१८६५
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२६-५



REFBK-0014471

४००८२

चरित्र ~~आत्मविकास~~

२८.१२.६५

१२८५

२१.२।।

१६६७

[illegible] ग्रंथ सं[illegible]ग्र. ठा[illegible] स्वच्छता

अनुक्रम ४००८२ दि: ~~२८।१२।६५~~

क्रमांक ~~१२६७~~ नों दि: २८।१२।६५

१२६५

# गुरु-शिष्य
# यांच्या
# आठवणी व चरित्र

## गुरु-शिष्य यांच्या आठवणी व चरित्र :—

या ग्रंथांतील विषय व त्यांचे लेखक :—

(१) लो० टिळक यांच्या आठवणी व अवांतर वृत्तविशेष.

आणि

(२) साहित्यसम्राट् केळकर यांचें चरित्र व अवांतर वृत्तविशेष.

लेखक : आठवणीकार देशभक्त सदाशिव विनायक बापट.

(३) आठवणीकार दे. भ. सदाशिवराव यांचीं चरित्र-चित्रें

लेखक : (१) श्री. वा. कृ. भावे, बी. ए.

(२) श्री. किशोर शंकर बापट, बी. ए. (ऑनर्स)

(४) श्री. सदाशिवराव बापट यांचे लेख, भाषणें व अवांतर वृत्तविशेष.

(५) श्री. बापट यांचे विषयींचीं विशेष पत्रें.

# गुरु-शिष्य

यांच्या

# आठवणी व चरित्र

[गुरु : लोकमान्य टिळक व साहित्यसम्राट् केळकर
शिष्य : आठवणीकार देशभक्त सदाशिवराव बापट]

: संपादक :


**श्री. किशोर शंकर बापट,**
(…ऑनर्स)
बी. एस्सी.,
संपादक 'केसरी', पुणें.



REFBK-0014471


विक्रेते


अनाथ विद्यार्थी गृह
प्रकाशन, पुणे २


मूल्य सहा रुपये


शके १८८७ सन १९६५

प्रकाशक :
कि. शं. बापट, बी.ए. (ऑनर्स)
१२९४ ब, सदाशिव, पुणें २.

© प्रकाशकाधिन

प्रसिद्धि : १ ऑगस्ट १९६५
' लोकमान्य पुण्यतिथि '

मुद्रक :
दि. दा. गांगल, एम्. एस्सी.,
लोकसंग्रह मुद्रणालय,
१७८६, सदाशिव पेठ, पुणें २.

গ্রন্থাগার
গ্রহণ ৯০০৮২ তাং ২৫/১১/৮৪
সংখ্যা ৮৮০
শ্রেণি



ती. रा. विनायक गणेश तथा भाऊसाहेब बापट व ती. सौ. वहिनी
(ती. आण्णांचे वडील व मातुःश्री)

# अर्पणपत्रिका

श्रीसमर्थ, लोकमान्य; आणि साहित्यसम्राट

या त्रिमूर्तींचे

एकनिष्ठ भक्त, व माझे वंदनीय पितृव्य तीर्थस्वरूप

सदाशिव विनायक तथा आण्णासाहेब बापट

यांना, लोकमान्यांच्या 'आठवणीं'च्या

निर्मितीची स्फूर्ति, ज्यांचेमुळें झाली,

त्या, 'आठवणीं'च्या पावन गंगेचें

पवित्र उगमस्थान असलेले, ती.

आण्णासाहेब यांचे टिळक-

-प्रेमी पितृदेव तीर्थरूप, व

माझे शिरसावंद्य

पितामह तीर्थस्वरूप

कै. **विनायक गणेश** तथा **भाऊसाहेब बापट**

यांचे पवित्र चरणीं

हा, परमपूज्य '**मूर्ती-त्रयीं**'चा स्मृतिग्रंथ अत्यंत कृतज्ञतापूर्वक समर्पण केला आहे.

—किशोर शंकर बापट

**संपादक**

ठाणे. स्थलभित.
४००८२ वि: चारित्र
८८० नों दि: २८।१।५९

# प्रस्तावना

टिळकभक्त श्री. सदाशिवराव तथा अण्णासाहेब बापट यांच्या वाङ्मयीन जीवितकार्याचा नव्या पिढीस परिचय करून देणारा हा ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचे पुतणे श्री. किशोर बापट यांचें अभिनंदन केलें पाहिजे. कै. न. चिं. तथा तात्यासाहेब केळकर यांच्या कन्या कै. कमलाबाई देशपांडे यांनीं अनेक वेळां म्हटल्याप्रमाणें 'अण्णा हे खरोखरीच टिळकयुगाचे चालतेबोलते ज्ञानकोशच होत.' टिळकयुगांतील सर्वच टिळकभक्तांची 'प्रस्थानत्रयी' गीता, दासबोध व केसरी असे. अर्थात् त्यास बापट हेहि अपवाद नव्हते. टिळक-केळकरांच्या निकटवर्ति सान्निध्यामुळें देशाच्या राजकारणाचीं सूत्रें गायकवाडवाड्यांतून लोकमान्यांच्या समर्थ हातांनीं संभाळलेली जशी बापटांना पहाण्यास मिळालीं तशीच लोकमान्यांच्या निधनानंतर 'केसरी'च्या सहाय्यानें आपल्या लेखणीचा कोट उभारून केळकरांनीं केलेला टिळक-तत्त्वांचा सांभाळहि बापटांनीं पाहिला. त्यांत बापटांची टिळक-केळकरांवरील भक्ति अनन्य ! मग ते त्या काळांतील राजकारणाचे,



प्रस्तावनाकार

वादसंवादांचें, झटापटीचें, विद्वत्तेचें, व्यक्तिगुणांचें वर्णन करण्यांत रंगून न गेलें तरच आश्चर्य ! ते तर टिळक-केळकर चरित्रगानांत स्वतः तल्लीन होतातच; पण स्वतःबरोबर इतरांची हृदयवीणाहि नकळत झंकारून जातात. पण हें अहोभाग्य सर्वांच्याच वाट्याला कोठून येणार ? व म्हणूनच त्या 'अमृतधारे'ची कांहीं वानगी या ग्रंथरूपानें कोणत्याहि साहित्यप्रेमी महाराष्ट्रीयास आतां चाखावयास मिळेल याचा मला विशेष आनंद वाटतो. श्री. किशोर बापट यांनी संपादित केलेला हा गुरु-शिष्यांच्या आठवणींचा हा ग्रंथ प्रसिद्ध झालेला पहाण्यास व त्यांचें कौतुक करण्यास दुर्दैवानें आज कमलाबाई देशपांडे नाहींत.

या ग्रंथाची रचना चार भागांत केली गेली आहे; पण या ग्रंथाच्या सर्वांगीं वावरणाऱ्या व्यक्ति आहेत खऱ्या तीन व नातीं दोन आणि तेंहि अंतीं अद्वैत ! ग्रंथाचें नामाभिधान पहातां ही गोष्ट कोणाच्याहि सहज लक्षांत येईल. गुरु-शिष्याचें नातें हें जसें टिळक-केळकरांच्या पुरतें सार्थ तितकेंच टिळक-बापट किंवा केळकर-बापट यांच्या बाबतींतहि यथार्थच होय.

श्री. सदाशिवराव बापट यांनीं भगीरथ प्रयत्नांनीं टिळक-आठवणी-आख्यायिकांचे तीन खंड प्रसिद्ध केले व त्या कामीं सर्वांकडून एकमुखी वाहवा मिळविल्यानंतर त्यांच्याकडून एका रसाळ टिळक-चरित्राची अपेक्षा केली गेली व तें स्वाभाविकच होतें. सदाशिवराव बापटांनीं तें कार्य पुरेंहि करीत आणलें होतें. पण दुर्दैवानें तयार केलेली टिळक चरित्राची प्रत टिळकमंदिर संस्थेतर्फे खानदेशांत त्यांनीं काढलेल्या 'स्वराज्या'वरील व्याख्यानाच्या प्रचारदौऱ्यांत जेव्हां गहाळ झाली, तेव्हां पुत्रनिधनाप्रमाणेंच

दुसरा असहनीय मानसिक धक्का सदाशिवरावांना बसला. त्यांत पुढें 'सार्वजनिक–सभे'च्या इमारतीस आग लागून सर्व महत्त्वाचा पत्र-व्यवहार व ऐतिहासिक कागदांचा संग्रह जळाला. याचा परिणाम अण्णांवर इतका झाला कीं, आधींचीच त्यांची संकोची व अंतर्मुखवृत्ति अधिकच संकोचून त्यांनीं हातीं लेखणी धरण्याचेंच जवळजवळ सोडलें! टिळक आठवणी-आख्यायिकेचे खंड कालांतरानें बाजारांत उपलब्ध होईनासे झाले. लोकमान्यांच्या निधनास आतां चव्वेचाळीस वर्षें झालीं आहेत व केळकरांच्या निधनासहि वीस वर्षें होऊन गेलीं. व्यक्ति नष्ट झाल्या म्हणजे हळूहळू त्यांच्या आठवणीहि पुसट होत जातात. आठवणींतील भावनात्मक आपले-पणा व जवळीक चरित्र-ग्रंथांतून जाणवत नाहीं. अशा स्थितींत बापट-लिखित टिळक-केळकरांच्या आठवणी एकत्रित प्रसिद्ध करून महाराष्ट्रांतील नवीन पिढीच्या डोळ्यापुढें अर्वाचीन इतिहासांतील सुवर्णपानें लिहिणाऱ्या दोन सुपुत्रांच्या जीवितकार्याचा तेजस्वी काळ उभा करण्याचें कार्य किशोर बापटांनीं केलें आहे.

या कार्याबद्दल पुन्हां त्यांचें अभिनंदन करून श्री. सदाशिवराव बापट यांच्या अनन्य गुरुभक्तीस मी प्रणाम करतों. अमोल भरजरी शालूला डकविलेलें त्याच्या किमतीचें कागदी चिटोरें जसें रूपभंग करणारें भासतें तशीच ही प्रस्तावना!

**दिनांक : २६ जुलै १९६५**
**केसरी कार्यालय, पुणें २.**

**ज. श्री. टिळक**



किशोर शंकर बापट—संपादक

# आत्मनिवेदन

(पुढील खुलासेवजा मजकूर वाचल्याखेरीज या ग्रंथांतील कांहीं विषयांचें वैशिष्टच व रहस्य लक्षांत येणार नाहीं, म्हणून प्रथम खालील खुलासेवजा मजकूर अवश्य वाचावा अशी आग्रहपूर्वक विनंति आहे.)

मी शुद्ध मतीमंद । घेतो चरित्राचा छंद ।।

—श्रीआत्माराम बोवा

**नदीचा उगम**

(१) माझे परमपूज्य चुलते तीर्थस्वरूप श्री. सदाशिव विनायक तथा आण्णासाहेब बापट यांच्या अतिनिकट सहवासांत मी असल्यामुळें " दुरून डोंगर साजरे, जवळ जाता, दऱ्या खोरे " या अर्थपूर्ण अनुभविक म्हणीचा मलाहि अनुभव येतो कीं काय, अशी मोठी भीति वाटे! परंतु सुदैवानें याच्या अगदीं उलट त्यांचे बाबतींत वस्तुस्थिति असल्यानें व तसा मला नित्य अनुभव येत असल्यामुळें, किंबहुना श्री. वा. कृ. भावे यांनीं ती. आण्णासाहेब यांच्याविषयीं आपल्या चरित्र-लिखाणाच्या शेवटीं लिहिलेल्या त्यांच्या "निश्चित" शब्दांत बोलावयाचें म्हणजे, या "सत्पुरुषाची" योग्यता मला दिवसेंदिवस प्रत्ययास येऊं लागली. श्री. भावे यांच्यासारख्यांनीं आपल्या बहुत दिवसांच्या, नित्य अनुभवाच्या व निकट परिचयाच्या शेवटीं ती. आण्णासाहेब यांचेबद्दल स्वयंस्फूर्तीनें वरीलप्रमाणें विचारपूर्वक केलेलें मूल्यमापन उपेक्षणीय नसून लक्षांत घेण्यासारखें आहे यांत शंका नाहीं. धर्म आणि देश यांच्या उद्धाराच्या गोष्टीशिवाय दुसरा चिंतनाचा विषय या थोर पुरुषापुढें नसल्यामुळें, केवळ त्याच दृष्टीनें त्यांचे सर्व व्यवहार होत असतात आणि त्यांतच त्यांचें मोठेपण दिसून येतें. हें त्यांचें वैशिष्टच जाणूं इच्छिणाऱ्या मंडळींना, आपण लेखाच्या द्वारें कांहीं सांगावें असें मला नेहमीं वाटे. पण अनेक कारणांमुळें मजकडून तसें घडलें नाहीं. ती. आण्णासाहेब बापट यांच्याविषयीं विशेष माहिती मिळावी म्हणून त्यांची बरीच

मित्रमंडळी अत्यंत आगत्यानें नेहमीं त्यांना विचारीत असतात. पण आण्णांच्या स्वभावानुरूप ती सांगण्यास ते फार टाळाटाळ करितात; किंबहुना तसें सांगण्याच्या ते मनापासून अगदीं विरुद्ध आहेत. याचें कारण, "नव्हे कार्यकर्ता, भूमीभार झालों। तुझा दास मी व्यर्थ जन्मास आलों ॥ काय करूं रे क्रिया घडेना। स्वहीत माझें होता दिसेना ॥" असें स्वत:विषयीं ते नेहमीं म्हणत असतात. यामुळें ते आपल्या प्रसिद्धीच्या बाबीस मान्यता देत नाहींत. ही त्यांची विचारसरणी केसरीचे मुख्य संपादक श्री. वा. कृ. भावे यांना पूर्णपणें माहीत असल्यानें ती. आण्णांना, **मुळींच कळूं न देतां**, बारा वर्षांपूर्वीं, म्हणजे दिनांक ६ डिसेंबर १९५२ च्या "स्वराज्य" पत्राच्या अंकांत त्यांचेविषयीं एक लेख त्यांनीं प्रसिद्ध केला. नंतर तो लेख आण्णांचे पाहण्यांत आला. तो पाहून ते चकित झाले व श्री. भावे यांचेकडे जाऊन त्यांनीं त्याबद्दल आपली तीव्र नाखुषी व्यक्त केली. पुढें सुदैवानें मला अनायासें तो लेख पाहावयास सांपडला व तो मीं सांभाळून ठेवला. पुढें त्यांत माझ्या माहितीप्रमाणें थोडच्या दुरुस्त्या व कांहीं जरूर त्या सुधारणा करून तो मीं पुनर्मुद्रित केला. त्याचीं थोडीं पुस्तकें तयार करून तीर्थस्वरूप आण्णांच्याविषयीं माहिती पाहिजे असलेल्या सुहृदांची उत्कंठा पूर्ण करण्याकरितां तीं पुस्तकें त्यांचेकडे, लोकमान्यांच्या गेल्या पुण्यतिथीस म्हणजे दिनांक १ ऑगस्ट १९६४ रोजीं पाठविलीं. ती. आण्णांचे आप्त, नातेवाईक, स्नेही, परिचित, व ऋणानुबंधी वगैरेंच्या विस्तृत गोतावळ्यांतील बहुतेक सर्वांना हीं पुस्तकें मीं नजर केलीं. हें पुस्तक विक्रीकरितां प्रसिद्ध केलें नसून तें केवळ खाजगी स्वरूपाचें असल्यामुळें, अर्थातच वर्तमानपत्रकर्त्यांकडे पाठविलें नाहीं. तथापि, 'केसरी-गृह' हें ती. आण्णासाहेब यांचें 'गुरुगृह' असल्यामुळें तें त्या संस्थेस कृतज्ञतापूर्वक नजर करण्यांत आलें. विशेष म्हणजे वरील सर्वांनीं त्यांचें स्वागत करून कौतुक केलें.

## सुहृदांच्या सूचना व आण्णांची भावना

त्यांपैकीं पुष्कळांनीं पत्रद्वारें व समक्षहि मला कांहीं सूचना केल्या. आण्णांनीं आत्मचरित्र लिहावें, निदान आपल्या आयुष्यांतील आठवतील त्या सर्व प्रमुख आठवणी त्यांनीं लिहाव्या, तसें नच केलें तर मुख्य मुख्य प्रसंगांचे टिपणीच्या

रूपानें निवेदन करावें. कारण अनेक थोरां मोठ्यांशीं खाजगी व सार्वजनिक कामांत त्यांचा निकट संबंध आल्यामुळें, त्या व्यक्ती व ते प्रसंग यांचें ऐतिहासिक दृष्टचा फार महत्त्व असल्यामुळें ते सर्व त्यांनीं अवश्य लिहावेत वगैरे विविध स्वरूपाच्या त्या सूचना होत्या. त्या करणाऱ्यांपैकीं फक्त तीन चार जणांचाच उल्लेख करितों. श्रीमति विदुषी डॉ. कमलाबाई देशपांडे लिहितात, " ती. आण्णासाहेबांचा जीवनवृत्तांत सविस्तर लिहिला जावा असें मला फार वाटतें. तुमचे काका आण्णासाहेब हे एक चालते बोलते ज्ञानकोश व ऐतिहासिक आठवणींचा कोश आहेत. त्यांचा गेलीं पन्नास वर्षें पुण्यांतील अनेक लहानमोठ्यांशीं व महाराष्ट्रांतील प्रमुख लोकांशीं दाट संबंध आलेला आहे. ते जुन्या आठवणी किती रसाळपणें सांगतात तें तुम्ही जाणतांच. म्हणून त्यांचेकडून गोष्टी तुम्हीं ऐकाव्या व रात्रीं त्या आठवून सर्व लिहून काढाव्या, असें केलेंत तर अनेक दुर्मिळ व बोधपर गोष्टींचें संक-लन तुम्हीं केल्याचें श्रेय जोडाल. तरी हें अवश्य करावें." दिवाणबहादूर श्री. के. वि. गोडबोले यांचीं यासंबंधीं कांहीं पत्रें आलीं. एका पत्रांत ते लिहितात, "श्री. आण्णासाहेब यांचेसंबंधीं तुम्हीं लिहिलेल्या फारच छोटचा पुस्तिकेबद्दल तुम्हांस धन्यवाद. पण तेवढ्यानें मात्र माझें अगर कोणाचेंहि मुळींच समाधान होणार नाहीं. वास्तविक आण्णासाहेब यांनींच आपलें आत्मचरित्र लिहिणें आवश्यक आहे. पण त्यांच्या संकोचित व विनयसंपन्न स्वभावास तें रुचणार नाहीं. म्हणून त्यांचें विस्तृत चरित्र तुम्हींच लिहिण्याचा प्रयत्न केला पाहिजे." फार काय पण, सुप्रसिद्ध इति-हास संशोधक श्री. य. न. केळकर यांची, मला पुढीलप्रमाणें कळविण्या-पर्यंत मजल गेली ! ते लिहितात, "श्री. सदाशिवराव तयार असतील तर मी स्वतः रोज दोन तास त्यांचा 'लेखक' म्हणून त्यांचें चरित्र लिहून घेण्यास आनंदानें येत जाईन !" तसेंच सदर पुस्तकावर अभिप्राय देतांना दि० २७ जून १९६५ चे अंकांत केसरीनेंहि लिहिलें आहे कीं, "श्री. बापट यांनीं आपलें स्वतःचें आत्मचरित्र लिहिल्यास तें फारच उपयुक्त ठरेल." वरील सर्व सूचना मला फार आवडल्या, आनंदहि झाला. त्याप्रमाणें मीं बहुत प्रयत्नहि केला; पण या बाबतींतील स्वतः ती. आण्णांच्या विशिष्ट विचारसरणीमुळें त्यांत मला यश येईना हें माझें दुर्दैव होय. कारण ते

स्वत:विषयीं कधीं कांहीं बोलूं इच्छित नाहींत. यास त्यांच्या दृष्टीनें त्यांचीं तशीं कारणेंहि आहेत. हें न सांगितल्यास त्यांस मजकडून अन्याय होईल. त्यांचें म्हणणें असें कीं, "माझा जीव तो काय, माझें कार्य तें काय, त्याचा दुसऱ्यास उपयोग काय, शिवाय 'नसे भक्ति, ना ज्ञान, ना ध्यान कांहीं ; युक्ति नाहीं, बुद्धि नाहीं, विद्या नाहीं विवेकिता । नेटके लिहिता येईना । अर्थ तो सांगता येईना । कळेना, स्फूर्ती होईना । प्रत्यहि पोट सोडीना ॥' असें श्रीसमर्थांनीं म्हटल्याप्रमाणें माझी खरी स्थिती आहे; शिवाय 'आपली आपण करी स्तुती' हें अहंकाराचें मूळ असून त्यांत आत्मनाश आहे" असें वैराग्यगर्भ व शुद्ध नम्र भावानें ते नेहमीं म्हणत असतात. या शिवायहि मुख्य कारण म्हणजे 'मना मानवाची नको कीर्ति तूं रे ।' या समर्थांच्या वचनांची त्यांचे मनावर विलक्षण पकड बसल्यामुळें व मोर नाचतो म्हणून लांडोरीनेंहि नाचणें हास्यास्पद आहे असें कांहींसें आत्मनिंदापर ते नेहमीं म्हणत असल्यामुळें या कामीं स्वत: त्यांच्याकडून कांहींहि होणें शक्य नाहीं, असें मला पक्कें दिसून आलें. फार काय पण या कामीं प्रथम त्यांनीं मला तीव्र विरोधहि केला; पण माझ्या विशेष हट्टामुळें त्यानीं ही वृत्ती सोडून ते सात्त्विक वृत्तीचे असल्यामुळें फक्त उदासीन राहिले! तथापि अशा प्रतिकूल परिस्थितींत मला हें काम करावें लागलें. त्यामुळें तें मना-प्रमाणें चांगलें होऊं शकलें नाहीं याबद्दल वाईट वाटतें. हरि इच्छा.

## ती० आण्णांची विचारसरणी

श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या 'गतगोष्टी' या आत्मचरित्र ग्रंथांतील त्यांनीं लिहिलेल्या 'हृद्गत' या अति उत्कृष्ट प्रकरणाची व त्यांतील आत्मचरित्र-विषयक मजकुराची करण्यांत आलेली तात्त्विक मीमांसा ती. आण्णांना फारच फार बहारीची वाटते. इतकेंच नव्हे तर, आत्मचरित्र लिहिण्याची प्रथा आण्णांना सर्वस्वीं मान्य असून तिचें तें समर्थनहि कर-तात. पण स्वत:चें चरित्र लिहिण्याचें तर राहूं द्याच, पण त्या बाबतींत दुसऱ्यास कांहीं सांगण्यास—बोलूं देण्यासहि, ते तयार नसतात हें आश्चर्य आहे! पण यास कांहीं इलाज नाहीं. तथापि स्वत:ची बाब सोडून इतरां-विषयीं व सार्वजनिक गोष्टीविषयीं लिहिणें म्हणजे एक प्रकारचा इतिहास

निर्माण करणें,---सार्वजनिक धनसाहित्यांत आपलाहि कण घालणें---यास मात्र ते तयार असतात व यास ते फार महत्त्व देतात. पण या ग्रंथांतील, भाग १ (आ) मध्यें दिलेल्या " आण्णासाहेब यांस बसलेले सहा मानसिक धक्के " व "आण्णांना न कळत बसलेले दुःखाचे तीन जबर बुक्के" या शीर्षकाखालील मजकुरामुळें, " आपण 'अपयशी' आहोंत, आपले हातास यश नाहीं, आपली तशी कांहीं पुण्याई नाहीं म्हणून आतां कोणत्याहि सार्वजनिक वाङ्मयीन कामांत हात घालावयाचा नाहीं" असें आत्मअविश्वासामुळें कांहीं न करण्याचें त्यांचे मनानें पक्कें घेतल्यानें ते आतां अशा कामीं कांहींहि करूं धजत नाहींत हें सिद्ध झालें आहे. त्यामुळें नाइलाजास्तव अखेर त्यांचा नाद कायमचा सोडून देऊन मीं माझ्यापुरतें काय केलें तेवढें सांगतों.

### माझा छंद; त्याचा भंग

तीर्थस्वरूप आण्णांचें थोडेंबहुत तरी चरित्र लिहिण्याचा मला 'छंद' असतांहि, या आत्म-निवेदनाच्या आरंभीं श्रीसमर्थांचें चरित्र लिहिण्याच्या कामीं उद्‌धृत केलेल्या श्रीसमर्थशिष्य श्रीआत्मारामबोवांच्या वचनांतील शब्दांत सांगावयाचें म्हणजे माझ्या "मति-मंदत्वा"मुळें, मला त्यांत यश आलें नाहीं म्हणून फार दुःख होतें. तथापि मी निराश मात्र मुळींच झालों नाहीं; उलट दीर्घोद्योग चालू ठेविला.

### विरोधाच्या कर्दमांतील ग्रंथाचें कमलपुष्प

माझे मनांतील अंतरंग प्रगट करावयाचे म्हणजे मीं प्रस्तुतचा माझा हा छंद अजिबात सोडावा म्हणून आण्णांनीं प्रथम सात्त्विक कळवळ्यानें, पण पुढें थोड्या रागानेंहि, माझेशीं वागण्यास सुरुवात केली; फार काय पण मी तिकडे दुर्लक्ष करीत आहे---माझा हट्ट सोडीत नाहीं, यामुळें घरांतील वातावरणहि तप्त होऊं लागलें, पण मी हें सत्कर्मच करीत आहें अशा श्रद्धेनें व शुद्ध भावनेनें त्यांचा हा तीव्र विरोध पचवून मीं आपला उद्योग तसाच पुढें चालू ठेवला व त्यांत मला यश येण्याची खात्री वाटूं लागली. "पुणें सार्वजनिक सभे"चे गेलीं ५५ वर्षें आण्णासाहेब चिटणीस असल्यामुळें त्या संस्थेच्या इमारतींतील एका खोलींत त्यांनीं आपला

खाजगी सर्व दप्तरखाना ठेविला होता. पण १९५२ सालीं त्या इमारतीच्या भयंकर अग्निप्रकोपांत त्यांच्या सर्व संग्रहाचा नाश झाला.

त्यांत १९२० पर्यंतचे--टिळकयुगापर्यंतचे त्यांच्या कागदपत्रांचे व्यवस्थित ठेवलेले सर्व रुमाल सर्वस्वीं नष्ट झाले. ती० आण्णांच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या माहितीचा मोठा भाग अशा प्रकारें लुप्त झाला. १९२१ ते १९५२ हा ३० वर्षांचा काल आण्णांच्या कर्तृत्वाचा असल्यामुळें त्या काळांतील कागदपत्रांचे बरेच रुमाल होते. पण तेहि कांहींसे आगींत सांपडल्यामुळें त्यांच्या उर्वरित भागांपैकीं अगदीं थोडाच भाग हाताशीं लागला. १९५२ ते १९६४ हा १२ वर्षांचा त्यांच्या कांहींसा नाउमेदीचा काल असतांहि त्यांतील बरेंच साहित्य उपयोगी पडलें. अशा रीतीनें वरील सर्व कागदपत्रांच्या संशोधनांतून शक्य त्या मिळालेल्या थोडचाबहुत माहितीचा मीं उपयोग करून घेतला आहे. गोष्टीवेल्हाळ, व तसेच प्रेमळ आण्णांशीं गप्पागोष्टी करतांना त्यांच्याविषयींच्या ज्या अनेक गोष्टी एकामागून एक सहज मला समजल्या त्यांवरून, त्यांच्या धाकामुळें, थोडचाच गोष्टींचीं शब्दचित्रें देण्याचा मीं प्रयत्न केला आहे, हें भाग १ (आ) मधील मजकुरावरून दिसून येईल. त्याशिवाय बाकीच्या सर्व मजकुराची या ग्रंथांत कालक्रमानुसार मांडणी केली आहे.

### हें चरित्र नसून चरित्र-चित्र आहे

हें पुस्तक म्हणजे ती० आण्णांचें चरित्र नसून त्यांच्याविषयींच्या अगदीं थोडचा माहितीबरोबर, मुख्यतः त्यांनीं लिहिलेल्या व आतां दुर्लभ झालेल्या टिळक-केळकर यांच्याविषयींच्या वाङ्मयाचा व आण्णांच्या इतर अल्प वाङ्मयसेवेचा वाचकांस करण्यांत आलेला पुरवठा, किंवा वाटल्यास गरिबाघरचा छोटा आहेर म्हणा, वाङ्मय-धनत्तर वाचकांस मी अर्पण करीत आहे.

### पुस्तकाचे चार भाग

या पुस्तकांतील मजकुराचे चार भाग केले असून त्यांतील मजकुराचीं निदर्शक अशीं शीर्षकें त्या त्या भागास दिलीं आहेत. पहिल्या भागांत कै. श्री. वा. कृ. भावे यांनीं आण्णांचे विषयीं लिहिलेला चरित्रविषयक मुख्य

लेख व आण्णांचे विषयीं मुळांत असलेल्या विपुल पण अनुपलब्ध माहितीपैकीं मला त्यांच्या कागदपत्रावरून उपलब्ध झालेली अगदीं थोडीशी माहिती यांचा समावेश केला आहे. दुसऱ्या व तिसऱ्या भागांत अनुक्रमें लो. टिळक व साहित्यसम्राट् केळकर यांचेविषयीं आण्णांनीं जें वाङ्मय स्वत: लिहिलें; प्रसिद्ध केलें व कांहीं अप्रसिद्ध होतें तेवढ्याचाच समावेश केला आहे; व चवथ्या भागांत आण्णांचे प्रसिद्ध झालेल्यापैकीं कांहीं थोडे लेख, अप्रसिद्ध भाषणें व पत्रांच्या रूपानें त्यांचेविषयींची सर्वसाधारण थोडी पण मनो-रंजक व आवश्यक माहिती दिली आहे. वरील सर्व मजकूर कालक्रमानुसार दिला आहे. तात्पर्य, ती. आण्णांचें समग्र व गूढ चरित्र कळणें व प्रसिद्ध करणें अशक्य असल्याचें मला दिसून आल्यामुळें, केवळ उपलब्ध असलेल्या सामग्रीच्या रूपानेंच त्यांचें अस्पष्ट व नाइलाजास्तव अपुरें चरित्र-चित्र रेखाटण्याचा अल्पसा नम्र प्रयत्न मीं केला आहे.

## ती. आण्णांचें टिळक-वाङ्मय

दुसरा भाग हा लोकमान्यांच्या आठवणी, टिळक सूक्तिसंग्रह वगैरे विषयक आहे. हें टिळक वाङ्मय प्रसिद्ध होऊन आतां ४० वर्षें होत आलीं. आरंभीं हें विशिष्ट वाङ्मय सर्वत्र कसें गरजलें याचें पुन्हां वर्णन येथें करण्याचें कारण नाहीं; कारण याच ग्रंथांत भाग ४ मध्यें केळकर-आठवणी ग्रंथ प्रसिद्ध केल्याबद्दल भरलेल्या त्यांच्या सत्कार-सभेंत स्वत: आण्णासाहेब बापट यांनीं या बाबतींत केलेलें विस्तृत भाषण दिलें आहे, त्यावरून सर्व खुलासा होईल. हें अवीट टिळक-वाङ्मय लोकांना अजून पाहिजे आहे. त्याची नित्य मागणी होत आहे. पण बाजारांत अगर ग्रंथाचे संपादक श्री. बापट यांचेजवळ अगर इतरत्र कोठेंहि त्याची एकहि प्रत शिल्लक नाहीं. पुन्हां तें प्रचंड सर्व वाङ्मय प्रसिद्ध होणें अशक्य आहे.

## लोकमान्यांच्या मराठी-आठवणीचा गुजराथींतील आणखी एक ताजा ग्रंथ !

पूर्वीं श्री. बापटकृत लोकमान्यांच्या आठवणींचा एक भाग कोणीं गुजराथी भाषेंत प्रसिद्ध केला. त्याप्रमाणें लोकमान्यांच्या आठवणींच्या अवीट व दुर्लभ वाङ्मयाच्या क्षुधेचा ताजा पुरावा असा कीं, चाळीस वर्षांनंतर,

गेल्या जानेवारीमध्यें, श्री० बापट यांच्या परवानगीनें, बडोदें येथील प्रो० आर. पी. मेहता यांनीं गुजराथी भाषेंत भाषांतर करून श्री. एम्. कोठारी या ग्रंथप्रकाशकांनीं गुजराथींत " लो० टिळकना जीवन प्रसंगो" या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध करून त्यांत बापटकृत आठवणीग्रंथांतील सुंदर ३०१ आठवणींचे प्रसंग प्रसिद्ध केले आहेत; व या पुस्तकास गुजराथ राज्याचे मुख्यमंत्री श्री. जसवंतराय मेहथा यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. या पुस्तकाची पहिली आवृत्ति म्हणून तीन हजार प्रती काढिल्या आहेत. या एका उदाहरणावरूनच लोकमान्यांच्या आठवणींच्या लोकांच्या तीव्र क्षुधेची कल्पना येईल !

## प्रकाशित व अप्रकाशित आठवणी

वर म्हटल्याप्रमाणें वाचकांची ही बौद्धिक क्षुधा कांहींशीं भागवावी म्हणून लोकमान्यांच्या आठवणींच्या तीन खंडांच्या मिळून १७०० पृष्ठांतील **फक्त एकट्या बापटांच्या** सुमारें अडीचशेंहून अधिक आठवणींचे प्रसंग या ग्रंथांत छापिले आहेत; व याशिवाय आठवणींच्या तीनहि खंडांत प्रसिद्ध न झालेल्या, पण इतरत्र प्रसिद्ध झालेल्या, श्री. बापट यांच्या कांहीं उत्तम आठवणींचा समावेश या ग्रंथांत करण्यांत आला आहे. तसेंच आतांपर्यंत कोठेंहि प्रसिद्ध न झालेल्या व केवळ या ग्रंथाकरितांच कांहीं नव्या आठवणी त्यांचेकडून मुद्दाम लिहून घेऊन त्या या ग्रंथांत प्रसिद्ध केल्या आहेत, हेंहि याचें एक वैशिष्ट्य होय.

## श्री. केळकर यांचें अभिनंदनपर पत्र

आठवणींच्या ग्रंथाच्या यशस्वितेबद्दल रसिकवर्य साहित्यसम्राट् श्री. केळकर यांनीं दे. भ. बापट यांना पाठविलेलें सुंदर अभिनंदनपर-पत्र, आठवणींच्या दुसऱ्या खंडांत प्रसिद्ध झालेलें, या ग्रंथांत छापिलें आहे. त्यावरून या ग्रंथाची महती कळून येते.

## बापटांचीं आत्म-निवेदनें : 'लोकमान्यांचे बॉस्वेल'!

लोकमान्यांच्या आठवणींच्या तिन्ही खंडांस, टिळक-सूक्ति-संग्रह या ग्रंथास व साहित्यसम्राट् केळकर यांच्या आठवणी ग्रंथास आण्णासाहेब बापटांनीं आत्म-निवेदनें लिहिलीं आहेत तीं अपूर्व व नमुनेदार असल्याबद्दल त्या वेळीं त्यांची

फार प्रशंसा झाल्यामुळें, व दीपस्तंभाप्रमाणें आठवणींच्या ग्रंथांवर त्यांचा विशिष्ट प्रकाश पडत असल्यामुळें, आणि मुख्यतः आठवणींचें रहस्य व अंतरंग कळण्यास त्यांचा विशेष उपयोग होत असल्यामु , तीं पांचहि आत्म-निवेदनें मुद्दाम या ग्रंथांत समाविष्ट करण्यांत आलीं आहेत. आण्णासाहेब यांच्या 'आत्मनिवेदना'चे हे 'अलंकार'हि आठवणींच्या सुवर्णरसानें मढविलेले असल्याचें दिसून येतें! रसिकवर्य कै. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांना बापटांचीं ही 'आत्मनिवेदनें' इतकीं आवडत कीं, ते बापटांना ' लोकमान्यांचे बॉस्वेल' म्हणत व विनोदानें त्यांस तशी हांकहि मारीत! असो; तसेंच प्रस्तुत ग्रंथाकरितां ती. आण्णांचें बालबोध, मोडी, व इंग्रजी हस्ताक्षरांचे नमुने त्यांस मीं मागितले असतां, त्यांस त्यांनीं आपल्या वृत्तीप्रमाणें स्पष्ट नकार दिला. पण अखेर माझ्या हट्टास्तव, आढेवेढे घेऊन कां होईना, ते त्यांनीं दिले; व गम्मत अशी कीं, तेहि आठवणींच्या स्वरूपांत!! असें त्यांचें 'आठवणींचें' मोठें 'वेड' म्हणा, किंवा कठीण व्रत आहे म्हणा! म्हणूनच श्रीमंत खापर्डे आण्णांचें मोठें कौतुक करीत! लोकमान्यांच्या व साहित्य-सम्राटांच्या आठवणींचें ठिकठिकाणचें पवित्र उदक नाना मार्गांनीं अडवून आणून त्याच्या सरोवराचे चार सुंदर ग्रंथ निर्माण करण्यास आण्णांना कसे भगीरथ प्रयत्न करावे लागले याचें विस्तृत वर्णन आठवणींच्या चारहि ग्रंथांच्या व टिळक-सूक्ति-संग्रहाच्या आत्मनिवेदनांत करण्यांत आलेलें आहे. मागील, चालू व पुढील पिढ्यांना हा सर्व कथाभाग अज्ञात असणें स्वाभाविकच असल्यामुळें, सदर विषयाचें महत्त्व जाणून हा सर्व कथा भाग प्रसिद्ध करणें अगत्याचें व आवश्यक वाटलें.

### तात्यासाहेब केळकरांचा कित्ता गिरविला

पण तसें करितांना एका महत्त्वाच्या बाबीस मात्र त्यांनीं बगल दिलेली आहे. या बाबतींत त्यांचेशीं बोलतांना सहज समजलेली बाब येथें देतों. लोकमान्यांसारख्या महाजबाबदार पुरुषांच्या गोष्टी-आठवणी देणाऱ्यानें त्या सत्यास स्मरून काळजीनें व मुख्यतः आपल्या सहीनें दिल्या तरच त्यांचा स्वीकार ते करीत असत. शिवाय आठवणी देणाराकडून ते सामान्यपणें असें लेखी अभिवचनहि घेत कीं, पुढें मागें सदर मजकूर विवाद्य ठरलाच तर, प्रगटपणें तो सत्य असल्याचें मी सिद्ध करीन, इतकी दक्षता व सावध-

गिरी ते घेत असत. तथापि आठवणींचे ग्रंथ प्रसिद्ध झाल्यावर कोणी मत्सरानें तर कोणीं काक दृष्टीच्या टिळक-द्वेष्टयांनीं त्या ग्रंथांतील कांहीं विधानांबद्दल त्यांना कायदेशीर उपद्रव देण्यास कमी केलें नाहीं. कांहींनीं त्यांना वकील-सॉलिसीटरमार्फत नोटिसा देऊन कोर्टात खेंचण्यापर्यंत प्रयत्न केले! पण वर लिहिल्याप्रमाणें आण्णांची दक्षता, सावधगिरी व दूरदृष्टि त्यांना उपयोगी पडून ते त्या सर्वांतून पूर्णपणें यशस्वी बाहेर पडले. वरील हकीकत ही महत्त्वाची बाब असतांना ती कोणत्याहि आत्म-निवेदनांत न घालतां, तिला तुम्हीं आपल्या आत्म-निवेदनांत बगल कां दिलीत असें त्यांस मीं विचारिलें, तेव्हां ते हंसत म्हणाले, "किशोर, तूं मार्मिक प्रश्न विचारलास खरा! ऐक, सांगतों. लोकांना वाटतें तितकें हें काम सरळ, सोपें नव्हतें. लोकमान्यांचे जसे अनन्य भक्त व पक्षपाती लोक असत, तसेंच त्यांना शत्रु व निंदकहि जबर असत. म्हणून या कामीं केव्हां काय संकट ओढवेल याबद्दल मी फार जागृत असे. शिवाय माझ्यापुढें गु. तात्यासाहेब केळकर यांचा आदर्श मीं सतत ठेविला होता. त्यांनीं येवढें प्रचंड टिळक चरित्र लिहिलें, त्यांत त्यांनीं असेंच कांहीं वितंडवाद गाळले व एका आग्यावेताळानें लो. टिळकांविरुद्ध उठविलेल्या बंडास फारशी जागा न देतां, नुसता साधा उल्लेख करून ते सफाईनें पुढें गेले. तसें मीं माझें धोरण ठेविलें होतें. तात्पर्य, तात्यासाहेब हे कसलेले बडे ग्रंथकार असल्यामुळें त्यांचा या बाबतींत कित्ता मीं गिरविला व तो सुखदायक ठरला."

### बापटांच्या ग्रंथाच्या अर्पण-पत्रिका

तसेंच सदर पांचहि ग्रंथांस आण्णासाहेब बापटांनीं अर्पण-पत्रिका जोडल्या आहेत. यासंबंधीं एक आठवण नमूद करण्यासारखी आहे. आठवणींचा पहिला खंड प्रसिद्ध करण्याचे वेळीं त्या ग्रंथांत घालण्याकरितां आण्णांनीं लिहिलेली अर्पण-पत्रिका श्री. तात्याहेब केळकर यांस त्यांनीं दाखविली. ती पाहून तात्यासाहेव, बापटांच्या विषयींच्या विशिष्ट भावनेनें म्हणाले, "बापट, टिळकांच्या आठवणी लिहिण्याची स्फूर्ति तुम्हास तुमच्या वडिलांकडून झाली असल्याचें तुम्ही नेहमीं अभिमानानें सांगतां. म्हणून ही लिहिलेली अर्पणपत्रिका रद्द करून हा ग्रंथ तुम्हीं त्यांसच अर्पण करणें न्यायाचें व औचित्यास धरून होईल." यावर आण्णांनीं अत्यंत विनयानें व नम्रतेनें

त्यांस सांगितलें कीं, " आपण म्हणतां तें खरें आहे व आपल्या थोर मनास तें साजेसेंच आहे. पण आठवणींची ही मीं मागितलेली माधुकरी सार्वजनिक स्वरूपाची असल्यामुळें ती खाजगी रीतीनें केवळ घरच्या मंडळीस अर्पण करणें न्यायाचें कसें होईल हें आपणच सांगा. माझा हा अगदीं स्वतंत्र ग्रंथ असता तर आपली ही आज्ञा शिरसावंद्यच झाली असती." हें ऐकून तात्यासाहेबांना बरें वाटलें व आण्णांच्या उचित योजनेस त्यांनीं संमति दिली. आण्णांनीं आपल्या या पांचहि ग्रंथांस अनुरूप अशाच सार्वजनिक स्वरूपाच्या अर्पणपत्रिका जोडल्या आहेत व त्याचें गुणज्ञांनीं कौतुकहि केलें आहे. म्हणून त्यांचाहि समावेश या ग्रंथांत मुद्दाम केला आहे. यावरून आण्णांच्या मनाची ठेवण दिसून येते.

### अमोल प्रस्तावना-लेखक

लोकमान्यांच्या व साहित्यसम्राटांच्या आठवणी-ग्रंथांच्या चारहि खंडांस प्रस्तावना लेखक श्रेष्ठांतील श्रेष्ठ असे राजकीय व मुख्यत: वाङ्मयीन थोर पुरुष आण्णांना मिळाले हेंहि त्या ग्रंथांचें एक वैशिष्टय होय. लोकमान्यांच्या आठवणींचा पहिला, दुसरा व तिसरा खंड यांस अनुक्रमें साहित्य सम्राट् केळकर, लोकनायक अणे व श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनीं बहुमोल प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्याचप्रमाणें साहित्यसम्राट् केळकर यांच्या आठवणींच्या सुंदर ग्रंथास श्री. ज. स. करंदीकर यांनीं मार्मिक प्रस्तावना लिहिली आहे. "टिळक सूक्ति संग्रह" या ग्रंथास "खडे तात्त्विक बोल" कर्ते श्री. मोडक यांनीं रसाळ व गोड प्रस्तावना लिहिली आहे. लोकमान्यांच्या इंग्रजी आठवणींचेहि तीन भाग आण्णांनीं प्रसिद्ध केले. त्यांसहि असेच नामवंत प्रस्तावना-लेखक लाभले. या बाबतींत आण्णासाहेब यांचेशीं बोलतांना पुष्कळच महत्त्वाची व मनोरंजक माहिती समजली. इंग्रजी आठवणींच्या तिसऱ्या भागाला डॉ. ॲनी बेझंट यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. यासंबंधानें निरनिराळे अनेक प्रश्न विचारल्यावर आण्णा म्हणाले, "डॉ. ॲनी बेझंट यांचें लोकमान्यांविषयींचें मत मला माहीत होतें. अशा जगद्विख्यात व्यक्तीची प्रस्तावना आपल्या ग्रंथास मिळाली तर, अर्थातच, ग्रंथाचें महत्त्व वाढेल असें वाटल्यावरून मी त्या उद्योगास लागलों खरा; पण डॉ. बेझंट रूपी हिमालयापर्यंत मी पांगळा माणूस पोंचणार कसा असा प्रश्न पडला. दरम्यान त्यांचेकडून ती मिळविण्याकरितां कांहीं प्रयत्न

केले, पण त्याचा उपयोग झाला नाहीं. अखेर हिय्या करून प्रस्तावना लिहिण्याबद्दल मीच खुद्द डॉ. बेझंटबाईंना आग्रहाचें विनंति-पत्र लिहिलें. मात्र त्यांत मागील एका विशिष्ट प्रसंगाची आठवण करून दिली. ती अशी कीं, मी जेव्हां थिऑसॉफिस्ट झालों त्या वेळेला पुणें येथें त्यांच्या माझ्या झालेल्या एका भेटींत घडून आलेल्या एका विशिष्ट गोष्टीचा मीं उल्लेख केला होता. खरोखरच मोठ्या चमत्काराची व अद्‌भुत गोष्ट अशी कीं, माझ्यासारख्या एका यःकश्चित पामरास पाठविलेल्या उत्तरांत, इतक्या दीर्घकाळानंतर त्या गोष्टीचें स्मरण ठेवून त्या वंदनीय, थोर व्यक्तिमत्त्वाच्या लोभनीय विदुषीनें लिहिलें कीं, 'तुम्ही माझ्या सांप्रदायाचे अनुयायी असल्यामुळें तुमचें काम मला केलें पाहिजे. शिवाय तें पवित्र असल्यामुळें सुमारें पंधरा दिवसांनीं तुम्हास माझा मजकूर मिळेल'! पण पुढें कळलें कीं, त्या विलायतेस जाण्यास निघाल्या; यामुळें आतां मजकूर कसचा मिळतो असें वाटून मी निराश झालों. पण एके दिवशीं पोस्टानें एक मोठें पाकीट आलें; त्यावर फक्त 'Bapat—Disciple of Tilak—Poona' येवढाच पत्ता होता. त्यावर एडन पोस्टाचा शिक्का होता. पाकीट फोडून पाहातों तो, आंत डॉ. बेझंट यांचें पत्र व प्रस्तावना ! चकीत झालों. त्यांनीं बोटींत लिहून प्रस्तावना पाठविली. सदर प्रस्तावनेची मी मुद्दाम फॅक्सिमिली (facsimile) करून (ठसा घेऊन) ती माझे पुस्तकांत छापिली आहे." आण्णांनीं सांगितलेल्या या प्रस्तावनेची कूळकथा व माहिती बोधपत्र वाटल्यावरून ती लहानशी प्रस्तावना या ग्रंथांत छापिली आहे.

### लोकमान्यांच्या पत्रांचा ग्रंथ

आण्णांच्या खाजगी व सार्वजनिक कार्याचे बाबतींतील प्रचंड पत्रव्यवहारासंबंधानें या पुस्तकांतील भाग १ (आ) व भाग ४ मध्यें वर्णन केलें आहे. त्यांनीं त्या कामीं शेंकडों, अक्षरशः हजारों, पत्रें स्वहस्तें लिहिलीं व त्यांत विशिष्ट भावना व वाङ्मयीन छटा असल्याचें, त्यांस आलेल्या अनेक उत्तरांवरून, दिसून येतें. पण त्या सर्व पत्रांपैकीं एकाहि पत्राची स्थळप्रत त्यांनीं ठेविली नाहीं याचें मात्र आश्चर्य वाटून मोठें दुःख होतें. नाहीं म्हणावयास केवळ अपवाद म्हणून फक्त **एकाच** पत्राची स्थळप्रत येवढ्या

प्रचंड पत्रव्यवहाराच्या पर्वतांत सुदैवानें मला उपलब्ध झाली. आठवणींचे दोन खंड प्रसिद्ध केल्यावर लोकमान्यांच्या खाजगी पत्रव्यवहाराचा म्हणजे मुख्यत: लोकमान्यांनीं पाठविलेल्या पत्रांचा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा आण्णांचा भगीरथ प्रयत्न चालला होता. म्हणून या बाबतींत दिनांक १९–१–१९२६ रोजीं त्यांनीं पाठविलेलें पत्र या पुस्तकांतील भाग २ मध्यें मुद्दाम दिलें आहे. या पत्रावरून त्यांनीं संकल्पिलेल्या लोकमान्यांच्या सुंदर वाङ्मय-स्मारकाची योजना स्पष्ट दिसून येते. लोकमान्यांच्या आठवणी, सूक्ति व पत्रें या त्रिदळात्मक वाङ्मयीन स्मारकाच्या योजनेंतील सिद्धीबद्दल त्यांनीं आठवणी खंड ३ मधील आपल्या आत्म-निवेदनांत केलेलें हृदयद्रावक निवेदन एतद्विषयावर आवश्यक प्रकाश पाडणारें असल्यामुळें वाचकांनीं मुळांतच तें अवश्य वाचावें अशी मी आग्रहपूर्वक विनंति करतों.

## आण्णांचें केळकर-वाङ्मय

### केळकर चरित्र

या ग्रंथांतील भाग ३ हा "साहित्यसम्राट् तात्यासाहेब केळकर यांचे चरित्र-आठवणी व अवांतर वृत्त"–विषयक आहे. त्यापैकीं श्री. केळकर यांचें विस्तृत गोड चरित्र त्यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त 'केळकर वाढदिवस मंडळा'नें १९३२ मध्यें प्रसिद्ध केलेल्या 'केळकर' या ग्रंथांत ती० आण्णा यांनीं लिहिलें आहे. श्री. केळकरांचेविषयीं आण्णा यांची विशेष भक्ति असल्यामुळें तें उत्कृष्ट साग्र चरित्र प्रस्तुत ग्रंथांत छापावें अशी माझी अनिवार इच्छा होती. हें सुंदर चरित्र सुमारें पाऊणशें पानांचें आहे. पण प्रस्तुत पुस्तकाची मर्यादित पृष्ठसंख्या लक्षांत घेतां हें संपूर्ण चरित्र या पुस्तकांत प्रसिद्ध करणें कठीण आहे असें शेवटीं दिसून आलें. शिवाय 'केळकर' या ग्रंथाच्या तीन आवृत्त्या प्रसिद्ध झाल्या व पुढें केसरीच्या 'केळकर अंकांत'हि सदर चरित्र संपूर्णपणें प्रसिद्ध करण्यांत आलें. एवढ्या प्रचंड प्रमाणांत तें प्रसिद्ध झाल्यामुळें त्याचें नावीन्य आतां फारसें उरलें नाहीं असें वाटून त्याचा या पुस्तकांत समावेश न करण्याचें प्रथम ठरविलें; पण ती० आण्णासाहेब यांच्या समग्र लिखाणाचा या पुस्तकांत त्याचा कांहींच

परामर्श न घेणें हें त्या बहुमोल लिखाणास व त्याच्या लेखकासहि मोठें अन्यायाचें होईल अशी माझ्या मनास एकसारखी रुखरुख लागून राहिली.

श्री. केळकर यांच्या जीवनयात्रेचे मुख्यत: तीन टप्पे पडतात. एक त्यांच्या जन्मापासून १९२० पर्यन्त, दुसरा १९३७ मध्यें सार्वजनिक कार्यांतून ते निवृत्त होईपर्यंतचा, व तिसरा १९४७ च्या अंतकाळपर्यंतचा. आण्णा यांनीं 'केळकर' ग्रंथांत लिहिलेलें चरित्र १९३२ पर्यंतचें आहे. पण तेंच मुळीं पाऊणशें पानांचें आहे. श्री. केळकर यांचें १९२० पर्यंतचें चरित्र जितकें महत्त्वाचें आहे तितकेंच तें पुढील काळाचेंहि महत्त्वाचें आहे. लोकमान्यांस शेवटीं एकट्या श्री. केळकर यांच्या हातांत केसरी संस्थेचीं व पुढारीपणाचीं सूत्रें देण्यास श्री. केळकर यांनीं आपली विविध गुणांची पात्रता सिद्ध केली व ती राजवट यशस्वी केली. म्हणून तोंपर्यंतचें त्यांचें चरित्र जसें महत्त्वाचें आहे तसेंच १९२० नंतरच्या गांधीयुगास आपल्या विशिष्ट तत्त्वज्ञानाच्या व विचारसरणीच्या अनिरुद्ध जोरावर विरोध करून त्यांनीं बौद्धिक विजय मिळविला व तो प्रतिपक्षीयांच्या कांहीं पुढाऱ्यांस मान्यहि झाला. म्हणून या काळाचेंहि त्यांचें चरित्र फार महत्त्वाचें ठरतें व तें श्री. केळकर यांनीं आपल्या आत्मचरित्रांत विस्तृत दिलें आहे. शिवाय १९२० नंतरचें गांधीयुग हें ताजें व नजीकचें असल्यामुळें त्यांतील केळकरांचा चरित्र कथाभाग अजून लोकांच्या चित्तांत उभा आहे. म्हणून व मुख्यत: या पुस्तकांतील केवळ स्थलसंकोचास्तव तो चरित्रभाग न देतां १९२० पर्यंतचेंच त्यांचें चरित्र या पुस्तकांत दिलें आहे. मात्र मूळच्या 'केळकर' ग्रंथांत शेवटीं आण्णासाहेब यांनीं जो मार्मिक व यथार्थ केळकर-गुणदर्शक परिच्छेद लिहिला आहे तो या पुस्तकांतील श्री. केळकर यांच्या अल्प चरित्राचें शेवटीं देऊन हें केळकर-चरित्र पूर्ण केलें आहे.

### आण्णासाहेब बापट यांचा खासगी व सार्वजनिक पत्रव्यवहार

या पुस्तकांतील भाग १ (आ) मध्यें शेवटीं आण्णांच्या खाजगी पत्रव्यवहारासंबंधीचा थोडा मजकूर देण्यांत आला आहे. त्यांत सार्वजनिक कार्यासंबंधीचा मजकूर भाग ४ मध्यें देण्यांत येईल असें म्हटलें आहे. त्या संबंधानें थोडें लिहितों.

आण्णांच्या पत्रव्यवहाराचे दोन भाग पडतात. पैकीं एक, केवळ खाजगी पत्रव्यवहाराचा भाग, व दुसरा सार्वजनिक कार्याबाबतच्या पत्र-व्यवहाराचा भाग. पहिल्या भागाचें वर्णन पूर्वीं आलेंच आहे. आतां दुसऱ्या भागाकडे वळतों. त्यांचें हें सार्वजनिक कार्य म्हणजे मुख्यत: दोन प्रकारचें होय. एक प्रकार म्हणजे टिळक-केळकर यांच्या आठवणी ग्रंथासंबंधीचा व दुसरा राष्ट्रीय प्रचारासंबंधीचा प्रकार होय. वरील दोघां महापुरुषांच्या आठवणी ग्रंथांकरितां, त्यांनीं आपल्या आत्मनिवेदनांत म्हटल्याप्रमाणें अनुक्रमें ५९९२ व २१०० मिळून सुमारें ८०९२ पत्रें स्वहस्तें लिहिलीं. याशिवायहि या बाबतींत त्यांचा पुष्कळ पत्र-व्यवहार झालेला दिसतो. या कामाशिवाय त्यांनीं "पुणें सार्वजनिक सभा" व "टिळक-स्मारक ट्रस्ट" या संस्थांचे मार्फत मिळून अठरा वर्षे अवघड प्रचारकार्य केलें, त्यासाठींहि त्यांना कितीतरी पत्रें लिहावीं लागलीं आहेत. तसेंच गेलीं तीन वर्षे, महर्षि आण्णासाहेब पटवर्धन व कै. सार्वजनिक काका या महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या सुप्रसिद्ध विभूतींच्या पुण्यतिथींचे राष्ट्रीय उत्सव पुण्यांतील शैक्षणिक अशा सुमारें पंचवीस संस्थांत त्यांनीं सुरू केले. या बाबतींतहि त्यांना पुष्कळ पत्र-व्यवहार करावा लागला. वरील दोन्ही कार्याबाबतच्या पत्र-व्यवहाराचा उल्लेख त्या संस्थांच्या अहवालावरून दिसून येईल. सदर कामीं विशेष मेहनत व बराच पत्र-व्यवहार केल्यामुळें त्यांत आण्णासाहेब यांना मिळालेल्या यशाबद्दल त्यांच्या अभिनंदनार्थ त्यांना अनेकांकडून वरींच पत्रें आलीं व तीं सर्व नमूद करण्यासारखींहि आहेत. पण केवळ स्थलाभावास्तव त्यांपैकीं फक्त पांचच पत्रें केवळ नमुना म्हणून भाग ४ मध्यें शेवटीं दिलीं आहेत.

### आण्णांचा 'हॅण्ड-प्रेस' !

तीं० आण्णासाहेब यांनीं एवढा प्रचंड पत्र-व्यवहार केवळ स्वत:च्या हातानें लिहून केला हें विशेष होय. हें सर्व पाहून एकदां श्री. तात्यासाहेब केळकर थट्टेनें त्यांस म्हणाले, "तुमचा हॅण्ड-प्रेस कसा काय चालला आहे ? तो संभाळून वापरा हो !" आण्णांनीं इतकीं पत्रें लिहिलीं, पण त्यांपैकीं केवळ अपवाद म्हणून कीं काय, फक्त एकाच पत्राची

स्थळप्रत ठेवण्यांत आलेली दिसते. हें मात्र या बाबतींत फार मोठें वैगुण्य आहे. त्यांच्या पत्रलेखनाचा मजकूर आकर्षक व कांहींसा वाङमयीन छटेचा असला पाहिजे असें त्यांस आलेल्या अनेक पत्रांवरून दिसून येतें. त्यांच्या पत्रांच्या स्थळप्रती न ठेवण्याचा त्यांचा परिपाठ दिसतो. पण यामुळें त्या लाभास मात्र मुकावें लागत आहे ही दुःखाची गोष्ट होय. असो.

वरील विविध कार्याचे बाबतींत त्यांना आलेल्या शेंकडों पत्रांच्या अनेक फायली 'सार्वजनिक सभे'च्या इमारतीच्या जळितांतून मोठ्या धाडसानें काढून जेवढ्या हातीं लागल्या तेवढ्या त्यांनीं व्यवस्थित ठेवल्या आहेत. याशिवाय त्यांच्या आप्त, नातेवाईक, व इष्टमित्रांचें वर्तुळहि विस्तीर्ण आहे. त्यांचेशींहि त्यांचा पत्र-व्यवहार होत असल्यामुळें त्यांचेकडून आलेल्या शेंकडों पत्रांचे गठ्ठे नांवनिशीवार व कालक्रमानुसार त्यांनीं ठेविल्याचें दिसून येतें. आलेल्या या सर्व पत्र-व्यवहारावर नजर टाकली असतां, आण्णांचा स्वभाव, आवड, निरलसपणा, चिकाटी, विचारसरणी व त्यांची जीवनयात्रा यांवर अनेक सद्‌गुणांचा विद्युत्‌प्रकाश पडलेला दिसून येतो. इतकेंच नव्हे तर, असें म्हणण्याचें मी धाष्टर्च करितों कीं, या सर्व पत्रांवरून त्यांचें एक स्वतंत्र व बोधपर सुंदर चरित्रहि निर्माण होऊं शकेल !

### फक्त ३५ पत्रें—तीं, 'मानपत्रेंच' !

पण तें सोडलें तरी, मुळांतील तीं सर्व अस्सल पत्रें प्रसिद्ध करावीं म्हटलें तरी, व्यावहारिक दृष्टचा अगदीं अशक्यांतील अशक्य गोष्ट आहे. कारण त्यांचे वडील व त्यांचे परमस्नेही कै. बाबासाहेब धारप (अॅडव्होकेट, मुंबई) या दोघांचींच मिळून सुमारें हजार बाराशें पत्रें आहेत. तद्वतच थोरांतील थोर व प्रसिद्ध अशा कांहीं गृहस्थांचींहि प्रत्येकीं अनेक पत्रें आहेत. यास्तव व्यावहारिक दृष्टीनें म्हणजे प्रस्तुत ग्रंथाच्या केवळ विस्तारभयास्तव, पण त्याचीहि मर्यादा ओलांडून, वर वर्णन केलेल्या पत्रसंग्रहांतून निवडकांतील अगदीं निवडक अशा विशिष्ट स्वरूपाचीं केवळ नमुना म्हणून, फक्त ३५ पत्रें भाग ४ मध्यें देऊन मनाचें कसेंतरी समाधान करून घेतलें आहे.

सदर पत्रांचें महत्त्व व तीं पाठविणारांचें व्यक्ति-महात्म्य लक्षांत न घेतां, केवळ सोयीच्या दृष्टीनें तीं कालक्रमानुसार दिलीं आहेत. तथापि त्यांचें स्वयंभुत्व कोणत्याहि प्रकारें कमी होत नाहीं हें उघड आहे.

## माझ्या पत्र-व्यवहाराचें समालोचन

इतिहासाचें सत्यत्व पटण्यास किंवा चालू व्यवहारहि विश्वसनीय मानण्यास निर्विवाद असें मोठें साधन म्हणजे लेखी पुरावा हें होय. हेंच तत्त्व व्यक्तिमात्राच्या जीवनांतहि फार महत्त्वाचें ठरतें. ती० आण्णासाहेब यांच्या संबंधानें या पुस्तकांत दिलेली माहिती बरीचशी लेखी पुराव्याच्या स्वरूपाची आहे आणि त्यांचा 'पत्र-व्यवहार'—म्हणजे त्यांस आलेलीं पत्रें—खाजगी व सार्वजनिक—हा तर मूर्तिमंत लेखी पुरावाच होय. अस्सल पत्रांची मौज ही असते कीं, तीं अधिक विश्वसनीय तर असतातच; शिवाय पत्रलेखनाच्या काळाच्या परिस्थितीवर अनेक बाजूंनीं तीं प्रकाश पाडणारींहि असतात. तसेंच चरित्र ग्रंथाचा पत्र-व्यवहार—अस्सल पत्रें हीं इमारतीच्या खांबांप्रमाणें आहेत. आण्णासाहेबांच्या चरित्राच्या साधनांपैकीं 'पत्र-व्यवहार' हा एक मोठा भाग आहे. म्हणून तो जितका विस्तृत व खुलासेवार या पुस्तकांत द्यावयास पाहिजे होता तितका तो केवळ ग्रंथ-विस्ताराच्या भयास्तव देतां आला नाहीं हा त्यांचे बाबतींत मजकडून घोर अन्याय होत आहे याची जाणीव क्षणोक्षणीं मला होत असे. पण ग्रंथाचें स्वरूप लक्षांत घेतां पत्र-व्यवहाराचे बाबतींत हात आखडता घेऊन कंजुष-पणाचें प्रदर्शन करण्याखेरीज गत्यंतरच नाहीं. तरी पण त्यांचें महत्त्व जाणून ग्रंथाच्या चारहि भागांच्या पक्वान्नांत पत्र-व्यवहारांचा मौल्यवान मसाला थोडाबहुत घालून मीं मनाचें समाधान मानून घेतलें आहे.

बालपणाच्या माझ्या अज्ञान अवस्थेनंतर पुढें नित्य सहवासानें आण्णांच्या दिनचर्येचें, वागण्याचें व विचारसरणीचें स्वरूप कांहीं आगळें आहे हें मला दिसून येऊं लागलें. पुढें पुढें तर त्यांची ईश्वरनिष्ठा, देशभक्ति, सदाचरण, स्वार्थत्याग, अंतरमुखदृष्टि व मुख्य म्हणजे प्रसिद्धि-परङ्मुखता या त्यांच्या थोर गुणांचा माझे मनावर विशेष परिणाम होऊन आपल्याप्रमाणें इतरांनाहि त्यांच्या सत्य स्वरूपाची ओळख पटावी म्हणून त्यांचेविषयीं

कांहीं लिखाण करून तें प्रसिद्ध करावें असें वाटूं लागलें. मी अशा मनः-स्थितींत असतां सुदैवानें आण्णांचे निरपेक्ष स्नेही, केसरीचे माजी मुख्य संपादक श्री. वा. कृ. भावे यांनीं आण्णांचेविषयीं " स्वराज्य " पत्रांत बारा वर्षांपूर्वीं लिहिलेला लेख अचानकपणें मला पाहावयास सांपडला. तो पाहून जणूं मला घबाडच सांपडल्याचा आनंद झाला. खरोखर हा मोठा विलक्षण योगायोगच म्हटला पाहिजे. कारण जें करावयाचें माझ्या मनांत होतें तें देवानें व माझ्या सुदैवानें अनायासानें घडवून आणिलें. मूळ श्री. भावे यांचा लेख व त्यांत थोडी सुधारणा करून त्याची पुस्तिका छापून ती लोकमान्यांचे गेल्या पुण्यतिथीस—१ ऑगस्ट १९६४ ला मीं प्रसिद्ध केली. त्याच्या ५०० प्रती काढून त्या आमच्या सर्व आप्त, नातेवाईक, स्नेही, सोबती, चाहते, ऋणानुबंधी इत्याद्यनेक मंडळीस भेटीदाखल **विना-मूल्य** पाठविल्या. अशा रीतीनें निदान ५०० सुहृदांस आण्णासाहेब यांच्या थोर गुणांचें दर्शन घडविल्याचें समाधान मला मिळवितां आलें हें आनंदानें मला सांगावेंसें वाटतें.

## आण्णांच्या 'परिचय-पुस्तिके'स आलेलीं उत्तरें

सदर पुस्तिकेबद्दल अनेकांकडून मला पत्रें आलीं. त्यांचें स्वरूप पाहून मी थक्क झालों. पुस्तिकेचें सर्वांनीं मनोभावें व सहर्ष स्वागत तर केलेंच; पण उलट प्रत्येक पत्रांत पुस्तिकेच्या आवश्यकतेविषयीं आवर्जून लिहिण्यांत आलें हें विशेष होय. तसेंच प्रत्येक पत्रांत आण्णांच्या विशिष्ट गुणांचें व त्यांच्या कामगिरीचें भरघोस वर्णन करण्यांत आलें आहे. हें प्रत्येक पत्र म्हणजे आण्णांच्या गुणांचें एक स्वतंत्र चित्र आहे; व अशीं चित्रें मला उपलब्ध झाल्यामुळें, असें वाटूं लागलें कीं, चरित्रविषयाची इतक्या निरनिराळ्या माणसांनीं काढिलेलीं हीं चित्रें जितकीं अधिक असतील तितकें त्यांचें चरित्र-वर्णन अधिक पूर्ण होईल. म्हणून तीं सर्वच्या सर्व पत्रें या पुस्तकांत प्रसिद्ध करावीं, व असें हें अनेक चित्रांचें आल्बम प्रसिद्ध करणें म्हणजेच इतक्या लोकांनीं मिळून एकत्र लिहिलेलें त्यांचें एक प्रकारचें सार्वजनिक विशिष्ट चरित्रच होय !! व असें करण्यानें पूर्ण

ड़ाँ . स्थळअ९

समाधान होईल. परंतु ध्येयदृष्टीनें किंवा तात्त्विक दृष्ट्या ही योजना सर्वोत्तम व रम्य खरी; पण शेवटीं व्यावहारिक दृष्टचा विचार करतां हें अगदीं अशक्य आहे असें ठरलें.

### ३८ पत्रांतून दिसणारे आण्णासाहेब

तथापि त्या आवर्जून लिहिण्यांत आलेल्या सुंदर पत्रांचा कांहीं परामर्श घेणें अवश्य कर्तव्य आहे असा विचार करून त्या सर्व पत्रांतील निवडकांतील अगदीं निवडक अशीं फक्त ३८ पत्रें या पुस्तकांत भाग ४ मध्यें घालण्यांत आलीं आहेत. पण तीं सुद्धां जशींच्या तशीं न देतां त्यांतील वर्णनपर व अनावश्यक भाग गाळून मुद्द्याचा पण अस्सल भाग तेवढा ठेवण्यांत आला आहे. पण असें करण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें. आलेल्या एकंदर सर्व पत्रांतील बहुतेक बऱ्याच पत्रांत ठळकपणें व लक्षवेधक असे महत्त्वाचे तीन मुद्दे मला दिसून आले. त्यांपैकीं खालील शेवटचा नंबर तीनचा मुद्दा विशेष महत्त्वाचा आहे. मुद्दा (१) अति परिचयादवज्ञा म्हणून मला आण्णांचे जे गुण व विशेष माहिती माहीत नव्हती ते गुण व ती माहिती अनेक पत्रांतून मिळाली. मुद्दा (२) आण्णांनीं आपलें आत्मचरित्र लिहावें. पण कदाचित् त्यांच्या संकोची वृत्तीस, प्रसिद्धि-पराङ्मुखतेस व अंतर्मुख दृष्टीस हें न पटलें तर, दुसऱ्या त्यांच्या समानधर्मीयानें तें लिहावें. तात्पर्य, यावरून आण्णांच्या कार्याचें महत्त्व लक्षांत येईल. पण हें सर्व घडून येणें कसें अशक्यप्राय आहे हें पूर्ण अनुभवांतीं मीं वर लिहिलेंच आहे, म्हणून पुन्हां द्विरुक्ति येथें करीत नाहीं. मुद्दा (३) पुष्कळांनीं आपल्या पत्रांत ती. आण्णांना 'सत्पुरुष' असें विशेषण लाविलें आहे हा एक विलक्षण योगच म्हटला पाहिजे! एखाद दुसऱ्याच्या पत्रांत तसा उल्लेख असता तर तो त्यांच्या पुरता मित्रप्रेमाचा प्रकार म्हणून लक्षांत घेण्यासारखा नव्हता. पण दहांनी दहा प्रकारांनीं एकच गोष्ट सांगितली असतां, ती शास्त्रीय दृष्टचा निःसंशय सिद्ध म्हणून सहजच ठरते. फार तर असें म्हणतां येईल कीं, एखाद्याची दृष्टि किंवा अनुमान चुकेल, पण तीच गोष्ट किंवा अनुमान सांगणारे जितके अधिक लोक भेटतील तितकें तिच्या यथार्थतेविषयींचें अनुमान अधिकच सुदृढ होतें हें उघड आहे. म्हणून त्यासंबंधानें पुढील मजकूर आवर्जून मी लिहीत आहें.

## माझी अपेक्षा

ती० आण्णासाहेब यांनीं आपल्या वयाच्या सोळा-सतराव्या वर्षापासून गीता, दासबोध व केसरी यांच्या स्फूर्तिप्रद शिकवणुकीमुळें देशसेवेचें 'वेड' घेऊन, शाळेंत स्कॉलर असतांना, आपल्या शिक्षणास रामराम ठोकला व आजन्म नैष्ठिक ब्रह्मचर्यव्रत पत्करून सर्व आयुष्य देशकार्यार्थ खर्च केलें. तें करीत असतां, प्रथम वर्तमानपत्राचें संपादकीय कार्य, नंतर चळवळींत अनेक वेळां शिक्षा व दंड, पुढें नाशिक-कटाच्या खटल्यांतील आरोपी, क्रांतिकार्यांतील जिवावर उदार होऊन करण्याचें जोखमीचें कार्य, देशाच्या स्वातंत्र्यासाठीं आध्यात्मिक तपस्या (वरील कार्याची परिस्फुटता करण्यास आण्णांची परवानगी नाहीं), खेडेगांवांतील एक तपाहून अधिक काळ नमुनेदार 'प्रचार-कार्य'-जागृति व संघटना, लोकमान्य व साहित्य सम्राट् यांचे 'आवडते लेखक' म्हणून सेवा, श्री. तात्यासाहेब केळकर यांचे योजनेवरून राष्ट्रीय पक्षाचे पुणें येथील 'लोकसंग्रह' या दैनिक वर्तमानपत्राचे कांहीं काल मॅनेजर म्हणून केलेली सेवा, टिळक-केळकर या राष्ट्र पुरुषांच्या आठवणी-ग्रंथांचें केलेलें प्रकाशन कार्य, कै० नामदार गोखले हे अध्यक्ष असलेल्या 'पुणें मद्यपाननिषेधक सभे'ची (Poona Temperance Association) निरपेक्षपणें दीर्घकाल अ० सेक्रेटरी म्हणून केलेली सेवा, 'पुणें सार्वजनिक सभा,' 'इंडियन होमरूल लीग,' 'लो० टिळक स्मारक-मंदिर ट्रस्ट' या संस्थांची दीर्घकाल सेवा इत्यादि विविध प्रकारांनीं अत्यंत मेहनतीनें ती० आण्णांनीं कार्य केलें व अजूनहि वयाच्या ऐंशीव्या वर्षाच्या घरांत आले असतांहि निरलसपणें ते, तें कार्य करीत आहेत. या सर्वाबद्दल स्वराज्य सरकारकडून प्रशंसा किंवा संभावना होणें तर राहूं द्याच; पण सातारा जिल्ह्यांतील एका खेडेगांवीं असलेली त्यांची वडिलोपार्जित थोडी जमीन कूळ-कायद्यांत नष्ट करून तेथील त्यांचें श्रीकृष्णेच्या कांठीं असलेलें पवित्र घर १९४८ च्या गांधीवधानंतरच्या संहारांत विशिष्ट पक्षानें अग्निमुखीं घातलें, पण सरकारकडून या बाबतींत कांहींहि दाद लागली नाहीं हें मात्र विशेष होय ! ! उलट अग्निदग्ध झालेल्या इमारतीची जागा सक्तीनें व बळजबरीच्या धाकानें आण्णांचेकडून मोफत मिळविण्याचा प्रयत्न मात्र केला. म्हणून त्यांनीं योग्य अधिकाऱ्यांकडे दाद

लावण्याचा प्रयत्न केला. पण तोहि विफल झाला! तथापि अलीकडे हल्लींच्या स्वराज्य-सरकारनें कांहीं लोकांची पूर्वीची सेवा लक्षांत घेऊन निरनिराळ्या शाखेंतील गुणी लोकांना आर्थिक साहाय्य केलें, त्याप्रमाणें देशकार्यार्थ देह झिजविलेल्या उतार वयांतील कांहीं आर्त लोकांचा सरकारनें परामर्श घेतला व घेत आहे हें खरें; पण त्यासाठीं अपेक्षा, आर्जव, विनंति व वशिला यांचा अवलंब केल्यावर शेवटीं सरकारनें पक्षदृष्टि ठेवून करण्यांत आलेल्या कारवाईमुळें तदितर मानी व सत्पात्र लोकांना त्याचा फायदा मिळूं शकत नाहीं असा अनुभव आहे. वाईचे वयोवृद्ध विद्वान, तपस्वी, सुप्रसिद्ध राष्ट्रीय कीर्तनकार डॉ० पटवर्धनबोवा यांचें वैराग्य, स्वार्थत्याग, राष्ट्रप्रेम सर्वमान्य आहे. त्यांनीं सर्व आयुष्य खडतर स्वार्थत्यागानें केवळ स्वराज्याकरतां कीर्तनद्वारें टाहो फोडून व्यतीत केलें. त्यांच्या उतारवयांत आपण होऊन सरकारनें त्यांचा परामर्श घ्यावयास नको काय? डॉ० पटवर्धनबोवांप्रमाणें अनेक झाकलेलीं माणकें आहेत. पण तीं सर्व नररत्नें उपेक्षिलीं गेलीं आहेत. याचें कारण ही तेजस्वी मंडळी सरकार-पक्षाभोंवतीं घुटमळणारीं नसून निःस्पृह, त्यागी, निरपेक्ष, स्वाभिमानी व याचना करणारीं नसल्यामुळें सरकार पक्षाचें लक्ष त्यांच्याकडे जाणें शक्य नाहीं हें होय. म्हणून शुद्ध लोकपक्षाकडे वळण्याखेरीज गत्यंतर नाहीं. लोकपक्ष म्हणजे जनता-जनार्दन. तो न्यायी, विचारी व सुलभप्राप्त असल्यामुळें त्याचे प्रत पोहोचण्यास संकोच वाटण्याचें कारण नाहीं. यास्तव त्यास मला नम्रपणें पण आग्रहपूर्वक असें सूचवावेसें वाटतें कीं, केसरीचे माजी मुख्य संपादक श्री. भावे यांचे सारख्यांनीं तीर्थस्वरूप आण्णासाहेब बापट या निरपेक्ष, त्यागी व सत्पात्र पुरुषास ज्या 'सत्पुरुष' या सार्थ उपपदानें भूषविलें, तेच 'सत्पुरुष' हें उपपद त्यांचे बाबतींत व्यवहार्य होण्याची प्रथा रूढ होण्यासाठीं या पुढें **प्रगटपणें** या उत्स्फूर्त उपपदाचा सर्वत्र उपयोग करण्यांत यावा अशी मी अपेक्षा करणें अनुचित होईल काय?

### ग्रंथाच्या नांवाचें औचित्य

या ग्रंथाचें नांव वस्तुतः 'टिळक, केळकर, बापट यांच्या आठवणी व चरित्र' असें ग्रंथाच्या मुखपृष्ठावर असावयाचें; कारण या त्रिमूर्तींच्या

संबंधाचाच हा ग्रंथ आहे हें उघडच आहे. पण ती. आण्णांनीं या ग्रंथावर वरील नांव घालण्यास जोराचा विरोध केला! ते म्हणाले, "ज्यांच्या चरणांजवळ बसून मीं सेवा केली, त्यांच्या समपातळींत व एका ओळींत माझ्यासारख्याच्या नांवाचा उल्लेख करणें अन्यायाचें व अतिक्रमणाचें असून तें मला असह्य होतें. कारण त्या उभय राष्ट्रपुरुषांचा चरणरजःकण मी असल्यामुळें हें बरोबरीचें नातें मी सहन करणें अशक्य आहे." श्रीसमर्थ, लोकमान्य व साहित्यसम्राट् यांचा केव्हांहि उल्लेख करतांना 'गुरुवर्य' या उपपदाशिवाय आण्णा कधींहि उल्लेख करीत नाहींत हें प्रसिद्ध आहे. त्यांची मनोरचना व पवित्रभावना लक्षांत घेऊन वरील नांवाऐवजीं 'गुरुशिष्य यांच्या आठवणी व चरित्र' हें सदर ग्रंथाचें नामाभिधान ठेविल्यास त्यांची हरकत नाहीं असें दिसून आलें. अर्थात् ज्यांत त्यांना संतोष त्यांत मलाहि आनंदच वाटणार आहे. तात्पर्य, अशा समेटानें ग्रंथाच्या मुखपृष्ठावरील सार्थ व यथोचित नामाभिधानाची योजना करण्यांत आली असून तसें केल्याबद्दल मला आनंद होतो.

आत्मनिवेदनाच्या आरंभीं मीं लिहिलें आहे कीं, "पुढील खुलासेवजा मजकूर वाचल्याखेरीज या ग्रंथांतील कांहीं विषयाचें वैशिष्टच व रहस्य लक्षांत येणार नाहीं." त्याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथांतील कांहीं विशिष्ट मजकुराबद्दल खुलासा करणें मला आवश्यक वाटलें. तसेंच तो करतांना कांही ठिकाणीं द्विरुक्ति करणेंहि अपरिहार्य झालें याची मला जाणीव आहे. मात्र हा खुलासा विस्तृत केल्याबद्दल वाचकांनीं मला क्षमा करावी. पण तसा तो केल्यामुळें गैरसमजास जागा उरणार नाहीं म्हणून मनास स्वस्थता वाटते.

### आभार-प्रदर्शन

शेवटीं आभारादाखल येवढेंच म्हणतों कीं, कै. वा. कृ. भावे यांनीं कोणास कांहीं न सांगतां, न विचारितां, आपण होऊन त्यांस माहीत असलेल्या माहितीचा लेख लिहिला व तो ती. आण्णासाहेब यांस कळूं न देतां प्रसिद्ध केला. या त्यांच्या निरपेक्ष मित्रप्रेमाचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. श्री. भावे यांच्या उपक्रमामुळेंच प्रस्तुतचें हें पुस्तक निर्माण करण्यास मला स्फूर्ति झाली म्हणून त्यांचे मी उपकार मानितों.

तीर्थस्वरूप आण्णासाहेब यांनीं या बाबतींतील आपला विरोध, मौनव्रत व ताटस्थ्य सोडलें असतें तर या ग्रंथास निराळेंच स्वरूप आलें असतें अशी माझी खात्री आहे. तथापि त्यांच्या प्रामाणिक व पवित्र भावनेचें रहस्य ओळखून, पण दुसऱ्याचा अंतरात्मा न दुखविण्याच्या त्यांच्या व्रताचा फायदा घेऊन, मी येवढेंच म्हणतों कीं, त्यांचे कागदपत्रांचे रुमाल, पुडकीं, फायली वगैरे सर्व साहित्य मीं सर्वस्वीं विस्कळित केलें व त्यांचा भरपूर उपयोग करून घेतला याबद्दल 'नकोरे मना क्रोध हा खेदकारी,' ही श्री समर्थांची मात्रा त्यांनीं पचविल्यामुळें, आपला राग न दर्शवितां, त्यांनीं सर्व कांहीं मला मनसोक्त करूं दिलें या त्यांच्या अभिजात सौजन्यपूर्ण औदार्याबद्दल मनोभावें व कृतज्ञतापूर्वक मी त्यांना नम्रपणें अभिवादन करून त्यांच्या आशीर्वादाची याचना करतों.

प्रस्तावनेशिवाय ग्रंथाला महत्त्व नाहीं. प्रस्तावना, ग्रंथाची मार्गदर्शिक आहे. जहाजाचें जसें होकायंत्र किंवा शरिराचे जसे नेत्र तद्वत् ग्रंथाची प्रस्तावना होय. तथापि अर्वाचीन पाश्चात्य वाङमयप्रपंचांत प्रस्तावना हा ग्रंथाचा अलंकारच समजला जातो. पण या सर्वांपेक्षां, नाट्यप्रयोगाच्या प्रारंभाच्या सूत्रधाराप्रमाणें, ग्रंथाची प्रस्तावना मानणें अधिक समर्पक होईल. या दृष्टीनें व मुख्यतः प्रस्तुत ग्रंथाचा सर्वमान्य विषय, दे. भ. जयंतराव टिळक व माझे पितृव्य ती. आण्णासाहेब यांचे घनिष्ठ व अंगांगी संबंध लक्षांत घेतां दे. भ. जयंतरावांच्या प्रस्तावनेशिवाय--मंदिराच्या शिखराशिवाय--हा ग्रंथ परिपूर्ण होऊंच शकत नाहीं. याहि मुख्य दृष्टीनें, प्रस्तुत ग्रंथाच्या प्रस्तावनारूपी सूत्रधाराचें काम, लोकमान्यांचे नातू व केसरीचे संपादक व विश्वस्त दे. भ. जयंतराव टिळक यांनीं जर्मनी व इंग्लंड या देशांत केलेल्या दौऱ्यामुळें झालेल्या आपल्या सहा आठवड्यांच्या अनुपस्थितींतील महत्त्वाचीं व जरुरीचीं तुंबलेलीं सर्व कामें बाजूला ठेवून, वेळांत वेळ काढून, मोठ्या आनंदानें, तत्परतेनें व आत्मीयबुद्धीनें पार पाडण्याचे श्रम घेतले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

ग्रंथाचा शेवट व आभार प्रदर्शनांतील क्रमांकाचा शेवट यांचा नेहमींच संगम होणें क्रमप्राप्त होतें. आपल्या घरांतील एखाद्या मोठ्या, विशिष्ट समारंभांत शेवटीं आनंदानें करण्यांत येणारें जसें 'श्रमभोजन', तसें, ग्रंथ

छापून तो पूर्ण करणाऱ्यांचे आभार मानणें होय. प्रस्तुत ग्रंथ छापण्यास घेण्याच्या आरंभापासून, तो संपूर्ण करून हातावेगळा करण्यापर्यंत अ. वि. गृहाच्या 'लोकसंग्रह' छापखान्याचे कर्तृत्ववान व सौजन्यशील व्यवस्थापक श्री. काशीनाथपंत गंगाराम सोनार यांनीं हें काम आपलें स्वतःचेंच समजून केवळ आत्मीयतेनें केलें व तें करितांना त्यांची दिसून आलेली तत्परता, कौशल्य, नियमितपणा, दक्षता व विशेष म्हणजे शब्द दिल्याप्रमाणें ठरीव वेळीं ग्रंथ सुपूर्त करण्यांत घेतलेली काळजी व केलेले परिश्रम याबद्दल शब्दांनीं त्यांचें आभार मानणें मला अशक्य आहे. म्हणून त्यांचेविषयीं मी माझी फक्त कृतज्ञताबुद्धि व्यक्त करून मनाचें समाधान करून घेतों! तसेंच या ग्रंथाचीं मुद्रितें अत्यंत बारकाईनें, काळजीनें व वेळच्या वेळीं तपासून देण्याचे श्रम घेतल्याबद्दल श्री. मा. वि. भावे महाशय यांचें मी मनःपूर्वक आभार मानतों.

### वंदना

सतारीवरील एक तार छेडली जात असतां, इतर तर्फेच्या तिच्या तारा सहजच अनुरणन करून तिला तिच्या सुरेलपणांत जशी साथ करितात तद्वतच या ग्रंथाचें मुखपृष्ठावरील नांव व तें देण्यांत ती. आण्णांची दिसून येणारी नितांत विनयशीलता व गाढ गुरुभक्ति यांच्या संवेदनात्मक संयोगानुरूप असे, दिवसांतून अनेकवार आनंदी वृत्तींत आण्णा गुणगुणत असलेल्या, खालीं दिलेल्या, त्यांच्या सांकेतिक व्रीदोद्गारांत हें लांबलेलें पण अत्यंत आवश्यक असलेलें माझें आत्मनिवेदन मी समाप्त करितों.

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुःसाक्षात् परब्रह्म, तस्मै श्रीगुरवेनमः ॥

लो. टिळक पुण्यतिथि
दिनांक १ ऑगस्ट १९६५
पुणें

किशोर शंकर बापट
संपादक

आठवणीकार देशभक्त सदाशिव विनायक बापट

यांचें

चरित्र-चित्र (१)

भाग १ (अ)

## अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ टिळक व 'केसरी'चें वेड | ... | ३ |
| २ शिक्षणास रामराम ठोकावा लागला | ... | ४ |
| ३ आजन्म ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा | ... | ४ |
| ४ दारूगुत्त्यावर पिकेटिंगमुळें शिक्षा | ... | ५ |
| ५ पोलिसांच्या कचाट्यांतून निसटले | ... | ६ |
| ६ अध्यात्मासाठीं संतांची भेट | ... | ६ |
| ७ टिळक जयजयकाराबद्दल दंड | ... | ८ |
| ८ लोकमान्य टिळकांनी पाठ थोपटली | ... | ८ |
| ९ 'लाडके लेखक' म्हणून बक्षीस दिलें | ... | ८ |
| १० टिळक-केळकर यांचें आठवणींचे ग्रंथ : त्याग, श्रद्धा, मनोवृत्ति | ... | ९ |
| ११ लो० टिळकसूक्ति-संग्रह : 'कष्टांची शिकस्त'! | ... | १० |
| १२ नमुनेदार प्रचार-कार्य व थोरांचे अभिप्राय | ... | १६ |
| १३ सरकारी बंदी मोडून खानदेशात प्रवेश व शिक्षा | ... | १९ |
| १४ लोकमान्यांच्या विश्वासांतील | ... | २१ |
| १५ सदा सत्यवादी विवेकी विचारी | ... | २१ |
| १६ ते सत्पुरुष आहेत, हें निश्चित | ... | २१ |

आठवणीकार देशभक्त सदाशिव विनायक बापट,

यांचें

# चरित्र-चित्र (२)

## भाग १ (आ)

## अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ प्रास्ताविक | ... | २३ |
| २ अपूर्व मृत्युपत्र ! | ... | २४ |
| ३ एक विलक्षण पत्र ! | ... | २४ |
| ४ आण्णा थिऑसॉफिस्ट झाले ! | ... | २६ |
| ५ आण्णांना बसलेले मानसिक सहा धक्के | ... | २८ |
| ६ आण्णांना नकळत बसलेले दु:खाचे तीन बुक्के | | ३३ |
| ७ आण्णांचें नमुनेदार प्रचारकार्य | ... | ३४ |
| ८ आण्णांचा खाजगी पत्रव्यवहार (आवक पत्रें) | ... | ३९ |
| ९ "गुरूची विद्या गुरूला फळली !" | ... | ५१ |
| १० आण्णांनीं दिलेल्या कांहीं देणग्या-वर्गण्या | ... | ५१ |
| ११ आण्णांचा ग्रंथसंग्रह | ... | ५४ |

मराठा ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम भाग २ ७०८२ दि: ९।१।६।८७
क्रमांक ८१० . मो. दि: २८।१२।५९

लो० टिळक यांच्या आठवणी-आख्यायिका

आणि

अवांतर वृत्तविशेष

# अनुक्रमणिका

मूळ आठवणी खंड १ पैकीं


| विषय | पान |
| --- | --- |
| १ अर्पणपत्रिका ... | ५६ |
| २ आत्मनिवेदन ... | ५७ |
| ३ आठवणी ... | ७४ |


मूळ आठवणी खंड २ पैकीं


| | |
| --- | --- |
| ४ अर्पणपत्रिका ... | १७८ |
| ५ आत्मनिवेदन ... | १७९ |
| ६ आठवणी | १९३ ते २२४ |
| ७ श्री. बापट यांचें अभिनंदन (श्री. केळकरकृत) ... | २२५ |
| ८ लोकमान्यांचे त्रिदळात्मक वाङ्मयस्मारक (आठवणी, सूक्ति व पत्रें,) | २२९ |


मूळ आठवणी खंड ३ पैकीं


| | |
| --- | --- |
| ९ अर्पणपत्रिका .. | २३३ |
| १० आत्मनिवेदन | २३४ ते २६० |
| ११ आठवणी | २६१ ते २९८ |

इंग्रजीमधील आठवणी; भाग १, २, ३ पैकीं

१२ Dedication ... २९९
१३ (Part I) To The Reader ... ३००
१४ (Part II) To the Reader ... ३०३
१५ (Part III) Preface ... ३०४
१६ (Part III) Foreword (Dr. Annie Besant) ... ३०८
१७ लो० टिळक यांच्या आठवणी ग्रंथावरील अभिप्राय ... ३१०

**लोकमान्यांच्या आठवणीच्या तीनहि खंडांत प्रसिद्ध न झालेल्या म्हणजे इतरत्र प्रसिद्ध झालेल्या श्री० बापट यांच्या नव्या आठवणी :—**

१८ लोकसंग्रह, पुणें, दिनांक १।८।१९२३ ३११ ते ३१४
१९ केसरी, दि. ३०।७।१९५७ ३१४ ते ३१६
२० तरुण भारत, पुणें, दि० ८।७।१९५७ ३१६ ते ३२१
२१ केसरी, दि. १६।८।१९६४ ३२५
२२ **इतरत्र कोठेंहि प्रसिद्ध न झालेल्या व केवळ याच ग्रंथासाठीं लिहून घेतलेल्या श्री० आण्णासाहेब यांच्या ताज्या चार आठवणी** ... ३२६ ते ३३०

**‘ लो० टिळकसूक्ति संग्रह ’ ग्रंथांतील विषय :—**

२३ अर्पणपत्रिका ... ३३१
२४ आत्मनिवेदन ... ३३२
२५ ‘ लो. टिळक सूक्तिसंग्रह ’ ग्रंथावरील अभिप्राय ... ३४५
२६ श्री. बापट यांचा सत्कार व त्यांचा स्वार्थत्याग ... ३४६
२७ श्री. बापट यांचा गौरव-समारंभ ... ३४७
२८ लोकमान्यांच्या ‘लिहिण्या’बाबतचे त्यांच्या ‘लेखकाचे’ श्री. स. वि. बापट यांचें अनुभव ... ३४९

## भाग ३

साहित्यसम्राट् केळकर यांचे चरित्र व त्यांच्या आठवणी ग्रंथांतील श्री. बापट यांचें आत्मनिवेदन आणि साहित्यसम्राट् केळकर यांचें अवांतर वृत्तविशेष ... ३५५

## अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ बोरखळ (जिल्हा सातारा) येथें श्री. केळकर यांस दिलेलें मानपत्र | ... | ३५६ |
| व मानपत्रास श्री. केळकरांचें उत्तर | ... | ३५९ |
| २ श्री. केळकर यांचे विरुद्ध उठलेलें वादळ व तें शमविण्याचा झालेला प्रयत्न | ... | ३६० |
| ३ साहित्यसम्राट् केळकर यांचें विद्वन्मान्य चरित्र | ... | ३६५ |
| ४ केळकर-चरित्रावरील अभिप्राय | ... | ३९८ |
| ५ श्री. केळकर यांची भाषणशैली | ... | ३१९ |
| ६ 'केळकर–आठवणी' ग्रंथाची अर्पणपत्रिका | ... | ४१३ |
| ७ 'केळकर–आठवणी' ग्रंथांतील आत्मनिवेदन | ... | ४१४ |
| ८ 'केळकर–आठवणी' ग्रंथाविषयीं थोरांचे अभिप्राय | ... | ४४० |


## भाग ४

आठवणीकार आण्णासाहेब बापट यांचे (१) लेख, (२) भाषणें, (३) त्यांस आलेलीं कांहीं निवडकांतील निवडक व अगत्याचीं पत्रें, आणि (४) आठवणीकार ती. आण्णासाहेब यांच्याविषयींच्या मीं पूर्वीं संपादित व प्रसिद्ध केलेल्या ' परिचय–पुस्तिके ' बाबत मला आलेलीं महत्त्वपूर्ण पत्रें (संपादक किशोर). (५) अवांतर वृत्तविशेष. (६) किरकोळ.

## अनुक्रमणिका


| विषय | | पान |
|---|---|---|
| १ सातारा जिल्हा परिषदेचें अध्यक्षस्थान | ... | ४४८ |
| २ ' केसरी–प्रबोध ' ग्रंथांतील लेख; (टिळक-केसरी यांची स्वराज्यार्थ प्रचंड खळबळ) | | ४४९ ते ४८१ |
| ३ ' भोपटकर–गुणगौरव' ग्रंथांतील लेख | ... | ४८२ |
| ४ श्रीशिवजयंतीनिमित्त शिवाजी मंदिरांतील भाषण | ... | ४९३ |
| ५ ' सह्याद्रि ' मधील लेख, ' सुभाषबाबूंचे सौजन्य ' | .. | ४९६ |
| ६ कै. बाबाराव धारप यांच्या आठवणी | .. | ५०२ |
| ७ ' केळकर–आठवणी ' ग्रंथाबद्दलच्या ती. आण्णांच्या सत्कार–सभेंतील भाषण | ... | ५०५ |
| ८ श्रीसमर्थांच्या आठवणी प्रसिद्ध करण्याबद्दल ती. आण्णांनी केलेलें आवाहन | ... | ५११ |
| ९ श्री. आण्णासाहेब यांस आलेल्या अनेक पत्रांपैकीं निवडक व अगत्याचीं पत्रें :— | ... | ५१५ |
| १० श्री. आण्णासाहेब बापट यांच्या गाजलेल्या प्रचार वृत्तांताचीं पुस्तकें | ... | ५७२ |
| ११ पत्रलेखकांची व पत्रांची सूची | ... | ५७३ |

# गुरु-शिष्य
यांच्या
# आठवणी व चरित्र




तीर्थस्वरूप स. वि. तथा आण्णासाहेब बापट

तीर्थस्वरूप स. वि. तथा आण्णासाहेब बापट यांचे हस्ताक्षर—बाळबोध

तुकाराममहाराज जरी संसारी होते तरी यांचा कल
कर्मत्यागाकडेच होता. म्हणून उत्कटभक्ति आणि त्याबरोबरच
आमरणान्त ईश्वरार्पणपूर्वक निष्काम कर्म असें जें प्रवृत्तिपर
भागवतधर्माचें लक्षण किंवा गीतेचा सिद्धांत त्याचा पूर्ण
खुलासा कोणास पाहिजे असल्यास तुकारामबोवांनीच
शिवाजी महाराजांस ज्या सद्गुरूस शरण जाण्यास
सांगितलें त्या श्रीरामदासस्वामींच्या दासबोध ग्रंथाकडेच
त्यानें वळलें पाहिजे. — लो० टिळक

लेखक - स.वि.बापट

तीर्थस्वरूप स. वि. तथा आण्णासाहेब बापट यांचे मोडी अक्षर



तीर्थस्वरूप स. वि. तथा आण्णासाहेब बापट यांचे हस्ताक्षर–इंग्रजी

Mr. Kelkar's presence would be missed for a long time, and he would have been of infinite use and value in bringing up this University on which he had, in his quiet way, set his heart.

— M. R. Jayakar
Barrister.

S. V. Bapat

भाग १ (अ, आ)

# आठवणीकार बापट यांचें चरित्र-चित्र

# आणि

# अवांतर वृत्त

# टिळक, केळकर, बापट—चरित्र व आठवणी ग्रंथ

या ग्रंथांतील विषयांचे खालीलप्रमाणें चार भाग करण्यांत आले आहेत :—

**भाग १** :—(अ, आ) आठवणीकार बापट यांचें चरित्र-चित्र आणि अवांतर वृत्त-विशेष.

**भाग २** :—लो. टिळक यांच्या आठवणी, आख्यायिका आणि अवांतर वृत्त-विशेष.

**भाग ३** :—साहित्यसम्राट् केळकर यांचें चरित्र आणि अवांतर वृत्त-विशेष.

**भाग ४** :—आठवणीकार बापट यांचे लेख, भाषणें, आवकपत्रें इत्यादि.

दा. क्र. १२४०१

# भाग १ (अ)

# आठवणीकार देशभक्त सदाशिव विनायक बापट यांचें चरित्र-चित्र (१)

(लेखक :—कै. श्री. वा. कृ. भावे, बी. ए., माजी मुख्य संपादक, केसरी)

## (१) टिळक व 'केसरी'चें वेड

कै. लो. टिळक यांच्या अलौकिक गुणांमुळें जे असंख्य तरुण त्यांजकडे आकृष्ट झाले त्यांपैकीं श्री. सदाशिव विनायक बापट हे एक होत. त्यांचा जन्म सातारा जिल्ह्यांत पोतनीसांचें वडगांव या गांवीं दि. १२ मे १८८७ रोजीं झाला. त्यांचे वडील त्या जिल्ह्यांत प्रथम गांव रजिस्ट्रार होते. सन १९०२ सालीं ते साताऱ्याजवळ कृष्णातीरीं वडूथ गांवीं रजिस्ट्रार असतां सदाशिवरावांना 'केसरी' पत्र वाचण्याची गोडी लागली. ती इतकी कीं, त्यांना टिळक व 'केसरी' यांच्याविषयीं एक प्रकारचें वेड लागलें. त्या वेळीं ते सातारा हायस्कुलांत इंग्रजी सहाव्या इयत्तेंत शिकत होते. विद्यार्थी-दशेंतच सातारा शहरांतील कांहीं तरुण मंडळींबरोबर त्यांनीं सर्व आयुष्य देशसेवेंत घालविण्याची शपथ घेतली. प्रसिद्ध 'संदेश' पत्राचे संपादक कै. अच्युतराव कोल्हटकर, बी. ए. होऊन त्या वेळीं साताऱ्यांतील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें शिक्षकाचें काम करीत असत. श्री. बापट व श्री. कोल्हटकर यांचें नातें असल्यानें त्यांनीं एका खाजगी जागेंत शिवजयंत्युत्सव साजरा करून अच्युतरावांच्या अध्यक्षतेखालीं बापट यांनीं व्याख्यान दिलें. या व अशाच इतर हालचालींमुळें सदाशिवराव पोलिसांच्या डोळ्यावर येऊन बापट यांनीं हा मार्ग सोडावा म्हणून त्यांनीं त्यांना खूप मार दिला. त्यामुळें ते बरेच दिवस अंथरुणावर पडून होते.

## (२) शिक्षणास राम राम ठोकावा लागला

या वेळीं सातारा हायस्कुलावर रावबहादूर गणेश व्यंकटेश जोशी हे विद्वान् गृहस्थ हेडमास्तर होते. त्यांच्याकडे बापटांच्या विरुद्ध पोलिसांच्या व सरकारच्याहि तक्रारी जाऊं लागल्या. शेवटीं सरकारी धोरणांमुळें हेडमास्तरसाहेब यांनीं त्यांना हायस्कूल सोडावयास लाविलें. अशा रीतीनें बापटांना मॅट्रिकच्या वर्गांत असतांनाच शिक्षणास राम राम ठोकावा लागला. त्यानंतर साताऱ्यास रिकामें राहण्यांत अर्थ नाहीं, असें वाटून लो. टिळकांच्या चळवळीनें सजीव झालेल्या पुण्यास ते आले व त्यांनीं भोपटकर-बंधूंनीं सुरू केलेल्या राष्ट्रीय शिक्षणाच्या 'महाराष्ट्र विद्यालयां'त सन १९०६ सालीं शिक्षकाची नोकरी पत्करली· शिवाय भोपटकरांच्या 'भाला' वर्तमानपत्रांत ते लिहूं लागले.

त्या वेळीं देशांत 'स्वदेशी' चळवळ जोरानें चालू होती. 'राष्ट्रीय शिक्षण' हें तिचें एक प्रमुख अंग होतें. लोकमान्यांनीं तळेगांव येथें 'समर्थ विद्यालय' सुरू केलें होतें; तसेंच पुणें येथील भोपटकर-बंधूंचें 'महाराष्ट्र विद्यालय' या दोन्ही विद्यालयांत सरकारास राजद्रोह दिसूं लागल्यावरून सरकारनें तीं दोन्ही विद्यालयें बंद केलीं. नंतर बापट हे नागपुरास गेले. तेथें अच्युतराव कोल्हटकर यांनीं 'देशसेवक' वर्तमानपत्र धडाडीनें चालविलें होतें. त्यांस उपसंपादकाची जरूरी होती. कोल्हटकर व बापट हे पूर्वीं साताऱ्यास असतांना वाई येथील 'वृत्तसार' पत्र व कोल्हटकर यांचे संबंध असल्यामुळें व 'वृत्तसारा'स अग्रलेख व इतर मजकुराची गरज असल्यामुळें तें काम कोल्हटकर यांनीं बापट यांजकडे सोपविलें होतें. त्या कामीं दिसून आलेली बापटांची लायकी कोल्हटकरांस माहीत असल्यामुळें त्यांस त्यांनीं 'देशसेवका'चे उपसंपादक नेमिलें. पुढें हेंहि पत्र बंद झाल्या-मुळें बापट हे १९०९ च्या आरंभीं 'पुणें सार्वजनिक सभे'स येऊन मिळाले.

## (३) आजन्म ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा

सदाशिवरावांच्या आयुष्यास लागत चाललेलें वळण त्यांच्या वडील-मातोश्रींस साहजिकच पसंत पडण्याजोगें नव्हतें. त्याशिवाय देशसेवेकरितां आमरण ब्रह्मचारी राहण्याची प्रतिज्ञा त्यांनीं केल्यामुळें त्यांच्या आशेचा

अंकुर करपून गेला. सदाशिवराव त्यांचे एकुलते एक चिरंजीव, त्यांनींच ब्रह्मचर्याची दीक्षा घेतल्यामुळें आपला कुलक्षय होणार, याची त्यांना भीति पडावी यांत नवल काय! तथापि समाधानाची गोष्ट एवढीच कीं, सदाशिवरावांचे वडीलहि 'केसरी व टिळक' यांचे मोठे भक्त होते. ते कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या जमान्यांतील असल्यामुळें 'केसरी' संस्थेविषयीं त्यांचीहि इतकी भक्ति असे कीं, ते आपल्या घरच्या प्रत्येक मंगल कार्याच्या वेळीं श्रीगणपतिपूजनाबरोबरच 'केसरी–संस्थेस' श्रीफल व यथाशक्ति दक्षिणा अर्पण करीत व सदाशिवरावांच्या कार्यास आशीर्वाद देत. सदाशिवरावांनीं आपली ही घोर प्रतिज्ञा पवित्रपणें खरी केली असली तरी "दिनाचा दयाळू। मनाचा मवाळू ।।" असे बापट असल्यानें व त्यांच्या मूळच्या मायाळू व परोपकारी स्वभावामुळें, अनन्यगतिक झालेल्या त्यांच्या सर्वांत जवळच्या स्वकीयांच्या प्रतिकूल परिस्थितीमुळें त्यांना जवळ करण्यानें बापटांचें घर हें एखाद्या कौटुंबिकाच्या घराप्रमाणें झालें व आपद्धर्म म्हणून संतोषानें त्यांनीं तें आपलेंसेंच मानलें हें विशेष होय! त्यांच्या गोड स्वभावामुळें त्यांचा मित्र-परिवारहि फार मोठा असून सर्वांना ते हवेसे वाटतात.

## (४) दारूगुत्त्यावर पिकेटिंगमुळें शिक्षा

सदाशिवराव महाराष्ट्र विद्यालयांत असतां सन १९०८ सालीं त्यांनीं इतर कांहीं तरुण मंडळीबरोबर दारुबंदीसाठीं पुणें येथील शनिवार पेठेंतील दारुगुत्त्यांवर पिकेटिंग करण्यास सुरुवात केली. ती चळवळ लो. टिळकांच्या प्रोत्साहनानें चांगलीच रंगून गुत्तेवाल्यांचें व त्याबरोबर सरकारचें दररोज हजारों रुपयांचें नुकसान होऊं लागलें. म्हणून चळवळीचा बीमोड करण्याकरितां विरोधकांवर सरकारनें खटले भरण्यास सुरुवात केली व त्यांना सिटी मॅजिस्ट्रेट दंड ठोठावूं लागले; तरी चळवळ हटेना. तेव्हां पुण्याचे डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट मि. कारमायकेल यानें पिकेटिंग बेकायदा ठरविलें. त्या वेळीं सरकारी हुकूम मोडून स्वतःवर खटले ओढवून घेण्याचा निश्चय नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्राचे संपादक कै. गोपाळराव ओगले, पुण्याचे प्रसिद्ध ॲक्च्युअरी कै. ग. स. मराठे प्रभृति तरुणांनीं केला. त्यांत अर्थातच बापटहि होतेच.

बापटांच्यावर खटला भरून त्यांना ७५ रुपये दंड करण्यांत आला. तो भरण्यास जवळ पैसे नसल्यामुळें बापट यांनीं आपली कानांतील सुंदर भिकबाळी विकून दंड भरला !

## (५) पोलिसांच्या कचाटयांतून निसटले

लो. टिळक यांस १९०८ च्या मध्यास सहा वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा झाल्यावर ब्रह्मगिरीबुवा ऊर्फ चांदवडकर प्रभृति पुण्यांतील टिळक-भक्तांच्या डोक्यांत या गोष्टीचा बदला घेण्याची कल्पना येऊन त्यांनीं हत्यारें, शस्त्रें, जमविण्यास सुरुवात केली. अशा संधीस म्हणजे १९०९ सालाच्या सुमारास स्वातंत्र्यवीर सावरकर यांनीं गुप्त रीतीनें विलायतेहून हिंदुस्थानांत ब्रौनिंग पिस्तुलें पाठवून दिलीं. त्यांतील कांहीं पिस्तुलें मुंबईहून ब्रह्मगिरी बुवांनीं पुण्यास विकत आणलीं व त्यांच्या साहाय्यानें लो. टिळकांना शिक्षा देणारा हायकोर्ट न्यायाधीश दावर व गव्हर्नर सर सिडनहॅम क्लार्क याचा खून करण्याचा कट केला. त्या कटाशीं बापट यांचा विशेष संबंध असल्यामुळें त्यांच्यापाशीं सदर पिस्तुलें कांहीं दिवस ठेवण्यांत आलीं होतीं. शेवटीं नाशिक येथें कलेक्टर जॅक्सन यांचा दे. भ. कान्हेरे यांनीं खून केला. त्याबरोबर पुण्याच्या कटांतील बहुतेक तरुण पकडले गेले. अर्थातच बापट यांसहि पकडलें; पण विशेष कर्मधर्मसंयोगानें ते त्यांतून निसटले, हाहि एक मोठा चमत्कारच होय !

नाशिक कटांत सापडलेल्या आरोपींच्या बचावासाठीं बॅ. बाप्टिस्टा यांची योजना करण्याकरतां व इतर खर्चाकरतां वर्गणी जमवण्याची आवश्यकता उत्पन्न झाली. म्हणून श्री. तात्यासाहेब केळकर यांच्यापासून बापट यांनीं परिचयपत्रें घेऊन महाराष्ट्रांतील मोठ्या शहरीं जाऊन गुप्त रीतीनें मोठी रक्कम जमविली. यामुळें खटला उभा राहिला. या खटल्यांत बापटांचे सर्व सहकारी मात्र मोठ्या शिक्षेस बळी पडले. त्याचा बापटांच्यावर विलक्षण परिणाम झाला.

## (६) अध्यात्मासाठीं संतांची भेट

नाशिक-कटाच्या खटल्यामुळें सदाशिवरावांत वैराग्य उत्पन्न होऊन त्यांस कांहीं सुचेनासें झालें. 'उदास वाटते जीवीं । आतां जावें कुणीकडे ॥

असें होऊन " तूं भक्तवत्सला रामा । वुद्धि दे रघुनायका ॥ " अशी प्रार्थना करून महर्षि अण्णासाहेब पटवर्धन यांच्या अनुज्ञेनें ते पुण्यांतून नाहींसे झाले ! हा मंसार सोडून परमार्थास लागावें, असें त्यांच्या मनानें घेऊन ते खानदेशांत धुळ्याजवळील सोनगिरीचे सत्पुरुष गोविंदबुवा व शिरडीचे साईमहाराज यांच्या दर्शनास गेले. सिद्धपुरुष गोविंदबुवा पिसाट वृत्तीचे असले तरी, कांहीं चमत्कार दर्शवून, परमार्थाचा मार्ग विकट असल्याचें त्यांनीं बापटांच्या गळीं उतरविलें. नंतर तेथून ते शिरडीस आल्यावर साईमहाराजांकडून त्यांना कांहीं मार्गदर्शन होईल असें वाटलें होतें; पण तसें झालें नाहीं. उलट त्यांच्या वैराग्याची परीक्षा पाहण्याकरतां साईबाबांनीं त्यांच्याजवळचे सर्व पैसे दक्षिणेच्या रूपानें काढून घेतले ! कफल्लक बनलेल्या बापटांपाशीं पुण्यास परत येण्यास रेल्वेच्या तिकिटावांचून रेल्वेचा प्रवास करावा लागला. वाटेंत दौंड स्टेशनावर त्यांच्या डब्यांत शिरून तपासनिसानें त्यांच्या जवळच्या सर्वांचीं तिकिटें तपासलीं; पण बापटांना मात्र त्यांचें तिकिट विचारलें नाहीं. तेथून पुणें स्टेशनवरहि तिकिट घेणाऱ्यानें त्यांच्यापाशीं तिकिट मागितलें नाहीं. ही सर्व हकीकत पुण्यास आल्यावर त्यांचें श्रद्धा-स्थान महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांस त्यांनीं निवेदन केली. तेव्हां महर्षींनीं बापट यांस शिरडीच्या चितळी स्टेशनाचें तिकिट काढावयास सांगितलें ! पण त्याचें रहस्य मात्र बापट यांस शेवटपर्यंत कळलें नाहीं. तथापि बापट यांची महर्षीविषयीं गाढ श्रद्धा वृद्धिंगतच झाली.

पुढें कांहीं दिवसांनीं म्हणजे १९१० सालीं अचानकपणें शिर्डीच्या साई-बाबांच्या सांगण्यावरून त्यांच्या सेवेस राहिलेल्या एका गृहस्थाकडून बापट यांस पोस्टानें पत्र आलें. कांहीं गूढ विचार व प्रश्न मनाशीं ठरवून त्यांचीं समाधान-कारक उत्तरें मिळवून त्याप्रमाणें आपलें आयुष्य घालविण्याकरितां वापट साई-महाराजांकडे पूर्वीं गेले होते; पण त्या वेळीं समक्ष भेटींत अगर त्यांच्याकडून आलेल्या या पत्रांतहि त्यांच्या प्रश्नाचें त्यांस कांहीं उत्तर न देतां, अर्थाअर्थीं कांहीं संबंध नसलेल्या अनपेक्षित अशा एक गोष्टीचा उपदेश मात्र सदर पत्रांत होता. याचें वापट यांस मोठें आश्चर्य वाटलें. साईबाबांचें हें तारीख ४–५–१९१० च्या पोस्टाच्या शिक्यानिशीचें पत्र श्री. बापट यांच्याजवळ असलेलें पाहावयास सांपडतें.

## (७) टिळक जयजयकाराबद्दल दंड

लो. टिळकांच्या शिक्षेनंतर महाराष्ट्रांत दडपशाही जोरांत सुरू होती. टिळकांची तसबीर लावणें अगर त्यांच्या नांवाचा जयजयकार करणें हा गुन्हा समजला जात होता. तरीही लोकमान्यांच्या जन्मतिथीच्या दिवशीं पुण्याजवळच्या एखाद्या मोठ्या गांवीं, बरोबर त्यांची तसबीर घेऊन, त्यांची जन्मतिथी करण्याचा बापटांचा क्रम सुरूच होता. या व इतर कारणांमुळें बापट सरकारच्या व पोलिसांच्या डोळ्यांवर आले असल्यानें त्यांना चांगली अद्दल घडविण्याचा त्यांनीं मोका साधला. श्रीगणपतीचा उत्सव होता. गणपतिविसर्जनाची मोठी मिरवणूक लकडीपुलाकडे चालली होती. तिच्यांत बापट अर्थात् होतेच. एकाएकीं त्यांना पोलिसांनीं पकडून त्यांच्यावर टिळकांचा जयजयकार केल्याचा आरोप ठेवून खटला भरला. खटला श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं चालविला. बापटांच्या बाजूनें सरदार बाळासाहेब नातू यांच्यासारख्यांनीं साक्षही दिली; पण सिटी मॅजिस्ट्रेट यांनीं आकसानें त्यांना १५० रुपये दंड ठोठावला. त्या वेळीं बेफाम होऊन बापटांनीं कोर्टांत विलक्षण भाषण केलें. त्याचाहि त्यांना पुढें फार त्रास सोसावा लागला.

## (८) लोकमान्य टिळकांनीं पाठ थोपटली

लो. टिळक मंडालेहून सुटून पुण्यांत परत आले. तेव्हां बापट 'पुणें सार्वजनिक सभे'चे चिटणीस होते. टिळकांना कांहीं प्रसंगानें डेक्कन एज्युकेशन सोसायटीचा पहिल्या वर्षीचा अहवाल पाहिजे होता. तो सोसायटीच्या दप्तरींहि न सांपडल्यामुळें टिळक संतप्त व निराश झाले होते. ही गोष्ट बापटांनीं समक्ष पाहिली. 'सार्वजनिक सभे'ची मोठी लायब्ररी त्यांनीं फार परिश्रमपूर्वक लावली असून तींत तो अहवाल त्यांनीं पाहिला होता. त्यांनीं तो ताबडतोब आणून लोकमान्यांच्या हातांत दिला. तेव्हां त्यांना आश्चर्य व समाधान वाटून अनेक मंडळींच्या देखत त्यांनीं बापटांची पाठ थोपटली!

## (९) 'लाडके लेखक म्हणून बक्षीस दिलें'

सदाशिवराव यांनीं सन १९०७ पासून १९२० पर्यंत लो. टिळक व साहित्यसम्राट् केळकर यांचे 'लेखक' म्हणून काम केलें. वरील दोघांना आपल्या

हातांनीं लिहिण्याचा कंटाळा असे. त्यांचे लेखक म्हणून लिहिण्याचें काम बापट करीत. 'केसरीं' तील लेख काय किंवा इतर लिखाण काय, त्यांसाठीं लो. टिळक तोंडानें अति जलद मजकूर सांगत. बापट तितक्याच जलदीनें मजकूर लिहीत. टिळकांना थांबण्यास ते सवडच देत नसत. कोण कोणास थांबवितो अशी त्यांची शर्यत चाले! शिवाय टिळक-केळकर यांचा शुद्धलेखनावर मोठा कटाक्ष असे. अशीं सर्व बंधनें बापटांनीं पाळल्यामुळें व त्यांचें अक्षरहि उत्तम असल्यामुळें ते त्या दोघांचे 'लाडके लेखक' बनले होते. तसेंच लो. टिळक यांनीं होमरूल लीग काढल्यापासून त्यांचें व केळकरांचें इंग्रजी लेखनाचें काम अतिशय वाढलें; तें सर्व टाईपराइट करावें लागे. बापट हे उत्तम टायपिस्ट होते. टिळक-केळकर यांच्या टाईपराइटच्या प्रचंड कामामुळें रेमिंग्टन व ऑलिव्हर या यंत्रावर काम करून तीं यंत्रें बापट यांनीं खिळखिळीं केलीं होतीं इतकें त्या दोघांचें टाईपराइटचें काम त्यांनीं केलें! असें सांगतात कीं, टाईपराइट केलेल्या शेंकडों पानांत बापटांच्याकडून एकहि चूक होत नसे. यामुळें तर टिळक-केळकर यांची बापटांच्यावर फार मर्जी बसली होती. लोकमान्य टिळक यांच्या इच्छेवरून श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं The Case for Home Rule हा बहुमोल ग्रंथ लिहिला. तो टिळकांना अतिशय आवडल्यामुळें त्यांनीं त्यांस धन्यवाद दिले. सदर ग्रंथाचें हस्तलिखित वाचण्याचे श्रम पडूं नयेत म्हणून टिळकांनीं तो ग्रंथ, बापट यांच्याकडून टाईप-राईट करून घेतला. बापट यांनीं तो ग्रंथराज अति जलदीनें व थोडया वेळांत बिनचूक टाईपराइट करून दिल्यामुळें लोकमान्यांनीं त्यांस मोठी शाबासकी दिली व कांहीं बक्षीसहि दिलें.

## (१०) टिळक-केळकर यांच्या आठवणींचे ग्रंथ

लो० टिळकांना एक लाखाची थैली त्यांच्या एकसष्टाव्या वाढदिवशीं देण्याची कल्पना खाजगी सभेंत श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं काढली. या वेळीं बापटांची ऐपत नसतांहि ५०० रुपयांचा आंकडा त्यांनीं घातला व त्याची भरपाई घरांतील दागिना मोडून त्यांना करावी लागली! टिळक दिवंगत झाल्यावर बापटांनीं त्यांच्या 'आठवणी व आख्यायिका' जमविण्यासाठीं जिवापाड मेहनत केली व पदरचे शेंकडों रुपये खर्च करून

इंग्लंडसारख्या दूर देशांतील ब्रिटिश पुढाऱ्यांच्या आठवणीहि जमवून आपला बहुमोल ग्रंथ तीन खंडांत रचिला. त्यासाठी आठवणी जमविण्याकरतां त्यांनीं ठिकठिकाणच्या लोकांस एकंदर २८७२ पत्रें स्वहस्तें लिहिलीं ! आठवणीकरतां त्यांनीं कित्येकांचा इतका पिच्छा पुरवला कीं, त्यांपैकीं कांहीं जण त्यांस आठवणीचें 'बोअरिंग मशीन' असें म्हणूं लागले ! त्यांनीं ज्यांच्याकडून आठवणी मिळविल्या त्यांत इंग्लंडचे मुख्यप्रधान मि. राम्से मॅक्‌डोनाल्ड, मजूर पक्षाचे पुढारी कर्नल वेजवुड, महात्मा गांधी, लाला लजपतराय, बाबू अरविंद घोष, सयाजीराव महाराज यांसारखे अनेक थोर पुरुष होते. बापट यांना माहीत असल्यावरून त्यांनीं प्रत्यक्ष बादशहा पंचम जॉर्ज यांच्याकडूनहि आठवणी मिळविण्याचा प्रयत्न केला. तें पाहून तात्यासाहेब केळकर विनोदानें म्हणाले, "आतां बापट यांनीं फक्त ब्रह्मदेवाकडूनच आठवणी मागविण्याचें राहिलें आहे !!" बापटांचे हे तीनहि खंड व परिश्रमपूर्वक तयार केलेला 'लो० टिळक सूक्तिसंग्रह' हा ग्रंथ असे सर्व ग्रंथ अत्यंत लोकप्रिय झाले. त्यांच्या या अपूर्व टिळकभक्तीबद्दल व वाङ्मय सेवेबद्दल बेळगांवास भरलेल्या साहित्य संमेलनांत त्यांस संमेलनाचे अध्यक्ष कै० शिवरामपंत परांजपे यांच्या हस्तें एक मौल्यवान सोनेरी घड्याळ बक्षीस देण्यांत आलें. याशिवाय पुण्यांत त्यांच्या डॉ० पळसुले प्रभृति स्नेही मंडळींनीं ५०० रु. ची थैली त्यांस नजर केली; पण ती त्यांनीं स्वतः-साठीं न घेतां पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं नेमलेल्या समितीनें जो स्वराज्यविषयक अहवाल इंग्रजींत प्रसिद्ध केला होता त्याचें भाषांतर मराठींत प्रकाशित करण्याकरितां श्री. तात्यासाहेब केळकर यांच्या स्वाधीन केली. श्री. तात्यासाहेब केळकर यांजविषयीं बापटांना विलक्षण आदर वाटत असल्यामुळें त्यांनीं तात्यासाहेबांच्या निधनानंतर त्यांच्या आठवणींचाहि एक सुंदर मोठा ग्रंथ प्रसिद्ध केला व तोहि सर्वमान्य झाला.

### (११) लो. टिळक-सूक्तिसंग्रह : 'कष्टांची शिकस्त !'

लोकमान्यांच्या 'आठवणी-आख्यायिका' या ग्रंथापेक्षांहि 'लो० टिळक-सूक्तिसंग्रह' हा बापटांचा ग्रंथ बहुमोल असल्यामुळें तो महाराष्ट्रांत अधिक

गाजला. हा ग्रंथ म्हणजे टिळक-लिखित समग्र वाङमयाचें उत्कृष्ट अत्तरच होय. यामुळें तो ग्रंथ लोकांस फार आवडला. याचें प्रत्यंतर म्हणजे, सदर ग्रंथाच्या छापलेल्या तीन हजार प्रती चुटकीसरशा महिन्या दोन महिन्यांतच खपून गेल्या ! आज एकहि प्रत बाजारांत व इतर कोठेंहि मिळूं शकत नाहीं. लोकमान्यांविषयीं बापटांची विलक्षण श्रद्धा असल्यामुळें या ग्रंथा-करतां सहृदयतेनें त्यांनीं अतिश्रम केले. महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध अशा अनेक लोकांकडून या ग्रंथाविषयीं प्रसिद्ध झालेल्या अभिप्रायांपैकीं नमुना म्हणून कांहीं अभिप्राय पुढें दिले आहेत. हे सर्वच अभिप्राय उत्तमोत्तम असले तरी फार विस्तृत आहेत. म्हणून नाइलाजानें ते अतिसंक्षिप्त रूपानें, पण मूळ-च्याच शब्दांत पुढें दिले आहेत :—

सदर ग्रंथासंबंधीं **प्रो० शि. म. परांजपे**, पुणें, म्हणतात—" लो. टिळकांचा थोरपणा आणि बापटांची त्यांच्याबद्दलची निःसीम भक्ति यांच्या संयोगापासूनच 'आठवणी व सूक्ति' असलीं हीं अप्रतिम पुस्तकें मराठी भाषेमध्यें निर्माण झालीं आहेत. कोशामध्यें जसा एखादा शब्द चटकन् काढून पाहावा त्याप्रमाणें अमुक अमुक विषयावर लोकमान्यांचीं काय काय मतें होतीं, हें पाहण्यास ग्रंथाच्या शेवटीं दिलेल्या सूचीचा तर फारच उपयोग होणार आहे."

**ना. श्रीमंत ग. श्री. खापर्डे**, उमरावती लिहितात—"बापटांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें अत्यंत श्रम करून हा ग्रंथ फार काळजीपूर्वक लिहिला आहे. त्यांतील सर्वच भाग उत्तम साधला आहे. पण त्यांतल्या त्यांत त्यांचें आत्मनिवेदन फारच फार उत्तमोत्तम असून अत्यंत मनोवेधक व चिरमननीय असें आहे."

**श्री. गंगाधरराव देशपांडे, बेळगांव** :—" या ग्रंथांत सूक्तींची निवड करण्यांत संग्राहकांनीं दाखविलेला मार्मिकपणा जाडच्या विद्वानांनाहि व्यक्त करतां आला असता कीं नाहीं, याची मला शंकाच आहे. पण यास कारण बापटांची टिळकभक्तीच होय; आणि खऱ्या भक्तीचा महिमाच असा आहे कीं, विद्वानापेक्षां खऱ्या भक्ताचें आपल्या देवतेसंबंधाचें ज्ञान अधिक यथार्थ व अचूक असतें. लोकमान्यांच्या या सूक्तींचें परिशीलन या आपल्या राष्ट्रांत

हल्लीं माजलेल्या पक्षभेदाच्या स्थितींत पुढारी, अनुयायी व विशेषेंकरून हिंदु तरुण यांना यथार्थ घडलें तर पुष्कळसे भेद विरघळून जातील व राष्ट्रास आज अत्यंत आवश्यक असलेलें एकीकरण सुसाध्य होईल अशी माझी खात्री आहे. ”

**लोकनायक मा. श्री. अणे** :—“हा ‘सूक्तिसंग्रह’ म्हणजे लोकमान्य वाङ्मय-सुधा-महोदधीचें मंथन करून काढलेलें ‘नवनीत’ होय. यांत रा. बापट यांनीं जीं उज्ज्वल रत्नें प्रदर्शनार्थ मांडलीं आहेत त्यांच्या प्रसादपूर्ण दिव्य तेजानें लोभित होऊन हजारों सारस्वतभक्त यात्रेकरूंच्या आर्द्र अंतःकरणांत लोकमान्य-वाङ्मय-तरंगिणींत निमज्जन करून स्वतःचा ज्ञानरूप काय पुनीत करून घ्यावा व कृतार्थता संपादन करावी, अशी अभिनंदनीय अभिलाषा उत्पन्न होईल व तद्द्वारा लोकमान्यांनीं चालना दिलेल्या अनेकविध चळवळींत नवीन चैतन्य उत्पन्न होईल अशी मला बलवत्तर आशा वाटते. ‘आठवणी व आख्यायिकां’ च्या तीन ग्रंथांच्या प्रकाशनानें लोकमान्यांसंबंधानें सर्व भरतखंड काय म्हणत आहे, हें बापटांनीं जगाच्या निदर्शनास आणून दिलें. प्रस्तुत ग्रंथ-प्रकाशनानें लोकमान्य भरतखंडास काय सांगूं इच्छित होते व काय सांगत आले, हें त्यांनीं निदर्शनास आणून दिलें आहे. पूर्वोक्त ग्रंथ हा लोकमान्यांच्या दिगंत कीर्तीचा प्रत्यंतर-प्रमाण म्हणून समजण्यांत आल्यास हा ग्रंथ त्यांच्या त्रिखंड पांडित्याचा, बहुविध कार्यसातत्याचा, अलोट देशभक्तीचा, अविचल व गंभीर विचारसरणीचा आणि अपूर्व धैर्याचा प्रत्यक्ष व दस्तऐवजीं अंतर्गत प्रमाण म्हणून समजावा लागेल. ......कायद्याच्या ग्रंथाची ‘डायजेस्ट’ – ‘सूत्ररूप निर्णयसंग्रह’ – नियमित रीतीनें प्रसिद्ध करण्यांत येत असतात. त्यांचा उपयोग जसा कायद्याच्या अभ्यासकांस व न्यायव्यवसायांत असणारांस होत असतो, तसाच लोकमान्यांच्या मागोमाग त्यांच्याच संदेशाच्या अनुरोधानें कार्य करणाऱ्या देशभक्तांस, सरस्वतीसेवकांस व व्यवसायी सामान्य जनतेस बापटांच्या या सूक्तिसंग्रहांचा होईल, असा भरंवसा वाटतो. ग्रंथाचें बाह्यांग सुंदर आहे; अंतरंग तर प्रत्यक्ष लोकमान्यांच्या वाङ्मय-शरीराचा आत्माच होय. सारांश, या थोर ग्रंथाच्या प्रकाशनानें लोकमान्य-वाङ्मय-स्मारकसेवेच्या

मंदिरावर बापटांनीं कळस चढवून सर्व भरतखंडास उपकृत केलें आहे, यांत संशय नाहीं. "

**स्वातंत्र्यवीर बॅ. सावरकर रत्नागिरी** :—"पुस्तक शक्य तितकें आकर्षक, उठावदार आणि उपयुक्त करण्यांत कष्टांची बापट पराकाष्ठा करतात ! "

**देशभक्त ल. ब. ऊर्फ आण्णासाहेब भोपटकर**, पुणें :—"हा सूक्तींचा ग्रंथ प्रसिद्ध करून बापट यांनीं महाराष्ट्राच्या विद्यमान व भावी पिढ्यांना कायमचें ऋणबद्ध करून ठेविलें आहे, यांत शंका नाहीं. या नवीन ग्रंथांत बापट यांनीं लोकमान्यांच्या पंचवीसशें वचनांचा संग्रह अत्यंत मार्मिकपणानें व परिश्रमानें केलेला आहे."

**श्री. ना. रा. बामणगांवकर, अमरावती** :—"एखाद्या मनोहर उद्यानांतील नाना रंगांच्या व नाना प्रकारच्या सुंदर व सुवासिक पुष्पांतून वेंचून काढलेल्या पुष्पांचा गुच्छ जितका मनोहर व आनंददायक होतो तितकाच लोकमान्यांच्या ज्ञानोद्यानांतील विविध विषयांवरील उद्‌बोधक व स्फूर्तिकारक सूत्रें निवडून सूक्तावलीच्या रूपानें श्री. बापट यांनीं तयार केलेला हा गुच्छ मनोहर व आनंददायक झाला आहे हें तर खरेंच; पण पुष्पगुच्छास एका दिवसाच्याहि आयुष्याची मर्यादा नसते. या ज्ञानगुच्छास तर निसर्गतःच अमरत्व लाभलें आहे. आणि म्हणूनच हा सूक्तिगुच्छ महाराष्ट्र वाचकांच्या वाचन-मंदिरांत व ज्ञानेच्छूंच्या हृदयमंदिरांत नित्य वास करील. खरोखर बापट यांनीं लोकमान्यांच्या ज्ञानमूर्तीचें हें रेषाचित्र कुशल चित्र-काराप्रमाणें सहज चितारिलें आहे. "

**श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, जळगांव**, वऱ्हाड :—"संग्राहकांचें आत्मनिवेदन विद्वत्तापूर्ण, खुबीदार व मनोरंजक झालें आहे. त्यांत आलेल्या कांहीं उपमा अत्यंत समर्पक वाटल्या. एकंदरींत पुस्तकावर बापट यांनीं फारच परिश्रम केल्यासारखे दिसतात. त्यांचें ग्राहकांकडून चीज होईल अशी आशा आहे."

**वीर वामनराव जोशी, अमरावती** :—"हा बहुमोलाचा ग्रंथ पाहून व वाचून मनास फार संतोष वाटला. टिळक-वाङ्मयांतील हा ग्रंथ राज-

कारण-अभ्यासूंना मार्गदर्शक होईल यांत शंका नाहीं. हा ग्रंथ निर्माण करण्यांत बापटांच्या परिश्रमांचें कौतुक किती करावें?"

**श्री. शंकर श्रीकृष्ण देव, धुळें** :—" बापट यांनीं लोकमान्य-वाङमयाची जी अपूर्व सेवा केली आहे तींत या सूक्तिसंग्रहानें उत्कृष्ट भर पडली आहे. लोकमान्यांच्या मुखांतून प्रसंगोपात्त जीं वाग्रत्नें बाहेर पडलीं किंवा त्यांच्या लेखणींतून सिद्धान्तरूप जीं सूत्रमय वाक्यें लिहिलीं गेलीं, त्यांपैकीं कांहीं निवडक रत्नांचा संग्रह करण्यांत आला आहे. जया अंतरीं भगवंत। अचल राहिला निवांत। तो स्वभावें जें बोलत। तें ब्रह्मनिरूपण ॥ या पारमार्थिक सिद्धान्ताप्रमाणें 'सकाळीं मी जागा झाल्यापासून रात्रीं झोंपीं जाईपर्यंत मातृभूमीच्या चिंतनावांचून माझा एक क्षणहि जात नाहीं' (सूक्ति अनुक्रमांक १८९७) अशा वृत्तीच्या महापुरुषाच्या मुखांतून जे सहज उद्गार बाहेर पडत, तेच या देशाचें राजकारण होय. त्या राजकारणाचा ज्यांस परिचय करून घ्यावयाचा असेल त्यांनीं बापटकृत या 'टिळक-सूक्ति-संग्रहा'चा अभ्यास करावा."

**तपस्वी न. शि. ऊर्फ बाबासाहेब परांजपे** :—" चालू हिन्दी राजकारण व्यवहारांत माजलेल्या घोटाळयाच्या निबिड अंधकारांतून बाहेर पडण्यास हा 'सूक्तिसंग्रह' म्हणजे उत्तर-ध्रुवासारख्या काळोख्या व अपरात्रीं स्थल व काल शुद्धिदाता एक सूर्यकान्त मणीच होय. हा संग्रह जितका वाचला जाईल व त्यावर जितकें चिंतन होईल तितका पुढील व्यवहार—धार्मिक व राजकीय—स्पष्ट होऊन प्रत्यक्ष आचारास मार्गदर्शक होईल."

**श्री. ल. रा. पांगारकर, नाशिक** :—" आठवणी व आख्यायिका या ग्रंथाचे तीन भाग प्रसिद्ध करून रा. बापटांनीं टिळक-वाङमयांत उत्कृष्ट भर घातलीच आहे. पण तेवढेंच करून न थांबतां गुरुसेवेचें पुण्य या नवीन ग्रंथानें त्यांनीं अधिक जोडलें आहे. समग्र ग्रंथ पाहतां बापटांच्या दीर्घ परिश्रमांची व गुरुभक्तीची तारीफ करावी तेवढी थोडीच आहे. ग्रंथांतील विषयाची मांडणी व ग्रंथाचा उठाव चित्तवेधक असून आंतील विपयास साजेसा आहे. लोकमान्यांचे हे सिद्धान्त पुढील पिढयांना खास मार्गदर्शक होतील. म्हणून प्रत्येकानें हा ग्रंथ अवश्य आपल्या संग्रहीं ठेवावा."

**श्री. नारायणराव राजहंस ऊर्फ बालगंधर्व** :—" लोकमान्यांची नुसती मूर्ति डोळ्यांपुढें आणल्यानें क्षणभर मन गुंग होऊन जेथें आपली चित्त-वृत्ति प्रसन्न होते तेथें साक्षात् त्या महात्म्याच्या मुखांतील दुष्प्राप्य असे बोधामृताचे पेले कोणी पाजूं लागल्यास त्या आनंदाचें काय वर्णन करावें ! 'टिळक-सूक्ति-संग्रह ' म्हणजे दुसरें काय आहे ! यांतील एकेक सूक्ति म्हणजे बोधामृताचा एकेक घोटच होय. आणि हा अमृत-कुंभ प्राप्त करून दिल्याबद्दल रा. बापट यांचे आभार मानण्यापेक्षां आपण वाचकांनीं आपल्या सुकृताबद्दल आपलें स्वतःचेंच अभिनंदन करून घेतलें पाहिजे ! "

**श्री. के. वि. गोडबोले, महाराष्ट्र-शाकुंतलकार** :—" प्रस्तुत ग्रंथ मराठी भाषेंत सर्वतोपरी अपूर्व आहे, व त्यास संपादकांची सुंदर प्रस्तावना जोडण्यांत आल्यामुळें तर या सूक्ति-ग्रंथांला फारच शोभा व उपयुक्तता प्राप्त झाली आहे असें वाटतें. टिळकांच्या आठवणी, आख्यायिका व सूक्ति, स्मृतींतून नष्ट होण्यापूर्वींच त्या संग्रहीत व प्रसिद्ध करून बापटांनीं भावी पिढ्यांपुढें लोकमान्यांचें खाजगी व सार्वजनिक चालतें-बोलतें चरित्रच कायमचें उभें केलें आहे, हे त्यांचे पुढील काळावर मोठे उपकार झाले आहेत."

**ज्ञानप्रकाश, पुणें** :—" टिळक-वाङ्मयाच्या सामग्रीचें मंथन करून श्री. बापट यांनीं मोठ्या परिश्रमानें हा संग्रह निर्माण केला आहे. ज्योतिष, धर्मशास्त्र, वेदान्त, गणित, गीर्वाणभाषा, प्राच्यविद्या संशोधन, इतिहास वगैरे अनेक विषयांत टिळकांची गति असल्यामुळें हा सूक्तिसंग्रह वैचित्र्य-मय झाला असून ज्याची ज्याकडे प्रवृत्ति असेल त्याला त्या विषयासंबंधीं गोडी लागावी असा मजकूर यांत आहे. हा सूक्तिसंग्रह घटकाभर कोणींहि हातीं घेतला तरी तो त्यास कमी-अधिक अंशानें उद्बोधक झाल्यावाचून राहणार नाहीं. रा. बापट यांनीं भक्तिपूर्वक केलेल्या श्रमाचें योग्य चीज होईल अशी आम्ही आशा प्रदर्शित करतों."

**महाराष्ट्र, नागपूर** :—" वाचमर्थोनुधावति " या भवभूतीच्या उद्गारांचा हा ' टिळक सूक्तिसंग्रह ' वाचतांना क्षणोक्षणीं प्रत्यय आल्या-शिवाय राहात नाहीं. सूक्ति—सुभाषित नव्हे—म्हणजे अंतःस्फूर्तीचा बोल. एका अर्थानें त्यांना (Oracle) देववाणी म्हणतां येईल. ती जितक्या

अवधानतेनें उच्चारली जाते तितकी त्यांत अंतःस्फूर्ति अवतीर्ण होते— अंतरात्मा आविर्भूत होतो आणि म्हणूनच महापुरुषांच्या सूक्तींना इतकें महत्त्व देतात...करितां लोकमान्यांचीं सर्व विषयांवरील मतें जाणण्याची इच्छा असणारांना हें पुस्तक संदर्भ-ग्रंथ म्हणून फार उपयोगी होईल."

**Mr. D. V. Belvi, Belgaum** :—"The 'Sūktisamgraha' published by Mr. Bapat is a collection of many of the incomparable sayings and pointed expressions scattered over the numerous writings and speeches of the late Lok. Tilak. The sayings are homely truths expressed in terce and pithy phraseology by a master-mind. They almost remind one of Solomon's Proverbs or Goethe's Maxims. Mr. Bapat has rendered real service to Maharashtra by bringing within an easy reach of its youth, the pith and marrow of Lok. Tilak's wisdom."

याशिवाय महाराष्ट्रांतील असें एकहि वर्तमानपत्र राहिलें नाहीं कीं, ज्याच्या संपादकांनीं या ग्रन्थावर विस्तृत अभिप्राय दिला नाहीं. कांहीं प्रमुख वर्तमानपत्रकारांनीं तर आपल्या पत्रांत अग्रलेख लिहून या ग्रंथाची फार प्रशंसा केली. पण विस्तारभयास्तव त्यांचा परामर्ष घेतां आला नाहीं, याबद्दल खरोखरच फार वाईट वाटतें.

## (१२) नमुनेदार प्रचारकार्य व थोरांचे अभिप्राय

बापटांचें मोठें कार्य म्हणजे 'पुणें सार्वजनिक सभा' व 'लो. टिळक स्मारक मंदिर' या संस्थांचे ते चिटणीस असल्यामुळें त्या संस्थांतर्फे त्यांनीं महाराष्ट्रांत सुमारें १२–१३ वर्षें केलेलें नमुनेदार प्रचारकार्य होय. पुणें जिल्ह्यांत सुमारें १३०० खेडीं आहेत. त्यांपैकीं बारीक गांवें सोडून सुमारें ६००–७०० खेडेगांवांत त्यांनीं 'सार्वजनिक सभे'तर्फे अनेक वेळां जाऊन संघटित कार्य केलें. तसेंच महाराष्ट्रांतील दहाहि जिल्ह्यांतील तालुक्यांच्या गांवीं व इतर ठळक गांवीं जाऊन 'टिळक स्मारक-मंदिर' संस्थेतर्फे प्रचलित राजकीय विपयांवर अभ्यासपूर्वक व्याख्याने देऊन त्यांनीं लोक-

जागृति केली. वरील दोन्ही संस्थांतर्फे केलेल्या प्रचारकार्याचें त्या त्या संस्थांनीं सर्व अहवाल प्रसिद्ध केले आहेत. हे सर्व अहवाल माहितीपूर्ण, मनोरंजक व बोधप्रद असत. महाराष्ट्रानें एकमुखानें त्यांची प्रशंसा केली. त्यांच्याकडे पाठविण्यांत आलेल्या कित्येक अभिप्रायांपैकीं, नमुन्यादाखल, प्रमुखांतील प्रमुख अशा फक्त पांचच थोर माणसांचे अभिप्राय खालीं देत आहें :—

(१) श्री. न. चिं. केळकर दि. २६–३–३६ च्या पत्रांत लिहितात :—

"रा. बापट यांचे आजवरचे सर्वच प्रचार-वृत्तान्त, आजचा महाराष्ट्रीय समाज व त्याचें राजकारण यांवर उत्कृष्ट प्रकाश पाडतात. शिवाय ते फार मनोरंजक आहेत. एम्. ए. च्या Thesis ला जर कोणी Village Life, Village Mind and Village Organisation असा विषय घेईल तर त्यास बापट यांच्या या सर्व वृत्तान्तांची मौल्यवान मदत होईल."

श्री

ता. १९–१–१९३१

(२) मित्रवर्य सदाशिवराव बापट यांसी सा. न. वि. वि.

आपल्या प्रचाराच्या कार्याचे वृत्तान्त वाचले. वाचून अति आनंद झाला. मला जी माहिती पाहिजे होती ती आपल्या वृत्तान्तांत पूर्णपणें येऊन गेली आहे. या विशेष माहितीचा उपयोग मुंबई कौन्सिलचे सभासद करून घेतील तर मोठें कार्य होणार आहे. केसरीच्या संपादकांनींहि याचा पाठपुरावा केला पाहिजे. आपलें लिहिणें मार्मिक, सुंदर आणि संक्षिप्त असल्यामुळें मनाला साहजिकच पटतें व त्यामुळें आवडतें. आपले अनुभव फारच मार्मिकपणें लिहिले आहेत, आणि त्यांची भाषाहि फार सुंदर साधली आहे. मी वाचीत असतां आपण समक्ष बसून माझ्याशीं बोलत आहां असा भास होऊं लागला !

आपला मित्र

**गणेश श्रीकृष्ण खापर्डे**

श्री. बलवन्ताश्रम, पुणें
ता. ३०–३–१९३८

(३) दे. भ. सदाशिवराव बापट यांस सा. न. वि. वि.

आपले सर्व वृत्तान्त मी नेहमीं मोठ्या आवडीनें वाचतो. वृत्तान्ताच्या शेवटीं परिशिष्टें देतां तीं फारच महत्त्वाचीं वाटतात. ग्रामविषयक असें एक सर्वांगीण पुस्तक लिहिण्याइतकी भरपूर सामग्री आपणाजवळ खास आहे. शिवाय परमेश्वरकृपेनें तुमची लेखणी रसाळ व विचारशक्ति काटेकोर आहे. खरेंच सांगतो, तुमचे वृत्तान्त वाचून आल्हाद वाटतोच, पण तुमचा हेवाहि वाटतो !

आपला
**लक्ष्मण बलवंत भोपटकर**

श्री. धुळें,
ता. १०–७–१९३८

(४) श्रीसमर्थभक्त सदाशिवराव बापट यांसी सा. न. वि. वि.

आपले आजपर्यंतचे प्रचारांचे सर्वच वृत्तान्त फारच उद्बोधक आहेत. जग हें कसें त्रिविध आहे याचे नमुने आपल्या मार्मिक वृत्तान्तांवरून पाहावयास सांपडतात. परवा निरुत्साह, काल उत्साह, आणि आज उत्साहातिरेक म्हणजे उन्माद यांचा जन-समाजांत, प्रस्तुत कसा खेळ चालला आहे याचा बोध तुमच्या वृत्तान्तांवरून चांगला होतो.

आपला
**शंकर श्रीकृष्ण देव**

श्री. जळगांव, वऱ्हाड

(५) सा. न. तुमचे आजपर्यंतचे सर्व प्रचार वृत्तान्त मी वाचीत आलों आहे. ते मोठे चटकदार, मनोरंजक, उद्बोधक व माहितीपूर्ण आहेत. सरकार व जनता यांनीं योग्य परामर्ष घेतला तर तुमच्या परिश्रमाचे सार्थक होईल.

आपला
**श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**

या बाबतींत एक सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे हें प्रचारकार्य करीत असतां, गांवोगावीं बापट यांनीं आपले १९२० सालापासूनचें परान्न-वर्ज्याचें व्रत अबाधित कायम ठेवलें ही होय. परान्न सोडण्याचें त्यांचें कारणहि टिळक-भक्तिमूलक आहे, हें तें कोणास कधीं सांगत नाहींत, हेंहि विशेष होय !

## (१३) सरकारी बंदी मोडून खानदेशांत प्रवेश व शिक्षा

१९३० सालीं नेहरू रिपोर्टाची माहिती जनतेस करून देण्याकरितां बापटांनीं टिळक मंदिर संस्थेतर्फे महाराष्ट्रांतील मोठ्या गांवांत व्याख्यानांचा दौरा काढला. तेव्हां त्यांच्यावर पूर्व खानदेशच्या कलेक्टरनें नोटीस बजावून त्या जिल्ह्यांत प्रवेश करण्यास त्यांस बंदी केली. तो बंदीचा हुकूम धुडकावून त्यांनीं पूर्व खानदेशांत व्याख्यानें दिल्यामुळें त्यांच्यावर भुसावळ येथें खटला भरण्यांत आला व त्यांना दोन महिन्यांची शिक्षा झाली. ती त्यांनीं धुळ्याच्या तुरुंगांत आनंदानें भोगली. तथापि कच्च्या कैदेंत असतांना श्री. बापट यांचे फार हाल करण्यांत आले; त्यामुळें ते तेथें आजारी पडले. ती सर्व हकीकत त्या वेळच्या वर्तमानपत्रांत मुख्यतः केसरींत आली आहे.

तुरुंगांतून सुटून आल्यावर नेहमीप्रमाणें बापट यांनीं आपल्या या प्रचारकार्याचा विस्तृत अहवाल टिळकमंदिर संस्थेस सादर केला व तो त्या संस्थेनें पुस्तक रूपानें प्रसिद्ध केला. त्यांतील जरुरीपुरता मजकूर संक्षिप्तरूपानें खालीं देत आहें. ---

पूर्व खानदेशांतील माझ्या व्याख्यानांचा मोठा दौरा बहुतेक संपत आला होता. इतक्यांत या जिल्ह्याच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें मला भाषणबंदी केली. पण सदर भाषणबंदी जुमानावयाची नाहीं असें मीं ठरविलें व त्यांस पुढील उत्तर पाठविलें. ... 'I have decided to go to Bhusawal on 16th July 1930 to proceed with my unfinished tour and lecture series. I, therefore, hereby inform you that I shall be ready to receive your notice at Bhusawal on 16th July and ready also to disobey that notice and deliver my lecture that very evening.'

ठरल्याप्रमाणें सदर दिवशीं व्याख्यान होतांच मला नोटीस वजावून पकडण्यांत आलें. पुढें कोर्टांत खटल्याच्या वेळीं, असहकारितेच्या तत्त्वानुसार मीं कोणत्याहि प्रकारें खटल्यांत भाग घेण्याचें नाकारिलें. पण कोर्टास एक यादी (लेखी स्टेटमेंट) नजर केली. ती येणेंप्रमाणें :—

"मला या पूर्व खानदेश जिल्ह्यांत भाषणबंदी कां व्हावी हेंच समजत नाहीं. कारण या जिल्ह्यांत ज्या स्वराज्य विषयावर मी बोलत होतों त्याच विषयावर पुणें, नाशिक व पश्चिम खानदेश या तीन जिल्ह्यांत शेकडो गांवीं मीं जाहीर व्याख्यानें दिलीं असतां व पूर्व खानदेश जिल्ह्यांतीलहि या विषयावरील माझ्या व्याख्यानांचा दौरा संपत आला असतां, आतांच म्हणजे अगदीं शेवटीं ही अक्षम्य भाषणबंदी व्हावयाचा मला अर्थच कळत नाहीं. ज्या विषयावर मी बोलत होतों तो विषय म्हणजे 'स्वराज्य.' अर्थातच जनतेचा नैसर्गिक व जन्मसिद्ध हक्क आणि तो प्राप्त करून घेण्याचें साधन म्हणजे शांततामय प्रतिकार अगर विरोध. जनतेच्या या साध्य-साधनास सरकार जर दोषी ठरविणार असेल व त्याचा अवलंब केल्याबद्दल गुन्हेगार म्हणून लेखणार असेल, तर मी असें स्पष्ट म्हणतों कीं, परमपवित्र, परमवंद्य, हिंदमातृभूमीच्या मुक्ततेकरितां मी हा गुन्हा केला आहे व जन्मभर मी तो करीत राहावा अशी परमेश्वरानें मला बुद्धि द्यावी अशीच त्यास माझी प्रार्थना आहे.

"शेवटीं एवढेंच सांगावयाचें कीं, जगांत आजपर्यंत स्वराज्याचा—स्वातंत्र्याचा लढा परस्परांचें रक्त सांडून लढविण्यांत आला आहे. परंतु आज हिंदुस्थानांत याच्या उलट प्रयोग करण्याचें म्हणजे अनत्याचारानें-अहिंसाव्रतानें हा झगडा यशस्वी करण्याचें राष्ट्रानें कंकण बांधलें असतांना सरकार राष्ट्र-सेवकांची मुस्कटदावी करीत आहे हें चिन्ह ठीक नव्हे. अशा या अत्याचारांनींच अशांतता उत्पन्न होते; व हीच अशांतता सरकारास अनिष्ट असलेल्या क्रांतीस प्रसवते. अर्थात् याची सर्व जबाबदारी अत्याचारी सरकारावर पडते, हें मात्र सरकार सोयीस्करपणें विसरतें. म्हणून नैतिक व व्यावहारिक दृष्ट्याहि दोषी असेल तर तें सरकार, व निर्दोषी आणि निष्पाप ( innocent ) असेल तर ती जनता. म्हणून त्या पवित्र जनता-जनार्दनाच्या मंगलमय जयजयकारांत मी हा लेख संपवीत आहे."

### (१४) लोकमान्यांच्या विश्वासांतील

१९१४ सालीं मंडाले तुरुंगांतील सहा वर्षांची शिक्षा भोगून लो. टिळक आल्यावर १९१५ सालीं बेळगांव येथें भरलेल्या प्रांतिकसभेच्या अधिवेशनानंतर तेथें त्यांनीं होमरूल-लीग ही संस्था स्थापून तिच्या कार्याची मुहूर्तमेढ रोविली. तेथेंच त्यांनीं या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची योजना केली. त्यांत बापट यांस 'हेड अकौन्टंट नेमण्यांत आलें. त्यांनीं हें काम 'देवकार्य' म्हणून केलें. सदर संस्थेकरितां लोकमान्यांनीं देशांत प्रचंड दौरे काढून लक्षावधि रुपयांचा निधि जमविला. हा त्यांचा पराक्रम न साहून कोणी मत्सरी व दुष्ट टवाळांनीं सदर निधीचे हजारों रुपये कांहीं कार्यकर्त्यांनीं गडप केले असें उठविलें. या खोडसाळ उठावणीस उत्तर देतांना एका सभेंत लोकमान्य म्हणाले, "जोंपर्यंत या निधीचे खजिनदार श्रीमंत नेने, ऑडिटर ग. स. मराठे, सेक्रेटरी तात्यासाहेब केळकर व हेड अकौन्टंट बापट आहेत तोंपर्यंत प्रत्यक्ष ब्रह्मदेवानें कांहीं सांगितलें तरी त्यावर मी विश्वास ठेवणार नाहीं." यावरून वरील तिघांबरोबर बापटांच्यावरही लोकमान्यांचा कसा विश्वास होता हें स्पष्ट दिसून येईल.

### (१५) सदा सत्यवादी विवेकी विचारी

सदाशिवराव जसे देशभक्त तसे देवभक्तहि आहेत. गीता आणि दासबोध त्यांच्या रोजच्या परिशीलनाचे ग्रंथ असून त्यांतील शिकवण त्यांनीं आपल्या अंगीं चांगलीच बाणवून घेतली आहे. ते दर रामदासनवमीला सज्जनगडावर जाऊन श्रीसमर्थांच्या समाधीचें पुण्यदर्शन घेण्यास चुकत नाहींत. त्यांत ते ब्रह्मानंद मानतात.

'सदा आर्जवी प्रीय जो सर्व लोकीं ।
सदा सत्यवादी विवेकी विचारी ॥'

या श्रीसमर्थ उक्तीप्रमाणें त्यांचें आचरण आहे.

### (१६) ते सत्पुरुष आहेत हें निश्चित

दैवी संपत्तीचे भगवद्गीतेंत सांगितलेले गुण श्री. बापट यांच्या ठिकाणीं बाहुल्यानें दृष्टीस पडतात. ते सर्वांशीं नम्रतेनें वागतात, अपशब्दानें कोणाचेंहि

मन कधीं दुखवीत नाहींत, 'सदा बोलणें नम्र वाचा सुवाचा' अशी त्यांची वागणूक आहे, निरपेक्षपणें उपकार करतात, कोणावरहि कधीं रागवत नाहींत. असत्य तर कधींच बोलत नाहींत. तथापि क्वचित् प्रसंगीं ते असत्य बोलतात; पण फक्त एकाच बाबतींत. ते नित्य नियमानें रोज तुळशीबागेंतील श्रीरामदर्शनास जातात. कोठें गेला होतां ? असें कोणी विचारल्यास देवदर्शनास गेलों होतों, असें कधींहि न सांगतां दुसरेंच कारण ते सांगतात. "देवदर्शन गुप्त ठेवावें; तें सांगण्यानें पुण्यक्षय होतो" अशी त्यांची भावना असल्यामुळें अशा बाबतींत ते असत्य बोलतात ! ते वस्तुतः लौकिक व्यवहार सोडून साधूच व्हावयाचे; परंतु वडील मातोश्रींवरील प्रेमानें त्यांना हा व्यवहार सोडवला नाहीं. म्हणूनच त्यांची गणना, क्षणभर साधूंत नसली तरी, सत्पुरुषांतच करावयास पाहिजे हें निश्चितच.

—स्वराज्य, दिनांक ६।१२।१९५२

# भाग १ (आ)

# आठवणीकार तीर्थस्वरूप आण्णासाहेब बापट

## यांचें

# चरित्र-चित्र (२)

[लेखक :—श्री. किशोर शंकर बापट (आण्णांचा पुतण्या)]

## (१) प्रास्ताविक

तीं. आण्णांना सर्वांत चरित्र वाचनाचा फार नाद आहे. तें त्यांचें आवडीचें वाङ्मय आहे. यांतूनच थोरांमोठ्यांच्या आठवणी सांगणें, लिहिणें यांचा उगम झाला आहे. दुसऱ्यांचीं चरित्रें, कथा, गोष्टी ऐकण्यास ते फार उत्सुक असतात. पण याच्या अगदीं उलट त्यांच्या स्वतःसंबंधाची स्थिति आहे. स्वतः-संबंधानें ते कांहींही लिहूं बोलूं इच्छित नाहींत हें अगदीं ठरून गेलें आहे. याचें एकच कारण मला दिसून आलें. तें असें कीं, 'उत्तम जन्मा येऊनि रामा गेलो मी वाया' असें त्याचें एकसारखें मनाशीं बोलणें चालत असल्यामुळें वाया गेलेल्या जीवानें पश्चात्तापयुक्त सदैव मौन धरावें असें यांच्या मनानें घेतलें आहे. 'मनारे जनी मौन्य मुद्रा धरावी' या त्यांचे गुरु श्रीसमर्थ यांच्या उपदेशाचा तर त्यांच्या मनावर विलक्षण परिणाम झाला आहे. यामुळें कोणीं कांहींहि म्हटलें तरी, ते स्वतःसंबंधानें कांहींहि बोलूं सांगूं इच्छित नाहींत. यामुळें माहिती मिळण्याचा सरळ मार्ग बंद झाला. गप्पागोष्टी करीत असतां, सहज ओघानें त्यांच्या बोलण्यांत येणाऱ्या जेवढ्या कांहीं गोष्टी ऐकावयास मिळतील तेवढ्यावरच समाधान मानावें लागतें; पण त्यास इलाज नाहीं. तथापि पुस्तक संग्रह करण्याचा व विशेषत. कागदपत्रें व्यवस्थित व जपून ठेवण्याचा त्यांचा कटाक्ष असल्यामुळें त्यांच्या सर्व संग्रहांतील कागदपत्रांतून सूक्ष्म संशोधनानें हातीं लागलेली माहिती व सहज त्यांच्याकडून ऐकण्यांत आलेल्या गोष्टींवरून पुढील त्रुटित मजकूर लिहिला आहे.

## (२) अपूर्व मृत्युपत्र

आमचें घराणें मूळ कोंकणांतील असलें तरी सुमारें दोडशें वर्षांपूर्वी पुणें येथील श्रीमंत सरदार मेहेंदळे यांनीं आपल्या इनामगांवांपैकीं सातारा जिल्ह्यांतील बोरखळ या गांवीं आमचे पूर्वज कै० आप्पा शास्त्री बापट यांच्या पुराणव्यवसायावर खूष होऊन त्यांस कांहीं जमिनी व तेथील आपला राहाता वाडा इनाम म्हणून दिला. वंशपरंपरेनें शेवटीं आण्णांचे वडील या मिळकतीचा उपभोग घेत होते. शिवाय सरकारी रजिस्ट्रार खात्यांतील नोकरींतून ते निवृत्त झाल्यावर सदर गांवीं ते राहात होते. आण्णा त्यांचे एकुलते एक चिरंजीव. पण ते राष्ट्रकार्याकरितां ब्रह्मचारी राहिल्यामुळें व त्यांची वृत्ति लक्षांत घेऊन त्यांच्या वडिलांनीं आण्णांच्या हयातीच्या शेवटीं त्यांनीं आपल्या जिन्दगीचे मृत्युपत्र कसें करावें हें लिहून ठेविलें व १९३९ सालीं ते कैलासवासी झाले. आण्णांचे परमस्नेही मुंबईचे अॅडव्होकेट कै० श्री. बाबासाहेब धारप यांस त्यांनीं हें मृत्युपत्र दाखविलें. तें पाहून बाबासाहेब धारप म्हणाले, "आजपर्यंत वकील म्हणून मी अनेक मृत्युपत्रें पाहिलीं. पण आण्णांच्यापेक्षां सवाई राष्ट्रीय दृष्टीनें बापानें आपल्या मुलाचें लिहिलेलें हें मृत्युपत्र पाहून मी थक्क झालों! जिनगीची व मुलाची काळजी घेणारे असे दूरदर्शी पुरुष क्वचितच." पितृ-भक्त आण्णांनीं आपले जिवश्च कंठश्च स्नेही श्री. धारप यांचे सल्ल्यानुरूप सर्व व्यवस्था केली हें सांगणें नकोच.

## (३) एक विलक्षण पत्र!

ती. आण्णांची देशभक्ति धर्ममूलक असल्यामुळें इंग्रजी राज्यांत धर्माची होत असलेली अवनति पाहून त्यांना जबर दुःख होई. या अवनतीचें मूळ परराज्य असल्यामुळें तें नष्ट केल्याशिवाय धर्मोद्धार होणार नाहीं असें त्यांना वाटे. म्हणून प्रथम त्यांनीं राजकारणांत लक्ष घालून, "आपणास जे ठावे ते हळूहळू शिकवावे, शहाणे करून सोडावे सकळ जन" या शिकवणुकी-नुसार कार्यक्षम होण्यासाठीं कायमचा ब्रह्मचर्याश्रम स्वीकारून आयुष्य व्यतीत करण्याची त्यांनीं शपथ घेतली. त्याच वेळीं त्यांनीं गृहस्थाश्रमांत पदार्पण

करण्यासाठीं त्यांचे वडील ती. भाऊसाहेब यांचे प्रयत्न चालू होते. अशा वेळीं आपला निश्चय कळविण्यासाठीं त्यांनीं एक विस्तृत व खुलासेवार पत्र लिहून आपल्या वडिलांस अर्पण केले. ती. भाऊसाहेब हेहि देशभक्त असल्यामुळें या पिता-पुत्रांचा याविषयासंबंधीं रोज खल होई. ती. भाऊसाहेब हे मुळांतच क्रांतिवादी असल्यामुळें परराज्य घालविण्याचा आण्णांचा प्रचारकी कार्यक्रम त्यांना मुळींच मान्य नसे. म्हणून त्यांची समजूत घालण्यासाठीं त्यांस १९०६च्या नोव्हेंबरमध्यें आण्णांनीं एक विस्तृत पत्र लिहिलें. त्यांत वडिलांच्या विचारांचें स्पष्ट दिग्दर्शन करून आपलाहि विचार स्पष्ट लिहिला होता. त्यांत म्हटलें होतें कीं "तुम्ही नेहमीं मला म्हणतां, लोकांना उपदेश करून लोकजागृति झाल्यावर स्वराज्याचा प्रयत्न करावा व त्यासाठीं मीं आपलें आयुष्य खर्च करावें हें माझें म्हणणें तुम्हांला मुळींच मान्य होत नाहीं. तुमचे नेहमींचें स्पष्ट म्हणणें असें कीं, परराज्य घालविण्यास मुख्य मार्ग म्हणजे 'शक्तीनें मिळती राज्यें' व त्यासाठीं सैन्य उठविणें हा होय. सरकारी म्हणजे मुळांत आपल्याच पलटणी हस्तगत झाल्याशिवाय नुसता कोरडा वाङमय प्रचार करण्यांत अर्थ नाहीं. देवी, दैत्य, राम-रावण, कृष्ण, कौरव, वगैरेपासून मी बोध घेऊन आयुष्याची दिशा बदलावी, क्षत्रिय व्हावें, व मग अशा कामीं देह खर्ची पडला तरी समाधान मानावें यांत पुरुषार्थ आहे. भाऊ! श्रीसमर्थ साक्ष तुम्हास सांगतों कीं, विदुलेने आपल्या मुलांस केलेल्या उपदेशाची मला, तुमचेवरील विचारामुळें, आठवण होते. तुमचे प्रखर व तेजस्वी विचार आज तरी माझ्या बालबुद्धीला झेपत नाहींत. तथापि तुमच्या अमृततुल्य उपदेशाचा अहोरात्र विचार करून श्रीसमर्थ बुद्धि देतील तसें करीन एवढेंच तुमच्या चरणीं आज निवेदन करितों."

आण्णांचे वडील ती. भाऊसाहेब यांनीं आण्णांचे हें पत्र बोरखळ येथील त्यांचे विशेष स्नेही दामले, भिडे यांस दाखविलें. ही मंडळी सरकारी नोकर असल्यामुळें व बापट-घराण्याचे हित-चिंतक व काळजी वाहणारे असल्यामुळें, हें पत्र कोठें उघडकीस आलें तर तें भयंकर राजद्रोही स्वरूपाचें ठरून या पिता-पुत्राचा सरकार बळी घेईल या भीतीनें त्यांनीं तें पत्र गुपचुपपणें रात्रीं जाळून टाकिलें. पुढें दैवयोगानें १९४७ सालीं देशास स्वराज्य मिळाल्यावर वरील दोघां सद्गृहस्थांनीं ती. आण्णांना पत्र पाठविलें तें येणेंप्रमाणें :—

॥ श्रीशंकर ॥ बोरखळ,

तारीख ५।३।१९४९

श्रीसमर्थभक्त आण्णासाहेब बापट मु. पुणें यांसी प्रेमपूर्वक सा. नमस्कार वि. वि. तुमच्या आमच्या घराण्यांचे संबंध आपण परस्पर जाणतच आहोंत. सुमारें चार साडेचार तपापूर्वीची-५० वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. तुम्ही आपल्या भावी आयुष्याचें धोरण ठरवून त्याप्रमाणें वागण्याचा संकेत केलात. तुमच्या व तुमचे वडील कै. ती. भाऊसाहेब यांच्या विचारसरणीमध्यें आपल्या देशास स्वराज्य मिळविण्याच्या साधनांबद्दल तीव्र मतभेद झाला होता. त्यासंबंधाचें निर्वाणीचें पत्र तुम्ही भाऊसाहेब यांस पाठविलें होतें. तें त्यांनीं त्या वेळीं आम्हांस दाखविलें होतें. पण तें आम्हांस त्या वेळीं भयंकर स्वरूपाचें वाटलें म्हणून आम्हीं तें गुपचुप जाळून टाकलें. त्याची आज आठवण होण्याचें कारण अखेर आपल्या देशास स्वराज्य मिळण्यास ती. भाऊसाहेबांच्या साधनांचाच अवलंब नेताजी सुभाषबाबू यांस करावा लागला हें होय. भाऊसाहेब यांच्या दीर्घदृष्टीचें नवलच वाटतें. कृतज्ञतापूर्वक त्यांचें स्मरण करून आम्ही त्यांस अभिवादन करितों. पूर्वसंकल्पाप्रमाणें तुम्हीहि आपलें आयुष्य पवित्र-पणें व निर्धारानें व्यतीत करीत आहांत म्हणून तुम्हांसहि धन्यवाद देतों. कळावे लोभ असावा ही विनंती.

आपले हितचिंतक

**रामचंद्र धोंडदेव भिडे (निवृत्त मामलेदार)**

**रामचंद्र सदाशिव दामले (निवृत्त मोजणीदार)**

## (४) आण्णा थिऑसॉफिस्ट झाले !

ती. आण्णांचा मूळचा मनःपिंड धार्मिक वृत्तीचा असून कालपरिस्थिती-मुळें त्यांतूनच देशभक्तीचे अंकूर फुटले. तथापि त्यामुळे मूळची त्यांची वृत्ति कमी झाली नाहीं. ते कट्टे श्री समर्थ सांप्रदायी आहेत हे खरे. तथापि इतर सांप्रदायांचीं तत्त्वें समजून घेण्याकडे त्यांचा ओढा असतो. डॉ. बेझंट बाईंनीं भारतांत थिऑसफीचा (ब्रह्मविद्या) विलक्षण प्रचार केला. मुंबई-पुण्यास त्यांनीं आपल्या अभूतपूर्व व्याख्यानांनीं सुशिक्षित धार्मिक प्रवृत्तीच्या लोकांस

चांगलेंच वेड लावलें. आण्णा त्यांत सांपडले. इतके कीं, त्यांस दुसरें कांहीं सुचेनासें झालें. डॉ. बेझंट बाईचें व्यक्तिमत्त्व, त्यांची विद्वत्ता, त्यांचें धर्मज्ञान, त्यांचें वक्तृत्व यांनीं आण्णा मोहून गेले! पुण्यांतील बेझंट बाईंच्या विलक्षण व्याख्यानांचा आण्णांच्या मनावर परिणाम होऊन या सांप्रदायाचा आपण फायदा घ्यावा असें त्यांस वाटून त्यांनीं आपल्या कांहीं शंका धीटपणानें पुण्यांतील एका मुक्कामांत डॉ. बेझंटबाईंची खाजगी भेट घेऊन त्यांच्या पुढें मांडल्या. आण्णा सांगतात, "चुटकीसरशी त्या पराक्रमी व वाचासिद्ध थोर विदूषीनें माझ्या शंकांचें निरसन केल्यामुळें मी आकर्षिला जाऊन त्यांच्या सांप्रदायाचे अनुयायी व्हावें असें मनानें घेतलें व लगेच तो विधि मी पार पाडला," पुढें आण्णांस डिप्लोमा देण्यांत आला. त्याची नक्कल खालीं देत आहे :—

नक्कल

Head Quarters
Adyar, Madras.

**The Theosophi cal Society & Universal Brotherhood**

Admits Sadashiv Vinayak Bapat Esqr. to the number its Fellows In Testimony Whereof, it has issued to him the present Diploma in the 11th Month of its 42nd Year Registered And Delivered this 18th Day of September 1917.

Fellow No. 10901.
Diploma No. 1709.
Obligation : Signed.

Annie Besant
President

वरील डिप्लोमा त्यांस देण्यांत आला खरा; पण पुढें अनेककारणांमुळें विशेषतः लोकमान्यांच्या गीतारहस्याच्या प्रखर प्रसारामुळें, त्यांच्या सान्निध्या-

मुळें, लोकमान्यांच्या निर्भेळ स्वराज्याच्या योजनेस डॉ. बेझंटबाईंच्या विरोधामुळें व महाराष्ट्र संतवाङमयाच्या अवीट अभ्यासामुळें आण्णांचें लक्ष थिऑसॉफिकल सांप्रदायांतून कमी कमी होत जाऊन ते आतां सनातनी वैदिक धर्मानुयायी झाले असून मनानें पूर्ण निवृत्त म्हणजे 'संन्यस्त' होत आहेत.

## (५) आण्णांना बसलेले मानसिक सहा धक्के

**धक्का (१) बाड हरवलें.**

ती. आण्णा फार भिडस्त, संकोची, विनम्र व अंतर्मुख वृत्तीचे असल्यामुळें त्यांचे सर्वच व्यवहार त्या पद्धतीनें झाल्यास नवल नाहीं. तुळशीबागेंतील श्रीराम प्रभूचें गेलीं कित्येक वर्षे ते रोज अचूक दर्शन घेतात. दर्शन घेऊन आल्यावर आतां कोठें गेला होतां असें त्यांस कोणीं विचारल्यास तें सांगण्याची टाळाटाळ करितात. प्रसिद्धि-पराङमुखता हा त्यांचा स्थायीभाव आहे. अशा वृत्तीच्या माणसाचें आयुष्य वास्तविक बिनखटका जावें. पण आण्णांच्या आयुष्यांत दुर्दैवानें त्यांस कांहीं जबर धक्के बसले. ते मळचे प्रयत्नवादी; 'यत्न तो देव जाणावा' असें म्हणणारे असून 'आधीं केलें मग सांगितलें' हें त्यांचें व्रत आहे. महर्षि आण्णासाहेब पटवर्धन हे या वृत्तीचे असल्यामुळें त्यांच्यावर अण्णांची भक्ति जडली. या व दुसऱ्याहि कारणांमुळें आण्णांचा नित्य संबंध येऊं लागला. १९०९ पासून महर्षींच्या निर्याणापर्यंत म्हणजे सहा वर्षे महर्षींशीं आण्णांचा निकट संबंध आल्यामुळें त्यांच्यासंबंधींच्या बारीक-सारीक पण महत्त्वाच्या गोष्टी अण्णांनीं लिहून ठेविल्या व त्याचें एक भलें मोठें बाड तयार झालें. महर्षि समाधिस्थ झाल्यावर तें बाड आण्णांनीं श्री. तात्यासाहेब केळकर यांस दाखविलें. तें पाहून केळकर आण्णांस म्हणाले, "बाड मजेदार आहे. त्यांतील विसंगती हा मोठा भाग असला तरी एकंदरींत बाड मनोरंजक व उपयुक्त आहे, सांभाळून ठेवा, पुढें मागें त्याचा आपण उपयोग करूं." महर्षि आण्णासाहेब यांच्या एका भक्तास या बाडाची बातमी कळल्यामुळें व त्यांचें आण्णांवर मोठें वजन असल्यामुळें यांनीं तें वाचण्यास मागितलें, आण्णांनीं त्यांस तें दिलें. परत आणण्यासाठीं आण्णा त्यांच्याकडे वरचेवर जात. शेवटीं तें सांपडत नाहीं, हरवलें असें सांगण्यांत आलें! आण्णांना बसलेला हा पहिला मानसिक धक्का होय.

**धक्का (२) ब्रह्मचारी बापट यांस पुत्रशोक झाला !**

लो. टिळक यांचें चरित्र श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं लिहिलें, त्याचे तीन खंड प्रसिद्ध झाले. त्या तीनहि खंडांच्या प्रस्तावनेंत तात्यासाहेब यांनीं ठळक रीतीनें व आवर्जून लिहिलें आहे कीं :—

"श्री. स. वि. बापट यांच्या आठवणी व आख्यायिका या पुस्तकांच्या दोन खंडांचाहि उपयोग मला झाला आहे. या ग्रंथाचा तिसराहि भाग येत्या ऑगस्टमध्यें प्रसिद्ध होणार आहे. व या तिन्ही खंडांच्या योगानें आणखी एका वेगळ्या रीतीनें टिळक-चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला तें साधन फार उपयोगीं पडण्यासारखें आहे. थोर लोकांचींच चरित्रें अनेक प्रकारांनीं लिहिलीं जाऊं शकतात. मीं लिहिलें तें मुख्यत: घडलेला इतिहास संगतवार सांगण्याच्या दृष्टीनें लिहिला आहे."

अशा रीतीनें १९४२ पृष्ठांच्या या प्रचंड ग्रंथानंतर दुसरा कोण चरित्र लिहिणार आहे हें पाहतों अशा अहंकारी व पापी घमेंडीचा विचार मनास शिवूं न देतां तात्यासाहेब यांनीं थोर मनानें, विनयशील, नम्र, प्रांजल. व रसोद्ग्राही काढलेले उद्गार दुसऱ्या कोणाकडून खास निघाले नसते असें आण्णा नेहमीं मोठ्या अभिमानानें म्हणत असतात. तात्यासाहेबांच्या वर दिलेल्या स्फूर्तिदायक, दूरदर्शी व सूचक विचारावरून तात्यासाहेबांच्या चरित्राचा व मुख्यत: तिन्ही आठवणी खंडांचा अर्क म्हणून आण्णांनीं लोकमान्यांचें एक सुटसुटीत सुमारें ३०० पानी चरित्र लिहिलें. हें चरित्र मुख्यत: विद्यार्थीवर्ग व सामान्य लोक यांच्याकरितां बहुत कष्ट सोसून त्यांनीं तयार केलें व ते १९३० च्या १ ऑगस्टच्या लोकमान्यांच्या पुण्य-तिथीस प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. सदर ग्रंथाचा बहुतेक भाग तात्यासाहेबांच्या दृष्टीखालीं घालून त्यांनीं घेतला होता. व तो ग्रंथ त्यांस अर्पण करण्याचेंहि त्यांनीं ठरविलें होतें. हें सर्व हस्तलिखित आण्णांनीं प्रचाराच्या फुरसतीच्या वेळांत तपासण्यासाठीं प्रवासांत आपल्या बरोबर घेतलें होतें. खानदेशांतील प्रचाराचें निम्में काम आटोपून ते रात्रीच्या गाडीनें पुण्यास येत असतां रात्रीं गर्दींत त्यांच्या डब्यांतून त्यांच्या सामानाची ट्रंक चोरीस गेल्याचें त्यांस आढळून आलें. याच ट्रंकेंत त्यांचें हस्तलिखित होतें. घाबरून त्यांनीं

गाडींतील साखळी ओढली व जवळच आलेल्या स्टेशनावर गाडी थांबली. तेथें अधिकारी वर्गास त्यांनीं आपली तक्रार नोंदविली व तेथेंच उतरून पोलिसांकडून दाद मागितली. पुण्यास येतांच ही सर्व हकीकत त्यांनीं तात्यासाहेबांस सांगितली. त्यांच्या सल्ल्यावरून तें चरित्र सांपडून देणारास मोठें बक्षीस लाविलें, केसरींत जाहिरात दिली, शिवाय सी. आय. डी. पोलिसांच्या मदतीनें ट्रंक सांपडण्याबद्दल खूप प्रयत्न केले. पण कांहीं उपयोग न झाल्यानें त्यांच्या कित्येक दिवसांच्या कष्टाचें हें फळ दुर्दैवानें, दुःखाच्या व निराशेच्या समुद्रांत सोडून द्यावें लागलें ! या अपघातामुळें आण्णांच्या मनावर झालेला विलक्षण परिणाम पाहून तात्यासाहेब केळकर यानीं श्री. वा. कृ. भावे यांस लिहिलेल्या पत्रांत विनोदानें म्हटलें होतें, "ब्रह्मचारी बापट यांना पुत्रहानीच्या शोकाचें कधीं कारण नव्हतें; पण हरवलेल्या त्यांच्या या पुस्तकानें त्यांस पुत्रशोक झाला आहे ! तरी तुम्हीहि त्यांचें समाधान करावें."

आण्णांना बसलेला हा दुसरा धक्का होय !

**धक्का (३) आठवणींचा गुप्त खजिना !**

लोकमान्यांच्या आठवणींसंबंधीं आण्णा बोलूं-सांगूं लागले म्हणजे कितीतरी नव्यानव्या मनोरंजक, बोधप्रद व मुख्यतः अज्ञात गोष्टी एकामागून एक ते रसाळपणें सांगत असतां ऐकावयास मिळतात. वास्तविक त्या त्यांनीं स्वतःच लिहावयास पाहिजेत इतक्या त्या महत्त्वाच्या आहेत. पण मुळांत अंतर्मुख दृष्टीचे ते असल्यानें म्हणजे स्वतःसंबंधानें मुळींच कांहीं बोलणें त्यांस मनापासून नको असल्यामुळें मौन हेंच त्यांस फार मानवतें. पण घरांत नित्य संबंध येत असल्यामुळें सहज बोलतां बोलतां मला त्यांच्याकडून कांहीं गोष्टी समजल्या तेवढ्या येथें मी देण्याचा प्रयत्न केला आहे.

लोकमान्यांच्या आठवणींसंबंधीं तिन्ही खंडांकरितां आण्णांनीं मोठ्या प्रयत्नानें मजकूर मिळविला होता. हा सर्व मजकूर जबाबदारीचा असल्यामुळें तो सराईत दृष्टीच्या थोर पुरुषाकडून तपासून, पारखून घेण्याचें भाग्य त्यांस लाभलें. यामुळें ते निर्धास्त असत. हा मजकूर त्यांच्या हातीं पडतांच तो प्रथमतः तात्यासाहेब केळकर यांस ते दाखवीत. तात्यासाहेब

निरलसपणें व फार काळजीनें हा मजकूर पाहात. त्यांच्या सूक्ष्म नजरेखालून गेली नाहीं अशी तिन्ही खंडांतील एकहि ओळ तुम्हांस सांपडणार नाहीं. तो मजकूर तपासत असतां, त्यांच्या दृष्टीनें आक्षेपार्ह मजकूर ते बाजूला ठेवीत, मग तो कोणाचाहि व कितीहि महत्त्वाचा असो. लोकमान्यांच्या जीवनावर निराळा नवा प्रकाश पाडणारा असा कितीतरी अज्ञात मजकूर त्यांस सांपडूं लागला. असा मजकूर पाहून तात्यासाहेब चकित होत. ते एकदां आण्णांस म्हणाले " बापट, माझें सर्व आयुष्य बलवंतरावांच्या सान्निध्यांत गेलें खरें; पण तुम्ही नाना प्रकारच्या लोकांकडून मिळवीत असलेल्या मजकुरापैकीं, कांहीं विलक्षण मजकूर पाहून बळवंतरावांच्या मनाचा थांग लागणें कठीणच जाईल ! मात्र हल्लींच्या काळांत अशा प्रकारचा मजकूर पचला जाणें कठीण आहे. म्हणून तो सर्व बाजूला काढून ठेवीत आहे. अनुकूल काल आल्यावर त्याचें एक स्वतंत्रच पुस्तक काढूं. मजकूर मात्र जपून ठेवा." वरील मजकूर फार महत्त्वाचा, भानगडीचा व सरकारसंबंधाचा होता. सुमारें तीनचारशें पानांचा तो ग्रंथ झाला असता. या मजकुरानें टिळकांच्या खऱ्या अंतरंगाचें दर्शन घडलें असतें. पण योगायोग तसा नव्हता. १९४७ सालीं देश स्वतंत्र झाल्यावर या ग्रंथाविषयींचें बोलणें आण्णांनीं केळकर यांच्याशीं सुरू केलें. तेव्हां याचा लवकरच विचार करूं असें तात्यासाहेब म्हणाले. पण पुढील वर्षी एकाएकी ते दिवंगत झाल्यामुळें हा ग्रंथ मागें पडला व प्रत्यक्ष तात्यासाहेब यांच्या आठवणींचा ग्रंथ प्रथम प्रसिद्ध करण्याच्या उद्योगास आण्णा लागले. लोकमान्यांच्या आठवणींचें मुळापासूनचें सर्व काम सार्वजनिक सभेच्या कचेरींत करीत असल्यामुळें व तेथेंच सर्व कागदपत्रांचें साहित्य ठेविलें असल्यामुळें १९५२ सालीं त्या संस्थेच्या इमारतीस भयंकर आग लागून त्यांत त्या संस्थेच्या सर्व मालाबरोबर आण्णांनीं जिवापलीकडे सांभाळून ठेविलेलें तें सर्व साहित्य भस्मसात् झालें. अर्थात् त्यांत हा अमोल दुर्मिळ ठेवा नष्ट झाला. आण्णांना बसलेला हा तिसरा मानसिक धक्का होय !

चौथ्या, पांचव्या व सहाव्या मानसिक धक्क्यांचें स्वरूपहि असेंच आहे. १९४९ सालीं तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणींचा ग्रंथ आण्णांनीं प्रसिद्ध केला. पण तो मर्यादेच्या बाहेर वाढल्यामुळें अखेर आण्णांनीं आपल्या

स्वतःच्या लिहून ठेविलेल्या आठवणींचा एक शब्दहि त्यांत घातला नाहीं. लोकमान्यांच्यापेक्षांहि तात्यासाहेब यांच्याशीं आण्णांचा दीर्घ व घनिष्ट संबंध असल्यामुळें त्यांच्याविषयींच्या आण्णांनीं कितीतरी रम्य आठवणी लिहिल्या होत्या. त्या सर्व तात्यासाहेब यांच्या आठवणींच्या दुसऱ्या खंडांत प्रसिद्ध करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. पण तो खंड दुर्दैवानें निघूं न शकल्यामुळें शेवटीं तें अपूर्व बाड अग्निमुखी पडलें व दैवास दोष देत. शोक करीत त्यांस बसावें लागलें. हा आण्णांस बसलेला चौथा मानसिक धक्का होय !

‘ टिळक सूक्तिसंग्रह ’ हा ग्रंथ तयार करण्याच्या आधींपासून आण्णांनीं दुसऱ्या एका स्वतंत्र ग्रंथाची तयारी चालवली होती. ते सांगतात ‘ हें मात्र माझें धाडस होतें. ’ कित्येक दिवसांपूर्वींपासून मनानें मराठींत एक ‘ अवतरण कोश ’ तयार करण्याचें त्यांनीं ठरविलें होतें. ही कल्पना त्यांना इंग्रजींतील रेव्हरंड जेम्स वुड यांच्या Dictionary of Quotations या ग्रंथावरून सुचली होती. कोशाचें प्रचंड काम, पण मोठ्या धैर्यानें कांहीं मित्रमंडळींच्या साहाय्यानें त्यांनीं त्यास हात घातला होता. श्रीज्ञानेश्वरापासून नाटककार व कवि गडकरीपर्यंत सर्वांचा परामर्ष घेण्यासाठीं त्यांनीं मोठा ग्रंथसंग्रह केला होता. त्यांची ऐपत नसतांहि त्यांनीं या कामीं फार खर्च केला होता. या कानाचे त्या कानास कळूं न देतां त्यांचा हा सर्व खटाटोप चालला होता. सुमुहूर्तानें ग्रंथास आरंभहि केला होता. पण दुर्दैवानें हाहि त्यांचा यत्न साधूं दिला नाहीं. वर उल्लेख केलेल्या अग्निकुंडांत त्याचीहि आहुति पडली. आण्णा यांस बसलेला हा मानसिक पांचवा धक्का होय !

‘पुणें सार्वजनिक सभे’तर्फे आण्णांनीं बारा वर्षें प्रचाराचें काम केलें. दरसाल प्रचाराच्या कामाचा वृत्तांत ते ‘सभे’स सादर करीत व तो पुस्तकरूपानें छापण्यांत येई. तें पुस्तक कार्यकर्ते, पुढारी व वर्तमानपत्रकार यांच्याकडे अभिप्रायार्थ पाठविण्यांत येई. त्या सर्वांकडून प्रशंसापर आलेल्या पत्रांच्या फाईली व एकूण सर्व वृत्तांताचीं पुस्तकें ‘सभे’च्या कचेरींतील एका कपाटांत व्यवस्थित ठेविलीं होतीं; पण हें सर्व वाङ्मय अग्निनारायणाच्या भक्षस्थानीं पडलें ! या सहाव्या धक्क्यानें मात्र माझा जबर शक्तिपात झाला असें कापऱ्या आवाजांत ते बोलले.

आण्णांना सार्वजनिक कामांत बसलेल्या वरील मानसिक धक्क्यांशिवाय आणखी कितीतरी धक्के बसले असतील यांत शंका नाहीं. पण स्वत:विषयीं कधीं कांहीं न बोलण्याचा त्यांचा स्वभाव असल्यामुळें ते सर्व प्रसंग अर्थात् अज्ञातच राहणार हें उघड आहे. सहज गप्पागोष्टी करीत असतां जे प्रसंग मला कळले तेवढे सांगण्यापलीकडे मी तरी जास्त काय करणार ? एकदां त्यांच्या सहज बोलण्यांत आलें कीं, लोकमान्यांच्या मिळविण्यांत आलेल्या आठवणींचा सर्वच मजकूर जशाचा तसा छापण्यांत आला असतां तर त्याचे निदान आणखी तीन खंड निघाले असते; पण तात्यासाहेबांसारख्या अत्यंत मार्मिक व अधिकारी पुरुषांनीं त्यास लावलेली कात्री फार उपयोगीं पडली. त्यांच्या सूक्ष्म मनाच्या व तीक्ष्ण दृष्टीच्या चाळणींतून चाळलेला मजकूर ग्राह्य समजून, बाकी सर्व मजकूर रद्द करण्यांत येई. पण त्यामुळें आण्णांना कसेसेंच होत असे !

## (६) आण्णांना न कळत बसलेले दुःखाचे तीन बुक्के !

लोकमान्यांच्या आठवणी मिळविण्याच्या बाबतींत चटका लागण्यासारख्या कांहीं गोष्टी घडल्या व निराशेनें आण्णा दुःखी झाले. त्यांपैकीं प्रत्यक्ष त्यांच्याकडून सहज बोलतांना मला कळले ते फक्त तीन प्रसंग सांगतों :—

(१) पंचम जॉर्ज बादशहा यांना लोकमान्यांची कांहीं माहिती असल्याचे एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांकडून अण्णांना कळलें. मग काय विचारतां ! बादशहाकडून तो मजकूर मिळविण्यासाठीं त्यांनीं विश्व प्रयत्न केले. अखेर त्या वेळचे इंग्लंडचे मुख्यप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांच्याशीं संधान बांधून त्यांचे मार्फत बादशहाकडून मजकूर मिळविण्याचा प्रयत्न केला. मॅक्डोनाल्ड हे भले गृहस्थ असल्यामुळें त्यांनीं प्रथम आपला स्वतःचा मजकूर तर पाठविलाच. शिवाय बादशहाचे व आपलें याविषयीं बोलणें झालें असल्यामुळें त्यांचा मजकूर लवकर पाठवितो असें त्यांनीं पत्र पाठविलें. पण इतक्यांत पार्लमेंटच्या निवडणुकी होऊन त्यांत मॅक्डोनाल्डसाहेब मुख्य प्रधान म्हणून निवडून न आल्यामुळें आतां बादशहाकडून तें काम मला करितां येणार नाहीं, क्षमा करा, असें त्यांचें पत्र आलें. तें पाहून आण्णांना निराशेचा जबर धक्का बसला.

(२) लाला लजपतराय व लोकमान्य यांचा घनिष्ट संबंध असल्यामुळें त्यांच्या आठवणीशिवाय ग्रंथ आळणी होणार म्हणून त्यांच्याकडून मजकूर मिळविण्यासाठीं आण्णांनीं केलेल्या प्रयत्नांचें वर्णन ऐकून मी स्तंभित झालों. पण येथें विस्तारभयास्तव ते देत नाहीं. त्या वेळीं लालाजी फार आजारी होते. नंतर आजारांतून उठल्यावर हवा पालटण्यासाठीं ते मसुरीस गेले. प्रकृतीच्या तशा स्थितींतहि त्यांनीं आपला इत्यंभूत मजकूर लिहिण्याचें ठरविलें व तसें करीत असल्याचें त्यांचें पत्र आलें. त्याप्रमाणें मजकूर लिहिलाहि. पुढें मसुरीहून हालतांना सामानाच्या भराभरींत नोकर लोकांकडून सदर मजकुराचे कागद गहाळ झाल्याचें एकाएकी त्यांचें दुखवटयाचें पत्र आलें. तें पाहून आण्णांचा जीव व्याकूळ झाला.

(३) श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्याकडून आठवणी मिळविण्याचा अण्णांनीं निश्चयच केला होता. कारण महाराजांचे व लोकमान्यांचे संबंध आण्णांना माहीत होते. पत्रव्यवहारानें हें काम होईना म्हणून ते वडोद्यास गेले. महाराजांच्या लक्ष्मीविलास राजवाड्यांत दोघांची भेट झाली. भेटींत मजकूर देण्याचें महाराजांनीं मान्य केलें. नंतर मजकूर तयार होऊन त्यावर महाराजांनीं सहीहि करून तो आण्णांना दाखविण्यांत आला. मजकूर फार महत्त्वाचा व गंभीर स्वरूपाचा होता. पण कांहीं विलक्षण घटना घडल्यामुळें तो सर्व मजकूर रद्द करून मामुली स्वरूपाच्या मजकुराच्या चार ओळी मागाहून देण्यांत आल्या! वरील सर्व आपत्तीमुळें "उदास वाटते जीवी। आतां जावे कुणीकडे ।। तूं भक्तवत्सला रामा। बुद्धि दे रघुनायका ।।" अशी त्यांची स्थिति होऊन निराशेनें अण्णा जास्तच दैववादी झाले व म्हणूं लागले आहेत कीं, "मना त्वाचिरे पूर्वसंचीत केलें। तयासारखें भोगणें प्राप्त झालें ।।"

## (७) आण्णांचें नमुनेदार प्रचारकार्य: इतिहास-संशोधनाची दृष्टि

लो. टिळक १९१४ सालीं मंडालेच्या तुरुंगांतून सुटून आल्यानंतर, वसंतऋतूंतील निसर्गाचा देखावा बदलून सर्व वृक्षवेलींना जशी पालवी फुटून त्यांस नवजीवन प्राप्त होतें त्याप्रमाणें देशांतील मृतवत् झालेल्या सार्वजनिक संस्थांत कार्यक्षमतेची ऊब उत्पन्न झाली. 'पुणें सार्वजनिक सभा'

ही सर्वांत जुनी, खानदानी, राजकीय संस्था पुन्हा काम-करूं लागली. प्रथम पुणें जिल्ह्याचें संघटन (ऑर्गनाईज) करावें असें त्या संस्थेनें ठरविलें. आण्णा या संस्थेचे चिटणीस असल्यामुळें ओघानेंच त्यांच्याकडे हें काम आलें. आपल्या आवडीचें काम आण्णांस करावयास मिळालें म्हणून त्यांस आनंद झाला. त्यांनीं प्रथम पुणें जिल्ह्यांत हें काम शके १८४७ ते शके १८५९ असें बारा वर्षें फार मेहनतीनें केलें. पुणें जिल्ह्यांतील शेंकडो गांवीं त्यांनीं अनेक वेळां जाऊन खेडेगांवांच्या लोकांचें संघटन करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या अडीअडचणींची दाद लावून दिली व त्यांस शक्य तें मार्गदर्शन केलें. त्यांनीं गांवोगांवीं नुसतीं व्याख्यानें न देतां शक्य तितकें भरीव काम केलें. यासंबंधानें बारा वर्षांच्या आपल्या प्रचारक-कार्याचे अहवाल त्यांनीं दरसाल 'पुणें सार्वजनिक सभे'स सादर केले आहेत. त्यांचें हें कार्य सभेस महत्त्वाचें वाटल्यामुळें सभेच्या एका वार्षिक जनरल सभेंत या कामाबद्दल त्यांचें अभिनंदनपूर्वक आभार मानण्यांत आले आहेत.

'सार्वजनिक सभे'तर्फे प्रचाराचें हें काम ते करीत असतां, केवळ गांवठी प्रचाराची दृष्टि न ठेवितां, सार्वजनिक व राजकीय कामाची अशी चौफेर दृष्टीहि ते ठेवीत असत. नमुन्यासाठीं याचें एकच उदाहरण देतों. शके १८४७ सालाच्या प्रचाराच्या कामाचा अहवाल त्यांनीं 'सभे'स सादर केला आहे. त्यांतील पृष्ठ १२ वर इतिहास संशोधकास शोभेल असा संशोधनात्मक महत्त्वाचा मजकूर आहे. तो खालीं देत आहे :—

"पुणें जिल्ह्यांतील हवेली तालुक्याच्या उत्तरेच्या सीमांतास इतिहासप्रसिद्ध तुळापूर गांव आहे; पण त्याची आज कोण शोचनीय स्थिति ! या गांवीं श्रीछत्रपति संभाजी महाराजांनीं हिन्दुधर्माची पताका आपल्या रक्तानें रंगवून फडकवीत ठेविली ! पण आज तिची काय स्थिति आहे? महाराजाचे हाल हाल करून त्यांस जेथें मारण्यांत आलें व शेवटीं या छत्रपतींचें जेथें दहन झालें त्या जागेवर आज काय दिसतें ? ...... पण त्याचें वर्णन मी येथें न करणेंच बरें. आज सव्वादोनशेंहून अधिक वर्षें महाराष्ट्रीयांचें इकडे दुर्लक्ष झालें तेवढें आतां पुरें आहे. यापुढें तरी आतां श्रीरायगडाप्रमाणें जरी नाहीं, तरी थोडयाबहुत प्रमाणांत तेथें समाधि

बांधण्यांत यावी अशी माझी व तेथील लोकांची महाराष्ट्रीयांस आग्रहपूर्वक सविनय प्रार्थना आहे. तसेंच सदर गांव हल्लीं निवडुंगांत बुडून गेला आहे. निवडुंग बेसुमार वाढल्यामुळें सर्पादि प्राण्यांस राहण्याला फार सोय झाली आहे, यामुळें तेथें दरसाल सर्पदंशानें मृत्यूहि बरेच होतात. करितां प्रथम सर्व निवडुंग नाहींसा केला पाहिजे. सदर गांव इंद्रायणी, भामा व भीमा या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर असल्यामुळें, पूर्वीं तें मोठें क्षेत्र मानलें जाई. म्हणून तेथें प्रशस्त घाट, श्रीसंगमेश्वर व श्रीविष्णुवल्लभेश्वर यांचीं मंदिरें व आल्या-गेल्यांस उतरण्याकरितां ओवऱ्या बांधण्यांत आल्या आहेत. श्रीछत्रपतींच्या दहनभूमीजवळच कलुषाची समाधि बांधण्यांत आलेली आहे. पूर्वीं हें सर्व निवडुंगांत गडप झालेलें होतें. परंतु रा० ब० दादासाहेब नाईक, प्रांतसाहेब, यांच्या कृपेनें तेथील निवडुंग काढण्यांत येऊन वरील देवस्थानाच्या जीर्णोद्धाराकरितां, त्यांनीं पुराणवस्तुसंरक्षण खात्याकडून दरसाल पन्नास रुपयांची नेमणूक करून दिली आहे. आतां या प्रकारणीं म्हणजे महाराजांची समाधि वांधणें, वार्षिक पुण्यतिथि करणें, निवडुंग काढणें वगैरे बाबतींत आमदार दे. श्री. नारायणराव गुंजाळ यांनीं लक्ष घालावें अशी त्यांस मी विनन्ती केली आहे. त्याप्रमाणें तसें करण्याचें त्यांनीं अभिवचन दिलें आहे. हल्लींच्या अनुकूल वातावरणाचा फायदा घेऊन महाराष्ट्रीय हिंदु धर्माभिमान्यांनींहि त्यांस मदत करावी अशी माझी विनंती आहे."

'पुणें सार्वजनिक सभे' प्रमाणेंच आण्णा हे 'लो. टिळक स्मारक मंदिर स्ट्रट, पुणें' या संस्थेचे चिटणीस व एक विश्वस्त असल्यामुळें, या संस्थे-मार्फतहि त्यांनीं आपल्या आवडीचें प्रचारकार्य केलें आहे. हें कार्य त्यांनीं सहा वर्षें केलें! पुणें सार्वजनिक सभेतर्फे करण्यांत आलेलें त्यांचें कार्य मुख्यत· खेडेगांवांतील संघटनेचें होतें. पण टिळकमंदिर संस्थेतर्फे सहा वर्षें त्यांनीं केलेलें प्रचाराचें हें कार्य देशांतील प्रचलित राजकीय विषयांचा प्रसार करण्याचें होतें. पहिल्या वर्षीं म्हणजे सन १९२८ सालीं 'नेहरू रिपोर्ट' या विषयाचा त्यांनीं महाराष्ट्रांत प्रचार केला. १९३० सालीं खानदेशांत व्याख्यानांचा दौरा काढून स्वराज्याच्या विषयाचा ते प्रचार करीत असतां त्यांच्यावर खटला भरून त्यांस भुसावळ येथें शिक्षा झाली वगैरे तपशील-वार मजकूर भाग १ पान १९ वर आला आहे.

१९३० सालीं तुरुंगांतून सुटून येतांच ती. आण्णा यांनीं आपल्या आवडत्या प्रचारकार्यास 'हरिः ओम्' म्हणून पुन्हां सुरुवात केली. पण सरकारच्या करड्या दडपशाहीमुळें गांवांतील लोक मोठ्या संख्येनें सभेस येईनासे झाले; व लोकांच्या उत्साहास प्रच्छन्न स्वरूप येऊं लागलें. ही सर्व प्रतिकूळ परिस्थिति पाहून व बापटांच्या उत्साहास विरजण पडतें कीं काय असें वाटून, त्यांचे गांवोगांवचे कार्यक्रम यशस्वीपणें पार पडावे व लोकांनाहि त्याचा उपयोग व्हावा म्हणून श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं ठिकठिकाणच्या लोकांना अगत्यपूर्वक आपल्या सहीनें जें पत्र पाठविले तें पुढें देत आहे.

॥ श्री ॥

केसरी कचेरी, पुणें शहर.
ता. २।५।१९३६

श्रीयुत ——————————

मुक्काम —————— यांसी,

कृ. सा. न. वि. वि.

देशांत प्रतिवर्षी चालू असलेल्या राजकीय, आर्थिक वगैरे चळवळीच्या विषयांची माहिती व्याख्यानें व खाजगी संभाषणें वगैरेच्या रूपानें लोकांस देऊन परस्परविचारविनिमय होणें अगत्याचें वाटतें. गेलीं कांहीं वर्षे प्रचाराचें हें काम टिळक-स्मारक ट्रस्टतर्फे महाराष्ट्रांतील पुणें, सातारा, सोलापूर, नगर, नाशिक, पूर्व खानदेश, पश्चिम खानदेश, रत्नागिरी, कुलाबा व ठाणें या जिल्ह्यांतून करण्यांत आलें. प्रस्तुत वर्षी आपले जिल्ह्यांतील तालुक्याचे गांवीं व तालुक्याचे गांवाएवढेंच किंवा त्याहून लहान पण इतर दृष्टीनें महत्त्वाचे गांवीं जाऊन मतप्रसार करण्याकरितां कै. लो. टिळक यांच्या 'आठवणी-आख्यायिका,' 'टिळक-सूक्तिसंग्रह' व 'केसरी-प्रबोध' या ग्रंथांचे संपादक व 'टिळक-स्मारक-ट्रस्ट' या संस्थेचे चिटणीस व विश्वस्त श्रीयुत **सदाशिव विनायक बापट** यांची या कामीं लोकांस माहिती वगैरे देऊन व्याख्यानें देण्याकरितां टिळक-स्मारक-ट्रस्टतर्फे योजना करण्यांत आली आहे. रा. बापट

हे या प्रचाराचें काम पुणें सार्वजनिक सभा व टिळक-स्मारक-ट्रस्ट या संस्थांचे वतीनें बरेच दिवस करीत असल्यामुळें त्यांना मुख्य राजकीय चळवळी व ग्रामसंघटनेसारख्या उपांगभूत चळवळी यांची चांगली माहिती झालेली आहे. त्यांच्या व्याख्यानांचे व चर्चेचे विषय सामान्यपणें स्वराज्य, त्याचीं साधनें व विधायक स्वरूपाची राष्ट्रीय कामगिरी अशा स्वरूपाचे राहतील.

तरी व्याख्यानास शक्य तितके अधिक लोक जमविण्याची व त्यांस जरूर ती मदत करण्याची तसदी घ्यावी, अशी विनंती आहे. भरंवसा जाणून लिहिलें आहे. कळावें, लोभ असावा ही विनंती.

आपला,
**नरसिंह चिंतामण केळकर**
चिटणीस, टिळक-स्मारक-ट्रस्ट
व
ट्रस्टी, केसरी-मराठा संस्था

आण्णा म्हणतात, वरील पत्राचा मला फार उपयोग झाला. किंबहुना माझें काम फार सुकर झालें व तें उत्तम प्रकारें पार पडूं लागलें. अशा रीतीनें सहा वर्षें दरसाल प्रचलित राजकीय विषयाचा अभ्यास करून व्याख्यानांच्या द्वारें त्यांनीं प्रचारकार्य फक्त तालुक्याच्या गांवीं व तालुक्याएवढ्या मोठ्या गांवीं ते करीत असत. अशा रीतीनें जुन्या महाराष्ट्रांतील दहा जिल्ह्यांतील २३५ गांवीं जाऊन २५० हून अधिक व्याख्यानें त्यांनीं दिलीं. सहा वर्षांच्या या प्रचारकार्याचे दरसालचे वृत्तांत पुस्तकरूपानें त्यांनीं 'टिळकमंदिर' संस्थेसहि सादर केले आहेत. ते फार बोधप्रद आहेत.

वरील दोन्ही संस्थांतर्फें करण्यांत आलेल्या नमुनेदार प्रचारकार्याबद्दल महाराष्ट्रांतील वृत्तपत्रांनीं वेळोवेळीं अग्रलेख लिहून बापटांना धन्यवाद दिले. तसेंच अनेक थोरपुरुषांनीं व कार्यकर्त्यांनीं आपले अनुकूल व रसभरीत अभिप्राय त्यांस कळविले आहेत. अशा शेंकडो अभिप्रायांच्या पत्रांच्या फायली आण्णांच्या संग्रहीं आहेत. त्यांपैकीं अगदीं निवडक असेच थोडे अभिप्राय, सारांशरूपानें श्री. भावे यांनीं या पुस्तकाच्या भाग १ मध्यें नमुन्यादाखल नमूद केले आहेत. (भाग १, पान १७ पाहा) त्यावरून या देशभक्त व नमुनेदार प्रचारकाच्या कार्याची कांहींशी कल्पना होईल.

## (८) आण्णांचा खाजगी पत्रव्यवहार

हा पत्रव्यवहार दोन प्रकारचा आहे. एक, खाजगी म्हणजे आप्त, नातेवाईक, व ऋणानुबंधी यांचा व दुसरा सार्वजनिक कार्यसंबंधाचा. या दुसऱ्या प्रकारांत, आण्णांनीं निर्माण केलेल्या ग्रंथांविषयींचा व सार्वजनिक मित्रमंडळी वगैरे विषयींचा समावेश होतो. प्रथम पहिल्या प्रकाराविषयीं थोडें लिहितों

आण्णांची आप्त, नातेवाईक मंडळी बरीच आहेत. त्यांस त्यांनीं लिहिलेल्या एकाहि पत्राची नक्कल त्यांनीं ठेविली नाहीं. पण कोणाचेंहि पत्र आलें कीं, त्यांस उत्तर गेलें नाहीं असें मात्र त्यांचेकडून कधींहि होत नाहीं. ते नेहमीं म्हणतात आलेलें पत्र म्हणजे प्रत्यक्ष भेटच होय. प्रत्यक्ष आलेल्या माणसास जसें आपण भेटतों तसेंच पत्ररूपानें आलेल्या भेटीस आपण पत्ररूपानें न भेटणें ही माणुसकी नाहीं, पाप आहे. अशा रीतीनें आप्त, नातेवाईक वगैरेकडून आलेल्या पत्रांचें वर्गीकरण करून गेल्या सुमारें ५० वर्षापासूनच्या सालवार पत्रांचीं पुडकीं त्यांनीं बांधून ठेविलीं आहेत. या आप्त, वगैरे मंडळींत प्रत्यक्ष त्यांचे वडील ती. भाऊसाहेब, आण्णांना वडील भावाप्रमाणें मानणारे त्यांचे जिवलग स्नेही मुंबईचे सुप्रसिद्ध वकील कै. बावासाहेब धारप, आण्णांस वडिलाप्रमाणें मानणाऱ्या त्यांच्या दोघी नाती ती. शांता आक्का दामले व ती. सौ. मालूताई जोशी यांचीं तर अक्षरशः शेंकडो पत्रें आहेत. तसेंच आण्णांची तिसरी नात ती. सौ. उषाताई सुलाखे यांची आलेलीं कांहीं पत्रें आहेत. तसेंच आण्णांचे नातेवाईक त्यांचे ज्येष्ठ नातजावई कै. द. ग. दादासाहेब दामले कै. हरि तात्या कोल्हटकर, कै. चिंतामणराव कोल्हटकर व श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचींहि बरींच पत्रें आहेत. व तीं सर्व वर लिहिल्याप्रमाणें व्यवस्थित ठेवण्यांत आलीं आहेत. ऋणानुबंधी मंडळींचींहि अनेक पत्रें आहेत. त्यांपैकीं विशेषतः श्री. तात्यासाहेब केळकर, श्री. आण्णासाहेब भोपटकर, श्रीमंत दादासाहेब खापर्डे, यांचीं बरींच पत्रें असून तीं सर्व जिव्हाळ्याचीं आहेत. तसेंच कै. प्रा. माटे, कै. भाऊसाहेब लवाटे, कै. वा. कृ. भावे, कै. नानासाहेब सुलाखे, नागपूरचे डॉ. पालकर, महाडचे दे. भ. बापूराव जोशी, निवृत्त कलेक्टर मुंबई येथील श्री. श्रीपाद नरहर सप्रे, मुंबईचे बडे व्यापारी श्री. तात्यासाहेब ढमढेरे, पुणें येथील दिवाणबहादूर

बापूसाहेब गोडबोले यांचींहि पत्रें अनेक असून तीं विशेष भावनेचीं आहेत. याशिवाय अनेक इष्टमित्रांचीं अनेक पत्रें आहेत. तीं सर्वच पत्रें आण्णांच्या स्वभावाचे पैलू दाखविणारीं व फार महत्त्वाचीं असून त्यांच्या चरित्रावर उत्कृष्ट प्रकाश पाडणारीं आहेत. वरील सर्व मंडळींपैकीं प्रत्येकाचें एकेक पत्र द्यावयाचें म्हटलें तरी अमर्याद विस्तार होईल. म्हणून स्थलसंकोचास्तव तीं प्रसिद्ध करणें अशक्य आहे. तथापि केवळ नमुन्यादाखल त्यांपैकीं निवडकांतील निवडक अशीं फक्त दहा पत्रें खालीं देतों :—

आण्णांचे वडील ती. भाऊसाहेब नेहमीं आपल्या श्रीक्षेत्र बोरखळगांवीं (जि. सातारा) राहात असत. ते आपल्या वयाच्या नव्वदाव्या वर्षी १९३९ सालीं कैलासवासी झाले. आण्णा देशस्थितीच्या प्रचाराचें काम करीत याचें त्यांना फार कौतुक वाटे. आण्णांच्या दरवर्षाच्या प्रचारकार्याबद्दल त्यांचें आण्णांना पत्र येई. त्यांपैकीं फक्त एक पत्र देतों. ते येणेप्रमाणें.

**आण्णांच्या वडिलांचें पत्रें :**

**पत्र : १**

।। श्री जरंडेश्वराय नमः ।।

बोरखळ
चैत्र शुा ६–६०
बुधवार ता. ६–४–१९३८

आयुष्मान रा. रा. सदाशिवराव आण्णा बापट यांसी विनुभाऊचे अनेक आशीर्वाद विशेष.

पुणें सार्वजनिक सभेमार्फत तुमच्या प्रचार-कार्याच्या वृत्तांताचें बुक पाठविलेलें पावलें. मोठा आनंद झाला.

परवाच्या दिवशींच समग्र वाचलें व मंडळींनीं ऐकलें. आज १०–१२ वर्षें दरसाल प्रचाराचा वृत्तांत तुम्ही प्रसिद्ध करतां ते सर्व वृत्तांत मीं वाचले होते. त्यापेक्षां यंदाचा तुमचा हा वृत्तांत फारच परिणामकारक आहे असें सदर वृत्तांत समग्र वाचणाराला समजून येईल. ग्रामपंचायत, दारूबंदी व गोवधबंदी असें अनुक्रमानें पुस्तकांत लिहिलें आहे. पैकीं 'गोवधबंदी'बद्दल भरपूर आधार असल्यामुळें मुसलमान व ख्रिश्चन मंडळीला थोडेंबहुत तरी पटेल व हिंदूंना तर अवश्य पटणार अशीं तुमचीं मुद्देशीर व्याख्यानें

आहेत. नवीन होतकरूंनीं संघटना करून वरील विषय आपापले गांवांतील लोकांस समजून सांगण्यास तुमचें हें वृत्तांताचें पुस्तक फार उपयोगी पडणारें आहे. यंदा तुमची प्रकृति ठीक नसतांना हें प्रचारकार्य केलेंत हें विशेष होय. कॉंग्रेसनें मंत्रिपदें स्वीकारलीं म्हणून प्रकृतीकडे न पाहातांहि उमेदीनें प्रवास केलात हेंहि विशेष होय. होतकरूंना प्रचार करण्यास तुमचें पुस्तकाचें साधन झालें आहे. लहानपणापासून तुमचे मनावर श्रीदासबोधाचा परिणाम होऊन तुम्ही योजिलेला आपला आयुष्यक्रम अनिरुद्धपणें तुम्ही चालवीत आहांत याबद्दल सर्वजण तुमचें कौतुक करतात. हें पाहून मला व तुम्ही देवता मानता त्या तुमच्या आईला आनंद होतो. श्रीजरंडेश्वर कृपेनें तुमचे हातून असेंच निरंतर कार्य घडो हाच आशीर्वाद.

**चिनुभाऊ बापट**

पत्र : २

श्री. तात्यासाहेब केळकर व त्यांच्या पत्नी पूजनीय ती. ताई या आण्णांना मुलाप्रमाणें मानीत. तात्यासाहेब यांच्या कांहीं पत्रांत आरंभीं अनेक आशीर्वाद असें लिहिलें आहे. त्यांनीं विलायतेहूनहि आण्णांना पाठविलेल्या अनेक पत्रांवरून परस्परांचे संबंध दिसून येतात. त्यांच्या अनेक पत्रांपैकीं फक्त तीनच पत्रें खालीं दिलीं आहेत :—

**श्री. तात्यासाहेब यांचीं पत्रें :**

श्री
लंडन
ता. १४-८-१९१९

रा. रा. सदाशिवराव बापट यांस
सा. न. वि. वि.

तिकडून आलेल्या पत्रावरून तुम्ही महिनाभर तापानें बरेच आजारी होतां असें समजलें. तरी आतां तुमची प्रकृति कशी काय आहे तें कळवावें. काळजी वाटते. तुमचे वडील मातु:श्री कोठें आहेत ? तिकडील हकीकत लिहिण्याजोगी असल्यास लिहावी. उत्तर यावें कळावें.

**न. चिं. केळकर**

पत्र : ३

Hira Lodge, 60 Talbot Road,
Bayswater, London. (w)
२८–९–१९१९

रा. रा. सदाशिवराव बापट यांस
सा. न. वि. वि.

तुमचें पत्र पोंचलें. मजकूर समजला. तूर्त तुम्हा सर्वांच्या प्रकृति बऱ्या आहेत हें वाचून बरें वाटलें. 'लोकसंग्रहा'संबंधीं काळजी वाटते खरी. तरी पण डोंबारी खेळ सर्वांसच साधतो असें नाहीं व साधला तरी तो करूं नये. पंतांनीं वर्तमानपत्र पोटाकरितां जर काढलें नाहीं तर बंद झालें तरी त्याची काय चिंता ? 'संदेश' अधिक खपो पण 'लोकसंग्रह' तोटा न होण्याइतका खपतो कीं नाहीं हें जरूर कळवावें. आमच्या माणसांनीं लोकसंग्रहांत लिहूं नये असा टिळकांचा इकडून हुकूम गेलेला पाहून पराडकर यांस वाईट वाटणें साहजिकच आहे. पण आमच्या माणसांनीं लेख लिहिण्यावरच पत्र टिकून राहतें हें थोडेंच आहे ! याबद्दल माझीं मतें माझ्या 'लोकसंग्रहां'तील आर्टिकलांत व पंतांच्या खाजगी पत्रांत मी लिहिलींच आहेत. मी येथून त्यांस मजकूर पाठवूं शकत नाहीं. यामुळें पंतास निराशा वाटावी हें ठीकच आहे. पण मी लेखकावाचून येथें थोटा बनलों आहे. येथें व्यग्रता पुण्यापेक्षां कमी आहे, पण हातानें लिहिण्याचा कंटाळा येतो. इंग्लंडसंबंधीं कांहीं लिहिण्याचें माझे मनात आहे; पण तें सर्व तिकडे परत आल्यावरच पुस्तकरूपानें लिहिणार आहे. चिपळूणकर यांजबद्दल तुम्हीं लिहिलें तें कळलें. त्यांचें जमत नसल्यास त्यांस रजा द्यावी. सोमण यांचे लेख कसे असतात ? भाऊसाहेब यांचे लेखक या नात्यानें कसें काय जमतें ? असो. पंतास पत्र यशस्वी करण्याची अक्कल खास आहे. पण ती तरी अशा कामीं किती उपयोगी पडेल कोणास ठाऊक ? गोखले व आगरकर यांनीं एका वर्षी सालअखेर हिशेब करून 'सुधारकां'च्या प्राप्तीचे ५०।५० रुपये नफ्याचे घेतले म्हणतात ! पण कांहीं असो, पत्रांत काय येऊं नये याविषयींचीं तत्त्वें त्यांचीं माझीं एक आहेत व ते तीं सांभाळतील अशी मला खास उमेद आहे. माझा या कामीं सल्ला म्हणजे उंटावरून शेळ्या

हाकण्यासारखा आहे हें मी जाणतों. पण केवळ स्नेहभावानें लिहितों. त्याचा अव्हेर करावा लागला तरी विषाद वाटणार नाहीं अशी आशा आहे. हें केवळ तुमचा व पराडकर यांचा स्नेह आहे म्हणून लिहिलें इतकेंच.

बापू जोशी यांचेबद्दल लिहिलें तें समजलें. वासुदेवराव जोशी यांची कल्पना स्वतःचे ५० रुपये व टिळकांचे ५० रुपये त्यांस द्यावे अशी होती. यापेक्षां अधिक त्यांत कांहीं नाहीं. मी वासुदेवराव यांस विचारलें पण टिळक यांस विचारलें नाहीं. तुमची आजारांत ओढाताण झाली असेल या-करितां तुम्हांस जरूर लागतील ते पैसे घरच्या माणसाप्रमाणें बापूकडून घेत जा. किंबहुना घरीं पगार पोंचवितांनाहि त्यांतले तुम्ही घेत जा. पण तुमच्या भिडस्त स्वभावापुढे माझा इलाज चालत नाहीं. मी यापूर्वीच बापूस लिहिलें होतें. त्यानें तुम्हांस कदाचित् सांगितलेंहि असेल. माझें म्हणणें इतकेंच कीं, तुम्हांस पैसे घ्यावयाचे झाले तर दुसऱ्याकडून घेण्यापेक्षां मजकडून घेण्यास तुम्हांस वाईट कां वाटावें ? तसें तुम्ही न कराल तर तुम्हांस कोणतेंहि काम सांगण्यास मलाहि संकोच कां वाटू नये ? याचा विचार करा. बापू जोशी यांचे कुटुंबाकरितां वासुदेवराव जोशी यांचेप्रमाणें मीहि ५० रु. देऊं इच्छितों, ते माझे पुढील पगारांतून परस्पर तुम्हीं घ्यावेत.

'केसरी' संबंधानें लिहिलें तें कळलें. आजपर्यन्त माझी १२–१३ पत्रें 'केसरी'स गेलीं. दर आठवड्यास दोन कॉलम मजकूर मी हातानें लिहून पाठवण्याचा कंटाळा येतो. पण मी स्वत: 'केसरी'चा संपादक लंडनास असून अशा महत्त्वाचे प्रसंगीं जर मजकडून केसरीस पत्र गेलें नाहीं तर लोक काय म्हणतील या विचारानें कंटाळल्यानें कां होईना पण लिहीत असतों. वैचित्र्याच्या दृष्टीनें विचार करून नवा विषय योजून खाडीलकर लिहितील तर त्यांना लिहितां येणार नाहीं असें मुळींच नाहीं. पण वैचित्र्याची लोकांना अपेक्षा आहे ही गोष्ट कदाचित् त्यांचे कानावर गेली नसेल. असो. परत आल्यावर ३।४ महिने विश्रांती घेऊन पुन्हां 'केसरी' हातीं घ्यावयाचा माझा निश्चय आहे. काय होईल तें पाहावें.

'इंडिया' पत्रास एडिटर दुसरा आहे पण मी निदान एक आर्टिकल सहीनें अगर बिनसहीनें दर आठवड्यास लिहितों. शिवाय एडिटरांस सल्ला-

मसलतहि देतों. त्यांत मधूनमधून नोट्सहि लिहितों. 'इंडिया' पत्राची कायमची व्यवस्था लौकरच होणार आहे.

यंदा तेथें प्लेग येतो कीं काय पाहावें. बंगला विकून सत्तेची जागा मी घालवून बसलों आहें. तुमची जागाहि मी आपल्याबरोबर घालविली. आमचीं मुलें माणसें यंदा सुट्टी झाल्यास परगांवीं जाऊं शकतील पण तुम्हीं काय कराल ? बाहेर जावें लागल्यास व जागा मिळाल्यास तुम्हीं घ्यावी. पैशाकडे पाहूं नये. देवदयेनें आपणांस कांहीं कमी नाहीं. कळावें.

नरसिंह चिंतामण केळकर

पत्र : ४

श्री

दिल्ली
ता. १६।२।२५

रा. रा. सदाशिवराव बापट यांसी
सा. न. वि. वि.

तुमचें पत्र पोहोंचलें. तुम्हीं सल्ला विचारला हें ठीकच झालें. तो विचारतांच म्हणून सांगतों. जमीन विकत घेण्याचे भानगडींत पडूं नये. 'केसरी' ऑफिसांतून रुपये घेऊन ताबडतोब ३ किंवा २ वर्षांचे मुदतीनें कायम ठेव म्हणून बँकेंत टाका. मुलीचे (भाची) लग्नाकरितां रक्कम बाजूला काढून ठेवली आहेत तशीच हीहि बाजूस काढून ठेवा. जिवाभावास जवळ थोडा तरी पैसा असला पाहिजे. जमीन पदरीं असल्याचें अभिमानापेक्षां निष्कर्जी राहण्याचा अभिमान फार चांगला. एका सत्कृत्याचें अभिमाना-खातर तुम्हीं १३०० रुपयांची जमीन ९०० रुपयांस विकलीत व आतां दुसऱ्या एका अभिमानाखातर तीच जमीन १३०० रुपयांस विकत घेणार ! या बाबतींत मी असा क्रम लावीन :—

(१) भाचीचें लग्न (२) कर्जनिवारण (हें शक्य झाल्यास तुमच्या चालू पगारांतून थोडें थोडें करावें). (३) स्वत:चे जिवाभावाकरतां थोडी शिल्लक ठेवली पाहिजे. यानंतर जमीन विकत घेणें. वडिलांना १३०० रुपयांची डिपॉझिट रिसीट दाखवा म्हणजे त्यांचें समाधान होईल. टिळकांचें कर्जाकरितां जमीन गेली ही ते दुखापत मानणार नाहींत. आठवणींच्या पुढील खंडाकरितां एक पैसाहि तुम्हीं ठेवण्याचें किंवा खर्च करण्याचें कारण

ठा. ग्रं. ५००८२ वि: चरित्र ४५ ६६०

नाहीं. पुस्तकास लागेल तितकी सर्व रक्कम मी आगाऊ ॲडव्हान्स म्हणून देईन, त्याची तुम्हांस काळजी नको. तात्पर्य, जमीन घेण्याचे विरुद्ध आहे. तथापि शेवटीं सांगावयाचें तें इतकेंच कीं, मीं मत दिलें. तथापि तुम्हांस योग्य वाटेल तें तुम्ही करा. तात्यांनीं उलट अभिप्राय दिला ; आतां जमीन कशी घेऊ असें म्हणूं नका. मी नाहीं कां घरांत व्यर्थ पैसे गुंतवून बसलों ? तथापि मला वाटतें तें मीं लिहिलें आहे. तुम्हांस तार पोंचलीच असेल. सूनबाई ४।६ महिने कराचीस गेल्यास तिला जाण्यास हरकत नाहीं. बापूची व आमची इच्छा या कामीं दोन नाहींत.

**नरसिंह चिंतामण केळकर**

**पत्र : ५**

जळगांव-वऱ्हाड

ता. २४।८।१९२४

चि० सदाशिवराव यांस आशीर्वाद, विशेष. तुमचें ता. २१।८।२४ चें पत्र पोचलें. तुम्हीं धरिलेला प्रेमाचा आग्रह पाहून मला आनंदच होतो पण समाजांत बरें काय दिसेल हेंहि पाहिलें पाहिजे. माझे मित्र रा. तात्यासाहेब केळकर यांचें मत माझ्यासारखेंच पडेल ही खात्री आहे. ते करतील तो निर्णय मला मान्य आहे, कळावे हें आशीर्वाद.

तुमचा

**श्रीपाद कृष्ण कोल्हटकर**

**पत्र : ६**

जळगांव-वऱ्हाड,

ता. २५।१०।२४

आशीर्वाद विशेष

तुमचें ता. १७।८।२४ चें पत्र पावलें. रा. तात्यासाहेबांचेंहि मत मजसारखेंच पडलेलें पाहून आनंद वाटला. माझीं सर्व पुस्तकें आजपर्यंत वेळोवेळीं तुम्हाकडे अभिप्रायार्थ पाठविलीं आहेत. पण अभिप्राय देण्यास मी नालायक असें तुम्हीं नेहमी म्हणतां हें तुमच्या स्वभावास धरूनच आहे. पण तुमचा रसिकपणा मी जाणून आहे. अभिप्राय न म्हणता तुम्ही माझ्या वाङ्मया-

संबंधानें माझेशीं व इतरांशींहि चर्चा करितां त्यावरूनहि दिसून आलेली तुमची रसिकता पाहून माझें पुस्तकावर अभिप्राय देण्यास तुम्हीं सर्वस्वी पात्र आहांत हेंच सिद्ध होतें. तरी संकोच न करितां माझे नवीन नाटक 'शिव-पावित्र्ये' यावर तुमचा स्पष्ट अभिप्राय कळवावा. कळावें हा आशीर्वाद.

तुमचा
**तात्या कोल्हटकर**

**पत्र : ७**

असें समजतें कीं, ती० परमपूज्य ताईसाहेब केळकर यांनीं जन्मांत कधीं पत्र लिहिलें असेल तर तें एक त्यांचे पति तात्यासाहेब यांस. याशिवाय फक्त त्यांनीं आण्णांना एक पत्र लिहिलें. त्या पत्रांत त्यांनीं आण्णांना मुलाप्रमाणें समजून किती उत्कट भावनेनें लिहिले आहे हें खालीं दिलेल्या त्यांच्या पत्रावरून दिसून येईल.

श्रीरामसमर्थ पुष्कर्णी, पुणें ४
ता. २०।११।१९५०

चिरंजीव सदाशिवराव बापट यांस
सप्रेम आशीर्वाद विशेष.

पुष्कळ दिवसांपासून आमची उभयतांची इच्छा होती पण ती पुरें करण्याचें राहिलें. आतां ती पुरी व्हावी अशी माझी इच्छा आहे. तुम्हीं आपणांस आमचे पुत्रवत मानता. आमची बुद्धिहि तीच आहे. मुलापेक्षां सुद्धां तुम्ही आमचेसाठीं जास्त कष्ट केलेत. त्याची फेड कृत्रिम मोलानें होणें नाहीं.

तरी पण आमची उभयतांची आठवण म्हणून तुम्हांस कांहीं देत आहे त्याचा स्वीकार करावा. नाकारूं नये. त्या बाबतींत मला भेटून कांहींहि बोलूं नये. नाकारल्यास तुम्हीं आम्हांस मानीत नाहीं असें मला वाटेल व इतर कांहीं काम सांगणेंहि जड वाटेल. प्रेम हें दुतर्फी पाहिजे. एकांगीं नसावें कळावें, हा आशीर्वाद.

**ताई केळकर**

दे. भ. आण्णासाहेब भोपटकर यांचीं पुष्कळ पत्रें आलेलीं आहेत. आण्णांनीं प्रसिद्ध केलेल्या सर्व प्रचार-वृत्तांताच्या पुस्तकावर व टिळक-केळकर यांचेसंबंधीं प्रसिद्ध केलेल्या सर्व ग्रंथावर भोपटकर यांनीं लिहिलेल्या अभिप्रायांच्या पत्रांत आण्णासंबंधानें त्यांची भावना दिसून येते. त्यांचीं हीं सर्व पत्रें फार बहारीचीं आहेत. त्यांपैकीं येथें फक्त दोनच देतों —

**पत्र : ८**

३२२।१ सदाशिव पेठ, पुणें शहर
ता. २५।२।१९३७

रा. रा. सदाशिवराव बापट यांसी

कृ. न. वि. वि

तुमच्या नेहमींच्या चांगुल स्वभावास अनुसरून तुम्हीं आपल्या पत्रांत जे विचार व्यक्त केले आहेत त्याबद्दल मी तुमचें मन:पूर्वक आभार मानतों. विशेषत:, शंभर रुपयांची नोट पाठविण्यांत तुम्हीं जो आपल्या मनाचा मोठेपणा प्रदर्शित केला आहे तो पाहून तर मी चीतच झालों आहे. सर्व भार मीच सोसावा असें मीं केव्हांच मनाशीं ठरवलें असल्यामुळें सदर नोट परत पाठविली आहे. त्याबद्दल राग नसावा. कमीजास्त समक्ष भेटींत बोलूं.

कळावें. लोभ असावा ही विनंती.

आपला,
**आण्णासाहेब भोपटकर**

**पत्र : ९**

३२२।१ सदाशिव पेठ
पुणें शहर
ता. १९।४।१९३९

रा. रा. सदाशिवराव बापट यांसी

कृ. न. वि. वि.

मला आतांच तुमचें ता. १७ चें पत्र मिळालें. नेहमींप्रमाणेंच मी ते तुमच्या मजविषयींच्या प्रेमाचें द्योतक समजतों. अर्थात्, त्याबद्दल माझे ठायीं कृतज्ञता बुद्धि साहजिकच वसत असते.

तुमचें शरीरच जर हल्लीं व्याधिग्रस्त झालें आहे तर त्याला तुम्ही तरी काय करणार? तशांत, मातापितरांविषयींच्या कर्तव्याला कांहीं किमतच नव्हे काय? तुम्हीं आपल्या वडील-मातोश्रींची सेवाचाकरी अवश्य प्रथम केली पाहिजे. तींत बाकीच्या कर्तव्यांचा समावेश होतोच.

प्रेमाच्या भरांत तुम्हांस नेहमींच माझे ठिकाणीं नसते गुण दिसतात, व असले गुण फुगून दिसतात याबद्दल मी तुमचें खरोखरच अंतःकरणपूर्वक आभार मानतों.

तसेंच पाहिलें तर मी तरी आतां साठीच्या घरांत आलेलों आहे. यामुळें प्रकृतिमान बेताबेताचेंच असतें, हें सारे खरें. पण शरीराकडे पाहून मीं जर आपलें कर्तव्य करायचें असें म्हटलें तर मग जिवंत राहून करायचें तरी काय? सारा ग्रंथ येथेंच आटोपलेला बरा नव्हे? असो.

तुमच्या वडील-मातोश्रींना माझे नमस्कार सांगा. ही विनंती.

आपला,

**आण्णासाहेब भोपटकर**

आण्णांच्या नातेवाइकांपैकीं त्यांचे कनिष्ठ जांवई मुंबई येथील सुप्रसिद्ध इंजिनियर व बडे कॉन्ट्रॅक्टर श्री. रामचंद्र नारायण जोशी यांचें नुकतेंच एक पत्र आलें तें देऊन स्थलसंकोचास्तव, नाइलाजानें हा खाजगी पत्रव्यवहार येथें संपवितों. सार्वजनिक कार्यासंबंधाच्या पत्रव्यवहाराचा थोडाबहुत परामर्ष या पुस्तकांतील भाग ४ मध्यें घेण्यांत आला आहे.

पत्र : १०

R. N. Joshi, B. E. M. I. E.,
Managing Director, S. B. Joshi & Co. Ltd.
Fellow of the University of Bombay,
Member of Council, Institution of
Engineers (India)
166–D. Dr. Ambedkar Road,
Bombay–14.

ता. ३०–१०–१९६४

॥ श्रीसमर्थ ॥

ती. रा. अण्णासाहेब बापट, पुणें, यांचे सेवेशी —

त्रिकाल चरणीं मस्तक ठेवून रामभाऊचा शिरसाष्टांग नमस्कार.

आपल्या डोळ्याचें ऑपरेशन ता. ३१ रोजीं आहे. शस्त्रक्रिया उत्तम रीतीनें होऊन आपली दृष्टि पूर्ववत् लौकरच होवो अशी सदिच्छा व्यक्त करतों.

आपलीं पत्रें आम्हांस गेलीं कित्येक वर्षें वक्तशीरपणें येत असतात. आपणांस आम्हां सर्वांचेबद्दल वाटणारें प्रेम व काळजी आपल्या शब्दा-शब्दांतून सुतराम् भरलेली असते. आपल्या पत्रांना चि. सौ. मालती मधून मधून उत्तरें धाडते. मी आपणास आजपर्यन्त विशेष कधीं पत्रें लिहिलीं नाहींत. पत्रें लिहिण्यास वेळ मिळत नाहीं अशी सबब मीं कधीं सांगितल्याचें स्मरत नाहीं, व ही सबब खरीहि नाहीं. चटकदार व आकर्षक लिखाण लिहिण्याची कला मला अवगत नाहीं. शास्त्रीय विषयांवरील अभ्यासिलेल्या मुद्द्यांवर चर्चात्मक लिखाण किंवा भाषण करण्याची संधि मला कधीं कधीं मिळते. पण त्याव्यतिरिक्त कोठल्याहि abstract विषयांवर बोलणें किंवा लिहिणें मला कधींच जमत नाहीं. कदाचित् या कारणामुळेंच मी कोणाशीं फारसा पत्रव्यवहार करीत नाहीं. कारण कांहींहि असो. आपल्या आजपर्यन्तच्या वेळोवेळीं येणाऱ्या प्रेमळ, चटकदार व मार्मिक पत्रांचा कांहींहि प्रमाणांत मी परामर्ष घेतला नाहीं. एवढी गोष्ट खरी.

आपणांसारख्या व्यक्तींशीं इतका जवळचा आप्तसंबंध येण्याचा योग आला हें माझें सद्भाग्य आहे. अनेक वर्षें मी आपणांस अगदीं जवळून बघितलें आहे. श्रीसमर्थांची शिकवण आपल्या रोमारोमांत उतरली आहे. कदाचित् सज्जनपणाचा गुण आपल्या अंगीं दोष ठरेपर्यन्तच्या सीमेस गेला आहे असें म्हटलें तरी चूक ठरणार नाहीं. आपण देशासाठीं, समाजासाठीं, पक्षासाठीं केलेला स्वार्थत्याग, सोसलेले कष्ट व आपला बहुश्रुतपणा, व्यवस्थितपणा व भाषानैपुण्य या गोष्टी लक्षांत घेतां आपल्या जीवनाच्या उत्तरार्धांत तरी विधात्यानें आपणांस पुरेसा न्याय दिला आहे असें वाटत नाहीं. आपल्या सर्वांच्या जीवनांत केलेल्या चांगल्या वाईट कर्मांचीं फळें आपणांस याच जीवनांत भोगतां येतात किंवा नाहीं व त्यांचा न्यायनिवाडा केव्हां होतो हा फार गहन विषय ठरेल. परंतु जीवनांत जेव्हां सज्जन लोकांचे हाल व दुर्जनांची भरभराट पाहावयास मिळते तेव्हां साहजिकच वरील प्रकारच्या कल्पना मनांत येतात. जीवनांतील यशाचें मापन करण्याची मानवी पद्धत तौलनिक स्वरूपाची असून ती त्याच्या (मानवाच्या) स्वल्प ज्ञानावर अवलंबून असल्यामुळे त्याला पूर्ण सत्याची विशालता किंवा खोली यांची कल्पना येऊं शकत नाहीं. याच संकुचित दृष्टिक्षेपांतून तरी माझी अशी समजूत आहे कीं, आपल्या प्रामाणिक श्रमांचे व कर्तबगारीचे मानानें राजकीय, सामाजिक लौकिकाच्या दृष्टीनें आपणांस यापेक्षां जास्त मान्यता मिळावयास हवी होती. असें समजूं कीं आपला पुण्यसंचय याच जीवनांत खर्ची पडण्यापेक्षां तो आपल्या खात्यांत जमा आहे व त्याची सव्याज भरपाई यथावकाश आपणांस केली जाईल.

आपले गेले कांहीं महिने कै. ती. दादासाहेब दामले यांच्या असाध्य दुखण्याच्या काळजीमध्यें, त्यांच्या सेवाशुश्रूषेमध्यें व कौटुंबियांचें सांत्वन करण्यामध्यें गेले. त्यांच्या निधनामुळें तुमच्या मनास फार अस्वस्थता आली आहे हें साहजिक आहे. त्यांत तुमची प्रकृति असावी तशी नाहीं. त्यांतच डोळ्याचें ऑपरेशन आहे. पण अवघड परिस्थितींतहि परमेश्वरावर भरंवसा ठेवून धीरानें वागणें हेंच योग्य. शस्त्रक्रियेनंतर जरूर ती सर्व काळजी घेणें. आपला स्वभाव फारच संकोची व भिडस्त आहे. दुसऱ्यांकडून सेवाशुश्रूषा करून घेणें आपल्या स्वभावाशीं जमत नाहीं म्हणून काळजी वाटते. ७–८

दिवसांनीं आपण मुंबईस येऊन विश्रांतीसाठीं निदान महिनाभर तरी राहावें अशी माझी आग्रहाची विनंती आहे. पण आपण ती मान्य करण्याची शक्यता आजपर्यन्तच्या अनुभवावरून तरी वाटत नाहीं. आपण लौकर बरे व्हाल अशी सदिच्छा व्यक्त करतों. पत्रांत कांहीं कमी जास्त लिहिलें असलें तर त्याबद्दल क्षमा मागतों. कळावें. ही विज्ञापना.

आपला नम्र,
**रामभाऊ जोशी**

## (९) गुरूची विद्या गुरूला फळली

ती. आण्णांचा आर्थिक सर्व व्यवहार रोखीचा असतो. उधार, उसनवार, दुकानांतील खातें हे शब्द त्यांच्या कोशांत नाहींत. अर्थात अशा धूर्त वागणुकीमुळें पुष्कळ वेळां ते आर्थिक अडचणींत असतात, नाहीं असें नाहीं. पण त्या वेळीं विलक्षण संयमानें ते जीव मारून स्वस्थ बसतात, मदतीसाठीं हात पुढे करीत नाहींत. याचा अर्थ असा कीं, ज्यासाठीं अर्थ-अपेक्षा असते त्याचा मोह ते टाळतात. त्यांची ही वृत्ति श्री. तात्यासाहेब केळकर यांना फार कौतुकाची वाटे. एकदां असा प्रसंग घडला कीं, आण्णांच्या भाचीच्या लग्नप्रसंगाच्या आर्थिक अडचणीच्या वेळीं त्यांस तात्यासाहेब यांनीं देऊ केलेली आर्थिक मदत आण्णांनीं नाकारली, तेव्हां विनोदानें पण थोड्या रागानें तात्यासाहेब म्हणाले, "ठीक, गुरूची विद्या गुरूला फळली हेंच खरें!" (तात्यासाहेब यांनीं लंडनहून पाठविलेल्या एका पत्रांत हा उल्लेख आहे.)

## (१०) आण्णांनी दिलेल्या कांहीं वर्गण्या व देणग्या

आण्णांची सांपत्तिक स्थिति अगदीं बेताची आहे. वडिलोपार्जित घर व शेतीचें थोडें उत्पन्न बोरखळ (जि. सातारा) या खेडेगांवीं होतें. पण १९४८ सालीं गांधीवधोत्तरच्या संहारांत घर जाळलें गेलें व कूळकायद्यांत शेतीचें उत्पन्न नाहींसें झालें. स्वकष्टार्जितावरच त्यांना अवलंबून राहावें लागते. खाजगी सार्वजनिक संस्थांचे सेवेंत त्यांचें आयुष्य जात असल्यामुळें त्यांत होणारी प्राप्ति हेंच काय तें त्यांचें मुख्य उत्पन्न. त्यांनीं तयार केलेल्या ग्रंथाच्या विक्रीची मदत थोडीबहुत काय झाली असेल तेवढीच.

तथापि त्यांच्या मनाचें औदार्य दांडगें आहे. तथापि मनानें ते हिशेबी असल्यामुळें रोजच्या राहाणींत शक्य तितकी काटकसर करून दरमहाच्या प्राप्तींतून कांहीं ठराविक शिल्लक ठेवावयाची व तिचा विनियोग प्रासंगिक धर्मकार्यापेक्षां राष्ट्रकार्याकडेच विशेष करावयाचा अशी त्यांची प्रवृत्ति व शिरस्ता आहे. ते मूळचेच विशेष भावनाप्रधान असल्यामुळें आपल्या शक्ति कुवतीपेक्षां पुष्कळ वेळां त्यांनीं आपला जीव दानधर्म करण्याच्या मोहानें धोक्यांत घातला आहे. या बाबतींत त्यांना विचारलें तर ते आपलें मौन सोडीत नाहींत; उलट असली माहिती उघड करूं नये असा त्यांचा आग्रह आहे! तथापि तिकडे दुर्लक्ष करून, त्यांच्या अंगावर पडलेल्या घरांतील कौटुंबिक खर्चाच्या जबाबदाऱ्या सांभाळून त्यांनीं दिलेल्या आजपर्यन्त कांहीं देणग्या व वर्गण्या यांच्या उपलब्ध असलेल्या प्रत्यक्ष पावत्याच आहेत, त्यावरून खालील माहिती मी गोळा करून दिली आहे. तसेंच घरचाहि जमाखर्च लिहिण्याचें वळण त्यांस असल्यामुळें त्यांतूनहि कांहीं माहिती मिळाली ती दिली आहे. त्यांपैकीं आरंभाचे चार-दोन आंकडे सोडून साधारणपणें १९३५ पासून जी माहिती मला मिळाली तेवढीच खालीं दिली आहे. आण्णा हे कधीं कोणाची विन्मुख पाठवणी करणारे नसल्यामुळें त्यांच्या हिशोबाच्या वहींत एक रुपयाचे आंकडे पुष्कळ दिसले म्हणून विस्तार-भयास्तव येथें त्यांचा उल्लेख केला नाहीं.

## तो. आण्णांनीं दिलेल्या कांहीं देणग्या व वर्गण्या

| नांव | सन | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. बोरखळ, (जिल्हा सातारा) येथील लो. टिळक पादुका स्थापना व श्री. न. चिं. केळकर यांस मानपत्र समारंभ. | १९२० | २५० |
| २. लो. टिळक षष्टयब्दिसमारंभ. | १९१४ | ५०० |
| ३. लो. टिळक पर्सफंड (चिरोल केस). | १९१९ | २५० |
| ४. 'त्रिकाळ' कर्ते श्री. करंदीकर सत्कारसमारंभ. | २२– १–१९१९ | १० |
| ५. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. | ६– ५–१९५४ | २५ |
| ६. श्रीसमर्थ मंदिर जांब. | २१– ६–१९४५ | ३० |
| ७. श्रीसमर्थ सेवामंडळ. | ९– ४–१९५१ | ३० |
| ८. आचार्य रबडे स्मारक समिती. | १५– २–१९३५ | ५ |
| ९. राहूरी एज्युकेशन सोसायटी. | १८– २–१९३५ | १० |
| १०. श्री. जरंडेश्वर-ब्राह्मण धर्मशाळा. | २६–१०–१९३७ | १० |
| ११. भोपटकर-सत्कार निधि. | २०– ८–१९४० | ३० |
| १२. आयुर्वेद-शिक्षण मंडळ पुणें. | २९– ८–१९४० | १० |
| १३. लो. अणे सत्कार समिती. | १०– ८–१९४० | ११ |
| १४. लोकशाही स्वराज्यपक्ष (स्त्री शाखा). | २०– ५–१९४० | १० |
| १५. हिंदू राष्ट्रीय निधि, पुणें. | २३– ५–१९४१ | १०१ |
| १६. महाराष्ट्रीय मंडळ पुणें. | ११– ७–१९४२ | १२ |
| १७. न. चिं. केळकर-सुवर्णपदक (मुंबई युनिव्हर्सिटी). | १३–१०–१९४२ | १००० |
| १८. सावरकर सत्कार मंडळ पुणें. | १६– ४–१९४३ | २५ |
| १९. महाराष्ट्र प्रांतिक हिंदू सभा (काळ पत्रनिधि) | १ –१०–१९४६ | १० |
| २०. न्याय सहाय्य निधी (डिफेन्सफंड). | २९– ५–१९४८ | ५० |
| २१. सातारा जिल्हा संघटना मंडळ. | १९३५ | २५० |
| २२. भारत इतिहास संशोधक मंडळ. | ४– ६–१९२४ | ३० |
| २३. नेहरू रिपोर्ट प्रचार. | १– ८–१९३२ | ५२५ |

| नांव | सन | रक्कम रुपये |
|---|---|---|
| २४. श्री. खानविलकर स्मारक निधि मुंबई. | ६– ९–१९६० | ५ |
| २५. पुणें सार्वजनिक सभा. | १३– ९–१९६२ | २५ |
| २६. दे. भ. हरिभाऊ फाटक सत्कार निधि | ८– ४–१९६४ | २५ |
| २७. गोवा विमोचन समिती. | २५–१०–१९५५ | ५० |
| २८. श्रीसमर्थ जन्मोत्सव समिती. | २४– ९–१९५८ | ५ |
| २९. पुणें नगर हिंदूसभा. | २०– ३–१९६३ | ५ |
| ३०. श्रीसमर्थ सेवा मंडळ (शिवथर घळीकरितां). | १५–११–१९६४ | १०१ |
| ३१. वे. मू. बाळशास्त्री म्हैसाळकर— संभावना | १९ | २५ |

## (११) आण्णांचा ग्रंथसंग्रह

आपला मुख्य व्यवसाय व इतर कामेंधामें सांभाळून आण्णांचें थोडें-बहुत वाचन चालू असतें. महाराष्ट्र संतवाङमय हा त्यांचा आवडीचा विषय आहे. व त्यांतहि श्रीसमर्थ-वाङमयाकडे त्यांचा विशेष ओढा आहे. काव्य, नाटक, इतिहास इत्यादि वाङमयाच्या प्रकारांचीहि गोडी त्यांना आहे. यामुळें चांगलें पुस्तक संग्रही असावें म्हणून ते या कामींहि थोडाबहुत खर्च करितात. अशा रीतीनें पुस्तकांचा बराच संग्रह त्यांनीं केला. शिवाय त्यांस भेटी-दाखल पुस्तकें येतात. असा सर्व मिळून त्यांचा मोठा संग्रह होता. हा संग्रह त्यांनीं सार्वजनिक सभेच्या इमारतीत फार व्यवस्थितपणें ठेविला होता. पण १९५२ सालीं त्या इमारतींच्या भयंकर अग्निप्रकोपांत तो सांपडला. मोठ्या कष्टानें त्यांतून सुमारें ६०० ग्रंथ हातीं लागले ते त्यांनीं हल्लीं टिळक मंदिराच्या कचेरींत ठेविले आहेत. आण्णा टापटिपीनें व व्यवस्थेशीर वागणारे असल्यामुळें त्यांनीं हाहि चिमुकला ग्रंथसंग्रह यादीनिशीं व्यवस्थित ठेविला आहे.



तीर्थस्वरूप लोकमान्य टिळक

# भाग २ रा

# लोकमान्य टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

# आणि

# अवांतर वृत्त-विशेष

लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका
खंड १ यांतील

# अर्पणपत्रिका

सन १८७० ते सन १९२०

म्हणजे

ज्या प्रभावशाली अर्धशतकानें महाराष्ट्राच्या सार्वजनिक

आयुष्यक्रमाचें नवयुग सुरू केलें, ज्यानें अभिनव

कल्पना-विचारांचें स्थित्यंतर घडवून आणिलें,

ज्यानें सामाजिक चालीरीतींचें मन्वंतर

प्रवर्तित केलें व ज्यानें महाराष्ट्राच्या

अर्वाचीन राजकीय इतिहासास

जन्म दिला

त्यास

कृतज्ञभावानें हा ग्रंथ-गुच्छ अर्पण केला आहे.

— सदाशिव विनायक बापट

## लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

### खंड १ यांतील

# आत्मनिवेदन

तत्त्वें तत्त्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ।
आत्मनिवेदन तेणें प्रकारें । सहजचि झालें ।।

—श्रीसमर्थ

कै. राष्ट्रसूत्रधार लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 'आठवणीं'चें हें पुस्तक वाचकांचे हातीं देण्यास मला फार आनंद होत आहे. ज्या महाभागानें आपल्या अतुल बुद्धिसामर्थ्यानें व अचाट कर्तबगारीनें सर्व हिंदुस्थानाला कोणत्या ना कोणत्या तरी चळवळीच्या आंदोलनानें चाळीस वर्षें एकसारखें डुलत ठेविलें होतें, त्या असामान्य पुरुषाचें पुण्यस्मरण नित्य कोणास होणार नाहीं ? जोंपर्यंत हिंदी 'राजकारण' हा शब्द लोक विसरणार नाहींत तोंपर्यंत त्यांची आठवण विसरणें अशक्य आहे. एवढ्या स्थूल प्रमाणांत जर ते सर्वांच्या चित्तांत अखंड वास करीत आहेत, तर मग मर्यादित अशा या प्रस्तुत प्रयत्नाचें प्रयोजन काय ? याला उत्तर एवढेंच कीं, समुद्राच्या अथांग हृदयांत अनंत अमूल्य वस्तुसंग्रह आहे, हें जरी सर्वांस माहीत असलें तरी पाणबुड्यानें बुडी मारून आपल्या शक्तीप्रमाणें त्याचे उदरांतून प्रत्यक्ष काढलेल्या लहानमोठ्या माणिक-मोत्यांचे सर करून एखाद्यानें त्यांचा हार गुंफिल्यास तो पाहून कोणास आल्हाद होत नाहीं ?

सातारा जिल्ह्यांत आमच्या बोरखळ गांवीं दरवर्षी लोकमान्यांच्या पुण्यतिथीचे दिवशीं, माझे वयोवृद्ध परमपूज्य तीर्थरूप टिळकभक्त भाऊसाहेब यांनीं मला म्हणावें कीं, 'येथील लोकांस तूं टिळकांच्या गोष्टी सांगून

त्यांची पुण्यतिथि साजरी करावी.' याच आज्ञेचें पर्यवसान लोकमान्यांच्या आठवणी लिहिण्याचे स्फूर्तींत झालें. त्याला पुढें माझे मित्र काशीनाथ नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर यांचें प्रोत्साहन मिळालें व त्या पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्याबद्दल साताऱ्चे मित्र श्री. जनार्दन नारायण ऊर्फ बापूराव ढाप्रे यांनीं विशेष आग्रह केला. लोकमान्यांच्या आठवणी म्हणजे साधकाच्या किंवा मुमुक्षूच्या हातांतील स्मरणीच्या मण्याप्रमाणें आहेत. कोणत्याहि दुसऱ्या व्यवसायांत चित्त व्यग्र झालें असतां हातांतील स्मरणीचे मणी ज्याप्रमाणें अंतर्दृष्टीला मुख्य ध्येयापासून फारसे दूर चळूं देत नाहींत, त्याप्रमाणें लोकमान्यांसारख्यांच्या आठवणी त्यांच्या धीरोदात्त स्वभावाचें व जाज्वल्य देशाभिमानाचें वरचेवर स्मरण देऊन मन कर्तव्यच्युत होऊं देत नाहींत.

पण या आठवणी सांगावयाच्या कोणीं आणि हे निरनिराळ्या ठिकाणीं सांडलेले मणी एकत्र करून त्यांची स्मरणी बनवावयाची कोणीं ? या मण्यांची निपजहि निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या परिस्थितींत झालेली असल्यामुळें स्फटिकाच्या मण्याप्रमाणें ते एकाच रंगाचे असूं शकणार नाहींत; अर्थात् सर्व मणी एके ठिकाणीं जमा केल्यानंतर त्यांची यथायोग्य निवड करून जो रंग ज्या ठिकाणीं खुलून दिसेल त्याच ठिकाणीं तो घालून सुंदर स्मरणी बनविण्याचें काम अधिकच कठीण व कौशल्याचें असतें. यामुळें मला हें काम प्रथम आपल्या शक्तीबाहेरचें वाटलें, तथापि लोकमान्यां-विषयींच्या शुद्ध भक्तिप्रेमामुळें या संग्रहकार्यास मीं हात घालण्याचें धाडस केलें. गेल्या वर्षीं त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त केसरी, लोकसंग्रह व लोकमान्य या पत्रांत मीं माझ्या आठवणी प्रसिद्ध केल्या, व त्याबरोबरच इतर सहानुभवी अशा कांहीं सद्‌गृहस्थांच्या सह्यांनिशीं महाराष्ट्रांतील लोकांस लोकमान्यांच्या आठवणी पाठविण्याबद्दल जाहीर विनंति केली. हेतु हा कीं, श्री. तात्यासाहेब केळकरकृत टिळकचरित्र जरी सर्वांगसुंदर झालें असलें तरी त्या चरित्र-प्रासादाच्या चिरेबंदींतील क्वचित् भरावयाच्या राहिलेल्या दरजा "आठ-वणीं" च्या उत्कृष्ट सनल्यानें जर बेमालूम भरल्या गेल्या तर अद्याप बनवायचें राहिलेलें चरित्र-प्रासादाचें उत्तुंग शिखर यामुळें अधिकच खुलून

दिसावें. 'आठवणी' ह्या एखाद्या प्रचंड नदीस येऊन चोहोंकडून मिळणाऱ्या लहानमोठ्या नद्यांप्रमाणें, किंवा चित्रकारानें काढलेल्या चित्रांतील रंगांप्रमाणें अथवा मूर्तिकारानें केलेल्या मूर्तीच्या कोरीव कामाप्रमाणें होत; किंवा असेंहि म्हणतां येईल कीं, आंगरख्यास जसें अस्तर, पंचपक्वान्नाच्या भोजनांत जशी चटणी-कोशिंबीर, छतास जशी झालर, झुंबराचे जसे लोलक, शालूवर जशा बुट्या किंवा नभोमंडळांत जशा तारका तशा कोणत्याहि चरित्र-विषयाच्या 'आठवणी' या चरित्र-ग्रंथाच्या पूरक होत.

असो. आठवणी प्रसिद्ध करण्याची ही कल्पना लोकांस आवडल्याचें एक गमक म्हणजे परप्रांतस्थ वर्तमानपत्रांत म्हणजे मद्रासच्या इंग्रजी 'हिंदू'त व 'कलकत्ता-समाचारां'त मीं लिहिलेल्या आठवणींचें भाषांतर होऊन आलें. केसरींत प्रसिद्ध झालेलें विनंतिपत्रक व आठवणी यांनीं या बाबतींत जो उपक्रम झाला तो सहृदय स्वकीयांना पटल्याचें प्रमाण म्हणजे यवत-माळचे सुप्रसिद्ध व विद्वान् पुढारी श्री. माधवरावजी अणे यांनीं आपल्या ता. ८–८–१९२३ च्या मला लिहिलेल्या पत्रांत प्रस्तुत प्रयत्नाबद्दल मला उत्तेजन देऊन, पुढीलप्रमाणें उद्गार काढले आहेत—

"लोकमान्यांसंबंधीं लहानमोठ्या सर्व गोष्टींचीं टांचणें प्रसिद्ध होणें इष्ट आहे, कारण त्याशिवाय त्यांच्या खासगी व सार्वजनिक चारित्र्यांतील सर्व रहस्य स्पष्ट होणार नाहीं. परंतु आठवणींची किंमत त्या प्रसिद्ध करणाऱ्या माणसाच्या विश्वसनीयतेवरच अवलंबून असल्यामुळें भावी चरित्र-कारास त्यांतून योग्यायोग्याची निवड करतांना अडचण उत्पन्न झाल्यावाचून राहात नाहीं. अनभिज्ञ माणसास ज्याप्रमाणें मोत्यांच्या सरांतील खरें व खोटें मोतीं ओळखणें कठीण, त्याचप्रमाणें आठवणींतून सत्यासत्याची पारख करणें कालांतरानें दुरापास्त. म्हणून असल्या आठवणी प्रसिद्ध करतांना ज्यांच्याकडून माहिती मिळाली त्या गृहस्थांच्या नांवांचा उल्लेख, काळ व स्थळ यांचा निर्देश असणें अवश्य असतें; आणि लिहिण्यास आनंद वाटतो कीं, आपण आपल्या आठवणी प्रसिद्ध करतांना ही खबरदारी घेतली आहे, हें मला दिसून आलें. माझी अशी खात्री आहे कीं, इतक्या परिश्रमानें लोकमान्यांच्या चरित्राचा भावी भव्य प्रासाद बांधण्याकरितां आठवणींच्या

रूपानें लहानमोठ्या विटा जमा करून आपण ठेवीत आहां, तोच क्रम असाच चालू ठेविल्यास या सर्व सामुग्रीचा उपयोग होऊन लोकमान्यांचा चरित्र-प्रासाद निर्माण झालेला पाहण्याचें सद्‌भाग्य देखील आपणास लाभेल. याच लोकमान्यांच्या दिव्य चरित्राचे उत्तुंग शिखरावरून अवतीर्ण झालेल्या तत्त्वगंगेच्या पावनस्पर्शानें आमचा उद्धार होणार आणि आमच्या भावी संततीचा उत्कर्ष होणार, हा माझा दृढ विश्वास असल्यामुळें या प्रवाहाचे अवतरणार्थ आपण चालविलेल्या प्रयत्नांचे मी मनःपूर्वक व सादर कौतुक करतों. आपल्या प्रयत्नांबद्दल मला निव्वळ कौतुक वाटत नसून आपले हातून कै० लोकमान्यांची स्मृति कायम ठेवण्याचें महत्कार्य होत आहे अशी भावना माझे अंतःकरणांत असल्यामुळें पुनः एकदां आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतों."

या बाबतींत ता. ३१ जुलै १९२३ च्या केसरीमध्यें पहिली जाहीर विनंति करण्यांत आली. सदरचें विनंतिपत्र सविस्तर खालीं दिलें आहे.

## लो. टिळकांचें वाङ्मय स्मारक

"सध्यांच्या राजकारणामध्यें टिळकमत पुनः प्रवर्तित करण्याची केवढी आवश्यकता आहे, हें कोणास सांगण्याचें कारण नाहीं. हें करण्याचीं साधनें अर्थात् अनेक आहेत, त्यांपैकींच लोकमान्यांचें सुबोध, सुविस्तृत, साधार, सर्वांगपरिपूर्ण व निःपक्षपाती चरित्र प्रसिद्ध होणें ही एक गोष्ट आहे, हें कोणासहि विसरून चालणार नाहीं. या पांच गुणांपैकीं कोठलाहि एक गुण कमी पडला तरी तें चरित्ररूप 'वाङ्मय स्मारक' तितकें अपुरेंच राहणार. नुकताच जो टिळकांचा चरित्र-खंड प्रसिद्ध झाला त्याच्या प्रस्तावनेंत ग्रंथकर्त्यानें चरित्रसाधनें भरपूर उपलब्ध नसल्याबद्दल म्हटलेंच आहे. अर्थात् उपलब्ध साधनांत व एका व्यक्तीच्या शक्तीप्रमाणें तें काम अंशतः पुरे झालें, इतकेंच म्हणतां येईल.

"परंतु हें काम सर्व राष्ट्रीय पक्षानें मनावर घेऊन एकजुटीनें करण्याचें आहे, असें आम्ही म्हणतों. टिळकांचा राष्ट्रोद्योग व संचार अनेक बाजूंनीं सतत चालला होता. अर्थात् जितका त्यांचा परिवार मोठा तितकीं

त्यांच्या चरित्राचीं साधनें विपुल ही गोष्ट उघड आहे. हजारों लहान-मोठ्या व्यक्तींशीं टिळकांनीं आपलें अंतरंग व्यक्त केलें असेल. त्यांत दिसून आलेल्या ज्या अनेक लहानमोठ्या स्वभावदर्शक गोष्टी त्या सर्व कोणा तरी एकट्या एक व्यक्तीला माहीत असतील ही गोष्टच मुळांत अशक्यप्राय आहे. अर्थात् अशा कोणत्याहि चरित्राला सर्वांग-परिपूर्णता येणें शक्य नाहीं. पण या गोष्टीची चिंता महाराष्ट्रभर पसरलेल्या सर्व राष्ट्रीय पक्षास वाटली पाहिजे. राष्ट्रीय पक्षाचें विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञान बऱ्याच अंशीं टिळकांच्या स्वभावगुणांत व चारित्र्यांत उतरलें होतें यांत शंका नाहीं. अर्थात् टिळकांचें अनेकांगी व विस्तृत चरित्र शक्य तर जसेंच्या तसें लिहिलें जावें हाच राष्ट्रीय पक्षाच्या राजकीय तत्त्वज्ञानाचा पाया होय. व्यक्ति नष्ट झाल्याबरोबर त्याच्याजवळ असलेल्या आठवणीहि लुप्तप्राय होतात व अशी पिढीच्या पिढी उलटून गेल्यावर साधार चरित्रसाधनांच्या अभावीं राजकीय पंथाचा पाया कमजोर होऊं लागतो, ही गोष्ट विसरतां कामा नये. चरित्रलेखनाची गोष्ट योग्य, परंतु एकट्या मनुष्याच्या हातून जरी पूर्ण झाली तरीदेखील ती ज्या-प्रमाणें एका अर्थानें अपूर्णच राहते, त्याप्रमाणें प्रत्येकानें हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, लेखक सर्वस्वीं योग्य असतांहि कित्येक वेळां अनेक कारणांमुळें त्याच्या हातून हीं कामें तडीस जातहि नाहींत. न्या. रानड्यांचें चरित्र गोखले लिहिणार होते; पण गोखल्यांच्याबरोबर रानडेहि गेले, असेंच म्हणण्याची आतां पाळी आली व स्वत: गोखल्यांचें चरित्रहि अजून कोणीं लिहिण्याचें मनावर घेतल्याचें दिसत नाहीं! तात्पर्य, अशा बाबतींत कोणावरहि न विसंबतां ज्याची त्याची काळजी प्रत्येकानें स्वत: केली पाहिजे. हजारों व्यक्ति व त्यांच्याबरोबर हजारों बहुमोल गोष्टी आम्ही स्वत:च्या अनास्थेनें नामशेष होऊं न देतां, व नंतर संशोधन सुरू झाल्यावर एखाद्या मोठ्या सिद्धान्ताची इमारत एखाद्या क्षुल्लक व्यक्तीजवळ असलेल्या क्षुल्लक चिठोऱ्यावर उभारावी लागते, हा अनुभव इतिहाससंशोधकांस आहेच. ती स्थिति होऊं नये म्हणून या कामीं येणाऱ्या भावनाप्रधान तत्त्वाचा गुण किंवा दोष स्वत: पत्करूनहि आम्ही महाराष्ट्रभर पसरलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या सर्व अनुयायांना अशी विनंति करतों कीं, आपणा-जवळ असलेली परंतु दुसऱ्याला सांगण्यासारखी वाटेल अशी, टिळकांसंबंधीं प्रत्येक लहानमोठी गोष्ट लिहून काढून ती आपल्या नांवावर त्यांनीं प्रसिद्ध

करावी. यांत स्वतःला अपरोक्ष रीतीनें मोठेपणा येईल, अशी खोटी कल्पना त्यांनीं करून घेऊं नये. कोणाला कशाबद्दल किती मोठेपणा द्यावयाचा, हें ठरविण्याइतकी जनता खात्रीनें शहाणी आहे. या बाबतींत एकजुटीनें कां काम केलें पाहिजे याबद्दल एकच उदाहरण पुरे होईल. अनेक लहानमोठ्या व्यक्तींनीं आपल्या हकीकतींच्या साधार परंतु लहानमोठ्या गोष्टी धीटपणानें पुढें येऊन सांगितल्या नसत्या तर, नुकताच प्रसिद्ध झालेला कायदेभंग-कमिटीचा रिपोर्ट किंवा पंजाब-प्रकरणाचा साधार व साद्यंत इतिहास लोकांना वाचावयास मिळाला नसता. अर्थात् टिळक-चरित्राच्या बाबतींतहि लहान लोकांनीं मोठे-पणाच्या किंवा मोठ्या लोकांनीं लहानपणाच्या कल्पना बाजूस सारून, पुढें येऊन, हें साधन-प्रकाशनाचें काम केलें तर सर्व राष्ट्रीय पक्षानें एकजूट करून टिळकांचें वाङ्मय स्मारक केलें असें होईल. यापेक्षां टिळकांच्या अनुयायांना जास्त लिहिण्याची गरज नाहीं असें वाटतें.

१. शंकर गणेश लवाटे, २. वासुदेव कृष्ण भावे, ३. काशीनाथ नरसिंह केळकर, ४. अनंत वासुदेव फडणीस, ५. सदाशिव विनायक बापट ''

पण सदर विनंति केल्यापासून पुढें सुमारें सहासात महिन्यांत फार तर दोघांचौघांशिवाय कोणाकडूनहि आठवणींचा मजकूर आला नाहीं. याचें कारण अशा प्रकारच्या पाश्चात्य धर्तीच्या नवीन वळणाची आम्हास संवय नाहीं हेंच होय, म्हणून त्याबद्दल आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. टिळक-चरित्र लिहिण्यापूर्वी चरित्रकार श्री· तात्यासाहेब केळकर यांच्या-सारख्यांनीं चरित्र-साधनें पुरविण्याविषयीं केसरीमधून दोन वेळां जाहीर विनंति करूनहि जेथें कांहीं उपयोग झाला नाहीं तेथें आमच्यासारख्यांच्या विनंतीची कथा काय ? सदरहू विनंतिपत्रास जरी यावें तसें यश आलें नाहीं, तरी आस्थेनें व आग्रहपूर्वक सतत खासगी तऱ्हेनें व्यक्तिशः प्रयत्न करीत राहिल्यास त्यांत निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं, असें माझ्या मनानें घेतल्यामुळें, गेले सहासात महिने मी या उद्योगाचे मागें लागलों, पत्रव्यवहार सुरू केला व कित्येकांच्या प्रत्यक्ष गांठीभेटीही घेतल्या. यास यश कितपत आलें याचें प्रस्तुत पुस्तक हेंच समर्पक उत्तर होय.

माझा हा प्रयत्न म्हणजे स्वतःच्या घरच्या शिधासामुग्रीनें समारा-धना घालण्यासारखा नसून इतरांनीं तयार केलेलीं पक्वान्नें वाढणाऱ्या

वाढप्याच्या कामाप्रमाणेंच होय. पुण्यांत वाढपी पुष्कळ मिळतात असें म्हणतात. त्यांपैकींच मीहि एक असून लोकमान्यांच्या आठवणींचें हें बौद्धिक पक्वान्न महाराष्ट्र-जनतेस मी वाढीत आहें; किंवा असें म्हटल्यास अधिक शोभेल कीं, लोकमान्यांच्या निरनिराळ्या स्नेही लेखकांकडून मागितलेली आठवणींच्या लेखांची ही 'मधुकरी' एकत्र करून तिचें पवित्र भोजन महाराष्ट्र-जनतेस घालण्याचें मी हें काम करीत आहें. आणि खरोखरच मला मधुकऱ्याप्रमाणेंच अनुभव आले! ही मधुकरी मी मागत असतां, जाणूनबुजून न वाढण्याच्या इच्छेनें, समर्थ अशा किती तरी ठळक यजमानांनीं "थांबून या," "अजून तयार नाहीं," "आज एकादशी आहे," (अन्न आहे पण वाढावयाचें नाहीं) "तुम्ही कोण ब्राह्मणच का ?" (तुम्हास आठवणी जमविण्याचा अधिकार काय ?) असें नाना प्रकारांनीं हिणवून शेवटीं विन्मुख पाठविण्यासहि कमी केलें नाहीं! निराशेच्या उन्हाचे चटके घेत व अपमानाच्या तापलेल्या रस्त्यानें पाय पोळत, धांवपळ करीत खिशाची चौपदरी करून मी हिंडत असतां, कांहींनीं बोलाविलेल्या ठराविक वेळींहि त्यांजकडे गेलों तरी 'अजून अवकाश आहे.' (मजकूर देण्याचें ठरविलें नाहीं) अशी पाटी लावलेली. बरें, जरा उशिरां गेल्यास 'मधुकरी बंद.' (मजकूर देण्याची इच्छा नाहीं) म्हणून तीच पाटी उलटी करून ठेवलेली! हें पाहून जिवास फार खेद होई. लोकमान्यांच्या सर्व नव्याजुन्या, प्रसिद्ध-अप्रसिद्ध, लहान-मोठ्या अनुयायांच्या 'आठवणीं'चें पवित्र अन्न मधुकरीच्या रूपानें एकत्र करून त्याची महाराष्ट्र-वाचकवृंदास समाराधना घालावी, या शुद्ध बुद्धीनें मी प्रेरित झालों असतांहि मला त्यांत दुर्दैवानें पक्षपातीपणाहि दिसून आला. लोकमान्यांशीं कमीजास्त संबंध आलेल्या अशा सुमारें तीनशें सद्गृहस्थांस आपल्या आठवणी देण्याविषयीं मीं विनंति केली.

येथें येवढें सांगणें अवश्य आहे कीं, या बाबतींत पक्षभेद, जातिभेद किंवा दुसरे कोणतेहि क्षुद्र विकार मनांत न आणतां सरकारच्या बाजूचे, मवाळ, जहाल, ब्राह्मण, अब्राह्मण, सुधारक, दुर्धारक, राष्ट्रीय, प्रागतिक, सहकारी, असहकारी, प्रतियोगी, स्वराज्यवादी वगैरे सर्व मतांचे लोकांस,

तसेंच हिंदू, मुसलमान, पार्शी, ख्रिस्ती वगैरे जातींच्या स्त्रीपुरुषांस मी एकजात पत्रद्वारें व समक्ष विनंति केली; कारण लोकमान्यांचें मन व कार्यक्षेत्र समुद्राप्रमाणेंच विस्तीर्ण असल्यामुळें सर्वांशीं त्यांचा संबंध आलेला होता; व न जाणो, एखाद्यास माहीत असलेली लोकमान्यांच्या थोरवीची गोष्ट आपल्या दोषैक पक्षपातामुळें त्यास न विचारल्यानें ती अप्रसिद्ध ठेविल्याचें पाप आपणास लागेल, या भावनेनें मीं सरसकट सर्वांस विनविलें. सारांश, आठवणी मागितल्या गेलेल्या क्षेत्राची सीमा सांगावयाचीच झाल्यास मी एवढेंच सागतों कीं, इंग्लंडचे मुख्य प्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड, सर व्हॅलेन्टाईन चिरोल, लॅन्सबरी, बेनस्पूर, हॉर्निमन, ॲन्ड्र्यूज, अमेरिकेंतील संडरलंड, लालाजी, सरलादेवी, श्रद्धानंद, मालवीयजी, अल्लीबंधु, अजमलखान, सुरेन्द्र, रवीन्द्र, पालारविंद, दास, नेहरू, चिंतामणी, जगद्गुरू श्रीशंकराचार्य, खापर्डे, मुंजे, अणे, भांडारकर, केळकर, परांजपे, नेने, बॅप्टिस्टा, जयकर, वाच्छा, पेटिट, सेटलवाड, गोकुळदास पारख, मनमोहनदास रामजी, जिना, बमनजीशेट, पटेल, महात्माजी, खाडिलकर, देशपांडे, कौजलगी, बेळवी, राजगोपाळ, विजयराघव, व्ही. पी. माधवराव, बेझंट, सर सुब्रह्मण्य, शास्त्री, रंगास्वामी, सत्यमूर्ति, सरोजिनी वगैरेंपासून तों थेट लोकमान्यांचा कारकून, त्यांचा खास स्वयंसेवक, त्यांचा लेखक, त्यांचेजवळ फार दिवस असलेला त्यांचा गडी, त्यांचे बरोबरचा आचारी, घरांतील देवपूजा करणारा ब्राह्मण, त्यांचे मुलांचा खासगी शिक्षक, त्यांचा नेहमींचा वृद्ध कोचमन, फार काय पण त्यांस श्मश्रूचे वेळीं कधींहि दुखापत न केल्याबद्दल आपल्या हस्तकौशल्याची (!) तारीफ करणारा त्यांचा ठरीव कारागीर यांजकडूनहि आठवणी मिळविण्याचा मीं प्रयत्न केला आहे. असो; वर मीं म्हटलेंच आहे कीं, थोर पुरुषांच्या आठवणी लिहिण्याचें हें वळण आम्हास नवीन आहे; आणि याचा पुरावा म्हणजे असा कीं, अगदीं हाताचे बोटांवर मोजण्याइतक्या व्यक्ति वगळून, बाकीच्या सर्व सद्गृहस्थांस वारंवार विनवण्या कराव्या लागल्या. पैकीं स्थानिक मंडळीकडे चारचार, पांचपांच खेपा घातल्या व बाहेरगांवच्या लोकांपैकीं कोणास तीन, तर कोणास चार, तर कोणास चार किंवा कोणास पांच अशीं पत्रें पाठविल्याशिवाय त्यांजकडून उत्तरहि येऊं शकलें नाहीं. इतकेंच काय पण शेवटच्या पत्रांत उत्तरांकरितां तिकिटें

पाठवून जबाब नाहीं म्हणून पुनः पोस्टाचीं रिप्लाय कार्डें पाठविलीं तरी-सुद्धां उत्तर आलें नाहीं. अशीं किती तरी उदाहरणें पाहावयास सांपडलीं! मग मजकूर येण्याची गोष्ट कशाला? छापील पत्रानें अगत्य वाटत नाहीं म्हणून एक बोटभरही छापील मजकुराचें पत्र न पाठवितां सर्व पत्रें (एकंदर हजार-अकराशें) मीं जातीनें हातानेंच लिहिलीं होतीं. आरंभीं मीं मनांत अशी शपथ घेतली होती कीं, कोणीहि सद्गृहस्थ मजकूर पाठवीपर्यंत किंवा पाठविण्याचें नाकारीपर्यंत आपण त्यास पत्रें पाठवीत राहावयाचें; पण ही माझी प्रतिज्ञा व शपथ कर्नाटकाच्या एका प्रसिद्ध पुढाऱ्यानें मात्र मला मोडण्यास भाग पडलें, कारण त्यांस मीं एकंदर अकरा पत्रें पाठविलीं तरी उत्तरादाखल बोटभर चिठीहि त्यांस पाठविण्यास वेळ झाला नाहीं. म्हणून अखेर मीच शरमून त्यांचा पिच्छा सोडून दिला! कदाचित् त्यांस सदर विषयाचें तितकें महत्त्व वाटत नसावें अगर तें कार्य हातीं घेण्यास माझी अपात्रता त्यांस वाटत असावी, असेंहि कशावरून नसेल? म्हणूनच पत्रास साधें उत्तरहि देण्याची सामान्य रीत त्यांनीं सोडली असावी. पण उलट आश्चर्याची गोष्ट ही कीं, लोकमान्यांशीं फारसा संबंध न आलेल्या, उलट बाजूच्या, इतकेंच काय, पण कांहीं परद्वीपस्थ, गौरकाय गृहस्थांनीं त्यांस सर्वच प्रकरण नवीन असतांही—माझ्या पहिल्याच पत्रास त्यांनीं उत्तरें पाठविलीं. कांहींनीं मजकूर पाठवून दिला व कांहींनीं तर विलायतेचा प्रवास करीत असतां बोटींतूनच मजकूर रवाना केला! ज्यांचा लोक-मान्यांशीं विशेष संबंध अशा कांहीं ठळक जुन्या पुढाऱ्यांच्या आठवणी या पुस्तकांत नसल्याचें पाहून सदर थोर मंडळींस मीं कदाचित् विनंति केली नसेल असें पुष्कळांस वाटणें स्वाभाविक आहे. पण अहंकाराचा, बढाई मारल्याचा किंवा आत्मप्रौढीचा दोष वाचक माझे पदरीं न बांधतील तर, त्यांस मी माझे मनांतील एक गोष्ट अत्यंत नम्रपणें एकाच वाक्यांत सांग-ण्याची परवानगी मागतों. ती अशी कीं, माझ्या अल्प समजुतीप्रमाणें महा-राष्ट्रांतीलच काय, पण सबंध हिंदुस्थानांतील अशी ठळक एकहि व्यक्ति मजकडून सहसा सुटली नसावी कीं, जिचा लोकमान्यांशीं संबंध आलेला वाटला असतां मीं त्या व्यक्तीस आठवण पाठविण्याबद्दल कळकळीनें व

परोपरीनें विनंति केली नाहीं. मग घरच्या—पुण्या-मुंबईच्या—लोकांची गोष्ट कशाला ? पण सर्वांवर ताण म्हणजे मुंबईच्या एका प्रसिद्ध शास्त्रीपुत्र आधुनिक 'महा'विद्वानानें या बाबतींत माझे पत्रास उत्तर म्हणून हेवा-मत्सर-द्वेषादिकांचें बोडण भरून त्याचा मला पत्ररूप प्रसाद पाठविला. तो गुप्त रूपानें झांकून ठेवणेंच प्राप्त आहे. कारण त्याचा नुसता विषारी आस्वादहि मीं वाचकांस दिल्यास त्यांची मानसिक प्रकृति बिघडविल्याचें फुकट पाप मात्र मला माझे माथीं घ्यावें लागेल !! असो; पण याचे उलट या बाबतींत माझ्या प्रयत्नास आस्थापूर्वक सहानुभूति दाखविणारे मला कोणी भेटले नाहींत असें मात्र नाहीं. आतां असेंहि झालें कीं, कांहींची मजकूर पाठविण्याची तीव्र इच्छा असतांहि जमलें नाहीं. जुन्या व लोक-मान्यांशीं विशेष संबंधी अशा प्रसिद्ध पुढारी सद्गृहस्थांच्या आठवणी मिळ-विण्यावर माझा विशेष कटाक्ष होता. त्या मिळविण्याच्या लोभानें मीं त्यांस किती त्रास दिला व तो त्यांनीं कृपाळूपणें कसा सोसला याचें प्रत्यंतर धुळ्यांचे आमदार, सत्कार्योत्तेजक सभेचे चिटणीस व प्रसिद्ध श्रीसमर्थभक्त श्रीयुत शंकर श्रीकृष्ण देव, बी. ए., एल्एल्. बी., वकील यांच्या पुढील पत्रावरून वाचकांस पटण्यासारखें आहे. ते आपल्या ता. ५-५-२४ च्या पत्रांत म्हणतात. "तुमचीं एकंदर सहा पत्रें पोंचलीं. प्रसिद्ध करण्यासारख्या आठवणी लिहिण्याचें अखेरीस मला कांहीं साधलें नाहीं. तरी राग न मानावा. इलाज नाहीं. मला वाईट वाटतें. तरी मला क्षमा केली पाहिजे. आठवणींत सार्वजनिक बोध पाहिजे का लोकमान्यांचे स्वभावाचा विशिष्टपणा असावा याचा विचार केला; पण अखेर कांहीं साधलें नाहीं खरें. मीं लिहिण्याचा प्रयत्न केला, दहाबारा कागद लिहिले; पण त्यांत प्रसिद्ध करण्यासारखें, किंवा निराळें कोणास ठाऊक नाहीं असें कांहीं वाटलें नाहीं. म्हणून तें टिपण माझ्या घरांतच आठवणीसाठीं मुलांच्या हवालीं केलें. हें सारें सांगतों तें एवढ्याचसाठीं कीं, मीं बहुत प्रयत्न केला; पण मला साधलें नाहीं, म्हणून क्षमा व्हावी. वाईट वाटतें कीं, तुम्हास कांहीं काळ व्यर्थ त्रास मात्र मीं दिला. क्षमा करा."

शिवाय कौतुकाची व विशेष समाधानाची गोष्ट म्हणजे अगदीं अज्ञात व अनपेक्षित अशाहि कांहीं प्रेमळ गुणग्राही 'दात्यांनीं' आपल्या पायांनीं

चालून येऊन या संग्रहांत आपण होऊन आपला भिक्षांश अर्पण करण्याची कृपा केलेली आहे! येथें हेंहि सांगण्यास हरकत नाहीं कीं, कै. श्रीमती रमाबाई रानडे यांनीं तर लोकमान्यांच्या आठवणी लिहून देण्याचें मला उल्हासपूर्वक आश्वासन दिलें होतें; इतकेंच नव्हे तर कांहीं विशिष्ट प्रसंगीं न्यायमूर्तींस लोकमान्यांनीं पाठविलेल्या दोन पत्रांवर न्यायमूर्तींनीं स्वहस्तें लोकमान्यांचें केलेलें वर्णन मला सांगून तीं पत्रेंहि त्यांनीं मला देण्याचें अभिवचन दिलें होतें. पण कालानें अचानक ऐनजिनसीं त्यांसच आपल्या दुर्भर उदरांत गडप केल्यामुळें सर्वच बेत जेथल्या तेथें राहिला!

माझे मनांत नेहमीं असें येई कीं, आपल्या आटोक्याबाहेरच्या भलत्याच जबाबदारीच्या कार्यास आपण आतां एकदां हात घातला खरा. तेव्हां प्रयत्नाच्या दृष्टीनें आपण कसूर करतां कामा नये. काम करण्याच्या बुद्धीचें जें दुसरें लक्षण "प्रारब्धस्यान्तगमनं" हें आपण विसरतां कामा नये. म्हणून कांहीं ठिकाणीं आठ-आठ हेलपाटे पडले तरी शेवटीं मजकूर मागण्यास मी गेलों, तेव्हां देणेदाराचा तगादेदार भय्या पुरवला, पण ही व्यक्ति आतां येणें नको, असेंहि कांहींनीं कपाळास आठ्या घालून मला जाणविल्या-शिवाय सोडलें नाहीं! मनुष्य कार्यैक झाल्यावर तो आपला मूळ स्वभावहि कसा विसरतो, हें मी या वेळीं चांगलें शिकलों. हें सर्व येथें सांगण्याचें कारण इतकेंच कीं, लोकमान्यांच्या आठवणींचा संग्रह करणें हें मी खासगी काम समजत नसून तें एक मोठ्या जबाबदारीचें सार्वजनिक कार्य असेंच मानतों, आणि म्हणून त्या कामाचा, संक्षेपानें कां होईना जनतेस अहवाल सांगणें हें माझें कर्तव्य समजतों. हें कर्तव्य बजावीत असतां आलेल्या अनुभवांचा साग्र वृत्तान्त लिहिल्यास, अर्थात् या आठवणींच्या आठवणी लिहिण्याचें योजल्यास, खरोखरच त्यांचें एक स्वतंत्र मनोरंजक शें-पाऊशें पानांचें मजेदार पुस्तकहि बनूं शकेल!

येणेंप्रमाणें खासगी प्रयत्न मीं केला; पण तो मला अगदीं अपुरा वाटल्यामुळें पुनः एकवार महाराष्ट्र-जनतेस सदर गोष्टींचें ताजें स्मरण करून दिल्यास थोडेंबहुत तरी कार्य साधेल, या उत्कंठतेनें 'केसरी'च्या ता. २७ मे १९२४ च्या अंकांत मीं पुनः जाहीर विनंति केली; पण

केवळ अपवाद म्हणूनच कीं काय, फक्त एकच पत्र आलें व त्याचाहि व्हावा तसा उपयोग झाला नाहीं ! तात्पर्य, माझ्या माहितीप्रमाणें लोकमान्यांशीं कमीजास्त संबंध आलेल्या ठळक अशा बहुतेक सर्व सद्गृहस्थांस मीं खासगी पत्रें पाठवून व समक्ष भेटून मजकूर मिळविण्याचा आटोकाट प्रयत्न केला; व अज्ञान वा विस्मरण यामुळें ज्यांना खासगी तऱ्हेनें विनंति करणें अशक्य, त्यांना वर म्हटल्याप्रमाणें, केसरीद्वारां दोन वेळां जाहीर विनंतीहि केली. ह्यापेक्षां अधिक यशस्वी प्रयत्न करण्याच्या मार्गाची अचूक दिशा कोणीं मला दाखविल्यास मी त्याचा आभारी होईन.

या पुस्तकास 'लो. टिळकांच्या आठवणी ' एवढेंच सुटसुटीत व सार्थ नांव द्यावयाचें होतें; पण आठवणी पाठविणाराकडून येणारा मजकूर निव्वळ आठवणीच्याच स्वरूपाचा वाटेना, त्यास क्वचित् आख्यायिकेचें स्वरूप चढूं लागलें. तेव्हां त्याहि कल्पनेचा समावेश व्हावा म्हणून ' आख्यायिका " हा शब्द जोडणें प्राप्त झालें. लोकमान्यांसारख्यांचें चरित्र लिहिणें जशी थट्टा नव्हे तसेंच त्यांच्या आठवणी लिहिणें सावें काम नाहीं. या बाबतींत धुळ्याचे रा. शंकरराव देव आपल्या ता. १-४-२४ च्या पत्रांत म्हणतात " मीं विचार केला तों असें आढळून आलें कीं, त्यांच्या आठवणी, आपण म्हणतों खरें, पण त्या आपल्याच आठवणी होतात! म्हणून मला माफी करा, असें मी आपणांस लिहिणार होतों. पण आपलीं विलक्षण आग्रहाचीं पत्रें पाहून काय करावें, असा प्रश्न पडला. तेव्हां असें ठरविलें कीं, खासगी स्वरूपाच्या आठवणी मनांतल्या मनांत ठेवून लोकांना मार्गदर्शक होतील अशाच तेवढ्या द्याव्या; पण अशा आठवणी मला फारच थोड्या देतां येतील." याचप्रमाणें मुंबईचे श्री. दत्तो आपाजी तुळजापूरकर बी. ए., एल्एल्. बी., वकील यांनीं या बाबतींत मार्मिकपणानें प्रदर्शित केलेले विचार पुढे देत आहें. ते म्हणतात—

" मोठ्या माणसांच्या आठवणी लहान माणसांनीं लिहिणें म्हणजे बरीच सावधगिरी ठेवावी लागते. त्या लोकमान्यांच्या आठवणी आहेत, हें प्रथम लक्षांत ठेवलें पाहिजे. नुसत्या बाळ गंगाधर टिळक या व्यक्तीच्या त्या आठवणी नसून, ' लोकमान्य ' बाळ गंगाधर टिळक यांच्या त्या

आठवणी असल्या पाहिजेत. लोकमान्यांचें कांहींतरी वैशिष्टच त्यांत दिसून आलें पाहिजे; 'नाहीं तर लोकमान्यांना सुपारीचें व्यसन होतें. तें इतकें कीं, एकदां असा प्रसंग आला कीं, त्यांच्या खिशांतली सुपारी सर्व संपली होती आणि सुपारीची तल्लफ तर लागलेली. तेव्हां त्यांनीं मला हांक मारून माझेजवळची सुपारी मागून घेतली.' ही गोष्ट लोकमान्यांची आठवण म्हणून 'लोकमान्य माझ्याशीं बोलले' हें शाबीत करण्याच्या अनावर इच्छेनें सांगत सुटणाऱ्या भोळ्याभाबड्या, खुळचट किंवा स्वयंमान्य टिळकभक्ताबद्दल हंसूं आल्याशिवाय राहात नाहीं. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण किंवा रामचंद्र यांच्या जरी असल्या क्षुल्लक गोष्टी व्यास-वाल्मिकींनीं सांगितल्या असल्या तरी त्यांच्या भारत-रामयणादि ग्रंथांना त्यामुळें उलटा थोडासा कमीपणाच आला असता! ज्या कवितेंत काव्य नाहीं ती कविता कसली? ज्या आठवणींत लोकमान्यांची—आठवण—ओळख पटत नाहीं ती आठवण तरी कसली?

दुसरी गोष्ट म्हणजे मोठ्या माणसांच्या आठवणी सांगणारांना त्यांतच आपलें आत्मचरित्र गोवून देण्याचा मोह अनावर होत असतो. आठवणी म्हटल्या म्हणजे त्या एकांगी कधींच नसतात. त्यांत त्या सांगणाराचा कांहीं तरी संबंध येत असतोच. आत्मचरित्र कथन करण्याची पर्वणी सहज साधत असल्यास ती कोणाला नकोशी वाटणार? पण त्यांत तारतम्यबुद्धि न ठेवल्यास रसहानि होऊन लेखक स्वतःलाच उपहासास पात्र करून घेतो.

तसेंच आम्हाला लोकमान्यांच्या आठवणी पाहिजेत, आख्यायिका नकोत; कर्णोपकर्णी ऐकलेल्या लोकमान्यांसंबंधींच्या चार भल्याबुऱ्या गोष्टींची आम्हाला जरूर नाहीं. आख्यायिकेंत खऱ्याखोट्याचें मिश्रण इतकें बेमालूम झालेलें असतें कीं त्यांचें पृथक्करण करणें केवळ अशक्यच. असल्या आख्यायिकांच्या आधारावर कोणत्याहि मोठ्या माणसांचा स्वभाव वाटेल त्या स्वरूपाचा बनवितां येईल. 'टिळक हे शरीरानें एवढे धिप्पाड आहेत व शक्तीनें एवढे बलवान आहेत कीं, गर्दींतून जातांना लहानशा धक्क्यानें ते सहज दहापांच माणसांना कोलमडून पाडूं शकतात.' अशा तऱ्हेची त्यांच्याविषयींची आख्यायिका त्यांच्या हयातींतच खेडेगांवांतून पसरलेली पुष्कळांनीं ऐकली

असेल. पण एवढें कशाला ? 'केसरींतील अग्रलेख व स्फुट सूचना एकाच वेळीं ते लिहीत असत; म्हणजे दोन लेखक जवळ बसलेले असावयाचे, एकाला अग्रलेखांतील एक वाक्य सांगावयाचें व तें तो लिहीपर्यंत दुसऱ्याला स्फुट सूचनांतील मजकूर सांगावयाचा व पुन्हा: अग्रलेखाकडे वळावयाचें ! ' ही त्यांच्या असामान्य लेखनकौशल्याबद्दलची आख्यायिका शब्दश: खरी मानणारे सुशिक्षित वर्गांतहि वरेच लोक आढळून येत असत ! असल्या गोष्टी सत्याच्या कसोटीवर पारखून घेण्याची यातायात कोण करतो ?

आख्यायिका म्हणजे फुगीर किंवा खोलगट भिंगाच्या आरशाप्रमाणें असतात. त्यांत खरें प्रतिबिंब कधीं दिसायचेंच नाहीं. म्हणून आम्हास लोकमान्यांच्या आख्यायिका नकोत, आठवणी पाहिजेत.

आठवणी याचा अर्थच असा आहे कीं, त्या आठवून आठवून सांगाव्या लागतात. म्हणजे त्या केवळ सत्यस्वरूपी असल्या पाहिजेत. त्यांत सांगणारांची अन्योक्ति, वक्रोक्ति, किंवा दुसरी कोणतीहि 'उक्ति' ऊर्फ मखलाशी असतां कामा नये. लोकमान्यांची कृति किंवा 'उक्ति' जशी असेल तशीच जनतेपुढें आली पाहिजे. जशी 'असेल' तशी; 'दिसेल' तशी नव्हे; कारण पाहणारा ज्या रंगाच्या चष्म्यांतून पाहील त्या रंगाची ती त्याला दिसेल.'

आठवणी व आख्यायिका या बाबतींत मला तात्त्विक दृष्टया जें कांहीं म्हणावयाचें होतें तें माझे सन्मित्र श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनीं लिहून माझें काम हलकें केले याबद्दल मजवर त्यांचे उपकार आहेत. सदरहू पुस्तकांत आख्यायिकांच्या सदरांत पडेल असा फारच थोडा मजकूर असल्याचें दिसून येईल. कांहीं लेखकांच्या आठवणींत आख्यायिकांची थोडी छटा दिसू लागली म्हणून त्या सर्व मजकुरावर हात फिरविण्यापेक्षां त्यांचाहि परामर्ष घेतला जावा म्हणून 'आख्यायिका' हें सदर घालावें लागलें. मुद्रणाभिज्ञ श्री. रा. द. पंत पराडकर यांनीं आपल्या एका पत्रांत मला पुढीलप्रमाणें सूचना केली होती. "आठवणींच्या लेखनविस्ताराविषयीं व त्यांच्या प्रदर्शनपद्धतीविषयीं आपणास इतकेंच सुचवावेसें वाटतें कीं, व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रमाणातीत संकोच न करतां सर्वच आठवणी-लेखकांना, निदान मर्यादित तरी, स्वातंत्र्य बहाल करूनच आपण चालावें." स्नेहबुद्धीनें केलेली ही सूचना

डा. स्थलांतर चरित्र 50062 ८८० २८।११५७

अखंड लक्षांत वाळगूनहि व वयानें, ज्ञानानें व अधिकारानें सर्वच लेखक श्रेष्ठ असतांहि, केवळ पुस्तकाच्या आटपशीरपणाचे दृष्टीनें कांहींचे मजकुरास नाइलाजास्तव मला कात्री लावावी लागली, औचित्याचे दृष्टीनें कांहींच्या लेखांतील व्यक्तींचीं नांवें गाळावीं लागलीं, कांहींच्यामध्यें एकसूत्रीपणा राहावा म्हणून मजकूर मागेंपुढें करावा लागला वगैरे 'आगंतुक मुखत्यारी' बद्दल त्यांनीं मला क्षमा करावी अशी त्यांस प्रार्थना आहे. जातां जातां या बाबतींत सांगण्यासारखें एवढेंच कीं, लेखकांकडून जसा मजकूर आला तसा तो तारतम्य-बुद्धि व विवेचकपणा न चालवितां सर्वच मी जशाच्या तसा छापिला असता तर त्यास खास हजार-बाराशें पानेंहि पुरलीं नसतीं व तो एक नवलकथांचा अद्‌भुत अजबखाना, किंवा गोपाळकालाच बनला असता !

सदर पुस्तक अनेक दृष्टींनीं दोषपूर्ण आहे, याची जाणीव प्रकाशकाला नाहीं असें नाहीं; पण तें ठराविक मुदतीच्या आंत विशिष्ट दिवशींच, प्रसिद्ध व्हावयाचें असल्यामुळें, अल्पावधींत एकाच छापखान्यांत तें सर्व छापलें जाईल कीं नाहीं या शंकेमुळें, मजकूर हातास आला त्या क्रमानें पुस्तकाचे दोन भाग करून ते निरनिराळ्या छापखान्यांत छापून घेणें भाग पडलें, त्यामुळें नेहमीं-प्रमाणें ग्रंथाची पृष्ठसंख्या एकसारखी धांवती न राहतां, त्यामुळें उत्पन्न होणारें वैगुण्य पत्करून, दोनही भागांस स्वतंत्र पृष्ठसंख्या घालावी लागली. हें लक्षांत असावें कीं, पुस्तकाची हल्लींची रचना लोकमान्यांच्या चतुर्थ वार्षिक पुण्य-तिथीचा दिवस गांठण्याच्या केवळ घाईघाईनेंच झालेली आहे. वास्तविक विषयवार मजकूर छापून त्यांतून लोकमान्यांचें संगतवार सुंदर चरित्र खुलून दिसण्यास कांहींच हरकत पडूं नये; पण याला सर्व मजकूर आगाऊ हातीं असावा लागतो. तो तसा न आल्यामुळें, इतकेंच नव्हे तर शेवटपर्यंत मजकूर येत राहिल्यानें, जसा तो आला तसाच छापणें प्राप्त झालें. त्यांत पंक्तिप्रपंच किंवा लहानथोर असा भेद ठेविला गेला नाहीं; व एका अर्थानें लहानथोरांची सरमिसळ बैठक या पुस्तकांत घडली, हें हल्लींच्या या 'डेमॉक्रसी'च्या काळांत ठीक झालें असेंच वाटतें ! ज्यांनीं या आवृत्तींतच छापण्याकरितां आपल्या आठवणी देण्याचें कबूल केलें होतें, पण अनिवार्य अडचणीमुळें त्यांस तें शेवटीं जमलें नाहीं अशा कित्येक परप्रांतस्थहि थोर गृहस्थांच्या आठवणी, व ज्यांनीं ह्याच ग्रंथांत छापण्याकरितां आपल्या गोड आठवणी अगत्यपूर्वक लिहिल्या

पण त्या उशिरा हातीं आल्यामुळें व अदमासाबाहेर ग्रंथविस्तार झाल्यामुळें, आमच्या व वाचकांच्या सोयीकरितां आणि मुख्यतः ग्रंथ-प्रसिद्धीकरणाची वेळ विशिष्ट दिवशींच साधण्याच्या औचित्याकरितां येथेंच थांबून, घेतां आल्या नाहींत त्यांची क्षमा मागतों. त्यांच्या आठवणीहि ईशकृपेनें योग झाल्यास, द्वितीय खंडांत प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे.

शेवटचें काम म्हणजे हें पुस्तक वाचकांचे हातीं देण्यास जे कारणीभूत झाले त्या सर्वांचे अंत:करणपूर्वक आभार मानण्याचें. पूर्वी, निरनिराळ्या वर्तमानपत्रांतून, मासिकांतून व लोकमान्यांविषयीं प्रसिद्ध झालेल्या कांहीं लहानमोठ्या पुस्तकांतून ओघांत येऊन गेलेल्या त्यांच्या आठवणी त्या त्या लेखकांच्या व प्रकाशकांच्या 'मूक संमतीनेंच' सदर ग्रंथांत अवतरित केल्या आहेत, त्याबद्दल त्यांनीं मला क्षमा केली पाहिजे; तसेंच आग्रहाग्रहानें पत्रें लिहून व तोंडी विनंति करून ज्यांनीं आपला अमूल्य वेळ खर्ची घालून मजकूर पाठविण्याची कृपा केली याबद्दल मी त्या सर्व लेखकांचे मनापासून आभार मानतों. माझे मित्र श्री. वासुदेव कृष्ण भावे, बी. ए. उपसंपादक, केसरी, श्री. गोपाळ हरि ऊर्फ तात्यासाहेब धारप, असि. मॅनेजर केसरी मराठा, श्री. दत्तात्रेय विष्णु आपटे, बी. ए., मॅनेजर 'आनंदाश्रम', लोकसंग्रह छापखान्याचे मालक श्री. शंकर रामचंद्र ऊर्फ मामासाहेब दाते, बी. ए., व विशेषत: या कल्पनेच्या बाबतींत उपक्रमापासून माझे सहकारी असलेले श्री. काशीनाथ नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर बी. ए., (टिळक-महाराष्ट्र-विद्यापीठ) व मला उपकारबद्ध करणारे 'गीताबीज' कर्ते श्री. गजानन विश्वनाथ केतकर, बी. ए., एल्‌एल्. बी., उपसंपादक, केसरी-मराठा यांचें या कामीं मला सहाय्य नसतें तर पुस्तक प्रसिद्ध होणें कठीण होतें, एवढेंच म्हणून त्यांचें मी मन:पूर्वक आभार मानतों.

सर्वांत शेवटचे पण अत्यंत आदरयुक्त व कृतज्ञतापूर्वक आभार मानावयाचे ते श्री. तात्यासाहेब केळकर यांचे होत. पण या बाबतींत मी लिहीन तितकें थोडेंच होईल, इतकेंच म्हणून पुरें करतों. कारण या कामीं सर्वस्वीं सहानुभूति व मदत त्यांचीच आहे.

शेवटीं, महाराष्ट्रभूमीस 'स्वातंत्र्या' चें चुडेदान करून धन्य झालेल्या श्रीशिवछत्रपतींच्या पश्चात् त्यांची स्फूर्तिदायक आठवण करून

देणाऱ्या भगवान श्रीसमर्थांच्या शब्दांत थोडा फरक करून हल्लींच्या तत्सम परिस्थितींतील लोकांस पुढीलप्रमाणें आठवण करून देऊन मी हें लांबलेलें आत्मनिवेदन पूर्ण करतों.

**बलवंताचें आठवावें रूप। बलवंताचा आठवावा प्रताप॥**
**बलवंताचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं ॥ १ ॥**
**बलवंताचें कैसें चालणें। बलवंताचें कैसें बोलणें॥**
**बलवंताची सलगी देणें। कैसी असे ॥ २ ॥**

पुणें, केसरी ऑफिस,
टिळकजयंती,
आषाढ व. ६ शके १८४६

सर्वांचा नम्र सेवक,
**सदाशिव विनायक बापट,**
संग्राहक व संपादक.

# लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

## खंड १ यांतील आठवणी

लेखक : **सदाशिव विनायक बापट**

[लोकमान्यांचे 'लेखक'; केसरी, टिळक स्वराज्यसंघ, टिळक स्वराज्य-संघ स्मारक-ट्रस्ट या संस्थांचे एक सेवक व पुणें सार्वजनिक सभेचे चिटणीस]

(१) सन १९०३ सालीं लोकमान्यांस पाहण्याकरितां मी १४ वर्षांचा असतांना मुद्दाम विंचुरकरांचे वाड्यांत गेलों होतों. लोकमान्य ह. भ. प. भिंगारकरबुवांशीं बोलण्याचे भरांत होते. ते म्हणाले, "बुवा, होम-हवनाचे वेळीं स्थंडिलें कशीं घालावींत वगैरेबद्दलचें शास्त्र आहे; पण त्याचा शास्त्रीय व आधुनिक दृष्टीनें विचार केला तर त्यापासून कांहीं नवीनच शोध लागणार आहे. त्यावर मी येत्या गणेशोत्सवांत व्याख्यान देणार आहें." हें व्याख्यान झाल्याचें दिसत नाहीं.

(२) सन १९०३ सालीं सातारा येथें एके दिवशीं सकाळीं मी मंडईंत गेलों होतों. ते आंब्याचे दिवस होते. मोठे, रंगास व वासास उत्कृष्ट अशा आंब्याच्या त्या पाटीवाल्यानें स्वस्त आंबे सांगितले. "तूं हे लहान आणि हिरवे आंबे इतके महाग सांगतोस, हें रे कसें ?" असें मी त्याचे जवळच्या दुसऱ्या पाटीवाल्या घोंगड्यास विचारलें. तो म्हणाला, "होय, सर्वच बामण आहेत, मोठे आहेत, श्रीमान् आहेत; पण त्या पुण्याच्या टिळक बामणाची कोणास तरी सर येईल का ? तसं ह्ये महाराज आंब हैती !"

(३) परलोकवासी रा. ब. वामनराव कोल्हटकर यांच्या पौनर्भव ज्येष्ठ कन्येचा पुणें येथें मळेकरांचे वाड्यांत सन १९०३ सालीं विवाह झाला. त्या वेळीं पानसुपारीस लोकमान्य आले असतां, त्यांस जरा टोंचून वामनराव म्हणाले, "लग्नसमारंभाचे मुख्य वेळीं सर्व मंडळी जमली असतांना आपण कसचे येतां ?" लोकमान्यांनीं विनोदानें उत्तर दिलें, "अहो ! त्या वेळीं नवरदेवाऐवजीं माझें का प्रदर्शन करावयाचें होतें ? केव्हां तरी पानसुपारी घेतली म्हणजे झालें."

लोकमान्यांच्या लहानपणापासूनचे एक मित्र रावबहादूर लक्ष्मण मोरेश्वर ऊर्फ आण्णासाहेब देशपांडे, पुणें (पे. डु. डे. कलेक्टर) यांजकडून लोकमान्यांबद्दल कांहीं गोष्टी ऐकावयास सांपडतील म्हणून मी त्यांच्याकडे गेलों होतों. न्या० रानडे यांच्या चरित्राकरितां मुंबईचे रा. ठाकूर यांचे सांगण्यावरून सातारचे रा. ब. विठ्ठलराव पाठक मास्तर यांजकडे मी गेलों असतांना (ही हकीकत मागें मीं केसरींत दिलेली आहे) त्यांनीं त्या वेळीं रानडे यांजविषयीं अति प्रेमानें गोष्टी सांगितल्या, त्याचीच मला या वेळीं आण्णासाहेबांचे घरीं आठवण झाली. फरक इतकाच कीं, मास्तरसाहेब हे आपणा स्वतःमध्यें व न्यायमूर्तीमध्यें कांहींच फरक न मानून एका प्रभावळींतील आपण सारख्याच योग्यतेच्या मूर्ति आहोंत असें समजत; तसें मात्र आण्णासाहेबांचें दिसलें नाहीं. रानडे–टिळक यांच्या या दोघां रावबहादूर मित्रांत हा फरक तेव्हांच दिसून आल्याखेरीज राहिला नाहीं. इतकेंच नव्हे तर, अगदीं आरंभींच लोकमान्यांचा ‘ विभूति, असामान्य पुरुष, महात्मा ’ वगैरे शब्दांनीं रा. ब. आण्णासाहेब यांनीं त्यांचा उल्लेख केला; व ते म्हणाले, “ त्या वेळीं लहानपणीं हा (आम्ही बरोबरीचे असल्यामुळें एकमेकांस अरे–जारे म्हणत असूं व त्यास ‘बाळ’ असेंच आम्ही म्हणत होतों) पुढें एवढा मोठा लोकमान्य राजकारणी पुरुष होईल, असें जरी आम्हांपैकीं कोणासहि वाटलें नाहीं, तरी त्याची बुद्धिमत्ता पाहून ‘ हें कांहीं निराळेंच पाणी आहे ’ असें आमचे ध्यानांत आल्याखेरीज राहात नसे. ” लोकमान्यांस शोभतील असेच त्यांचे स्नेही रा. ब. आण्णासाहेब हे असल्यामुळें, अगदीं प्रांजलपणें ‘ बळवंतराव ! तुमचेपेक्षां आम्ही ऐहिक सुखाचे मागें अधिक आहोंत ’ असें त्यांस आपण नेहमीं म्हणावें, असेंहि त्यांनीं सांगितलें. कोणाचीं कांहीं बिंगें, दोष, हे अति परिचयाच्या व खेळीमेळींतील मनुष्यासच अधिक माहीत असावयाचे, हें लक्षांत आणून व अशांपैकींच एका पुरुषाचें लोकमान्यांबद्दलचें मत पाहून त्या थोर महात्म्याबद्दल अधिकच आदर कां वाटणार नाहीं ? लहानपणापासून आण्णासाहेबांचा व लोकमान्यांचा निकट स्नेहसंबंध असल्यामुळें, आण्णासाहेब म्हणतात, “ त्याचेसंबंधीं आतां काय काय म्हणून तुम्हास सांगावें ? ” असें म्हणून त्यांनीं मला दोन तास बरीच

माहिती सांगितली. पण तिच्यापैकीं फारच थोड्या गोष्टी येथें पुढें देत आहें.

(४) आण्णासाहेब म्हणतात, "आम्ही सुमारें १४।१५ वर्षांचे असूं. एके दिवशीं सायंकाळीं पर्वतीकडे फिरावयास आम्ही गेलों असतां सर्वांनीं धोंडे मारून आंब्याच्या कांहीं कैऱ्या पाडल्या. इतक्यांत आंबराईचा रखवालदार तेथें आला. आम्हां पोरांस त्यानें खूपच दम दिला; तेव्हां बाळ पुढें होऊन त्यास म्हणाला, "अरे, आंबराई कोणाची?" रखवालदार म्हणतो, "कोणाची म्हणजे? सरकारची." बाळ म्हणतो, "अरे सरकारचीच ना? तर मग सरकारची म्हणजे सार्वजनिक—आपणा सर्व रयतेची!" पण चिमुकल्या या बुद्धिमान पोराचा हा युक्तिवाद त्या अडाण्यास काय होय? तो ऐकेना; जास्तच खवळला. म्हणून अखेर त्यास आम्हीं चवली काढून दिली. तेव्हां त्यास बाळ म्हणतो, "अरे ही चवली तूं तरी खा, पण सरकारास मात्र देऊं नको!"

(५) "शाळाखात्याचे इन्स्पेक्टर व कर्नाटकांतील प्रसिद्ध गणिती म्हैसाळकर यांस एकदां कांहीं एक उदाहरण अडलें, म्हणून डेक्कन कॉलेजचे गणिताचे प्रोफेसर केरूनाना छत्रे यांजकडे आले. बाळ हा नानांचा 'पेटट्' (लाडका) असल्यामुळें ते त्यास लाडानें 'टिळक्या' म्हणत. नानांनीं म्हैसाळकरांस "त्या टिळक्याकडे जा; तो हें उदाहरण तुम्हास सोडवून देईल" असें सांगितलें, व त्याप्रमाणें बाळानें तें सोडविलेंहि! तेव्हांपासून नाना हे बाळास हें 'सूर्याचें पिल्लूं' आहे असें म्हणत! व आम्हा मुलांजवळहि नाना एकदां म्हणाले, 'त्या सूर्याच्या पिल्लाचा प्रभाव आतां नाहीं तुम्हाला कोणास कळणार; पण ऐन मध्यान्ह काळीं त्याचा प्रकाश कोणासहि सोसणार नाहीं,' हें लक्षांत ठेवा!"

(६) "१८७५–७६ सालीं मुंबईच्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्यें आम्ही असतां, तेथील गणिताचे प्रो. हॅथॉर्नथ्वेट यांनीं निवळ परीक्षा पाहण्याकरितां म्हणून एकदां मुद्दाम अति कडक घेतलेल्या गणिताचे परीक्षेंत काथवटे यांना पांच, व मला सात, असे मार्क मिळाले. सुमारें ५० मुलांना अगदीं शून्य मिळाले. फक्त धोंडो हरि आगाशे यांस मात्र ७० मिळाले व

बाळास ५५ मिळाले; पण एके दिवशीं बाळास हॅथॉर्नथ्वेट साहेबांनीं मुद्दाम बोलावून म्हटलें, "आगाशेपेक्षां तुम्हास मार्क जरी कमी मिळाले असले तरी तो केवळ तुमच्या निष्काळजीपणाचा व अव्यवस्थितपणाचा परिणाम आहे; पण तुमची गणितांतील एक प्रकारची सूक्ष्म व स्वतंत्र बुद्धि वाखाणण्यासारखी आहे यांत शंका नाहीं!" पुढें प्रो. साहेब त्यास म्हणतात, "केंब्रिज जर्नलमध्यें गणिताचे कांहीं कूट-प्रश्न आले आहेत. मीहि ते सोडविण्याचा प्रयत्न करतों, पण तुम्हीहि प्रयत्न करून पाहा." असें म्हणून त्यांनीं तें जर्नल त्याचेजवळ दिलें. घरीं येऊन बाळानें बैठक मारून सपाट्यासरशीं तें सर्व सोडवून त्यांस नेऊन दिल्यावर मोठे खूष होऊन प्रोफेसर-साहेब त्यास म्हणतात, 'Oh good chap! I never thought you were capable of solving them all in such an intelligent method! (शाबास! अशा स्वतंत्र बुद्धीनें तुम्ही हें सर्व सोडवाल असें मला वाटलें नव्हतें.)' पुढें पुढें या प्रोफेसर-साहेबांचे हातून बाळास शेंकडा ९५-९८ मार्क मिळत असत. एकदां तर सदर प्रोफेसर-साहेबांनीं आपल्या लाडक्या गणिती चेल्यास परीक्षेंत शंभरांपैकीं ९९$\frac{3}{4}$ मार्क दिले व भरवर्गांत त्याची त्यांनीं वाहवा केली!!"

(७) १९१५ सालीं पुणें येथें बॅ. बॅप्टिस्टा यांचे अध्यक्षतेखालीं बळवंतराव यांनीं राष्ट्रीय पक्षाचे विद्यमानें १५ वी प्रांतिक परिषद भरविल्यामुळें मवाळपक्ष चिडून गेला होता. याचा केवळ सूड म्हणून त्यांनीं कॉंग्रेसच्या घटनेप्रमाणें ही परिषद कायदेशीर भरली नसल्याचें निमित्त करून पुणें येथें शनिवार-वाड्यासमोर मंडप घालून सर होमी वाडियाचे अध्यक्षतेखालीं पुन: प्रांतिक परिषद भरविण्याचा येळकोट केला! ही दुही बरी नाहीं, कांहीं तरी समेट व्हावा म्हणून आण्णासाहेब म्हणतात, मी दोनहि पक्षांकडे जाऊन फार प्रयत्न केला. हरिभाऊ आपटे, सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी व फर्ग्युसन कॉलेजची मंडळी आणि मी मिळून समेटाची एक योजना तयार केली व ती बळवंतरावांस दाखविली व त्यांनीं ती मान्यहि केली. पण आश्चर्य हें कीं, बळवंतराव हट्टी, समेटास नेहमीं विरुद्ध (Uncompromising) म्हणून त्यांचें 'कानफाट्या' नांव पाडणाऱ्या व

तशा जगभर डांगोरा पिटणाऱ्या मवाळांनींच त्यांच्या गुरुबंधूंच्या केवळ हट्टानेंच हा समेट लाथाडून टाकला. तो असा—

पुण्याची स्थानिक सर्व प्रमुख मवाळ मंडळी आमच्या योजनेस बळवंतरावांप्रमाणें तयार झाली असतांहि, त्या वेळचे मिस्टर गांधी हे बळवंतरावांकडे येऊन म्होरकेपणानें आपणावर जबाबदारी घेऊन म्हणतात, "समेट होईल; नाहीं असें नाहीं! आमच्या सर्व प्रोग्रेसिव्ह पक्षातर्फे मी तुम्हांस असें सांगतों कीं, तुम्ही मात्र एक अक्षरहि बोलण्याचा हक्क न सांगतां व इतर कांहींहि चळवळ न करतां आमच्या मंडपांत येऊन बसण्याचें अभिवचन द्यावें; म्हणजे तुमचा डेलिगेशन फॉर्म आम्ही मंजूर करूं. शिवाय असें पाहा कीं, एकदां तुम्ही आलां म्हणजे तुमचा पक्षहि आल्यासारखें झालें व मग एकीहि झाली असें म्हणण्यास हरकत नाहीं!!" गांधींनीं बळवंतरावांसारख्या सिंहास अशा रीतीनें खिजविणें बरें नव्हतें; पण याचा परिणाम म्हणजे प्रांतिक परिषदच काय पण पुढें लगेच लखनौ राष्ट्रीय सभाहि मवाळांचे हातून घेऊन त्यांनीं आपलीशी केली. आण्णा-साहेब म्हणतात, "टिळक-गांधी यांच्या वरील समेटविषयक संवादाच्या सर्व नोट्स मीं त्या वेळीं घेऊन घरीं येऊन त्यांचा विस्तार करून सर्व लिहून काढल्या आहेत!"

(८) लो. टिळक ता. २६-१-१९०४ च्या केसरींत कांहीं एका प्रसंगीं लिहीत असतां म्हणतात, "लहान मनुष्य काय आणि मोठा काय प्रसंगविशेषीं निरनिराळ्या प्रकारचे व कधीं कधीं एकमेकांस विरुद्ध विचार प्रदर्शित करीत असतो. परंतु त्यामुळें त्याचीं तीं मतें कायमचीं होतीं, असें समजणें वेडेपणाचें होय. मनुष्याच्या शरीराप्रमाणें त्याचें मन हें नेहमीं उमेदींत असतें असें नाहीं. त्याच्या मनांत कधीं नाउमेदीची झांक येत असते......आयुष्याच्या हरएक क्षणीं मनुष्य जे बोलतो तें तो पूर्ण विचारांतींच बोलतो असें नाहीं; इतकेंच नव्हे तर त्याच मनुष्यास त्याच विषयावर जर सार्वजनिक तऱ्हेनें बोलण्याचा प्रसंग आला तर निराळ्या तऱ्हेनें तो बोलत असतो." मनुष्यस्वभावाचें हें वर्णन व मानवी मनाची ही विचिकित्सा किती खरी व यथार्थ आहे बरें? "अमकी अमकी (भिकार) गोष्ट करण्या-

करितां मी जन्मास आलों नाहीं" असे आत्मप्रत्ययाचे तेजस्वी उद्गार निदान २-३ वेळां तरी लोकमान्यांनीं काढलेले प्रस्तुत लेखकास माहीत आहेत. पण लोकमान्यांनीं आपल्या बरोबरीच्या नात्यास धक्का न लागावा व आपली जन्मादारभ्य विनयशीलता कलंकित न व्हावी म्हणूनच वरील उद्गाराच्या अगदीं थेट उलट उद्गार त्यांनीं काढल्याचें रा. ब. आण्णासाहेब यांचे पुढील सांगण्यावरून सहज कळून येतें. तुमचा खडतर तुरुंगवास, लोकनायकत्वाचें असिधाराव्रत वगैरेची स्तुति करून त्यांचे आम्ही जुने स्नेही त्यांचेजवळ बोलत असूं तेव्हां ते आम्हास म्हणत, "एकेक करूं लागलें—एकेक अंगावर पडलें—म्हणजे तें तें सर्व कोणीहि पुढें करूं लागतो, व माझेंहि असेंच झाले." कारण श्रीशिवाजीमहाराजांप्रमाणें 'I am not born a patriot (जन्मतः मी देशभक्त नाहीं).' हें तुम्ही लक्षांत ठेवा. अहो! तुम्ही यांत पडतां तर माझी खात्री आहे कीं, तुम्हीसुद्धां असेंच करतां. अक्षर घटविण्यास बसलें म्हणजे तें घटतें—जात्यावर बसलें कीं तोंडास ओंवी येतेच; त्यांत विशेष तें काय आहे?" पण लोकमान्यांची ही शालीनतेची शालजोडी जरा बाजूस सारली—अर्जुनाची दिव्य दृष्टि काढून मग विश्वरूपदर्शनाची कल्पना केली—म्हणजे मग "त्यांत विशेष तें काय आहे" हें प्रत्येकानें आपल्या मनाशीं पाहून घ्यावें.

(९) आण्णासाहेब सांगतात, "एकदां पुण्याचे कलेक्टर मि. कारमायकेल मला म्हणाले, 'इनॉक्युलेशनचे विरुद्ध टिळकांनीं केसरींत फार लिहिलें आहे. हें आम्हास बिलकुल खपणार नाहीं, असें त्यांस तुम्ही कळवा.' मीं त्यांस म्हटलें, 'साहेब, मी त्यांचा खासगी स्नेही; सरकारी बाबीविषयीं मीं त्यांस काय म्हणून विचारावें? आपणच त्यांस भेटीस बोलावून विचारा.' साहेब म्हणतात, 'आम्ही पाठविलेल्या पत्राचा ते अव्हेर करतील (He will disregard my letter and treat it with contempt).' हें ऐकून लगेच त्यांस मीं बजावलें, 'हें पाहा, यामुळेंच सर्व बिघडलें आहे. त्या माणमाविषयीं आपण निष्कारण गैरसमज करून घेतला आहे. क्वचित् खासगी नात्यानेंहि आपण आपल्या पट्टेवाल्याबरोबरहि त्यास निरोप पाठविला तरी तो येणारा आहे असा त्याचा निगर्वी स्वभाव आहे. आपण

एकदां याची प्रचीति तर पाहा. हें असो; पण आपण म्हणतां ते केसरीचे सर्व लेख मीं वाचले आहेत. त्यांत इनॉक्युलेशनचा कोठें संबंधहि नाहीं.' साहेब म्हणाले, 'तर मग माझेकरितां त्यांचें भाषांतर करून टिळकांस घेऊन तुम्हीच यानात?' अखेर हें त्यांचें म्हणणें मी मान्य करून घरीं येऊन भाषांतर करून बळवंतरावांस त्यांजकडे घेऊन गेलों, व तें सर्व साहेबांनीं वाचल्यावर त्यांत कोठेंच कांहीं वावगें नाहीं हें पाहून 'खोटा रिपोर्ट' करणारावर स्वारी आपणाशींच खूप कडाडली. नंतर बळवंतरावांचें व त्यांचें सुमारें दोन तास जगांतील राजकारणाबद्दल मोकळेपणें बोलणें झालें. एकदां तर बळवंतराव त्यांस म्हणाले, 'कल्पना करा; हल्लींसारख्या आमच्या देशस्थितींत माझे ठिकाणीं तुम्हीच जर आमच्या पत्राचे संपादक असतां, तर काय केलें असतें? आयर्लंडांत—फार काय स्कॉटलंडांत—स्कॉच एडिटर कसें लिहितो हें काय आम्ही पाहात नाहीं?' हें ऐकून तर साहेब बहाद्दर खूपच हंसूं लागले! दुसरे दिवशीं मला बोलावून साहेब म्हणतात, "Oh Mr. Deshapande, your friend is a gigantic intellectual man! I was certainly much pleased and even impressed with his cogent and attractive conversation of yesterday!"

(१०) रा. ब. आण्णासाहेब म्हणाले, "टिळकांचें नांव सरकारास अप्रिय म्हणून सरकारास भिऊन बळवंतरावांबद्दल उगाच खोटेंनाटें कांहीं तरी वारंवार सरकारास सांगण्याचें पाप व मोह अनेकांना आवरत नसे, हें मला माहीत आहे. पण मी बळवंतरावांचा लहानपणापासूनचा जिवलग स्नेही असून व हें सर्व साहेब लोकांस माहीत असूनहि पेन्शन घेईपर्यंत माझें केव्हांहि व कांहींहि नुकसान झालेलें नाहीं. याचें कारण माझ्या मतें इतकेंच कीं, सरळपणानें व सत्यपणानें सरकारास टिळकांचें अंतःकरण उघडून कोणीं दाखविलेंच नाहीं. सर्वांनीं त्यांचेविषयीं गैरसमज मात्र केला. मी पुणें येथें नोकरीवर असतां (हु. डे. कलेक्टर) एकदां कमिशनर मॉरिसन साहेब यांजकडून ऑफिसमध्यें घोडेस्वाराबरोबर मला पत्र आलें कीं, ताबडतोब असाल तसे मला येऊन भेटा. पण मी ट्रेझरी ऑफिसर असल्यामुळें 'तीन वाजेपर्यंत मला येथून हलतां येत नाहीं' असें मीं त्यांस लिहून पाठविलें. पुढें माझें काम संपल्यावर मी त्यांस भेटण्यास गेलों. सुमारें दीड तास

बोलणें झालें तें सर्व टिळकांचेविषयीं ! साहेब मला म्हणाले, " तुम्ही टिळकांचे स्नेही. सरकाराविषयीं तुमच्या टिळकांना इतका द्वेष कां ?" मीं म्हटलें, "साहेब, मोठा नाजूक विषय आपण काढला. माझ्यासारख्या नोकरास व आधींच दूषित ग्रह करून घेतलेल्या टिळकांचे स्नेह्यास आपण हें विचारलें नसतें तर फार बरें झालें असतें. पण आपण आतां विचारतांच तेव्हां सरळपणानें सांगणें माझें कर्तव्य आहे." असें म्हणून त्यांस निरनिराळ्या गोष्टी सांगून (आण्णासाहेबांनीं येथें बऱ्याच गोष्टी सांगितल्या; पण त्या देणें अशक्य आहे) उत्कृष्ट रीतीनें टिळकांचें म्हणणें, कशाचाहि विपर्यास न होऊं देतां, मीं त्यांस सांगितलें. नंतर ते म्हणतात, ' ना. गोखले तुमचे स्नेही आहेत ? त्यांस तुम्ही देशभक्त समजतां ? त्यांचे मार्ग तुम्हास कसे काय वाटतात ?' यांचींहि उत्तरें मीं अगदीं प्रांजलपणें मला जीं बरोबर वाटलीं तीं दिलीं. तरीहि पण साहेबबहाद्दरांचें समाधान येवढ्यानें होईना. म्हणून आणखी खोदून मला ते विचारतात, " त्या दोघांत तुम्हास विशेष कोण आवडतो व ते कां ? व टिळक राजद्रोही ठरले असतांहि गोखल्यांचेपेक्षां समाज त्यांचेच मागें इतका कां ? " याचींहि उत्तरें मीं स्पष्टपणें व सत्यास स्मरून त्यांस दिलीं व म्हटलें, " हे दोघेहि देशभक्त असले तरी टिळकांचेंच म्हणणें मला व जनतेस अधिक पटतें ! नंतर समाजाच्या अगदीं खालच्या थरापर्यंत टिळक सर्वांशीं मिसळून त्यांचीं सुखदु:खें तींच आपलीं सुखदु:खें ते कशीं मानतात, त्यांस सरकारनें राजद्रोही म्हटलें तरी लोकांच्या खऱ्या कल्याणाविषयीं नि:स्पृहपणें, धीटपणें व नि:स्वार्थबुद्धीनें सदैव झटणाऱ्या व निष्कलंक दानतीच्या त्या देशभक्तासच प्रजेनें डोक्यावर कां घेतलें वगैरे वस्तुस्थितीचें यथार्थ वर्णन करून त्यांस मीं सांगितलें; व शेवटीं म्हटलें 'साहेब, हें सर्व आपणास कसें काय वाटलें असेल तें असो. पण आपण विचारलें म्हणून सत्यास स्मरून, सरकारचीहि दिशाभूल न व्हावी म्हणून व टिळकांसहि माझेकडून अन्याय न व्हावा म्हणून मला जें योग्य वाटतें तें सांगितलें आहे. ' कदाचित् याचा परिणाम म्हणून पुढें एकदां टिळक-मॉरिसन यांच्या भेटींत झालेल्या त्यांच्या संवादावरून बळवंतरावांविषयीं त्यांचा ग्रह साफ बदलून उलट ते अनुकूल झाल्याचेंहि दिसून आलें !"

(११) आण्णासाहेब देशपांडे म्हणतात, "कोणावरहि आणि त्यांतल्या त्यांत सरकारी बड्या ऑफिसरावर तर आपली छाप पाडण्याची कला बळवंतराव यांस मोठीच अवगत होती यांत शंका नाहीं. १८९५ सालच्या कौन्सिलच्या निवडणुकीकरितां ते एक उमेदवार उभे राहिले होते. त्या वेळीं त्यांस सरकारी कांहीं खासगी कागदपत्र पाहण्याचें कारण पडलें. म्हणून त्यांचे स्नेही व त्या वेळचे म. भा. कमिशनरचे दप्तरदार रावबहादूर बाबासाहेब पेंडसे यांचेजवळ त्यांनीं ते पाहण्याची इच्छा दर्शविली. बाबासाहेब म्हणाले, 'साहेबांचें (जे. के. स्पेन्स—कमिशनर) तुमचेविषयीं मत बरें नाहीं. तेव्हां तुम्हास ते पाहण्यास मिळणें शक्य दिसत नाहीं.' बळवंतराव त्यांस म्हणतात, 'तुमचे हातून हें काम होत नाहींना ? साहेब देईल कीं नाहीं हें माझें मी पाहून घेईन.' असें म्हणून अगोदर साहेबांशीं एंगेजमेंट करून —भेटण्याची वेळ ठरवून, त्यांस भेटण्यास ते गेले व सुमारें अर्धा पाऊण तास दोघांचें बोलणें होऊन त्यांनीं अशी कांहीं साहेबबहादूरावर आपली छाप पाडली कीं, ते परत आल्यावर कमिशनरसाहेब आपल्या दप्तरदारास म्हणतात, " Oh, Mr. Pendse, Mr. Tilak seems to be an extraordinary, intelligent and very straightforward man. I don't know why he is condemned by the Government. Please give him all the necessary and available documents he wants. (काय हो पेंडसे ! मला तर रा. टिळक हा मोठा बुद्धिवान व अगदीं सीधा मनुष्य दिसतो. मग सरकारचा त्यांचेवर दांत कां ? त्यास हवे असलेले आपल्याजवळचे सर्व कागदपत्र त्यास द्या. )"

(१२) "तसेंच १९१६ सालीं बळवंतराव यांनीं होमरूल लीग स्थापण्यापूर्वी स्वराज्यावर व्याख्यानांची झोड उठविली. तेव्हां 'होमरूल' हा शब्द व्याख्यानांत न वापरण्याबद्दल त्या वेळचे पुण्याचे कलेक्टर मि. मौंटफर्ड यांनीं त्यांस सांगण्याकरितां आपले भेटीस बोलाविलें. उभयतांचें बरेंच बोलणें झालें. सदर भेटींत 'होमरूल' हा शब्द मी आज नुसता वापरतों आहें, इतकेंच काय पण लवकरच मी 'होमरूल लीग' अशीच संस्था स्थापणार आहे, असेंहि त्यांनीं त्यांस सांगण्यास कमी केलें नाहीं. पुढें सदर मौंटफर्डसाहेब यांनीं गव्हर्नरसाहेबांस या मुलाखतीचा रिपोर्ट केला. त्यांत ते म्हणतात. " Mr.

Tilak is very bold and a most reasonable man. He is a gentleman of no hide-and-seek policy. He does what he speaks and he always speaks frankly and openly. From the various reports at my disposal, I can say he seems to be a trusted and popular leader. ( टिळक मोठे धीट व समजूतदार गृहस्थ आहेत. वाटेल तशीं वळणें मारणारा तो मनुष्य नसून ते जें उघडपणें बोलतील तेंच ते करतील. लोकांचा विश्वास संपादन करून लोकमान्य असलेला हा पुरुष आहे. असें माझेकडील सर्व रिपोर्टांवरून मला दिसून येतें. )"

(१३) "पुढें गव्हर्नर विलिंग्डनसाहेब यांनीं त्यांस आपल्या भेटीस बोलाविलें. खुद्द स्वारीशीं गांठ पडल्यामुळें तर आपण त्यांचेशीं अधिकच स्पष्ट व सडेतोड बोलल्याचें, आण्णासाहेब म्हणतात, त्यांनीं आम्हास सांगितलें. गव्हर्नरसाहेब म्हणाले, "Well Mr. Tilak from this, I could clearly see that you mean to uproot the British Government by resorting to any unconstitutional and revolutionary means. ( या तुमच्या बोलण्यावरून वाटेल त्या गैरशिस्त व क्रांतिकारक मार्गानें ब्रिटिश सरकार येथून नाहींसें करावें अशी तुमची इच्छा दिसते )." टिळक सरळ व स्पष्टपणें म्हणाले "Yes Sir, If I could I would. But it is impossible, impracticable and even suicidal for us to follow such Irish methods in the present state of the country and therefore I must try my best in constitutionally but vehemently and desperately fighting with the Government to reach the goal (होय साहेब, हें शक्य असतें तर असेंच केलें असतें. पण हल्लींसारख्या आमच्या देशस्थितींत आयर्लंड करतें तसें आम्हीं करणें अशक्य, अव्यवहार्य व आत्मघातक होणार असल्यामुळें आम्हास सनदशीर मार्गानेंच पण अत्यंत आवेशानें व निकरानें सरकाराशीं झगडण्याखेरीज इलाज नाहीं)." सरकारी अधिकाऱ्यावर वरीलप्रमाणें छाप पाडण्याची बळवंतरावांची अलौकिक हातोटी असल्यामुळें, आण्णासाहेब म्हणतात, मी त्यांस वारंवार म्हणें कीं, तुमचे संबंधानें विनाकारण सरकार गैरसमज करून घेतें. तेव्हां तुम्ही सरकारी अधिकाऱ्यांत थोडे मिळाल-मिसळाल तर कोणाची

छाती आहे तुमचेविरुद्ध ब्र काढण्याची ? यावर ते म्हणाले, ‘ तसें करण्यानें ते आपला उपयोग मात्र करून घेतात ! व माझा सरकारनें तसा उपयोग करून घ्यावा याचे मी अगदीं विरुद्ध आहे. आवळा देऊन कोहळा काढणें हा सरकारचा उपजत स्वभाव आहे. म्हणून शहाण्यानें त्यास बळी न पडणें हें बरें. प्रसंग येतो तेव्हां आम्हीहि आवळयाचा मोबदला कोहळा काढण्यास असमर्थ आहोंत असें मुळींच नाहीं.’

(१४) “१८९५ सालच्या कायदेकौन्सिलच्या निवडणुकीकरितां बळवंतरावांबरोबर ( त्यांस प्रतिस्पर्धी म्हणून ) धोंडो शामराव ऊर्फ बाबासाहेब गरुड हे एक उमेदवार म्हणून उभे होते. रा. ब. बाबासाहेब पेंडसे हे कमिशनरांचे दप्तरदार असल्यामुळें त्यांचे वजनानें सर्व मामलेदार मंडळींचे मार्फत अधिक मतें मिळण्याचा विशेष संभव म्हणून पेंडसे यांची मदत घेण्यास एके रविवारीं दोन प्रहरीं रा. गरुड यांचे घरीं गेले, या वेळीं बाबासाहेब निजलेले होते. कर्मधर्मसंयोगानें बळवंतरावहि त्याच वेळीं तेथें आले. हें पाहून गरुड हे पेंडसे यांचे उशाशीं जाऊन बसले. बळवंतराव उठून मुद्दाम त्यांच्या पायथ्याशीं बसले. वास्तविक हे दोघेहि परस्परांचे व पेंडसे यांचेहि स्नेही. पुढें पेंडसे निजून उठतांच प्रथम त्यांस साहजिकच बळवंतराव दिसतांच बळवंतरावांनीं त्यांस नमस्कार ठोकला व निवडणुकीचे कामीं त्यांजकडून मदतीचें वचनहि घेतलें. तों गरुडांनीं गिल्ला करून म्हटलें, ‘ वाः हें काय ? मी येथें अगोदर आलेलों आहे. म्हणून बाबासाहेबांचेकडून वचन मागण्याचा हक्क माझा अगोदर आहे.’ तेव्हां बळवंतराव त्यांस म्हणतात, “ भारतीय युद्धाचे वेळीं अशाच रीतीनें श्रीकृष्णाची मदत मागण्यास आलेल्या अर्जुन-दुर्योधन-न्यायाचा तुम्हास विसर कसा पडतो ? ”

(१५) सन १९०४ सालीं सातारा हायस्कूलमध्यें मी (लेखक) सातव्या इयत्तेंत असतां मुखपृष्ठावरील लोकमान्यांच्या फोटोचीं एक्झरसाईज बुकेंच मी नेहमीं वापरीत असें. त्या वेळीं एकदां मुख्य डायरेक्टरसाहेब आमचे हायस्कूलमध्यें आले असतां आमचे वर्गांत ते आल्यावर त्यांची दृष्टि सहज माझे हातांतील त्या एक्सरसाईज बुकाकडे गेली. वर्ग पाहून ते परत गेल्यावर त्या वेळचे हेडमास्तर रावसाहेब हरि गणेश गोडबोले यांस डायरेक्टरसाहेबांनीं

टिळकांच्या फोटोचीं एक्झरसाईज बुकें इतःपर न वापरण्याबद्दल सक्त ताकीद दिली. म्हणून दुसरे दिवशीं मी शाळेंत येतांच हेडमास्तरसाहेबांनीं मला आपल्या खोलींत बोलावून नेऊन टिळकांच्या फोटोचीं माझीं सर्व एक्झरसाईज बुकें रद्द करून पुनः केव्हांहि तीं शाळेंत न आणण्याबद्दल मला त्यांनीं तंबी दिली. हें पाहून मला फार राग आला व मी तें न ऐकतां दुसरे दिवशीं मी नेहमींप्रमाणेंच तीं घेऊन शाळेंत गेलों. हेडमास्तरसाहेबांनीं तें पाहून उग्र रूप धारण करून तसें न करण्याबद्दल मला बरेंच दटावून सांगितलें. पण भलत्याच बाबतींत अधिकाऱ्यांच्या लागणाऱ्या स्वैर लहरीस बळी पडणाऱ्या आमच्या मोठ्या लोकांच्या मानसिक दास्याची व मनोदौर्बल्याची मला चीड येऊन त्यांचें न ऐकण्याच्या हट्टास मी पेटलों. अखेर मला शाळेंतून काढून टाकण्याचें ब्रह्मास्त्र सोडण्यापर्यंत मजल आली व त्यासहि मी तयार आहें, असें त्यांस दिसतांच त्यांनीं आपले घरीं बोलावून अगत्यानें व मोठ्या प्रेमळपणानें ते मला म्हणाले, “बापट ! ज्या टिळकांचे यःकश्चित् चित्राबद्दल तुम्ही इतका अभिमान बाळगतां ते प्रत्यक्ष—Tilak was my class-fellow and he is my colleague whom I sincerely respect and love deeply and even at present. पण काय करणार बाबा ! तूं टिळकांचा खरा भक्त असशील तर आमच्या लहानपणची एक गोष्ट मला आठवते ती तुला सांगतों. ती ऐकून टिळकांचें खरें अनुकरण कसें करावयाचें तें त्यावरून शिकशील. आम्ही डेक्कन कॉलेजमध्यें असतां एकदां व्हिक्टोरिया महाराणीचें उत्कृष्ट रंगीत चित्र आमचे खोलींत लाविलेलें आमच्या एका देशाभिमानी सोबत्यानें आमचे खोलींत येऊन तिटकाऱ्यानें फाडून टाकून 'आपल्या देशास गुलामगिरींत ठेवणाऱ्यांचीं चित्रें तुम्हास नित्य कशीं पाहवतात बुवा ?' असें म्हणत आमच्याकडे पाहात त्यानें तें पायाखालीं तुडविलें ! हें पाहून जवळच बसलेले टिळक थोडे हंसत पण फार गंभीरपणें त्यास म्हणाले, “अरे, त्या बिचाऱ्या निरुपद्रवी कागदानें तुमचें काय केलें आहे ? दारें लावून बंडखोरी करणें म्हणजे आपल्या मनाचा कमकुवतपणा व क्लैब्य दर्शविणें आहे. हिम्मत असेल तर सदाशिवरावभाऊ पेशव्यांप्रमाणें घण घालून लंडनचें तख्त फोडून पायाखालीं तुडविण्याची महत्त्वाकांक्षा धरा. निदान याच दिशेनें यावज्जन्म आपल्या यत्नांची शिकस्त

करण्याची आज मनानें तरी शपथ घ्या; तरच हें चित्र फाडण्याचा तुमचा आवेश मी खरा समजेन!" हेडमास्तरसाहेब मला म्हणतात, "मग बोल, आतां टिळकांच्या निर्जीव फोटोचीं एक्झरसाईज बुकें वापरण्याचा तूं हट्ट धरणार का टिळकांचे वरील तेजस्वी उद्‌गार तुला प्रिय वाटून त्यांचें तूं अनुकरण करणार?"

(१६) एके दिवशीं रा. वामनराव तळवलकर वकील यांचेकडे मी कांहीं कामानिमित्त गेलों असतां त्यांचेपाशीं गप्पागोष्टी करण्यांत त्यांजकडून लोकमान्यांविषयीं कांहीं गोष्टी ऐकल्या. (या गोष्टी म्हणजे केळकरकृत टिळकचरित्रांत चरित्रकारांनीं संक्षिप्त रूपानें वर्णिलेल्या लोकमान्यांच्या शाळेंतील शिक्षक म्हणून शिकविण्याच्या त्यांच्या पद्धतीचीच ही एक प्रकारें विस्तृत आवृत्ति आहे, यांत नवीन असें विशेष कांहीं नाहीं.) वामनराव म्हणतात, "मी न्यू इंग्लिश स्कूलमध्यें सहावींत किंवा सातवींत असेन. त्या वेळीं मला एक उदाहरण अडलें. तें मी प्रथम प्रो. भानू यांस विचारलें. त्यांनीं तें समजावून दिलें; पण मला समजलें नाहीं, म्हणून प्रो. कर्वे यांस विचारलें. त्यांनीहि तें समजावून देण्याचा प्रयत्न केला; पण माझी समज पडेना. पुढें ओकशास्त्री वर्गावर आले. त्यांस विचारलें. ते म्हणाले, 'अरे यांत रे काय? हें अगदीं साधें आहे' असें म्हणून त्यांनीं सांगण्याचा प्रयत्न केला; तरी माझेप्रमाणें इतरांचेहि डोक्यांत तें शिरेना. अखेर शेवटीं बळवंतराव वर्गावर आले. तेव्हां संकोच, भीति, लाज सोडून त्यांस मीं तें विचारलें. ते म्हणाले, 'फळ्याकडे जा.' आणि चमत्कार असा कीं, अशा कांहीं अद्‌भुत रीतीनें त्यांनीं तें उदाहरण मांडण्यास सांगितलें कीं, तें तसें मांडतां मांडतांच विजेप्रमाणें चमकन् माझे डोक्यांत प्रकाश पडून पुढील रीत करण्याचे आधींच मी आनंदानें 'हो, समजलें' असें म्हटलें. त्यासरशीं ते व वर्गांतील सर्व मुलें यांचा हंशा पिकला! पण हंशा संपण्याचे आधींच मीं उदाहरणाचें उत्तरहि फळ्यावर मांडून टाकलें!"

(१७) वामनराव म्हणतात, "अल्जिब्रा शिकविण्याचे बाबतींतहि त्यांचे असेंच. इतर शिक्षकांकडून मुलांची समजूत पटून तासांत २-४ उदाहरणेंहि संपण्याची मारामार; पण ही स्वारी वर्गावर आली म्हणजे काय त्यांचे

सांगण्यांत जादू असेल कळत नाहीं, त्यांनीं एकदां अशी कांहीं रीत सांगावी कीं, गुंतलेल्या दोऱ्याचें टोंक हातीं लागतांच मग तो जसा भराभर ओढावा तशी सर्वांस समान अशी एक रीत सांगून तासांत वीस-वीस बावीस-बावीस उदाहरणांचा त्यांनीं फडशा पाडावा ! असा चमत्कार अजूनपर्यंतहि कोणीहि गणिती प्रोफेसरानें दाखविलेला नाहीं, असें मी खात्रीपूर्वक म्हणतों!"

(१८) वामनराव सांगतात, 'बळवंतरावांनीं आम्हास युक्लिड शिकवितांना फळ्यावर आम्ही मुलांनीं मुद्दाम त्यांचा घोटाळा उडावा म्हणून ABC हीं नेहमींचीं अति परिचित अक्षरें न मांडतां कांहीं तरी Q F X अशीं मांडावीत. पण त्या बहाद्दरानें खुर्चीवर बसूनच मागें फक्त एकदां मान वळवून फळ्यावरील आकृति व तीं अक्षरें पाहावींत व हंसत उलट मुलांचाच घोटाळा उडवीत शेवटपर्यंत पुन: फळ्याकडे न पाहतां अति मजेनें आम्हास तो सिद्धान्त त्यांनीं बिनचूक समजावून द्यावा !'

(१९) दे. भाऊसाहेब लवाटे हेहि वामनरावांच्याच वर्गांत होते. भाऊसाहेब म्हणतात, "मी एकदां सर्व मुलांच्या आग्रहावरून, सर्वांच्या समजुतीप्रमाणें अतिशय अवघडांतलें अवघड म्हणून एक उदाहरण मुद्दाम टिळकांस वर्गामध्यें एकदम विचारलें. आज टिळकांची 'फजीति' होणार असें प्रत्येकास मनांत वाटलें. परंतु मी मोठ्या ऐटीनें बांकावरून उठून उदाहरण वाचून दाखविण्याचाच अवकाश तों ताडकन् एका घावानें जसा नारळ फोडावा त्याप्रमाणें त्यांनीं तें फळ्यावरूनहि न समजावून देतां तोंडानेंच सोडवून टाकलें. तेव्हां आम्ही सर्व मुलें अगदीं खजील झालों व हें प्रकरण कांहीं निराळेंच आहे, असें तेव्हांपासूनच मनांत आम्ही समजून राहिलों !!"

(२०) "कै. भिकाजीपंत हर्डीकर [पूना कॉलेजमधील प्रो. हर्डीकर यांचे वडील] म्हणून पुण्यास एक नि:सीम टिळकभक्त होते. घरांत अठराविश्वें दारिद्र्य नांदत असतांहि त्यांनीं आपली नि:स्पृहता व टिळकांविषयीं निष्ठा किती जाज्वल्य ठेवली होती हें अनेकांस माहीत आहे. १८९७ सालची गोष्ट. लोकमान्यांवर खटला होऊन मुंबईस त्यांस अखेर शिक्षा होणार असें ठरलें. त्याचे आदले दिवशीं टिळकांची सर्व ऋणानुबंधी मंडळी

गिरगांवांतील गोपाळ नारायण यांचे घरीं रात्रीं जमली होती. लोकमान्य एकटेच बाहेर गच्चीवर कांहीं विचार करीत हिंडत होते. इतक्यांत त्यांस काय आठवण झाली न कळे. ते एकदम आंत आले व म्हणाले, 'तुम्ही सर्व येथें आलांत; पण आमचे भिकाजीपंत कोठें दिसत नाहीत?' 'ते कसचे येतात!' असें कोणी बोललें हें ऐकून "आतांचे आतां केसरी ऑफिसमधून पैसे घेऊन येथें येण्याबद्दल त्यांस तार करा; अगर कोणी तरी आतांचे गाडीनें जाऊन त्यांस घेऊन या" असें लोकमान्यांनीं तेथील एकास सांगितलें. निव्वळ परोपकार व देशसेवा हाच भिकाजीपंतांचा धंदा असल्यामुळें त्यांचेजवळ मुंबईपर्यंतचेंहि भाडें नसणार, हें ओळखणाऱ्या लोकमान्यांच्या सर्वगामी मनाची व आपल्या एकनिष्ठ भक्ताची उपेक्षा न करण्याच्या स्वभावाची किती तारीफ करावी? "नुपेक्षी कदा बाळ भक्ताभिमानी।"

(२१) "आमच्या शाळेंतील सर्व शिक्षक मंडळींमध्यें टिळक हे अगदीं साधेभोळे, आपला धंदा बरा कीं आपण बरे, अगदीं नाकासमोरच चालणारे, फक्त पंतोजीचेंच काम त्यांनीं करावें, अशी त्यांचेविषयीं सर्वांची त्या वेळीं समजूत होती. पण हा समुद्र जोंपर्यंत खवळला नाहीं तोंपर्यंतच त्याची ती शांति पाहण्यासारखी असे. एकदां शाळेंतील काशीनाथ व बाळा या दोन शिपायांनीं शाळेंत चोरी केली. टिळकांस मनुष्याची परीक्षा विशेष असे, हें त्या वेळींहि बरेच जणांस माहीत होतें. शिवाय काहीं कारणांमुळें त्यांचा त्या उभयतांवर पक्का वहीम होता. अखेर गुन्हे पकडणाऱ्या एखाद्या निष्णात् पोलिस अधिकाऱ्याप्रमाणें त्यांनीं त्याचा छडा लावून वरील दोनहि शिपायांस अचानक मुद्देमालासह पकडलें! चोरी केल्याचें कबूल करा व जन्मांत पुनः असें पाप करणार नाहीं, अशी पांडुरंगाची शपथ घ्या म्हणजे सोडून देतों, असें त्यांनीं त्यांस प्रथम मऊपणाच्या समजुतीनें पुष्कळ सांगितलें पण उलट ते उडवाउडव करूं लागले हें पाहून मग मात्र टिळकांनीं नारसिंहावतार धारण केला. शाळेच्या—गद्रेवाड्याच्या गच्चीवरून—तिसरे मजल्यावरून त्या दोघांस त्यांनीं व आगरकरांनीं वेताच्या छड्यांनीं शनिवारमारुतीपर्यंत एकसारखें मारीत-फोडीत नेलें व तेथें चौकींत त्यांस पोलिसचे हवालीं केलें! लोकमान्यांचें न्यायनिष्ठुर व कठोर हृदय येथें दिसून आलें, पण त्याचबरोबर कुसुमापेक्षांहि त्यांच्या मृद्वंतःकरणाची साक्ष पुढील गोष्ट स्पष्ट

पटविते. उपरिनिर्दिष्ट शिपायांवर नंतर खटला होऊन त्यांस शिक्षा व दंड करण्यांत आला, ही गोष्ट टिळकांस कळतांच मुद्दाम आगरकर यांस न कळवितां, त्यांनीं आपल्या पदरची त्या दोघांच्या दंडाची रक्कम बिन-बोभाट शाळेच्या त्यांच्या विशेष आवडीच्या कारकुनाबरोबर ताबडतोब दोघांहि शिपायांच्या घरीं पोंचविण्याची व्यवस्था केली व पुढें राहिलेला अर्ध्या महिन्याचा पगार रीतसर ऑफिसमधून घेऊन जाण्याबद्दल त्यांच्या बायकांस लेखी कळविण्यास कारकुनास त्यांनीं सांगितलें !

(२२) विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या पिढींतील मंडळींपैकीं आतां पुण्यास फारच थोडे लोक विद्यमान आहेत. सुदैवानें रावसाहेब कोंडोपंत-दादा छत्रे हे एक त्यांपैकीं होत. त्यांजकडे परवां मी गेलों असतां त्यांचेपाशीं गप्पागोष्टी करण्यांत गेलेला काळ हा कित्येक दिवस जुना इतिहास वाचण्यांत जाणाऱ्या वेळेपेक्षां किती तरी पटींनीं लाभदायक झाला, यांत शंका नाहीं. दादासाहेबांनीं अगदीं नवीन अशा व मजेदार पण महत्त्वाच्या किती तरी गोष्टी मला सांगितल्या. पण त्या केवळ व्यक्तिविषयक असल्यामुळें त्यांचा उपयोग करतां येत नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. लोकमान्यांविषयीं त्यांचें प्रेम, त्यांच्या बुद्धीविषयीं, धैर्याविषयीं, स्वार्थ-त्यागाविषयीं व मुख्यतः त्यांच्या शुद्ध आचरणाविषयीं त्यांनीं काढलेले उद्‌गार खरोखरच मननीय होत. पण तेहि विस्तारानें सांगत बसत नाहीं. कोंडोपंत-दादांच्या आठवणी शाबूत आहेत; पण त्या ठसका लागण्याइतक्या अति तिखट आहेत. त्या सांगण्याची अगदीं सोय नाहीं ! फक्त मासलाच म्हणून अत्यंत सौम्य अशी एकच आठवण सांगून पुरे करतों. ते म्हणाले, "आम्ही कॉलेजमध्यें होतों. त्या वेळीं माधवराव रानडे यांनीं वक्तृत्वोत्तेजक सभा स्थापण्याचे आधीं कांहीं दिवस वक्तृत्वास उत्तेजन देण्याकरितां समारंभ केला. बक्षिसेंहि ठेविलीं होतीं. बुधवारांतील आनंदोद्‌भव नाटक-गृहांत हा समारंभ झाला. 'सामाजिक सुधारणा यशस्वी कशी होईल ?' असा एक विषय होता. त्यावर एक उमेदवार—तेहि हल्लीं हयात असावेत—बोलावयास उठले. खरोखरच त्यांनीं विषय फारच उत्कृष्ट रीतीनें मांडला. पण सामाजिक सुधारणेचे म्होरके—म्हणजे माधवरावजी, भांडारकर, तेलंग वगैरे मंडळी—यांच्या बोलण्यांतील आणि कृतींतील जमीनअस्मानाच्या

विरोधाचें त्यांनीं निर्भीडपणें वर्णन करून त्यामुळेंच सुधारणा कशी मागें हटत आहे, याचें विवेचन ते करूं लागले. त्या वेळीं थिएटरमध्यें विलक्षण खळबळ उडाली. माधवरावजी वुइंगमध्यें बसलेले होते. त्यांनीं त्या वक्त्यांस 'बस करा, पुढें बोलूं नका, पुरें करा, अजून संपविलें कीं नाहीं?' वगैरे शब्दांनीं दटावण्यास सुरुवात केली. आम्ही—टिळक व मी—तिसरे मजल्यावर बसलों होतों व तेथून हें सर्व पाहात होतों. तेव्हां सिंहाप्रमाणें गर्जना करून टिळक मोठ्या कर्कश आवाजानें ओरडून म्हणाले कीं, 'नाहीं, हें बरें नाहीं. त्यांस बोलूं द्या. रावसाहेब! आपण मध्यें वक्त्यास अडथळा करूं नका.' या त्यांच्या विलक्षण मोठ्या आवाजानें थिएटर हादरून गेलें व त्यांच्या म्हणण्याचा प्रतिध्वनि चोहोंकडून उठूं लागला!! पुढें दुसरे दिवशीं टिळकांनीं केलेला हा प्रकार फार वाईट व मर्यादा सोडून केला याबद्दल त्यांनीं रावसाहेबांची माफी मागावी, असें बोलणें सुरू झालें. व आमचे तीर्थरूप नाना यांस कृष्णशास्त्री चिपळूणकरांचे घरीं बोलावून व तेथें आरोपी म्हणून आम्हां उभयतांस बोलावून त्यांचेपुढें आमच्या खटल्यास सुरुवात झाली व झालेल्या प्रकाराबद्दल आम्ही—मुख्यतः टिळक यांनीं रावसाहेबांची माफी मागावी, अशी या 'कोर्टानें' शिक्षाहि दिली! पण टिळकांनीं मोठ्या धैर्यानें व चातुर्यानें आपली बाजू त्यांचेपुढें मांडून त्यांची अशी खात्री पटविली कीं, अखेर शेवटीं शास्त्रीबोवाच म्हणाले, "या मुलांचेहि म्हणण्यांत निःसंशय पुष्कळच अर्थ आहे." सुदैवानें नानांसहि तसेंच वाटलें, म्हणून त्यांनीं माफीचा नाद सोडून दिला! उलट रावसाहेबांचे अंगावरच हडसून-खडसून बाजू उलटवून त्यांनींच खेद प्रदर्शित करावा, हा टिळकांचा मनोदय, आम्ही लहान असल्यामुळें, पूर्ण होणें अगदी अशक्यांतलें अशक्य असलें तरी त्यांचें धैर्य, बुद्धिमत्ता, वकिली व सच्चेपणा वगैरे लोकोत्तर गुण तेव्हांच सर्वांस कळून चुकले!

(२३) विधात्याच्या या अगाध सृष्टिरचनेच्या गूढ तत्त्वांचें संशोधन करण्यांत किंवा आधिभौतिक शास्त्रांची मर्यादा अधिक विस्तृत करण्यासारखें प्रचंड कार्य करण्यांत वास्तविक लोकमान्यांचें आयुष्य खर्च व्हावयाचें. कारण मूळ अशा गोष्टींकडेच त्यांच्या बुद्धीचा ओढा असे;

पण देशाच्या पारतंत्र्यामुळें केवळ प्राप्त कर्तव्य म्हणून त्यांच्या इच्छे-विरुद्ध त्यांस राजकारणाच्या रेंघ्यांत पडावें लागलें, हें पुढील गोष्टीवरून स्पष्ट होतें. एकदां दे. भाऊसाहेब लवाटे यांचे बोलण्यांत पुढील दोन गोष्टी आल्या—" गणपत्युत्सव होता. श्रीमंत विंचुरकरांचे वाड्यांत श्रीगजाननापुढें बळवंतरावांचेंच व्याख्यान व्हावयाचें होतें. मंडपांत अगदीं चिकार गर्दी उडून राहिली. व्याख्यानाची वेळ होऊन गेली, तरी बळवंतरावांचा पत्ता नाहीं. शेवटीं प्रो. जिनसीवाले त्यांस पाहण्यास—बोलविण्यास—गेले, तों स्वारी आपल्या माडींत ज्योतिष व भूस्तरशास्त्राच्या पुस्तकांत इतकी गर्क होऊन गेली होती कीं, तेथें जिनसीवाले आले तरी त्याची त्यांस शुद्धि नाहीं! अखेर प्रोफेसरसाहेब त्यांस म्हणाले, "अहो! उठा, चला खालीं आतां. समाधि हलवा! तिकडे लोक कंटाळूं लागले आहेत." हें ऐकून त्यांस बळवंतराव म्हणतात, "भय्यासाहेब! या आनंदांतून बाहेर पडणें जिवावर येतें! पण काय करणार? चला बुवा! खरोखर अशा ग्रंथाच्या सहवासांतच माझा जन्म जावयाचा, त्यांतच मला परमानंद वाटतो. पण या दुर्दैवी देशाच्या पायांतील पारतंत्र्य-शृंखला कायम ठेवून तो आनंद मी उपभोगणें पापमूलक अतएव ' यो भुंक्ते स्तेन एव सः ' होय; यांत शंका नाहीं. चला बुवा, प्रथम कर्तव्य हें केलेंच पाहिजे!"

(२४) "श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या कानावर आमच्या भरभराटत चाललेल्या शाळेचा लौकिक गेल्यामुळें त्यांसहि एकदां ही शाळा पाहावी अशी इच्छा झाल्यामुळें ते शाळा पाहण्यास आले. प्रि. आपटे हे त्या वेळीं शाळेचे सुपरिन्टेंडेंट होते. आपट्यांची ती टापटीप, ती व्यवस्था काय वर्णावी? सयाजीराव महाराज शाळा पाहून बहुत खुष झाले असले पाहिजेत. त्यांनीं जातांना आम्हा मुलांस दोनशें रुपये केवळ खाऊकरितां म्हणून दिले. आम्हीं सर्व मुलांनीं आम्हास दिलेली ही देणगी खाऊकरितां न खर्चतां त्याच सालीं मुंबईस भरणाऱ्या राष्ट्रीय सभेस द्यावी असें ठरविलें. पण हें आम्हीं ठरवून काय उपयोग? त्यास सुपरिन्टेंडेंटांची संमति पाहिजे, पण त्यांस हें पसंत नाहीं अशी आम्हास आंतून कुणकुण लागल्यामुळें आम्हीं सर्व मुलांनीं पुष्कळ सह्यांचा एक जंगी अर्ज तयार केला व आम्ही दोघे-

तिथे त्यांचे प्रतिनिधी म्हणून मधल्या सुटींत सुपरिन्टेंडेंटसाहेबांचे खोलींत जरा भीत भीत अर्ज घेऊन गेलों. प्रि. आपटे यांस तें सर्व नापसंत होतें म्हणून प्रथमच रागावून ते म्हणाले, " I shall catch the ring-leaders of this movement and certainly drive them out of the school." हें ऐकून मुकाटचानें आम्ही परत आलों; व त्याच रात्रीं नारायण पेठेंत मांडे यांचे वाडयांत बळवंतराव राहात होते तेथें त्यांस भेटण्यास गेलों. जेवण आटोपून मुकटा सोडून स्वारी नुकतीच बाहेर ओटीवर येत होती तों आम्ही त्यांस भेटलों. पण प्रि. वामनराव आपटे काय म्हणाले हें त्यांस न सांगतां आम्ही आमचा मूळ उद्देश त्यांस निवेदन केला. तेव्हां ते म्हणाले, "अरे! तुमच्या मनांत असलेच विचार यावेत व देशोद्धार करण्यास तुम्हीं प्रवृत्त व्हावें म्हणूनच तर आम्ही ही शाळा काढली आहे. तुम्ही मुलांनीं जें योजलेंत तें फार उत्कृष्ट आहे." पण त्याच वेळीं गद्रे यांचे वाडयांत आपटे-टिळक वगैरे मंडळींचें थोडें बिघडत चालल्याचें आम्हा मुलांचेहि कानीं येत असल्यामुळें त्यांत आमच्या कृत्यामुळें आणखी भर पडूं नये म्हणून आम्ही पुन: बळवंतराव यांस भेटून आपटे काय म्हणाले तें त्यांस सांगितलें. त्यावर ते म्हणतात, "आपटे सुपरिन्टेंडेंट आहेत. ते जर तसें म्हणत असतील तर अलबत त्यांचें तुम्हीं ऐकिलेंच पाहिजे, व शिस्त ही सांभाळलीच पाहिजे !"

(२५) केसरीच्या जन्माचे पूर्वीं टिळक-पंचायतनाशीं परिचित असलेले रा. बळवंत गणेश दाभोळकर यांजकडे मी परवां गेलों असतां त्यांनीं सांगितलेल्या कांहीं गोष्टी पुढें देत आहें. रा. दाभोळकर हे केसरी निघण्याचे आधीं कै. विष्णुशास्त्री यांचेकडे नोकर या नात्यानें असून ते त्यांचीं प्रुफें वगैरे पाहण्याचें काम करीत असत. पुढें केसरी-मराठा काढण्याचें ठरल्यावर त्यांची त्या कामाकडे योजना करण्यांत आली. रा. दाभोळकर सांगतात :— (१) "त्या सर्व मंडळींत प्रत्यक्ष काम उरकण्याचे बाबतींत व प्रथम काय तो विचार करून मग एकदां पूर्ण विचारांतीं डोक्यांत घेतलेलें काम सिद्धीस नेण्याचे बाबतींत टिळक फार जबरदस्त असत. त्या वेळीं मोरोबादादांचे वाडयांत तिसरे मजल्यावर रात्रीं ते आपल्या

मंडळींत वादविवाद करीत. तेव्हां विषय प्रतिपादन करतांना ते सहज एवढ्या मोठ्यानें बोलत कीं, त्यांचा तो आवाज आम्ही नातूंचे हौदावर बसून कित्येक वेळां ऐकिलेला आहे! (२) केसरीचा व मराठ्याचा पहिला अंक पुण्यांतील लोक निजून उठण्याचे आंत वर्गणीदारांचे घरीं जाऊन पडला पाहिजे म्हणून, माधवराव नामजोशी, गणेश मोरेश्वर सोहोनी (मॅनेजर), त्र्यंबकराव कुळकर्णी (न्यू स्कूलचे पहिले कारकून), मी व स्वतः टिळक यांनीं मोठ्या पहांटे उठून, अंकांचें ओझें वागवून, कोणाच्या खिडकींतून तर कोणाचे दरवाजाच्या फटींतून तो आंत टाकून सर्व अंक वांटलेले आहेत! (३) केसरीचे तीन हजार वर्गणीदार होईपर्यंत वर्गणीदारांचे पत्ते न छापतां दर आठवड्यास, बी. ए. होऊनहि सरकारी नोकरीविषयींच्या तिटकाऱ्यानें कोतवालचावडीजवळ स्टेशनरीचें दुकान घातलेले प्रो. धारप, मी स्वतः, व खुद्द टिळक असे तिघे बसून ते सर्व लिहून काढीत असूं! (४) पहिल्यापासूनच टिळकांची गति सर्व कांहीं विषयांत चाले. केसरी प्रथम दोनतीन वर्षें घुबडी प्रेसवर (त्या हँडप्रेसवर घुबडाचें चित्र असल्यामुळें त्यास घुबडी प्रेस असें नांव पडलें होतें) काढून पुढें वर्गणीदार एकसारखे जोरानें वाढत चालल्यामुळें त्याकरितां विलायतेहून एक नवीन यंत्र आणिलें; पण पुण्यांत तें बसविणार कोण? अखेर टिळकांनींच तें बसविलें! यामुळें त्यांचे हात, पाय, सर्व अंग व कपडे सदैव काळे झालेले असत. म्हणून त्यांचे सहकारी त्यांस थट्टेनें "हे आमचे प्रेसमन आहेत" असें म्हणत! (५) शास्त्रीबुवांचे हयातीपासून मी आरंभीं थोडे दिवस कंपॉझिटरचे व पुढें प्रूफ-करेक्टरचें काम करीत असे. शास्त्रीबुवा जो मजकूर लिहून छापण्यास देत तो—वेलांटी, मात्रा, अनुस्वार, विरामचिन्हें यांतहि बिलकुल खोडाखोड न करतां—अगदीं छापील अक्षराप्रमाणें—नेहमीं लिहून देत. ही त्यांची शक्ति अगदीं अपूर्व असे. अगदीं याचे उलट आगरकरांची 'कॉपी' आली म्हणजे त्यांत ब्रह्मांड खोडलेलें व सर्व गिचमिड झालेलें असावयाचें. शास्त्रीबुवा व आगरकर या दोन टोंकांचा मध्यबिंदु म्हणजे टिळकांचा लिहिण्याचा मासला मानण्यास हरकत नाहीं."

(२६) श्रीरामदासस्वामी यांस 'समर्थ' ही पदवी प्रथम कोणीं दिली या पृच्छेस समर्पक उत्तर जरी अजून मिळत नसलें तरी अर्वाचीन राम-

दासांच्या—टिळकांच्या—' लोकमान्य ' या पदवीवर आपल्या कल्पनाजनकत्वाचा हक्क सांगणारे मोठ्या अहमहमिकेनें पुढें येत आहेत. सन १९०५ मध्यें बळवंतराव यांस ' लोकमान्य ' ही पदवी स्वयंस्फूर्तीनें प्रथम माझेच लेखणींतून माझे ' भाला 'पत्रद्वारें दिली गेली असें भालाकार दे. भा. व. भोपटकर हे मोठ्या कौतुकाभिमानानें नेहमीं सांगत असतात, तर रा. बळवंतराव दामोळकर म्हणतात " १९०५ चे पूर्वी एक तप—१२ वर्षें—म्हणजे सन १८९३ मध्येंच ' धर्म आणि मीमांसा—नैसर्गिक धर्म व भौतिकधर्म ' हें पुस्तक मी बळवंतरावजींस अर्पण केलें त्या वेळीं अर्पणपत्रिकेंत गौरवपूर्वक त्यांचा नामोल्लेख करतांना त्यांचे नांवामागें कित्येक दिवस चिंतन करून त्यांस अन्वर्थक असें " लोकमान्य " उपपद मीं लिहिलेलें आहे, व तें पाहून कै. शंकर बाळकृष्ण दीक्षित हे त्या वेळीं म्हणाले, वा दामोळकर, टिळकांना ही सार्थ पदवी तुम्हीं दिलीत खरी ! आतां आपण तरी निदान यापुढें त्यांस ' राजमान्य ' न लिहितां ' लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ' असेंच लिहिणार !

(२७) वसंतऋतु येतांच वृक्ष जसे नवपल्लवित होतात किंवा मृगनक्षत्र सुरू होतांच पर्जन्याची जशी झोड उठते, तद्वत् लोकमान्य मंडालेहून सुटून येतांच केसरी सुरू करण्याबद्दल रोजचे रोज कचेरींत पत्रांचा पाऊस पडूं लागला. मॅनेजर बाबासाहेब विद्वांस यांस इतके सर्व पत्ते लिहून केसरी ताबडतोब विनचूक रवाना करण्याची मोठी पंचाईत पडूं लागली, म्हणून त्यांनीं निव्वळ या कामाकरितां एकदोन माणसें मुद्दाम नेमून त्यांजकडून सायक्लोस्टाइलवरून पत्ते लिहून घेण्याचें ठरविलें. पहिले दिवशीं सदर मंडळींस सायक्लोस्टाईलवरील लिहिणें जमेना, ते लिहिण्याचे त्यांचे कसे तरी प्रयत्न चालले असतां लोकमान्य तेथें सहज आले. अज्ञानानें ती मंडळी तें लिहिण्याचा कांहीं तरी उद्योग करीत आहेत हें पाहून लोकमान्य हंसत त्यांस म्हणतात ' साधी गोष्ट. पण माहीत नाहीं, म्हणून ' किल्लीवांचून जसें कुलूप उघडणें त्याचप्रमाणें हे तुमचे उद्योग होत ' असें म्हणत त्यांनीं तेथेंच बैठक मारून त्या कारकून मंडळींस समजावून देण्याकरिता वॅक्सपेपरवरून पराणीप्रमाणें असलेल्या लोखंडी लेखणीनें एक शीट पत्ते त्यांनीं लिहून काढले व म्हणाले ' हे एवढेसे पत्तेच काय पण केसरीच्या सुरुवातीस

कारकुनाचें व छापखान्याबद्दलचेंहि काम आम्हीच करीत होतों. एका बैठकीस हजार हजार पत्ते मीं लिहिले आहेत ! ' रा. दाभोळकर यांची वर दिलेली एक आठवण लोकमान्यांच्या या उद्‌गाराशीं कशी तंतोतंत जुळते !

(२८) केसरीवर लोकमान्यांचें प्रेम किती होतें हें कोणत्या शब्दांनीं सांगावें ? अन्य शेंकडों संपादकमित्रांनीं, कांहीं विशिष्ट प्रश्नांवर आपल्या वर्तमानपत्रांत अगर मासिकांच्या निरनिराळचा प्रसंगानें निघणाऱ्या जादा अंकांत लोकमान्यांनीं लेख लिहावा म्हणून, त्यांस किती तरी विनवावें; पण मुळांत त्यांचा भिडस्त स्वभाव असतांहि केवळ तत्त्वप्रतिपालनार्थ " आपलें पत्र सोडून दुसऱ्याचे पत्रांत मजकूर लिहिणें (to adorn other's wife inspite of ones own) हा एक केवळ संपादकीय व्यभिचार आहे " असें ते उघडपणें नेहमीं म्हणत व या गाढ तत्त्वनिष्ठेमुळें त्यांनीं कित्येकांचे कित्येक दोषारोपहि सोसलेले आहेत पण कोणीहि कोणत्याहि मताचा कांहीं अडचणीच्या प्रसंगांत सांपडल्यास ते त्यास मदत करण्यास एका पायावर तयार असत. एकदां दैनिक ज्ञानप्रकाशाचे अगदीं आरंभींच्या अमदानींत असा एक प्रसंग आला कीं, कांहीं आपत्तीमुळें जागेवर एकहि संपादक उभा नसल्यानें व मॅनेजर हरिपंत गोखले व लोकमान्य यांचा जुना संबंध असल्यामुळें, ते लोकमान्यांकडे गेऊन त्यांस सर्व हकीकत सांगून मजकूर मागूं लागले व योगायोग असा कीं, त्याच वेळीं केसरी-ज्ञानप्रकाशाचा कांहीं एका बाबतींत जोराचा वाद चालू होता. पण अशा वेळीं लोकमान्यांनीं एक पळाचाहि विचार न करतां, व पूर्वी अशाच एका अत्यंत बिकट प्रसंगीं ऐनखिडींत—हरिपंतांनीं लोकमान्यांस दगा दिला असतांहि तें सर्व विसरून, लेख लिहून देतों, असें त्यांस सांगितलें आणि सर्वांत मोठी मौज ही कीं, प्रत्यक्ष चालू वादावरच व केसरीवर हल्ला करून खुद्द ज्ञानप्रकाशाचा एडिटरहि लिहूं शकणार नाहीं, असा त्यांच्या बाजूनें त्यांनीं एक उत्कृष्ट लेख त्यांस लिहून दिला ! !

(२९) अगदीं याच मासल्याची पण जरा निराळ्या तऱ्हेची एक गोष्ट येथें देतों. ताईमहाराजांच्या खटल्यांत पुणें येथील अव्वल कोर्टांतील

बहुतेक सर्व काम येथील प्रसिद्ध वकील रा. गोपाळ मोरेश्वर पटवर्धन यांनीं चालविलें होतें. त्यांचेपाशीं मी एकदां गप्पा मारीत असतां त्यांनीं लोकमान्यांबद्दल बऱ्याच गोष्टी सांगितल्या; पण त्या सर्व गाळून प्रकृत स्थळास अनुरूप तेवढीच देतों. ते म्हणाले, "त्या वेळीं येथील कोर्टांत ताईमहाराज—बाळामहाराज—यांच्या बाजूचें म्हणजे आमच्या विरुद्ध पक्षाचे वकील, हल्लींचे सर माधवराव चौबळ व पी. पी. खरे असे होते. एके दिवशीं सायंकाळीं कोर्टाचें काम संपल्यावर वकिलांचे खोलींत सदर वकीलद्वयास हंसत-हंसत व विनोदानें पण टोंचून, बळवंतराव म्हणाले, 'अरे, कसले तुम्ही हे वकील? जन्मच्या जन्म घालविलांत तरी असें कसें हें काम चालवितां? मी जर तुमच्या बाजूचा वकील असतों तर एव्हाना केव्हांच मी केस जिकतों!' ह्या त्यांच्या उद्गारांचा फायदा घेऊन, कदाचित् आपणास अनुकूल असा मार्गदर्शक सल्ला मिळेल या लोभानें, पी. पी. खरे यांनीं त्यांस मुद्दाम जरा चढवून 'सांगा पाहूं तुम्ही कसे आर्ग्युमेंट केलें असतें तें' असें म्हटलें व आमचे हे युधिष्ठिर खरोखरच त्यांस कसें आर्ग्युमेंट केलें पाहिजे हें सांगूं लागले. पण उद्यां हें आपल्या अंगावर येईल हें ओळखून मी लगेच बळवंतरावांचा हात धरून ओढीत 'चला हो, आतां आपणास वेळ नाहीं येथें शिळ्या गप्पा मारण्यास' असें म्हणत त्यांस बाहेर घेऊन आलों, व त्यांस जरा रागानें म्हणालों, 'अहो, हे असले आपल्या अंतर्यामांतले डाव कोठें प्रतिस्पर्ध्यास सांगावयाचे असतात?' यावर एकदम ते म्हणतात, 'आपली शस्त्रास्त्रें शत्रूंस दाखवून मग त्यांत यशस्वी होणें यांतच तर खरें पौरुष व युद्धकौशल्य आहे!' तात्पर्य, यावरून त्यांचें उदार मन व स्वसामर्थ्याविषयींचा त्यांचा आत्मविश्वास याची कल्पना येते.

(३०) पुणें येथील श्रीशिवराज्याभिषेकोत्सवाच्या दुसऱ्या वर्षाच्या उत्सवांत कै० नारायण बापूजी कानिटकर यांनीं कीर्तन करावें असा लोकमान्यांनीं त्यांस आग्रह केला. कानिटकर हे लोकमान्यांचे एक परम स्नेही असल्यामुळें ते लोकमान्यांस म्हणाले, "होय; माझा तो धंदा नसतांना अगर आजपर्यंत मीं कधींहि हा प्रयोग करून पाहिला नसतांहि तुम्ही

म्हणतांच म्हणून महाराजांपुढें कीर्तनास मी उभा राहीन. पण बळवंत-राव ! तुम्ही मात्र या हरिदासाचे मागें झांज वाजविली पाहिजे ! " लोकमान्य म्हणतात, "ठीक आहे; जसा कोरा हरिदास तसा त्याचा कोराकरकरीत साथीदार; फक्त श्रोतेच तेवढे काय ते घटलेले ! ! " आणि खरोखरच सदर उत्सवांत कानिटकरबोवांचे मागें झांझकरी टिळक साथीदार म्हणून उभे राहून हें कीर्तन झालें. लोकांस याची अर्थातच अपूर्वाई वाटल्यामुळें त्यांनीं चटकन् त्या वेळीं त्यांचा घेतलेला फोटोहि पाहावयास सांपडतो !

(३१) श्रीशिवछत्रपतींच्या पहिल्या उत्सवाकरितां रायगडास लोकमान्य गेले असतां गड चढतां चढतां वाटेनें दे. भाऊसाहेब गोखले यांचेपाशीं लोकमान्य गप्पागोष्टी बोलत हंसत पण गंभीरपणें म्हणतात, "तुमच्याप्रमाणें मी हल्लीं तालीम करीत नसलों तरी व मी गृहस्थाश्रमी असलों तरीहि राष्ट्राचा गाडा मला ओढावयाचा आहे हें जाणूनच मी ब्रह्मचर्याचेहि कांहीं नियम सक्तीनें पाळीत असतों. नाहींतर इतरांप्रमाणें मी वागतों तर एव्हांना मी कांहींचा आजोबा केव्हांच झालों असतों ! ! "

(३२) आपल्या आर्यावर्तांत ब्रह्मनिष्ठ ऋषि, वैराग्यवंत ब्राह्मण, अयाचित व निःस्पृह विद्वद्वर्य यांचा योगक्षेम चालविणें किंवा त्यांचा परामर्ष घेणें हा आपला धर्म किंवा भूषण मानणाऱ्या राजांची परंपरा पाहून ती न तुटूं देण्याच्या सात्त्विक बुद्धीनें व त्यांत आपलाहि समावेश करण्याच्या उदार स्वभावानें व सदभिमानाने एखादा अर्वाचीन भूपति निर्माण होणें अशक्य नाहीं. तशांत त्यांस क्षत्रियाचे व ब्राह्मणांचे जोडगोळीप्रमाणें कर्म करणारा कोणी भेटेल तर त्याचें कौतुक विशेषच वाटणार ! श्रीमंत सरकार राजे सयाजीरावमहाराजांस एकदां वाटलें कीं, अमुक एका ग्रंथाचें भाषांतर टिळकांस करावयास सांगून त्या निमित्तानें त्यांस १२-१५ हजार रुपये दक्षिणा म्हणून द्यावी ! व त्याप्रमाणें सन १८९५ सालीं लोकमान्यांस त्यांनीं मुद्दाम भेटीस बोलावून आपली इच्छा निवेदन केली. पण चमत्कार असा कीं, सांपत्तिक दृष्टया त्या वेळीं सर्व बाजूंनीं ताणलेला असतांहि हा निःस्पृह, मानी, स्वावलंबी व तेजस्वी ब्राह्मण राजाश्रयाची शीतळ पण

रोगट सावली कसची मान्य करतो ? त्यांनीं महाराजांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानून त्यांस नकार दिला ! व घरीं आल्यावर आपले माचे धोंडोपंत बाबा यांचेजवळ त्यांनीं सहज पण खासगी तऱ्हेनें आत्मविश्वासोद्गार काढले ते असे :—"I am not born to earn my bread by making mere translations for others. I am actuated with the spirit of some century work for the age I live in ! (दुसऱ्यानें दिलेला तुकडा खाऊन केवळ भाषांतर करण्यासारखीं कामें करण्यास मी जन्मास आलेलों नाहीं. ज्या शतकांत आपण जन्म घेतला त्याचें नांव आपण कांहीं करूं या उमेदीनेंच मी कार्यप्रवृत्त झालों आहे ! )" हे उद्गार पन्नास वर्षांपूर्वीं अशाच एका थोर पुरुषाच्या—कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या—'I am the Shivaji of the Marathi language who had not his equal either to precede or to succeed him' या आत्मसाक्षात्कारोद्गाराची सहज आठवण करून देतात.

(३३) वरील गोष्टीवर अधिक प्रकाश पाडणारी अशी मला एक गोष्ट सहज आठवली. केसरी ऑफिसांतील लायब्ररी लावणें म्हणजे एक मोठें प्रकरण असे. एकदां, हें लायब्ररी लावण्याचें काम माझेकडे आलें होतें. थोरल्या दिवाणखान्यांत ही लायब्ररी असे व तेथेंच येथील मुक्कामांत श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांची बैठक असे. नाटकें, निबंध, कादंबऱ्या वगैरेसारख्या पुस्तकांचीं कपाटें तेथेंच होतीं; याकडे पाहून सहज दादासाहेब मला म्हणाले, 'हीं इतकीं पुस्तकें कसलीं आहेत; कोणी वाचतो का ?' हा प्रश्न ऐकून हातांतील आडकित्त्याने सुपारी फोडीत लोकमान्यांची स्वारी किंचित् हंसत तेथें आली व म्हणाले, 'हे सर्व साळू-मैनांच्या गोष्टीचे 'प्रचंड' ग्रंथ आहेत ! व आश्चर्य हे कीं, बहुतेकांची या कपाटावरच नेहमीं झडप पडते ! बाकीच्या पुस्तकांचा मात्र कसर व मूषक रसिकपणें परामर्ष घेतात !' इतक्यांत एक विद्वान् गृहस्थ येऊन आपली कादंबरी फार नांवाजलेली आहे अशी प्रस्तावना करीत लोकमान्यांस ती त्यांनीं नजर केली. उभयतांचें थोडें मजेदार संभाषण झालें. ते परत गेल्यावर लोकमान्य म्हणतात, "असल्या ताई-माईच्या गोष्टी लिहिण्यांत व त्या सुशिक्षितांस वाचण्यास सांगण्यांत काय पौरुष आहे न कळे !

असल्या विद्वानांची बौद्धिक क्षुधा इतकी मंद व्हावी याचें आश्चर्य वाटतें. पारतंत्र्यांतील राष्ट्र सर्वच बाजूंनीं कसें मद्द बनतें याचें हें एक गमक आहे. इतिहास, शास्त्र (सायन्स), नवीन शोध यांच्या चिंतनांत तरुण सुशिक्षितांची वुद्धि न खेळतां तिला असले छंद—चाळे लागतात यास काय करावें? लहानपणासून निदान मला तरी वाटे कीं, आपण नेहमीं असें वाचावें व लिहावें कीं, ज्याचा या परम गूढ विश्वाच्या अतर्क्य व अपूर्व बांधणीचा बोध होण्यास व तिचा समर्पक शोध लावण्यास उपयोग होऊन त्याचा आपल्या प्रयत्नानें जीवकोटीच्या उन्नतीस अधिक उपयोग होईल, इतकेंच नव्हे तर चराचर वस्तुगत स्वयंभु शक्तीचें सर्वैक्य करून शक्य तर सत्-चित्-आनंद याचा अनुभव सर्वांस प्राप्त करून घेतां येईल!"

(३४) कै० भिकाजीपंत हर्डीकर (न्यू पूना कॉ० मधील प्रो. नानासाहेब हर्डीकर यांचे वडील) यांच्या देशभक्तीच्या व लोकमान्यांविषयींच्या त्यांच्या अलोट प्रेमाच्या अनेक जण अनेक प्रकारें गोष्टी सांगतात इतिहाससंशोधक राजवाडे यांनीं तर महाराष्ट्रांतील कर्त्या पुरुषांची त्यांच्या विशिष्ट गुणाबद्दलची एक नमुनेदार जंत्री मागें एकदां प्रसिद्ध केली होती. त्यांत 'निःसीम देशभक्त' या सदरांत भिकाजीपंत यांच्या नांवाचा प्रथमोल्लेख केलेला आढळतो. हें त्यांच्या देशभक्तीविषयीं झालें. पण त्यांच्या टिळकप्रेमाची पुढील गोष्ट वाचा. × × × × सालच्या पुणें म्युनिसिपल निवडणुकींत × × × यांस उभें करून निवडून आणावयाचें असें लोकमान्यांनीं भिकाजीपंतांस सांगण्याचा मात्र अवकाश; लगेच दुसरे दिवसापासून अहोरात्र भिकाजीपंतांचें यंत्र सुरू झालें! 'नॉमिनेशन पेपरवर' फक्त सही करण्याच्या श्रमावांचून त्यांस या बाबतींत इकडचें पाऊल तिकडे टाकण्यासहि न लावतां, बड्या लोकांशीं कॉम्पिटिशन असतांहि त्यांनीं × × × यांस निवडून आणिलें! याच बाबतींत भिकाजीपंत एकदां × × × वकील यांजकडे, ते बुधवार पेठेंतील खासगीवाले यांचे वाड्यांत बसले असतां, आले. सदर वकीलसाहेब म्हणजे मोठे गमतीदार प्राणी. भिकाजीपंत आपणाकडे येत आहेत असें पाहून जवळच बसलेल्या भाऊसाहेब लवाटे यांस ते म्हणतात, "शंकरराव थांबा; आतां जरा

थोडी गम्मत करूं." तोंच भिकाजीपंत कडक उन्हानें सर्वांग घामटलेले व हातांत फाइल्स, चिठ्या व विनंतिपत्रें, शिसपेनसली वगैरे सांवरीत लगबगीनें तेथें आले. जरा इकडे तिकडे थोडें बोलणें करून हे वकील मुद्दाम कुचेष्टेनें डोळे मिचकावीत त्यांस म्हणतात, 'काय भिकाजीपंत! कसले तुमचे बळवंतराव! मोठा लबाड मनुष्य आहे.' झालें; हें ऐकतांच एकदम पायांतील शस्त्र हातांत घेऊन 'आमच्या बळवंतरावांस लबाड म्हणतां?' असें म्हणत तें त्यांच्या डोक्यांत मारणार तों वकीलसाहेब तेथून धांवत सुटले. वकील पुढें व हातांत हें शस्त्र घेऊन भिकाजीपंत त्यांचे मागें! असे दोघे एकामागें एक धांवत आहेत! हा देखावा पाहून तेथील मंडळीची हंसतां हंसतां मुरकुंडी वळली. आप्पाबळवंताचे गेटापर्यंत ही मिरवणूक आली! अखेर "बळवंतरावांची माफी मागा तरच सोडतो" असें भिकाजीपंत त्यांस म्हणतांच, "होय बाबा, तुमच्या बळवंतरावांची एकदां नव्हे, सात वेळां माफी मागतों!" असें त्यांनीं म्हटल्यावर, मग भिकाजीपंतांनीं उचललेलें शस्त्र म्यानांत घातलें! तेथून दोघेहि परत आले व थोड्या गप्पा मारून भिकाजीपंतांची स्वारी पुढील उद्योगास निघून गेली. ही गम्मत कोणी लोकमान्यांस सांगितली. तेव्हां ते म्हणतात, "यांत माझा संबंध आहे म्हणून मी कांहींच न बोलणें बरें; पण आमच्या भिकाजीपंतासारख्या एकनिष्ठ माणसांनींच आपल्या एकनिष्ठ व्रतानें मोठी कार्यें केलेलीं आहेत हें जगास सांगण्यास इतिहास उभा आहे!"

(३५) अगदीं वरील गोष्टीसारखीच दुसरीहि एक गोष्ट आतां लिहितां-लिहितांच आठवल्यानें तीहि लिहिण्याचा मोह आवरत नाहीं. १९०९ च्या नाशिक खटल्याचे होमकुंडांत सांपडल्यानें कारागृहांत बारा वर्षांची तपश्चर्या करीत असतां, एके दिवशीं साबरमतीच्या तुरुंगांतील कोठडींत टिळकभक्त ब्रह्मगिरीबोवांस जेल-सुपरिन्टेन्डेंटानें, त्याची केवळ कुचाळकी करण्याकरितां, व्हॅलेंटाईन चिरोलकृत Unrest in India हें पुस्तक वाचण्यास मुद्दाम दिलें व तो त्यांस म्हणतो, 'तुमच्या टिळकांस खरोखर फांशींच दिलें पाहिजे.' झालें; जिवंत निखाऱ्यावर परवशतेची राख पडली असली तरी त्यावर गुर्वपमानाचें स्फोटक द्रव्य पडतांच एकदम भडका न झाला तरच आश्चर्य! साहेबाच्या तोंडचे ते शब्द ऐकतांच

त्या बंदिवान भक्तानें लाथेनें तें पुस्तक दूर भिरकावून दिलें व त्या साहेबावर चित्त्याप्रमाणें एकदम तुटून पडून हातांतील त्या वेळच्या पाणी पिण्याच्या टिनपॉटच्या शस्त्राचा त्याचेवर प्रहर करणार तोंच इतर शिपायांनीं सुपरिटेंडेंटाचा बचाव केला. ही गोष्ट एका गृहस्थानें लोकमान्यांस सांगितली, तेव्हां या वेळींहि त्यानीं अगदीं थेट उपरिनिर्दिष्ट उद्‌गारच काढले. ते असे. "माझा यांत कांहींहि संबंध नसता तर मला या बाबतींत स्वतंत्रपणें अधिक बोलतां आलें असतें. तरी पण स्वामिनिष्ठ करारी पुरुषाच्या केवळ स्वामिभक्तीच्या अचाट कृतीनेंच कित्येक देशाचा इतिहास निराळ्याच रीतीनें रंगलेला पाहावयास सांपडतो हें विसरतां कामा नये."

(३६) लोकमान्याच्या घरीं त्यांच्या मुलीचें लग्न होतें. लग्नांत भिकाजीपंत अगदीं घरच्या माणसाचेहि वर राबत. प्रयोजनाचे दिवशीं बाहेरच्या सर्व मंडळींचीं जेवणीं खाणीं सर्व आटोपल्यावर आतां फक्त घरांतीलच मंडळी जेवावयाची उरली होती. तेव्हां बळवंतराव म्हणतात, "भिकाजीपंत, चला आतां, आपलीं पानें मांडा." त्यांचीं पानें मांडून वाढावयास सांगून सर्व व्यवस्था लावल्यावर भिकाजीपंतांची स्वारी मुकाट्यानें न जेवतां घरीं जाण्यास निघाली. तें पाहून लोकमान्य त्यांस विचारतात, "हें काय ? चाललांत कोठें ? अगोदर चला आपण बरोबर जेवूं या, आणि मग बाकीचीं कामें करीत बसा." अत्यंत नम्रतेनें पण निर्भीडपणें लोकमान्यांस भिकाजीपंत उत्तर देतात, "चालू ग्रामण्यांत तुम्ही असल्यामुळें जोंपर्यंत तुम्ही श्रीशंकराचार्यांनीं सांगितल्याप्रमाणें प्रायश्चित्त घेतलें नाहीं तोंपर्यंत तुमचे घरीं मला अन्नग्रहण करतां येत नाहीं !" हें ऐकून लोकमान्यांसहि मोठें नवल वाटलें. ते म्हणतात, "शाबास ! स्वतंत्र विचारांचीं व तत्त्वप्रेमी माणसें असावींत तर तीं अशींच असावींत. स्त्रीस जसें पातिव्रत्य तसें तत्त्वनिष्ठ पुरुषास तत्त्वप्रतिपालन !"

(३७) विधायक कार्याचें लोकमान्यांस वावडें होतें असा मवाळांचा त्यांच्यावर मोठा आक्षेप आहे. पण १८९७ सालीं पुण्यास प्लेगची आग लागून कहर गुदरला, तेव्हां लोकमान्यांनींच 'हिंदू-हॉस्पिटल' रूपी बंबानें ती विझ-

विण्याचा कसा कसून प्रयत्न केला हें प्रसिद्धच आहे. सदर हॉस्पिटल लकडी-पुलाचे पलीकडे जिमखान्याच्या जागेवर बांधलेलें होतें. तेथें रोज एकंदर व्यवस्था पाहण्यास सांज-सकाळ लोकमान्य जात असत. पुढें नाशिक खटल्या-मध्यें एक तप कारागृहवास भोगून आलेले देशभक्त ब्रह्मगिरीबुवा त्या वेळीं हॉस्पिटलमध्यें स्वयंसेवकाचें काम करीत असत. ते सांगतात, एके दिवशीं एक विधवा बाई प्लेगच्या दुखण्यांतून बरी होऊन आमच्या त्या दवाखान्यांतून गांवांत परत जावयाची होती. तिचे तेथील बिल सुमारें ३०–३५ रुपये झालें होतें. पण तिचेजवळ मुळीच पैसे नव्हते. दवाखान्याच्या ऑफिसचे अधि-कारी, तेथील नियमाप्रमाणें, तिचेकडून पैसे घेतल्याखेरीज तिला सोडीनात. इतक्यांत लांबून गाडींतून श्रीमंत बाळासाहेब नातू यांचेसह येत असलेल्या लोकमान्यांस तिनें पाहून, संकटसमयीं अचानक रीतीनें अवतीर्ण होऊन द्रौपदीस साहाय्य करणाऱ्या श्रीकृष्णाची तिला आठवण झाली व आपणासहि तोच अनुभव आतां येत असल्याचें तेथील सर्व मंडळीदेखत तिनें सद्‌गदित कंठानें बोलूनहि दाखविलें ! इतक्यांत लोकमान्य तेथें आले. त्यांनीं तो सर्व प्रकार ऐकून घेतला. बाळासाहेब नातू येवढे श्रीमंत, पण त्यांनीं तें ऐकून हळूच तोंड चुकवून मागें सरले. लोकमान्यांनीं तेथील अधिकाऱ्यास "या बाईचे सर्व पैसे माझे खात्यावर टाकून त्यांस येथून जाण्याचा पास द्या व त्या अशक्त झाल्या-मुळे गाडींतून त्यास त्यांचे घरीं पोंचतें करा" असें सांगितलें ! बुवा म्हण-तात, अशा रंजल्या-गांजलेल्यास आपुले म्हणणाऱ्या साधु पुरुषास या प्लेग-हॉस्पिटलच्या पायीं अखेर किती तरी भुर्दंड भरावा लागला!

(३८) शनिवार पेठेंतील रा. नरसिंह केशव जोगळेकर हे न्यू. इं. स्कूलमधील एक जुने विद्यार्थी. त्यांनीं लोकमान्यांच्या कांहीं गोष्टी मला सांगितल्या; पण त्या सर्व सोडून त्यांपैकीं फक्त एकच येथे देतों. ते म्हणाले— "औरंगाबाद-कॉलेजमध्यें श्रीधर रामचंद्र जोगळेकर म्हणून आमचे एक चुलते प्रोफेसर होते. बळवंतराव सन १९००–१९०१ चे सुमारास तेथें श्री जगन्नाथ महाराज दत्तक-प्रकरणांत आले होते. त्यांस त्या वेळीं श्री जगन्नाथमहाराजांची पत्रिका तयार करावयाची होती; पण मूळचें टिप्पणच कोठें सांपडेना, मोठी पंचाईत पडली. पण त्यापूर्वीं एकदां त्यांनीं तें मूळचें टिप्पण सहज कोठेंसें पाहिलें होतें. त्यावरून तेथें बसलेल्या मंडळीस, विशेषत: प्रो० जोगळेकर

यांस, बळवंतरावांनीं आपल्या केवळ स्मरणानें पत्रिका मांडण्यास सांगितलें. आणि चमत्कार हा कीं, पुढे कित्येक दिवसांनीं तें मूळ टिप्पण जगन्नाथमहाराजांचे वडिलांजवळ सापडलें. तेव्हां त्या मूळ टिपणाप्रमाणें त्यांनीं केलेली ही नवीन पत्रिका अगदीं हुबेहुब जुळली !

(३९) लोकमान्यांच्या केवळ बुद्धिविषयक व स्मरणशक्तीच्या गोष्टींच्या आठवणी आतां सांगत वसण्यांत त्यांची एक प्रकारें आपण किंमतच हलकी लेखतों असेंच प्रस्तुत लेखकाला वाटूं लागलें आहे. तरी पण पुन: थोडा विचार करतां असें वाटतें कीं, श्रीकृष्णाचें उत्तरचरित्र जरी गभीर व तत्त्वप्रबोधक असलें तरी त्याचेबरोबर त्याचें पूर्वचरित्रहि सर्वांस रम्य होऊन आकर्षिल्याखेरीज राहात नाहीं. तद्वतच लोकमान्यांविषयीं म्हणतां येईल. असो. माधवराव नामजोशी (यांचे अपयशाशीं कायमचे वांकडे असल्यामुळे त्यास आण्णासाहेब पटवर्धन कौतुकानें 'फत्तेसिंग' म्हणत असत) व लोकमान्य दोघे पुणें म्यु. कौन्सिलर असतां कांहीं प्रकरणांत सरकाराशीं म्यु. चें भांडण सुरू झालें. त्या बाबतींत म्युनिसिपॉलिटीस सरकारकडून आलेल्या उत्तराची नक्कल या दोघांस पाहिजे होती. पण ती देण्याचें प्रेसिडेन्टसाहेबांनीं नाकारलें. फार तर तुम्हास येथल्या येथेंच ते कागद फक्त वाचावयास मिळतील, पण त्यावरून नक्कल करून घेण्याची सक्त मनाई आहे असेंहि त्यांस बजावण्यांत आलें ! दोघांनीं विचार करून ठरविलें कीं, त्यांपैकीं अर्धा भाग एकाने लक्षांत ठेवावा व बाकीचा अर्धा भाग दुसऱ्यानें आपल्या स्मरणाच्या कागदावर उतरून घ्यावा व बाहेर जाऊन ताबडतोब दोघांनीं लिहून काढावा. याप्रमाणें आपापसांत त्यांनीं ठरविल्यानंतर प्रेसिडेन्टसाहेबांपाशीं त्यांनीं ते कागद वाचण्यास मागितले, व प्रेसिडेन्टमहाशयहि असे बहाद्दर भेटले कीं, त्यांनीं ते कागद त्यांस देऊन, पण त्यांचे शेजारी आपलीहि खुर्ची टाकून त्यावर ते पहारा करीत बसले ! बरें, त्या कागदांतील मजकूर तरी थोडा होता? पण स्पंज ज्याप्रमाणें पाणी शोपून घेतो किंवा जळू जसें रक्त पिऊन घेते तद्वत या बहाद्दरांनीं तो सर्व मजकूर अगदीं अक्षर अन् अक्षर स्मृतीच्या टिपकागदाने टिपून घेतला; अगर समर्पक दृष्टान्तानें बोलावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, प्रतिकृतीरूप छायाचित्र काढण्याच्या पत्राप्रमाणें आपल्या डोक्याच्या कॅमेऱ्यांतील स्मृतियंत्रानें त्या दोघांनीं तें सर्व लिहून काढलें ! व

दुसरे दिवशींच केसरी-मराठ्यांतून तें सर्व—जसेच्या तसे उधृत करून त्यावर अति जलाल टीकेचा भडिमार उडविला !

(४०) सन १९०० सालीं सातारा येथें गोकुळदास पारख यांचे अध्यक्षतेखालीं प्रांतिक परिषद भरली; त्या वेळीं पुण्याहून लोकमान्य, श्रीमंत बाळासाहेब नातू, वासुकाका जोशी, तात्यासाहेब केळकर, आण्णासाहेब परांजपे, भाऊसाहेब लवाटे इत्यादि अनेक प्रतिनिधि मंडळी एकत्र मिळून साताऱ्यास जाण्यास निघाली. सातारा रोड स्टेशनवर प्रतिनिधींचे सर्व सामान स्वयंसेवकांनीं बैलाचे छकड्यांत घातलें व प्रतिनिधि मंडळी तेवढी घोड्याचे गाड्यांतून साताऱ्यास पाठविण्यांत आली. दोनप्रहरीं १२-१ वाजता मंडळी तेथें पोचतांच, जेवावयाचीं पानें अगदीं तयार होतीं; पण सर्व मंडळीचीं सोंवळीं बरोबरच्या सामानांत राहिलीं. बैलाच्या गाडींतून इतक्या लांबून तीं यावयाचीं असल्यामुळें जो तो आपल्या हाताचा श्रीकार करून सचिंत उभा राहिला. पण लोकमान्य तेवढे चटकन् स्नान करून सोंवळें नेसून एका पानावर जाऊनहि बसले ! तें पाहून त्यास वासुकाका विचारतात "अं! तुम्ही कोठून सोंवळें आणिलेंत ?" लोकमान्य हंसत म्हणतात "जेवावयास जावयाचें आणि तोंड विसरावयाचें अशी कशी तुम्ही सर्व मंडळी बुवा ! स्टेशनवर सर्व सामान बैलगाडींत घातलेलें पाहून व त्याच वेळीं पुढील हे सर्व ओळखून टांग्यांत बसतांनाच मी आपला मुकटा व धोतरें तेवढें खाकोटीस मारलें ! "

(४१) हिंदुस्थानसरकारचे सी. आय. डी. चे सुपरिंटेन्डेंट रावसाहेब बाबासाहेब देशपांडे यांचेपाशीं मला गप्पा मारण्याचा योग आला असता त्यांनी अत्यंत सहृदयतेनें लोकमान्यांविषयीं ज्या अनेक गोष्टी सांगितल्या त्या प्रसिद्ध करण्याचा काळ अद्याप न आल्यामुळें अगदीं सामान्य अशा किरकोळ एकदोनच गोष्टी सांगतों. बाबासाहेब म्हणाले, (१) १८९७ सालच्या शिक्षेचे वेळीं बळवंतराव येरवड्याचे तुरुंगांत असता तेथें कांहीं कामाकरितां सहज मी गेलों होतों. पुष्कळ कैदी काम करिण्याकरितां तेथें एके ठिकाणीं बसलेले होते. जेलरहि तेथे जवळच उभा होता. इतक्यांत कैद्याचा पोषाक घातलेले बळवंतरावजी तेथें आले. त्यांस पाहून एकदम स्फूर्तीनें ते सर्व कैदी उभे

राहिले! हें काय? असें त्यांस दरडावून विचारतां ते म्हणाले, "हे 'राव. साब' (टिळक) आल्यावर आम्ही बसावं कसं? म्हणून आम्ही उभें राहिलों. त्यांचे केसासहि ढका लागलेला आम्हास खपणार नाहीं. मग त्यांच्या अपमानाची गोष्ट कशाला?" (२) तेथील कांहीं कैदी आडमुठेपणानें व मुद्दाम हट्टानें आपलें नेमलेलें काम करीत नसत. यामुळें त्यांचा फार छळ होई. तेव्हां त्यांस या पुरुषानें 'तुम्ही कांहीं अपराध करून तेथें आलांत ते आलांत; आणि आतां पुन्हां त्या पापाचीं भर आपलें काम न करण्यानें करणार? आळसानें स्वस्थ बसणें हा अधर्म आहे व हा अधर्म तुम्ही करतां म्हणूनच तुमचे हाल होतात, हें बरें नाहीं' वगैरे त्यांस शिकवून त्यांनीं सर्वांकडून निमूटपणें सुखानें काम करून घेतलें व त्यांचे हाल वांचविले! सुपरिन्टेंडेटसाहेबांच्या कसल्याहि भयंकर शिक्षांस न जुमानणाऱ्या त्या आडमुठ्या सिद्दी व काबूली दांडगेश्वर कैद्याचें तें अवजड यंत्र चालविण्यास आपणास ही 'लोकमान्य कळ' चांगली सांपडली आहे, म्हणून सदर साहेबास फार बरें वाटे व तसें त्यांनीं आपल्या सरकारी रिपोर्टांतहि नमूद केल्याचें माझे ऐकण्यांत आहे.

(४२) विजापूर जिल्ह्यांतील बल्लोळीचे श्री. बाबाचार्य जहागीरदार यांजकडून लोकमान्यांविषयीं कळलेल्या कांहीं गोष्टींपैकीं एकच गोष्ट येथें देतों. तिकडील एका वतनदार गृहस्थांचें उत्पन्न सरकारनें केवळ आकसानें कांहीं एका प्रकरणांत जप्त केलें, यामुळें सदर गृहस्थावर मोठाच प्रसंग गुदरला. म्हणून त्यानें मोठमोठ्या वकिलांकडून कलेक्टरकडे अर्ज केले, कमिशनर-गव्हर्नर यांजकडे अपिलें पाठविलीं. कौन्सिलमध्येंहि प्रश्न विचारला; पण कोठें कांहीं दाद लागेना. अखेर वैतागून जाऊन प्राणत्याग करण्यापर्यंतहि त्यांची मजल पोचली. निराशेच्या शेवटच्या बिंदूपर्यंत पोंचलेल्या मनाची स्थिति काय वर्णन करावी? आणि अशा वेळींच अकस्मात् आशेच्या विद्युत्कणाचें दर्शन होणें म्हणजेंच तो ईश्वरी कृपाप्रसाद होय असें मनास कां वाटू नये? सदरहु गृहस्थास लोकमान्यांकडे येऊन त्यांचा सल्ला घेण्याची स्फूर्ति झाली. त्यांनीं तावडतोब पुण्यास येऊन लोकमान्यांकडे त्यांस आपलें सर्व कागदपत्र दाखवून तपशिलवार हकीगत सांगितली. त्यांत ते म्हणाले, 'केवळ माझ्या हयातीपर्यंतच माझें उत्पन्न सरकारनें जप्त केलें आहे; माझ्या-

पाठीमागें पुनः पूर्ववत् सर्व उत्पन्न जसेंच्या तसें सुरू होणार असें सरकारनें ठरविल्यामुळें मला आतां आत्महत्या केल्याखेरीज माझ्या पोराबाळांचें पोट भरणें शक्य नाहीं. आतां मी जगणें याचा अर्थ बायकापोरांनीं माझेसकट उपाशी मरणें असा असल्यामुळें, आतां आत्महत्येखेरीज उपाय नाहीं. मी मरण्यानें माझें येवढें थोरलें कुटुंब तरी पोटभर अन्न खाईल. म्हणून शेवटीं आपलें दर्शन घ्यावें व सल्ला विचारावा म्हणून इतकें लांब, महाराज, मी मुद्दाम आलों आहे.' लोकमान्य हें सर्व शांतपणें ऐकून घेऊन त्यांस एकदम म्हणतात "व:, मला तर यांत विशेष असें कांहींच दिसत नाहीं. आत्महत्येचा विचारहि तुम्ही मनांत न आणतां कार्य साधणें अशक्य नाहीं. पण एक गोष्ट मी तुम्हास सांगतों तेवढी कराल काय ?" "महाराज, जेथें मी प्राणार्पणहि करण्यास तयार झालों तेथें आतां बाकी काय राहिली आहे? काय वाटेल ते सांगा" असें त्या अनन्यगतिक गृहस्थानें त्यांस उत्तर दिलें. लोकमान्य म्हणतात, "ठीक आहे. हिंदु-धर्मशास्त्र व हिंदु लॉ असें प्रतिपादतात कीं, संन्यास घेतल्यावर त्या संन्यस्ताचें पूर्वाश्रमांतील स्थावर-जंगम वगैरे सर्व ऐहिक वस्तुजातावरील स्वामित्व नष्ट होतें. तेव्हां तुम्ही आतां संन्यास घ्या; म्हणजे कायदेशीर रीतीनें तुम्ही आपल्या इस्टेटीस 'मृत' झाल्यासारखेच होणार आहां व सर्व हक्कसंबंधांस तुम्हास कायदा, तुम्ही जिवंत असूनहि 'मृत' मानून तुमच्या वारसांस—मुलांस तुमचें उत्पन्न देण्यास तयार होईल यांत बिलकुल शंका नाहीं. वाटल्यास तुम्ही त्रिदंडी संन्यास घेतला तरीहि हरकत नाहीं!" हें ऐकून शेंकडों रुपये खर्चून व ताठर अशा अनेक वकील-बॅरिस्टरांचें आर्जव करून न मिळणारें यश कवडीचाहि खर्च न येतां व बिलकुल खुशामत न करतां एका महात्म्याच्या सहजोपदेशानें निभ्रांत मिळणाऱ्या भावी यशाच्या पूर्व कल्पनेनें तो आर्त व त्रस्त मनुष्य अगदी गहिंवरून जाऊन त्यानें लोकमान्यांच्या चरणावर मस्तक ठेवून त्यांचा त्यानें साशीर्वाद निरोप घेतला, व आपल्या गांवीं जाऊन लोकमान्यांच्या उपदेशाप्रमाणें संन्यास घेऊन विजापूरचे कलेक्टर यांस तसें कळविलें. तेव्हां "ही युक्ति पुण्याच्या त्या चित्पावन टिळक ब्राह्मणानें यांस सांगितली असली पाहिजे." असें अगदीं उघडपणें कलेक्टरसाहेब म्हणाले व निरुपाय

होऊन पूर्वींच्या त्यांनीं आपल्या हुकुमाप्रमाणें सरकारजमा केलेलें त्याचें उत्पन्न सोडून दिलें!!

(४३) १९०३ सालच्या धारवाडच्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष दाजीसाहेब खरे हे ना. गोखले व लोकमान्य यांचेसह पुण्याहून निघून एकाच डब्यांत वसून प्रांतिक परिषदेकरितां धारवाडास गेले. वाटेंत, "मी अध्यक्षांचें असें असें भाषण लिहिलें आहे" असें म्हणून दाजीसाहेबांनीं बळवंतराव यांस तें वाचून दाखविलें. बळवंतराव म्हणतात, "तुमचें भाषण उत्कृष्ट आहे यांत शंका नाहीं. पण सरकारास आपण आपलीं सर्व प्रमाणें अगोदरच दाखवून त्यास अजिबात निरुत्तर करून गप्प बसविण्यापेक्षां आपण होऊन जाणूनबुजून मुद्दामच चुकीचें एखादें असें सामान्य विधान करून ठेवावें कीं, तें खोडण्याच्या लोभानें सरकारनें आपले अंगावर येण्यास धांवावें व मग याचा फायदा घेऊन कांटेरी कुंपणावर टाकलेल्या वस्त्राप्रमाणें त्याची अवस्था आपण करून सोडावी. मग त्यास असें धोपटावें कीं, कोठून यांचे वाटेस आपण होऊन गेलों असें त्यास होऊन जावें!" वाग्युद्धांतील हाहि एक पेंच आहे यांत शंका नाहीं!

(४४) सन १९०४ च्या जुलैमध्यें ग्रामण्य प्रकरणाचे अखेरचे निकालाचे बाबतींत श्रीशंकराचार्यांस भेटण्यास संकेश्वराच्या लोकांनीं लोकमान्यांस अपूर्व समारंभानें संकेश्वरीं नेलें होतें. तेथें गेल्यावर खासगी बैठकींत गप्पागोष्टी बोलत असतां संकेश्वरकाकांचे [वामन विठ्ठल कुलकर्णी] जवळ पुढीलप्रमाणें लोकमान्य बोलल्याचें सांगतात. "अलीकडल्या इंग्रजी शिकलेल्या सर्व सुशिक्षित तरुण मंडळींस आमच्या संस्कृतीची फारशी किंमत वाटत नाहीं, व धर्माबद्दल तर त्यांची आस्तिक्य बुद्धि नाहीं व आस्थाहि नाहीं. या बाबतींत ते अगदीं उदासीन आहेत. किंबहुना संस्कृति व धर्म विसरण्यासहि ते तयार आहेत. म्हणून क्वचित् मनांत असें येतें कीं, आमची संस्कृति व धर्म कोणास नकोच असेल तर मग येथें आमचें स्वराज्य झालें काय किंवा परस्थ ख्रिस्त्यांचें कायमचें राज्य टिकलें काय सारखेंच! संस्कृति, देव, धर्म, परंपरा, रक्तसंबंध यांकरितां स्वराज्य—आहार, निद्रा, भय वगैरेंकरितां स्वराज्य—या सर्वांस हवें आहे!"

(४५) 'छत्रपति श्रीशिवाजी महाराजांच्या राजकारणांत श्रीसमर्थ रामदास स्वामींचें कांहीं अंग असावें कां ?' असें एकदां एकानें धीटपणें लोकमान्यांस विचारलें. हें ऐकून ते म्हणाले, 'हें काय विचारतां ? न्या. रानडयांसारख्यांनीं म्हटल्याप्रमाणें व अलीकडील इतिहाससंशोधकांच्या सिद्धान्ताप्रमाणें तुकोबादि संतमंडळींनीं महाराष्ट्रभूमीची मशागत केली हें तर खरेंच, तथापि रामदास स्वामींचें कार्य कांहीं विशेष आहे. रामदास स्वामी व शिवाजीमहाराज ह्या मूळच्या दोन अगदीं स्वतंत्र अशा दैविक स्फूर्ति असून गंगा-यमुनाप्रमाणें हे दोन स्वातंत्र्याचे अगदीं स्वतंत्रपणें प्रचंड ओघ देशांत वहात होते. पुढें ब्राह्मतेज व क्षात्रतेज यांच्या या प्रीति-संगमांतूनच स्वराज्याचें मंदिर उद्भूत झालें हें विसरतां कामा नये.'

(४६) १९०५ च्या डिसेंबरमध्यें गायकवाड वाडयांत मॅट्रिकचे परीक्षेस पुण्यास आलेल्या विद्यार्थ्यांपुढें लोकमान्यांचे अध्यक्षतेखालीं दे. भा. ब. भोपटकर यांचें व्याख्यान झालें. अध्यक्षांनीं समारोपादाखल केलेल्या आपल्या भाषणांत "जमलेलीं हीं सर्व माझीं मुलेंच आहेत" असें उद्गार काढले होते. व्याख्यान संपून लोकमान्य नेहमींच्या बसावयाच्या आपल्या माडींत आल्यावर तेथें असलेले कै. श्री. बाळासाहेब नातू त्यांस म्हणतात, "आतांच्या भाषणांतील तुमच्या उद्गारावर उद्यां ज्ञानप्रकाशांत खूप भडिमार होणार." लगेच लोकमान्य म्हणतात, "अहो, तो आमच्या पांचवीसच पुजला आहे. त्यांत काय विशेष ? पण मजा ही कीं, सेल्बी साहेब (प्रि. डेक्कन कॉलेज) व आमचे प्रि. परांजपे हे आपल्या कॉलेजांतील मुलें जणूं तुरुंगांतील कैदीच आहेत असें समजतात ! पण जाहीरनामा हींच आमचीं कॉलेजें आणि तेथें येणारीं सर्व मुलें हीं मला तरी निदान आमच्या रामभाऊ—बापू (लोकमान्यांचे चिरंजीव) प्रमाणेंच वाटतात."

(४७) नेहमीं केवळ साध्यावरच मुख्य नजर ठेवून तें प्राप्त करण्यास कोणत्याहि साधनाचा, तेवढ्यापुरता उपयोग करण्यास लोकमान्य कसे कचरत नसत हें सर्वश्रुत आहेच. वेळ प्रसंग पडला तेव्हां इतक्या उतार-वयांत विलायतेस जाऊन कांहीं एका प्रसंगीं मजूर पक्षाचे सहाय्याच्या अपेक्षेनें त्या पक्षाचे पुढारी मि. बेनस्पूर यांजकडे ते गेले असतां जरूर

पडली म्हणून त्यांनीं तेथें चहाहि घेतला. पण मुळांत आपल्या चालीरीती, रीतिरिवाज वगैरेंचा हाडांत अभिमान बाळगणारे लोकमान्य, १९०७ सालीं एके दिवशीं सकाळीं त्यांचे घरावरून एकदां सहज 'लिमजी-भिस्कूट' म्हणून मोठ्यानें ओरडत विकीत जाणाऱ्या मनुष्याचे शब्द ऐकून, तेथें बसलेले 'वन्दे मातरम्'पत्रकर्ते रा. हरी रघुनाथ भागवत यांजकडे वळून सखेदाश्चर्य चर्येनें ते त्यांस म्हणतात, "मराठी राज्य जाऊन किंवा पेशवाई बुडून अद्याप शंभर वर्षेंहि झालीं नसतां, उलट शंभर पटींनीं किंवा शत-मुखांनीं परकीय राज्यकर्त्यांच्या दुष्ट व भ्रष्ट चालीरीतींना प्रजेस विषारी दंश करून इतक्यांतच ग्रासून टाकिलेलें पाहून कधींहि निराश न होण्याच्या निश्चयानें राष्ट्राच्या तपश्चर्येस आसन ठोकून बसलेल्या पुरुषाचें मनहि (हें स्वतःस अनुलक्षून असेल काय ?) क्षणभर चिंतादग्ध झाल्याखेरीज राहणार नाहीं. पुण्यासारख्या शहरांत ब्राह्मण आळींतून राजरोस 'साहेबाच्या भाकऱ्या' विकल्या जातील अशी कल्पना तरी १८१८ सालीं कोणास झाली असेल काय ? इंग्रजी शिक्षणानें, परंपरागत चालीरीतींच्या बाबतींत, बधिर झालेल्या तरुणांच्या मनास आतां याबद्दल कांहींच वाटेनासें झालें आहे. मला तर अशी भीति वाटते कीं, हा क्रम असाच पुढें चालू राहिल्यास, कांहीं काळानें आमची सर्व गृह-व्यवस्था मोडून पाश्चात्य राष्ट्राप्रमाणें, बकाली, हमाली व विस्कळित स्थिति प्राप्त होईल !"

(४८) 'ये यथा माम् प्रपद्यन्ते तांस्तथैव भजाम्यहम्' या सूत्र-सिद्धांतवचनानें लोकमान्यांची विचारशक्ति आत्मसात् केली होती हे वर वर पाहिलें असतांहि कळून येतें. मग तोच न्याय त्यांच्या राजकारणांत 'रिस्पॉन्सिव्ह' या शब्दानें व्यक्त झाला असल्यास आश्चर्य नाहीं, इतकेंच काय पण रोजच्या सामान्य व्यवहारांतहि त्याचा प्रभाव दिसून येतो. एकदां कै. श्री. बाळासाहेब नातू यांजकडे कोणी एक विद्वान् स्वामी आले होते. त्यांची श्रीभगवद्गीतेवर वादविवाद करण्याची इच्छा होती. त्या विषयांतील तज्ज्ञ म्हणून बाळासाहेब यांनीं लोकमान्यांस बोलाविलें. मुख्य प्रतिपाद्य विषयापेक्षां — तत्त्वज्ञानापेक्षां — संस्कृत भाषेवरील आपल्या प्रभुत्वाच्या जाणिवेमुळेंच प्रतिपक्षीयाच्या भाषेच्या कमजोरपणाचा फायदा

घेऊन स्वामींनीं संस्कृतमध्येंच वादविवाद करण्याचा आग्रह धरला व त्यामुळें अजिंक्यपत्र मिळविण्याचा प्रयत्न केला. पण फळाच्या वाह्य कवचापेक्षां आंतील स्निग्ध व पुष्ट भागावरच लोकमान्यांचा विशेष कटाक्ष असल्यामुळे त्यांनीं तें आव्हान मान्य केलें. वादास प्रारंभ झाला. पण लवकरच स्वामी कुंठीत झाले. अखेर काडीचा आश्रय घेणाऱ्या बुडत्या माणसाप्रमाणें 'शेषं कोपेन पूरयेत्' अशी त्यांची स्थिति होऊन किंचित् चिडून 'व्यासवचनावरहि टीका करणारे तुम्ही मूर्ख आहांत' असें ते त्यांस म्हणाले. लोकमान्यांनींहि लगेच उलट 'भवानपि मूर्खोऽस्ति' या वचनाचा त्यांस नम्रपणें परत अहेर केला!!"

(४९) लोकमान्यांच्या ज्येष्ठ चिरंजिवांची मुंज होती. अक्षतासमारंभ अगर भिक्षावळ वगैरे प्रसंगीं आपण वाजंत्री-बिजंत्री कुच कांहीं लावणार नाहीं असें त्यांनीं घरांतील मंडळींस सांगितलें. तेव्हां त्यांस कारण विचारतां ते म्हणाले, "वाजंत्री वाजविण्यास सरकारची परवानगी लागते, आणि ती संसारांतील यःकश्चित् मोठेपणाकरितां त्यास (सरकार) मागण्याची पाळी येणें ही पेशव्यांच्या राजधानींतील लोकांस लांछनास्पद व शरमेची गोष्ट आहे. वाजंत्री वाजविण्यास सरकारची परवानगी पाहिजे तर मग आहार-निद्रादि व्यवहारासहि त्यांचाच पास काढला पाहिजे!!"

(५०) १९०६ सालापर्यंत सदाशिव पेठेंतील श्रीमंत विंचूरकर यांचे वाड्यांत लोकमान्य राहत असत. एके वर्षी श्रीगणपत्युत्सवाचे वेळीं श्रीगजाननाची मूर्ति आणण्याकरितां ते स्वतः गेले होते. सालाबादप्रमाणें वाजंत्रीवालेहि बरोबर होते. पण वाजंत्र्याचा पास वाजंत्रीवाल्यांनीं न काढल्यामुळें त्यांस वाजंत्री वाजवितां येईना. हें पाहून ही 'बाल' गोपाळांची छोटी मिरवणूक दाणे आळींतून, बुधवारांतून, सदाशिव पेठेंतील पुष्करणीचे हौदाजवळ येतांच लोकमान्य त्या वाजंत्रीवाल्यास हंसत व बिनदिक्कत सांगतात, "वाजवा रे आतां. आतां आपण आपले आळींत आलों आहोंत! काय होईल तें पाहून घेईन. आम्ही आमच्या देशांत इतके गुलाम आहोंत कीं काय? खुशाल वाद्यें वाजवा रे! तुमच्याकडे त्याचें कांहीं नाहीं. मी त्याबद्दल जबाबदार आहे. पाहतां येईल!!" कायदेभंग

लोकमान्यांच्या हाडींमासीं कसा अगदीं स्वयंभु पण रक्षाच्छादित अग्नीप्रमाणें निर्दयतेनें कार्य करी हें आतां सांगण्याचें कारण नाहीं.

(५१) लोकमान्यांचें ज्ञान व त्यांची विरक्तता हीं लोकांस पटतात. पण त्यांची 'भक्ति' लोकांच्या तितकी परिचयाची नसावी असें वाटतें. म्हणून सांगतों कीं, लोकमान्यांचे भाचे बाबासाहेब विद्वांस हे नेहमीं, घरगुती मंडळींस काय सांगतात तें एकदां ऐका. "दादांस (लोकमान्य) मधुमेहाचा विकार झाल्यापासून म्हणजे १४–१५ वर्षें त्यांनीं साखरेस व तज्जन्य पदार्थांस कधीं स्पर्शहि केला नाहीं. पण ते कोठें श्रीसत्यनारायणाचे पूजेस बाहेर गेले असतां दिलेला प्रसाद अगर कोणी कोणत्याहि देवतेचा घरीं आणून दिलेला प्रसाद ते कधींहि आपल्या प्रकृतीकडे बिलकुल लक्ष न देतां अंगुष्ठ आणि तर्जनीच्या चिमटींत मावेल इतका घेऊन मोठ्या भक्तीनें सदैव ग्रहण करीत, व त्याबद्दल ते धन्योद्गारहि काढीत ?"

(५२) वरील गोष्ट लिहीत असतां ग्रामण्यप्रकरणांतील लोकमान्यांचे प्रतिस्पर्धी योद्धे श्रीमंत बाळासाहेब नातू यांच्या संस्मरणीय उद्गारांची आठवण झाली. बाळासाहेब एवढे करारी, निश्चयी व धार्मिक म्हणून मनोनिग्रही पण प्रस्तुत लेखकांजवळ त्यांनीं कांहींएका प्रसंगानें लोकमान्यां-बद्दल काढलेले पुढील उद्गार वरील प्रसंगास धरून वाटल्यावरून ते देत आहे. "तपेंच्या तपें बळवंतराव कसें कठोर पथ्य करीत असतील, हें त्यांचें ते जाणोत ! आपणाला तर महिनाभरहि होणार नाहीं. (बाळासाहेब यांसहि मधुमेहाचा विकार होता.) खरोखरच तो पुरुष देशाचें कार्य करावें म्हणून जगण्याकरितां खातो तर आम्ही खाण्याकरितांच जगतों ! साधुत्व यापेक्षां निराळें तें काय असतें ? परवां ते एकदां माझे घरीं आले असतां मी त्यांस काशीहून नुकत्याच आलेल्या श्री विश्वेश्वराच्या प्रसादाच्या श्रीखंडाच्या वड्या दिल्या, व म्हटलें, 'खा; आतां देहाचा अंत पाहूं नका. पुरे झालें तें पथ्य.' खाद्य पदार्थ म्हणून ते खाणार नाहींत हें ओळखून मी थट्टेनें पण आग्रह करून त्यांस म्हटलें, "अहो, हा काशीविश्वेश्वराचा प्रसाद आहे; न खाल तर लक्षांत ठेवा तो कोपेल व तुमचे हातून कार्यच होणार नाहीं !" यावर ते म्हणाले, 'तुम्ही म्हणतां तसा हा काशीविश्वेश्वराचा

प्रसाद पोटभर मी आज खाईन तर उद्यांच त्या जनतास्वरूप विश्वेश्वराची सेवा अंतरल्यामुळे तो क्षोभून भस्म करून टाकील. म्हणून नित्याप्रमाणें अंशमात्र हा प्रसाद ग्रहण करतों, कारण हल्लींचे हे 'काँप्रोमाईज'चे दिवस आहेत!" (त्या वेळीं काँग्रेसच्या समेटाची भाषा चालू होती) असें म्हणून त्यांनीं चिचोक्याएवढा तुकडा भक्तिपूर्वक ग्रहण केला. तात्पर्य, आमच्या भक्तीप्रमाणें त्यांची भक्ति उथळ व आंधळी नसून ज्ञानमय अर्थात् खोल व डोळस होती."

(५३) विलायतसरकार व हिंदुस्थानचे स्टेट सेक्रेटरी यांस कांहीं-एका बाबतींत एकदां पुणें सार्वजनिक सभेची तार करावयाची होती. तारेचे फॉर्मवर तार लिहीत असतां जागा संपली व विवक्षित रकमेत जाणारे शब्दहि भरले. पण तारेंतील एक शब्द तर लिहावयाचा राहिला. तें पाहून लोकमान्य म्हणतात, "जाऊं दे रे! आमचें इंग्लिश बरोबर नाहीं म्हणून त्यांनीं आम्हास शेरा दिला तरी चालेल. राज्य करण्यास आम्ही अपात्र आहोंत यापेक्षां तर तो बराना? मग उगाच साहेबास सुखा-सुखी एका शब्दास सवा रुपया कोण देतो? बाकी या तारेचा काय उपयोग होणार आहे हें दिसतेंच आहे! फक्त उपलब्ध साधनांचा कर्तव्यबुद्धीनें उपयोग करून घेणें एवढेंच आपलें काम!"

(५४) सन १९०८ सालीं रात्रीं लोकमान्यांस शिक्षा देऊन गुप्त रीतीनें इन्स्पेक्टर सुलिव्हान यांचे देखरेखीखालीं साबरमतीच्या तुरुंगांत नेल्यावर त्यांचें वजन करण्यांत येऊन त्यांस कैद्याचा पोषाक देण्यांत आला वगैरे वृत्तांत तुरुंगांतील एका बड्या हपिसरानें सांगितलेला वडोदे येथील गुजराथी 'सयाजीविजय' पत्रानें त्या वेळीं पुढीलप्रमाणें प्रसिद्ध केला होता. "त्यांस (लो. टिळक) कैद्याचा पोषाक दिला, त्या वेळीं हजर असलेल्या तेथील सर्व लोकांचे डोळे एकदम भरून आले. ते पाहून टिळक म्हणाले, "स्वदेशाच्या सेवेकरितां मला ही शिक्षा झाली आहे. याबद्दल मी आपल्यास भाग्यवान समजतों. कोणीहि खेद मानूं नये." त्यांस इतर कैद्याप्रमाणें जाड भाकरी व भाजी खाण्यास दिली असतां त्यांनीं आम्हाकडे पाहून उद्गार काढले कीं, "हिंदुस्थानच्या तीस कोटी प्रजेपैकीं दहा कोटी लोकांस अशा तऱ्हेचेंहि खाणें

८८० २८।५।८३

मिळत नाहीं, आणि बाकीचे पंधरा कोटी लोक अशाच प्रकारचें खाणें खातात. अर्थात् हें मला गोडच लागतें! ! ”

(५५) सन १९०७ सालीं पुणें येथें कै. ना. रा. ब. ग. व्यं. जोशी यांचे अध्यक्षतेखालीं पुणें जिल्हा परिषद भरली होती. सदर परिषदेंत बहिष्काराचा ठराव मंजूर करण्याचे वेळीं अध्यक्षांनीं त्यावर अनुकूल व प्रतिकूल मतें विचारलीं. त्या वेळचे सार्वजनिक सभेचे चिटणीस, स्वदेशी व्रताचे कट्टे उपासक व लोकमान्यांचे निःसीम भक्त श्री. शंकर गणेश ऊर्फ भाऊसाहेब लवाटे या अत्यंत नम्र पण तत्त्वैकनिष्ठ स्वतंत्र विचाराच्या देशभक्तानें, त्यांच्या कांहीं विशिष्ट विचारपद्धतीस बहिष्काराचा ठराव न पटल्यामुळें, सदर वेळीं तेथें विरुद्ध मत दिलें. तात्पुरतें बैठकीचें काम संपून भाऊसाहेब वगैरे थोर मंडळी सार्वजनिक सभेंत आली. येथेंच प्रतिनिधींच्या भोजनाची सोय केली होती. भाऊसाहेब मागील चौकांत येतांच, सार्वजनिक कार्यास अखंड वाहून घेणारे व लोकमान्यांचे एकनिष्ठ भक्त श्री. ब्रह्मगिरीबुवा यांनीं त्यांस पाहिलें. ते लाल होऊन, जवळच असलेला मोठा दगडी पाटा दोनहि हातांत घेऊन, त्वेषानें भाऊसाहेबांचे अंगावर धांवून “बळवंतरावांच्या विरुद्ध मत देतां नाहीं का ? ” असें म्हणत त्यांचे डोक्यांत तो घालण्यास वर उगारणार तोंच श्री. यशवंतराव कुळकर्णी यांनीं धांवत येऊन पाटा ओढून बाजूस ठेवून दिला. हें वर्तमान लोकमान्यांस कळतांच त्यांस फार वाईट वाटलें व ब्रह्मगिरीबुवा हे लोकमान्यांच्या गळ्यांतले ताईत असतांहि “तत्त्वाकरितां मरण्यासहि शंकररावांइतका दुसरा कोण धैर्य दाखवितो ? ” असें म्हणून त्यांनीं त्यांस चांगलीच समज दिली !

(५६) १९०७ सालच्या देशकालपरिस्थित्यनुरूप “ काळ्या-गोऱ्याचें स्वराज्य” असा लोकमान्यांनीं केसरींत लेख लिहिल्यावर, पुढें लगेच कलकत्त्याच्या दैनिक वन्देमातरम् पत्रांत त्या वेळच्या नवीन पक्षाचे पुढारी पालारविंद यांच्या सहीनें ‘स्वतंत्र स्वराज्य’ हें राष्ट्रीय पक्षाचें ध्येय आहे असें प्रसिद्ध झालें तें वाचतांच लोकमान्य एकदम उद्गारतात “ माझ्याहि पुढे हे लोक चालले काय ? ठीक आहे. राष्ट्र या पायरीवर आलें असल्यास मलाहि त्याचे पुढील पायरीवर चढलें पाहिजे. ” समाजनेत्याने समाजाचे पुढें शेंकडों

योजनें दूर उभें न राहतां त्यांच्या पुढें फक्त एक पाऊल टाकून राष्ट्राची प्रगति करण्याचा लोकमान्यांचा धडा विसरल्यानें न कळत समाजनाश कसा होतो हें आतां अनुभवसिद्धच आहे.

(५७) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर एके दिवशीं आपल्या चिरंजिवांच्या अभ्यासाच्या व निजण्या बसण्याच्या खोलींत ते सहज गेले. तों त्यास तेथें खुंटाळयावर असलेली बोअरहॅट दिसली. ती पाहून भिवया चढ्‌वून व कपाळास आठ्या घालून त्यांनीं ती ओढून घेतली व रागानें 'माझें घरीं साहेबाची टोपी काय म्हणून ?' असें म्हणत तिटकाऱ्यानें खिडकींतून खालीं लांब भिरकावून दिली !

(५८) १९०७ सालीं नागपुरास राष्ट्रीय सभा भरावयाची होती. आजवर राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष चंदावरकरासारखेहि आज सौभाग्यवती तर उद्यां गंगाभागीरथी म्हणजे आज काँग्रेसचे अध्यक्ष तर उद्यां सरकारचे बंदे गुलाम होऊन गेले असतांहि पूर्वी कधींहि अध्यक्ष न झालेल्या लोकमान्यांचीच या वेळीं अध्यक्षस्थानीं निवड व्हावयाची असें जवळजवळ ठरल्यासारखेंच होतें. म्हणून स्वागतमंडळाची रीतसर अध्यक्ष निवडण्याबद्दल सभा होण्याचे आधीं तत्रस्थ नेमस्ताग्रणी रा. ब. वामनराव कोल्हटकर हे तेथील राष्ट्रीय पक्षाभिमानी दे. शंभुराव गाडगीळ वकील यांस म्हणतात "काय वाटेल तें करा; पण टिळकांस मात्र अध्यक्ष करूं नका. टिळकांस अध्यक्ष निवडल्यानें राष्ट्रीय सभेचा आजपर्यंतचा खानदानीपणा, आब, लौकिक व सरकारांतील वजन नाहींसें होऊन तो एक 'पोटा-पाट्यांचा' (हा वऱ्हाडी शब्द आहे, त्याचा अर्थ 'पोरासोरांचा') खेळ होऊन बसेल व राष्ट्रकार्य खंडून जाईल." नागपुरास सभा केली असतां लोकमान्यच अध्यक्ष होणार याच केवळ भीतीनें मेथा-गोखले मंडळींनीं राष्ट्रीय सभेची उचलबांगडी करून तिला सुरतेस खेंचलें व रास बिहारी घोस यांस अध्यक्ष करण्याचें ठरविलें. पण मवाळब्रुवांच्या दुर्दैवानें उलट खाऊन हद्दपार केलेल्या लोकप्रिय लाला लजपतराय यांस याच संधीस सोडण्याची सरकारास वुद्धि झाली; व लालाजींसच अध्यक्ष करण्याबद्दल उभ्या हिंदुस्थानांत प्रथम केसरीनें म्हणजे लोकमान्यांनीं एकच काहूर उठवून दिलें व उरलेल्या थोड्या अवधींतहि सर्व देशभर याबद्दल

त्यांनीं प्रचंड खळबळ करून सोडली. तरी मवाळ कांहीं ऐकेनात. शेवटीं कलकत्ता येथें लोकमान्यांचे जिवलग स्नेही बाबू मोतीलाल यांस लोकमान्यांनीं पत्र पाठवून कळविलें कीं "लालाजींसच अध्यक्ष करण्यानें सरकारचा सक्रिय असा खासा निषेध होणार असून त्या योगें सबंध राष्ट्रास एक प्रकारें स्फूर्ति येणार आहे. करितां काय वाटेल तें करा आणि रास विहारी अध्यक्षस्थान न स्वीकारतील अशी त्यांची समजूत घाला. या वेळीं जातीनें मी स्वतः हजर असतों तर राष्ट्रकार्यार्थ आपला दुराग्रह सोडण्याबद्दल मी त्यांच्या पाया पडून (I should have knelt down before him and prayed for not accepting the Chair) त्यांनीं अध्यक्षस्थान सोडण्याबद्दल मी त्यांस विनंति केली असती!" सुईच्या अग्रावरील मातीचा कणहि न देण्याचा दुर्योधनी हट्ट हा आपल्या दुर्दैवी राष्ट्राचा स्वभाव पडल्यामुळें त्याचे परिणामहि आपणास भोगणें प्राप्तच आहे.

(५९) १९०८ सालाच्या पिकेटिंगच्या अपूर्व चळवळीचा जन्म, तत्पूर्वी पुण्यास भरलेल्या पुणें जिल्हा सभेच्या बैठकींत, राजमान्य गो. कृ. देवधर त्यांच्या दारूवरील विचित्र भाषणामुळें संतापून खवळून "ही दारू देशांतून नाहींशी व्हावी अशी तुमची खरोखरच मनापासून इच्छा असल्यास तुम्ही त्या-करितां मरण्यास तयार आहांत काय?" या लोकमान्यांनीं केलेल्या दिव्य भाषणांत झालेला आहे हें सूर्यप्रकाशाइतकें खरें आहे. कारण अगदीं प्रथम प्रस्तुत लेखक व नाशिक खटल्यांत फरारी झालेल्या दे. केतकर या दोघांनीं केवळ लोकमान्यांच्या वरील स्फूर्तिपूर्ण आव्हानावरून त्याच दिवशीं शनिवार पेठेंतील गुत्त्यांवर पिकेटिंग करून—पार्शी मालकाकडून मार सोसण्याचें गणेश-पूजन करून—आरंभ केला. असें असतां, येथें, कोठें म्हणे जॉन स्मॉल मे. हॉलमध्यें डॉ. भांडारकर यांचें व्याख्यान झालें होतें, त्यामुळें ही पिकेटिंगची चळवळ उत्पन्न झाली असें येथील मद्यपाननिषेधक मंडळाच्या अहवालांत लिहिल्याचें मीं लोकमान्यांस सांगितलें. तें ऐकून तो महात्मा म्हणतो "अरे, यांत वाईट तें काय? आपल्या तपाचें फळ दुसऱ्यास मिळत असल्यास, आमच्या वेदान्त सिद्धांताप्रमाणें आपलें पुण्य द्विगुणित होतें!" पण हें द्विगुणित पुण्यहि लोक-मान्यांचे पदरीं पडू न देण्याचा—म्हणजे त्याचा उच्चार करून तें त्यांचे नांवें

लिहिण्याचा-नोकरशाहीचा येथेंहि डाव दिसून येतो ! कारण पुणें जिल्ह्याचे त्यावेळचे अबकारी कमिशनर वरिष्ठ अधिकाऱ्यास केलेल्या आपल्या खाजगी रिपोर्टांत म्हणतो, "Mr. Tilak ruled over Poona for the last two weeks" तसेंच सार्वजनिक सभेंत टेंपरन्स असोसिएशनचे व्हाईस-प्रेसिडेन्ट रेव्हरंड डॉ. मॅकनिकल हे पिकेटिंगची चळवळ अगदीं व्यवस्थित चाललेली पाहून तें केवळ लोकमान्यांचेंच कर्तृत्व आहे हें मनांत पक्कें ओळखून हंसत मुद्दाम विचारतात "Oh Mr. Lawate ! Who is supporting this gigantic movement and doing all this ? Is it that great man?"

(६०) १९०८ सालीं प्रो. शि. म. परांजपे यांस पकडल्यावर, ते जामिनावर सुटून पुढें मुंबईस खटला चालावयाचा असल्यामुळें, सकाळचे गाडीनें ते व लोकमान्य मुंबईस जाण्याकरितां पुणें स्टेशनवर गेले. कै. बापूसाहेब गांधी यांचे वाड्यांत मी राहत असल्यामुळें तेहि या खटल्याकरितां याच वेळीं मुंबईस जाण्यास निघाल्यामुळें त्यांचेच गाडींतून मीहि पुणें स्टेशनवर गेलों. गाडींतून उतरतांच बापूसाहेबांच्या विश्वासांतले सी. आय. डी. चे एक मुख्य व प्रसिद्ध ऑफिसर बापूसाहेबांजवळ येऊन मोठ्या उत्सुकतेनें त्यांच्या खांद्यावर हात टाकून चितायुक्त मुद्रेनें त्यांच्या कानांत सांगतात, "बळवंतरावांवरहि शस्त्र उगारण्याचा सरकारचा आतां विचार अगदीं कायम झाला आहे. बहुतेक मुंबईची त्यांची ही खेप शेवटचीच होईल, इतकेंच नव्हे, तर ते मुंबईहून आतां पुण्यास परत येतील का नाहीं, शंकाच आहे. वॉरंटवर मॅजिस्ट्रेटाची आतां फक्त सहीच व्हावयाची राहिली आहे. तरी हें ताबडतोब त्यांस सांगा." लोकमान्यांचे भक्त बापूसाहेब जरा घाबरल्यासारखे होऊन घाईघाईनें टिळकांच्या डब्यांत जाऊन त्यांस म्हणतात, "आज आपण न जातां उद्यांचे गाडीनें जावें. म्हणजें घरीं जाऊन सर्व व्यवस्था करण्यास ठीक पडेल." पण संकटकालींच अधिक स्फुरण पावणारे व वज्राप्रमाणें कठोर हृदयाचे लोकमान्य विनोदानें व किंचित् हास्य पण बेपर्वा मुद्रेनें म्हणतात, "घरीं जाऊन काय फौजफाटा तयार करावयाचा आहे, कां सैन्य जमवावयाचें आहे, कां हत्ती-घोडे श्रृंगारावयाचे आहेत ? अगर किल्ल्यावर शत्रूचा हल्ला होणार म्हणून तेथें चर खणावयाचे आहेत ? कांहीं नाहीं. जेथें सबंध देश

त्यांनीं (सरकार) एक अफाट तुरुंग करून ठेविला आहे तेथें फार तर मोठ्या दालनांतून एका लहान दालनांत ते मला कोंबणार येवढेंच कीं नाहीं? यांत तयारी करण्यासारखें कांहींच नाहीं!"

(६१) सरस्वती नदीसारखे गुप्त व अदृश्य असेहि असंख्य प्रवाह ज्याप्रमाणें समुद्राला मिळतात त्याप्रमाणें लोकमान्यांच्या सर्वव्यापी राजकारणाची स्थिति होती. निरपेक्ष व सर्वांत मौज म्हणजे साक्षात् लोकमान्यांसहि अज्ञात अशा अनेक दर्जाच्या लहान-थोर अधिकृत लोकांनीं सर्वसंग्रही लोकमान्यांविषयींच्या प्रेमादर बुद्धीनें अगदीं बिनबोभाट व आपल्याकडून शक्य तितक्या होणाऱ्या परतंत्रावस्थेंतील अगदीं नाजुक पण पराकाष्ठेच्या मदतीचाहि फायदा त्यांस दिलेला आहे. १९०८ सालीं प्रो. शि. म. परांजपे यांचेवरील खटल्याचे प्रकरणांत लोकमान्य मुंबईस गेले असतां त्यांस पकडण्याच्या वॉरंटावर प्रे. मॅजिस्ट्रेटाची सही होऊन नुकता अर्धा तासहि लोटला नसेल तोंच सरदारगृहांत कोणी एका चित्रगुप्तानें आपलें नांवगांव कांहीं न सांगतां ही बातमी आणून दिली व तो गुप्त झाला. या वेळीं लोकमान्य बाहेर गेले होते. परत सरदारगृहांत ते येतांच त्यांचेजवळ असणाऱ्या रा. यशवंतराव कुळकर्णी यांनीं त्यांस ही गोष्ट सांगितली. तेव्हां लोकमान्य उद्गारतात, "ज्या राष्ट्राला प्रतिकार करण्याचें सामर्थ्य नाहीं त्या दुर्बल राष्ट्राच्या पुढाऱ्यास असली बातमी अगोदर कळून तरी उपयोग काय?" पुढें स्वस्थपणें २–२॥ तास शांत झोंप घेऊन उठल्यावर ते यशवंतराव यांस विनोदानें विचारतात, "इतका वेळ झाला तरी तुमचें तें वॉरंट अजून कोठें येत नाहीं तें?" असें म्हणून, वरील बातमी क्षणभर खरी मानून, जवळ असलेल्या प्रो. पराजपे यांस 'परतंत्र राष्ट्रास स्वतंत्र करणें' हें एक 'सतीचें वाण' आहे असें सांगून त्यांनीं बरेंच उपदेशपर भाषण केलें व तुमचा खटला वकील–बॅरिस्टर न देतां तुम्ही स्वतःच चालवा व मजवर प्रसंग आल्यास मीहि तसेंच करणार आहें असें बोलत आहेत तोंच इन्स्पेक्टर पेटिगारा वॉरंट घेऊन त्यांचे खोलींत शिरले. त्यास पाहतांच हंसत लोकमान्य म्हणतात, "पकडवॉरंटावर मॅजिस्ट्रेटाची सही होऊन चार तास होऊन गेले व तेथून येथें येण्याचा पंधरा मिनिटांचाहि

रस्ता नसतां तुम्हांस वॉरंट बजावण्यास चार तास लागतात? लवकर आलां असतां तर आज जामिनकीचा अर्ज गुदरण्यास तरी सांपडलें असतें ! "

(६२) वरील गोष्ट लिहीत असतां तत्सदृश अशा पुढील एका गोष्टीची आठवण झाली. लोकमान्यांस सरदारगृहांतून पकडून नेल्यावर पुणें येथील केसरी ऑफिसची व सिंहगडावरील त्यांच्या बंगल्याची झडती घेण्यासाठीं पोलिसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची पार्टी पुण्यास येण्याकरितां मुंबईहून रवाना झाली. सदर पोलिस पार्टी बोरिबंदरावर येऊन पोंचण्याचे आधींच लोकमान्य व केसरीसंस्था यांविषयीं सहानुभूति वाटणाऱ्या पण सर्वांस अज्ञात अशा कोणी एका अपरिचित हितचिंतकानें पुण्यास मॅनेजर रा. धोंडोपंत यांस पुढीलप्रमाणें सांकेतिक श्लेषात्मक अर्जंट तार पाठविली "Toladhada started Be careful"! परंतु चावडीवरील कुळकर्ण्यांच्या उघड्या दप्तराप्रमाणें केसरी ऑफिसचा दरबार खुला व मुक्तद्वार असल्यामुळें आत्मीयत्वाच्या भावानें 'Be careful' या दिलेल्या सावधगिरीच्या इषाऱ्याचा मॅनेजर यांस कांहींच उपयोग होणारा नसला तरी त्यावरून प्रत्येकजण अनपेक्षित व निरपेक्षपणें आपली कर्तव्यकुसुमांजलि लोकमान्यांच्या चरणावर अर्पण करण्यास कसा तयार असे ह्याची कल्पना येते!

(६३) पुणें येथें श्रीजगन्नाथमहाराजांचे वाड्यांत १९२३ चे ऑगस्ट-सप्टेंबरमध्यें श्रीमंत दादासाहेब खापर्डे विलायतेहून आले असतां, येथील त्यांचे मुक्कामांत, ते टिळक—स्वराज्यसंघ—स्मारकाचे एक ट्रस्टी म्हणून, कामानिमित्त त्यांजकडे मी वरचे वर जात असल्यामुळें सहज लोकमान्यांसंबंधी त्यांचे सांगण्यांत आलेल्या कांहीं गोष्टी पुढें देत आहें. ते म्हणाले, "माझ्या मधल्या मुलाचें लग्न कुबेर येथें झालें. बळवंतराव लग्नास आले होते. लग्नसमारंभ आटोपल्यावर वैदिक ब्राह्मणांची संभावना म्हणून त्यांस योग्य दक्षिणा द्यावयाची होती. पण सत्पात्र व अधिकारी ब्राह्मणांची व इतर सामान्य भिक्षुकगण आणि दक्षिणा उपटूं इच्छिणाऱ्या आगांतुकांचीहि सर्व एकत्र खिचडी झाली. यामुळें दक्षिणा वांटण्याची मोठी पंचाईत पडली. बळवंतरावांनीं ही अडचण पाहतांच पूर्वीं कधीं 'आर्क्टिक

होम इन् दि वेदाज' वगैरे पुस्तकांकरितां वेद व वेदांगें यांचा त्यांनीं अभ्यास केला असेल; पण या वेळीं त्यांनीं नेमके संहिता, ब्राह्मण, पद, क्रम, उपनिषदें व उपग्रंथ वगैरेबद्दल केवळ जिज्ञासू म्हणून आपण विचारीत आहों असें त्या ब्रह्मवृंदास दाखवून, कोणासहि अपमान न वाटूं देतां मोठ्या खुबीनें प्रत्येकानें प्रत्येकास कांही ना कांहीं विचारून अशा विलक्षण बुद्धिकौशल्यानें त्यांनीं बाकीचे सर्व गबाळ लोक अगदीं खड्या-सारखे एका बाजूस काढले कीं, तेथें फक्त ऐन विद्वान ब्राह्मण तेवढाच शिल्लक उरला, व त्यांसहि विनंतिपूर्वक कांहीं म्हणावयास सांगून व त्यांपैकींहि जे कोणी कोठें चुकत तेथें आपण मोठ्या खुबीनें पण त्यांस अपमान न वाटेल अशा रीतीनें दुरुस्ती करून, प्रत्येकाच्या अधिकाराच्या तारतम्य बुद्धीनेंच त्यांनीं स्वतः आपल्या हातानें सर्वांस दक्षिणा वांटली !"

(६४) कै. बाबामहाराजांचे पश्चात् त्यांस दत्तक पुत्रक घेण्याचे बाबतींत, श्रीमंत दादासाहेब म्हणतात, मी व बळवंतराव बहुत हिंडलों. पुढें नारायणाच्या कृपेनें, श्रीजगन्नाथमहाराज आम्हास लाभले. पण ताई-महाराज-प्रकरणामुळें आम्हास कोर्टांत जावें लागलें, त्या वेळीं मुकदम्याची तयारी करतांना मला रोजची डायरी लिहिण्याचा माझा परिपाठ असल्यामुळें त्या वेळच्या मी माझ्या डायऱ्या काढल्या, पण कधीं कांहींहि टिपून ठेवण्याचा बळवंतरावांचा शिरस्ता नसतांहि कित्येक दिवसां-पूर्वींच्या शेंकडो गोष्टी त्यांनीं निवळ स्मरणशक्तीनें आपल्या डोक्याच्या जिवंत डायरींतून काढून अगदीं तारीखवार मला सांगाव्यात व त्या नेमक्या माझ्या डायरी-बुकाबरहुकूम जमाव्या हें पाहून त्या महापुरुषाच्या ईश्वर-दत्त बुद्धीच्या देणगीचा मला मोठा अचंबा वाटे !

(६५) श्रीमंत खापर्डे सद्गदित कंठानें वर्णन करून म्हणतात, १९०८ सालीं बळवंतरावांवर खटला होऊन त्यांस रात्रीं शिक्षा देण्याचे आधीं ज्यूरी व जस्टिस दावर आंत निघून गेल्यावर आम्ही सर्व चहा घेण्याकरितां एकत्र जमलों. तेव्हां हंसत बळवंतराव मला म्हणतात, "दादासाहेब ! आजचा रंग कांहीं निराळाच दिसतो. बहुतेक काळ्या पाण्याची तयारी दिसते. हा आजचा आपला बहुतेक शेवटचाच चहा

समजा ! ! ” जन्मठेप काळ्या पाण्याच्या शिक्षेचें भेसूर चित्र अशा उतार वयांत डोळ्यापुढें अगदीं स्पष्ट दिसत असतांहि ‘सतीचें वाण’ घेणाऱ्या लोकमान्यांनीं ‘माझें मरण पाहिलें म्या डोळा’ या तयारीनें शेवटीं केलेल्या दिव्य सिंहनादाचें भावनाप्रधान कवींनीं व लेखकांनीं वर्णन करावें तेवढें थोडेंच होणार आहे !

(६६) १९०५ मध्यें रायगडावर श्रीशिवछत्रपतींच्या उत्सवाकरितां लोकमान्य गेले होते. वाटेंत त्यांना कोणी पुण्यास त्यांच्या चिरंजिवांची प्रकृति फारच बिघडल्याचें सांगितलें. हें ऐकून लोकमान्य थोडे रागानें म्हणाले, “येथून गडावर जाऊन महाराजांचा उत्सव यशस्वी करून परत फिरेपर्यन्त मला घरची कोणी कांहीं बातमी सांगतां कामा नये. काम झाल्यावर घरगुती गोष्टी ऐकून घेतां येतील.”

(६७) सन १९०५ सालीं पुण्यास लोकमान्यांनीं विलायती मालाची होळी केली, हें ऐकून सातारा हायस्कूलचे त्या वेळचे हेडमास्तर कै. रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी (त्यांचें माझें नातें असून आम्हास ते मॅट्रिकचे वर्गास इंग्रजी शिकवीत असत) म्हणाले, “लोकमान्यता मिळावी म्हणून टिळकांची ही सर्व धडपड आहे.” पण पुढें हेच रानडे–गोखल्यांचे चहाते रा. ब. जोशीबुवा पुण्यास पेन्शन घेऊन राहिल्यावर लोकमान्यांचे सहा वर्षांचे रहजेरींत राष्ट्रीय पक्षाचे पुढारी झाले, व शेवटीं अंतकाळीं लोकमान्यांचें पुढीलप्रमाणें स्मरण करीत. “अहो ! तो राजकीय सिद्ध पुरुष—बळवंतरावजी टिळक—मला भेटेल का हो ? आतां या जन्मांत ते मला अभाग्याला कसचे भेटतात ?”

(६८) लोकमान्यांस शिक्षा झाल्यापासून स्वतःच्या अंतकाळपर्यन्त रावबहादुरांनीं लोकमान्यांचे स्मरणार्थ साखर खाण्याचें सोडून दिलें होतें. तसेंच वासुदेवराव जोशी यांचेजवळ सदर रावबहाद्दूर एकदां म्हणाले, “आंकड्यांनीं (Statistics) कोणतीहि गोष्ट सिद्ध करून दिली म्हणजे त्याच्या जोरावर इंग्रज सरकार नमेल अशी आम्हा रानडेप्रभृतींची पहिल्यापासून समजूत असल्यामुळें मी सर्व जन्म या आंकड्यांचे पायीं खर्चीं घातला. पण पुढें लोकमान्य बळवंतरावजींशीं संबंध आल्यामुळें

त्यांच्या राजकीय ज्ञान-स्फुल्लिगानें माझी ही जुनी समजूत समूळ खाक होऊन त्यांचेंच राजकीय धोरण स्वराज्याचा मार्ग अचूक दाखविणारें आहे अशी माझी खात्री झाली."

(६९) येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्यें न्यायमूर्ति रानडयांचे अनन्य भक्त मुंबईचे वासुदेवराव ठाकूर शिक्षक होते. जमल्यास न्यायमूर्तींचें चरित्र अगर निदान त्यांच्या आख्यायिका व माहिती प्रसिद्ध करावी अशी त्यांची इच्छा होती. न्यायमूर्तींचे समकालीन व त्यांचे स्नेही, साताऱ्चे कै. रा. ब. विठ्ठलराव पाठक मास्तर यांजकडून रानडे यांचेबद्दल माहिती आणण्याकरितां मला त्यांनीं साताऱ्यास पाठविलें होतें. पाठक हे मोठे सौजन्यशील व गरीब स्वभावाचे असत. माझें येण्याचें कारण त्यांस मी सांगतांच त्यांस मोठा आनंद झाला. त्यांनीं १८७५ सालापासून जी हकीकत सांगण्यास सुरुवात केली ती रानडे यांचे दहनक्रियेपर्यन्त आणून भिडविली! त्यांत अनेक गोष्टी आल्या. लोकमान्यांबद्दल त्यांचें मत, रानडे, तेलंगादि वगैरे त्या वेळच्या पुढाऱ्यांचें मत व इतर खूपच खूप लोकमान्यांबद्दल त्यांनीं गंमत सांगितली. ती काय काय म्हणून लिहावी? फक्त एकच गोष्ट सांगतों. ते म्हणाले, "एके दिवशीं टिळक-आगरकर सायंकाळीं हल्लींच्या फर्ग्युसन कॉलेजच्या रस्त्यानें वादविवाद करीत चालले होते. वाटेंत माधवरावजी व मी भेटलों. पण वादाचे भरांत आम्हांस त्यांनीं न ओळखून माधवरावजींस घासून टिळक पुढें गेलें, पण बोलले नाहींत हें पाहून मी संतापलों; व मागें वळून 'अहो टिळक' म्हणून हाक मारली; व त्यासरसें टिळक झपाझप पावलें टाकीत परत आले. मी त्यांस झालेला प्रकार सांगतांच 'मी आपणास पाहिलें नाहीं, क्षमा करा. रावसाहेबांपाशीं मी असें वर्तन करीन हें आपणांस वाटलें तरी कसें?' असें म्हणून त्यांनीं लवून अति नम्रपणें माधवरावजींस नमस्कार केला. ते आपल्या वाटेनें व आम्ही आपल्या रस्त्यानें चालूं लागल्यावर मीं माधवरावजींस विचारलें, 'काय हो, टिळकांनीं आतां जें वर्तन केलें, ती लबाडी का खरोखरच मनापासून हो?' माधवरावजी म्हणतात, "छे:, असें कसें म्हणतां? "Both the young men are noble, and

brave and especially, Mr. Tilak is the Hope of India. (हे दोघेहि तरुण फार थोर मनाचे व पराक्रमी आहेत; आणि त्यांतल्या त्यांत विशेषतः टिळक हे देशाचा भाग्योदय करतील असें वाटतें.)"

(७०) सातारा जिल्ह्यांतील बोरखळ गांवीं सदाशिवभटजी ऊर्फ तातू दामले ह्या नांवाचे एक वयोवृद्ध गृहस्थ होते. या वृद्ध गृहस्थास लोकमान्यांबद्दल विलक्षणच प्रेम वाटे. शिक्षा होऊन लोकमान्य मंडालेस रवाना झाल्यावर पुढें कांहीं दिवसांनीं सदर तातूंची प्रकृति फार बिघडली. वात झाला. मात्रा दिल्या, पण शुद्धि येईना. अखेर त्यांचे चिरंजीव त्यांचे अंथरुणावर जाऊन तातूंचे कानांत मोठ्यानें "अहो तातू! टिळक सुटले" म्हणून खूप ज़ोरानें ओरडले तों एकदम "अरे केव्हां?" असें म्हणत तातू शुद्धीवर आले!!

(७१) मुंबईस लोकमान्य एके दिवशीं (१९०७) रस्त्यांतून पायींच चालले होते. तिकडून मोटार आली. एका स्नेह्यानें लोकमान्यांचा हात धरून जरा घाईनें 'बाजूला सरा, समोरून मोटार येत आहे' असें म्हटलें. त्यावर लोकमान्य म्हणतात, 'मोटारीखालीं मरण्याकरितां मी खास जन्मलों नाहीं!'

(७२) सातारा जिल्ह्यांतील कोरेगांव तालुक्यांतील वाघोली गांवीं सरकारी नोकरीवर असलेल्या माझ्या वडिलांस सन १९०५ सालीं मध्यप्रांतांतील नेमस्त पक्षाचे पुढारी व आमचे आप्त कै. रा. ब. वामनराव कोल्हटकर एकदां मुद्दाम भेटण्यास आले होते. तेथील बाळासाहेब भुइटे या भागवतसांप्रदायी मराठा गृहस्थाचे व प्रार्थनासमाजिस्ट सदर रावबहादुरांचें हिंदुधर्मासंबंधानें बोलणें होतां होतां प्रकरण अगदीं घाईवर आलें. इतक्यांत त्यांचेपुढें पोस्टमनानें पुण्याहून आलेलें 'भाला' पत्र ठेवतांच तें हातांत घेऊन संतापानें रावबहादूर म्हणतात, 'हें पाहा, हिंदुधर्माच्या व बाष्कळ धार्मिकपणाच्या नांवाखालीं टिळकांनीं काय वाटेल तें पोरांस शिकवून या पत्राच्या 'ज्वलज्जहाल' म्हणवून घेणाऱ्या एडिटराप्रमाणें तरुणांस मनःपूत भटकण्यास लाविलें आहे. टिळकानीं धर्माचा व देशाचा नुसता खेळ आरंभिला आहे. एकदां आगगाडीच्या एका

दिवसाच्या प्रवासांत एकाच डब्यांत टिळक व मी असतां संबंध चोवीस तासांत त्यांजकडे मीं ढुंकून पाहिलें नाहीं, मग त्यांचेशीं एक अक्षरहि बोलण्याची गोष्ट बाजूसच राहिली." पण पुढें १९१७ सालीं ह्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध रावबहादुरांची स्वारी पुण्यास आल्यावर मला ते विचारतात, "काय रे सर्व दूषितपूर्वग्रह विसरून टिळकांस मला भेटण्याची इच्छा आहे. तेव्हां स्वस्थपणें बोलण्यास ते मोकळे केव्हां असतात?" कालाय तस्मै नमः!

(७३) १९०९ सालची गोष्ट असावी. कै. रावबहादूर नानासाहेब [वामनराव] कोल्हटकर पुणें येथील शनिवार पेठेंतील कै. बापूसाहेब गांधी यांचे वाड्यांत राहात होते. एके मंगळवारीं सकाळीं पुढील ओटी-वर खुर्ची टाकून त्यावर नानासाहेब ब्रशानें दांत घाशीत बसले होते. इतक्यांत केसरी विकणारा मुलगा खूप मोठमोठ्यानें सुरावर 'के–स–री' म्हणत ओरडत आला. त्यास दरडावून रागानें नानासाहेब म्हणतात, "खबरदार पुनः हें पत्र विकण्यास इकडे येशील तर." जवळच उभा असलेला मी हें पाहात होतों. पुढें कांहीं दिवसांनीं एका मंगळवारीं रात्रीं जेवणखाण आटोपून, निजण्याचे आधीं दिवाणखान्याच्या सर्व खिडक्यादारें बंद करून नानासाहेब टेबलावरील मोठ्या दिव्याजवळ खुर्चीवर बसून एकाग्रतेनें केसरी वाचीत बसलेले मी माजघरच्या दारानें, वर जात असतां पाहिलें. ही वेळ बरी आहे असें मनांत आणून चोरट्या पायानें एकदम त्यांच्या टेबलाजवळ जाऊन त्यांस नम्रपणें म्हटलें, "केसरी वाचतां आहांत वाटतें," "होय 'थॉटफुल' लोकांनीं तो वाचावा. कारण—'Tilak's violent method of both thinking and working is quite unsuitable to the youths" असें त्यांनीं म्हटल्यावर मुद्दाम मीच विषयांतर करून खासगी दुसरें कांहीं बोलणें काढलें. असो. लोकमान्यांच्या प्रतिपक्षीयांनीं अव्वलपासून त्यांचेबद्दल करून घेतलेल्या गैरसमजाची व सरकारच्या खुनशी दृष्टीच्या विपारी परिणामाची जीर्ण कात टाकून नव्या स्वरूपांत लोकमान्यांची स्वारी, सहा वर्षांनीं देशांत परत आल्यावर सर्वच मनु पालटला. १९१७ सालीं पुण्यास प्रस्तुत लेखकाचे घरीं

अगत्यपूर्वक येऊन भोजन करून नानासाहेब परत जातांना अधिकारपूर्वक नात्यानें त्यांस म्हणतात—" ही कर्मभूमि आहे. जननिंदेकडे दुर्लक्ष करून अखंड निष्काम बुद्धीनें व निरपेक्षपणें कर्म करणाऱ्या तुझ्या गुरूचा—टिळकांचा—तूं आतां मार्ग सोडूं नकोस ! "

(७४) एके रात्रीं मी टिळकांचेकडे गेलों असतां फर्ग्यूसन कॉलेजकडे सी. आय. डी. पैकीं कोणी एका इसमानें कांहीं विद्यार्थ्यांशीं मारामारी केली हें सांगण्यास कांहीं विद्यार्थी त्यांजकडे आले होते. हातांतील आडकित्त्यानें सुपारी फोडीत लोकमान्य म्हणतात, "एका मनुष्यानें अंगावर एकाच वेळीं एकापेक्षां अधिक माणसें आल्यास सगळ्यांचे वाटेस न जातां त्यांपैकीं प्रथम एकासच जायबंदी करावें. एकास नाकाडावर मारून, दुसऱ्यास तसेंच करावें. हें मारामारींतील बीज आहे."

(७५) एकदां गु. भाऊसाहेब लवाटे यांजपाशीं बोलत असतां त्यांनीं पुढील गोष्ट सांगितली. "दोन प्रहरीं अकरा वाजण्याची वेळ असेल. मी केसरी ऑफिसांत गेलों असतां अगदीं उघडे असून उभें पांढरें गंध लावून लोकमान्यांची स्वारी गच्चीवरून फिरत होती. इतक्यांत खालीं अंगणांत त्यांचे चिरंजीव त्यास दिसले. त्या दोघांस जवळ बोलावून अगदीं कळकळून ते म्हणतात, "अरे तुम्हीं संध्या केली का ? हें पाहा, संध्या केल्याखेरीज, निदान चोवीस नांवें घेऊन व सूर्यास अर्घ्य आणि दहा गायत्री जप तरी केल्याखेरीज, अन्नास स्पर्श करूं नका."

(७६) १९०७ सालाच्या उन्हाळ्यांत लोकमान्य सिंहगडावर असतां दे. लाला लजपतराय यांस अकस्मात् हद्दपार करण्यांत आलें. ही बातमी कळतांच तात्यासाहेब केळकर यांनीं ताबडतोब खालीं येण्याकरितां लोकमान्यांस सिंहगडावर बोलावणें पाठविलें. सायंकाळीं गाडींतून उतरून लोकमान्य गायकवाडवाड्यांत शिरतात तों तिकडून सार्वजनिक सभेचे माजी चिटणीस आप्पासाहेब मांडे येत होते. ते त्यांच्याबरोबर लोकमान्यांच्या घरांत माडीवर गेले. प्रस्तुत लेखक तर लोकमान्यांच्या येण्यावर अगदीं डोळा ठेवून बसला होता. तो त्यांचे पाठोपाठ तेथें गेलाच. आप्पासाहेब उद्वेगानें लोकमान्यांस म्हणतात, लजपतराय हद्दपार झाले. डोक्यावरची

पगडी डाव्या हातानें खुंटाळ्यावर ठेवीत व उजव्या हातानें आंगरख्याचे बंद सुटेनात म्हणून ते तोडीत खवळलेल्या सिंहाप्रमाणें हा पुरुषसिंह उद्गारतो, "लालाजींसारखा देशभक्त हद्दपार होतो, आणि लॉर्ड मिंटो अजून कसा जगतो ?" पण किंचित् थांबून विवेकशक्तीनें देशकाल-परिस्थितीचा 'मध्यबिंदु' छेडून शांतपणें पण जरा निराशेनें हलक्या स्वरांत ते म्हणतात, "या दुर्बल राष्ट्राकडून भलतीच अपेक्षा करणें मूर्खपणाचें आहे."

(७७) सन १९०८ सालीं पुण्यास पिकेटिंगची चळवळ चालू होती; ती मारण्याकरितां रस्ता अडविल्याचें निमित्त करून स्वयंसेवकांस सरकार शिक्षा देई. पोलिसांनीं माझेवरहि असाच खटला भरला होता. खटला चालण्याचे आदले दिवशीं माझे मित्र महाराष्ट्र पत्राचे संपादक ओगले यांसह मी लोकमान्यांकडे गेलों. लोकमान्य ईझीचेअरवर पडले होते. "उद्यां माझा खटला आहे" असें त्यांस मी म्हणतांच एकदम उसळून "कसला खटला ? कोर्टांत जाऊन मॅजिस्ट्रेटाचा कान धरून फाडकन श्रीमुखांत कां भडकावीत नाहीं ? अन्याय करून उलट शिक्षा करतोस, असें त्यांस कां म्हणत नाहीं ? तुम्हा तरुणांचें रक्त अन्यायाच्या चिडेनें तापत कसें नाहीं ?" हें ऐकून आम्ही लहान तोंड करून माना खालीं घालीत जिन्याच्या पायऱ्या उतरूं लागलों. ४–६ पायऱ्या खालीं आलों, तों 'अहो वर या' असें टिळक गच्चींत येऊन म्हणाले. आम्ही आंत गेल्यावर ते म्हणाले "आतां असें कांहीं करूं नका हो, नाहीं तर म्हणाल टिळकांनीं सांगितलें म्हणून आम्हीं केलें. हें जातीचेंच लागतें."

(७८) बंगालच्या फाळणीमुळें राष्ट्रांत क्षोभ झाला खरा, पण खालच्या वर्गापर्यंत ही चळवळ कशी न्यावी, हें विचारण्याकरितां एके रात्रीं हल्लींचे केसरीचे सहसंपादक वासुदेवराव भावे वगैरे मंडळींसह मी लोक-मान्यांकडे गेलों असतां ते म्हणतात "राष्ट्राकरितां फकीर बनण्यास तुम्ही तयार आहां काय ? तसे असाल, तर राष्ट्रोन्नति झालीच पाहिजे. नुसता सल्ला काय विचारतां ? बुद्धिवान ब्राह्मणांचीं मुलें महाराष्ट्रांत रामदासांच्या

शिष्याप्रमाणें फकीर म्हणून हिंडण्याची वेळ आतां आली आहे. उद्योगास लागा. ”

(७९) १९०८ चे पिकेटिंगचे चळवळीचे वेळीं पुण्यास किंग या नांवाचे पोलिस सुपरिंटेंडेंट होते. ‘गुत्त्यावरून तुम्ही चालते व्हा’ असें त्यांची बायको स्वयंसेवकांस सांगते असें कोणी स्वयंसेवक लोकमान्यांस सांगण्यास आला. लोकमान्यांजवळ बसलेले कै. दत्तोपंत लिमये म्हणाले “ही कोण किंगची बायको आम्हास सांगणार ?” लोकमान्य म्हणतात “ कोण म्हणजे ? किंगची बायको क्वीन ! ”

(८०) लोकमान्यांच्या मुलीचें लग्न होतें. ते एका गृहस्थास भोजनाचें आमंत्रण देण्यास गेले. सदर बडे गृहस्थ त्यांस म्हणाले “ मी जेवावयास आलों असतों; पण आपण काय इंडियन लोक ! इंग्रज आपणांवर उगाच नाहीं राज्य करीत ! तुम्ही जेवावयास बोलावणार ११ वाजतां आणि मंडळी जेवावयास बसणार १ वाजतां.” लोकमान्य म्हणाले “तुम्ही ११ वाजतां या, आणि ११ चे ठोक्यास पानें न बसलीं तर अपमान झाला म्हणून निघून जा, मग तर झालेंना ? साहेबच तेवढें वेळेचें महत्त्व जाणतो, आणि आम्ही काय सर्व धनगर आहोंत ?’ असें म्हणून अगदीं यंत्राप्रमाणें दुसरे दिवसाचा बेत राहिला, व हातामध्यें घड्याळ घेऊन अगदीं ११ चे ठोक्याला हर हर महादेव केला ! तरी वरील बड्या गृहस्थांचा पत्ता नाहीं. सुमारें पावणेबारा वाजतां ही स्वारी आली, तों सर्व पंगत उठून आंचवण्यास चालली होती. हें पाहून सदर बडे गृहस्थ म्हणाले, बळवंतराव लाजविलेत बुवा !

(८१) जगन्नाथ महाराज प्रथम गायकवाड वाड्यांतच लोकमान्यांजवळ राहात. त्यांस जवळ घेऊन लोकमान्य विनोदानें म्हणतात, “ अहो, तुम्ही महाराज ! महाराजांस उपदेश कोणी करावा ? पण सदुपदेश कोणींहि कोणास करावा हें ध्यानीं घ्याल तर मी काय म्हणतों याचा विचार करा. या लहान वयांत तुम्ही शरीर न कमवाल तर पुढें तुमचें कसें होणार ? मी लहानपणीं शरीराकडे थोडें लक्ष दिलें म्हणून आजवर त्या जोरावर काम करीत आहे. ‘Sound mind in a

sound body' हें तुम्ही तरुण लोक कसें विसरतां ? याच वयांत शरीरसंपत्ति मिळवाल तर त्या भांडवलावर पुढें जगाल. उद्यांपासून मेहनतीस सुरुवात करा."

(८२) कांहीं मित्रमंडळीबरोबर राजगड, तोरणा वगैरे ठिकाणीं सफर करण्यास मी गेलों होतों. या मावळी डोंगराळ मुलुखांतून जात असतां वाटेंत लोकांनीं आम्हांस विचारावें कीं, पुण्याचा राजाटिळक—खुशाल आहेना ? तोरणा–राजगडचे पायथ्याखालच्या गांवांतील लोकांनीं सांगितलें कीं, मागेंच टिळकमहाराज हे किल्ले पाहून गेले आहेत.

(८३) एका स्नेह्यास घेऊन मी लोकमान्यांकडे गेलों होतों. सदर स्नेह्याचा आजन्म ब्रह्मचारी राहून राष्ट्रसेवा करण्याचा विचार होता म्हणून या बाबतींत लोकमान्यांचा काय सल्ला मिळतो याकरितां तो त्यांस विचारतो, "आजन्म ब्रह्मचर्य राहणें शक्य आहे काय ? व तसें करून देशसेवा करूं काय ? " लोकमान्य ताडकन् म्हणाले, "घरीं जाऊन ताबडतोब लग्नाचा विचार ठरवा. अहो ! स्वत:च्या आत्मविश्वासाच्या जोरावर ज्या गोष्टी करावयाच्या असतात त्यासंबंधानें जो दुसऱ्यास विचारतो, याचा अर्थच हा कीं, तो तितक्या प्रमाणांत त्या कार्यास नालायक असतो. तुमच्याप्रमाणेंच कांहीं तरुण मजकडे येऊन अमुक अमुक पराक्रमाच्या गोष्टी करूं का, म्हणून मला विचारतात. अशा सर्वांस मी नालायक दुर्बल म्हणून परत पाठवितों. कारण खरा पराक्रम करणारा पुरुष 'पराक्रम करूं का' म्हणून विचारीत नसतो. उमलणाऱ्या फुलानें कधीं कोणाचा सल्ला घेतला आहे ? "

(८४) १९०९ च्या मार्च महिन्यांतील एके दिवशीं साताराचे नजमुद्दीनखानसाहेब हे सातारा येथील मुसलमान बंधूंच्या उर्दू शाळेच्या फंडास पुणें येथील सर्व पक्षीय पुढारी मंडळीकडून द्रव्याची मदत मिळावी म्हणून दे. तात्यासाहेब केळकर यांस विनंति करण्याकरितां मुद्दाम आले होते. सदर मुसलमान पुढाऱ्यास येथील सात आठ प्रसिद्ध गृहस्थांकडे घेऊन जाण्यास तात्यासाहेब यांनीं मला सांगितलें. म्हणून मी त्यास प्रथम संगमाश्रमांतील भीष्माचार्यांकडे—डॉ. भांडारकर यांजकडे—घेऊन गेलों. या

वेळीं ते आरामखुर्चीवर पडून रीडर (वाचण्यास ठेविलेल्या माणसाकडून) ते पुस्तक वाचून घेत होते. एके काळीं मीहि सरसाहेबांचा अल्पकाळ वाचक असल्यामुळें मी डॉक्टरसाहेबांस बरोबरच्या पाहुण्यांची ओळख करून दिल्यावर जरा इकडे तिकडे बोलणें झालें. इतक्यांत त्यांच्या गड्यानें 'टाईम्स' पत्र आणून दिलें. डॉक्टरसाहेबांची त्याजवर नजर जातांच भेटीस आलेल्या गृहस्थांकडेहि त्यांचें टाईम्सच्या दर्शनानें दुर्लक्ष होऊन आतुरतेनें "टाईम्स काय म्हणतो, अगोदर पाहा" असें म्हणून तो वाचण्यास सांगितला. 'वाचकानें' कांहीं तारा वगैरे गरमागरम मजकूर वाचल्यावर "रत्नागिरी येथें केवळ खासगी जागेंतहि टिळकांचे फोटो वगैरे लावण्यास सरकारनें सक्त मनाई केली आहे" हा मजकूर वाचून दाखवितांच डॉक्टरसाहेब एकदम दचकल्यासारखे झाले व रागानें म्हणाले, "काय, सरकारास म्हणावें तरी काय? जेथें ज्याचा जन्म झाला तेथें त्याच्या चित्रास बंदी! शहाणें सरकार खास चुकतें आहे. Though myself and Tilak do not worship the same idol in the same temple yet I want the man because he is a patriot of purest heart without alloy (टिळकांचें व माझें ध्येय व मार्ग भिन्न असले तरी बावनकशी सोन्याप्रमाणें तो देशभक्त परमशुद्ध असल्यामुळें आम्हास तो हवा आहे)." असें म्हणून तपोवृद्ध डॉक्टरसाहेब पुढे म्हणतात "शिवाय भट्टींत भाजलेल्या गाडग्याचा जसा खण खण आवाज होतो तसा टिळकांचा प्रकार आहे!" यावर नजमुद्दीन साहेब म्हणाले "चित्रास बंदी याचें आश्चर्य कसलें? कारण ज्या देशाची ज्यानें सेवा केली त्या देशाच्या बाहेर सरकारनें घाडावें हा कोठला न्याय?" पण हें म्हणणें नेमस्त वृद्ध डॉक्टरसाहेबांस न पटून ते म्हणाले "नाहीं, न्यायी हायकोर्टानें जो न्याय दिला तोच खरा!"

(८५) १९०९ सालीं एके दिवशीं पुणें येथें सोट्या म्हसोबाजवळ जोशी यांचे वाड्यांत मध्यप्रांतांतील नेमस्ताग्रणी कै. रा. ब. वामनराव ऊर्फ नानासाहेब कोल्हटकर यांचे घरीं एका प्रसंगीं मी भोजनास गेलों होतों. रा. रामचंद्र भिकाजी जोशी व प्रो. दत्तोपंत घारपुरे हेहि तेथें भोजनास

आले होते. जेवण चालू असतां रामभाऊ जोशी म्हणाले 'तिकडे छिंदवाड्याचे तुरुंगांत अच्युतराव विलक्षण हाल भोगीत असतां येथें 'टिळकांची' मात्र मारे चैन चालू आहे. धन्यास धत्तुरा आणि चोरास मलिदा म्हणतात तो असा.' हें ऐकून मला फार राग आला व मीहि बराच बोललों. तरी रामभाऊ म्हणतात 'सरकारास आंतून शरण गेल्याखेरीज एरवीं टिळकांची अशी चैन चालली नसावी.' तापलेल्या तेलाप्रमाणें हे शब्द कानीं पडतांच माझा संताप असह्य होऊन मी तसाच पंक्तींतून तडक उठून गेलों. रात्रीं मला माडीवर बोलावून एकांतांत नानासाहेब म्हणतात "अरे, तूं इतका तापट असशील अशी मला कल्पना नव्हती. अर्धपोटी तूं पंक्तींतून उठून गेलास हें बरें केलें नाहींस. ज्या केवळ टिळकांच्या शिकवणीमुळें आमच्या अच्युताचें (संदेशकार अच्युतराव कोल्हटकर) व तुझ्याहि आयुष्याचें खोबरें झालें त्या टिळकांचेबद्दल आम्हास राग आला तर आश्चर्य काय ? ज्याच्या उपदेशानें अनेकांच्या संसाराचे धिंडवडे निघाले त्याच्याबद्दल जरा कोठें कोणीं प्रतिकूल बोलले कीं, तुम्ही तरुण असें डोकें फिरवून घेऊं लागलां तर मग त्यांच्याविषयीं आमच्या रागास सीमाच नसावी ! टिळक विद्वान् आहेत, बुद्धिवान् आहेत, देशभक्तहि असतील व तुमच्या दृष्टीनें त्यांचे मार्ग राष्ट्रोन्नतिकारकहि असूं शकतील; पण अविचारानें शेंकडों तरुणांचीं डोकीं त्यांनीं फिरवून त्यांस भलत्याच मार्गास लावून त्यांजवर अवलंबून असलेल्या शेंकडों कुटुंबांचा व नाजूक सामाजिक कल्पनांचा त्यांनीं संहार केला आहे हें लक्षांत येऊनच रामभाऊ जोशी यांनीं जेवतांना तसे उद्गार काढले असावेत. बाकी टिळकांच्या खरेपणाविषयीं, दानतीविषयीं व त्यांच्या 'सिन्सिरिटी'विषयीं आमचे रामभाऊच काय पण टिळकांच्या शत्रूंसहि शंका घेण्यास जागा नाहीं. त्यांचे बाबतींत प्रत्यक्ष आमच्यासारख्यांचींहि मतें आतां दिवसेंदिवस आस्ते आस्ते बदलूं लागलीं आहेत हें तूं लक्षांत ठेव ! पण टिळक म्हटलें कीं, त्यापुढें स्तुतीचेच शब्द आले पाहिजेत असें तुम्हां तरुणांचें अगदीं ठरून गेलेलें आहे. पण ज्यानें न्या० रानड्यांस विरोध केला ती आठवण झाली म्हणजे अजूनहि आम्हास टिळकांचें स्मरण अगदीं दुःसह होतें आणि

म्हणूनच अधूनमधून रामभाऊसारखे लोक फटकन् अविचारानें कांहीं तरी बोलण्याचे भरांत भलतेंच बोलून जातात इतकेंच काय तें ! "

(८६) सन १९११ च्या ऑगस्टमध्यें, म्हणजे लोकमान्य मंडालेस असतां, अमेरिकेहून बॅ० मायरन एच्. फेल्प्स हे पुणें येथें येऊन गायकवाड-वाड्यांत उतरले होते. या पहुण्यांची बडदास्त ठेवण्याचें काम तात्या-साहेब केळकर यांनीं माझेकडे सोंपविलें होतें. सदर साहेब वृद्ध व ज्ञान-तृष्णार्त असून प्राच्य विद्याभिलाषी व आर्यधर्म आणि संस्कृति यांचे मोठे चहाते असल्यामुळें संपूर्ण आर्यावर्तांत प्रवास करण्याकरितां ते मुद्दाम इकडे आले होते. त्यांचें 'सार्वजनिक सभेंत' व्याख्यान झाल्यावर महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांचेकडे जाऊन ब्रह्मविद्या, योगशास्त्र, प्राणायामविधि वगैरेसंबंधीं त्यांच्याशीं त्यांनीं वाटाघाट केल्यावर एखादें हिंदु देवालय पाहण्याची त्यांनीं इच्छा दर्शविल्यावर त्यांस मी श्रीतुळशीबागेंत घेऊन गेलों. मुख्य सभामंडपांत आपणास जातां येणार नाहीं असें मी त्यांस विनयपूर्वक सांगितल्यावर त्यांस काय वाटलें न कळे, धोतर नेसलेले ते साहेब, मंडपाच्या पायरीवर ठेविलेला आपला पाय चटकन् खालीं घेऊन व शुभ्र धोतराच्या पुढील सोग्यानें ती पायरी झाडून कांहीं वेळ स्तब्ध होऊन मला म्हणतात "या विसाव्या शतकांत तुमच्या देशांत अद्याप इतकें पावित्र्य व शुचिर्भूतपणा टिकलेला पाहून जगांतील नष्टप्राय होणाऱ्या पावित्र्याबद्दल मला आतां तितकें निराश होण्याचें कारण नाहीं" असें म्हणत तेथेंच उभ्या असलेल्या एका गायीच्या चाऱ्याकरितां म्हणून त्यांनीं माझेजवळ दोन रुपये दिले ! नंतर हिंदुधर्मा-संबंधानें बरेंच व फार संस्मरणीय असें ते बोलले; पण तें सर्व प्रकृतस्थळीं अप्रस्तुत म्हणून सोडून देऊन फक्त लोकमान्यांसंबंधीं त्यांनीं काढलेले उद्गारच देणें रास्त आहे. मीं त्यांस विचारल्यावरून ते म्हणाले "That great man's world-wide fame and his antiquarianism brought me here, especially to this part of the country. Your holy land has ever produced great men among whom we reckon Mr. Tilak. Men like Tilak are born for the world's progress and not merely for their own land."

(या थोर पुरुषाची त्रिखंड कीर्ति ऐकून व त्यांची संशोधक बुद्धि पाहूनच मी या देशांत—विशेषत: पुणें—येथें आलेलों आहे. तुमच्या पवित्र भूमींत आजपर्यंन्त जीं मोठीं माणसें निपजलीं त्यांतच टिळकांची आम्ही गणना करतों. टिळकांसारखीं माणसें हीं केवळ आपल्या देशाकरितांच जन्मलेलीं नसून तीं सर्व जगाच्या प्रगतीकरितांच अवतीर्ण झालेलीं असतात.) पुढें साहेब मजकूर हे मुंबईचे गाडीनें जाण्याचें ठरलें, तेव्हां त्यांचा फोटो घेण्याची वाड्यांतच तयारी केली असतां ते मला म्हणाले, " I could be more glad if I were photoed along with my host—Mr. Tilak in whose sad absence I was hospitably entertained. However, I shall be pleased to be taken in even without his person, with his mere photo !" (ज्यांच्या घरीं मीं उतरलों त्या टिळकांच्या पश्चात् माझें आदरातिथ्य योग्य झालें तरी त्यांचे बरोबर माझा फोटो घेतला गेला असता तर मला फार आनंद झाला असता. तरी पण आतां तुम्ही माझा फोटो घेणारच तर स्वत: टिळक नसले तरी निदान त्यांच्या फोटोसहित माझा फोटो तुम्ही घेतल्यास मला फार बरें वाटणार आहे.) म्हणून लोकमान्यांची तसबीर मध्यें ठेवून एका बाजूस फेल्प्ससाहेब व दुसऱ्या बाजूस तात्यासाहेब केळकर असे बसून फोटो घेण्यांत आला. सदरहु फोटो गायकवाड वाड्यांत थोरल्या दिवाणखान्यांत हल्लींहि पाहावयास सांपडतो.

(८७) क्रॉफर्ड-प्रकरणांत सांपडलेले फलटण वगैरे संस्थानांचे माजी कारभारी रावसाहेब शंकर भालचंद्र बापट हे लोकमान्यांचे एक सहाध्यायी असल्याचें कळल्यावरून मी त्यांजकडे लोकमान्यांच्या आठवणी मागण्याकरितां गेलों होतों. तेव्हां ते म्हणाले, "बळवंतराव व मी एका वर्गांत असे कधीं नव्हतों. तथापि एकाच वेळीं कॉलेजामध्यें मात्र होतों. ते वरच्या वर्गांत होते. बळवंतरावांचा व आण्णासाहेब देशपांडे (आठवण नं. ३ पाहा) यांचा जसा संबंध तसा आगरकर यांचा व माझा संबंध असे. टिळक–आगरकर यांचा पहिल्यापासूनच सामाजिक बाबतींत मतभेद होऊन नेहमीं वादविवाद चाले. कॉलेजांत टिळक म्हणजे एक अगदीं पुंड असे होते " असें म्हणून

त्यांनीं कांहीं मजेदार गोष्टी सांगितल्यावर ते म्हणाले "त्या वेळच्या वादविवादांतहि आपली संस्कृति, चालीरीति, धर्म, परंपरा वगैरेबद्दल त्यांचा अभिमान विशेष दिसून येई; व मुख्य गोष्ट म्हणजे, इंग्रज सरकारच्या खऱ्या स्वरूपाची कल्पना त्या वेळींच त्यांना आलेली होती." यानंतर कांहीं किरकोळ गोष्टी सांगितल्यावर रावसाहेब म्हणतात, "१८९१–९२ सालीं एकदां आम्हीं कांहीं मामलेदार मंडळींनीं मजेनें सिंहगडाची ट्रिप केली. त्या वेळीं बळवंतरावहि आमचेबरोबर आले होते. पण ते असे हट्टी कीं, तेथील स्वयंपाक ओवळ्यानें होत आहे हें पाहत असतांहि व आम्ही सर्व मंडळी त्यांस चिडवीत होतों तरी त्यांनीं जेवतांना मुकटा नेसण्यास कमी केलें नाहीं!" नंतर क्रॉफर्ड प्रकरणांत त्यांनीं केलेल्या अपूर्व मदतींचें वर्णन करून बापटसाहेब म्हणाले "एखाद्यानें त्यांचेवर एकदां भार टाकला, म्हणजे आत्मलिंगहि देणाऱ्या शंकराप्रमाणें बळवंतराव त्याचेकरितां काय वाटेल तें करीत! लोकांस माहीत नाहीं कीं, बळवंतरावांस मनांतून सामाजिक सुधारणा अवश्य हवी होती, आणि त्यामुळें ते खासगी वादविवादांत सहजच अनुकूल बोलत. पण दुसरे दिवशीं पाहावें तों केसरींत निराळाच प्रकार, हें पाहून बापटसाहेब म्हणतात, "आम्ही त्यांस किंचित् रागानें म्हणावें, 'बळवंतराव, हें काय? असें दुटप्पी तुमचें वर्तन कां?" यावर ते म्हणत 'राजकीय बाबतींत मनानें आज मी बंडखोर आहे; तथापि वर्तमान पत्रांत, आपल्या लोकांची तयारी पाहूनच, जसा मी लिहितों व पाऊल पुढें टाकतों, तसेंच सामाजिक बाबीचेंहि आहे. जी गोष्ट आज करण्यास मी एकटा तयार तीच मला आपल्या समाजाची पात्रता व शक्ति माहीत असतांहि, त्यावर लादणें अनिष्ट व अहितकारक वाटते. ही साधी गोष्ट तुम्हास कशी कळत नाहीं?' आधीं सामाजिक कीं आधीं राजकीय? हा वाद त्या वेळीं प्रामुख्यानें चाले. तेव्हा 'राजकारणाशिवाय—स्वराज्याशिवाय सर्व फुकट आहे' हें त्यांनीं त्या वेळीं दिलेलें उत्तर आज सर्वसंमत होऊन अखेर खरें ठरलें. यामुळें त्यांस आपल्या वयाच्या पंचविशींत कळलेली गोष्ट आज इतरांच्या साठींत कळते हें पाहून खरोखरच ती एक विभूति होऊन गेली असेंच आम्ही समजतों!"

(८८) १९०८ सालच्या केसरीवरील खटल्यांतील बहुतेक सर्व आक्षिप्त लेख रा. खाडिलकर यांनींच लिहिलेले होते हें आतां सर्वश्रुत आहे. त्यासंबंधानें कै. दत्तोपंत लिमये (केसरीचे उपसंपादक) यांच्याशीं एकदां सहज बोलत असतां लोकमान्य म्हणाले "आमचे खाडिलकर मराठी चांगलें लिहितात यांत शंका नाहीं; पण केळकरांच्याप्रमाणें चांगलें लिहूनहि अंगावर बाजू आल्यास तें 'डिफेन्ड' कसें करतां येईल हें संधान त्यांस राखतां येत नाहीं; आणि हा तोल सांभाळणें हेंच तर तारेवरची कसरत करण्यासारखें अवघड काम आहे."

(८९) लोकमान्यांस एकदां सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटीमध्यें जावें लागलें. त्या वेळीं डॉ. मुंजे त्यांस हंसत थट्टेनें म्हणाले, बळवंतराव जपून चला. तेथें कदाचित् दगाबिगा (Constitutionally and Politically) होण्याचा संभव." यावर लोकमान्य म्हणतात, "नामदार गोपाळराव गोखल्यांसारख्याच्या हातून मरण्याकरितां (Constitutionally and Politically) मी जन्मास आलेलों नाहीं, लक्षांत ठेवा!!"

(९०) गुरुवर्य भाऊसाहेब लवाटे यांनीं एकदां सांगितलेल्या गोष्टीची येथें आठवण झाली. ती अशी— सुरतेची राष्ट्रीय सभा उधळली गेली, त्या वेळच्या दंगलींत कोणी एका गोखले पक्षीय नेमस्तानें बळवंतरावांचे अंगावर फेंकण्याकरितां खुर्ची उचलली, हें ना. गोखले यांनीं पाहतांच त्वेषानें त्यांचे हातून त्यांनीं ती घेऊन म्हटलें "In case you touch his hair bloodshed is certain. (जर त्या पुरुषाच्या केंसाला तुम्ही धक्का लावाल तर येथें निःसंशय रक्तपात होईल.)"

(९१) पुढें बळवंतरावांस अगदीं याचे उलट म्हणजे तुमचे अंगावर खुर्ची फेंकण्यास ना. गोखले यांनीं कोणा एकास सांगितलें असें कोणीं सांगतांच, त्यांस वस्तुस्थिति कांहींहि माहीत नसतांहि ते म्हणाले 'छट! कोणी मला काय वाटेल तें सांगो; गोपाळरावांची माझे बाबतींत असें करण्याची छातीच नाहीं!'

(९२) षट्संवत्सरांचा वनवास भोगून लोकमान्य परत आल्यावर आपल्या गैरहजेरींत गुलाबाच्या ताटव्यांच्या ठिकाणीं स्मशान झाल्यासारख्या

आपल्या देशाच्या राजकीय स्थितीकडे पाहून तत्परिस्थित्यनुरूप त्यांनीं धोरण ठेविलें. लोकांस कदाचित् आठवण असेल कीं, ते सुटून आल्यावर मुंबई-सरकारानें एक खासगी गुप्त पत्रक काढून सरकाराशीं संबंध असलेल्या सर्व लोकांस तें पाठवून, लोकमान्यांस " वाळींत " टाकलें होतें. "जोंपर्यंत टिळक आपलें ठरीव राजकीय धोरण बदलण्यास तयार नाहीं तोंपर्यंत He will be looked upon as an enemy of the British Empire (ब्रिटिश साम्राज्याचे ते शत्रु समजले जातील) असें म्हणून त्यांच्याशीं वरील लोकांनीं कोणत्याहि प्रकारचा संबंध (केवळ भेट घेणेंहि) ठेवतां कामा नये " असें सदर पत्रकांत म्हटलें होतें. ही अडचणीची परिस्थिति जाणून मर्द, धोरणी व गनिमी काव्याच्या मराठ्यास शोभेल असेंच त्यांनीं भाषण केलें व पहिला लेख लिहिला; पण त्यांतील सरकाराशीं राजनिष्ठ राहण्याबद्दलच्या मजकुराबद्दल त्यांच्या जुन्या स्नेह्यांनीं त्यांस फार दोष दिला. त्यावर ते म्हणाले, "मला तें भाषण अगर तो लेख बोलण्यास व लिहिण्यास महाराष्ट्रानें व विशेषत: या लोकांनींच भाग पाडलें. माझे पश्चात् सहा वर्षांत जर सर्व मृतवत् झालें नसतें, कांहीं तयारी केली असती, तर हा प्रसंग माझेवर कां येतां ? सहा वर्षांत यांनीं कांहीं कामगिरी करून दाखविली असती, तर हल्लीं लढाईचा योग्य फायदा घेऊन कोणाची वाट न पाहतां हातांत बंडाचें निशाण घेऊन मीच पुढें झालों असतों ! मग व्यर्थ नांवें ठेवण्यांत अर्थ काय ?"

(९३) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर त्यांचे कनिष्ठ जामात डॉ. साने लोकमान्यांस एकदां म्हणाले "आपण आपलें सर्व आयुष्य राज-कारणाकरितां खर्ची घातलें हें ठीकच झालें; पण आतां यापुढें अनंतकाल आपली कीर्ति मागें ठेवणारे आपले ग्रंथ सिंहगडासारख्या एकांतवासाच्या ठिकाणीं राहून पूर्ण करावेत " असें मला वाटतें. यावर लोकमान्य म्हणतात " स्वदेश पारतंत्र्यांत असतांना ग्रंथलेखनासारखीं कामें हीं मुख्य नसून फुरसतीच्या अगर तुरुंगवासांतील अपरिहार्य विश्रांतीच्या काळांतच करण्या-सारखीं असतात. या हतभागी देशाची विपन्न स्थिति पाहून रोजचें राजकारण टाकून दुसऱ्या उद्योगास लागणें म्हणजे कुरुक्षेत्रावरील अर्जुना-च्या मनोदौर्बल्याचें अनुकरण करणेंच होय. " कीर्तीचाहि 'स्वार्थत्याग'

करणाऱ्या या कर्मयोग्याचें चरित्र पतित राष्ट्राचा उद्धार केल्याखेरीज कसें राहील ?

(९४) एकदां पंढरपुरास जाणारा कोणी एक म्हातारा मराठा वारकरी लोकमान्यांकडे आला. त्यानें यापूर्वी त्यांस कधींहि पाहिलें नव्हतें. लोकमान्य या वेळीं आरामखुर्चीवर उभें पांढरें गंध लावून उघडेच पडले होते. तो त्यांस पाहून, ज्यांची कीर्ति मी इतके दिवस ऐकत आहें. ते हेच का असें म्हणून अत्यंत आश्चर्यचकित होऊन हात जोडून त्यांच्यापुढें येऊन बसला. 'कोठून आलां ? कोठें जावयाचें आहे ? ' वगैरे मामुली प्रश्न लोकमान्यांनीं त्यांस केल्यावर तो म्हणतो, "मी आतां म्हातारा झालों आहे. तुमचें नांव आज लई दिवस ऐकतों आहे. तुम्हांस डोळ्यांनीं एकदां बघावं व तसंच पुढं पंढरीस जावं म्हणून आलों आहे. महाराज. पण तुम्हाला जिवांतली एक गोष्ट विचारूं का ? " "खुशाल काय वाटेल तें विचारा" असें लोकमान्य म्हणाल्यावर मोठ्या भक्तीनें आलेला म्हातारा अगदीं काकुळतेनें त्यांस विचारतो "तुम्ही आता महाराज, कैक वेळां या इंग्रजांच्या तुरुंगांत गेलां हें तुम्हांस कोणीं शिकविलें ? " लोकमान्य अत्यंत शांत व गंभीर मुद्रेनें सदर वृद्ध वारकऱ्याची समजूत पटेल अशा तऱ्हेनें उत्तर देतात "हें पाहा, कोणीहि मला शिकविलें नाहीं. माझ्या स्वभावाप्रमाणें मी हें करीत आहे इतकेंच. यांत तुम्हास विशेष तें काय वाटतें ? तुम्ही इतक्या लांब, पायीं या वयांत, भक्तीनें पंढरीस जातां; हें करण्यास तुम्हास कोणीं कधीं सांगितलें आहे ? तसाच माझ्या आवडीचा मीहि हा एक उद्योग करतों इतकेंच." हे ऐकून प्रेमाश्रूंनीं डोळे भरून येऊन तो भक्तीवान म्हातारा लोकमान्यांच्या पायावर डोकें ठेवण्यास पुढे सरसावला; पण त्यास तसें न करूं देतां त्यांनीं त्यांस निरोप दिला.

(९५) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर केसरींत त्यांची मुलाखत प्रसिद्ध करण्याकरितां गु. तात्यासाहेब केळकर त्यांजकडे गेले. तात्यासाहेब त्यांस प्रश्न विचारीत, लोकमान्य त्यांचें उत्तर देत आणि प्रस्तुत लेखक तें लिहून घेई. त्यांत सहज थट्टेनें तात्यासाहेबांनीं त्यांस विचारलें 'मग. सुपारीचें कसें काय होई ? ' लोकमान्य म्हणतात, "अहो, सुपारी म्हणजे कांहीं प्राणवायू नव्हे कीं, तिजवांचून जगणें अशक्य आहे. मुख्य मनाचा निश्चय

असला म्हणजे सर्व झालें. माझे इतके दिवसांची ती संवय, पण मला तिची आठवणहि झाली नाहीं."

(९६) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यानंतर मिसेस बेझंट व मद्रासचें सुब्बाराव हे काँग्रेसचे बाबतींत राष्ट्रीय व मवाळ यांचा समेट करण्याकरितां पुण्यास आले होते. त्या वेळीं बाईशीं काय बोलावयाचें, त्यांस आपला निरोप काय सांगावयाचा असें विश्वासांतील एका प्रमुख गृहस्थानें लोकमान्यांस विचारलें. त्यावर ते म्हणाले, 'देशास स्वराज्य मिळविण्याकरितां शत्रूंस वेळप्रसंगीं नमस्कार घालण्यापासून तों राज्यक्रांतिकारक कोणताहि शेवटचा बंडखोरीचा अति जालीम उपाय बाईस सुचेल तो अवलंबण्यास मी तयार आहे' असें सांगा.

(९७) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यापासून बरेच थकले होते. ते बाहेर कोठें चालले तरी त्यांचे भाचे बाबासाहेब विद्वांस अगर दुसरें कोणी तरी त्यांचे बरोबर असत. कै. आण्णासाहेब पटवर्धन यांचेकडून कांहीं एक काम त्यांना करवून घ्यावयाचें होतें व हें त्यांनीं जवळच्या मंडळींवर सोंपविलें होतें. पण त्यांचे विस्मरणामुळें कां आळसामुळें त्यांचें हातून तें झालें नाहीं. दोन प्रहरीं १२ वाजतां त्यांनीं तें करून आलां कां म्हणून सदर मंडळींस विचारलें. 'नाहीं' असें उत्तर मिळतांच स्वारी ताडकन् ईझीचेअरवरून उठली, अंगांत आंगरखा चढविला, डोक्यावर पगडी ठेवून उपरणें सावरीत कोणी बरोबर येईल न येईल याची वाट न पाहतां अगदीं उन्हाचे पायींच, एखाद्या तीराप्रमाणेंच, सपाटयानें आण्णासाहेबांचे घरीं ते जाण्यास निघाले. 'अडचाव्या' मजल्यावर गु. केळकर मजकूर सांगत होते. केळकरांनीं लोकमान्यांस झपाटयानें जात असतां खिडकींतून पाहतांच ते म्हणाले "हें पाहा, बळवंतरावांमध्यें जें कांहीं आहे तें हें आहे. काम म्हटले कीं त्यांना कसा संचार होतो!" लगेच केळकर मला म्हणाले "जा. बळवंतराव एकटे चालले आहेत त्यांचेबरोबर जा, जा." मी चटकन् जिना उतरून त्यांस दरवाजापुढील सडकेवरच गांठलें. मला पाहतांच ते किंचित् हंसत म्हणाले "तूं कशाला आलास? तुझे दोन पाय मला देऊन मला चार पायांचा बनवितोंस काय?"

(९८) महर्षि आण्णासाहेब पटवर्धन समाधिस्त झाले त्या वेळीं त्यांची प्रेतयात्रा सकाळीं दहा वाजतां निघून सायंकाळीं सहाचे सुमरास श्रीओंकारेश्वराचे स्मशानभूमींत पोचली. वार्धक्यामुळें चालतांना लोकमान्यांचे पाय लटपटत तरी आरंभापासून शेवटपर्यंत शवाचे पालखीबरोबर लोकमान्य चालले होते. मध्यंतरी त्यांचे भाचे बाबासाहेब विद्वांस यांनीं त्यांना 'घरीं चला, कांहीं तोंडांत टाकून पाणी पिऊन मग पुन: या' असें एकसारखें वारंवार म्हणावें; पण त्यांनीं त्याकडे लक्षच देऊं नये. अखेर चार-पांच वाजण्याचे सुमारास लोकमान्य अगदीं थकून गेल्यासारखे दिसूं लागल्यामुळें कळवळा येऊन प्रेममूलक रागानें बाबासाहेब त्यांस म्हणतात "आज तुम्ही मांडलें आहे तरी काय? कां आण्णासाहेबांच्या पाठोपाठ जावयाचें आहे? थोडें खाऊन पाणी प्यायल्याखेरीज मी तुम्हास आतां पुढें जाऊन देणार नाहीं." हे ऐकून गंभीर स्वरानें लोकमान्य म्हणतात "अरे, आण्णासाहेब पुढें चालले आहेत ना? वाटेंत सोडून आपण येथून निघून जाणें ही कल्पनाच मला दु:सह होतें. आतां आण्णासाहेब वरचेवर आपणांस भेटणार नाहींत. म्हणून त्यांचा शेवटचा निरोप घेऊन आपण घरीं जाऊं व मग खाऊं. जेवणखाण हें रोजचें आहेच. एक दिवस न जेवल्यानें खास मरण येत नाहीं. उलट आण्णासाहेब हे तर वर्षांतून चार–दोन दिवसच जेवीत!"

(९९) लोकमान्यांचें व्यवहारज्ञान, तत्त्वनिष्ठा व माननीयांस नम्रतापूर्वक मान देण्याची तयारी वगैरे गुण एकसमयावच्छेदेंकरून पुढील गोष्टींत ठळक रीतीनें दृष्टीस पडतात. श्रीमद्भगवत्गीतेच्या सिद्धांताविषयीं आपला व आद्य श्रीशंकराचार्यांचा मतभेद पडतो. तेव्हां प्रथम त्या विषयांतील तज्ज्ञ पण अवखळ मंडळीस अगोदर खासगी रीतीनें बोलावून, त्यांची वादविवादानें खात्री करून, आपल्या सिद्धांतास त्यांची मान्यता घेऊन, मग आपला ग्रंथ गीतारहस्य प्रसिद्ध करावा या हेतूनें त्यांनीं वाईचे धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले यांस मुद्दाम बोलावून, पुण्यास १५ दिवस मुक्काम करण्यास सांगून आपला हस्तलिखित ग्रंथ त्यांस वाचण्यास दिला. शास्त्रीबुवा लेले हे शनिवार पेठेंत तांब्यांचे वाड्यांत दे. भाऊसाहेब लवाटे यांचेकडे उतरले होते. मीहि त्याच वाड्यांत राहात असे. शास्त्रीबुवा रोज सकाळ-संध्याकाळ आठ-आठ

तास गायकवाडवाड्यांत जाऊन ग्रंथ वाचीत. परत घरीं आल्यावर आमचे जवळ त्यांचा पहिला उद्गार हा निघे कीं, अहाहा! आमच्या गुरुजींनीं (लोकमान्यांस ते नेहमीं गुरुजी म्हणत) अपूर्व कामगिरी केली आहे. शास्त्रीबुवा एकदां आम्हास सांगतांना म्हणाले 'आमचे गुरुजी मला प्रारंभींच म्हणाले कीं, शास्त्रीबुवा! माझा व आचार्यांचा गीतेच्या मुख्य सिद्धांतावर सूक्ष्म मतभेद होत असला तरी, त्यांच्याबद्दल मी माझे ग्रंथांत जेथें तेथें म्हणून त्यांचा उल्लेख केला आहे तेथें तेथें त्यांचेबद्दल शक्य तितक्या आदर-भक्ति व नम्रतापूर्वक मला लिहितां आलें तितकें मीं लिहिलेंच आहे. पण या भावना व्यक्त करण्याकरितां अजूनहि शब्द अपुरे झाले असल्यास ते तुमच्या मनाप्रमाणें पूर्ण करण्यास मी तुम्हास पूर्ण मुखत्यारी देत आहें. पण ऐन तत्त्वप्रतिपादनाच्या गाभ्यास स्पर्श करतांना मात्र युद्धारंभीं भीष्माचार्यास प्रणिपात करून युधिष्ठिरानें काढलेल्या उद्गारांची तुम्हास मी आठवण करून देत आहे.' शास्त्रीबुवांनीं संपूर्ण ग्रंथ वाचल्यावर म्हणजे शेवटचे दिवशीं ते घरीं येतांच अत्यंत हर्षित होऊन आम्हास म्हणाले "गीतेवर आचार्यांच्या भाष्यानंतर गीतारहस्यासारखा अपूर्व ग्रंथ अद्याप निर्माण झालेला नाहीं असें माझें पूर्ण विचारांतीं मत झालें आहे. मी तरी निदान या अर्वाचीन ग्रंथराजास 'तिलक-भाष्य' असेंच म्हणणार!" पण पुढें शास्त्रीबुवांचें हें मत 'लोकापवादास्तव' डगमगूं लागलें ही गोष्ट वेगळी!

(१००) पुण्याचे हल्लीचे म्युनिसिपल कौन्सिलर शेट गमनाजी पिताजी मारवाडी या हौशी तरुण देशभक्तानें लोकमान्यांच्या शेवटच्या पांच-सहा वर्षांत 'स्वयंसेवक या नात्यानें त्यांचें काम हौसेनें केलें होतें. बेळगांव, लखनौ, कलकत्ता, अमृतसर वगैरे ठिकाणीं व पुणें येथेंहि सार्वजनिक प्रसंगीं ते सतत, लोकमान्यांबरोबर असून स्वयंसेवक म्हणून त्यांची सेवा ते मनोभावें करीत. या बाबतींत मी मुद्दाम शेटजींशीं गप्पा गोष्टी मारीत असत त्यांनीं आपल्या अनुभवाच्या मजेदार अशा किती तरी गोष्टी मला सांगितल्या पण त्यांपैकीं मासला म्हणून फक्त तीन-चारच येथें देतों.

(१०१) कलकत्त्याच्या कॉंग्रेसच्या अध्यक्षाचें काम करून मिसेस ॲनी बेझंट पुणें येथें आल्यावर त्यांस किकाभाई बिल्डिंगमध्यें मोठी पानसुपारी

झाली. गर्दी अतोनात झाली होती. दिवाणखान्यांत पाय ठेवण्यासहि जागा नव्हती. दिवाणखान्याच्या बाहेर पादत्राणें ठेवून सर्व मंडळी आंत बसली होती. समारंभ आटोपल्यावर शेंकडों लोकांच्या पादत्राणांचा एकच गल्ला झाल्यामुळें, लोकमान्य व बेझंटबाई बाहेर आल्यावर पाहतात तों बाईंचा जांभळ्या मखमलीचा स्लीपर कोठें सांपडेना. त्या इकडे तिकडे पाहूं लागल्या. पण दूर एका बाजूस तो पडलेला एक स्वयंसेवक शेटजींनीं पाहिला. पण साहेबांचा जोडा हातांत घेऊन पुढें करणें स्वयंसेवक झाले म्हणून शेटजी-सारख्या सन्मान्य गृहस्थाचे जिवावर आलें. हें लोकमान्यांच्या लक्षांत येतांच एक पाऊल शेटजींकडे टाकून हलक्या आवाजांत हंसत ते त्यांस म्हणतात 'हा नारायण आडला...!' ही दीर्घ सूचना शेटजींचे लक्षांत येतांच त्यांनीं चटदिशीं बाईचा तो स्लीपर उचलून त्यांचे पायापुढें ठेविला. तेव्हां आश्चर्य चकित मुद्रेने एक क्षण बाई लोकमान्यांकडे पाहात उभ्या राहिल्या!

(१०२) १९०९-१० मधील प्रसिद्ध नाशिक केसच्या आगीची शेटजीं-सहि थोडी झळ लागलेली होती. लोकमान्य मंडालेहून परत आल्यावर नाशिक केसचे बाबतींत त्यांस शेटजींनीं सर्व हकीकत सांगितली. तेव्हां ते उद्गारले "महाराष्ट्रांतील तरुण देशभक्तांच्या शक्तीचा हा व्यर्थ अपव्यय झाला. कुशल नेता मिळता तर भलत्याच रुळावर गाडी न जातां ती इच्छित स्टेशना-वरच खास जाऊन पोंचली असती!"

(१०३) लोकमान्यांस पुणें येथें भवानीपेठेमध्यें एकदां व्यापारी मंड-ळींनीं एक जंगी पानसुपारी केली. तेथें केवळ व्यापारी वर्गच जमलेला होता. समारंभ आटोपून लोकमान्यांची स्वारी गाडींतून घरीं चालली असतां त्यांस गाडींत कोणीं विचारलें 'आपण सरकाराबद्दल सर्वसाधारण लोकांस नेहमीं जसा उपदेश करतां तसें आज कां सांगितलें नाहीं?' गमनाजी शेट सांगतात कीं, या वेळीं लोकमान्य म्हणाले 'पैसेवाल्या धनिक व्यापारी लोकांस सामान्य लोकांप्रमाणें एकदम खोल पाण्यांत नेऊन उपयोग नाहीं. आस्ते आस्तेच त्यांस त्यांत ओढलें पाहिजे. नाहीं, तर जर कां, त्यांनीं एकदां आमच्या राजकारणाच्या खोल पाण्याची धास्ती घेतली तर ते पुन्हा कधीं आमचेकडे तोंडहि फिरविणार नाहींत!'

(१०४) लोकमान्य विलायतेहून आले त्या वेळीं त्यांचे स्वागतार्थ मुंबईस बोटीच्या धक्क्यावर विलक्षण गर्दी झालेली होती. शेंकडों लोक त्यांस हार घालून व त्यांच्या समवेत विलायतेहून आलेल्या त्यांच्या सहकाऱ्यांस गुच्छ देत. त्यांत चुकून एकानें एका वड्या साहेबास मोठा गुच्छ दिला; सदर साहेब तेथे एकाजवळ बोलले कीं, 'बोटीवर असतांना या साव्या माणसाच्या इतक्या लोकप्रियतेची मला कल्पना नव्हती.' असें म्हणून त्यांनीं स्वतः आपले हातांतील तो गुच्छ हंसत पुढें होऊन, लोकमान्यांचे हातांत दिला, त्या क्षणीं शेटजी सांगतात, 'टाळ्यांचा प्रचंड गजर झाला ! !'

(१०५) नंतर तेथून लोकमान्यांची मिरवणूक निघाली. सरदारगृहाजवळ खूप गर्दी झाली होती. लोकमान्य दुसऱ्या मजल्यावरून खालीं जमलेल्या प्रचंड समुदायास निरोपादाखल एकसारखे नमस्कार करीत, तों टाळ्यांचा अधिकच गजर होई ! तेव्हां तेथील गर्दींत सांपडलेल्या गुजराथी पार्शी स्त्रियांनीं, शेटजी म्हणतात, मला विचारिलें, शूं गर्दी छे?' मी त्यांस सांगितलें 'टिळकमहाराजांस पाहण्याकरितां लोक जमले आहेत. ते पाहा टिळकमहाराज' तेव्हां त्यांजकडे पाहत आपले दोन्ही हात जोडून त्या म्हणत "अल्लामिया उनका भला करे!"

(१०६) 'गीतारहस्य–निरीक्षण' कर्ते पेन्शनर श्रीयुत परशरामपंत चिंचाळकर (हे पुणें येथें 'महाराज' या नांवानें प्रसिद्ध होते.) यांनीं सांगितलेल्या आपल्या आठवणींपैकीं फक्त दोन येथें देतों. 'महाराज' म्हणाले "होमरूलचे दौरे करून लोकमान्य पुण्यास आल्यावर आजारी पडले; त्या वेळीं मी त्यांजकडे गेलों होतों. त्यांचे अंगांत बराच ताप होता. तेव्हां मी त्यांस म्हणालों "आतां किती दिवस आपण ही दगदग करणार? हें पुरें झालें. आतां सर्व सोडून द्या." तेव्हां ते म्हणाले "दुसऱ्यास कामाचा चार्ज देऊन तुम्ही जसें पेन्शन घेतलें तसें माझ्या कामाचा चार्ज घेऊन लोक मला जेव्हां 'विश्रांति'चें पेन्शन देतील तेव्हांच मी यांतून मोकळा होऊन आवडीचें ग्रंथलेखनासारखें काम करणार, तोंपर्यंत हें असेंच चालावयाचें!"

(१०७) लोकमान्य विलायतेस जाण्यापूर्वी त्यांचे वाड्यांत केसरी ऑफिसांतील मंडळींसह त्यांचा फोटो काढण्यांत आला. त्या वेळीं मी त्यांचे पायाजवळ बसलों होतों. तेव्हां ते हंसत विनोदानें मला म्हणाले "हं सांभाळा, तुम्ही सरकारी पेन्शनर आहांत. टिळकांचे संसर्गानें तुम्हास कांहींच न मिळतां, त्यामुळें उलट तुमचें पेन्शन बुडण्याचा मात्र तुम्हास लाभ होईल. हें पत्करत असेल तर खुशाल बसा!"

(१०८) पुण्यास बॅ. बॅप्टिस्टा यांचे अध्यक्षतेखालीं भरलेल्या १५ व्या प्रांतिक परिषदेच्या स्वागताध्यक्षांचे जागीं कै. आण्णासाहेब पटवर्धन यांची लोकमान्यांनीं योजना केली होती. असलें व्यावहारिक काम करण्यास आण्णासाहेबांस वेळ होणार हें नाहीं लोकमान्य जाणून होते; तरी त्यांची भक्ति असल्यामुळें स्वागताध्यक्षांचें भाषण आण्णासाहेबांनींच लिहून काढावें अशी त्यांची फार इच्छा. आण्णासाहेब म्हणतील त्या वेळा व सांगतील ते शब्द उतरून घेण्यास व एकसारखे त्यांचे मागें लागून भाषण लिहून काढण्याबद्दल माझी त्या कामावर लोकमान्यांनीं योजना केली होती. पण आण्णासाहेबांचा परमार्थसाधनाच्या रोजच्या गूढ व ठरीव कार्यक्रमांत या गोष्टीस शेवटपावेतों वेळ मिळेना. अखेर परिषदेचा पहिला दिवस अगदीं डोक्यावर येऊन ठेपला, तरी आण्णासाहेबांच्या भाषणाचा पत्ता नाहीं हें पाहून, परिषदेचा सर्व कार्यक्रम व्यवस्थितपणें जुळविण्याचें जबाबदारीचें काम केळकर यांजकडे असल्यामुळें, ते लोकमान्यांस म्हणाले, "तुम्ही आण्णा-साहेबांवर अवलंबून असाल तर शेवटीं तुम्हासच स्वागताध्यक्षांचें भाषण करावें लागेल." थोड्याच वेळांत केळकर तेथून गेल्यानंतर लोकमान्य म्हणतात, "हा थोर पुरुष (आण्णासाहेब) परमार्थ साधनाकडे न वळतां राजकारणांतच पडता तर संबंध हिंदुस्थानाचा पुढारी होता, व राजकारणास निराळीच दिशा लावता."

(१०९) लोकमान्य भिडस्त होते हें आतां पुष्कळांस माहीत झालें असावें असें वाटतें. सातान्यास दादासाहेब करंदीकरांच्या ज्युबिलीला जाण्यास लोकमान्य रात्रीं निघाले. प्रात:काळीं सातारारोड स्टेशनवर गाडींतून उतरल्यावर लोकमान्यांच्या जवळच्या एका गृहस्थानें माझे कानांत सांगितलें.

" पुण्याहून निघण्याचे वेळींच दादांस (लोकमान्यांस) ताप भरूं लागला, पण तसें ते यत्किंचितहि घरीं बोलते, तर बाबांनीं (धोंडोपंत विद्वांस) त्यांस निघूंच दिलें नसतें. आतां ताप १०१ डिग्री आहे.' पुढें सदर स्टेशनवर पानसुपारी अर्पण केली व त्यांची अगदीं इच्छा नसतांहि तेथील मंडळींनीं आग्रहास्तव दूधहि पिण्यास लाविलें. स्टेशन ते सातान्याचे दरम्यान सडकेलगतच्या आवारांत लोकमान्यांचे स्वागतार्थ बोरखळकर मंडळींनीं मोठा समारंभ केला होता. थोडा फलाहार करण्याबद्दल तेथील मंडळींनीं लोकमान्यांस विनंति केली. परंतु ताप आला आहे असें सांगण्यांत आल्यावरून त्या मंडळींचें कांहीं चालेना. तरी पाऊणशें वर्षांच्या विनायकराव बापट या वृद्ध गृहस्थांनीं, पाय अधू असतांहि लंगडत लंगडत दोन मैलावर मोठ्या भक्तीनें आपणाकरितां हें उत्कृष्ट गायीचें दूध आणिलें आहे एवढें घ्यावें, असें कोणीं सांगतांच तापानें अत्यंत अनिच्छ असतांहि, सदर मंडळी खट्टू न व्हावी म्हणून त्यांनीं दूध प्राशन केलें !

(११०) पुणें स्वदेशी को. स्टोअरचे लोकमान्य हे एक डायरेक्टर होते. त्यामुळें तेथील सेल्समनचे जागेवर माझ्या एका स्नेह्यास नेमण्याकरितां तेथील मॅनेजर यांस देण्यास मी लोकमान्यांपाशीं चिठी मागितली. लोकमान्यांनीं तत्क्षणींच ती दिली. पण थोड्या दुःखानें ते उद्गारले " महाराष्ट्रीय ब्राह्मणास सेल्समन होण्याची पाळी यावी ! बाळाजी विश्वनाथ भट कोंकणांतून आला आणि पेशवा झाला. पण अलीकडे सबंध व्यापार ताब्यांत घेईन अशी कोणाहि तरुणास महत्त्वाकांक्षाच उत्पन्न होत नाहीं ! "

(१११) तत्त्वज्ञानी व वेदांती लोकांस प्रेमाश्रु अगर दुःखाश्रु सहसा येत नाहींत असें म्हणतात. या नियमास लोकमान्य अपवाद झालेले क्वचितच कोणीं पाहिलें असेल; पण मला एक प्रसंग स्मरतो. पुणें येथें भरलेल्या १५ व्या प्रांतिक परिषदेंत, सातारा जिल्ह्यांतील इस्लामपूरकडील धोंडोपंत कुलकर्णी या नांवाच्या उतारवयी गृहस्थानें, सरकारनें नामशेष केलेल्या कुलकर्णी वतनावर कळकळून व तळमळीनें असें कांहीं विलक्षण करुणरसपूर्ण भाषण केलें कीं, तें ऐकून सर्व श्रोतृवृंद तर गहिंवरलाच, पण उतारवयांत स्वतःस सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा मिळाल्यावरहि सिंहगर्जना

करणाऱ्या या पुरुषसिंहाचे डोळे कालवशात् दीन झालेल्या लोकांची ही दैन्यकथा ऐकून दुःखाश्रूनें भरून आले !

(११२) तात्यासाहेब केळकर यांचे अध्यक्षतेखालीं सोलापुरास भरलेल्या प्रांतिक परिषदेच्या पहिल्या दिवशीं अगदीं प्रारंभीं, म्हणजे स्वागताध्यक्षाचें भाषण सुरू असतां, स्वतःस प्रागतिक म्हणवून घेणाऱ्यांच्या दुष्ट चिथावणीवरून कांहीं मूर्ख व भाडोत्री इसमांचे करवी कांहीं सभा-गुंडांनीं सभा उधळून लावण्याचा यत्न चालविला. पुढें पुढें तर मंडपांत पावसाच्या गारांप्रमाणें सपासप एकसारखे धोंडेहि येऊं लागले. उच्चासनावर नियोजित अध्यक्ष व लोकमान्य व इतर मंडळी बसली होती. दप्तर घेऊन मीहि त्यांचेजवळ बसलों होतों. मंडपांत जोरानें एकसारखे दगड येऊं लागल्यामुळें या उच्चासनावरहि थोडी गडबड सुरू झाली. तेव्हां लोकमान्य डावेउजवे बाजूस बसलेल्या खापर्डे, बॅप्टिस्टा यांस म्हणतात, "दगड येवोत अथवा वरून वीज कोसळो, सभा यशस्वी पार पडल्याखेरीज मी येथून हलणार नाहीं."

(११३) लोकमान्यांचें सर्व आयुष्य प्रतिपक्षीयांशीं व त्यांनीं उत्पन्न केलेल्या संकटांशीं झगडण्यांत खर्च झालें. यामुळें प्रतिपक्षीयांस एकसारखे चेंगरींत व तुडवीत जाऊन त्यांस मार्ग काढावा लागे. हें सर्व आठवून एकदां ते सहज बोलले "काय योगायोग आहे पाहा ! मुळांत सर्वांशीं गोडीगुलाबीनें व मवाळकीनें वागून भिडस्तपणें नमतें घेण्याचा माझा जन्मस्वभाव असतां या राजकारणाच्या धंद्यानें माझा मूळ स्वभावहि पालटून टाकला ! "

(११४) लोकमान्यांनीं आपला 'गीता-रहस्य' ग्रंथ छापल्यावर त्याची किंमत ठेवण्याची वेळ आली. तेव्हां सदरहू पुस्तकांत एक पैसाहि आपणास घ्यावयाचा नाहीं या बुद्धीनें, तत्प्रीत्यर्थ आलेला एकंदर खर्च सर्व प्रतींवर वांटून त्यावर बसेल तो खर्च हीच त्याची किंमत ठेवावयाची--त्यांत कांहींहि कूस ठेवावयाची नाहीं--असें त्यांनीं ठरविलें होतें. ही गोष्ट त्यांच्या एका धंदेवाईक स्नेह्यास कळतांच त्यांनीं असें न करण्याबद्दल त्यांचें मन वळविण्याचा त्यांनीं बहुत प्रयत्न केला. पण आपल्या म्हणण्याचा

कांहींच परिणाम होत नाहीं असें पाहून महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांचेकडून मात्रा लागू पडेल म्हणून त्यांचे मार्फत प्रयत्न केला. लोकमान्यांस मी आण्णासाहेब यांचे घरीं घेऊन गेलों. प्रथम जरा इकडील तिकडील गप्पागोष्टी झाल्यावर त्यांचा झालेला संस्मरणीय संवाद पुढें देत आहे :—

**आण्णासाहेब** :—पुस्तक छापण्याचें काम कोठवर आलें आहे किंमत काय ठेवणार ?

**लोकमान्य** :—पुस्तक आतां बहुतेक छापून तयार झालें आहे. किंमत जास्तींत जास्त तीन रुपये ठेवावी असें म्हणतों.

**आण्णासाहेब** :—म्हणजे ? असल्या तत्त्वज्ञानविषयक प्रचंड ग्रंथाची किंमत तीन रुपये ठेवणार ? तुम्ही सर्व आयुष्य गीतेच्या चिंतनांत व मननांत घालवून अर्धें तप खर्ची घातलेल्या एवढ्या ग्रंथाची किंमत काय तीन रुपये ?

**लोकमान्य** :—होय ! याहीपेक्षां किंमत कमी बसत असल्यास ती मला हवी आहे ! व त्याचाहि विचार करीत आहे ! श्रीमद्भगवद्गीते-सारख्या धार्मिक ग्रंथाच्या बाबतींत पैसा मिळविण्याची माझी इच्छा नाहीं

**आण्णासाहेब** :—अहो ! हें ठीक आहे. सध्यांच्या चालू पद्धतीनें पुस्तकाची रीतसर किंमत ठेवून त्यांत मिळेल तो पैसा तुम्ही स्वतःकरितां घ्यावा असें मी म्हणत नाहीं. पण तुम्ही राजकारणी पुरुष ! वेळीं अवेळीं तुम्हास पैशाची जरूर लागते. त्या वेळीं लोकांचे तोंडाकडे पाहण्यापेक्षां रीतसर पद्धतीनें पुस्तकाची किंमत ठेवून त्यांत मिळणारा पैसा तुम्ही तुमच्या राजकीय कार्याकडे द्यावा म्हणजे झालें ! मला वाटतें चालू पद्धतीप्रमाणें तुमच्या ग्रंथाची किंमत ठेविल्यास लाख पाऊणलाख रुपये तुम्हास सहज बाजूस काढून ठेवितां येतील, व ऐनवेळीं तुम्हांस ते उपयोगीं पडतील !

**लोकमान्य** :—आण्णासाहेब ! या सर्व गोष्टींचा मी विचार केला आहे. तरी पण आपल्या प्रेमळ सूचनेबद्दल मी आपला फार आभारी आहें. या वेळीं मला एका प्रसंगाची आठवण होते, आणि तो प्रसंग म्हणजे १८८० सालीं केसरी सुरू करण्याचे वेळीं विष्णुशास्त्री चिपळूणकर

यांचे घरीं आम्ही बसलों असतां केसरीची वर्गणी काय ठेवावी हा वाद निघाला ! शास्त्रीबुवा व मी एका मताचे होतों. त्या वेळीं वर्तमान-पत्राचे धंद्यांत क्रांति होण्यासारखी आम्ही केसरीची वर्गणी एक रुपया ठेवावी असें ठरविलें. खेडेगांवच्या शाळेंतील पंतोजीसहि आमचें पत्र घेतां यावें ही जशी त्या वेळची इच्छा तशीच अगदीं साधारण प्राप्तीच्या मनुष्यासहि आमचा 'गीता-ग्रंथ' वाचावयास मिळावा अशीच हल्लींहि आहे ! वाटल्यास यास आपण हें माझें "धार्मिक वेड" आहे असेंहि खुशाल म्हणा. मी तर बायबल एडिशनप्रमाणें 'गीतारहस्य' बारीक टाइपांत व पातळ कागदावर छापून त्याची प्रत आठ आण्यांस देण्याचे विचारांत आहे. आपण म्हणतां बाजारभावाप्रमाणें माझे ग्रंथाची किंमत ठेवून त्यांत मिळेल तो पैसा राजकीय कामाकडे मीं लावावा. पण या कामाकरितां मला पैसा पाहिजे असून तो लोकांनीं--महाराष्ट्रानें—मला दिला नाहीं असें आजपर्यंत कधींहि झालें नाहीं. मी फक्त मागण्याचाच अवकाश ! महाराष्ट्र जनता ही कामधेनु आहे, तो कल्पवृक्ष आहे !"

वरील संवाद झाल्यावर आण्णासाहेबांचे येथून लोकमान्य गेल्यावर आण्णासाहेब उद्‌गारतात, "सामान्य माणसानें बळवंतरावाचे वाटेस जाऊं नये ! तो (एकेरी नांवानेंच प्रेमानें ते नेहमीं त्यांस संबोधीत) तेजस्वी सूर्य आहे. त्याचेपुढें कोणाची कांहीं लटपट चालणार नाहीं."

(११५) वरील आठवण लिहीत असतां लोकमान्यांचे भाचे व केसरीचे मॅनेजर श्री. रा. बाबासाहेब विद्वांस यांनीं सांगितलेली एक गोष्ट आठवली. १९०२ मध्यें केसरीचा आकार जेव्हां दुप्पट करण्यांत आला, तेव्हां इतरांनीं इच्छा दर्शविली असतांहि लोकमान्यांनीं केसरीची वर्गणी दुप्पट न वाढवितां फक्त आठ आणेच वाढविली. म्हणजे एक रुपया आठ आणे वर्गणी व तेरा आणे पोस्टेज, एकूण दोन रुपये पांच आणे असा हिशेब झाला ! तेव्हां प्रो० जिनसीवाले त्यांस म्हणाले--"आणखी तीन आणे वाढवा म्हणजे बरोबर अडीच रुपये होतील ! इतक्या मौल्यवान पत्रास तीन आणे म्हणजे कांहीं जास्त नाहींत. शिवाय जमाखर्चासहि ठीक होईल !" लोकमान्य म्हणतात, "तुमचा हिशेब मोठा सोयीचा आहे !

पण माझें पत्र म्हणजे कांहीं 'टाइम्स ऑफ इंडिया' नव्हे कीं, तें फक्त श्रीमंतांनींच तेवढें घ्यावें, दरमहा दोन आणे लायब्ररीस देणाऱ्याप्रमाणें, वर्षाचे आणखी फक्त तेरा आणे देऊन कोणासहि घरचे घरीं बसून मालकीनें 'केसरी' खुशाल वाचतां यावा, अशी माझी इच्छा आहे. शिवाय वर्षअखेर रद्दीचे पैसे येतील ते वेगळेच!" बाबासाहेब म्हणतात, "त्या वेळीं भय्यासाहेबांनीं त्यांस पुष्कळ आग्रह केला; पण दादांनीं अखेर तीन आणेहि वाढवूं दिले नाहींत!"

(११६) लोकमान्यांनीं स्वानुभवानें मधुमेहाचें एक पथ्य तयार केलें होतें व तें लोकांच्या माहितीकरितां छापलेंहि होतें. कोणी मधुमेहासंबंधीं माहिती विचारल्यास त्यांस ते हें पत्रक देत असत. तें पुढें दिलें आहे.

## मधुमेहावर यव व सातु यांचा उपयोग

### [बाळ गंगाधर टिळक]

ज्यास मधुमेह झाला त्यानें यवाच्या धान्याचा उपयोग करावा असें **चरकादि** जुन्या संस्कृत वैद्यक ग्रंथांतून लिहिलें आहे. यवाच्या धान्याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि प्रकारच्या धान्याचा उपयोग न करणें हें ह्या पथ्यांतील बीज होय. **यव** किंवा **जव** याच्या पिठासच **सातु** असें म्हणतात व श्रावणीच्या वेळीं त्याचा उपयोग करण्यांत येतो, हें पुष्कळांस माहीत असेलच. जव बाजारांतून विकत आणले म्हणजे त्याच्यावर फोल किंवा टरफलें असतात. तीं काढण्यासाठीं प्रथम सुमारें दोन तास जव पाण्यांत भिजत ठेवावे आणि नंतर उन्हांत वाळवून सडले म्हणजे वरचीं सालें निघून जातात व गव्हासारखा दाणा शिल्लक राहतो; हे दाणे दळून गव्हाप्रमाणें त्याचा रवा किंवा सपीठ असे दोन प्रकार करतां येतात. रव्याचा सांजा किंवा सोजी करतां येते; आणि बारीक पिठाची चपाती, धिरडें, भाकरी, पुरी किंवा इंग्रजी तऱ्हेची ब्रेड, पाव-बिस्किटें, वगैरे माल करतां येतात. किंबहुना गव्हाच्या कणकेचे जे जे पदार्थ तयार करतां येतात ते सर्व यवाच्या पिठाचेहि तयार होतात. त्यामुळें यव हें धान्य एकच असलें तरी त्याचेच दररोज निरनिराळे प्रकार केल्यानें खाण्याचा वीट येत नाहीं. दळण्यापूर्वी भडभुंजाच्या भट्टींत यव भाजून काढले आणि मग त्याचे दळून पीठ केलें

म्हणजे त्यास 'सातु' असे म्हटले जातें. जेव्हां नुसतेंच पीठ ताकांत अगर दुधांत कालवून खावयाचें असेल तेव्हां या सातूचा उपयोग करावा लागतो; नाहींपेक्षां पोटांत आमांश होण्याचा संभव असतो. बाजारांत सत्तूचें जें पीठ विकत मिळतें त्यांत रुचि येण्यासाठीं प्राय: दुसऱ्या धान्याचें पीठ मिसळलेलें असतें. म्हणून यव भाजून सातूचें पीठ तयार करणें तें घरींच करणें चांगलें.

**रोजच्या पथ्याचें प्रमाण** :—दररोज दरमाणशीं सुमारें खालीं लिहिल्याप्रमाणें जिन्नस लागतात :—(१) सुमारें १० पासून २० औंस (८ औंस म्हणजे पुण्यांतला एक पावशेर किंवा वीस तोळे) यवाचें पीठ किंवा सातू. हें प्रमाण क्षुधा व पचनशक्ति याप्रमाणें कमीअधिक करावें. (२) सुमारें तीन पौंड म्हणजे सवा अगर दीड शेर दूध (गायीचें असल्यास बरें). (३) सुमारें पावशेर तूप अगर लोणी.

तूप अगर लोणी स्वतंत्र खाणें कित्येकांस आवडत नाहीं; म्हणून चपातीबरोबर किंवा दुसऱ्या पदार्थाबरोबर त्याचा उपयोग करावा. पण जवाच्या चपातीला थोडासा उग्र वास येतो, म्हणून यवाच्या पिठाच्या पुऱ्या तुपांत कराव्या हें बरें. पुऱ्यांना चपातीप्रमाणें वास येत नाहीं.

[मांसमच्छर खाणाऱ्या लोकांनीं तुपाऐवजीं ५ ते ८ अंडीं घेण्यास हरकत नाहीं; पण यवाचें हें पथ्य चालू असतां कोणत्याहि प्रकारचें मांस खाऊं नये.]

दूध आणि तूप यांचें वरीलप्रमाणें प्रमाण वाढविलें तरी हरकत नाहीं. दुधाचें यथारुचि दहीं अगर ताक करून उपयोग करावा. या पथ्यास दूध आणि तूप अवश्य आहे; अगदींच सोडून चालावयाचें नाहीं. शक्ति व वजन कायम राहण्यास दूधातुपाची पुष्कळ मदत होते.

**भाजीपाला, फळें वगैरे** :—भाज्या (विशेषेंकरून पालेभाज्या), चटण्या, कोशिंबिरी, लोणचीं, तिखट, आंबट वगैरे नेहमींच्याप्रमाणेंच पण बेतानें खाण्यास हरकत नाहीं. फळेंहि कोणतींच वर्ज्य नाहींत; पण त्यांतले त्यांत संत्र्यासारखीं थोडीशीं आंबट असलेलीं फळें विशेष ग्राह्य होत.

चहा-कॉफी घेतली तरी चालते; पण त्यांत साखर न घालतां सॅकरीन (एक प्रकारची कोळशाची साखर) घालावी. इंग्रजी औषधें विकावयाच्या दुकानांत ही 'सॅकरीन' मिळते. अर्धा गुंज (ग्रेन) सॅकरीन एक चहाच्या पेल्यास पुरेशी होते. सॅकरीनच्या गोळ्यांपेक्षां पूड फार स्वस्त मिळते. म्हणून पूड वापरणें सोयीचें होय. गूळ व साखर हीं या रोगास सर्वांशीं वर्ज्य आहेत.

**परिणाम :**—याप्रमाणें पथ्यावर राहिलें असतां औषध घेण्याची जरूर पडत नाहीं. सुमारें १५ दिवसांतच लघवीचें मान कमी होऊन लघवींतून साखर जाणेंहि सर्वांशीं नाहीं तरी पुष्कळांशीं बंद होतें, असा अनुभव आहे. केवळ पथ्यावर राहण्याचा हा परिणाम आहे. पथ्य मात्र वर सांगितल्याप्रमाणें निग्रहानें केलें पाहिजे; म्हणजे तांदूळ, गहूं किंवा डाळी यांचा उपयोग न करतां फक्त यवाच्या एका धान्यावरच राहिलें पाहिजे.

**टीप :**—या पथ्यानें एकदां रोग हटल्यावर पुढें हें पथ्य सोडल्यानें पुनः कांहीं दिवसांनीं रोग उद्‌भवेल कीं नाहीं, याचा अनुभव घेतलेला नाहीं.

पुणें २० जुलै १९१४.

(११७) १९१७ सालीं अहमदाबादेस बॅ. जिना यांचे अध्यक्षतेखालीं प्रांतिक परिषद भरली होती. त्या वेळीं लोकमान्य आपल्या राजकीय परिवारासह तेथें गेले होते. देवालयांत जाऊन जसें देवदर्शन घेणें तसेंच अहमदाबादेस जाऊन महात्माजींचा आश्रम पाहणें असें दे. शंकरराव ऊर्फ भाऊसाहेब लवाटे यांस वाटून ते म्हणाले, 'आपण आश्रम तर पाहणार; पण तेथें गांधीजी नसतील अशा वेळीं आपण जाऊन तो पाहून येऊं.' म्हणून एके दिवशीं परिषद चालू असतांच, महात्माजी तिकडे गुंतले आहेत असें पाहून सायंकाळीं पांच वाजतां भाऊसाहेब लवाटे, पुणें येथील प्रसिद्ध वकील रा. लक्ष्मण रघुनाथ गोखले व प्रस्तुत लेखक आश्रम पाहण्यास गेलों. सुमारें तास दीड तास तेथील सर्व व्यवस्था पाहून आम्ही परत येत असतां निम्या-अधिक वाटेवर महात्माजी आश्रमाकडे चाललेले

आम्हांस भेटले. भगवद्भक्त श्री तुकोबाप्रमाणें ती शांति--वैराग्य--मूर्ति, डोक्यास गुजराथी पांढरें पागोटें घालून अंगांत खादीचा आंगरखा घातलेली व अनवाणी येत असलेली दुरून पाहतांच भाऊसाहेब किंचित् संकोचित झाल्यासारखे दिसले. म्हणतां म्हणतां उभयतां जवळ येतांक्षणींच बरेंच हंसून प्रेमानें भाऊसाहेबांचा हात आपल्या काखेंत घेऊन महात्माजी पुनः खूप हंसत त्यांस विनोदानें म्हणतात, 'Oh ! a pacca Maharashtrian intending to escape me without my knowledge was hastily marching home but happily I have at last succeeded in arresting him !' पुढें प्रेमादरानें त्यांनीं त्यांस आपलेबरोबर परत आश्रमांत येण्याचा अतिशय आग्रह केल्यावरून त्यांचेबरोबर आम्हां दोघांसहि जावें लागलें. त्या वेळीं संध्याकाळ होऊन दिवे लावण्याची वेळ झाली होती. आश्रमांत शिरतांच समोर एका साध्या आसनावर महात्माजी बसून पुढें लिहिण्या-वाचण्याकरितां चौरंग ठेविला होता; व जवळच गोडच्या तेलाची एक समई शांत व मंद प्रकाशानें तेवत होती. हा 'थाट' पाहून तेथील साध्या, शुद्ध, सात्त्विक व पवित्र वातावरणानें माझ्यावर इतका परिणाम केला कीं, या महर्षींचा तो आश्रम सोडतांना माझें हृदय जड झालें, कंठ भरून आला व पाय तेथेंच रुतूं लागले ! असो. महात्माजींनीं आश्रमांतील सर्व छात्रवृन्दास बोलावून आणून त्यांस भाऊसाहेब लवाटे यांचे चरणांवर मस्तक ठेवण्यास सांगितलें, व अखेर आपल्या धर्मपत्नीसहि बोलावून त्यांस भाऊसाहेबांचें महत्त्व वर्णून तसें करण्यास सांगितलें. ती माउली पुढें येतांच, महात्माजींकडे वळून "हें काय महाराज ?" असें म्हणत भाऊसाहेब उठले व त्यांनींच अगोदर सौ. कस्तुरबाई यांचेपुढे मस्तक ठेविलें ! रा. गोखले यांस व मला हा देखावा करुणरसाचा अपूर्व भासला वाटला. नंतर कांहीं वेळ गप्पागोष्टी झाल्यावर आम्ही उठलों. पण आश्रमाचे शेवटचे प्रवेशद्वारापर्यंन्त महात्माजी भाऊसाहेब यांस पोंचवावयास येऊन मोठ्या प्रेमानें त्यांनीं त्यांचा निरोप घेतला. दुसरे दिवशीं पहाटे लोकमान्यांचें कांहीं लिहावयाचें होतें म्हणून त्यांनीं मला हांक मारली. लिहिणें वगैरे काम संपल्यावर वरील सर्व प्रकार मीं त्यांस कथन केला. तो स्वस्थपणें ऐकून

घेऊन ते म्हणाले, “ ठीकच झालें; गोपाळराव गोखल्यांचें शंकररावांविषयीं पहिल्यापासूनच चांगलें मत. न्यू इंग्लिश स्कूलमध्यें गोपाळराव त्यांस मास्तर होते. मला माहीत आहे कीं, तेव्हांपासून अखेरपर्यन्त शंकररावांबद्दल त्यांचे फार चांगले ग्रह होते. इतकेंच नव्हे तर आमच्या पक्षांत काय ते एकटे लवाटेच प्रामाणिक व ‘ सिन्सिअर ’ आहेत असें ते नेहमीं म्हणत असत. इतकेंच काय पण आपल्या सर्व्हन्ट ऑफ इंडिया सोसायटीमध्येंहि इतर सभासदांपेक्षां त्यांस जास्त वेतन देऊन तिकडे ओढण्याचा त्यांनीं प्रयत्नहि केलेला होता; पण लवाटे यांचें मन आमचेकडे असून व मुख्यत: आमच्या मताशींच त्यांचीं मतें जुळतीं असल्यामुळें त्यांनीं तें नाकारलें ही गोष्ट वेगळी; पण गोपाळरावांस त्यांचेविषयीं प्रेम वाटे यांत शंका नाहीं. आणि त्यांचेच शिष्य गांधी ? अर्थात् गुरुजींच्या सांगण्यावरून शिष्याचें मत बनलेलें असावें व त्याचाच हा प्रभाव दिसतो. एकूण गुरुबंधूचा हा सत्कार-प्रसंग आमच्या तात्या गोखले यांस चांगला अनुभवावयास सांपडला म्हणावयाचा ! तथापि हेंहि खरें कीं, लवाटे हे आमच्यांतील एक पक्के मिशनरी आहेत. ते स्वतंत्र विचारी आहेत. पण त्यांच्या डोक्यांत येईल तें करण्यास ते काय वाटेल तें करतील. फक्त अशा अवखळ माणसाचा उपयोग करून घेणें हेंच शहाण्या माणसाचें काम आहे. पण तें सर्वांसच साधत नसतें ! ! ”

(११८) बॅ. जिना यांचे अध्यक्षतेखालीं (१९१७) अहमदाबाद येथें प्रांतिक परिषद भरली होती. त्या वेळीं रोज सभेचे कामास गुजराथी स्त्रियांनीं (कोरस) पद्यें वगैरे म्हणून प्रारंभ होई. सायंकाळीं घरीं आल्या-वर लोकमान्य आपल्या खोलींत सहज इकडे तिकडे हिंडत असतां, आपणाशींच असें कांहीं हंसूं लागले कीं, जवळच्या व्हरांड्यांत गंगाधरराव, बाबुराव गोखले वगैरे मंडळी होती, त्यांचें सहज तिकडे लक्ष गेलें. आपण हंसत असतां या मंडळींनीं आपणास पाहिलें, असें पाहून त्यांनीं खोलींत त्यांस बोलाविलें, व पुन: त्यांस जास्तच हंसूं येऊं लागलें. त्यांजकडे पाहून मंडळीहि हंसूं लागली. ‘ काय झालें ? ’ म्हणून हंसत गंगाधररावांनीं त्यांस विचारतां, ते पुन: हंसत म्हणाले, “ येवढी प्रांतिक परिषद आणि तेथें

दळणाच्या चालीवर त्या बाया, मुली व मुलें रडकीं गाणीं म्हणत. राष्ट्र-देवता जागृत करीत आहेत" हें पाहून मला × × ×ची आठवण झाली आणि म्हणून हंसूं येत आहे. वैराग्यवान् तत्त्ववेत्त्या लोकमान्यांचे बुद्धिकक्षेंतून कांहीं सुटलेंच असेल तर तें एक संगीतशास्त्र असेल काय ?"

पण असें असतें तर आपल्या मोहिनीरूप कंठानें सर्व गायनभक्तांस वेड लावणाऱ्या प्रसिद्ध नटवर्य राजहंस यांस लोकमान्यांकडून "बालगंधर्व" पदवीच न मिळती!

(११९) लोकमान्य मंडालेहून आल्यावर एके दिवशीं त्यांनीं आपल्या संस्कृत जिन्सीवाले–लायब्ररींतून एक पुस्तक आणण्यास मला सांगितलें. वेदभाष्याचें तें पुस्तक होतें. तें मी त्यांजकडे घेऊन चाललों असतां त्यांतील सुमारें १०–१२ पानें कोणी कात्रीनें नेमकीं कातरून घेतलेलीं मला दिसून आलीं. हें मी त्यांस सांगतांच ते जरा दुःखानें पण विनोदमिश्र रागानें म्हणतात, "काय नवल आहे पाहा! अशा ग्रंथाचा वाचक कांहीं पोर नसणार! पण बरें. या विद्वानानें या पुस्तकांतील पानेंच नेलीं; नाहीं तर तो हयग्रीव दैत्याप्रमाणें ऐनजिनसी ब्रह्मदेवाचे मुखांतूनच वेद हरण करून न्यावयाचा!"

(१२०) तळेगांवच्या श्रीसमर्थ-विद्यालयाच्या जमिनीचें खरेदीपत्र मोडींत लिहावयाचें होतें. तें लिहिण्यास लोकमान्यांनीं मला आपले खोलींत हाक मारली. तेथें जाऊन मी खुर्चीवर बसतांच टेबलावर स्टँप होता तो त्यांनीं आपल्या डावे हातानें मजपुढें थोडा सारून "हं लिही; खरेदीपत्र, शके अठराशे" असें म्हटलें. पुढील शब्द उच्चारण्याचे आधींच मी त्यांस म्हटलें, येवढ्या थोरल्या स्टँपवर तो खराब होऊं नये म्हणून एकदम न लिहितां, अगोदर साध्या कागदावर लिहून घेतों आणि मग पाठीमागून त्यावर लिहितों. पण ते मला म्हणाले, "लिहिण्यास तूं मात्र चुकूं नकोस; माझे तोंडांतून निघालेल्या शब्दामुळें जर काहीं बिघडलें किंवा चूक झाली तर हा स्टँप तुला बक्षीस देऊन दुसऱ्यावर मग लिहीन!" आणि खरोखरच प्रतिज्ञेप्रमाणें, इतक्या भानगडीचें व छपन्न हजार कुलंगड्यांच्या गुंता-गुंतीचें तें खरेदीपत्र एक अक्षरच काय पण यःकश्चित् विरामचिन्हहि न

चुकूं देतां त्यांनीं तोंडानें सांगितलें ! अशा दस्तऐवजाचे शेवटीं लेखकाचा दस्तूर लागतो. म्हणून शेवटीं ते म्हणतात, " हं, आतां मात्र मी हटकून चुकणार हो ! तुझें सबंध नांवच मला माहीत नाहीं. आतां चुकलों तर मात्र स्टँप तूं भरला पाहिजेस !" असें म्हणून डोकें चोळीत माझें स्वतःचें नांव तेवढें तूं लिही असें हंसत म्हणत तोंडांत सुपारीचें खांड टाकून स्वारी उठून गेली !

(१२१) एके सोमवारीं केसरीचा मजकूर लिहीत असतां वाईचे कै. धर्ममार्तण्ड भाऊशास्त्री लेले आले. लोकमान्य मजकूर सांगण्याचे अगदीं जोरांत आले होते; तरी विचारांचे व सांगण्याचे त्या झोतांत एकीकडे सुपारीचीं खांडें ते तोंडांत टाकीतच होते. लिहिणें संपल्यावर गमतीनें शास्त्रीबुवा त्यांस विचारतात, "गुरुजी, सुपारीनें जीभ जड होते म्हणतात; पण आपली जीभ तर अधिकच चपळ झालेली दिसते हें कसें ?" हास्य-मुद्रेनें चटकन् लोकमान्य म्हणतात, "सुपारी खाऊन अशी जीभ जड होती तर अक्कलकारा खाऊन घरोघर नानाफडणीसच निर्माण झाले असते !"

(१२२) कै. वा. गणेश सखाराम खरे पे. इंजिनियर (पुणें) यांचे चिरंजीव रा. सदाशिवराव यांनीं पुढील गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "माझे वडिलांस गायनशास्त्राचा फार नाद असे. लोकमान्य मंडालेहून सुटून (१९१४) आल्यावर माझे वडील त्यांस भेटण्यास गेले. मीहि त्यांचेबरोबर होतों. इकडील-तिकडील गप्पा झाल्यावर माझे वडिलांनीं त्यांस गायन-शास्त्रांतील एका विशिष्ट गोष्टीबद्दल प्रश्न केला. ताडकन् लोकमान्य म्हणाले, " हो, या विषयाची विचिकित्सा १९०४ सालच्या मॉडर्न रिव्ह्यू च्या...च्या अंकांत (त्या अंकाचें मला आतां स्मरण नाहीं) केलेली आहे." असें म्हणत चटकन उठून त्यांनीं आपल्या लायब्ररींतील कपाटामध्यें इकडे तिकडे तो अंक पाहिला; पण सांपडला नाहीं. म्हणून मला ताबडतोब त्यांनीं तो आणण्यास नेटिव्ह जं. लायब्ररींत पाठविलें. तेथें तो अंक मिळाला व त्यांत नेमका त्या विषयावरील लेखहि पाहावयास सांपडला !" लोक-मान्यांचें व गायनशास्त्राचें छत्तिसाव्या आंकड्याप्रमाणें रहस्य असतां वरील

गोष्ट ऐकून त्यांच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटते. अशाच प्रकारची गायन-शास्त्रासंबंधाची एक गोष्ट ह. भ. प. लक्ष्मणराव पांगारकर हे नेहमीं सांगत असतात.

(१२३) लोक केवळ आपणाकरितां रात्रीच्या रात्री कसे तिष्ठत असतात, याची कल्पना लोकमान्यांइतकी इतर कोणाहि पुढाऱ्यास नसावी असें वाटतें. साताऱ्यास रा. दादासाहेब करंदीकर यांचे ज्युबिलीकरितां अमुक एका दिवशीं रात्रीं १० चे गाडीनें बरोबरच्या परिवारासह लोकमान्यांचें जाण्याचें ठरलें. निघण्याचे आधीं दोन-तीन तास रा. वासुदेवराव जोशी त्यांजकडे येऊन म्हणाले, " बळवंतराव ... या जरुरीच्या कामामुळें आज आपणांस साताऱ्यास जातां येणार नाहीं. आजचा बेत रहित करून उद्यां सकाळीं येतों, अशी आतांचे आतां साताऱ्यास तार करण्यास खालीं धोंडूस (मॅनेजर बाबासाहेब) सांगतों. " लोकमान्य म्हणतात, " याचा अर्थ काय ? त्या कामाचें काय वाटेल तें होवो ; १० चे गाडीनें आज मी जाण्याचें आगाऊ प्रसिद्ध झाल्यामुळें आतां मी तो बेत रहित करणें शक्य नाहीं. आजचा बेत रहित करण्यास तुम्हांला काय होतें ? वाटेल तर तुम्ही सर्व राहा, मी एकटा आतां जाणारच. कारण माझेकरितां शेकडों लोकांची गैरसोय होणें मला दुःसह होतें."

(१२४) १९१६ सालीं लखनौ येथें राष्ट्रीय सभेची बैठक संपण्याचे आधीं एक दिवस रात्रीं मिसेस ॲनी बेझंटबाईचें एके ठिकाणीं 'विश्वबंधुत्व' या विषयावर व्याख्यान झालें. व्याख्यानास लोकमान्य, खापर्डे, बिपिन पाल वगैरे अनेक प्रसिद्ध पुढारी हजर होते. बाईचें हें व्याख्यान मुख्य वक्तृत्व-कलेच्या दृष्टीनें अतिशय उत्कृष्ट झालें, असें बाईच्या प्रतिपक्षीयांनींहि त्या वेळीं त्यांस सर्टिफिकेट दिलें होतें. व्याख्यान संपून लोकमान्यांसह आम्ही सर्व मंडळी घरीं आल्यावर आंगांतील कपडे वगैरे काढतां काढतां दादा-साहेब खापर्डे लोकमान्यांस म्हणतात, ' बाईनीं वक्तृत्वाचा आज, गड्या, पाऊस पाडला खरा ! ' आपणांमध्यें हा गुण नाहीं, याची जणूं काय आप-णास पूर्ण जाणीव असल्याचें प्रांजलपणें पण संदिग्ध तऱ्हेनें भासवून मग लोकमान्य म्हणतात, " हो पाऊस पाडला खरा ; कारण ग्रीष्मऋतूंतील

मेघांचे कडकडाट व विजांचे चमचमाट कोणास चकित करीत नाहींत ? बाईमध्यें तो गुण आहे यांत शंकाच नाहीं. आम्ही महाराष्ट्रांतील केवळ Matter-of-fact अशीं माणसें असून वर्षाऋतूप्रमाणें विनबोभाट पण निश्चित व अचूक असे आम्ही कार्य साधणारे आहोंत. बाह्य देखाव्याचें आम्हास वाळकडूच नाहीं. त्यास आम्ही तरी काय करावें ?"

(१२५) लखनौच्या कॉंग्रेसच्या वेळीं व यापुढेंहि आतां राजकारणांत विशेष रीतीनें ओढण्याकरितां रा. ब. चिंतामणराव वैद्य यांस लोकमान्यांनीं लखनौस आग्रहानें नेलें होतें. तेथें राजाराम विलासचे प्रशस्त धर्मशाळेंत लोकमान्यांचा तळ पडला होता. कॉंग्रेस संपण्याचे सुमारास चिंतामणराव यांची प्रकृति फारच बिघडली, म्हणून त्यांस जवळ दिल्ली येथें ओळखीच्या ठिकाणीं घेऊन जाण्याचें ठरलें. चिंतामणरावांचे जामात रा. दामले यांस, कर्मयोगाची अखंड समाधि लागलेले लोकमान्य म्हणतात, " संसार-प्रपंचाची व्यर्थ चिंता करीत कल्याणास घरीं औषधें पीत अंथरुणावर पडून मरण्यापेक्षां येथें येऊन राष्ट्रीय सभेच्या राष्ट्रकार्यार्थ शरीर व मन झिजवून त्या तंद्रींत आतां हस्तिनापूरच्या धर्मक्षेत्रांत चिंतामणरावांनीं देह ठेविला तरी मला आतां इतकें वाईट वाटणार नाहीं. कारण भगवद्गीतेच्या सिद्धान्ताप्रमाणें त्यांस आतां स्वर्ग प्राप्त झालाच पाहिजे ! "

(१२६) प्रत्येक थोर पुढाऱ्याचें ब्रीदवाक्य (ज्यांत त्याचें सर्व तत्त्वज्ञान व आयुष्याचें सारसर्वस्व आणि अनुभव सांठवलेले आहेत) घेऊन त्यांचा अपूर्व संग्रह करून तो प्रसिद्ध करून सर्व जगास त्याचा फायदा मिळावा म्हणून कोणी एक गृहस्थ उद्योग करीत होते. थोर थोर लोकांकडे ते याकरितां गेले असतां 'सावकास विचार करून काय तें सांगतों', 'हा विचाराचा प्रश्न आहे--घाई नको', 'उद्यां या', 'आणखी पांच दिवसांनीं या', 'विचार करून ठरवितों,' वगैरे उत्तरे देऊन व पुढेंहि बऱ्याच हेलपाट्यांनंतर मोठें परिश्रमपूर्वक चिंतन करून कोणी कांहीं, कोणी कांहीं त्यांस सांगे. याच कामाकरितां लोकमान्यांकडे ते एकदां आले असतां त्यांस त्यांनीं आपली इच्छा दर्शवितांच एका पळांत स्थितप्रज्ञ लोकमान्यांनीं 'Trust in God and do the right' (परमेश्वरावर श्रद्धा ठेवा आणि सत्कर्म करा) हें आपलें ब्रीदवाक्य असल्याचें त्यांनीं सांगितलें !

(१२७) एकदां (१९१८ सालीं) लोकमान्यांचा कोणी एक ज्योतिषी स्नेही त्यांजकडे येऊन म्हणतो, "बळवंतरावजी! तुम्हास आज मी एक विशेष गोष्ट सांगणार आहें. पण त्यामुळें तुमचे मनावर मात्र कांहीं परिणाम होतां कामा नये हो !" तुच्छता-प्रदर्शक मुद्रेनें लोकमान्य म्हणतात, "मी लवकर मरणार असें तुमच्या ज्योतिषांत आलेलें तुम्ही सांगणार असाल; यापेक्षां तुम्ही ज्योतिषी लोक दुसरें विशेष तें काय सांगणार ? काय, होय कीं नाहीं ?" खाडकन् तोंड उतरून लोकमान्यांच्या लोभाचे हे ज्योतिषी स्नेही किंचित् लज्जित चर्येनें म्हणतात, "हो, पुढील साल तुम्हास अत्यंत अनिष्ट आहे. यापुढील मी बोलत नाहीं..." लोकमान्य म्हणतात, "पण काय ? पण मलाहि कमींत कमी--निदान आणखी ३-४ वर्षें तरी माझे हातून होणाऱ्या कार्यामुळें मला मरण्यास बिलकुल वेळ नाहीं. मग तुमचें ज्योतिष काय वाटेल तें सांगो !"

(१२८) लोकमान्यांस पासष्टावें वर्ष लागलें. त्यानिमित्त त्यांच्या ज्युबिली प्रसंगीं त्यांस केलेल्या एक लाख रुपयांच्या अहेराचे बाबतींत कांहीं कामानिमित्त कै. दत्तोपंत बेहेरे यांजकडे मी गेलों होतों. दत्तोपंत म्हणजे लोकमान्यांच्या अगदीं खेळीमेळींतील स्नेही. ह्यांनीं या बृहस्पतितुल्य पुरुषाची मला तेव्हां एक गोष्ट सांगितली. मागें एकदां येथें कोणी एक अष्टावधानी आला होता. त्याचे प्रयोग पाहण्यास सार्वजनिक सभेंत खासगी रीतीनें बऱ्याच मंडळींस बोलाविलें होतें. सदर अष्टावधानी यांचे प्रयोग झाल्यावर मीं जरा चेष्टेनें बळवंतराव यांस म्हटलें, 'तुम्ही मोठे बुद्धिवान म्हणतां; पण या साध्या माणसानें जो आतां बुद्धीचा प्रभाव दाखविला, तसा तुम्ही दाखवा पाहूं बरें !' आणि अद्भुत चमत्कार हा कीं, कधींहि संवय नसणाऱ्या त्या बहाद्दरानें जन्माच्या सतत व्यासंगाच्या त्या अष्टावधान्याप्रमाणें अगदीं यशस्वी प्रयोग करून दाखविला ! हें पाहून आश्चर्यानें आम्ही सर्व मंडळी थक्क झालों. देणें ईश्वराचें !

(१२९) कै. धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले यांच्याशीं एकदां बोलत असतां, त्यांस आपल्या विद्यार्थिदशेंतील एक आठवण होऊन त्यांनीं लोकमान्यांच्या पहिल्यापासून स्वार्थत्यागी मनाची व न्यू इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थ्यी-

विषयींच्या त्यांच्या कळकळीची एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले, " शाळा स्थापन झाल्यावर कांहीं काळ शाळेची सांपत्तिक स्थिति साधारणच होती मॅट्रिकमधील मुलांस सायन्सचें पुरेसें साहित्य शाळेंत नव्हतें. हें पाहून दरमहा तीस रुपये पगार घेणाऱ्या आमच्या या गुरुजींनीं (टिळक) दरमहाचे दरमहा काटकसर करून हातांत पडलेल्या पगारांतून प्रथम कांहीं बाजूस ठेवून वर्षअखेरच्या जमलेल्या १५० रुपयांतून आवश्यक तें सायन्सचें साहित्य मुलांस आणून दिलें.

(१३०) लोकमान्यांचे स्नेही व राष्ट्रीय पक्षाच्या सार्वजनिक प्रमुख फंडाचे सन्मान्य व प्रसिद्ध खजिनदार मुंबईस श्रीमंत यशवंत विष्णु ऊर्फ आण्णासाहेब नेने यांच्याशीं स्वराज्यसंघाच्या कामामुळें, माझा संबंध आला व त्यांच्या सौजन्यामुळेंच तो अधिक वृद्धि पावला. लोकमान्यांच्या राजकीय धोरणावद्दल गप्पागोष्टी करीत असतां बोलण्याच्या ओघांत त्यांच्या तोंडून लोकमान्यांविषयीं सहज कितीतरी गोष्टी येऊन गेल्या. पण त्या सांगण्याचा योग्य काल अद्यापि यावयाचा असल्यामुळें मोह आवरून फक्त सर्वसाधारण अशाच गोष्टी सांगण्याखेरीज गत्यंतर नाहीं. कारण लोकमान्यांचें चरित्रच असें गूढ आहे कीं, आध्यात्मिक दृष्टि नसलेल्या जीवाची श्रीकृष्णाच्या अद्‌भुत चरित्रानें जशी हटकून दिशाभूल होते तद्वतच राजकीय दृष्टिहीन कमकुवत प्राण्याचा लोकमान्यांच्या अथांग चरित्रानें गैरसमज न झाला तरच आश्चर्य ! म्हणून केवळ सरळ बालबोध अशाच त्यांच्या चार आठवणी सांगतों.

(१३१) श्रीमंत आण्णासाहेब म्हणाले, " मी केसरीचा अगदीं त्याच्या पहिल्या अंकापासून वर्गणीदार आहें. १८८२ सालीं बर्वे-प्रकरणांत टिळक-आगरकर यांचा प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट मि. वेव यांचेपुढें ता. २९ फेब्रुवारी रोजीं खटला निघून तो सेशन कमिट झाला. त्या वेळीं उभयतांची माझी ओळख नव्हती; इतकेंच काय, पण दृष्टादृष्टहि पूर्वीं कधीं झाली नसतांहि उमेदीनें व नवीन दमानें पुढें येणाऱ्या त्या बाल-गोपाल जोडीस मी जामीन राहण्याबद्दल इच्छा दर्शविल्यामुळें त्या परोपकारी, कृतज्ञ, उमद्या तरुण देशभक्तांस मोठें आश्चर्य वाटलें व टिळकांनीं माझें नांव, गांव, पत्ता——अवांतर सर्व माहिती टिपून घेतली. तेव्हांपासून त्यांचा व माझा

मराठी ... ८७०८२ ... परि/१५७

गेलीं ३८ वर्षें, वाढत्या चंद्रेकलेप्रमाणें, अधिकाधिक संबंध वाढत जाऊन, तो पौर्णिमेच्या चंद्रमाप्रमाणें पूर्ण होऊन आमचे निवासस्थानींच (मुंबई) तो चिरंतन वास करीत आहे !

(१३२) १८९७ सालच्या खटल्याचे वेळींहि वाटेल तितक्या रकमेचा त्यांस जामीन राहण्यास मी एकटा तयार आहें व त्याकरितां माझें ' प्रॉपर्टी-डीड ' (सर्व मालमत्ता) मी तारण लावून देण्यास तयार आहे, असें भाई शंकर यांचे मार्फत लोकमान्यांस मीं कळविलें होतें. पण व्यवहारज्ञ व स्नेहाचाहि भलताच फायदा कधींहि न घेऊं इच्छिणाऱ्या लोकमान्यांनींच मी तसें न करण्याबद्दल मला अत्यंत आग्रह केला; म्हणून मग मी व शेट द्वारकादास धरमसी असे दोघे त्यांस जामीन राहिलों.

(१३३) पुढें एक वर्ष शिक्षा भोगून ते परत आल्यावर एके दिवशीं आम्ही गोष्टी बोलत बसलों असतां, स्नेहभावपूर्वक जरा थट्टेनें व हंसत मीं त्यांस म्हटलें, "एक वर्ष जरा कोठें आपण शिक्षा भोगून आलांत ते, लोक आपणास हार घालून पाया पडून देवाप्रमाणें भजूं लागले. मग जे देशाकरितां हत्तीच्या पायीं मेले गेले, तापलेल्या तव्यावर उभें राहून ज्यांनीं देह जाळून घेतले, कडेलोट केल्यानें ज्यांनीं देशाकरितां प्राण सोडले, तोफेच्या तोंडीं दिल्यानें ज्यांचे तुकडे उडाले, अंगावर तेल ओतून पेटवून दिल्यानें जे पापडाप्रमाणें भाजून मेले, सव्वा मणाच्या बेडचा सोसून ज्यांनीं देह झिजविले अशा नरवीर देशभक्तांचें मग किती कौतुक केलें पाहिजे !" हें ऐकून अत्यंत गंभीरपणें लोकमान्य म्हणतात "हो, अगदीं खरें. अहो तुम्हीं आतां वर्णन केलें त्यापुढें आमचे कष्ट म्हणजे कोणत्या झाडाचा पाला ? देशसेवेकरितां ती एक चैनच आम्ही करतों असेंच उलट मला वाटतें. खरोखरच आमच्या या कष्टांत विशेष काय आहे ? जरा विचार केला आणि आमच्या पूर्वींच्या लोकांनीं धर्माकरितां अगर स्वामिकार्याकरितां देहाचे कसे होम केले हें पाहिलें, म्हणजे आमच्या पोकळ कष्टाबद्दल गळ्यांत पडणाऱ्या हारांच्या फुलांचा हा निव्वळ दुरुपयोग आहे असें वाटतें. इतकेंच नव्हे, तर एखाद्यानें सामान्य कर्तव्य बजावल्याबद्दल, त्यास अनुरूप असें भलतेंच पारितोषिक देण्यानें, खरोखरच जनतेच्या गुणग्राहकतेची

किंमत होऊन तिच्या अल्पसंतुष्टतेबद्दल कींव येते; इतकेंच नव्हे तर तिला अगदीं भलतेंच वळण लागतें, याबद्दल मनांतून मला बहुत खेदहि होतो !"

(१३४) १८९७ सालच्या तुरुंगवासानंतर लोकमान्यांनीं कांहीं एका विशिष्ट बाबीबद्दल श्रीमंत आण्णासाहेब नेने यांस पत्र पाठवून त्यांत अति महत्त्वाचें असें एक पुढील वाक्य लिहिलेलें आहे, "आण्णासाहेब ?... तुम्ही मला वांचविलें आहे. हे तुमचे उपकार मी विसरणें शक्य नाहीं !" यावरून श्रीमंत आण्णासाहेबांचा व लोकमान्यांचा कसा व कोणत्या प्रकारचा संबंध होता हें दिसून येईल. वंदुकीचें साग्र व यथार्थ वर्णन करून नेमकें तिच्या तोंडांतील गोळीचें वर्णन टाळण्यानें होणाऱ्या मनाची निराशा वरील पत्रांतील गाळलेल्या मुख्य मजकुरामुळें खिन्न होऊन विपण्ण होणाऱ्या मनाच्या निराशेपेक्षां खास अधिक तीव्र असूं शकणार नाहीं ! पण त्यास काय करणार ? श्री शिवरायाप्रमाणें लोकमान्यांचें चरित्रच तसें गूढ आहे खरें !!

(१३५) सन १९१४ सालीं लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर श्रीमंत आण्णासाहेब व लोकमान्य एकदां अगदीं खासगी सुखदुःखाच्या गोष्टी बोलत असतां आण्णासाहेब त्यांस म्हणतात, "आपण येथें नसतांना—आपले पश्चात् आपलें कुटुंब कैलासवासी झालें याबद्दल त्या वेळीं मला किती दुःख झालें म्हणून सांगूं ? आपणास तर ती बातमी कळल्यावर काय वाटलें असेल याची कल्पना होत नाहीं." किंचित् संकोचित मुद्रेनें लोकमान्य म्हणतात, "तुम्ही आतां विचारतांच म्हणून सांगतों. मूळ माझे स्वभावांत भावना कमी आहे असें नाहीं; पण अनुकूल संवेदनेनें हर्षातिशय अगर प्रतिकूल संवेदनेनें शोकातिशय असें कधींच होत नाहीं. याचा अर्थ असा नाहीं कीं, मी सुखदुःखातीत आहें. पण त्याहिबरोबर हेंहि खरें कीं, गीता व वेदान्त यांच्या मननानें व चिंतनानें विकारांचा क्षय होतो, हा माझा अनुभव आहे."

(१३६) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर सरकारानें त्यांस कसें 'वाळींत' टाकलें होतें व लोकांस कसा दरारा बसविला होता हें सर्वांस

माहीतच आहे. त्याच वेळीं एका प्रसिद्ध इंग्रज मनुष्यास लोकमान्यांनीं द्रव्याची मोठी मदत केली. तें पाहून आण्णासाहेब म्हणतात, मी त्यांस म्हणालों, 'विनाकारण पैशाचा असा दुरुपयोग कां करतां ?' ते म्हणाले, 'अहो, हें राजकारण आहे. पैशाचा मलिदा मी त्यांस चारीन तेव्हांच हा माझे उपयोगीं पडणार. राज्यकर्त्यांच्या हाडामांसाचा असल्यामुळें त्याचेकडून या पैशाच्या दसपट काम साधून घेतल्याखेरीज राहणार नाहीं. आवळा दिल्याखेरीज कोहळा मिळणार कसा ?" आणि खरोखरच त्यांनीं त्याचेकडून कोहळा मिळविला हें आम्हांस माहीत आहे !

(१३७) श्रीमंत आण्णासाहेब नेने यांच्या आठवणी वर लिहितांना त्यांचेसंबंधीं कांहीं शत्रूंनीं उठविलेल्या गैरसमजाच्या धुळीच्या शमनार्थ खुद्द लोकमान्यांनीं, केसरींत लिहावयाच्या मजकुराचे वेळीं सहज बाबासाहेब विद्वांस यांचेजवळ काढलेले उद्‌गार अशा वेळीं प्रसिद्ध करणें अनौचित्याचें होईल असें वाटत नाहीं. लोकमान्य म्हणाले, "कोणी काय वाटेल तें म्हणो; इतकेंच काय पण दुसरेहि कोणी त्यांची साथ करो; जोंपर्यंत मी जमविलेल्या पैशाचे (होमरूल-फंडाचे) आण्णासाहेब नेने खजिनदार आहेत व मराठे ऑडिटर असून आमचा लेखक सदुभाऊ बापट अकौन्टंट आहे तोंपर्यंत मला ब्रह्मदेवाचीहि भीति वाळगण्याचें कारण नाहीं ! मग × × × × × ची कथा काय ?"

(१३८) सन १९१७ ची कलकत्त्याची कॉंग्रेस होऊन मी परत येत असतां वाटेंत चांदा (मध्यप्रांत) येथें माझे आप्त रा. सा. दिगंबर कृष्ण कोल्हटकर असिस्टंट जज्ज यांचेकडे मी उतरलों होतों. रा. ब. वामनराव कोल्हटकरहि तेथेंच आलेले होते. कलकत्त्याहून परत येत असतां लोकमान्यांस चांदेकर मंडळी मुद्दाम तेथें आणणार होती. कोल्हटकर यांचे बंगल्यावरून लोकमान्यांची मिरवणूक जाणार होती. दुफेर रस्ते शृंगारण्यांत आले होते. त्यांच्याकडे पाहून मध्यप्रांतांतील नेमस्ताग्रणी वामनरावजी म्हणतात. "Certainly he is a very valuable man and by all means he deserves all public adoration. So long, we in vain misunderstood the man." (खरोखरच हा पुरुष केवळ अमूल्य आहे आणि जनतेनें त्यास भजावें असाच तो आहे. इतके दिवसपर्यंत,

आमच्यासारख्यांनीं विनाकारण त्यांचेविषयीं गैरसमज मात्र करून घेतला होता.) एके काळीं लोकमान्यांस शत्रु म्हणून लेखणाऱ्या नेमस्त मंडळींकडून हें सर्टिफिकेट घेण्यास त्यांस कसे टाकीचे घाव सोसावे लागले हें सांगण्याचें कारण नाहीं.

(१३९) सदर चांदा येथील मुक्कामांत एके दिवशीं रात्रीं चांदण्यांत रावबहादुरांशीं मी गप्पागोष्टी करीत असतां, त्यांचा विद्याव्यासंग, गीताभ्यास व त्यांचें दांडगें वाचन यांविषयीं मला अत्यंत आदर असल्यामुळें, मी त्यांस मुद्दाम विचारलें, "टिळकांचें गीतारहस्य तुम्हास कसें काय वाटतें ?" थोड्या कष्टानें पण अत्यंत सरळ व प्रामाणिकपणें ते म्हणाले, "तूं विचारतोस म्हणूनच सांगतों, "Mr. Tilak's *magnum opus* is crtainly unparalleled; but I wish it had been from the pen of Justice Ranade. I cannot frankly admire it as I would have done in the case of Ranade." (टिळकांचा हा प्रचंड ग्रंथ अद्वितीय आहे, यांत शंका नाहीं. परंतु मला वाटतें, हा ग्रंथ न्या. रानडे यांनाच शोभता. त्यांचे हातूनच तो व्हावयास पाहिजे होता. रानडे यांनीं हा ग्रंथ लिहिला असता तर त्याविषयीं आम्ही धन्योद्गार काढले असते तसें टिळकांचे बाबतींत होणें शक्य नाहीं !)

(१४०) कै. श्री. बाळासाहेब नातू 'सार्वजनिक सभेचे' खजिनदार असल्यामुळें त्यांजकडे वरचे वर जाण्याचा मला प्रसंग येई. कांहीं कारणामुळें लोकमान्यांच्याविषयीं तेथें बोलणें निघालें. तेव्हां ते म्हणाले, "मी बळवंतरावांस एकदां म्हणालों, 'तुम्ही आपली व केसरीची सर्व शक्ति, लोकांनीं स्नानसंध्या करावी व धर्मानें वागावें इकडे खर्च केली असती तर देशाचा खास अधिक फायदा झाला असता.' यावर टिळक म्हणाले, "अहो, परदास्यांतून सुटणें व दुसऱ्यास सोडविणें हीच खरी पहिली संध्या आहे. तुम्ही ब्रह्मवाक्य मानणाऱ्या आद्य शंकराचार्यांनींसुद्धां 'को नरक. ?' यास 'परतंत्रता' हेंच उत्तर दिलें आहे. या नरकांतून मुक्त झाल्यावर मग दुसरी भाषा; आणि म्हणूनच रामायण-महाभारतकाळीं ब्राह्मणांनीं निरुपायास्तव क्षत्रियाचें काम अंगावर घेतलेंच कीं नाहीं ? दुर्दैवानें आज तशीच आमची स्थिति झाली आहे. यांत सर्व कांहीं समजा."

(१४१) वरील आठवणींबरोबर दुसरीहि एक आठवण झाली. प्रो. जिनसीवाले हे श्री. बाळासाहेब नातू यांचेप्रमाणेंच धार्मिक व कर्मठ होते. त्यांनीं एकदां लोकमान्यांस धोंडोपंत विद्वांस यांचेबरोबर निरोप पाठविला कीं, "काय वाटेल तें करा; पण संध्या, त्रिसुपर्ण व ब्रह्मयज्ञ केल्याखेरीज राहात जाऊं नका." यावर उलट लोकमान्यांनीं त्यांस निरोप पाठविला तो असा :—"भय्यासाहेबांस (प्रो. जिनसीवाले यांस) म्हणावें कीं, सकाळीं मी जागा झाल्यापासून रात्रीं झोंपीं जाईपर्यंत मातृभूमीच्या चिंतनावांचून माझा एक क्षणहि जात नाहीं. हीच माझी संध्या, हेंच त्रिसुपर्ण व हाच ब्रह्मयज्ञ! तरी पण सहज घडल्यास मला तें नको आहे असें मात्र नाहीं."

(१४२) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर त्यांचा कीर्ति-भानु ऐन मध्यान्हीं तळपत असतां, एके दिवशीं मी सहज × × × यांच्याशीं बोलतांना, त्यांच्या मनाचा ताजवा मला पूर्ण माहीत असल्यामुळें, मी मुद्दाम त्यांस विचारलें, 'हल्लीं ठिकठिकाणीं बळवंतरावजींच्या अपूर्व मिरवणुकी निघतात व बादशहांपेक्षांही त्यांचा विलक्षण सन्मान होतो. इतकेंच काय पण देवाप्रमाणें लोक त्यांस भजतात, हें बळवंतरावांस कसें काय वाटत असेल? त्यांस कितीतरी आनंद होत असेल नाहीं?' चटकन् × × म्हणतात, 'छट्! बळवंतरावजींचे ते दिवस मागेंच निघून गेले आहेत. ते आतां मनानें या सर्वांच्यावर आहेत. खरोखर ते अलीकडे शोक-आनंद या विकारातीत झाले आहेत. लोकांची ही सन्मानाची उपाधि केवळ आपलें कार्य अधिक विस्तारावें याच सात्त्विक बुद्धीनें ते सोशीत असावेत असें मला वाटतें. नाहीं तर एरवीं त्यांनीं क्षणभरहि असले प्रकार निःसंशय चालूं दिले नसते असें मला वाटतें; पण करतात काय, लोकसंग्रह हा तर त्यांचा नित्याचा धंदाच होऊन बसला आहे!'

(१४३) रा. विनायक गणेश लिमये, बी. ए. यांजकडे मी एकदां गेलों असतां त्यांनीं आपला स्वतःचा अनुभव सांगितला, तो पुढें देत आहें. ते म्हणाले, "वे. शा. सं. प्रो. किवजडेकरशास्त्री यांस लोकमान्यांनीं कांहीं एक ग्रंथ लिहिण्यास सांगितला होता. सदर बाबतींत शास्त्रीबुवांकडे जाऊन मी लिहिण्याचें काम करीत असें. पण एकाएकीं माझे डोळे बिघडले व लिहिण्यावाचण्यास मी असमर्थ झालों." एके दिवशीं शास्त्रीबुवा लोकमान्यांकडे गेले

असतां त्यांस लोकमान्य म्हणाले 'आमचें काम (ग्रंथ लिहिण्याचें) कोठपर्यंत आलें आहे ?' शास्त्रीबुवा म्हणाले, 'आमचे मदतनीस लिमये यांचे डोळे एकाएकीं बिघडल्यामुळें लेखनाचें काम लांबणीवर पडलें आहे,' लोकमान्य म्हणाले 'कोण लिमये ? कशानें एकाएकीं डोळे बिघडले ? त्यांस ताबडतोब माझ्याकडे पाठवून द्या.' शास्त्रीबुवांनीं मला लोकमान्यांकडे जाण्यास सांगितलें; पण त्यांची माझी ओळख नाहीं, कधीं जाणें-येणें नाहीं, कांहींहि संबंध नाहीं. असें असतां आपण त्यांजकडे कसें जावें असें वाटूं लागलें. पण त्या थोर पुरुषाची आज्ञा उल्लंघणें अधर्म्य होय असें वाटल्यामुळें त्यांजकडे गेलों. त्यांनीं मला सर्व माहिती वगैरे विचारली व म्हणाले, 'तुमचे डोळे येथील डॉक्टराकडून बरे होणारे नाहींत, त्याकरितां तुम्हास मुंबईसच गेलें पाहिजे, मुंबईस तुम्ही अवश्य जा.' 'पण जा कसें ? माझी तशी सांपत्तिक स्थिति नाहीं, यामुळे हें मला अशक्य आहे,' असें मी किंचित् निराशेनें त्यांस म्हणालों. त्यावर ताडकन् लोकमान्य म्हणतात, "आम्ही ज्या वेळेला एखाद्याला कांहीं गोष्ट करावयास सांगतों तेव्हां ती केवळ आम्ही आमच्या जबाबदारीवरच सांगत असतों. नेहमींचा आमचा असाच परिपाठ आहे. तुम्हास काळजी करण्यास नको. तुम्ही खुशाल मुंबईस जा, उपचार करा, सर्व खर्च मी देईन !" तरुणावर पितृवत् प्रेम करणाऱ्या या पुढाऱ्याच्या थोर व उदार मनाची मी आपले मनांत वाहवा करीत घरीं गेलों, व पुढें अन्य रीतीनें मी आपली सोय मुंबईस करीत आहें, असें त्यांस लिहून पत्रद्वारें त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानले. पुढें कैक दिवसांनीं ते चिरोल-केसच्या अगदीं गडबडींत असतां व बोलण्यासहि त्यांना त्या वेळीं फुरसत नसतां त्यांतले त्यांत किजवडेकरशास्त्री यांच्यापाशीं त्यांनीं त्या पत्राचा उल्लेख केला याचें आश्चर्य वाटतें !"

(१४४) न्यू इंग्लिश स्कूलमधील लोकमान्यांच्या बरोबरीचे एक शिक्षक व त्यांचे स्नेही श्री. हरिभाऊ आमडेकर यांचेकडे ता. २४–८–१९२० रोजीं गेलों असतां त्यांनीं मला लोकमान्यांविषयीं बऱ्याच गोष्टी सांगितल्या; व मी त्यामुळें लोकमान्यांच्या चरित्रावर विशेष प्रकाश पडणार असला तरी त्या केवळ व्यक्तिविषयक असल्यामुळें त्या सर्व गाळून, सांगण्यासारखी अशी फक्त एकच गोष्ट येथें देतों. ते म्हणाले, शाळेंतील ड्रिलमास्तर गंगाधरपंत दीक्षित यांजकडे एके दिवशीं कांही नैमित्तिक प्रसंगानें विष्णुशास्त्री चिपळूणकर,

बळवंतराव, आगरकर, वगैरे वरीच शिक्षक मंडळी भोजनास गेली होती. भोजन चालू असतां आग्रह सुरू झाला. तेव्हां बळवंतराव म्हणाले, “येथें आग्रह करण्याचें कांहींएक कारण नाहीं. शिवाय अकरा वाजतां आपणां सर्वांस शाळेंत कामावर जावयाचें आहे हें लक्षांत ठेवा.” त्यांच्या या म्हणण्याकडे फारसें कोणी लक्ष दिलें नाहीं. आग्रह सुरू झाला. कांहीं मंडळी हट्टास पेटली, व पैज मारण्यापर्यंत पाळी आली. अखेर बळवंतरावहि यांत सांपडले व अखेर त्यांची आणि दुसऱ्या एका गृहस्थाची चढाओढ सुरू झाली, व यांत हरेल त्यानें पांच रुपये शाळेंतील ड्रिलच्या सामानाकरितां द्यावे असें ठरलें ! टिळकांच्या सदर सामनेदारानें मोठ्या शिकस्तीनें बेसनाचे वीस लाडू खाल्ले व बळवंतरावांनीं एकवीस खाऊन पैज जिंकली ! बळवंतराव आतां आजारी पडणार, कोण हा अत्याचार, वगैरे मधून मधून शास्त्रीबुवा व आगरकर एकसारखें बोलत व निषेधहि करीत. पुढें जेवण झाल्यावर कांहींनीं आज शाळेंत जाणें अशक्य म्हणून चिठ्ठी पाठविली; कांहींनीं तेथेंच वामकुक्षी केली व कांहींनीं आज शाळेंत येण्यास उशीर होईल म्हणून कळविलें. पण शास्त्रीबुवा आपलें सोंवळें-भांडें घरीं ठेवून येतात तों, वर्गावर जाऊन आपल्या नेहमींच्या मोठ्या आवाजानें शिकवीत असलेल्या टिळकांचा आवाज ऐकून शास्त्रीबुवा अगदीं थक्क झाले. इतकेंच नव्हे, तर तास संपतांच ज्या कोणा शिक्षकांस येतां न आल्यामुळें वर्ग मोकळा पडला होता त्या वर्गावर जाऊन त्यांनीं तास घेतला. हें पाहून शिक्षक मंडळी बसण्याच्या खोलींत शास्त्रीबुवा आल्यावर म्हणतात ‘जोंपर्यंत टिळक शाळेंत आहेत तोंपर्यंत तरी निदान आजची शाळा बुडण्याची मला काळजी नाहीं !’

(१४५) एके रविवारीं ( ता. ७ जुलै १९१८ ) अनपेक्षित रीतीनें सकाळच्या डाकेनें आमच्या ऑफिसमध्यें—केसरी ऑफिसांत—मॉन्टेग्यू—चेल्मसफर्ड सुधारणांच्या रिपोर्टाच्या तीन प्रती अचानक येऊन धडकल्या. तें पाहून प्रथम सर्वांस आश्चर्य वाटलें. ताबडतोब लोकमान्यांनीं आपणां स्वतःकरितां एक प्रत घेतली, एक केळकर-खाडिलकर यांस दिली, व एक करंदीकर-गोखले-भट यांचे हवालीं केली, व दुसरे दिवशीं सोमवारीं सायंकाळीं सर्वांनीं एके ठिकाणीं जमून आपले अभिप्राय मला कळवावेत असें सर्वांस सांगितलें. लोकमान्यांनीं त्या दिवशीं-रविवारीं-सकाळीं १७० फुलस्कॅप पानांचें तें पुस्तक एकदां

जें हातांत घेतलें तें सायंकाळीं संपेपर्यंत खालीं ठेविलें नाहीं. स्नान, खाणें व व इतर व्यवहार सर्व बाजूस राहिला. अशी विलक्षण एकाग्रतेची समाधि त्यांनीं लाविली होती असें त्यांचे भाचे रा. बाबासाहेब विद्वांस यांनीं सांगितलें. रात्रीं व दुसरे दिवशीं—सोमवारीं सकाळीं—त्या पुस्तकावरून त्यांनीं आपलीं टिपणें-टांचणें करून दोन प्रहरीं केसरीकरितां अग्रलेखहि लिहून ठेविला. त्या अग्रलेखास त्यांनीं "उजाडलें, पण सूर्य कोठें आहे?" असा त्या सुधारणांच्या तात्पर्यात्मक व सर्व निष्कर्षक मथळा दिला! चार वाजतां थोरल्या दिवाणखान्यांत वरील सर्व मंडळी जमण्यापूर्वी प्रस्तुत लेखकानें आशाळभूतपणें "तुम्ही तो रिपोर्ट वाचलाच असेल; सरकारनें अखेर काय दिलें आहे?" असें वरील मंडळींपैकीं एका तज्ज्ञास विचारलें. तेव्हां प्रसन्न व आनंदित मनानें "रुपयापैकीं फार तर दहा-बारा आणे स्वराज्य आपणास ईश्वरकृपेनें मिळालें आहे" असें ते म्हणाले!! नंतर सर्व मंडळी जमल्यावर लोकमान्यांची स्वारी तेथें आली. 'काय सर्वांनीं वाचलेंत? केवढा हा रिपोर्ट, काय वेटचांचा वाग्जाळ! साहेबानें अखेर त्याच्या शीलाप्रमाणें आमच्या हातावर, मिठ्ठास गोड गोड भाषण करीत, तुरी दिल्या यांत शंका नाहीं! रुपयापैकीं फार तर आणा दोन आणे किंमतीच्या या सुधारणा आहेत. या वेळीं युद्धाच्या मदतीच्या मोबदल्यानें आम्हास जें मिळावयास पाहिजे त्या मानानें हें कांहींच नाहीं. अशानें प्रजा अधिकच निराश होऊन सरकारासंबंधानें देशांत प्रचंड असंतोष मात्र फैलावल्याखेरीज राहणार नाहीं. सर लायोनेल कर्टिस यानें या वेळीं आपला हात चांगला मारून घेतला यांत शंका नाहीं. या सुधारणांस मांटेग्यू-चेल्म्सफर्ड सुधारणा म्हणण्यापेक्षां मॉन्टेग्यू–कर्टिस स्कीम असेंच म्हणणें विशेष शोभेल. उपनिषदांच्या शब्दांत मी तर त्यांचें असेंच वर्णन करीन कीं, 'मॉन्टेग्यू शिरःकर्टिस पुच्छं प्रतिष्ठा!' नंतर मग मंडळींचा पुष्कळच वादविवाद झाला, व उद्यांचे केसरीकरितां आपण आतांच याच विषयावर आर्टिकलहि लिहून खालीं बाबाकडे दिलें आहे' असें ते म्हणाले. हें ऐकून सर्वांस आश्चर्य वाटलें. पुढें लोकमान्य म्हणाले, "त्या आर्टिकलला मीं 'उजाडलें; पण सूर्य कोठें आहे?' असें हेडिंग दिलें आहे, पण ही कल्पना मला A Drama without Hamlet यावरून सुचली." नंतर टाइम्स–क्रॉनिकलकडे सुधारणासंबंधीं आपला अभिप्राय आजचे आज तारेनें पाठविण्याचें ठरविलें; व लगेच तेथेंच

चरित्र
२८/११/५८
१६०

मसुदा तयार होऊं लागला. आरंभींच The Reforms are quite worthless एवढें वाक्य ते किंचित् रागानें एकदम उद्गारतांच सर्वांसच जरा कसेंसें वाटलें; इतकेंच नव्हे तर इतक्या कडक पद्धतींत व सबंध हिंदुस्थानांत सर्वांचे आधीं, आजचे आज, आपणच प्रथम आपलें मत जाहीर करीत आहांत याची त्यांस त्या मंडळींनीं अत्यंत सौम्य व नम्र रीतीनें किंचित् जाणीवहि करून दिली. पण सिद्धांताप्रमाणें सिद्ध झालेलीं त्यांचीं पायाशुद्ध व शास्त्रीय मतें व तीं व्यक्त करण्याची त्यांची तीक्ष्ण पद्धति यांत फरक कसचा पडतो ? पुढें केसरीचें मत प्रमुख इंग्रजी पत्रांना कळवितांना केसरीनें योजलेल्या शीर्षकाचें भाषांतर तारेंत घालण्याची वेळ आली. तेव्हां कोणी The morning without the sun, कोणी The day dawned but the sun वगैरे वगैरे भाषांतर सुचवूं लागले. तों एकदम लोकमान्य म्हणाले "थोडक्यांत पण 'पोएटिक' The sunless morning असें लिहा म्हणजे झालें.

(१४६) दुसरे दिवशीं सकाळीं म्हणजे मंगळवारीं मी त्यांचेकडे लिहावयास गेलों असतां आंतील खोलींत आरामखुर्चीवर पडून रा. वासुकाका जोशी यांच्याशीं ते बोलत होते. नवीन सुधारणा त्यांच्या डोक्यांत एकसारख्या घोळत होत्या. सुधारणांचा पोंचटपणा, मत्राळांचा तिरस्कार्य लोचटपणा, इंग्रजांचा कावेबाजपणा व आपल्या लोकांचा कमकुवत ऊर्फ दुबळेपणा या चतुर्विध विचारांनीं केव्हां फार निराशेनें तर केव्हां मधून मधून प्रबल आशेनें ते बोलत होते. बोलतां बोलतां किंचित् पडल्या आवाजांत ते म्हणाले "आमच्या हयातींत येथपर्यंत तरी मजल गांठेल असें तरी एके काळीं आम्हास कोठें वाटलें होतें? समव्यवसायी बंधूंना (मला वाटतें या वेळीं विष्णुशास्त्री, आगरकर वगैरे मंडळी त्यांच्या मनापुढें असावी) आशेचे नुसते किरणहि पाहावयास न सांपडतां या जगांतून जावें लागलें. त्या मानानें माझें मोठेंच भाग्य म्हटलें पाहिजे; आणि आलों गतीच्या दसपट वेगानें आम्ही पुढें गेलों व या वेळीं भगवद्गीतेचें बीज सर्वांस नीट कळलें तर मला उमेद आहे कीं, माझ्या देखत जरी नाहीं तरी दहावीस वर्षांत देशास पूर्ण स्वातंत्र्य मिळण्यास हरकत नाहीं!"

(१४७) तळेगांवच्या नूतन श्रीसमर्थ विद्यालयाच्या पुनर्स्थापनेच्या बाबतींत लोकमान्यांनीं मुद्दाम पडद्याआड राहून गु. प्रो. आण्णा विजापूरकर

यांस शक्य ती मदत केल्याचें लोकांस माहीत नसावें असें दिसतें. सदरहू बाबतींत सर माधवराव चौबळ यांजकडूनहि इष्ट व शक्य ती मदत घेण्यास लोकमान्यांनीं कमी केलें नाहीं. विद्यालयाच्या बाबतींत प्रस्तुत लेखकाबरोबर दोन-तीन वेळां पत्रें देऊन त्यास पुणें-लष्करमधील बंगल्यांत सर माधवराव साहेब यांजकडे लोकमान्यांनीं मुद्दाम पाठविलें होतें. त्यांपैकीं एके प्रसंगीं रात्रीं दहा वाजतां मी सरसाहेबांकडे पत्र घेऊन गेलों असतां वेळप्रसंगीं गव्हर्नरसाहेबांच्या खुर्चीवर बसून काम केलेल्या सरसाहेबांचे हातांत अगदीं खेडेगांवीं पद्धतीचा चंचीचा बटवा व त्याच्या खालीं लांबवर लोळत पडलेली नाडी हा थाट पाहून मला जरा आश्चर्यच वाटलें. लोकमान्यांनीं दिलेलें पत्र त्यांचे हातांत मी देऊन जवळच खुर्चीवर बसण्यास त्यांनीं मला सांगितल्या-वर त्यांनीं तें पत्र फोडून वाचून झाल्यावर तेथें असणाऱ्या एका बड्या गृहस्थाकडे वळून ते म्हणतात, "मी पेन्शन घेण्याचे आधीं एकदां माझे अध्यक्षतेखालीं किर्लोस्कर थिएटरांत सभा झाली. त्या वेळीं तेथें टिळक आले. त्यांच्या स्वागतार्थ श्रोत्यांनीं केलेल्या त्यांच्या नांवाच्या गजरानें थिएटर कोसळून खालीं पडतें कीं काय असें वाटलें. हें सर्व पाहून मला मनांतून फार आनंद झाला." इतकें बोलून हातांतील पत्र पुनः वाचीत किंचित् मजकडे वळून पण जवळच्या त्या गृहस्थाकडे पाहात सर साहेब म्हणतात, "Once he (Tilak) takes to a thing he has no minute to wait. He will try to accomplish it by whatever means at his hands. With such giant-like efforts the country must see better days." असें म्हणत लोकमान्यांस देण्याकरितां त्यांनीं एक चिठी लिहून दिली. ती घेऊन लोकमान्यांकडे मी आलों तों त्यांस झोंप लागली असल्यामुळें रा. बाबासाहेब यांचेजवळ ती ठेवून मी घरीं गेलों. तो सोमवारचा दिवस होता. गु. तात्या करंदीकर केसरीचीं प्रुफें पाहात तेथें बसले होते. अकराचे सुमारास लोकमान्य जागे होतांच बाबांनीं त्यांस ती चिठी देतांच " आतांचे आतां पावणेबाराचे गाडीनें तळेगांवास जाऊन विजापूरकर यांस सकाळचे मेलनें माधवराव चौबळ येत आहेत, त्यांस तळेगांवचे स्टेशनावर भेटून त्यांचेबरोबर मुंबईस जाण्यास त्यांस सांगा-वयाचें आहे; तरी ताबडतोब कोणास पाठविण्याची व्यवस्था करा" असें

गु. तात्या करंदीकर यांस लोकमान्यांनीं सांगतांच ते माझ्या घरीं आले. मी लगेच रवाना झालों. रात्रौ ११-११। वाजतां गु. आण्णा विजापूरकर यांस उठवून माझे येण्याचें प्रयोजन मी सांगताच ते म्हणतात " खरोखर बळवंतराव नुसत्या शिक्षणाचा प्रश्न हातीं घेते तर राष्ट्रीय शिक्षणाचें पूर्ण स्वराज्य ते केव्हांच मिळवते ! ते जे डोक्यांत घेतील त्याचा अगदीं पिच्छा पुरवतील. केसरीवर आरूढ होणें त्यांनाच शोभतें ! "

(१४८) ताईमहाराज-प्रकरणाचा एकदांचा अखेरचा निकाल लोकमान्यांस अनुकूल असा प्रिव्ही कौन्सिलांत लागल्याची तार येतांच त्या आनंदाचें काय वर्णन करावें ? सदर दिवशीं मी आजारी म्हणून घरीं पडून होतों. पण लोकमान्यांस केव्हां भेटेन व त्यांचे अभिनंदनार्थ त्यांच्या चरणांवर केव्हां मस्तक ठेवीन असें मला झालें होतें. अखेर त्याच दिवशीं रात्रीं १०॥ चे सुमारास मी त्यांजकडे जाऊन त्यांचे पायावर डोकें ठेवून आनंदाचे चार शब्द बोलल्यावर ते म्हणतात " या खटल्यानें गेलीं १४ वर्षें माझी वुद्धि व शक्ति बरीच खाऊन टाकली. अखेर बरी झाली म्हणून ठीक. तरी पण आनंद झाला असतां हंसणें व दुःख झालें असतां रडणें या निवळ माकडचेष्टा आहेत असें समजून आपण आपलें काम मात्र अखंड करीत राहिलें पाहिजे. "

(१४९) तपस्वी बाबासाहेब परांजपे यांचा स्पष्टवक्तेपणा महशूरच आहे. त्यांच्याशीं एकदां बोलत असतां ते म्हणाले " मी टिळकांकडे एकदां जाऊन त्यांस म्हटलें ' परवांपासून आपल्या ऑफिसांतील दोन पदवीधर गृहस्थांस येथून रजा मिळाली, आश्चर्य आहे ! आपल्या चालीस ते कमी पडत असले तरी त्यांस शिकवून, वेळोवेळीं त्यांस सूचना देऊन आपण तयार केलें असतें तर ते तयार झाले असते. सरकारी नोकरीच्या यंत्रांत घातलेला कसलाहि इसम जर त्या सांच्यांत वसतो तर आपल्या ऑफिसमध्यें असें कां होऊं नये ? दोष कोणाचा ?' हें ऐकून टिळक म्हणतात 'अहो, असल्या गोष्टी कोठें शिकवून येतात ? तें जातीचेंच लागतें. आम्हास कोठें कोणीं शिकविलें होतें ? छापाचे मातीचे गणपति काय थोडे तयार होतात ? मग शाडूच्या कोरीव मूर्तींची कांहींच किंमत उरतीना ! येथें येणाऱ्या आमच्या

मंडळींस साहित्यसामुग्री वगैरे सर्व कांहीं आम्ही पुरवितों, त्यांस पुस्तकें वगैरे जें कांहीं लागेल तें सर्व देतों. त्यांतून आपल्या कर्तृत्वानें जो डोकें वर काढील—मग तो एकादाच का होईना—तोच टिकाऊ होईल व हें सर्व सांभाळील.'

(१५०) लोकमान्यांनीं चिरोलवर खटला करून त्यापायीं आपली चीजवस्त, राहण्याचें घरहि गहाण टाकून व वरआणखी लाख दीड लाख रुपयांचें डोक्यावर कर्ज करून खटल्याकरितां विलायतेस जाण्याची तयारी केली होती हें आतां सर्वश्रुतच आहे. विलायतेस जाण्यापूर्वी विश्वासांतील कांहीं मंडळींस जवळ घेऊन लोकमान्य म्हणतात, " मी आतां विलायतेस चाललों. खटला आपणासारखा झाला तर माझें अब्रुनुकसानीबद्दल मिळणाऱ्या पैशाचें मी काय करणार हें सांगावयास पाहिजे; पण उलट खटला अंगावर आला तर मात्र मी हिंदुस्थानांत लगेच परत येतांच (पुढील वाक्य हंसत विनोदानें म्हणतात) सरकारी नोकरीप्रमाणें पाहिलें तरी देखील मला आता जनतेकडून 'पेणसलींत निघण्यास' हरकत नाही; 'पेणसल' राहिली, पण जनतेची निदान एक वर्ष 'हक्काची' रजा घेऊन सिंहगडावर बसून माझे अपूर्ण राहिलेले ग्रंथ मी पुरे करून त्यांवर मला सहज हजारों रुपये मिळतील ते मिळवून ऋणमुक्त झालें पाहिजे व हें अगदीं सहज होईल यांत मला बिलकुल शंका वाटत नाहीं. शिवाय या अशा अडचणीच्या काळांतच माझे हातून ग्रंथ निर्माण व्हावेत असाच योगायोग व ईश्वरी संकेत असावा असें दिसतें." यावरून परावलंबनाचा त्या विजयी योद्धयाच्या मनास कधींहि विटाळ न होतां निवळ आत्मबळावरच कोणत्याहि अचाट कार्यास ते कसा हात घालीत हें यावरून दिसून येतें. बाकी त्यांस पितृवत् मानणाऱ्या व अखंड शीर्षाधिष्ठित करणाऱ्या जनतेनें फुलांची पाकळी म्हणून त्यांचे चरणीं तीन लक्ष रौप्य मुद्रिका अर्पण केल्या ही गोष्ट वेगळी. पण ही पर्स, ते हिंदुस्थानांत येतांच त्यांस देण्याकरितां, ते विलायतेंत असतांनाच, इकडे पैसे गोळा होऊं लागले होते. ही गोष्ट त्यांस समजली तेव्हां त्यांस बरें वाटलें नाहीं. कारण लोकांच्या मदतीच्या अपेक्षेवर आपण हा खटला उभारलाच नसून तो आपण आपल्या मनगटाच्या सामर्थ्यावर व आत्मविश्वासावर उभारला आहे. खटला सार्वजनिक स्वरूपाचा असला तरी

लोकांस न विचारतां तो आपण सुरू केला आहे; सबब त्याचा बोजा लोकांवर काय म्हणून असें त्यांस वाटत असे. म्हणून त्या वेळीं विलायतेहून त्यांनीं रा. बाबूराव गोखले यांस पाठविलेल्या कित्येक पत्रांतून याविषयींचा पुढीलप्रमाणें लिहिलेला मजकूर पाहून त्यांच्या निरपेक्षतेसंबंधानें मन अधिकच उचंबळून येतें " Mr. Kelkar has cabled to you to stop fresh collection for the proposed Purse Fund. So please discontinue at once the Purse Fund collections in any way. (पत्र–ता. ३१ जुलै १९१९)...I have already written to you to stop at once the Purse collection in any manner whatever. I did not like your idea of sending cards on my birth-day. But it is no use quarrelling about what has taken place. I think you had better close up the thing now at once. (पत्र–ता. १४ ऑगस्ट १९१९) .....I sincerely hope you have now stopped the collection of the Purse Fund. (पत्र–ता. २१ ऑगस्ट १९१९) .... I think you had now better close the Purse Fund; that is stop securing any new contributions at least (पत्र ता. २८ ऑगस्ट १९१९).

(१५०) येणेंप्रमाणें लोकमान्यांनीं निकडीचीं पत्रें पाठविलीं, पण लोकमान्यांवरील हा प्रसंग आपणावरीलच प्रसंग असें जाणणाऱ्या त्यांच्या बंधु-भगिनींनीं लोकमान्य हिंदुस्थानांत येण्यापूर्वींच तीन लक्षांचीं गांठोडीं बांधून ठेविलीं व तीं त्यांस पुणें येथें मुद्दाम केलेल्या जाहीर समारंभांत अर्पण केलीं. त्या वेळीं लोकमान्य म्हणाले, " तुम्हास न विचारतां मीं य खटल्यांत हात घातला; म्हणून त्याचा बोजा तुमच्यावर लादणें योग्य नव्हतें. तुमच्या अभावीं सदरहू घोंड दूर करण्यास मला कांहीं काल बाजूला बसावें लागणार होतें. पण आज तुम्ही हा बोजा उचललांत याचा अर्थच हा कीं, तुम्ही मला तेवढ्यापुरतें विकत घेतलेंत, व मलाहि तुम्हास सांगण्यास आनंद वाटतो कीं, ह्या मूर्दंडादाखल वायां जाणारा माझा काल मी यापुढें तुमच्याच सेवेंत खर्च करीन ! "

(१५२) मवाळ झाले म्हणून सर्वच मवाळ अगदीं एकछापीच असतात असें थोडेंच आहे. त्यांतून मनुष्याची पारख असणाऱ्या लोकमान्यांस मवाळांच्या पुढाऱ्यांतीलहि प्रकृतिभेद माहीत असल्यास नवल नाहीं. लोकमान्य विलायतेस असतां १९१९ सालीं सुधारणांच्या कायद्याबद्दल पार्लमेंटच्या सिलेक्ट कमिटीपुढे होणाऱ्या साक्षीकरितां हिंदुस्थानांतून निरनिराळीं डेप्युटेशनें गेलीं होतीं. त्यांत मवाळांच्या डेप्युटेशनांत इतरांपेक्षां ना. श्रीनिवास शास्त्री आले तर तितका कार्यनाश होणार नाहीं अशासंबंधानें केळकर यांस पाठविलेल्या ता. २८।२।१९१९ च्या पत्रांत लोकमान्य म्हणतात "I may last of all tell you that if Shastri comes to know what the real situation here is and if he does not fall subsequently into the hands of Basu and Lord Sinha I believe he will agree with us or at any rate not oppose us !"

(१५३) सन १९१९ सालीं लोकमान्य विलायतेहून परत येण्याचे वेळीं अभूतपूर्व बादशाही स्वागत समारंभानें पुण्यपत्तनस्थानीं त्यांचा अलौकिक नगर प्रवेश घडवून आणिला. लगेच म्युनिसिपालिटीनेंहि त्यास मानपत्र अर्पण केलें; पण त्याशिवाय पुण्यांतील सर्व जनतेमार्फत त्यास आणखी एक दुसरें मानपत्र देण्याचें ठरलें. पण त्यास जेथे मॅन्शनमधील मंडळींनीं अर्थात् जुन्या दावेदार मवाळ पक्षानें—विरोध करण्याचें ठरविलें. " मानपत्रास पुण्याचे सर्व नागरिक अनुकूल नाहींत—पुष्कळ विरुद्ध आहेत, सबब तें मानपत्र सर्व नागरिकांतर्फे न देतां, टिळकांच्या चहात्या मंडळींचें आहे असें प्रसिद्ध करा; नाहींतर आम्ही विरोध करूं. " असा मवाळांच्या सभेंत ठराव पास झालेला प्रसिद्ध झाला. तें पाहून समारंभास विघ्न येऊं नये—तो निर्बाध पार पडावा या शुद्ध बुद्धीनें या मानपत्राच्या चळवळीचे आद्य पुरस्कर्ते यांनीं मवाळ म्हणतात त्याप्रमाणें करावें असें ठरविलें. ही गोष्ट लोकमान्यांस कळतांच अपूर्व वीरश्री संचरलेल्या योद्धयाप्रमाणें ते पुढें होऊन हा केवळ तत्त्वाचा प्रश्न पडल्यामुळें सर्व नागरिकांतर्फेच मानपत्र असेल तर घेण्याचें त्यांनीं ठरवून हें सर्व काम स्वत: जातीनें पार पाडण्याचें त्यांनीं ठरविलें. कारण प्रश्न 'मान'-पत्राचा—मानापमानाचा नसून (कारण यापूर्वीं शेंकडों मानपत्रें त्यांस मिळालेलीं होतीं व

प्रत्यक्ष पुणेंकरांतर्फेंहि म्युनिसिपालिटीनें त्यांस मानपत्र नुकतेंच दिलेलें होतें) विलायतेंत बजावलेल्या कामगिरीस पुणें शहरवासीयांच्या मिळणाऱ्या पसंतीच्या तत्त्वाचा होता. यामुळें स्वतःबद्दलचा हा प्रश्न आहे असें म्हणून लोकापवादास्तव त्यांत आपण लक्ष न घातलें तर आतां मात्र खचित तत्त्वाचा व कार्याचा नाश होतो असें पाहून स्वतःविषयींच्या निरभिलाष बुद्धीनें, ' केवळ टिळकचाहात्यांचेतर्फे हें मानपत्र नसून तें सर्व नागरिकांतर्फेंच आहे; छाती असेल तर तेथें विरोध करण्यास या,' असेंहि पत्र मवाळ कंपूचे अध्वर्यु रँ० परांजपे यांस त्यांनीं पाठविलें. इतकेंच काय, पण रेमार्केट (फुलेमंडई)च्या रणक्षेत्राच्या या छोटया वाग्‌युद्धभूमीची रचना कशी असावी, कोणत्या शिबिरामध्यें प्रतिपक्षीयांनीं बसावें, एकंदर तेथील व्यवस्था कशी असावी इतक्या बारीक-सारीक गोष्टीहि--त्यांचा नकाशा काढून सभेचे व्यवस्थापक डॉ. गोपाळराव पळसुले यांजकडून करवून घेण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं ! तसेंच ता. ९।१२।१९१९ च्या केसरींतील या विषयावरील त्यांनीं लिहिलेल्या त्या प्रखर स्फुट सूचना व पुढच्याच अंकांतील ' ना. परांजप्यांचा जळफळाट ' हा तिखट अग्रलेख हे त्यांच्या युद्धनैपुण्याचे व कार्ययशस्वितेचे अपूर्व मासले होत !

(१५४) गेल्या जानेवारीमध्यें स्वामी श्रद्धानंदजी पुणें येथें आले असतां येथील त्यांच्या कांहीं तासांच्या मुक्कामांतील कामाचे गर्दीतच मी त्यांस लोकमान्यांविषयीं आपल्या आठवणी देण्याबद्दल विनंति केली. स्वामीजी म्हणाले, परकीय राज्यकर्त्यांकडून स्वराज्य कसें मिळवावें हें ज्यानें जन्मभर आपल्या अलोट देशभक्तीच्या व मुत्सद्देगिरीच्या उदाहरणानें लोकास शिकविलें तीच त्याची खरी आठवण होय ! इतर सटरफटर गोष्टी घेऊन काय करावयाचें आहे ? ' तरी पण माझा विशेष आग्रह पाहून ते म्हणाले ' त्यांचा माझा फारसा संबंध आला नाहीं, व आतां या वेळीं आठवतहि नाहीं; तथापि एक प्रसंग सांगतों. अमृतसरच्या काँग्रेसच्या वेळीं टिळक तेथें आले असतां काँग्रेसचा स्वागताध्यक्ष मीच असल्यामुळें त्यांस उल्लेखून ते मला म्हणाले, " स्वामीजी, खरा संसार--राष्ट्राचा खरा संसार--सुरळीत चालावा म्हणून स्वतः स्वार्थसंन्यास घेतलेले तुमच्यासारखे शेंकडो

संन्यस्त स्वामी आपल्या देशांत जर निर्माण होतील तर भगवद्गीतेंतील 'संन्यास' या कल्पनेचा व शब्दाचा खरा अर्थ लोकांस चटकन् समजेल. तुम्ही आपल्या आचरणानें भगवद्गीतेच्या सिद्धांताचा अर्थच लावीत आहांत असें मी समजतों." आर्यसंस्कृतीबद्दल टिळकांचें प्रेम कसें विशेष होतें, हें त्यांनीं सांगितलें व नंतर लगेच भरलेल्या श्रीशिवाजीमदिरांतील सभेंत वरील गोष्टींचा त्यांनीं उल्लेखहि केला.

(१५५) लोकमान्य व श्री जगन्नाथमहाराज यांचा संबंध पिता-पुत्रा-प्रमाणें असल्याचें मला माहीत असल्यामुळें श्रीमंत जगन्नाथमहाराज यांनीं लोकमान्यांविपयींच्या आपल्या कांहीं आठवणी लिहाव्या अशी त्यांस विनंति करण्याकरितां मी त्यांजकडे मुद्दाम गेलों होतों. पण अनेक कारणांमुळें महाराजांचें मन जरा व्यग्र झालें असल्यामुळें 'त्या लिहून काढण्यास मला तूर्त मनःस्वास्थ्य व वेळ नाहीं, तरी पण तुम्हास मी मला आठवेल ती हकीकत सांगतों, तुम्हीच त्या लिहून काढा' असें ते म्हणाले. त्यांस मी रुकार दिल्यावर त्यांनीं मोठ्या प्रेमानें व अगत्यपूर्वक सांगितलेल्या हकीकतीवरून पुढील आठवणी लिहीत आहें. लोकमान्यांविषयीं महाराजांचें मन व अंतः-करण प्रेमादरानें व कृतज्ञतेनें इतकें भारून गेलेलें आहे कीं, त्यांच्याविषयीं ते अगदीं जिव्हाळयाचे त्यांचे उद्गार सांगत, त्या वेळीं वेळोवेळीं त्यांचा कंठ सद्गदित होई, डोळे अश्रूंनीं भरून येत, व मुखावाटें शब्द बाहेर पडणें मुष्किलीचें होई ! असो. श्रीमंत खानदानीच्या, व जुन्या लोकांच्या रोजनिशी लिहिण्याच्या पद्धतीस महाराजांनीं रजा न देतां ती पद्धत चालू ठेविलेली पाहून मला आनंद झाला, व त्या जुन्या रोजनिशीवरूनच त्यांनीं मला पुढीलप्रमाणें थोडीबहुत हकीकत सांगितली :—

(१५६) महाराज म्हणाले, "लोकमान्य विलायतेस गेले त्याचे आदले दिवशीं रात्रीं मुंबई येथें सरदारगृहांतील गच्चीवरील त्यांचे खोलींत जाऊन मी त्यांस म्हणालों, 'दादा, तुम्ही तर उद्यां विलायतेला जाणार; केसरी वगैरे वाकी सर्व कामांची तुम्ही नीट व्यवस्था करून ठेविली आहे असें सम-जतें; पण माझी व्यवस्था काय?' ते म्हणाले 'तुमची व्यवस्था? कसली तुमची व्यवस्था? जी व्यवस्था करायची ती (दत्तक शाबीत करणें व एस्टेट

मिळविणें) केव्हांच कायमची करून टाकली आहे. पण यापायीं आपणास माझ्याकरितां साठ हजार रुपये भूर्दंड भरावा लागला आहे त्याचें काय ? ती सर्व रक्कम आपण माझेकडून परत घ्यावी अशी माझी विनंति आहे.' "एकूण तुमच्या व आमच्या एस्टेटींत तुम्ही फरक करतां म्हणावयाचा ? माझी एस्टेट तीच तुमची एस्टेट असें मी समजत आलों. लक्षांत ठेवा. ज्या दिवशीं बाबामहाराजांस त्यांच्या अंतकाळीं मी शब्द दिला त्या दिवसापासून जें जें म्हणून माझें मी समजतों; व सर्व तुमचें—मग पैशाची कथा काय? —असें मी मानीत आलों आहें. इतकेंच काय पण माझे मनांत तुम्हांस मी तिसरा मुलगा असेंच समजतों; व कांहीं प्रसंगीं तर I consider you more than my sons !" महाराज म्हणतात, 'हे त्यांचे उद्‌गार ऐकून माझे डोळे भरून आले व माझ्यानें पुढें कांहींच बोलवेना. तेव्हां त्यांनीं मला पोटाशीं धरून माझ्या पाठीवरून हात फिरविल्यावर मला अल्पकाळ कांहीं अद्‌भुत संचार झाल्यासारखें वाटलें ! तरी पण जसा परमार्थ तसा योग्य व्यवहार हा ज्याचा त्यासच करावा लागतो व तो एक मानवाचा धर्मच असल्याचें माझें मनांत बिंबल्यामुळें मी पुनः त्यांस म्हणालों 'दादा, तुम्ही म्हणता तें सर्व मला कबूल आहे. इतकेंच नव्हे तर आपण आतां बोललेले शब्द ऐकून माझ्यासारखा भाग्यवान मीच असेंहि मला वाटतें! तरी पण हें पितृऋण फेडण्यांत मला एक प्रकारचा सात्त्विक आनंद होणार असून एक ऐहिक कर्तव्य केल्यासारखें मनास वाटून त्यायोगें मला पराकाष्टेचें समाधान होणार आहे.' तेव्हां ते म्हणाले 'ठीक आहे, अशानें तुम्हाला समाधानच होणार असेल तर बंगलाबागेची तुमची कांहीं जमीन मला द्या. तिची आज किंमत तीस हजार रुपये होईल. ती जागा, उत्साहानें व राष्ट्रीयत्वाच्या अभिमानानें काम करणाऱ्या मंडळीस न्यू पूना कॉलेजकरितां भाड्यानें मी देणार आहे. बाकीचे तीस हजार मी तुम्हास माझा मुलगा समजतों म्हणून प्रेमपूर्वक बक्षीस म्हणून देत आहें ! मग तर झालें ना?' ही हकीकत लोकमान्यांचे उभयतां चिरंजिवांस मीं मागेंच सांगितली असून दादांचे जिवलग स्नेही श्रीमंत आण्णासाहेब नेने यांस तर हें सर्वच इत्यंभूत माहीत आहे.

(१५७) महाराज म्हणाले 'लोकमान्य १९२० सालीं विलायतेहून येथें परत आल्यावर माझें कुटुंब निर्वतल्याचें त्यांना समजल्यामुळें एके

दिवशीं ते माझ्या समाचारास व सांत्वनार्थ आमचे वाड्यांत आले. ती धीरोदात्त मूर्ति पाहून कोणाचे दुःख एकदम विरघळून जाऊन त्याचें मनास पराकाष्ठेचें समाधान होणार नाहीं? आणि खरोखरच त्या महात्म्यानें मला त्या प्रसंगीं कोणता अमृततुल्य उपदेश केला तो ऐका. ते मला एकदम म्हणाले 'तुम्ही असें दुःख करीत काय बसतां? मृत्यूबद्दल दुःख? "मरणं प्रकृतिः शरीरिणंम्" हें कसें विसरतां? होय, मनुष्यानें दुखः करावें? पण केव्हां? तर तो कर्तव्य करण्यास चुकेल तेव्हां! मृत्यूस भितां? व त्यानें कोणास गाठलें म्हणून दुःख करितां? माझेबद्दल मी तुम्हास सांगतों कीं, मृत्यु जरी मजकडे आला तरी त्याला माझें काम संपेतोपर्यंत बाहेर जाण्यास सांगेन! मी तुम्हाला विचारतों, तुम्हाला सुद्धां मनावर इतका ताबा कां ठेवतां येऊं नये? कां तुम्ही माणसें नाहींत? अभ्यासानें सर्व कांहीं साध्य होतें.' मी म्हटलें 'पण दादा, आपण आमची व आपली बरोबरी कशी करतां?' हंसत पण किंचित् उद्वेगानें ते म्हणाले 'हें पाहा! प्रत्येक मनुष्य मला नेहमीं अगदीं अशाच तऱ्हेनें बोलतो! कांहीं न करतां निसटण्याची ही पळवाट मोठी सोयीची आहे खरी! पण जगांतील अनुभवानें मी असें स्पष्ट म्हणतों कीं कोणीहि स्वतः तसें होण्याबद्दल प्रयत्न करीत नाहीं. अभ्यास व मनाची विरक्तता हा काय पदार्थ आहे हेंहि कधीं पाहावयाचें नाहीं; आणि मग म्हणे मला असें होतें आणि तसें होतें म्हणून सदैव तक्रार करायची! अशानें कांहीं होणार नाहीं. करावयास लागा म्हणजे आपोआप सर्व सुचतें—पुढील दार उघडतें—सर्व कांहीं होतें. पण केल्याखेरीज होणार कसें?'

(१५८) महाराज म्हणाले, '१९२० सालीं लोकमान्य विलायतेहून परत आल्यावर मुंबईसच सरदारगृहांत एके दिवशीं रात्रीं मी त्यांस विचारलें 'विलायतेस ज्या दिवशीं चिरोल केसचा निकाल झाला त्या दिवशीं तुम्हाला वाईट वाटून किती तरी दुःख झालें असेल नाहीं?' प्रशांतपणें व माझी समजूत पटेल अशा रीतीनें ते मला म्हणाले 'अरे, दुःख म्हणजे काय? प्रतिकूलसंवेदनोत्पादकं दुःखम् असें म्हणतात, पण ज्यानें अभ्यासानें व विवेकानें मुळांत निःसंवेदित्वच जेथें प्राप्त करून घेतलें तेथें मग आतां दुःख कसलें? दुःखाचें बीजच जर उपटलें तर तेथें अंकूर फुटणार कसा? अपेक्षा, आसक्ति व कर्तव्यच्युति यांत दुःख आहे; तरी पण तुम्ही ज्या कल्पनेनें

दुःखाकडे पाहतां ती कल्पनाच मुळीं आम्हीं निर्मुल केलेली आहे.' तथापि मी त्यांस म्हणालों 'हो तुमच्या कल्पनेप्रमाणेंच कां होईना, तसें दुःख झालें तर तुम्ही कसें करतां ? ते चटकन् म्हणाले 'Yes, I make my mind quite vacant and allow it complete rest.' मन निर्विकार करून तें जितका अधिक काल या स्थितींत ठेवावें तितकी अधिक शांति व प्रसन्नता मनास प्राप्त होते. कारण हा एक प्रकारचा योगच आहे,व त्यास मुख्य एकाग्र चित्तत्वाची (कॉन्सेन्ट्रेशन) अत्यंत जरूर आहे. त्याशिवाय हें कांहीं साधणार नाहीं! कॉन्सेन्ट्रेशनच्या परमावधीची स्थिति म्हणजे द्रोणाचार्यांनीं आपला आत्मा ब्रह्मांडीं नेला म्हणतात ती होय. असो.' मीं त्यांस विचारलें 'तुम्ही, बिछान्या-वर पडतांच तुम्हास चटकन झोंप रोज कशी कशी येते?' ते एकदम म्हणाले 'That is due to my concentration. तुम्हाला ऐकून कदाचित् खरेंहि वाटणार नाहीं–अगदींच आश्चर्य वाटेल कीं, मला गेल्या वीस वर्षांत स्वप्न म्हणून कधीं पडलें आहे असें मला आठवत नाहीं. मंडालेस असतांना सतत एकसारखे कित्येक दिवस मी Mind vacant—मन निर्विकार–ठेवण्याचा अभ्यास वाढविल्यानें भगवद्गीतेंत सांगितल्याप्रमाणें मनुष्य सुखदुःखांत कसा असू शकतो याची मला कल्पना येते. तुमच्यासारख्या तरुणांनीं रोज प्रातः-काळीं स्नानोत्तर गायत्रीजपाच्या साधनानें चित्तैकाग्र्याचा अभ्यास केल्यास सुईच्या अग्राप्रमाणें तुमची बुद्धि सर्वभेदक होईल, इतकेंच नव्हे तर, विशेष अभ्यासानें पुढें ती आत्मसाक्षात्कारीहि होईल. नाहीं तर उलट तीच बुद्धि कुंचलीप्रमाणें होते हा तर सर्वांचा अनुभवच आहे!' पुढें मीं त्यांस विचारलें 'तुम्ही रोज दोन प्रहरीं निजतां त्या वेळीं तुम्ही झोंपीं गेलां आहांत असें सर्वांस वाटतें. पण मी आज कित्येक दिवस बारकाईनें पाहात आहे कीं, तुम्हीं निजलां तरी फक्त घोट्याखालील पाय–पाऊल तेवढें–एकसारखें हळूहळू हल-वीत असतां हें कसें?' जरा हंसत ते म्हणाले 'होय, मी दिवसा लौकिक दृष्ट्या रोज निजतों खरा, पण मला त्या वेळीं क्वचितच झोंप लागते. हें अगदीं खरें. पण आतां तुम्ही विचारतां म्हणूनच सांगतों कीं रोज दोन तास mind vacant मन विचाराशिवाय निर्विकार ठेविल्याखेरीज चैनच पडत नाहीं व देहास आणि मनास विश्रांतीहि मिळत नाहीं. पण तेवढ्या दोन तासांनीं पुढील सबंध दिवसाचे माझे सर्व व्यवहार नीट चालू राहतात. घड्याळास

जशी किल्ली तसें हें आम्हास आहे. विचार–विकाररहित मन म्हणजे अगदीं रिकामें–मोकळें–स्वच्छ कोऱ्या पाटीप्रमाणें-मन ठेवणें प्रथम कठीण जातें. पण तसें करण्याचा एकदां तो अभ्यास हस्तगत झाला, म्हणजे त्यापुढें सर्व सुख. इंग्रजी शब्दांत बोलावयाचें म्हणजे हेंच कॉन्सेन्ट्रेशन; आणि योग योग म्हणतात तो तरी हाच.'

मन अस्वस्थ असतांहि वेळ खर्च करून महाराजांनीं मोठ्या प्रेमानें आपल्या आठवणी मला अगत्यपूर्वक सांगितल्याबद्दल त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानून मीं त्यांची रजा घेतली.

(१५९) प्राणवायूचा निरोध करून इच्छाशक्तीच्या जोरावर इच्छामरणी भीष्माचार्य, उत्तरायणामध्यें प्रयाण करण्याकरितां, शरपंजरीं पडल्याची पौराणिक कथा अर्वाचीन शास्त्राभिज्ञांस कादंबरीवजा किंवा अद्‌भुतरम्य नवलकथेप्रमाणें वाटत असे. पण अलीकडे पाश्चात्यांच्या गूढ शास्त्रसंशोधनानें अनुभवसिद्ध झालेल्या इच्छाशक्तीच्या (Will-power) प्रयोगावरून तरी आतां लोकमान्यांच्या खालीं दिलेल्या चित्योद्‌गाराची किंमत सर्वांस कळून येण्यास हरकत नाहीं. लोकमान्य शेवटच्या दुखण्यांत मुंबई येथें आजारी पडले असतां त्यांच्या पलंगाभोंवतीं उभे असलेल्या मंडळींस, विशेषतः त्यांचे भाचे बाबासाहेब विद्वांस व डॉ. भडकमकर यांजकडे वळून ते म्हणतात, " I am living by my will and if I am to die I shall die only by my will." (मी माझ्या इच्छाशक्तीच्या बलावर जगतों आहें, व माझ्या इच्छेशिवाय मृत्यु मला कांहींएक करूं शकत नाहीं.) हे आत्मसाक्षात्काराचे दिव्योद्‌गार प्रस्तुत लेखकास महद्‌भाग्यानें ऐकावयास मिळाल्यानें त्यास धन्यता वाटत आहे. पण त्यासच काय, तर प्रत्यक्ष महात्माजींसारख्यांसहि, ते या वेळीं तेथें नुकतेच येऊन लोकमान्यांस भेटून गेल्यामुळें, लोकमान्यांच्या वरील उद्‌गारांनीं कौतुकाश्चर्य वाटलें. त्यांनीं अहमदाबादच्या मंडळींस लोकमान्यांविषयीं जी तार केली त्यांत 'प्रकृति चिंताजनक आहे. तथापि लोकमान्यांच्या अद्वितीय इच्छाशक्तीमुळेंच आजवर ते टिकले व यांतून ते खास निभावणार, असा माझा विश्वास आहे' असें म्हटलेलें होतें!"

(१६०) शुद्ध ऐहिक वस्तु-प्राप्तीबद्दलच लोकमान्यांचा देह खर्ची पडला म्हणून निव्वळ रजतम-गुणविशिष्ट जनांनींच तेवढा त्यांच्या अवतार-समाप्तीबद्दल शोक प्रदर्शित केला नसून हर्षविषादातीत मायानदी तरून केवळ ब्रह्मैक्य पावलेले पंचवटींतील समस्त संन्यस्त, साधू, वैराग्यवंत, महंत व गोसावी अशासारख्यांसहि लोकमान्य निजधामास गेल्याबद्दल आषाढ वद्य ८ रविवार शके १८४२ रोजीं सभा भरवून व्यावहारिक दृष्टया दुःख-प्रदर्शन करावेंसें वाटलें !! त्या वेळीं वैष्णव हेमंत म्हणाले " आम्ही विरक्त, निरिच्छ संन्यासी. आई बाप, आप्त इष्ट, गणगोत वगैरे सर्व मायापाश तोडून सुखदुःख समसमान मानून फटिगाप्रमाणें राहणारे आम्ही साधू; पण गंगाधरसुत बलवंताच्या निधनानें आम्हालाहि दुःख झालें. त्यांच्या आत्म्याच्या स्थलांतरानें आमचे आत्मेहि संवेदना पावले. त्यांच्या आत्म्याची शक्ति ऐहिक जनांच्या कल्याणार्थ खर्ची न पडती तर ती सायुज्ज मुक्तीच प्राप्त करती. इतकेंच काय पण ती 'बलवंत' शक्ति साक्षात् ईश्वरी अंशमात्र असल्यानें तो अंश आज पूर्णांशांत विलीन झाल्यानें आमचीं हृदयेंहि आज विगलित झालीं आहेत. पुनः असे ईश्वरी अंश अवतीर्ण होतील तरच संसारी जनांचा उद्धार होईल."

# लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

## खंड २ यांतील

# अर्पणपत्रिका

सन १८१८ ते सन १९१८

म्हणजे

ज्या अभागी शतकाचा प्रारंभ हिंदवी-स्वराज्यसूर्यास्तांत होऊन
ज्याचा शेवट लोकशाहीच्या अरुणोदयांत झाला, अशा त्या
निशामय, परवश, व नैराश्यगर्भ दीर्घ काळांत ज्या
लहान थोर निःसीम व ज्वलत् हिंदी देशभक्तांनीं,
अनेक प्रसंगीं, अनेक दिशांनीं, केवळ **स्वदेश**
**स्वातंत्र्यार्थ**, परमोच्च कर्तव्याच्या
स्थंडिलावर आपल्या प्राणांची
आहुति दिली, त्या सर्व
ज्ञात-अज्ञात पुण्यात्म्यांच्या
पवित्र चरणीं
ही बहुरंगी
तिलकस्मृति-
सुमनमाला

कृतज्ञतापूर्वक विनम्रभावानें अर्पण केली आहे.

— **सदाशिव विनायक बापट**

# लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

## खंड २ यांतील

# आत्मनिवेदन

आपुलिया स्वानुभवें । आपणांस निवेदावें ।
आत्मनिवेदन जाणावें । ऐसें असे ।।

—श्रीसमर्थ

कै० 'राष्ट्रसूत्रधार' लोकमान्य लोकश्री बाळ गंगाधर टिळक यांच्या 'आठवणी व आख्यायिका' यांचा प्रथम खंड गेल्या वर्षी मीं टिळक जयन्तीच्या दिवशीं प्रसिद्ध केला. सदर ग्रंथाच्या आत्मनिवेदनांत मीं असें म्हटलें होतें कीं, 'ईशकृपेनें योग आल्यास लोकमान्यांच्या आणखी अधिक आठवणी द्वितीय खंडांत प्रसिद्ध करण्याचा माझा विचार आहे.' संकेतार्थी एकीकडे असें विधान करून लगेच दुसरीकडे त्याच वेळीं त्याच ग्रंथावर 'प्रथम खंड' असें निश्चितपणें लिहिण्यास मी प्रवृत्त झालों; यावरूनच द्वितीय खंडाचा संकल्प मीं त्याच वेळीं मनांत करून ठेविला होता, हें उघड होईल. आणि त्या संकल्पाप्रमाणें लोकमान्यांच्या 'आठवणी व आख्यायिका' यांचा हा द्वितीय खंड आज वाचकांच्या हातीं देण्यास मला फार आनंद होत आहे.

चरित्रग्रंथाच्या इमारतीस मराठी भाषेमध्यें 'आठवणीं' च्या ह्या एका नवीन दालनाची जोड देण्यांत येत आहे असें क्षणभर कल्पिल्यास, लोकमान्यांच्या चरित्रग्रंथाच्या या दालनाचा एक भाग प्रस्तावनारूपानें गतवर्षी श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांच्या हस्तें उघडण्यांत आला, तर यंदाचे वर्षी तशाच रीतीनें त्याच्या दुसऱ्या भागाचें उद्‌घाटन लोकमान्यांचे भक्त व वऱ्हाडचे सुप्रसिद्ध विद्वान् पुढारी श्रीयुत माधवरावजी अणे यांच्या हस्तें करण्यांत येत आहे, हें पाहून सर्व वाचकवृंदांस आनंद झाल्याखेरीज राहणार नाहीं.

गतवर्षी तयार झालेलें तें अर्वेच काम करण्यास किती व कसकसे श्रम पडले, काय काय अडचणी आल्या, कोणकोणते अनुभव मिळाले वगैरेंचा वृत्तान्त त्या वेळीं निवेदन करण्यांत आलाच आहे. त्यानंतर पुढील कामास लागण्यापूर्वीं, माझ्या मनाची स्वाभाविकपणेंच अशी एक समजूत होती कीं आतां सदरहू कामाचा बोलबाला बराच झाल्यामुळें लोकमान्यांच्या वाङ्मय-स्मारक-मंदिराच्या इमारतीचा हा दुसरा मजला चढविण्याचें काम बरेंच सोपें जाईल व कदाचित् कल्पनेबाहेरहि यशःप्राप्ति होईल, आणि या बाबतींत माझ्याप्रमाणें इतरांसहि असेंच वाटणें स्वाभाविक होतें. धुळ्याच्या 'श्रीरामदास आणि रामदासी' या मासिकाच्या संपादकांनीं तर त्या वेळीं जाहीरपणें अशी इच्छा प्रगट केली होती कीं, 'आतां यापुढें रा० बापट यांना इतका त्रास पडणार नाहीं; आणि ईश्वराची आम्ही अशी प्रार्थना करतों कीं, असे आणखी निदान दोनतीन खंड प्रकाशित करण्याचें भाग्य त्यांच्या वांट्यास येवो.' परंतु दुर्दैवानें नमूद करणें प्राप्त आहे कीं, हा सर्वांचाच अदमास अगदीं चुकीचा ठरला व मला अनुभव मात्र अगदीं उलट आला. पण याचें कारण कदाचित् असेंहि असूं शकेल कीं, आठवणींच्या फुलबागेंतील चटकन् प्रथम हाताशीं येण्यासारखीं जेवढीं म्हणून आठवणींचीं उमललेलीं फुलें होतीं तेवढीं सर्व गतवर्षीं निःशेष रीतीनें खुडून झाल्यामुळें आतां राहिलेलीं फार अडचणींत व क्वचित् कांट्याकुट्यांतहि असल्यामुळें तीं संपादन करण्यास तसेच श्रम पडावे हें अगदीं स्वाभाविक आहे. आणि खरोखरच गेले नऊदहा महिने म्हणजे जवळजवळ सर्व ऋतूंत हीं सर्व तऱ्हेचीं स्मृति-सुमनें पैदा करण्याच्या नादांत अहोरात्र मी आठवणींच्या फुलबागेंतून अविरतपणें संचार करीत असतां कांहीं विश्वासाच्या ठिकाणीं मला ठेंचा लागल्या, कांहीं ठिकाणीं अतिसात्त्विकपणाच्या निसरड्यांत पाय घसरला. कांहीं ठराविक ठिकाणीं पायांत अपमानाचे कांटे बोंचले, आणि कांहीं ठिकाणीं तर आशेच्या हिरव्यागार तृणाच्छादित खळग्यांत पडून अखेर मुखच्छेदनापर्यंत पाळी आली! तथापि खिन्न व निराश न होतां, केवळ लोकमान्यांविषयींच्या भक्तिप्रेमातिशयानें मोहित होऊन, कोठें तीं उत्कृष्ट स्मृतिकुसुमें दिसतांच, अगदीं अडचणीच्या जागेंतहि हात घालून तीं प्राप्त करून घेण्याचा मीं छंद घेतला होता. कारण अशा

प्रयत्नांच्या अभावींच Full many a flower is born to blush unseen अशीच त्यांचीहि अवस्था झालेली असते. असा अनुभव असल्या-मुळें, तीं मिळविण्याकरितां मी विशेष आग्रह धरीत असें. अर्थात् अशा प्रयत्नांत चार ओरखडे निघणें अपरिहार्य असतें !

प्रथम खंडाच्या पहिल्या व दुसऱ्या आवृत्तींत प्रारंभींच एक जाहीर विनंतीचें जोड कार्ड जोडण्यांत येऊन, त्यांत ज्यांना लोकमान्यांच्या आठवणी माहीत असतील, त्या त्यांनीं स्वत: पाठविण्याबद्दल व ज्या दुसऱ्या कोणांस त्या ठाऊक असतील त्यांचें नांव व गांव कळविण्याबद्दल मीं विनंति केली होती. त्या तीन-साडेतीन हजार कार्डांपैकीं फक्त सतरा कार्डें भरून आलीं; व त्यांपैकीं आठवणी पाठविण्याच्या अभिवचनाचीं नऊ असून, दुसऱ्यांकडे बोट दाखविण्यांत आलेलीं पांच होतीं; राहिलेलीं बाकीचीं तीन निव्वळ औपचारिक अशींच होतीं. या चौदा गृहस्थांना वेळोवेळीं विनंति केल्यावरून अखेर सात जणांकडून मजकूर मिळाला. बाकीच्या गृहस्थांकडून नकारात्मक उत्तर मिळेपर्यंत मला प्रत्येकास चार-पांच वेळां लिहावें लागलें ! प्रथम-खंडाच्या वेळीं लोकमान्यांशीं परिचित असलेल्या अशा तीनशें गृहस्थांना आपल्या आठवणी देण्याबद्दल मीं विनंति केली होती. पैकीं सुमारें दीडशें लोकांकडून मजकूर मिळाला व बाकीच्या बहुतेक सर्वांकडून त्याच वेळीं नकार मिळाला होता. येणेंप्रमाणें आठवणी मिळविण्याचें हें प्रकरण त्याच वेळीं निकालांत निघाल्यावर व लोकमान्यांविषयीं कांहीं विशेष सांगूं शकतील अशा सर्व लोकांची यादी संपल्यावर, आतां दुसऱ्या खंडांत देण्या-सारख्या आठवणी तुम्ही कोणाकडून मिळविणार व हें होणार तरी कसें असें काळजीच्या कांहीं जिवलग मित्रांनीं सहानुभूतिपूर्वक मला विचारून शेवटीं दुसऱ्या खंडाचा नाद अजिबात सोडण्याबद्दल त्यांनीं मला आग्रहानें सांगितलें. परंतु पाश्चात्य राष्ट्रांतील साधारण प्रतीच्या गुणी माणसा-संबंधानें जर ग्रंथावर ग्रंथ निर्माण होतात, तर लोकमान्यांसारख्या शतकास ललामभूत होणाऱ्या महाविभूतीच्या संबंधाची माहिती, नांव घेण्यासारखा एक चरित्रग्रंथ वगळल्यास, अवघ्या एक दोन पुस्तकांपलीकडे जाऊं नये ही गोष्ट मनास फार लागून राहिली; व आपण नेटानें, सतत, आस्था-पूर्वक व दीर्घ परिश्रम करीत राहिल्यास या महापुरुषाच्या आणखी कित्येक

गोष्टी प्रसिद्ध करण्याचें भाग्य आपल्या वांटयास आल्याखेरीज राहाणार नाहीं, अशा श्रद्धेनें व आत्मविश्वासानें मीं ह्या द्वितीय खंडास हात घातला. आठवणी देण्यासारख्या लोकमान्यांच्या बहुतेक सर्व परिचित लोकांचा परामर्ष निःशेष रीतीनें प्रथम खंडाचे वेळींच घेतला गेल्यावर आतां माझ्या स्नेह्यांच्या काळजीप्रमाणें नवीन कोणत्या लोकांस आठवणी-बद्दल मीं विनंति करावी अशी मला मुळींच कधीं चिंता पडली नाहीं. कारण वरसंशोधनार्थ मुलीचा बाप ज्याप्रमाणें कांहीं एका विशिष्ट दृष्टीनेंच सर्व जगाकडे पाहात राहातो तद्वत् गेले आठनऊ महिने मी प्रत्येकाकडे 'यांचा कांहीं लोकमान्यांशीं संबंध येऊन, हे कांहीं त्यांचेसंबंधीं आपणांस विशेष सांगू शकतील काय?' याच लोभी दृष्टीनें मी पाहात असें. किंवा अत्यंत तिखट घ्राणेंद्रियाचा प्राणी ज्या बाजूकडून भक्ष्य वस्तूचा नुसता वास येईल त्या दिशेकडे लोभावून एकसारखा हुंगीत जातो, त्याप्रमाणें अमक्यास आठवणी ठाऊक आहेत, असें नुसतें कानांवर येतांच गल्लोगल्लीं व रस्तोरस्तीं फिरत राहून, त्यांचा छडा लावून, व नाहीं त्या ठिकाणीं पत्रें पाठवून मीं मजकूर मिळविण्याचा उद्योग केलेला आहे. आणि लिहि-ण्यास आनंद वाटतो कीं, अशा तऱ्हेनें सुमारें साडेसहाशें सद्गृहस्थांशीं माझा संबंध येऊन त्यांजकडून आठवणी मिळविण्याचा मीं प्रयत्न केला. फार काय, पण इंग्लंडचे राजे व हिंदुस्थानचे बादशहा पंचम जॉर्ज यांचेशीं लोकमान्यांचा संबंध आल्याचें कळल्यावरून खुद्द त्यांचेपासून तों थेट गाय-कवाडवाड्याच्या देवडीवर बसणाऱ्या भय्यापर्यंत आठवणी मिळविण्याचा मीं प्रयत्न केला आहे. पण यांपैकीं हाताच्या बोटावर मोजण्याइतक्या व्यक्तीं-कडून आपण होऊन किंवा माझ्या पहिल्याच विनंतीवरून मजकूर मिळा-ल्याचें सोडून दिल्यास बाकीच्या सर्वांकडून तो मिळविणें म्हणजे एक प्रकारचें दिव्यच करावें लागलें, असें मीं क्षणभर म्हटल्यास, वाचकांस ही अतिशयोक्ति वाटून तिच्या दर्पानें कदाचित् ते जरा नाकेंहि मुरडतील; पण काय करावें? मला तसा प्रत्यक्ष अनुभव आला खरा! या साडेसहाशें टिळकप्रेमी सज्जनांना आपलें टिळकप्रेम—टिळकस्मृति व्यक्त करण्याबद्दल मी एकंदर अठ्ठावीसशें बहात्तर पत्रें लिहिलीं; व कित्येकांच्या अनेक वेळीं समक्ष गांठीभेटी घेतल्या त्या वेगळ्याच! छापील पत्रानें अगत्य वाटत

नाहीं म्हणून एक बोटभरहि छापील मजकुराचें पत्र न पाठवितां व अर्थात् प्रत्येकाचा मजकूर वेगवेगळा असल्यानें, तीं सर्व पत्रें मीं जातीनें हातानेंच लिहिलीं होतीं. लोकमान्यांसंबंधानें आपण कांहीं सांगू शकूं, असें एकदां एखाद्यानें म्हटल्यावर मग त्याजकडून एक मजकूर तरी मिळविणें किंवा अखेर त्याजकडून नकार मिळेपर्यन्त तरी त्याच्यामागें लागणें मला जरूर वाटे. त्याशिवाय मला चैनच पडत नसे. कित्येकांकडून मजकूर देण्याचें अभिवचन मिळाल्यामुळें पण शेवटपर्यन्त तो हातीं येत नाहीं असें दिसल्यावरून त्यांस एकसारखीं रजिस्टर पत्रें व तारा पाठवाव्या लागल्या, तेव्हां कोठें कांहींचेकडून तो हातांत पडला. याशिवाय मजकूर मिळविण्याकरतां स्थानिक मंडळीकडे तर किती खेपा घालाव्या लागल्या असतील याला कांहीं सीमाच नाहीं. आणि म्हणूनच कीं काय, एका प्रसिद्ध पुढाऱ्यानें मला 'आठवणींचें बोअरिंग मशीन' असें विनोदानें आपल्या पत्रांत म्हटलेलें दिसतें ! असो.

वरील या सर्व निरूपणावरून कोणाजवळ आठवणी नाहींत किंवा त्या देण्याची कोणाची इच्छा नाहीं, असें कोणी अनुमान काढील तर मात्र ती मोठी चूक होईल. मग जें कार्य सहज व्हावें त्यास इतके कष्ट कां पडावे? याला उत्तर लोकांची अनास्था असें कोणीं दिल्यास, 'तोतयाचें–बंड' या नाटकांत नाटककारांनीं नाना फडणविसाच्या तोंडांत घातलेल्या शब्दानें मी असेंच म्हणणार कीं, 'सर्व जगावर हा अनास्थेचा आरोप, मी कसा करूं ?' पण येवढें मात्र म्हणतों कीं, अशा प्रकारच्या पाश्चात्य धर्तीच्या नवीन वळणाची आम्हांस संवय नाहीं. हेंहि पण याचें एक निःसंशय कारण आहे. आणि हें माझें विधान पाश्चात्य देशांतील नमुन्यादाखल खालीं दिलेल्या एका गोष्टीवरून वाचकांस पटल्याखेरीज राहाणार नाहीं अशी उमेद वाटते.

एडिंबरो येथें रॉबर्ट लुईस स्टीव्हन्सन्-क्लबमध्यें १९२१ च्या नोव्हेंबरांत स्टीव्हन्सन्च्या वार्षिक पुण्यतिथीच्या निमित्तानें झालेल्या जेवणावळीनंतर त्याच्या एका रोझेलाईन मॅसन् या भक्ताच्या मनांत आलें कीं, रॉबर्ट लुईस स्टीव्हन्सन्, याच्याविषयींच्या आठवणी सर्वांकडून गोळा करून त्यांचा एक ग्रंथ प्रसिद्ध करावा. त्याप्रमाणें त्यानें वर्षभर प्रयत्न करून

पुढील सालीं म्हणजे सन १९२२ मध्यें 'I can Remember Robert Louis Stevenson.' या नांवाचा ग्रंथ प्रसिद्ध केला. आठवणींचा नायक हा एक चांगला पण निवळ कादंबरीकार असून व तो मृत्यु पावून पंचवीस वर्षांपेक्षां अधिक काल होऊन गेला असतांहि, त्याच्या आठवणीसंग्राहकानें मिळविलेलें यश लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तो आपल्या आत्मनिवेदनांत म्हणतो, "During the whole of this last year, these contributions have been arriving, from Scotland and England, from Australia and America and the South Seas, each one giving some fresh, intimate, living glimpse of Stevenson, or throwing a flash-light on some otherwise forgotten moment of his life, or recapturing some impression once received of him, ...... My first thanks are due to all these contributors who thus materialised the idea by *immediately* sending to me their personal memories to form this combined tribute from so many relatives, intimate friends, chance acquaintances, school-fellows, companions of early years, comrades of latter days,—all of whom can say I can remember Robert Louis Stevenson." अशा प्रकारचे उद्गार वास्तविक त्याच्या ग्रंथनायकापेक्षां शेंकडों पटीनें अधिक श्रेष्ठ असलेल्या लोकमान्यांसारख्या पुरुषाच्या ग्रंथाचे बाबतींत काढण्याचें आमचें भाग्य आम्हालाहि कां लाभूं नये ? पण 'The large, quick and cordial response which came in reply to my editorial letters, requesting Contributions was a delightful encouragement.' असें मॅसननें स्वतःविषयीं आपल्या आत्मनिवेदनांत म्हटलें आहे, याच्या अगदीं उलट अशी आमची स्थिति झाली. लो० टिळकांसारख्या अनेक विषयांत तज्ज्ञ म्हणून त्यांचें कार्यक्षेत्रहि विस्तृत असल्यानें हरतऱ्हेच्या अनंत लोकांशीं संबंध आलेल्या व नुकत्याच दिवंगत झालेल्या अत्यंत लोकप्रिय अशा या पुरुषाच्या आठवणींच्या प्रथम खंडाचे वेळीं गेल्या वर्षी मी तीनशें लोकांना हजारअकराशें पत्रें पाठविलीं तेव्हां त्यांपैकीं

सुमारें दीडशें लोकांकडून आठवणी मिळाल्या; आणि एकतारीप्रमाणें निवळ वाङ्मयाची तेवढीच तार छेडणाऱ्या व दोहोंहून अधिक तपांपूर्वी होऊन गेलेल्या स्टीव्हन्सनसारख्यांच्या आठवणी मिळविण्याकरितां रोझेलाइन मॅसन् यांनींहि जगभर पत्रव्यवहार केला; पण तो तीनशें पत्रें पाठवून दीडशें लोकांच्या आठवणी मिळवून ! ! आणि शिवाय ज्यांस आठवणी असून त्यांस विचारतां आलें नाहीं असे अजून कितीतरी लोक शिल्लक असतील ! कारण या बाबतींत ते म्हणतात : "I am regretfully aware that although nearly three hundred editorial letters of request have been sent, addressed to all who were known to remember Stevenson, or who were thought to possibly remember Stevenson, yet that there must be many more who do remember him and have not been reached."

असो; तात्पर्य आपल्या मराठी भाषेमध्यें वाङ्मयांतील ह्या एका नवीन तऱ्हेच्या वळणाचा नूतन प्रवेश होत असतांना असें होणें अगदीं स्वाभाविक आहे, व त्याबद्दल कोणाची तक्रारहि असूं शकणार नाहीं, हें उघड आहे. तथापि नेहमीं माझ्या असेंहि मनांत येतें कीं, आपल्यापेक्षां अधिक योग्यतेच्या व सर्व दृष्टीनें अधिकारी अशा कोणी प्रसिद्ध पुरुषानें जर या कार्यास हात घातला असता तर हें कार्य अधिक यशस्वी रीतीनें होऊन माझ्यापेक्षां अगदीं उलट अनुभव त्यास लोकांस निवेदन करतां आला असता; पण असें म्हणावें तर लोकमान्यांच्या चरित्राकरितां साधनसामुग्री पुरविण्याबद्दल चरित्र प्रसिद्ध होण्यापूर्वी, श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं केसरीद्वारें दोन वेळां जाहीर विनंति केली असतांहि तिचा कसा परामर्ष घेतला गेला हेंहि विसरून चालणार नाहीं !

तथापि यावर असा आक्षेप घेतला जाईल कीं, कांहीं नाहीं म्हटलें तरी इतक्या लोकांनीं तुम्हांस अखेर मजकूर दिलाच कीं नाहीं ! होय, तो त्यांनीं देण्याची कृपा केली याबद्दल खरोखरच मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें, हें येथें कृतज्ञतापूर्वक नमूद करणें माझें कर्तव्य आहे; व असेंहि म्हटल्याखेरीज मला राहावत नाहीं कीं, त्या सर्वांनीं आपला बहुमोल वेळ

खर्च करून, श्रम घेऊन व स्वार्थत्यागपूर्वक आपापल्या आठवणींची बहुमोल सामुग्री देऊन हें सार्वजनिक दुमजली तिलक-स्मृतिमंदिर बांधण्याचें मनांत आणिलें नसतें तर लोकमान्यांच्या वाङमयस्मारकाची ही मूळ कल्पना गर्भावस्थेंतच लुप्त झाली असती; यांत तिळप्राय शंका नाहीं. पण तात्त्विक रीतीनें बोलावयाचें तर अशा प्रकारचें कार्य तोलास तोल मिळून सुलभ रीतीनें व यशस्वीपणें तडीस जाणें निराळें, आणि त्यासाठीं आग्रह, भीड किंबहुना खुषीची सक्ति करावी लागून तें पूर्ण होणें हें निराळें. यांपैकीं पहिला प्रकार पाश्चात्य देशांमधून बहुशः आढळून येतो. हाच पौर्वात्य व पाश्चात्य यांचेमधील वाङमयसेवेंतील फरक होय, एवढें नमूद करणें भाग आहे. प्रथम खंडाच्या आत्मनिवेदनांतील या असल्याच विचारसरणीचा माझ्या कांहीं रसिक व विद्वान् मित्रांस राग येऊन त्यांनीं त्याबद्दल त्या वेळीं माझी हजेरीहि घेतली ! त्यांचें म्हणणें इतकेंच कीं, तुम्ही आपल्या प्रांजल-पणाच्या व सत्यनिरीक्षणाच्या नादांत आपल्याच लोकांचें दैन्य, मांद्य, अनास्था व विचार-दारिद्र्य यांचें प्रदर्शन करून अप्रत्यक्षपणें तुम्हीच टिळकांची किंमत हलकी करीत आहांत, हें तुमच्या लक्षांत येत नाहीं ! याबद्दल मला इतकेंच म्हणावयाचें कीं, छत्रपति श्रीशिवाजीमहाराज यांच्यासारख्या अवतारी पुरुषाचें स्मारक पूर्वकाळीं होऊं शकलें नाहीं म्हणून जर त्या विभूतीस कांहीं कमीपणा येत नाहीं, तर लोकमान्यांच्या आठवणी आपल्या लोकांस ही नवीन तऱ्हा अंगवळणी नसल्यामुळें त्यांचेकडून मिळवितांना कसे अनुभव आले, ही वस्तुस्थिति मोकळेपणानें सांगतांच त्यावरून लोक-मान्यांस कमीपणा कसा येतो, हेंच मला समजत नाहीं. नभोमंडळांतील चंद्रसूर्यांस मेघांनीं आच्छादून टाकलें म्हणून त्यांचें तेज लुप्त झालें असें कोणी म्हणेल काय ?

उपरिनिर्दिष्ट केल्याप्रमाणें, साडेसहाशें सद्गृहस्थांपैकीं सुमारें पावणेतीनशें लोकांकडून एकंदर मजकूर आला. वास्तविक प्रथम सर्वांस मजकूर मागतांना जरा पराकाष्ठेच्या आग्रहानें तो त्यांजपाशीं मागावयाचा तर प्रत्येकाचा तो प्रसिद्ध करणें हें शिष्टाचारास धरून आहे हें अगदीं खरें; पण ज्यांच्या आठवणी अगदींच सामान्य स्वरूपाच्या, फक्त ज्याच्या त्याच्या

स्वतःपुरतेंच त्यांचें खरोखर महत्त्व, ज्या लौकिक स्वरूपाच्या नसून वैशिष्टय-विहीन, कांहीं केवळ आत्मगौरवपर, कांहीं लोकमान्यांच्या निवळ सार्वजनिक उद्‌गारांनींच भरलेल्या, कांहीं केवळ ऐकीव व कांहीं निरनिराळ्या रीतीनें तीच तीच हकीकत पुनःपुन्हा निवेदन करणाऱ्या इत्यादि स्वरूपाचा सुमारें पंचवीस तीस लोकांचा मजकूर अजिबात बाजूस ठेवणें प्राप्त झालें व बाकीच्यांच्या मजकुरापैकीं जो अप्रस्तुत भाग वाटला त्यास निरुपायानें कात्री लावावी लागली. याबद्दल वरील सर्वांनीं क्षमा केली पाहिजे. या बाबतींत प्रथम खंडाच्या आत्मनिवेदनांत मीं काढलेले उद्‌गार येथें पुनरुद्धृत करणें जरूर वाटतें. "लेखकांकडून जसा मजकूर आला तसा तो तारतम्यबुद्धि व विवेचकपणा न चालवितां सर्वच्या सर्वच, जशाचा तसाच मीं छापला असता तर त्यास खास हजार बाराशे (आतां तर दोन अडीच हजार) पानेंहि पुरलीं नसतीं व तो एक नवलकथांचा अद्‌भुत अजबखाना किंवा गोपाळकालाच बनला असता!" पण असें करण्यानें कांहीं विशिष्ट लोकांच्या मजकुरास मुकावें लागतें, असा मला अनुभव आला. कारण त्यांच्या मजकुरास हात लावणें हा त्यांना अपमान वाटतो. एका थोर सन्मान्य वाङ्मयभक्तानें मला कळविलें कीं, "पूर्वी प्रथम खंडाकरितां पाठविलेल्या आठवणींतील माझ्या तीन आठवणी तुम्ही गाळल्या व बाकीच्यांनाहि थोडीफार कात्री लागलेली आहे. खुद्द लोकमान्यांनीं माझ्या लेखांना कातर कधीं लावली नाहीं ती आपण लावलीत, हें तुम्हास पुनः आठवणी न पाठविण्याचें खरें कारण होय." पण सुदैवानें अगदीं याच्या उलट दुसऱ्या एका विद्वानानें कळविलें कीं, "दीर्घसूत्री आत्मवर्णनपर व अप्रस्तुत असा मजकूर आम्हां सर्व लेखकांच्या लिखाणांतून कमी करून लांकडाच्या मोठ्या तुळवटापैकीं पाहिजे तेवढाच भाग कापून घेऊन त्याचा प्रमाणशीर सुंदर देव्हारा बनविणाऱ्या चतुर सुताराप्रमाणें सर्व लेखकांच्या लेखांतील अवश्य तेवढाच भाग घेऊन त्याचा अति मनोहर संग्रह बनविण्याच्या तुमच्या कौशल्याबद्दल आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतों." यासंबंधानें टीकात्मक एक अक्षरहि अधिकउणें न लिहितां, स्तुति-निंदा-निरपेक्ष मनानेंच आपण आपलें कार्य करीत राहावें, हाच यापासून बोध घेण्यासारखा आहे, अशी मीं मनास खूणगांठ घातली.

पहिल्या खंडांत ज्यांच्या आठवणी आल्या आहेत अशा लोकांचीं कांहीं थोडीं नांवें पुन्हां या ग्रंथांत आलेलीं पाहून आक्षेपकांस आक्षेपास भांडवल मिळाल्यासारखें होईल; पण त्यांस मला एवढेंच सांगावयाचें कीं, आठवण सांगणारा जुना झाला तरी त्याची आठवण नवी आहे ना ? पात्र जुनें असलें तरी त्यांतून वाढावयाचीं पक्वान्नें ताजीं व मिष्ट आहेत ना ? झालें तर मग; ऐन पक्वान्न सोडून पात्राची व्यर्थ चर्चा करीत बसणें केव्हांहि अरसिकपणाचेंच होईल !

प्रथम खंडांत माझे नांवावर सुमारें शंभर पानांचा मजकूर आलेला आहे. याचें कारण अनेकांकडे मी जाऊन, त्यांनीं सांगितलेल्या आठवणी मीं लिहून काढून त्या सर्व माझ्या स्वतःच्या आठवणींस जोडूनच त्या वेळीं दिल्या गेल्या; पण या खेपेस मी तसें न करतां ज्यांनीं त्या लिहून काढून पुन्हां त्यांचेकडे जाऊन, त्या त्यांस दाखवून, जरूर तर त्यांची सही घेऊन, त्या ज्याच्या त्या नांवाखालींच छापण्याचा अट्टाहास केला आहे; व या अशा मजकुरांचीं पानें सहज शें-दोनशें होतील यांत शंका नाहीं. असें करण्यानें या खेपेस फार त्रास पडला खरा; पण ज्यांच्या त्यांच्या नांवावर प्रसिद्ध होण्याच्या औचित्यानंदानें तो त्रास भरून निघाला असें म्हणण्यास हरकत नाहीं; व या रीतीनें ज्यांचा मजकूर देतां आला नाहीं अशांचाच तेवढा माझ्या आठवणींस जोडून दिला आहे. तसेंच परगांवाहून आलेलीं मोडी लिपीचीं बाडें बालबोध करणें, कित्येकांमध्यें सन, तारखा भरणे, कांहीं संक्षिप्त व त्रुटित मजकुरानें लिहून पाठविलेल्या मजकुरांचीं बाडें पूर्ण लिहून काढून पुन्हा तीं सर्व ज्यांची त्यांच्याकडे पसंतीकरितां पाठवून परत मिळविणें, अत्यंत दुर्वाच्य असलेला मजकूर खिळे जुळविणाऱ्यांच्या सोयी-करितां पुन्हा सर्व सुवाच्य लिहून काढणें वगैरे वगैरे जिकिरीचीं कामें, काय कारण असेल न कळे, गेल्या खेपेपेक्षां या खेपेस फार करावीं लागलीं.

हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं, लोकमान्यांच्या आठवणींचा संग्रह करणें हें मी माझें खाजगी काम समजत नसून तें एक मोठ्या जबाब-दारीचें पवित्र व सार्वजनिक काम असेंच मानतों आणि म्हणून त्या कामाचा संक्षेपानें कां होईना, अहवाल जनतेस सांगणें हें माझें कर्तव्य समजतों.

संपादक या नात्यानें वास्तविक हातीं पडलेल्या लोकमान्यांच्या या सर्व आठवणींच्या साधनसामुग्रीचा योग्य रीतीनें, सूक्ष्म दृष्टीनें व चिकित्सकपणानें अभ्यास करून, त्यांची संगति लावून व शेवटीं त्यांतून निघणाऱ्या प्रमेयांवरून त्यांच्या चारित्र्यासंबंधानें कांहीं सिद्धान्त बांधून त्याचें तात्त्विक व सोपपत्तिक विवरण एखाद्या स्वतंत्र अध्यायांत विस्तरशः करणें अगदीं आवश्यक होतें; पण ग्रंथ-प्रकाशनाच्या व शेवटपर्यंत सामुग्री मिळविण्याच्या धांदलीत मनास असावी तशी स्वस्थता नसल्यामुळें व मर्यादित कालाच्या नियंत्रणामुळें हें काम मला करितां आलें नाहीं, याबद्दल मनास फार खेद होतो. तसेंच एकंदर मजकुराची विषयवार निवड न करितां किंवा दुसरी कोणती एखादी स्वतंत्र पद्धत न स्वीकारितां अगर कांहीं एका विशिष्ट तऱ्हेचें कलम हातांत घेऊन त्यांची सजावट न करितां आला त्या क्रमानें मजकूर मुद्रित केला हें सुमार झालें, असेंहि कोणास वाटणें स्वाभाविक आहे. प्रथम खंडावर अभिप्राय देतांना एका पत्राचे विद्वान् संपादक म्हणतात, "लोकमान्यांनीं धार्मिक, राजकीय, सामाजिक वगैरे बाबीसंबंधाचीं मतें विषयवारीनें न देतां अगर साकल्येंकरून त्यांचें स्वरूपाविष्करण न करितां लोकांनीं पाठविला तसा मजकूर छापून टाकला हें बरें झालें नाहीं;" तर दुसऱ्या एका प्रसिद्ध मासिकाचे संपादक लिहितात, "......लिहून आलेलीं स्फुट प्रकरणें संपादकांनीं विषयवार लावलीं नाहींत हें फार चांगलें केलें आहे. किंबहुना हें पुस्तक इतकें चित्ताकर्षक होण्याचें हेंच आद्य कारण आहे. ग्रंथ कोठेंहि उघडावा, त्या प्रकरणापुरता रस तेथें तेथें उभा आहे. स्फुटपणामुळें अचानकपण व अचानकपणामुळें रसाविर्भाव हा या ग्रंथांत येणेंप्रमाणें परस्पर-विरोधी मतांस परस्परांचा संक्षेप देऊन अखेर आपणांस जें योग्य दिसेल तेंच करीत असावें हेंच इष्ट वाटतें. तथापि एवढें खरें कीं, लोकमान्यांच्या या सार्वजनिक चरित्र-लेखकांची वर्गवारी केली असती तर कांहीं गोष्टींवर विशेष प्रकाश पडला असता व त्यापासून कांहीं बोधहि घेतां आला असता. पण विस्तारभयास्तव आतां त्याचा निव्वळ उल्लेख करण्यापलीकडे आपण कांहींच न करणें अधिक बरें!"

सदर खंडांतील इंग्रजी मजकुरासंबंधानें येवढेंच म्हणावयाचें कीं, त्यापैकीं कांहीं भाग फारसा आठवणीदाखल नसून तो निव्वळ गुणवर्णनपर

(appreciation) असतांहि घेतला आहे. याचें कारण माझ्या इंग्रजी आठवणींच्या पुस्तकाचे प्रस्तावनेंतील प्रस्तावनालेखक श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं लिहिलेल्या प्रस्तावनेंतील त्यांच्याच शब्दांत सांगतों म्हणजे झालें. ते म्हणतात, "The reminiscences contained in this book are mostly by those who came into contact with Lok. Tilak, but comparatively at a distance; and therefore they may look more like appreciations than reminiscences. But even these have their own value as coming from illustrious men and women, who were his contemporary judges and in a few cases also his co-workers."

श्रीयुत केळकरकृत लोकमान्यांच्या चरित्रप्रासादाचे अपूर्ण राहिलेले मजले व त्यावरील शिखर पूर्ण होण्यापूर्वीं लोकमान्यांच्या सर्व भक्तांनीं आपापल्याजवळची 'आठवणी व आख्यायिकां'ची साधनसामुग्री त्यांस वेळेवर नजर केली तर, उत्कृष्ट कसबी शिल्पकाराप्रमाणेंच त्याचा ते उपयोग करून घेतील व महाराष्ट्रास अभिमान बाळगण्यासारखें व चिरकाल टिकणारें लोकमान्यांचें हें एक देदीप्यमान व अतिमनोहर वाङमयस्मारक यांचे हातून पूर्ण यशस्वी होईल अशी कोणीहि अपेक्षा करणें स्वाभाविक आहे, आणि त्या करितां आठवणींचा आणखी तिसरा खंड प्रसिद्ध केल्यास, त्याचा 'अधिकस्याधिकं फलम्' या न्यायानें अधिक उपयोग होईल, असें कोणीं म्हटल्यास तें अगदींच अयथार्थ आहे असेंहि नाहीं; तरी पण अशा प्रकारच्या वाङमयासहि कांहीं स्वाभाविकच मर्यादा असते व सर्व वस्तु प्रमाणबद्ध असण्यांतच जें औचित्य व सौंदर्य असतें तें ओळखूनच आतां यापुढें आठवणींचा तिसरा खंड न काढण्याचें ठरविलें आहे व तें योग्य आहे असेंच सर्वांस वाटेल, अशी माझी समजूत आहे. कारण बोलून चालून आठवणी ह्या राजाच्या स्वारीच्या सैन्यांतील पायदळाप्रमाणें होत किंवा फार तर असेंहि म्हणतां येईल कीं चंद्रहारांतील जशा टिकल्या, झाडाचीं जशीं पानें, मथुरी पेढ्यावरील जशा चारोळ्या किंवा नाण्यामध्यें जसा खुर्दा तद्वतच आठवणी ह्या मुख्य चरित्रग्रंथाच्या पूरक होत. आणि म्हणूनच पूरक वस्तु प्रमाणशीर असण्यांतच

खरें स्वारस्य आहे, हें ओळखून येथेंच आपण तूर्त तरी पूर्णविराम करणें अवश्य आहे.

शेवटचें काम म्हणजे आभारप्रदर्शनाचें. हरिकीर्तन संपल्यावर शेवटीं खिरापत वांटतांना व ती ग्रहण करतांना जो आनंद होतो, तसाच याहि वेळीं होणें अगदीं स्वाभाविक आहे. प्रथम, हा ग्रंथ वाचकांचे हातीं देण्यास प्रामुख्येंकरून जे कारणीभूत झाले, त्या सर्व आठवणीलेखकांचे मी पुन्हां एकवार मनापासून आभार मानतों. तसेंच ज्या सहृदय स्वकीयांनीं हस्तें परहस्तें आठवणी मिळवून देण्याची मला मदत केली त्या अनेक परोपकारी सज्जनांचे उपकार मी विसरणें अशक्य आहे. अर्वाचीन काळच्या वाङ्मययुगांतील ग्रंथरचनेंत पुस्तकांची 'सूची' हे ग्रंथाचे डोळे समजण्यांत येऊन त्यास लिहिण्यांत येणारी प्रस्तावना हे त्या ग्रंथाचें नाक मानलें जातें. एतदर्थ सौन्दर्याच्या ह्या अधिष्ठानाची सदरहू ग्रंथास सोळा आणे जोड करून देणारे वऱ्हाडचे सुप्रसिद्ध विद्वान् पुढारी व लोकमान्यांचे अनुयायी श्रीयुत माधव श्रीहरि ऊर्फ बापूजी अणे यांनीं कार्यबाहुल्य असतांहि या ग्रंथास प्रस्तावना लिहिण्याची कृपा केली याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहें. तसेंच ज्यांचा उल्लेख केल्याशिवाय माझ्यानें राहवणार नाहीं असे केसरी-मराठा पत्रांचे मॅनेजर व ट्रस्टी श्री. बाबासाहेब विद्वांस व माझे मित्र श्रीयुत वासुदेव कृष्ण भावे, बी. ए. उपसंपादक केसरी, कवि वाङ्मयविशारद् यशवंत नरसिंह केळकर (संपादक, गीत-द्विदल), श्रीयुत गोपाळ हरि धारप, असिस्टंट मॅनेजर केसरी-मराठा, प्रस्तुत ग्रंथाच्या योजनेच्या बाबतींत उपक्रमापासून माझे सहकारी असलेले प्रेमळ मित्र श्रीयुत काशीनाथ नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर, बी. ए. (टिळक म. विद्यापीठ) यांचें मला अनेक प्रकारें सहाय्य झालें आहे व त्याबद्दल मी त्यांचा उपकृत आहें. प्रस्तुत ग्रंथाच्या दोन्ही खंडांचे कामीं मला कायमचे उपकारबद्ध करणारे 'गीता-बीज 'कर्ते श्रीयुत गजानन विश्वनाथ केतकर, बी.ए., एल्एल्. बी., उपसंपादक केसरी-मराठा हे होत. श्रीयुत गजाननराव यांनीं हें पुस्तक आपलेंच समजून तें वेळेवर प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत कळकळीनें व निरपेक्षपणानें जी अहर्निश मेहनत केली त्याबद्दल त्यांचे योग्य शब्दांनीं

उतराई होणें कठीण आहे. तथापि माझ्या शाब्दिक आभारापेक्षां आपले परमपूज्य मातामह लोकमान्य टिळक यांचीही सेवा आपलें हातून घडली, याच कल्पनेनें ते आपलें समाधान करून घेतील अशी मला आशा आहे.

'जगद्धितेच्छु' छापखान्याचे सौजन्यशील मालक श्रीयुत केशव रावजी गोंधळेकर यांस वेळोवेळीं दिलेल्या तसदीबद्दल त्यांची क्षमा मागून त्यांनीं टिळक जयंतीस नाहीं तरी टिळक पुण्यतिथीस पुस्तक तयार करून दिल्या-बद्दल व 'विजय' प्रेसचे उत्साही मालक श्रीयुत आप्पासाहेब गोखले यांच्या सर्वसाधारण मुद्रणविषयक सल्ल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

सर्वांत शेवटचे पण अत्यंत आदरयुक्त व कृतज्ञतापूर्वक आभार मानावयाचे ते गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचे होत. लोकमान्य टिळक यांच्या आठवणींच्या ग्रंथाचे दोन्ही खंड हें केवळ तात्यासाहेबांच्या कृपेचें व व प्रोत्साहनाचें फळ आहे; एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या उपकारांची कल्पना होणार आहे.

टिळक पुण्यतिथि
केसरी ऑफिस, पुणें

सर्वांचा नम्र सेवक
**सदाशिव विनायक बापट**

# लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

## खंड २ यांतील आठवणी

लेखक : सदाशिव विनायक बापट

[ लोकमान्यांचे लेखक, केसरी, टिळक स्वराज्य संघ, टिळक-स्मारक ट्रस्ट या संस्थांचे एक सेवक, पुणें सार्वजनिक सभेचे चिटणीस, पुणें ]

(१) सन १९०५ सालीं पुण्यांत सरतान-सिंह नांवाचे निशाणबाज गृहस्थ आले होते. मत्स्यवेध, अदृश्यवेध, शब्दवेध, वगैरे निशाणबाजीच्या अद्‌भुत प्रकारांत त्यांचा हातखंडा होता. त्यांचे प्रयोग गायकवाडवाड्यांत झाले. इतर बरेचसे प्रयोग झाल्यावर शेवटच्या म्हणजे शब्दवेधाच्या प्रयोगाची तयारी चालली होती. राणाजींचे डोळे बांधण्यांत आले. नंतर पांढरीं, तांबडीं, निळीं, हिरवीं अशीं निरनिराळ्या प्रकारचीं मडकीं आणण्यांत येऊन राणाजींना त्यांचा रंग सांगण्यांत आला व त्यांपैकीं प्रत्येकाचा आवाज ऐकविण्यांत आला. नंतर तीं मडकीं दूर अदलाबदल करून ठेवण्यांत आलीं. या अदलाबदल केलेल्या मडक्यांचे आवाज राणाजींना पुन्हां ऐकवावयाचे होते. पण प्रेक्षकांत या वेळीं भयंकर गोंगाट चालला असल्यामुळें मडक्यांचा आवाज त्यांना ऐकूं येणें अशक्य झालें. तेव्हां लोकांना शांत करण्याकरितां लोकमान्य उभे राहिले; व विनोदानें म्हणाले, " हा शब्दवेध आहे. म्हणून लोकांनीं शांत राहाणेंच जरूर आहे. राणाजी मडक्यांच्या आवाजावरून वेध करणार आहेत. तेव्हां जर कां कोणाचा बोलतांना मडक्यांसारखा आवाज निघाला तर नेमका त्याचाच वेध होईल हें लक्षांत ठेवा व अगदीं स्तब्ध बसा ! " हें ऐकून एकच पळ विलक्षण हंशा पिकला; पण लगेच त्याच्या उलट तेथें अरण्यवत् शांतता झाली.

(२) १९०६ सालीं लोकमान्य व प्रो. परांजपे यांस सातारा जिल्ह्यांतील कऱ्हाड गांवच्या लोकांनीं मोठ्या समारंभानें कऱ्हाडास नेलें होतें. परत जातांना कऱ्हाड स्टेशनवर पुण्यास जाण्याकरतां ही मंडळी गेल्यावर लोकमान्यांच्या नांवाची आलेली तार त्यांना प्लॅटफॉर्मवर देण्यांत आली. या वेळीं भा. ब. भोपटकर यांच्या 'भाला' पत्रावरील खटला मुंबईस चालावयाचा होता, व ही तार तेथूनच आली होती. तारेंत 'आपण शक्य तितक्या लवकर यावें' असें म्हटलेलें वाचून जवळच्या लोकांस— (मला वाटतें, तेथें नानासाहेब आगाशे व रामभाऊ सोमण होते)— लोकमान्य म्हणाले, "आम्ही जरी पुण्याचीं तिकिटें काढलेलीं आहेत तरी आतां मला थेट मुंबईसच गेलें पाहिजे. आमच्या धोंडूस (मॅ. विद्वांस यांस) आतांचे आतां तार करा व पांचशे रुपये घेऊन पुणें स्टेशनवर येण्याविषयीं कळवा. हा भोपटकरांवरील खटला नाहीं तर तो आमचेवरीलच आहे, अशी माझी समजूत आहे. शिवाय भोपटकरांस अजून तुरुंगाची वाट मळावयाची आहे. ते या बाबतींत नवशिके आहेत. तेव्हां प्रथम तेथें जाऊन मला त्यांची पाठराखणी केली पाहिजे."

(३) १९०६–७ सालच्या स्वदेशी चळवळीचे वेळीं, सरकारनें दडपशाही सुरू केली. त्या वेळीं बाबू बिपिनपाल यांनीं वर्तमानपत्रांत जाहीर केलें कीं, ज्यांना तुरुंगांत जावयाचें असेल, त्यांनीं अगोदरपासूनच घरीं आस्ते आस्ते कदान्न वगैरे खाऊन, तुरुंगांत जाण्याची तयारी केली पाहिजे. हें वाचून लोकमान्य म्हणाले, "तुरुंगांत जावयाचें म्हणूनच कां तेवढ्यापुरती ही तयारी करावयाची? यांत कांहीं अर्थ नाहीं. देशभक्ताचें मन कोणत्याहि अवस्थेंत समस्थितींतच राहिलें पाहिजे. त्यांस प्रत्यक्ष तुरुंगवास घडो वा न घडो. देशास चांगले दिवस येईपर्यन्त आहे हा तुरुंगवासच आहे असेंच समजून तरुण देशभक्तांचें आचरण घडणें जरूर आहे. ज्यास तुरुंगाकरितां कदान्न घेण्याची तालीम करावी लागणार त्यास आमचा कर्मयोग नीट कळलाच नाहीं असें म्हटलें पाहिजे; व हा कर्मयोग ज्यास नीट कळला नाहीं, त्यानें कदान्न खाऊन तुरुंगांत जाण्याची कितीहि तयारी केली तरी त्याचे हातून कार्यभाग होणार नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे."

(४) एकदां अनंत-चतुर्दशीचे दिवशी गणपति-विसर्जन करून, लकडीपुलावरून रात्रीं लोकमान्य घरी परत आल्यावर स्नान, भोजन वगैरे होऊन स्वारी आरामखुर्चीवर स्वस्थ पडली होती. पण त्या वेळीं ते मनानें व देहानें बरेच अस्वस्थ असल्याचें स्पष्ट दिसत होतें. इतक्यांत प्रो. कौशाम्बी त्यांजकडे आले व त्यांचेशीं कांहीं तात्त्विक चर्चा करूं लागले. पण नेहमीं-प्रमाणें लोकमान्य आपल्या आनंदी वृत्तींत या वेळीं नाहींत असें त्यांसहि वाटल्याखेरीज राहिलें नाहीं. म्हणून अखेर ते त्यांस म्हणालेच, 'आज आपली प्रकृति बरी नाहींशी दिसते.' चटकन् लोकमान्य म्हणतात, "छे, तसें कांहीं नाहीं. माझी प्रकृति ठीक आहे; पण गणपति-विसर्जन करून मी घरीं आल्यावर, मला नेहमींच असें चुकल्यासारखें होतें, चैन पडत नाहीं. यामुळें मनास थोडी अस्वस्थता आली आहे इतकेंच." हें ऐकून कौशाम्बी आश्चर्यचकित होऊन म्हणाले, "एकूण आपल्यासारख्या ज्ञानी पुरुषावरहि अशा लौकिक गोष्टींचा परिणाम होतोच म्हणावयाचा!" लोकमान्य म्हणाले, "अहो, संस्काराचा परिणाम हा कांहीं नाहीं म्हटलें तरी कोणावरहि थोडा तरी व्हावयाचाच. शिवाय, भक्तीच्या पोटांतून निघालेलें ज्ञान हेंहि अखेर भक्तींतच विलीन झाल्यास तीहि एक आनंदाची अवस्था आहे, हें सूक्ष्म विचारांतीं तुमचेहि लक्षांत येईल."

(५) प्रो. राममूर्ती यांच्या शक्तीचे अद्भुत खेळ पुणें येथें शनवार-वाड्यासमोर चालू असतां ते पाहण्यास राममूर्ती यांनीं लोकमान्यांस एकदां बोलाविलें होतें. खेळ आटोपण्यापूर्वीं लोकमान्यांस पानसुपारी व हारतुरे दिल्यावर आभार मानण्याचे वेळीं किंचित् सद्गदित होऊन लोकमान्य म्हणाले, "ज्या वाड्यापुढें आज हे शक्तीचे प्रयोग करण्यांत आले ते त्या वाड्याचे मालक त्या वाड्यांत असून त्यांच्या पुढें करण्यांत आले असते तर या 'भीमसेना'ची त्यांनीं कोणत्या रीतीनें संभावना केली असती हें मीं सांगावें असें नाहीं. परराज्यांत जित लोकांच्या गुणांचें चीज होत नाहीं, ते मातीमोल होतात, म्हणूनच अशा वेळीं या वाड्याकडे पाहून क्षणभर माझी चित्तवृत्ति क्षुब्ध होते. अशा वेळी या भीमसेनाची संभावना मी केवळ पोकळ शब्दानेंच करणार व आपणहि ती फुकट टाळ्यांच्या आवाजानेंच पूर्ण करण्यांत समाधान मानणार, अशी स्थिति आज आली आहे खरी!'

(६) १९१७ सालीं पुणें येथें भरलेल्या आठव्या आयुर्वेदपरिषदेचें अध्यक्षस्थान कोचीन संस्थानाधिपति श्रीमंत सर रामवर्मा यांनीं मंडित केलें होतें. महाराजसाहेब धार्मिक प्रवृत्तीचे असून निर्भय व स्वतंत्र विचाराचे असल्यामुळें लोकमान्यांस भेटण्याची त्यांची फार इच्छा होती. पण ही वस्तुस्थिति लोकमान्यांस माहीत नसल्यामुळें व आपल्या संसर्गानें राजेसाहेबांसारख्या लोकांस त्रास पोहोंचूं नये व परिषद तर यथासांग पार पडावी म्हणून परिषदेमध्यें अगदीं जरूर तेवढाच भाग लोकमान्य घेत असत. पण लोकमान्यांशीं अधिक संबंध यावा अशी तर महाराजसाहेब रोज इच्छा करीत. आणि लोकमान्य तर शक्य तितका संबंध मुद्दाम टाळीत. अखेर महाराजसाहेब यांनीं होऊन परिषदेच्या चिटणिसांस विचारलें की, 'टिळक-महाराजांस भेटण्याची व परिचय करून घेण्याची आमची फार इच्छा आहे. तरी ते आमची भेट घेतील काय?' ताबडतोब चिटणीस लोकमान्यांकडे येऊन त्यांनीं त्यांस ही हकीगत सांगितली. तेव्हां लोकमान्य म्हणाले, "खासा न्याय! महाराजसाहेब आमच्या गांवीं आले व आमच्या परिषदेचे अध्यक्ष झाले, तेव्हां वास्तविक या बड्या पाहुण्यास आम्ही होऊनच भेटावयास जाऊन त्यांचें आदरातिथ्य करावयास पाहिजे. पण आमचा संसर्ग अशा लोकांस तापदायक होण्याचा संभव असतो. यामुळें त्यांस आपण अडचणींत घातलें असें वाटूं नये म्हणून, आम्ही होऊनच मुद्दाम अशा लोकांपासून नेहमीं चार पावलें दूर राहातों. पण तुम्ही सांगतां ती हकीगत ऐकून आतां मला येथें स्वस्थ बसवणार नाहीं." असें म्हणून चटकन् उठून पोषाख करून महाराजसाहेबांस भेटण्यास स्वारी निघून गेली. टिळक आपण होऊन आपल्या भेटीस आल्याचें महाराज-साहेब यांस कळतांच ते आश्चर्यचकित झाले. पुढें उभयतांचें बराच वेळ बोलणें-चालणें झाल्यावर लोकमान्यांनीं त्यांस आपले वाड्यांत उपाहारास (गार्डन पार्टी) येण्याचें आमंत्रण दिलें. त्याप्रमाणें महाराजसाहेब आले होते. वाड्यांत लोकमान्यांनीं उपाहाराची उत्कृष्ट व्यवस्था ठेवली होती, हें सांगावयास नकोच. समारंभ आटोपल्यावर वाड्यांतून परत जातांना मोटारींत महाराजसाहेब बसल्यावर त्यांचे लोकमान्यांनीं आभार मानले. तेव्हां वयोवृद्ध महाराजसाहेब उठून हात जोडून लोकमान्यांस म्हणाले,

" Oh ! You are thanking us, because we came up here for enjoying the entertainment ! How much more then, must we thank you who denied himself the enjoyment for the sake of his countrymen by getting six years ! "

(७) सुमारें १६-१७ वर्षांपूर्वी कोणी एक स्त्रीसंगीत नाटक मंडळी 'दंडधारी' नांवाचा खेळ पुण्यास करीत होती. सदरहू नाटकांत दंडधारी हें पात्र लोकमान्यांचें म्हणून घालण्यांत आलें होतें. यामुळें हा खेळ येथें अत्यंत लोकप्रिय झाला होता. लोकमान्यांचे स्नेही दत्तोपंत वेहेरे हे एकदां त्यांजकडे येऊन त्यांस थट्टेनें म्हणाले, 'बळवंतराव, काल येथें काय विलक्षण टाळयांच्या कडकडाटांत लोकांनीं तुमचें अपूर्व स्वागत केलें हो !' लोकमान्य म्हणाले, " म्हणजे ? मी तर काल मुंबईस होतों. आज सकाळीं आतांच येथें आलों. " दत्तोपंत मजेनें म्हणतात, 'रामदासस्वामीसारखेच आपण आहांत म्हणावयाचें तर ! घटकेंत मुंबईस दिसतां, व त्याच वेळीं येथें पुण्यासहि आहांत ! आम्ही तर काल स्वत: येथें तुमचें विलक्षण स्वागत झालेलें पाहिलें !' लोकमान्यांस अर्थात् हें बोलणें कांहींच कळेना. तेव्हां ते म्हणतात, "काय, म्हणतां तरी काय ?" जरा कुचेष्टेनें व हंसत दत्तोपंत म्हणाले, 'आमच्या साधुसंतांप्रमाणें दैविक चमत्कार दाखवून आत्मिक शक्तीनें जरी तुम्हांस सर्वगामी होतां न आलें तरी तुम्हांस तुमच्या बाह्य स्वरूपानें एकाच वेळीं अनेक ठिकाणीं आतां प्रकट होतां येऊं लागलें, हें का थोडें झालें ?' चटकन् लोकमान्यांचे लक्षांत हें बोलणें येऊन ते म्हणाले 'आमची कोठें नक्कल किंवा सोंग आपण पाहिलेलें दिसतें. हो, ते भोंडे आहेतच ना !" दत्तोपंत म्हणतात, 'होय, भोंडे तर आहेतच; पण अलीकडे दुसरे एक भोंडे-पात्र निर्माण झालें आहे हें तुम्हांस कोठें ठाऊक आहे ! अहो, तुमच्यावर लोकांनीं नाटक लिहिलें आहे व त्यांत तुम्हांस आणिलें आहे ! काय सांगूं बळवंतराव ! अगदीं हुबेहुब आम्हांस काल दुसरे बळवंतरावच थिएटरांत पाहावयास सांपडले ! तुम्ही स्टेजवर आलां–नव्हे तें पात्र स्टेजवर आलें तेव्हां काय तो टाळयांचा कडकडाट विचारावा ! आणि मौज अशी कीं, हे नवे बळवंतराव म्हणे, मूळ स्त्री आहे !!' हें

ऐकून लोकमान्य खूप हसूं लागले. इतक्यांत कै० सदाशिवराव भावे (केसरीचे मदतनीस मंडळांपैकीं एक) तेथें आले. हे मोठे नाट्यप्रिय होते व हें लोकमान्यांस ठाऊक होतें. म्हणून त्यांस लोकमान्य म्हणाले, "हें कोणीं हो नाटक लिहिलें आहे ?" 'नेवाळकरांनीं' भावे म्हणाले; 'व त्यांची आपणांस भेटण्याची फार इच्छा आहे. त्यांस उद्यां घेऊन येऊं का ?' लोकमान्य म्हणाले, 'आणा, वाटल्यास.' दुसरे दिवशीं नेवाळकरांस घेऊन भावे आले. तेव्हां त्यांचेशीं बोलतांना नाटक कसें असावें, त्याचा हेतु काय असावा, तें पाहून प्रेक्षकांवर त्याचा परिणाम कसा व्हावा, वगैरे गोष्टी लोकमान्यांनीं त्यांस सांगितल्या. नंतर नेवाळकर लोकमान्यांस म्हणाले, 'ज्या बाई आपली–दंडधारीची–भूमिका घेतात, त्यांची आपणांस भेटण्याची इच्छा आहे.' हें ऐकतांच थोडया गंभीरपणानें लोकमान्य म्हणाले, " मला भेटण्यास कोणासहि प्रतिबंध नाहीं खरा; तथापि त्यांना माझा निरोप कळवा कीं, मला भेटण्यापेक्षांहि माझ्या नांवानें जर तुम्हांस चार पैसे अधिक मिळत असले तर सत्प्रवृत्तीनें वागून मिळणाऱ्या त्या पैशांतील कांहीं अंश यापुढें सार्वजनिक कामास देण्याचें ठरवा म्हणजे झालें."

(८) सन १९०६ च्या पुणें म्युनिसिपालिटीच्या निवडणुकीस कै. हरिभाऊ आपटे व प्रो. शि. म. परांजपे हे एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून उमेदवार उभे राहिले होते. निवडणुकीचे दिवशीं तिसरे प्रहरीं वाडयांत निरोप आला कीं, बळवंतराव पोलिंग स्टेशनवर न येतील तर आतां परांजपे खास पडणार. हें ऐकतांच स्वारी तडक निघून पोलिंग स्टेशनवर गेली. नेपोलियनप्रमाणें लोकमान्यांची विलक्षण आकर्षक शक्ति आमच्या तेथें अनुभवास आली. नेमस्त पक्षाचे व प्रत्यक्ष हरिभाऊंचे एक गुजराथी स्नेही तेथें मत देण्यास आले व हरिभाऊंस मत देण्याचें त्यानें प्रथम कबूलहि केलें. पुढें तेथून जरा दहा पावलें दुसऱ्या दालनांत ते जातात तों तेथें लोकमान्यांची व त्यांची दृष्टादृष्ट झाली. तेव्हां दुरून लोकमान्यांनीं त्यांस मोठया आवाजानें, 'काय शेटजी ? काय विचार आहे ? आम्ही येथें उभें आहोंत. लक्षांत आहे ना ?' येवढें म्हणतांच शेटजी म्हणाले, 'हो, प्रथम मी हरिभाऊंस मत देण्याचें कबूल केलें होते; पण आतां प्रत्यक्ष

उ८०८२ ८८०

आपली गांठ पडल्यावर तसें कसें होईल ?' असें म्हणून त्यांनीं हरिभाऊंस हातानें खूण करून बोलाविलें, व 'आपणांस मीं दिलेला शब्द परत घेण्याची परवानगी द्या' असें त्यांनीं त्यांस सांगितलें. त्याप्रमाणें शेटजी परांजपे यांचेबरोबर जाऊन त्यांस मत देऊन आले. पुढें हरिभाऊंच्या मवाळ स्नेह्यांनीं तेथें एकच हलकल्लोळ केला; पण अर्थात् त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं.

(९) पूना टेम्परन्स असोसिएशनच्या विद्यमानें चाललेल्या १९०८ सालच्या पुण्यांतील पिकेटिंगच्या चळवळीचे वेळीं, दारूसंबंधानें पुण्याचें लोकमत व्यक्त करण्याकरितां रे मार्केटांत सर्व पक्षांची जंगी जाहीर सभा भरवावी असा पुणें सार्वजनिक सभेंत सदर असोसिएशनच्या कार्यकारी मंडळानें ठराव मंजूर केला. सदर सभेस लोकमान्य, हरिभाऊ आपटे, लक्ष्मणराव गोखले, कामत वगैरे मंडळी हजर होती. वरील ठराव मंजूर केला त्यांत सदर जाहीर सभेचें अध्यक्षस्थान डॉ० भांडारकर यांनीं स्वीकारण्याबद्दल त्यांस विनंति करावी व ती त्यांनीं अमान्य केल्यास ... साहेबांस अध्यक्षस्थान देण्यांत यावें असें ठरलें होतें. डॉ० भांडारकर यांनीं अध्यक्षस्थान न स्वीकारल्यास ना. गोखले यांस विचारावें व त्यांनींहि नकार दिल्यास, मग आपणांपैकीं दुसऱ्या कोणा 'इंडियनास' विनंति करावी असें टिळकांचें मत होतें. पण 'इंडियना' पेक्षां साहेबच अध्यक्ष असावा, अशी मवाळांची फार इच्छा असल्यामुळें त्यांनीं वरीलप्रमाणें ठराव मंजूर केला. कारण प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें भांडारकर खास येऊं शकणार नाहींत, हें त्यांस पक्कें माहीत असल्यावरून केवळ टिळकांच्या समाधानाकरतां मवाळ सभासदांनीं उगाच प्रथम त्यांचें नांव घालून ठेवलें होतें. झालें; सदर कार्यकारी मंडळाची सभा खलास होते न होते व बाकीचे सर्व मवाळ तेथून जातात न जातात तोंच केळकर, लवाटे यांस टिळक म्हणाले, "यांना अध्यक्ष साहेब पाहिजे काय ? साहेबाशिवाय यांचें अजून भागत नाहीं अं ! ठीक आहे. आतांचे आतां भांडारकरांकडे मी जातों व काय वाटेल तें करून अध्यक्ष होण्याबद्दल त्यांचें वचन घेऊन येतों. म्हणजे आपोआपच साहेब अध्यक्ष होण्याचें हें संकट टळेल !" असें म्हणून गाडी बोलावून

स्वारी तडक संगमाश्रमाकडे रवाना झाली. एखादी गोष्ट मनाप्रमाणें घडवून आणावयाची म्हटली म्हणजे मग लोकमान्यांस अगदीं दम नसे. त्याशिवाय दुसरें कांहीं त्यांस सुचावयाचें नाहीं. भांडारकरांकडे गेल्यावर प्रथम सरसाहेब अनेक अडचणींमुळें कबूल होईनात. पण लोकमान्यांनीं आपल्या अमोघ वाणीनें व कार्याच्या कळकळीनें, त्यांना अखेर वचन देण्याला भाग पाडलें! नंतर लोकमान्य वाड्यांत परत आल्यावर जवळच्या मंडळीस थोड्या उद्विग्न मनानें म्हणतात, "काय चमत्कार पाहा, आमच्या लोकांची सभा आणि त्याचा अध्यक्ष साहेब यांना हवा ! आम्ही काय सर्व बंडखोर आहों! त्या म्हातारबोवानें या प्रसंगीं संमति दिली म्हणून अब्रू बचावली. नाहीं तर, आम्हांस दारू पिण्यास शिकविणाऱ्या साहेबांच्या जातीपैकीं एकास आमच्या डोक्यावर बसावयास सांपडून उलट 'तुम्ही दारू पिऊं नका' असा त्याचे तोंडून खासा उपदेश आम्हास निमूटपणें ऐकावा मात्र लागला असता ! पण हे आमच्या या पढतमूर्खांच्या लक्षांत येईल तेव्हां ना ! " पुढें सदर सभा डॉक्टर साहेबांच्याच अध्यक्षतेखालीं झाली, हें सांगणें नकोच.

(१०) लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर एकदां त्यांच्या खेळीमेळींतील एका स्नेह्यानें त्यांस 'तुम्ही अलीकडे मवाळ झालां आहांत' असें रोखठोक तोंडावर म्हटलें. "यास कांहीं पुरावा द्याल का ?" असें लोकमान्य त्यांस म्हणतांच सदर गृहस्थ उसळून त्यांस म्हणाले, 'मवाळ झालों नाहीं अशाबद्दल तुम्ही तरी कांहीं पुरावा देऊं शकाल ? ' जरा संकोचित वृत्तीनें टिळक म्हणाले, " माफी न मागतां मी सहा वर्षें तुरुंगांत राहिलों यापेक्षां आणखी तो पुरावा काय पाहिजे ?" यावर रागावून ते गृहस्थ म्हणतात, 'बळवंतराव, ही वकिली करून आम्हांस असें फसवितां काय ? तुम्हीं सहा वर्षें शिक्षा भोगलीत हा तुमचा मोठेपणा कोण मान्य करीत नाहीं ? पण लक्षांत असूं द्या ; सहा वर्षांच्या पूर्वींच्या तुमच्या वाण्याचें तें फळ आहे. आमचा आक्षेप तुम्ही सुटून आल्यापासून मवाळ झालां आहांत असा आहे. यावर काय उत्तर ?' चटकन् लोकमान्य म्हणाले, " अहो, तुम्ही म्हणतां तसा मी मवाळ झालों असतों तर माझ्या ऑफिसच्या स्टाफवर तुरुंगांतून आलेले वामनराव जोशी, भट व बापट हे कोणास पाहावयास

मिळालेच नसते. मवाळांच्या स्टाफवर यांपैकीं कोणा एकास ठेवून दाखवा पाहूं?" हें ऐकून त्यांच्या ह्या स्नेह्याचें कदाचित् समाधान झालें नसलें तरी ते त्या वेळीं निरुत्तर झाले हें खास!

(११) जुन्नर येथें भरलेल्या पुणें जिल्हा-परिषदेच्या वेळची गोष्ट. लोकमान्यांनीं त्या प्रसंगीं जुन्नरास भेट दिल्यामुळें तेथील नागरिकांनीं त्यांची प्रचंड मिरवणूक काढून त्यांच्यावरील प्रेम व्यक्त केलें होतें. परंतु राष्ट्रीय-पक्षातर्फे भरणाऱ्या या परिषदेस हाणून पाडण्यासाठीं कांहीं मवाळ व सत्यशोधकी चळवळयांनीं अगाऊच महिना पंधरा दिवस, जुन्नरास जाऊन आपली एक दुसरी परिषद भरविण्याचा येळकोट केला. परंतु त्यांना लोक बघेनात व दुसरी परिषद भरविण्याचा आपला बेत फसतो असें पाहून त्यांनीं शेजारपाजाराच्या खेड्यापाड्यांतून कांहीं भोळ्या शेतकऱ्यांना 'जुन्नरला चला, तुम्हांला टिळक महाराजांचें भाषण ऐकण्यास मिळेल' वगैरे थापा मारून त्यांना परिषदेच्या दिवशीं जुन्नरास आणिलें! इकडे जिल्हा परिषद मंडपांत सुरु होतांच, तिकडे मंडपाबाहेर एका झाडाखालीं त्यांनीं आपली सभा भरविली. त्यांच्या 'प्रचंड' परिषदेस पांच पंचवीस लोक जमले होते! व आतां आपणांस टिळक महाराजांचें दर्शन होऊन त्यांचें भाषण ऐकावयास मिळणार म्हणून मोठ्या आतुरतेनें ते वाट पाहात बसले होते. झालें; सभेस सुरुवात होऊन एकएक मवाळ व सत्यशोधकी वक्ता टेबलावर उभा राहून बोलूं लागला. एका कोल्हापुरी समाजिष्टानें तर मारे अस्तन्या मागें सारसारून हातवारे करीत तुफान भाषण करण्यास सुरुवात केली. शेजारच्या मंडपाकडे हात करून तो म्हणाला, "माझ्या शेतकरी बंधूंनो, त्या पलीकडल्या मंडपांत भरलेल्या भिकार सभेकडे लक्ष देऊं नका. तेथें सारे लबाड, टिळकपक्षाचे लोक जमले आहेत. त्यांच्या नादीं लागूं नका. तुमचे खरे हितकर्ते आम्हीच आहोंत." इ० सदर वक्त्याचे ते उद्गार ऐकून जमलेले सर्व शेतकरी प्रेक्षक कावरेबावरे झाले. व 'अरे हें काय? टिळक महाराज कुठें आहेत? त्यांचें भाषण केव्हां होणार?' असें एकमेकांस जोरानें विचारूं लागले. इतक्यांत तिकडे मंडपांत लोकमान्यांचें भाषण सुरू होऊन तें ऐकण्यासाठीं सर्वांनीं मंडपांत यावें असा व्हालंटिअरनें कर्णा फुंकला. त्यासरशीं बंदुकीच्या बारानें झाडावरील सर्व पक्षी उडावेत त्याप्रमाणें,

झाडाखालील हे लोक तेथून पळत निघून लोकमान्यांचें भाषण ऐकण्यासाठीं त्या मंडपांत घुसले व वडाखालील सभा ओस पडली !

(१२) तारीख १ फेब्रुवारी १९१७ रोजीं किर्लोस्कर नाटक गृहांत मि. सी. एफ्. अॅन्ड्र्यूज यांच्या प्रेरणेनें मुदतबंदी मजूर पद्धतीच्या निषेधार्थ जाहीर सभा भरली होती. या वेळीं राष्ट्रीय पक्षाचे व नेमस्त पक्षाचे बहुतेक सर्व प्रमुख लोक हजर होते. अध्यक्षस्थानीं सर डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांची योजना झाली होती. वयोवृद्ध अध्यक्षांचें हलक्या स्वरांतील भाषण लोकांस ऐकूं जात नसल्यामुळें, अगदीं चिकार भरलेल्या त्या थिएटरमध्यें गडबड सुरू झाली व ती इतकी वाढली कीं, कोणाचा शब्द कोणास ऐकूं येईना. तेव्हां ना. परांजपे यांनीं कार्यक्रम सुरळीत चालू द्यावा अशी श्रोत्यांस विनंति केली; पण याचा परिणाम उलट होऊन आगींत तेल ओतल्याप्रमाणें गडबड अधिकच वाढली ! तेव्हां अखेर लक्ष्मणराव गोखले वकील यांनीं लोकमान्यांचे जवळ जाऊन त्यांचे कानांत सांगितलें कीं, 'आपणच उठून दोन शब्द सांगाल, तरच आतां शांतता होईल व सभा पार पडेल.' तेव्हां लोकमान्य चटकन् होय म्हणाले; पण चमत्कार असा झाला कीं, बोलण्यास पुढें येण्याकरितां उपरणें सावरीत आहेत व उठून बोलण्याच्या बेतांत आहेत, असें श्रोत्यांस नुसतें दिसतांच, बटन दाबतांच जसा विजेचा दिवा लागावा त्याप्रमाणें एकदम विलक्षण शांतता प्रस्थापित झाली ! अर्थात् मग त्यांस उभे राहून बोलण्याचें कारण पडलें नाहीं; व पूर्वीं एका हातावरहि डॉ. साहेबांचें ऐकूं न येणारें भाषण आतां थिएटरच्या शेवटच्या जागेपर्यंत सर्वांस स्पष्ट ऐकूं गेलें ! आपलें भाषण संपवून अध्यक्ष खालीं बसल्यावर त्यांचेजवळच बसलेल्या ना. परांजपे व डॉ. देव यांस ते म्हणतात, 'पाहा, काय टिळकांचें सामर्थ्य आहे तें ! त्यांच्या नुसत्या इच्छाशक्तीनें व दृष्टिक्षेपानें जें कार्य झालें तें तुमच्या हात जोडून केलेल्या कळकळीच्या विनंतीनेंहि झालें नाहीं.' हें ऐकून प्रो. हरिभाऊ लिमये हळूच म्हणाले, 'म्हणूनच आम्ही अलीकडे त्यांची सवंग लोकप्रियता हा शब्द वापरण्याचें सोडून दिलें आहे.'

(१३) वादविवादामध्यें विषयाचा तात्रडतोब निकाल लावण्यांत लोकमान्यांचा अगदीं हातखंडा असे. एकदां सार्वजनिक सभेच्या कार्यकारी

मंडळाच्या सभेंत नियमासंबंधानें वाटाघाट चालू होती. सभेच्या नियमाप्रमाणें हिशेब तपासनीस यांस कार्यकारी मंडळामध्यें वाव नसे; व नियमामुळें असें होत असेल तर आपण कार्यकारी मंडळाच्या सभासदत्वाची जागा सोडून, नुसते हिशेब तपासनीस म्हणून राहात नाहीं असें त्या गृहस्थानें सांगितलें. पण लोकमान्यांस तर हेच गृहस्थ हिशेब तपासनीस पाहिजे होते. यावर कोणास कांहीं तोड सुचेना. वादविवादांत फुकट वेळ जाऊं लागला. तेव्हां चटकन् लोकमान्य म्हणाले, "ठीक आहे; सभेच्या नियमांत असा फरक करा, The person, who will be elected as Auditor, shall be the member of the Managing Committee; but he will not be entitled to give vote on financial questions. असें केल्यानें सभेच्या नियमास बाधहि येत नाहीं व आलेल्या अडचणीचाहि परिहार होतो. होय कीं नाहीं ?" लोकमान्यांच्या या युक्तीनें कित्येक वेळ घाटत असलेला तो वाद सर्वांचें समाधान होऊन, एकदम निकालांत निघाला ! व त्याप्रमाणें सभेच्या मूळ नियमांत तशी दुरुस्ती करण्यांत आली !

(१४) लोकमान्य विलायतेहून परत आल्यावर त्यांस व तात्यासाहेब केळकर यांस श्रीओंकारेश्वराचे पटांगणांत वैदिक ब्राह्मण मंडळींनीं साशिर्वाद पानसुपारी देण्याचा समारंभ केला. उभयतांस मोठमोठे फुलांचे हार घालण्यांत आले होते. समारंभ झाल्यावर केळकरांसह लोकमान्य बाहेर आपल्या नेहमींच्या दोन घोड्यांच्या गाडींत बसण्यास आले. त्यांचे मागून स्वयंसेवकानें तें हारांचें ओझें आणिलें, व तें तो गाडींत ठेवूं लागला. लोकमान्य खालींच उभे होते. त्यांनीं ते हार आपल्या नेहमींच्या आबा गाडीवाल्याच्या अंगावर टाकून त्यास हंसत म्हणाले, "हे हार आतां तुझ्या घोड्यांचे गळ्यांत घाल; तुझे हे दोन्ही घोडे ही गाडी ओढतात; गाडींत बसलेले आम्ही दोघे देशाची गाडी ओढतों. एकूण दोघे सारखेच !!" हें ऐकून तेथें मोठा हंशाच झाला !

(१५) एकदां लोकमान्य 'केसरी'चा मजकूर सांगत असतां कै. भाऊशास्त्री लेले तेथें आले. अर्थात् लिहिणें थांबलें. शास्त्रीबुवा लोकमान्यांस

थोडें हांसत म्हणाले, "गुरुजी, नेहमींच्या बोलण्यांतहि तुम्ही आपणांस, 'आम्ही' या बहुवचनानें उल्लेखीत असतां, हें कसें काय ?" लोकमान्य म्हणाले, "अहो, संवयीनेंहि स्त्रीपार्टी पुरुष हा देखील, पुढें पुढें बायकां-सारखें बोलतो. वर्तमानपत्रांतील लिहिण्यानें ही संवय आमचे (पाहा, या वेळीं सुद्धां 'माझे' हा शब्द तोंडांत येत नाहीं) आंगवळणी पडली आहे. ३५ वर्षांपूर्वी मी प्रथम 'केसरी' लिहिण्यास बसलों, तेव्हां 'आम्ही' असें लिहिण्याचा मला फार संकोच वाटला; हें मला पक्कें आठवत आहे. Habit is second Nature (संवय हीच दुसरा नैसर्गिक गुण बनतो). हें खरें."

(१६) लोकमान्यांच्या परिचयाचे एक विद्वान् गृहस्थ एकदां मुद्दाम त्यांच्या दर्शनाकरितां आले होते. ते येतांच त्यांनीं लोकमान्यांच्या पायावर मस्तक ठेविलें. त्या वेळीं झालेल्या संभाषणांत शेवटीं टिळक त्यांस म्हणाले, "तुमच्यासारख्या जाणत्या लोकांनीं मला हा असा नमस्कार काय म्हणून करावा? मी कांहीं साधु नाहीं. तुमच्याच सारखा मी एक सामान्य मनुष्य आहें. फक्त मी माझी इच्छाशक्ति देशकार्यासाठीं वाहिली. तुम्हीहि तसें करूं शकाल व तुम्हीं तसें केल्यास तोच नमस्कार मला जास्त प्रिय होईल. नुसत्या या अशा नमस्कारानें माझें खरें समाधान कधीं होणार नाहीं!"

(१७) लोकमान्यांस 'केसरी'चा कांहीं मजकूर लिहावयाचा होता. त्या वेळीं हाताशीं मी अगर दुसरें कोणी नसल्यामुळें, स्वारी जरा विचार करीत त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें हात मागें वळवून गच्चीवरून इकडे तिकडे फिरत होती. इतक्यांत मी तेथें गेलों; तेव्हां ते हांसत म्हणाले, "स्वावलंबी व्हा, असें मी लोकांस सांगतों आणि मी मात्र, लेखकाशिवाय हात नसल्याप्रमाणें, अडून बसतों." जरा किंचित् थांबून पुन्हां ते विनोदानें म्हणाले, "पण तूं लक्षांत ठेव कीं, वेळ आली तेव्हां साडेआठशें पानांचा ग्रंथ मींच हातानें लिहून काढलेला आहे. तेथें लेखकाकरितां थांबलों नाहीं, किंवा तूं येशील म्हणूनहि वाट पाहिली नाहीं, किंवा मी लिहिणार नाहीं असें म्हणून स्वस्थ बसलों नाहीं बरं कां!"

(१८) प्रस्तुत लेखकाच्या एका स्नेह्याच्या वृद्ध व प्रेमळ मातोश्री कोणास कांहीं न सांगतां एकदां लोकमान्यांच्या घरीं गेल्या व त्यांचे पाय धरून त्यांस म्हणाल्या, 'तुमचे जवळ असलेला आमचा मुलगा—माझ्या मुलाचा स्नेही—बापट हा लग्न करीत नाही; तो आइबापास एकटाच मुलगा आहे! त्याचे आईबाप आतां म्हातारे झाले आहेत. करितां तुम्ही त्यांस सांगाल तरच तो लग्न करील. दुसऱ्या कोणाचेंहि तो ऐकत नाहीं. तुम्हींच त्यास लग्नास उभें केलें पाहिजे!' त्या पोक्त बाईचें हें सर्व म्हणणें शांतपणें ऐकून घेऊन लोकमान्य त्यांस गंभीरपणें म्हणतात, "तुम्ही म्हणतां तें कांहीं अंशीं खरें आहे; पण हें लक्षांत ठेवा कीं, कोणी कोणाच्या सांगण्यानें असल्या गोष्टी करीत नसतो. ज्याच्या त्यानें आपण होऊनच त्या करावयाच्या असतात. आणि तसें करण्याचें त्याचे मनांत नसलें म्हणजे मग कांहीं तरी निमित्त कारण सांगून तो मोकळा होतो. हें असें आहे. तुम्हांस व त्याच्या आइबापास तसें वाटणें स्वाभाविक आहे. पण आमच्या सांगण्यानें तुम्ही म्हणतां तसें करण्यास आज तो प्रवृत्त झाला तर आमच्या नेहमींच्या धंद्यास अनुसरून, समजा, उद्यां तो आमच्याच सांगण्यावरून दहा वर्षें तुरुंगांत गेला तर मग कसें? मग तुम्हीच म्हणाल कीं, तुरुंगांत जाण्यास टिळक सांगणार होते तर मग लग्न करावयास तरी त्यांनीं कां सांगितलें? पण हें तुम्ही लक्षांत ठेवा कीं, आतां मी तुम्हांस सांगितल्याप्रमाणें ज्याच्या मनांत जी गोष्ट करावयाची असते ती कोणी कोणाचे सांगण्यावरून अगर ऐकून करीत नसतो; तथापि मी त्यांस सांगून पाहीन. नंतर बाई घरीं आल्या; पण याबद्दल प्रथम त्यांनीं आम्हांस कांहींच पत्ता लागूं दिला नाहीं. दोनप्रहरीं मी वाड्यांत गेल्यावर मला पाहतांच लोकमान्य म्हणाले, "अरे, तू म्हणे घरीं कोणाचे ऐकत नाहींस?" लोकमान्यांच्या तोंडचे हे शब्द ऐकून मी चित्रासारखा त्यांजकडे पाहात अगदीं तटस्थ राहिलों. पुढें जरा बावरल्यासारखा दिसतांच लोकमान्यांनीं मला सकाळची सर्व हकीकत सांगितली व म्हणाले, "देशाचें कांहीं काम करावें असें ज्यांना वाटत असेल त्यांनीं गृहस्थाश्रम स्वीकारूंच नये असें कांहीं नाहीं. मात्र सार्वजनिक कामाच्या आड गृहस्थाश्रम येऊं न दिला म्हणजे झालें. आणि जपावयाचें तें तेथेंच. आमचे भिकाजीपंत हर्डीकर हे

असेच होते. व समाजाच्या स्वास्थ्याच्या व हिताच्या दृष्टीनें हेंच योग्य आहे. पण ज्यांना याबद्दल आपणासंबंधानें विश्वास नसेल आणि एकदां आपण संसारचक्रांत अडकलों कीं, मग त्यांतच जन्मभर कायमचे अडकून पडूं असें वाटत असेल, त्यांनीं ब्रह्मचारी राहून राष्ट्रकार्य केल्यास, तेंहि हवेंच आहे; नको आहे असें नाहीं. देशाकरितां तरुण लोक फकीर झाल्यास हल्लींच्या देशपरिस्थितींत हें इष्टच आहे. पण ते आमच्या राजवाड्यांप्रमाणें (प्रसिद्ध इतिहास-संशोधक विश्वनाथ काशीनाथ राजवाडे) निष्कलंक व शुद्धाचरणानें समाजांत राहूं, अशी मनांत शपथ घेतील तरच त्यांनीं या मार्गांत पडावें. एरवीं त्यांनीं आपला व समाजाचा नाश करूं नये. म्हणून अशा बाबतींत ज्यानें त्यानें आपला प्रश्न आपणच सोडविला पाहिजे व मार्ग मोकळा केला पाहिजे." लोकमान्यांनीं तूं अमुक कर असें जरी प्रत्यक्ष मला सांगितलें नाहीं तरी मीं काय करावें, हें माझ्या अभिरुचीप्रमाणें अप्रत्यक्ष रीतीनें सांगून अर्जुनाच्या निमित्तानें भगवंतांनीं जशी जगास गीता सांगितली त्याप्रमाणें सर्व तरुणांस (तरुण देशभक्तांस) त्यांनीं त्या बाबतींत मार्ग दाखवून दिला आहे, अशी माझी श्रद्धा आहे.

(१९) लोकमान्यांच्या अपूर्व स्मरणशक्तीच्या नमुन्याची मला एक गोष्ट आठवली. गायआळींत श्रीयुत न. चिं. केळकर यांचे वाड्यांत प्रो. लक्ष्मण शास्त्री लेले कांहीं दिवस राहात होते. त्यांस भेटण्याकरितां एकदां लोकमान्य त्यांजकडे गेले. बरोबर मी होतों. आम्ही त्यांचे घरीं गेलों; पण शास्त्रीबोवा बाहेर गेल्याचें सांगण्यांत आलें. तथापि आपण अर्ध्या तासाचे आंत परत येतों असे ते सांगून गेले आहेत असेंहि आम्हांस सांगण्यांत आलें. म्हणून ते येईपर्यंत आपण येथेंच बसूं, असें लोकमान्य म्हणाले. इतक्यांत त्यांस कलकत्त्यास मोतीबाबूंस पाठवावयाच्या पण घरीं लिहून ठेविलेल्या पत्राची आठवण झाली. परन्तु घरीं मला पाठवून तें पत्र मला सांपडून पुन्हां बुधवार पोस्ट ऑफिसांत जाऊन तें रजिस्टर करण्यास आतां वेळ नाहीं, असें लोकमान्यांस वाटून ते म्हणाले, "तर मग आतां शास्त्रीबोवा येईपर्यन्त तें पत्र येथेंच लिहूं व येथूनच परभारें तें रजिस्टर करूं म्हणजे ताबडतोब आजचे आज रवाना होईल." असें म्हणून त्यांनीं तेथें

पत्राचा मजकूर सांगण्यास सुरुवात केली. फूलसकॅप कागदाची दीडतक्ती भरून तें पत्र होतें. लोकमान्यांनीं त्यावर सही केल्यावर तें घेऊन धांवत जाऊन रजिस्टर करण्यास मला सांगितलें. त्याप्रमाणें मी गेलों; पण एक-दोन मिनिटांपूर्वींच ऑफिस बंद झाल्याचें कळले. म्हणून पुढें तसाच परत येऊन त्यांस तसें सांगितलें. 'ठीक आहे, उद्यां सकाळीं मात्र तें पत्र प्रथम रजिस्टर कर' असें ते म्हणाले. दुसरे दिवशीं सकाळीं वाड्यांत आलों तों त्यांनीं स्वत: आपल्या हातानें लिहून ठेवलेलें पत्र टेबलावरील एका बुकांत मीं पाहिलें. तेव्हां मूळ त्यांच्या हातचेंच तें सुंदर अक्षराचें पत्र पाठवावें असें मला वाटलें. म्हणून तें एकदां मीं वाचून पाहिलें, तों त्यांनीं मला सांगून लिहविलेल्या पत्राची ती जणूं काय नक्कलच आहे, असें दिसून आलें. म्हणून मी तेथें त्या दोन्ही पत्रांची एकमेकांवरून रुजवात घेतली आणि चमत्कार असा कीं, जणूं काय पहिल्या पत्रावरून ह्या पत्राची कोणी तरी नक्कल करावी त्याप्रमाणें मला दिसून आलें!

(२०) प्रो. वामन मल्हार जोशी हे मराठ्याचे कांहीं दिवस सह-संपादक होते. ते एकदां खूप आजारी पडले; व त्यांत त्यांचें कसलेंसें ऑपरेशन करण्यांत आलें. एके दिवशीं लोकमान्य मला म्हणाले, "वामन-रावांची प्रकृति बरी होऊन ते अंथरुणावर उठून बसूं लागेपर्यंत, रोज त्यांचेकडे जाऊन त्यांचा समाचार घेऊन मला कळवीत जा. मी स्वत:च त्यांजकडे जावयाचा; पण त्या वाड्यांत (शनवार पेठ तांबे वाडा) मी जाऊं लागलों म्हणजे शेंकडों विचार मनांत येऊन तेथील आमच्या वास्तव्याच्या पूर्वस्मृतीनें मनास थोडी अस्वस्थता उत्पन्न होते. आगरकरांचा तो आवाज मी तेथें ऐकत आहें, असें मला वाटतें! त्या आठवणी जितक्या आनंदाच्या तितक्याच अखेर दु:खदायक होतात, म्हणून मी जात नाहीं."

(२१) लोकमान्य विलायतेस जाण्याचे वेळीं सातारचे रा० नाना-साहेब आगाशे वकील, यांनीं एकदां त्यांस सहज हंसत विचारलें, 'आपण विलायतेस गेल्यावर पोषाख कोणता करणार?' लोकमान्य म्हणाले, "त्यांत विशेष तें काय आहे, देश तसा वेष! फक्त तो स्वदेशीय असला म्हणजे झालें. शिवाय तुम्ही हें लक्षांत ठेवा कीं, तेथें आम्ही येथीलप्रमाणेंच

पोषाख कायम ठेवला तर, ज्या कामाकरिता आम्ही तिकडे जात आहों, त्याकडे तेथील लोकांचें लक्ष वेधण्यापेक्षां आमचा पोषाख हाच नवलाचा व चर्चेचा एक विषय होऊन बसेल. तसें आम्हांस नको आहे. तथापि आम्ही आपला हेड-ड्रेस (डोक्याचा पोषाख—म्हणजे पगडी, टोपी, वगैरे) कायमच ठेवूं. पण मुख्य काम——इष्ट हेतु——साधण्याकरतां जो कांहीं स्वार्थत्याग करावा लागेल तो करणें, हाच आमचा धर्म आहे."

(२२) कुटुंबांतील कर्ता पुरुष जसा कुटुंबांतील आपल्या मंडळींविषयीं सदा दक्ष असतो तसा पुढारी हा आपल्या अनुयायांविषयीं सदैव दक्ष असलेलाच दिसून येईल. लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यावर पुन्हां कॉंग्रेसमध्यें शिरण्याचा लखनौ येथील पहिलाच प्रसंग होता. म्हणून आपल्या बरोबर ते बरीच मंडळी घेऊन गेले होते. ऐन थंडीचे दिवस होते. आणि त्यांत उत्तर हिंदुस्थानांतील ती थंडी. तेव्हां दक्षिणेंतून एकदम गेलेल्या लोकांना तिचें स्वरूप अत्यंत उग्र वाटल्यास नवल नाहीं. तेथें पोहोंचल्यावर दुसरे दिवशीं नित्याच्या संवयींप्रमाणें मी पहांटे उठून बहिर्विधीकरितां पाण्यानें भरलेली तपेली हातांत घेतली खरी; पण विंचवाच्या वेदनेप्रमाणें हाताची स्थिति झाली. पण निरुपाय होऊन तसाच पुढें गेलों. इतक्यांत कुटुंबांतील काळजीच्या मोठ्या माणसाप्रमाणें लोकमान्य उठून बाहेर आले; थंडी मी म्हणत होती; तरी त्यांनीं स्वतः हातानें रॉकेलचा कंदील लाविला व गच्चीच्या एका कोपऱ्यांत निजलेल्या भय्यास उठवून त्यास हिंदीत त्यांनीं सांगितलें कीं, 'आतांचे आतां उठून त्या मोठ्या बंबाखालीं विस्तव घालून सर्व पाणी तापवून ठेव. येथील सर्व पाहुणेलोकांस गरम पाणीच तूं पुरविलें पाहिजेस.' असें सांगून लोकमान्य परत आपले खोलींत निजण्यास गेले. भय्याशीं झालेलें त्यांचें हें बोलणें मी आंतून ऐकत होतों. कारण स्वारीचा आवाज अगोदरच फार लहान, तेव्हां तो कां ऐकूं येऊं नये! असो; मी बाहेर आल्यावर पाहातों तों भय्या न उठतां लेपांत आपला गुरगुटून पडलेला! पण हिंदी प्रान्तांत मी हा प्रथमच गेल्यामुळें त्यास मराठींतून सांगून काय कळणार? बरें, न बोलतां उठवून त्यास खुणेनें सांगावें, तर आमच्या भाषेच्या अज्ञानावरून तो आमची अगोदरच किंमत करणार! असा विचार मनांत येऊन त्या भानगडींत न पडतां केवळ

लोकमान्यांची आज्ञा-इच्छा म्हणून मीच बंब पेटविण्याच्या उद्योगास लागलों. खडबड खडबड सुरू झाल्यामुळें म्हणा, किंवा सांगितलेलें काम झालें कीं नाहीं, हें पाहण्याकरितां म्हणून म्हणा, लोकमान्यांची स्वारी पुन्हां बाहेर आली व पाहतात तों तेथें भय्या जागच्या जागीं निजलेला ! पुढें स्नानगृहा-पर्यंत ते आले तों तेथें मी थंडीनें कुडकुडत बंब पेटविण्याचा उद्योग करीत आहें, हें पाहून त्यांस नवल वाटलें. ते म्हणाले, "तुला हें कोणीं सांगितलें? तें काय करीत आहेस? इकडे ये व त्या भय्याच्या अंगावरून पांघरूण काढून त्यास हें करावयास सांग." असें म्हणून न थांबतां आपणच झपाट्यानें तिकडे गेले, व स्वतःच भय्याचे अंगावरून पांघरून ओढून घेऊन, त्यास रागानें जरा बोलून बरोबर घेऊन आले व पुन्हां त्यास काय करावयाचें तें सर्व सांगितलें. नंतर आम्ही दोघे गच्चीवर आलों. तेव्हां मला ते म्हणाले, "आपल्याबरोबर मंडळी आली आहेत त्यांच्या प्रकृतीस आपणांस जपलें पाहिजे. येथील थंडीचा इंगा त्यांना अजून माहीत नाहीं. जेवणाच्या कामाची वगैरे व्यवस्था इतर मंडळी करीत आहेतच. तूं फक्त रोज सर्व मंडळीस सर्व विधीकरितां गरम पाणी देण्याची व्यवस्था ठेव. आपणाबरोबर आलेल्या मंडळींची काळजी आपणासच घेतली पाहिजे. त्यांत कोणी जर आजारी पडला तर माझ्या कामावरील माझें तितकें लक्ष कमी होईल. तसेंच आमच्या दादासाहेबांचे (खापर्डे) येथें कांहीं कमी पडतां कामा नये, असें मंडळींस सांगून ठेव." आपल्या शिष्य मंडळींशीं श्रीसमर्थ कसें वागत, याचें वर्णन लोकमान्यांच्या वर्तनांत कसें प्रतिबिंबित झालेलें होतें, हें यावरून दिसून येईल. रामदास दासा सांभाळितो कैसा। जीव प्राणा जैसा तैसा पाहे।।

(२३) लोकमान्यांच्या अत्यंत परिचयाच्या गृहस्थाशीं आठवणी-संबंधानें मी सहज एकदां बोलत असतां, त्यांनीं एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "दादांच्या एका अतिमंद गतीच्या सब्‌जज्ज स्नेह्याकडे ते कांहीं दिवस विश्रांतीकरतां एकदां गेले होते. तेथें त्यांस समजलें कीं, आपल्या या स्नेह्याच्या अति शंकेखोर व कापूसपिंज्या स्वभावामुळें त्यांचीं अनेक जज्मेंटें लिहिण्याचीं तुंबलेलीं असल्याकारणानें वरून त्यांस त्याबद्दल थोडी समजहि मिळाली आहे. तेव्हां एके दिवशीं हंसत थट्टेनें लोकमान्य

आपल्या सदर स्नेह्यास म्हणाले, 'येथें राहून मीं तुमचें फुकट अन्न कां खावें? तुमच्या टेबलावरील मुकदम्याचीं तीं पुडकीं इकडे आणा पाहूं. असें म्हणून त्यांनीं ते कागद आपल्या खोलींत आणले, व ते सर्व वाचून तेथील आपल्या मुक्कामांत त्यांनीं त्यांचीं सर्व जजमेंटें लिहून ठेविलीं !!'

(२४) लोकमान्यांचे भाचे श्रीयुत बाबासाहेब विद्वांस हे एकदां म्हणाले, "स्वदेशाच्या करुणास्पद व केविलवाण्या स्थितीचें चिंतन करीत दादा कित्येक वेळां एकाग्रतेनें आराम-खुर्चीवर पडत. अशा वेळीं कामानिमित्त त्यांचे पुढून मी एकसारखा येई-जाई; पण त्यांचें मुळींच भानहि नसे. एकदां अशा स्थितींत विचार करतां करतां त्यांस काय वाटलें न कळे, ते एकदम खुर्चीवरून उठले व किंचित् सद्गदित झाल्यासारखे दिसून म्हणाले, 'क्षणभर परमेश्वरानें मला साक्षात् मोक्ष देतों म्हटलें तरी तो झिडकारून त्यास मी म्हणेन कीं, प्रथम पारतंत्र्यांतून सुटलेला माझा देश मला पाहावयाचा आहे. कारण वैयक्तिक मोक्ष झाला तरी तो उच्च कोटीचा पण पराकाष्ठेचा स्वार्थसाधुपणाच आहे !!"

(२५) लोकमान्यांचे भाचे विद्वांस यांचे बोलण्यांत एकदां एक सहज गोष्ट आली ती देतों. "दादा मंडालेहून सुटून आल्यावर एका चित्रकारानें कै० सौ० मामींचें एक मोठें चित्र—ऑईल पेंटिंग—करून आणलें. तें पाहून मी म्हणालों, 'वा किती छान हें चित्र काढलें आहे!' चटकन् दादा म्हणाले, 'पण चित्रकलेच्या दृष्टीनें तें यावें तसें आलें नाहीं' यावर मी म्हणालों, "मला तर हें अगदीं हुबेहूब मामींसारखेंच दिसत आहे" हें ऐकतांच जरा हास्यवदन करून पण किंचित् सद्गदित होऊन दादा म्हणाले, 'अरे, ती तुला अधिक माहीत कीं मला?' मामी हयात असेपर्यंत दादा प्रत्यक्ष आमचे देखतहि त्यांच्याशीं फारसें कधीं बोलत नसत; मग हा असला विनोद त्यांचे तोंडून कोठून येणार? म्हणून मामींच्यामागें कधीं न येणारे दादांच्या तोंडचे ते शब्द ऐकून माझेहि डोळे पाण्यानें भरून आले!"

(२६) सातारचे कै० राजे श्रीमंत आबासाहेब महाराज यांस विंचूरकर वाड्यांत लोकमान्यांनीं पानसुपारी केली. त्या समारंभाच्या गडबडींत श्रीमंतांच्या एका हुजऱ्यानें सर्वांचा डोळा चुकवून एक चांदीची

वाटी मोठ्या चपळाईनें गुपचुप खिशांत टाकली. तेथील सर्व लोकांत एकट्या लोकमान्यांचे नजरेस हें कसें आलें न कळे. स्वारी तेथून हलणार इतक्यांत ते हुजऱ्याजवळ गेले व हंसत विनोदानें त्यास म्हणाले, "तुमच्या यजमानांच्या–सरकारस्वारींच्या–छत्रपतीच्या हक्कावरोबरच तुमचाहि हा हक्क आतां गेला आहे ! उगाच खिसा जड करून कां घेतां ! " हें ऐकतांच चपापून त्या हुजऱ्यानें खिशांतून वाटी काढून परत दिली !

(२७) सन १८९१ मधील पुण्यांतील चहाबिस्कुट प्रकरणामुळें लोकमान्यांच्या घरचीं नित्यनैमित्तिक धार्मिक कृत्यें वैदिक ब्राह्मण कांहीं दिवस करीत नसत. अशा मुदतींत श्रावणीचे दिवस आले. लोकमान्यांचे भाचे बाबासाहेब विद्वांस यांस मोठी पंचाईत पडली. अजीबात श्रावणी न करणें, ही कल्पना बाबासाहेब यांस पटेना. व करावी तर उपाध्ये–ब्राह्मण मंडळी येईनात. तेव्हां काय करावें, या संकटांत ते पडले असतां, लोकमान्य त्यांस म्हणाले, " अरे, यांत काळजी करण्यासारखें काय आहे ? नेहमींप्रमाणें श्रावणीची सर्व तयारी कर. श्रावणी चालविण्यास बाळंभटच येणार आहेत." हे बाळंभट कोण, याची बाबासाहेब यांस कल्पना होईना. कारण सर्व भिक्षुक मंडळींतून फुटून राजरोस येणारे असे हे धैर्यवान् बाळंभट कोण ? याचा ते विचार करूं लागले. तेव्हां लोकमान्य म्हणाले, "असा पाहतोस काय ? बघ, उद्यां अगदीं तुझ्या नेमलेल्या वेळेवर पळी-पंचपात्री घेऊन बाळंभट येथें हजर आहेत. तूं आपली सर्व तयारी कर म्हणजे झालें." व त्याप्रमाणें दुसरे दिवशीं ठराविक वेळीं एका हातांत दर्भ, व दुसरे हातांत पळी-पंचपात्री घेऊन आंतून 'बाळंभट' (लोकमान्य) तेथे आले; व पोथीच्या साहाय्यानें या स्वावलंबी आणि करारी बाळंभटजींनीं सर्व श्रावणी यथासांग पार पाडली !

(२८) सदर बहिष्कृत मुदतींतच एकदां लोकमान्यांच्या वडिलांची कीं मातोश्रींची श्राद्धतिथी आली. त्या वेळींहि त्यांनीं अजीबात श्राद्ध न करण्याचें मनांत न आणतां भोजनास तयार असलेल्या एका सामान्य ब्राह्मणास खरी वस्तुस्थिति स्पष्ट सांगून व दुसऱ्या ब्राह्मणाबद्दल देवाचें पंचायतन ठेवून पोथीवरून त्यांनीं स्वतः चटावर श्राद्ध केलें !

(२१) लोकमान्यांचे बालस्नेही रा० ब० आण्णासाहेब देशपांडे पे० हु० डे० कलेक्टर यांजकडे मी पुन्हां गेलों असतां त्यांनीं सांगितलेल्या कांहीं आठवणींपैकीं फक्त दोन पुढें देत आहें. ते म्हणाले :—(१) "सरकारी ऑफिसांतून महत्त्वाच्या गुप्त बातम्या बळवंतरावांस कशा मिळत, याचें आम्हांस अजूनहि आश्चर्य वाटतें. एकदां एक राजकीय गुप्त सरक्युलर सरकारनें काढलें होतें. तें निघालें आहे, असें त्यास कळलें होतें; पण प्रत्यक्ष तें त्यांस मिळणें अशक्य होतें. पण पुढें पाहावें तों एके दिवशीं त्यांतील विधानाबद्दल ते जोरजोरानें बोलूं लागले. त्या वेळीं आम्ही पुणें येथें सिटी मॅजिस्ट्रेट असून बळवंतराव व मी एकाच वाड्यांत म्हणजे सरदार विंचूरकरांचे वाड्यांत राहात होतों. व टिळकांशीं आमचा स्नेह असल्याचें सरकारास पूर्ण माहीत असल्यामुळें सदर सरक्युलरांतील गुप्त मजकूर त्यांस आम्हींच कळविला अशी सरकारास जबरदस्त शंका आली. पण बळवंतरावांचा स्वभाव व त्यांचें शील सरकारास कसें कळणार ? मी त्यांचा इतका जिवलग स्नेही ना, पण त्यांनीं होऊन मला सरकारी बातमीविषयीं कधीं चुकूनहि कांहीं विचारलें नाहीं, व कधीं स्नेहीपणाचा भलताच फायदा घेतला नाहीं! पण हें कोणास खरेंहि वाटणार नाहीं. असो; सदर सरक्युलर त्यांस प्रत्यक्ष न मिळतां नुसत्या अनमानधबक्यानेंच स्वारी बोलत आहे, असें मला वाटलें. सरक्युलर मुळीं निघालेंच नाहीं, असें क्षणभर त्यांस मी मुद्दाम म्हणतांच, त्यांनीं त्या सरक्युलरची कॉपी आपल्या कपाटांतून काढून माझे हातांत ठेवली, तेव्हां मी अगदीं गार झालों!" (२) एकदां न्यायमूर्ति माधवरावजी रानडे यांस भेटण्यास मी त्यांचे घरीं गेलों होतों. त्या वेळीं रावबहादूर जठार हे तेथें होते. मला पाहतांच कपाळास आठ्या घालून ते माधवरावजींस म्हणाले, 'कालच्या केसरींत बळवंतरावांनीं तुम्हांस खूप शिव्या दिल्या आहेत.' त्यावर रावसाहेब म्हणाले, 'बळवंतरावांच्या मनगटांत सामर्थ्य आहे, म्हणूनच ते तसे लिहितात. सरकारशीं आम्ही कारणापेक्षांहि जास्त संबंध ठेवतों, हा खरोखर आमचाच कमकुवतपणा आहे; व याचाच त्यांना फार राग येतो. तो मनुष्य मर्द आहे. त्यास हें स्वाभाविकच आवडत नाहीं. तेव्हां त्यानें त्याबद्दल आम्हास नांवें ठेविल्यास—नव्हे मनापासून शिव्या दिल्यास

तें त्यांस शोभण्यासारखेंच आहे. अहो, दुसरा तरी असा मर्द व निर्भीड मनुष्य आपणांत कोण आहे ?"

(३०) १९०८ सालीं लोकमान्यांस मुंबई येथें सरदारगृहांत पकडून, पोलिस कचेरींत नेण्याकरितां सरदारगृहाचे खालीं पोलिसनें गाडी बोलावून आणली व त्यांतून त्यांस घेऊन गेले. त्या वेळीं तेथें जवळ असलेले विजापूरचे रा० रामचंद्र केशव भिडे यांचे सांगण्यांत पुढील गोष्ट आली. ते म्हणाले, "त्या वेळीं तो गाडीवाला बोलला, 'अशा प्रसंगीं टिळकमहाराज माझ्या गाडींत बसणार, हें गेल्या जन्मींचें माझें पुण्य कीं पाप ? त्यांना गाडींत घालून, सरकारच्या हवालीं करण्याचें माझ्या नशिबीं आलें खरें !' असें म्हणून तो व जवळची मंडळी गहिंवरून आली !"

(३१) श्री. नारायणराव कृष्ण देशपांडे तडवळेकर म्हणाले, "लोकमान्यांचा वाटेल त्यानें वाटेल तसा फायदा करून घेतलेला आहे. जो कायद्याचा सल्ला वकिलास पैसे देऊन सहज मिळावयाचा, तो कित्येकांनीं लोकमान्यांकडून फुकट घेतलेला आहे. इतकेंच नव्हे तर, उलट त्यांचे घरीं जाऊन वर पाहुणचाराची दक्षिणाहि त्यांनीं घेतलेली आहे. एकदां सोलापूर जिल्ह्यांतील एक गृहस्थ लोकमान्य सिंहगडास असता कायद्याचा सल्ला घेण्याकरितां तेथें गेले होते. त्यांचा व लोकमान्यांचा वस्तुतः कांहींहि संबंध ओळखपाळखहि नसतां, ते त्यांजकडेच उतरले. ते दिवाळीचे दिवस होते. सदर गृहस्थास लोकमान्यांनीं कायद्याचा बहुमोल सल्ला तर दिलाच, पण उलट त्यांनीं त्यांस तेथें राहून घेऊन घरच्या माणसाप्रमाणें त्यांचें अभ्यंग स्नान, फराळ, भोजन, खेळ, वगैरेंनीं आदरातिथ्य केल्याचें सदर गृहस्थ स्वतः आम्हांस सांगत होते !"

(३२) रा. ब. शंकर केशव साठे पे० डे० कलेक्टर पुणें, यांच्याशीं बोलण्याचा योग आला असतां ते म्हणाले, "न्यू इंग्लिश स्कूलच्या अगदीं पहिल्या अमदानींत प्रथम कांहीं काळ मी एक शिक्षक होतों. टिळक वगैरे मंडळींनीं नुकत्याच काढलेल्या फर्ग्युसन कॉलेजांतील ज्या प्रोफेसरांस एम्.ए.ची पदवी असेल तो अधिक विद्वान् व श्रेष्ठ असे कांहीं जणांस वाटूं लागले. म्हणून टिळकांनींहि एम्. ए. च्या अभ्यासास सुरुवात केली. त्यांचे जोडीदार

ढेकणे—हे ग्वाल्हेरचे सुभे होते—हे कांहीं विषयांत फार मागें असल्यामुळें, त्यांस टिळकांनीं शिकवून त्या त्या विषयांत तयार केलें. पण परीक्षेचे पेपर लिहिण्याच्या टिळकांच्या विलक्षण पद्धतीमुळें अखेर परीक्षेंत विद्यार्थी ढेकणे पास व गुरुजी टिळक नापास झाले ! तेव्हांपासून 'परीक्षा ती परीक्षा त्यांत अखेर साधेल तोच व्यवहारचतुर' असेंच टिळक म्हणत."

(३३) दिवाणबहादुर गोडबोले यांचे बोलण्यांत लोकमान्यांविषयीं कांहीं गोष्टी आल्या. त्यांपैकीं येथें फक्त एकच देत आहें. ते म्हणाले, "आमच्या कामानिमित्त मी पुणें जिल्ह्यांत हिंडत असतां घोडेगांवीं एकदां आमचा मुक्काम पडला. गांवकरी लोकांशीं बोलत असतां, त्या खेडवळ लोकांनीं टिळकांनीं स्वराज्यावर दिलेल्या व्याख्यानाची हकीगत मला सांगितली. ती ऐकून अशा लोकांची टिळकांनीं एवढ्या प्रचंड विषयाची अगदीं थोडक्यांत इतक्या उत्कृष्ट रीतीनें समजूत तरी कशी घातली, याचें मला आश्चर्य वाटलें. लोकांचीहि त्यांच्याविषयींची विलक्षण श्रद्धा मला पाहावयास मिळाली. त्या लोकांपैकीं कोणी म्हणाले, कुठल्याशा त्या ब्रह्मदेवाच्या देशांतून (बर्मा) आपल्या देशास येण्याची टिळकमहाराजांना इच्छा होतांच तुरुंगाचें कुलूप एकदम खाडकन् खालीं गळून पडलें व मग टिळकमहाराज इकडे आपल्या देशांत आले !"

(३४) लोकमान्य कर्मठ नसले व ते कितीहि तार्किक, बुद्धिवादी व केवळ प्रयत्नवादीच असले तरी त्यांचें मन व अंतःकरण श्रद्धाविहीन होतें, असें म्हणणें अयुक्त होईल. यास पुरावा म्हणून पुणें येथील प्रसिद्ध 'लोहदेही' भाऊसाहेब गोखले यांच्या सांगण्यांत आलेल्या किती तरी गोष्टी देतां येतील. पण त्या सर्व एकाच स्वरूपाच्या म्हणून त्यांचा संक्षेप करून त्यांपैकीं फक्त एकदोनच येथें देतों. (१) सन १८९६-९७ सालीं पुण्यांत प्लेगचा कहर उडाला. लोकमान्य प्रयत्नवादी तर खरेच; त्याप्रमाणें त्यांनीं सदर बाबतींत लौकिक अशा अनेक आधुनिक मार्गांचा अवलंब केला. पण त्याबरोबरच, भाऊसाहेब म्हणतात, "त्या परोपकारी व दयेनें थबथबलेल्या अंतःकरणाच्या पुरुषानें दैविक उपाय योजण्यासहि कमी केलें नाहीं. त्यांनीं मला एकदां एका बाजूस घेऊन सांगितलें कीं, 'या आधिदैविक संकटाच्या

निवारणार्थ ग्रामदेवता श्रीजोगेश्वरीलाहि मला अभिषेक करणें आहे. त्याची सर्व व्यवस्था तुम्ही करा; व लागेल तो खर्च मागून घ्या." (२) तसेंच १९०८ सालीं लोकमान्यांस मुंबईस पकडल्यावर, भाऊसाहेब म्हणाले, "आम्ही सर्व हतबल झालों. या वेळीं आम्हीं काय करावें, असें लोकमान्यांस विचारलें असतां तशा त्या बिकट स्थितींतूनहि येथील मंडळींस त्यांचें पत्र आलें कीं, 'मी चालविलेला मार्ग पुढें चालू ठेवा; त्यांत चूक होऊं देऊं नका; व सर्वांस सद्‌बुद्धि देण्याबद्दल श्रीओंकारेश्वरास रुद्राभिषेक करा.' त्याप्रमाणें लोकमान्यांस शिक्षा होईपर्यंत आम्ही श्रीओंकारेश्वरास अखंड रुद्राभिषेक चालवून श्रींचा तीर्थप्रसाद व अंगारा रोजच्या रोज मेलगाडीनें रा. कृष्णाजी मोरेश्वर फाटक वकील, मुंबईस घेऊन जात; व लोकमान्य त्याचा भक्तिपूर्वक स्वीकार करीत."

(३५) व्यंकटेश बापूजी केतकर या लोकमान्यांच्या प्रसिद्ध ज्योतिषी स्नेह्याकडे आठवणीकरितां मी गेलों असतां त्यांनीं मोठ्या सहानुभूतीनें माझेशीं बहुत वेळ संभाषण केलें! व लोकमान्यांच्या थोर गुणांविषयीं बारीकसारीक अशा कांहीं गोष्टी सांगितल्या. पैकीं एकच येथें देतों. केतकर म्हणाले, "आमच्या घरीं आमच्या नातवाचें लग्न होतें. त्याची छापील आमंत्रणपत्रिका अनेक लोकांस पाठविण्यांत आली; त्यांत एक सहज बळवंतरावजींसहि पाठविली गेली. आमंत्रणपत्रिका पाठविल्या दिवसापासून लग्नदिवस बराच दूर होता. पण सदर दिवस त्यांनीं नेमका लक्षांत ठेवून व लग्नघर—व्याह्यांचें घर—ठाऊक नसतांहि शोध करीत करीत घर धुंडीत अखेर स्वारीं पानसुपारीस येण्यास चुकली नाहीं!"

(३६) लोकमान्यांचे बालमित्र रावसाहेब श्रीधर बाळकृष्ण उपासनी यांचा व लोकमान्यांचा विशिष्ट प्रकारचा स्नेहसंबंध असल्यामुळें व तो शेवटपर्यंत तसाच टिकल्यामुळें त्यांजकडून आठवणी मिळविण्याबद्दल मीं आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली. परंतु प्रत्यक्ष त्यांचे हातून मजकूर लिहून मिळणें आतां अशक्य आहे, असें दिसून आल्यानंतर त्यांच्या सहज बोलण्यांत आलेल्या कांहीं किरकोळ गोष्टींवरच आतां निरुपायास्तव समाधान मानून घेणें भाग आहे. ते म्हणाले, "बौद्धिक गुणांत बळवंतराव

आमच्या सर्वांत फार श्रेष्ठ होते. कांहीं मित्रमंडळी त्यांस 'हा कठोर आहे,' असें म्हणत; पण ज्यांस त्यांचा पुरा स्वभाव माहीत झाला होता, त्यांस ते फणसासारखे आहेत असेंच शेवटीं वाटे. यांची अभ्यासाची रीत अगदीं वेगळी असे. कोणत्याहि विषयाच्या अगदीं खोल मुळांत जाऊन ते त्याचा विचार करीत. १९०८ सालच्या खटल्यांत काय, किंवा वेळोवेळीं उत्पन्न झालेल्या प्रश्नांत काय, त्यांचें जें ज्ञान व तेज दिसून आलें त्याचा उगम एल्एल्. बी. चा अभ्यास करण्याच्या वेळेपासून झालेला होता. समर्थ व शिवाजी ह्या जशा दोन स्वतंत्र शक्ती अगर स्फूर्ती राष्ट्रांत एकाच वेळीं निर्माण झाल्या, तद्वत् चिपळूणकर व टिळक होत असें मी व माझी मित्र-मंडळी नेहमीं म्हणत असे. बळवंतरावांच्या मनाची उत्क्रांति कसकशी होत गेली, हा तरुणांचा मोठा अभ्यास करण्यासारखा विषय आहे; पण यास मुख्य कारण त्यांचें भगवद्गीतेचें चिंतन होय. अशी माझी खात्री झाली आहे सरकारसंबंधीं त्यांनीं कडक भाषणें केलीं म्हणजे मीं त्यांस म्हणावें, 'हें असें पचणार कसें ?' तेव्हां ते म्हणत, 'हें आमचें उंटाचें पिलूं एकदां आंत शिरकलें आहे, यांतच आतां आमचा सोक्षमोक्ष–अंत व्हावयाचा !' मंडालेहून सुटून आल्यावर मी त्यांस एकदां कळवळून म्हणालों, 'बळवंतराव, आतां हें बस्स झालें बुवा. राजकारणच सोडून द्या. आम्हीं नाहीं कां पेन्शन घेतलें ! तसेंच आतां तुम्हीहि करा.' तेव्हां ते म्हणाले, "सोडणें, धरणें, आणि चालू ठेवणें ह्या क्रियांत मला आतां कांहीं अंतरच कळत नाहीं. कर्म करितां करितां मरण येणें एवढेंच मला आतां कळतें; व हीच स्वर्गप्राप्ति आहे, होय कीं नाहीं ?"

(३७) जुन्नरचे रा० रामचंद्र मार्तंड खत्री यांनी लोकमान्यांच्या बारीकसारीक अशा बऱ्याच आठवणी मला सांगितल्या. त्यांपैकीं कांहींचा पुढें निर्देश करतों. (१) ते म्हणाले, "जुन्नरास लोकमान्यांस आणण्याबद्दल गांवकऱ्यांची किती तरी दिवसांपासूनची इच्छा होती. अखेर १९०४ सालीं प्रथम हा योग जुळून आला. त्या वेळीं त्यांचें तेथें अपूर्व स्वागत झालें. मिरवणूक चालू असतां एका खिडकींतून मामलेदार साहेबांनीं मुद्दाम बोडक्यानें आपल्या सरकारी गुरमीच्या ऐटींत लोकमान्यांस नुसती मान हालवून ताठ्यानें नमस्कार केला. पण लोकमान्यांनीं त्यांस अशा विलक्षण रीतीनें उलट

नमस्कार केला व त्यांजकडे पाहून हास्य केलें कीं, त्याचा विलक्षण परिणाम मामलेदार साहेबांवर होऊन अखेर ते त्यांस तेथें एकांतीं भेटावयास येऊन 'मीं आपला उपमर्द केला' असें म्हणून त्यांनीं दिलगिरी प्रदर्शित केली!" (२) मामलेदारसाहेब परत गेल्यावर जवळच्या मंडळीजवळ लोकमान्य म्हणाले, 'मला जुन्नरहून एका एल्एल्. बी. चें पत्र आलें होतें कीं, तुम्ही येथें येऊं नका. तुमचा येथें मान राहणार नाहीं, हा सर्व पोरासोरांचा उद्योग आहे.' हें वाचून तर जुन्नरास जरूर जावयाचें असें मीं ठरविलें आणि त्याप्रमाणें येथें येतांच मघाशीं सदर एल्एल्. बी. नें त्याबद्दल माझेकडे क्षमेचें पत्र पाठविलें. पण मला हीं दोन्ही सारखींच आहेत. (३) मिरवणूक शेट रामलाल खत्री यांचे दारापुढें आली असतां या व्यापाऱ्यानें लोकमान्यांवर खरीं मोतीं पोवळीं उधळलीं. तो देखावा काय वर्णन करावा! (४) मिरवणूक जरा पुढें जातांच एक वृद्ध मुसलमान गृहस्थ आपल्या डोळ्यांतील आनंदाश्रु पुशीत पुशीत पुढें आले आणि 'जैसा तुमारा नाम सुना ऐसाहि तुमकु देखके बहोत आनंद हुवा' असें लोकमान्यांस म्हणून गर्दीत भर रस्त्यावर त्यांनीं गुडघे टेकून लोकमान्यांस कुर्निसात केला! (५) लोकमान्य जेथें उतरले होते तेथून गर्दीतून कोणी त्यांचा जोडा चोरून नेला. पण नेहमींच्या नीच चोरीप्रमाणें ही चोरी केली नसून पूजेकरितां आपण त्यांच्या ह्या पादुका चोरून आणिल्या आहेत व त्याबद्दल अडीच रुपये आपण त्या ओटीवरील कोनाड्यांत पुडी करून ठेविले आहेत असें दुसरे दिवशीं टपालानें आलेलें पत्र लोकमान्यांचे हातांत देण्यांत आलें! (६) सदर मुक्कामांत लोकमान्य शिवनेरी किल्ला पाहण्यास गेले होते. गड चढतां चढतां वाटेंत जरा थांबून मागें वळून बरोबर असलेले मार्तंडराव खत्री यांस लोकमान्य म्हणतात, 'काहो? महिनापंधरा दिवस लढविण्यासारखा हा किल्ला आहे, नाहीं? पण आपल्या हयातींत आतां असले दिवस कसले येतात!' (७) यानंतर १९१७ सालच्या जिल्हासभेच्या अधिवेशनाकरतां लोकमान्य जुन्नरास आले होते. त्या वेळीं तेथील त्यांचे जुने व वृद्ध मित्र मार्तंडराव खत्री यांजकडे उतरण्याचें प्रथम त्यांनीं ठरविलें होतें; पण मधल्यामध्यें टिळकभक्त रघुनाथराव जोशी व सावरकर, जोगळेकर यांनीं त्यांस आपल्या वाड्यांत नेलें. हें पाहून मार्तंडराव यांस वाईट वाटलें. व न जाणो ते व लोकमान्य

समवयस्क असल्यामुळें त्यांस मार्तंडराव कदाचित् आपले घरीं घेऊन जातील म्हणून वाड्याच्या त्या टिळकभक्त मालकांनीं वाड्याचे पुढील दरवाज्यास भलें मोठें कुलुपहि लावून टाकलें ! हें प्रकरण लोकमान्यांच्या कानावर गेलें. तेव्हां ते म्हणाले, ' मी कॉम्प्रमाईजवाला आहें. म्हणून आतां असें करतों कीं, मार्तंडरावांचे घरीं जेवावें व या वाड्यांत निजावें, मग तर झालें ना ! '

(३८) लोकमान्यांचें टाइपरायटिंगचें काम रा० दत्तात्रय वामन भाटवडेकर करीत असत. भाटवडेकर म्हणाले, (१) " चिरोल केसचे बावतींत लोकमान्यांचें मीं टाइपरायटिंगचें पुष्कळच काम केलें. त्या वेळीं ते फर्ग्युसन कॉलेजकडे लिमये यांच्या बंगल्यांत राहात होते. तेथें ज्या ठिकाणीं टाइपरायटरचें यंत्र ठेविलें होतें, तेथें यंत्रावर चांगला प्रकाश पडेना यामुळें काम भराभर होण्यास जरा पंचाईत पडे. पण ही गोष्ट लोकमान्यांचे लक्षांत कशी आली असावी, याचें मला अजूनहि आश्चर्य वाटतें. कारण ते एकीकडे तोंडानें मजकूर सांगण्यांत गुंतले असतांहि हातानें तेथेंच दुसऱ्या खिडकीजवळ मोठमोठीं जड खोकीं एकमेकांवर ठेवण्याचा उद्योग करीत होते. तें काम यथास्थित झाल्यावर ते मला म्हणाले, ' त्या ठिकाणीं प्रकाश उलटा पडत आहे. त्यामुळें यंत्राचीं अक्षरें चकाकतात व तुमचें काम झपाझप होत नाहीं. आपले येथें या बंगल्यांत तर दुसरें टेबल नाहीं. तेव्हां तुमचें यंत्र या मीं बनविलेल्या टेबलावर ठेवा; म्हणजे काम सुरळीत चालेल ! ' हें ऐकून मी चकित झालों. इतक्या बारीक गोष्टी यांच्या लक्षांत आल्या कशा व सर्व अवधान ठेवून हें यांनीं केलें कसें, याचें मला अजूनहि नवल वाटत आहे. (२) लोकमान्यांच्या विलक्षण स्मरणशक्तीच्या अनेक गोष्टींचा मला त्या वेळीं अनुभव आला. टाइपरायटिंगचेकरितां ते तोंडानें मजकूर सांगत असतां, जवळ नसतांहि शेकडों पुस्तकांतील व मराठा वगैरे पत्रांतील महत्त्वाचे उल्लेख ते भराभर सांगत; व पाठीमागून म्हणत कीं, भट (विष्णुपंत भट, त्या वेळचे मराठ्याचे संपादक) येथें आल्यावर त्यांस हे उल्लेख बरोबर असल्याबद्दल पाहण्यास सांगा व चमत्कार असा होई कीं, भटांनीं तीं तीं पुस्तकें व फायली काढून पाहाव्या तों त्यांत नेमके उल्लेख असलेले आढळून येत ! (३) सदरहू बंगल्यांत दोन प्रहरीं टाईपरायटिंग-

करितां मीं गेलों असतां लोकमान्यांस झोंप लागली होती. त्यांजकडे पाहून 'या शरीरास जरा विश्रांति मिळू दे' असें म्हणून मी अगदीं हलक्या पावलानें तेथून दुसरीकडे गेलों. पुढें कांहीं वेळानें ते जागे झाल्यावर मी त्यांजकडे येऊन गेलों हें कळल्यावरून, मी त्यांजकडे पुन्हां जातांच ते म्हणाले, 'अहो, अज्ञानाची बहीण झोंप, हिच्या संगतींत तुम्ही मला टाकून जावें, हें तुम्ही मोठें पाप केलेंत! पाय न वाजवितां चोरासारखे मजकडे तुम्ही कां आलांत? दरवडेखोराप्रमाणें तुम्ही यावयास पाहिजे होतें!! (४) लोकमान्यांस कोणती गोष्ट व तीहि पूर्णत्वानें माहीत नव्हती असें म्हणणें कठीण आहे. य:कश्चित् टाइपरायटिंग यंत्र व त्यावरील काम ना, पण त्यांना या बाबतींतील सर्व कांहीं मर्म माहीत होतें; इतकेंच नव्हे तर पंधरा पंधरा वर्षें हा एकच धंदा करणाऱ्या आम्हांस त्यांनीं या बाबतींत आमच्या लक्षांत पूर्वीं न आलेल्या अशा किती तरी उपयुक्त व नवीन कल्पना सुचविल्या!"

(३९) नागपूरचे श्रीयुत धुंडिराजपंत ठेंगडी इंजिनियर हे राष्ट्रीय पक्षाचे कट्टे अभिमानी असल्याचें मला माहीत असल्यामुळें मी त्यांजकडे लोकमान्यांच्या आठवणी मागण्यास गेलों होतों. तेव्हां ते म्हणाले, (१) "जन्मभर लक्षांत राहील अशी फक्त टिळकांची एकच आठवण मला माहीत आहे. कारण तिचा मनावर विलक्षण परिणाम झाला असून माझ्या राष्ट्रीय विचारसरणीस त्यामुळें निराळें वळण लागलेलें आहे. १९०५ सालची ती गोष्ट असावी. देशांत स्वदेशी चळवळीस नुकताच प्रारंभ झालेला होता. व बळवंतरावजींनीं तिचा विलक्षण रीतीनें पुरस्कार चालविला होता. मी युरोप वगैरे देशांतून जाऊन आल्यामुळे व आमचें अर्थशास्त्राचें ज्ञान केवळ पुस्तकी विद्येपलीकडे न गेलें असल्यामुळें मला देशांतील या 'स्वदेशी'चा अर्थच कळत नसे. अर्थशास्त्राच्या दृष्टीनें 'स्वदेशी' हा विषय अखेर जगांतील मानवजातीच्या अपकर्षास कारणीभूत होणारा आहे, असेंच वाटे. म्हणून मीं एकदां लोकमान्यांकडे गेलों व त्यांस खसखशीत विचारलें कीं, या चळवळीनें आपण मानवजातीच्या उत्कर्षास विघ्न आणीत आहांत. खुल्या व्यापाराचें तत्त्व आपणांस मान्य असूं नये, हा चमत्कार आहे! कोणत्या दृष्टीनें आपण 'स्वदेशीस' उचलून धरतां? हें ऐकून लोकमान्य हंसले. व

माझी समजूत घालण्याच्या हेतूनें गंभीर मुद्रेनें व शांतपणें म्हणाले, हो, तुम्ही म्हणतां तें अगदीं बरोबर आहे. सर्व मानवजातीच्या दृष्टीनें विचार कराल तेव्हां तुमचेंच म्हणणें खरें आहे. पण आज प्रथम आपणास आपल्या देशापुरताच विचार करावयाचा आहे ना ? शरीराच्या एकाच अवयवांतून रक्तस्राव होत असल्यास, बाकीच्या सर्व अवयवांकडे दुर्लक्ष करून प्रथम लक्ष याच अवयवाकडे द्यावें लागतें हें तुम्हास कबूल आहे ना ? त्याच-प्रमाणें सरकारनें नामशेष केलेल्या व धुळीस मिळविलेल्या आपल्या देशांतील उद्योगधंद्यांचें प्रथम संरक्षण करून, त्यांस उत्तेजन देऊन, नंतर त्यांची भरभराट झाल्यावर मग तुम्ही म्हणतां त्या तत्त्वज्ञानास प्रारंभ होतो. एरवीं हा वेदान्त खोटा आहे व म्हणूनच स्वदेशी चळवळ केल्या-खेरीज गत्यंतर नाहीं. लोकमान्यांच्या या उपदेशानें माझी पूर्ण समजूत पटली व तेव्हांपासून शरीरानें व मनानें मी पूर्ण 'स्वदेशी' बनलों !"
(२) "१९०७ सालीं सरदारगृहांत लोकमान्यांस पकडण्यांत आलें त्या वेळीं मी (ठेंगडी) तेथेंच होतों. जिना उतरून पोलिसांच्या गाडींत बसण्याकरितां लोकमान्य खालीं जाऊं लागले तेव्हां सभोंवतालच्या सर्व लोकांचे डोळे टप् टप् अश्रू ढाळूं लागले. तेव्हां लोकमान्य म्हणाले, "तुम्ही जोंपर्यंत असे बायांसारखे नुसते रडतां, तोंपर्यंत आम्हांस असेंच निमूटपणें तुरुंगांत जात राहिलें पाहिजे !"

(४०) लोकमान्यांच्या श्मश्रूकारानें आपली एक आठवण सांगितली. तो म्हणाला, "एकदां दादा श्मश्रू करवीत असतां, वासूकाका तेथें आले. इकडील तिकडील त्यांच्या मौजेच्या गप्पा झाल्यावर, वासूकाका लोकमान्यांस म्हणाले, 'आत्तांच मी × × × यांचेकडून जाऊन आलों. त्यांची मी आपल्याकडून, तुम्ही सांगितल्याप्रमाणें पुष्कळ समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण ते कांहीं ऐकेनात. तेव्हां अखेर मग मी भीडमुर्वत न धरतां, त्यांची चांगली उलटीसुलटी केली !' लोकमान्य हंसत म्हणाले, "हा जशी आमची आतां करतो आहे तशीच कीं नाहीं !"

(४१) वरिष्ठ दर्जाच्या एका सरकारी नोकरानें आपली लोकमान्यां-विषयीं एक आठवण सांगितली. ती पुढें देत आहें. "सन १८९१ सालचे

खानेसुमारीचे वेळीं सरकारनें पुणें शहरांतील बऱ्याच सरकारी नोकरांकडे कांहीं छापील प्रश्न काढून त्यांचीं उत्तरें देण्याकरितां ते पाठविण्यांत आले होते. त्यांत आमच्याकडे चित्पावन ब्राह्मणांची उत्पत्ति, त्यांच्या देव-देवता, त्या देवतेस आवडणारीं फुलें व प्रत्येक वारासंबंधीं माहिती याबद्दलचे प्रश्न आले होते. आम्ही सदर विषयासंबंधानें ग्रंथांतरीची माहिती मिळविण्याकरितां येथील आनंदाश्रमांतील ग्रंथसंग्रह व विद्वान् शास्त्री, तसेंच गांवांतील इतर शास्त्री व नवीन तऱ्हेनें शिकलेल्या पदवीधरांकडे गेलों. परंतु कोणाकडूनहि समाधानकारक माहिती मिळेना. म्हणून अखेर आम्ही टिळकांकडे जाऊन प्रयत्न करून पाहावा, असें म्हणून त्यांजकडे गेलों. या वेळीं ते त्यांजकडे आलेल्या एका खेडवळ माणसाची यशस्वी शेतकीसंबंधानें समजूत पाडण्यांत गढून गेले होते. तथापि त्यांनीं आमचें सर्व म्हणणें शांतपणें ऐकून घेतलें व चटकन् उठून आंतील खोलींत जाऊन हिंदुधर्मशास्त्राचीं तीन-चार इंग्रजी पुस्तकें आणिलीं व सांगितलें कीं, यांत तुमच्या सर्व प्रश्नांचीं उत्तरें आहेत. चित्पावनांची उत्पत्ति याची माहिती काशीखंड पुस्तकाच्या पांचव्या अध्यायांत तुम्हांस सांपडेल. तें पुस्तक पुणें शहरांत कोठेंहि मिळणार नाहीं फक्त डॉ० भांडारकर यांचे लायब्ररींत एक प्रत आहे. त्यांत तुम्हांस पाहिजे आहे ती माहिती सांपडेल. वरील सर्व ग्रंथ आम्हीं घरीं आणिले व वाचून पाहिल्यानंतर त्यांत सर्व प्रश्नांचीं उत्तरें अगदीं बरोबर टिळकांनीं सांगितलेल्या सारखीं सांपडलीं!! टिळकांची अलौकिक बुद्धिमत्ता व त्यांच्या एकदां नजरेखालून गेलेल्या गोष्टींचें कधींहि न होणारें विस्मरण याबद्दल आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाहीं."

(४२) हल्लीं सरकारी नोकरींत असलेल्या पण न्यू इंग्लिश स्कूलमध्यें टिळक यांचे हाताखालीं शिकलेल्या एका सद्‌गृहस्थानें पुढील आठवण सांगितली. "इ० स० १८८३–८४ सालीं श्रीमंत गायकवाड सरकारांनीं न्यू इंग्लिश स्कूलला भेट दिल्यानंतर विद्यार्थ्यांस खाऊकरितां म्हणून त्यांनीं कांहीं रक्कम दिली होती. त्याप्रमाणें शाळेंतील सर्व मुलांस हिराबागेंत एके दिवशीं दुपारीं बोलाविलें होतें. तेथें सर्व मुलें व शिक्षक मंडळी जमल्यावर, मुलांस केळीं, संत्रीं, पेरू, बोरें देण्यास आरंभ केल्यावर आपणास अगोदर मिळावें

या इच्छेनें मुलें पुढें घुसावयास लागलीं; त्यामुळें लहानलहान मुलें चेंगरू लागलीं. या मुलांत इंग्रजी सहाव्या इयत्तेंतील कांहीं प्रौढवयाचीं मुलें होतीं. त्यांस टिळक, धारप वगैरे मास्तर मंडळींनीं पाहिल्यावर म्हटलें 'तुम्ही मोठीं मुलें आहांत, लहान मुलांस अगोदर येऊं द्या, तुम्ही सर्वांचे मागाहून आलां तर बरें पडेल.' एवढें म्हणतांच तीं मुलें कांहींशा अभिमानानें तेथून निघून दूर विहिरीचे कांठीं जाऊन बसलीं. सर्व मुलांस खाऊ मिळाल्यावर तीं घरीं गेलीं; पण हीं मुलें तेथेंच बसलीं होतीं. त्यांस धारप मास्तर यांनीं स्वत: बोलाविलें व विचारलें कीं, 'तुम्ही येथें अजून कां बसलां आहांत, व तुम्हांस खाऊ वगैरे कांहीं मिळाला नाहीं काय?' तेव्हां मुलांनीं वस्तुस्थिति त्यांचे नजरेस आणली. म्हणून त्यांनीं त्यास उरलेले पदार्थ देण्याची तजवीज केली. पण त्यांपैकीं चांगले जिन्नस सरल्या कारणानें राहिलेले गाळ जिन्नस मुलें घेईनात. तेव्हां ही तक्रार टिळकांचे कानावर गेली. ते बंगल्यांतून बाहेर आले व मुलांस म्हणाले, 'तुम्हांस सर्व जिन्नस देतां येत नाहींत खरें. कारण सर्व संपले आहेत. तथापि त्या पुष्कळ पदार्थांबद्दल तुम्हास दुसरा चांगला एक जिन्नस दिला म्हणजे झालें कीं नाहीं?' मुलांनीं होय म्हणतांच, त्यांनीं शिपायास बंगल्यांत असलेलीं पेढेबर्फीचीं ताटें आणून मुलांचे पुढें ठेवण्यास सांगितलीं. हें टिळकांचें बोलणें वामनराव आपट्यांनीं ऐकतांच ते म्हणाले, 'अहो, बळवंतराव, हें काय करतां? मुलांपुढें ताटें ठेवूं नका. प्रत्येक मुलास फक्त दोन दोन पेढे व एक एक बर्फीची वडी द्या म्हणजे झालें.' रा० आपटे हे सुपरिंटेंडेंट असल्यानें, टिळकांच्या शिस्तप्रियतेमुळें, त्यांचे हुकूमाची येथें बजावणी झाली. परंतु टिळकांस ही गोष्ट न आवडून त्यांनीं आपटे यांस न कळत, आपल्या जवळचे पैसे शिपायाजवळ देऊन नवीन मिठाई आणिली आणि ती वांटून घेण्यास मुलांस परस्पर सांगितलें! मुलें टिळक मास्तरांच्या मनाचा मोठेपणा, औदार्य व शिस्त यांची स्तुति करीत घरीं गेलीं."

(४३) एका जबाबदार सरकारी नोकरानें लोकमान्यांची पुढील आठवण सांगितली—"गायकवाडवाड्याबद्दलचा दस्त रजिस्टर केलेला नाहीं. गायकवाडसरकारकडून एक आण्याच्या पावतीचें तिकीट लावून

घेतलेली पावतीच लोकमान्यांनीं रजिस्टर करण्यास दिली. स्टँप वांचविण्याची ही युक्ति आहे, तेव्हां एक आण्याची पावती रजिस्टर करावी कीं नाहीं, अशी शंका रजिस्ट्रार साहेबांस आल्यामुळें त्यांनीं सदर बाब वरिष्ठांकडे पाठविली. सरकारच्या तज्ज्ञांनीं वाटाघाट करून असें ठरविलें कीं, जरी स्टँप वांचविण्याकरितां ही युक्ती लढविण्यांत आली आहे, तरी सदर पावती रजिस्टर करण्याचें नाकारण्यास कायदेशीर आधार नाहीं. यामुळें पावती रजिस्टर करणें भाग आहे. अखेरीस ही पावती रजिस्टर करण्यांत आली. गायकवाडवाडा लोकमान्यांचा झाल्याबद्दल सरकारास फक्त एक आणा देऊन लोकमान्यांनीं हें कार्य करून घेतलें ! "

(४४) पुणें येथें हुंडीवाले साठे यांचें घराणें सुप्रसिद्धच आहे. लीं शंभर वर्षें पुणें येथें त्यांची पेढी चालत आली होती. परंतु कालक्राच्या दुर्निवार्य भोंवऱ्यांत ती सांपडल्यामुळें तिचे शेवटचे पुरुष कै० नरसो शीनाथ साठे हे त्या बावतींत कांहीं संकटांत आहेत असें लोकमान्यांस ठतांच जुन्या धंद्याच्या बचावाकरितां व एका घराण्याच्या दानतीच्या णाकरितां, लोकमान्यांनीं आपले मित्र रा० वासूकाका जोशी " यांचे ंत रा० नरसोपंत साठे यांस निरोप पाठविला कीं, तुम्हांस अशा ा मदतीच्या फुलाच्या पाकळीनें कांहीं उपयोग होऊन तुमचें बस्तान रत असेल तर मग काय वाटेल तें करून तुम्हांस मी पंचवीस र रुपये देण्यास तयार आहें ! परंतु साठे यांच्या फाटलेल्या पेढीच्या ंकाशास या लहानशा ठिगळाचा फारसा उपयोग होणार नसल्यामुळें, त्यांनीं कृतज्ञबुद्धीनें लोकमान्यांस नकारात्मक कळविलें; पण या गोष्टीचा नरसोपंतांचे मनावर कायमचा कसा विलक्षण परिणाम झाला होता, हें आपल्या उतार वयांत, त्यांनीं लोकमान्यांस पाठविलेल्या एका पत्राची नक्कल खालीं देत आहें, त्यावरून कळून येईल.

॥ श्री ॥ पुणें नारायण पेठ.

तारीख २ जानेवारी १९२०.

श्रीमंत लोकमान्य बळवंतरावजी दादा टिळक स्वामींचे सेवेशी :—
शिरसाष्टांग नमस्कार, विज्ञापना; आतांपावेतों आपले कृपेंकरून क्षेम आहों.

माझी प्रकृति अलीकडे सहा महिने ताप येऊन फार अशक्त झाली आहे. केव्हां काय होईल ह्याचा नेम नाहीं. शक्ति बिलकुल नाहीं.

कांहीं रोजांपूर्वीं आपले वाड्यांत येऊन समक्ष मजकूर कळविलाच आहे. हल्लीं प्रकृतीस हवा पालटण्यासाठीं मी नीरा कॅनॉलवर आप्तांकडे राहण्यास जात आहें.

प्रकृतीमुळें देहावसान केव्हां होईल याचा नेम नाहीं, असें आतां माझे मनास वाटूं लागलें आहे. यासाठीं देहावसान झाल्यास माझे मागें माझ्या बंधूंवर कृपा करून आमचे घराण्याचा बचाव आपण करालच. हैं चिठ्ठी लिहून ठेवण्याचें कारण कदाचित् देहावसानाची वेळ आल्यास सुखानें प्राणोत्क्रमण व्हावें.

आमचें घर जावें आणि तें मिळविण्याविषयीं बहुत लोकांची इच्छा माझ्या दृष्टीस पडली. तेव्हां मीं त्यांस सांगितलें कीं, 'माझ्या बापाप्रमाणें हो, जे परमेश्वरी अवतारी पुरुष विलायतेस गेले आहेत ते परत आल्यास तुम्हांस घर कसें जातें तें दाखवितों.' अशा दमावर आजपावेतों जसा, धरला. आपली गांठ पडून सर्व बोलणें होऊन निर्धास्त झालों आहे. आतां केव्हांहि मरण आलें तरी आपलें स्मरण करून निष्काळजीपणानें प्राण सोडीन. प्रत्यक्ष चालता बोलता देव आमच्या हुंडीवाले घराण्यास भेटला ही त्यांच्या बापाची पुण्याईच. आपणहि माझे बाप आहांत, ही विज्ञापना.

(सही):—**नरसो काशीनाथ साठचे.**

सदरहू आठवण कै० नरसो काशीनाथ साठचे यांचे विद्यमान वयोवृद्ध बंधु श्रीयुत गोविंदराव काशीनाथ साठचे यांनीं अगत्यपूर्वक मला सांगितली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

# लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

## खंड २ रा यांतील

# श्री. बापटांचें अभिनंदन

लेखक : श्री. नरसिंह चिंतामण केळकर

लोकमान्य टिळकांच्या 'आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाच्या पहिल्या खंडाची प्रस्तावना लिहिण्याचें काम मजकडे आलें होतें. हल्लींच्या या दुसऱ्या खंडाची प्रस्तावना लिहिण्याचें काम माझे मित्र श्री. माधवरावजी अणे यांनीं पत्करल्यामुळें मी त्यांतून मोकळा झालों आहें. तथापि दुसरा खंड प्रसिद्ध होऊन हा ग्रंथ पुरा झाला, याबद्दल मला जो आनंद होतो तो व्यक्त करण्याकरितांच या दोन ओळी लिहीत आहें.

हा ग्रंथ पुरा करण्याला श्रीयुत बापट यांना जे अचाट परिश्रम करावे लागले त्याची कल्पना त्यांच्या 'आत्मनिवेदना'नें वाचकांना येईलच. तथापि हे परिश्रम घडत असतांनाच ते मला प्रत्यक्ष दिसत होते; यामुळें त्यांचें सार्थक झाल्याबद्दल बापट यांचें अभिनंदन केल्याशिवाय माझ्यानें राहावत नाहीं. हे परिश्रम पडण्याचीं कारणें बापट यांनीं अनुमानिलीं तीं खरींच आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत माझ्या मतें मुख्य कारण हेंच कीं, आठवणी स्मरणांत ठेवणें व त्यांचें महत्त्व मनाला पटून त्या लिहिणें हा वाङ्मयव्यासंगाचा प्रकार आपल्या इकडे अद्यापि नवा असून लोकांच्या अंगवळणीं पडलेला नाहीं. या ग्रंथापूर्वीहि कै. रानडे यांच्यासारख्या एखाद-दुसऱ्या लोकोत्तर व सादरस्मरणीय अशा गृहस्थाच्या थोड्याबहुत आठवणी 'विविधज्ञानविस्तारा'सारख्या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या होत्या. पण तो प्रयत्न एकांगी होता. बापटांचा हा ग्रंथ प्रसिद्ध झाल्यानंतर दुसऱ्याहि एक-दोन थोर व्यक्तींच्या आठवणी प्रसिद्ध करण्याचा उपक्रम दृष्टीस पडला.

तो मात्र स्पष्टपणें अनुकरणात्मक असून त्याला मिळालेली स्फूर्ति बापट यांच्या प्रस्तुत ग्रंथापासूनच मिळाली असावी, असें अनुमान काढण्यास जागा आहे. कसेंहि असो; वाङ्मयलेखनाचा हा नवा प्रकार यानंतर रूढ होऊन वाढतच जाईल, व पुढें येणाऱ्या अशा प्रकारच्या ग्रंथकारास तरी इतके श्रम पडणार नाहींत, अशी आशा वाटते.

'आठवणी व आख्यायिका' यांना तुटक स्फुट लेखांचें स्वरूप असतांहि सामान्य वाचकांस त्या वाचाव्याशा वाटतात. याचें कारण तरी हेंच कीं, समग्र चरित्राच्या मानानें जरी त्या अपूर्ण वाटल्या तरी त्यांत वर्णिलेल्या विषयापुरत्या त्या पूर्णच असतात. अपूर्णांतहि जें पूर्णत्व म्हणून असतें तें प्रतीत होण्याचीं उदाहरणें वाङ्मयक्षेत्राच्या बाहेर देखील आपणांस आढळतात. फूल हें अनेक पाकळ्यांनीं पूर्ण होत असलें तरी प्रत्येक पाकळी रंग, रस, सुवास यांच्या दृष्टीनें इतर कोणत्याहि पाकळ्या किंवा समग्र फूल याच्या तोडीचीच असते. संपूर्ण फुलाचें रूप मात्र कोणत्याहि एक किंवा अनेक पाकळ्यांहून वेगळें असतें. पण संपूर्ण गुलाबाचें फूल नयनमनोहर असलें तरी त्याच्या सुट्या पाकळ्याहि कौतुकास्पद असतात; त्या आपण हुंगतों व न्याहळतोंहि. किंबहुना सबंध गुलाबाचें फूल कोणी तोंडांत घालीत नाहीं. पण सुट्या पाकळ्या असल्या तर त्या आपण खातोंहि ! हा फायदाच नव्हे काय? पैलूदार स्फटिकाचीहि गोष्ट अशीच आहे. सगळे पैलू मिळून स्फटिक होत असला तरी प्रत्येक पैलू देखील अनेक गुणांनीं तत्समच असतो. कित्येक वेळां अपूर्ण हेंहि विशिष्ट कारणाकरितां पूर्णाइतकेंच ग्राह्य होऊं शकतें. बांधीव फुलाचा गुच्छ प्रियच असतो; पण ओंजळभर फुलें नुसतीं सुटीं घेऊन या हातांतून त्या हातावर उधळीत वास घेण्याचीहि एक प्रकारची मौज असतेच कीं नाहीं? समग्र चरित्र हें बांधीव गुच्छा-प्रमाणें असलें तर 'आठवणी व आख्यायिका' या सुट्या फुलाप्रमाणेंच होत. समग्र चरित्रग्रंथ हातीं असला तरी काय झालें? तो हप्त्याहप्त्यानें व वायद्यावायद्यानें वाचणारे वाचक किती तरी असतात! त्यांचें खुणेचें पान किंवा दोरा एका प्रकरणांतून दुसऱ्या प्रकरणांत जाण्याला अनेक दिवस लागतात. अशा आळशी किंवा मिजासी वाचकांना तर अशा 'आठवणी व आख्यायिका' फारच उपयोगी पडतील. 'यथा यक्षस्तथा बलिः !'

एका वेळची भूकच चार दोन घासांची, मग अशा भुकेला एकदम ताटभर साखरभातापेक्षां एक लहानशी सुटसुटीत लाडवाची गोळीच अधिक बरी नव्हे काय ?

असो; सामान्य वाचकांना अशा खंडसंग्रहात्मक पुस्तकापासून होणाऱ्या फायद्याची ही गोष्ट तर झालीच. पण एखाद्या चरित्रकाराला—व विशेषत: एकाच चरित्रविषयाचे अनेक चरित्रकार होऊं शकतात, त्या सर्वांना—अशा 'आठवणी व आख्यायिका' यांचा विशेष उपयोग असतो. अशा प्रत्येक आठवणींत व आख्यायिकेंत थोडी तरी माहिती म्हणून असते हें तर झालेंच; पण एकाच मुद्द्याला लागू अशी माहिती निरनिराळ्या आठवणींत किंवा आख्यायिकांत निरनिराळ्या परिस्थितीच्या कोंदणांत बसलेली आढळल्यानें चरित्रविषयाचे विवक्षित गुण किंवा दोष 'सिद्ध झाले' असें मानतां येतें. दहांनीं दहा प्रकारांनीं एकच गोष्ट सांगितली असतां ती शास्त्रीय दृष्ट्या निःसंशय सिद्ध म्हणून सहजच ठरते. एखाद्याची दृष्टि किंवा अनुमान चुकेल, दोघांचें चुकेल. पण तीच गोष्ट किंवा अनुभव सांगणारे जितके अधिक लोक भेटतील तितकें तिच्या सत्यतेविषयीं अनुमान अधिक सुदृढच होणार !

या पुस्तकांत 'आठवणी व आख्यायिका' या एकाच नांवाखालीं आलेल्या मजकुरांत प्रत्यक्ष, ऐकीव, आनुमानिक (काल्पनिक मात्र नव्हे) अशा विविध प्रकारच्या मजकुराची सरमिसळ सहजच झालेली आहे. शास्त्रीय दृष्ट्या त्यांतील ग्राह्य कोणतें, हें ठरविणें अर्थातच सूक्ष्म व सराइत नजरेचें काम आहे. या 'आठवणी व आख्यायिका' गोळा करणारानें, मजकुरावरून आपली संपादकीय लेखणी फिरवितांना, ही दृष्टि थोडीबहुत ठेवलेली असेलच. तथापि प्रत्येक आठवण किंवा आख्यायिका ही प्रत्यक्ष लेखकाच्या नांवानेंच प्रसिद्ध होत असल्यामुळें संपादकाची एतद्विषयक जबाबदारी पुष्कळशी आपोआप कमी होते. असला ग्रंथ लिहिणाराचा पेशाच मुळीं हा असतो, कीं त्याच्या हातीं येणारा मजकूर तो स्वत: फक्त घासून पुसून सुटसुटीत किंवा आटपशीर करून वाचकांपुढें मांडीत असतो. त्याचें महत्त्व, त्याची विश्वसनीयता किंवा त्याजवरून निघणारीं अनुमानें

यांविषयीं त्यानें मुग्धच राहावयाचें असतें. ती सर्व कामगिरी वाचकांकडेच राहाते. अशांपैकीं ज्यांचा आपल्या जुन्या शास्त्राशीं किंवा आधुनिक पुराव्याच्या शास्त्राशीं परिचय असेल, त्यांना या ग्रंथांतील मजकूर वाचीत असतां प्रथम ग्राह्याग्राह्य व नंतर सारासारविचार चालविण्याचें हौसेचें काम कितीतरी मिळणारें आहे. कातीव व रेखीव सत्य कोणचें असेल, दाक्षिण्यामुळें स्पष्टोक्तीला झालरीवजा मुरड कोठें पडलेली असेल, अतिशयोक्तीची भर न कळत कोठें पडलेली असेल, प्रेमानें लेखकाचा हात कोठें सढळ झाला असेल, मनाच्या आढीमुळें उल्लेखाला कोठें कार्पण्य आलें असेल, आंतल्या गांठीचा कोणचा विनोद कोठें साधला असेल, कोठें फसला असेल हें सूक्ष्म नजरेनें न्याहाळण्याइतका मार्मिक विषय चिकित्सकबुद्धीला दुसरा कोणता असणार ? तात्पर्य, या स्फुट व त्रुटित चरित्रखंडांतील मजकुरावरून लो. टिळकांचा स्वभाव जसा प्रगट होत आहे, तसाच लेखनपद्धतीवरून लेखकांचा स्वभावहि दिसून येणारा असल्यामुळें, मनुष्यस्वभावाची परीक्षा व परिचय यांची या ग्रंथांत वाचकाला मेजवानीच आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

असो, बापट यांच्या परिश्रमामुळें दोन खंड मिळून सुमारें हजार बाराशें पानांचा हा ग्रंथ प्रसिद्ध होऊन हातावेगळा झाल्याबद्दल सामान्य वाचकवर्ग आणि विशेषतः विद्यमान व भावी टिळकचरित्रकार यांच्यातर्फे श्रीयुत बापट यांचें साभार अभिनंदन करून हा लेख पुरा करतों.

पुणें
११–७–२५

नरसिंह चिंतामण केळकर

लो. टिळक यांचें वाङ्मय-स्मारक

# आठवणी, सूक्ति व पत्रें

[ टिळक वाङ्मय स्मारक प्रकरणीं श्री. आण्णासाहेब यांनीं अक्षरशः हजारों पत्रें लिहिलीं; त्यांच्या स्थळ-प्रतींपैकीं फक्त एकच पत्र उपलब्ध झालें, तें खालीं मुद्दाम दिलें आहे. ]

श्रीराम समर्थ

केसरी कचेरी, नारायणपेठ, पुणें शहर,
दिनांक १९-१-१९३५

रा. रा. ··· ··· ··· ··· ··· ··· ··· ··· ··· ··· ··· ··· यांचे सेवेशी सादर साष्टांग नमस्कार वि. वि.

लोकमान्य टिळक यांचें वाङ्मय स्मारक हें चरित्रें, व्याख्यानें व त्यांच्या लेखांचें प्रकाशन इत्यादि द्वारांनीं त्यांच्या निधनानंतर बऱ्याच अंशांनीं आतांपर्यन्त पार पडलें आहे. 'आठवणी' हेंहि वाङ्मय स्मारकाचें एक अंग समजून तें मीं बहुतेक पुरें केलेंच आहे; व त्याचप्रमाणें लोकमान्यांच्या सूक्ति व त्यांचीं महत्त्वाचीं पत्रें प्रसिद्ध करणें हेंहि काम माझ्या कार्यक्षेत्रांत येऊं शकतें. सूक्ति व पत्रें प्रसिद्ध करण्याची ही कल्पना आठवणींचे दोन खंड प्रसिद्ध केल्यानंतर मला सुचलेली नसून, ती पूर्वींपासूनच माझ्या मनांत एकसारखी घोळत आहे. परंतु आठवणींचें कार्य संपूर्ण नसलें तरी बऱ्याच अंशीं हातावेगळें होईपर्यन्त या गोष्टीची वाच्यता करणें प्रशस्त नसल्यामुळें, मी मुग्ध होतों. परंतु आतां ती गोष्ट जाहीर रीतीनें जनतेस सांगण्याची वेळ आली आहे, असें समजून ही विनंती करीत आहें.

लोकमान्यांच्या 'आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाचे दोन खंड प्रसिद्ध झाल्यानंतर, तिसऱ्या खंडाचीहि आवश्यकता कित्येकांच्या मतें

अद्यापिहि उरत असल्याचें कळल्यावरून त्या जमविण्याचा माझा उद्योग पूर्ववत् चालूच आहे. तेव्हां या गोष्टीकडे लक्ष देऊन लोकमान्यांच्या आठवणी अजूनहि ज्यांच्या संग्रहीं आहेत व असे गृहस्थ माझ्या मतें अनेक आहेत—त्या त्यांनीं मजकडे पाठवून देण्यावर हें काम सर्वस्वीं अवलंबून आहे, हें ध्यानीं घेऊन, आतां विलंब न लावतां आपला मजकूर त्यांनीं मजकडे ताबडतोब पाठविण्याची कृपा करावी.

आपल्या चाळीस वर्षांच्या राजकीय चळवळीच्या उद्योगांत लोकमान्यांनीं श्रीसरस्वती देवीची उपासनाहि कांहीं थोडीथोडकी केलेली नाहीं. तिची विविधता सर्वश्रुतच आहे. करितां या त्यांच्या अगाध वाङ्मयोदधीचें अवगाहन करून त्यांतून हातीं लागतील तेवढीं तेजस्वी, संग्राह्य व संस्मरणीय सूक्तीचीं पाणीदार मौक्तिकें गोळा करून त्यांच्या सरांचा हार गुंफण्याचे कामीं मी सांप्रत गुंतलों आहें; व हेंहि काम लवकरच पूर्ण करून किंबहुना तें एकीकडे चालू ठेवूनच, लोकमान्यांचीं खासगी पण महत्त्वाचीं पत्रें संग्रहीत करण्याचा मीं प्रयत्न चालविला आहे. लोकमान्यांचें कार्यक्षेत्र जितकें विस्तृत तितकाच त्यांचा खासगी व सार्वजनिक पत्रव्यवहारहि विस्तीर्ण व प्रचंड असणार हें उघड होय. तथापि वैयक्तिक, अगदींच किरकोळ व निवळ खासगी संबंधाचा मजकूर वगळून केवळ सार्वजनिक स्वरूपाचा व विशेष महत्त्वाच्या मजकुराचींच तेवढीं पत्रें ज्यांचे-जवळ असतील त्यांनीं तीं मजकडे पाठविण्याची कृपा केल्यास या थोर राष्ट्रीय पुरुषाच्या चरित्र ग्रंथाच्या महावस्त्रास एक तंतु पुरविण्याचें पुण्य त्यांस खचित लाभणार आहे.

विशेष महत्त्वाच्या अशा या पत्रांचा मी उपयोग करून घेतल्यावर तीं सर्व पत्रें पुणें येथील लोकमान्यांच्या स्मारकसंस्थेच्या टिळकमंदिराच्या ट्रस्टींच्या स्वाधीन करून मंदिरांतील एका दालनांत कांचेच्या कपाटांत 'प्रदर्शनीय वस्तु' म्हणून तीं सुव्यवस्थित व सुरक्षित रीतीनें ठेवण्याचें ट्रस्टींनीं कृपा करून मला अभिवचन दिलें आहे. पण ज्यांना कदाचित् आपणाजवळील ह्या अस्सल पत्रांचा कायमचा वियोग सहन होणार नाहीं त्यांनीं तीं मजकडे पाठविल्यावर, त्यांचें महत्त्व मीं पूर्णपणें ओळखून

असल्यामुळें, तीं मीं जिवापलीकडे जपून त्यांच्या नकला करून घेऊन मग तीं रजिस्टर पोस्टानें—वाटल्यास इन्शुअर करूनहि ज्यांची आपल्याजवळून लोकमान्यांचें अस्सल पत्र अजीबात हलविण्याची इच्छाच नसेल त्यांनीं निदान सदर पत्राची अस्सलबरहुकूम नक्कल करून ती तरी मजकडे पाठविण्याची तसदी घ्यावी; म्हणजे जरूर तर मी त्यांस भेटून दोहों प्रतींची रुजवात घेण्याचीहि व्यवस्था करीन.

लोकमान्यांच्या आठवणी, सूक्ति व पत्रे या त्रिदलात्मक वाङमय स्मारकापैकीं सूक्तींचा संग्रह करून तो प्रसिद्ध करणें हें काम जितकें एकमुखी, स्वावलंबी व स्वाधीनचें आहे तितकेंच 'आठवणी व पत्रें' मिळविणें हें काम परावलंबी, परतंत्र व सर्वस्वीं परेच्छाधीन असल्याचें लक्षांत घेऊनच प्रथम स्वतंत्र 'सूक्तिसंग्रह' प्रसिद्ध करण्याचें काम लवकरच उरकून टाकण्याचें मीं योजिलें आहे. बाकीचें कामहि लवकर उरकावयास हवें असेल तर त्याची जबाबदारी मजपेक्षां अर्थात् लोकमान्यांचे असंख्य चाहते व अनुयायी, भक्त, मित्र यांचेवर आहे, हें कोणीहि कबूल करील. करितां आतां प्रसिद्ध होणारा हा आठवणींचा शेवटचाच खंड होय. शिवाय असे प्रयत्न पुनः होत नसतात, हें लक्षांत घेऊन, त्या सर्वांनीं हें काम लवकर शेवटास नेण्यास मला मदत करण्याची कृपा करावी, अशी माझी सविनय पण आग्रहपूर्वक प्रार्थना आहे.

आपला नम्र सेवक,
**सदाशिव विनायक बापट**

# अर्पणपत्रिका

अफाट कालसरोवरांतील भारतवर्षाचें प्रस्तुतचें क्लैब्य, दास्य, कलह,

बुद्धिभेद व मतमतांतर यांच्या कर्दमांतून उगवणाऱ्या

ऐक्यरूपी उन्मीलित कमलावर अधिष्ठित अशा

आर्यभूच्या भावी स्वातंत्र्य-लक्ष्मीस ही

तृतीय तिलक–स्मृति–सुमनमाला

अत्यंत भक्तिपूर्ण

अंतःकरणानें

वाहिली

आहे.

— सदाशिव विनायक बापट

# लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

## खंड ३ यांतील

# आत्मनिवेदन

निवेदितों मी तुम्हासी ।
संत महंत आणि ऋषि ॥
माझ्या सलगीच्या उत्तरा ।
तुका म्हणे क्षमा करा ॥

आपुलिया स्वानुभावें । आपणांस निवेदावें ।
आत्मनिवेदन जाणावें । ऐसें असे ॥
—श्री समर्थ

कै० 'राष्ट्रसूत्रधार' लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या 'आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाचा हा तिसरा म्हणजे शेवटचा खंड आज वाचकांस सादर करण्यास मला फार आनंद होत आहे. वास्तविक हा खंड यापूर्वीच प्रसिद्ध व्हावयाचा; कारण आम्हीं पुरस्कारिलेल्या लोकमान्यांच्या वाङ्मय-स्मारकापैकीं प्रस्तुत ग्रंथाचे पहिले दोन खंड सन १९२४ व १९२५ सालीं प्रसिद्ध झाले व १९२६ सालीं कामास खंड पडून त्या सालीं 'टिळक-सूक्तिसंग्रह' हा ग्रंथ प्रसिद्ध करण्यांत आला. अर्थात् उरलेला आठवणींचा तिसरा खंड पुढील सालीं म्हणजे सन १९२७ मध्यें प्रसिद्ध व्हावयाचा; पण टिळकसूक्तींचा संग्रह करण्याचें काम जसें एकमुखी, एकतंत्री, स्वावलंबी व स्वाधीनचें होतें तसें आठवणी मिळविण्याचें काम अनेकतंत्री, अनियंत्रित, परावलंबी व सर्वस्वीं पराधीन असल्यामुळें गेल्या वर्षी हें काम हातावेगळें करणें अशक्य झालें. आठवणींचा दुसरा खंड हाच दुसरा आणि शेवटचा होय. असें जरी भीतभीत व लोकापवादास्तव मीं सदर खंडाच्या आत्मनिवेदनांत म्हटलें होतें, तरी त्याच आत्मनिवेदनांत तिसराहि खंड काढण्याचा हेतु एकदोन

ठिकाणीं डोकावत होता, हें सूक्ष्म दृष्टीच्या वाचकांचे नजरेस येण्यासारखें होतें. कारण तिसरा खंड काढण्याचा मीं त्याच वेळीं आपल्या मनाशीं अगदीं पक्का निश्चय केला होता. मग अशा संदिग्ध व प्रच्छन्न रीतीनें त्या वेळीं लिहिण्याचें कारण काय? कारण इतकेंच कीं, स्वत: मला जरी लोकमान्यांच्या आठवणींचा हा मेवा अवीट वाटत असला तरी महाराष्ट्र वाचकवृंदाच्या अभिरुचीचा मला थांग न लागल्यामुळें, न जाणों, कदाचित् आपणाकडून या कामीं अतिरेक होऊन त्या अतिरेकाचा स्वाभाविक परिणाम जी प्रतिक्रिया ती तर भोंवणार नाहींना, अशी मनांत मला भीति वाटत असे. पण त्याचबरोबर हेंहि मी पूर्ण जाणून होतों कीं, दरम्यान कांहीं थारेपालट झाल्यास व कांहीं काल गेल्यास पुन: या पक्वान्नाची चव घेण्यास वाचकवृंद उत्सुकच राहील. अशा समजुतीनें आठवणींचा दुसरा खंड प्रसिद्ध केल्यावर पुढील सालीं 'टिळक-सूक्ति-संग्रह' प्रसिद्ध करण्यांत आला व दुसऱ्या खंडानंतर तीन वर्षांनीं हा शेवटचा तिसरा खंड वाचकांच्या हातीं पडल्यास पहिल्या दोन खंडांप्रमाणें ते उत्सुकतेनें याचाहि परामर्ष घेतील अशी मीं अपेक्षा केल्यास ती चूक ठरणार नाहीं असें वाटतें. आणि म्हणूनच पांच वर्षांपूर्वीं आम्ही पांच जणांनीं (श्री. शंकर गणेश लवाटे, श्री. वासुदेव कृष्ण भावे, श्री. अनंत वासुदेव फडणीस, श्री. काशीनाथ नरसिंह केळकर व श्री. सदाशिव विनायक बापट) लोकमान्यांची जी वाङमय-स्मारकाची योजना महाराष्ट्रापुढें मांडली ती आज पूर्णपणें सिद्धीस गेल्याचें पाहून हर्ष होणें स्वाभाविक आहे व अशा वेळीं एतद्विषयक आमच्या प्रतिपक्षीयांस व टीकाकारांस उद्देशून उत्तरादाखल आम्हीं कांहीं म्हणण्याचें योजिल्यास तेंहि अस्वाभाविक नाहीं. परंतु गुरुवर्य तात्यासाहेब केळकर-प्रणीत असें एक सुभाषित आहे कीं, "एका अर्थानें विजय-काल हा पाप-काल असतो. कारण या वेळीं हर्षाच्या भरांत अविचार होण्याचा संभव असतो." हें सूत्र लक्षांत घेऊन प्रत्युत्तर देण्याचा मोह आवरून धरणें मला योग्य वाटतें.

आठवणींचा तिसरा खंड तयार करण्याचें मनाशीं निश्चित ठरवून त्या कामास मी लागलों खरा; पण आठवणी मिळण्याचे बाबतींत पहिल्या दोन खंडांच्या वेळेच्या अनुभवापेक्षां विपरीत अनुभव, काय कारण असेल न

कळे, या वेळीं येऊं लागला. आठवणी देणारांचें क्षेत्र संपलें असतांहि केवळ पूर्व-संकल्पास बळी पडून तिसरा खंड काय वाटेल तें करून काढावयाचाच अशा दुराग्रही हट्टाचें आसन ठोकून मीं बसलों होतों असें नव्हे. तर डोळ्या-पुढें स्वच्छ पाण्यानें भरून वाहात असलेले झरे दिसत असतां जसा त्यांचा मोह तृषार्तास सोडवत नाहीं तशीच माझी या बाबतींत अवस्था झाल्या-मुळें मी या कार्यास प्रवृत्त झालों, हें प्रथम लक्षांत ठेविलें पाहिजे. कारण पहिल्या दोन खंडांत जरी शेंकडो प्रसिद्ध-अप्रसिद्ध, परिचित-अपरिचित, लहान-मोठ्या लोकांनीं आपल्या आठवणी दिल्या होत्या व आतां हें आठवणीचें क्षेत्र संपलें, असें जरी बहुतेक सर्वांस वाटत होतें, तरी लोकमान्य-रूपी हिमालय पर्वताचें अपूर्वत्व अजूनहि संपलें नसून त्यावरील अद्याप पाहण्यासारखे नित्य नवीन नवीन आढळणारे असे कित्येक अद्‌भुतरम्य वस्तुचमत्कार व ते वर्णन करणारे शेंकडो लोक माझ्या डोळ्यांस एक-सारखे दिसत असल्यामुळें त्यांचा संग्रह करण्याचा मोह मला कसा आवरेल? पण त्याबरोबर हेंहि खरें कीं, त्या संस्मरणीय, दर्शनीय व पूजनीय वस्तूचें जसें प्राचंड्य, विशालत्व व 'विभूतिमत्त्व' तसेंच तद्विषयक 'संस्मृतींच्या' एकीकरणाचें कार्यहि मोठें बिकट व कष्टसाध्य असावें हेंहि स्वाभाविकच होय. 'स्थावराणां हिमालयः' अशा या पर्वतराजाच्या वर-वर दिसणाऱ्या गुणैश्वर्याचें पूर्वी अनेकांनीं कितीहि रसभरित वर्णन केलें असलें तरी अजूनहि त्याजकडे किंचित् सूक्ष्म नजरेनें व निराळ्या दृष्टीनें पाहूं जाणारांस वाटावें कीं, यापूर्वी इतरांनीं येथें जें कांहीं पाहिलें तें आपण आज पाहतों त्याच्यापुढें कांहींच नाहीं! अहो, केवढें तरी सद्‌गुणांचें रत्नभांडार येथें सांठविलेलें आहे. असे हे उद्‌गार कानीं येतांच कोणाचे पाय भांडार लुटून आणण्यास धांवणार नाहींत? मग माझ्यासारख्या अधाशाची गोष्ट तर विचारावयासच नको. पण दुरून कीर्तिरूपानें ऐकूं येणारें हें लोकमान्यांचें गुण-भांडार प्रत्यक्ष दृष्टिपथांत येऊन त्याचा साक्षात् लाभ होणें हें कर्म मात्र केवढें दुर्घट होतें, हें मीं सांगण्यापेक्षां वाचकांनीं कल्पनेनें जाणणें अधिक बरें. सारांश, हा एक खंड पुरा करण्यास पहिल्या दोन खंडांच्या मिळून वेळेपेक्षांहि अधिक वेळ लागला व त्या प्रमाणांत जरी नाहीं तरी पहिल्या दोन खंडांपेक्षां या खंडांतील मजकूर मिळविण्या-

करितां पत्रव्यवहार करणें, अनेकांच्या गांठीभेटी घेणें, दुसऱ्यांचा मजकूर ऐकून घेऊन तो आपणच लिहून काढून संमतीदाखल त्यांच्या सह्या घेणें वगैरे काम फारच करावें लागलें. असें सांगणें हें 'बेहिमतीपणाचें' आहे असें 'अधिकारी' वाणीनें सांगण्यांत आलें आहे. पण उलट आपण टीचभर पुस्तकाच्या औट पृष्ठांच्या प्रस्तावनेंत चढेलपणानें सरसकट सर्वांस शेला-पागोटें देत सुटणें हेंच हिम्मतदारपणाचें लक्षण मानावयाचें असल्यास मग कांहींच बोलणें नाहीं !

लोकमान्यांविषयींच्या भक्तिप्रेमानें मोहित झालेले लोक मला नेहमीं म्हणत कीं, टिळकांच्या खाजगी म्हणजे घरगुती आयुष्यांतील (Home-life) गोष्टी तुम्ही जितक्या अधिक सांगाल तेवढ्या आम्हास थोड्याच आहेत! कारण काय असेल तें असो, टिळकांच्या मोठ्या व प्रसिद्ध गोष्टींपेक्षां त्यांच्या अगदीं बारीकसारीक गोष्टी जाणण्या-ऐकण्याची लोकांची पराकाष्ठेची उत्सुकता दिसून येते यांत शंका नाहीं. आणि म्हणूनच केळकरकृत संपूर्ण टिळकचरित्राचीं पहिलीं १८९४ पृष्ठें ओलांडून शेवटच्या 'व्यक्तिविषयक प्रकरणाच्या पंचवीस पानांवर वाचकांची प्रथम कशी झडप पडते हें मीं पाहिलें आहे. अनेक कारणांपैकीं याचें एक कारण असें असेल का कीं, जसें कोणा पुढाऱ्यानें आपल्या हद्दपारीच्या कहाण्या लिहिल्या, कोणीं आपले सत्याचे प्रयोग कथन केले, कोणी आपल्या स्वतःच्या आठवणीच प्रसिद्ध केल्या व कोणीं आपलीं 'आत्मचरित्रें' लिहिलीं त्याप्रमाणें "टिळकांनीं आत्मचरित्र असें कधींच लिहिलें नाहीं, किंबहुना आत्मचरित्रपर अशा गोष्टीहि त्यांनीं आपल्या लेखांत किंवा व्याख्यानांत कधीं येऊं दिल्या नाहींत" (केळकरकृत टिळकचरित्र खंड १, पान ३) फार काय, पण स्वतःसंबंधानें उभ्या आयुष्यांत त्यांनीं जाहीर असा एक उद्गारहि कधीं काढिला नाहीं म्हणून लोकांची अतृप्त जिज्ञासा अशा रीतीनें प्रगट व्हावी ? आणि हेंहि स्वाभाविकच आहे कीं, मध स्वतःची गोडी सांगता तर कदाचित् भ्रमर त्यावर इतके अनुरक्त होतेना ! एक आंग्ल कवि म्हणतो—

Heard melodies are sweet
And unheard are sweeter still

यांतील बीज तरी हेंच होय.

लोकांची ही इच्छा जाणून व त्यांत माझ्याहि इच्छेची भर पडून पहिल्या खंडापासूनच अशा प्रकारचा मजकूर मिळविण्याबद्दल माझा कटाक्ष होता. आणि या दृष्टीनेंच लोकमान्यांच्या सर्व नातेवाइकांकडून विशेषत: त्यांच्या मुली, मुलगे, जांवई, नातू इत्यादिकांकडून वरील स्वरूपाचा मजकूर मिळविण्याचा मीं प्रयत्न केला, तरीहि तेवढ्यानें लोकमान्यभक्तांचें समाधान झालें नसल्याचें मला दिसून आलें. अखेर मनांत विचार आला कीं, ज्यांचा लोकमान्यांशीं, सुदैवानें म्हणा, वा दुर्दैवानें म्हणा बारन्‌वारा चोवीस तास असा अहर्निश व एकसारखा कांहीं काल संबंध आल्यामुळें लोकमान्यांचे बारीकसारीकहि स्वभावगुण कळणें शक्य झालें त्या मंडालेच्या तुरुंगांतील त्यांच्या सहवासी आचाऱ्याकडून माहिती मिळविण्याचा प्रयत्न करावा. लोकमान्यांच्या मंडाले येथील अर्धतपाच्या मुदतींत त्यांचे जवळ एकंदर तीन आचारी राहून गेले. या तीनहि गृहस्थांकडून काय वाटेल तें करून त्यांच्या आठवणी मिळविण्याबद्दल मीं शिकस्तीचे प्रयत्न केले; पण दुर्दैवानें अनेक कारणामुळें त्यांपैकीं दोघांकडून त्या मिळणें शेवटीं अशक्य होऊन ज्यांस लोकमान्यांजवळ तीन वर्षें राहण्याचें पुण्य लाभलें अशा फक्त एकाच वृद्ध गृहस्थाकडून त्यांच्या आठवणी मिळण्याचा योग घडून आला व तेवढ्यानेंहि आतां लोकमान्य भक्तांच्या जिज्ञासेची क्षुधा कांहीं अंशीं शमावी अशी कल्पना आहे.

हें झालें अगदीं लहान प्रसंगाच्या हकीकती लहान व्यक्तींकडून मिळविण्यासंबंधीं. आतां मोठ्या प्रसंगाच्या हकीकती मोठ्या लोकांकडून मिळविण्यासंबंधीं लिहूं. खरोखर ज्यांची हकीकत इतिहासांतरीहि राहण्याच्या योग्यतेची आहे असे कित्येक अद्भुत प्रसंग लोकमान्यांच्या चरित्रांत निःसंशय घडून आलेले आहेत. पण ते सर्वच उजेडांत येणें व कागदोपत्रीं लिहिले जाणें आजच्या घटकेस अगदीं अशक्यप्राय आहे. गेल्या पांच-सहा वर्षांत प्रस्तुत कामानिमित्त लोकमान्यांसंबंधीं भेटण्याबोलण्याचा विविध प्रकारच्या लोकांशीं संबंध आल्यामुळें माझी अशी खात्री होऊन चुकली आहे कीं, जरी ग्रंथ हा आरसा नसून चित्र आहे असें मानिलें तरी लोकमान्यांचें घडलें तसें यथातथ्य व बिंब-प्रतिबिंब न्यायानें यथार्थ चरित्र-चित्र रेखाटलें जाणें तूर्त तरी अशक्य आहे व हें मलाच वाटतें असें नव्हे तर खुद्द टिळक

चरित्रकार श्रीयुत तात्यासाहेब केळकर टिळकचरित्राच्या प्रथम खंडाच्या दुसऱ्या पानावर म्हणतात, "लोकमान्य टिळकांचें चरित्र लिहिणें ही गोष्ट आजच्या घटकेला बरीच अवघड व नाजुक आहे, कारण कांहीं कांहीं बाबींची खासगी माहिती कोणा लिहिणारास असली तरी ती प्रकट करण्याची वेळ अद्याप आलेली नाहीं." या विधानाचा प्रत्यय मला पावलोपावलीं अनुभवास आला हें वाचकांस सांगणें जरूर वाटतें. तथापि या खेपेस आठवणी मिळविण्याचें असें एक अगदीं निराळें क्षेत्र मीं आपल्या डोळ्यापुढें ठेविलें होतें. तें म्हणजे अप्रसिद्धांत अप्रसिद्ध व प्रसिद्धांत प्रसिद्ध लोकांचे पैकीं या दुसऱ्या वर्गांतील ज्या लोकांचा संबंध लोकमान्यांशीं आला असल्याचें मला माहीत होतें असे लोक म्हणजे राजे, महाराजे, संस्थानिक, देशी व परदेशी अव्वलप्रतीचे सरकारी नोकर, सर्वांत श्रेष्ठ दर्जाचे सरकारी काळेगोरे पेन्शनर, जगप्रसिद्ध ग्रंथकार, मुत्सद्दी व राजकारणी लोक, लोकमान्यांवरील दोनही खटल्यांतील हिंदी ज्यूरर, तुरुंगावरील जेलर व सुपरिटेंडेंट, चिरोल खटल्यांतील आरोपी व दोनहि पक्षांकडील बॅरिस्टर व सॉलिसिटर आणि इकडील व विलायतेंतील न्यायाधीश, पार्लमेंटचे सभासद, कोट्याधीश व्यापारी आणि तिन्ही-चारहि खटल्यांतील सर्व नामांकित लोक. वरील व्यक्तींचा उल्लेख एकदोन ओळींत करण्यांत आला खरा; पण त्यांची यादी करूं गेल्यास ती सुमारें शंभरदीडशें जणांची होईल. अशा धेंडांशीं निरनिराळ्या तऱ्हेनें पत्रव्यवहार करणें, दुसऱ्याकडून ओळखी देणें, वशिले लावणें किंवा युक्ती, प्रयुक्तीनें समक्ष गांठी भेटी घेणें वगैरे कार्यसिद्धीचे जेवढे म्हणून उपाय करतां येणें शक्य होते तेवढे सर्व मीं केले. वरील मंडळींशीं पत्रव्यवहार केला तो बहुतेक सर्व पत्रें रजिस्टर करून! तरी पत्रास उत्तरच येऊं नये असेंहि कित्येकांचें झालें. बरें, कोणाचें उत्तर यावें तर "विचार करीत आहोंत" एवढेंच लिहिलेलें असावें. पुन्हां त्यांस स्मरणार्थ लिहावें तर मुळीं जाबच येऊं नये. पण जाब मिळेपर्यंत आपण त्यांचा पिच्छा सोडावयाचा नाहीं असा माझा दंडक असल्यामुळें शेवटीं मग कोणी बड्यांतल्या बड्या सरकारी अधिकाऱ्यानें ताडकन् लिहावें "होय, टिळकांना मी 'ॲप्रिशिएट' करतों, म्हणून काय मी त्यांचेबद्दल तसें उघड लिहूं बोलूं म्हणतां? तुम्ही अशी अपेक्षा तरी कशी करतां?" कोणी "तूर्त अशक्य आहे" असें लिहावें तर

कोणी "फारसें आठवत नाहीं" असें कळवावें. "आतां काय, त्या शिळ्या गोष्टी झाल्या, त्यांत स्वारस्य नाहीं" म्हणून कोणीं म्हणावें, तर कोणी "पुढें-मागें पाहूं" असें लिहून टाळाटाळी करावी. "आठवणी आहेत. चांगल्याहि आहेत; पण त्या देणें धाडसाचें आहे व त्या दिल्यास आम्हास अपायकारक होईल, माफ करा" असें कोणीं सांगावें तर कोणीं "मन कितीहि सम केलें तरी मनांतून जुना व्यक्तिद्वेष जात नाहीं" असेंहि मोकळेपणानें नमूद करावें? बरनार्ड शॉ यांनीं लिहिलें, "टिळकांशीं माझें झालेलें बोलणें तुमचे पुस्तकांत तुम्हीं छापिलें तर तें तुम्हास अनिष्ट होईल." एका महाराजानें उद्गार काढले, "राजकारण करावें तर तें टिळकांनींच. आम्हास त्यांच्या कांहीं गोष्टी माहीत आहेत, पण जगांत नसेल एवढें मोठें कुलुप आमचे तोंडास ठोकलें आहेना?" तसेंच सर जॉन सायमन यांचें वकिली थाटाचें उत्तर, चिरोल खटल्यांतील टिळकांचे सॉलिसिटर डौनर व जॉनसन यांचीं मजेदार पत्रें, हेंडरसन, मिसेस नॉरमिंगटन, सर शंकरन् नायर, वाच्छा, सेटलवाड, बमनजी-शठ, जितेन्द्रबाबू, हसन इमाम, जे. बी. पेटिट, सर बी. के. बोस, सर माधवराव चौबळ, वगैरेंनीं माझे पत्रास पाठविलेल्या जबाबांतील कांहीं मजकूर उल्लेख-नीय असला तरी तीं पत्रें केवळ खासगी स्वरूपाचीं असल्यामुळें त्यांच्या संबंधानें लिहिणें शिष्टाचारास सोडून होईल म्हणून येथें कांहीं लिहीत नाहीं. तथापि सामान्यपणें या सर्वांतील एक सूत्र असें सांगतां येईल कीं, ज्यांचेशी पत्रद्वारें किंवा समक्ष माझा संबंध आला त्या सर्वांत एकहि असें उदाहरण मला सांपडलें नाहीं कीं, ज्याचे मनावर टिळकांचेविषयीं कांहींना काहीं परिणाम झाला नाहीं, किंवा ज्यास त्यांचेबद्दल कांहीं विशेष माहीत नाहीं; आणि म्हणूनच मला खेद होतो कीं, या 'प्रसिद्धांत प्रसिद्ध' लोकांकडून मजकूर मिळविण्याबद्दल माझ्या शक्तीबाहेर मीं प्रयत्न केले असतां त्या मानानें मला यश आलें नाहीं. माझ्या मनांत नेहमीं असा एक विचार येत असतो कीं, आपल्यापेक्षां लायक दुसरा एखादा कोणी पदवीधर व प्रसिद्ध पुरुष हें कार्य हातीं घेतां तर तो यशाची केवढी तरी इमारत उभी करता व आपलें आत्मनिवेदन लिहिण्यास तो बसता तर अगदीं माझ्या उलट आपले अनुभव तो खास सांगता! पण असें न घडल्यामुळें आतां उगाच संकेतार्थी बोलण्यांत मतलब काय?

आतां 'अप्रसिद्धांतील अप्रसिद्ध' लोकांकडून मजकूर मिळविण्याकरितां मीं कसा प्रयत्न केला व अगोदर हे इतके अप्रसिद्ध लोक मला कसे ज्ञात झाले यासंबंधानें तपशीलवार लिहित बसलों तर त्या हकीकतीचें एक भारूडच बनेल व वाचकांपुढें तो पसारा मांडल्यानें त्यांस तो एक जुलूमच वाटेल हें जाणून तो सर्व कथाभाग सोडून देतों. पण वरील दोन्ही वर्गांच्या टोंकांमधील 'प्रसिद्ध' या वर्गांतील लोकांकडेहि मी दुर्लक्ष केलें नाहीं. इतकेंच नव्हे तर, तो या दोन्ही टोंकांमधील हिरण्यगर्भ (Golden mean)असल्यामुळें त्यावर तर आरंभापासून माझी सर्व भिस्त होती. आणि म्हणून गेलीं पांचसहा वर्षे या वर्गांतील लोकांच्यामागें मी जितका लागलों असेन तितका दुसऱ्या कोणत्याहि वर्गाच्या मागें लागलों नाहीं. याचें एकच गमक म्हणजे लोकमान्यांच्या डाव्या-उजव्या हाताप्रमाणें समजण्यांत येणाऱ्या एका प्रसिद्ध गृहस्थाच्या आठवणी तुम्ही कशा मिळविल्या नाहींत असें शेंकडों जणांनीं मला नाना प्रकारें टोंचून विचारलें म्हणून आतां सांगतों कीं, या निष्ठावंत व मला पूज्य असणाऱ्या टिळकभक्तास अगदीं आरंभापासून मीं किती व कशीं पत्रें पाठविलीं व त्यांच्या जिवलग स्नेह्यांकडून भीड घालून आळविलें असतांहि त्यांनीं मगरूरपणानें व पक्षांधतेनें आपल्या आठवणी देण्याचें कसें साफ नाकारिलें हा कथाभाग अत्यंत हृदयभेदक असला तरी तो जाहीर करणें अप्रशस्त होय. सदर गृहस्थांकडे दोन वेळां मी समक्ष गेलों असतां शेवटीं रागाच्या सप्तकांत सूर चढवून ते मला म्हणतात, "हें पाहा, तुम्ही सर्वांनीं टिळकांना भलतेंच 'पेन्ट' केलें आहे. तुमचे सर्व उद्योग मला साफ नापसंत आहेत. म्हणून मी स्वतंत्र रीतीनें चारशें पानांचें बळवंतरावांचें एक निराळें चरित्र लिहिणार आहे. तेव्हां तुम्हांला माझ्याकडून माहितीचा म्हणजे आठवणीचा एक कणहि मिळणार नाहीं, समजला ?" तसेंच या जातीच्या इतरहि कांहीं सज्जनांकडून ठेवणींतील आहेर मिळाले. पण 'अपमान सांगावा मनांत' या न्यायानें त्यांचें प्रदर्शन येथें करीत नाहीं. एक भले गृहस्थ मोठ्या तावातावानें म्हणतात, "मला जातीनें तुम्हीं विनंती केली नाहीं म्हणून मी आपल्या आठवणी दिल्या नाहींत." जणूं काय मी मनकवडा आहे किंवा अंतर्ज्ञानानें मला कळतें कीं, अमुक एका महात्म्यास लोकमान्यांच्या

आठवणी माहीत आहेत ! पण न करत्याचा वार शनिवार यापैकींच हा प्रकार होय. कारण गेलीं पांचसहा वर्षें आठवणी पाठविण्याबद्दल जाहीर रीतीनें मीं कित्येक वेळां विनंती केली असतांहि ज्यांस त्या पाठविण्याची बुद्धि झाली नाहीं त्यांस समक्ष विनंती केली असतां त्यांनीं तिचा कितपत आदर केला असतां हें एक त्यांचें त्यांसच माहीत ! कारण असे कित्येक लोक आहेत कीं, ज्यांनीं मजकूर पाठविण्याचें गेलीं तीन-चार वर्षें अभिवचन दिलें होतें, म्हणून त्यांस शेवटपर्यन्त किती तरी पत्रें व तारा पाठविण्यांत आल्या, तरी अखेर त्यांनीं तो पाठविला नाहीं तो नाहींच ! पण उलट असे मात्र काहीं लोक आढळले कीं, ज्यांनीं माझ्या पहिल्या दुसऱ्या विनंतीस मान देऊन आपल्या आठवणी ताबडतोब पाठविल्या; पण त्या या ग्रंथांत प्रसिद्ध झालेल्या पाहण्यास दुर्दैवानें ते उरलेच नाहींत ! पुणें ही लोकमान्यांची कर्मभूमि असल्यामुळें येथें त्यांच्यासंबंधींच्या अनेक गोष्टी अनेक लोकांस ठाऊक असणें स्वाभाविक आहे. म्हणून अशा कांहीं लोकांकडे हेलपाटे घालीत असतां या कामीं कांहीं विघ्नसंतोष्यांनीं शक्य तितकीं विघ्नें उत्पन्न करून व या विषयाची टवाळकी करून मला पाहातांच कुचेष्टेनें म्हणावें, "चला, पळारे पळा, आठवणी आल्या आठवणी ! 'निसटा येथून; नाहीं तर चिकटतील आपणास त्या कौसकुल्यासारख्या ! !" हें पाहून जिवास फार खेद होई. पण "अपमानितां सिणो नये। निखंदितां कष्टो नये। धिक्कारिता झुरों नये। कांहीं केल्या ॥" हा समर्थांचा उपदेश डोळ्यांपुढें ठेवूनच करारानें पुढें सरलें म्हणजे कार्यसिद्धि उभी आहे असें वाटे. कारण, "तुका म्हणे येथें कराराचें काम। मग आहे राम जवळीच।" हा संताचा अनुभव फोल कसा ठरेल ? शिवाय या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखी अशी एक गोष्ट आहे कीं, लोकमान्यांच्या सबंध हयातींत त्यांचें कोणतेंहि कार्य विरोधाशिवाय कधीं शेवटासच जाऊं नये असाच त्यांचा ग्रहगुण होता. सबंध आयुष्यभर संकटें व विघ्नें यांच्याशीं एकसारखें झुंजून व त्यांना पराभूत करून यश मिळविणाऱ्या या महापुरुषाच्या याच ग्रहगुणामुळें, त्यांच्याविषयींची प्रत्येक गोष्ट विरोधानें व्यापून मग शेवटीं ती यशस्वी व्हावी असाच ईश्वरी नेमानेम असल्यानें प्रस्तुतसारख्या प्रकरणींहि तोच अनुभव यावा हेंहि स्वाभाविकच आहे.

प्रस्तुत खंडांतील आठवणी-लेखक बहुतेक सर्व नवीन आहेत व त्यांच्या विविध आठवणींचे प्रसंगहि प्रायः अभिनव व स्वतंत्र आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. एकदां एकाच्या मजकुरात येऊन गेलेली गोष्ट पुनः दुसऱ्याच्या मजकुरांत आली तर ती किंवा एखादी थोडी अस्वाभाविक वाटणारी गोष्ट आम्हीं होऊनच पहिल्या खंडाचे वेळीं गाळिली होती. उदाहरणार्थ :—टिळक कसे काय शिकवितात हें पाहण्याकरितां एकदां न्या. माधवराव रानडे लॉ क्लासमध्यें टिळक शिकवीत असतां गुपचूप बांकावर येऊन बसले वगैरे. हा प्रसंग पहिल्या खंडाचे वेळीं लोकमान्यांच्या लॉ क्लासांतील एका विद्यार्थ्यानें पण हल्लीं वकील असलेल्या एका गृहस्थानें लिहिलेला मजकुरांतून आम्हीं कमी केला होता. पण पुढें बऱ्याच जणांकडून तो प्रसंग वर्णन करण्यांत आल्यामुळें दुसऱ्या व प्रस्तुत खंडामध्यें तो मुद्दाम तसाच कायम ठेविला आहे. अशा क्वचित् कांहीं प्रसंगांची पुनरुक्ति निरनिराळ्या व्यक्तींच्या मजकुरांत झाली असल्यास ती बुद्धिपुरस्सरच होऊं दिली आहे. कारण एका थोर ग्रंथकाराच्या मताप्रमाणें अशी पुनरुक्ति म्हणजे ती गोष्ट खरी असल्याचा एक उत्कृष्ट पुरावाच होय. सदर ग्रंथकार म्हणतो, "प्रत्येक आठवणींत व आख्यायिकेंत थोडी तरी माहिती म्हणून असते, हें तर झालेंच; पण एकाच मुद्द्याला लागू अशी माहिती निरनिराळ्या आठवणींत किंवा आख्यायिकेंत निरनिराळ्या परिस्थितीच्या कोंदणांत बसलेली आढळल्यानें चरित्रविषयाचे विवक्षित गुण किंवा दोष 'सिद्ध झाले' असें मानतां येनें. दहांनीं दहा प्रकारांनीं एकच गोष्ट सांगितली असतां ती शास्त्रीय दृष्ट्या निःसंशय सिद्ध म्हणून सहजच ठरते. एखाद्याची दृष्टि किंवा अनुमान चुकेल, दोघांचें चुकेल; पण तीच गोष्ट किंवा अनुभव सांगणारे जितके अधिक लोक भेटतील तितकें तिच्या सत्यतेविषयीं अनुमान अधिक सुदृढच होणार !" तथापि मजकूर पाठविणारांच्या बहुतेक सर्व लिखाणांत जो कांहीं ठराविक गोष्टींविषयीं हटकून ठरलेला मजकूर येत असे तो मात्र सर्व काढून टाकण्यांत आला आहे. उदाहरणार्थ, (१) स्वतःची लोकमान्यांविषयींची भक्ति. (२) त्यांचें प्रथम दर्शन व त्याचा मनावर झालेला परिणाम. (३) मिरवणुकी, सभा, मेजवान्यांचा थाटमाट वगैरेचीं वर्णनें. (४) सर्वसामान्य स्तुति. (५) मृत्यू-

बद्दल दुःखोद्गार. (६) आठवणी पाठविण्याबद्दल बापटांचा आग्रह वगैरे. वस्तुतः ज्याच्या त्याच्या दृष्टीनें वरील प्रकाराचा मजकूर ज्याचा त्यास महत्त्वाचा व अगत्याचा वाटणें स्वाभाविक आहे. फार काय पण आम्हासहि त्यांत एक प्रकारची लज्जत आहे असेंच वाटतें. पण लज्जतदार झाला म्हणून त्यासहि कांहीं सीमा असावी लागते. नाहीं तर सगळाच बेचवपणा उत्पन्न व्हावयाचा! या दृष्टीनें तो मजकूर कमी केला आहे. असो. या काय किंवा पहिल्या दोन खंडांतील काय कांहीं मजकूर अगदींच सुमार आहे असेंहि कोणास वाटेल व तें वाटणें कदाचित् बरोबरहि असेल. मोत्यांचा कंठा झाला म्हणून त्यांतील सारेच दाणे कांहीं एकसारखेच असतात असें नाहीं. कांहीं मजकूर सामान्य असला तरी तो असामान्य व्यक्तींचा म्हणून व कांहीं सामान्य व्यक्तींचा तो अर्थातच असामान्य म्हणून समाविष्ट करण्यांत आला आहे. तथापि कोणास असेंहि वाटण्याचा संभव आहे कीं, ज्या कोणास टिळकांविषयीं यःकश्चित जें कांहीं आठवलें तें त्यानें लिहून पाठविलें व संग्राहकानें तरतमबुद्धीस फांटा देऊन व विवेचकपणा न चालवून केवळ हपापल्याप्रमाणें हें सर्व रटचाळ छापून टाकिलें झालें! म्हणून येथें एवढें सांगणें अगत्याचें आहे कीं, या ग्रंथाकरितां सहसा कोणी आपण होऊन मजकूर पाठविला नाहीं. तर, ज्यांस तो माहीत आहे अशांचा पत्ता-छडा लावून, त्यांचेमागें लागलागून तो मिळविला व त्यांपैकीं ज्यांत विशेष कांहीं वाटलें नाहीं अशा सुमारें पाऊणशेंहून अधिक लोकांचा मजकूर अजीबात बाजूस काढून टेविला. बाकीच्या उरलेल्या मजकुराचे पोहे कांडून घेतले व नंतर ते पाखडून, फुंकून, निवडून वाचकरूपी श्रीकृष्णास अर्पण करीत आहे! दुसऱ्या खंडामध्यें एकंदर २७० जणांच्या आठवणी प्रसिद्ध करण्यांत आल्या व त्याचीं पानें ७२५ झालीं, तर प्रस्तुतच्या याहि खंडांत तितक्याच गृहस्थांनीं आपल्या आठवणी लिहिल्या आहेत, पण याचीं पानें मात्र ६०० च झालीं यावरून या खंडांतील मजकुरास तो पाठविणाऱ्या सर्व आठवणी-लेखकांच्या शिव्याशाप व राग पत्करून, कशी कात्री लावण्यांत आली किंवा तो सर्व मजकूर किती बारीक चाळणींतून चाळण्यांत आला हें वाचकांचे नजरेस यावें म्हणून मुद्दाम याचा निर्देश केला आहे. तथापि आठवणींच्या या

पोह्यांतील भुगा इतका टाकाऊ व निरर्थक आहे कीं, तो हातीं धरण्याच्याहि किमतीचा नाहीं असें कांहीं नाजुक प्रकृतींच्या लोकांस वाटेल हें गेल्या दोन खंडांवरील टीकेवरून मी जाणून आहें. म्हणून अशांस मी उत्तर देत न बसतां माझें मनोगत बॉसवेलच्याच शब्दांनीं सांगतों. तो म्हणतो, "I am fully aware of the objections which may be made to the minuteness on some occasions of my detail of Johnson's conversation, and how happily it is adapted for the petty exercise of ridicule, by men of superficial understanding and ludicrous fancy : but I remain firm and confident in my opinion, that minute particulars are frequently characteristic, and always amusing, when they relate to a distinguished man. I am, therefore, exceedingly unwilling that anything, however slight, which my illustrious friend thought it worth his while to express, with any degree of point, should perish." तसेंच सदर खंडांतील इंग्रजी आठवणींच्या मजकुरासंबंधानें एवढेंच म्हणावयाचें कीं, त्यांपैकीं कांहीं भाग फारसा आठवणींच्या स्वरूपाचा नसून तो निवळ गुणवर्णनपर (Appreciation) असतांहि घेतला आहे. पण याचें कारण मी सांगण्यापेक्षां माझ्या इंग्रजी आठवणींच्या पहिल्या खंडाचे पुस्तकास प्रस्तावना लिहिणारे श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या मार्मिक प्रस्तावनेंत जें कारण दिलें आहे तेंच येथेंहि लागू पडणारें आहे म्हणून येथें उद्धृत करतों. तात्यासाहेब म्हणतात—"The reminiscences contained in this book are mostly by those who came into contact with Lok. Tilak, but comparatively at a distance; and therefore they may look more like appreciations than reminiscences. But even these have their own value as coming from illustrious men and women, who were his contemporary judges and in a few cases also his co-workers."

गालबोटाखेरीज सौंदर्य खुलत नाहीं म्हणतात त्याचप्रमाणें आक्षेपाशिवाय कोणतेंहि कार्य पूर्ण सिद्ध न व्हावें हेंहि स्वाभाविकच आहे. कांहीं जण म्हणतात कीं, "या आठवणींच्या द्वारें बापट यांनीं टिळकांस देवकोटीस पोंचविलें आहे! त्यांच्या या सर्व पुस्तकांत जेवढें स्तुतिपर कोणी लिहील तेवढेंच छापणार; दुसरी बाजू तुम्हांस येथें पाहावयास मिळावयाची नाहीं." वस्तुतः आठवणींच्या तीनहि भागांतील प्रत्येक ओळ ज्याच्या त्याच्या सहीनिशीं छापण्यांत आली असतां, म्हणजे ज्या शेंकडो लोकांनीं, 'ज्याचा अनुभव जैसा। तो तो बोलतो तैसा'। या दासोक्तीप्रमाणें लोकमान्यांविषयीं आपले अनुभव प्रामाणिकपणें व जबाबदारीनें आपल्या सहीनें प्रसिद्ध केले असतां ते मात्र सर्व खोटे—टिळकांस देवकोटीस पोचविणारे—आणि ज्यांनीं त्यांच्या जन्माचा उभा दावा साधला व सर्वंध जन्मांत साधें 'लोकमान्य' म्हणण्यासहि ज्यांची जीभ आडवी पडते ते मात्र सच्चे—टिळकांचें यथार्थ वर्णन करणारे—असेंच म्हणावयाचें कीं नाहीं? पण सर्वांत धादांत खोटें विधान म्हणजे टिळकांबद्दल जो कोणी अनुकूल लिहील तेवढ्याकडून व तेवढाच मजकूर मीं घेतलेला आहे, प्रतिपक्षीयांस विचारलें नाहीं व त्यांनीं कोणी मजकूर दिला असतां तो मीं घेतला नाहीं, हें होय. पण हें बोलणें खोटें करण्यास हातच्या कांकणास आरसा कशाला? प्रो. भानु, सी. के. बोले, बॅ. गाडगीळ, धोंडोपंत कर्वे, कै. विठ्ठलराव पाठक, सी. वाय. चिंतामणी, सर नारायण चंदावरकर, वाग्भट ना. देशपांडे, ल. र. गोखले, कै. पारसनीस, प्रो. काळे, सर गंगाधरराव चिटणीस, सुरेंद्रनाथ बानर्जी, दि. ब. गोडबोले, डॉ. भांडारकर, वि. रा. शिंदे. के. सि. ठाकरे, रे. मॅकनिकल, नामदार शास्त्री, रँ. परांजपे, डॉ. मॅन, के. नटराजन, बापूसाहेब जठार, सर विश्वेश्वर अय्या, बॅ. जिना, नटेसन, प्रि. राजवाडे इत्याद्यनेकांच्या आठवणी छापण्यांत आल्या आहेत. हे काय सर्व टिळक पक्षाचे व यांनीं काय टिळकांची आरती करण्यास पंचारती हातांत घेतली आहे? तसेंच येथील व मुंबईतील दोघां मुरब्बी नेमस्तांनीं आपण टिळकांच्या विरुद्ध आठवणी देणार आहोंत असें मला सांगितलें असतांहि त्या देण्याबद्दल सतत दोन वर्षं मीं त्यांचा कसा पिच्छा पुरविला, पण अखेर त्यांपैकीं एकानें टाळाटाळी करून व

दुसऱ्यानें मजवरच उलटें काहून कशा दिल्या नाहींत याबद्दल त्यांची साक्ष काढण्यासारखी आहे! फार काय ज्या कांहीं प्रत्यक्ष लोकमान्यांच्या अनुयायांनीं लोकमान्यांचे दोषदर्शक असें कांहीं प्रसंग लिहिले तेहि छापण्यांत आलेले आहेत, हें ढोबळ दृष्टीनें पाहाणारासहि दिसून येईल. म्हणून माझें असें उघड आव्हान आहे कीं, टिळकांसंबधीं महत्त्वाचा, पण त्यांचे उलट असलेला मजकूर मला कोणी देत असतां तो मी घेण्याचा नाकारिला असें कोणींहि दाखवून द्यावें. अहो, जेथें मनांतच नाहीं तेथें मजकडून असें वर्तन होईल तरी कसें? आठवणींच्या पहिल्या खंडाच्य आत्मनिवेदनांत मीं म्हटलेंच आहे कीं, "या बाबतींत पक्षभेद, जातिभेद, किंवा दुसरे कोणतेहि क्षुद्र विकार मनांत न आणतां सरकारी नोकर, मवाळ, जहाल, ब्राह्मण, अब्राह्मण, सुधारक, उद्धारक, सत्यसमाजिस्ट, राष्ट्रीय, प्रागतिक, सहकारी, असहकारी, प्रतियोगी, स्वराज्यवादी वगैरे सर्व मतांचे लोकांस तसेंच हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती वगैरे धर्मांच्या स्त्री-पुरुषांस मी एकजात विनंती केली आहे." अशा रीतीनें पहिल्यापासून माझें धोरण स्पष्ट जाहीर केलें असतां वरील आक्षेपकां-प्रमाणें पण त्यांच्या अगदीं उलट आक्षेप घेणारेहि कांहीं कट्टर टिळकभक्त मला भेटले. त्यांपैकीं एक प्रसिद्ध पुढारी मला मोठ्या रागारागानें म्हणाले "जन्मभर टिळकांचें शत्रुत्व करणाऱ्या व सरकारास साथ देणाऱ्या या... लोकांसारख्यांच्या तुम्ही आठवणी कां घेतल्या? आणि त्या तुम्ही घेतल्या म्हणूनच केवळ मी तुम्हास माझ्या आठवणी देत नाहीं. मला त्यांचा विटाळ नको!" पण तत्काळ मी त्यांस म्हणालों, "मित्र काय किंवा अनुयायी काय, केव्हांहि स्तुतिपर बोलतीलच; पण जेव्हां शत्रु किंवा प्रतिपक्षी तसें बोलतो तेव्हां मात्र त्याचें फार महत्त्व असतें. आणि याच दृष्टीनें मी सर्वां-पुढें झोळी पसरली आहे." शिवाय हें धोरण स्वीकारण्यास स्फूर्ति मिळाली ती पंडित मोर्ले यांनीं लिहिलेल्या ग्लॅडस्टनच्या चरित्रावरून. सदर ग्रंथाच्या आत्मनिवेदनांत ते म्हणतात, "हा ग्रंथ तयार करण्यास लागणाऱ्या असंख्य कागदपत्रांची मदत मिळविण्यासाठीं व्हिक्टोरिआ राणीस विचारलें. तेव्हां त्या म्हणाल्या, 'पक्षातीत राहून हें चरित्र बनवाल तरच तें श्रेष्ठ दर्जाचें होईल;' आणि तसें मीं केलें म्हणून या स्वरूपांत हा ग्रंथ दिसत आहे."

आणि मीहि त्याचाच अनुवाद करून म्हणतों कीं, हेंच व्यापक धोरण मी स्वीकारलें म्हणूनच लोकमान्यांच्या आठवणींचे वैचित्र्यपूर्ण तीन खंड प्रसिद्ध करण्याइतकी सामुग्री उपलब्ध झाली.

वाङ्मयांतील 'आठवणी'च्या स्थानाची तात्त्विक व अत्यंत मार्मिक चर्चा पहिल्या खंडाच्या सुंदर प्रस्तावनेंत गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांनीं केली असल्यामुळें वास्तविक या मुद्द्यास स्पर्श करण्याचाहि माझा अधिकार नाहीं. परंतु माझ्या एका विद्वान व सर्व इंग्रजी वाङ्मयाचें अलोडन केल्याबद्दलच्या अभिमानानें बोलणाऱ्या मित्रानें या बाबतींत कांहीं उद्‌गार काढले म्हणून त्यासंबंधानें दोन शब्द लिहिणें कर्तव्य वाटतें. आमच्या आठवणींच्या ग्रंथांसंबंधानें सरसकटपणें निषेधात्मक व तुच्छतापूर्वक विधान करून ते मला म्हणाले, "अहाहा ! काय तुमची तीं आठवणींचीं पुस्तकें ! त्यांत कोणाच्या आठवणी आहेत तर म्हणे, आचाऱ्यांच्या, गड्यांच्या, कारकुनांच्या व पुजाऱ्यांच्या; आणि ते कोणासंबंधानें त्या सांगणार ? तर, लोकमान्यांसारख्या प्रत्यक्ष एका अनभिषिक्त राजासंबंधीं ! इंग्रजी वाङ्मय पाहा, त्यांत विद्वान व विद्वत्त्व याशिवाय असला लवलेशहि सांपडावयाचा नाहीं." मीहि या बाबतींतील थोडेंबहुत इंग्रजी वाङ्मय चाळलें आहे. परंतु माझा अनुभव मात्र आमच्या मित्राच्या अगदीं उलट आहे. माझ्या माहितीप्रमाणें इंग्रजी वाङ्मयांत अशा प्रकारचें वाङ्मय फारच थोडें आहे. किंबहुना तें अगदीं अलीकडेच निर्माण होऊं लागलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. पण याचा अर्थ असा नव्हे कीं, इंग्रजी वाङ्मयांत आठवणी लिहिण्याची कल्पना नाहीं किंवा असल्यास ती अगदीं अर्वाचीन असून फार अल्पप्रमाणांत आहे. फार काय पण आपल्या स्वतःच्या किंवा एक व्यक्तीनें दुसऱ्या एखाद्या प्रसिद्ध मनुष्याच्या आठवणी लिहिणें हा चरित्रें लिहिण्याइतकाच पाश्चात्य देशांत अलीकडे सर्वसाधारण एक उद्योग होऊन बसला आहे, हें मला माहीत आहे. पण मला म्हणावयाचें आहे तें असें कीं, कोणाहि एका प्रसिद्ध व्यक्तीशीं संबंध आलेल्या अनेक लहानमोठ्यांच्या उद्बोधक व लहान-मोठ्या आठवणी एकत्र करून त्या प्रसिद्ध करण्याची कल्पना पाश्चात्य देशांतहि अगदीं अलीकडची आहे व तीहि अद्याप विशेष मोठ्या प्रमाणांत वाढलेली दिसत नाहीं. नेपोलियनविषयक माहितीचीं कमींत कमी

दीडशें पुस्तकें उपलब्ध आहेत व त्यांत त्याच्या आठवणीविषयींचीं सुमारें चाळीसहूनहि अधिक असतील. एकट्या M. De Bourrienne यानेंच आपल्या आठवणींचे सहा खंड लिहिले आहेत. पण हीं सर्व पुस्तकें प्रत्येकानें आपापल्या स्वतः एकट्याच्या आठवणींचीं लिहिलेलीं. मी म्हणतों तशा तऱ्हेचें पुस्तक प्रत्यक्ष नेपोलियनचे बाबतींतहि पाहावयास सांपडत नाहीं. यास दाखला पाहिजे असल्यास तो १९२५ सालीं लुईस कोहेन यानें बऱ्याच लोकांनीं आपापल्या म्हणजे एकेकट्या लिहिलेल्या नेपोलियनच्या आठवणींच्या पुस्तकांतून कांहीं निवडक गोष्टी अथवा आख्यायिका वेंचून त्यांचे Nepoleonic Anecdotes म्हणून जें सुंदर पुस्तक तयार केलें त्याचे प्रस्तावनेंत सांपडण्यासारखा आहे. तो म्हणतो— "It is strange that hitherto no lengthy book, either in France or in England, has been published devoted exclusively to Napoleonic Anecdotes; if there be such a work it has escaped the notice of the writer, who for the last thirty years, has been an assiduous reader of French Empire literature." पण मी म्हणतों अशा घाटाचें पुस्तक पाहिजे असल्यास तें रॉबर्ट लुईस स्टीव्हन्सन यांचेसंबंधानें सन १९२३ सालीं रोझेलाईन मॅसन यांनीं लिहिलेलें 'I can remember Robert Louis Stevenson' हेंच काय तें पहिलें होय; व हें मीच म्हणतों असें नव्हे, तर वरील ग्रंथकर्तीस सदर विषयासंबंधानें मी लिहिलें असतां त्यांजकडून आलेलें उत्तर माझ्या विधानास पुष्टिकारकच आहे. म्हणून तें येथें देतों—

20 Ann Street,
Edinburgh.
December 2nd 1927.

Dear Mr. Bapat,

I am glad to hear that you like my Stevenson books, and I thank you for telling me. I am not aware of any other book similar to my "I can remember Robert Louis

Stevenson", and I have asked at one of the chief bookshops in Edinburgh as well as in London, and have been told there that they have never heard of anyone of the same kind,—that is, of a book of reminiscences of one individual person, written by different persons. They say this is, perhaps, the new type of a book in the English literature......I thought of a book of this kind because I knew so many persons who had recollections of Stevenson, and it seemed a great pity they should be lost. I thought at first of collecting only the few reminiscences I knew about, but then, in the course of collecting them, I heard of others, and so the book grew to its present size......I have sometimes seen in the newspaper suggestions that a similar book might be compiled—I think one suggestion was that there were people who remembered Carlyle—but I do not know of anyone having carried out any such suggestion. If I hear of any, I will let you know.

With kind regards, I am,
Yours sincerely,
(Sd.) Rosaline Masson

यावरून समजून येईल कीं, इंग्रजी वाङ्मय एवढ्याच एका विशिष्ट बाबीपुरतें मराठी वाङ्मयाच्या फारसें पुढें गेलेलें नाहीं. अशी स्थिति असतां आमच्या विद्वान व इंग्रजी-भाषाकोविद मित्राला आमच्या ग्रंथापेक्षां इंग्रजींतील असे कोणते एकजात विद्वानांनीं लिहिलेले आठवणींचे विद्वत्ताप्रचुर ग्रंथ दिसले? प्रसिद्ध क्रिकेटियर डब्ल्यू. जी. ग्रेस यांच्याबद्दलच्या आठवणींचें अलीकडे एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. पण त्यांतील आठवणी आमच्या विद्वान मित्रांस इतक्या क्षुल्लक वाटतील कीं त्यांस तें पुस्तक क्षणभरहि हातीं धरवणार नाहीं. नेपोलियनविषयीं आपल्या स्वतःच्या आठवणी लिहिणाऱ्या चाळीस

लेखकांपैकीं एक तर त्याचा वाढप्या, दुसरा त्याचा हुजऱ्या व तिसरा त्याचा खास मोतद्दारच आहे! पण यांत कमीपणा मानण्यासारखें खरोखर काय आहे? माझी तर अशी पक्की खात्री आहे कीं, एखादे वेळीं लोकमान्यांचा मंडाले येथील आचारी, त्यांचा परिचारक, त्यांचा नेहमींचा लेखक, किंवा गायकवाडवाड्यांतील त्यांचे मर्जीतील खास कारकून श्री. यशवंतराव कुलकर्णी असे लोक त्यांच्या चरित्रावर उत्कृष्ट प्रकाश पाडण्यासारखी जी एखादी गोष्ट सांगू शकतील ती युनिव्हर्सिटीच्या पदव्या मिळवून त्यांच्या चरित्रावर एक डझन ग्रंथ किंवा प्रबंध प्रसिद्ध करण्याची जाहिरात देऊन लिहिण्यास बसणाऱ्याच्या कलमांतूनहि खास उतरणार नाहीं. बॉसवेल म्हणतो, "More knowledge may be gained of a man's real character by a short conversation with one of his servants than from a formal and studied narrative." चॅनिंग लिहितो, "One simple anecdote of a great man is worth a volume of biography." वुईल मॉट सांगतो, "Occasionally a single anecdote narrated by any person opens a character; reminiscences enable the skilful hand to construct the skeleton." प्लुटार्क प्रतिपादितो, "Nor is it always in the most distinguished achievements that men's virtues or vices may be best discerned; but very often an action of small note, a short saying, or a jest, shall distinguish a person's real character more than the greatest sieges, or the most important battles."

प्रस्तुतचा हा लोकमान्यांच्या आठवणींचा शेवटचा खंड असल्यामुळें सिंहावलोकनादाखल तीनहि खंडांसंबंधाची थोडी संकलित माहिती येथें केली तर तें अप्रासंगिक व अनुचित होईल असें वाटत नाहीं. माहिती ग्रंथित म्हणजे तीनहि खंडांच्या बाह्य स्वरूपाचा एक प्रकारचा आढावाच होय. या त्रिखंडात्मक ग्रंथाकरितां झालेला पत्रव्यवहार व त्याची फलश्रुति कोष्टकरूपानें देतों—

| खंड | ग्रंथाची पृष्ठसंख्या | किती लोकांस लिहिलें | पत्रसंख्या | आठवणी पाठविणारांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ५५० | ३०० | ११०० | १६० |
| २ | ७२५ | ६५० | २७७२ | २७० |
| ३ | ६०० | ६१७ | २१२० | २७१ |
| एकूण | १८७५ | १५६७ | ५९९२ | ७०१ |

म्हणजे सरासरीने विनंति करण्यांत आलेल्या लोकांच्या निम्मेजणांकडून मजकूर मिळाला व तो प्रत्येकास साधारणपणें सातआठ पत्रें लिहून ! यांत संग्राहकाच्या स्वतःच्या १४२ पानांच्या आठवणी असून त्यानें लिहून काढलेल्या इतरांच्या आठवणींचीं २५० पानें सहज भरतील. असो. वरील ७०१ आठवणी-लेखकांचें स्थूल मानानें वर्गीकरण केलें तर तें पुढीलप्रमाणें होईल. स्त्रिया १५, धर्मगुरु ३, पदवीधर २८२, प्रोफेसर ५२, बॅरिस्टर ३१, वकील १४५, आमदार व खासदार २७, पार्लमेंटाचे सभासद ८, वर्तमानपत्रांचे संपादक ८२, शास्त्री—पंडित २३, डॉक्टर २८, कमिशनरजज्ज वगैरे दर्जाचे पेन्शनर १४, कीर्तनकार ७, नट ६, कवि १९, कारखानदार १७, ग्रंथकार ५२, शिल्पकार ८, ज्योतिषी ९, इंजिनिअर ७, कॉलेज–प्रिन्सिपल ९, राजे-महाराजे–संस्थानिक–सरदार–जहागीरदार २२. या पृथक्करणावरून तरी आमच्या विद्वान मित्रास वाटतें त्याप्रमाणें सारखें सारेच आठवणी–लेखक कांहीं गडी आचारी, कारकून नाहींत हें कोणाच्याहि ध्यानीं येईल. प्रस्तुत ग्रंथाची कल्पना आमच्या मित्राप्रमाणें सर्व लोकांस त्याज्य व तुच्छ वाटती तर ती उचलण्याची महाराष्ट्र वाङमय सेवकांस इच्छाच होती ना. पण लोकमान्यांच्या आठवणींच्या ग्रंथाचा पहिला खंड प्रसिद्ध झाल्यापासून अशा प्रकारचीं कांहीं पुस्तकें आपल्या मराठी सारस्वतांत निर्माण झालीं आहेत व कित्येक गर्भावस्थेंतहि आहेत. देव मामलेदार यशवंतमहाराज यांच्या आठवणी कोणी जमवीत आहे तर ज्योतीबा फुले यांच्याबद्दलहि अनेकांच्या 'स्मृत्या' जागृत करून त्या एकत्र करण्याचा प्रयत्न चालू आहे. तसेंच कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, न्या. रानडे, ना. गोखले, महर्षि आण्णासाहेब पटवर्धन, नाटयाचार्य आण्णासाहेब किर्लोस्कर,

प्रसिद्ध नट भाऊराव कोल्हटकर, कोल्हापूरचे कै. शाहू छत्रपति व इतिहास-संशोधक विसूभाऊ राजवाडे यांच्या आठवणी लवकरच प्रसिद्ध होण्याचा रंग दिसत आहे व तसें झाल्यास महाराष्ट्राच्या अनेक अंगांचा गेल्या अर्धशतकाचा तो एक चित्ताकर्षक इतिहास समजला जाईल. तेव्हां आतां सांगा बरें कीं, लहान–मोठया, गरीब–श्रीमंत, प्रसिद्ध–अप्रसिद्ध, विद्वान–अविद्वान, शत्रु–मित्र, अशासारख्या शेंकडोंनीं शेंकडो तऱ्हांनीं लोकमान्यांचें केलेलें गुणगान ऐकून व त्यांतून उद्भुत होणारा इतिहास पाहून कोणास आनंद होणार नाहीं ? इतरांबद्दल मला कांहींच म्हणतां येणार नाहीं; पण माझ्यापुरतें मी बोलावयाचें तर लोकमान्यांच्या ह्या 'त्रिखंडात्मक' विश्वरूपदर्शनानें झालेली माझ्या मनाची स्थिति संजयाच्या मुखानेंच मी सांगतों कीं "तच्च संस्मृत्य संमृत्य रूपमत्यद्भुतं हरेः। विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ॥"

आठवणींच्या ग्रंथासंबंधानें जें काय थोडक्यांत म्हणावयाचें होतें त्याचें येथवर निरूपण झालें. आतां इतर एक दोन गोष्टींसंबंधीं खुलासा करूं. लोकमान्यांच्या या वाङ्मयस्मारकास हात घालण्याच्या वेळेपासून मी मनांत गुप्तपणें कांहींएक निराळा संकल्प करून ठेविला होता व तो पूर्णपणें सिद्धीस जाईपर्यंत त्याची परिस्फुटता न करणेंच योग्य होतें. परंतु दुर्दैवानें तो सिद्धीस जाण्याची माझी सर्व आशा खुंटल्यामुळें त्याचा आतां जाहीर उच्चार करणें वावगें होणार नाहीं. मीं मनांत असें योजिलें होतें कीं, प्रथम लोकमान्यांच्या त्रिखंडात्मक आठवणी प्रसिद्ध केल्यानंतर त्यांच्या सूत्ररूप उक्तींचा संग्रह-ग्रंथ प्रसिद्ध करावयाचा आणि नंतर ज्यांविषयीं मी अत्यंत उत्कंठित होतों अशा त्यांच्या खासगी पत्रव्यवहारांचा निदान एखादा तरी ग्रंथ प्रकाशित करून शेवटीं त्यांच्या सर्व खासगी व जाहीर व्याख्यानांचा प्रसाद, ग्रंथरूपानें महाराष्ट्र वाचकांस वांटून लोकमान्यांचें हें चतुर्दलात्मक वाङ्मयस्मारककार्य आपल्यापुरतें समाप्त करावयाचें परंतु ईश्वरी संकेत तसा नव्हता. किंवा असें म्हणण्यापेक्षां तो संकेत व्यवहारसिद्ध होण्यास माझे ठायीं असावयास पाहिजे ती पुण्याई नसल्यामुळें माझा हात अपेशी ठरला—निदान पूर्ण यशस्वी ठरला नाहीं असेंच म्हणणें अधिक रास्त होईल, हें खालील हकीकतीवरून कळून येईल.

लोकमान्यांचा प्रचंड व्याप व सर्वत्र पसरलेला त्यांचा गोतावळा लक्षांत घेतां त्यांच्या पत्रव्यवहाराचा एखादा ग्रंथ तयार करणें कांहीं मोठें कठीण व अशक्य काम नव्हतें. आणि तो ग्रंथहि फक्त जावक पत्रांचा म्हणजे त्यांनीं पाठविलेल्या पत्रांचा.—त्यांस आलेल्या पत्रांचा नव्हे. कित्येक वेळां मनुष्याचें खरें हृद्गत अशा खासगी पत्रांतूनच प्रतिबिंबित होतें म्हणून मोठ्या लोकांचीं अशीं खासगीं पत्रें एकत्रित करून त्यांचे चित्ताकर्षक व उद्बोधक ग्रंथ बनविण्याचें काम वाङ्मयप्रेमी पाश्चात्य लोकांत मोठ्या प्रमाणांत केलेलें पाहावयास सांपडतें. मलाहि त्या तऱ्हेनें प्रयत्न करण्याची इच्छा होऊन मी या कार्यास प्रवृत्त झालों व 'आठवणी 'प्रमाणें प्रथम खासगी रीतीनें लोकां-कडून पत्रें मिळविण्याचा उद्योग सुरू केला. प्रथम ठळक व नंतर मला ज्ञात अशा लोकमान्यांच्या प्रसिद्ध-अप्रसिद्ध मित्रगणांशीं पत्रव्यवहार सुरू केला व तोहि बहुत झाला; पण नुसत्या खासगी प्रयत्नानें हें काम भागणार नाहीं असें वाटल्यावरून ता. १९–१–१९२६ च्या केसरींत मीं जाहीर विनंति केली कीं, "…लोकमान्यांचीं खासगी पण महत्त्वाचीं पत्रें संग्रहीत करून त्यांचें पुस्तक प्रसिद्ध करण्याचें मीं योजिलें आहे. लोकमान्यांचें कार्यक्षेत्र जितकें जितकें विस्तृत तितकाच त्यांचा खासगी व सार्वजनिक पत्रव्यवहारहि विस्तीर्ण व प्रचंड असणार हें उघड होय. तथापि वैयक्तिक, अगदींच किरकोळ व निवळ खासगी संबंधाचा मजकूर वगळून केवळ सार्वजनिक स्वरूपाच्या व विशेष महत्त्वाच्या मजकुराचींच तेवढीं पत्रें ज्यांचे-जवळ असतील त्यांनीं तीं मजकडे पाठविण्याची कृपा केल्यास या थोर राष्ट्रीय पुरुषाच्या चरित्रग्रंथाच्या महावस्त्रास एक तंतु पुरविल्याचें पुण्य त्यांस खचित लाभणार आहे." या जाहीर विनंतीचा व कळकळीच्या आणि सतत आग्रहपूर्वक केलेल्या खासगी विनंतीचा खास उपयोग होईल असें मला वाटलें होतें. पण या बाबतींत यश न मिळण्याची दीर्घ सूचना पहिल्या-पासून देणारे गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचाच अनुभवसिद्ध अदमास अखेर खरा ठरला. पण तात्यासाहेबांस फारसें न कळूं देतां मी जोरानें केलेल्या या उद्योगास मला यश किती आलें? तर सांगण्यास खेद होतो कीं, सारीं तीस–पसतीसच पत्रें माझ्या हातास लागलीं व तींहि अगदींच सामान्य मजकुराचीं म्हणजे जवळजवळ निरुपयोगीच. म्हणून तीं सर्व पत्रें

वचन दिल्याप्रमाणें ज्यांचीं त्यांस परत पाठविलीं. लोकमान्यांचीं महत्त्वाचीं व निवडक पत्रें न मिळण्याच्या या दोषाचीं माझ्या मतें मुळीं वांटणीच होऊं शकत नाहीं. कारण तो सर्व दोष एकट्या सरकारनिर्मित परिस्थितीच्या माथ्यावर लादण्यास मला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. कारण ज्या अनेक लोकांकडून व लोकमान्यांच्या मित्रमंडळींकडून पत्रें न पाठवितां येण्याचीं कारणें मला कळविण्यांत आलीं तीं बहुतेक एकाच नमुन्याचीं होतीं. कोणीं लिहिलें कीं, "माझ्या घराची झडती होणार हें कळतांच मीं तीं सर्व बहुमोल पत्रें फाडून टाकलीं." कोणी कळविलें कीं, "टिळकांस १९०८ सालीं पकडल्यावर आमचेवर पोलिसांचा दांत राहिल्यामुळें आम्हीं इतके दिवस जपून ठेवलेलीं तीं सर्व मौल्यवान पत्रें एका मित्राजवळ ठेवण्यास दिलीं पण त्याचे घरीं तीं गहाळ झालीं!" एका थोर देशभक्तानें सांगितलें कीं, "प्रत्यक्ष मलाच पकडण्याची पाळी आली तेव्हां माझ्या महत्त्वाच्या सर्व कागदपत्रांबरोबर टिळकांचींहि पत्रें आम्ही अग्निसात् केलीं!" लोकमान्यांचे एक जिवलग स्नेही म्हणाले, "अहो, मागेंपुढें बळवंतरावजींच्या पत्रांचा असा ग्रंथ निघेल असें वाटलें असतें तर तीं रक्षण करतां आलीं असतीं. आम्हांस आलेल्या त्यांच्या पत्रांपैकीं कित्येक पत्रें इतकीं चांगलीं होतीं कीं तेवढ्यांचेंच एक तुम्हास पाहिजे तसें पुस्तक बनलें असतें. पण तें बोलून आतां काय उपयोग? तीं सर्व पत्रें जेव्हांच्या तेव्हांच नष्ट करण्यांत आलीं!" सारांश, अशा रीतीनें कोणीं कांहीं, कोणीं कांहीं कळविलें. निराशा झाली. वाईट वाटलें. बहुत दिवसांची उमेद व गोड कल्पना सोडून द्यावी लागली. पण मनांत विचार आला कीं, जेथें तात्यासाहेब केळकर यांचेसारख्यासहि "टिळकांचा पत्रव्यवहार अगदींच थोडा होता असें नाहीं; पण या चरित्राकरितां जाहीर विनंती केली असतांहि आम्हाला महत्त्वाचीं अशीं टिळकांचीं दहापांच पत्रें देखील मिळालीं नाहींत" असे उद्गार काढावे लागतात तेथें आपण व आपला प्रयत्न कोणत्या झाडाचा पाला! तथापि दुधाची तहान ताकानें भागवून घेण्याप्रमाणें कां होईना, तात्यासाहेबांनीं टिळकचरित्राच्या दुसऱ्या खंडांत लोकमान्यांनीं मंडालेच्या तुरुंगांतून पाठविलेलीं पत्रें छापलीं आहेत, ही फारच बहारीची

गोष्ट केली व आपली अतृप्त इच्छा अशा प्रकारें संतृप्त झाली म्हणून मला आनंद झाल्याशिवाय राहात नाहीं.

लोकमान्यांच्या लहान-मोठ्या, खासगी–जाहीर, अशा सर्व व्याख्यानांचें पुस्तक मराठींत उपलब्ध नाहीं. कारण कोणाहि लघुलेखकानें तीं व्याख्यानें घेतलेलीं नाहींत. कै० सदाशिव हरि भावे यांनीं त्यांच्या व्याख्यानांचीं दोन पुस्तकें प्रसिद्ध केलीं, पण तीं वरील पद्धतीनें तयार केलेलीं नाहींत व तींहि दुर्दैवानें सरकारजमा झालीं आहेत. कै० त्र्यंबक गुरुनाथ काळे, श्री. हरि रघुनाथ भागवत, ह. भ. प. पांगारकर वगैरे कांहीं गृहस्थांनीं त्यांचीं कांहीं व्याख्यानें प्रसिद्ध केलीं; पण तीं सर्व लघुलेखकानें लिहिलेलीं नाहींत. नाहीं म्हणावयास १९१६ सालच्या स्वराज्य संघाच्या चळवळींत प्रसिद्ध झालेलें लोकमान्यांच्या व्याख्यानांचें एक अगदीं छोटेखानी पुस्तक आहे, पण तें सरकारी रिपोर्टरांनीं घेतलेल्या आक्षिप्त व्याख्यानांचें! तात्पर्य, अस्सल म्हणजे लोकमान्यांच्या तोंडांतून निघालेल्या शब्दांतच प्रसिद्ध झालेलीं म्हणजे, लघुलेखकानें घेतलेलीं व्याख्यानें जवळजवळ नाहींतच म्हटलें तरी चालेल. ही उणीव भरून काढण्याचें कल्पनातीत काम मी मनांत योजिलें होतें तें असें. चिरोल खटल्याच्या निमित्तानें मुंबई येथें कमिशनपुढें साक्षीपुरावा चालू असतां मुंबई सरकारच्या न्यायखात्याचे सेक्रेटरी लॉरेन्स रॉबर्टसन यांना उलटतपासणींत सांगितलें होतें कीं, "पोलीसनें संग्रह करून जमविलेलें टिळकांचें सार्वजनिक चरित्र मजजवळ आहे. सरकारनें तें छापलेंहि आहे." तसेंच सरकारी नोकरींत वरिष्ठांतील वरिष्ठ दर्जावर असलेल्या एका हिंदी सद्गृहस्थाकडून मला कळलें होतें कीं, "सन १८९६ सालापासून १९२० सालीं मुंबईस सरदारगृहांत आजारी पडून वातामध्यें बोलल्या गेलेल्या शेवटच्या शब्दापर्यंत टिळकांचा प्रत्येक शब्दन् शब्द सरकारी दप्तरांत टिपला गेलेला आहे. मग त्यांच्या जाहीर व्याख्यानासंबंधानें जास्त काय सांगावें?" वरील दोनही गोष्टी समजल्यापासून सरकारी दप्तरांतून योग्य मार्गानें टिळकांचीं लघुलेखानें घेण्यांत आलेलीं सर्व व्याख्यानें व शक्य तर सरकारलिखित चरित्र मिळविण्याच्या मृगजलामागें धांवण्याच्या नादास मी लागलों. या बाबतींत केलेल्या प्रयत्नांचा जाहीर उच्चार करणें म्हणजे स्वतःच्या नादिष्टपणाचें खासें प्रदर्शन करणें

होय. म्हणून शेवटीं एवढेंच सांगतों कीं, प्रस्तुत प्रकरणीं मला अखेर जेव्हां असें सांगण्यांत आलें कीं, "सदर कागदपत्र हे मुंबई-सरकारचें गुप्त व मौल्यवान दप्तर जेथें असतें तेथेंच ठेवण्यांत आलें असून त्या खोलीच्या कुलुपावर प्रत्यक्ष गव्हर्नरसाहेबांचें सील करण्यांत आलेलें असतें; व त्यांच्या खास परवानगीशिवाय सील तोडलें जात नाहीं." तेव्हां मीं हा नाद सोडून दिला. आरंभापासूनच मी हें जाणून होतों कीं, हा प्रयत्न म्हणजे वाळूच्या कणांतून तेल काढणें आहे किंवा शेषाच्या मस्तकांतील मणि हरण करण्या-प्रमाणें होय. म्हणून या बाबतींत मला आशाच नसल्यामुळें माझी निराशा झाली नाहीं, ही गोष्ट वेगळी. तरी पण कधीं काळीं कोणा पुण्यवंत पुरुषाच्या हातास हें गुप्त धन लाभून तें लोकांस प्राप्त होण्याचा सुयोग शक्य तितक्या लवकर घडून येवो अशी परमेश्वराची प्रार्थना केल्यावांचून माझ्यानें राहावत नाहीं.

श्री. केळकरकृत टिळकचरित्र पूर्ण होण्यापूर्वीच वास्तविक आठवणींचे तीनहि खंड प्रसिद्ध व्हावयास पाहिजे होते. असें झालें असतें तर चरित्र-ग्रंथाचें महावस्त्र विणतांना आठवणींच्या कलाबतूचा उपयोग करून घेतां आला असता. तथापि आठवणींच्या पहिल्या दोन खंडांचा चरित्राच्या उत्तरार्धाच्या दोनही भागांस चरित्रकारांनीं यथाप्रमाण उपयोग करून घेतल्याबद्दल मला समाधान वाटणें स्वाभाविक आहे. इतकेंच नव्हे तर श्रीयुत तात्यासाहेबांनीं आठवणींच्या ग्रंथास इतकें महत्त्व दिलें आहे कीं, "आठवणींच्या तीनहि भागांच्या योगानें आणखी एका वेगळ्या रीतीनें टिळक चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला तें साधन उपयोगी पडण्यासारखें आहे" असें म्हणण्यापर्यंत त्यांच्या प्रांजल विचारौदार्याची व निरहंकार वाङ्मय-प्रेमाची मजल गेली आहे! एका दृष्टीनें हें म्हणणें खरेंहि आहे. कारण चरित्रलेखनास चरित्रनायकाची प्रत्यक्ष माहिती जितकी अधिक मिळेल तितकी हवीच असते. डॉ. जॉन्सन म्हणतो, Lives can only be written from personal knowledge, which is growing every day less, and in a short time is lost forever दिवसानुदिवस दुर्मिळ होणाऱ्या अशा 'आठवणी' चीं म्हणजे प्रत्यक्ष माहितीची सामुग्री एकत्रित मिळाली

असतां तिच्या साहाय्यानें एखाद्यास, तात्यासाहेबांच्या मताप्रमाणें, लोकमान्यांचें आणखी एखादें निराळें चरित्र लिहिण्याची स्फूर्ति कां न व्हावी? व ती कल्पना प्रस्तुत लेखकास कां न पटावी?

कांहीं मित्रांची अशी एक सूचना आहे कीं, या तीनहि खंडांच्या आठवणींतील अवांतर मजकुराचा सर्व विस्तार छाटून टाकून त्यांतील आठवणींचा मुख्य गाभा तेवढा एकत्रित करून त्याचें सुंदर व सुटसुटीत असें एकच पुस्तक तयार करण्यांत यावें. यास उत्तर एवढेंच कीं, "A book should be luminous but not voluminous" हें बेकनचें तत्त्व कोणास पटणार नाहीं ? कांहींनीं सुचविलें कीं, शालोपयोगी पुस्तकांत याचा समावेश होईल अशा दृष्टीनें गोष्टींची निवड करून त्याची एक स्वतंत्र आवृत्ति काढण्यांत यावी. या व अशा इतर सहानुभूतिपूर्वक सूचना करणाऱ्या मित्रांचे आभार मानून त्यांनीं केलेल्या सूचनांचा यथाकाल विचार करूं एवढेंच आज त्यांस आश्वासन देतों.

प्रस्तावना व आत्मनिवेदन अदमासाबाहेर वाढल्यामुळें या खंडास सूचि जोडूं नये असें प्रथम वाटत होतें. पण अर्वाचीन वाङ्मययुगांत ग्रंथास सूचि नसणें म्हणजे खतावणीवांचून कीर्द लिहिल्याप्रमाणें होय. इतकेंच नव्हे तर, तो पाश्चात्य राष्ट्रांत वाङ्मयक्षेत्रांतील एक मोठा गुन्हा समजला जातो. याची सत्यता लॉर्ड कॅम्बेल यांच्या पुढील उद्गारावरून कळून येईल "....So essential did I consider an index to be to every book, that I proposed to bring a bill into parliament to deprive an author who publishes a book without an index of the privilege of the copy-right, and, moreover to subject him for his offence to a pecuniary penalty." कायद्याच्या सक्तीचें भय आपणास नसलें तरी कायद्याहूनहि श्रेष्ठ असे जे आपले वाचक त्यांच्या अवकृपेचा धाक आम्हीं धरला पाहिजे व त्यांची सोय पाहणें पवित्र कर्तव्य मानलें पाहिजे. म्हणून निरनिराळ्या तऱ्हेच्या सूचि या ग्रंथाचे शेवटीं जोडण्यांत आल्या आहेत.

शेवटीं आभार मानावयाचे. आठवणींच्या रूपानें लोकमान्यांचें हें वाङ्मयस्मारक ज्या अनेक टिळकभक्त स्त्रीपुरुषांच्या साहाय्यानें मला

उभारितां आलें त्या सर्व बंधुभगिनींस एकवार शेवटचें अभिवादन करून त्यांनीं मजकडून ही सेवा करून घेतली याबद्दल प्रथम त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. वस्तुतः या तिमजली तिलक-स्मृतिमंदिराचे धनी तेच आहेत. फार तर 'ट्रस्टी' इतकेंच कदाचित् माझें नातें असूं शकेल! एवढेंच नव्हे तर, या बाबतींत माझ्या अंतःकरणांतील सदैव जागृत असणारी भावना मी माझ्या शब्दांनीं व्यक्त न करतां ती श्रीतुकारामहाराजांच्या शब्दानें सांगतों कीं, "फोडिलें भांडार। धन्यांचा हा माल। मी तंव हमाल। भारवाही॥

प्रस्तुत खंडास लोकमान्यांचे जिवलग मित्र नामदार श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनीं परिश्रम घेऊन जी विस्तृत, विवेचक व वैचित्र्यपूर्ण प्रस्तावना लिहिण्याची तसदी घेतली त्याबद्दल मी त्यांचे आभार मानीन तेवढे थोडेच आहेत. दादासाहेब आपल्या प्रस्तावनेंत म्हणतात, "बापटांच्या ग्रंथाचाहि शेवट झाला व माझाहि नजीक आला म्हणून प्रस्तावना लिहिण्यास माझी योजना केली कीं काय, कळत नाही!" दादासाहेब यांची प्रस्तावना जरी आज या शेवटच्या खंडास जाहीर स्वरूपांत प्रसिद्ध होत असली तरी १९२३ सालीं, म्हणजे अगदीं आरंभीं, येथील श्री. जगन्नाथ महाराज यांचे वाड्यांत खासगी रीतीनें या कार्याचा शुभ प्रस्ताव त्यांच्या हस्तेंच झालेला आहे व पुढील कार्यास याच 'गणेशाचा' आशीर्वाद मिळालेला आहे. शिवाय त्या वेळेपासून त्यांनीं हरएक रीतीनें दाखविलेली सहानुभूति व आत्मीयता याबद्दल मी त्यांचा अनृणी होणें अशक्य आहे.

अत्युक्तीनें कांहीं प्रसंगीं अर्थहानि होते, म्हणून प्रस्तुत कामीं मला केलेल्या साहाय्याबद्दल माझे मित्र श्रीयुत गजानन विश्वनाथ केतकर, बी.ए. एल्एल्.बी. संपादक 'केसरी' यांचें अधिक शब्दांत मी येथें मुद्दाम आभारप्रदर्शन न करण्याचें ठरविलें आहे. कारण कृतज्ञताबुद्धि शब्दातीत आहे व तिचें 'कृति' हेंच व्यक्त रूप आहे. शब्दाच्या टरफलापेक्षां कृतीचा मगजच मधुर असतो व तोच गणपतरावांस सादर करावा, असें मला वाटतें.

लोकमान्यांच्या आठवणींचा संग्रह करण्याची मूळ कल्पना व स्फूर्ति माझे परमपूज्य तीर्थरूप टिळकभक्त भाऊसाहेब यांजकडून मला मिळाली तरी ती मूर्त स्वरूपांत येऊन यशस्वी होण्यास कारणीभूत झालेले माझे स्नेही व हितचिंतक वाङ्मयविशारद श्री० काशीनाथ नरसिंह ऊर्फ बापुराव

केळकर, हायकोर्ट वकील पुणें, याचे या प्रसंगीं मनःपूर्वक आभार मानणें माझें कर्तव्य आहे. रा. बापुराव हे या कामीं आरंभापासून माझे सहकारी, सहानुभवी व सल्लागार मित्र आहेत, एवढें सांगितलें असतां त्यांच्या बहुमोल साहाय्याची कल्पना होणार आहे.

इंदूर येथील संस्कृत महाविद्यालयांत विद्वद्वर्य वे. शा. शं. करमळकर-शास्त्री यांनीं 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' हीं अक्षरें साधून रचलेला संस्कृत हारबंध (श्लोक) या ग्रंथांत घालण्यास दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेंच, ज्यांनीं मला या कामीं निरनिराळ्या रूपानें मनापासून मदत केली ते गृहस्थ म्हणजे बेळगांवचे प्रसिद्ध वकील, खासदार श्रीयुत दत्तात्रय व्यंकटेश बेळवी, श्रीयुत श्रीपाद महादेव माटे एम्. ए, पुणें, श्रीयुत काशीनाथ नारायण घारप, बी. ए. एल्एल्. बी. हायकोर्ट वकील मुंबई, श्रीयुत वासुदेव कृष्ण भावे, बी. ए. सहसंपादक केसरी पुणें, श्रीयुत दिनकर वासुदेव दिवेकर एम्. ए. सहसंपादक मराठा, पुणें, श्रीयुत गोपाळ हरि घारप अ० मॅनेजर केसरी, पुणें, गंधर्व ना० मंडळींतील प्रसिद्ध नट श्रीयुत कृष्णाजी गणेश फुलंब्रीकर ऊर्फ मास्तर कृष्णा, श्रीयुत अनंत सखाराम गोखले, मालक विजयप्रेस पुणें व सरस्वती-मंडळाच्या श्रीगणेश प्रिंटिंग वर्क्सचे चिटणीस श्रीयुत गणेश काशीनाथ गोखले यांचे मी मनापासून आभार मानतों.

सर्वांत शेवटचे पण अत्यंत आदरपूर्वक व कृतज्ञताबुद्धीनें अंतःकरणापासून आभार मानावयाचे ते गुरुवर्य तात्यासाहेब केळकर व श्रीयुत बाबासाहेब विद्वांस यांचे होत. पण ते मला शब्दांनीं व्यक्त करतां येणें अशक्य आहे. लोकमान्य टिळक यांच्या आठवणींच्या ग्रंथांचे तीनहि खंड व 'श्रीटिळकसूक्तिसंग्रह' हें सर्व या उभय टिळकविश्वसित पुरुषांच्या कृपेचें, आश्रयाचें व प्रोत्साहनाचें फल होय, एवढें सांगितलें म्हणजे त्यांच्या उपकाराची कांहींशी कल्पना होणार आहे.

शेवटीं सद्गुरु श्रीसमर्थांच्या शब्दांत वाचकांची प्रार्थना करून हें लांबलेलें आत्मनिवेदन समाप्त करतों :—

**चुकत वाकत आठवलें । इतुकें संकळित बोलिलें ।**
**न्यूनपूर्ण क्षमा केलें । पाहिजे श्रोतीं ।।**

टिळक पुण्यतिथि, शके १८५०
केसरी-कचेरी, पुणें

सर्वांचा नम्र सेवक
**सदाशिव विनायक बापट**

# लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका

## खंड ३ यांतील आठवणी

लेखक : सदाशिव विनायक बापट

[ लोकमान्यांचे लेखक, केसरी, टिळक स्वराज्य संघ, टिळक-स्मारक ट्रस्ट या संस्थांचे एक सेवक, पुणें सार्वजनिक सभेचे चिटणीस, पुणें ]

(१) लोकमान्य एकदां लिहिण्याचा मजकूर सांगत असतां एक काशीयात्रा करून आलेला भाविक मराठा मनुष्य त्यांस भेटण्यास आला. लोकमान्यांस हा अनोळखी असूनहि अगदीं घरच्या माणसाप्रमाणें तो त्यांच्याशीं बोलूं लागला व शेवटीं त्यानें काशीच्या काळभैरवाचा गंडा त्यांच्या मनगटांत बांधला. तेथें एक लोकमान्यांचे सुधारक स्नेही बसले होते. ते थोड्या रागानें लोकमान्यांस म्हणाले, "माधवराव रानडे अगर गोपाळराव गोखले असें कधींहि करून न घेते. 'तुम्ही ढोंगी आहांत' असें तुमचे शत्रू तुम्हास म्हणतात तें कां उगाच ?" थट्टेवारीवर हें बोलणें नेऊन लोकमान्य म्हणाले, "तुमचे रानडे व गोखले कसे आहेत हें मला तुम्ही सांगावयाला नको. त्यांना मी पूर्ण जाणतों. पण तें असो... ..अहो ! एक-तर यावर माझी श्रद्धा नाहीं असें नाहीं; शिवाय पुढाऱ्याला सर्वांचीं मनें धरून चालावें लागतें हें तुम्ही कसें विसरतां? कित्येक वेळां मुलाच्या चालीनें मोठ्यास चालावें लागतें ना ? शिवाय यांत नुकसान काय ? हा गंडा बांधल्यानें मला माझ्या कार्यांत यश येईल या श्रद्धेनें त्या बिचाऱ्यानें तो जपून आणून आस्थेनें माझ्या हातांत बांधला तर त्यांत तुमचें काय घोडें विघडलें ? तुमच्या मताप्रमाणें त्याचा बुद्धिभेद करून काय निष्पन्न झालें असतें ? तें कांहीं असो. आमचा हा असा खाक्या आहे खरा !" हें लोक-मान्यांचें म्हणणें ऐकल्यावर त्यांचे स्नेही थोडा आंबट चेहरा करून तेथून निघून गेले.

(२) कै. प्रो. जिनसीवाले या विद्याव्यासंगी पुरुषाजवळ एक शोभिवंत व अनेक कप्प्यांचें लिहिण्याचें मोठें टेबल होतें. प्रोफेसरसाहेबांचा सर्व लेखन-वाचनव्यवसाय या टेबलाशीं बसून होई. प्रोफेसरसाहेबांच्या पश्चात् हें टेबल त्यांच्या एका नातेवाइकाकडे गेलें. पण तें त्यांजकडून आपण विकत घ्यावें असें लोकमान्यांस वाटून त्यांनीं तें विकत घेतलें. त्याची किंमत सहज विचारतां, त्यांनीं सांगितलेल्या किंमतीच्या मानानें तें फारच महाग लागलें असें त्यांस म्हणतांच ते म्हणाले, "ज्या टेबलावर भय्यासाहेबांसारख्या सरस्वतीभक्तानें जन्मभर लिहिलें व वाचलें त्या टेबलाशीं आपला संबंध यावा व विद्यार्जनाची आपणास नेहमीं स्फूर्ति व्हावी याच केवळ एका भावनेनें मीं हें टेबल, मला महाग पडलें असलें तरी, मुद्दाम विकत घेतलेलें आहे."

(३) लोकमान्यांस मजेनें एका स्नेह्यानें विचारलें, 'आपल्या देशास स्वराज्य–स्वातंत्र्य–मिळेपर्यंत तुमची ही धडपड अशीच चालू राहणार हें मला कबूल आहे. पण समजा, उद्यां आपला देश स्वतंत्र झाला–पूर्ण स्वराज्य मिळालें–तर तुम्ही पुढें काय कराल?' चटकन् लोकमान्य म्हणाले, "स्वराज्य-स्वातंत्र्य–मिळालें तरी प्रजेचीं इतर जीं दुःखें असतील तीं नाहींशीं करण्याबद्दल आमचे असेच प्रयत्न चालावयाचे! शिवाय स्वराज्यांत जे दोष असतील ते नाहींसे करण्याबद्दल आजच्याप्रमाणेंच त्या स्वदेशी सरकारच्या मागेंहि आमचें असेंच टुमणें चालूं राहावयाचें. बरें, तेंहि स्वराज्य अगदीं मनाप्रमाणें निर्दोष झालें म्हणतां तर पुढें काय ? अहो! रामराज्य झालें तरी राज्यांत दोष हे कांहीं तरी राहावयाचेच व जे दोष दिसतील ते नाहींसे करण्याबद्दल आम्ही प्रयत्न करावयाचेच किंवा जगांत दास्यांत अगर आपत्तींत जें राष्ट्र असेल त्यास त्यांतून मुक्त करण्याकरितां आमचे असेच प्रयत्न चालावयाचे! तात्पर्य, विद्यमान परिस्थितीपेक्षां अधिक चांगली स्थिति प्राप्त करून घेण्यास आमच्यासारख्यांचे असेच आजन्म उद्योग चालू राहावयाचे. त्यास देश, काल परिस्थिति वगैरेंचें बंधन असू शकत नाहीं. देशाभिमान हा विश्वबंधुत्वाचा धाकटा भाऊ आहे इतकेंच काय तें"

(४) १९०७ सालीं पुणें येथील पिकेटिंगच्या चळवळींत दे. भ. वासुदेव कृष्ण भावे, उपसंपादक केसरी यांचेवर खटला झाला होता. खटला चालू झाल्यावर सिटी मॅजेस्ट्रेट कोर्टांत तो संपेपर्यंत रोज लोकमान्य जात असत.

सदर बाबतींत डॉ. मॅन, रे० मॅकनिकल वगैरे कांहीं साहेबलोकांस साक्षीस बोलविलें होतें. काम आटोपून परत निघतांना खालीं जिन्याजवळ लोकमान्यांशीं ही साहेब मंडळी बोलत उभी राहिली. लोकमान्यांस तेथून लवकर निघावयाचें होतें. तेव्हां ते विनोदानें म्हणले, 'चला येथून आतां लवकर, नाहीं तर Unlawful Assembly होईल ! (त्या वेळीं वरिष्ठ कायदेकौन्सिलांत वीस इसम एकत्र जमल्यास 'अॅन्लॉफुल असेंब्ली' म्हणजे 'बेकायदा जमाव' समजला जाईल असा नुकताच ठराव झाला होता.) तेव्हां डॉ. मॅन म्हणाले, 'पण येथें आम्ही कांहीं युरोपियन आहों हें लक्षांत ठेवा.' त्यावर टिळकांनीं प्रत्युत्तर दिलें, "म्हणूनच आमच्या मंडळीस म्हणतों चला येथून. कारण अखेर तुम्ही तेवढे सुटाल व आम्हास मात्र सरकार मारील !"

(५) मुंबई येथें कै० गजानन भास्कर वैद्य यांनीं हिंदु मिशनरी सोसायटीतर्फें प्रथम ता. ९ डिसेंबर १९१७ रोजीं सकाळीं मिस डेव्हिस या ख्रिस्ती बाईस व संध्याकाळीं मि. वहिद उद्दीन या मुसलमान गृहस्थास विधिपूर्वक हिंदू करून घेतले. या बाबतींत गजाननराव लिहितात, "सदर दिवशीं रात्रीं मुंबई स्टेशनावर अचानकपणें लोकमान्य टिळक यांची व आमची गांठ पडली. तेव्हां गोपाळदास (पूर्वींचे वहिद उद्दीन) हे त्यांच्यापुढें हात जोडून उभे राहिले. आम्ही त्यांची ओळख करून दिली. 'यांना आम्हीं आज विधिपूर्वक हिंदू करून घेतलें आहे' असें जेव्हां आम्ही लोकमान्यांस निवेदित केलें तेव्हां 'विधि केला कीं नाहीं' याची त्यांनीं आधीं चौकशी केली व 'असा उद्योग व्हावयासच पाहिजे; आपलाहि कांहीं विधि असणें अत्यंत जरूर आहे; त्याशिवाय कोणाला हिंदू करून घेऊं नका' असें आम्हास त्यांनीं आस्थेनें बजावून सांगितलें हे त्यांचे आमच्यावर महदुपकार आहेत."

(६) बॅ० बॅप्टिस्टा यांचे अध्यक्षतेखालीं पुण्यास प्रसिद्ध प्रांतिक सभा झाली. त्या वेळीं मोरोबादादांचे वाड्यांत प्रतिनिधींच्या उतरण्याची व्यवस्था केली होती. परिषद आटोपल्यानंतर एका ठराविक दिवसापर्यंतच सदर वाड्यांत प्रतिनिधींची जेवणा-खाण्याची व्यवस्था होईल असें सर्वांस कळविण्यांत आलें होतें. त्याप्रमाणें बहुतेक सर्व प्रतिनिधि आपापल्या गांवीं गेले. फक्त कर्नाटक प्रांतांतील दोनतीन कारवारी प्रतिनिधि तेथें उरले. इकडे मुख्य

व्यवस्थापकांनीं सर्व आटपाआटपी व निरवानिरव करून 'आतां आपणां-कडून तुमची कांहीं व्यवस्था होणार नाहीं' असें त्यांस सांगून तेथून निघ-ण्याची तयारी केली. पुण्यास अगदीं अपरिचित असे ते कानडी प्रतिनिधि आम्हीं आतां काय करावें वगैरे विवंचनेंत असतां लोकमान्य तेथें आले. मुख्य व्यवस्थापकांची ही वागणूक पाहून लोकमान्यांस फार वाईट वाटलें, व ते सर्वांसमक्ष त्या पाहुणे मंडळीस म्हणाले, "आपण टांगे करून सर्व सामानासह माझ्या घरीं चला. काय चार-दोन दिवस येथें राहावयाचें असेल तर राहा व काम आटोपल्यावर सावकाश आपल्या गांवीं जा." तेव्हां हें ऐकून प्रतिनिधि म्हणाले, 'येथें कर्नाटकी खाणावळ आहे, तेथें आम्ही गेल्यानें आमची सर्व सोय होणार आहे. करितां तिकडे जाण्यास आपली परवानगी असावी.' यावर टिळक म्हणाले, "ठीक आहे. तुम्हास जें सोयीचें होईल तें करा" असें म्हणून त्यांना त्या ठिकाणीं घेऊन जाण्यास मला सांगितलें व त्यांची तेथील सर्व व्यवस्था लावून तेथील त्यांचें एकंदर बिल आपल्या ऑफिसांतून (केसरी) भागविण्याविषयीं त्यांना बजाविलें.

(७) रे मार्केटसमोरील आर्यन सिनेमा थिएटरांत महाराष्ट्र फिल्म कंपनीची 'सैरंध्री' नामक देशी फिल्म पाहण्याकरितां लोकमान्यांस मुद्दाम बोलविण्यांत आलें होतें. त्यांत १९१८ च्या मुंबईच्या स्पेशल कॉंग्रेसचे मंडपांत मुख्य मुख्य पुढारी प्रवेश करीत असल्यावेळची एक फिल्म तयार करण्यांत आली होती. ती लाविल्यावर तींत अनेक पुढारी येऊन गेले. पण लोकमान्य टिळक चालल्याचें दिसतांच सर्व थिएटरभर प्रचंड टाळ्यांचा गजर झाला. लोकमान्य सदर वेळीं थिएटरमध्यें आहेत हें मात्र कोणासच ठाऊक नव्हतें. लोकमान्यांजवळ बसलेले त्यांचे मित्र लोकमान्यांस म्हणाले, 'बळवंतराव तुमच्या नुसत्या चित्राचें दर्शन घेऊन लोकांनीं हा इतका टाळ्यांचा कड-कडाट केला, मग तुम्ही प्रत्यक्षच येथें आलां आहांत हें त्यांस समजलें तर लोक टाळ्या वाजवून थिएटर खालीं पाडतील कीं काय कोण जाणें!' हें ऐकून लोकमान्य हळूच म्हणाले, "लोकांचें मजवर प्रेम असलें तरी मी असल्या पोकळ डेमॉन्स्ट्रेशन्सला फसणारा नाहीं. याची किंमत किती हें मी पूर्ण जाणून असतों आणि या जाणिवेनेंच मीं सर्व आयुष्य घालविलें आहे. मॅथेमॅटिशियन कधीं फसणार नाहीं हें विसरूं नका."

(८) सोलापूर प्रांतिक सभेच्या वेळीं 'सुधारणा व स्वराज्य' या मुख्य तंट्याच्या विषयावर अनेक प्रसिद्ध वक्ते बोलावयाचे असल्यामुळें प्रत्येक वक्त्यास कांहीं विशिष्ट वेळ बोलूं देण्याचें ठरलें होतें. त्याप्रमाणें लोकमान्य बोलावयास उभे राहिले. पण ठरलेली त्यांची वेळ संपतांच अध्यक्ष श्री० तात्यासासाहेब केळकर यांनीं घंटा वाजविली! पुढें इतरांचीं भाषणें होऊन सभेचें त्या दिवसाचें काम संपल्यावर आम्ही तात्यासाहेब व मीं–बिऱ्हाडीं गेलों. तेथें तात्यासाहेबांकडे आलेल्या स्नेही मंडळींजवळ ते हंसत व विनोदानें म्हणाले, बळवंतरावजींस तुम्ही आपलें भाषण आटोपा असें सांगण्याचा मला कधीं जन्मांत प्रसंग येईल अशी कल्पना नव्हती! पण काय योगायोग पाहा.' नंतर कांहीं वेळानें दुसरीकडे उतरलेल्या बंगल्यांत मी लोकमान्यांकडे गेलों. तेथें श्रीमंत दादासाहेब खापर्डे व लोकमान्य यांचें याच विषयासंबंधानें बोलणें चाललें होतें. 'तुम्ही बोलत असतां केळकरांनीं आणखी कांहीं वेळ घंटा वाजविली नसती तर आकाश काय कोसळून पडलें असतें?' असें म्हणून खापर्डे तात्यासाहेबांवर खूपच गरम झालेले दिसले. तेव्हां गंभीर मुद्रेनें लोकमान्य म्हणाले, "आमचे तात्या खरे न्यायाधीश आहेत. एकवेळ ते शत्रूवर दया करतील, पण मित्रास अन्यायाची सवलत कधींहि देणार नाहींत हा त्यांचा स्वभाव मला माहीत आहे. प्रत्यक्ष माझे बाबतींतहि पक्षपात न करणारे माझ्या ऑफिसांत इतके न्यायनिष्ठुर लोक आहेत हें मला व आमच्या ऑफिसला भूषणच आहे. आजपर्यंत अनेक बाबतींत त्यांचे माझे मतभेद झाले. पण प्रत्येक वेळीं ते आपलीं प्रामाणिक मतें मला स्पष्ट सांगत आले आहेत. शास्त्रीय दृष्ट्या कित्येक वेळां त्यांची विचारसरणी शेवटपर्यंत मला चुकीची दिसे, पण त्यांच्या समतोल व न्यायी बुद्धीविषयीं व प्रामाणिकपणाविषयीं माझी इतकी खात्री आहे कीं, मतभेदविषयक बाब तात्यांच्या विचाराच्या ताजव्यांतून कशी काय तोलली जाते हें मलाहि मनांतून पाहावेंसें वाटतें व पुष्कळ वेळां त्याचा मला उपयोगहि झालेला आहे!"

(९) सन १९१७ सालीं पुणें जिल्ह्यांतील शिरूर तालुक्याची परिषद कै० सी० के० दामले यांच्या अध्यक्षतेखालीं तळेगांव-ढमढेरे येथें भरली होती. सदर गांवीं मुन्सफ कचेरी आहे. परिषद भरण्यापूर्वीं त्या वेळच्या

नियमाप्रमाणें सरकारची परवानगी घ्यावयास पाहिजे होती. पण चुकून ती घेण्याचें राहून गेलें होतें. तालुक्यांतील लोकांच्या आग्रहावरून सदर वेळीं लोकमान्य तेथें गेले होते. त्यांच्या तेथील स्वागताचें काय वर्णन करावें? पण कांहीं विघ्नसंतोषी माणसांनीं, परिषदेची आगाऊ परवानगी घेतली नव्हती याचा फायदा घेऊन सदर परिषद न भरली जाईल अशाबद्दल आपली पुण्याई खर्च केली व 'सरकार परिषद भरवूं देत नाहीं' अशी गांवभर बातमी उठविली. यामुळें भिऊन जाऊन आतां कसें करावें, पाहुणे व पुढारी मंडळी काय म्हणतील अशी तेथील परिषदेच्या चालकांस काळजी वाटूं लागली. अखेर ती मंडळी लोकमान्यांकडे आली. आलेल्या मंडळींचें सर्व म्हणणें शांतपणें ऐकून घेतल्यावर लोकमान्य म्हणाले, "अगोदर परवानगी घेतली असती तर बरें होतें. कटकट चुकली असती. पण आतां काय त्याचें? तरी पण काळजी करूं नका, सर्व कांहीं यथास्थित होईल. कांहीं चिंता नाहीं. भ्यावयास नको. मी येथें आलों आहें हीच सरकारची परवानगी समजा! परिषद कोण कशी होऊं देत नाहीं पाहूं!" असें म्हणून श्री० तात्यासाहेब केळकर यांच्या सल्ल्यानें थेट गव्हर्नर साहेबांस त्यांनीं काय मजकुराची तार केली न कळे, पण सायंकाळीं कलेक्टरसाहेबांकडून परिषदेच्या चालकांस 'सरकारी मदत पाहिजे असल्यास कळवा, असें विचारण्यांत आलें.' हें पाहून सर्व मंडळी चकित झाली.

(१०) सदर वेळीं तळेगांवीं रावसाहेब × × × मुन्सफ होते. वास्तविक त्यांच्याच स्फूर्तीनें वरील परिषद घडून आली. परिषदेचा बुडित खर्च त्यांनीं दिला असें म्हणतात. कैं. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांनीं ही सर्व हकीकत लोकमान्यांस सांगितली होती. या परिषदेच्या पाठीशीं आपण आहोंत हें सरकारास कळूं नये म्हणून लोकमान्यांची प्रचंड मिरवणूक त्यांच्या दारावरून चालली असतां रावसाहेब यांनीं खिडकींतून मुद्दाम उघड्या अंगानें व बोडक्या डोक्यानें टिळकांस अधिकारी ऐटीनें म्हणजे नुसती मान हलवून नमस्कार केला, पण पुढें कांहीं दिवसांनीं पुण्यास येऊन गुपचुप लोकमान्यांस भेटून वरील उद्धट नमस्कारपद्धतीचा सूड म्हणूनच कीं काय त्यांनीं या वेळीं लोकमान्यांस पादस्पर्शपूर्वक

नमस्कार केला व म्हणाले, "आम्ही सरकारी नोकर म्हणजे 'विधवा' होत. आमचा दुसऱ्यास उपयोग तर कांहीं नाहींच, पण अपशकुन मात्र हटकून व्हावयाचाच! असेंच कांहीं अंशीं परवां तळेगांवास मजकडून घडलें याची क्षमा असावी." तेव्हां लोकमान्य म्हणाले, "पण मला तसें मुळींच वाटत नाहीं. राजकारणाच्या लग्नसमारंभांत तुम्हास उजळमाथ्यानें मिरवितां आलें नाहीं तरी घरांत कार्य निघालें म्हणजे खरी कष्टाचीं कामें कोणासहि न दिसतां जशा आमच्या 'विधवा'च बिनबोभाट करतात तसेंच सार्वजनिक कांहीं कार्य करावें अशी इच्छा असणाऱ्या तुम्हा सरकारी नोकरांचें आहे. तुमची सर्व हकीकत मला कळली आहे. तुमचें अंतःकरण मीं ओळखिलें आहे. तुमच्यासारखीं सरकारी नोकरींतील माणसें आमच्या चळवळीच्या इमारतीच्या पायांतील आधार आहेत. सरकारी नोकरी सोडून ज्यांच्या हातून सार्वजनिक काम होण्यासारखें नाहीं, अशांनीं सरकारी नोकरींतच राहून आम्हांला सर्व बाजूंनीं मदत केली तर देवाच्या घरीं त्यांची सेवा रुजू होईल."

(११) 'पुणें सार्वजनिक सभा' फार जुनी व खानदानी स्वरूपाची असल्यामुळें पूर्वी मोठमोठे संस्थानिक तिचे अध्यक्ष असत. ही परंपरा अनेक कारणांनीं पुढें तुटल्यामुळें व सामान्य मनुष्य सभेचा अध्यक्ष असणें सभेच्या चालकांस (महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांस) बरें न वाटल्यामुळें पुष्कळ वर्षं अध्यक्षाशिवायच सभेचें काम चाललें होतें. पण ही स्थिति लोकमान्यांस पसंत न पडून अखेर ते मंडालेहून सुटून आल्यावर कांहीं दिवसांनीं भरलेल्या सार्वजनिक सभेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेंत (या वेळीं आण्णासाहेबच अध्यक्षस्थानीं बसले होते.) एकदम उठून लोकमान्यांनीं महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांचें नांव सभेच्या कायमच्या अध्यक्षस्थानीं सुचविलें. रीतसर अनुमोदन मिळून सर्वानुमतें ठराव मंजूर झाला. दुसरे दिवशीं मी आण्णासाहेबांचे घरीं गेलों. त्या वेळीं एक गृहस्थ आण्णासाहेबांस म्हणाले, 'आपणास अगोदर विचारल्याखेरीज बळवंतराव असली महत्त्वाची गोष्ट कधीं करावयाचे नाहींत, असें असतां काल त्यांनीं हें काय केलें! आपणासहि ते जुमानीत नाहींत हें बरें काय?' तेव्हां आण्णासाहेब त्यांजवर डोळे वटारून म्हणाले, "बाबा रे, असें म्हणूं नकोस, तो (लोकमान्यांस

ते क्वचित् अरे जारे असें प्रेमानें म्हणत.) अशा प्रसंगीं जें बोलतो तें तो बोलत नसून महाराज (परमेश्वर) त्यांच्या अंतःकरणांत बसून बोलतात. ऐनवेळीं जेव्हां तो बोलतो, तेव्हां त्यास स्फूर्ति होते व म्हणूनच काल मला ती गोष्ट पसंत नसतांहि मी त्याचें म्हणणें मान्य करून गप्प बसलों."

(१२) सन १९१६ मधील लोकमान्यांवरील होमरूलच्या खटल्याचा लोकमान्यांस अनुकूल निकाल लागल्यावर केसरी ऑफिसांत एके दिवशीं श्री. तात्यासाहेब केळकर यांच्याभोंवतीं त्यांची मित्रमंडळी (त्यांत बरेच सरकारी नोकर होते) सहज जमून गप्पागोष्टी चालल्या होत्या. इतक्यांत लोकमान्य तेथें आले. 'काय मंडळी म्हणत आहेत हो?' असें त्यांनीं विचारल्यावर श्री. तात्यासाहेब हंसत म्हणाले. 'खटल्याच्या निकालाबद्दल मंडळी पेढे मागत आहेत!' लगेच लोकमान्य विनोदानें म्हणाले, "उद्यांच्या केसरींत 'टिळक सुटले, पुढे काय?' असें आतांच मीं आर्टिकल लिहून ठेवलें आहे. त्यांत प्रत्येक शब्दागणिक पेढे वांटले आहेत, ते खा. पण ते तुम्हा सर्वांस पचतील का? नाहीं तर ते टिळकांचे पेढे म्हणून खाल आणि सरकारच्या अवकृपेच्या आजारानें आजारी मात्र पडाल!'

(१३) अकोल्याचे श्री. गणपतराव दामले यांच्याशीं बोलत असतां त्यांनीं पुढील गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "१९०८ सालीं लोकमान्यांवरील खटला चालू असतां त्यांस शिक्षा होण्यापूर्वीं श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनीं अकोल्याचे डॉ. दादासाहेब कोल्हटकर यांस शेवगांवचे सत्पुरुष श्रीगजाननमहाराज यांजकडे मुद्दाम पाठविलें. हेतु हा कीं, चालू संकटांत महाराजांकडून लोकमान्यांस कांहीं आशीर्वाद मिळावा, अथवा त्यांच्यावर अनुग्रह व्हावा. डॉक्टरसाहेब तेथें गेले, पण महाराज एकसारखे तीन दिवस निजूनच राहिले. कोल्हटकरांची निष्ठा पाहून अखेर महाराज उठले व आपल्या भाकरीपैकीं एक सबंध भाकर कोल्हटकरांचे अंगावर टाकून साधुपुरुषांच्या नेहमींच्या संदिग्ध भाषेंत ते म्हणाले, 'मुंबईच्या त्या काळचाला (टिळक) खाऊं घाल.' तेव्हां मुंबईस ती भाकरी नेण्यांत आली व ही सर्व हकीकत लोकमान्यांस कळविली. तेव्हां त्यांस चावत नव्हतें तरी देखील कशीबशी चावून चावून त्यांनीं मोठ्या भक्तीनें ती भाकरी प्रसाद म्हणून खाल्ली!

(१४) १९१७ मध्यें पुणें जिल्हा परिषद जुन्नरास झाली त्या वेळीं लोकमान्य तेथें गेले होते. वाटेंत नारायणगांव येथें गांवकऱ्यांनीं त्यांस शाळागृहांत पानसुपारी केली. लोकमान्यांचे बरोबर × × × होते. ते उंच असल्यामुळें त्यांना दारांतून आंत जातांना चौकट ठेंगणी पडल्यामुळें कपाळास लागली. तें पाहून लोकमान्य हळूच म्हणाले, "आपल्या उच्च-पणानें लोकांशीं नेहमीं न वागतां अति लीनतेनें सदैव त्यांच्याशीं वागावें म्हणून नम्रभाव उत्पन्न होण्यासाठीं मधून मधून अशा शिक्षा भोगाव्या लागतात !"

(१५) ... ... ... या गांवीं मी व्याख्यानाकरितां गेलों होतों. व्याख्यान आटोपल्यावर मंडळींशीं गप्पा मारीत असतां एका पाटलांनीं पुढील हकीकत सांगितली. ते म्हणाले, "मी जुन्नर परिषदेकरितां लोकमान्यांच्या बाजूनें इतकी खटपट केली कीं, अखेर ती सरकारच्या डोळ्यावर आली. पुढें कांहीं दिवसांनीं माझ्या पाटिलकीचें वतन जप्त कां करूं नये असें मला विचारण्यांत आलें. म्हणून मी पुण्यास टिळक-महाराजांचा सल्ला घेण्यास गेलों. तेव्हां ते म्हणाले, 'आणखी कांहीं कामाकरितां मला उद्यां कलेक्टरास भेटावयास जावयाचें आहे तेव्हां त्या कामाबरोबर पाहतों हें कांहीं जमतें कां ? तुम्ही मला उद्यां सायंकाळीं भेटा.' ठरल्याप्रमाणें ते कलेक्टरसाहेबांस भेटण्यास गेले व म्हणाले, '... ... गांवच्या ... ... पाटलानें आम्हास जुन्नरास विनाकारण फार त्रास दिला. वास्तविक अशा कामगारानें या कामांत पडण्याचें कांहीं कारण नव्हतें.' हें ऐकून कलेक्टरसाहेब बुचकळ्यांत पडले. कारण त्यांस वाटलें कीं कांही झालें तरी खरा रिपोर्ट टिळकांचा. अधिकाऱ्यांकडून आलेला चुकीचा असावा, असें समजून त्यांनीं 'मी तें पाहतों' असें टिळकमहाराजांस सांगितलें व चमत्कार असा झाला कीं, पुढें लगेच माझ्या मागचा सरकारी भुंगा नाहींसा झाला !"

(१६) जुन्नरास मी व्याख्यानाकरितां गेलों असतां पूर्वीं गुप्त पोलिस खात्यांत नोकरी करून आतां पेन्शन घेतलेल्या एका गृहस्थाकडून पुढील हकीकत समजली. ते म्हणाले, "मागें १९०४ सालीं टिळक येथें आले होते

तेव्हां मला त्यांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यास ठेवलें होतें. पोट जाळण्या-करितां कांहीं तरी क्लृप्त्या करून वरील अधिकाऱ्यांस खूष करावें म्हणून मी सभ्य पोशाखांत टिळक यांची एकांतीं भेट घेतली व त्यांस म्हणालों, 'मी एक कर्मठ ब्राह्मण आहे. मला श्रीशंकराचा दृष्टान्त झाला आहे कीं, शिवनेरीस श्रीअंबेच्या आराधनार्थ कोणास तरी ठेवावें, म्हणजे मातुःश्री प्रसन्न होतील व पुनः शिवाजीचा अवतार होऊन तो टिळकांस गुरु करून महाराष्ट्र देश इंग्रजांचे हातून सोडवील. तरी गडावर आराधनेस ठेवावयाच्या माणसाचा आपण मला खर्च द्यावा.' माझें बोलणें संपतें न संपतें तोंच टिळक म्हणाले, 'हो, मलाहि पुण्यास काल जगदंबेचा दृष्टान्त झाला कीं, 'जुन्नरला कोणी एक गृहस्थ तुला भेटावयास येईल. त्यास म्हणावें, सरकारास फितूर होऊन त्यास देशबांधवांच्या चुगल्या सांगून, सार्वजनिक काम करणाऱ्या लोकांस फसवून व त्यांस संकटांत आणून पोटांत कांटे भरण्याऐवजीं दुसरें कांहीं प्रामाणिकपणानें काम केलें तर जगण्यापुरतें अन्न मिळणार नाहीं असें नाहीं.' हे त्यांचे शब्द शेवटपर्यंत ऐकतां न ऐकतांच मी खेटरें मारल्या-प्रमाणें तोंड लपवीत तेथून आलों."

(१७) पुणें येथील श्री. दिनकर कृष्ण साठे यांच्याशीं गप्पागोष्टी करीत असतां ते म्हणाले, "(१) १८९० सालची गोष्ट. सिंहगडावर बळवंतरावांसह त्यांची कांहीं स्नेही मंडळी मजेनें गेली होती. रावबहादुर गणपतराव मानकर हेहि आले होते. मानकरांनीं टिळकांना 'या हो, राउंड' अशी हांक मारली. मला याचा कांहींच अर्थ समजेना. तेव्हां त्याचा अर्थ मी विचारतां रावबहादूर म्हणाले, "आम्ही कॉलेजमध्यें असतांना हे बळवंतराव सर्व विषयांत ऑल-राउंड असत. यामुळें त्यांस कॉलेजमध्यें 'राउंड' म्हणून सर्व मंडळी हांक मारीत! (२) या जमलेल्या मंडळींचा तेथें अनेक विषयांवर खूप वादविवाद चाले. 'आतां यापुढें तरुण लोकांना निराळा कांहीं तरी मार्ग दाखविला पाहिजे' असें टिळक म्हणत होते. यावर एक पेन्शनर गृहस्थ म्हणाले, 'अहो, इतके दिवस नोकरीचा रुळलेला मार्ग सोडून दुसरा मार्ग कसचा दाखवितां?' तेव्हां टिळक म्हणाले, "लोक पूर्वीं ज्या वाटेनें गेले असतील त्याच वाटेनें जाण्यांत

पुरुषार्थ नाहीं. डोंगरांतील तुटलेल्या कड्यांतून स्वतःची वाट जो काढील व इतरांस जवळचा मार्ग दाखवील, तोच खरा मर्द होय व हा मर्दपणा तरुणांत मला उत्पन्न करावयाचा आहे." (३) आमच्या एका मित्रास लोकमान्यांस पाहावयाचें होतें म्हणून आम्ही त्यास घेऊन त्यांजकडे गेलों. त्यांचें दर्शन घेतल्यावर तो त्यांस म्हणाला, 'आमच्या आयुष्यांतील कांहीं दिवस आपणासारख्यास देतां आले तर काय बहार होईल!' हें ऐकून लोकमान्य म्हणाले, "तुमच्या सदिच्छेबद्दल व माझ्याविषयीं तुम्हास असलेल्या प्रेमाबद्दल मी तुमचा फार आभारी आहे. पण हें तुमचें बोलणें ऐकून मला एक विचार सुचला; तो हा कीं, जेव्हां आपल्या देशांत पूर्वी सुबत्ता होती तेव्हां देवाच्या नैवेद्याचें स्वतंत्र पान वाढून तें अतिथीस देण्यांत येई. आतां दारिद्र्यामुळें आपण आपल्याच पानाचा देवास डोळे मिटून नैवेद्य दाखवितों. पण मनाची खात्री असते कीं, यांतील एक कणहि कमी होणार नाहीं. अशीच आपल्या आयुष्याची गोष्ट असल्यामुळें देवास नुसता नैवेद्य दाखवितां तसेंच आम्हास तुमच्या आयुष्यांतील दिवस देणें आहे!"

(१८) मुंबईचे एस. आर. बखले वकील यांच्याशीं गोष्टी बोलत असतां त्यांनीं आपला एक अनुभव सांगितला. ते म्हणाले, "एकदां बेळगांवचे आजरेकर वकील व मी राजगड किल्ला पाहण्याकरितां सिंहगडहून तिसरे प्रहरीं निघालों. रात्रीं राजगडच्या पायथ्याच्या गांवीं मुक्काम करून दुसरे दिवशीं सकाळीं किल्ल्यावर जावें असें ठरविलें होतें. पायथ्याच्या गांवीं आम्ही गेलों खरें; पण तेथील लोकांस वाटलें कीं, आम्ही कलकत्त्याच्या 'हवरा' पुलांत बळी देण्याकरितां व त्या पुलाच्या कामाकरितां मुलें पकडण्यास आलों आहों. कारण त्या वेळीं चोहोंकडे तशी आवई उठली होती. आम्ही ते लोक नाहीं वगैरे सांगून त्यांची खात्री करण्याचा जसा प्रयत्न करूं लागलों, तसा त्यांस आमचा जास्तीच संशय येऊं लागला व आम्हास अरेतुरे करून धक्काबुक्की करण्यापर्यंत मजल आली. शिवाय रात्रीची वेळ. आम्हास गांवांत कोठेंहि उतरण्यास जागा मिळेना, कांहीं सोय लागेना. मोठी पंचाईत पडली. इतक्यांत आमच्या गड्याला त्या गांवकरी लोकांस हे त्या पुण्याच्या—सिंहगडवरल्या—टिळकांचे स्नेही आहेत असें

सांगण्याची बुद्धि झाली. तो तसें बोलतांच एकदम सर्व स्थिति बदलली. तेच बिथरलेले लोक आमच्याशीं जरा गोडीनें बोलूं लागले व नंतर म्हणाले, ‘ हें आम्हांस प्रथमच तुम्हीं कां नाहीं सांगितलें ? आतां तुमच्या केंसालाहि धक्का लागावयाचा नाहीं.’ असें म्हणून त्यांनीं आमची सर्व व्यवस्था लावली व सकाळीं राजगडापर्यंत आमचेबरोबर एक वाटाड्या देऊन आम्हास गडावर पोंचविलें. त्या दिवशीं केवळ टिळकांच्या नांवामुळें आमचा मार बचावला यांत शंका नाहीं ! ”

(१९) लोकमान्य सातार्‍यास श्री. दादासाहेब करंदीकर यांच्या ज्युबिलीनिमित्त गेले होते. त्या वेळीं त्यांची तेथें प्रचंड मिरवणूक काढण्यांत आली. मिरवणुकींत आपलेवर छत्र धरून चौर्‍यामोर्चेलें ढाळण्यांत येत असलेलीं पाहून त्यांस त्याबद्दल फार राग आला व तसें न करण्याबद्दल त्यांनीं निषेधपूर्वक बरेच वेळां सांगून पाहिलें. पण त्याकडे लक्ष न देण्याचा लोकांचा निश्चय झालेला दिसत होता. अखेर मिरवणूक राजवाड्यासमोर आली. तेव्हां मात्र ते हात जोडून जवळच्या मंडळींस थोड्या रागानें म्हणाले, “ आतां तरी हे चाळे बंद कराल काय ? ह्या राजवाड्यासमोर माझ्यानें हें सहन करवत नाहीं. वास्तविक येथून मी पायींच चालावयास पाहिजे. येथून गाडींतून मिरवणें म्हणजे राजवाड्याचा अपमान करणें आहे. तसेंच येथें माझ्यासारख्यानें चौर्‍यामोर्चेलें ढाळून घेणें म्हणजे प्रत्यक्ष स्वराज्याची चेष्टा करणें नव्हे काय ? ” हें ऐकून श्री. दादासाहेब करंदीकर यांनीं तावडतोब तसें करविलें. तेव्हां लोकमान्यांस हायसें वाटलें.

(२०) १९२० च्या जूनमधली गोष्ट. लोकमान्य एक दिवस सकाळीं आपल्या निजावयाच्या खोलींत आरामखुर्चीवर पडून कोणत्या तरी विचारांत अत्यंत निमग्न असल्याचें मीं पाहिलें. बाहेर सी. के. दामले बांकावर येऊन बसले होते. त्यांस लोकमान्यांस त्याच वेळीं भेटावयाचें होतें, म्हणून मीं तसें त्यांस आंत जाऊन सांगितलें. पण ते इतके विलक्षण एकाग्रचित्त झाले होते कीं, माझ्या बोलण्याकडे त्यांचें लक्षच जाईना ! आपणास लोकमान्यांनीं आंत बोलाविलें आहे असें वाटून दामले आपण होऊन आंत आले व ‘काय चाललें आहे’ असें खूप मोठ्यानें बोलले. तेव्हां “या, आतां मी कोणत्या

विचारांत होतों तें सांगतों" असें लोकमान्य म्हणाले. प्रथम थोडें इकडे-तिकडे बोलणें झाल्यावर लोकमान्य म्हणाले, "आजपर्यंतच्या उद्योगानें हें इतकें मिळालें (नवीन सुधारणा). याचा कसा उपयोग करून घ्यावयाचा हा कारकुनी डोक्याचा प्रश्न आहे. मिळालेलें कांहीं कोणी आतां परत घेत नाहीं. त्याची काळजी नको. पण माझ्या मनापुढें हल्लीं कोणता प्रश्न असेल तर तो हा कीं, सबंध देशांतील चोहोंकडल्या कौन्सिलच्या, असेंब्लीच्या व कौन्सिल ऑफ स्टेटच्याहि निवडणुकी झाल्यानंतर पहिल्या तीन वर्षांतच सरकारनें दिलेल्या सुधारणा पचनीं पाडून त्या आमच्या भुकेस कशा न पुरणाऱ्या आहेत, हें सिद्ध करावयाचें व अधिक देण्याबद्दल मारवाड्या-प्रमाणें सरकारनें जो नऊ वर्षांचा वायदा केला आहे तो काळ अलीकडे आणण्यास सरकारास कसें भाग पाडतां येईल, इतकेंच काय पण दुसऱ्या निवडणुकीच्या वेळीं या मुद्द्यावरच विलायतेंत व हिंदुस्थानांत कशी चळवळ करतां येईल हाच एक विचार माझे डोक्यांत हल्लीं चालू आहे." हें ऐकून दामले म्हणाले, 'ती अजून लांबची गोष्ट आहे.' त्यावर लोकमान्य म्हणाले "अहो! गेलें महायुद्ध सुरू होण्यापूर्वी जर्मन राष्ट्राच्या मुत्सद्द्यांनीं अगोदर आठ आठ वर्षें युद्धभूमीचा नकाशा काढून त्यांत आपलीं व शत्रूचीं कोठकोठें व किती प्रेतें पडतील हें दाखविलेलें तुम्हास माहीत आहे काय? नुसतें पायांपुरतें पाहून कसें भागणार." इतकें बोलतात तोंच पंचांग-कमिटीची मंडळी तेथें आली व त्या विषयावर बोलणें सुरू झालें.

(२१) कै. केरूनाना छत्रे यांचे नातू डॉ. गोपाळ नीळकंठ छत्रे यांनीं सांगितलं कीं, "पावणेएकुणतीस अंश धरून केलेलें पंचांग शुद्ध व शास्त्रोक्त समजतात. केरूनानांचें व टिळकांचें मत या बाबतींत एकच होतें. सांगलीच्या ज्योतिषसंमेलनाचे ठरावानें हें मत प्रस्थापित झालें. सांगली-संमेलनाहून परत आल्याबरोबर सकाळीं टिळकांनीं पहिली गोष्ट कोणती केली असेल तर ती ही कीं, त्यांनीं आमच्या वडिलांकडे ताबडतोब एक चिठी पाठविली. त्यांत इतकेंच लिहिलें होतें कीं, 'गुरुवर्य नाना यांचे मताप्रमाणें सांगली-संमेलनामध्यें ठराव पास झाला व ही गोष्ट निदान माझ्या हयातींत एकदां ती तडीस गेली.' ही चिठी इतक्या सकाळींच

आमचेकडे आली की, ‘पहांटेस स्टेशनवरून घरीं येतांच हीच गोष्ट दादांनीं प्रथम केली’ असें बाबासाहेब विद्वांस यांनीं आम्हांस सांगितलें.”

(२२) दोन वर्षांपूर्वी व्याख्यानाकरितां मी पुणें जिल्ह्यांतील लोहगड गांवीं गेलों होतों. लोहगड किल्ल्याच्या पायथ्याशींच असलेल्या या गांवीं गेल्यावर लोहगडच्या ऐतिहासिक किल्ल्याचें दर्शन घेण्याची इच्छा साहजिकच उत्पन्न झाली. मी ज्यांचे घरीं उतरलों होतों त्यांस तशी इच्छा दर्शवितांच त्यांनीं किल्ल्याची वाट दाखविण्याकरितां व वरील माहिती देण्याकरितां जवळच्या वाडींतील एका म्हाताऱ्या मुसलमान बाईस माझेबरोबर जाण्यास सांगितलें. ही बाई इतकी म्हातारी होती कीं, ती हा एवढा किल्ला कसा चढणार हीच मला काळजी पडली ! परंतु वाट चालू लागल्यावर ही काळजी नाहींशी होऊन तिच्याबरोबर मीच कसा चालेन हीच काळजी उत्पन्न झाली ! आम्ही वर जाऊन पोचल्यावर त्या म्हातारीनें शक्य तीं ऐतिहासिक स्थळें दाखविलीं व दंतकथेनें चालत आलेल्या तेथील कांहीं गोष्टीहि तिनें सांगितल्या. बराच वेळ हिंडणें झाल्यामुळें आम्ही उभयतां थकलों व विश्रांतीकरितां एका दगडावर वसलों. बाई मोठी प्रेमळ होती. तिनें मी कोठें असतों, काय करतों, वगैरे हकीकत विचारली. तेव्हां ‘मी पुण्यास टिळकांच्या कारखान्यांत असतों’ असें सांगितलें. हें ऐकून ‘बाबानं माझं कल्याण केलं आहे’ असें ती उद्गारली. तेव्हां हें काय प्रकरण आहे हें ऐकून घेण्यास माझे कान अधीर झाले. मीं तिला विचारलें ‘त्यांनीं काय तुमचें काम केलें आहे ?’ ती म्हणाली, “थांबा सगळी हकीकत सांगतें, “ऐका. टिळकमहाराजांन सरकारनं मुंबईस तुरुंगांत घातलं होतं. (बाईस निराळे प्रश्न मी विचारल्या वरून लोकमान्यांचा हा १८९७ चा तुरुंगवास असावा असें दिसतें.) तेव्हां माझा दादला पोलिसांत होता. पुढें त्याजकडे तुरुंगांतील टिळकमहाराजांचे खोलीवर पहारा करण्याचं काम आलं. माझा दादला मोठा मायाळू होता. रोज घरीं आल्यावर त्यानं मला सांगावं कीं, टिळकांचे खाण्याविणं तुरुंगांत लई हाल होत आहेत. अखेर त्यानं घरीं नारळ आणून त्याच्या खोबऱ्याचे तुकडे करून ते व थोडा गूळ असे कागदाच्या पुडींतून किंवा

फडक्याच्या पुरचुंडींतून कोणी पाहात नाहीं असें इकडेतिकडे पाहून गजांतून ते आंत टिळकमहाराजांकडे गुपचुप टाकून देई. असं केल्यावर पहिल्या दिवशीं टिळक महाराज चोरून हळूच दादल्याशीं बोलले व म्हणाले, ‘असं करूं नकोस. हें निभणार नाहीं. अधिकाऱ्यास समजल्यावर तुला जबर शिक्षा होईल व तुझें जन्माचें नुकसान होईल. मला काय, हें नको आहे असें नाहीं.’ यावर दादल्यानं सांगितलं ‘माझी काळजी नको. मी त्यांत पक्का आहे. माझें मी पाहून घेईन.’ पुन: दुसरे दिवशीं असंच केलं. मधूनमधून असं दोन-चार वेळां केल्यावर टिळकमहाराज दादल्यास म्हणाले, ‘आतां नको. तें खाऊन उष्णानें माझें तोंड आलें आहे.’ म्हणून पुढं हें बंद केलं व त्यानं घरीं बदाम आणले. मीं रात्रीं गुपचुप फोडी. त्यांतील बिया व थोडी खडीसाखर यांची एक पुडी करून ठेवी. दुपारीं कामावर जातांना तो ती बरोबर नेई, आपल्या पहाऱ्याच्या वेळीं हळूच ती आंत फेकी. असं थोडेच दिवस चालून एके दिवशीं त्यांस सोडण्याकरितां तेथून हलविलं. तेथून जातांना ते दादल्यास म्हणाले, ‘मी आतां सुटणार. केव्हां तरी मला पुण्यास येऊन भेट.’ महाराज तेथून गेल्यापासून ‘नको ही चाकरी, देऊं का राजीनामा’ असं दादला मला वरच्या वर म्हणे. ‘आपण गरीब माणसं; चाकरी सोडून खावं काय?’ असं मी त्याला म्हणे. शेवटीं पुण्यास जाऊन महाराजांना विचारून काय तें करूं असं ठरविलं. पुढें दीड-दोन महिन्यांनीं दादला पुण्यास गेला. महाराजांना भेटला व ही नोकरी सोडतों असं म्हणाला. महाराजांनीं ‘कां नोकरी सोडतोस?’ असें विचारल्यावर तो म्हणाला कीं, ‘आपल्यासारखीं देवमाणसं तेथें आलीं म्हणजे त्यांच्याशीं आम्हाला कसं वागावं लागतं याचा आतां तुम्हांला अनुभव आहेच. तेव्हां नको ती चाकरी असं वाटतं. तरी पण अगोदर आपणाला विचारून आपण सांगाल तसं करावं असं ठरविलं आहे.’ तेव्हां महाराजांनीं त्याला सांगितलं “अगदीं चुकतां आहांत. हें पाहा, नोकरी सोडून तूं काय करणार? हें लक्षांत ठेव कीं, आतां यापुढें आमच्या-सारखीं माणसें तेथें पुष्कळ येणार, आम्ही हा पायंडा पाडून ठेवला आहे. म्हणून म्हणतों, अशा माणसास तुझ्याकडून जो उपयोग होईल तो दुसऱ्या भलत्यासलत्याकडून होईल काय? तेव्हां तूंच सांग. म्हणून नोकरी

सोडण्याची गोष्ट बोलूं नकोस. मात्र मला जसा उपयोगी पडलास तसा सर्वांस नेहमीं उपयोगी पडत जा म्हणजे झालें." असें म्हणून त्यांनीं दादल्याचे हातांत वीस रुपयांची नोट दिली. दादल्यानं नको नको म्हणून ती परत केली. पण अखेर ती त्यांनीं त्याच्या खिशांत कोंबली, व शिवाय एक रेशीमकांठी धोतरहि दिलें. पुढें कांहीं दिवसांनीं माझा एकुलता एक मुलगा पटकीनें आजारी पडला. वैद्याचा दवा केला, तोडगे केले, पीर खिचडा केला, सर्व उपाय केले. पण कांहीं उपयोग न होऊन एकदम त्याचे हातपाय गार पडले व डोळे फिरविले. तेव्हां वैद्यबुवानंहि सांगितलं कीं, हा आतां घटकेचा सोबती आहे. तेव्हां मी रडून आकांत केला; पण इतक्यांत दादल्यास आठवलं कीं, टिळकमहाराजांचं धोतर आपल्याजवळ आहे, तें याच्या अंगावर घालावं व दैवाची परीक्षा पाहावी. असें म्हणून बासनांतून तें काढलं व मुलाचे अंगावर घातलं. तेव्हां चमत्कार असा कीं, थोडा थोडा मुलास उतार पडून अखेर तो मृत्यूच्या दाढेंतून वांचला! तेव्हांपासून आमच्या वाडींत व गांवांत कोणी आजारी पडलं व वांचत नाहीं असं वाटलं म्हणजे महाराजांचं हें धोतर आमचेपासून मागून नेतात व ते आजाऱ्याच्या अंगावर घालतात कीं, लगेच गुण येतोच! या धोतरास 'महाराजांची छाटी' असं इकडील लोक म्हणतात. दादला मरून लई दिवस झालं. त्या वेळीं जसं मला दुःख झालं तसंच टिळकमहाराज गमावल्याचं कळलं त्या दिवशींहि झालं. मी त्या दिवशीं सबंध दिवसभर उपास केला."

(२३) खेड तालुक्यांत व्याख्यानाकरितां मी हिंडत असतां खालील तीन गांवीं तीन गोष्टी ऐकावयास सांपडल्या. पैकीं त्रिव्वी या गांवीं तेथील प्रमुख श्री. मारुतराव पाटील यांचेच घरीं मी उतरलों होतों. मारुतरावांचे वडील श्री. लाडूजी पाटील हे त्या वेळीं ब्याण्णव वर्षांच्या वयाचे असून त्यांचीं सर्व इंद्रियें शाबूत असलेलीं पाहून त्यांचेविषयीं मला मोठा आदर वाटला. त्यांच्याशीं पुष्कळ वेळ बोलत बसलों होतों. तेवढ्या वेळांत त्यांनीं किती तरी मजेदार गोष्टी सांगितल्या, पण त्या सर्व येथें अप्रस्तुत होत. असो ते म्हणाले, "पुण्याच्या काँग्रेसच्या वेळीं आमचे एक श्रीमंत तरुण मित्र यांची व टिळकांची ओळख नसल्यामुळें मुद्दाम आमच्यामार्फत ते त्यांस भेटले व म्हणाले,

'असल्या सरकारशीं हे असले नुसते कागदी घोडे तुम्ही काय नाचवीत बसलां आहांत ?' टिळक म्हणाले, "मग काय करावें असें तुमचें म्हणणें आहे ?" तेव्हां हे जवान तरुण म्हणाले, 'अगोदर सरकारचा चोहोंकडून खजिना एकदम लुटला पाहिजे व मग त्या पैशावर हजारों लोकांकडून इच्छित कार्य केलें पाहिजे.' तेव्हां टिळक म्हणाले, "ठीक आहे. तुम्ही तुमच्यासारखीं पांचशें माणसें अगोदर माझ्यापुढें उभीं करा, म्हणजे माझी हजार माणसें तयार आहेत असें समजा." टिळकांचे हें उत्तर ऐकून स्वारी अगदीं गारीगार झाली. पुढें त्यांच्या मनांतील राष्ट्रीय विचारहि कायमचेच गार झाले. असो. पुढें कित्येक वर्षांनीं पुण्याचे कै. बंडोपंत तरवडे यांचेबरोबर कांहीं दत्तक-प्रकरणांत हे पूर्वींचे 'बंडखोर' जवान आमचेबरोबर टिळकांकडे आले होते. त्यांस पाहतांच टिळक थट्टेनें म्हणाले, "काय हो ! तुम्ही आपले पांचशें तरुण लोक घेऊन आलां आहां वाटतें !" टिळक आपणास ओळखणारहि नाहींत अशी ज्यांची समजूत त्यांस टिळकांनीं सुमारें बारा वर्षांनंतर मारलेला हा गरगरीत टोला पाहून आम्ही सर्व थक्क झालों व ते गृहस्थ तर मेल्यापेक्षां मेले झाले. त्या वेळीं टिळक म्हणाले, "तरुण लोकांच्या उत्साहावर गार पाणी ओतण्यांत अर्थ नाहीं व त्यांस भलतीकडे भडकूं देण्यांतहि अर्थ नाहीं. मात्र त्यांच्या कर्तृत्वशक्तीस योग्य अवसर देणें व तिचें पोषण करणे हेंच काम पुढाऱ्यानें जपून करावयाचें असतें."

(२४) चासकमान येथील एक सुखवस्तु गृहस्थ म्हणाले, 'क्रॉफर्ड-प्रकरणांत मी सांपडलों होतों. याबाबत सरकारकडे अर्ज करण्याच्या कामीं लोकमान्यांशीं माझा संबंध आला होता. पण त्यांची माझी पूर्वींची ओळख नव्हती अगर पुढेंहि ती राहणें शक्य नव्हतें. पण १९१७ सालीं जुन्नर परिषदेकरितां ते इकडे आले असतां, सुमारें पंचवीस वर्षांनीं मला पाहतांच एकदम ते म्हणाले, "मग पार्लमेंटकडे केलेल्या अर्जाचे बाबतींत तुमचें काय झालें ? मला कांहीं समजलें नाहीं !"

(२५) मंचरचे पुढारी श्री० आण्णासाहेब कुलकर्णी म्हणाले, "१९०७ सालीं मंचर येथें उत्पन्न झालेल्या हिंदु-मुसलमान तंट्याच्या बाबतींत फक्त

काय तो एकदां लोकमान्यांचा सल्ला घेण्यास मी त्यांजकडे गेलों होतों. त्यानंतर ते १९१४ सालीं सुटून आल्यावर म्हणजे सुमारें आठ वर्षांनीं आमच्या एका स्नेह्याबरोबर त्यांचें दर्शन घेण्यास मी गायकवाडवाड्यांत गेलों होतों. मला पाहतांच ते एकदम म्हणाले, " काय हो ! मंचरच्या तुमच्या मशिदीच्या प्रकरणाचें पुढें काय झालें ?"

(२६) लोकमान्य रात्रीं सरदारगृहांत समाधिस्थ झाल्यावर माझी वृत्ति कांहीं वेळ अगदीं वेड्यासारखी झाली होती. तेथें मग मला कोठें चैन पडेना. म्हणून पहांटे सरदारगृहाच्या खालीं येऊन त्याच्यापुढील सडके-पलीकडल्या फूटपाथवरील एका झाडाखालीं मी जाऊन स्वस्थ बसलों. कांहीं वेळानें मुंबईस पोट भरण्याकरितां नगर जिल्ह्यांतून आलेले दोन शेतकरी तेथें उपस्थित झाले. त्यांपैकीं एक दुसऱ्यास म्हणतो, 'कसलीर इथं इतकी गर्दी !' त्यावर दुसरा उत्तर करतो, 'अर, पुण्याचा तो आपलं राज्य कमावणारा टिळक होता नव्ह का ? तो इथं मेला म्हणत्यात !' हें ऐकतांच पहिला कावराबावरा झाला. अनेक दुःखांचे उद्गार काढूं लागला व म्हणाला, 'गड्या ! आतां नाहीं आपल्याच्यान म्होर जाववत. चला आपण तिथं जाऊन त्याला शेवटचं डोळाभर पाहून घेऊं या' असें म्हणून ते दोघे तिकडे वळले. त्यांचे पाठोपाठ मुद्दाम मीहि गेलों. माझ्या कल्पनेप्रमाणें खालींच ते गर्दींत सांपडले. त्यांचा वर कसचा प्रवेश होतो, म्हणून मी त्या दोघांचे हात धरून त्या मनस्वी गर्दींतून, माझी स्वयंसेवकांशीं ओळख असल्यामुळें त्यांस वर घेऊन गेलों. लोकमान्यांच्या शवाकडे पाहून ते दोघेहि ढसढसा रडूं लागले. नंतर मीं त्यांस तुम्ही कोठले, काय वगैरे हकीकत विचारल्यावर त्यांपैकीं पहिला म्हणाला, " काय सांगूं रावसाब ! आम्ही नगर जिल्ह्यांतले. हे महाराज मागं नगरास आले होते तेव्हां मी त्यांना चौकर वकिलाचे घरीं गांठून मारवाड्यानें लुबाडलेल्या माझ्या जमिनीचे कागदपत्र त्यांस दाखविलं. त्यांनीं ते सगळे पाहून वाचून माझ्याकडून एक दमडीहि न घेतां रात्रीं मला इंग्रजी अर्ज लिहून दिला व 'कोणाहि वकिला-मार्फत कलेक्टराला ह्या अर्ज देऊन भेट' असे सांगितलं. त्याप्रमाणें मी केलं व अखेर माझी जमीन मला परत मिळाली. माझीं बायकापोरं आज

त्या जमिनीवर जगत आहेत. या महाराजांनींच आम्हाला अन्न खायला घातलं" असें म्हणत व लोकमान्यांच्या शवाकडे पाहात तो ओक्साबोक्सी रडूं लागला.

(२७) सिंहगड घेऱ्याच्या रांगेंतील दक्षिणेकडील अगदीं शेवटचें गांव कल्याण येथें व्याख्यानाकरितां मी गेलों होतों. येथें ब्राह्मणाचें फक्त एकच घर असून बाकी सर्व वस्ती कोळी व मावळे यांची आहे. रात्री चावडीवर निवळ चांदण्यांत गोष्टीच्या रूपानें माझें तासभर व्याख्यान झाल्यानंतर उघड्या जागेंत निजण्याकरितां आम्ही अंथरुणावर पडलों असतां तेथील एका मावळ्यानें पुढील गोष्ट सांगितली. "माझा बा लइ म्हातारा होऊन परवां मेला. पण त्याला तुमच्या टिळकमहाराजांची मायंदाळ भक्ति ! टिळक-महाराज या गडावर राहण्यास येत तेव्हां त्यांस आमचा एकदा दुधाचा रतीब होता. त्यांस सरकारनं सहा वर्सं तुरुंगांत टाकलं तेव्हांपासून माझ्या बानं सोमवारचा उपास धरला. पुढें ते पुण्यास सुटून आल्यावर आतां उपास करूं नको असं मीं त्यास म्हटलं. पण त्यांच्या पायावर डोकं ठेवल्याशिवाय सोमवार सोडायचा नाहीं असं म्हाताऱ्यानं सांगितलं. म्हातार-पणानं तो अगदीं थकला होता. त्यास घेऊन पुण्यास कसा जाऊं ही मला काळजी पडली. तेव्हां बाच म्हणाला, कुठं जा इतक्या लांब आपण शहरामंदी, महा-राजच पुढल्या वर्शीं उन्हाळ्यांत गडावर हवा खायला येत्यालच. तेव्हां त्यांस सावकाशपणं भेटूं म्हणजे झालं.' त्याप्रमाणें ते पुढें गडावर आल्याचं आम्हाला कळलं म्हणून मीं गडावर जाऊन त्यांस विचारलं, 'आतां आपण इथं आणखी किती दिन आहांत ?' 'आहे आणखी आठ दिवस. पण पुन: परत येईन' असें ते म्हणून त्यांनीं मला विचारलं, 'कां चौकशी करतों आहेस, कांहीं कामबीम आहे काय ? तेव्हां मी त्यांस सारी हकीकत सांगि-तली. ती ऐकून लगेच ते म्हणाले, 'ठीक आहे. उद्यां या वेळीं या. मी येथेंच आहें.' लगेच मीं खालीं जाऊन बाला हें सारं सांगितलं. ते ऐकून त्याला फार हरिख झाला व दुसरे दिवशीं वर जाण्याची आम्ही तयारी केली. टिळकमहाराजांना भेट म्हणून म्हाताऱ्यानं बरोबर घरचा खवा व पायावर वाहण्यास कण्हेरीचीं फुलं घेतलीं. बा अतिशय थकलेला असल्यामुळें

त्यास एका हऱ्यांत बसवून तो घेऊन आम्ही निघालों. पायथा संपून गडाचा एक टप्पा आम्ही चढलों. तोंच तेथें एका झाडाखालीं एका वाटाड्यास घेऊन टिळकमहाराज येऊन बसलेले आम्हास दिसले. म्हाताऱ्याला तसं सांगतांच तो तसा हऱ्यांतच उठायला लागला. लगेच आम्ही हरा खालीं ठेवला. बा हऱ्यांतून बाहेर आला व दोन पावलं महाराजांपर्यंत चालत येऊन त्यानं त्यांस एकदम मिठी मारली. तें पाहून 'असं काय श्रीमंताला झोंबावं' असं मी म्हणालों. पण उलट महाराजांनींहि म्हाताऱ्याला तशीच भेट दिली! मग बा म्हणाला, 'आपण कशाला इतका डोंगर उतरून आलांत. आम्ही वर येतच होतों. आपणाला हे केवढे श्रम झाले. तुम्ही तर आतां माझ्यापेक्षांहि म्हातार दिसूं लागला.' तेव्हां महाराज म्हणाले, 'अहो! माझ्याकरितां तुम्ही आज सहासात वर्षं उपास करीत आहां, शिवाय तुम्ही इतके म्हातारे. मी फक्त दिसायला म्हातारा. तुम्ही वर येण्यापेक्षां मी खालीं आलों म्हणून त्यांत काय बिघडलें?' वगैरे कांहीं वेळ बोलणं झाल्यावर बा त्यांच्या पायावर फुलं ठेवूं लागला तेव्हां ते रागावले. 'तुम्ही मला माझ्या वडिलासारखे असून हें असें काय करतां?' असें म्हणून त्यांनीं तीं फुलें बाजूस ठेवून दिलीं. नंतर बानें खव्याचं टोपलं घेऊन त्यांतून खवा काढून तो महाराजांच्या हातावर ठेवला व 'हा एवढा गरीबाचा मेवा तरी माझ्या देखत खा म्हणजे मला आनंद वाटेल' असं तो म्हणाला. ती टोपली त्यानं त्यांच्याजवळ ठेवली व तेव्हां त्यांनीं तो थोडाथोडा बोलत बोलत सर्व खाल्ला. त्या वेळीं डोंगरांतले मोळीवाले, कातकरी वगैरे लोक जमले होते. त्यांस व आम्हा सर्वांस महाराजांनीं आपल्या हातानें खवा वांटला. मग बराच वेळ बोलणं चालणं झालं. नंतर 'ऊन होतें आहे, आम्ही आतां परततों. तुम्हीहि परत जा' असें ते आम्हास म्हणाले व म्हाताऱ्याचा हात धरून सांगितलें कीं, 'आतां यापुढें मात्र सोमवार करूं नका हो.' इतके म्हणून ते चालावयास लागले. पण आतां एवढा डोंगर छातीवर घेऊन हे उन्हांत कसे जाणार अशी मला काळजी वाटली. म्हणून मी त्यांस म्हणालों, 'बासारखं तुम्ही या हऱ्यांत बसा. आम्ही अलगत तो घेऊन चालतों.' प्रथम त्यांनीं हें कबूल केलं नाहीं. आपले मुकाट्यानें चालावयास लागले. पण चालतांना पाय लटपटत आहेत असं

मला दिसतांच मी त्यांच्या म्होर होऊन त्यांस अखेर हऱ्यांत बसण्यास लावलं. ते बसले व त्यांस घेऊन आम्ही वर गेलों."

(२८) भोर संस्थानांतील नसरापूर येथें मी गेलों असतां तेथील मंडळींनीं पुढील हकीकत सांगितली. "जवळजवळ तीस वर्षांपूर्वी सकाळीं एके दिवशीं राजगड किल्ला पाहून लो० टिळक नदीपार होत होते. इतक्यांत गांवांतली कांहीं मंडळी सहज नदीवर गेली होती. पाहतात तों टिळकमहाराज! ते परभारेंच पुण्यास जाण्याच्या विचारांत होते; पण मंडळींनीं त्यांना पाहिल्यावर त्यांस कोण सोडील? मंडळी त्यांस गांवांत घेऊन आली सर्व पेठेंत त्यांस पानसुपाऱ्या झाल्या. दोनप्रहरीं त्यांस मेजवानीहि देण्यांत आली. सायंकाळीं त्यांचें जाहीर भाषण झालें. त्यांत त्यांनीं "जसें तुम्हास स्वराज्य आहे तसें सर्व हिंदुस्थानास मिळावें असा आमचा प्रयत्न चालू आहे" असें सांगितलें. 'स्वराज्य-गंगे'चा उगम लोकमान्यांच्या मुखांतून प्रथम आमचेच गांवीं झालेला आहे, हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे."

(२९) विलायतेस डेप्युटेशन घेऊन लोकमान्यांस कोलंबोमार्गानें जावयाचें असतां सोलापूर स्टेशनाच्या प्लॅटफॉर्मवर मंडळींनीं त्यांची संभावना करण्याची तयारी केली होती व हें गाडी स्टेशनांत शिरत असतांच लोकमान्यांच्या लक्षांत आलें. नंतर गाडी थांबतांच प्रमुख मंडळी डब्याजवळ आली व त्यांस म्हणाली 'गाडी सुटण्यास अवकाश आहे, आपण खालीं यावें.' तत्काल लोकमान्य विनोदानें म्हणाले, "मला खालीं कां ओढतां, तुम्हीं वर आलें पाहिजे! खालीं ओढणें सोपें–मतलबाचें आहें. वर येणें अवघड आहे." हें ऐकून मोठा हंशा झाला.

(३०) नगर जिल्ह्यांतील मांडवगणचे श्री० देशमुख पुण्यास आले होते. त्यांस गीतारहस्याची एक प्रत घ्यावयाची होती; पण बाजारांत कोठेंहि ती विकत मिळेना. म्हणून केसरी ऑफिसमध्यें ते आले. पण तेथेंहि प्रत शिल्लक नव्हती. म्हणून ते लोकमान्यांकडे आले व त्यांस त्यांनीं तसें सांगितलें. तें ऐकून चटकन् उठून लोकमान्यांनीं आपल्या कपाटांतील खास प्रतींपैकीं एक प्रत आणून त्यांस दिली. देशमुख त्यांस पैसे देऊं लागले. अर्थात् लोकमान्यांनीं ते घेतले नाहींत. पण विनोदानें म्हणाले, "अहो!

निदान मीं आपल्या हातानें तरी ज्ञान विकणें बरे नाहीं. शिवाय तुमची आम्हीं खोटी कां करावी ? आमचेकडून पुस्तक तयारच कां असू नये ? माझ्या मतें ग्रंथ वाचण्याची भूक मारणें पाप आहे. त्यास प्रायश्चित्त म्हणून तरी हे पैसे मला घेतां येणार नाहींत ! ”

(३१) १९१८ मधील मुंबईच्या स्पेशल काँग्रेसच्या विषयनियामक कमिटीच्या सभेंत ‘स्वराज्य’ विषयावर वादविवादाचें रणकंदन चालू असतां नेमस्त वृत्तीच्या एका गृहस्थानें लोकमान्यांच्या राजकारण-बुद्धि-विषयीं किंचित् संशयास्पद असे उद्‌गार काढले. त्यावर त्या काँग्रेसचे अध्यक्ष बॅ. हसन इमाम चवताळून उठून म्हणाले, ‘Let me say, and it is with great pride, that Lokamanya Tilak is my father in point of politics.’ हें ऐकून सर्व सभासद अगदीं चित्रासारखे शांत बसले.

(३२) सिंहगड घेऱ्यापैकीं खांवगांवीं माझें व्याख्यान झाल्यावर मी तेथून जावयास निघालों. पुढें चालतां चालतां आजूबाजूच्या गांवांहून व्याख्यानास आलेल्या दोन मराठी गृहस्थांस मीं पुढील शब्द आपापसांत बोलतांना ऐकले. “ हे कोणी तरी टिळकमहाराजांचे लागत असावेत. त्याविना त्यांचा इतका कैवार घेऊन सरकारचे उलट हे कशाला बोलतील?” मी लगेच त्यांस म्हणालों ‘हो, मी पुण्यास टिळकमहाराजांच्या कचेरींत असतों,’ हें ऐकून त्यांपैकीं एक मोठ्या काकुळतीनें म्हणाला, ‘गेला ! असा पुरुष आतां होणं नाहीं. आम्हाला अगदीं भावावानी समजत असे.’ हें ऐकून तुम्ही कोण, कुठले वगैरे सर्व हकीकत त्यांस विचारण्याची मला सहजच उत्कंठा उत्पन्न झाली. हे दोघे वृद्ध भाऊभाऊ होते. डोक्याला मावळी पागोटें, त्यांचे रुबाबदार चेहरे, कानांत ते सोन्याचे बाळे, गालावर पिकल्या केसांचे कल्ले, खांद्यावर घोंगडी व हातांत पहाडी काठी असा त्यांचा थाट होता. ते म्हणाले, ‘ते पाहा, समोर सिंहगडाच्या त्या अगदीं नेमक्या नाकाखालीं बेचक्यांत आमचें दुर्गदरा गांव आहे. टिळकांनीं वर बंगला बांधला, त्या वेळेपासून त्यांची आमची ओळख पडली. ते दरवर्षी उन्हाळ्यांत वर येत, तेव्हां आम्ही रोज त्यांच्याकडे जाऊन

गोष्टी बोलत बसावयाचे. त्यांना कांहीं आमचं काम लागलं म्हणजे ते त्या नाकाडावर उभें राहून खूप मोठ्यानें हांक मारीत, म्हणजे खालीं आम्हास नेमकें ऐकावयास येई.' एकदां आम्ही त्यांस म्हणालों, 'आम्हाला लिवतां येत नाहीं, रेघब्री कशी ती ओढायची माहीत नाहीं. तेव्हां आमच्यासंग बोलून तुम्हाला काय फायदा आहे; ' यावर ते म्हणाले, "अहो! पूर्वींच्या काळचा फत्तरावर लिहिलेले (शिलालेख) आम्ही वाचतों त्यापासून' ज्ञान मिळवितों; मग तुम्ही तर काय बोलूनचालून जिवंत माणसें आहांत' असें म्हणून रामास मदत केलेल्या वानरसेनेची आम्हास गोष्ट सांगितली. पुढें एकदां आमच्या भाऊबंदकीच्या तंटयाबाबत त्यांना आम्ही आपलें कागदपत्र दाखविले. ते पाहून त्याबद्दलचं काम झाल्यावर ते आम्हास गमतीनं म्हणाले, 'तुम्ही कोणाचं अन्न खातां, तुम्हाला कांहीं ठाऊक आहे?" 'आम्ही रायाजीच्या वंशातले आहोंत. त्याचं अन्न खातों' असं आम्ही म्हणालों. हें ऐकून त्यांना बरं वाटलं व शिवाजीमहाराजांकरितां जीव धोक्यांत घालून तानाजीनें येथें घोरपड कां, कशी व कोठें लाविली वगैरे, आम्हास बरोबर घेऊन त्यांनीं चोहोंकडून हिंडून दाखविलें व म्हणाले, 'तुम्ही एवढचा पराक्रम केलेल्या रायाजीच्या वंशांतले आपणास म्हणवितां तर आम्हाकरितां एक घोरपड मिळवा म्हणजे ती कशी लावावयाची वगैरे तुम्हास मी दाखवितों.' हे आपले तेवढचा वेळेपुरतें घोरपडीचें यांचें बोलणें असेल असें समजून आम्हीं तें मनावर घेतलें नाहीं; पण पुढें जेव्हां जेव्हां आम्ही त्यांजकडे जावं तेव्हां तेव्हां त्यांनीं 'आणली घोरपड ?' असें आम्हास विचारावें. एकदां तर त्यांनीं आम्हास त्याकरितां पैसेहि देऊन ठेवले आणि पुढें पुढें तर घोरपडीशिवाय ते आमच्याशीं गोष्टच बोलेनासे झाले. फार काय पण 'घोरपड आणल्याशिवाय आम्हास भेटूं नका' असेंहि शेवटीं त्यांनीं सांगितलें. 'काय बामणानं डोक्यांत वेड घेतलं आहे पाहा' असं आम्हास वाटे. पण मैत्री जमल्यामुळें त्यांना भेटल्याशिवाय आम्हास चैनच पडू नये! अखेर आम्ही हरप्रयत्न करून एक घोरपड मिळविली व ती घेऊन आम्ही वर गेलों. घोरपड पाहून टिळकांना काय आनंद झाला सांगावं! त्यांनीं आपल्या घरांतील सर्व मंडळींस हांक मारून आणून ती दाखविली व आजूबाजूच्या बंगल्यांतल्या आपल्या स्नेह्यासोबत्यांस बोलावून आणून

ती दाखविली. तिला खायला काय घालायचं, ती कशी माणसाळायची व तिचा आपण कसा उपयोग करायचा हें त्यांनीं आम्हांस सांगितलें. त्या वेळीं दाजीसाहेब खरे तेथें होते. ते घोरपड पाहून टिळकमहाराजांवर फार रागावले व म्हणाले, 'कांहीं तरी तुम्ही डोक्यांत घेतां व नाहीं ते उद्योग करीत बसतां झालं !' टिळकमहाराजांनीं त्यांस कांहींच उत्तर दिलें नाही, पण आम्हास मात्र म्हणाले, 'ह्या भवानीला जपून ठेवा. मला खालून पुण्याहून बोलावणें आलें आहे. मी आज जाऊन चार-आठ दिवसांत परत येतों व मग हिच्या नादास आपण लागू. त्याप्रमाणें आम्ही ती जपून ठेविली, पण टिळकमहाराज लवकर येईनात व इकडे घोरपड तर खराब होऊं लागली, म्हणून आम्ही पुण्यास त्यांच्याकडे गेलों व लवकर येण्याविषयीं त्यांस बोललों. तेहि येतों म्हणाले, व घोरपड सांभाळून ठेवण्यास सांगितलें व पुन: आम्हास थोडे खर्चण्यासहि दिलें. पण दुर्दैवानें पुढें लगेच सरकारनें त्यांना पकडलें व इकडे घोरपडहि मरून गेली !

(३३) कांहीं कामाकरितां मी पुणें-सिंहगडच्या रस्त्यावरील डोणजें गांवीं गेलों होतों. तेथील × × × यांनीं पुढील गोष्ट सांगितली. " एका उन्हाळ्यांत लोकमान्य सिंहगडावर जाण्याकरितां तिसरे प्रहरीं टांग्यांतून सडकेनें आमच्या वाड्यावरून चालले होते. घरापुढें बरींच मुलें खेळत होतीं. त्यांस पाहून लोकमान्यांनीं टांगा उभा केला व एकास जवळ बोलावून गार पाणी पिण्यास मागितलें. त्या मुलानें आमच्या घरीं येऊन कुटुंबास सांगितलें. पण कोणास पाहिजे हें पाहण्याकरितां कुटुंबानें बाहेर येऊन पाहिलें तों टिळकमहाराज दरवाजाबाहेर सावलींत ओट्यावर उभे असलेले दिसले. तेव्हां भांबावून जाऊन लगबगीनें तिनें एका वाटींत सात-आठ घारगे घालून ती वाटी व तांब्याभांडें बाहेर नेऊन दिलें. लोकमान्यांनीं त्यांपैकीं दोन घारगे खाऊन उन्हांतून तापून आल्यामुळें अर्धा-अधिक तांब्या पाणी प्याले. नंतर जरा विचारपूस करून ते पुढें जाण्याकरितां टांग्यांत बसणार, इतक्यांत आमच्या कुटुंबानें धीटपणानें नारळ व सुपारी त्यांचेपुढे ठेवून नमस्कार केला व आपणास पुत्रसंतान नाहीं, तरी आपल्या हातचा प्रसाद म्हणून तसा आशीर्वाद 'मिळावा' अशी हात जोडून तिनें प्रार्थना केली. तेव्हां लोकमान्य म्हणाले, " मी कांहीं साधु नाहीं, संत नाहीं,

फार काय ज्योतिषीहि नाहीं. फार तर एवढें सांगतों कीं, रोज देवाची सेवा करीत जा, म्हणजे सर्व कांहीं तुमच्या मनाप्रमाणें होईल," असें म्हणून ते टांग्यांत बसले पण आमच्या कुटुंबानें भक्तीनें वेडें होऊन आशीर्वाद देण्याविषयीं जास्त आग्रह धरला व टांग्यांत जोडा घातलेल्या त्यांच्या पायावर तिनें अखेर डोकें ठेवलें. तेव्हां लोकमान्यांनीं खालीं उतरून सुपारी आपल्याजवळ ठेवून ओटयावरील तो नारळ घेऊन कुटुंबाच्या ओटींत घातला व 'तुमचा हेतु पूर्ण होईल' असें म्हणून ते टांग्यांत बसून निघून गेले. ईश्वरी योगायोग असा कीं, वयाच्या पन्नास वर्षांपर्यंत आम्हास संततिलाभ झाला नसतांहि हा प्रसंग घडून आल्यानंतर पुढें दोन वर्षांनींच टिळकमहाराजांनीं कुटुंबास सुपारीचा प्रसाद न देतां नारळाचाच दिल्या-प्रमाणें आम्हास पुत्रलाभ झाला!! त्याचें पाळण्यांतील नांव आम्ही 'बाळ' असेंच ठेविलें आहे.

(३४) लोकमान्यांची लोकप्रियता महाराष्ट्रापुरतीच आहे अशी माझी प्रथम समजूत होती. पण लखनौ कॉंग्रेसचे वेळीं मी त्यांचेबरोबर गेलों, तेव्हां मुंबई सोडल्यापासून लखनौचीं कॉंग्रेस आटोपून परत निघेपर्यंत आलेल्या अनुभवावरून हिंदुस्थानांतील कोणता प्रांत लोकमान्यांविषयीं अधिक भक्तिश्रेष्ठ आहे, हेंच मला कळेनासें झालें. लखनौ येथील त्या वेळच्या कांहीं गोष्टी आठवतात. त्या सर्वच मजेच्या आहेत, पण त्यांपैकीं फक्त एक दोन येथें देतों. लखनौच्या स्टेशनावर टिळकांची स्पेशल ट्रेन जाऊन उभी राहिली. त्या वेळीं प्लॅटफॉर्मवर भयंकर गर्दी झाली होती व व स्टेशनाच्या बाहेर तर एवढा प्रचंड जनसमुदाय लोटला होता कीं, दृष्टीच्या टापूंत मनुष्याशिवाय दुसरें कांहींहि दिसत नव्हतें. लोकमान्यां-करितां एक विलक्षण तऱ्हेनें शृंगारलेली मोटार सज्ज करून ठेवली होती. पण तेथील लोकांच्या मनांतून टिळकांनीं मोटारमधून न जातां गाडींतून जावें. कारण असें केल्यानें त्यांस गाडीचे घोडे सोडून त्यांची गाडी स्वतः ओढावयास सांपडणार होती. परंतु व्यवस्थापकांनीं तसें न करतां टिळक यांस मोटारीमध्यें बसविलें व मोटार येथून लवकर घेऊन चला म्हणून पोलिस सार्जंट त्यांस सांगू लागला. पण मोटारच्या मागूनपुढून व दोनहि

बाजूंस इतके लोक जमले होते कीं, मोटार नुसती हलविण्याची देखील सोय नव्हती. शॉफरनें चाकास गति देण्याकरितां पुढील चावी एकदां फिरवून खट्खट् धाड्धाड् आवाज तर काढले. पोंऽपोंऽचा तर सपाटा सुरू केला. पण लोक कसचे खमंग! ते मोटारीचा हातच सोडीनात. सर्वांचा आग्रह पडला कीं, टिळकांनीं घोड्याच्या गाडींतच बसावें. मी म्हणणारी गर्दी बराच वेळपर्यंत थबकून राहिल्यामुळें शांततेकरितां जबाबदार असणाऱ्या पोलिस सार्जंटचे डोळे इंगळासारखे लाल झाले व 'मोटार एकदम हांकून न्या' असा त्यानें संतापून पुन: हुकूम सोडला. पण इतक्यांत पाहावें तों मोटारच्या चाकाला भोंक पडलेलें. मोटार गर्दींतून लवकर काढून नेण्याविषयीं व्यवस्थापक व सार्जंट जेव्हां दर्डावून सांगूं लागले तेव्हां लोकमान्यांविषयीं अत्यंत प्रेम असणाऱ्या कांहीं लोकांस बुद्धि सुचून त्यांनीं मोटारीचें चाकच फाडून टाकलें. यामुळें निरुपाय होऊन लोकमान्यांस अखेर घोड्याच्या गाडींत बसविण्यांत आलें. मोटारींतले पुष्पहार मोटारींतच राहिले. मोटार लंगडी होऊन पडली. आतां या गाडीचे सोहाळे व्हावयाचे राहिले होते. तेथें लोकमान्यांवर पुष्पांचा पाऊस पडला. पुन: तगादा कीं, 'गाडी लवकर हलवा.' लोक तर घोड्याच्या पुढें उभे राहिले! घोड्यास पाय उचलावयासहि जागा नव्हती. 'बाजूस सरा, बाजूस सरा, नाहीं तर गर्दींतून घोडे दटावूं' असें लोकांस सांगण्यांत आलें; पण याहि वेळीं परमेश्वरानें लोकमान्यांच्या भक्तांच्या अंत:करणांत शिरून, त्यांस गाडीचे पोल मोडून टाकण्याची बुद्धि दिली. झालें, पोल तुटून पडले. 'अरे हें काय, हें काय' असें करतात तोंच कांहीं जणांनीं घोडे सोडले आणि आपणच त्यांचें काम करण्यास सिद्ध झाले. हे मनुष्याश्व रथास जुंपल्याबरोबर पुढील गर्दी न सांगतां पुढील मार्ग आक्रमण करूं लागली, हें सांगावयास नकोच. पण या वेळीं टिळक नको, नको म्हणत आहेत, व्यवस्थापक 'अरे, असें काय करतां' म्हणून लोकांस गाडी न ओढण्याबद्दल मिनतवारी करीत आहेतच पण अशा वेळीं त्यांचें ऐकतो कोण? निघाले मनुष्यवारु पुढें, ते मागें पाहतात कशाला? तोंडानें एकसारखे 'टिळकमहाराजकी जय' असें मंगलध्वनि सुरू झाले.

५०४८२ ता. १९२९ २८७

(३५) काँग्रेसच्या पहिल्या दिवशीं अध्यक्ष मुजुमदारबाबू यांचें भाषण झाल्यानंतर त्या दिवशींचें काम तहकूब झालें. आतां सर्व लोकांनीं आपापल्या बिऱ्हाडीं जावयाचें; पण संयुक्त प्रांताच्या ब्लॉकमधले पुष्कळ लोक आणि प्रेक्षकांच्या गॅलरींतले बहुतेक लोक बराच वेळपर्यंत आपल्या जागा सोडीनात. त्यांची दृष्टि त्या उंच व्यासपीठावरील (डायस) लोकमान्यांच्या मूर्तीकडे लागली होती. टिळक उच्चासनावरून उठून खालीं उतरूं लागले, तशी त्यांच्याभोंवतीं लोकांची गर्दी जमली. या वेळीं ते ऑल इंडिया काँग्रेस-कमिटीच्या महत्त्वाच्या सभेस जाण्याच्या गडबडींत होते. पण येथेंच त्यांस सात-आठशे लोकांनीं वेष्टून सोडिलें. कांहीं केल्या रस्ता निघेना. जो तो त्यांच्या जोड्यास हात लावून तेथील धूळ आपल्या मस्तकास लावूं लागला! टिळकांनीं त्यांचा असल्या आदरप्रदर्शनाबद्दल निषेध केला, पण त्यांचें कोणीच ऐकेना. शेवटीं लोकमान्यांनीं त्यांना विनंति केली कीं, "मला येथून सभेस जावयाचें आहे, मेहेरबानी करून वाट सोडा, मला जाऊं द्या." त्यांचें हें म्हणणें पंडित मालवीयजींनीं लोकांस हिंदीमध्यें समजावून सांगितलें. तेव्हां लोकांनीं मग चटचट पाळीपाळीनें लोकमान्यांच्या पाया पडून रस्ता करण्यास सुरुवात केली. एक म्हातारा दाढीवाला होता. तो हातांत काठी घेऊन मोठमोठ्यानें ओरडून म्हणूं लागला, 'महात्माको काम है, महात्माकू जाने दो.' तत्काळ गर्दी दुभंगली आणि टिळक सभेस निघून गेले.

(३६) लोकमान्य आपल्या बिऱ्हाडीं होते. नेहमींप्रमाणें ते जरा इकडेतिकडे खोलींत येरझारा घालीत होते. इतक्यांत पांढरा पोषाख केलेला एक पंडित त्यांच्या खोलीशीं गेला आणि आंत डोकावून साध्या पोषाखांतले ते गृहस्थ दुसरेच कोणी तरी असावेत असें समजून लोकमान्यांस त्यांनीं विचारलें, 'महात्मा टिळक कोठें आहेत?' लोकमान्यांनीं उत्तर दिलें, "टिळक तो मीच" हें ऐकून तो पंडित अगदीं खजील झाला. त्यानें तीनतीन वेळां खालीं वांकून नमस्कार करून लोकमान्यांची माफी मागितली. पुढें थोडा वेळ बसून त्यानें स्वतः रचिलेलीं हिंदी व्याकरणाचीं भलीं मोठीं दोनतीन पुस्तकें टिळकांस सप्रेम नजर केलीं व अभिप्रायहि मागितला. दोनप्रहरीं पुस्तकें वाचून अभिप्राय लिहून ठेवतों असें लोकमान्यांनीं त्यांस सांगितल्यावर त्यांनीं पुनश्च त्यांस प्रणिपात करून पंडितजी तेथून निघून गेले.

(३७) पुढें कोणी एक बड्या घराण्यांतील मुसलमान गृहस्थ लोकमान्यांचें दर्शन घ्यावयास आले व खोलीच्या दाराशीं उभें राहून, आपल्या पायांतील बुटाचे बंद सोडण्यास आपल्याबरोबरच्या शिपायास सांगितलें. हें पाहून दारापाशीं उभा असलेला स्वयंसेवक त्यांस म्हणाला कीं, 'बूट काढून ठेवण्याची जरूर नाही. आपणास त्यानिशीं आंत जावयास हरकत नाहीं.' तेव्हां त्या थोर मुसलमान गृहस्थानें दातांत जीभ घातली व कानावर हात ठेवून म्हणाले कीं, 'नहि महाराज, ये तो बहोत सेक्रेड (पवित्र) जगा है. इहांपर जूता कैसा लिजावे ? ' असें म्हणून त्यांनीं जोडा बाहेर काढून ठेवला व आंत जाऊन लोकमान्यांचें दर्शन घेतलें.

(३८) सन १८९८ सालीं लोकमान्य बंधमुक्त झाल्यावर 'सुधारक' कर्त्यांनीं त्यांची मुलाखत घेतली होती. नवीन पिढीस खुद्द लोकमान्यांच्या तोंडची ती हकीकत कळावी म्हणून विस्तृत अशा त्या मुलाखतीपैकीं कांहीं निवडक भाग खालीं देत आहें—

**प्रश्न**—आपणावर खटला होण्यापूर्वी असा प्रसंग येण्याचा संभव आहे, असें आपणास भासत होतें काय ?

**टिळक**—खटला कोणावर तरी होणार असें वाटलें, पण मजवरच प्रसंग येईल असें वाटत नव्हतें.

**प्रश्न**—टाईम्स ऑफ इंडियाच्या खोडसाळ लेखाबद्दल त्याच्या कर्त्यास न्यायाच्या कोर्टापुढें उभें करण्यासाठीं त्या वेळीं आपण मुंबईस आला होतां असें टाईम्सनें प्रसिद्ध केलें तें खरें आहे का ?

**टिळक**—टाईम्सवर फिर्याद करण्याचा माझा बेत होता, परंतु त्या वेळेस मुंबईस मी गेलों तों प्लेगच्या हकीकतीचें लहानसें पुस्तक प्रसिद्ध करण्यास गेलों होतों व मीं तेथें एक-दोन छापखान्यांत त्याबद्दल चौकशीहि केली होती.

**प्रश्न**—टाईम्समध्यें 'जस्टिस' या सहीचीं पत्रें प्रसिद्ध झालीं तीं अमुक एका मनुष्यानें लिहिलीं असावीं असें आपणास वाटतें काय ?

**टिळक**—त्यावद्दल लोक निरनिराळे तर्क करीत होते. कोणी कोणी तीं पत्रें रा. कीर्तने यांनीं लिहिलीं किंवा डॉ. भांडारकर यांनीं लिहिलीं अशींहि विधानें केलीं; तथापि त्या दोनहि गृहस्थांच्या हातून तें काम झालें नाहीं असा माझा पक्का ग्रह आहे. तीं पत्रें लिहिणारा मनुष्य दुसराच कोणी असला पाहिजे.

**प्रश्न**—तुरुंगांत असतांना आपणास कोणतीं कामें करावीं लागलीं ?

**टिळक**—मुंबईस असतां, दोऱ्या वळण्यासाठीं काथ्या, वाख वगैरे साफ करून देण्याचें काम मला दिलें होतें. परंतु पुढें पुण्यास आल्यावर गालिच्यासाठीं लोंकर व सूत रंगविण्याकडे मी होतों. शेवटीं महिनाभर लोंकर कातण्याचें काम मजकडे दिलें होतें.

**प्रश्न**--आपणास कांहीं वर्तमानपत्रें वाचावयास मिळत होतीं काय ?

**टिळक**—मला मराठा व केसरी मिळे, त्याचप्रमाणें दुसरीं पत्रें आलीं तर मिळत; तथापि त्या पत्रांतून बराचसा मजकूर कापून काढिलेला असे.

**प्रश्न**—मुंबईस असतां प्रथम खाण्यासंबंधीं पुष्कळ हाल झाले असें म्हणतात ?

**टिळक**—होय. मला नुसती कोरडी भाकरी खावी लागे; कांद्याचा मला जन्माचा कंटाळा, त्यामुळें त्याचें कालवण मीं कधींहि पुढें येऊं दिलें नाहीं. दूध, तूप तर मुळींच नव्हतें, त्यामुळें माझी शक्ति क्षीण झाली व वजन फारच कमी म्हणजे एकशेंपांच पौण्ड झालें.

**प्रश्न**—मग आपणास जास्त चांगलें अन्न केव्हां मिळूं लागलें ?

**टिळक**—विलायतच्या हॉवर्ड असोसिएशननें अर्ज केल्यावरून किंवा दुसऱ्या कांहीं कारणानें म्हणा, सर्जन-जनरलनें येऊन माझी प्रकृति पाहिली व माझें वजन करून पाहिलें; तेव्हां मी एकशेंपांच पौण्ड भरलों, म्हणून एक पौण्ड दूध देण्याचा ठराव झाला. यानंतर आठ दिवसांनीं म्हणजे ता. २१ जानेवारी रोजीं डॉ. ब्यारी यांनीं आणखी एक पौण्ड दूध व अडीच तोळे तूप द्यावयाचा ठराव केला. ही सवलत शेवटपर्यन्त चालू होती.

**प्रश्न**—आपली राहण्याची व्यवस्था कशी होती ?

**टिळक**—मला युरोपियन तुरुंगांत ठेविलें होतें. माझी खोली तीन खणांची होती. त्यांत निजण्यास दगडी ओटा व वर फळ्या घातल्या होत्या. आमचा बिछाना काय तो दोन कांबळ्यांचा. माझ्या अंगावर कैद्याचा पोषाख होता. मला वाचावयास घरचीं पुस्तकें मागवून घेण्याची व त्याचप्रमाणें रात्री तीन तास दिवा ठेवण्याची परवानगी होती. मजजवळ जीं पुस्तकें होतीं तीं सर्व ऑफिसांत ठेवावीं लागत व त्यांतून कांहीं पुस्तकें मात्र मला घेऊन माझ्या खोलींत जाऊं देत. मीं बहुतेक ऋग्वेदाचाच अभ्यास केला. त्यास टीकांची मदत होती, त्यावरून मीं असा तर्क बांधला आहे कीं, आर्य लोकांचे पूर्वज ज्या ठिकाणीं 'दोन महिन्यांची रात्र' होती अशा ठिकाणीं, म्हणजे उत्तरध्रुवाजवळच्या मुलखांत होते, परंतु पुढें हळूहळू ते दक्षिणेकडे येऊं लागले. माझ्या म्हणण्यास भूशास्त्रवेत्त्यांच्या शोधाचें पाठबळ आहे; तथापि तुरुंगांत मला पुरेशीं पुस्तकें मिळालीं नाहींत. तीं अद्यापि पाहावयाचीं आहेत. तीं पाहिल्यावर कदाचित् माझें मत फिरण्याचाहि संभव आहे. परंतु सध्यां माझ्या मनाची त्याविषयीं खात्री झाली आहे.

**प्रश्न**—आपण लोंकर रंगविण्यासंबंधीं कांहीं नवीन क्लृप्ति काढिली असें म्हणतात, ती कोणती ?

**टिळक**—मी? मुळींच नाहीं! कांहीं तरी गप्प उठली असेल, तींत बिलकुल तथ्य नाहीं. माझे मित्र प्रो० गज्जर यांजकडून कांहीं पुस्तकें मिळवून त्यावरून रंग देण्याच्या निरनिराळ्या रीती कागदावर एकत्र लिहून काढल्या. यापलीकडे या बाबतींत माझ्या हातून कांहीं झालें नाहीं.

**प्रश्न**—मि० न्यूजंट यांची आपली गांठ पडली व कांहीं बोलाचाली होऊन त्यामुळें आपणास त्रास सोसावा लागला असें प्रसिद्ध झालें आहे.

**टिळक**—तेंहि खरें नाहीं. ऑ० मि० न्यूजंट एक वेळ तुरुंगांत आले होते, त्या वेळीं रंग देण्याच्या पडवींत ते आले. त्यांस टाळण्यासाठीं मी मागें गेलों; परंतु माझ्या मागोमाग येऊन त्यांनीं मला नांवानें हाक मारिली; तेव्हां त्यांचेकडे येणें मला भाग पडलें. मला त्यांनीं विचारिलें, 'प्रकृति कशी आहे? ' तेव्हां मीं उत्तर दिलें, 'तुरुंगांतल्या खाण्याच्या मानानें व

येथील कायद्याच्या कडकपणाच्या मानानें माझें नीट आहे म्हणावयाचें.' त्यांनीं पुन: विचारिलें, ' अजून किती महिने उरले आहेत?' मीं उत्तर दिलें, 'सात आठ आहेत.' मि० न्यूजंट म्हणाले कीं, 'पण त्यांत कांहीं माफी मिळेल.' मीं सांगितलें कीं, 'चांगल्या वर्तणुकीसाठीं मार्क मिळतात त्यामुळें सुमारें दीडदोन महिने कमी होतील.' यानंतर मि. न्यूजंट म्हणाले, ' पण हें काम जरासें ओंगळ नाहीं काय ?' मीं म्हटलें, 'आहे, परंतु काथ्या खोलण्यापेक्षां हें बरें आहे.' यानंतर मला सलाम करून ते गेले. त्या वेळीं यापेक्षां आम्हामध्यें कांहींसुद्धां बोलणें झालें नाहीं.

**प्रश्न**—आपली प्रकृति बरीच क्षीण झाली आहे.

**टिळक**—होय. माझें वजन १३५ पौंड होतें तें आतां ११२ आहे. तथापि मला कोणत्याहि रोगाची पीडा आहे असें नाहीं. एक महिन्यांत येथील व्यवस्था नीट लावून, चारपांच महिने कोठे तरी जाऊन विश्रांति घ्यावी असा माझा विचार आहे.

**प्रश्न**—चाफेकरानें आपणाजवळून गीता घेतली असें म्हणतात.

**टिळक**—होय. सुपरिंटेंडेंटाजवळ त्यांनीं गीतेचें एक पुस्तक मागितलें होतें; पण माझ्या ऑफिसावर असलेल्या पुस्तकांत गीतेच्या तीन प्रती होत्या, करितां सुपरिंटेंडेंटला विचारून मीं त्यांपैकीं एक चाफेकरांस दिली. पुढें ती माझी मला परत मिळाली. चाफेकर यांनीं सांगितल्यावरून त्यांचा अर्ज मीं लिहिला. त्या वेळीं तो सुमारें तीन तास मजजवळ होता. परंतु या वेळीं तुरुंगांतील एक अधिकारी आम्हांजवळ एकसारखा बसला होता व त्याच्यासमोर आमचें सर्व बोलणें झालें.

**प्रश्न**—तुरुंगांत वागण्याचें फार जड असेल ?

**टिळक**—तें काय विचारावें? परवानगीवाचून बोलतां कामा नये, हलतां कामा नये, कोठें जाणेंयेणें उपयोगी नाहीं, काम करण्यास ओळ सोडून बसतां कामा नये, नाहीं तर, देखरेख करणारे लोक सुपरिंटेंडेंट यांस वाटेल तें सांगतात व कैद्याचें म्हणणें कांहींएक न ऐकतां फटके मारणें, खोडा घालणें किंवा अंधारांत कोंडून ठेवणें इत्यादि शिक्षा मिळतात अगर माफीचे मार्क कापतात. मला सुदैवानें असा त्रास झाला नाहीं. याचें कारण तुरुंगावरचा पहिला सुपरिंटेंडेंट स्वत: माझ्याकडे विशेष लक्ष देई.

**प्रश्न**—तुरुंगांत स्वच्छतेविषयीं बरीच काळजी घेण्यांत येत असेल ?

**टिळक**—जागा, भिंती व नजरेपुढें येणारें सामानसुमान फारच चक्क ठेवण्यांत येतें; परंतु कैद्यांच्या शारीरिक स्वच्छतेची हवी तशी काळजी घेत नाहींत. कैद्यांच्या अंगास महिना-पंधरा दिवसांत पाणी लागावयाचें नाहीं! सर्वांस पुरेसें पाणीहि तुरुंगांत नाहीं. मी प्रथम रोज स्नान करीत होतों. परंतु पावसाळ्यांत मला आमांश झाल्यावर एक दिवसाआड करूं लागलों. कैद्यांच्या अंगावरच्या कपड्यांस चारचार महिन्यांत पाणी नाहीं, त्यामुळें त्यांत उवा पडतात; त्या हातांनीं वेंचून काढाव्या लागतात !

**प्रश्न**—अंगावरील कपडे धुणारा किती दिवसांनीं सांपडे ?

**टिळक**—नियम म्हटला तर आठ दिवसांनीं एक वेळ. तीन रिठे किंवा थोडासा साबण घेऊन रविवारीं कपडे धुवावयाचे व तेहि मिळेल तेवढ्याच पाण्यांत! जास्त वेळां कपडे धुणें हा गुन्हा आहे! रात्रंदिवस तेच कपडे अंगांत घालावयाचे असल्यामुळें ते किती घाण होतात हे सांगतां पुरवत नाहीं.

**प्रश्न**—निजावयाच्या जागेंतहि ढेकूण, पिसा, चिलटें फार असतील ?

**टिळक**—पुण्याच्या तुरुंगांत माझ्या खोलींत ढेंकूण नव्हते; तथापि याच तुरुंगाच्या इतर भागांत म्हणजे निजावयाच्या ज्या मोठमोठ्या बराकी आहेत त्यांत आणि त्याचप्रमाणें मुंबईस ढेकूण व पिसा अतोनात आहेत. तेथील भिंती चांगल्या आहेत, परंतु ढेंकूण आढ्यावर जाऊन बसतात आणि रात्र झाली कीं, ते पटापट अंगावर पडतात. धरीन म्हटलें तर दिवा नाहीं, दुसरीकडे जाईन म्हटलें तर इलाज नाहीं. अशी स्थिति होते. नेटिव्ह कैद्यांस निराळ्या खोल्या नाहींत. त्यांस एका रांगेनें एका बराकींत आडवें पडावें लागतें. दोन घोंगड्या ज्यांच्या वांट्यास (कित्येकांना एकच मिळते) येतील त्या घ्यावयाच्या व धुळीवर कीटकांच्या भक्ष्यस्थानीं पडावयाचें ही स्थिति रोजची आहे. मुंबईस प्लेग झाला तेव्हां कॅर्बालिक ॲसिड घालून त्या घोंगड्या धुतल्या पाहिजेत, असें मीं डॉक्टरास सुचविलें

तेव्हां त्याकडे त्यांचें लक्ष गेलें. त्यांचे आधीं त्या केव्हां धुतल्या होत्या कोण जाणे ! तुरुंगांतील सर्व स्वच्छता दिखाऊ आहे. तेथील स्वच्छ जागा म्हणजे झाडलेल्या रस्त्यासारखी दिसण्यास स्वच्छ, आणि स्वच्छ अन्न म्हणजे ज्यांत न खाण्यासारखा पदार्थ नाहीं तें. याहून स्वच्छता तेथें ठाऊक नाहीं !

**प्रश्न**—आपल्या डिफेन्सफंडाबद्दल आपणास कांहीं माहिती आहे काय ?

**टिळक**--डिफेन्सफंडाचा हिशेब झाला आहे त्यावरून पाहिलें तर सुमारें ५३००० रुपये जमले व त्यांपैकीं अजमासें नऊ हजार रुपये शिल्लक आहेत. त्या रकमेचें काय करावयाचें याचा विचार ज्या मुख्य मुख्य ठिकाणांहून वर्गणी आली, तेथील कांहीं प्रमुख गृहस्थांच्या सल्ल्यानें रीतीप्रमाणें होईल.

(३९) लोकमान्य विलायतेहून परत आल्यावर दुसरेच दिवशीं त्यांच्या एका विशेष सलगीच्या स्नेह्यानें त्यांस प्रश्न केला कीं, 'काय हो बळवंतराव चिरोल केसच्या पायीं तुम्ही दोनअडीच लाख रुपये बुडवून अखेर काय मिळविलें ? कालापव्यय, द्रव्यनाश आणि तुमच्या शक्ति-बुद्धीचा व्यर्थ दुरुपयोग मात्र झाला, होय कीं नाहीं ?' हें ऐकून लोकमान्य गंभीर मुद्रेनें व निश्चयी स्वरानें म्हणाले, ''तुम्ही हा प्रश्न विचारतां म्हणूनच मी मोकळेपणानें सांगतों. कारण मी हें जाणतों कीं, तुमच्या या विचारण्यांत प्रामाणिकपणा व कळकळ आहे. पण इतर कोणी कुत्सित बुद्धीनें विचारलें म्हणजे आमचेजवळ उत्तरहि त्याच मासल्याचें आहे. असो. चिरोलवर खटला भरण्याचीं कारणें अशीं कीं, अन्यायाचा, आणि त्यांतहि शत्रुपक्षाकडून बुद्धिपुरस्सर केलेल्या अन्यायाचा, प्रतिकार करण्याचा माझा जन्माचाच स्वभाव आहे. माझी अशी समजूत आहे कीं, भीतीनें वा दुसऱ्या कसल्याहि सबबीनें अन्यायाचा प्रतिकार न करणें म्हणजे साक्षात् देवद्रोह करण्यासारखें आहे. राजद्रोह करण्यासारखें आहे. राजद्रोह मात्र तुम्हास भयानक वाटतो; पण राजाच्याहि राजाचा म्हणजे सत्याचा व न्यायाचा द्रोह करणें याचें तुम्हास कांहींच वाटत नाहीं. पण माझें तसें नाहीं, त्यास नाइलाज आहे. मंडालेहून मी येथें परत आल्यावर दुसरेच दिवशीं माझ्या

हातांत चिरोलचें पुस्तक पडलें. तें वाचल्यावर माझ्या स्वभावानुरूप अगदीं ऑटोमॅटिकली व्हावयाचें तसें झालें. खटला करावयाचा हें तर ठरलेंच. प्रश्न काय तो शक्याशक्यतेचा व बाकीच्या व्यावहारिक गोष्टींचा; पण मीं एकदां विचारपूर्वक एखादी गोष्ट करण्याचें मनाशीं पक्कें ठरविलें म्हणजे मग बाकीच्या गोष्टींची पर्वा करीत नाहीं. मीं विचार केला कीं, खटला माझ्यासारखा झाल्यास उर्मट व अरेरावी सरकारावर व त्यांच्या सग्यासोयऱ्यांवर आणि हस्तकांवर एक प्रकारचा वचक बसेल. पूर्वीं टाईम्स व ग्लोब या पत्रांवरील खटल्यांत आम्हास यश आलेंच कीं नाहीं? तसेंच याहि बाबतींत आल्यास अब्रुनुकसानीदाखल मिळणाऱ्या पैशाचा उपयोग आमच्या शब्दामुळें व चळवळीमुळें तुरुंगांत जाणाऱ्या देशभक्ताच्या कुटुंबा-कडे आम्हास करतां येईल. बरें, खटला फसला, सर्व मसलत अंगावर आली तरी सर्वस्वीं आमची बाजू खरी, पुराव्यानें सिद्ध होणारी अतएव न्यायाची असूनहि कायदेबाज म्हणविणाऱ्या सरकारनें उघडउघड पक्षपात-बुद्धीनें हा एक प्रकारें आपल्या 'प्रेस्टीज'चा प्रश्न म्हणून न्यायाचा खून केला म्हणून सर्व दुनियेचा त्यांचेवरील विश्वास उडणार, हें निश्चित होय. आणि असें झालें तर याहून आणखी मला काय पाहिजे? राजकीय बाबतींत खुद्द विलायतेंतहि आम्हास—जित लोकांस—न्याय मिळत नाहीं म्हणून इंग्रजांवर व त्यांच्या न्यायावर विश्वास ठेवण्यांत हशील नाहीं एवढी गोष्ट हिंदी लोकांस शिकण्यास आमचे दोन लाख रुपये खर्च झाले तर ते वांया गेले असें मला वाटत नाहीं. व म्हणूनच आम्ही हा खटला हिंदुस्थानांत न चालवितां विलायतेंतच चालविला जाण्याबद्दल आग्रह धरला. बाकी या खटल्यामुळें व्यक्तिशः आमचा सांपत्तिक दृष्ट्या जरी सर्वनाश झाला असला तरी मला अशी पूर्ण उमेद आहे कीं, ज्या अर्थीं मीं लोकांस न विचारतां व त्यांचा सल्ला न घेतां हा खटला आपल्या एकट्याच्या जबाबदारीवर उभारला त्या अर्थीं लोकांकडून काडीच्या मदतीचीहि अपेक्षा न करतां, एक दोन वर्षे सिंहगडावर जाऊन राहीन आणि तेथें आज कित्येक वर्षे मनांत योजून ठेविलेलीं दोन-तीन पुस्तकें लिहीन, म्हणजे त्यांवर, माझी खात्री आहे कीं, मला माझें सर्व कर्ज फेडतां येऊन मी या अडचणींतून मुक्त होईन. चिरोलवर खटला करण्याची ही माझी विचारसरणी तुम्हास पटते

का ?" हें ऐकून प्रश्न करणाऱ्या स्नेह्याचें पूर्ण समाधान झाल्यामुळें 'तुमचें म्हणणें सर्वस्वीं पटलें बुवा, हा आमचा कबुली जबाब घ्या!' असे ते थट्टेनें म्हणाले.

(४०) केसरी वर्तमानपत्राचा मजकूर थोडया वेळांत लाइनो अगर अगर मोनो टाइपाप्रमाणें कसा कंपोज करतां येईल व या यंत्राचा मराठी टाइपाकडे उपयोग करण्यास टाइपांत काय फेरबदल करावा लागेल ह्या गोष्टींकडे लो. टिळकांचें लक्ष सन १९०४ मध्यें लागलें होतें. तेव्हां त्यांनीं लगेच मराठी अर्ध्या अक्षरांचे पंच करून व बरींच अक्षरें कान्यावर घेऊन पंच किती कमी होतात व ते लाइनो अगर मोनोचे 'की' बोर्डांत बसतील किंवा नाहीं हें पाहण्याच्या खटपटीस ते लागले. आर्यभूषण टाईप फाउंडरीचे मुख्य कै. सहदेव दाजी पिंगळे यांजकडे त्यांनीं तें काम सोंपविलें व आपण स्वतः रोज सकाळ-संध्याकाळ त्या छापखान्यांत जाऊन त्यांस येणाऱ्या अडचणी दूर करीत. शेवटीं एक फाऊंट तयार करून त्याचे टाईप पाडून तो केसरींत सन १९०४ डिसेंबरच्या अंकांत घालून पाहिला. त्या वेळीं मुंबईच्या निर्णयसागर टाईप फाउंडरीचे मालकास सांगून हाच फाउंट कै. राणोजी यांजकडून तयार करविला. तिकडे काम तयार होण्यास वर्ष-दोन वर्षें लागलीं; यामुळें व इतर अपरिहार्य अडचणींमुळें तें काम तसेंच पडून राहिलें. सन १९१४ मध्यें सरकारनें दिलेल्या एकांत-वासांतून परत आल्यावर पुन्हा तें काम त्यांनीं हातांत घेतलें व टाइपाच्या पहिल्या वळणांत फेरबदल करून त्यांनीं सुधारणा केली. पुढें विलायतेस गेले, तेव्हां तेथें एका मोठ्या टाइप-कंपनीची भेट घेतली. सदर कंपनीनें टाइपाबद्दल अमेरिकन कंपनीस त्यांस लिहावयास सांगितलें. विलायतेस व येथें परत आल्यावरहि त्यांची खटपट चालूच होती. परंतु ता. १ ऑगस्ट सन १९२० रोजीं सर्वच ग्रंथ आटोपला! तथापि त्यांनीं सुचविलेल्या सुधारणांवरून सन १९२६ मध्यें केसरी-मराठा संस्थेचे मॅनेजर श्री. बाबा-साहेब विद्वांस यांनीं पुनः नवा फाउंट तयार केला. आज लोकमान्य हयात असते तर याहूनहि या कार्यांत अधिक सुधारणा झाली असती यांत शंका नाहीं. सन १९०४ मध्यें लोकमान्यांनीं प्रथम तयार केलेल्या फाउंटमध्यें

२१३ मेट्रिसा होत्या. पुढें त्यांत सुधारणा करून सन १९१४ मध्यें त्या १८१ वर आणिल्या व त्यानंत १९२६ सालीं सुधारून केलेल्या फाउंटमध्यें त्या पुनः १९० करण्यांत आल्या. 'निर्णयसागर'च्या एका फाउंटमध्यें त्या सुमारें चारशें मेट्रिसा आहेत असें म्हणतात. टिळक-टाइपाचे १६६ इंच (एक हजार एम्) कंपोज करण्यास एका कंपॉझिटरला सुमारे दोन तासांहून कमी वेळ लागतो. तर तोच मजकूर चालू टाइपांत कपोज करण्यास कमींत कमी अडीच तास लागतात. टिळक-टाइपाचा विशेष हा कीं, चालू लिपीप्रमाणेंच त्याचें सर्व वळण कायम ठेवून चालू खिळचांतच ही सुधारणा केलेली आहे, तो एका मोल्डमध्ये पाडतां येतो व डिगऱ्या वगैरेंचा कोणताहि त्रास नाहीं. तात्पर्य, टिळक-टाइप इंग्रजी टाइपाप्रमाणें कपोज करण्यास सोपा पडतो.

(४१) विलायतेस चिरोल केसचा निकाल लागल्यावर त्या बाबतींत मनमोकळेपणानें लोकमान्यांनीं आपले भाचे श्री. बाबासाहेब विद्वांस यांस एक खासगी पत्र पाठविलें होतें. त्यांतील मुख्य भाग पुढें देत आहे. त्यावरून सदर खटल्यासंबंधीं लोकमान्यांच्या मनःस्थितीची स्थूल मानानें कल्पना येईल.

10 Howley Place,
Maida Vale., W. 2.
London.
26th February, 1919.

My dear Baba,

We have lost our case against Chirol. There was as you know no evidence to prove the charges. But the Judge made a monstrous charge to the Jury, ignoring the difference between political and private character as suggested in Carson's argument, and the Jury returned one general verdict for the defendants without caring to go into the

truth of each libel. We shall have now to pay Chirol's cost, unless we appeal and suceed therein, which is very doubtful.

You know that £ 7500 were deposited by us in Court. This sum will be lost and I am afraid we shall have to pay something more, how much I cannot say, but certainly not less than £ 1500 more. In addition to this I had to pay here £ 7100 to our Solicitors for the expense of conducting the case here. Of this sum I had my own Cheque for £ 1500 and the rest £ 5600 I have taken from ****. Therefore the whole liability now is, over £ 14000 ! As for the appeal we shall do what Sir John Simon would advise. It is a very heavy loss to us. But we cannot help. We tried a game and failed and we shall have to pay ! How I propose to get the money, I shall write in my next. Where are all your astrologers who said I would win ?

Don't be disheartened at the news of our failure in the Chirol case and the consequent money responsibility. We shall meet the situation as we have been doing hitherto, bravely and calmly.

The Jury and the Judge looked upon it as Government case and Mr. Montgomery was watching the case in court openly on behalf of Government; in other words he was assisting Chirol. I am sorry even in England you could not get a Jury to dispassionately judge of the evidence in the case. All who were in court felt that, but for the biassed and impassioned charge of the Judge, we should have won. Sir John did his work very well. He went so far as to urge that Chirol has produced no

evidence and so there was no case to go to the Jury at all. But all his efforts were of no avail. All went on the theory that if Tilak succeeded, it would be a disaster for Government. The 'London Times' actually says so. When such prejudice was created and intentionally created, there was of course no hope of success.

We are doing well. I am afraid that my Home Rule work may suffer to a certain extent by this failure; but let us try and see.

With compliments and Ashirvads to all.

I am,
yours affectionately,
Bal Gangadhar Tilak

# इंग्रजींतील आठवणी-ग्रंथांचीं
# आत्मनिवेदनें

लोकमान्यांच्या आठवणींच्या तीनहि खंडांत असलेल्या इंग्रजींतील आठवणींचीं स्वतंत्र तीनहि पुस्तकें प्रसिद्ध करून त्यांत आण्णासाहेब यांनी लिहिलेल्या तीनहि छोटया इंग्रजी प्रस्तावना व त्यांची अर्पणपत्रिका पढें दिली आहे.

**Reminiscences and Anecdotes of Lokmanya Tilak**
**Vols. I, II, III**

**DEDICATED**
TO
**SHRIYUT N. C. KELKAR**
AND
**SHRIYUT D. V. VIDWANS**
*Tried and trusted lifelong associates*
*of the*
**LATE LOKAMANYA**
*in his*
*Self-sacrificing Service*
*of the*
**MOTHERLAND**
*and*
*The Present Trustees*
*of*
**" KESARI-MAHRATTA INSTITUTION "**
*In humble token of the love and high regard*
*which the Dedicator feels*
*towards them.*

Poona
Kesari Office

S. V. Bapat

# Reminiscences and Anecdotes of Lokmanya Tilak

## Vol. I.

## TO THE READER

Last year I had the proud privilege to offer to the Marathi public the first volume of about five hundred pages of the Reminiscences and Anecdotes of the late Lokamanya Tilak. Contributions in English from the pen of the many of his admirers and friends that formed a part of that volume, were published by me in a separate volume simultaneously, with a foreword by Mr. N. C. Kelkar. He, in his foreword, observed " My advice to Mr. Bapat would, therefore, be to preserve and to make progress in the line on which he has already started and to make his work of reminiscence-hunting as thorough and exhaustive as he can make it, so that he may, in future, be able to make the English Volume as big as the Marathi one.

Encouraged by this advice and by last year's success I published this year also a second volume of Lok. Tilak's Reminiscences of more than seven hundred pages in Marathi on his 5th anniversary day. Following the same advice, I tried my utmost, according to my light and information, to collect for that volume reminiscences from all those who came in touch with the late Lokamanya at home or abroad. To give an idea of my labour in this direction I may quote here only two sentences from the replies I received from two famous leaders to letters, repeatedly sent to them by me.

One of them complains of having been literally showered by my letters and fancies me to be a '*Boering Machine*' to screw out reminiscences of Lok. Tilak, which effort has, he remarks, served incidentally to display a typical Maharashtrian characteristic, while the other begs me to save him from experiencing every day the humiliation of unfulfilled promise, as his table was bent under the weight of my letters ! With all that, I could not get anything from them is a different matter : but I felt that I could not give up my pursuit and had to persevere in my importunities since they had promised me their contributions. That the response from non-Maharashtrian provinces was very meagre and disappointing even after such persistent and tenacious efforts, this booklet will clearly bear out. But the editor does not mean to cast any reflection upon the defaulters because it does not import any lack of love and reverence on their part to the late Lokamanya, but it only reminds him that he is not a person to exercise his influence effectively upon them. But why should they be punctilious about the personality of the editor? Is it not the rough and coarse hand of gardener that wreathes together the fragrant and beautiful flowers into a garland ? May I hope that hereafter at least those that have something striking and significant to narrate about the late Lokamanya, will kindly send their contributions to me without delay? As said by Mr. D. V. Gokhale, B. A. LL. B. Editor of the *Mahratta* in his lucid preface to this book 'ample material may be found for the publication of a third 'volume, the field being not, as yet, exhausted."

The two Marathi volumes contain reminiscences from about four hundred people of Maharashtra. Really speaking contributions from all the rest of the provinces taken together should naturally have been many more than those available in Maharashtra. But even conceding that the Lokamanya might not have been brought into as close and varied a contact with the people outside Maharashtra, as with the Maharashtrians themselves, it is not too much to expect at least an equally large number of contributions from other provinces.

I propose to close this series by issuing a last volume very shortly comprising all such contributions as may be sent to me, at an early date, in response to this last and earnest appeal.

Lastly, I have to thank heartily the writers of this book who have undergone considerable trouble and obliged me by kindly sending their contributions. I must not forget to express my gratitude to Mr. D. V. Gokhale for allowing me the pleasure of presenting this book to the readers with his able foreword.

KESARI OFFICE
POONA CITY

S. V. BAPAT

## Reminiscence and Anecdotes
## of
## Lokamanya Tilak
## Vol. II

### TO THE READER

I have nothing to add more in my capacity of editor and publisher of this small volume of the "Reminiscences of Lok. Tilak" to what Mr. N. C. Kelkar has already said in his preface to this pamphlet. Really I am put under double obligation by Mr. Kelkar not only by his foreword to this volume alone, but also by the illuminating and extensive preface he has so ably written to a still larger volume (of about 550 pages) of " Reminiscences and Anecdotes of Lok. Tilak," recently published by me in Marathi. The reprint of that volume, I am proud to say, was required to be published within one month from its first edition. A perusal of this pamphlet, the matter of which has been culled from the original vernacular big volume, is likely to create, in the minds of readers, an impression of dissatisfaction that it embodies reminiscences and anecdotes from the pen of only a few people outside Maharashtra, when, as a matter of fact the number of persons out of Maharashtra with whom Lok. Tilak came in touch is legion. But as the book was to be out on his last anniversary day, I had to hurry it through the press and I could not find sufficient time to collect them from his friends and admirers outside Maharashtra. That was why I could not incorporate reminiscences from such eminent gentlemen as Messrs Das, Lajapatrai, Khaparde,

Jamnadas Dwarkadas and many others even when they had definitely promised me to send their quota. However, under the guidance of Mr. Kelkar who has all along encouraged and obliged me in every way, I have now resolved to collect and to publish at an early date if possible, reminiscences and anecdotes from persons, not only in India alone but from abroad, who, in some way or other, came in contact with the great leader and patriot in his life time. I need hardly say that the measure of my success entirely depends on the response that will be promptly given to his sacred memory by the friends and admirers of the Lokamanya.

" Kesari " Office,
Poona City,
18th Sept. 1924

S. V. BAPAT

Reminiscences and Anecdotes
of
Lokamanya Tilak
Vol III

## PREFACE

THIS third and last volume of Lokamanya Tilak's reminiscences was to be published on the lst of January 1928. But owing to unavoidable and unforeseen difficulties, the compiler regrets that he could not do so. He is however glad to present it to the readers to-day. His original intention was to publish this volume even before January 1928; and

hence he made urgent requests to the contributors of this volume to send in their material quickly. Now when he himself has made delay in the publication, it behoves him to beg their pardon for that. One of the many reasons why he could not publish this book then, was that Mr. N. C. Kelkar decided all of a sudden to publish the second part of Lok. Tilak's biography in Marathi.

As this volume mainly contains matter which properly forms a sequel to the third Marathi Volume of Lok. Tilak's reminiscences, it is obvious that this English volume could not be published earlier than the Marathi volume. As the publication of that Marathi volume was postponed for the above reasons, it was inevitable that this English volume had also to be postponed along with that. That third Marathi volume is now published on this year's anniversary day of Lok. Tilak and for the convenience of English knowing readers this volume, like the first two English volumes, comprising the English contributions only, is published separately.

A similar first volume was published by me in 1924. In his preface to that volume Mr. N. C. Kelkar said, "...... And my advice to Mr. Bapat would therefore be to preserve and make progress in the line on which he has already started and to make his work of reminiscence hunting as thorough and exhaustive as he can make it, so that he may be able to make the English volume as big as the Marathi one." According to that encouragement and advice, I have corresponded with persons, with whom to my knowledge Lok. Tilak had come in touch in some way or

other, in India and abroad. I have personally interviewed persons wherever possible. And as a result of this I have been able to present to the public a second volume in 1925 and this third and last volume in 1928. But I regret to announce that I have not been successful in this task as I expected. While all the three volumes in Marathi comprise 1875 pages I am sorry to say that the total number of pages of the three English volumes does not exceed 400. Also, if the number of contributors to three English volumes is not more than 125! Between the one province of Maharashtra on the one hand and the whole of India on the other, from the latter a larger number of contributors should have been forthcoming. But it may be that it would not be proper to expect an equal number of contributors from people outside Maharashtra, as Lok. Tilak must have in touch with more people in Maharashtra than out of it and that too for a longer period. Yet if only all those who had as sured me with their contributions had fulfilled their promise, I would have been in a position to express my satisfaction rather than my disappointment. It is likely that had a better qualified and better known person than myself undertaken this work, it would have been more successful. But that seems not to be wholly correct. For even such a first-rank leader as Dr. Besant had complied with my humble request in 1924 when she was homeward bound. She wrote her reminiscences on board the ship and posted them at Aden. Many other Rajas and Maharajas have also responded to my call. I am thankful to them all for that. But there are many others who in spite of my many

letters and telegrams and their own promises, did not send their reminiscences. I attribute this lapse, not to the lack of love and respect for Lok. Tilak on their part, but to the want of a sense of civic duty amongst us Indians, in general and I think this is the main cause of failure in this particular instance as in many other movements of ours.

Though the Marathi material fully satisfies connotation and denotation of the word 'reminiscence,' I am fully aware that the material in the English volumes does not fall under that category. But instead of myself explaining and answering that objection, I deem it proper to quote the actual words of Mr. Kelkar from his lucid preface to the list English volume where he has already anticipated and given a reply to the objection. He says, "The reminiscences contained in this book are mostly by those who came into contact with Lok. Tilak, but comparatively at a distance; and therefore they may look more like appreciations than reminiscences. But even these have their own value as coming from illustrious men and women, who were his contemporary judges and in a few cases also his co-workers."

Mr. D. V. Gokhale, B. A., LL. B. Editor, 'Maharatta', had suggested in his foreword to the second volume, that as there were many a beautiful instructive anecdote in the Marathi volumes, which the English readers would read with great interest, they should be translated into English. I am sorry I have not been able to do this. But I beg to announce that whosoever will come forward to translate my Marathi volumes will get my permission most willingly.

To conclude, I heartily thank all those who have obliged me by sending their contributions. I am very much indebted to Dr. Besant for her short and sweet foreword. As in 1924, this time also she has sent her preface written in her own handwriting amidst the very busy time of her preparing to sail for England. I am sure that instead of my formal thanks, she will appreciate my motives the better if I place her as an ideal before the Indian youths to follow rather than passively admire her energies in her old age.

Lastly, my obligations are many to my friends Messrs. M. D. Vidwans, M. A. LL. B., Pleader and G. H. Dharap, Asst. Manager whose assistance has been invaluble to me.

KESARI OFFICE<br>POONA CITY } **S. V. Bapat**

**Reminiscences and Anecdotes**

**of**

**Lokamanya Tilak**

**Vol. III**

## FOREWORD

(*By Dr. Annie Besant*)

The honour is given to me to write these few lines to Mr. Bapat's most timely and useful work, the reminiscences by friends of that splendid servant of India, Bal Gangadhar Tilak. Let me write of him as I knew him.

He was a man filled with passionate and never-weakening love for India, for whom every sacrifice for her

was joy, every suffering was welcome. No Physical bondage could bind that free Spirit. His clarion call still rings through India: "Freedom is my birthright, and I will have it."

In my own relations with him, I found him absolutely straight and loyal to his word. When we joined hands I told him that I could join in no secret conspiracy, nor would I coment to throw boys and young men in any danger which we did not share. I did not seek to dictate his couduct to him, but I did claim similar freedom for myself and I would not risk the lads. He promised he would tell me, if he determined to use them, and has worked with me on that basis, straight to the end.

We differed on the N. C. O. movement. As he said, he wished for Responsive Co-opertion, but he thought that Gandhiji wielded power that might serve India, and he would not therefore break with him. Unhappily he soon passed away, leaving India bereft of his stateman's brain as well as his lion heart. Other brave hearts we have, but few brains like his.

To me, Tilak is not lost. He is with us, working with us from the other side. And I lay at his feet this poor tribute of admiration, respect and affection. We both love India; we both try to serve her. He is awaiting her Freedom and working for it. So am I. He is still our comrade in the great struggle. And he will share our joy when the Motherland is free.

He left his mortal body but his Spirit in its subtler vehicles still works for India, and History will record his name among those who won India's freedom, who devoted himself wholly. Utterly to her service, faithful to Death, and leaving an immortal memory.

— *Annie Besant*

## लो. टिळक यांच्या आठवणी ग्रंथावरील अभिप्राय

ती. आण्णासाहेब यांनीं लोकमान्यांच्या आठवणींचे तीन खंड प्रसिद्ध केले. हें अपूर्व टिळक वाङमय प्रसिद्ध केल्याबद्दल आभार, अभिनंदनें, अभिप्रायादाखल समाजाच्या सर्व थरांतील व्यक्तींकडून शेंकडों पत्रें आलेलीं आहेत. तसेंच महाराष्ट्रांतील वर्तमानपत्रांत त्यांचा प्रशंसेदाखल अग्रलेख आले आहेत. त्यांतील कांहीं थोर पुरुषांचीं निवडक पत्रें व वर्तमानपत्रांतील उतारे देण्याचा विचार होता. पण तो प्रपंच इतका वाढला कीं, त्यांस कोठें आळा घालावा हें समजेनासें झालें. कारण तें स्वतंत्र पुस्तकच बनलें असतें ! म्हणून शेवटीं तो विचार सोडून देऊन खालील फक्त चार ओळींत समाधान मानण्याचें ठरविलें.

आठवणींचा तिसरा खंड प्रसिद्ध झाल्यावर केसरीनें त्यावर अग्रलेख लिहिला. त्यांस शीर्षक घातलें कीं, 'लोकमान्यांचें विश्वरूपदर्शन'. नंतर केसरी म्हणतो "श्री. बापट यांनीं प्रसिद्ध केलेले लोकमान्यांच्या आठवणींचे तीन खंड म्हणजे "लोकमान्यांचें विश्वरूप दर्शन होय." माझ्या मतानें सर्वांच्या अभिप्रायांचा हा निष्कर्ष होय. म्हणूनहि वर म्हटल्याप्रमाणें निवडक पत्रांचा विस्तार येथें केला नाही त्याबद्दल दिलगीर आहे.

**संपादक**

**लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका**
**या ग्रंथाचे खंड १, २, व ३**
**समाप्त**

# लो. टिळकांच्या तीनहि खंडांत प्रसिद्ध न झालेल्या श्री. बापट यांच्या नव्या आठवणी

[लोकमान्य टिळक सन १९२० सालीं कैलासवासी झाले. १९२३ च्या ३१ जुलैच्या केसरीच्या अंकांत ती. आण्णासाहेब बापट यांनीं लोकमान्यांच्या आपल्या आठवणी प्रथम प्रसिद्ध केल्या व लगेच दैनिक 'लोकसंग्रह' पत्राच्या दि. १ ऑगस्ट १९२३ च्या 'टिळक-अंकांत' आठवणीचा दुसरा हप्ता प्रसिद्ध केला. तिसरा हप्ता म्हणून मुंबईच्या 'लोकमान्य' पत्रांत प्रसिद्ध करण्यांत आला. नंतर लोकमान्यांच्या पुण्यतिथीस म्हणजे दि. १ ऑगस्ट १९२४ व १९२५ ला त्यांच्या आठवणी-आख्यायिकांचा अनुक्रमें पहिला व दुसरा खंड प्रसिद्ध करून १९२६ सालीं 'लो. टिळक-सूक्ति-संग्रह' हा ग्रंथ त्यांनीं प्रसिद्ध केला; व शेवटीं १९२८ च्या दि. १ ऑगस्टच्या लोकमान्यांच्या पुण्यतिथीस तिसरा म्हणजे शेवटचा आठवणींचा खंड त्यांनीं प्रसिद्ध केला. त्यानंतर सुमारें तीस वर्षे या विषयास खंड पडून १९५७, १९६० व १९६४ या वर्षी 'केसरी' व 'तरुण भारत'मध्यें त्यांनीं आपल्या पंधरा नव्या आठवणी प्रसिद्ध केल्या व त्याशिवाय आतापर्यंत कोठेंहि **प्रसिद्ध न झालेल्या केवळ या ग्रंथाकरितांच** महत्त्वाच्या नव्या चार आठवणी त्यांनीं माझ्या विनंतीवरून मला लिहून दिल्या. त्या सर्व शेवटीं दिल्या आहेत.

— **संपादक**]

(लेखक : **श्री. सदाशिव विनायक बापट**)

(१) कै. महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांजकडे एकदां (१९०७) सायंकाळीं लोकमान्य आले होते. उभयतांचे इतर बाबीसंबंधानें बोलणें झाल्यावर आण्णासाहेब त्यांस विचारतात, "काय हो, तुमचे नरसोपंत म्हणे नामदार गोखल्यांकडे—सर्व्हंट ऑफ इं. सो. मध्यें जाणार म्हणतात, हें खरें काय ? ', लोकमान्य म्हणतात, " मीं कांहीं अजून ऐकिलें नाहीं. यंदा

कदाचित् नरसोपंत तिकडे गेलेच, तर गोखल्यांचे कँपमध्यें जाऊन गोखल्यांना एक आमच्यापैकीं चांगलाच प्रतिस्पर्धी निर्माण झाल्याखेरीज राहणार नाहीं. अहो, नरसोपंतांइतका तयार झालेला दुसरा मनुष्य तिकडे तरी कोण आहे ? पण या गप्पेंत कांहीं तथ्यांश असेल, तर ही मोठ्या खेदाची व नवलाची गोष्ट म्हटली पाहिजे. १९०६–७ सालीं खाडीलकरादि भक्तगण तेवढेच लोकमान्यांस प्रिय व तात्यासाहेब केळकर हे नावडते, अशी जी त्या वेळीं कांहींची व्यर्थ समजूत होती, ती किती भ्रामक होती व तात्यासाहेबांचे संबंधानें लोकमान्यांना त्या वेळींहि काय वाटत होतें हें या पुढील गोष्टीवरून दिसून येईल.

(२) १९०७–८ सालीं अनेक कार्यकर्त्या पुरुषांची अनेक प्रकारें परीक्षा घेतली. सुरतेच्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं लोकमान्यांच्या राजकारणाचा पारा भलतीकडेच चढत चालला. त्यांस " Source of weaknesss " होत असूं अशा काल्पनिक दीर्घ शंकेनें सदर प्रसंगीं व आणिक एके प्रसंगीं दे. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या कामाचा लोकमान्यांस लेखी राजीनामा दिला. या दोन्ही प्रसंगीं त्यांचा राजीनामा पाहून लोकमान्यांस फार दुःख झालें. व केळकरांची गांठ पडतांच त्यांनीं त्यांचेपुढें ते कागद फाडून टोपलींत टाकून त्यांस गंभीरपणें म्हटलें, 'कांहीं बाबतींत तुमचा माझा मतभेद झाला म्हणून काय झालें ? मतभेद स्वभाववैचित्र्याचें व उलट जिवंतपणाचें लक्षणच मी समजतों. राजीनामा देण्यासारखी 'पेनफूल' (दुःखकारक) गोष्ट अशी पुन्हां कधीं करूं नका. अशानें माझेंहि मन अस्वस्थ होऊन कामास व्यत्यय मात्र येतो.' यावरून लोकमान्यांस केळकर हवे होते, का केळकरांनीं कसें तरी आपलें आसन घट्ट धरून ठेविलें होतें, अगदीं उघड होतें.

(३) १९०७ सालच्या राष्ट्रीय सभेच्या घटनेच्या २० व्या कलमाप्रमाणें 'पुणें सार्वजनिक सभेच्या' उद्देशांतहि फरक करावा, या लोकमान्यांच्या इच्छेवरून सार्वजनिक सभेची जनरल मीटिंग बोलाविली होती. सदर गोष्ट करण्याचे लोकमान्यांचे मनांत आहे, असें समजतांच सर्व सभासदांनीं त्यांस संमति दिली. पण लोकमान्यांचे एक जुने स्नेही कै. दत्तोपंत बेहेरे यांनीं त्यांस हरकत घेऊन लोकमान्यांशीं दोन हात (!)

करण्याचें योजिलें. अखेर लोकमान्यांचे इच्छेनुरूप ठराव मंजूर व्हावयाचा; तो झाला. सार्वजनिक सभेंतून परत घरीं जातांना लोकमान्यांबरोबर मला जाण्यास सांगितलें. गाडींत बसल्यावर ते हंसत हंसत म्हणाले, " जग एका बाजूस आणि आजचे दत्तोपंत वेहेरे दुसऱ्या बाजूस ! दत्तोपंत म्हणजे पुण्याचे दुसरे पी. एम. मेथा साहेबच ! वास्तविक असलीं बारीक सारीक कामें आतां तात्यासाहेब केळकरांनीं उरकावींत. एवढ्या कामाकरितां मी येण्याची आवश्यकता नव्हती. " विनयपूर्वक मीं म्हटलें. जेथें आपण आला असतांहि दत्तोपंतांसारखी मंडळी नापास व्हावी, म्हणून उद्योग करितात तेथें तात्यांचे हातून हें कसें जमलें असतें ? " अरे ! तेवढ्यापुरताच या मंडळींचा आवेश असतो हें ओळखूनच काम केलें म्हणजे सर्व कांहीं होतें. तात्यांनीं आतां अंगाबाहेर टाकून चालणार नाहीं.

(४) लोकमान्य मंडालेहून सुटून परत आल्यावर एके दिवशीं रा. कृष्णाजीपंत खाडीलकर यांनीं लोकमान्यांच्या सहा वर्षांच्या शिक्षेच्या मुदतींत लिहिलेलीं आपल्या सर्व नाटकांचीं पुस्तकें मोठ्या भक्तीनें लोकमान्यांस नजर केलीं. त्या वेळीं तेथें लोकमान्यांचे भाचे श्री. बाबा विद्वांस व मी उभे होतों. तीं पुस्तकें पाहून एकदम लोकमान्य म्हणाले, " बस्स, आमच्या बुद्धिवान खाडीलकरांना हल्लीं काम म्हणजे दिवसा नाटकांची ठाकठीक रंगीत तालीम पाहावी व रात्री बसलेलीं नाटकें पाहावींत; होय कीं नाहीं, खाडीलकर ? जगांतील राजकारणाचे भूमिगत प्रवाह पाहण्याची तुमची शक्ति आहे; राजकारणांत तुमचें डोकेंहि चालतें. पण तिकडे न वळतां फक्त नाट्यसृष्टींतच तुमची बुद्धि खर्च होत आहे. " थोडें अपमानास्पद लोकमान्यांचें हें बोलणें आणि तेंहि प्रस्तुत लेखकासारख्या नोकरादेखत झालेलें ! पण मानी व ओली आग असलेल्या रा. खाडीलकरांनीं तें अगदीं निमूटपणें ऐकून घेतलें यावरून त्यांच्या प्रखर गुरुभक्तीची प्रतीति येते.

(५) १९०७ सालच्या उन्हाळ्यांत लोकमान्य सिंहगडावर असतां, दे. लाला लजपतराय यांस अकस्मात हद्दपार करण्यांत आलें, ही बातमी कळतांच तात्यासाहेब केळकर यांनीं ताबडतोब खालीं येण्याकरितां लोकमान्यांस सिंहगडावर बोलावणें पाठविलें. सायंकाळीं गाडींतून उतरून

लोकमान्य गायकवाड वाड्यांत शिरतात तोंच तिकडून सार्वजनिक सभेचे माजी चिटणीस आप्पासाहेब मांडे येत होते, ते त्यांच्याबरोबर लोकमान्यांच्या घरांत माडीवर गेले. प्रस्तुत लेखक तर लोकमान्यांच्या येण्यावर अगदीं डोळा ठेवून बसला होता. तो त्यांचे पाठोपाठ तेथें गेलाच. आप्पासाहेब उद्वेगानें लोकमान्यांस म्हणतात, "लजपतराय यांस हद्दपार करण्यांत आलें." डोक्यावरची पगडी काढून डाव्या हातानें खुंटाळ्यावर ठेवीत व उजव्या हातानें आंगरख्याचे बंद सहज सुटेनात म्हणून तोंडीत खवळलेल्या सिंहा-प्रमाणें तो पुरुषसिंह उद्‌गारतो, "लालाजीसारखा देशभक्त हद्दपार होतो आणि लॉर्ड मिंटो अजून कसा जगतो ?" पण जरा थांबून विवेकशक्तीनें देश काल परिस्थितीचा मध्य बिंदु छेदून शांतपणें पण जरा निराशेनें हलक्या स्वरांत ते म्हणतात, "या दुर्बल राष्ट्राकडून भलतीच अपेक्षा करणें मूर्खपणाचेंच आहे."

'लोकसंग्रह'
दिनांक १–८–२३

(६) सन १९०७ मध्यें पुणें येथें विजयानंद नाटकगृहांत कै. नामदार रावबहादुर गणेश व्यंकटेश जोशी यांच्या अध्यक्षतेखालीं पुणें जिल्हापरिषद भरली होती. त्या परिषदेंत नेमस्त पक्षाचे पुढारी कै. गोपाळ कृष्ण देवधर यांचें, मद्यपान-निषेध या ठरावावर भाषण झालें. नेमस्त पक्षाच्या विचार-सरणीस अनुसरून श्री. देवधर यांचें झालेलें विचित्र भाषण ऐकून लोकमान्य अगदीं खवळून गेले व आपणांस या विषयावर थोडें बोलावयाचें आहे अशी अध्यक्षांस त्यांनीं परवानगी मागितली. अध्यक्षांनीं त्यांस बोलण्यास विनंती केल्यावर लोकमान्यांनीं श्री. देवधर यांच्या दारू बंद करण्याच्या विक्षिप्त मार्गांचा निषेध व धिक्कार केला. मोठ्या आवेशानें ते म्हणाले, "दारूबाज इंग्रज राष्ट्रानें कायदेशीर रीतीनें सुरू केलेल्या आपल्या देशांतील ही दारू अजिबात नाहींशी व्हावी अशी खरोखरच तुमची तळमळ असेल तर त्याकरतां मरण्यास तुम्ही तयार आहां काय ?" लोकमान्यांचा सवाल ऐकतांच श्रोतृवृंदांतून, 'आहोंत, आहोंत' अशा प्रचंड आरोळ्या उठल्या व पुढें लवकरच कै. गोपाळराव ओगले (नागपूरच्या 'महाराष्ट्र' पत्राचे

संपादक) यांनीं प्रस्तुत लेखकासह 'लोकमान्यां'च्या स्फूर्तिपूर्ण आवाहना-वरून पुणें येथील शनिवार पेठेंतील दारूच्या गुत्त्यावर पिकेटिंग करण्याची चळवळ सुरू केली. नंतर लोकमान्यांनीं त्या चळवळीचा देशभर कसा डोंब माजविला हें प्रसिद्धच आहे.

वर वर्णन केलेल्या रावबहादुर यांच्या अध्यक्षतेखालीं झालेल्या 'मद्यपान-निषेध' या ठरावावर लोकमान्यांच्या झालेल्या अति कडक भाषणावर नेमस्त पक्ष व सरकार फार नाखूष व रुष्ट झालें होतें. वरील परिषदेनंतर एके दिवशीं पुणें येथील शनिवार पेठेंतील डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांच्या वाड्यांत राहत असलेले नामदार रावबहादुर जोशी यांजकडे एक बडे नेमस्त अग्रणी येऊन रावबहादुरांस म्हणाले, "काल आम्ही पुण्याचे कलेक्टर मि. कारमायकेल यांजकडे गेलों होतों. त्यांच्या बोलण्यावरून आपणांस मला विनंती करावयाची आहे कीं, आपण सरकारी पेन्शनर असल्यामुळें आपल्या अध्यक्षतेखालीं टिळकांच्या झालेल्या भाषणाबद्दल आपण आपली नापसंती व्यक्त करून टिळकांशीं यापुढें संबंध न ठेवण्याचें आपण 'टाईम्स'मध्यें जाहीर करावें. असें कराल तरच आपली रावबहादुर पदवी व पेन्शन टिकणार आहे, असा सल्ला आपणांस आमच्या पक्षातर्फे द्यावयाचा आहे."

कै. नामदार रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी हे सातारा हायस्कूलचे सन १९०५ सालीं हेडमास्तर असतांना मी त्या हायस्कूलांत मॅट्रिकच्या वर्गामध्यें त्यांचा विद्यार्थी होतों. शिवाय रावबहादुरांचें व माझें अगदीं जवळचें नातें होतें. यामुळें मी त्यांच्या घरीं वारंवार जात असें. वरील भाषणप्रसंगीं मी तेथें उपस्थित होतों. लोकमान्यांचा मी 'लेखक' असल्यामुळें दुसऱ्या दिवशीं नित्याप्रमाणें मी त्यांजकडे लिहावयास गेलों असतां, अतिसावधानतेनें ऐकलेली वरील सर्व हकीगत लोकमान्यांस मीं निवेदन केली. त्यांवर उत्कंठेनें लोकमान्य म्हणाले, "मग रावबहादुरांनीं त्यांस काय उत्तर दिलें?" मीं सांगितलें, "रावबहादुर निग्रही स्वरांत म्हणाले कीं, 'ज्या दिवशीं त्या सभेचे अध्यक्ष होण्याचे टिळक यांस मीं कबूल केलें त्याच वेळीं मी माझ्या पदवीची व मुख्यत: पेन्शनची आशा सोडली आहे!" हें ऐकून

प्रसन्न मनानें व गंभीरपणानें लोकमान्य म्हणाले, "तुझे आणि रावबहादुर जोशीबुवांचें नातें आहे. शिवाय तूं त्यांच्या विश्वासांतील आहेस. तेव्हां फक्त त्यांसच माझा निरोप सांग कीं, **ज्या दिवशीं तुमचें पेन्शन सरकार बंद करील त्या दिवसापासून 'केसरी' कचेरीकडून तुमचें पेन्शन सुरू झालें आहे असें समजा, काळजी नको.**"

लोकमान्यांचा निरोप रावबहादुरांच्या कानावर मीं घातला. प्रथम रावबहादुर वरील संवाद लोकमान्यांना सांगितल्याबद्दल माझ्यावर खूप रागावले. नंतर ते सद्‌गदित होऊन उद्‌गारले, "छेः माझी तशी मुळींच अपेक्षा नाहीं; तसें मला नकोहि आहे. **खरोखर लोकसंग्रह करावा बलवंतरावांनींच**; पुढाऱ्याचे सर्व गुण त्या महापुरुषांत आहेत खरे!"

'केसरी'

दि. ३०–७–५७

गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांच्या कृपेनें लोकमान्यांच्या आठवणींचें मराठी तीन खंड व इंग्रजी तीन भाग आणि 'लोकमान्य टिळक सूक्तिसंग्रह' असें 'टिळक वाङ्मय' माझ्या हातून प्रसिद्ध झालें, हें मी माझें भाग्य समजतों. माझ्या वडिलांस व त्यांचेमुळें मलाहि लहानपणापासून लोकमान्यांचेविषयीं भक्ति व प्रेम नव्हे वेड म्हणानात—पराकाष्ठेचें जडल्यामुळें व पुढें माझा केसरी संस्थेशीं टिळक–केळकर यांचा 'लेखक' म्हणून नोकर या नात्यानें निकट संबंध आल्यामुळें लोकमान्यांचे पश्चात् वर लिहिलेलें 'टिळक वाङ्मय' मला प्रसिद्ध करतां आलें.

सदर आठवणींच्या प्रचंड तीन ग्रंथांत मिळून इतरांच्या व स्वतः माझ्या अशा शेंकडो आठवणी मीं प्रसिद्ध केल्या आहेत. लोकमान्यांच्या आठवणींच्या पहिल्या खंडाचा तर विशेष असा कीं, तो ग्रंथ १ ऑगस्ट १९२४ रोजीं म्हणजे लोकमान्यांच्या पुण्यतिथीस प्रसिद्ध होईल अशी केसरींत आगाऊ दोन आठवडे जाहिरात प्रसिद्ध झाली. पण १ ऑगस्टचे आधींच त्या ग्रंथाची तीन हजारांची आवृत्ति खपून एक ऑगस्टला एकहि प्रत शिल्लक उरली नाहीं अशी वेळ आली!! म्हणून पुन्हा त्या खंडाची तीन हजाराची आवृत्ति ताबडतोब छापून घेतली. तरीहि आज सदर ग्रंथाची एकहि प्रत माझे जवळ शिल्लक

नाहीं ! व ती बाजारांत कोठेहि मिळत नाहीं ! तीच गत मीं प्रसिद्ध केलेल्या 'लोकमान्य टिळक सूक्तिसंग्रह' या ग्रंथाची झाली. अतिश्रम घेऊन हा ग्रंथ सन १९२६ सालीं मीं प्रसिद्ध केला पण त्याचीहि तीन हजारांची आवृत्ति संपून तोहि आज माझे जवळ अगर बाजारांत शिल्लक नाहीं. असें हें लोकमान्यविषयक आठवणी वाङमय अवीट आहे.

लोकमान्यांचा आठवणीचें हें वाङमय प्रसिद्ध होऊन तीस वर्षे होऊन गेलीं. दोन पिढ्या उलटून गेल्या. तरी अजून त्यांच्याबद्दलच्या आठवणी सांगण्या ऐकण्याची लोकांची असलेली जिज्ञासा पाहून त्या युगप्रवर्तक लोकप्रिय पुढारी पुरुषाच्या लोकमान्यतेची यथार्थ प्रतीति येते.

लोकमान्यांचा लेखक म्हणून रोज त्यांच्याशीं माझा निकट संबंध येत असे. यामुळें त्यांच्या अति सान्निध्यानें माझ्या मनावर झालेल्या परिणामाचें यथार्थ वर्णन करणें अशक्य आहे. कोणी मला त्यांच्या आठवणीचे बाबतींत गोष्टी–वेल्हाळ असेंहि म्हणतात. म्हणून आतां लोकमान्यांच्या माझ्या आठवणी मी सांगत नाहीं. शिवाय वर म्हटल्याप्रमाणें शेकडों पानांच्या आठवणीचे तीन खंड आतां प्रसिद्ध झालेच आहेत. पण माझ्या दुर्दैवानें म्हणा किंवा मुख्यत: अनुकूल काळ नसल्यामुळें म्हणा, किंवा अशाच आणखी कांहीं कारणामुळें म्हणा, थोरांतल्या थोर पुरुषांच्या व कांहीं इतरांच्याहि लोकमान्यासंबंधींच्या विशेष महत्त्वाच्या कांहीं आठवणी मला मिळूनहि त्या अखेर त्या वेळीं प्रसिद्ध करण्याचा योग आला नाहीं. हा कथाभाग म्हणजे त्या प्रसिद्ध आठवणीच्या नमुनेदार अशा फक्त चार पांच आठवणी सांगण्याचें मीं योजिलें आहे.

(७) सन १९१२ मध्यें दिल्ली दरबार झाला. त्यासाठीं लंडनहून बादशहा हिन्दुस्थानांत आले होते. दिल्लींत कॉरोनेशन दरबार आटोपल्यावर बादशहा कलकत्त्यास गेले. तेथें हिन्दुस्थानास कोणत्या देणग्या द्याव्यात याचा विचार करण्याकरितां अतिगुप्तपणें बादशहाचे अध्यक्षतेखालीं एक सरकारी खास सभा झाली. या सभेस गव्हर्नर जनरल, सर्व प्रांतांचे गव्हर्नर व हिन्दुस्थान सरकारच्या कार्यकारी मंडळाचे फक्त सभासद एवढ्या मंडळींस आमंत्रण होतें. त्यांत त्या वेळेचे कार्यकारी मंडळाचे सभासद नागपूरचे सर गंगाधरराव

चिटणीस उपस्थित होते. हिन्दुस्थानास कोणत्या देणग्या द्याव्यात हे बादशहांनीं जाहीर करावे अशी चर्चा चालू झाली. त्या वेळीं सर गंगाधरराव यांनीं सरकारास सुचविलें कीं, 'सरकारास एक पैचाहि खर्च न येता लाखो रुपये खर्च केल्याचें श्रेय घ्यावयाचें असेल तर टिळक यांस तावडतोब सरकारनें सोडून द्यावें.' ही सूचना गव्हर्नर जनरल व विशेषतः बादशहा यांस पसंत पडली. लोकमान्य टिळक यांच्या लोकप्रियतेबद्दलची बादशहांनीं लंडन येथील एक आठवणहि तेथें सांगितली. यामुळें त्या सभेंत टिळक यांस सोडून द्यावें असें ठरलें. पण दुसरे दिवशीं मुंबईचे गव्हर्नर सिडेनहॅम (सर जार्ज-क्लार्क) या कलिपुरुषानें काय कळ दाबली न कळे, टिळकांना सोडण्याचा विचार सरकारनें रहीत केला!!

वरील आठवण सर गंगाधरराव यांनीं इंग्रजींत लिहून मजकडे पाठविली. पण मागाहून त्यांचा विचार बदलून त्यांनीं मला तार करून सदर मजकूर प्रसिद्ध करण्यास परवानगी न देतां तो परत मागून घेतला. ओठास लावलेल्या सुवर्णपात्रांतील अमृत मुखांत न पडतां तें सांडावें तसा हा प्रकार झाला.

(८) वरील मजकुरांत बादशहांनीं लोकमान्यांची एक आठवण सांगितली असा उल्लेख आहे. तो प्रसंग लक्षांत घेऊन प्रत्यक्ष बादशहांकडून ती आठवण मिळविण्याचा मीं प्रयत्न चालविला. प्रथम त्यांत यश येईल असें दिसेना. शेवटीं त्या वेळेचे इंग्लंडचे मुख्य प्रधान रामसे मॅकडोनाल्ड यांचेशीं पत्रद्वारें मीं संधान बांधलें. त्या भल्या पुरुषानें मला लिहिलें कीं, "तुमचें काम करितों. काल 'हिज मॅजिस्टीस भेटलों. त्यांत यश येईल असें दिसतें." पण माझें दुर्दैव असें कीं, त्याच वेळीं मजूर मंत्रिमंडळ गडगडून रामसे मॅक्डोनाल्ड यांना मुख्यप्रधानपद सोडावें लागलें. त्याचा परिणाम असा झाला कीं त्यांत त्यांनीं मला कळविलें, "आतां तें काम अशक्य आहे, दिलगिरी आहे. तथापि टिळकांबद्दल माझें मत म्हणून मीं चार ओळी लिहून पाठविल्या आहेत." तो मजकूर आठवणींच्या दुसऱ्या खंडांत प्रसिद्ध झाला आहे.

(९) बडोदे संस्थानाधिपति श्रीमंत सयाजीराव महाराज यांचा लोकमान्यांशीं विशेष संबंध आला होता हें मला माहीत होतें. म्हणून मी बडो-

द्यास मुद्दाम जाऊन श्रीमंतांची भेट घेतली. या भेटींत त्यांनीं महत्त्वाच्या पण अगदीं खाजगी अशा कितीतरी गोष्टी सांगितल्या. शेवटीं त्या लिहून काढून मला देण्याकरतां तो सर्व मजकूर टाईपराईटहि केला. पण ऐन वेळीं त्यांच्या राजकीय सल्लागारांनीं त्यांस सदर मजकूर न देण्याबद्दल विनंती केली. यामुळें महाराजांनीं तो मजकूर आपल्या स्वतःच्या विशिष्ट परिस्थितीमुळें देतां येत नाहीं असें दिलगिरीपूर्वक मला सांगितलें. नमुन्यादाखल एकच गोष्ट सांगतों.

सुमारें १८९२ सालीं महाराजांनीं लोकमान्यांस भेटीस बोलावून आपला मनोदय कळविला कीं, "तुम्ही बडोद्यास येऊन आमच्या संस्थानाचे प्रथम शिक्षणखातें आपल्या ताब्यांत घ्यावें. तें सुधारून यशस्वी केल्यावर तुम्हांस आम्ही इंग्लंड वगैरे प्रदेशांत राज्यकारभाराचें निरीक्षण करण्याकरतां पाठवूं व नंतर तुम्हांस आम्ही आमच्या संस्थानाचें मुख्यदिवाणपद देऊं, तरी आमच्या या योजनेस संमति द्यावी." पण तसें करण्यास लोकमान्यांनीं घातलेल्या कठीण अटी महाराज सरकारांस न पटल्यामुळें हा सर्व डाव विस्कटला गेला !

(१०) हैदराबाद संस्थानाचे माजी मुख्य न्यायाधीश कै. नामदार केशवराव यांचा व लोकमान्यांचा कांहीं एका अतिगुप्त व नाजूक प्रकरणांत संबंध आला होता. तें प्रकरण—त्या आठवणी—त्यांनीं लिहून द्याव्यात म्हणून मीं त्यांस भेटून खूप आग्रह केला. अखेर त्यांनीं तो मजकूर लिहून पाकीट बंद करून माझेजवळ दिला व बजावलें कीं, तो तात्यासाहेब केळकर यांचे जवळ द्या. त्यांच्या 'जजमेंट' वर माझा पूर्ण विश्वास आहे, ते सांगतील तसें करा. त्याप्रमाणें तें पाकीट तात्यासाहेब यांस मीं दिलें. त्यांनीं आंतील मजकूर वाचला व ते म्हणाले, " छे, छे, हा असला मजकूर प्रसिद्ध करण्याची अजून वेळ आली नाहीं; तो पचणार नाहीं. असाचे असा हा मजकूर केशवराव यांस भेटून त्यांचे हातांत द्या. व माझें म्हणणें म्हणून सांगा कीं, मजकुराचे हे कागद फाडून टाका व तसें त्यांनीं केल्याचें तुम्ही मला सांगा. तात्यासाहेब यांची ही आज्ञा मला मान्य करावी लागली. तात्यासाहेब यांचा निरोप केशवराव यांस सांगितल्यावर त्यांनीं तात्यासाहेबांचेबद्दल फारच थोर उद्गार काढले व माझे देखत त्यांनीं ते सर्व कागद फाडून

टाकले. व. तसें केल्याचें तात्यासाहेब यांस मीं सांगितलें. तात्या-साहेब यांस मी सदर मजकुराबद्दल विचारतां ते म्हणाले. "बळवंतरावांचें राजकारण कळणें कठीण आहे. बाळकृष्णपंत चाफेकर फरारी झाल्यावर मोंगलाईतील एका अरण्यांत तो लपून राहिला होता. बरेच दिवस त्यानें तेथें काढले. पण शेवटीं त्याचे अन्नाविना अति हाल होऊन तो जगत नाहीं असें बळवंतराव यांस कळलें. म्हणून त्यांनीं त्यांस अन्न-औषध पुरवून जरूर ती मदत करण्याबद्दलची विलक्षण कामगिरी ना. केशवरावांकडे सोपविली व केशवरावहि असे बहाद्दर कीं, केवळ टिळकांची ही इच्छा म्हणून त्यांनी ती पुरी केली वगैरे मजकुराची ही आठवण केशवराव यांनीं लिहिली आहे !!"

(११) महात्मा गांधीजी यांना मी विशेष विनंति केल्यावरून त्यांनीं आठवणींच्या माझ्या दोन्ही खंडांस आपल्या आठवणी पाठविल्या होत्या. त्याप्रमाणें तिसऱ्या खंडासहि आठवणी पाठवाव्यात म्हणून मी त्यांस विनंति केली. पण आपण तूर्त फार कामांत असल्यामुळें मजकूर पाठवूं शकत नाहीं असें त्यांनीं कळविलें. पण यानें माझें समाधान न झाल्यामुळें मीं पुन्हां पुन्हां त्यांस एकसारखी मागणी सुरू केली. अखेर त्या महात्म्यानें मजकूर लिहून पाठविला. हा मजकूर इतका महत्त्वाचा होता कीं, तो आगाऊ पाहण्यां-साठीं माझ्या अनेक मित्रांनीं तो मागून घेतला व त्या गडबडींत अखेर तो कोठें गहाळ झाला. इतक्या प्रयत्नानें, अशा महात्म्याकडून आणि एवढ्या महत्त्वाचा मजकूर मिळविलेला नाहींसा झाल्यामुळें मी चिंतातूर झालों. अखेर ही सर्व हकीगत गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांस मीं सांगितली ते म्हणाले, "महात्माजीस हा प्रकार कळवून क्षमा मागा व त्या मजकुराची दुसरी प्रत त्यांचे जवळ असल्यास पाठवून देण्याबद्दल त्यांस विनंति करा. गांधीजींची ही आठवण कसेंहि करून मिळवा. ती मीं आरंभींच वाचली आहे. ती प्रसिद्ध झाली पाहिजे." महात्माजींच्या एका निःसीम भक्ताच्या मध्यस्थीनें मी गांधीजींस तात्यासाहेब यांनीं सांगितल्याप्रमाणें विनंति केली. त्यांचे खाजगी-चिटणीसांनीं कळविलें कीं, त्या मजकुराची प्रत शिल्लक नाहीं. तो मजकूर नाहींसा झाला याचा अर्थ तो मजकूर प्रसिद्ध होऊ नये अशी देवाची इच्छा होती असें बापूजी (महात्माजी) म्हणाले !!

गहाळ झालेल्या या आठवणींत म. गांधीजींनीं सिंहगडावरील आपला व लोकमान्य यांचा राजकीय बाबतींत झालेला प्रदीर्घ वाद–संवाद तपशील-वार लिहून शेवटीं लोकमान्यांनीं आपल्या विद्वत्तेनें, पांडित्यानें व कुशाग्र बुद्धीनें आपणास कुंठीत करून आपला कसा पराजय केला याचें मोठ्या मनानें वर्णन केलें होतें.

वरील हकीकतीवरून माझ्या हातीं आलेल्या लोकमान्याविषयीं थोरांच्या महत्त्वाच्या आठवणी, माझ्या दुर्दैवानें मला उपलब्ध न होतां काळाच्या उदरांत कशा गडप झाल्या हें कळून येईल !

**तरुण भारत**, दि. ८-७-१९५७

(१२) नामदार श्रीनिवासशास्त्री यांचा मुक्काम पुणें येथें असतांना त्यांजकडे मी लोकमान्यांच्या आठवणी मागण्याकरितां गेलों होतों. प्रथम कांहीं वेळ इकडलें तिकडलें बोलणें झाल्यावर ते म्हणाले, "नामदार गोखले व लोकमान्य टिळक यांच्याविषयीं आपणांस सारखाच आदर आहे." नामदार गोखले यांनाहि लोकमान्य टिळकांबद्दल किती आदर वाटत होता हें लोकांना माहीत नाहीं. त्याचें प्रत्यंतर म्हणून त्यांनीं त्या वेळीं सहज एक गोष्ट सांगितली. ते म्हणाले, "एकदां गोपाळराव निकटवर्ती अशा कांहीं मंडळींच्या मेळाव्यांत गप्पा मारीत बसले होते. त्यांत टिळकांचा विषय निघाला. गोपाळरावांना बरें वाटावें म्हणून की काय कोण जाणे तेथील मंडळींपैकीं एकानें टिळकांची खूप निंदा केली. पण ही गोष्ट गोपाळरावांना सहन झाली नाहीं." ते रागानें म्हणाले की,

"Tilak may have his faults; I may have to settle my account with him; but who are you? You are nowhere near him. Tilak's natural endowments are first rate. He has used them for the service of the country and although I did not approve of his methods, I never questioned his motives. There is no man who has suffered so much for

the country, who has had in his life to contend against powerful opposition so much as Tilak; and there is no man who has shown grit, patience and courage so rare that several times he lost his fortune and by his indomitable will gathered it together again."

(टिळकांचे कांहीं दोष असतील. मी आणि ते त्याबद्दल काय करावं याचें तें पाहूं; पण तुम्ही कोण ? टिळकांच्या मानानें तुम्ही क:पदार्थ आहांत. निसर्गतःच टिळक अव्वल दर्जाचे बुद्धिमान आहेत. त्यांनीं आपल्या गुणांचा उपयोग देशकार्याकडे केलेला आहे. मला टिळकांच्या कार्यपद्धति मान्य नसल्या तरी त्यांच्या सद्हेतूबद्दल मीं केव्हांहि शंका व्यक्त केलेली नाहीं. राष्ट्रासाठीं टिळकांनीं जेवढे हाल सोसले तेवढे इतर कोणींहि सोसले नाहींत. त्यांना भयंकर विरोधाला तोंड द्यावें लागलें. पण तसें करतांना त्यांनीं व्यक्त केलेली चिकाटी, धैर्य व सहनशीलता ही अपूर्व होती. अनेकदां त्यांना सर्वस्वाला मुकावें लागलें. आणि आपल्या अजिंक्य इच्छाशक्तीच्या जोरावर पुन्हा तें परत हस्तगतहि केलें.)

नामदार शास्त्री यांचें म्हैसूर विश्वविद्यालयातर्फे तेथील महाराज कॉलेजांत दि. २८–१–१९३५ रोजीं भाषण झालें. त्यांतहि त्यांनीं नामदार गोखले यांचे लोकमान्यांविषयीं वरील अर्थाचे उद्गार प्रकट केले असल्याचें आठवतें.

### 'हिंदू'ची व्याख्या

(१३) लोकमान्य मंडालेस शिक्षा भोगीत होते. त्या मुदतींत मद्रासच्या 'हिंदु' पत्रानें 'हिंदु कोण?' असा प्रश्न उत्पन्न करून त्यावर अखिल भारतांतील विद्वान् व नामांकित लोकांचे अभिप्राय मागवून ते प्रसिद्ध केले. पण त्यांपैकीं एकासहि समर्पक व्याख्या करतां आली नाहीं. तशी एकटी एकच व्याख्या करतां येणें शक्य नाहीं असें ठरलें. अखेर "आपणांस म्हणवून घेईल तो हिंदु" अशी एका प्रसिद्ध महाराष्ट्रीय विद्वानानें व्याख्या केली व ती कांहीं अंशीं लोकांस पटल्यासारखी दिसली. पुढें लोकमान्य सुटून आल्यावर त्यांस

ही सर्व हकीकत मीं सांगितली. तेव्हां ते जरा उद्विग्नपणें म्हणाले, " काय चमत्कार आहे पाहा; अमुक अमुक एक म्हणजे हिंदु असे कोणासहि निश्चित सांगतां येऊं नये अं! ही सर्व अशास्त्रीय शिक्षणपद्धतीचीं, गुलामगिरीचीं व आमच्या मानगुटीवर बसलेल्या परकीय संस्कृतीचीं फळें आहेत. या विषयावर लवकरच मी " केसरींत सविस्तर लिहिणार आहें." पण पुढें या विषयावरील त्यांचा मार्मिक, विद्वत्ताप्रचुर व समर्पक लेख 'केसरी'त न येतां तो जानेवारी १९१५ च्या 'चित्रमयजगत्' मासिकाच्या अंकांत " हिंदु धर्माचें स्वरूप रक्षण " म्हणून प्रसिद्ध झाला! तो लेख वाचून गु. तात्यासाहेब केळकर उद्गारले " बळवंतरावांचा काय पीळ आहे पाहा! कठीण विषयाची गुंतागुंत व निरगाठ शास्त्रीय पद्धतीने सोडावी ती बळवंतरावांनींच!"

## होमधूम्र म्हणजे अंजन

(१४) संवय व संस्कार यांचें प्राबल्य कांहीं विशेष आहे. त्यांचा प्रभाव सामान्य माणसावरच होतो असें नसून असामान्यावरहि होणें अपरिहार्य आहे. यांस लोकमान्य तरी कसे अपवाद ठरणार? दरसाल लोकमान्यांच्या घरीं श्रावणी होत असे. श्रावणीच्या वेळीं यथासांग कर्म झालें तरी होमांतील धूर लागून डोळ्यांतून खळखळ पाणी गेल्याशिवाय सामान्य लोकांना जसें बरें वाटत नाहीं तसेंच कांहींसें लोकमान्यांसहि होत असावें! श्रावणीच्या वेळीं ते मुद्दाम होमकुंडाजवळच्याच पाटावर बसत. उपाध्यायांचें सर्व म्हणणें स्पष्ट ऐकूं यावें व तंत्रकर्म दिसावें व मधून मधून त्याचें रहस्य सांगतां यावें हाहि तेथें बसण्यांत त्यांचा हेतु असे. एकदां होमाकरितां आणविलेलें इंधन थोडें ओलसर असल्यामुळें तें धुमसून ज्वाला न होतां चोहोकडे धूरच धूर होऊन गेला. तेव्हां बाकीची तरुण मंडळी तेथून उठून दूर गेली. पण लोकमान्यांनीं हातांत वेळूची धमनी (फुंकणी) घेऊन सपाटून फुंकून मंत्र म्हणत म्हणत ज्वाळा उत्पन्न केली, तेव्हा धूर कमी झाला, व मंडळी जवळ आली. तेव्हां ते त्यांस म्हणाले " तुम्ही तरुण लोक इतके बावळे कसे रे! पूर्वीच्या काळीं तर असला हा आपला नित्याचा विधि असे. रोज वैश्वदेव झाल्याशिवाय ब्राह्मण अन्न

ग्रहण करीत नसे. आतां वर्षांतून एक दिवस अनायासें होणाऱ्या होमधूम्राचा फायदा घ्यावयाचा सोडून अशी टाळाटाळी तुम्ही करतां, आश्चर्य आहे !' होमधूम्र हें एक अंजन आहे; अनुभव तर घेऊन पाहा !"

(१५) लोकमान्यांच्या आठवणींच्या तीनहि खंडांतील प्रसिद्ध झालेला सर्व मजकूर प्रथम मी गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांस दाखवीत असे; तो अत्यंत काळजीनें तपासून पाहून देशकालपरिस्थितीमुळें तूर्त प्रसिद्ध न करण्यासारखा त्यांस वाटे तो मजकूर ते बाजूला काढून ठेवीत, व आज उपेक्षित असा हा सर्व मजकूर फार काळजीनें जपून ठेवा, अनुकूल काळ आल्यावर त्या विशिष्ट मजकुराचा आपण स्वतंत्र खंड प्रसिद्ध करूं असे ते मला सांगत. गुप्त प्रकारचा व वरील स्वरूपाचा लोकमान्यांच्या जीवनावर खरा व स्पष्ट प्रकाश पाडणारा असा आलेला अनपेक्षित मजकूर पाहून ते एकदां सहज म्हणाले, " बळवंतरावजींना पूर्णपणें ओळखणें जरा जडच जाईल." तात्यासाहेब यांच्या वरील योजनेप्रमाणें तूर्त प्रसिद्ध न करण्याच्या त्या अत्यंत महत्त्वाच्या सर्व मजकुराचा स्वतंत्र रुमाल मीं जिवापलीकडे जपून ठेवलेला होता. पण या विषयासंबंधाचें सर्व कागदपत्र वगैरे मी 'पुणें सार्वजनिक सभे'च्या इमारतींतील कचेरींत ठेवीत असल्यामुळें, सन १९५२ सालीं त्या इमारतीच्या भयंकर अग्निप्रकोपांत, माझ्या दुर्दैवानें, माझें हें सर्व अमोल साहित्य भस्मसात् झालें. तथापि लोकमान्यांच्या अघटित घटनापटुत्वाचे ठसे माझ्या मनावर पूर्णपणें उठल्यामुळें त्यांचा आतां केवळ स्मरणशक्तीनें अनुवाद मी करीत आहे.

लोकमान्यांच्या आठवणींचा खंड दुसरा पान ४६० वर श्री. दिनकर लक्ष्मण कानडेशास्त्री एम्. ए. (अमेरिका) यांच्या आठवणी छापल्या आहेत. त्यांत आठवण नं. ६ आहे. ती येणेंप्रमाणें :—

" एकदां परदेशांत जाण्यास निघालेले एक गृहस्थ लोकमान्यांचें दर्शन घेण्यास आले. रात्रीचे दहा वाजून गेले होते व लोकमान्य आजारी म्हणून बिछान्यावर पडले होते. हे गृहस्थ येतांच लोकमान्य उठून बसले व त्या दोघांचें बोलणेंचालणें झाल्यावर हातांत दिवा घेऊन जिन्यापर्यंत पोहोंच-

विण्यास ते गेले; शेवटचा आशीर्वाद म्हणून त्यांस ते म्हणाले, "जगांत कोणत्याहि देशांत गेलां व कांहीं उद्योग करीत असलां तरी हिंदुस्थानचे प्रतिनिधि म्हणून नित्य वागत व राहात जा; जग तुमचेवरूनच तुमचे देशाची किंमत ठरवील हें लक्षांत ठेवा."

या आठवणीनंतर कानडेशास्त्री यांनीं पुढीलप्रमाणें मजकूर लिहिला होता :—

"आलेल्या गृहस्थांस पोचवून परत आल्यावर लोकमान्य मला म्हणाले, 'तुम्ही आमच्या गंगाधरराव देशपांडे यांचे स्नेही व शिष्य आहांत. तुमची मला पूर्ण माहिती आहे; म्हणूनच म्हणतों हा कागद वाचा. असे म्हणून आलेल्या त्या गृहस्थांनीं त्यांस दिलेला कागद त्यांनीं माझ्या हातांत दिला. तो कागद इंग्रजींत टाइपराईट केलेला बॉम्ब तयार करण्याच्या कृतीचा होता ! रात्र इतकी झाली होती तरी मी तो वाचीपर्यंत ते स्वस्थ बसले होते. नंतर ते म्हणाले, "पुनः हा कागद तुम्हांस पाहावयास मिळणार नाहीं. तुम्ही बेळगांवास जा व गंगाधररावांना हें सर्व सांगून लवकर घेऊन या." त्यांनीं उठून कांहीं पैसेहि मला दिले. त्याप्रमाणें लगेच मीं तसें केलें. गंगाधरराव आल्यावर त्या थोर वंदनीय उभयतांचें झालेलें बोलणें हल्लींच्या देशकालपरिस्थितींत मीं येथें लिहिणें अगदीं अशक्य आहे; त्यास इलाज नाहीं."

अर्थात् वरील आठवण गु. तात्यासाहेब यांनीं बाजूला काढून ठेवली हें सांगणें नकोच.

**केसरी १६–८–६४**

## ताज्या चार आठवणी.

**खालील चार आठवणी पूर्वी कोठेंहि प्रसिद्ध झाल्या नसून माझ्या आग्रहाच्या विशेष विनंतीवरून केवळ या ग्रंथाकरितां आण्णासाहेब यांनी त्या मला लिहून दिल्या आहेत. त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.**

संपादक—**किशोर बापट**

(लेखक—श्री. सदाशिव विनायक बापट)

## लोकमान्य टिळक व सर डॉ. भांडारकर

(१) सन १९०७ सालची गोष्ट असावी. कैं० डॉ० सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे एके काळीं महाराष्ट्रांतील वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध थोर पुरुष पुणें येथें संगमावरील आपले संगमाश्रमांत राहात असत. सुधारकाग्रणी कैं० रावबहादुर वामनराव कोल्हटकर यांचा व डॉ० भांडारकर यांचा फार स्नेह असून त्यांच्या नित्य भेटी होत. आपणास एका 'रीडर'ची आवश्यकता असल्याचें डॉ. भांडारकर हे सहज सदर कोल्हटकर यांचेजवळ बोलले. कोल्हटकर यांचें माझें नातें असल्यामुळें त्यांनीं मला सदर 'रीडर'चें काम पत्करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें मी रोज दीड दोन तास संगमाश्रमांत जाऊन हें काम करीत असें. प्रथम ते टाईम्स वाचून घेत. ज्ञानप्रकाश, सुबोध पत्रिका, इंदुप्रकाश हीं पत्रें वाचण्यास सांगत. केसरी ते घेत नसत. मधूनमधून एखादा इंग्रजी–मराठी ग्रंथहि ते वाचून घेत. पण गंमतीची गोष्ट अशी कीं, कांहींहि वाचण्यास सुरुवात करण्यापूर्वीं अगदीं नित्य-नियमानें रोज मला विचारीत, 'आज गव्हर्नरसाहेबांचा मुक्काम कोठें आहे ?' त्यांचे या प्रश्नास योग्य उत्तर देण्यासाठीं मी तशी तयारी ठेवीत असे ! रोजची पत्रें वाचन झाल्यावर एखादे वेळीं मी होऊनच त्यांस सांगत असे कीं, आजच्या केसरींतील अग्रलेख मोठा वाचनीय आहे. ते ज्ञानाचे भोक्ते असल्यामुळें लगेच मला पैसे देऊन उद्यां येतांना केसरीचा तो अंक घेऊन या असें सांगत. एकदां केसरी वाचून दाखवीत असतां, मला जरा थांबवून पूर्वींची एका प्रसंगाची आठवण होऊन ते म्हणाले, "पूर्वीं मी मुंबई-कौन्सिलांत असतांना तेथील माझे भाषणावर केसरीनें टीका करून त्या अग्रलेखास 'धूर्त कोण व फसला कोण ?' असें हेडिंग घातलें होतें. गव्हर्नरसाहेब धूर्त व फसलों मी असें म्हणून मजवर खूप कडक टीका केली होती. केसरीकारांचा तो मुद्दा व सरकारशीं त्यांचें भांडण खरें असलें तरी टिळक फार जहाल लिहीत म्हणून मला त्यांचें लिहिणें पसंत पडत नाहीं." मी लोकमान्यांचा लेखक असल्यानें त्यांचेकडे गेल्यावर वरील

हकीकत सहज त्यांस सांगितली. चटकन् लोकमान्य म्हणाले, 'म्हातारबोवांना तरुणांचे खेळ मानवणार नाहींत. पण आमच्या मताच्या सच्चेपणाबद्दल ते नेहमीं प्रांजलपणेंच बोलत असतात हें मला माहीत आहे, हा त्यांचा गुण का लहान आहे ?" असें म्हणून त्यांनीं त्यांची मोठी स्तुति केली.

(२) पुणें येथें स्थापन झालेले Poona Temperance Association चे अध्यक्ष कै० नामदार गोखले असून कै० लवाटे हे सेक्रेटरी व मी असिस्टंट सेक्रेटरी होतों. मद्यपानाच्या निषेधार्थ पिकेटिंगची प्रसिद्ध चळवळ लोकमान्यांनीं सुरू केली होती. तिला पाठिंबा देण्यासाठीं वरील संस्थेमार्फत तिच्या कार्यकारी मंडळाच्या सभेंत पुणें नागरिकांची प्रचंड जाहीर सभा भरवावी व तिचें अध्यक्षस्थान सदर संस्थेचे उपाध्यक्ष डॉ० रेव्हरंड मॅकनिकल यांस द्यावें असा गोखले पक्षीयांचा आग्रह होता. पण लोकमान्यांना हें खपलें नाहीं. ते म्हणाले, "आमच्या सभेला साहेब अध्यक्ष कशाला पाहिजे ? आम्हास साहेब नको. डॉ० मॅक्निकलप्रमाणेंच वजनदार आमचे डॉ० भांडारकर आहेत, त्यांस अध्यक्ष करूं" पण टिळकांची ही सूचना ठराविक विरोधकांना मान्य झाली नाहीं. ते म्हणाले वयोमानामुळें व सरकारचे संबंध लक्षांत घेतां डॉक्टर भांडारकर संमति देणार नाहींत. तेव्हां आवेशानें लोकमान्य म्हणाले, 'शेवटीं हें काम मजवर सोपवा. ते कसें मान्य करीत नाहींत पाहातों' नाइलाजास्तव हें काम सभेला टिळक यांचेकडे सोपवावें लागलें.

लगेच दुसरेच दिवशीं लोकमान्य सेक्रेटरी मंडळीसह डॉ० भांडारकर यांजकडे गेले. प्रथम औपचारिक व प्रास्ताविक बोलणें झाल्यावर या सभेचें आपणच अध्यक्षस्थान स्वीकारणार असल्याचें सर्वांनीं ठरविलें आहे. तरी तशी आपले डायरींत नोंद करावी असें म्हणून लोकमान्यांनीं डॉक्टरसाहेबांना बोलण्यास अवसरच ठेविला नाहीं ! तथापि डॉक्टरसाहेबांनीं बरीच कुरकूर केली. पण शेवटीं ते म्हणाले, "टिळक, तुमच्या कार्यास यश यावें म्हणून व मुख्यतः स्वतः तुम्ही येऊन आग्रह करीत आहांत म्हणूनच केवळ नाइलाजानें मी अध्यक्ष होण्याचें मान्य करितों. मीं हें मान्य केलें नसतें." लोकमान्यांनीं त्यांना नम्रतेनें अभिवादन करून त्यांचा निरोप

घेतला. ठरल्याप्रमाणें दिनांक २३ एप्रिल १९०८ रोजीं रेमार्केटच्या भव्य पटांगणांत डॉ० भांडारकर यांचे अध्यक्षतेखालीं प्रचंड सभा झाली.

(३) लोकमान्य कैलासवासी झाल्यावर त्यांच्या आठवणीचे ग्रंथ मीं प्रसिद्ध केले. लोकमान्यांचे व या डॉक्टरसाहेबांचे संबंध मला माहीत असल्यामुळें व डॉक्टरसाहेबांचा मी पूर्वी 'रीडर' असल्यामुळें लोकमान्यांसंबंधाच्या त्यांच्या आठवणी सहज मिळतील अशी माझी खात्री होती. त्याप्रमाणें मीं त्यांना समक्ष विनंती करितांच त्यांनीं आनंदानें मान्य केली व कांहीं प्रसंगहि त्यांनीं सांगितले. टिळकांचेविषयीं त्यांचा आदर त्या वेळीं मला स्पष्ट दिसून आला. ते म्हणाले, "तुम्ही आठ दिवसांनीं या. तुम्हास मी तो मजकूर डिक्टेट करीन म्हणजे काम होईल." त्याप्रमाणें मी गेलों. पण त्या वेळीं त्यांची प्रकृती बरीच बिघडली होती. नंतर पुन्हां बरेच वेळा गेलों. शेवटीं त्यांचे घरांतील त्यांचे जवळच्या एका नातेवाइकांनीं मला कळकळून सांगितलें कीं, "त्यांची प्रकृती आतां काळजी करण्यासारखी आहे. त्यांना मानसिक श्रम आम्ही देत नाहीं. म्हणून तुम्हीहि आतां त्यांचेकडून मजकूर मिळविण्याचे श्रम घेऊं नकां व त्यांसहि तसदी देऊं नका." हे निर्वाणीचे शब्द ऐकल्यावर मला कायमचा पाय काढण्याखेरीज गत्यंतरच नव्हतें !!

### बाबू अरविंद घोष व लोकमान्य टिळक

(४) १९०७ सालच्या सुरतेच्या कॉंग्रेसला जाण्याकरितां निघालेले बाबू अरविंद घोष यांना नागपूर येथें टिळक पक्षाच्या पुढाऱ्यांनीं मुद्दाम उतरवून घेतलें. एक दिवस त्यांचें तेथें 'राजकीय नवा पक्ष' या विषयावर व्याख्यान झालें. पण व्याख्यानाचें हें निमित्त होतें. खरा हेतु लंडनमधील, बंगालमधील, व इतर क्रांतिकारकांच्या भावी कार्याचा कार्यक्रम ठरविणें हा होता. एके रात्रीं विशिष्ट गुप्त ठिकाणीं या क्रांतिकारकांची फारच कडक बंदोबस्तांत गुप्त बैठक झाली. या वेळीं मुख्यत: अरविंद बाबूंनीं आपली विशिष्ट योजना सर्वांना समजावून सांगितली. पण नुकत्याच लंडनहून आलेल्या व पंजाबमधील कांहीं क्रांतिकारकांना अरविंद बाबूंची ती दीर्घकाळची योजना पसंत पडून लगेच मोठ्या प्रमाणावर या कार्यास सुरुवात

२८८०

करावी असें त्यांनीं सांगितलें. शेवटीं अरविंद बाबू म्हणाले, 'आतां सुरतेस टिळकांची आपली भेट होणार आहे, त्यांचे पुढें आपल्या योजन ठेवूं. त्यांच्या सल्ल्याखेरीज मी तरी यापुढें पाऊल टाकण्यास तयार नाहीं आणि एवढ्याचकरितां सुरतेच्या प्रसंगाचे निमित्त करून मी तेथें जात आहें.' सर्व मंडळींना हा विचार मान्य झाला. त्यांच्या बरोबरची सर्व मंडळी पुढें सुरतेस गेली व एक-दोन दिवस बाबूजींना डॉ. मुंजे व अच्युतराव कोल्हटकर यांनीं राहून घेतलें. या मुदतींत सुरतेस काय करावयाचें हें ठरविण्यासाठीं खाजगी बैठकी झाल्या. त्यांतहि बाबूजींनीं असेंच सांगितलें कीं, "टिळकांचे विचार ऐकून त्या धोरणानें आपण काय तें करूं. कारण टिळकांच्यांत भारतमातेच्या उद्धाराची दैविक नवशक्ति उत्पन्न झाली आहे अशी माझी भावना आहे. यास्तव त्यांच्याच नेतृत्वानें हें तारू हाकारिलें पाहिजे." बाबूजींना अच्युतरावाचे घरीं चहास बोलाविलें होतें. त्या वेळीं तेथें त्यांचा फोटो घेण्यांत आला. त्यांत अच्युतराव, डॉ. मुंजे वगैरे निवडक चार दोन प्रमुख मंडळी असून प्रस्तुत लेखक आण्णासाहेब बापट बाबूजींच्या चरणासन्निध बसलेला आहे हें त्याचें भाग्य होय. सदर फोटोची एक प्रत माझेजवळ होती. पण ती १९५२ च्या 'सार्वजनिक सभे'च्या इमारतीच्या अग्निप्रकोपांत भक्ष्यस्थानीं पडली हें माझें दुर्दैव होय.

सुरतेच्या कॉंग्रेसच्या दंगलींतहि एके रात्रीं मोठ्या कौशल्यानें बाबू अरविंद घोष यांनीं एक गुप्त बैठक भरवून लो. टिळक यांचेशीं दीर्घकाल विचारविनिमय केला. त्या वेळीं टिळकांनीं केलेलें मार्गदर्शन मुत्सद्दीपणाचें, धीरोदात्त, दूरदृष्टीचें व तरुण अंतःकरणांना भिडणारें असेंच झालें. तें शब्दांनीं व्यक्त करणें अविचाराचें अतएव अशक्य आहे. मात्र बाबू अरविंदांनीं त्याबाबत समाधान व्यक्त केलें ही मोलाची व महत्त्वाची गोष्ट होय.

सुरतेहून अच्युतराव पुण्यास आल्यावर त्यांनीं महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांची भेट घेतली. आण्णासाहेब व अच्युतराव यांचा घनिष्ट संबंध होता. सुरतेच्या गुप्त बैठकींतील सर्व हकीकत अच्युतरावांनीं त्यास

सांगितली. आण्णासाहेब हे धर्मकारणांत जसे आचरणानें क्रांतिकारक होते तसेच ते राजकारणांत विचारानें क्रांतिकारक असल्यामुळें लोकमान्यांशीं सहविचारी होते. 'अच्युतरावांनीं सांगितलेली सर्व हकीकत ऐकून ते उद्गारले, "बळवंतराव ईश्वरी कार्य करीत आहे. त्यांस तें स्फुरण आहे. म्हणूनच त्यांच्या सल्ल्याशिवाय कांहीं करूं नका असा माझा निरोप अरविंद बाबूंना सांगा!" नंतर अच्युतराव नागपुरास आले. तेथें त्यांनीं चालविलेल्या 'देश-सेवक' वर्तमानपत्राच्या उपसंपादकाचें कार्य त्यांच्या प्रदीर्घ अनुपस्थित त्यांनीं मजकडे सोंपविलें होतें. तें मजकडून यशस्वीपणें पार पडल्याबद्दल समाधान व्यक्त केलें. वरील सर्व हकीकत त्यांनीं मला सांगितली तशी ती येथें नमूद केली आहे

लोकमान्य टिळक सूक्ति-संग्रह

या

ग्रंथांतील

# अर्पणपत्रिका

लो. टिळक–‘ तत्त्वांवर ’ ज्या बंधु-भगिनींनीं अचल व नितान्त निष्ठा ठेवून त्यांच्या तत्त्वांनुसार आचरण करण्याचा पूर्वी प्रयत्न केला, जे सांप्रत करीत आहेत आणि पुढेंहि करतील,

**त्या सर्वांस**

हा ग्रंथ विनम्रभावानें प्रेमादरपूर्वक अर्पण करीत आहे.

— **सदाशिव विनायक बापट**

आठवणीकार

# लोकमान्य टिळक सूक्तिसंग्रह या ग्रंथांतील

# आत्मनिवेदन

**आपणास निवेदावें। आपण विवेकें नुरावें।**
**आत्मनिवेदन जाणावें। याचें नांव ॥**

—श्रीसमर्थ—दासबोध ६–२–३९

कै० लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या वाङमयस्मारकाच्या अनेक अंगांपैकीं 'आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाचे दोन खंड गेलीं दोन वर्षे टिळक जयंतीस मीं प्रसिद्ध केल्यानंतर, तिसरे वर्षींहि तिसरा म्हणजे शेवटचा खंड प्रसिद्ध करण्यापूर्वींच, दरम्यान केव्हां तरी, लोकमान्यांचा 'सूक्ति-संग्रह' प्रसिद्ध करण्याचें कार्य उरकून घ्यावें अशी प्रथम माझी इच्छा होती. म्हणून तारीख १९ माहे जानेवारी सन १९२६च्या केसरींत प्रसिद्ध केलेल्या जाहीर विनंति-पत्रकांत मीं म्हटलें होतें कीं, लोकमान्यांच्या आठवणी, उक्ति व पत्रें या त्रिदलात्मक वाङमय-स्मारकापैकीं उक्तींचा संग्रह करून तो प्रसिद्ध करणें हें काम जितकें एकमुखी, स्वावलंबी व स्वाधीनचें आहे, तितकेंच 'आठवणी व पत्र' मिळविणें हें काम परावलंबी, परतंत्र व सर्वस्वी परेच्छाधीन असल्याचें लक्षांत घेऊनच प्रथम स्वतंत्र ' उक्ति-संग्रह ' प्रसिद्ध करण्याचें काम लवकरच उरकून टाकण्याचें मीं योजिलें आहे." पण हा संकल्प यापूर्वींच सिद्धीस न जाण्याचीं मुख्य दोन कारणें म्हणजे गेल्या लागोपाठ दोन वर्षांप्रमाणें याहि वर्षीं आठवणींचा मजकूर मिळविण्याकरितां, परिश्रमांत कांहींहि बाकी ठेविली नसतांहि अपेक्षित असा कितीतरी मजकूर शेवटपर्यंत हातींच न आल्यामुळें अखेर मनाप्रमाणें यंदांच्या टिळकजयंतीस ग्रंथ तयार होण्याची आशा सोडून देणें प्राप्त झालें. तेव्हां अर्थात् ओघानेंच व औचित्याच्या दृष्टीनेंहि प्रस्तुत ग्रंथप्रकाशनार्थ आजचा दिवस गांठण्याकडे मनाची प्रवृत्ति होणें स्वाभाविक होतें. शिवाय सदरहू काम एकमुखी, स्वावलंबी व स्वाधीनचें असलें तरी त्यास प्रारंभ केल्या दिवसापासून कळून आलेली त्याची व्याप्ति, वेळोवेळीं

बदललेली त्याचीं स्वरूपें व तें किचकट काम करण्यास मोडणारा वेळ याची प्रारंभीं मला असावी तितकी कल्पना नसल्यामुळें, हें पुस्तक उशिरानें कां होईना, पण आजच्या पुण्यदिवशीं वाचकांस समर्पण करण्यास मला फार आनंद होत आहे.

प्रस्तुत पुस्तकाची कल्पना जरी गेल्या तीन चार वर्षांत जोरानें माझे मनांत खेळूं लागली तरी तिचें बीजारोपण मात्र सुमारें एकवीस बावीस वर्षांपूर्वीं म्हणजे मी विद्यार्थिदशेंत असतांनाच माझे मनोवाटिकेंत झालेलें होतें, हें येथें नमूद करणें अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें. आणि म्हणूनच केसरींतील वर उल्लेखिलेल्या जाहीर विनंतिपत्रकांत मी म्हटलें होतें कीं, "लोकमान्यांच्या उक्ति प्रसिद्ध करण्याची ही कल्पना आठवणींचे दोन खंड प्रसिद्ध केल्यानंतर मला सुचलेली नसून ती पूर्वींपासूनच माझ्या मनांत एकसारखी घोळत आहे." सन १९०४–१९०५ सालीं केसरी वाचून त्यांतील सुंदर अशीं कित्येक वाक्येंच्या वाक्यें तोंडपाठ करण्याची मला हौस वाटत असे; व पुढें पुढें तर त्यांतील उत्कृष्ट 'वचनें' उतरून काढून त्यांस 'केसरीचे सिद्धान्त' असें नांव देऊन त्या वेळीं त्यांचें माझेजवळ एक बाडच तयार झालें होतें! मधून मधून ह्या बाडांत भर घालण्यांत येई व तें प्रसिद्ध करावें असेंहि केव्हां केव्हां वाटे. पण उन्हाळ्यांत नदीस जसे खांडवे पडतात त्याप्रमाणें या कल्पनेची आजवर स्थिति होऊन अखेर लोकमान्य-वाङ्मय-स्मारक-प्रसिद्धीच्या निमित्तानें ती आज मूर्त स्वरूपांत प्रगट होत आहे याबद्दल मलाहि समाधान वाटणें स्वाभाविक आहे.

परंतु अशा तऱ्हेचा प्रयत्न करणें हें निषिद्ध, आर्यसंस्कृतीस विसंगत, निदान आपणांस अप्रिय असल्याचें कांहीं जुन्या व भाविक विद्वानांनीं आपलें मत प्रसिद्ध केल्याचें महशूरच आहे. "थोर, महात्मे व संत यांच्या पूर्ण ग्रंथांतील अशीं अपूर्ण अतएव स्फुट, त्रुटित व छिन्नविच्छिन्न झालेलीं वचनें काढून तीं एकत्र करणें हें पाश्चात्य रिवाजाप्रमाणेंच अर्धशरिराचा पुतळा प्रस्थापण्यासारखें आहे; आर्यसंस्कृतीच्या मूर्तिपूजेंत अर्धपुतळ्याची कल्पना जशी अधर्म्य तशीच वाङ्मयांतील प्रस्तुतची कल्पनाहि त्याज्य होय" असें त्यांचें थोडक्यांत म्हणणें आहे. या प्रसंगीं मला एका गोष्टीची आठवण होते. बरेच

दिवसांपूर्वीं एकदां पुणें सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत कोणी एका गृहस्थानें श्रीगजाननाच्या मूर्तीचें प्रदर्शन भरविलें होतें. त्यांतील सर्वोत्कृष्ट मूर्तीस अमुक एक बक्षीस देण्याचें ठरवून तें बक्षीस आर्यसंस्कृतीचे जाज्वल्य अभिमानी महर्षि श्रीसद्गुरु आण्णासाहेब पटवर्धन यांच्या परीक्षेप्रमाणें देण्यांत यावयाचें होतें. सदरहू कामाकरितां महर्षीस बोलवावयास मी त्यांचे घरीं गेलों तेव्हां ते म्हणाले, "बाबारे, मी तेथें येणें शक्य नाहीं. परमात्म्याच्या त्या सर्वच मूर्ति आहेत; त्यांत निवडानिवड करणें—बरेंवाईट म्हणणें—या जिव्हेस अशक्यप्राय आहे." पण त्याच ब्रह्मर्षींनीं एकदां त्यांस अत्यंत पूज्य असलेल्या श्रीगुरुचरित्र ग्रंथांतील वेंचे-उक्ति या स्वरूपाचा भाग कोणता हें आम्हांस अगदीं तार्किकदृष्टया विशद करून सांगितलें होतें, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. आणि हें खरेंच आहे कीं, मनुष्याच्या बुद्धीचा उपजत असा हा तरतमभाव जागृत न ठेवणें म्हणजे साक्षात् परमेश्वराशीं एवढयापुरती ही एक प्रकारें प्रतारणा करणेंच नव्हे काय? 'अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च' असें म्हणणाऱ्या भगवंतांनीं 'हंतते कथयिष्यामि दिव्याह्यात्मविभूतयः' असें म्हणून साऱ्या विश्वांतील निवडक वस्तूंची पृथक् यादी केलीच कीं नाहीं?

पण इतक्या खोल पाण्यांत न शिरतां, आपल्या संस्कृत वाङमयांतहि अशा प्रकारचा प्रयत्न, इंग्रजी वाङमयाप्रमाणें मोठ्या प्रमाणांत नसला तरी, थोडयाबहुत अंशानें केलेला आपणांस पाहावयास सांपडतो. सुभाषितरत्नभांडागार, रत्नावली, सूक्तिकुसुमांजलि वगैरे ग्रंथ याची साक्ष देतील. तथापि अनेक ग्रंथकारांच्या निरनिराळ्या ग्रंथांतील वचनांचीं हीं उदाहरणें असलीं तरी, एकाच ग्रंथकाराच्या अगर त्याच्या अनेक ग्रंथांतील उक्ति एकत्र संग्रहित केल्याचीं उदाहरणें मात्र पाहावयास सांपडत नाहींत. तसेंच, आपल्या मराठी वाङमयांतहि अशा तऱ्हेचीं पुस्तकें फारशीं नाहींत म्हटलें तरी चालेल. सिमियन बेंजामिनकृत मार्कस् ऑरेलियस बादशहाचीं 'बोधवचनें', श्री० न. रा. परांजपेकृत श्रीरामकृष्ण परमहंस यांचीं 'बोधवचनें' अशासारखीं कांहीं पांचपंचवीस पानांचीं किरकोळ पुस्तकें आहेत, नाहीं असें नाहीं. तसेंच श्रीयुत महादेव हरि मोडक यांचें 'खडे तात्त्विक बोल' हें पुस्तक प्रसिद्ध आहे; पण याचें स्वरूप मात्र अगदीं भिन्न आहे. इंग्रजी भाषेंत मात्र या विषयासंबंधानें अनेक ग्रंथ पाहावयास सांपडतात. इंग्रजी व संस्कृत या दोन्ही भाषांत

ज्ञानभांडार विपुल आहे; परंतु इंग्रजी भाषेंत त्यांतील ग्रंथरत्नावर पैल पाडून ते अधिक दीप्तिमान् होतील याबद्दल जो उद्योग करण्यांत आला आहे, तशा प्रकारचा उद्योग संस्कृत वाङमयांत फारसा केलेला दृष्टीस पडत नाहीं. आणि संस्कृत भाषेची जर ही स्थिति तर मराठीविषयीं बोलावयासच नको. इंग्रजींत नेपोलियनच्या ऐशींहून अधिक लहानमोठ्या पुस्तकांतून डी. लियन-कोर्ट यानें सदुक्ति काढून त्यांचा संग्रह केला आहे. व कायसर वुइल्यमच्या ग्रंथांतून, तसेंच त्याच्या खाजगी पत्रांतून, फार काय पण त्यानें वेळोवेळीं पाठविलेल्या असंख्य तारांतूनहि, त्याचा उक्ति संग्रहकार जे. एम्. केनेडी यानें बारीकसारीकहि उक्ति जमवून त्यांचें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. परवां एका विद्वान् सद्गृहस्थांशीं सहज या माझ्या प्रस्तुतच्या प्रयत्नासंबंधानें मी बोलत असतां माझी योजना पूर्ण ऐकून घेतल्यावर या बाबतींत त्यांनीं काढलेले उद्गार, केलेलें आंबट तोंड व माझ्या श्रमाचें दाखविलेलें वैयर्थ्य व वर्णिलेलें वैफल्य हीं लक्षांत घेऊन या बाबतींत पाश्चात्य विद्वानांचें तरी काय म्हणणें आहे हें पुढील उदाहरणांवरून वाचकांचे लक्षांत येईल. वुइल्यम् पेन लिहितो, "The wisdom of nations lies in their maxims, which are brief and pithy. Collect and learn them; they are notable measures and directions for human life; they save time in speaking; and upon occasions may be the fullest and safest answers," इंग्रजी भाषेंतील प्रसिद्ध टीकाकार ॲडिसन् यांचें म्हणणें असें कीं, "Maxims are of great weight; and a few useful ones at hand do more toward a happy life than whole volumes that we know not where to find." याशिवायहि कित्येक उदाहरणें माझ्या अवलोकनांत आलीं आहेत. त्यांपैकीं कांहीं मनोरंजक, प्रसंगोचित व ह्या विषयास पोषक अशीं वाटल्यावरून तीं संक्षेपतः देत आहे.

सूक्तींविषयीं प्रसिद्ध इंग्रजी तत्त्ववेत्ता लॉर्ड बेकन आपला स्वानुभव सांगतो—

'Wise sayings are not only for ornament, but for action and business having a point or edge whereby knots in business are pierced and discovered.' प्रसिद्ध पंडित जॉन मोर्ले

यांचा अभिप्राय असा कीं, 'Maxims are the guiding oracles which man has for himself in that great business of ours, of learning how to be, to do, to do without, and to depart. आणखी पुढें ते म्हणतात, 'Aphorism, let us remember that this wisdom of life is the true salt of literature;—that those books are most nourishing which are most richly stored with it, and that it is one of the main objects which men ought to seek in the reading of books.' डब्ल्यू. आर. अॅल्जर यांचें सूत्रमय वाक्य असें आहे कीं, 'Aphorisms are portable wisdom.' इमरसॅन लिहितो, 'A moral lesson is better expressed in short sayings than in long discourse and hence their importance.' सदुक्तीचा परामर्ष कसा घ्यावा यासंबंधानें सर हेन्री सिडने म्हणतो, 'If you find a wise sentence or an apt phrase commit it to your memory.' जोबर्ट याने याविषयीं आपलें मत अनेक ठिकाणीं ग्रथित केलें आहे. तो एके ठिकाणीं म्हणतो, 'Good maxims are the germs of all excellence. They are to the intellect what laws are to actions; they guide and direct and, although themselves blind are protective.' सर जे. मॅक्निटॉश लिहितो, 'Maxims are the condensed good sense of nations.' सर व्हॅन्टिस् हा आपलें असें मत देतो की, 'I am of opinion that there is no maxim which is not true, because they are all sentences drawn from experience itself, the mother of all the sciences.' कोलरीज म्हणतो, 'A maxim is a conclusion upon observation of matters of facts, and is merely speculative; a 'principle' carries knowledge within itself, and is prospective.' जेरिमी टेलर सूक्तीची उपयुक्तता वर्णितो, 'If these little sparks of holy fire which I have thus heaped up together do not give life to your prepared and already enkindled spirit, yet they will sometimes help to entertain a thought, to actuate a assion

to employ and hallow a fancy.' हूड याचें सूत्र असें कीं, 'Apothegms form a short cut to much knowledge.' सूक्तींच्या स्वरूपाविषयीं डॉ० जॉनसन् म्हणतो, 'The excellence of aphorisms consists not so much in the expression of some rare or abstruse sentiment as in the comprehension of some useful truth in few words.' टायलॉटसन् सूक्तींचा महिमा गातो कीं, 'The little and short sayings of nice and excellent men are of great value like the dust of gold, or the least sparks of dimonds.' प्लुटार्क प्रतिपादितो कीं, 'Apothegms are the most infallible mirror to represent a man truly what he is.'

सूक्तींसंबंधानें पाश्चात्य पंडितांचें काय मत आहे तें वरील उदाहरणांवरून दिसून येईल; पण तेवढ्यावरून या बाबतींत त्यांना आपण गुरुस्थानीं मानण्याचें कारण नाहीं. कारण इंग्रजी शिक्षणाचा गंधहि ज्यांस नाहीं अशा कांहीं रसज्ञ व विद्याव्यासंगी लोकांनींहि अशा तऱ्हेचे पण निराळ्या वळणाचे केलेले प्रयत्न प्रस्तुत लेखकास माहीत आहेत. फार काय, पण वरील कोटींतहि समाविष्ट होण्यास तो ( प्रकृतलेखक ) अपात्र असतां, सदर ग्रंथ तयार करण्याचें लहानपणापासून म्हणजे कोणताहि इंग्रजी ग्रंथ वाचण्यापूर्वी, त्याच्या मनांत आलें यास कारण तरी एका ग्रंथकारानें म्हटल्याप्रमाणें 'It is God Himself who speaks to us, when noble thoughts inspire us.' अशी लोकमान्यांसंबंधानें असलेली त्याची भावनाच होय असें त्यास वाटतें व या त्याच्या कल्पनेस पाश्चात्य ग्रंथांची माहिती मुळींच कारण झालेली नाहीं हें येथें अवश्य नमूद करणें जरूर वाटतें.

लोकमान्यांनीं आपल्या चाळीस वर्षांच्या राजकीय चळवळीच्या उद्योगाबरोबरच श्रीसरस्वती देवीची उपासनाहि कांहीं थोडीथोडकी केलेली नाहीं. तिची विविधता सर्वश्रुतच आहे. या त्यांच्या अगाध वाङमयोदधीचें मी माझ्या शक्त्यनुसार अवगाहन करून त्यांतून माझ्या हातीं लागलीं तेवढीं ओजस्वी, संग्राह्य व संस्मरणीय सूक्तींची पाणीदार मौक्तिकें गोळा करून त्यांचा हा हार गुंफिला आहे. बोलून चालून हा एक अत्यंत नम्र प्रयत्न

आहे. कारण वर म्हटल्याप्रमाणें, लोकमान्यांचें वाङ्मय म्हणजे खरोखर तो एक समुद्र आहे. आणि सागराचा सर्वव्यापी ठाव एकएकटा कोण घेऊं शकणार? तथापि, निष्ठेनें व आत्मविश्वासपूर्वक केलेल्या या सार्वजनिक सेवेचा गेल्या दोन वर्षांप्रमाणें यंदाहि वार्षिक वृत्तांत कथन करणें हें मी माझें कर्तव्य समजतों.

सदर ग्रंथांत संग्रहित केलेल्या सूक्ति ह्या लोकमान्यांच्या हातचा लेख अगर त्याचें व्याख्यान अशा जाहीरपणें छापिल्या गेलेल्या मजकुरांतूनच उद्धृत केलेल्या आहेत; खासगी संभाषणांतून अगर अप्रकाशित बाडांतून त्या घेतलेल्या नाहींत हें येथें प्रथम सांगितलें पाहिजे. कारण या बाबतींत मागें एकदां एके प्रसंगीं लिहितांना केसरीकारांनीं दिलेला खालीलप्रमाणें इषारा मला सर्वांशीं पटलेला होता; म्हणून तो मीं पूर्णपणें अमलांतहि आणिला आहे. केसरीकार म्हणतात: "आठवणी व आख्यायिका कोणी आपल्या स्मरणाप्रमाणें सांगूं शकेल; परंतु 'वचनां'चें (उक्तींचें) क्षेत्र असें अमर्याद नाहीं. लोकमान्य टिळकांचीं भाषणें किंवा लेख आज कोठें ना कोठें छापलेले मिळण्यासारखे असल्यामुळें, तसा कागदोपत्रीं पुरावा ज्या वचनांस आहे तेवढींच वचनें विश्वसनीय व बाकीचीं वचनें स्वतः कितीहि मौल्यवान् असलीं तरी निराधारपणामुळें अविश्वसनीय, अतएव बिनकिमतीचीं असेंच समजलें पाहिजे" तसेंच दुसरेंहि कारण असें कीं, प्रत्येक सूक्ति जेथून उद्धृत केली तेथील संदर्भहि तिचे खालीं देण्यांत आला आहे. या दोन्ही कारणांमुळें 'नामूलं लिख्यते किंचित्' असें या बाबतींत विधान करण्यास मला मुळींच हरकत वाटत नाहीं. कारण, 'आधारावांचुनि । काय सांगसी कहाणी ।।' असें पूर्वीच्या संतांनींहि लिहून ठेविलें आहे हें मी कसें विसरेन ?

याप्रमाणें छापील व प्रसिद्ध झालेल्या मजकुरांतूनच जरी सर्व उतारे घेतले असले तरी या मजकुरांच्या विश्वसनीयतेविषयीं तारतम्य वाचकांस चालवावें लागेलच. गीतारहस्यासारखे खुद्द लो० टिळकांच्या नांवावर प्रसिद्ध झालेले ग्रंथ व लेख हे या तारतम्यांत पहिल्या प्रतीचे ठरतील. त्या खालोखाल केसरींतील लेख येतील. कारण यांत क्वचित् एखादे ठिकाणीं

लोकमान्यांचा नसलेल्या अशा लेखांतील उतारा येण्याचा संभव; याचेहि खालोखाल व्याख्यानें, कारण त्यांत रिपोर्टराचे प्रमाद असण्याचा संभव; व याचेहि खालोखाल आठवणी. कारण आठवणी सांगणाऱ्यांची स्मृति व यथातथ्य वर्णन करण्याचा गुण यांच्या कमजास्त प्रमाणावरच आठवणींत नमूद झालेल्या उक्तींची विश्वसनीयता अवलंबून राहणार हें उघड आहे.

सदर पुस्तकाकरितां वर म्हटल्याप्रमाणें आजवर प्रकाशित झालेलें लोकमान्यांचें वाङ्मय (Works) मी माझ्या शक्तिबुद्धीप्रमाणें शक्य तितकें गोळा करून त्यांपैकीं ज्यांचा मला परामर्ष घेतां आला त्याची वर्णानुक्रमें यादी या पुस्तकांत दुसरीकडे दिलीच आहे. लोकमान्यांनीं आपल्या आयुष्यापैकीं निम्म्याहून अधिक वर्षें जो केसरी लिहिला त्या केसरींतील त्यांचें लिखाणच या पुस्तकांतील मजकुराचा एक मुख्य घटक असणार हें उघड आहे. केसरीच्या अगदीं आरंभापासून म्हणजे सन १८८१पासून, जरी केसरीचे एक उत्पादक म्हणून लोकमान्यांचा केसरीशीं निकट संबंध होता, तरी सन १८८७ सालीं त्यांच्या संपादकत्वाखालीं केसरी सुरू होईपर्यंत त्यांतील त्यांचे लेख कोणते हें समजणें कठीण, म्हणून पहिलीं सात वर्षें सोडून देऊन सन १८८७ ते सन १८९७, १८९९ ते १९०८ व १९१४ ते १९२० या सालांतील त्यांच्या लेखांतून सूक्ति निवडलेल्या आहेत. करितां या बाबतींत येथें दोन शब्द सांगणें जरूर आहे. ही गोष्ट सर्वांच्या परिचयाचीच आहे कीं, ज्या मुदतींत एखादा मनुष्य एखाद्या वर्तमानपत्राचा जाहीर रीतीनें संपादक असतो, त्या मुदतींत त्या वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेले सर्व संपादकीय लेख त्यानेंच लिहिलेले असतात असें नाहीं. या नियमान्वयें लोकमान्य हे केसरीचे जाहीर संपादक असलेल्या मुदतींत केसरींत प्रसिद्ध झालेल्या अग्रलेखांतून इतरांनीं लिहिलेलेहि जे अग्रलेख मिसळलेले आहेत ते अर्थातच वगळून, बाकी उरलेल्या खुद्द त्यांच्या लेखांतून, व ते केसरीचे जाहीर संपादक नसतां, वेळोवेळीं त्यांनीं लिहिलेल्या अग्रलेखांतूनहि उक्ति घेण्यांत आलेल्या आहेत. लोकमान्यांचे लेख कोणते हे ठरविण्याचे कामीं लोकमान्यांचे एक लेखक व 'गेलीं आठ वर्षें' या पुस्तकाचे कर्ते श्री० आप्पाजी विष्णु कुलकर्णी यांचें मला बरेंच साह्य झालें हेंहि येथें नमूद केले पाहिजे पण इतकें करूनहि कदाचित् चुकून क्वचित् एखादे ठिकाणीं लोकमान्यांचा

लेख समजून इतरांच्या लेखाचा उपयोग केला जाण्याचा जसा संभव आहे, तसा तो दुसऱ्याचा लेख समजून ऐनजिनसी मुळांत लोकमान्यांचा लेखच वगळला जाण्याचाहि संभव आहे. अंगावर पडणाऱ्या ह्या जबाबदारीच्या पेंचांतून सुटण्याकरितां 'लो० टिळकांचे केसरींतील लेख भाग १ ला' या ग्रंथास गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांनीं लिहिलेल्या मार्मिक व अधिकार-पूर्ण प्रस्तावनेंतील त्यांच्या पुढील वाक्यानेंच उत्तर देऊन आपण मुक्त व्हावें हेंच श्रेयस्कर होय. ते म्हणतात, "पण या बाबतींत मुख्य हेतूकडेच लक्ष देऊन किरकोळ चुकांची उपेक्षा करणेंच योग्य होईल. किंवा किंचित् आडमुठेपणा मुद्दाम स्वीकारून आम्हीं असाहि युक्तिवाद कां न करावा कीं, स्वतः जाहीर संपादक असतां, म्हणजे केसरींत आलेले अग्रलेख आपलेच (टिळकांचे) आहेत अशी लोकांची समजूत होण्यासारखी असतां, जे लेख टिळकांनीं संपादकीय म्हणून स्वीकारले, ते एका अर्थानें त्यांचेच झाले ! 'आपणांसारिखे करिती तात्काळ' किंवा 'लोह परिसा खाया जाये। लोह सुवर्णचि होये।' या अभंगवाणीप्रमाणें केसरींतील अग्रलेखांसंबंधीं लेखकांलेखकांत भेद करणें हें सर्वथा अयोग्यच होईल म्हणून अशा गोष्टीची वाच्यता करण्याचा कोणाला अधिकार नाहीं, हें जसें कायदेशीर रीतीनें म्हणतां येतें, तसेंच वरील विचारसरणी लक्षांत घेतां मार्मिकतेच्या आग्रहा-नेंहि तें म्हणतां येईल."

केसरीच्या खालोखाल उक्ति-संग्रहास उपयोगी पडलेला ग्रंथ म्हणजे ग्रंथराज 'गीता-रहस्य' हा होय. हा ग्रंथ वाचीत असतां यांतून काय घ्यावें आणि काय न घ्यावें अशी माझी अगदीं बावरल्यासारखी स्थिति होई. आरसेमहालांत बसलेल्यास आंत ठेवलेल्या दिव्याचीं अनंत रूपें आठहि दिशांना दिसावींत तद्वतच हा ग्रंथराज वाचीत असतां मला सर्वत्र उक्ति दिसूं लागाव्यात ! पण अखेर एका विद्वान् सन्मित्राच्या साहाय्यानें व त्याच्या विवेकपणाच्या कसोटीनें ह्या ग्रंथाचा परामर्श घेतां आला हें लिहिण्यास आनंद वाटतो. बाकीच्या इतर साधनसामुग्रीसंबंधानें विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. तथापि सुमारें बावीस वर्षांपूर्वीं मायावतीच्या प्रबुद्ध भारतांत लोकमान्यांनीं 'The Path of the Soul' या विषयावर

लिहिलेला पण आतां दुष्प्राप्य झालेला निबंध मीं मिळविला होता. पण तो निव्वळ शास्त्रीय स्वरूपाचा असल्यामुळें या कामीं त्याचा मला कांहींच उपयोग करून घेतां आला नाहीं.

'सूक्ति-संग्रहा'ची कल्पना मनांत दृढमूल असली तरी तिचें स्वरूप कसें असावें याचा मात्र मनाशीं निश्चय होत नसे. एकदां वाटे, निरनिराळ्या विषयांसंबंधानें लोकमान्यांचे विचार काय आहेत यांस प्राधान्य देऊन त्यांचें, बार्नेट स्मिथ यानें तयार केलेल्या 'Thoughts from Gladstone' या ग्रंथासारखें पुस्तक तयार करावें; म्हणजे होमिओपाथिक औषधीप्रमाणें अगदीं सूत्रमय वाक्येंहि नाहींत व मोठे लांबलचक पानेंच्या पानें उतारेहि नाहींत. स्मिथच्या वरील ग्रंथांत वीसपासून फार तर तीसपस्तीस ओळीं-पर्यंत ग्लॅडस्टनसाहेबांचे जसे निरनिराळ्या विषयांवरील विचार एकत्र ग्रंथित केले आहेत तसें आपण करावें. एकदां वाटे, पुस्तक अगदीं लहानच कां होईना, पण केवळ सिद्धान्तस्वरूपाचें ए. डब्ल्यू. हॉल यांच्या 'A thousand Flashes of French Thought' ह्या पुस्तकाचें आपण अनुकरण करावें. एकदां मनांत येई कीं, 'Beauties of Shakespeare' या ग्रंथाप्रमाणें आपल्या पुस्तकाची मांडणी करावी. पण लोकमान्यांसारख्या युग-प्रवर्तकाच्या अवतारकार्याचें रहस्य लक्षांत आणून, ज्यांच्या एका शब्दाच्या स्फुल्लिंगानें मनें चेतून तीं कार्यक्षम व्हावीं त्यांच्याविषयींचें निवळ एकेरी घाटाचें पुस्तक न बनवितां, ज्यांत वरील सर्व कल्पनांचा थोड्याबहुत प्रमाणानें समावेश होईल असा आपण प्रयत्न करावा, असें शेवटीं मनानें ठरविलें. म्हणून त्यांचें स्वभाववैशिष्टच, त्यांचें मत, त्यांनीं केलेलें सामान्य तत्त्वांचें असामान्य वर्णन, त्यांचे सिद्धान्त, त्यांची भाषा, त्यांचीं तत्त्वें, त्यांचा अधिकार आणि स्फूर्तीनें निघालेले त्यांचे कांहीं संस्मरणीय उद्‌गार वगैरे अनेक दृष्टींनीं सूक्तींची निवड करण्यांत आली आहे. त्यांत एखादी सूक्ति दिसण्यास अगदीं सामान्य अशी असेल, नाहीं असें नाहीं; पण अशा सूक्तींतूनहि लोकमान्यांचें कांहींना कांहीं तरी वैशिष्टच भासलें म्हणूनच तिचा संग्रह केला आहे. 'Beauties of Shakespeare' हा ग्रंथ तयार करणारा डब्ल्यू. डॉड यानेंहि या बाबतींत अगदीं अशाच तऱ्हेचे उद्‌गार काढलेले पाहावयास सापडतात. तो म्हणतो : 'But I have

another apology to make, for some passages introduced merely on account of their peculiarity, which to some possibly, will appear neither sublime nor beautiful, and yet deserve attention, as indicating the vast stretch and sometimes particular turn of the Poet's imagination.'

वास्तविक 'सूक्ती'चें तत्त्वतः स्वरूप पाहिलें तर तें अगदीं अर्थपूर्ण पण सूत्ररूपच असलें पाहिजे. काडीची शक्ति जशी तिच्या गुलांत अगर बंदुकीचें सामर्थ्य जसें तिच्या तोंडांतील अंगुष्ठमान काडतुसांत, तद्वतच सूक्तींचें आहे. खनिजद्रव्यांतून निवडून काढलेले जसे सुवर्ण कण किंवा द्राक्षांच्या घोसांतून वेचून काढलेलीं टपोरीं व शेलकीं द्राक्षें तशाच उक्ति होत. उक्ति म्हणजे हंडाभर दह्याचें मंथन करून निघालेलें नवनीत किंवा मक्षिकांनीं विविध फुलांतून जमविलेला मधच होत. फार काय, पण सूक्ति ह्या तद्विषयक वाङ्मयाचें अत्तरच होय असें म्हणण्यास हरकत नाहीं. हवेल यांनीं सूक्तीची अशी व्याख्या दिली आहे कीं, 'Sense, shortness and salt are the ingredients of a good maxim.' तसेंच पण्डित जॉन मोर्ले उक्तीचें असें लक्षण बांधतात कीं, The essence of aphorism is the compression of a mass of thought and observation into a single saying'. सूक्ति निवडतांना हें धोरण मीं आपल्या डोळ्यांपुढें अढळ ठेविलें होतें. तथापि तें धोरण मजकडून न कळत सुटल्यामुळें व दुसऱ्या अनेक करणांमुळें मीं निवडून काढलेल्या एकंदर सर्व उक्ति वाचून त्यांपैकीं सुमारें दीड हजार उक्ति माझ्या एका विद्वान्, मार्मिक व मेहनती स्नेह्यानें, ग्रंथ-विस्ताराच्या भीतिस्तव, नापसंत म्हणून बाजूस ठेवून देण्यास सांगितलें. तथापि त्या वाचतांना, उद्धृत करितांना व त्यासंबंधानें चिंतन करितांना, कविवर्य गटे याच्या पुढील म्हणण्या-प्रमाणेंच त्यांचा केव्हांहि मनावर परिणाम झाल्याखेरीज राहणार नाहीं अशी माझी समजूत आहे. तो म्हणतो, 'We should only utter higher maxims so far as they can benefit the world. The rest we should keep within ourselves, and they will diffuse over our actions a lustre like the mild radiance of a hidden sun.'

चरित्र लिहिण्याचे जसे अनेक प्रकार श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं लो० टिळक यांच्या चरित्राच्या प्रस्तावनेंत वर्णिलेले आहेत, तसेच उक्ति निवडण्याचे व त्यांची मांडणी करण्याचेहि अनेक प्रकार होऊं शकतात. कोणास विषयवारी आवडेल, तर कोणास विषयवारीनें वाचणें कंटाळवाणें होतें म्हणून त्या सरमिसळ रीतीनें असणें बरें वाटेल. ऐतिहासिक दृष्टीचा मनुष्य त्यांत कालानुक्रमाची अपेक्षा करील, तर केवळ रसोद्ग्राही पद्धतीच्या मनुष्याची त्यांतील महत्त्वमापनक्रमाकडेच दृष्टि जाईल. तसेंच कोणास शेवटीं सूचि असावी असें वाटेल, तर 'कोशास कोणीं कोठें सूचि केली आहे का ?' असा कोणी प्रश्न करील. फार काय, पण उगाच प्रत्येक उक्तीच्या मागें क्रमांकाची उपाधी नसावी असें कोणी म्हणेल तर हे आकडे सांखळीच्या आडव्या गंधांतील अक्षदीच्या टिकलीप्रमाणें दोन उक्तींच्या मध्यें घातल्यास फार बरें दिसेल असेंहि कोणास वाटेल. तात्पर्य, अशोक-वनिता-न्याय हा कोठेंहि लागूच पडेल. म्हणून वरील गोष्टींचा ज्यांत अंशत: अंतरभाव होईल असाच एक नवा प्रकार मीं उपयोजिला आहे. तो म्हणजे चावीच्या दगडानें जशी कमान आधारलेली असते, तसा कोणत्या ना कोणत्या एका प्रधान शब्दावर आधारलेल्या प्रत्येक सूक्तींतील सूचक शब्द ( Key-word ) शोधून, त्यास अध्यक्ष (!) म्हणजे तो जाडया टाइपांत छापून त्याच्या अक्षरानुक्रमवार सूक्तींची मांडणी केलेली आहे व ही योजना वाचकांस पसंत पडावी अशी कल्पना आहे.

सारांश, आरंभीं म्हटल्याप्रमाणें लोकमान्यांचें वाङ्मय ही पवित्रगंगा असल्यानें वाटेल त्यानें आपल्या शक्त्यनुसार तिच्यांतील सूक्त्युदकानें आपल्या ग्रंथरूपी गिडया भरून त्यांचा सर्व जनतेस लाभ जोडून द्यावा. स्वत:पुरतें बोलावयाचें म्हणजे मी हा प्रयत्न करीत असतां, कदाचित् माझ्या अपात्रतेमुळें, या गिडींत सूक्तीच्या उदकाबरोबर क्वचित् वाळूचा कण चुकून येण्याचा संभव आहे, म्हणूनच Political Aphorisms of Emperor Napoleon' या पुस्तकाच्या आपल्या आत्मनिवेदनांत लियन् कोर्ट यानें 'मी तयार केलेल्या या पुस्तकांतील सूक्ती सर्व योध्ये, मंत्री आणि तत्त्ववेत्ते यांनीं मुखोद्गत कराव्यात' असें जें फाजील आत्मविश्वासाचें किंबहुना गर्वोक्तीचें विधान केलें आहे, तसें मात्र माझ्यानें करवत नाहीं !

शेवटीं आभारप्रदर्शनापूर्वी, एवढेंच सांगावयाचें कीं, नियोजित अध्यक्षाचे अगोदर जसें एखाद्या स्वागताध्यक्षानेंच आपल्या प्रास्ताविक भाषणानें सर्व वेळ व्यापून टाकावा, तद्वतच या माझ्या लांबलेल्या आत्मनिवेदनाच्या अतिप्रसंगाबद्दल वाचकांनीं मला क्षमा करावी अशी त्यांस माझी विनंति आहे.

खरोखर आभार मानण्यासारखें गोड काम दुसरें कोणतेंहि नसेल. कारण आभार मानणें म्हणजे आपली कृतज्ञता व्यक्त करणें होय; आणि कृतज्ञतेची व्याख्या 'अधिक उपकारांची अपेक्षा' अशी मार्मिक लोक करितात; तेव्हां हे आभार म्हणजे व्याजी घातलेलें भांडवलच होय, असें कोणी म्हणतील; परंतु तशी भावना मनांत न बाळगतां; केवळ कृतज्ञता-बुद्धीनेंच हें काम मी करीत आहें. तें करीत असतांना, प्रथम गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचा निर्देश करणें जरूर आहे. पूर्वी प्रसिद्ध झालेले लोकमान्यांच्या 'आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाचे दोनहि खंड आणि आतां प्रसिद्ध होणारा हा ग्रंथ हे सर्व तात्यासाहेबांच्या कृपेचें, आश्रयाचें व प्रोत्साहनाचें फल होय, एवढें नमूद केलें असतां त्यांच्या उपकारांची कल्पना येणार आहे. त्यानंतर ज्या सन्मित्रांनीं मला या कामीं निरनिराळ्या रूपानें मनःपूर्वक साहाय्य केलें त्यांच्या नांवांचा उल्लेख केल्याखेरीज माझ्यानें राहावत नाहीं. अर्वाचीन काळच्या वाङमययुगांतील ग्रंथरचनेंत प्रस्तावना हें ग्रंथाचें नाक मानलें जातें; किंवा घराची शोभा आंगण राखतें म्हणतात, त्याप्रमाणें ग्रंथांचें स्वरूप प्रस्तावनेवरून कळतें. या दृष्टीनें सदर ग्रंथाचे विद्वान्, मार्मिक, रसिक व 'अधिकारी' प्रस्तावना-कार 'खडे तात्त्विक बोल' बोलणारे श्रीयुत महादेव हरि मोडक, बी. ए. यांनीं प्रकृतीस स्वास्थ्य नसतांहि लिहिलेल्या प्रस्तावनेबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे थोडे आहेत. तसेच केसरी व मराठा पत्रांचे 'मॅनेजर व ट्रस्टी' श्रीयुत धोंडोपंत ऊर्फ बाबासाहेब विद्वांस, श्री० काशीनाथ नारायण धारप, बी. ए. एल्एल्. बी. वकील, ठाणें, इतिहाससंशोधक श्री० शंकर नारायण जोशी, न्यू पूना कॉलेजचे माजी फेलो श्री० वामन त्र्यंबक आपटे, बी. ए., टिळक महाविद्यालयाचे आचार्य श्री० विष्णु प्रभाकर लिमये, बी. ए., श्री० सदाशिव केशव भावे, बी. ए., टिळक-वाङमय-स्मारक—योजनेच्या बाबतीत उपक्रमापासून माझे सहकारी असलेले मित्र वाङमय-विशारद श्री० काशीनाथ

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
 अनुक्रमांक विः 

नरसिंह ऊर्फ बापूराव केळकर, बी. ए. यांचें मला अनेक प्रकारें साहाय्य झालें आहे व त्याबद्दल मी त्यांचा उपकृत आहें. तसेंच, गुप्तदानाप्रमाणें गुप्त मदत करण्यांत संतोष व भूषण मानणाऱ्या माझ्या एका सगोत्रज, विद्वान् व प्रेमळ 'समोपनामधारी' पदवीधर मित्राचे मी अंतःकरणांतल्या अंतःकरणांत मूक आभार मानीत आहे ! लोकमान्यांच्या आठवणींच्या ग्रंथाच्या दोनहि खंडांप्रमाणें याहि पुस्तकाचे कामीं मला कायमचे उपकारबद्ध करणारे 'गीता-बीज'कर्ते श्री० गजानन विश्वनाथ केतकर बी. ए., एल्एल्. बी., उपसंपादक केसरी-मराठा हे होत. श्रीयुत गणपतराव यांनीं हें पुस्तक आपलेंच समजून तें वेळेवर प्रसिद्ध करण्याच्या बाबतींत कळकळीनें, निरलसपणानें व निरपेक्षतेनें जी मेहनत घेतली त्याबद्दल त्यांचें योग्य शब्दानें उतराई होणें कठीण आहे. तथापि माझ्या शाब्दिक आभारांपेक्षां आपले परमपूज्य मातामह लोकमान्य टिळक यांची ही सेवा आपले हातून घडली याच कल्पनेनें ते आपलें समाधान करून घेतील अशी मला आशा आहे..

'विजय' प्रेसचे उत्साही, मुद्रणकलाभिज्ञ व कार्यदक्ष मालक श्रीयुत आप्पासाहेब गोखले यांच्या सर्वसाधारण मुद्रण-विषयक सल्ल्याबद्दल व त्यांनीं वचन दिल्याप्रमाणें वेळेवर पुस्तक तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें.

टिळक-जयन्ती
शके १८४८
केसरी कचेरी, पुणें

सर्वांचा नम्र सेवक
**सदाशिव विनायक बापट**

## 'लो० टिळक-सूक्तिसंग्रह ग्रंथावरील अभिप्राय

ती. आण्णासाहेब यांनीं वरील बहुमोल ग्रंथ फार श्रमानें तयार केल्याचें सार्थक झालें, कारण तो ग्रंथ सर्वांना आवडल्याबद्दल अनेकांकडून उत्तमोत्तम अभिप्राय आले आहेत. महाराष्ट्रांतील प्रमुख वर्तमानपत्रकर्त्यांनीं त्यावर अग्रलेख लिहून त्यांची प्रशंसा केली आहे. प्रमुख पुढाऱ्यांनीं, वाङ्मय लेखकांनीं व सार्वजनिक कार्यकर्त्यांनीं त्यावर आपले अभिप्राय प्रसिद्ध केले आहेत. शिवाय अनेक चहात्यांकडून पसंतीचीं पत्रें आलेलीं आहेत. त्यांपैकीं केवळ नमुन्यादाखल म्हणून या ग्रंथांतील पहिल्या भागांत

श्री. भावे यांनीं कांहीं थोड्या प्रमुख मंडळींचें अभिप्राय अगदीं संक्षिप्त रीतीनें प्रसिद्ध केले आहेत. विशेष नमूद करावयाचें म्हणजे या ग्रंथाच्या मान्यतेचें एक प्रमुख निदर्शक असें कीं, तो ग्रंथ प्रसिद्ध झाल्यापासून फक्त पांच महिन्यांतच त्याची तीन हजारांची आवृत्ति संपून गेली ! आज बाजारांत अगर त्याच्या संपादकांकडे एकहि प्रत शिल्लक नाहीं ! तात्पर्य, असें हें लोकोपयोगी टिळक-वाङ्मय प्रसिद्ध केल्याबद्दल सर्वांनीं आण्णांना धन्यवाद दिले.

**श्री. सदाशिवराव बापट यांचा सत्कार व त्यांचा स्वार्थत्याग**

"दिनांक १ ऑगस्ट रोजीं सायंकाळीं लो. टिळक मंदिरांत टिळक पुण्यतिथीनिमित्त श्री. तात्यासाहेब केळकर यांचे अध्यक्षतेखालीं श्री. बाबासाहेब खापर्डे यांचें व्याख्यान झालें. प्रारंभीं श्री. सदाशिवराव बापट यांनीं पूर्वसंकेताप्रमाणें 'लोकमान्यांच्या आठवणी व आख्यायिका' या ग्रंथाचा तिसरा म्हणजे शेवटचा खंड वाचकांच्या हातीं दिल्याबद्दल त्यांच्या स्नेही मंडळींनीं त्यांना श्री. खापर्डे यांच्या हस्तें ५०० रु. थैली नजर केली व त्यांचा सत्कार केला. श्री. सदाशिवराव बापट यांनीं यथोचित शब्दांत सर्वांचे आभार मानले. ते म्हणाले "या प्रसंगीं मी भावनेनें बोलत नाहीं. मी आठवणीकार असल्यानें एक आठवण सांगतों. लोकमान्यांना ६१ वें वर्ष लागलें त्यानिमित्त भरलेल्या त्यांच्या सत्कार-समरंभाच्या वेळीं त्यांना जनतेनें एक लक्ष रुपयांची थैली अर्पण केली. त्यास उद्देशून ते म्हणाले 'या रकमेंत मी माझा कांहीं अंश घालून ही रक्कम जनसेवेस परत करितों. या गोष्टीची हास्यास्पद नक्कल होत नसेल तर टिळक-चरणस्मरणपूर्वक मी असें म्हणतों कीं, हा सत्कार व्यक्तिशः माझा नसून तो लोकमान्यांच्या अवतारकृत्याचा आहे. तसेंच लोकमान्यांच्या ज्या अनेक भक्तांनीं आठवणी मला लिहून देण्याची कृपा केली त्यांचा हा सत्कार आहे. या ५०० रुपयांत मी माझें अत्यल्प तुळशीपत्र (रुपये २५ चे) घालून ही रक्कम लोकमान्यांच्या राजकीय मताचा प्रचार करण्याकडे खर्च करावी म्हणून गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचे चरणीं अर्पण करितों.'' याप्रमाणें प्रचंड टाळ्यांचे गजरांत श्री. बापट यांनीं आपलें भाषण संपविलें.

—केसरी दि. ७।८।१९२८

## श्री. सदाशिराव बापट यांचा गौरवसमारंभ

गणेश चतुर्थीच्या शुभ दिवशीं पुणें येथें सरदार दादासाहेब नातू यांच्या वाड्यांत श्री. स. वि. बापट, लो. टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका या ग्रंथांचे संग्राहक व संपादक, यांचा सन्मान करण्याचा समारंभ झाला. हा समारंभ भारत स्नेह-संवर्धक मंडळ या संस्थेनें केला. सदर संस्था शके १८४८ मध्यें स्थापन झाली असून तिच्या उद्देशांमध्यें पक्षभेद आणि जातिभेद यापासून अलिप्त राहून काम करणें, राष्ट्रबलसंवर्धक, प्रबोधनात्मक ग्रंथसंपत्तीचा पुरस्कार करणें व त्यास उत्तेजन देणें यांचा समावेश होतो. श्री. ल. ब. भोपटकर, श्री दा. वि. गोखले, श्रीपांडूआण्णा शिराळकर, श्री. ग. वि. केतकर, श्री. वा. कृ. भावे, प्रो. नाईक, आदि पुरुष मडळी आणि सौ. दुर्गाताई केळकर, सौ. कमलाबाई गांधी, सौ. इंदिराबाई देवधर, सौ. गिरिजाबाई केळकर आदि प्रमुख भगिनी या समारंभास मुद्दाम हजर राहिल्या होत्या. ९॥ वाजतां कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रो. पटवर्धन यांचें राष्ट्रगीतगायन झाल्यावर सौ. सरलाबाई नाईक यांनीं अध्यक्षस्थान मंडित केलें. नंतर प्रो. वि. ब. नाईक यांनीं आपल्या भाषणांत श्री. बापट यांनीं आपल्या आठवणी व आख्यायिका या ग्रंथाची सामुग्री मिळविण्याच्या कामीं दाखविलेली असामान्य चिकाटी, लो. टिळकांचे विषयींची उत्कट निष्ठा आणि स्पृहणीय भक्ति या गुणांचा उल्लेख करून अशा तऱ्हेचें काम करणाऱ्या माणसाला किती कष्ट आणि दगदग सहन करावी लागते याचें वर्णन केलें.

सौ. इंदिराबाई देवधर यांनीं श्री. बापटांचा उचित शब्दांत गौरव करून त्यांच्या आठवणी व आख्यायिका या पुस्तकाचें विशेषतः स्त्रीवर्गास किती महत्त्व आहे तें विशद करून सांगितलें. स्त्रीवर्ग किंवा बहुजनसमाज यांची वाचनाकडे आवड कमी. त्याला लो. टिळकांसारख्या विभूतीच्या चरित्राचें महत्त्व व मर्म समजून द्यावयाचें असल्यास तें चरित्र ग्रंथापेक्षां श्री. बापटांसारख्या आठवणींनींच कसें चांगल्या प्रकारें होणार आहे याचें वर्णन केलें.

त्यांच्यानंतर श्री. वा. कृ. भावे हे बोलावयास उठले. त्यांनीं श्री. बापट यांचा पूर्ववृत्तांत कथन करून त्यांच्या एकनिष्ठ लोकमान्यभक्तीचा, स्वार्थत्यागवृत्तीचा आणि उत्कट स्वदेशप्रेमाचा प्रामुख्यानें उल्लेख केला. वयाच्या १५ व्या किंवा १६ व्या वर्षींच श्री. बापट यांनीं आपल्या शिक्षणावर पाणी सोडून होईल त्या प्रसंगविशेषीं प्राणहि अर्पण करण्याची तयारी ठेवून राष्ट्रसेवा करण्याचें असिधाराव्रत कसें उचलिलें व तत्सिद्ध्यर्थ नैष्ठिक ब्रह्मचाऱ्याचा खडतर आयुष्यक्रम त्यांनीं कसा अंगिकारिला व तितक्याच निश्चयानें तो कसा पार पाडला याचें वर्णन केलें.

सौ. कमलाबाई गांधी यांनीं अशा आठवणी व आख्यायिका यांच्या वाचनानें अशिक्षित स्त्री समाजाला राष्ट्रप्रेमाचे जिवंत धडे कसे मिळू शकतील आणि या दृष्टीनें या ग्रंथाचें किती महत्त्व आहे हें सांगून भारत स्नेह संवर्धक मंडळाच्या गुणग्राहीपणाबद्दल त्याचें अभिनंदन केलें.

श्री. दास्ताने वकील यांनीं लोकमान्य टिळकांच्या कांहीं आठवणी वाचून दाखविल्या. यानंतर सौ. गिरिजाबाई केळकर व डॉ. आबासाहेब नातू यांचीं प्रसंगानुरूप भाषणें झाल्यावर श्री. स. वि. बापट हे बोलावयास उठले. ते म्हणाले, "देवालयें बांधणारा सृष्टिक्रमानुसार कालवश होतो व त्याचें नांवहि ऐकूं येत नाहीं. परंतु त्या देवालयांत स्थापिलेल्या मूर्तीचा जयजयकार मात्र त्यानंतर शेंकडों वर्षें अव्याहत चालू असतो. त्याप्रमाणेंच लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका या पुस्तकाची गोष्ट आहे. या पुस्तकाचा संग्राहक मी फक्त नांवाला आहे; परंतु खरा जयजयकार आणि खरा गौरव म्हणजे त्या पुस्तकरूपी मंदिरांत स्थापित झालेल्या लो. टिळकांच्या पूज्य आणि पावन चरित्राचाच आहे; मी केवळ निमित्त मात्र आहे."

यानंतर अध्यक्ष सौ. सरलाबाई नाईक यांचें समारोपादाखल भाषण झालें. त्या म्हणाल्या, "श्री. बापट यांचा ग्रंथ अनेक दृष्टींनीं वाचनीय, मननीय आणि स्फूर्तिदायक आहे यांत संशय नाहीं. विशेषतः भावी पिढ्यांना लो. टिळकांसारख्या असामान्य विभूतीचा अत्यंत विश्वसनीय परिचय करून देण्याचे कामीं लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका या ग्रंथाची महति

अमोल आहे. प्रस्तुत काळीं श्री. बापटांसारख्या लेखकास राजाश्रय मिळणें शक्य नसल्यामुळें अशा राजाश्रयाची उणीव लोकाश्रयानें भरून काढिली पाहिजे." श्री. बापट यांनीं घेतलेले दीर्घ परिश्रम आणि सहन केलेले कष्ट यांचा गौरवपूर्ण भाषेंत उल्लेख करून त्यांनीं आपलें भाषण संपविलें.

रीतीप्रमाणें अध्यक्षांचें आभारप्रदर्शन झाल्यावर श्री. बापटांचा सत्कार करण्यांत आला. असा हा गोड व तरुण अंतःकरणाला स्फूर्तिदायक असा समारंभ पार पडला. केसरी दि. ८–८–१९२८

## लोकमान्यांच्या 'लेखका'चे (स. वि. बापट) अनुभव

(लेखक : स. वि. बापट आठवणीकार)

१९०६ सालाची गोष्ट आहे. पुणें येथें भोपटकरबंधूंनीं 'महाराष्ट्र विद्यालय' म्हणून राष्ट्रीय शिक्षणाची शाळा सुरू केली होती. त्यांत मी शिक्षक होतों. एके दिवशीं केसरींत घालण्यासाठीं माझा एक लेख घेऊन मी गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचेकडे गेलों होतों. माझें अक्षर पाहून ते म्हणाले, "बळवंतरावजींना (लो. टिळक) एक लेखक पाहिजे आहे. तुम्ही तें काम कराल काय ?" मी म्हणालों, "दुपारी ११॥ ते ५ पर्यन्त मी शाळेंत गुंतलेला आहे. त्याशिवायच्या वेळेंत मी अवश्य हें काम करीन." त्यांनीं लोकमान्यांस तसें सांगितलें.

### स्वतः लिहिण्याचा कंटाळा

दुसरे दिवशीं मला बोलावून रोज सकाळीं ८ ते १० मीं यावें असें लोकमान्यांनीं मला सांगितलें; व त्याप्रमाणें कामास बिनचूक सुरुवात झाली. स्वतःच्या हातानें लिहिण्याचा लोकमान्यांस अतिशय कंटाळा असे, व काम तर ब्रह्मांड असे. म्हणून त्यांस लेखकाची फार गरज असे. पण चांगलें अक्षर, शुद्धलेखन व जलद लिहिणें यांवर त्यांचा कटाक्ष असे. वरील तीनहि बाबतींत त्यांना मी पसंत पडलों.

रोज पत्र-व्यवहार, अनेक विषयांचीं टांचणें, टिपणें, गरीब लोकांचे विनामूल्य कायदेशीर अर्ज वगैरे लिहून देणें, केसरी-मराठाकरितां अग्रलेख व इतर मजकूर लिहिणें वगैरे विविध प्रकारचें त्यांचें भरपूर काम रोज असे. पण मौज अशी कीं, मी दुसरीकडे ११ वाजल्यापासून गुंतलों आहें हें लक्षांत ठेवून लिहिण्याचे नादांत ते कितीहि असले तरी, बरोबर १० वाजतां अर्धवट तसेंच काम सोडून 'उठा, जा कसे, तुमची वेळ झाली,' असें त्यांनीं मला सांगितलें नाहीं असें कधींहि झालें नाहीं. शाळेच्या सुट्टीचे दिवशीं मात्र खूप लिहिणें होई. मी थोडा कंटाळें; पण कंटाळा हा शब्द त्यांच्या कोशांत नव्हता.

ते मजकूर सांगतांना आरामखूर्चीवर बसलेले असत किंवा तेथल्या तेथें येरझारा घालीत मजकूर सांगत. कोणताहि मजकूर जलदीनें सांगण्याची त्यांना संवय असल्यामुळें मी त्यांचा खोळंबा न करतां अति जलदीनें लिहीत असे. अशा प्रकारें एकमेकांस न थांबविण्याची ही शर्यतच चाले!

## तुटलेला मजकूर सहज जोडीत

लोकमान्यांना भेटीस येणाऱ्यांचीहि नेहमीं रीघ लागे. कोणी केव्हांहि यावें. मजकूर सांगत असतां कोणी आलें तर आलेल्या मनुष्याचें पूर्ण समाधान होईपर्यन्त ते थांबत. आलेला मनुष्य जातांच ते मजकूर सांगत; पण चमत्काराची गोष्ट अशी कीं, मागील मजकूर कोठपर्यंत आला आहे वगैरे कांहींएक न विचारतां, न थांबतां, तुटलेला धागा आपोआप जोडून ते पुढें जात!

वर्तमानपत्री लिखाणांत व इतर महत्त्वाच्या लिखाणांत संस्कृत व इंग्रजी ग्रंथांतील अवतरणें ते घेत; पण त्यांच्या स्मरणशक्तीचा चमत्कार असा कीं, मूळ ग्रंथ न पाहतां बिनचूक तो मजकूर ते सांगत. लिहिणें संपल्यावर चटकन् उठून संदर्भ ग्रंथ आणून, माझे लिहिण्यांत चूक होऊं नये म्हणून, तो अवतरणांकित मजकूर पाहून त्याप्रमाणें लिहा असें मात्र मला सांगत.

त्या वेळीं केसरी आठवड्यांतून फक्त मंगळवारीं प्रसिद्ध होई. बहुतेक दर अंकांत ते अग्रलेख व महत्त्वाची एखादी स्फुट सूचना लिहीत. मधून-मधून 'मराठा' पत्रांतहि ते अग्रलेख लिहीत. विनोदानें ते आपल्या उपसंपादकांस विचारीत कीं, "आम्हास या अंकांत लिहिण्यास किती जागा देतां ?" गंमत अशी कीं, ठरविलेल्या रकान्यांतच आपला महत्त्वाचा मजकूर असतांहि तो ते नेमका असा बसवीत कीं, एक ओळ देखील कमी जास्त करावी न लागतां त्यांत चपखल तो बसत असे.

पुढें पुढें लोकमान्यांच्या इतर कामाचा इतका व्याप वाढला कीं, 'केसरी'करितां सोमवारी वेळेवर अग्रलेख लिहिण्यास त्यांस वेळ सांपडत नसे. यामुळें मजकूर त्यांचेकडून वेळेवर लवकर मिळावा म्हणून व्यवस्थापकांचा माझे मागें लकडा लागे. एकदां त्यांना मीं म्हटलें, 'उशीर झाला आहे, केसरीकरतां मजकूर सांगतांना ?' 'केसरी'च्या मजकुराची तयारी त्यांचे डोक्यांत चाललीच होती. ते हंसत म्हणाले, "डोक्यांतील इंजिन अजून पेटलें नाहीं. पेटतांच मजकूर सांगतों." थोडक्याच वेळांत त्यांनीं बोलावलें व अतिजलदीनें मजकूर सांगून ते दुसऱ्या कामास लागले.

कित्येक वेळां सोमवार सायंकाळपर्यंतहि त्यांच्या महत्त्वाच्या विविध कामांमुळें, त्यांचेकडून 'केसरी'चा मजकूर मिळत नसे. व तो तर त्यांनींच लिहावयाचा असें ठरलेलें असे. शेवटीं रात्रीं दहा-दहा ओळी मजकूर लिहून ते कागद खालीं कंपोजकरितां पाठविण्यांत येत. अशा रीतीनें हें लिहिणें संपे व तडक ते दुसऱ्या कामास जात. कोणत्याहि लेखकाला आपल्या मजकुराचीं प्रुफें स्वतः पाहिल्याशिवाय समाधान होत नाहीं. पण लोकमान्य म्हणत, "माझ्या मजकुराचीं प्रुफें मीं पाहण्याचें कारण नाहीं. त्यांत मला कांहींहि कमीजास्त करावयाचें नसतें. मात्र मीं सांगितलेल्या मजकुराचें अक्षरन् अक्षर आलें म्हणजे झालें."

## सुटसुटीत मथळा

अग्रलेखाचा मजकूर लिहून झाल्यावर त्यांस ते समर्पक मथळा सांगत. १९०७ सालीं लोकमान्यांच्या स्फूर्तीनें दारूच्या पिकेटिंगची अभूतपूर्व चळवळ चालू होती. सरकार व सरकार-पक्षपाती लोक दारूचें समर्थन करीत होते. त्या वेळीं एका सोमवारीं मद्यपान-निषेधार्थ चळवळीवर अग्रलेख लिहून तयार झाला. लेखास मथळा काय घालावयाचा असें मीं त्यांस विचारतांच, दोन-चारशें लोकांच्या सभेपुढें आवेशानें बोलावें तसें ते एकदम म्हणाले, "धिक्कार असो दारुबाजांच्या कैवाऱ्यांना" असा मथळा लिहा.

अग्रलेखाचा मथळा आकर्षक व लहान असावा असें ते म्हणत. १९१४ सालीं ते सुटून आल्यावर तात्यासाहेब केळकर यांनीं केसरीसाठीं त्यांची मुलाखत घेतली. ही मुलाखत फार महत्त्वाची आहे. केळकर प्रश्न विचारीत, लोकमान्य उत्तर देत, व मी लिहीत असे. सहा वर्षांपूर्वीच्या गोष्टी जणूं काय काल-आज घडल्या अशा आठवण न करितां लीलेनें ते सहज सांगत आश्चर्य असें कीं, घडलेल्या गोष्टीच्या तारखा व वारहि ते बिनचूक सांगत ! हें पाहून तात्यासाहेब थक्क होत.

मुलाखतीचा मजकूर जमेस धरून लोकमान्य सुटल्याबद्दल केसरी-करितां तात्यासाहेब यांनीं सुंदर अग्रलेख लिहिला. त्यास त्यांनीं "लोकमान्य टिळक यांची बंधमुक्तता" असा मथळा घातला होता. तात्यासाहेब यांच्या सांगण्यावरून सदर लेखाचीं प्रुफें मीं लोकमान्यांस दाखविलीं. तीं पाहून ते म्हणाले, "मजकुर छान-सुन्दर आहे. मथळा मात्र बोजड व कुरूप आहे. रस्त्यांतील मुलें माणसें एकमेकांस सांगतील, असा सुटसुटीत असावा. तो खोडा व तेथें " 'टिळक सुटले!' असें लिहा." तात्यासाहेब यांस तसें सांगताच ते म्हणाले, "हें तर बळवंतरावजींचें वैशिष्ट्य आहे. सार्थ व सूत्ररूपानें त्यांनींच लिहावें. बोलावें."

एके दिवशीं लिहिण्याचें काम चालू असतां वाईचे धर्ममार्तंड भाऊ-शास्त्री लेले आले व ते लोकमान्यांस म्हणाले :—

" या वयांतहि अजून आपला लिहिण्याचा सपाटा चालू आहे तर! " लोकमान्य खेदपूर्वक म्हणाले, " काय करावें ? स्वतःच्या हातानें न लिहितां लेखकाकडून लिखाण करण्याची वाईट खोड मला लागली आहे." लोकमान्यांना बरे वाटण्याकरतां भाऊशास्त्री म्हणाले, ' व्यासांनाहि आपला महाभारत ग्रंथ लिहिण्यास लेखकाची (श्रीगजाननाची) मदत घ्यावी लागली ना ? मग तुम्हांसच लेखकाकरवी लिहिण्याचा खेद कां होतो ? "

पण हें उत्तर लोकमान्यांना खपलें नाहीं. विनयशील स्वरांत ते म्हणाले, " शास्त्रीजीबोवा, असें म्हणू नका. तुमचा हा दृष्टान्त अयोग्य व अस्थानीं आहे. भगवान् वेदव्यास यांची गोष्ट आपण पामरांनीं काय बोलावी ? आपल्या सोयीकरितां त्यांच्या पांघरुणांत आपलें पाप दडविणें अशास्त्रीय आहे. " हें ऐकून शास्त्रीबोवांनीं आपली चूक कबूल केली.

### तुरुंगांत ' लेखक ' मिळाला नाहीं

१९१४ सालीं मंडाले तुरुंगांतून लोकमान्य परत आल्यावर एके दिवशीं लिहिण्याच्या कामाचे वेळीं मी त्यांना सहज म्हणालों, " एवढा ' गीता-रहस्य ' ग्रंथ स्वतः लिहितांना आपणास कोण कष्ट पडले असतील, नाहीं ? " लडिवाळपणाच्या मोकळ्या मनःस्थितींत ते म्हणाले, " होय, अगदीं खरें; तथापि माझे प्रकृतीस तेथील हवापाणी सर्वस्वी प्रतिकूल असतांहि सहा वर्षांचा बंदीवास कारणी लागावा म्हणून मीं योजिलेले माझे सर्व ग्रंथ तेथेंच लिहावे अशा उमेदीनें मी तेथें लेखक मिळविण्याचा प्रयत्न केला. माझेकरितां सरकारी एक आचारी म्हणून अशिक्षित वृद्ध कैदी दिला होता. पण त्याचें काम मी करून लेखकाचें चागलें काम करील असा

कैदी देण्यांत यावा अशी माझी योजना होती. पण ती मान्य होणें अशक्य आहे असें मला निक्षून कळविण्यांत आलें. माझी योजना मान्य झाली असती तर तेथील सर्वस्वी प्रतिकूल परिस्थितींतहि 'गीता-रहस्या 'प्रमाणें माझे बाकीचे ग्रंथ मीं लिहून जनताजनार्दनाची अधिक सेवा करण्याचें पुण्य मला जोडतां आलें असतें; पण योगायोग तसा नव्हता हेंच खरें."

त्या दिव्य वाणींतून निघालेले ते उद्‌गार आजहि माझ्या कानांत दुमदुमत आहेत!

तरुण भारत
दि. २२-८-१९६४

लोकमान्य टिळकविषयक भाग २

समाप्त



साहित्यसम्राट् ती. तात्यासाहेब केळकर : ती. ताईसाहेब केळकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४००८२ वि: चरित्र
क्रमांक ८८० नों. दि. २८।।५६५

भाग ३ रा

# साहित्यसम्राट केळकर यांचें चरित्र

व

त्यांच्या आठवणी-ग्रंथांतील

श्री. बापट यांचें आत्मनिवेदन

आणि

अवांतर वृत्त-विशेष

### ती० आण्णासाहेब बापट यांनीं लिहिलेलें श्री० केळकर यांस दिलेलें मानपत्र

बोरखळ (जिल्हा सातारा) येथील आण्णा हे रहिवासी. तेथें त्यांचें घर व थोडी जमीन होती. त्यांचे वडील-मातु:श्री नेहमीं तेथें राहात. वडील मोठे टिळक भक्त असून तात्यासाहेब केळकरांचे फार चहाते होते. १९२० सालीं लोकमान्य निधन पावतांच लगेच लोकमान्यांचें स्मारक म्हणून बोरखळ येथील श्रीखल्वेश्वर मंदिरांत लोकमान्यांच्या पादुका स्थापन करण्याचा मोठा समारंभ करण्यांत आला. सातारा येथून पुष्कळ मंडळी आली होती. तेथील प्रसिद्ध पुढारी श्री. सोमण वकील (महाराष्ट्र राज्याचे विधान सभेचे माजी अध्यक्ष) यांचे अध्यक्षतेखालीं हा मोठा समारंभ झाला. त्या वेळीं पुण्याहून मुद्दाम बोलावून केवळ सत्कार करण्यासाठीं श्री तात्यासाहेब केळकर यांची योजना केली होती. सदर वेळीं बोरखळ-ग्रामस्थ मंडळींनीं श्री० केळकर यांस चांदीच्या करंडकांतून मानपत्र मोठ्या समारंभपूर्वक अर्पण केलें. हें मानपत्र ती. आण्णासाहेब बापट यांनीं लिहिलें असल्यामुळें व तें लोकमान्यांच्या पश्चात तात्यासाहेब यांस देण्यांत आलेलें **पहिलेंच मानपत्र** असल्यामुळें मुद्दाम पुढें दिलें आहे.

## देशभक्त नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर

बी. ए., एल. एल. बी., संपादक 'केसरी'

यांचे सेवेशी :—

आज आमच्या या श्रीकृष्णावेण्ण्यांच्या थडीवरील वतनदारांना व विशेषत: बोरखळ ग्रामस्थांना आपल्यासारख्या थोर गृहस्थांचें स्वागत करण्याचा अपूर्व लाभ झाल्यामुळें अत्यंत आनंद होत आहे. आपणांस आमचे घरीं पाचारून आणण्याचा मानस फार दिवसांचा होता; पण येतां येतां तो योग आज जुळून आला! राष्ट्रसूत्रधार लोकमान्य हा लोक सोडून गेले आणि आमच्या देशाला ठेंगणेपणा आला. सतत चाळीस वर्षेंपर्यंत आम्हां गरीब प्रजाजनांच्या हितासाठीं महाबलिष्ठ अशा इंग्रजसरकाराशीं मोठ्या हिंमतीनें लोकमान्य लढले; आणि सर्व गोष्टी आतां अगदीं हातघाईला

आल्या असतांना फलाविषयीं नेहमींच अनासक्त म्हणून दिवंगत झाले ! पण येथून जातांना त्यांनीं आपली माळ आपल्या अंगावर टाकिली ही गोष्ट आम्ही अत्यंत महत्त्वाची समजतों.

आपल्या ऐन पंचविशीच्या अमदानींत लोकमान्यांनीं आपल्याला आमच्या या प्रांतांतूनच पुण्यास नेलें. तेव्हांपासून सारखीं पंचवीस वर्षें आपण लोकसेवेंत घालविलीं आहेत. ही गोष्ट जितकी आपणांस तितकीच आम्हांसहि अभिमानास्पद आहेच. तरी पण, तिजवर कै. लोकमान्य महर्षींच्या पसंतीचा शिक्का पडला ही गोष्ट विशेष होय. ज्या ज्या वेळीं लोकमान्यांवर कहर गुदरला त्या त्या सर्व प्रसंगीं "केसरी" "मराठ्याची" जबाबदारी त्यांनीं आपल्यावरच टाकिली; व राजकारणांत ज्या कांहीं जोखमीच्या, जबाबदारीच्या व विश्वासाच्या जागा उत्पन्न होत त्यांवर त्यांनीं आपलीच योजना केली. स्वराज्यसंघाचे आपण सन्मान्य चिटणीस आहां व लोकशाही पक्षाचें चालकत्वहि आपणांकडेच आलें आहे. विलायतेंतील शिष्टाईच्या प्रसंगींहि लोकमान्यांनीं आपलीच निवड केली आणि तेथें गेल्यावरहि 'इंडिया' ची जोखीमदारी आपणाकडेच दिली. आणि सर्वांत महत्त्वाची बाब ही कीं, इहलोक सोडतांना आपल्या जीवितांतील जनसेवेचें सर्वस्व प्रतिपालनासाठीं आणि जोपासनेसाठीं त्यांनीं आपल्याच हवालीं केलें. पण आपल्यासंबंधीं कधीहि दृष्टीआड न करण्यासारखी व लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे प्रथम आपण आपली कर्तबगारी, पात्रता व योग्यता केवळ आपल्या आंगच्या बहुमोल गुणांनींच प्रस्थापित केली, लोकमान्यांच्या गैरहजिरींत केसरीचें केसरीत्व कायम ठेवून महाराष्ट्राची अब्रू बचावली. हें मर्म महाराष्ट्र पुरें ओळखून आहे ! आपण मोठे कुशल लेखक आहां, रसवेत्ते पंडित आहां आणि विविध विषयांच्या परिशीलनानें आपल्या बुद्धीला व अभिरुचीला पैलूदारपणा आला आहे असें आमच्यांतील अधिक जाणते लोक सांगतात. पण आम्ही जमलेली मंडळी बहुतेक खेडेगांवचीं नेणतीं माणसें आहों. आम्हांला इतक्या खोलांत जातां येत नाहीं. तरी पण कांहीं कांहीं अनुमानें आम्ही ठोकताळ्यानें बांधूं शकतों. लोकमान्यांच्या करड्या कसोटीस व तीक्ष्ण नजरेस जो पटला तोच खरोखरी आम्हांस अत्यंत वंद्य, पूज्य, आदरणीय व अनुकरणीय होय, असें आम्ही बिनघोक समजतों.

सन १९०८ सालीं सिडनहॅमी रावणी राज्यात केसरीचें आयुष्य आतां क्षणभंगुर आहे अशी सर्वांस पदोपदीं चिंता वाटत असतां ज्याप्रमाणें एखाद्या डगमगणाऱ्या पुलावरून कुशल सारथ्यानें बिनधोकपणें गाडी न्यावी, त्याप्रमाणें त्या वेळच्या अत्यंत दारुण पण परम नाजुक परिस्थितींतून "केसरी"-सह आपण महाराष्ट्रास कसें विलक्षण बुद्धिचातुर्यानें, धैर्यानें व सावधगिरीनें सुरक्षित घेऊन गेलांत हें आमच्या स्मरणांतून जाणें शक्य नाहीं.

राष्ट्राच्या आपत्कालीं निराशेच्या तिमिरांत उमेदीनें पुढील यशाचें बीज पेरणारा मोठा आशावान खरा. १९०८ सालीं लोकमान्यांना सरकारानें धरून नेल्यावर त्यांच्या गर्जनांचे नुसतें पडसादच चहूंकडे उठत होते; अशा कर्तव्यशून्य काळांत लोकमान्यांच्या पुढील कामगिरीचा मार्ग आमच्या जिल्ह्यांतील एका प्रसिद्ध सद्गृहस्थाच्या मदतीनें आपणच बिनबोभाट व निमूटपणें तयार केला ही आपली अमूल्य देशसेवा महाराष्ट्र विसरणें अशक्य आहे. लोकमान्यांनीं परत येतांच दोन झापांतच कॉंग्रेस कबजांत घेतली व राजकीय वातावरण स्वराज्यास अनुकूल करून घेतलें हें खरें; पण आधींचा आपला सेतुबंध त्यांच्या लक्षांत आल्यावांचून राहिला असेल काय?

आपल्या भिडस्त व विनयशील वृत्तीनें आणि शांत व सहनशील स्वभावानें आणि निश्चल कर्तव्यनिष्ठेनें आपल्या विद्येस आणि जनसेवाव्रतास अधिक शोभा येते. आपल्याला गतसालीं मुंबई प्रांतिक परिषदेचें अध्यक्षपद देण्यांत आलें व त्या प्रसंगीं आपली स्वाभिमानपर समतोल वृत्ति व कामाचा आटोप हीं महाराष्ट्राच्या नजरेस ठळकपणानें आलीं.

अशा प्रकारें विद्या, विनय, आस्था, देशभक्ति, उद्यमशीलता, समतोल-पणा आणि शांतपणा इत्यादि गुण आपले अंगीं आहेनच. व त्या सर्वांच्याहि वर लोकमान्यांसारखा कर्मयोग्याचा प्रसाद आपणास लाभला आहे; म्हणून या पुण्याईच्या बलावर आपल्या हातून या हतभाग्य देशाची सेवा अधिका-धिक होवो, दिवसेंदिवस आम्हां खेडेगांवांतील शेतकऱ्यांशीं आपला जास्त जास्त संबंध येवो, आमचे हक्क कोणते आहेत व ते आम्हीं कसे बजवावे याची शिकवण आम्हांला आपणांकडून नेहमीं लाभो, स्वराज्य मंदिराची इमारत कळसास पोहोंचविण्यास आपला हात यशस्वी होवो व तत्सिद्ध्यर्थ

आपणास आयुरारोग्य लाभो अशी त्या जगन्नियंत्यापाशीं प्रार्थना करून, आमच्या मनामध्यें आपल्याबद्दल जी आदरबुद्धि आणि कृतज्ञताबुद्धि वास करीत आहे तिचें अल्पसें बाह्य निदर्शक म्हणून आम्ही जें हें मानपत्र आपल्याला नम्रपणें अर्पण करीत आहों त्याचा आपण स्वीकार करावा, अशी आपल्या खेडवळ बंधूंची आपल्यापाशीं सप्रेम प्रार्थना आहे.

श्रीक्षेत्र बोरखळ, जिल्हा सातारा
मिति आश्विन शु० ५ शके १८४२

आपले कृपाभिलाषी,

**विनायक गणेश बापट**
**दत्तात्रय कृष्ण कुलकर्णी**
**शंकर वासुदेव आठले**
**काशीनाथ विष्णु दामले**
**शंकर बोवा गोसावी**
**आण्णा आबाजी रसाळ**
**इत्यादिक ग्रामस्थ मंडळी**

## श्री० केळकर यांचें आभारप्रदर्शक भाषण :—

वरील मानपत्र श्री. तात्यासाहेब यांस समर्पण केल्यानंतर त्यांचें झालेलें सुंदर भाषण विस्तृत व भावनापूर्ण होतें. त्यापैकीं अत्यंत संक्षेपानें येथें आवश्यक तेवढाच भाग पुढें देतो. ते म्हणाले, :—"आतां सदाशिवराव बापट हे आपल्या स्वागतपर प्रास्ताविक भाषणांत म्हणाले कीं, शिवाजी महाराजांच्या गादीवर बसलेल्या राजाराममहाराजाप्रमाणें, लोकमान्य टिळकांच्या गादीवर बसलेले केळकर यांची कारकीर्द खास यशस्वी होईल." हे त्यांचे उद्गार मला बिलकूल मान्य नाहींत. माझ्यासंबंधानें त्यांची कांहींहि भक्तिभावना असली तरी हल्लींच्या लोकशाहीच्या काळांत हे विचार व ते व्यक्त करण्यांत आलेली भाषा, शब्दरचना अगदीं अयोग्य व अप्रस्तुत आहे. तथापि खरें बोलावयाचें म्हणजे आमचे बापट हे खरे टिळक-भक्त असल्यानें टिळकांना जाऊन अजून चार महिने झाले नाहींत तोंच त्यांचें

स्मारक बापट यांनीं आपले गांवीं उभें केलें याबद्दल मी त्यांचें विशेषतः बोरखळ ग्रामस्थ मंडळीचें मनापासून अभिनंदन करितों. मला वाटतें सबंधीं देशांत लोकमान्यांचें हेंच पहिलें स्मारक असेल. म्हणून त्याबद्दल कौतुक वाटतें व पुन्हां बोरखळकर मंडळींस धन्यवाद देतों !

## श्री. केळकर यांचे विरुद्ध उठलेलें वादळ व तें शमविण्याचा झालेला प्रयत्न

(लोकमान्य, मुंबई, दि० ३–१०–१९२४ वरून)

श्री. केळकर यांचा खुलासा : अर्थात त्यांचा अभिजात प्रांजलपणा !

लेखक : **सदाशिव विनायक बापट**

(१) विचारें मना तूंचि शोधोनि पाहे।
(२) खरें शोधिल्यावीण बोलों नको हो।

—श्रीसमर्थ

गेल्या श्रीगणपत्युत्सवांत गायकवाडवाड्यांत झालेल्या श्री. भा. ब. भोपटकर यांच्या व्याख्यानासंबंधानें आजच्या केसरींत श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या सहीनिशीं जाहीर खुलासा प्रसिद्ध केल्यापासून येथील विविध व विशिष्ट मतांच्या अभिमान्यांकडून आपल्या दृष्टीनें त्यांजवर खासगी रीतीनें बहुविध प्रकारें अध्यारोप करण्यांत येत असल्याचें कानीं आल्यावरून हें पत्र केवळ मुद्दाम लिहीत आहें.

श्री. तात्यासाहेब केळकर यांचा हा खुलासा कांहींना आत्माघातकीपणाचा वाटतो, तर कांहींना त्यांतून आत्मोद्धार दिसतो. कित्येक त्यांवर मुत्सद्दीपणाचा छाप मारतात, तर दुसरे कित्येक तो भित्रेपणाचा परिणाम लेखतात. कांहीं त्यांजकडे मतलबी दृष्टीने पाहतात, तर कांहीं त्यांस सत्त्वबुद्धीनें न्याहाळतात. सदरहू खुलाशानें कित्येकांच्या कमरा मोडल्याशा दिसतात तर कांहींच्या जिभाच छाटलेल्या पाहावयास सांपडतात ! तात्पर्य, जो तो आपापल्या दृष्टीनें—कोत्या दृष्टीनें—या खुलाशाचा अर्थ लावीत आहे व

म्हणूनच मला अतिशय खेद होतो. कारण, उणी पुरीं दोन तपें श्री. तात्यासाहेब केळकर महाराष्ट्राच्या राजकीय आखाड्यांत उभे असतां, त्यांचेविषयीं कोणीहि आपल्या मनाची अशी फसगत करून घेणें हें क्षणभर जरी त्यास सोयीचें व पथ्याचें असलें तरी तें न्यायदेवतेस मंजूर होणें शक्य नाहीं. प्रसिद्ध झालेल्या श्री. तात्यासाहेबांच्या खुलाशांतील दुखविल्या गेलेल्या जनताजनार्दनाची त्यांनीं मागितलेली "अंतःकरणपूर्वक माफी" ही निर्लेप, निरपेक्ष व निर्व्याज असून ती शुद्ध स्वरूपी—स्वयंभू कशी आहे याचें प्रत्यंतर हवेंच असल्यास पुढील गोष्टींत तें पाहावयास सांपडेल व त्यावरून त्यांच्या मनाची ठेवणहि लक्षांत येईल.

सन १९१२ सालीं पुणें येथील वसंत व्याख्यानमालेचा समारोप ता. ८ जून रोजीं कै. गोविंद वासुदेव कानिटकर यांचे अध्येक्षतेखालीं श्री. तात्यासाहेबांनीं केला. सदरहू समारोपाच्या भाषणांत त्यांनीं प्रत्येक व्याख्यात्यास कांहीं एक विशिष्ट विशेषण लावून त्याचा उल्लेख केला होता. ता. १४ जूनचे ज्ञानप्रकाशांत 'मालेचा हितचिंतक' या सहीनें 'वसंत व्याख्यानमालें'तील वक्ते व 'नरसोपंतांचें शेलापागोटें' या मथळ्याखालीं एक पत्र प्रसिद्ध झालें. सदर पत्रांत लेखकानें रा. केळकर यांच्या सदर कृत्याबद्दल नापसंती दर्शवून शेवटीं "आपल्या समारोपांत रा. केळकर आपल्या हातून घडलेल्या गुन्ह्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित करितात किंवा, मीं जें कांहीं बोललों तें सद्हेतूनेंच बोललों, त्यांत कोणत्याही वक्त्याबद्दल माझा खासगी द्वेष नव्हता ही कोटी लढवितात तें पाहावें" असें म्हटलें होतें ! सदरहू ज्ञानप्रकाशाचा अंक प्रस्तुत लेखकानें श्री . तात्यासाहेबांच्या मुद्दाम नजरेस आणून त्यावर त्यानें आपलेंहि मत नम्रपणें व विनयपूर्वक दर्शविलें होतें. सदरहू गोष्टीचा विचार करण्यास व चूक लक्षांत येण्यास काय वेळ लागला असेल तेवढाच ; पण ती चूक झाली असें त्यांस विचारांतीं वाटतांच मग क्षणाचाहि विलंब न करितां त्या शुद्ध व सरळ अंतःकरणाच्या पुरुषानें तावडतोब पत्र लिहून ज्ञानप्रकाशकडे पाठविलें. तें ज्ञानप्रकाशाच्या ता. १५ माहे जून सन १९१२ च्या अंकांत पान ३ कॉलम ४ मध्यें प्रसिद्ध झालेलें पुढें देत आहे :

## वसंत व्याख्यानमालेचा समारोप

रा. रा. ज्ञानप्रकाशकर्ते यांस :

सा. न. वि. वि. यंदाच्या वसंत व्याख्यानमालेचा जो समारोप मीं केला त्यावर आक्षेप घेणारें एक पत्र आपल्या आजच्या अंकीं प्रसिद्ध झालें आहे. त्यासंबंधानें मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, मीं केलेली टीका अध्यक्षाच्या अधिकारानें केलेली नसून व्याख्यात्याच्या हक्कानें केली होती. तथापि हक्काचा वादहि गौण आहे. तशी टीका करण्यास मला हक्क असो वा नसो ; माझ्या हक्कापेक्षां वसंत व्याख्यानमाला ही मला अधिक प्रिय आहे आणि याकरितां ज्या कोणा वक्त्यास माझ्या हातून त्यांचा अपमान झाला असें वाटत असेल (असे वक्ते तेविसांत कदाचित् एक दोनच असतील) त्यांची मी माफी मागतों. एवढ्यानेंहि जर कोणाचें समाधान होण्यासारखें नसेल तर, पुढील सालीं मी मालेंतील एक व्याख्याता म्हणून बोलेनच व समारोपाचें काम त्या गृहस्थांपैकीं वाटेल त्याकडे द्यावें म्हणजे त्यांना मजवर टीका करण्यास योग्य संधि मिळेल. हीहि गोष्ट मला मान्य आहे. कळावें.

पुणें ता. १४–६–१९१२ न. चि. केळकर.

सर्व मतांच्या सभ्य लोकांनो बोला ! बारा वर्षापूर्वी स्वतःची चूक विरुद्ध पक्षाच्या पत्रानें व आपल्या हाताखालच्या नोकरानें लक्षांत आणून देतांच जो पुरुष आनंदानें ताबडतोब माफी मागण्यास सज्ज होतो तो काय परप्रेरित रागालोभाच्या आंचीनें कीं, आपल्या स्वभावसिद्ध अन्तःस्फूर्तीनें ? केळकरांच्या अंगच्या सद्गुणांपैकीं प्रांजलपणा हाच विशेष गुण होय असें महात्माजी नेहमीं म्हणत असतात, तें उगाच नव्हे. शिवाय विशेष मुद्दा लक्षांत ठेवावयाचा तो हा कीं, भोपटकरांच्या निषेधार्थ पुण्यास जी खारट तुरट सभा झाली ती ता. २५ रोजीं व श्री. तात्यासाहेब यांचें सिमल्याचें ‘ खुलाशाचे पत्र ’ ता. २३ चें यावरून गदगदा झाड हालविल्याशिवायच कर्तव्यबुद्धीची क्षमा सुमनें आपोआप खालीं पडलेलीं आहेत हें आज नाहीं उद्यां, कृतघ्न मनासहि पटल्याखेरीज खास राहणार नाहीं अशी मला उमेद आहे.

[वरील पत्राचे बाबतींत ती० आण्णांच्या कांहीं स्नेह्यांनीं त्यांस आपले अभिप्राय कळविले; त्यांपैकीं फक्त चार थोर गृहस्थांचे अभिप्राय खालीं देतों.]

पत्र (१)

"For God & People"
L. B. BHOPATKAR,
M. A., LL. B.,
High Court Pleader.

Sadashiv Peth,
POONA CITY.
Date 4–10–24.

श्री. सदाशिवराव बापट यांसी

कृ. सा. न. वि. वि. मी कालच लोकमान्यांतील आपला लेख वाचला, व तो मला फारच पसंत पडला. असाच लेख यावयास पाहिजे होता. क. लो. हे वि.

आपला मित्र
**आण्णासाहेब भोपटकर**

पत्र (२)

श्री

पुणें;
ता. ४–१०–२४.

श्री. आण्णा बापट यांसी

प्रेमपूर्वक सा. न. वि. वि.

लोकमान्यांतील आपलें पत्र वाचलें. मला खरोखरच फार आवडलें. चांगलें आहे. केसरींत खुलासा प्रसिद्ध झाल्याबरोबरच 'तात्यांनीं' फार उत्तम गोष्ट केली. असें मत प्रो. करमरकर वगैरे माझ्या स्नेह्यांचे तोंडून सहज स्फूर्तीनें निघालेलें मीं ऐकिलें आहे मवाळ, कट्टर व ब्राह्मणेतर या सर्वांच्या हातीं कोलीत मिळालेलें होतें तें तात्यांनीं काढून घेतलें हें चांगलें केलें, असेंच सर्व समंजस लोक म्हणतील. इज्जतीच्या भलत्याच कल्पनेला तात्या बळी पडले नाहींत हेंच चांगलें झालें. अद्याप हितशत्रू त्याचा फायदा घेण्याचा प्रयत्न करीत आहेत पण त्यांत राम राहिला नाहीं.

आपला
**त्र्यंबक भिकाजी हर्डीकर**
**(माजी प्राध्यापक, सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें)**

पत्र (३)

पुणें ३३३ सदाशिव पेठ,
ता. ४–१०–१९२४

मित्र श्री. सदुभाऊ बापट यांसी
सा. न. वि. वि.

अजून माझे डोळे नीट नाहींत म्हणून पत्र दुसऱ्याकडून लिहीत आहे. तुम्हीं म्हणतां तें अगदीं खरें आहे. तात्यासाहेब जात्याच प्रांजल आहेत या तुमच्या लिहिण्यानें सुद्धां वांकडे लोक सिधे लिहावयास लागतील असें वाटत नाहीं. कोणीकडून तरी तात्यांना झोडपणें हेंच त्यांना हवें होतें, पण आपल्या तर्फेच्या माणसानें गप्प बसणें व आत्मसंरक्षणार्थ तात्यांनाच बोलावयास लावणें हें गैर झालें असतें. या दृष्टीनें पाहतां त्यांची कड घेऊन कोणीतरी लिहावयास पाहिजे होतें. तें तुम्हीं लिहिलें. हें फार चांगलें झालें. तुमचे मी मनापासून अभिनंदन करितों. कळावें ही विनंती.

आपला मित्र
(सही) श्रीपाद महादेव माटे
(प्रसिद्ध साहित्यिक व प्राध्यापक)

पत्र (४)
श्रीशंकर

आश्विन शु. ७।४६
पुणें, ता. ५–१०–२४

रा. रा. सदाशिवराव बापट, मित्राचे सेवेशीं
कृतानेक सादर साष्टांग नमस्कार विनंति विशेष

आपलें छापील पत्र मी परवां लायब्ररींत 'लोकमान्यांत' आलेलें मुद्दाम वाचलें. तेव्हां माझा ग्रह कांहीं अनुकूल झाला नाहीं. परंतु आतां फिरून लक्षपूर्वक तें मुद्दाम वाचलें. त्यावरून आपण लिहिलें तें बरें लिहिलें. चांगलें लिहिलें, योग्य कर्तव्य केलें. तुमच्या कृतज्ञताबुद्धीस हें धरून झालें असा माझा अभिप्राय झाला आहे. लायब्ररींत प्रथम तें पत्र वाचलें तेव्हां कशाला बिचारे सदाशिवराव या फंदांत पडले असें वाटलें होतें. पण तें तुमचा स्वभाव लक्षांत घेऊन वाटलें इतकेंच. निरंतर लोभ ठेवा ही विनंति.

आपला
शंकर गणेश लवाटे
(सुप्रसिद्ध मद्यपान निषेधक; पुणें सार्वजनिक सभेचे माजी चिटणीस)

# साहित्यसम्राट्
# केळकर यांचें चरित्र

(लेखक—आठवणीकार, सदाशिव विनायक बापट)

[सन १९३२ सालीं श्री. नरसिंह चिंतामण तथा तात्यासाहेब केळकर यांस ६१वें वर्ष लागलें. त्या वाढदिवसानिमित्त स्थापन झालेल्या 'केळकर वाढदिवस मंडळा 'नें त्यांस मोठ्या समारंभपूर्वक अर्पण केलेल्या ' केळकर ' या ग्रंथांत ती० आण्णासाहेब बापट यांनीं तात्यासाहेब यांचें विस्तृत चरित्र लिहिलें आहे. तें सुमारें पाऊणशें पानांचें आहे. केवळ स्थल संकोचास्तव त्यापैकीं निम्मे म्हणजे सन १९२० पर्यंतचें चरित्र पुढें दिलें आहे.]

केळकर मंडळी ही ऋग्वेदी आश्वलायन सूत्राची शाकलशाखेची कोंकणस्थ मंडळी आहेत. खुद्द केळकरांच्या शाखेचे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यांत ढोकमळें या गांवीं राहात असत असा दाखला मिळतो. तसेंच केळकरांना उपलब्ध झालेल्या घरच्या ऐतिहासिक कागदपत्रांवरून असें समजतें कीं, त्यांचे पूर्वज सुमारें ३०० वर्षांपूर्वीं ढोकमळचाहून देवगड तालुक्यांतील वानिवडें या गांवीं येऊन वसाहत करून राहिले. हा गांव देवगड खाडीच्या दोन प्रवाहांमध्यें खालीं खाडीकांठापासून वर डोंगर-माथ्यावर हळूहळू हल्लीं वसलेला आहे. पण केळकरांचे पूर्वज या गांवीं आले त्या वेळीं गांवची मुख्य वस्ती डोंगरमाथ्यावर सपाट मैदानांत गांव-देवीच्या आसपास होती. केळकर घराण्यापैकीं प्रथम एकच तरुण मनुष्य या गांवीं येऊन तेथील ग्रामस्थ रा० घैसास यांच्या घरीं उतरला. या घरंदाज गृहस्थाला फक्त एक मुलगी होती. व हा पाहुणा संभावित, सुस्वरूप व तरुण असा पाहून या गृहस्थाला अशी इच्छा उत्पन्न झाली कीं, त्याला आपली मुलगी देऊन घरजांवई करून घ्यावा. पण आणखी इतर कांहीं गांवें पाहिल्याशिवाय पक्की वस्ती करण्याचा पाहुण्याचा बेत नसल्यानें तो

नकार देऊन पहांटे उठून गांव सोडून निघाला तों गांवच्या सरहद्दीवर त्याला फुरसें चावलें. म्हणून मुक्कामाच्या घरीं परत आला. घरधन्यानें त्याला देवीचें नांव घेऊन अंगारा लावला, व चार दिवसांनीं तो बरा झाला. अर्थात् ग्रामदेवतेनेंच आपल्याला हा गांव सोडूं नको अशी आज्ञा केली असें समजून पाहुणा घरजांवई होऊन राहण्यास कबूल झाला.

तेथून पुढें वंशविस्तार याच गांवीं झाला. क्रमाक्रमानें त्याला गांवचें जोशीपण मिळालें व महाजनकीचा म्हणजे सभेंत गंध प्रथम लावण्याचा हक्क मिळाला. पुढें गांवचे वतनदार मराठे जातीचे, धाडी धुरी मिराशी वगैरे आडनांवांचे लोक होते. त्यांनीं डोंगराखालीं खाडीच्या कांठची दलदलीची पुष्कळशी जमीन शेतीला देऊं केली. पुढील दोन पिढ्यांत घराण्यांत कर्ते पुरुष निघाल्यानें त्यांनीं या दलदलीच्या बऱ्याचशा भागांतील 'तिवरी' नांवाचीं खारट पाण्यांत उगवणारीं झाडें पार तोडून टाकून जमीन साफ केली, डोंगरचे दगड काढून आणून व खाडींतील गुळी माती घेऊन पक्के गडगे बांधले, आणि पाणी आंत-बाहेर घेण्याची कायमची व्यवस्था करून दलदलीची चांगली जमीन शेतजमीन बनविली. या पराक्रमावरून केळकर मंडळींना 'तिवरेकर' किंवा 'तेवरीकर' असेंहि नांव पडलें. हें नांव हल्लीं फक्त आठवणींत आहे, प्रचारांत नाहीं व त्याला अनुसरूनच कीं काय ही खाजणाची शेतजमीनहि, लोकांनीं बांधबंदिस्थी नीट न ठेवल्यामुळें, पडीत होऊन तेथें पुन्हां तेवरीचीं झाडें उगवूं लागलीं आहेत.

दीडशें वर्षांपूर्वीं हा गांव चांगला समृद्ध होता; व अवघ्या ७५ वर्षांपूर्वीं केळकरांच्या वरच्या तिसऱ्या पिढीला घर भरलेलें व नांदतें असून सकाळच्या न्याहारीलाच घरचें ४०।५० मनुष्य बसत असे असें सांगतात. केळकरांनीं स्वत: आपले सख्खे आजे व दोनहि चुलत आजे पाहिले आहेत. शेती पाहिली आहे. घरीं गुरांनीं गोठा भरलेला पाहिला आहे. गडी-माणसें पाहिलीं आहेत. परंतु या तिसऱ्या पिढीलाच शेतीचें उत्पन्न अपुरें पडल्याचें भासूं लागलें, आणि या तिघां आजांपैकीं केळकरांचे सख्खे आजे देशावर येऊन मुलाला मिरजेस नोकरीकरितां ठेवून परत गेले; दुसरे चुलत आजे

हे मात्र मरेपर्यंत कोंकणांतच राहिले. केळकरांची मातोश्री सुमारें २० वर्षांची होईपर्यंत कोंकणांत असे. ती दूरच्या शेतांवर घरच्या पुरुष-मंडळींना दशम्या नेऊन पोंचवी व येतांना गुरांकरितां चारा कापून स्वतः घेऊन येई ! केळकरांच्या मातोश्रीचे वडीलहि शेतकरीच होते. ते प्रथम वानिवड्या-जवळ खाडीपलीकडील मोडें या गांवीं राहात. पण तेथून ते पुढें बावडे-घाटांकडे गडमठ या एका इनामी गांवीं पुष्कळशी जमीन खंडानें घेऊन शेती करीत राहिले. केळकर हे इंग्रजी तिसऱ्या–चवथ्या इयत्तेंत असेपर्यंत जाणतेपणीं त्यांच्या दोन तीन खेपा कोंकणांत झाल्या आहेत. आणि या दोन्ही घरच्या आज्यांबरोबर लडिवाळपणानें ते नांगरावर बसले आहेत व त्यांनीं आपल्या हातानें वायंगणाचें शिपणेंहि केलेलें आहे.

या आधारावर केळकर स्वतःला शेतकरी म्हणतात, व १९१९सालीं या आपल्या हक्काचा उपयोग त्यांनीं निवडणुकीच्या एका सभेंतील फड मारून नेण्यास केला. त्यासालीं विठ्ठल रामजी शिंदे व केळकर पुणें शहरा-तर्फे कायदेकौन्सिलच्या निवडणुकीला उभे होते. भवानी पेठेंत सभा झाली. खासेराव जाधव अध्यक्ष होते. प्रथम विठ्ठलराव शिंदे बोलायला उभे राहिले व म्हणाले कीं, " मी जातिवंत मराठा आहे." माझा बाप शेतकरी होता. ती वेळ ब्राह्मणेतर चळवळीची असल्यामुळें जमलेल्या मराठे मंडळीला शिंदे यांचें बोलणें पटून त्यांनीं टाळ्या वाजविल्या. पुढें केळकर बोलायला उभे राहिले व प्रथमच म्हणाले कीं, "शिंदे यांनीं सांगितलेल्या दोन्ही मुद्द्यां-वर मीच अधिक सरस ठरतो, तेव्हां मलाच निवडून द्या. कारण शिंदे यांचा बाप शेतकरी होता. पण माझे दोन्ही घरचे आजे शेतकरी होते व मी स्वत: नांगरकुळवावर बसून चाबूक उडविला आहे. तेव्हां शिंदे यांच्यापेक्षां माझ्या घराण्यांत शेतकरीपणा अधिक जुना आहे कीं नाहीं ? आतां शिंदे हे जातिवंत मराठे पुढारी म्हणवितात, पण या दिवसांत जातीला महत्त्व कोण देतो ? जातिवंत मराठे म्हणविणारापेक्षां स्वतःला मुद्दाम आवडीनें 'मराठा' म्हणवून घेणाराचा अभिमान अधिक नाहीं काय ? तसा मी आहें. म्हणजे ज्या पत्राचा मी संपादक आहें त्या पत्राचें नांवच 'मराठा' आहे. ज्यांनीं मूळ 'मराठा' पत्र काढलें त्यांना त्याचें नांव 'ब्राह्मण' असें ठेवतां आलें

नसतें काय? पण तसें न करतां त्यांनीं 'मराठा' हें नांव मुद्दाम ठेवलें. शिंदे हे जन्मानें मराठे याचा अर्थ त्यांचा नाइलाज आहे. आणि आमच्या 'मराठा' पत्राचें नांव मुद्दाम मराठ्यांच्या अभिमानानें ठेवलेलें आहे. तेव्हां या दोन मुद्द्यांवर कोणाला निवडून देणार तें सांगा!"

असो. सांगण्याचें तात्पर्य इतकेंच कीं, केळकरांचा व कोंकणचा संबंध लावालावीचा नाहीं. अजूनहि वानिवडें गांवीं त्यांच्या घराण्याचें लहानसें घर आहे. थोडीशी कां होईना, शेतजमीन आहे. त्यांच्या पूर्वजांनीं श्रमानें बांधून आणलेल्या गोड्या पाण्याच्या पाटाचा हक्क आहे. याशिवाय एकंदरीनें कोंकणची हवा, निसर्गशोभा, तेथील जांभळ्या दगडांतील गोड पाणी, हिंडण्या-फिरण्याला चढउताराची मुबलक जागा, व सर्वांत विशेष म्हणजे बिन-कपड्यानें म्हणजे जरूर तर नुसता एखादा पंचा लावून घेऊन मोकळ्या अंगानें हिंडण्याफिरण्याची केळकरांची आवडती संवय—या सर्व गरजा व हौशी भागविणारें असें कोंकण असल्यामुळें त्यांना तें देशापेक्षां प्रिय वाटतें. आणि एखादे वेळीं त्यांच्या बोलण्यावरून असेंहि दिसतें कीं, खरोखरीच विश्रांति घेण्याची वेळ आली तर वर्षांतून ४।५ महिने ते कोकणांत राहण्यास जातीलहि. कोंकणच्या नुसत्या कल्पनेनेंहि त्यांना खरा आनंद वाटतो.

केळकरांचे सख्खे आजे हे सर्व भावांत वडील. म्हणून पुढील पिढीच्या प्रगतीचा विचार करण्याची जबाबदारी त्यांच्यावरच पडली. केळकरांचे सख्खे आजे हे जसे तिघा भावांत वडील, तसेंच त्यांच्या या आजांच्या तिघां मुलांत केळकरांचे वडील चिंतोपंत हेच सर्वांत वडील बंधु होत. तेव्हां ओघानें त्यांच्या-वरच देशावर येण्याची प्रथम पाळी आली. आपल्या वयाच्या १२ व्या वर्षीं आपल्या वडिलांबरोबर बावडा घाट चढून पायानें प्रवास करीत ते मिरजे-पर्यंत आले. दर तीन कोस जमीन चालली म्हणजे पाय दुमडून घेऊन त्यावर बसून ते हलके करावे, व कोठें तरी झाडाखालीं बसून भात शिजवून खावा, असें करीत त्यांनीं ७५ कोसांची मजल मारली. मिरजेस या वेळीं भिडे या नांवाचे एक गृहस्थ राहात होते. त्यांचें गांव देवगडानजीक जामसंडे हें असल्यामुळें त्यांची व केळकरांच्या आजाची ओळख होती. या भिडे घराण्या-पैकीं खुद्द मिरजकर संस्थानिक पटवर्धन यांचे घरीं एक मुलगी दिली होती.

अर्थात् भिडे यांची शिफारस थोरले बाळासाहेब मिरजकर यांजकडे चालून केळकर यांचे वडील चिंतोपंत यांना किल्ल्यांतील पागेंत तीन रुपये पगाराची नोकरी मिळून व वाड्यांतील पंक्तीला जेवण अशी तरतूद झाली. या नोकरी-वर असतांनाच त्यांनीं अक्षर, गणित यांची तयारी केली. आणि श्रीमंतांना रोज त्यांच्या आवडत्या फुलांचा एक पुडा पूजेच्या वेळीं नेऊन देऊन कृपा संपादून पांच रुपये पगारावर कारकूनफडांत कायमची नोकरी मिळविली. तेथून पुढें कारकून, स्वारीकारकून, फडणीस म्हणजे अव्वल कारकून, फौजदार व शेवटीं खाजगी कारभारी या हुद्द्यांपर्यंत बढती मिळविली; व अखेर खाजगी कारभारी असतांच पेन्शन घेतलें. त्यांची कांहीं नोकरी कारकून, फडणीस व मामलेदार म्हणून मिरज इलाख्यांतील मोडलिंब नांवाच्या तालुक्यास (पंढरपुरापासून आठ कोस) झाली. तेथेंच केळकरांचा जन्म श. १७९४ श्रावण व॥ ६ म्हणजे ता. २४ ऑगस्ट १८७२ रोजीं झाला.

तात्यासाहेब केळकर यांचें शिक्षणाला मिरजेस प्रथम सुरुवात झाली. मराठी पांच इयत्तांचें शिक्षण पुरें करून, व इंग्रजी पहिली इयत्ता घरींच करून ते १८८२ सालीं इंग्रजी दुसऱ्या इयत्तेंत प्रविष्ट झाले. इंग्रजी चौथ्या इयत्तेपासून सातव्या इयत्तेपर्यंत वर्गांत त्यांचा बहुधा नंबर पहिला क्वचित् दुसरा असा असे, व आपल्या वडील दोघां भावांप्रमाणें हायस्कुलांतील वरच्या सर्व वर्गांत त्यांना तीन रुपयांची स्कॉलरशिप मिळे. हायस्कुलांत त्यांचा गणित विषय नेहमीं कच्चा असे. तसेंच व्याकरणविषयाचीं ते उपेक्षा करीत. परंतु दोन्ही भाषांचा वाङ्मय-विभाग, इतिहास, निबंध-लेखन, भाषांतर या विषयांत गणितांत कमी पडलेल्या मार्कांची भरती होऊन, त्यांचा नंबर वर राही. विशेष सांगण्यासारखे शिक्षक म्हटले म्हणजे कै. वासुदेव-शास्त्री खरे हे होत. १८८२ च्या सुमारास शास्त्रीबुवा पुणें येथील न्यू इंग्लिश स्कूलची नोकरी सोडून मिरजेस हायस्कुलांत संस्कृत शिक्षक म्हणून आले, व अखेर त्याच जागेवर पेन्शन घेऊन इतिहास-संशोधक म्हणून मोठा नांवलौकिक मिळवून, इतिहास-लेखनाचें बहुमोल काम करून, मिरजेस ते निवर्तले. शास्त्रीबोवांच्या हाताखालून त्यांच्या पसंतीस उतरलेले जे अनेक विद्यार्थी होऊन गेले, त्यांत केळकर हे एक होते. खरेशास्त्री यांच्या

हातचा छड्यांचा मार जसा केळकरांनीं पुष्कळ खाल्ला, त्याप्रमाणेंच त्यांचेपासून वाङमयप्रेम व रसिकता यांच्या अभिरुचीचे पहिले धडेहि घेतले. केळकर यांनीं खाजगी रीतीनें अमरकोश वगैरे पाठ केला होता. आणि पाठांतरानें संस्कृत श्लोकांच्या भेंड्या लावण्यांत येत तेव्हां बहुधा एका पक्षाचे पुढारी केळकर असत. इंग्रजी सहाव्या किंवा सातव्या इयत्तेंत 'राम-वनवास' या विषयावर संस्कृतांत कविता करण्याकरितां शास्त्रीबोवांनीं एक लहानसें बक्षीस ठेवलें होतें तें केळकर यांना मिळालें; व त्यावर शास्त्रीबोवांनीं असा शेरा लिहिला कीं, "संस्कृत विषय घेतलेल्या अर्थात् मध्यमप्रतीच्या बी. ए. ला देखील असे चांगले श्लोक करतां येणार नाहींत." शास्त्रीबोवांचे घरीं नेहमीं जावें यावें, ते कविता करीत त्या वाचाव्या असा केळकर यांचा परिपाठ असे; व उलट नवीन कांहीं कविता वगैरे केली तर ती त्यांजकडून आवर्जून केळकरांनाच आधीं वाचावयास मिळे. राजाराम कॉलेजनें १८८७ सालीं नवीन नाटकाकरतां बक्षीस लावलें त्याकरतां खरेशास्त्री यांनीं 'गुणोत्कर्ष' हें नाटक लिहिलें. तें पाठविण्यापूर्वीं ठराविक वेळेंत तें वाचून होतें कीं नाहीं या व इतरहि दृष्टींनीं तें वाचण्याचा मान शास्त्रीबोवांनीं केळकरांनाच प्रथम दिला होता. शास्त्रीबोवांच्या नाट्यलेखनास तेथून खळ पडला, त्यानंतर त्यांनीं 'महाराष्ट्र नाटक मंडळी'करितां १९१०–११ चे सुमारास 'तारामंडळ' हें नाटक लिहिलें व त्याचें प्रथम-वाचन केळकरांच्या घरीं पुण्यास झालें. तेव्हां या गुरुशिष्यांना 'गुणोत्कर्ष' नाटकाच्या वाचनाची आठवण होऊन दोघांनाहि अत्यंत आनंद वाटला. उलट, लौकरच पुढें स्वत: केळकर यांनीं 'तोतयाचें बंड' हें नाटक लिहिलें. त्याची पहिली छापील प्रत त्यांनीं शास्त्रीबोवांना पाठविली; व शास्त्रीबोवांनीं उलट केळकरांना पत्र लिहून कळविलें. त्यांत असें लिहिलें होतें कीं, "आज जेवण झाल्यावर कुटुंबास जवळ बसवून तुमचें नाटक स्वत: वाचून कुटुंबास ऐकविलें. सर्व वाचन एकाच बैठकींत संपविलें. इतिहास विषयावर व नाटकाच्या दृष्टीनें तुम्हीं इतकें उत्तम नाटक लिहिलें हें पाहून जुन्या सगळ्या आठवणी होऊन फार आनंद झाला. आणि एक इतिहासाभ्यासी या नात्यानें तुम्हांस असें कळवितों कीं, इतिहासाच्या दृष्टीनें तुमच्या नाटकांत म्हणण्यासारखी अशी एकहि

चूक मला आढळली नाहीं, हें त्यांतल्या त्यांत माझ्या मतें विशेष प्रकारचें यश आहे. कारण इतिहास व पुराणें यावरील नाटकें, मूळचा विषय किती विकृत करतात हें तुम्हां आम्हांला आतां माहीतच आहे." काव्यनाटकादि वाङमयाप्रमाणें इतिहासाचीहि गोडी केळकरांना प्रथम खरेशास्त्री यांजपासूनच मिळाली. शेरिडनच्या 'रायव्हल्स्'चें रूपांतरित नाटक "नवरदेवाची जोडगोळी" या नांवाचें केळकरांनीं १८९४ सालीं लिहिलें, तें प्रसिद्ध करतांना खरेशास्त्री यांनाच समर्पण केलेलें आहे. आणि "मराठे व इंग्रज" या केळकरांच्या इतिहासविषयक ग्रंथाला शास्त्रीबोवांनीं विस्तृत व मार्मिक प्रस्तावना लिहिली आणि त्याच वेळीं केळकरांच्या राजकारणांतील प्रगतीच्या गुणग्राहकतेचें एक निदर्शक म्हणून ते १०० रु. भरून होमरूल-लीगचे तहाहयात सभासद झाले! केळकरांची शास्त्रीबोवांविषयीं जन्मभर कशा प्रकारची भावना व आदरबुद्धि होती, हें केसरींत त्यांच्या ऐतिहासिक लेखसंग्रहाचें वेळोवेळीं जें विस्तृत परीक्षण त्यांनीं केलें व त्यांच्या मरणोत्तर त्यांच्याविषयीं जो अत्यंत कळकळीचा लेख लिहिला त्यावरून सहज दिसून येतें. अशा रीतीनें खरेशास्त्री व केळकर यांचा प्रथम गुरुशिष्यसंबंध व नंतर स्नेहसंबंध मोठा उदाहरणीय व उल्लेखनीय असाच झाला आहे.

सन १८८८ सालीं केळकर हे मॅट्रिकची परीक्षा पास झाले. त्यांचा नंबर पुष्कळ खालीं आला होता. तथापि मिरजेच्या विद्यार्थ्यांकरतां राजाराम कॉलेजांत ठेवलेली कृ. भि. गोखले स्कॉलर्शिप त्यांना मिळाली. १८८८ ची पहिली सहामाही केळकरांनीं फर्ग्युसन कॉलेजांत काढली होती. त्या वेळच्या शिक्षकवर्गाचें वर्णन टिळकचरित्राच्या पहिल्या भागांत त्यांनीं यथार्थ केलें आहे. या वेळीं प्रो. टिळक रजेवर असल्यामुळें त्यांच्या शिकवण्याचा अनुभव केळकरांना मिळाला नाहीं. प्रो. गोखले हेच त्या वेळीं गणित विषय शिकवीत. १८८९ च्या जूनपासून १८९० अखेर केळकर कोल्हापूर येथील राजाराम कॉलेजांत विद्यार्थी होते. तेथूनच ते प्रीव्हीयस व फर्स्ट बी. ए. ची परीक्षा पास झाले. कांहीं महिन्यांपूर्वीं राजाराम कॉलेजच्या ज्युबिलीचा खास मोठा अंक काढण्यांत आला व त्यांत आपल्या वेळच्या प्रोफेसरांचें व स्थितीचें मार्मिक वर्णन केळकरांनीं केलें तेंहि वाचण्यासारखें आहे. पुण्यास डेक्कन कॉलेजांत

केळकरांचे वडील बंधु असत तेव्हांपासून त्यांनीं तें कॉलेज पाहिलेलें; व तेथील हवापाणी, सृष्टिशोभा या गोष्टी फार आवडलेल्या; पण खर्चाला पैसे नाहींत म्हणून कोल्हापुरासच त्यांना राहावें लागलें. पण तेथें सेकंड बी. ए.चा वर्ग नसल्यामुळें त्यांना डेक्कन कॉलेजांत यावेंच लागलें. मग त्या कॉलेजांत राहण्याची त्यांची हौस फिटली. प्रीव्हीयस व फर्स्ट बी. ए. या दोन्ही परीक्षांकरितां गणित विषयाचे दोन दोन पेपर्स असत. म्हणून गणित विषयांतील कच्चेपणा तेथेंहि त्यांना फार भोंवला. पण पी. ई. च्या परीक्षेंत आलजिब्राच्या पेपरमध्यें व पहिल्या बी. ए. च्या परीक्षेंत ट्रिगनॉमेट्रीच्या पेपरमध्यें अधिक मार्क मिळाल्यामुळें त्यांची सुटका झाली. सुदैव हें कीं, या विषयांत त्यांना जेमतेम मार्क मिळत. पण सुटका हटकून होई. पण जर का दैवानें असा हात दिला नसता तर घरच्या गरीबीमुळें कदाचित् त्यांचें कालेजचें शिक्षणच थांबलें असतें व पुढील आयुष्याचा क्रम कदाचित् सर्वस्वी वेगळाहि झाला असता ! आयुष्यांतील पुष्कळ प्रसंगांना अनुलक्षून ' मी दैववान् व म्हणून कांहींसा दैववादी आहे ' असें केळकर म्हणतात. त्या वेळची त्यांची पहिली आठवण गणित विषयांतील परीक्षेसंबंधी असते. संस्कृत व इंग्रजी विषयांतहि चार पेपर असले तर त्यांतल्या एखाद्याची हटकून हेळसांड करावयाची, पण इतर तीन पेपर्स-मध्यें भरतीचे मार्क सहज मिळून जावे असें घडे. पण या विषयांसंबंधीं त्यांनीं चिंता अशी केव्हांहि बाळगिली नाहीं. सेकंड बी. ए. मध्यें प्रवेश केल्याबरोबर त्यांच्या मागचा गणित विषय सुटला. तेव्हां त्यांना आपण संकटमुक्त झालों असें वाटलें.

१८९१ सालीं दुसऱ्या बी. ए. चा अभ्यास करीत असतां त्यांनीं अवांतर ग्रंथांच्या वाचनाला थोडा बहुत प्रारंभ केला. प्रिलिमिनरी परीक्षा झाल्यावर सहज एका जुन्या पुस्तकविक्याकडून पांच रुपयांत त्यांना स्कॉटच्या सर्व कादंबऱ्यांचा सेट मिळाला, तो वाचण्याचा त्यांना इतका नाद लागला कीं, आप्तस्वकीय स्नेहीमंडळींनीं त्यांना परीक्षेची आठवण करून देऊन त्यांच्या हातांतून हीं पुस्तकें काढून घेतलीं ! डेक्कन कॉलेजांतच रा. श्री. कृ. कोल्हटकर, भास्कर रामचंद्र नानल वगैरे लोकांशीं त्याचा स्नेह झाला आणि बोटिंग क्लब, क्रिकेट, संस्कृत नाटकप्रयोग, विविध विषयांची चर्चा

व गप्पागोष्टी इत्यादि प्रसंगांनीं तो दृढ झाला. कोल्हटकर व केळकर यांचा स्नेह वाङ्मय लेखनाच्या कारणानें पुढें पुष्कळच वृद्धिंगत झाला व तो कसा टिकून राहिला याचें एक निदर्शक म्हणजे कोल्हटकर यांच्या लेखांच्या ग्रंथाला केळकर यांनीं लिहिलेली प्रस्तावना हें होय. १८९२ सालीं केळकरानीं मुंबईस राहून पहिल्या एल्. एल्. बी. चा अभ्यास केला पण तेथेंहि नाटय व वाङ्मय यांच्या नादानें परीक्षेचा अभ्यास थोडा कमी पडून, आणि त्यांतून ती परीक्षा त्या वर्षीं चिमणलाल सेटलवाड व मॅकलौड यांनीं विशेष कठिण व कसोशीनें घेतल्यामुळें केळकर त्या परीक्षेंत नापास झाले. पण १८९३ सालीं घरीं राहून तीच परीक्षा त्यांनीं दिली व तींत ते पहिल्या वर्गांत आले. आणि डेक्कन कॉलेजच्या पदवीधरांपैकीं या परीक्षेंत बसलेल्या विद्यार्थ्यांत त्यांचा पहिला नंबर आल्यामुळें, खास कॉलेजचें असें ५० रुपयांचे बक्षिसहि त्यांना मिळालें. १८९४ सालीं पहिले तीन महिने सातारा येथील खाजगी शाळेत शिक्षकाची नोकरी करून पुढील सात-आठ महिन्यांत त्यांनीं दुसऱ्या एल्एल्. बी. चा अभ्यास केला व त्याच सालीं ते ती परीक्षा पास झाले. १८९५ च्या एप्रिल महिन्यांत त्यांनीं सातारा जिल्ह्यांतील वकिलीची सनद घेतली. पण तो धंदा त्यांनीं पुढे अवघे नऊ महिने केला. दरम्यान अक्कलकोट येथील मुन्सफीची जागा त्यांना मिळत होती ती त्यांनीं घेतली नाहीं; व १८९६ च्या मार्च महिन्यांत जमखंडी येथील मुन्सफीची जागा त्यांना मिळत होती व ती घेण्याच्या बेतांत ते होते; इतक्यांत लो. टिळकांनीं त्यांना आपले ॲसिस्टंट म्हणून पुण्यास बोलावण्याचा योग अगदीं अनपेक्षित रीतीनें आला. आणि केळकरांनींहि त्या संधीवर उडी घालून इतर नोकऱ्यांचा किंवा वकिलीचाहि नाद सोडून देऊन, केसरी-मराठा कचेरी व टिळकांचा लॉ क्लास यांतील असिस्टंटची नोकरी पतकरली. ता. १७ मार्च १८९६ रोजीं ते पुण्यास येऊन नोकरीवर दाखल झाले. एकाच जागेवर अशा रीतीनें अखंड सुमारें साडेछत्तीस वर्षें नोकरी व तीहि वर्तमानपत्राच्या धंद्यांत! अशासारखीं उदाहरणें हिंदुस्थानांत फारशीं मिळतील असें वाटत नाहीं. म्हणून केसरी-मराठा कचेरी व केळकर या उभयतांनाहि या

एका विशेष गोष्टीचा अभिमान वाटत असेल तर तो यथार्थ नाही असें कोण म्हणेल ?

१८९० अखेर केळकरांचे वडिलबंधु नारायणराव हे सातारा हायस्कूलमध्यें शिक्षकाच्या कायम नोकरीवर होते व या सुमारास त्यांचे वडीलहि पेन्शन घेऊन साताऱ्यास येऊन राहिले. अर्थात् केळकरहि सातारचेच रहिवासी झाले. १८९२–१८९६ हीं तीन चार वर्षें केळकरांचीं साताऱ्यास इतकीं आनंदाचीं गेलीं कीं, त्यांना अजूनहि सातारा हें आपलें घर असेंच वाटतें ! विशीबाविशीचें वय हें सहृदय माणसाला अत्यंत उल्हासाचें असतेंच पण त्यांतूनहि सातारा गांवचें हवापाणी, तेथील सृष्टिसौंदर्य, तेथील युनियन क्लबांतील आनंदी व उल्हासी सज्जन मंडळी, आणि स्थानिक वर्तमानपत्राच्या द्वारें व लिटररी क्लबाच्या द्वारें वाङमयसेवेचा प्रथम योग, इत्यादि गोष्टींमुळें केळकरांना साताऱ्याविषयीं चिरस्मरणीय प्रेम वाट होतें यांत नवल नाहीं. या चार वर्षांत त्यांनीं तेथील सभांतून निबंध वाचले. कांग्रेसहून येणाऱ्या प्रतिनिधींच्या स्वागतपर पद्यें रचलीं, व पाठ करून भाषणें म्हटलीं. क्लबांत टेनिस खेळणाऱ्या लोकांत पहिली जागा मिळवून बक्षिस घेतलें. नाटचलेखन व्यवसायाला प्रारंभ केला. बंगाली शिक्षणास प्रारंभ करून एकदोन पुस्तकांचीं भाषांतरेंहि केलीं. 'करमणूक' पत्रांत मधून मधून कविता प्रसिद्ध केल्या. पारसनीस यांनीं सुरू केलेल्या "महाराष्ट्र कोकिळ" मासिक पुस्तकांत लेख लिहिले. पारसनिसांच्या झांशीवाली राणीच्या चरित्रलेखनांत सहकारिता केली. आणि मटंगे बोवांच्या सहवासांत गायनवादनश्रवणाची हौस पुरवून घेतली. या निरनिराळ्या व्यवसायांत सातारच्या पुढारी वकिलांना केळकरांच्या अंगचें वाङमयप्रेम सहजच कळून आलें. विशेषतः त्यांनीं तेथील 'बोध सुधाकर' नामक फार जुन्या अशा वर्तमानपत्रांत इंग्रजी व मराठी लेख लिहून किंकेड प्रभृति स्थानिक अधिकाऱ्यांवर चुरचुरीत टीका केली यामुळें, तेथील एक वकील रा. गोविंदराव रानडे यांना, टिळकांनीं आपणांला एक तरुण एलएल्. बी., मदतनीस पाहिजे अशी मागणी करतांच त्यांनीं केळकरांचें नांव एकदम सुचविलें. ही गोष्ट केवळ यदृच्छेनें आगगाडीच्या एका प्रवासांत टिळक व रानडे यांच्या भेटींत सहज निघाली. आणि पुढेंहि रानडे यांनीं केळकरांना विचारणें, केळकरांनीं होय म्हणणें, रानडे यांनीं

टिळकांना तसें कळविणें, टिळकांनीं केळकरांना भेटीस बोलावणें, हें कळतांच टिळकांचे विद्यमान मदतनीस रा. वाकनीस वकील यांनीं एकदम राजीनामा देणें व टिळकांना अडचणींत घालणें या सर्व गोष्टी इतक्या अकल्पित रीतीनें घडल्या कीं, दैव हें या प्रकरणांतील सूत्रें कांहीं वेळ मुद्दाम हातीं घेऊन निकालाकरितां चाळवीत बसलें असावें अशीहि कल्पना मनाला क्षणभर पटते. कारण एरवीं सहा सहा महिने, वर्ष वर्ष घोळत पडणाऱ्या गोष्टी अवघ्या ८।१० दिवसांत निकालांत निघाव्या, व तांतडीमुळें केळकरांना टिळकांचें निमंत्रण तारेनें यावें हें कसें घडावें? या तारेपूर्वीं रानड्यांना लिहिलेल्या पत्रांत टिळकांनीं असें म्हटलें होतें कीं, केळकर हे मला पुण्यास यावयास हवेत ते केवळ एक नोकर म्हणून नव्हे. सहकारी मित्र म्हणून! कारण न जाणों, आयुष्याचा भरंवसा मला यापुढें फारसा धरतां येणार नाहीं. बरोबरीचे अनेक सहकारी मित्र अल्पायुषी ठरल्यानें टिळकांना असें वाटणें स्वाभाविक होतें. पण सुदैवानें त्यापुढें टिळक सुमारें चोवीस वर्षें जगले, इतकेंच नव्हे तर त्यांच्या चरित्रांतील बहुतेक महत्त्वाची सर्व कामगिरी या अवधींतच घडली. आणि टिळकांच्या मरणोत्तरहि त्यांच्या संस्थेचें कार्य आज बारा वर्षें यथाशक्ति केळकरांना चालवितां आलें; पण यावरून टिळकांनीं केळकरांना लिहिलेल्या पहिल्या पत्रांतील इच्छा ही केवळ इच्छा नसून अन्तःस्फूर्तीची ती एक प्रकारची भविष्यवाणीच ठरते नाहीं काय?

१८९६ सालीं व १८९७ च्या सप्टेंबरपर्यंत केळकर हे रोज लॉ क्लासचे दोन तास घेत, व मराठ्यांत लिहीत. त्याही वेळीं दुष्काळ, प्लेग वगैरेसंबंधीं गाऱ्हाणीं व चळवळी चालू असल्यामुळें टिळक हेहि स्वतः जरुरीप्रमाणें किंवा आवडीप्रमाणें 'मराठ्यांत' लेख लिहीत. परंतु १८९६ च्या ऑक्टोबरपासूनचे जरूर त्या सर्व मजकुराची भरती करून देणें व प्रुफें पाहणें हें काम केळकरांकडेच आलें होतें. केळकरांनीं या अवधींत मात्र केसरींत कांहीं लिहिलें नाहीं. दुसरे ॲसिस्टंट म्हणून रा. खाडिलकर हेहि येऊन कांहीं दिवसांनीं केसरीकडे मिळाले होते. १८९७च्या पावसाळ्यांत खटला होऊन टिळकांना शिक्षा झाली तेव्हां, नोकरीच्या नात्यानें वडील म्हणून, एल्. एल्. बी. म्हणून, व विशेषतः इंग्रजी व मराठी दोन्ही लिहूं शकतील म्हणून, आणि सरते शेवटीं त्या कठीण काळांत सरकारच्या तोंडीं दोन पत्रांकरतां निरनिराळे दोन बळी देण्यापेक्षां

एकच कोणीतरी देणें बरें असें ठरून, केळकरांनाच दोन्ही पत्रांचे संपादक टिळकांकडून नेमण्यांत आले. पुढील दीड–दोन वर्षांच्या अवधींत केसरींतील लेखनाचें काम मुख्यतः रा. खाडिलकर यांच्याकडे होतें. तथापि मराठी लेखनाची जातीची हौस असल्यामुळें, व विशेषप्रसंगीं जाहीर संपादक या अधिकारानें, केळकरांनींहि मधूनमधून केसरींत लेख लिहिले. पुढें तुरुंगांतून परत आल्यावर टिळकांनीं केसरी तेवढा आपल्या हातीं घेतला पण मराठ्याचें संपादकत्व सर्वस्वीं केळकरांवरच सोंपविलें. तें कांहीं थोडी अवधी वगळतां १९१८ पर्यंत केळकरांकडेच होतें. या १७।१८ वर्षांचे अवधींत स्वतः टिळकांनीं मराठ्यांत फारच थोडें लिहिलें. उलट, केसरीचे संपादक नसतांही केळकरांनीं १९०० ते १९०९ या अवधींत केसरींतहि अनेक लेख लिहिले, व १९१० पासून १९१८ पर्यंत फिरून केसरी व मराठा दोन्ही पत्रांचे संपादकत्व केळकरांकडेच होतें. खाडिलकर, वामनराव जोशी, आर. के. जोशी, पी. एम्. बापट, डॉ. भट व डी. व्ही. गोखले, बाबा पटवर्धन इत्यादि मंडळी मराठ्याकडे दुय्यम किंवा सहकारी संपादक या नात्यानें असत. रा. खाडिलकर हे १९०९ सालीं केसरी व मराठा दोन्ही पत्रांचे संपादक होते. पण या अवधींत त्यांनीं मराठा पत्रांत फार तर चार दोन आर्टिकलांपलीकडे कांहीं लिहिलें नसेल. उलट या सालीं केळकर मराठ्याचे जाहीर संपादक नव्हते तरी त्यांतील सर्व लेख तेच लिहीत. फिरून १९१८-१९ या दीड दोन सालांत खाडिलकर हे केसरीचे संपादक होते. १९१९ अखेर केळकर विलायतेहून परत आल्यावर १९२० च्या उन्हाळ्यांत मे च्या शेवटीं केळकरांनीं टिळकांच्या सांगण्यावरून केसरी पुन्हां हातीं घेतला. तो मध्यंतरीं एक वर्ष खेरीज करून गतवर्षी जानेवारीच्या प्रारंभीं ज्युबिलीच्या अंकापर्यंत त्यांच्याकडेच होता. त्यानंतर त्यांनीं प्रत्यक्ष डिक्लरेशन असें सोडलें. तथापि, ते संचालक म्हणून केसरीसंबंधीं सर्व व्यवस्था पाहत, आणि कारणपरत्वें केसरींत लिहीत हें वाचकांना सांगण्याचें कारण नाहीं. त्यांचा व केळकरांच्या लेखनाचा १०।२० वर्षांचा चिरपरिचय असल्यानें, एखादा विशेष लेख निश्चयपूर्वक केळकरांचाच असावा असें आतां त्यांना ओळखतां येऊं लागलें असेल असें वाटतें.

१८९६ सालीं सार्वजनिक सभेनें दुष्काळासंबंधीं चळवळ हातीं घेतली होती. ती अर्जांच्या व वर्तमानपत्री लेखांच्याच रूपाची होती. करबंदीची नव्हती. फक्त फॅमीन कोड अंमलांत आणून शेतकऱ्यांना सूट व माफी योग्य ती मिळावी असेंच सभेचें म्हणणें होतें· पूर्वी रा. ब. रानडे यांनीं ठिकठिकाणीं सभेचे एजंट वगैरे पाठवून सरकाराकडून या सभेला मान्यता मिळविली होती; पण टिळकांचा हात लागल्यामुळें तीच चळवळ सरकारनें निषिद्ध ठरविली. या चळवळींतच टिळकांनीं केळकरांना सार्वजनिक कार्यास प्रथम जुंपलें असें म्हणतां येईल. प्रो. शिवरामपंत परांजपे, खाडिलकर, वऱ्हाडचे अच्युत सीताराम साठे इत्यादिकांबरोबर, केळकर यांनींहि सातारा जिल्ह्यांत हिंडून कलेक्टर वगैरे अधिकाऱ्यांना भेटून लोकस्थिति व सरकारचा दुष्काळ निवारणाचा उद्योग यांसंबंधानें रिपोर्ट केले. सातारा जिल्ह्यांत या वेळीं विंचेस्टरसाहेब कलेक्टर होते. त्यांना या चळवळीचें अपूर्वत्व वाटलें, व केळकरांसारखे तरुण एल्एल् बी. सभेचे एजंट होऊन फिरतीवर निघतात याचेंहि कौतुक वाटून त्यांनीं केळकरांना मुद्दाम भेटीस बोलावलें. १८९६ अखेर पुण्यास प्लेग प्रथमच आला. त्या वेळीं सर्वच लोकांची पांगापांग झाली. लॉ क्लास बंद होता. यामुळें केळकर साताऱ्यास जाऊन तीन महिने राहिले. तरी मराठा पत्रांत लिहिण्याचें काम ते तेथून सर्व नियमित व बिनचूकपणें करीत. ते १८९७ च्या मार्चमध्यें पुण्यास परत आले. त्यानंतर पुढें कोण-त्याहि प्लेगमध्यें ते परगांवीं गेले नाहींत. त्या वेळीं इनॉक्युलेशनहि सर्वसंमत नव्हतें. पुण्यांत प्लेग केसेस दररोज कांहीं काळ दोनअडीचशें पर्यंतहि होत. अशा वेळीं पुण्यांत राहून आपलें नित्याचें काम करणें किती जोखमीचें व धोक्याचें असेल याची कल्पना सहजच येईल. टिळक हे तर स्वतः गांवांतच राहून, शिवाय रँडप्रभृति प्लेग अधिकाऱ्यांशीं वाटाघाट, भांडण करून, लोकांच्या तक्रारी दूर करण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनीं सार्वजनिक पण खाजगी असें एक प्लेग इस्पितळ चालविलें. या सर्व बाबतींत इंग्रजीं-तील पत्रांचे मसुदे करणें, प्लेग इस्पितळकडील देखरेखी मंडळींत राहून पडेल तें काम करणें या गोष्टी इतरांप्रमाणें केळकरांना कराव्या लागत. पण या सर्व खटापटीच्या कामीं टिळकांचा मुख्य आधार रा. वासुदेवराव जोशी हेच असत. पुढें टिळकांवर खटला झाला. नातू बंधूंना अटक झाली.

वासुदेवराव जोशीहि पुण्याबाहेर निघून गेले. तेव्हां केसरी, मराठा, चित्रशाळा वगैरेंचीं कामें अनुक्रमें संपादक व व्यवस्थापक म्हणून केळकर, धोंडोपंत विद्वांस व शंकरराव जोशी यांच्यावर येऊन पडली. या तिघांची गट्टी तेव्हांपासून कायम राहिली. टिळकांना शिक्षा झाल्यावर केळकर केसरी–मराठा पत्रांचे संपादक झाले. पण अडचणींच्या भरींत भर म्हणून आर्यभूषण छापखान्यानें केसरी–मराठा पत्रें छापण्याचें नाकारलें. तेव्हां केळकरांना इतर छापखान्यांत ती व्यवस्था करावी लागली. अशा अडचणींत व प्लेगच्या दिवसांत पुण्यांत सोल्जर लोकांची प्लेगतपासणी सुरू झाली तेव्हां पेठेनिहाय स्वयंसेवकांचीं मंडळें नेमण्यांत आली. त्यांत सदाशिव पेठेच्या वॉर्डांतील चीफ व्हॉलंटीयरचें काम केळकरांकडे होतें. व्हॉलंटीयर नेमणें, काढणें, प्लेगतपासणीचे वेळीं सोल्जर लोकांबरोबर पेठेंत हिंडणें, हेल्थकँपच्या तक्रारी अधिकाऱ्यांकडे पोंचविणें इत्यादि कामें केळकरांनीं केलीं. टिळकपंथांतील कांहीं लोकांना हीदेखील सरकाराशीं सहकारिता वाटे, व घरबसल्या ते केळकरांना हांसत. पण मनाला गोष्ट पटली म्हणजे स्वपक्षांतील लोकांच्या अप्रीतिलाहि न भितां तें करण्याच्या स्वभावाप्रमाणें केळकरांनीं प्लेग व्हॉलंटीयरचें काम केलें. या कामांत कर्नल क्रे म्हणजे जे पुढें हिन्दुस्थानचे सेनापति झाले, त्यांची केळकरांवर इतकी मर्जी बसली कीं, प्लेगच्या कारभारांत लोकहिताची कांहीं गोष्ट कर्नलसाहेबांकडून करवून घेणें झाल्यास लोक केळकरांना पुढें घालीत. पुढें एडन येथें कमांडंट असतां व लॉर्ड किचनेर यांजकडून सेनापतिपदाचा चार्ज त्यांनीं गणेशखिंडींत घेतला. तेव्हां पुण्याच्या मुक्कामांत त्यांनीं आठवण ठेवून केळकरांना भेटीस बोलावलें होतें. संपादक व मेहेनती व्हॉलंटीयर या नात्यानें पुण्याचे कमिशनर मि. वुडबर्न यांनीं केळकरांना अनेक वेळां भेटीस बोलावलें; व एकदां तर त्यांनीं केळकरांना प्रत्यक्ष असा सवाल केला कीं, "तुमची कामगिरी पाहून तुम्हांला रावबहादुर ही पदवी द्यावी अशी शिफारस मी सरकारकडे करणार आहें, त्याला तुमची संमति मिळेल का?" त्याला केळकरांनीं सांगितलें कीं, "कृपा करून ही कृपा मजवर करूं नका. पुणें म्युनिपालिटीचा नागरिक म्हणून मी प्लेग-व्हॉलंटीयरचें काम केलें. इतर पुष्कळांनीं अशींच कामें केलीं आहेत. तुम्हांला कांहीं बक्षीस या सेवेकरितां

द्यावयाचेंच असेल तर तें म्युनिसिपालिटीला द्या, व तेंहि असें कीं, म्युनिसिपालिटींत पूर्वी १० नॉमिनेटेड सभासद होते ते, तिला शिक्षा म्हणून, १८ केले. तरी ती संख्या फिरून पूर्ववत् करा." या संख्येसंबंधानें पुण्यांत जाहीर सभा झाली. तींत मुख्य भाषण केळकर यांनीं केलें व शहराच्या वतीनें सरकाराकडे अर्ज पाठविण्याचा मसुदा लिहिला.

केळकरांनीं केलेल्या कामाची जाणीव सरकाराप्रमाणें गांवांतील लोकांनाहि होती. म्हणून १८९८च्या सप्टेंबरांत पुणें शहर म्युनिसिपालिटीच्या नव्या निवडणुकी निघाल्या, तेव्हां राष्ट्रीय पक्षातर्फे आण्णासाहेब पटवर्धनांबरोबर त्यांनीं केळकर उभे केलें, व दोघेहि अगदीं खटपटीशिवाय निवडून आले. येथून पुढें केळकर म्युनिसिपालिटींत १९२२ पर्यंत (मध्यंतरीं ६ महिनेखेरीज करून) सतत लोकपक्षातर्फे निवडून येत. त्यांना या निवडणुकींत प्रतिपक्षी असले तर ते राष्ट्रीय पक्षांतील केव्हांहि नव्हते; व ते कोणत्याहि म्युनिसिपल निवडणुकींत अपेश घेऊन परत गेले नाहींत. म्युनिसिपालिटींत आणासाहेब पटवर्धन असले तरी ते सभांना क्वचितच हजर राहात; व राष्ट्रीय पक्षातर्फे त्या संस्थेंत जें कोणतेंहि काम व्हावयाचें त्याचें पुढारपण केळकरांकडेच येई. केळकरांची म्युनिसिपालिटींत प्रगति तेव्हांच झाली. दोराबजी पदमजी, तेव्हांचे म्यु० प्रेसिडेंट, यांची केळकरांवर फार मर्जी असे. आणि पुणें–ड्रेनेज–वॉटर–सप्लाय प्रश्नासंबंधानें मि० पॉटिंजर, सॅनिटरी एंजीनियर, यांच्याशीं वाद जुंपला तेव्हां, दोराबजी व केळकर व कै. रा. ब. गंगाधर अनंत भट, या तिघांनीं हें भांडण खूप लढविलें. हे तीन आपले शत्रु असें पॉटिंजर साहेबांनीं आपल्या रिपोर्टांत सरकारकडे लिहिलें पण सुरत, अहमदाबाद येथें जाऊन, ड्रेनेजचें झालेलें व होणारें काम पाहून म्युनिसिपालिटीकडे रिपोर्ट करण्यासाठीं केळकरांचीच योजना झाली आणि त्यांनीं या प्रश्नांवर केलेले रिपोर्ट कमिटीच्या दप्तरीं दाखल आहेत. ते मॅनेजिंग कमिटीचे मेंबर बहुधा नेहमीं असत. मार्केट–कमिटीचे चेअरमन सहा वर्षे होते, तेव्हां मार्केट सुधारण्यासंबंधानें त्यांनीं विस्तृत रिपोर्ट केला. १९१२ सालीं त्यांना व्हाईस प्रेसिडेंट नेमण्यांत आलें. १९१८ सालीं त्यांची निवडणूक प्रेसिडेंटच्या जागीं झाली. म्यु. अध्यक्ष निवडलेला खरा, पण तो मुळांत नॉमिनेटेड मेंबर असावयाचा. अशी एक पद्धतच यापूर्वी

पडून गेली होती. त्याप्रमाणें दोराबजी पदमजी, गोखले, नवरोजी पदमजी, कूपुस्वामी मुदलियार व हरिभाऊ आपटे हे सर्व मुळांत नॉमिनेटेड मेंबर असत. पण म्यु० अध्यक्ष निवडावयाचा तो मुळांतहि लोकनियुक्तच असावा ही पद्धत प्रथम केळकरांपासून पडली, व तें तत्त्व किंवा धोरण अजूनहि अंमलांत आहे. १९१८ सालीं केळकर म्युनिसिपालिटीसंबंधानें इतके लोकप्रिय झाले होते कीं, हरिभाऊ आपटे यांना सरकारचा व नॉमिनेटेड लोकांचा पाठिंबा असतां खुद्द त्यांच्यात्र व्यापारी स्नेह्यांना 'यंदा आम्हाला केळकरांना निवडूं द्या' असें आग्रहानें सांगून गप्प बसवावें लागलें. त्या निवडणुकीच्या दिवशीं म्यु. खालीं लोकांचा वेढाच पडलेला होता व शेवटीं लोकमत पाहून हरिभाऊ आपटे यांनींच केळकरांचें नांव अध्यक्षपदासाठीं सुचविलें. पुढच्या वर्षी केळकर विलायतेस जावयास निघणार, तेव्हां आपण असली जागा विनाकारण अडवून ठेवूं नये, म्हणून त्यांनीं अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. पुढें १९२२ सालीं तर त्यांना अध्यक्षाच्या निवडणुकींत प्रतिस्पर्धीच उभा राहूं शकला नाहीं. १९२४ नंतरहि लोक त्यांना निवडणुकीला उभे राहा असें म्हणत. पण त्यांनीं तेथपासून पुढें स्वेच्छेनें म्युनिसिपालिटींतून आपलें अंग काढून घेतलें; कारण दुसरीकडे वरिष्ठ कायदेकौन्सिलांतील काम त्यांचें अंगावर येऊन पडलें होतें. अध्यक्ष असतांना लोकांच्या तक्रारी ऐकून घेण्याचें काम ते आस्थेनें व पद्धतशीर करीत. टिळकरोड व टिळकरोड कॉलनी, यांची योजना मूर्तस्वरूपांत आणण्याचे कामीं अध्यक्ष या नात्यानें केळकरांनीं बरीच मेहनत घेतली.

या विषयावर लिहितांना एका महत्त्वाच्या गोष्टीचा उल्लेख करणें अवश्य आहे, तो रे मार्केटांत लो. टिळकांचा पुतळा उभा करण्यासंबंधीं. हा पुतळा उभा करण्याचा ठराव म्यु. नें करून, शिल्पकार वाघ यांना तें काम सांगून, मातीचा पुतळा पसंत करून कामाच्या पोटीं सहा हजार रुपयांची रक्कम देऊनहि टाकली होती. पण असहकारितेच्या काळीं मानपत्रें व पुतळे यांच्या कामीं खर्चास सरकारनें हरकत घेतली. तेव्हां पुण्याच्या पुतळ्याचे उरलेले पैसे मंजूर करणाऱ्या सभासदांवर सरकारनें दावे लाविल्यास हिस्सेरशीनें पैसे भरावे लागतील या भीतीनें कमिटी पुतळा

स्वीकारीना व उरलेले पैसे देईना. आणि पुतळा तर तयार होऊन गायकवाडवाड्यांत येऊन पडला! तेव्हां केसरी–मराठा–संस्थेचे ट्रस्टी या नात्यानें केळकरांनीं संस्थेतर्फे रु. दहा हजार म्युनिसिपालिटीस देऊं केले. तेव्हां सर्व चिंता दूर होऊन पुतळा उभारण्याचा ठराव एकमतानें पास झाला, व फार थोड्या अवधींत रात्रीचा दिवस करून बैठकीचें दगडी काम करून, चीफ ऑफिसर भागवत यांच्या साहाय्यानें अगदीं ठरल्या दिवशीं केळकरांनीं पं. मोतीलाल नेहरू यांच्या हस्तें पुतळा उभारण्याचा समारंभ किती थाटानें केला याची पुण्याच्या नागरिकांना आठवण आहेच. पुढें कोर्टांत पुतळ्याचा दावा म्युनिसिपालिटीसारखा होऊन केसरी–मराठा–ट्रस्टनें दिलेले दहा हजार रुपये ट्रस्टला परत मिळाले. खाजगी लोकांना म्युनिसिपालिटीनें मानपत्र देण्याचा जो उपक्रम केला, त्यांत पहिलीं दोन मानपत्रें दिलीं तीं टिळक–केळकर यांनाच म्हणजे ते विलायतेहून परत आल्यावर. केळकर हे फक्त एकच वेळा पुणें जिल्हा लोकलबोर्डांत होते. ते १९०४ चे सुमारास असावे. प्रथम त्यांची निवडणूक शहर म्युनिसिपालिटीतर्फे तालुका बोर्डांत होऊन त्या बोर्डातर्फे त्यांची निवडणूक जिल्हा बोर्डावर झाली होती.

१९०१ सालीं टिळक हे ताई–महाराजांच्या खटल्याच्या पाशांत सांपडले. तो पाश त्यांजवर बारा वर्षे पडला होता; व दैवाचे उलटसुलट प्रकार त्यांत पुष्कळच झाले. या प्रकरणांतील फौजदारी व दिवाणी मुकदम्याचें काम पुणें व औरंगाबाद येथें जें झालें त्यांत केळकरांचें वकीलपत्र दुय्यम वकील म्हणून किंवा घरचा वकील म्हणून नेहमीं दाखल होतें. मोठमोठे बॅरिस्टर व हायकोर्ट वकील मुख्य काम चालवीतच. पण मुकदमे चालू असतांना किरकोळ काम पुष्कळच पडे, व घरचा वकील म्हणून केळकरांवर तें सहजच सोंपविले जात असे. या कामांतील मुख्य चालक व पुरस्कर्ते यशवंतराव कुलकर्णी व दुय्यम घरगुती वकील म्हणून केळकर अशांची जोड असे टिळकांना कोर्टांत पक्षकार म्हणून नेहमीं हजर राहावें लागे. त्यांचेबरोबर, आपलीं अवांतर कामें सांभाळून केळकरहि हजर रहात. अर्ज-दरखास्ती देणें, नकला घेणें, मुदती घेण्यासाठीं न्यायाधीशास भेटणें वगैरे कामीं वकील म्हणून त्यांच्या सहीनें अर्ज दाखल होत. प्रोबेटच्या कामीं

ॲस्टन साहेबांपुढें अखेरची तक्रार टिळकांतर्फे केळकरांनीच तोंडीं सांगितली आणि पुणें येथें एक दिवस व उमरावती-औरंगाबाद येथें कांहीं दिवस साक्षीदारांच्या जबान्या घेण्याचें कामहि केळकरांना करावें लागलें. औरंगाबाद-उमरावती येथें सरकारतर्फे ॲडव्होकेट-जनरल बॅ. स्टॅंगमन हे असत. त्यांना तोंड देण्याला स्वत: टिळकच पुरें पडत. परंतु कोर्टांत आरोपी किंवा पक्षकार यानें स्पष्ट बोलण्याला किंचित् स्वाभाविक मर्यादा पडत असल्यामुळें घरगुती वकील केळकर हेहि उपयोगीं पडत. औरंगाबादेस कमिशनचे कामीं महिनेच्या महिने मुक्काम पडे. खटला चालू असतांना साक्षींचा सारांश थोडक्यांत टिपून तारेनें वर्तमानपत्रांकडे पाठविणें हें कामहि प्राय: केळकरांकडे येई. १९०४ सालीं मुंबई हायकोर्टांत मुख्य न्यायमूर्ति सर लॉरेन्स जेकिन्स यांनीं टिळकाना या प्रकरणांतील सर्व फौजदारी आरोपांतून एकदमच मुक्त केलें. तेथून या प्रकरणास टिळकांच्या तर्फे उतार लागला. हा निकाल हायकोर्टांत लागतांच त्याची निकालाची नक्कल मिळवून केळकरांनीं या खटल्यावर 'मराठा'चे सुमारें वीस कॉलम भरतील इतकें मोठें आर्टिकल अवघ्या दीड दिवसांत लिहून फिरून 'मराठा' वेळेवर काढला. तो लेख टिळकांना इतका आवडला कीं, त्यांनीं त्यांत एक शब्दाचाहि फरक न करतां तो अंक विलायतेस पाठवून मि. विल्यम डिग्बी यांजकडून त्याचें पॅंफ्लेट छापून शेंकडों प्रती तिकडे वांटल्या. ताईमहाराज प्रकरणांत टिळकांचा महत्त्वाचा वेळ एकंदर किती खर्च झाला याची गणती करणेंच कठीण, व त्या कल्पनेनें दु:खहि होतें. पण त्यांच्याबरोबर केळकरांचाहि बराच वेळ या कामाकडे खर्च झालेला आहे, व आपलें वर्तमानपत्राचें काम सांभाळून त्यांनीं हें काम केलेलें आहे. ताईमहाराज प्रकरणाची अद्भुत व मनोरंजक हकीकत केळकरकृत टिळकचरित्रांत वाचकांस भरपूर वाचावयास मिळते.

१९०४ च्या सुमारास वंगभंगाची चळवळ सुरू झाली. तींत वर्तमानपत्रांत विशेष प्रकारचे लेख लिहिणें, सभाना हजर राहणें, ठराव, स्टेटमेंटें यांचे मसुदे स्वत: करणें किंवा टिळक तोंडीं सांगत असतां हातानें ते लिहिणें, वगैरे पुष्कळ कामें केळकरांना करावीं लागत. अशा कामांत इंग्रजी भाषेचाच उपयोग मुख्यत: होई. यामुळें तें काम केळकरांवर पडे.

केसरींत कांहीं विशेष लिहावयाचें तर तें काम टिळक खाडिलकरांना सांगत. या चळवळीच्या वेळीं वक्ते म्हणून केळकर अद्यापि पुढें आलेले नव्हते. तें काम पुष्कळसें प्रो. परांजपे हे टिळकांचे मदतनीस म्हणून करीत. त्यांचें सुंदर वक्तृत्व या कामीं फार उपयोगी पडे. तथापि कॉंग्रेसच्या लगत्याची टिळकांची जी चळवळ असे तिच्यांतील काम मात्र खाडिलकर–परांजपे यांजकडे न जातां केळकरांकडे येई. कारण त्यांत मुंबईस परजातीय पुढारी किंवा साहेबलोक यांच्याशीं गांठी पडत. कॉटन, वेडर्बर्न, फेरोजशहा मेथा इत्यादिकांच्या भेटीला टिळक जात ते केळकरांनाच बरोबर घेऊन जात. इतर कोणास बरोबर नेत नसत. १९०६ सालीं सुरत येथील मुंबई प्रांतिक परिषदेंत टिळकांना हजर राहतां आलें नाहीं, तेव्हां राष्ट्रीय शिक्षणाचा प्रश्न परिषदेपुढें मांडून सर फेरोजशहा यांच्याशीं भांडण्याचें काम केळकर-प्रमुख राष्ट्रीय पक्षाकडे आलें होतें. पार्लमेंटचे सभासद केर हार्डी पुण्यास आले तेव्हां त्यांना बरोबर घेऊन राष्ट्रीय पक्षाच्या चळवळीची माहिती करून देण्याचें काम केळकरांकडे होतें. १९०७ सालीं पुण्यास हेन्री नेव्हिन्सन हे वर्तमानपत्राचे बडे बातमीदार आले. ते तर ओळखीचें पत्र प्रथम केळकरांसच घेऊन आले होते; व त्यांनींच त्यांना पुण्यास ना. गोखल्यांकडे व सिंहगडास टिळकांकडे नेऊन भेटविलें. नेव्हिन्सन यांनीं आपल्या पुस्तकांत केळकरांचें वर्णन 'A keen-tempered intellectual young man' असें केलें असून, सुरतेच्या कॉंग्रेसच्या गोंधळाचें वर्णन करतांना एका मुद्द्याबद्दल केळकरांच्या साक्षीचा आधार दिला आहे. सुरतेच्या राष्ट्रीय सभेंत गोंधळ होऊन सभा मोडल्यावर खास राष्ट्रीय पक्षाची अशी परिषद अरविंदबाबूंच्या अध्यक्षतेखालीं भरली. तिच्या सेक्रेटरीचें काम परिषदेंत व बाहेरहि केळकरांकडेच होतें; व पुढें कॉंग्रेस कंटीन्युएशन कमिटी नेमली तिच्याहि एका सेक्रेटरीचे जागीं केळकरांची नेमणूक करण्यांत आली होती.

१९०८ सालीं पुण्यास पुणें-जिल्हा-परिषद भरली. तिच्या व्यवस्थेचें काम इतरांबरोबर केळकरांकडेहि होतें. किंबहुना या वेळीं केळकर हे 'पुणें सार्वजनिक सभे'चे चिटणीस असल्यामुळें, व त्या वेळच्या परिषदांच्या व्यवस्था बहुधा सार्वजनिक सभेमार्फत होत असल्यानें, तें काम जबाबदारीनें

केळकरांनाच करावें लागे. अर्थात् केसरी-कचेरीची इतर मंडळी व टिळकांचे पुण्यांतील अनुयायी यांची मदत व सहकारिता असेच हें सांगावयास नकोच. पण सेक्रेटरीचें काम म्हटलें म्हणजे तें किती मेहनतीचें असतें, व त्यांतूनहि केळकरांसारखा अंगचोरपणा न करणारा सेक्रेटरी असल्यास त्याला तें किती करावें लागे त्याची कल्पना कोणासहि येईल.

१९०८ सालीं लो. टिळकांवर राजद्रोहाचा मोठा खटला झाला त्या-वेळीं प्रत्यक्ष खटल्यांतील काम केळकरांकडे फारसें नव्हतें. पुण्यास झडत्या वगैरे झाल्या त्या वेळीं केळकर हजर असत. मुंबईस खटल्याची हकीकत लिहून घेण्याकरितां एक शॉर्टहँड लेखक युरोपियन धंदेवाला नेमला होता. त्याजकडून सर्व रिपोर्टाचीं बाडें घेऊन जमल्यास त्याचें दैनिक पत्रक बनवून छापून वांटण्याचें काम टिळकांनीं केळकरांना मुद्दाम सांगितलें होतें. पण मुंबईतील एकाहि छापखानेवाल्यानें हें काम पत्करलें नाहीं. दरदामाचा प्रश्न नव्हता. पण छापखानेवाले सहजच भीत. रिपोर्टाचें शेंकडों रुपयां-वारी बिल झालें. तेव्हां त्या सर्व रिपोर्टांचा उपयोग करून खटल्याचें इंग्रजींत पुस्तक काढण्याची कल्पना निघाली. खटला संपताच केळकरांनीं तें काम हातीं घेतलें, व 'इंदुप्रकाश' छापखान्याच्या मदतीनें फार थोड्या वेळांत तें काम पुरें केलें. खटल्याचें बुक या दृष्टीनें तें खरोखरच नमुनेदार झालें आहे. या छापील तीन-चारशें पानांचीं प्रुफें स्वत: दोनदोन वेळ वाचून, मजकूर व्यवस्थित तयार करून देऊन, टिळकांच्या आठ दिवसांच्या भापणाचा संक्षेप संगतवार करून, प्रस्तावनेसह हें पुस्तक किती थोड्या दिवसांत निघालें, म्हणजे त्याला किती मेहेनत पडली याची साक्ष, तें पुस्तक हातांत घेऊन मनानें कोणीहि द्यावी. हें पुस्तक सरकार-जमा झालें !

पण हें काम पुरें होण्याचीच जणूं काय वाट पाहात एक खटला टपून बसला होता. कारण खरोखरच या पुस्तकाचें शेवटचें प्रूफ पाहून केळकर 'इंदुप्रकाश' प्रेसची पायरी उतरले तोंच त्यांच्यावर हायकोर्टाची नोटीस बजावण्यांत आली. हा खटला टिळकांच्या खटल्याच्या निकाला-संबंधीं केळकरांनीं लिहिलेल्या 'मराठ्यां'तील लेखाबद्दल होता. या लेखांत तापलेल्या डोक्यानें केळकरांनीं न्या. दावर यांना खूप शिव्या देऊन घेतल्या

होत्या. केळकरांच्या पद्धतीप्रमाणें शिव्या स्पष्ट नव्हत्या, पण त्यांची पद्धत सोडून लेख मात्र अत्यंत तीव्र होता. या लेखाचीं प्रुफें ना. शास्त्री व नटेशराव द्रवीड या गृहस्थांनीं स्नेहबुद्धीनें, म्हणजे केळकराच्या हातून भलतें कांहीं रागाच्या भरांत लिहून जाऊं नये अशा बुद्धीनें, वाचून पाहिलीं. पण त्यांनाहि तो लेख इतका समर्पक वाटला कीं, It would be a sacrilege to touch a word of it असा अभिप्राय शास्त्री यांनीं दिला. पण शास्त्र्यांच्या सर्टिफिकिटानें खटला थोडाच वांचतो! हायकोर्टातील न्यायमूर्तींना आपल्या बंधुवर्गाची पाठ राखलीच पाहिजे. त्याशिवाय कसें होणार! सुरुवातीसच केळकरांनीं माफी मागितली असती तर कदाचित् त्यांची सुटका दंडावर झाली असती. पण ती न मागितल्यामुळें त्यांना १२०० रु. दंड, १४ दिवसांची कैद, व माफी मागे-पर्यंत फिरून कैद अशी शिक्षा देण्यांत आली. अर्थात् केळकरांनीं दंड तर भरलाच; पण हायकोर्टाच्या हटवादाचा अर्थ असाच कीं, ही शिक्षा बिन-मुदतीची व माफी मागितल्याशिवाय कधींहि न संपणारी अशी होती म्हणून माफी न मागण्याच्या हटवादानें तुरुंगांत जन्म काढणें योग्य व शक्य नाहीं म्हणून त्यांनीं शेवटीं माफी लिहून दिली. तुरुंगांत केळकरांना साध्या कैद्याप्रमाणेंच वागविण्यांत आलें होतें. पण डोंगरीच्या जुन्या तुरुंगांतील ढेंकूण, कृमि, व ऑक्टोबरच्या उन्हाळ्यांतील मुंबईची हवा यामुळें त्यांना त्रास झाला. डोंगरीच्या तुरुंगाचें वर्णन केळकरांनीं पद्यरूपानें टिळक-चरित्राच्या पहिल्या खंडांत दिलेलें वाचकांनीं वाचलेलें असेलच.

हा खटला सुरू झाला तेव्हां शिक्षा होणार हें निश्चित वाटून 'मराठा' पत्राचें डिक्लरेशन आपल्या नांवावर चढविण्यास केळकर यांनीं खाडिलकरांना सांगितलें. त्याप्रमाणें केसरी व मराठा दोन्ही पत्रांचें डिक्लरेशन १२।१४ महिने खाडिलकरांच्या नांवावर होतें. पण या अवधींत पूर्वीं सांगितल्याप्रमाणें 'मराठ्यां'तील सर्व इंग्रजी लिखाण केळकरांनींच केलें. पण याशिवाय आयर्लंडच्या इतिहासावर ओळीनें १०।१५ लेख व इतरहि कांहीं लेख केसरींत लिहिले. १९०८ च्या एप्रिलांत सुरतेस नेमस्तांनीं भरविलेल्या कन्व्हेन्शनच्या नियमांना परप्रांतांत मान्यता किती

आहे हें पाहण्याकरितां टिळकांनीं केळकरांना उत्तर हिंदुस्थानांत पाठविलें होतें, त्या वेळीं ते लखनौ, अलाहाबाद, पाटणा, अलीगड, मुरादाबाद, दिल्ली व लाहोर येथपर्यंत हिंडून आले. लाला लजपतराय यांची व केळकरांची ओळख पुण्यासच यापूर्वीं झाली होती. पण या दौऱ्यांत ते आर्य-समाजगुरुकुलाच्या वार्षिक उत्सवाला लाला लजपतराय यांच्याबरोबर हजर होते. स्वामी श्रद्धानंद म्हणजे तेव्हांचे लाला मुनशीराम, यांची व केळकरांची प्रथम भेट तेव्हांच झाली. अलीगड येथील टाऊन हॉलांत केळकरांचें व्याख्यान झालें. त्याच्या पोलिस रिपोर्टावरून त्यांच्यावर राज-द्रोहाचा खटला भरण्याचा विचार झाला होता. पण ती गोष्ट पुढें घडून आली नाहीं. लाहोरास ते सुप्रसिद्ध सरलादेवी चौधराणी व पं. रामभुज दत्त यांचे पाहुणे होते, व लाला हरकिसनलाल यांचीहि ओळख तेव्हांच झाली. अलाहाबादेस कन्व्हेन्शनच्या नियमाप्रमाणें प्रांतिक परिषद भरली, तिचा निषेध व्हावा म्हणून केळकरांनीं एक स्टेटमेंट तयार करून अलाहाबाद येथील कांहीं वकील बॅरिस्टरांच्या सह्या त्यावर घेतल्या. पण परिषद अगदींच रोडकी होती, व अखेर त्या स्टेटमेंटचा उपयोग करण्यांत आला नाहीं. एका अर्थानें पं. मदनमोहन मालवीय यांच्या विरुद्ध ही कारवाई होती. पण पंडितजींनीं केळकरांना पाहुणे म्हणून स्नेहभावानेंच वागविलें.

१९०८ सालीं नागपूर शहरीं राष्ट्रीय पक्षाची स्वतंत्र राष्ट्रीय सभा भरवावी अशी एक कल्पना निघाली होती. तिला केळकर विरुद्ध होते. कारण त्या वेळीं ती सर्वप्रांतीय सभा होऊं शकली नसती. पण सरकारानें नोटीस काढून ती बंद केली. १९०९ सालीं कॉंग्रेस कंटिन्युएशन कमिटीचे कामा-साठीं केळकर हें चिंतामणराव वैद्य व डॉ. मुंजे यांच्याबरोबर कलकत्त्यास गेले, व 'पत्रिका' कचेरींत त्यांची राष्ट्रीय पक्षाच्या व इतरहि कांहीं पक्षांच्या पुढाऱ्यांशीं वाटाघाट झाली. त्यांत "फक्त कन्व्हेन्शन मान्य करूं नये व भरेल तेव्हां संयुक्त राष्ट्रीय सभाच भरावी; पण स्वतंत्र राष्ट्रीय पक्षाच्या म्हणून सभा भरवूं नये" असें ठरलें. १९०९ सालीं नाशकास जॅक्सनसाहेबांचा खून झाला. यामुळें १९०८ च्या जोडीला १९०९ साल

महाराष्ट्राला मोठें संकटाचें गेलें. राजकीय चळवळ बहुतेक सर्व थांबली. फक्त राष्ट्रीय पक्ष जिवंत राहिला म्हणजे मिळविली अशी स्थिति झाली. या सालीं केळकरांनीं मनांत निश्चय केला कीं, घेतलीं तर केसरी व मराठा दोन्हीं पत्रें आपल्या हातीं घ्यावीं, नुसतें 'मराठा' पत्र घेऊं नये. कारण 'मराठ्या'चा उपयोग बाहेर प्रांतांत असला तरी राष्ट्रीय पक्षाच्या मताच्या दृष्टीनें 'केसरी' हें मुखपत्र व 'मराठा' हें त्याचें अनुयायी. खाडिलकर हे केळकरांना पूर्वींप्रमाणें 'मराठा' हातीं घ्या, असें म्हणत. कारण मराठ्यांत केळकरच लिहीत असून डिक्लरेशन तेवढें खाडिलकरांचें होतें. पण राजकारणांत आपलीं मतें निश्चित व स्वतंत्र आहेत, तीं मतें राष्ट्रीय पक्षास कमीपणा आणणारीं नसून एकंदरीनें राष्ट्राच्या राजकारणाला हितकारक अशीं आहेत, आणि मराठी भाषेंतून तीं चांगल्या रीतीनें प्रतिपादन करण्याची शक्ति व पात्रता आपल्या अंगीं आहे आणि नोकरीच्या कालावधीनें सीनिऑरिटी म्हणजे वडीलकी आपली आहे, असें असतां केसरीचे संपादक आपण न राहतां नुसत्या 'मराठ्याचे' संपादक राहावें ही गोष्ट केळकरांना अपमानास्पद वाटूं लागली. त्याचप्रमाणें त्यांनीं आपली इच्छा पत्रद्वारें मंडाले येथें टिळकांना कळविली, त्यांची अनुमति मिळवून केसरी आपले हातीं घेण्याची मागणी त्यांनीं खाडिलकर यांजकडे केली व त्यांनींहि मग ती मान्य केली. पण १९१० चे प्रारंभीं केळकरांनीं केसरीचें डिक्लरेशन केल्यावर खाडिलकर यांनीं केसरी कचेरीशीं आपला संबंध तोडला; व अशा रीतीनें केसरी व मराठा या दोन्ही पत्रांचें संपादकत्व केळकरांकडे आलें.

१९१० पासून जवळजवळ १९१६ पर्यंत राजकीय चळवळ म्हणजे विधायक स्वरूपाची चळवळ थांबली होती. राष्ट्रीय सभा लिबरल पक्षाच्या हातीं राहिली, पण ती उन्हाळ्यांतील वाळवंटी नदीप्रमाणें जवळजवळ आटून गेली. फक्त क्रांतिकारक चळवळ मात्र अत्याचारांच्या रूपानें मधून मधून दर्शन देई. दिल्लींत लॉर्ड हार्डिज यांनीं प्रवेश केला, त्या वेळीं खुद्द त्यांच्यावर बॉंब फेकण्यांत आला. इतर ठिकाणींहि अत्याचार सुरू होते. चिरोलसाहेब हिंदुस्थानांत या सुमारास आले. त्यांना लंडन टाईम्सला लिहिण्याला जवळजवळ हा एकच विषय तेव्हां पुरला. महाराष्ट्रांत जॅक्सन-

खुनाच्या खटल्यानें फारच जरब बसविली होती व सावरकर यांच्या अद्‌भुतरम्य प्रकरणानें त्यांतच भर घातली होती. इतक्याहि उपर महाराष्ट्रांत सनदशीर अशी मामुली राजकीय चळवळ कांहीं चालती. पण काँग्रेसला उद्देशून राष्ट्रीय पक्षानें काय धोरण ठेवावें याविषयीं त्या पक्षांतील पुढाऱ्यांत मतभेद होता. आणि काय करावें हें टिळक निश्चितपणें सांगते; पण ते १९१४ पर्यंत तुरुंगांत होते. यामुळें वर्तमानपत्राला लिहिण्याला राजकीय विषय थोडे मिळत. या संधीचा फायदा घेऊन केळकरांनीं केसरी-मराठ्यांत विविध विषयांवर लिहून वर्तमानपत्रद्वारां लोकशिक्षण देण्याचें कार्य किती उत्तम रीत्या करतां येतें ह्याचा नमुनाच दाखविला. चित्रशाळेनें त्यांच्या लेखसंग्रहाचें सुमारें ६–७ शें पानांचें एक पुस्तक काढलें; त्यांत १९१०–१५ पर्यंतचेच लेख किती आहेत त्यावरून हें दिसून येईल. १९०९ सालच्या आयर्लंडच्या इतिहासावरील लेखमालेप्रमाणें या वेळीं त्यांनीं संस्कृत विद्येच्या पुनरुज्जीवनावर लेखमाला लिहिली. दिल्लीदरबारावर त्यांनीं जे तीन चार अग्रलेख केसरींत लिहिले त्यांची प्रत्येकानें फार वाखाणणी केली. वर्तमानपत्राच्या वाचकांना चटकदार असें कांहीं तरी लागतेंच आणि राजकारणाचा कडक मसाला नसेल तेव्हां निदान वाङ्मयाचें गोड मोहन घातलेले लेख वाचावयास मिळाले म्हणजे वाचकांना बरें वाटतें. टिळकांच्या गैरहजेरींत केसरीवरील लोकांचें लक्ष टिकविणें—विशेषतः खाडिलकरांची चटकदार लेखणी त्यांतून निघून गेल्यावर टिकविणें—ही केळकरांवर दुहेरी जबाबदारीच होती. पण आपल्या वाङ्मयसामर्थ्यावर विश्वासून त्यांनीं ती चांगली पार पाडली. ती इतकी कीं, १९१४ सालीं टिळक परत आल्यावर केसरीचा संपादक कोण राहावा हा प्रश्नच उद्भवला नाहीं. वस्तुस्थितींत तो आपोआपच जिरला !

टिळकांनीं स्वतः यापुढें केसरी हातीं घ्यावयाचा नाहीं हें निश्चित ठरविलें. खाडिलकरांनीं पांच वर्षे केसरींतून अंग काढून घेतल्यामुळें आणि केळकरांनीं तो लोकांना पसंत पडेल असा चालविल्यामुळें केसरीचें संपादकत्व आपोआप त्यांचेच हातीं राहिलें. आणि पूर्वी मराठ्याशीं जितका संबंध टिळक ठेवीत तितकाच, म्हणजे जवळजवळ नाहींच इतका, संबंध ते केसरीशीं ठेवूं लागले. पण टिळकांच्या गैरहजेरींत ज्या व्यावहारिक

राजकारणाचा लोप झाला होता तें त्यांच्या येण्यानें फिरून पायावर उभें राहिलें. आणि १९१४ सालीं तर महायुद्धच सुरू झालें यामुळें जें राजकारण सुरू झालें तें जगाला अजूनहि पुरून उरलें आहेच. पण आणखीहि किती वर्षें किंवा किती पिढ्या त्या कारणानें तें पुरून उरेल हें कोणीं सांगावें? तात्पर्य, या सर्व कारणांनीं केसरीला व केळकरांच्या संपादकत्वाला टिळकांच्या सान्निध्यानें नवें तेज चढलें. टिळक सुटण्याच्या आदल्या वर्षी नेमस्त लोकांनीं, राजकारणाचा कुजलेला डाव संपवावा व राष्ट्रीय पक्ष फिरून काँग्रेसमध्यें येईल अशी तिची घटना व्हावी याविषयीं प्रयत्न सुरु केले होते. रोडावलेली राष्ट्रीय सभा बाळग्रहाची व्यथा झालेल्या किरकिऱ्या मुलाप्रमाणें मरते कीं जगते अशा स्थितींत आली होती. टिळकांच्या बंदिवासांतील तपश्चर्येनें, नेमस्तांच्या मतें टिळकांनीं सुरतेस जें पाप केलें असेल तें, धुऊन निघालें होतें. खाडिलकरांनीं केसरी सोडल्यापासून चार वर्षें नेमस्त पक्षावर नित्य होणारें अभद्र गालिप्रदान थांबलें होतें. या सर्व कारणांनीं जहाल व मवाळ एक होण्याची संधि सर्व पाहात होते.

साताऱ्यास १९१३ सालीं ना. बेळवींच्या अध्यक्षतेखालीं प्रांतिक परिषद भरविली, तींत दोन पक्ष झाले. शिवरामपंत परांजपे, खाडिलकर वगैरेंनीं काँग्रेसवर कायमचा बहिष्कार घालावा असा पक्ष मांडला. केळकर हे काँग्रेस कंटिन्यूएशन कमिटीचे सेक्रेटरी. त्यांना हें माहीत होतें कीं, राष्ट्रीय पक्षाची अशी स्वतंत्र सभा भरविली तर ती खरी राष्ट्रीय सभाच होऊं शकत नाहीं. तेव्हां राष्ट्रीय सभेच्या समेटाविषयीं नेमस्तांनीं योग्य रीतीनें पुढें हात केला तर स्वीकारावा, मग काँग्रेसच्या घटनेंत सुधारणा सुचवाव्या त्यांत कमीपणा नाहीं. खुद्द टिळकांनाहि आज विचारतां आलें तर ते हाच सल्ला देतील, हें मत केळकरांनीं प्रतिपादलें. मोठी हमरीतुमरी झाली. पण टिळक सुटून आल्यानंतर त्यांनीं स्वतःच काँग्रेसमध्यें शिरण्याचे प्रयत्न सुरू केले; त्यावरून पुढें केळकरांचें म्हणणें सहजच खरें ठरलें. १९१६ सालीं बेळगांव येथील परिषदेंत त्याचा निकाल लागला. त्या सालच्या लखनौ येथील राष्ट्रीय सभेपासून राष्ट्रीय पक्ष काँग्रेसमध्यें शिरला व त्यामुळें तो पुढें बलिष्ठहि झाला, इत्यादि गोष्टी प्रसिद्धच आहेत. " टिळक परत आल्यावर आपण त्यांना आपलें म्हणणें कबूल करावयास

लावूं" असें टिळक पक्षांतील दोन्ही उपपक्ष म्हणत होते. पण शेवटीं केळकर-पक्षाच्या बाजूला टिळकांचें सारें वजन पडून तिकडूनहि केळकर हे केसरी-मराठा पत्राचे संपादक म्हणून स्थिरपद झाले. १९१५ सालीं केसरीचे दुय्यम संपादक श्री. दत्तोपंत लिमये बी. ए. हे निवर्तले, व खाडिलकरांनींहि आतां केसरी कचेरीवरील बहिष्कार उठविला असल्यामुळें टिळकांनीं त्यांचा संबंध पुन्हां केसरीशीं जोडून घेतला. आणि महायुद्धांतील अद्भुत घडामोडी चालू असतां केळकर व खाडिलकर या दोघांचेहि लेखक या नात्याचे गुण केसरीला फार उपयोगी पडून केसरीची लोकप्रियता उडी घेत वाढूं लागली.

कॉंग्रेसघटनेंत योग्य त्या दुरुस्त्या कशा करून घ्याव्या याविषयीं सर्वत्र चर्चा सुरू होती. तिचा कानोसा घेऊन, आपलीं मतें सांगून समजावून राष्ट्रीय पक्षाचा एकजीव करावा अशा विचारानें टिळकांनीं आपलीं माणसें ठिकठिकाणीं पाठविलीं. त्याप्रमाणें केळकर हे फिरून नागपूर, कलकत्ता वगैरे बाजूस हिंडून आले. १९१५ सालीं मुंबईस कॉंग्रेस भरली त्या वेळीं या प्रश्नाची वाटाघाट खाजगी रीतीनें करण्याकरितां कॉंग्रेसचे अध्यक्ष सत्येंद्रप्रसन्न सिंह यांच्याकडे टिळकांनीं केळकरांनाच पाठविलें होतें. मिसेस् बेझंट यांच्याशीं या सुमारास टिळकपक्षाचा पत्रव्यवहार सुरू झाला. तो करण्याचें काम मुख्यत: केळकर यांचेकडेच होतें. त्याचे आदले वर्षी पुण्यास एन्. सुबराव आले व त्यांच्या मध्यस्थीनें समेटाची वाटाघाट झाली, त्यांत केळकरांकडे बरेंच काम होतें. १९१६ सालीं लखनौ येथील कॉंग्रेसमध्यें आतांचे महात्मे व तेव्हांचे मिस्टर गांधी हे नेमस्तांच्या बाजूनें टिळकांशीं बोलणें करण्याला येत, तेव्हां त्या वाटाघाटींत टिळकांचे खालोखाल केळकर हेच प्रमुख असत. त्या राष्ट्रीय सभेंत कॉंग्रेस-लीग स्कीम या नांवानें स्वराज्याची घटना प्रथम आंखली गेली. त्या वेळीं सबकमिट्यांतून पुष्कळसें काम चाले, तेव्हां अध्यक्ष अंबिकाचरण मुजुमदार यांनीं सेक्रेटरी या नात्यानें केळकरांनाच मागून आपले हाताशीं घेतलें होतें. या सर्वांचें कारण हेंच कीं, महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाचे विचार बाहेर प्रांतीं लोकांना कळण्याचें मुख्य साधन टिळकांचें इंग्रजी पत्र 'मराठा' हेंच एक होतें, आणि मराठ्याचे संपादक या नात्यानें केळकरांना बाहेर प्रांतांतले लोक १८९७

पासून एकसारखे ओळखीत होते. 'मराठ्यां'तील मतें कित्येक वेळां परप्रांतीय पुढाऱ्यांना आवडलीं नाहींत तरी, केळकर हे इंग्रजी भाषेंतून तीं कशीं चांगलीं मांडूं शकतात याचा त्यांना पुष्कळ दिवसांचा परिचय होता. खाडिलकरप्रभृति लेखक हे फक्त मराठींतील लेखक एवढ्याच नात्यानें व तेहि महाराष्ट्रापुरतेच माहीत होते. इंग्रजी भाषेंतील लिहिण्याची आवड व पात्रता ही गोष्ट परप्रांतांतील पुढाऱ्यांच्या डोळ्यांपुढें येण्यास केळकरांना उघडच उपयोगी पडली. त्यांनींहि तिचा योग्य फायदा घेतला; व याच कारणानें टिळकहि परप्रांतीय व सामान्यतः राजकारणाच्या सर्व कामांत केळकरांचा उपयोग इतरांपेक्षां सहजच अधिक करूं लागले. याचा पहिला प्रत्यय १८९९ तच आला होता. त्या सालीं १८९८ च्या मद्रास कॉंग्रेसचा रिपोर्ट प्रसिद्ध झाला. त्याचे संपादक कै० जी. सुब्रह्मण्यम् अय्यर ('हिंदु' पत्राचे प्रसिद्ध संपादक) हे होते. त्यांनीं हकीकत देतांना 'केळकरांनीं हा ठराव मांडला' असें म्हणतांना खालील वाक्य घातलें होतें :— " The young man who conducted 'The Mahratta' with conspicuous ability in Mr. Tilak's absence " केळकरांच्या इंग्रजी लिखाणामुळेंच लाला लजपतराय, पं. मदन मोहन मालवीय, फेरोझशहाप्रभृति मुबईचे पुढारी, सुरेंद्रनाथ बानर्जी व भूपेंद्र वसू, मद्रासचे कृष्णस्वामी अय्यर व विशेषतः मिसेस बेझंट या सर्वांशीं त्यांचा दाट परिचय असे. 'पत्रिके'चे मोतीलाल घोष यांचा महाराष्ट्रांत केळकरांशीं किती पत्रव्यवहार होता हें टिळकचरित्रांत जीं त्यांचीं पत्रें मधूनमधून छापलीं आहेत (व एकंदरीशीं त्यांचें प्रमाण फारच थोडें आहे) त्यावरून दिसून येईल. व केळकरांच्या इंग्रजी लिखाणासंबंधानें सामान्यतः एकच विधान केलें म्हणजे पुरे कीं, सुमारें १९०१ पासून १९२० पर्यंत टिळकांनीं (केवळ खाजगी पत्रें सोडून) सार्वजनिक विषयांवरील बिनवर्तमानपत्री अशा लेखाचा एकहि मसुदा केला नाहीं कीं, जो त्यांनीं प्रथम केळकरांना लिहावयास सांगितला नाहीं; किंवा तो स्वतः लिहिला असल्यास केळकरांकडे नीट पाहून वाचून ठाकठीक करण्यास दिला नाही. सांगण्याचें तात्पर्य हेंच कीं, त्यांच्या मराठी लिखाणानें जशी त्यांची प्रसिद्धि महाराष्ट्रांत झाली त्याचप्रमाणें त्यांचें इंग्रजी लिखाणहि परप्रांतांत प्रसिद्धि मिळण्यास त्यांना उपयोगीं पडलें.

१९०७ सालीं टिळकांनीं केळकरांना सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी व १९०९ सालीं काँग्रेस कंटिन्यूएशन कमिटीचे सेक्रेटरी नेमल्याचें पूर्वी सांगितलेंच आहे. १९१५ सालीं त्यांना पुण्यास भरलेल्या प्रांतिक परिषदेचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें. लगेच १९१६ सालीं होमरूल लीगची स्थापना टिळकांनीं केली. तिचे सेक्रेटरी त्यांनीं केळकरांनाच नेमलें. यापुढें होणाऱ्या राष्ट्रीय सभेच्या विषयनियामक कमिटींत किंवा ऑल इंडिया काँग्रेस कमिटींत केळकर हेच टिळकांचे जोडीदार सभासद म्हणून इतर लोकांकडूनहि नेमण्यांत येऊं लागले. मांटेग्युसाहेब हिंदुस्थानांत आले, तेव्हां त्यांच्याकडे जाणाऱ्या शिष्टमंडळाचे सेक्रेटरी व व्यवस्थापक केळकरच होते. आणि राष्ट्रीय पक्षाच्यातर्फे म्हणून स्वराज्याची जी जाहीर कैफियत टिळकांना प्रसिद्ध करावीशी वाटली, ती लिहिण्याचें काम त्यांनीं एकट्या केळकरांवरच सोंपविलें, व त्यांनींहि तें काम अवघ्या सहा आठवड्यांत २५७ पानी एक मोठें पुस्तक लिहून छापून कशा प्रकारें पुरें केलें हें तें पुस्तक ज्यांनीं वाचलें त्यांना माहीत आहेच. ह्या कामासाठीं कै. बाबू बिपिनचंद्र पाल ह्यांना येथें मुद्दाम बोलावून घेऊन त्यांजकडून हा ग्रंथ तयार करवावा असें लोकमान्यांच्या मनांत होतें. पण हें तयार झालेलें पुस्तक वाचून पाहिल्यावर आपले साहाय्यक श्री. केळकर यांचें बळ काय आहे हें त्यांच्या ध्यानीं येऊन त्यांनीं केळकरांच्या संबंधानें अतिशय गौरवाचे उद्गार काढले. दिल्ली येथील १९१८ च्या राष्ट्रीय सभेनें त्यांना काँग्रेसचे एक चिटणीस व काँग्रेस डेप्युटेशनचे सेक्रेटरी नेमलें. परंतु केळकरांनीं ही दोन्ही कामें एकदम होणार नाहींत म्हणून काँग्रेस सेक्रेटरीशिप सोडली व डेप्युटेशन सेक्रेटरीशिप ठेविली, व त्याप्रमाणें काँग्रेस डेप्युटेशनची सर्व जुळवाजुळव करून ते व विठ्ठलभाई पटेल एकदमच विलायतेस गेले. पूर्वी कोलंबोकडून जातांना केळकरांनाच होमरूललीग डेप्युटेशनचे चिटणीस नेमण्यांत आलें होतें, व विलायतेंत असतांना या दोन्ही डेप्युटेशनांचे सेक्रेटरी ते एकाच वेळीं होते. व विलायतेस काँग्रेस पक्षाची सरशी होऊन ब्रिटिश काँग्रेस कमिटी व तिचें 'इंडिया' मुखपत्र हीं दोन्ही ताब्यांत आल्यावर, 'इंडिया' पत्राचें संपादकत्वहि केळकरांकडेच होतें. विलायतेहून आल्यावर सोलापूर येथें मुंबई इलाख्याची संयुक्त प्रांतिक परिषद् भरली तिचें अध्यक्षपद केळकर यांना देण्यांत आलें; व ती सभा कशी काय झाली, याची सविस्तर हकीकत केळकर-

कृत टिळकचरित्र खंड ३ यांत वाचावयास मिळेल. तत्पूर्वीं नाशिक व विजापूर येथें भरलेल्या परिषदांतहि सभांचे अध्यक्ष मराठी भाषा न जाणणारे असल्यामुळें, सभेचें चालकत्व एका अर्थानें अध्यक्षांचे मदतगार व प्रमुख म्हणून केळकरांकडेच आलें होतें. अशा रीतीनें टिळकांचे हयातींत १९०७ पासून १९२० पर्यंत टिळकांचे दुय्यम म्हणून, किंवा त्यांचे प्रतिनिधि म्हणून किंवा त्यांची शिफारस म्हणून, सेक्रेटरी, अध्यक्ष किंवा संपादक या नात्याचीं कामें सभा, परिषदा, संस्था इत्यादिकांतून करण्यांत आलीं तीं टिळकांनीं केळकरांकडेच सोपविलीं. अशी १३ वर्षांची अखंड परंपरा सांगतां येते. किंबहुना अशा महत्त्वाच्या ठिकाणीं त्यांना वगळून दुसऱ्या कोणास टिळकांनीं नेमल्याचें अपवादात्मकहि उदाहरण घडलें नाहीं असें निश्चयानें सांगतां येईल. यासंबंधीं प्रो. विजापूरकरांनीं जाहीर रीतीनें मुद्राराक्षसांतील एका श्लोकाचा उल्लेख करून ('यत्रैषा मेघनीला' इ. तो श्लोक होय) टिळकांचें प्रतिनिधित्व केळकरांशिवाय कसें पार पडूं शकत नाहीं याचें वर्णन विनोदानें केलेलें कित्येकांच्या स्मरणांत असेल ! शेवटीं दोन गोष्टी सांगितल्या म्हणजे ही बाब संपली. पहिली ही कीं, १९१९ सालीं कॉंग्रेस डेमोक्रॅटिक पक्षातर्फे पुणें शहराकरितां कौन्सिल निवडणुकींत उमेदवार म्हणून केळकरांनाच उभें करण्यांत आलें. दुसऱ्या कोणाला नाहीं. आणि दुसरी गोष्ट ही कीं, १९०९ च्या टिळकांच्या मृत्युपत्रांत केसरी–मराठा हीं पत्रें केळकर व खाडिलकर यांना प्रथम देऊं करावीं असा उल्लेख होता, व सल्लागारमंडळ सुचविलें होतें; तरी केळकर-खाडिलकरांनाच सर्वाधिकार दिला होता. आणि १९१८ च्या मृत्युपत्रांत तर केसरी संस्थेचा ट्रस्ट व आपले वारस यांच्या संबंधानें वाद वगैरे तोडून सुव्यवस्था करणाऱ्या पंचांतील मुख्य पंच टिळकांनीं केळकर यांनाच नेमलें. ही गोष्ट लक्षांत घेऊनच १९२० सालीं टिळकांच्या चिरंजीवांनीं केळकरांना केसरी–मराठा संस्थेचे मुख्य ट्रस्टी व चालक नेमलें.

केळकर व खाडिलकर या दोघांच्याहि गुणांची सूक्ष्म परीक्षा टिळकांना होती; व त्या दोघांनीं केसरी संस्थेंत एकत्र राहून नांदावें व दोघांनींहि आपापल्या गुणांचा फायदा संस्थेला करून द्यावा अशी टिळकांची नुसती इच्छाच नव्हे, तर परोपरीनें त्यांचा प्रयत्नहि होता. परंतु त्यांची इच्छा कांहींहि असली तरी एका म्यानांत दोन सुऱ्या राहूं शकत नाहींत ही गोष्ट त्यांना कळून चुकली

होती. वडिलपणाचा अधिकार केळकरांचा व त्यांनीं बिकट काळांत केसरी वांचविला, वाढविला व तेजस्वीहि राखिला. यामुळें केळकरांचा कोणत्याहि तऱ्हेनें गौणपणा नाहीं. उलट इंग्रजी भाषेचें ज्ञान व सार्वजनिक कामांत पडून तीं करण्याची हौस या दोन गोष्टींत तर खाडिलकरांपेक्षां केळकर पुष्कळच सरस व उपयुक्त, हें टिळकांना उघड दिसून आलें होतें. म्हणून केळकरांचा वडीलपणा संभाळून, संस्थेच्या प्रेमाखातर त्यांच्यांशीं जुळवून घेऊन, खाडिलकर राहण्यास मनानें तयार आहेत असें त्यांना दिसतें तर, काय वाटेल तें करून, त्यांनीं त्यांना ठेवून घेतलें असतें. परंतु ही गोष्ट अशक्य आहे असें जेव्हां त्यांना दिसून आलें, तेव्हां दोन्ही साधत नाहींत तर एक तरी पुरें साधावें या न्यायानें, मृत्यूपूर्वीं महिना दोन महिने केसरीचे संपादक म्हणून केळकरांचेंच फिरून डिक्लरेशन करून, त्यांनीं ही संस्था सर्वस्वी भरंव· शावर केळकरांचे स्वाधीन केली. १९०९ सालीं खाडिलकर केसरीचे संपादक असतां मुंबईस राष्ट्रीय पक्षाचें 'राष्ट्रमत' नांवाचें दैनिक पत्र आपले हातीं घेण्याला डॉ. नानासाहेब देशमुख, चिंतामणराव वैद्य प्रभृति मंडळींनीं केळकरांना निमंत्रित केलें होतें. पण केसरी संस्था सोडून जावयाचें नाहीं या निर्धारानें, व धोंडोपंत विद्वांस यांच्याहि त्याच आग्रहामुळें, केळकरांनीं तें निमंत्रण स्वीकारलें नाहीं. पुढें १९२० सालानंतर बरोबर याच्या उलटा प्रसंग उद्भवला. तो असा कीं, टिळकांच्या चिरंजीवांनीं ट्रस्ट केला तेव्हां "केळकर व विद्वांस यांच्या जोडीला तुम्हांस तिसरे ट्रस्टी म्हणून घालतों." म्हणून टिळकांचे जांवई डॉ. साने यांनीं विचारलें असतां, खाडिलकरांनीं त्या गोष्टीला नकार दिला. मग पूर्वींच्या 'राष्ट्रमता' प्रमाणेंच 'लोकमान्य' नांवाचें नवें दैनिक मुंबईच्या राष्ट्रीय पक्षाच्या मंडळीनीं काढलें 'त्याचे संपादक होण्याविषयीं त्यांनीं निमंत्रण केलें तें खाडिलकरांनीं स्वीकारलें. परंतु कांहीं दिवसांनीं खाडिलकरांचें व इतर चालकमंडळीचें न जुळल्यामुळें रा. खाडिलकर यांनीं 'लोकमान्य' पत्र सोडून देऊन 'नवा काळ' नांवाचें स्वतःच्या मालकीचें, व महात्मा गांधींच्या अनुयायित्वाच्या नव्या धोरणाचें, दुसरें दैनिक पत्र काढलें. केसरीचा उत्कर्ष कायम राहून ती संस्थाहि केळकरांनीं ट्रस्टी, संपादक व संचालक या नात्यानें कशी ऊर्जितावस्थेस आणली व लो. टिळकांनीं त्यांच्यावर टाकलेला विश्वास कसा सफल केला

हें दिसून येतें. केळकर व खाडिलकर यांनीं टिळकांच्या वेळीं सुमारें वीस वर्षे एकत्र राहून सहकारितेनें कांहीं कांहीं कामें केलीं. त्याचप्रमाणें टिळकांच्या मरणोत्तरहि घडतें तर दूध व साखर अशीं एकत्र लोकांना प्यावयास मिळालीं असतीं. पण स्वभावभेद, स्वाभिमान, आत्मविश्वास व राजकारणांतील धोरणाचें वैचित्र्य, इत्यादि गोष्टींमुळें दूध एकीकडे व साखर एकीकडे असें झालें खरें. एका अर्थानें ही गोष्ट खेदकारक होय. तथापि दोन ठिकाणीं दोघांचेंहि चांगलें चालून दोघांनींहि आपापली कर्तबगारी महाराष्ट्राला दाखविली. यावरून टिळकांनीं पस्तीस वर्षांपूर्वीं ज्या दोघां मदतनीसांची निवड केली ती योग्य ठरली इतकें तरी खास म्हणतां येईल.

टिळकांनीं १९१८ सालीं मृत्युपत्र केलें. तें फार घाईनें लिहिलें. असें सांगतात कीं, कोलंबो येथें विलायतच्या प्रवासाचें सामान आगबोटीवर चढविण्याकरितां मोटारींत भरण्यांत येऊं लागलें. तेव्हां शेवटीं रा. धोंडोपंत विद्वांस यांनीं टिळकांना पुन्हा एकदां मृत्युपत्र करण्याचें राहिलें या गोष्टीची आठवण दिली. तेव्हां त्याच क्षणीं बसून त्यांनीं धोंडोपंतांना तें तोंडानें सांगून एखाद्या साध्या कागदाप्रमाणें लिहून टाकलें. मूळच्या अस्सल मृत्युपत्रांत शोध घातले आहेत. यावरून जो मसुदा तोच अस्सल दस्तऐवज हें सहजच ठरतें. घाईनें मृत्युपत्र लिहिलें नसतें तर तें दरकोर कागदावर लिहिलें नसतें. मोठ्या कागदावर स्वच्छ लिहून त्याच्या प्रती केल्या असत्या, हें उघड आहे. पण अशा घाईत लिहिलेल्या कागदांत तीन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख करण्याला टिळक विसरले नाहीत. याचें कारण त्या तीन गोष्टी त्यांच्या मनांत अगदीं खोलपर्यंत रुजल्या व दृढ झाल्या होत्या. १. केसरी-मराठ्याचा पब्लिक ट्रस्ट करणें; २. धोंडोपंत यांना त्यांच्या जन्मभर व्यवस्थापक म्हणून ठेवणें; व ३. केळकरांना एकंदर संस्थेचे मुख्य चालक म्हणून नेमणें. पैकीं पहिल्या दोन गोष्टी त्यांनीं मृत्युपत्रांत स्पष्ट लिहिल्या. तिसऱ्या गोष्टीचे दोन भाग पडतात. एक केसरीचें संपादकत्व व दोन वडीलकीच्या मानानें सर्वांवर वजन पडेल व सर्वांचा विश्वास राहील म्हणून तंटेबखेडे उत्पन्न झाले असतां त्यांचा सरपंच म्हणून निकाल करण्याचा अधिकार केळकरांना देणें. यांपैकीं, पहिली गोष्ट पुढें १९२० सालीं विलायतेहून आल्यावर स्वतःच करविली. टिळकांनीं ट्रस्ट केला पण ट्रस्टडीड केलें नव्हतें. यामुळें केळकरांना ट्रस्टी या नांवानें टिळकांनीं कोठें उल्लेखिलेलें

नाहीं. पण त्यांना ही गोष्ट माहितीच होती कीं, घोंडोपंतांना मृत्युपत्राचे एक्झिक्युटर नेमलें म्हणजे त्यांना केसरीसंस्थेचा ट्रस्ट ट्रस्टडीड करूनच पुरा करावा लागेल व ते ट्रस्टडीड करावयास बसले असतां केळकरांशिवाय दुसऱ्या कोणाला ट्रस्टी नेमणें शक्यच नाहीं. व तीच गोष्ट अखेर टिळकांचे पुत्र वारस म्हणून व धोंडोपंत एक्झिक्यूटर म्हणून दोघांनीं मिळून केली. ट्रस्टडीड न होतें तरी मृत्युपत्राच्या आधारें धोंडोपंत हेच एक्झिक्यूटर म्हणून टेस्टॅमेंटरी ट्रस्टी राहते व असे सर्वाधिकारी म्हणूनहि त्यांनीं केळकरांनाच केसरीचे संपादक नेमलें असतें. हें सांगण्याचें कारण इतकेंच कीं केळकर हे केसरी–मराठ्याचे सर्वाधिकारी झाले; ते स्वतः टिळक, त्यांचे चिरंजीव, एक्झिक्यूटर धोंडोपंत या सर्वांच्या पसंतीनें, संमतीनें झाले, कायदेशीर रीतीनेंहि झाले, आणि अनिर्वाह्यतेनेंहि झाले. कारण त्यांच्या जागीं अशा अधिकारावर दुसऱ्या कोणाचें नांव सुचविणें शक्य होतें किंवा आहे? ‘आणि मिळणें हें एकपट व राखणें दुप्पट’ या न्यायानें देखील केळकर यांना मिळालेला सर्वाधिकार योग्यच होता हे त्यांच्या कारकीर्दीवरून सर्वांना दिसून आलेंच आहे. बारा वर्षांपूर्वी टिळकांनीं मनाला प्रश्न विचारून केळकरांसंबंधीं जें निर्णयात्मक उत्तर दिलें, तेंच आज बारा वर्षांनंतरहि जनतेला आपल्या मनाला विचारून द्यावें लागेल. टिळकांच्या वेळीं व त्यानंतर अर्थातच महाराष्ट्रांत केळकरांना प्रतिपक्षी पुष्कळ होते व झाले. पण त्यांचें सर्वांगीण कर्तृत्व लक्षांत घेतां त्यांना बाजूला सारणारा तर राहोच व त्यांना प्रतिस्पर्धी शोभणाराच काय पण आत्मविश्वासानें स्वतःला तसें म्हणविणाराहि कोणी मनुष्य निघाला नाहीं. हेवा कोणालाहि करतां येतो. प्रत्यक्ष स्पर्धेला फारच थोडे उभे राहूं शकतात. स्पर्धेत यश मिळविणें ही गोष्ट त्याहून दुरापास्त होय.

[ येथून पुढें १९२० साल सुरू झालें. या वर्षीं लोकमान्य अकस्मात् वारले. टिळक-युग संपलें, गांधी-युग सुरू झालें. माझें आत्मनिवेदनांत निवेदन केल्याप्रमाणें, ‘केळकर’ ग्रंथांतील मूळच्या केळकर-चरित्रांतील ती. आण्णासाहेब बापट यांनीं लिहिलेला शेवटचा परिच्छेद खालीं देऊन हें अल्प केळकर-चरित्र समाप्त करितों. ]

— संपादक

असो. एकंदरीनें व्यापक विचार करतां कोणीहि इतिहासकार धिम्या व शांत मुत्सद्द्यांत व देशभक्तांत केळकरांची गणना करील यांत संशय नाहीं. स्वभावतःच त्यांचा कल विध्वंसनापेक्षां विधायक कार्याकडे अधिक. क्षणभंगुर हुल्लडीपेक्षां त्यांना अखंड रचनात्मक कामगिरी जास्त प्रिय. म्हणून केळकरांची कर्तबगारी वेगळी व दासबाबू किंवा पं. नेहरू यांची वेगळी. कांहीं देशभक्त दारूच्या बाणासारखे असतात. ते पेट घेऊन आकाशांत वर उडतात, जनतेचें मन थोडा वेळ आकर्षण करून घेतात, पण लगेच नष्ट होऊन जमिनीवर पडतात. परंतु केळकरांची देशभक्ति तशा स्वरूपाची नाहीं. ती नंदादीपासारखी आहे. तींत भरारी व शोभा नाहीं, परंतु तींत जें स्नेहपूर्ण अखंडत्व, सातत्य व शांत प्रकाशदायित्व आहे तें फार थोड्या पुढाऱ्यांच्या देशभक्तींत दृष्टोत्पत्तीस येतें. या दृष्टीनें पाहिलें तर पाठीमागें छत्तीस–सदतीस वर्षांची देशसेवा असलेले असे दोनच पुरुष हिंदुस्थानांत दिसतात. एक पं. मदनमोहन मालवीय व दुसरे केळकर. त्यांच्या राष्ट्रीयत्वाचा झरा राजापुराच्या गंगेप्रमाणें केव्हां तरी वाहणारा नव्हे, तो आंग्लकवि टेनिसननें वर्णिलेल्या चिरकाल प्रवाही जलौघासारखा आहे. आणि या त्यांच्या लोकसेवेच्या संथ नदींत त्यांचें अभंग सौजन्य, त्यांची अचूक सदभिरुचि, त्यांची प्रशंसनीय उपकारतत्परता इत्यादि अनेक दुर्मिळ गुणांचे ओढे येऊन मिसळल्या कारणानें व तींतच त्यांच्या निस्सीम वाङ्मय-प्रेमाच्या नौका विहार करीत असल्यामुळें तिला जी मनोहरता प्राप्त झाली आहे. ती इतरत्र क्वचित् नजरेस पडते. केळकरांच्याहून जास्त तडफेचे देशभक्त आहेत व होतीलहि. त्यांच्याहून अधिक विद्यासंपन्न व अभिजात वाङ्मयसेवकहि कदाचित् निर्माण होतील. तथापि त्यांच्या अंगीं एकसमयावच्छेदेकरून वास करणाऱ्या अनेक गुणांनीं विशिष्ट असा अष्टपैलू, निरभिमानी, विनयशील, वादकुशल व सततोद्योगी लोकनायक व लोक-सेवक महाराष्ट्राला, किंबहुना हिंदुस्थानाला, मिळणें ही परमेश्वराची खरोखरच मोठी कृपा होय. त्या परमेश्वराच्या कृपेनें केळकर यांस दीर्घ आयुष्य लाभो व भारतवर्षाला त्यांच्या गुणसमुच्चयाचा भरपूर फायदा मिळो, एवढीच प्रार्थना करून, हें केळकरांचें अल्पचरित्र संपवितों.

## केळकर चरित्रावरील अभिप्राय

श्री. केळकरांच्या सबंध चरित्राचा केसरीचा अंक प्रसिद्ध झाल्यावर ती. आण्णांना अभिनंदनार्थ कांहीं पत्रें आलीं. त्यांत एका थोर पुरुषाचें (इतिहासकार रावबहादूर श्री. गोविंद सखाराम सरदेसाई यांचें) पत्र आलें. शितावरून भाताची परीक्षा या न्यायानें तेवढें एकच पत्र खालीं देतों :—

कामशेत; ता. २८।८।३२

श्री

श्री. सदाशिवराव बापट यांसी सा. न. वि. वि.

ता. २६ च्या केसरींत आपण लिहिलेलें श्री. केळकर यांचें चरित्र हातीं येतांच समग्र लक्षपूर्वक वाचून पाहिलें. आनंद वाटला. ते अत्यंत सम्मंजस, यथातथ्य, बिलकूल अतिशोक्ति नसलेले, गुणांचा अवास्तव गौरव न करणारें, तसेंच दोषांवर पांघरूण घालणारे, म्हणजे सर्वथा निःपक्षपात बुद्धीनें सिद्ध झालें आहे. माझ्यासारख्या त्रयस्थ मनुष्यास हा तुमचा लेख कसा वाटला तें कळल्यानें तुम्हास बरें वाटेल असे समजून मी हें आपले मत तुम्हास मुद्दाम लिहून कळवीत आहे. परमेश्वर कृपेनें केळकरांस दीर्घायुष्य लाभो व भारतवर्षाला त्यांच्या गुणसमुच्चयाचा भरपूर लाभ मिळो" या तुमच्या प्रार्थनेंत मीहि पूर्णपणें सामील आहे. या प्रयत्नाबद्दल तुमचेंहि मी अभिनंदन करितों. क. लो. ही विनंति.

आपला,

**गो. स. सरदेसाई**

'केळकर' या नांवानें प्रसिद्ध झालेल्या वड्या ग्रंथांत श्री. आण्णासाहेब बापट यांनीं 'श्री. केळकरांची भाषणशैली' या विषयावर लिहिलेला स्वतंत्र लेख पुढें दिला आहे.

## श्री. केळकर यांची भाषणशैली

(श्री. सदाशिव विनायक बापट, आठवणीकार, पुणें.)

जें जें सूक्ष्मनाम घ्यावे। त्याचें रूप विवरून द्यावें॥
तरीच वक्ता म्हणवावें। विचारवंत।

— श्रीसमर्थ

"He, who has reason and good sense at his Command needs few of the arts of the Orator."

—GOETHE

गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांना सार्वजनिक सभांतून मनापासून बोलावयास नको. खेरीज वक्तृत्वास नैसर्गिक अशी अनुकूलताहि त्यांस कमी आहे. बोलावयास आरंभ केला कीं, त्यांना खोकल्याचा ठसका लागतो व तो भाषण संपवीपर्यंत वैऱ्याप्रमाणें त्यांस अडवीत असतो. या कारणानें, नको तें बोलणें, असें त्यांस होऊन जातें; परंतु त्यांनीं सार्वजनिक आयुष्याचा वसाच घेतला असल्यामुळें सार्वजनिक भाषणांना टाळून त्यांचें चालावें कसें ! ज्या उपाधीची मनुष्याला हौस त्या तो पत्करीलच; परंतु तात्यासाहेब यांचा विशेष हा कीं, ज्या उपाधि त्यांना सहज साधावयाच्या नाहींत त्यांपुढें स्वतः हात न टेकतां त्यांनाच ते आपल्यापुढें हात टेंकावयास लावतील. म्हणून सार्वजनिक आयुष्यक्रम त्यांनीं स्वीकारला नसता तरी सभेंत वक्ते म्हणून एरव्हीं पुढें आले नसते, असें म्हणवत नाहीं. केसरी–मराठा संस्थेस येऊन मिळाले म्हणून ते संपादक झाले. तथापि तसे ते संपादक झाले नसते, तरी वकील या पेशानें ते वागणारच होते व वकिलाचा पेशा असा आहे कीं

वकील होणें म्हणजेच चार चौघांत उभें राहून भाषण करणें. एक वेळ संपादक मुका असला तरी चालेल, पण वकील हा बोलकाच पाहिजे यासाठीं एल्एल्. बी. होऊन साताऱ्यास वकिलीची सनद घेतल्यावर तात्यासाहेबांनीं तेथील युनियन क्लबांत एक भाषणाचा प्रसंग मुद्दाम उकरून काढला. तें भाषण केवळ कोणाएका व्यक्तीचे औपचारिक असे आभार मानण्याचेंच होतें; परंतु त्याकरितां त्यांनीं आधींपासून केवढी तयारी केली होती? त्यांनी जे चार शब्द बोलावयाचे होते ते प्रथम एका कागदावर लिहून काढले, सभेस जाण्यापूर्वी ते चार पांच वेळां वाचले व मग क्लबांत जाऊन त्यांनीं तें आभाराचें भाषण केलें!

यावरून एक मुद्दा स्पष्ट होतो. तो हा कीं, वकिली झाली तरी तिच्यांत कोर्टांत बोलावें लागणारच व वकीलाचा पेशाहि एक प्रकारें सार्वजनिकच असल्यामुळें गांवांत प्रसंगवशात् भरणाऱ्या सभांतूनहि भाषणें करण्याची त्याला पाळी येणार. शिवाय तात्यासाहेबांचा स्वभाव जात्याच चळवळचा पडल्यानें सामान्य वकिलापेक्षां ते सभांतून अधिक वेळां चमकले असते, यांत शंका नाहीं. त्यांनीं वकिली सोडून संपादकत्व स्वीकारलें तें कोर्टांत कज्जेदलाली करण्यापेक्षां विद्याव्यासंग कायम ठेवून लेखनव्यवसाय चालविणें त्यांस श्रेयस्कर वाटलें म्हणून स्वीकारलें हें तर उघडच आहे; पण त्याबरोबरच वकिली पेशांतल्यापेक्षां संपादकीय पेशांत सार्वजनिक कामें करण्याची संधि जास्ती मिळेल यासाठींहि त्यांनीं संपादकत्व स्वीकारलें असें ओघानेंच कबूल करावें लागतें.

वतमानपत्राचा संपादक हा अद्यापि तरी हिंदुस्थानांत लोकांचा पुढारी समजला जातो. अनेक विषयांचा अभ्यास करणें हें त्याचें कर्तव्यच होऊन बसतें. संपादक या नात्यानें जसे अनेक विषयांवर तो लेख लिहितो तसें त्याला पुढारी या नात्यानें भाषण करावयास पाचारण झाल्यास तें नाकारून चालत नाहीं. बहुशः पुष्कळ वक्ते असे असतात कीं, त्यांना ज्या विषयावर भाषण करावयाचें त्याची वेगळी तयारी करण्याची जरूरी वाटत नाहीं. किंबहुना विषयाची तयारी न करतांच जो बोलतो तोच खरा वक्ता व त्यावरच सरस्वतीदेवीचा वरदहस्त अशीहि सामान्यतः

आपल्याकडे समजूत आहे. पण खरा युरोपियन वक्ता बहुधा हातांत मुद्द्याचें किंवा माहितीचें टिपण घेतल्यावाचून सभेंत एखाद्या महत्त्वाच्या विषयावर बोलतांना आढळणार नाहीं. कारण त्याला आपल्या विषयांतील विशिष्ट मुद्देच श्रोत्यांपुढें मांडावयाचे असतात व त्यांतील एखाददुसरा मुद्दा गळाला तर त्याचा भाषण करण्याचा हेतु तितक्या प्रमाणांत निष्फळ होतो परंतु आपल्या देशांत यासंबंधाची कल्पना वेगळी आहे. कोणी हातांत टिपण घेऊन बोलूं लागल्यास त्यानें वक्तृत्वास कमीपणा येतो असें लोक मानतात.

तात्यासाहेब यांच्या भाषणास वरील कसोटी लावली तर त्यांची गणना खऱ्या वक्त्यांत होणार नाहीं. त्यांचीं सार्वजनिक आयुष्यांतील पहिलीं पहिलीं भाषणें ज्यांनीं ऐकलीं असतील त्यांना एक गोष्ट खास आठवेल. ती गोष्ट ही कीं, ते जाहीर भाषण करण्यास येत तेव्हां त्यांच्या हातांत एखाददुसरें पुस्तक हें असावयाचेंच. त्याशिवाय त्यांना आधार वाटूंच नये. परंतु त्यांच्या इतर गुणांप्रमाणें याहि गुणांत नंतर त्यांची विलक्षण प्रगति झाली असल्यामुळें विशेष प्रसंगाशिवाय ते भाषणाच्या वेळीं पुस्तकें आणीत नसत. पण त्यांचा नेहमींचा सांप्रदाय असा कीं, ज्या विषयावर बोलावयाचें त्या विषयाचा नीट अभ्यास केल्यावांचून व त्यावर चिंतन केल्यावांचून ते कधींहि घराबाहेर पडावयाचे नाहींत. भाषणाच्या वेळीं त्यांच्याजवळ मुद्द्यांचीं व माहितीचीं भरपूर टांचणें टिपणें असत व स्मरणाकरितां ते मधून मधून तीं नजरेखालीं घालत. हीं टिपणें म्हणजे अत्यंत परिश्रमानें व व्यवस्थेनें तयार केलेली त्या त्या विषयाच्या माहितीची व मुद्द्यांची तपशीलवार यादी होय. अशा या टिपणांचें एक बाड त्यांचे घरीं मला पाहावयात सांपडलें. तें पाहून क्षणभर असें वाटलें कीं, आहे हें असेंच बाड छापून काढलें तरी खऱ्या अभ्यासू गृहस्थास तें मार्गदर्शक होईलच; पण शिवाय मनोरंजकहि होईल.

कित्येक वक्त्यांना विषयाची तांत्रिक माहिती असलेली पुरते. तेवढ्या माहितीस आपल्या वक्तृत्वाचा, भाषाप्रभुत्वाचा, कल्पकतेचा व काव्यमय वर्णनाचा दुजोरा देऊन श्रोत्यांच्या डोळ्यांसमोर ते रम्य चित्र उभें

करतात. पण हें त्यांस नेहमीं हटकून साधतेंच असें मात्र नाहीं. उडाला तर तो भुईनळा, नाहीं तर केवळ तो मातीचा गोळा. तात्यासाहेब हे या थाटाचे वक्ते नव्हेत. किंबहुना ते वक्ते नसून हाडाचे लेखक आहेत. या कारणानें त्यांचीं भाषणें म्हणजे त्यांनीं लिहिलेले सुंदर लेखच होत. इतरांप्रमाणें त्यांचीं भाषणें कापरासारखीं हवेंत उडून जाणारीं नसतात. कारण ते आपलीं भाषणें अभ्यासपूर्वक तयार करीत असल्यामुळें एखादे वेळीं त्यांस आपल्याच भाषणाचा मागाहून रिपोर्ट लिहिण्याचा प्रसंग आल्यास ते आपलें मूळचें भाषण जसेंच्या तसें साद्यंत सहज लिहून काढत. प्रथम प्रथम त्यांचीं भाषणें थोडीं नीरस होत. परंतु आपलीं भाषणें रसभरित, मनोरंजक व परिणामकारक होण्याकरितां तीं कशीं सजविलीं पाहिजेत याची नस त्यांना अनुभवानें सांपडली, व त्या योगानें त्यांचीं भाषणें त्यांच्या लेखाइतकींच आतां उत्कृष्ट वठूं लागलीं. 'जेथें पिकतें तेथें विकत नाहीं' हा अनुभव सर्वत्रच आहे. त्यास अनुसरून ज्या वक्त्यांची इतर गांवांत प्रसिद्धि ते वक्ते आपल्या गांवीं बोलावयास उभे राहिले तर त्यांचें भाषण ऐकण्यास श्रोते बहुधा अगदींच मोजके जमतात. कारण श्रोते आपल्या मनाशीं म्हणतात, "माहीत आहे काय बोलणार तें" पण मौज अशी कीं, तात्यासाहेबांच्या बाबतींत तसें कधीं होत नसून वरील म्हणीस हार खावी लागते. ते आज बोलणार आहेत त्या अर्थीं कांहीं तरी नवा मुद्दा काढतील, नवा विचार मांडतील, नवी कोटी लढवितील, नवी माहिती सांगतील अशी लोकांची समजूत असल्यानें त्यांचें भाषण ऐकण्यास श्रोत्यांची नेहमीं गर्दी उसळल्याखेरीज राहात नाहीं.

श्रोत्यांची काळजी वाहणारा त्यांच्यासारखा वक्ता विरळा ! श्रोत्यांचा वेळ वाया जाऊं नये व आपलाहि वेळ अनाठायीं खर्च होऊं नये इकडे त्यांचें नेहमीं लक्ष असतें. श्रोते कंटाळण्यापूर्वीं त्यांचें भाषण संपलें नाहीं असा प्रसंग उभ्या जन्मांत कधीं घडला नसेल. थोडया वेळांत मनोरंजकपणानें भरपूर माहिती देण्याकडे त्यांचा कटाक्ष असतो. त्यांच्या लेखनाप्रमाणें त्यांच्या भाषणांत कृत्रिमपणा कधीं सांपडावयाचा नाहीं. पाल्हाळीकपणाचा तर त्यांस रागच आहे. थोडक्या शब्दांत अर्थपूर्ण लिहिणें-बोलणें हा आतां त्यांच्या हातचा मळ झाला आहे. म्हणूनच 'Great

writers and speakers are commonly economic in the use of words' हें वर्णन त्यांस पूर्णपणें लागू पडतें. पुष्कळ जण वक्ते या नात्यानें आपला कांहीं विशेष अधिकार आहे, आपण गुरु आहों, उपदेशक आहों व श्रोते शिष्य आहेत असा अहंकार बाळगून भाषणास प्रवृत्त होतात; परंतु तात्यासाहेबांच्या अंत:करणास ही भावना केव्हांहि शिवत नाहीं. विनय हा तर त्यांचा स्वभावच आहे. ज्या अर्थी विशिष्ट विषयावर भाषण करण्यास आपण उभे आहों, त्या अर्थी सदर विषयासंबंधानें शक्य तितकी भरपूर माहिती देणें हें आपलें कर्तव्य आहे, इतकाच विचार त्यांच्या मनांत असतो. मात्र तें ज्ञान मनोरंजक व्हावें, कंटाळवाणें होऊं नये या गोष्टीचा ते स्वत:स कधींहि विसर पडूं देत नाहींत. वक्तृत्वाचा प्रसंग हा कांहीं विशेष प्रसंग आहे असें ते स्वत: समजत नाहींत व श्रोत्यांनाहि भासवीत नाहींत. जणूं काय चारचौघांत बसून खेळीमेळीनें आपण गप्पा गोष्टी करीत आहों अशा तऱ्हेचा घरगुतीपणाचा रंग ते आपल्या भाषणास आणतात, व ती त्यांची वृत्ति श्रोतृवृंदांतहि अल्पावकाशांत सहजच प्रतिबिंबित होते. त्यांचें भाषण हा काव्यशास्त्रविनोदाचा एक मासलाच असतो. हरिदास आपल्या कीर्तनांत सर्व दर्जाच्या लहान–थोर श्रोत्यांचीं मनें वेधून घेतात तोच प्रयत्न तात्यासाहेब भाषणप्रसंगीं करीत असल्यामुळें श्रोत्यांस त्यांचें भाषण म्हणजे एक चमचमीत मेजवानी वाटते. कदाचित् हरिदासांचेंच धोरण त्यांनीं आपल्यासमोर कित्यादाखल ठेवलें असावें. तात्यासाहेब आपल्या मुख्य विषयाचें निरूपण यथोचित व यथासांग करतीलच; पण त्याबरोबरच सदर निरूपणास एकदोन मजेदार गोष्टींनीं, दहा पांच मार्मिक दृष्टांतांनीं, विविध सुभाषितांनीं व सुंदर अलंकारांनीं ते शोभा आणतील. मात्र श्रोता भाषणाच्या अखेरीपर्यंत गंभीर बनून दगडासारखा खंबीर त्यांना पाहवणार नाहीं. म्हणून ते मधून मधून विनोदाची लकेर सोडून गालावरची फक्त सुरकुतीच मोडावी इतक्या बेताचें स्मित श्रोत्यांत उत्पन्न करतील. हें सगळें उत्तम प्रकारें साधण्यास त्यांचें मन किती सुसंस्कृत, अभिजात व ताजवेतोल बनलें असेल याची अटकळ बांधतां येते. तसेंच, विनय, समतोलपणा, न्यायदक्षता, नि:पक्षपातित्व व अतिशयोक्तीचा अभाव यांनीं त्यांचें भाषण नेहमीं विनटलेलें असतें. तात्यासाहेबांच्या भाषणाचें

वर्णन यथार्थतेनें इंग्रजी शब्दांनीं करावयाचें तर तें Proportion (प्रमाण-बद्धता), Propriety (औचित्य) and Prudence (चातुर्य) या शब्द-त्रयींत करतां येईल. आणि त्यांतहि 'औचित्य' हा गुण त्यांच्या भाषणांत विशेषत्वानें वसत असल्यामुळें 'True eloquence consists in saying all that is proper, and nothing more' ही पोप कवीची वक्तृत्वाची व्याख्या त्यांस सर्वस्वीं लागू पडते; म्हणूनच म्हणावें लागतें कीं, या थाटाचे वक्ते एकंदरींत फारच दुर्मिळ. इतर वक्ते पाहावे तर वक्तृत्व आहे तर विद्वत्ता नाहीं, विद्वत्ता आहे तर रसिकत्व नाहीं, रसिकत्व आहे तर सभ्यता नाहीं, सभ्यता आहे तर विनोद नाहीं, विनोद आहे तर औचित्य नाहीं व औचित्य आहे तर वेळेचें महत्त्व नाहीं असे आढळतात. तात्या-साहेब वरील यादींतील अवगुण वगळून प्रयत्नसाध्य जेवढे म्हणून गुण आहेत तेवढे आपल्या भाषणांत एकवटीत असल्यानें त्यांचें भाषण ऐकण्यास समाज नेहमींच फार उत्सुक असतो. अनेक ग्रंथकारांनीं वक्तृत्वाच्या अनेक व्याख्या केल्या आहेत व त्याचीं विविध लक्षणें सांगितलीं आहेत. तात्यासाहेबांच्या भाषणपद्धतीचें थोडक्यांत वर्णन करावयाचें झालें तर तें सिसरोच्या पुढील शब्दांनी करतां येईल. तो म्हणतो, "He is an eloquent man who can speak of low things acutely, and of great things with dignity, and of moderate things with temper." केळकरांच्या भाषणांतील विशेष गुण म्हणजे विषयमांडणींतील नावीन्य. एका विषयावर एकच व्याख्यान द्यावयाचें असल्यास सामान्य वक्ताहि आपलें तें भाषण अनेक अंगांनीं चित्ताकर्षक करूं शकेल. पण एकाच विषयावर अनेक वेळां व ठराविक लोकांसमक्ष भाषण करावयाचें झाल्यास चांगल्या वक्त्यासहि मोठी पंचाईत पडते. ठराविक मुद्दे, त्याच त्या कोटया, तोच तो विनोद, तेच हास्यप्रसंग नाटकांतील पात्राप्रमाणें त्याला करावे लागतात. फार काय पण कित्येक वक्ते ठराविक आवेशाचे शब्दहि तसेच उच्चारतात ! पण तात्यासाहेबांचें मात्र तसें नाहीं. नेहरूरिपोर्टाचा दौरा महाराष्ट्रांतील ठळक पांचसहा मंडळीसह तात्यासाहेबांनीं अनेक गांवीं काढला होता. त्या वेळीं त्या एकाच विषयावर प्रत्येक गांवीं ते बोलत असत. पण मौज अशी कीं, एकदां जें बोलले तें पुन्हां दुसरीकडे कधींहि ते बोलले नाहींत; पण विषय

मात्र पूर्वीपेक्षांहि अधिक सरसपणानें ते रंगवीत. तसेंच होमरूलच्या चळवळीचे वेळीं वऱ्हाडांत त्यांनीं व्याख्यानांचा दौरा काढला होता. त्या वेळींहि लोकांस हाच अनुभव आला. त्यांच्या भाषणांत समर्पक दृष्टांत, रूपकें व उपमा विपुल असतातच; पण एकंदरींत सबंध भाषणांत कळकळ सांठविलेली असून शिवाय त्यावर वाङमयाची तकाकी झळकत असते, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. त्यांच्या भाषणांत बरीचशीं इंग्रजींतील अवतरणें येतात व इंग्रजीच्या खालोखाल संस्कृत वाङमयांतील विशेषतः मृच्छकटिक, मुद्राराक्षस वगैरेसारख्या नाटकांतील उल्लेख असतात. संतकवींच्या मात्र ते फारसे वाटेस जात नाहींत! क्वचित् प्रसंगीं वेदांतग्रंथांतील वचनांचा उल्लेख येत असल्याचें आढळून येतें.

तात्यासाहेबांना जात्या फारसे युद्धप्रसंग नकोत. पण पेशा तर सार्वजनिक कार्यकर्त्याचा पडल्यामुळें ते कित्येक युद्धप्रसंग टाळीत असले तरी कांहींना त्यांना तोंड देणें भाग पडतें. त्यांपैकीं बरेचसे युद्धप्रसंग त्यांजवर त्यांच्या प्रामाणिकपणानें आणिले आहेत. कित्येक वक्त्यांचा प्रयत्न आपण बाजूस राहून श्रोत्यांना भरीला घालण्याचा असतो. असहकारितेच्या चळवळींत याचा अनुभव पुष्कळांना आला असेल. विद्यार्थ्यांनीं शाळा, कॉलेजें सोडावीं, वकिलांनीं कोर्ट-कचेऱ्यांची पायरी न चढावी व पुढाऱ्यांनीं कौन्सिलाकडे पाठ फिरवावी अशी त्रिविध प्रकारची ती चळवळ होती. या त्रिविध प्रकारांपैकीं वकील व पुढारी हे जाणते व सुबुद्ध असल्यानें त्यांना दुसऱ्या कोणी उपदेश करण्याचें कारण नव्हतें. येऊनजाऊन उपदेशाला पात्र काय ते विद्यार्थी. त्यांजवर उठल्यासुटल्या सर्वांनीं शाळा-कॉलेजें सोडण्याच्या उपदेशाची झोड उठवावयाची. तात्यासाहेब यांना इतर पुढाऱ्यांप्रमाणें या प्रसंगीं हा उपदेश करण्याची पाळी आली असतां ती चुकवून कसें चालेल! अशा परीक्षेच्या वेळीं त्यांनीं आपलें वर्तन प्रामाणिकपणाच्या बाण्यास धरूनच ठेवलें. जें स्वतःस पटलें नाहीं तें दुसऱ्यास सांगावयाचें नाहीं याचें नांव प्रामाणिकपणा व याचाच अर्थ जबाबदारीची जाणीव. या गुणांच्या परीक्षेस तात्यासाहेब त्या बिकट काळांत टिकले व त्याबद्दल त्यांस असहकारितेच्या पुरस्कर्त्यांकडून दूषणेंहि सहन करणें भाग पडलें. इतर अनेक गुणांप्रमाणें सहनशीलता हा त्यांच्या अंगीं ठळक गुण आहे. ते

प्रतिपक्षाचे शंभर अपराध पोटांत घालतील. पण ही सहनशीलतेची मर्यादा संपल्यावर प्रतिपक्षाशीं युद्ध पुकारतील त्या वेळीं आपल्या कोटिक्रमानें, युक्तिवादानें, पुराव्यानें व एक प्रकारच्या विशिष्ट पद्धतीच्या उपहासानें प्रतिपक्षाचे ते राईराईएवढे तुकडे करतील.

असहकारितेच्या काळांत राष्ट्रीय शिक्षणाचा पुरस्कार त्यांनीं केला, पण तो त्यांनीं आपल्या पद्धतीनें केला. त्यांनीं विद्यार्थ्यांना सरसकटपणें शाळा-कॉलेजें सोडण्याचा आग्रह केला नाहीं. पण ज्यांनीं सरकारी शिक्षण-संस्था सोडल्या, त्यांच्याकरितां टिळक-महाविद्यालय स्थापण्यांत पुढाकार घेऊन स्वतंत्र अशा राष्ट्रीय शिक्षणाची त्यांनीं सोय केली. तथापि तेवढ्यानें राष्ट्रीय शिक्षणाच्या 'कट्ट्या' पुरस्कर्त्यांचें समाधान न होऊन एका बाजूस राष्ट्रीय शिक्षणाचे हे मोठे कैवारी (!) व दुसऱ्या बाजूस तात्या-साहेब केळकर असा सामना शिवाजीमंदिरांत झडला. त्या प्रसंगीं तात्या-साहेबांनीं प्रतिपक्षास मनमुराद बोलूं दिल्यामुळें तो वाद दोनतीन दिवस भरास येऊन चांगलाच रंगला व अखेर तात्यासाहेबांनीं आपली बाजू मांडून प्रतिपक्षाचे सर्व मुद्दे खोडून काढले. या भाषणांत त्यांचे वरील सर्व गुण चांगलेच प्रत्ययास आले. प्रतिपक्षावर हल्ला चढवितांना प्रथम त्याचा पूर्वपक्ष स्वतःच मांडावा व एक एक मुद्दा खोडून काढावा अशी त्यांची न्यायाधीशासारखी पद्धत असे, तसें करीत असतां ते विकारवश होत नसत. यामुळें तर त्यांचीच बाजू खरी असल्याबद्दलचा श्रोत्यांचा समजच दृढावे. आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अशा युद्धप्रसंगीं कोणासहि अन्याय न व्हावा म्हणून डोळ्यांत तेल घालून ते जपत असत. यामुळें केळकर ज्या पक्षास आहेत तो पक्ष न्यायाचा व सत्याचा आहे असा श्रोत्यांचा पूर्वग्रह होई व तो तात्यासाहेबांस उत्कृष्ट वक्तृत्वापेक्षांहि अधिक लाभ-दायक ठरे. पालघर येथें ठाणें-जिल्हा-परिषद भरली असतां बॅ. जमनादास मेहता व तात्यासाहेब यांच्यांत विरोध आला. त्या वेळीं तात्यासाहेबां-पुढें मेहतांच्या वक्तृत्वाचें तेज दिपून गेलें. त्या बाबतींत न्यायीपणाप्रमाणेंच विद्वत्ता, प्रामाणिकपणा व कळकळ या गुणांच्या जोरावर तात्यासाहेबांनीं ती सभा जिंकली.

गंगाप्रवाहाप्रमाणें तात्यासाहेब यांची भाषणपद्धति मूळची शांत व गंभीर अशा प्रकारची आहे. खळखळाट, आवेश, क्षोभ हे प्रकार त्यांच्या भाषणांत नैमित्तिकच उत्पन्न होतात. भाषणप्रसंगीं कोणीं त्यांस विनाकारण डिवचलें किंवा विरोध करणारा प्रतिपक्षी त्यांच्या बरोबरीचा भेटला अगर अन्यायानें त्यांजवर कोणीं हल्ला केला अथवा दुष्टपणानें त्यांची कोणीं कुचेष्टा केली तर एकदम शांतवृत्तीच्या म्यानांतून त्यांचें वक्तृत्वखड्ग बाहेर पडून तळपावयास लागतें व अशा वेळीं त्यांचें भाषण आवेशयुक्त होऊन फारच परिणामकारक होतें.

मतभेदामुळें पक्षोपपक्ष उत्पन्न होऊन त्यांचे तट पडले असतां तात्यासाहेब प्रत्येक पक्षांतील अनुकूल मुद्दे एकत्र करून त्यांतून सामान्यपणें समान भूमिका सिद्ध करण्याचा प्रयत्न करतात, व अशा त्या भूमिकेवर सर्व पक्षांचीं तोंडें एकत्र करणें हा तर त्यांचा हातखंडा आहे. तसेंच निरनिराळ्या पक्षांत बेबनाव उत्पन्न होऊन बखेडा होण्याचा प्रसंग आला असतां त्यांच्यांत तडजोड काढून समेट घडवून आणणें हा केळकरांच्या स्वभावांतील असाधारण गुण होय. या गुणाचा प्रभाव त्यांच्या जाहीर भाषणांतूनहि अनेक वेळां दृष्टीस पडला असून त्यायोगें अनेक व्यक्तींचे तुटलेले स्नेहसंबंध पुन्हा जडले आहेत व कित्येक संस्थांवरील संकटांचें निवारणहि झालें आहे.

मराठीप्रमाणें इंग्रजींतहि भाषणें करण्याची त्यांच्यावर पाळी आली याला कारण त्यांचें 'मराठा' पत्राचें संपादकत्व. ते मराठा पत्राचे संपादक असल्यामुळें राष्ट्रीय सभेंत व परप्रांतांत भाषणें करण्याची त्यांजवर साहजिकच जबाबदारी पडली. मुळांत हौस असल्यामुळें, अभ्यासानें व पुष्कळ वर्षांच्या संवयीमुळें ते इंग्रजी लेख माहितीच्या तसेंच भाषेच्याहि दृष्टीनें उत्कृष्ट लिहितात. जी त्यांची समजूत लेखांच्या बाबतींत तीच भाषणांच्या बाबतींत. आपलीं इंग्रजी भाषणें माहितीनें भरलेलीं असावींत व त्यांची इंग्रजी भाषाहि उत्कृष्ट असावी अशी त्यांची इच्छा असल्यामुळें ते आपलीं महत्त्वाचीं इंग्रजी भाषणें अगोदर लिहून काढल्यावांचून सहसा करीत नाहींत. त्यांचें पहिलें इंग्रजी भाषण सन १८९७ सालीं उमरावतीस भरलेल्या राष्ट्रीय

सभेंत झालें. त्या वेळीं त्याचें वय अवघें पंचवीस वर्षांचें होतें. तो त्यांच्या सार्वजनिक आयुष्यक्रमाचा प्रारंभ होता. तेव्हांपासून गेल्या पस्तीस वर्षांत त्यांची इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाच्या दृष्टीनें एकसारखी प्रगतीच होत गेली असून तिचा परिणाम त्यांच्या भाषणावर झाल्यावाचून राहिला नाहीं. मराठींतून भाषण करतांनाहि त्यांना श्रम पडतातच; पण मला वाटतें, त्याहिपेक्षां इंग्रजी भाषणाचे वेळीं त्यांना ते जास्त पडतात. म्हणून इंग्रजी बोलण्याचा प्रसंग ते आपण होऊन आपल्यावर सहसा ओढवून घेत नाहींत. कारण इंग्रजी लिहिण्याची त्यांना जितकी संवय आहे तितकी ती इंग्रजी भाषणाची नसावी. ही अडचण त्यांना एकट्यानाच आहे असें नाहीं; तर बहुधा सर्वच महाराष्ट्रीय पुढाऱ्यांना आहे. महाराष्ट्रीयांचा व्यवहार सारा मराठींतूनच चालतो. त्यांच्यांत कोणी बडे कारखानदार नाहींत, कोणी प्रचंड पेढीवाले नाहींत अगर मोठे व्यापारीहि नाहीत. यामुळें संभाषणाचा व महत्त्वाच्या कामकाजाचा संबंध इंग्रजी भाषेशीं व इंग्रज लोकांशीं फार थोडा येतो. याचा परिणाम एकंदरीनें असा झाला आहे कीं नांव घेण्याजोगे इंग्रजी वक्ते महाराष्ट्रीयांत कमी. तथापि जे थोडे वक्ते आहेत त्यांत तात्यासाहेबांचा दर्जा बराच वरचा लागेल. वक्तृत्वास नैसर्गिक आवाजाची अनुकूलता त्यांना नसतांहि त्यांनीं इतर रीतीनें या कामीं इतकें यश मिळविलें हेंच विशेष आहे. पण याचें आश्चर्य वाटावयास नको. कारण बुद्धि व यत्न हीं त्यांचे ठिकाणीं एकवटलीं असल्यामुळें या दोनहि गुणांच्या संगमाचा जो स्वाभाविक परिणाम व्हावयाचा तो येथेंहि घडून आला आहे. त्यांचें नांव साऱ्या हिंदुस्थानांत मशहूर आहे याला त्यांचें राजकीय कर्तृत्व, इंग्रजी लेखनपटुत्व व विद्वत्त्व कारणीभूत आहेच; त्या-खेरीज त्यांचें इंग्रजी वक्तृत्वहि कारणीभूत आहे हें विसरून चालणार नाहीं. सन १९२४ सालीं लोहगांवचा अर्जुना व सोल्जर वॉकर यांच्या खटल्याचे निमित्तानें केसरीनें केलेल्या टीकेमुळें मुंबई हायकोर्टाची बेअदबी झाल्या-बद्दल केसरीवर खटला होऊन त्यांत त्यांस ५२०० रुपये दंड ठोठावण्यांत आला. या वेळीं केळकर यांनीं मुंबई हायकोर्टांत स्वतः खटला चालविला होता. त्या प्रसंगीं त्यांनीं हायकोर्टांत केलेलें विस्तृत भाषण त्यांच्या उत्कृष्ट इंग्रजी भाषणाचा एक नमुना आहे. तसेंच ते असेंब्लीचे सभासद असतां

त्यांनीं पब्लिक सेफ्टी बिलास विरोध करितांना जें भाषण केलें तें त्यांच्या स्वतःच्याहि मतें समाधानकारक वठलें असें त्यांनीं एका गृहस्थाजवळ म्हटलेलें प्रस्तुत लेखकास माहीत आहे. असेंब्लींतील वरील विषयावरील त्यांचें भाषण संपल्यावर सरकारचे फॉरेन सेक्रेटरी सर डेनिस ब्रे म्हणजे ज्यांनीं मूळ पब्लिक सेफ्टी बिल असेंब्लींत मांडलें त्यांचें भाषण झालें. त्यांनीं प्रारंभींच तात्यासाहेबांच्या संबंधी काढलेले उद्गार नमूद करण्यासारखे आहेत. ते म्हणाले,

"Ordinarily, Sir, when my honourable friend Mr. Kelkar gets up to speak I settle myself down in my chair for a delightful half hour. For, I greatly enjoy his charm of manner, his urbanity of speech, his delightful quips and literary anecdotes, his touches of humour, the tolerance and moderation of his views."

इंग्रजी भाषणापेक्षां त्यांचीं मराठी भाषणें अधिक सरस वठतात. आजपर्यंत त्यांचीं शेंकडों भाषणें मराठींत झालीं असतील व त्यांत उत्तमहि अनेक असतील. पण त्या सर्वांत अतिउत्कृष्ट म्हणून एका भाषणाचा उल्लेख करावयाचा असेल, तर तो १९२२ मध्यें यवतमाळ येथें स्वराज्यसंघाच्या परिषदेनिमित्त लो. टिळकांच्या स्मारकयोजनेवर त्यांनीं केलेलें भाषण होय. या भाषणाची रसिकवर्य श्रीमंत दादासाहेब खापर्डे व लोकनायक बापूजी अणे यांनीं खासगी रीतीनें कितीतरी प्रशंसा केली असल्याचें मीं ऐकिलें आहे. मराठींतून त्यांनीं अनेक नात्यांनीं भाषणें केलीं आहेत. अध्यक्ष नात्यानें भाषण असें त्यांनींच करावें असा त्यांचा लौकिक आहे. उपस्थित विषयाचा मोठ्या कौशल्यानें समन्वय करून शेवटीं सर्व मुद्द्यांचा समारोप करण्याची उत्कृष्ट कला तात्यासाहेबांना फारच श्रेष्ठ प्रतीची साधली आहे. वस्तुतः अध्यक्षाच्या भाषणाला फारसें महत्त्व नाहीं अशी सामान्य समजूत आहे; परंतु तात्यासाहेब यांनीं आपल्या विशिष्ट पद्धतीनें ही समजूत पार बदलून टाकली आहे. माहिती, मुद्देसूदपणा, नावीन्य, कोटिक्रम,

समतोलपणा, विनोद यांपैकीं कोणत्या ना कोणत्या गुणांनीं ते अगोदरच्या सर्व व्याख्यात्यांवर पुष्कळ वेळां ताण करतात. बडोद्यास भरलेल्या महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांचें तें अध्यक्षीय भाषण हा मराठी साहित्यांतील एक उत्कृष्ट मासला समजला जातोच, पण त्याखेरीज त्यांनीं त्या वेळीं श्रीमंत सयाजीराव महाराज यांजविषयीं गुणगौरवपर व आभारप्रदर्शक असें जें आयत्या वेळीं स्फूर्तीनें वेगळें भाषण केलें, तें कित्येक विद्वान् साहित्यभक्त आजहि नावाजीत आहेत. अध्यक्षाची साधी सूचना मांडणें किंवा अनुमोदन देणें अथवा उपवक्ता म्हणून बोलणें या गोष्टी अगदीं सामान्य आहेत. तरी या वेळीं सुद्धा त्या त्या प्रसंगाची मांडणी नवीन प्रकारानें करून ते श्रोत्यांचीं मनें नेहमीं हस्तगत करतात. ही त्यांची पद्धति महाराष्ट्रांत इतकी सर्वसामान्य झाली आहे कीं, तिचें अनुकरण अलीकडे सर्वत्र होऊं लागलें आहे. त्यांनी आपल्या भाषणशैलीनें श्रोत्यांच्या अभिरुचीस विशिष्ट वळण लावलें असल्यानें निदान पुण्यांतील श्रोत्यांवर छाप ठेवणें इतर पुष्कळ वक्त्यांना जड जातें. भव्य मुद्रा, मोठा आवाज, अस्खलितपणा, वीरश्री, अभिनय, इत्यादि गुणांनीं मंडित अशा वक्त्यांची महाराष्ट्रांत वाण नाहीं. वाण असेल तर ती संकल्पित विषया-वरील भरपूर माहितीची, अभ्यासाची, चिंतनाची, विचारशक्तीची व औचि-त्याची. श्रीसमर्थहि निराळ्या तऱ्हेनें असेंच सांगतात कीं——

> वक्तृत्वाचा अधिकार। अल्पास न घडे सत्योत्तर।।
> वक्ता पाहिजे साचार। अनुभवाचा ।।

वरील सर्व गुण फारच थोड्या वक्त्यांत असल्यानें तात्यासाहेब केळकर व इतर वक्ते एकाच व्यासपीठावरून बोलत असतां तात्यासाहेबांचेपुढें इतर वक्ते सहजच फिक्के पडावे, हें स्वाभाविकच आहे.

सार्वजनिक रीतीनें भाषणें करण्यांत तात्यासाहेबांच्या आयुष्याचीं ३०।३५ वर्षें गेलीं. त्यामुळें त्यांना या पद्धतीचा कंटाळा वाटूं लागल्यामुळें म्हणून बसून संभाषण करण्याच्या पद्धतीचाहि ते शक्य तेव्हां अवलंब करीत. संभाषणपद्धति याचा अर्थ असा कीं, मोंवतालीं बसलेल्या

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्र. ४७०८२ वि. चरित्र
क्र. ८८० ता. २८।१५।६७



लोकांनीं त्यांना निरनिराळ्या मुद्द्यांवर प्रश्न विचारावे व त्यांना तात्यासाहेबांनीं उत्तरें द्यावीं ही पद्धति विलायतेंत अवलंबण्यांत येते; पण ती साहजिकच फार अवघड आहे. कारण, श्रोता काय विचारील याचा नियम नसतो. त्याला दाही दिशा मोकळ्या; पण उत्तर देणाराला मोकळीक मुळींच नाहीं. त्यानें विचारल्या प्रश्नाला समर्पक उत्तर द्यावें, नाहींपेक्षां आपलें अज्ञान कबूल करावें. पण अशाचा परिणाम, श्रीसमर्थ म्हणतात, असा होतो कीं, "उत्तर विलंबीं पडलें। श्रोतयांस कळों आलें।। म्हणजे महत्त्व उडालें। वक्त्याचें।।" म्हणून ही पद्धति फारच अवघड, अतएव वक्त्याच्या परीक्षेची आहे. नेहमींच्या व्याख्यात्याला तशी अडचण नसते. त्यानें आपल्या मनाशीं विषय ठरवावा व तो तास दीडतास बोलून संपवावा. सदर विषयासंबंधानें श्रोत्यांना कांहीं शंका उरल्या असल्या तरी त्याची जबाबदारी व्याख्यात्यावर नाहीं. पण तात्यासाहेब ही सोपी वाट सोडून प्रश्नोत्तराची बिकट वाट पत्करितात, यांतच त्यांचा हजरजबाबीपणा, पक्वप्रज्ञता व आत्मविश्वास सिद्ध होतो यांत शंका नाहीं. आणि असे प्रसंग त्यांनीं ज्या ज्या वेळीं उपस्थित केले, त्या त्या वेळीं त्यांत त्यांनीं पूर्ण यशच मिळविलें.

'साहित्यसम्राट् केळकर यांच्या आठवणी'

या

ग्रंथांतील

# अर्पणपत्रिका

परमवंद्य-पवित्र भारतमातेस लाभलेल्या

**अभिनव श्रीस्वातंत्र्यलक्ष्मीस**

आणि

तदर्थ अवतरलेल्या व लहानपणापासून विशिष्ट

रीतीचें वळण लावून मातृभूमीची सेवा कर-

ण्यास मला स्फूर्ति दिलेल्या महनीय

**केसरी-मराठा संस्थेस**

ही 'नरसिंह' स्मृति-कुसुमांजलि कृतज्ञताबुद्धीनें

अर्पण केली आहे.

**—सदाशिव विनायक बापट**

आठवणीकार

## 'साहित्यसम्राट् केळकर यांच्या आठवणी'
## या ग्रंथाचे संग्राहक व संपादक श्री. बापट यांचें

# आत्मनिवेदन

मत्कथाश्रवणे श्रद्धा मदनुध्यानमुद्धव ।
सर्वलाभोपहरणं दास्येनात्मनिवेदनम् ।।
एवं धर्मैर्मनुष्याणामुद्धवात्मनिवेदनम् ।
मयि संजायते भक्तिः कोऽन्योऽर्थोऽस्यावशिष्यते ।।

—श्रीमद्भागवत

आपणास निवेदावें। आपण विवेकें नुरावें ।
आत्मनिवेदन जाणावें । याचें नांव ।।

—श्रीसमर्थ

कै. देशभक्त साहित्यसम्राट् नरसिंह चिंतामण ऊर्फ तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणींचा हा ग्रंथ आज त्यांच्या वर्षश्राद्धाच्या दिवशीं वाचकांस सादर करण्यास मला आनंद-दुःखमिश्रित आनंद होत आहे! वस्तुतः हें त्यांचें वाङमयश्राद्ध कोणा अधिकृत व्यक्तीकडून होतें तर तें योग्य झालें असतें व त्यामुळें मला विशेष आनंद झाला असता. तथापि आपल्या धर्म-कल्पनेप्रमाणें दिवंगत व्यक्तीच्या कुलांतील कोणीहि हें कृत्य करण्यास अधिकारी असतो. त्याप्रमाणें कै. तीर्थस्वरूप तात्यासाहेबांच्या सार्वजनिक किंबहुना राजकीय परिवारांतील एक अत्यंत विनम्र घटक मी आपणांस समजत असल्यामुळें, श्रद्धापूर्ण अंतःकरणानें करावयाचें हें वाङमयश्राद्ध करण्याचें पुण्य माझ्या वांटयास आलें हें मी माझें भाग्यच समजतों.

हें सत्कर्म करण्याचें पुण्य मला लाभेल अशी मला कल्पना नव्हती. कारण खुद्द तात्यासाहेब यांस अशा प्रकारची योजना मुळींच अभिप्रेत

नव्हती, व त्यांचा स्वभाव लक्षांत घेतां असें असणें हें अगदीं स्वाभाविकच होतें. लो. टिळकांच्या आठवणींच्या पहिल्या खंडास त्यांनीं प्रस्तावना लिहिली आहे. त्या ग्रंथाची त्या वेळीं जाहिरात मीं 'केसरीं' त दिली; तींत त्यांच्या नांवामागें 'साहित्यसम्राट्' असें उपपद मीं लिहिलें होतें. 'केसरी' च्या सदर जाहिरातीचें स्टीरिओ केलेलें पान त्यांनीं आदल्या रात्रीं सहज पाहिलें. जाहिरातींतील 'साहित्यसम्राट्' हा शब्द पाहून त्यांना राग आला व तेवढा तो शब्द त्यांनीं छिन्नीनें उडवून लावला! दुसऱ्या दिवशीं सकाळीं मी 'केसरी' पाहतों तों हा प्रकार दिसला. चकित झालों. चौकशी करतां तात्यासाहेबांकडे बोट दाखविण्यांत आलें. त्यांस विचारतां ते म्हणाले, "अहो माझा स्वभाव तुम्हांस माहीत आहे. माझ्या माणसानें, माझ्या पत्रांत, माझी अशी स्तुति करणें बरोबर आहे का? हें मला बिलकूल मंजूर नाहीं; म्हणून मी तो शब्द काढून टाकला." "प्रभवो ह्यात्मन: स्तोत्रं जुगुप्सन्त्यपि विश्रुता:" (समर्थपुरुष आपल्या वर्णनीय गुणाचीहि स्तुति करवीत नाहींत; ती ऐकण्याचा त्यांस कंटाळा येतो.) हें श्रीमद्भागवतांतील वचन तात्यासाहेबांना कसें लागू पडतें तें दिसून येतें. अर्थात् अशा विनयसंपन्न पुरुषाला प्रस्तुत ग्रंथासारखा प्रयत्न कसा मंजूर होणार? आत्मस्तुतीसंबंधानें ते स्वत: जरी इतके विनयसंपन्न होते, तरी त्यांच्या सार्वजनिक मताविषयीं कोणीं कांहींहि टीका करूं नये अगर बरें वाईट म्हणूं नये असा त्यांचा स्वभाव नव्हता; अथवा स्वत:विषयीं मतप्रदर्शन करण्यांत ते पाय मागें घेत असें मुळींच नव्हतें. त्यांच्या या स्वभावाविषयीं माझा विचार मी रस्किनच्या शब्दांतच व्यक्त केलेला बरा. तो म्हणतो—

"The first test of a truly great man is his humility. I don't mean by humility, doubt of his power or hesitation in speaking his opinions, but a right understanding of the relation between what he can say and do and the rest of the world's sayings and doings."

## तात्यासाहेब म्हणतात, ‘ हें मला मंजूर नाहीं ’

तात्यासाहेब यांनीं एके ठिकाणी म्हटलें आहे कीं, “ स्वतःचें मूल्यमापन स्वतःच करणें यासारखी कठीण पण आवश्यक गोष्ट दुसरी नाही, ” आणि याप्रमाणें त्यांनीं हें कठीण व आवश्यक कार्य करून दाखविलें आहे. तें म्हणजे त्यांचें आत्मचरित्र होय. “ गतगोष्टी अर्थात् माझी जीवनयात्रा ” हा त्यांचा ग्रंथ छापून त्याची पहिली प्रत त्यांच्या टेबलावर आलेली मीं पाहिली; तेव्हां त्यांस मी हंसत हंसत सहज पण जरा लावून बोलण्यासारखें साभिप्राय म्हणालों, “ स्वतःच्या वाङमयाचे सर्व प्रकार आपल्या हातानेंच प्रसिद्ध करीत आहांत. आतां त्यांत आपल्यासंबंधानें करण्यासारखें दुसऱ्यास कांहींहि उरूं देण्याचा आपला बेत दिसत नाहीं, असेंच ना समजावयाचें ? ” हें ऐकून थोडे गोरेमोरे होऊन त्या महामर्मज्ञ पुरुषानें चटकन् उत्तर दिलें, “ समजलों; दुसऱ्यास आपणासंबंधानें प्रसिद्ध करण्यासारखें कांहींहि ठेवूं नये असें मीं ठरविलें तरी तुमच्यासारखीं कांहीं हट्टी माणसें नियम मोडून आपला हट्ट पुरविणार नाहींत कशावरून ? मला ही भीति आहेच ! ” असें म्हणत त्यांनीं तो आत्मचरित्राचा ग्रंथ उघडून त्यांतील विशिष्ट मजकुरावर बोट ठेवून मला त्यांनीं वाचण्यास सांगितलें. तो मजकूर असा :—“ उद्यां माझ्या पश्चात् आधुनिक चरित्रकोशांत ग्रंथकार, वर्तमानपत्रकार, राजकीय पुढारी या नात्यांनीं माझ्या चरित्राचा थोडाफार उल्लेख होण्याचा संभव आहे, ही गोष्ट विनय सोडल्याशिवायहि मला नमूद करण्यास हरकत वाटत नाहीं. तेव्हां अशा प्रसंगीं माझी साधार माहिती जितकी अधिक प्रसिद्ध होईल तितकें बरें. कारण मग कल्पना चालवून मजविषयीं कोणींहि कांहींहि लिहावें असें तरी घडणार नाहीं. अनेक सार्वजनिक स्वरूपाच्या गोष्टी, या एकप्रकारें निमसार्वजनिक महत्त्व महाराष्ट्रांतील एक पुढारी या नात्यानें मला अखेर–अखेर आलें होतें, असें मीं मानलें तर मी गर्विष्ठ किंवा अहंकारी बनलों असें कोणी मला म्हणेल असें वाटत नाहीं. मग असल्या गोष्टींसंबंधानें कोणी तरी कांहीं तरी सांगितलेली अर्धवट बातमी, हकीकत, आठवण, माझ्या पश्चात् प्रसिद्ध होणें यांत इतर कोणाचा फायदा नसून माझा मात्र तोटा आहे. तो वांचावा याकरितां या आत्मवृत्तासारखें कांहींतरी लिहून ठेवणें बरें अशी कल्पना

दृढ झाली." हा मजकूर वाचून संपतांच झटकन मी त्यांस म्हणालों, 'पण शेवटीं असें एक दालन शिल्लक राहीलच कीं, ज्याचा आपणांस कांहीं केल्या उपयोग करतां येणार नाहीं; तो इतरांनींच करावा !' हें ऐकून माझी समजूत पटेल अशा स्वरांत गंभीर मुद्रेनें ते म्हणाले, "आलें; माझ्या लक्षांत आलें; तुमच्या मनांत काय आहे तें मी समजलों. छे, तसें कांहीं होऊं नये. माझी ती योग्यता नाहीं. फक्त टिळकच त्यास योग्य. त्यांच्या जोडीस बसण्याला निराळीच पात्रता लागते. निदान मी तरी त्यास पात्र नाहीं. बाकी हेंहि मी बोलणें व्यर्थच आहे म्हणा. कशाला भविष्यकाळाच्या पोटांत आपण शिरा !"

## प्रस्तुत ग्रंथाचें कारण

पुराणांत अशी कथा आहे कीं, प्रभुरामचंद्राच्या नांवाचा महिमा म्हणून त्याच्या नांवानें इतरांनीं पाण्यांत टाकलेले दगड तरंगले व संकल्पित कार्य झालें; पण प्रत्यक्ष त्यानें टाकलेला दगड बुडाला ! या गोष्टींतील रहस्य तात्यासाहेबांच्या बाबतींतहि प्रतीत होते ! स्वतःसंबंधानें कांहींतरीच मोजमाप घेणाऱ्या या थोर पुरुषाची वरील विचारसरणी लक्षांत घेऊन, त्या अत्यंत विनयशील, गुणी, परोपकारी व खऱ्या देशभक्त पुरुषासंबंधानें प्रस्तुत ग्रंथासारखा प्रयत्न न करणें म्हणजे एकतर कृतघ्नपणाचें पाप समाजानें आपल्या माथीं घेण्यासारखें आहे; इतकेंच नव्हे तर, त्यांच्या ठायीं असलेल्या सद्गुणसंपदेचें संरक्षण व जोपासना करून पुढील पिढ्यांस तिचा लाभ न देतां ती विस्मृतीच्या व उपेक्षेच्या मातींत मिसळविण्यासारखें आहे ! आणि हें पाप आपल्या राष्ट्रानें आजपर्यंत कांहीं थोडेंथोडकें केलेलें नाहीं. पण ही जाणीव सुदैवानें आतां सर्वत्र उत्पन्न झाली आहे ही समाधानाची गोष्ट होय. कै. तात्यासाहेब हे लोकमान्यांचे पट्टशिष्य व अंतेवासी होत. त्यांचें सार्वजनिक जीवन लोकमान्यांच्या जीवनांत अनुस्यूत आहे; किंबहुना लोकमान्यांच्या सार्वजनिक जीवनापैकीं फार मोठा भाग तात्यासाहेबांच्या साहाय्यानें व्यापलेला आहे. या दृष्टीनें तात्यासाहेबांचें सार्वजनिक जीवन हें लोकमान्यांच्या सार्वजनिक जीवनाचें पूरक असल्यामुळें, त्यांचें चरित्र जनतेच्या पुढें आल्याशिवाय लोकमान्यांचें चरित्र पूर्ण होणार नाही, याहि

दृष्टीनें प्रस्तुत ग्रंथाचा उपक्रम होणें क्रमप्राप्तच आहे. शिवाय तात्यासाहेबांचें चरित्र हें लोकमान्यांच्या चरित्राला पूरक असलें तरी, तात्यासाहेब या महनीय व्यक्तीच्या दृष्टीनेंहि पण त्यांचें स्वतंत्र असें स्थान आहे यांत शंका नाहीं. तात्यासाहेबांच्या चरित्रापैकीं निम्मा भाग लोकमान्यांच्या चरित्रांत समाविष्ट होतो, तसा त्यानंतरचा भाग अगदीं स्वतंत्र होतो; व त्यांतील सर्व कार्यकर्तृत्व त्यांचें स्वतःचें ठरतें. तात्यासाहेबांच्या कार्याचा व्याप फार दांडगा होता. वाङ्मयदृष्टचा तर लोकमान्यांच्यापेक्षांहि तात्यासाहेबांचा व्याप अधिक होता असें म्हणण्यांत अतिशयोक्ति होणार नाहीं. तात्पर्य, तात्यासाहेबांसारखा सर्वगामी, सर्वव्यापी पुरुष महाराष्ट्रांत गेल्या अर्धशतकांत न्या. रानडे यांच्याशिवाय दुसरा कोणी झाला नाहीं अशी एका थोर गृहस्थानें अनेक वेळां केलेली घोषणा सर्वश्रुत आहेच. पण विशेष नवलाची व चटका लागण्यासारखी गोष्ट म्हणजे त्यांच्या जीवितयात्रेंतील शेवटच्या अंतकालाच्या प्रसंगाची होय. 'अनिष्टं सर्वभूतानां मरणं नाम भारत । मृत्युकाले हि भूतानां सद्यो जायति वेपथुः ।' भीष्म धर्मराजाला सांगतात, 'खरोखर कोणत्याहि प्राण्याला मरण नकोसें वाटतें. मृत्युकाळ जवळ आला कीं, सर्वांना कांपरें भरतें.' पण या वचनाविरुद्ध तात्यासाहेबांचें मृत्युसमयीं धीरोदात्त वर्तन दिसून आलें. कारण या पुरुषाला काल-पुरुष दिसूं लागतांच त्यांनीं एखाद्या सिद्धकोटींतील पुरुषाप्रमाणें केलेलें वर्तन पाहून सर्वांच्या तोंडून धन्योद्गार निघाले ! आणि म्हणूनच श्रीसमर्थ म्हणतात, मरणाचें स्मरण असावें । मरोन कीर्तीस उरावें । येणेप्रकारें ॥ (स्वतःच्या मृत्यूच्या बाबतींत आत्मवृत्ताच्या प्रस्तावनेंत व प्रस्तुत ग्रंथाच्या पान ४९६ वर तात्यासाहेब यांनीं काढलेले उद्गार चिंतनीय असल्यामुळें त्यांकडे मी वाचकांचें लक्ष वेधितों.)

### ग्रंथ करण्यास पात्र कोण ?

अशा सत्कीर्तीच्या 'नरा'च्या संबंधानें आपलें कर्तव्य काय, याचा विचार त्यांच्या प्रेतयात्रेंत मी चाललों असतांना माझ्या डोक्यांत चालू होता. तो विचार अर्थातच प्रस्तुत ग्रंथाच्या योजनेबद्दलचा. वस्तुतः हें कार्य प्रारंभीं म्हटल्याप्रमाणें, गुरुवर्य तात्यासाहेब यांच्या कौटुंबियांकडून

म्हणजे त्यांचे मुलगे, मुली, पुतणे, बंधु, नातू, यांच्या हातून व्हावें अशी माझी मनापासून इच्छा होती. कारण अधिकार, विद्या, वाङमयप्रेम, रसिकता, सहृदयता, कळकळ, साधनानुकूलता आदि सर्व दृष्टींनीं ही मंडळी सत्पात्र असल्यामुळें हें कार्य त्यांच्या हातून नमुनेदार होईल, अशी माझी भावना होती. म्हणून त्यांच्याजवळ प्रथम मीं हा विषय काढला. त्यांच्याहि मनांत हा विषय घोळत होताच. पुढें या बाबतींत बराच विचारविनिमय करण्यांत आला. ती सर्वच मंडळी सुज्ञ, सुबुद्ध, विचारी, परिस्थितिप्रज्ञ व मजविषयीं प्रेम, कळकळ, सहानुभूति बाळगणारी असल्यामुळें अखेर त्या सर्वांनीं मिळून मीच हें कार्य अंगीकारणें सर्व दृष्टींनीं कसें उचित व सयुक्तिक आहे हें मला पटवून देण्याचा प्रयत्न केला व अखेर तें मलाहि मान्य झाल्यामुळें तें करण्यास मी आनंदानें प्रवृत्त झालों.

## तात्यासाहेबांची आशा खरी ठरली !

'आठवण' ही चीज अशी आहे कीं, जसजसा काळ जातो, तसतशी ती कापराप्रमाणें किंवा बर्फाप्रमाणें नाहीशी होते, मनुष्य ती विसरतो. हा सिद्धान्त व या कार्यातील पूर्वानुभव लक्षांत घेऊन ताबडतोब मीं या कार्यास प्रारंभ केला व पुढें आठ दिवसांतच म्हणजे दि. १८–१०–१९४७च्या 'केसरीं'त एतद्विषयक जाहीर विनंतिपत्रक प्रसिद्ध केलें. या पत्रकाकडे जनतेचें विशेष लक्ष वेधावें म्हणून तात्यासाहेबांच्याविषयीं विशिष्ट आत्मीयत्व बाळगणारे, लोकमान्यांचे पौत्र व दौहित्र म्हणजे अनुक्रमें रा. जयंतराव टिळक व रा. गणपतराव केतकर व शिवाय मी, अशांच्या नांवांनीं तें प्रसिद्ध करण्यांत आलें व महाराष्ट्रांतील ठळक अशा बहुतेक सर्व वृत्तपत्रांत तें छापण्यांत आलें. त्याचबरोबर निरनिराळ्या व्यक्तींशीं खासगी पत्रव्यवहारहि मीं सुरू केला. 'टिळक-आठवणी' ग्रंथांच्या वेळेपेक्षां या वेळीं आठवणी मिळण्याच्या बाबतींत फारच अनुकूल असा अनुभव आला, हें येथें प्रथमदर्शनींच जाहीर करण्यास मला आनंद होतो. त्या वेळीं ती कल्पना अगदीं नवीन होती; वाट मळावयाची होती. पण त्यानंतर गेल्या पंचवीस वर्षांत अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या आठवणी प्रकाशित होऊन हा प्रकार आतां आठवणी पाठविणारांच्याहि चांगलाच अंगवळणी पडला आहे

याचें मला प्रत्यंतर आलें. पंचवीस वर्षांपूर्वी लोकमान्यांच्या आठवणी मिळविण्यास जितके सायास पडले तितके या वेळीं न पडतां, कार्य बरेंच सुकर झालें, ही समाधानाची गोष्ट होय. या बाबतींत गु. तात्यासाहेब यांनीं त्या काळीं टिळक-आठवणींच्या पहिल्या खंडास लिहिलेल्या विद्वत्ता-प्रचुर ( लिटररी ) प्रस्तावनेंत व्यक्त केलेली आशा येथें नमूद करणें योग्य होईल. ते लिहितात—"आठवणी मिळविण्यास परिश्रम पडण्याचीं कारणें बापट यांनीं अनुमानिलीं तीं खरींच आहेत. तथापि त्यांतल्या त्यांत माझ्या मतें मुख्य कारण हेंच कीं, आठवणी स्मरणांत ठेवणें व त्यांचें महत्त्व मनाला पटवून त्या लिहिणें हा वाङ्मयव्यासंगाचा प्रकार आपल्याइकडे अगदीं अभिनव असून, तो लोकांच्या अंगवळणीं पडला नाहीं. वाङ्मय-लेखनाचा हा नवा प्रकार यानंतर रूढ होऊन तो वाढतच जाईल व पुढें येणाऱ्या अशा प्रकारच्या ग्रंथकारास तरी रा. बापट यांस पडले इतके परिश्रम पडणार नाहींत अशी आशा वाटते " तात्यासाहेब यांची आशा खरी ठरली, पूर्ण झाली ! शिवाय योगायोग असा कीं, प्रत्यक्ष त्यांच्याच बाबतींत हा अनुभव जाहीर करण्याचें भाग्य माझ्या वाट्यांस आलें !

## आठवणींचें वेड

काय कारण असेल तें असो; 'आठवण' चूष मला लहानपणा-पासूनच फार प्रिय आहे. विद्यार्थीदशेंतील गोष्ट मी सोडून देतों; पण वयाच्या एकोणिसाव्या वर्षापासून महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांच्या सान्निध्यांत माझे दिवस गेल्यामुळें, त्यांच्या बोलण्यांत आलेल्या व त्यांच्या समकालीन असलेल्या कांहीं गृहस्थांनीं सांगितलेल्या कै. सार्वजनिक काकांच्या थोड्या विशेष गोष्टी–आठवणी–मी त्या वेळीं टिपून ठेविल्या होत्या. पुढें आण्णासाहेब समाधिस्त झाल्यावर त्यांच्या संबंधींच्या कांहीं आठवणीहि मीं लिहून काढल्या व तें लहानसें चोपडें गु. तात्यासाहेब केळकर यांस दाखविलें होतें. पण अनेक अडचणींमुळें तें काम पडलें, तसेंच राहून गेलें व शेवटीं तें चोपडेंहि गहाळ झालें ! तात्पर्य, आठवणींचें हें माझें वेड असें फार जुनें आहे, एवढें सांगून त्याविषयीं माझी ममत्व भावना काय आहे. हें टेनिसनच्याच शब्दांत नमूद करतों. तो म्हणतो—

" As the dew to the blossoms,
The bud to the bee.
As the scent to the rose,
As those memories to me."
Tennyson

## आठवणींचें माहात्म्य व त्यांचा उपयोग

'आठवणी' या वाङ्मयविषयक प्रकारासंबंधानें लो. टिळकांच्या आठवणींच्या खंडद्वयास लिहिलेल्या आपल्या सुंदर प्रस्तावनेंत तात्यासाहेब केळकर व लोकनायक बापूजी अणे या उभयतांनीं तात्त्विकदृष्टया फार मार्मिक विवेचन केलेलें आहे. विशेषतः तात्यासाहेब यांनीं तर प्रत्यक्ष चरित्रापेक्षांहि 'आठवणी'च्या वाङ्मयप्रकारास जास्त महत्त्व दिल्याचें दिसून येतें. ते लिहितात, "प्रकरणवार लिहिलेला एखादा चरित्रग्रंथ वाचून चरित्रविषयाच्या कार्यक्षेत्राची सुसंगत व व्यापक कल्पना येऊं शकेल; पण त्याचा स्वभाव व त्याचे गुणदोष यांची कल्पना आठवणीवजा हकीकती किंवा संवादप्रसंग यांनीं जितकी येऊं शकते तितकी एखादें संपूर्ण चरित्र वाचल्यानेंहि कदाचित् येऊं शकणार नाहीं." तात्यासाहेब यांच्या तोलाचे पाश्चात्य ग्रंथकार यांचें तसेंच म्हणणें आहे. चॅनिंग लिहितो, 'One simple anecdote of a great man is worth a volumes of biography.' अखिल आंग्ल वाचकवर्गाला प्रिय व मान्य होऊन बसलेल्या बॉस्वेलचे असे उद्गार आहेत कीं, 'More knowledge may be gained of a man's real character by a short conversation with one of his servants than from a formal and studied narrative.' 'आठवणी'चें असें हें स्वयंभू माहात्म्य असलें तरी, त्यांचा ऐनजिनसी चरित्रग्रंथासच खरा उपयोग होणारा आहे. याच दृष्टीनें विलमॉट याचा अनुभव लक्षांत घेण्यासारखा आहे. तो म्हणतो. 'Occasionally a single anecdote narrated by any person opens a character: reminiscences enable the skilful hand to construct the skeleton.' अशाच प्रकारचे उद्गार खुद्द गु. तात्यासाहेब यांनीं लिहिलेल्या लो. टिळक यांच्या चरित्रग्रंथाच्या दुसऱ्या व तिसऱ्या खंडाच्या प्रस्तावनेंत त्यांनीं काढले आहेत. ते म्हणतात, "या ग्रंथांस बापट

यांच्या आठवणींच्या पुस्तकांचाहि उपयोग झाला आहे. आठवणींच्या तिन्ही खंडांच्या साहाय्यानें आणखी एका वेगळ्या रीतीनें टिळक-चरित्र कोणास लिहिण्याची स्फूर्ति झाली तर त्याला हें साधन उपयोगी पडण्यासारखें आहे." अनुभवाचे हे सर्व बोल लक्षांत घेऊनच आम्ही प्रस्तुत ग्रंथाबद्दल जें विनंति-पत्रक प्रसिद्ध केलें होतें त्यांत असेंच म्हटलें होतें कीं, "तात्यासाहेबांनीं स्वतःचें आत्मचरित्र लिहिलें असलें तरी, प्रसिद्ध होणाऱ्या त्यांच्या आठवणींच्या आधारानें त्यांचें एक स्वतंत्र चरित्र लिहिलें जावयास पाहिजे व तसें लिहिणारा लवकरच कोणी पुढें येईलहि!" ही आमची इच्छा पूर्ण होवो अशी प्रार्थना आहे.

## 'आठवणी' व 'आख्यायिका' यांची मीमांसा

प्रस्तुत ग्रंथ फक्त 'आठवणी'चा आहे; त्यास नांवहि तसेंच दिलें आहे. यांत आख्यायिकांचा समावेश करण्यांत आला नाहीं. 'लोकमान्य टिळकांच्या आठवणी व आख्यायिका' असें त्या ग्रंथाचें नांव होतें; व त्यांत थोडयाबहुत आख्यायिकांचा समावेश करण्यांत आलाहि. त्या वेळीं नुसत्याच आठवणी थोडया मिळतील असें प्रथम वाटलें, म्हणून त्या ग्रंथांची तशी सजोड योजना केली; पण त्या वेळींहि पुढें अनुभव असाच आला कीं, नुसत्या आठवणींचाच आला तसा मजकूर छापला असता तर, आणखी दोन-तीन खंड सहज भरले असते, व त्याशिवाय आख्यायिकांचा मजकूर वेगळाच! म्हणून हा पूर्वानुभव लक्षांत घेऊन व गु. तात्यासाहेबांविषयीं येणाऱ्या मजकुराचें क्षेत्र लक्षांत आणून त्यांच्या नुसत्या आठवणीच प्रसिद्ध करण्याचें ठरविलें. पक्वान्न ताटभर असल्यावर इतर पदार्थांची इच्छा कोण करतो? किंवा सुंदर हाराकरितां उत्कृष्ट सुवासिक फुलें भरपूर मिळाल्यावर, त्यांत घालण्यांत येणाऱ्या पाल्यास कोण विचारतो? शिवाय आख्यायिका ही किती झालें तरी 'आठवणी'ची चुलत-सावत्र बहीण! आख्यायिका म्हणजे फुगीर किंवा खोलगट भिंगाच्या आरशा-प्रमाणें असते. त्यांत खरें प्रतिबिंब कसें दिसणार? यासंबंधानें तात्यासाहेब केळकर यांनीं केलेली विचिकित्सा व दिलेला अभिप्राय मार्गदर्शक ठरतो. ते लिहितात "आठवण ही प्रथमतः घडलेली गोष्ट ज्यानें प्रत्यक्ष पाहिली त्यानेंच ती 'चक्षुर्वैसत्यं' म्हणून सांगितलेली असावी; ऐकीव माहिती प्रायः त्याज्यच.

निदान तशा प्रकारची आठवण ही दुय्यम प्रतीची समजावी. अशा दुय्यम प्रतीच्या आठवणींचा समावेश 'आख्यायिका' या सदराखालीं होऊं शकतो. परंतु आख्यायिकांना इतिहासाचें स्वरूप नसून बखरीचें स्वरूप असतें हें ध्यानांत ठेविलें पाहिजे. शिवाय आख्यायिका झाली तरी ती 'खुद्द पाहणारानेंच खुद्द मला सांगितली' येथपर्यंत तरी तिचा मुळाशीं प्रत्यक्ष संबंध असला पाहिजे. पण यापलीकडे जाऊन सांगोवांगीच्या नात्यांत चुलतपणाच्या जितक्या अधिक चुली येतील, तितकी सत्याची राख अधिक झालेली आढळेल. पुराव्याच्या दृष्टीनें म्हणजे शास्त्रीय सत्यकथनाच्या दृष्टीनें आख्यायिका, आठवणीपेक्षां गौणच ठरते." साहित्यसम्राटांच्या या अभिप्रायावरून आख्यायिका हें नांव वर्ज्य करून तें कलम या ग्रंथांत अजिबात गाळण्यांत आलें आहे.

## तात्यासाहेबांचें कार्यक्षेत्र

तात्यासाहेबांचें कार्यक्षेत्र विशाल व दीर्घकालीन असल्यामुळें सहस्रावधि लहान-थोर कार्यकर्त्यांशीं त्यांचा संबंध आलेला होता. नुसत्या एका पुण्यापुरतेंच बोलावयाचें तर गेल्या पन्नास वर्षांतील पुण्यांतील असें एकहि सार्वजनिक कार्य दाखवितां येणार नाहीं कीं, तात्यासाहेबांचा त्याच्याशीं प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष संबंध आलेला नाहीं. महाराष्ट्रांतील सार्वजनिक चळवळींविषयींहि असेंच स्थूलमानानें म्हणतां येईल. अशाच प्रकारचें विधान अखिल हिंदुस्थानासंबंधानें करणें केव्हांहि न्यायाचें व वस्तुस्थितीस धरून व्हावयाचें नाहीं हें खरें; तथापि 'मराठ्या'चे दीर्घकाल संपादक, लोकमान्यांचे प्रमुख साहाय्यक, वरिष्ठ कायदेमंडळाचे सभासद, राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य, स्वराज्यसंघाचे चिटणीस व तिच्या विलायतेंतील दीर्घकाल राष्ट्रीयतेंतील शिष्टमंडळाचे एक प्रमुख सभासद. लंडन येथील 'इंडिया' पत्राचे संपादक व तेथील गोलमेज परिषदेचे सभासद इत्यादि विविध नात्यांनीं अखिल भारताशीं व विलायतेशींहि त्यांचा संबंध आला होता. तसेंच वाङ्मयक्षेत्रांतील ग्रंथकार, वृत्तपत्रकार, नाटककार, कादंबरीकार, चरित्रकार, टीकाकार, इतिहासकार, तत्त्वज्ञानी, लेखक, लघुकथालेखक, प्रस्तावनालेखक, कवि इत्यादि विविध अंगांनीं त्यांनीं बहुमोल सेवा केली असल्यामुळें त्या त्या क्षेत्रांतील शेंकडों

व्यक्तींशीं त्यांचा निकट संबंध आला होता. याशिवाय मुख्य म्हणजे राजकारण, समाजसुधारणा, स्थानिकस्वराज्य संस्था, शैक्षणिक व इतर सार्वजनिक संस्था, विमाकंपन्या व बँका यांची स्थापना, व्यापार, साखरेच्या व इतर कारखान्यांची उभारणी इत्यादि राष्ट्रीय जीवनाची जीं अनेक अंगोपांगें आहेत त्यांतहि त्यांनीं आपलें बुद्धिसर्वस्व खर्च करून त्यांतील शेंकडों लोकांबरोबर कार्य केलें आहे. अशा प्रकारच्या विस्तीर्ण क्षेत्रांतील लोकाशीं पत्रव्यवहार करून व समक्ष गांठीभेटी घेऊन त्यांच्या आठवणी मिळविण्याचा मीं अटोकाट प्रयत्न केला आहे.

## आठवणी किती व कशा मिळाल्या ?

माझ्या शक्तिबुद्धीप्रमाणें मीं सुमारे दीड हजार लोकांचा ठावठिकाणा काढून त्यांस आपल्या आठवणी पाठविण्याबद्दल पुनः पुनः पत्रें लिहिलीं. तीं सुमारें २१०० झालीं व अशा रीतीनें पत्रव्यवहार करून सुमारें ५०० लोकांकडून आठवणींचा मेवा हातीं आला. प्रत्येकाला आपली वस्तु चांगली वाटणें हा मनुष्यस्वभावच आहे. पण हा मेवा निवडून पाहतां त्यांत अग्राह्य असा दुर्दैवानें सुमारें १२५ जणांचा निघाल्यामुळें तो सर्व बाजूस ठेवावा लागला! बाकी सुमारें ३७५ जणांचा मेवा निवडून, साफसूफ करून, वाचकवृंदास सादर करीत आहें. लोकमान्यांच्या आठवणींच्या तिन्ही खंडांकरितां १५६७ लोकांना ६००० पत्रें लिहून ७०० जणांकडून मजकूर मिळाला. देशभक्त तात्यासाहेबांच्या या ग्रंथाकरितां १५०० लोकांना ११०० पत्रें लिहून ५०० जणांकडून मजकूर आला. या फलनिष्पत्तीवरून कांहीं अनुमानें काढतां येतील. पण त्या खोल पाण्यांत मी शिरत नाहीं! तथापि येथें एकदोन गोष्टींचा निर्देश करणें आवश्यक आहे. तात्यासाहेब कालवश झाल्यावर अनेक वृत्तपत्रांत व मासिकांत त्यांच्या मृत्युलेखांबरोबर त्यांच्या आठवणीहि प्रसिद्ध करण्यांत आल्या. कांहीं नियतकालिकांचे विशेष अंक निघून त्यांत आठवणीचें मुख्य सदर घालण्यांत आलें होतें. अशा रीतीनें बऱ्याच जणांच्या बऱ्याच आठवणी प्रसिद्ध होऊन गेल्या. एकदां इतरत्र प्रसिद्ध झालेली आठवण प्रस्तुत ग्रंथांत घ्यावयाची नाहीं असा माझा दंडक असल्यामुळें, त्या पाठविणारांना तो मजकूर साभार परत पाठविण्यांत आला. पण यामुळें त्यांची मजवर इतराजी होऊन

मलाहि त्या मजकुरास मुकावें लागलें ! कांहीं गृहस्थांनीं पूर्वीं प्रसिद्ध कोठें न केलेल्या आपल्या आठवणी पाठविल्या ; पण त्याबरोबरच्या पत्रांत ठासून लिहिलें कीं, " आमच्या मजकुरावरून संपादकीय लेखणी फिरतां कामा नये, त्यास बिलकूल धक्का लावतां कामा नये. मजकूर आहे तसाच छापण्यांत आला पाहिजे ! " मजकूर चांगला व निरपवाद असला तर तो संपादकास हवाच असतो; किंबहुना तो उत्तम असल्यास जशाचा तसा घेण्यास त्यास आनंदच होतो. पण जर मजकूर जशाच्या तसा घेतला असता तर संपादकावर खुशाल अब्रूनुकसानीचे व राजद्रोहाचे खटले भरण्यास पंचाईत पडती ना व तशींच इतर खेंकटींहि निर्माण झाल्याशिवाय राहतीं ना ! म्हणून तो मजकूर साभार परत करणें भाग पडलें वर दिलेल्या कारणांमुळें आठवणी व त्या देणाऱ्यांची संख्या थोडीबहुत कमी होऊन एकंदर ग्रंथावर त्याचा कांहींसा परिणाम व्हावा हें अगदीं स्वाभाविक होय.

पण उलटपक्षीं सांगावयाचें तर, अशीहि कांहीं मंडळी भेटलीच कीं, 'यत् रोचते तत् ग्राह्यम् । यन्न रोचते तत् त्याज्यम् ।' असें म्हणून विश्वासपूर्वक त्यांनीं आपल्या आपल्या आठवणींचा मजकूर माझ्या हवाली केला व त्या बाबतींत एक अक्षरहि न बोलतां त्याची सर्व जबाबदारी त्यांनीं मजवरच टाकिली ! अर्थात् त्याचा योग्य तो परामर्श घेण्यांत आला हें सांगावयास नकोच. तसेंच विशेष विश्वासाच्या व अगत्याच्या कांहीं मंडळीकडून आठवणी मिळणार अशी माझी खात्री होतीच. त्याप्रमाणें त्यास विचारतां, 'आपण मजकूर देणार आहों, पण तो दमानें पुढें सावकाश देऊं', असें त्यांचें म्हणणें पडलें. पण अनेक कारणांस्तव मला दम निघत नसल्यामुळें त्यांचें हें म्हणणें मीं न ऐकतां, त्यांच्यामागें लागून त्यांजकडून मीं अखेर मजकूर मिळविला. पण दुर्दैवानें, तो ग्रंथरूपानें प्रसिद्ध झाल्याचें पाहण्यापूर्वींच त्यांनीं उदाहरणार्थ डॉ. मुंजे, गु. भाऊसाहेब लवाटे, रा. बाबूराव साळवेकर, श्री. लक्ष्मीबाई कोल्हटकर यांनीं इहलोक सोडला ! यामुळें माझ्या जिवास हळहळ लागून राहिली यांत शंका नाहीं. असो.

कांहीं अवघड ठिकाणचा मजकूर केवळ पत्रव्यवहारानें मिळणें कठीण होतें, व तीं ठिकाणें तर विशेष महत्त्वाचीं असल्यामुळें त्याकरितां हिंडावें

लागलें. प्रवास करावा लागला. त्या त्या व्यक्तीकडे पुनः पुनः गेल्यानें त्यास होणाऱ्या त्रासामुळें त्यांजकडून झालेला अपमान गिळावा लागला व स्वतःच्या क्वचित् तत्त्वभ्रष्टतेकडेहि कानाडोळा करणें प्राप्त झालें. पण आपला इष्ट हेतु साधण्याकरितां 'न जावेंचि तेथेचि लागेल जावें। वदावेंचि लागेल तेंचि वदावें।' अशी स्थिति पत्करावी लागेल ही मनाशीं खूणगांठ मीं प्रथमच बांधली होती. पण नमूद करण्यास आनंद वाटतो कीं, या प्रयत्नांतहि, माझ्या अपेक्षेपेक्षांहि; जास्त यश मला मिळालें.

## विचित्र अनुभव !

पण 'मान सांगावा जनांत, अपमान सांगावा मनांत,' या म्हणींतील पहिल्या तत्त्वान्वयें वर उल्लेख झाला. आतां दुसऱ्या तत्त्वान्वयें उल्लेख खालीं होत असला तरी तो स्वगत आहे असेंच समजावें ! निदान मी तरी असेंच समजतों. तात्यासाहेबांचा गोड स्वभाव, त्यांची थंड व प्रशांत वृत्ति, त्यांची समतोल दृष्टि, त्यांची खिलाडू वृत्ति, त्यांची निर्लेप व पक्षनिरपेक्ष परोपकारिता व त्यांचें अजातशत्रुत्व यामुळें त्यांच्या आठवणी मिळविण्यास फारशी पंचाईत पडेल असें मला प्रथम वाटलें नाहीं; कोणाकडूनहि नाखुषी येईल अशी कल्पना झाली नाहीं व विरोध होईल हें ध्यानींमनींहि आलें नाहीं, पण अशा दुर्दैवानें प्रत्यक्ष अनुभव मात्र थोडा उलट आला खरा ! हें कार्य करीत असतां, कोठें विश्वासाच्या उंच जागेवर हेवा-मत्सर-अहंकाराचे तृणाच्छादित खळगे दिसले, कोठें कृतज्ञतेच्या प्रकाशाऐवजीं कृतघ्नतेचा काळोख पाहावयास सांपडला, कोठें निःपक्षत्वाच्या मऊ बैठकीऐवजीं पक्षाभिमानाचे कांटे बोचले, कोठें सहकारितेच्या गोड झऱ्याच्या जागीं विरोधाचे खारट प्रवाह अनुभवास आले व कोठें तर फक्त कामापुरते स्वार्थी मामा भेटले ! तात्यासाहेबांच्या हयातींत वर वर्णन केलेल्या जातींच्या लोकांचें वर्तन त्यांच्याशीं कसें होत असे व त्यांचें सौजन्य आणि परोपकारिता यांची लूट अशा लोकांनीं कशी केली हें मीं प्रत्यक्ष पाहिलें असल्यामुळे, स्वाभाविकच त्यांच्याकडे मी मोठ्या आशेनें गेलों. पण या वेळीं तावातावानें त्यांनीं काढलेले उद्गार व मला दिलेलीं उत्तरें ऐकून मी अगदीं थिजूनच गेलों; नमुन्याकरितां त्यांपैकीं फक्त एकाचाच येथें उल्लेख करतों. एक

'सत्पुरुष' म्हणाले, "तुम्ही आठवणी जमविल्या, अधिनायिका गोळा केल्या; आतां फक्त 'आफवा' तेवढ्या राहिल्या; त्या प्रसिद्ध करा म्हणजे जन्माचें सार्थक झालें!!" अशा प्रकारचे आहेर स्वीकारून, पण तोंड न उघडतां, 'नीच उत्तर साहाणें। प्रत्योत्तर न देणें॥' हा सद्‌गुरूंचा उपदेश आठवून मी गप्प वसलों व 'Everyone salutes the rising sun, but he is rare who salutes the setting sun" ही असलेली जगाची स्वाभाविक प्रवृत्ति लक्षांत घेऊन अशा लोकांशीं बुद्धिवाद न करतां अगर संबंध न ठेवतां, 'उदंडाचें उदंड ऐकावें। परि तें प्रत्ययें पाहावें। खरें खोटें निवडावें। अंतर्यामीं॥' असा बोध घेऊन मीं मनाचें सांत्वन केलें!!

तात्यासाहेबांशीं कोणत्या ना कोणत्या कारणामुळें विशेष संबंध आलेल्या अगर परिचय असलेल्या गृहस्थांना आठवणी देण्याबद्दल मी समक्ष विनंती करी अगर पत्रें पाठवीं. त्यांत ज्यांच्याकडून त्या देण्याबद्दल प्रथमच नकार मिळे, त्यांना अर्थातच पुन्हा विचारण्याचें कारणच नसे. पण ज्यांच्याकडून आरंभींच होकार येई त्यांच्याकडून मात्र त्या मिळेपर्यंत त्यांचा नाद मी सोडत नसे. कारण मला वाटे, सहजासहजीं त्यांच्याकडून मजकूर न आल्यानें आपण तो नाद सोडला तर न जाणों, कदाचित् त्यांत एखादी महत्त्वाची गोष्ट अगर एखादा अति मौल्यवान् प्रसंग राहून जावयाचा! याच केवळ विचारानें भारून जाऊन मजकूर पदरांत पडे-पर्यंत, समक्ष गांठी-भेटी घेऊन अगर पत्रव्यवहार एकसारखा चालू ठेवून त्यांचा पिच्छा मी पुरवीत असे. तथापि याहि बाबतींत दुर्दैवानें मी तोटका पडलों व मला अखेर कांहीं ठिकाणीं हार खावी लागली हें मी कबूल करतों! श्रीयुत प्र. के. अत्रे, विद्वद्वर्य प्रो. रामभाऊ रानडे, दे. भ. अच्युतराव पटवर्धन, दे. भ. स. का. पाटील अशांसारख्या नामवंत बऱ्याच जणांपैकीं प्रत्येकास मी स्वतः कमींत कमी सात-आठ पत्रें पाठविलीं. शिवाय त्यांच्यावर वजन पडेल अशा थोर गृहस्थांचा वशिला लावून त्यांच्याकडूनहि त्यांस विनंती करविली. पण उपयोग झाला नाहीं, यश आलें नाहीं! रा. अत्रे समक्ष मला म्हणाले, "बापट, आंतां मात्र मी तुमचा अंत पाहात नाहीं. दोन-तीन दिवसांत मजकूर न चुकतां पाठवितों. पण दुर्दैवानें अखेर तो हातीं पडला नाहीं तो नाहींच!! तसेंच देशांतील

अव्वल दर्जाच्या अनेक थोर गृहस्थांकडून आठवणी पाठवण्याबद्दल प्रथम तत्परतेनें अनुकूल उत्तरें आलीं. पण राज्यकारभार अंगावर पडून त्या कामाच्या दडपणाखालीं सापडल्यामुळें असलें काम करण्यास त्यांस उसंत होत नसावी असेंच अखेर मला दिसून आलें व त्याप्रमाणें कांहींनीं मला कळविलेंहि. याहिमुळें माझी मोठी निराशा झाली. तात्पर्य प्रस्तुत ग्रंथांत ज्या कोणा थोरा-मोठ्या माणसाचें नांव आठवणी देणारांत नसेल त्यांस विनंती न केल्यामुळें त्यांच्याकडून मजकूर आला नाहीं असें न समजतां, त्यांच्या बाबतींत विश्वप्रयत्न होऊनहि तो येऊं शकत नाहीं, असेंच वाचकांनीं नि:संशय समजावें अशी माझी विनंती आहे. तसेंच, तात्यासाहेब यांचा विलायतेंतील प्रमुख लोकांशीं संबंधहि थोडाथोडका आला नव्हता. लोकमान्यांच्या आठवणींच्या वेळीं विलायतेंतील त्यास परिचित अशा प्रत्येक व्यक्तीशीं मला पत्रव्यवहार करावा लागला. पण सुदैवानें या वेळीं लंडन येथें माझे जुने मित्र रा. दत्तोपंत ताम्हनकर हे 'केसरी' चे प्रतिनिधि म्हणून वास्तव्य करीत असल्यामुळें त्यांच्यावर मीं हें काम सोंपविलें. यामुळ माझे ते श्रम वांचले. मला माहीत असलेल्या तिकडील लोकाच्या नांवांची विस्तृत यादी तेवढी मीं त्याच्याकडे पाठविली. पण दरम्यानच्या महा-युद्धाच्या प्रलयामुळें व विशेषत: बराच काळ लोटल्यामुळें बहुतेक मंडळी दिवंगत झाली असल्याचें त्यानीं कळविलें. तथापि विद्यमान लोकांचा पत्ता-सुगावा लावून त्यांच्याकडून मजकर मिळविण्याचा त्यांनीं बहुत प्रयत्न केला हें नमूद करण्यास आनंद होतो.

## भयंकर उल्कापात व त्याचे परिणाम

अशा रीतीनें आठवणी मिळविण्याचें काम तीन महिने सतत एक-सारखें चालू होतें. एवढ्या अवधींत हाताशीं इतका मजकूर आला कीं, तो पाहून ११ मार्चला येणाऱ्या पाडव्यास हा ग्रंथ प्रसिद्ध करावा असें वाटूं लागण्यापर्यंत मजल गेली! कारण आम्ही प्रसिद्ध केलेल्या जाहीर विनंतिपत्रकांत असें म्हटलें होतें कीं, "सदर आठवणी पुरेशा हातीं येतांच लगेच त्या ग्रंथरूपानें छापून प्रसिद्ध करण्याचें काम आम्ही हातावेगळें करणार आहों. त्यासाठीं एखाद्या विशिष्ट ठरीव कालाची अगर प्रसंगाची

वाट न पाहण्याचाहि आमचा मानस आहे." हा संकल्प सिद्धीस जाण्याचा काल आम्हांस स्पष्ट दिसूं लागला. पण दुर्दैवाची गोष्ट अशी कीं, ३० जानेवारीस देशांत येवढा अभूतपूर्वक, भयंकर उल्कापात झाला—महात्मा गांधींचा वध झाला—व त्यानें देश हादरून गेला ! लोकक्षोभाच्या ज्वालामुखी पर्वताचें रौद्र रूप प्रकट झालें. प्रत्यक्ष पुणें शहरांत दंगल झाली व तींत टिळक-मंदिरहि सांपडलें ! या मंदिराच्या कचेरींतच आठवणींचें कामकाज मी करीत असें. दंगेखोरांनीं टिळक-मंदिराच्या आंत व बाहेर आग पेटविली. ती पाहून मी बेभान झालों ! तशा स्थितींत मी तेथें गेलों व टिळक-मंदिराच्या मौल्यवान् कागदपत्रांच्या दप्तरांत आठवणींचें सर्व साहित्य बांधून टांगा अगर मजूर न मिळाल्यामुळें, तें भलेंमोठें जड दप्तर डोक्यावर घेऊन बाहेर पडलों. तें घेऊन घरीं येण्याची सोयच नव्हती ! म्हणून टिळक-मंदिराजवळील विश्वासाच्या एका मित्राच्या घरीं तें ठेवण्यास गेलों. त्यांनीं सांगितलें, 'तुमचा हा जळका वासा येथें ठेवूं नका !' म्हणून दुसऱ्या स्नेह्याकडे गेलों. ते म्हणाले, 'आतांच आमच्या घराची झडती झाली; पुनः होण्याचा संभव आहे; तुमचा तुम्ही विचार करा.' म्हणून तिसऱ्या स्नेह्याकडे गेलों. त्यांचें घर आज पेटविलें जाण्याचा संभव आहे असें तेथें कानावर आलें ! जसें, कोणी पाठीशीं लागल्यास कावरीबावरी होऊन मांजरी तोंडांत पिल्लू घेऊन त्यास ठेवण्यास निवाऱ्याची जागा शोधते तशी माझी गत झाली ! अखेर एकदाचें सुरक्षित ठिकाणीं तें दप्तर ठेविलें. तेव्हां माझा जीव भांड्यांत पडला !

## प्रतिकूल परिस्थिति

देशांतील या भयंकर प्रकाराचा सर्वच व्यवहारावर परिणाम झाला तसा माझ्या या कार्यावरहि झाला असल्यास नवल नाहीं. स्तब्धता, नैराश्यता, उदासीनता, अविश्वास यांच्या कुंद व रोगट वातावरणांत कांहीं दिवस गेले. पुढें आस्ते आस्ते तें कमी झालें. संकटांचे ढग वितळूं लागले, आशेचा वारा वाहूं लागला व सत्कर्माचा सूर्य प्रकाशला. म्हणून मी माझ्या कार्यास पुन्हा सुरुवात केली. पण आतां मात्र दुर्दैवानें निराळाच अनुभव येऊं लागला. पत्रव्यवहार व गांठीभेटी यांचा उपयोग होईनासा झाला;

नवीन मजकूर मिळणें बाजूसच राहिलें; उलट मिळालेला मजकूर कांहीं अति नाजूक प्रकृतीच्या लोकांनी परत मागितला!! ३० तारखेपूर्वी मजकूर पाठविण्याच्या बाबतींत वचनबद्ध झालेल्या कांहीं शिष्टांनीं "आतां तुम्हास आठवणी पाठविणें शक्य नाहीं" असें रागानें कळवून अंग झाडून टाकलें! अशांतच कांहीं स्वकीयांपैकीं, कोणीं घाबरटपणानें, तर कोणी वैषम्यबुद्धीनें प्रस्तुतचा हा प्रयत्न मीं आतां अजीबात सोडून द्यावा असा खासा पोक्त सल्ला दिला!! या शल्यनीतीचा कितपत उपयोग झाला हें सांगणें सोडून दिलें तरी, ग्रंथाच्या एकंदर स्वरूपावर वरील परिस्थितीचा थोडाबहुत परिणाम होणें अपरिहार्यच होतें. हातीं आलेल्या व येऊं घातलेल्या मजकुराच्या प्रमाणावरून जेथें ६००–६०० पृष्ठांचे दोन खंड निघावेत असा प्रथम माझा अदमास होता, तेथें ६०० पृष्ठांचा एकच खंड प्रसिद्ध करावा अशी परिस्थिति निर्माण झाली व त्याचप्रमाणें करावें, असें अखेर ठरवावें लागलें! तदनुसार कागदाची परवानगी देण्याबद्दल सरकारकडे अर्ज करण्यांत आला. पुढें देशांतील राजकीय वातावरण जसजसें निवळत चाललें, तसतसें आठवणी मिळविण्याचा पुनः चालविलेल्या प्रयत्नास यश येत चाललें. फार काय, पण प्रस्तुत आत्मनिवेदनाचा मजकूर लिहीत असतांहि अजून आठवणी येण्याचा प्रवाह चालूंच आहे! यामुळें संकल्पित ६०० पानांत सर्व मजकूर बसणार नाहीं या भीतीनें पुनः जास्त पृष्ठें छापण्याकरितां सरकारची परवानगी मागितली व १२० पृष्ठें जास्त छापण्यास ती मिळाली. अशा रीतीनें मजकूर व पानें यांचा पाठशिवीचा खेळ चालू असतां, "घट्ट झालें पाणी घाल, पातळ झालें पीठ घाल" या ग्राम्य महिला-म्हणीची आठवण झाल्याशिवाय राहिली नाहीं!

## संपादकीय संस्कार

तथापि अशा प्रकारच्या ग्रंथांतील मजकुरावर संपादकीय हात फिरला जाणें आवश्यकच असतें; आणि प्रस्तुत ग्रंथाच्या बाबतींत तर तो हात दमेपर्यंत त्यास काम करावें लागलें! ग्रंथांतील जागेची मर्यादा, औचित्य, महत्त्व, अभिरुचि वगैरे लक्षांत घेऊन, तारतम्यबुद्धि चालवून, निःपक्षपाती मनानें मजकुरास नाइलाजास्तव कात्री लावावी लागली. कित्येकांच्या मज-

कुराचा संक्षेप करावा लागला. ज्यांनीं आपल्या आठवणी लेखी न देतां तोंडींच मला सांगितल्या त्या मी घरीं येऊन लिहून काढून त्यांवर त्यांच्या संमतीच्या सह्या घेतल्या. तसेंच परगांवांहून आलेलीं मोडी लिपीचीं बाडें बालबोध करणें, कित्येकांमध्यें सन, तारखा भरणें, त्रुटित मजकुरानें लिहून पाठविलेल्या आठवणींचीं बाडें पूर्ण लिहून काढून पुन्हा तीं ज्यांचीं त्यांच्याकडे पसंतीकरितां पाठवून परत मिळविणें, अत्यंत दुर्वाच्य असलेला मजकुर खिळे जुळविणाऱ्यांच्या सोयीकरतां पुन्हा सर्व सुवाच्य लिहून काढणें वगैरे जिकीरीचीं कामेंहि करावीं लागलीं. तथापि प्रसूतिवेदनेसारखें हें काम मला वाटे यांत शंका नाहीं! एकदां एकाच्या मजकुरांत येऊन गेलेली सामान्य गोष्ट पुन्हा दुसऱ्याच्या मजकुरांत आली तर द्विरुक्तीचा दोष टाळण्याकरितां ती गाळण्यांत आली आहे. पण तीच गोष्ट विशेष महत्त्वाची असली व ती अनेकांच्या मजकुरांत आली असली तरी ती बुद्धि-पुरस्सरच ठेवण्यांत आली आहे. कारण एका थोर ग्रंथकाराच्या मताप्रमाणें अशी पुनरुक्ति म्हणजे ती गोष्ट खरी असल्याचा एक उत्कृष्ट पुरावाच होय. उलटपक्षीं, जागेच्या अभावीं व काटकसरीच्या दृष्टीनें कांही चांगल्या बाबींसहि फांटा द्यावा लागला. उदाहरणार्थ, प्रत्येक आठवणींतील मजकुराचें द्योतक असें त्या त्या लेखकानें घातलेलें आकर्षक शीर्षक काढून टाकावें लागलें. शिवाय आठवणी पाठविणारांच्या बहुतेक सर्व लिखाणांत कांहीं ठराविक गोष्टीं-विषयीं आलेला सर्वसामान्य पण रसभरित मजकूर पुनरुक्तीचा दोष टाळ-ण्याकरितां गाळावा लागल. उदाहरणार्थ, ( १ ) स्वतःची तात्यासाहेबां-विषयींची भक्ति, ( २ ) त्यांचें प्रथमदर्शन व त्याचा आपल्या मनावर झालेला परिणाम, ( ३ ) आपल्या स्वतःची माहिती, ( ४ ) मिरवणुकी, सभा, संमेलनें, मेजवान्या वगैरेंचीं थाटामाटाचीं वर्णनें, ( ५ ) तात्या-साहेबांची सर्वसामान्य स्तुति, (६) त्यांच्या मृत्यूबद्दल दुःखोद्गार, ( ७ ) आठवणी पाठवण्याबद्दल बापटांचा विलक्षण आग्रह इत्यादि. वस्तुतः ज्याच्या त्याच्या दृष्टीनें वरील प्रकारचा मजकूर ज्याचा त्यास महत्त्वाचा व अगत्याचा वाटणें स्वाभाविक आहे. फार काय, पण मलाहि त्यांत एक प्रकारची लज्जत आहे असेंच वाटतें. पण लज्जतदारपणा झाला म्हणून

त्यासहि कांहीं सीमा आहेच. म्हणून याहि दृष्टीनें तो कमी करणें भाग पडलें हें लिहिण्यास दुःख होतें.

## काटकसरीची कमाल !

मजकूर व जागा यांनीं परस्परांस सामावून घेण्याच्या दृष्टीनें करण्यांत आलेल्या विशिष्ट काटकसरीचें आणखी थोडें दिग्दर्शन येथें करणें आवश्यक आहे. माझ्या अति आग्रहाच्या विनंतीमुळें ज्या कांहीं सुहृदांनीं आपला मजकूर देण्याची कृपा केली, त्या प्रत्येकाच्या मजकुरांपैकीं फक्त एकचतुर्थांशच मजकूर घेऊन बाकीचा सर्व बाजूस ठेवावा लागला ! प्रत्यक्ष केळकर-कुटुंबीयांतील मंडळींनीं खरोखर आपल्या आठवणींचा पाऊस पाडला असता हें मला माहीत आहे. पण त्यांजकडूनहि हाताच्या बोटांच्या संख्येपेक्षां जास्त आठवणींच्या संख्येचा मजकूर घ्यावयाचा नाहीं असेंच मला निरुपायानें ठरवावें लागलें ! फ़ार काय, पण प्रत्यक्ष मी माझ्या नांवानें एकहि आठवण घातली नाहीं ! ! लो. टिळकांच्या तिन्ही आठवणी-खंडांत माझ्या नांवावर माझ्या स्वतःच्या आठवणींचीं १४२ पृष्ठें खर्ची पडलीं आहेत ! पण केवळ परस्थितीमुळें मला येथें संयम करणें भाग पडलें. स्वतःच्या घरीं घालण्यांत आलेल्या प्रयोजनांत प्रथम सर्वांना सन्मानपूर्वक संतुष्ट करणें व योग्य तो परामर्श घेणें हेंच कोणीहि झालें तरी आपलें आद्य कर्तव्य समजतो, व मगच स्वतःची सोय झाल्यास पाहतो, किंवा तसें न जमल्यास त्याची क्षितीहि तो बाळगत नाहीं. विशेष सांगावयाचें म्हणजे, हाच न्याय या प्रत्यक्ष आत्मनिवेदनाच्या मजकुरासहि लावण्याचें मीं योजिलें होतें; पण कळकळीच्या कांहीं हितचिंतक सल्लागारांनीं व सहानुभवी मित्रांनीं व्यावहारिक दृष्टीनें तसें करणें अनिष्ट व अयोग्य आहे असें माझ्या मनावर बिंबविल्यामुळें संक्षेपतः वस्तुस्थितिकथनाचा मीं हा नम्र प्रयत्न केला आहे. शिवाय कै. गु. तात्यासाहेब यांच्या आठवणींचा ग्रंथ तयार करणें हें मी माझें खासगी काम समजत नसून तें एक जबाबदारीचें पवित्र व सार्वजनिक काम आहे असेंच मी मानीत असल्यामुळें हें इतिवृत्त संक्षेपानें वाचकांस निवेदन करणें हेंहि मी आपलें कर्तव्यच समजतों.

## इंग्रजींतील आठवणींचें स्वरूप

या ग्रंथांत संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांत आठवणी लिहिण्यांत आल्या आहेत. त्यांपैकी पहिल्या तीन भाषांतील मजकुराविषयीं कांही न लिहितां, ग्रंथाच्या शेवटीं घालण्यांत आलेल्या फक्त इंग्रजी मजकुरासंबंधानें एवढेंच म्हणतों कीं, त्यांपैकीं कांहीं भाग फारसा आठवणीच्या स्वरूपाचा नसून तो निव्वळ गुणवर्णनपर (appreciation) असतांहि घेतला आहे, याची मला पूर्ण जाणीव आहे; पण त्याचें कारण मी सांगण्यापेक्षां लो. टिळक यांच्या इंग्रजींतील आठवणींच्या माझ्या पहिल्या खंडाच्या पुस्तकास प्रस्तावना लिहिणारे कै. दे. भ. तात्यासाहेब केळकर यांनीं आपल्या मार्मिक प्रस्तावनेंत जें कारण दिलें आहे तेंच येथेंहि लागू पडणारें असल्यामुळें तें येथें उद्‌घृत करतों. तात्यासाहेब लिहितात :—

" The reminiscences contained in this book are mostly by those who came into contact with Lok. Tilak, but comparatively at a distance; and therefore they may look more like appreciations than reminiscences. But even these have their own value as coming from illustrious men and women, who were his contemporary judges and in a few cases also his co-workers."

## या स्मृति-मंदिराचे धनी कोण ?

अशा रीतीनें उभारण्यांत आलेलें हें 'नरसिंह-स्मृति-मंदिर' आहे. 'लो. टिळक-स्मृति-मंदिर' तीन मजली (तीन खंड) असून हें 'केळकर-स्मृति-मंदिर' एकमजली असलें तरी तें आकारानें विस्तृत आहे. याचा अर्थ असा कीं, लोकमान्यांच्या आठवणींच्या तीन खंडांची पृष्ठसंख्या १८७५ असून त्यांचे आठवणी लेखक ७०० आहेत, तर प्रस्तुतच्या या एकाच ग्रंथाची पृष्ठसंख्या सुमारें ६७५ असून त्याचे आठवणी लेखक सुमारें ३७५ आहेत. अर्थात् याचें श्रेय केवळ आठवणीदारांनाच आहे, मी फक्त निमित्तमात्र आहे; म्हणून म्हणतों–"आतां ग्रंथाचें दूषण-भूषण। सर्वस्वे त्यांचे त्यांसी ॥" तथापि, ग्रंथविषयक कामांत मीं कांहीं केलें असेन तर तें मी न सांगतां एका ग्रंथ-

काराच्या खालील शब्दांतच व्यक्त केलेलें बरें. तो म्हणतो—"I have here made only a nosegay of culled flowers and have brought nothing of my own except the string that ties them. I am but a gatherer and a disposer of other men's stuff." हाच विचार किंबहुना माझी खरी मनोभावना टिळक-आठवणींच्या आत्मनिवेदनांत शेवटीं मीं व्यक्त केली आहे. म्हणून पुनरुक्तीचा थोडा दोष पत्करूनहि पुन्हां तेच शब्द येथें उद्धृत करतों. "आठवणींच्या रूपानें हें वाङ्मय-स्मारक ज्या अनेक स्त्री-पुरुषांच्या साहाय्यानें मला उभारतां आलें, त्या सर्व बंधुभगिनीस एकवार शेवटचें अभिवादन करून त्यांनीं मजकडून ही सेवा करून घेतली त्याबद्दल प्रथम त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतों. वस्तुत: या स्मृतिमंदिराचे धनी त्यांचे तेच आहेत. फार तर त्याचे 'विश्वस्त' इतकेंच कदाचित् माझें नातें असूं शकेल ! एवढेंच नव्हे, तर या बाबतींतील माझ्या अंत:करणांतील सदैव जागृत असणारी भावना मी माझ्या शब्दांनीं व्यक्त न करतां, संत श्रीतुकाराममहाराजांच्या शब्दानें सांगतों कीं, फोडिलें भांडार। धन्याचा हा माल। मी तव हमाल। भारवाही।।

## केळकर-सूक्तिसंग्रह प्रसिद्ध होणार काय ?

आठवणींच्या ग्रंथासंबंधानें जें काय थोडक्यांत म्हणावयाचें होतें त्याचें येथवर निरूपण झालें. आतां एका गोष्टीसंबंधानें खुलासा करितों. वस्तुतः प्रस्तुत ग्रंथ तयार करण्याच्या आधीं 'टिळक-सूक्ति-संग्रह' या ग्रंथासारखा 'केळकर-सूक्ति-संग्रह' ग्रंथ तयार करण्याची माझी मनीषा होती. कारण एक तर त्यासंबंधीं मीं पूर्वींच थोडीबहुत तयारी करून ठेविली होती. दुसरें असें कीं आठवणींच्या ग्रंथाचें काम परावलंबी, दीर्घसूत्री व सर्वस्वी परेच्छाधीन असल्यामुळें तें सावकाश व यथाकाल होणारें आहे. उलट, 'सूक्ति-संग्रह' ग्रंथाचें काम हें एकहाती, स्वावलंबी व सर्वस्वीं स्वाधीनचें आहे. तथापि हा ग्रंथ झाला तरी ताबडतोब प्रसिद्ध होणें कठीणच होतें. कारण तात्यासाहेब यांनीं आपल्या पन्नास वर्षांच्या राजकीय चळवळीच्या उद्योगाबरोबरच श्रीसरस्वतीदेवीची उपासना कांहीं थोडीथोडकी केलेली नाहीं. किंबहुना

मुख्यतः या देवतेच्या सेवेच्या द्वारेंच त्यांनीं आपलें जीवितकार्य पूर्ण केलें आहे. यामुळें त्यांच्या अगाध वाङ्मयोदधीचें अवगाहन करून त्यांतून ओजस्वी, दीप्तिमान्, संग्राह्य व संस्मरणीय अशा सूक्तींचीं पाणीदार मौक्तिकें गोळा करण्याचें अवघड कार्य झटपट होणारें नाहीं, हें अगदीं उघड आहे. तथापि, इतस्ततः पडलेले आठवणींच्या पाण्याचे थेंब एकत्र करून त्यांच्या सुंदर सरोवराचा ग्रंथ निर्माण करण्यास लागणाऱ्या प्रदीर्घ काळापेक्षां 'सूक्ति-संग्रह' बनविण्याचें कार्य अल्प काळांत जनतेच्या सेवेस सादर करतां येईल असें मला वाटत होतें; परंतु हेंहि खरें कीं जसजसा काळ निघून जातो तसतसें लोकांना आठवणींचें विस्मरण होतें, व्यक्ति नाहींशा होतात व एकंदर परिस्थितींतहि बदल होतो. या अशा अनेक कारणांमुळें हें कार्य अधिकच बिकट होतें, हा लोकमान्यांच्या आठवणींचे ग्रंथ तयार करतांना आलेला पूर्वानुभव लक्षांत घेऊन, प्रस्तुतचा ग्रंथ प्रथम प्रसिद्ध करून नंतर मग 'केळकर-सूक्ति-संग्रह' हा ग्रंथ प्रसिद्ध करावा असें मीं मनाशीं निश्चित ठरविलें आणि त्या उद्योगास लागलों. त्याप्रमाणें दि. २१ नोव्हेंबर १९४७ च्या 'केसरीं'त "केळकर-सूक्ति-संग्रह प्रसिद्ध होणार" या शीर्षका-खालीं मीं खालील मजकूर प्रसिद्ध केला आहे :—"आठवणींचा ग्रंथ प्रसिद्ध होतांच त्याच्या पाठोपाठ 'केळकर सूक्तिसंग्रह' हा ग्रंथहि प्रसिद्ध होईल असें मी नम्रपणें जाहीर करतों. वास्तविक एक टप्पा सोडून पुढील लांबच्या टप्प्याविषयीं आगाऊ बोलणें, त्याची परिस्फुटता करणें, माझ्या मनास व स्वभावास मानवणारें नाहीं; परंतु गेल्या 'केसरी'तील अग्रलेखांत एतद्विषयक आलेला मजकूर लक्षांत घेऊन माझ्या सुहृदांच्या व मित्रमंडळीच्या सल्ल्यावरून नाइलाजास्तव ही नम्र घोषणा आजच करणें मला भाग पडलें आहे." या घोषणेप्रमाणें प्रस्तुत आठवणींचा ग्रंथ आतां हातावेगळा झाल्यानंतर त्या उद्योगास लागण्याला मी मोकळा होत आहे. परंतु वयोमान व मुख्यतः गेल्या चार-सहा महिन्यांत जडलेल्या कांहीं विशिष्ट व्याधीमुळें भासूं लागलेली शक्तिक्षीणता व त्यामुळें उत्पन्न होणारा स्वतः-विषयींचा अविश्वास यांमुळें माझ्या हातून हें कार्य कसें काय पार पडेल या भीतीनें मात्र मन अस्वस्थ आहे. प्रभुकृपेनें काय घडेल ते खरें! असो.

## ग्रंथाची प्रस्तावना म्हणजे पृथ्वीस आधारणारा शेष !

शेवटचें काम म्हणजे आभार-प्रदर्शनाचें. क्रमांकानें हें कलम शेवटचें मानण्यांत येत असलें तरी, वस्तुतः मनोव्यापारांत त्याचें आद्यस्थान आहे. प्रथम, हा ग्रंथ वाचकांच्या हातीं देण्यास प्रामुख्येंकरून जे कारणीभूत झाले त्या सर्व आठवणी-लेखकांचें मी पुन्हां एकवार मनापासून आभार मानतों. तसेंच ज्या सहृदय स्वकीयांनीं हस्तें-परहस्तें आठवणी मिळवून देण्याची मला मदत केली त्या अनेक परोपकारी सज्जनांचे उपकार मी विसरणें अशक्य आहे. अर्वाचीन काळच्या वाङमय-युगांतील ग्रंथरचनेंत ग्रंथा-इतकाच किंबहुना अधिकच ग्रंथाच्या प्रस्तावनेस मान व महत्त्व देण्यांत येत असतें; आणि त्यांत प्रस्तावना-लेखक जितके थोर, विद्वान् व प्रसिद्ध, आणि त्यांची प्रस्तावना जितकी मोठी, मार्मिक व विवेचक असेल तितकें त्या ग्रंथास स्वाभाविकच मोठेपण येत असतें. फार काय पण, छत्रीचा जसा दांडा, फुलाचा जसा देठ, शरीराचे जसें नाक, मंदिराचा जसा कळस, सभेचा जसा अध्यक्ष, सैन्याचा जसा सेनानायक, वाद्यांच्या मिरवणुकींतील जसा चौघडा, इतकेंच नव्हे तर, नक्षत्रांत जसा चंद्र, तेंच स्थान ग्रंथाच्या प्रस्तावनेचें होय असें अर्वाचीन काळीं सर्वत्र समजण्यांत येतें. या दृष्टीनें 'केसरी'चे माजी संपादक व गीतामंजरीकार विद्वद्वर्य श्री. जनार्दन सखाराम ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर यांनीं परिश्रमपूर्वक लिहिलेल्या विद्वत्ताप्रचुर प्रस्तावनेबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. लोकमान्यांच्या आठवणींच्या पहिल्या खंडास गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांनीं प्रस्तावना लिहिली. त्या तात्यांच्या आठवणींच्या ग्रंथास या तात्यांनीं प्रस्तावना लिहिण्याच्या आलेल्या योगाबद्दल मला फार आनंद होत आहे. तसेंच या ग्रंथाच्या शेवटच्या सर्व मुद्रितांवरून त्यांची सराईत नजर फिरून तीं सर्व मुद्रितें बारकाईनें तपासण्याचें कार्य त्यांनीं केलें असल्यामुळें माझें मन या बाबतींत निश्चिंत आहे. अशा रीतीनें तात्यासाहेब करंदीकर यांनीं केलेल्या द्विविध व जबाबदारीच्या कार्याबद्दल त्यांचे आभार मानावेत तेवढे थोडेच आहेत.

## केळकरांचें घर म्हणजे माहेरघर !

प्रस्तुतसारख्या ग्रंथाचें स्वरूपच असें आहे कीं, त्यास अनेकांचे हात लागल्याखेरीज तो सिद्ध होऊंच नये. म्हणून विनंती केली असतां अनेकांनीं अनेक रीतींनीं साह्य केलें हें तर खरेंच; पण विनंती करण्यापूर्वीच आपणहून स्वयंस्फूर्त मदत करण्याची ज्यांनीं उत्कट इच्छा दर्शविली, त्यांच्या निरपेक्षपणाबद्दल कसें उतराई व्हावें हेंच मला समजत नाहीं. कै. तात्यासाहेबांचे भक्त व माझे जुने स्नेही श्रीयुत रा. द. ऊर्फ पंतपराडकर हे या श्रेणींतील असून, त्यांनीं केवळ तात्यासाहेबांच्या प्रेमाखातर या ग्रंथाचीं दुसरीं मुद्रितें तपासण्याचे श्रम घेतले व आपल्या मुद्रणकलाभिज्ञतेचाहि लाभ दिला याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतों. कै. गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचें घर म्हणजे माझें स्फूर्तिस्थान व माहेरघर असल्यामुळें आभारप्रदर्शनाच्या कलमांत त्यांच्या घरच्या मंडळींचा उल्लेख येथें झालेला पाहणें हें त्या सद्भिरुचीच्या व निरपेक्ष मंडळींना मुळींच आवडणार नाहीं; त्या मंडळींचें आभार मानणें म्हणजे मी माझे स्वत:चेच आभार मानण्यासारखें होणार आहे, अशी वस्तुस्थिति आहे, पण हें जाणनहि केवळ माझ्या समाधानाचा स्वार्थ साधण्याकरितां ह्या मंडळींपैकीं व्यक्तिशः कोणाचाच उल्लेख न करतां, समष्टिरूपानेंच त्या सर्व मंडळींचें, त्यांनीं केलेल्या हरेक मदतीबद्दल, मी मनोभावें आभार प्रदर्शित करतों.

## मदतनिसांचे आभार

वर म्हटल्याप्रमाणें या ग्रंथास ज्यांच्या मदतीचे हात लागून हा ग्रंथ हातावेगळा होण्याचें मला समाधान होत आहे, त्या मंडळींत 'केसरी'चे माजी संपादक रा. वासुदेव कृष्ण भावे, रा. दामोदर विश्वनाथ गोखले, केसरीचे उपसंपादक रा. जयंत श्रीधर टिळक, इतिहाससंशोधक रा. शंकर नारायण जोशी, राष्ट्रीय कीर्तनकार रा. वासुदेव शिवराम कोल्हटकरबुवा, महाराष्ट्र प्रांतिक कॉंग्रेस कमिटीचे चिटणीस रा. गोपाळ आबाजी ऊर्फ तात्यासाहेब देशपांडे, विलायतेंतील 'केसरी'चे प्रतिनिधि रा. दत्तात्रय विश्वनाथ ताम्हनकर, वैदिक-संशोधन-मंडळांतील कार्यकर्ते रा. दिगंबर

वासुदेव नेनेशास्त्री, रा. कुंजविहारी लक्ष्मण भोपटकर, केसरी-मराठा संस्थेचे व्यवस्थापक रा. आत्माराव रावजी भट, चिरंजीव प्रभाकर दत्तात्रय दामले, रा. यशवंत कृष्ण ठकार, रा. ग. र. वैशंपायन, रा. शं. दा. चितळे, मुंबईचे सप्लाय-ऑफिसर रा. श्रीपाद नरहर सप्रे, 'सह्याद्रि' मासिकाच्या जुळणी-विभागाचे प्रमुख रा. भास्कर महादेव कुलकर्णी व त्यांचे सहकारी व मुद्रितें तपासणारे श्री. त्र्यं. रा. दामले, ग. भा. क्षीरसागर, द. वि. जोग, न. भा. काळे, हे प्रमुख असल्यामुळें त्यांचे मी मनापासून आभार मानतों. तसेंच ग्रंथाच्या मलपृष्ठावरील तीनरंगी चित्र श्री. जनार्दन दत्तात्रेय गोंधळेकर यांनीं अगदीं लवकर तयार करून दिल्या-बद्दल त्यांचेहि आभार मानणें उचित आहे.

## विश्वस्त-त्रयीचें ऋण

खरोखर आभार मानण्यासारखें गोड काम दुसरें कोणतेंहि नसेल. कारण आभार मानणें म्हणजे आपली कृतज्ञता व्यक्त करणें होय; आणि कृतज्ञता व्यक्त करणें म्हणजे ऋणमुक्ततेचें कांहीसें समाधान मिळविण्या-सारखें आहे. पण कृतज्ञतेची व्याख्या 'अधिक मदतीची अपेक्षा अशी मर्मज्ञ लोक करतात. तेव्हां हे आभार म्हणजे व्याजी लावलेलें भांडवलच होय असें कोणी म्हणेल! परंतु तशी भावना मनांत न बाळगतां निर्लोभी-पणानें हें आभारप्रदर्शनाचें काम मी करीत आहें. सर्वांत शेवटचे पण अत्यादरपूर्वक व कृतज्ञताबुद्धीनें अंतःकरणापासून आभार मानावयाचे ते 'केसरी-मराठा' संस्थेचे विश्वस्त यांचे होत. रा. जनार्दन सखाराम करंदीकर, रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर व रा. गजानन विश्वनाथ केतकर या विश्वस्तत्रयीच्या झालेल्या साहाय्याबद्दल त्यांचे आभार मला शब्दांनीं व्यक्त करतां येणें अशक्य आहे. या त्रयमूर्तीनें मिळवून व शिवाय व्यक्तिशः, विशिष्ट प्रकारचें जें अमूल्य साहाय्य केलें आहे, त्या योगानें त्यांनीं मला कायमचें ऋणी करून ठेविलें आहे; इतकेंच नव्हे तर हा ग्रंथ सर्वतोपरी त्यांचाच आहे असें म्हणण्यांत काडीमात्रहि अतिशयोक्ति मी करीत नाहीं अशी माझी भावना आहे.

### गुरुवर्य तात्यांचे आशीर्वाद

प्रस्तुत ग्रंथाची योजना गुरुवर्य तीर्थस्वरूप तात्यासाहेब केळकर यांना अभिप्रेत कशी नव्हती हें आरंभींच मीं सांगितलेंच आहे. अर्थात् त्यांना अभिप्रेत नसतांना, म्हणजे त्यांच्या कांहींसें मनाविरुद्ध, पण त्यांच्याविषयीं वसत असलेल्या गाढ, थोर व अकृत्रिम प्रेमामुळें आणि केवळ कृतज्ञता-बुद्धीमुळेंच हा ग्रंथ तयार करण्यांत आला आहे. पण तो तयार होत असतां झालेले खटाटोप वगैरे त्यांच्या अतींद्रिय ज्ञानास गोचर होऊन, शेवटीं त्यांनीं मजवरील विशिष्ट ममत्वबुद्धीमुळें आशीर्वादात्मकच उद्‌गार काढले असले पाहिजेत अशी माझी दृढ श्रद्धा आहे. हे त्यांचे आशीर्वाद खालीं दिलेल्या 'श्रीसमर्थहृदयांतील' शब्दांतच सांगितलेले बरे :—

**जें जें कांहीं त्वां केलें। तें तें सर्व आम्हां पावलें।**
**तुजकडे त्यांतील कांहीं न उरलें। येणें तुज घडलें आत्मनिवेदन ।।**

प्रस्तुत आत्मनिवेदनात्मक लेखाच्या आरंभीं श्रीमद्‌भागवतांत उद्धवास उद्देशून भगवंतांनीं काढलेले उद्‌गार अवतरित केले आहेत त्यांतीलहि बीज हेंच होय !

### वाचक-वृन्दास प्रार्थना

शेवटीं सद्‌गुरु श्रीसमर्थांच्या शब्दांत वाचकांची प्रार्थना करून हें लांबलेलें आत्मनिवेदन समाप्त करितों.

**इतुके बोलिलें स्वभावें। त्यांत मानेल तितुकें घ्यावें ।।**
**श्रोतीं उदास न व्हावें। बहु बोलिलें म्हणोनी ।।**
**चुकत वाकत आठवलें। इतुकें संकलित बोलिलें ।।**
**न्यूनपूर्ण क्षमा केलें। पाहिजे श्रोती ।।**

केळकर प्रथम श्राद्ध-दिन :
आश्विन वद्य ३०, शके १८७०
केसरी कार्यालय, पुणें २

सर्वांचा नम्र सेवक
**सदाशिव विनायक बापट**

# ‘केळकर-आठवणी’ ग्रंथाविषयीं थोरांचे अभिप्राय

वरील ग्रंथाच्या निर्मितीविषयीं ती. आण्णासाहेब यांच्या ‘आत्म-निवेदना’वरून सर्व कांहीं कळून येण्यासारखें आहे. हा ग्रंथ बेसुमार वाढल्यामुळें त्यांत आण्णांनीं आपल्या स्वतःच्या लिहून ठेविलेल्या कित्येक आठवणींपैकीं एकहि आठवण घातली नाहीं. या ग्रंथाचा दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचें त्यांनीं आपल्या मनाशीं निश्चित ठरविलें होतें. पण दुर्दैवानें व प्रतिकूल परिस्थितीमुळें केळकर आठवणी ग्रंथाचा दुसरा भाग निघूं शकला नाहीं. या बाबतींत घडलेली घटना ‘आण्णांना बसलेले मानसिक सहा धक्के’ या शीर्षकाखालील मजकुरांत दिली आहे. (भाग १ पाहा.)

या ग्रंथाविषयीं महाराष्ट्रांतील प्रमुख सर्व पत्रांनीं प्रशंसेचे अग्रलेख लिहिले; कांहीं प्रसिद्ध व्यक्तींनीं आपले अभिप्राय वर्तमानपत्रांत प्रसिद्ध करून संतोष व्यक्त केला. कित्येकांनीं ग्रंथमान्यतेबद्दल आण्णांना खाजगी पत्रें पाठवून धन्यवाद दिले. या सर्वांचा आण्णांनीं संग्रह केला आहे. तो सर्वच मजकूर वाचनीय, बोधप्रद व मनोरंजक असल्यामुळें त्याचें एक सुंदर स्वतंत्र पुस्तकच होऊं शकेल. वरील मजकुरापैकीं कांहीं मजकूर तर चटक लावण्यासारखा आहे. पण विस्तारभयास्तव त्यास येथें जागा न देतां, सामान्यः मजकुराची पण थोर व्यक्तींपैकीं फक्त ८ पत्रें खालीं देतों :—

**साहित्यसम्राट् केळकर यांच्या आठवणी या ग्रंथाबाबत श्री. आण्णासाहेब बापट यांस आलेलीं पत्रें :—**

**पत्र १**

'Matri–Smriti'
Law College Road,
Poona 4.
5th January 1949

Dear Mr. Bapat,

During such little leisure as I get from my work at present, I have glanced through the contents of your 'Reminiscences of Kelkar."

It is a wonderful production showing great loyalty and assiduity on your part. I do hope that it will serve to keep Mr. Kelkar's memory ever fresh and green in the minds of the public.

Some of the incidents recorded in your book are typical, and their value is highly enhanced by your "atma nivedan." Some critics may say that some of the memories have been narrated in extravagant terms, but in appreciating this comment, it must be understood that, in Maharashtra and in fact in the whole of India, our great men are so few that a little exaggeration in admiration is permissible. Mr. Kelkar's presence would be missed for a long time, and he would have been of infinite use and value in bringing up this University, on which he had, in his quiet way, set his heart.

I have no doubt that your book has been well received by the Marathi-speaking public.

Yours sincerely,
M. R. Jayakar

S. V. Bapat, Esq.,
512, Sadashiv Peth,
Poona 2.

पत्र २

Government House,
Patna,
Nov. 29, 1948

Dear Mr. Sadashivrao Bapat,

Your letter of 10-11-1948 is duly received here. I thank you for sending me a copy of your Reminiscences, of late

Tatyasaheb Kelkar. I read a few of them. It is a splendid collection of reminiscences, and the readers will be able to know much more about Tatyasaheb's varied activities and certain peculiar traits in his character in dealing with different types of persons who were coming to him for advice or assistance. I admire your perseverence in collecting the materials and presenting them in an attractive form to the public. I congratulate you on that.

Yours sincerely,
M. S. Aney.

पत्र ३

'Snehsmriti,'
Rocky Hill, Bombay 6,
Jan. 25, '49.

'My dear Mr. Bapat,

I received your reminder asking my opinion on the "Reminiscences of Mr. N. C. Kelkar" and the collection of contributions which you have made about his life and career. I thought that my opinion was not worth having and was hardly needed as the book speaks for itself. The book contains an unqualified admiration and respect for our beloved Tatyaji from all parts of India and even outside and from parts and Schools of thought. Is it not a wonder, a man of that calibre was not conceded a seat in the Constituent Assembly by the Powers concerned?

With kind regards,

Yours very truly,
Jamnadas M. Mehta.

पत्र ४

हिंदुमहासभा भवन
न्यू दिल्ली,
ता. २१-११-१९४८

श्री. सदाशिवराव बापट यांसी —
सा. न. वि. वि.

केळकर आठवणींचा ग्रंथ मिळाला. त्यांतील सर्व नाहीं तरी बऱ्याचशा आठवणी मीं लक्षपूर्वक वाचल्या. अमोल ठेवा आहे. ग्रंथाचें बाह्यांग तसेंच अंतरंगहि फारच सुबक व मनोरम साधलें आहे.

अतोनात श्रम करून तुम्हीं एक उत्तम ग्रंथ निर्माण केला आहे व मराठी वाङमयांत तुम्हीं नव्यानेंच निर्माण केलेली प्रथा उत्कृष्टपणें पुढें चालविली आहे. मराठी सारस्वतांत तुम्हीं आपलें नांव अजरामर केलें आहे यांत संदेह नाहीं. नाहींतर मी आलों तसाच हात हालवीत एके दिवशीं कालाच्या उदरांत गडप होऊन जाणार आहे.

मी हें हेव्यादाव्यानें लिहीत नाहीं; तर तुमच्याबद्दलच्या शुद्ध कौतुक बुद्धीनें लिहीत आहे.

अशीच ग्रंथनिर्मिति तुमचे हातून यापुढेंहि होवो अशी अंतरीची इच्छा !

कळावें, लोभ असावा.

आपला,
ल. ब. भोपटकर

पत्र ५

सेक्रेटरिएट,
मुंबई, ता. १४-१२- ८

श्री. स. वि. बापट यांस —
कृ. सा. न. वि. वि.

तरुण वयांत सार्वजनिक आयुष्याला सुरुवात केल्यापासून इहलोकची यात्रा संपवीपर्यंत ज्या लोकोत्तर थोर पुरुषानें जनतेच्या सुखाची काळजी वाहण्याचें काम केलें त्या कैलासवासी तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणींचा ग्रंथ परिश्रमपूर्वक संपादन करून महाराष्ट्रांतील वाचक वर्गाला आपण ऋणी करून ठेवलें आहे.

आठवणींच्या ग्रंथांतील आपलें निवेदन वाचलें म्हणजे दे. भ. तात्यासाहेब यांच्याविषयीं आपल्या अंतःकरणांत किती नितांत आदर वसत होता याची कल्पना येते. त्यांचें मोठें चरित्र आपण लिहावयास घेतलें तर त्यांच्या चरित्रांतील अनेक पैलू आपण महाराष्ट्राच्या वाचकवर्गाला स्पष्ट करून दाखवाल यांत मला तिळमात्र शंका नाहीं. तथापि आपण प्रसिद्ध केलेल्या या आठवणींच्या ग्रंथानें सुद्धां तात्यासाहेबांचें महाराष्ट्राला विविध दर्शन करून देण्याचें महत्कार्य आपण केलें आहे.

निरनिराळ्या व्यक्तींनीं लिहिलेल्या त्या थोर पुरुषाच्या आठवणी वाचीत असतांना तात्यासाहेबांच्या समृद्ध जीवनाची यथार्थ कल्पना, त्यांच्या कार्याच्या व्यापाची माहिती नसलेल्या नव्या पिढींतील तरुणांना झाल्यावाचून राहाणार नाहीं.

त्यांचा विद्याव्यासंग येवढा दांडगा होता कीं, "साहित्य सम्राट्" ही यथार्थ पदवी त्यांच्या हयातींतच त्यांना मिळाली. परंतु साहित्य गुणाशिवाय इतर अनेक सद्गुणांचा त्यांच्या ठिकाणीं समुच्चय झालेला होता. गुणग्राहकता, रसिकता, निगर्वीपणा आणि प्रेमळपणा हे त्यांच्या ठिकाणीं सहज दिसून येणारे गुण निरनिराळ्या आठवणींत विखुरलेले आहेत तें पाहून आनंद होतो. असा हा बहुमोल संग्राह्य ग्रंथ अल्पावधींत तयार करून महाराष्ट्रांतील वाचकांच्य हातीं आपण दिलात याबद्दल मी आपणांस धन्यवाद देतों.

आपला
**गोविंदराव वर्तक**
(माजी स्थानिक स्वराज्य मंत्री)

पत्र ६

द्वारकानगरी,
ता. १४।१२।४८

सा. न. वि. वि.

आपण साहित्य सम्राट् तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणींचा ग्रंथ प्रसिद्ध केल्याची जाहिरात प्रसिद्ध होतांच मी त्याची एक प्रत मागवून ती समग्र वाचून काढली. आपल्या आत्मनिवेदनामध्यें या आठवणी गोळा करावयास आपणांस किती प्रयत्न करावा लागला व किती त्रास सहन करावा लागला याबद्दलची माहिती वाचून थक्क झालों.

या आठवणी-ग्रंथामध्यें ३७५ जणांचा मेवा निवडून साफसूफ करून आपण वाचकांस सादर केला आहे. या आठवणींमध्यें केळकर यांनीं निरनिराळ्या वेळीं व प्रसंगीं काढलेले उद्‌गार खरोखर फारच महत्त्वाचे आहेत. तरुण पिढीनें त्यांचें जर वाचन, मनन व अनुकरण केलें तर त्यापासून त्यांचा मोठा फायदा होणार आहे यांत संशय नाहीं. प्रत्येक मराठी भाषा जाणणाऱ्या गृहस्थानें या आठवणी जरूर वाचाव्यात अशी मी शिफारस करतों. असा हा उपयुक्त ग्रंथ आपण फार मेहनत घेऊन प्रसिद्ध केला याबद्दल मी आपलें अभिनंदन करतों.

**नानासाहेब शिंदे**
(जनरल राजरत्न, बडोदें)

पत्र ७

केसरीचे माजी संपादक व विश्वस्त श्री. ग. वि. केतकर यांचें पत्र :—

श्री.

केसरी कचेरी, पुणें
दि. १९।१०।४८

श्री. सदाशिवराव बापट यांसी सा. न.

केळकरांच्या आठवणीचा तुमचा ग्रंथ आज सायंकाळी हातांत पडला. रात्रीं बारा-एक वाजेपर्यंत आधाशाप्रमाणें 'आठवणीं'चा ठेवा चाळीत बसलों होतों. प्रस्तावना व तुमचें आत्मनिवेदन समग्र वाचलें. आनंद झाला. दोन्ही फोटोहि योग्य स्थळीं घातलेले पाहिले. टिळक सूक्तिसंग्रहाप्रमाणें

'केळकरसूक्ति-संग्रह' करण्याचें तुम्हीं योजिलेंत, उत्तम आहे. या कामीं श्रमविभागानें कार्य होण्यासारखें आहे. केळकर समग्र वाङमयाचा एक खंड मी सूक्ति लिहून देण्याचें काम करण्यास तयार आहे. आपण एकट्यानें हें काम करूं नये. एकेका माणसाकडे एकेक 'समग्र केळकर ग्रंथ' विभागून द्यावा म्हणजे काम लवकर होईल. ही विनंति.

आपला
ग. वि. केतकर

**पत्र ८**

श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचे चरित्रकार श्री. शंकर श्रीकृष्ण देव, वकील, धुळें, लिहितात :—"केळकर आठवणींचे संग्राहक श्री. सदाशिवराव बापट यांचेबद्दल असें सांगण्यास हरकत नाहीं कीं, त्यांच्याइतका या वाङमयदालनांत, अधिकारी व वाकबगार संपादक उभ्या महाराष्ट्रांत, दुसरा कोणी नाहीं. लोकमान्य टिळकांच्या आठवणीचे तीन भाग, खुद्द कै. केळकरांच्या देखरेखीखालीं, तयार करतांना त्यांनीं घेतलेल्या श्रमावरून व मिळविलेल्या अनुभवावरून, त्यांचें अशा कामाचें विलक्षण तंत्र आधींच ठरून गेलें होतें, व अशा ग्रंथाचा किती उपयोग होऊं शकतो हें त्यांनीं जाणलें होतें. कै. केळकरांच्याबद्दल त्यांचे ठिकाणीं गुरुभक्ति होती, त्या भक्तीनें प्रेरित होऊन, तात्यासाहेबांनीं पूर्वीं मोडता घातला असतांहि, त्यांना त्यांच्या आठवणी संग्रहित करण्यावाचून राहवेना, चैन पडेना, म्हणून त्यांच्या सुंदर आत्मनिवेदनाच्या २७ पानावर उल्लेखिलेले सर्व श्रम त्यांनीं सुखानें सोसले व कै. तात्यासाहेबांचें यथार्थ दर्शन महाराष्ट्रास त्यांनीं करवून दिलें. खरोखर असे साक्षेपी संपादक या ग्रंथास लाभले म्हणूनच, हें मोठें जिकीरीचें पण महत्कार्य इतक्या लवकर तडीस गेलें. श्री. बापट या आठवणींस मेवा असें म्हणतात. कांहींहि म्हटलें तरी एवढें खास कीं, याच्या सेवनानें सर्वांस तुष्टी व पुष्टी मिळेल व तात्यासाहेब केळकरांच्या अनेक गुणांचें ज्ञान होऊन आनंद वाटेल."

भाग ३ समाप्त

ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ४७०८२ वि: चरित्र
क्रमांक ८८० नो दि: २८।।५६

## भाग ४

# आठवणीकार आण्णासाहेब बापट यांचे

(१) लेख,

(२) भाषणें,

(३) श्री. आण्णासाहेब यांस आलेलीं कांहीं निवडकांतील निवडक व अगत्याचीं पत्रें,

(४) आठवणीकार बापट यांच्याविषयींच्या मी पूर्वी संपादित व प्रसिद्ध केलेल्या 'परिचय-पुस्तिके'बाबत आण्णासाहेब यांच्याविषयीं मला आलेलीं कांहीं महत्त्वपूर्ण पत्रें;

(५) किरकोळ.

—संपादक
किशोर बापट

# सातारा जिल्हा परिषदेचें अध्यक्षस्थान

नवाकाळ, मुंबई
दि. ८-३-२९ वरून

यंदाची सातारा जिल्हा परिषद चाफळ येथें भरणार असून तिच्या अध्यक्षस्थानाकरितां स्वागत सभेनें कांहीं नांवें सुचविलीं आहेत. सुचविलेल्या नांवांत माझेंहि नांव असलेलें पाहून मला फारच आश्चर्य वाटलें. इतरांबरोबर माझेंहि नांव अध्यक्षपदाकरितां सुचविण्याचें स्वागत सभेच्या मनांत आलें याबद्दल सभेचे आभार मानणें माझें कर्तव्य असलें तरी तिच्याकडून ही चूक घडत आहे असें नाइलाजास्तव उघडपणें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. सुचविलेलीं अनेक नांवें आहेत व त्यांत माझें नांव असल्यानें मजवर अध्यक्षपदाचें संकट ओढवण्याचा फारच संभव आहे. यासाठीं यंदां कदाचित् माझी निवडणूक झाली तरी मी जिल्हा सभेचें अध्यक्षस्थानाचा स्वीकार करणें अशक्य आहे, हें मी नम्रतापूर्वक आजच जाहीर करून ठेवतों. इतकेंच काय पण अशा स्थानाकरितां माझ्यासारख्याचें नांव सुचविण्यांत आलें असतां त्याचा मी इन्कार न करणें म्हणजे त्यांस मूक संमतीच देणें होय. असें वाटल्यावरून त्याबद्दलहि मी आपली जाहीर नापसंती व्यक्त करतों. तरी वरील मजकूर लक्षांत घेऊन माझ्याशिवाय इतरांपैकीं कोणाहि सद्गृहस्थाची निवड करण्यांत यावी अशी सातारा जिल्ह्यांतील मंडळींस माझी विनंति आहे. वास्तविक सदरहू पत्र सातारा येथील स्थानिक पत्रामध्येंच प्रसिद्ध होणें योग्य होतें. परंतु ता. ९–३–२९ च्या आंत जिल्ह्यांतील लोकांकडून निवडणूक व्हावयाची असल्यामुळें तसें करण्यास सवड नाहीं म्हणून आपणाकडे हें पत्र पाठवित आहे. कळावें ही विनंति.

पुणें, ता. ६–३–२९. सदाशिव विनायक बापट

## 'केसरी-प्रबोध'-ग्रंथांतील लेख

सन १९३१ सालीं 'केसरी–मराठा' संस्थेस ५१ वें वर्ष लागलें. त्यानिमित्त स्थापन झालेल्या 'केसरी महोत्सव मंडळा'नें प्रसिद्ध केलेल्या 'केसरी–प्रबोध' ग्रंथांत श्री. आण्णासाहेब यांनीं लेख लिहिला, तो पुढें दिला आहे. लो. टिळकांनीं स्थापन केलेल्या हिंदी स्वराज्य संघ संस्थेचे आरंभापासून शेवटपर्यंत आण्णासाहेब हे हेड अकौन्टन्ट होते. त्यांचा सदर संस्थेशीं घनिष्ट संबंध आला होता. १९१६ च्या लखनौ येथील प्रसिद्ध समेटाच्या काँग्रेसच्या अधिवेशनांत ते उपस्थित असून लोकमान्यांच्या तेथील कचेरीचें काम ते करीत असल्यामुळें या संस्थेच्या चळवळीचें त्यांनीं केलेलें वर्णन ऐतिहासिक दृष्टचा फार महत्त्वाचें, मनोरंजक व बोधप्रद आहे. त्यावरून विशेषतः टिळक व केसरी यांच्या प्रचंड कामगिरीची कल्पना येते.

## हिंदी स्वराज्य-संघाची चळवळ

### अर्थात्

## टिळक-केसरी यांची स्वराज्यार्थ प्रचंड खळबळ

[श्री. सदाशिव विनायक बापट, आठवणीकार]

लो. टिळक यांनीं होमरूलच्या चळवळीचा प्रचार करण्याकरितां ज्या अनेक साधनांचा उपयोग केला त्यांपैकीं 'केसरी' हें एक महत्त्वाचें व प्रमुख साधन असलें तरी, त्यानें बजावलेल्या कामगिरीची माहिती दिल्यानें समग्र चळवळीचें आकलन पूर्णपणें होणें अशक्य आहे. यासाठीं लो. टिळक, केसरीकार व त्यांचे सहकारी यांनीं शहरापासून खेड्यापर्यंत व्याख्यानें देऊन व विलायतेस शिष्टमंडळ नेऊन होमरूल चळवळ कशी रंगारूपास आणिली व यास केसरीचें कसें साहाय्य झालें याचें सिंहावलोकन प्रस्तुत लेखांत साधार केलें आहे.

लोकमान्य टिळक १९१४ सालीं मंडालेच्या तुरुंगांतून सुटून परत हिंदुस्थानांत आले त्या वेळीं महाराष्ट्रांतील किंवा साऱ्या हिंदुस्थानांतील हवा अगदीं स्तब्ध होती. १९०८ पासून सुरू झालेला दडपशाहीचा अंमल अद्यापि कायम असल्यामुळें देशांतील राजकीय चळवळ बाह्यतः थंडावल्याप्रमाणेंच दिसत होती. नेमस्त पक्षाचे पुढारी वर्षांतून एकदां कोठें तरी राष्ट्रीय सभा भरवीत; पण तिच्यांतून राष्ट्रीय पक्षानें आपलें अंग काढून घेतलें असल्यामुळें राष्ट्रीय सभेंतील चैतन्य नष्ट होऊन तिलाहि प्रेतकळाच आली होती. ही स्थिति अत्यंत निरुत्साहजनक व शोचनीय असून ती दृष्टीस पडल्यानंतर लो. टिळकांसारख्या राजकारणांत जन्मभर पोहलेल्या पुढाऱ्यासहि पुढील धोरण आंखतांना विचार पडावा हें स्वाभाविक होय. तशांत सरकारनेंहि त्यांच्या मार्गांत आडकाठ्या घालून ठेविल्या होत्या. ते मंडालेहून सुटले तरी त्यांच्या भोंवतालचा तुरुंग सुटला नव्हता. तो तुरुंग मंडालेहून त्यांच्याबरोबरच बोटींत बसून पुण्यास आला व त्याच्या भिंती त्यांच्या वाड्याभोंवतीं उभ्या राहिल्या. त्यांच्या वाड्यावर तुरुंगाप्रमाणेंच पोलिसांचे पहारे बसले व त्यांना भेटावयास जाणाऱ्या लोकांवर पाळत ठेवण्यांत येऊन सरकारी नोकर, पेन्शनर, फार काय पण सरकारचा यत्किंचितहि आश्रय असलेले गृहस्थ यांना लोकमान्यांच्या वाऱ्यासहि उभें राहणें सरकारनें धोक्याचें करून सोडलें.

परंतु असा कडेकोट बंदोबस्त ठेवला असला तरी सरकारचें सामर्थ्यहि सृष्टिक्रमापुढें अखेर दुर्बलच ठरलें. लो. टिळक हाच वारा होता, हीच वीज होती व हीच पर्जन्यवृष्टिहि होती. लो. टिळकांच्या अंगांतील विविध शक्ति अनुकूल कालाची वाट पाहात उभ्या होत्या. १९१४ च्या जून महिन्याअखेरीस लोकमान्यांची मंडालेहून सुटका झाली व त्यानंतर अवघ्या दोनच महिन्यांनीं म्हणजे ऑगस्टमध्यें युरोपांत महायुद्धास प्रारंभ होऊन त्यांत इंग्लंडहि अडकलें. लो. टिळकांना तुरुंगांतील सहा वर्षांत देशांतील राजकारणाची विस्कटलेली घडी आतां बसवावयाची होती. अखिल जनतेचीं मनें त्यांच्या मुठींत होतींच; परंतु त्यांचा पुढाकार घेऊन त्यांस कार्याला जुंपण्यास योग्य काय ती संधीचीच वाण होती. ही सुसंधि त्यांस महायुद्धानें मिळवून दिली. सरकारनें लो. टिळक व बहुजनसमाज यांची गांठ पडूं न

देण्यासाठीं जरी अनेक निर्बंध घातले होते तरी ते तोडून बहुजन समाजास येऊन मिळण्यांतच खरी चतुराई होती.

सरकारास झाली तरी या महायुद्धाच्या नवीन संकटांत लोकमान्यांकडून मदत मिळाली तर ती हवीच होती. तेव्हां सरकारची ही अडचण ओळखून लो. टिळकांनीं आपल्या राजनिष्ठेचा जाहीरनामा प्रसिद्ध केला व त्याचा गुण एखाद्या रामबाण औषधाप्रमाणें तत्काल दिसूनहि आला. त्यांच्यावरील बंधनें उडालीं व राष्ट्राच्या राजकीय रथाचें सारथ्य आपल्या हातीं घेण्यास लोकमान्यांनीं चारी बाजूंनीं जोराची खटपट सुरू केली.अनेक प्रकारच्या राजकीय गाऱ्हाण्यांवर केसरींतून लेखणी चालवितां चालवितां टिळक आतां तरण्याचे म्हातारे झाले होते. गेल्या तीस पसतीस वर्षांच्या अनुभवावरून त्यांनीं आपल्या मनाशीं जी खूणगांठ बांधून ठेवली होती ती ही कीं, हिंदुस्थानांतील ब्रिटिश अधिकारी वर्गापासून किरकोळ तक्रारींची दाद लावून घेण्याचा शीण एकंदरीनें व्यर्थ असून सर्व तक्रारींचें मूळ जी राजसत्ता तीच शक्य तितकी लवकर जनतेस प्राप्त करून देणें इष्ट होय, व त्याच दिशेनें आपले प्रयत्न चालविण्याचें त्यांनीं आतां ठरविलें. सरकार या वेळीं संकटांत होतें, त्याची गांठ जर्मनीसारख्या बलिष्ठ शत्रूशीं पडली होती. युद्धाची नौबत झडतांच जर्मनीनें प्रथम प्रथम बेल्जम व फ्रान्स यांत जलदीनें घुसून जे पराक्रम केले त्यामुळें बेल्जम व फ्रान्स यांच्या तोंडचें पाणीच पळालें. साऱ्या जगाचे डोळे दिपले. फ्रान्सवर हल्ला झाल्यानंतर जर्मनीच्या हॉविट्झर तोफांचे गोळे इंग्रजांच्या स्वदेशभूमीवर पडणार हें ठरल्याप्रमाणेंच होतें. इंग्लंडनें आपलें मरण ओळखलें होतें. त्यास जर्मनीच्या सेनासागराला फ्रान्सांतच थोपवून धरणें सुरक्षितपणाचें असल्यानें फ्रान्सच्या फ्लँडर्समधील रणमैदानावर इंग्लंड आपलें सैन्य किडयामुंग्याप्रमाणें मरूं देण्यास कबूल झालें होतें. हिंदुस्थानांतील लाख दीड लाख सैन्य इंग्लंडनें फ्रान्समध्यें नेऊन ओतलें व त्यास हा सैन्याचा ओघ युद्ध संपेपर्यंत वाहता ठेवावयाचा होता.

हिंदुस्थान देश हा माणसांचा समुद्र. त्याचा पाट काढून तो फ्रान्स देशांत सोडून द्यावयाचा हें मुख्य काम. या मनुष्यबळाशिवाय इंग्लंडला हिंदुस्थानांतून मिळेल तितकें द्रव्यबळहि हवें होतें. महायुद्धाची तात खुद्द

इंग्लंडच्याच मानेस लागलेली. तेव्हां प्रत्येक इंग्रजास स्वदेशभूमीच्या रक्षणाकरितां रणांगणावर उभें राहण्यास एक प्रकारचें स्फुरण चढावें यांत नवल नाहीं. तरीसुद्धां पाहिजे तितके तरुण रणांगणाची वाट चालण्यास वीरश्रीनें पुढें येत नाहींत अशी ब्रिटिश मुत्सद्द्यांची तक्रार होतीच व त्याकरितां सैन्यांत शिरण्याची धडधाकट ब्रिटिश लोकांवर सक्ति करावी कीं काय या विचारांत ब्रिटिश मुत्सद्दी होते. इंग्लंडची जेथें ही रड तेथें हिंदुस्थानाविषयीं मुळीं बोलावयास नको. कारण इंग्लंड व हिंदुस्थान यांचें पडलें एकमेकांशीं लावालावीचें नातें. एका अर्थानें हिंदी लोकांना इंग्लंड सारखें जर्मनीहि सारखेंच. दोन्ही देश त्यांना परकीयच. बरें तशांतहि इंग्लंडच्या संबंधापासून हिंदी लोकांची विद्या, वैभव, संपत्ति या बाबतींत भरभराट झाली असती तर गोष्ट वेगळी. पण त्या तिन्ही बाजूंनीं त्यांची दैनाच असल्यानें इंग्रजाकरितां लढाईंत मरण्याची इच्छा कोणा हिंदी माणसास होणार ? बरें, पगाराच्या किंवा अधिकाराच्या लालसेनें सैन्यांत जाण्याची कोणास वृद्धि व्हावी म्हणावें तर तिकडूनहि उजेडच! पोट भरण्याकरितां जीव धोक्यांत घालावयाचा म्हटल्यास ज्यांची मरणें पत्करण्याइतकी अन्नान्नदशा झाली आहे असे हिंदी लोक फारच थोडे. या कारणानें सरकारास रिक्रूटिंग ऑफिसर ठिकठिकाणीं नेमून सैन्याची भरती जुलुमानेंच करावी लागत होती. अशा वेळीं लो. टिळकांनीं, मी तुमच्याशीं राजनिष्ठापूर्वक सख्य करण्यास तयार आहें, असें सरकारास कळविलें तर सरकारास तें हवेंच होतें. यासाठीं लोकमान्यांनीं स्वतःचा जाहीरनामा काढून आपली राजनिष्ठा सिद्ध केली व त्याबरोबर त्यांचीं बंधनें तुटून पडून ते मोकळे झाले. हा डाव टाकण्यांत लोकमान्यांचें जसें धैर्य तसा दूरदर्शीपणाहि दिसून आला. हा जाहीरनामा काढल्याबद्दल जहाल म्हणणाऱ्या कांहीं गृहस्थांनीं त्यांस प्रच्छन्नपणें दोषच दिला. टिळक मवाळ झाले असें ते म्हणूं लागले. परंतु वरकरणी वाटणारी ही पड पत्करून लोकमान्यांनीं पुढील प्रचंड चळवळीचा रचलेला व्यूह जेव्हां वरील लोकांच्या नजरेस आला तेव्हां लोकमान्यांनीं केलें तेंच बरोबर केलें अशी त्यांची खात्री झाली.

राजनिष्ठेचा जाहीरनामा काढून बुद्धिबळाच्या खेळाचा थाट मांडल्यानंतर लोकमान्यांनीं आपलें एक एक मोहरें पुढें टाकून प्रतिपक्षावर कशी

मात करावी या उद्योगास ते लागले. त्यांना आतां होमरूल लीगची म्हणजे स्वराज्याची चळवळ हातीं घ्यावयाची होती. हिंदुस्थानचें राजकीय ध्येय 'स्वराज्य' असल्याची घोषणा महर्षि दादाभाई नौरोजी यांनीं १९०६ सालीं कलकत्त्यास राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावरून केलीच होती. तथापि त्यासाठीं एखादा सुसंघटित प्रयत्न कोणींच करून पाहिला नव्हता. लो. टिळकांनीं आपल्या हयातींत राष्ट्रीय संघटनेचे प्रयत्न वेगवेगळ्या दिशांनीं करून पाहिले होते. त्यांनीं सुरू केलेला श्रीगणपतिउत्सव, महाराष्ट्रांत हिंदूंची धर्माच्या ध्वजाखालीं जूट बनविण्याचाच संघटित प्रयत्न होता. त्यांनीं सुरू केलेला श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचा उत्सव महाराष्ट्रांत स्वराज्याची व स्वदेशाभिमानाची जातिवंत आकांक्षाच उत्पन्न करण्याचा एक संघटित प्रयत्न होता. होमरूल लीगची स्थापना हें त्यापुढचेंच पाऊल होय. होमरूल हें नांव आयर्लंडच्या इतिहासांत गाजलेलेंच होतें. परंतु हिंदुस्थानच्या राजकारणांत त्याचा धैर्यानें प्रथम उच्चार करण्याचा मान प. वा. बॅ. बॅप्टिस्टा यांसच दिला पाहिजे. लोकमान्यांनीं आपल्या राष्ट्रीय पक्षाची परिषद ता. १० मे, सन १९१५ रोजीं पुण्यास किर्लोस्कर नाटकगृहांत भरविली. परिषदेचें अध्यक्षस्थान बॅ. बॅप्टिस्टा यांस देण्यांत आलें होतें. परिषदेस तेराशेंवर प्रतिनिधि हजर होते. अशा या भव्य परिषदेंत बॅप्टिस्टासाहेबांनीं होमरूल हेंच आपलें ध्येय ठरवून त्याची मागणी करावी असें म्हटलें होतें. टिळक व बॅप्टिस्टा यांची या बाबतींत आगाऊ सुमारें आठ नऊ महिने वाटाघाट चालली होती; तरी ध्येयाचा होमरूल या शब्दानें जाहीर उच्चार झाला नव्हता तो बॅ. बॅप्टिस्टा यांनीं या वेळीं प्रथम केला ही महत्त्वाची गोष्ट होय. पुण्यांत होमरूल व होमरूल लीग यासंबंधीं खल चालू असतां प्रत्यक्ष लीग स्थापण्यांत मद्रासेस ॲनी बेझंटबाई यांनींच आघाडी मारली. बाईंनीं आपल्या संघाची स्थापना त्याच वर्षाच्या सप्टेंबर महिन्यांत केली. तेव्हां लो. टिळकांनाहि त्याच दिशेनें प्रयत्न करण्याची हिंमत चढली व स्फुरण आलें. तथापि त्यांना या बाबतींत महाराष्ट्रांतील लोकमत अजमावून पाहण्याची जरुरी भासली. कोणत्याहि राजकीय चळवळीस खरा पाठिंबा लोकमताचाच पाहिजे ही लोकमान्यांची दृढ भावना असल्यामुळें त्यांनीं ३० नोव्हेंबर १९१५ पासून

केसरींतून 'हिंदी स्वराज्यसंघ' या विषयावर लेखमाला लिहिण्यास सुरुवात केली. त्यांची केसरींतील ही लेखमाला अत्यंत मननीय आहे. त्यांनीं सदर लेखमालेंत स्वराज्यसंघ स्थापण्याचा सांगितलेला उद्देश व त्याजवरील आक्षेपांस त्यांनीं दिलेलीं उत्तरें हीं कोणाचीहि खात्री पटविणारीं अशींच आहेत.

होमरूल मागणें किंवा होमरूल मिळविण्याकरितां संघ स्थापन करणें यांत राजद्रोह नाहीं, भयंकरपणा नाहीं, या दोन्ही गोष्टी सनदशीर व कायदेशीर आहेत, अशी बहुजनसमाजाची समजूत घातल्यावांचून त्याचें या नवीन उपक्रमाला पाठबळ मिळण्याची आशा नव्हती. वरील लेखमालेंत केसरीनें हाच प्रयत्न केला आहे. बेझंटबाईंच्या संघाची बातमी वाचकांस सांगतांना केसरीनें म्हटलें आहे कीं, "सांप्रतची राजकीय पद्धति सुधारण्याकरितां ही चळवळ आहे व ती महाराणी व्हिक्टोरिया हिनें १८५८ सालीं प्रसिद्ध झालेल्या जाहीरनाम्यास धरून आहे. हिंदुस्थानची राज्यपद्धति सुधारावी व ती लोकमतानुवर्ति व्हावी अशी राष्ट्रीय सभेची व हिंदी पुढाऱ्यांची ओरड फार जुनी आहे व त्या मागणीस अनुसरूनच बेझंटबाईंचा हा स्वराज्यसंघ आहे," असें केसरीनें जनतेस नीट समजावून सांगितलें.

"वरें, स्वराज्याची मागणी करितांना, आम्ही पूर्ण स्वातंत्र्य मागत नाहीं, ब्रिटिश साम्राज्यांतच राहूं इच्छितों, पण येथील अंतर्व्यवस्था आमच्या इच्छेप्रमाणें चालावी एवढीच आमची सध्यांची मागणी आहे," असेंच त्या वेळीं केसरीनें प्रतिपादिलें. "साम्राज्य सोडून आम्हास कोठें जावयाचें नाहीं आणि साम्राज्य चालण्यास जी कांहीं सामान्यव्यवस्थेची अपेक्षा आहे तिलाहि विघातक असें आम्ही कांहींच मागत नाही," (३०-११-१५) असा केसरीनें मालेंतील पहिल्याच लेखांत निर्वाळा देऊन टाकला अर्थात् यामुळें चळवळीस येऊन मिळण्यास जनतेनें भेदरूं नये व चळवळीवर सरकारनेंहि राजद्रोहाचा शिक्का मारून ती चिरडून टाकूं नये हा केसरीचा स्पष्ट उद्देश होता. त्यापुढचा आक्षेप अधिक जबरदस्त होता. सांप्रत ब्रिटिश सरकार संकटावस्थेंत आहे, त्याला आपलें सर्व लक्ष महायुद्धाकडेच लाव-

ण्याची व आपलें सर्व सामर्थ्य महायुद्धांत यशस्वी होण्याकडेच खर्च करण्याची निकड आहे, अशा स्थितींत ब्रिटिश सरकारास देशांत शांतता राखून हरएक प्रकारची मदत करण्याचें सोडून बेझंटबाईंनीं सरकारच्या पाठीमागें ही नवी भगभग काय म्हणून आतांच लावावी, असा हा आक्षेप होता. त्यासहि केसरीनें चोख उत्तर दिलें. "हिंदुस्थान देश आजपर्यंत आमचा राजनिष्ठ नोकर होता; पण त्याला आतां यामुळें राजनिष्ठ मित्र या नात्यानें वागविलें पाहिजे," असें लॉर्ड हार्डिंज यांनीं नुकतेच जे उद्गार काढिले आहेत त्यांतील बीज हेंच होय ... ... "प्रस्तुतच्या युद्धांत हिंदुस्थानवासीयांनीं जी राजभक्ति प्रगट केली आहे, तिजवरून इंग्लंड व हिंदुस्थान यांचें सेव्य-सेवक-भावाचें नातें बदलून दोघांमध्यें मित्रत्वाचें नातें उत्पन्न करण्यास कांहीं हरकत नाहीं, असें इंग्रजी राष्ट्राच्या निदर्शनास आलें आहे. म्हणून स्वराज्यप्राप्त्यर्थ खटपट करण्यास हीच वेळ अनुकूल होय असें आम्हांस वाटतें." (कित्ता). त्याशिवाय केसरीनें आणखीहि एक सबळ कारण सांगितलें. महायुद्ध संपलें व इंग्रज लोक हिंदुस्थानच्या भावी राज्यव्यवस्थेचा विचार करावयास बसले तर त्यांस हिंदी लोकांच्या दृष्टीनें कोणती राज्यव्यवस्था सोयीची याची योग्य कल्पना यावयास नको काय ? ती कल्पना आणून देण्याकरितां लोकमत जागृत करणें, पुढारी व जनतेचे प्रतिनिधि यांनीं एकत्र जमून विचारविनिमय करणें व त्यास सुसंगत स्वरूप आणून स्वराज्याची एक योजना तयार करणें याला चारदोन वर्षें सहज लागणारीं असल्यामुळें युद्धाच्या घाईंत हिंदी पुढाऱ्यांनीं स्वराज्याच्या चळवळीकडेच आपलें लक्ष लावणें कां निकडीचें आहे हें केसरीनें आक्षेपकांच्या निदर्शनास आणून दिलें. केसरीनें आपली बाजू अशी बळकट करून ठेविली कीं, तिजवर नोकरशाही व तिचे कैवारी यांस तुटून पडण्यास कांहीं आधारच शिल्लक राहिला नाहीं.

केसरी केवळ होमरूल लीगचीच चळवळ हातीं घेऊन थांबतां तर गोष्ट वेगळी. पण त्या चळवळीबरोबरच महायुद्धांत यश मिळविण्यास सरकारास ज्या सैन्याची आवश्यकता त्या सैन्यांत शिरून रणांगणावर शौर्य गाजविण्याची आलेली संधीहि न गमविण्याचा उपदेश 'चला आतां शिपाई व्हा' वगैरे मार्ग-दर्शक अग्रलेख लिहून केसरीनें पुढें तरुणांना केला व तो उपदेश करण्या-पूर्वींहि सैन्याची भरती सरकारनें चालविलीच होती. त्या सर्वांचा मोबदला

किंवा बक्षीस म्हणून सरकारनें हिंदुस्थानास स्वराज्य द्यावें अशा तऱ्हेची क्षुद्र कल्पना मात्र होमरूलची चळवळ करण्यांत केसरीची किंवा लोकमान्यांची नव्हती हें विसरतां कामा नये. स्वराज्य हा प्रत्येक मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे, या मुद्द्यावर केसरीचा जोर होता. कारण बक्षीस किंवा मोबदला देणाराच्या मर्जीवर अवलंबून असतो; परंतु हक्काचें तसें नाहीं. हक्क ज्याचा त्यास देणें हें राज्यकर्त्याचें कर्तव्यच होय. हा हक्क सरकारनें कबूल केला तरी हिंदी लोकांच्या लायकीनालायकीचा प्रश्न पुन्हा शिल्लक राहतोच व इंग्रज लोकहि, हिंदुस्थानास आम्ही स्वराज्याचे अधिकार उपभोगूं देणार नाहीं, असें कधींच न म्हणतां हिंदी लोक स्वराज्यास लायक नाहींत असेंच वेळीं अवेळीं सांगत आले होते. त्यांचा हा आक्षेप भ्रामक असल्याचें केसरीनें सांगितलें व त्याला म्हैसूरसारख्या संस्थानाचा त्यानें दाखला दिला. केसरी म्हणतो, "म्हैसूरसारख्या जवळच्या संस्थानांत जर हिंदी लोक नमुनेदार राज्यव्यवस्था ठेवूं शकतात, तर त्यांना ती इतर प्रांतांत सहज ठेवतां येईल." याहि उपर कदाचित् हा आक्षेप क्षणभर कबूल केला तरी हिंदी लोकांची स्वराज्य चालविण्याची नालायकी नाहींशी होणार कधीं? शेंदीडशें वर्षें हिंदुस्थानवर इंग्रजांनीं राज्य करून शेवटीं हिंदी लोक स्वराज्य चालविण्यास जर नालायकच, तर हा दोष हिंदी लोकांचा नसून इंग्रजी राज्यपद्धतीचाच असल्यानें तो दोष हिंदी लोकांस स्वराज्य देण्यानेंच दूर होणार आहे. ना. शास्त्री हे १९१५ सालीं कोईमतूरच्या जिल्हा-परिषदेचे अध्यक्ष होते. त्यांनींहि आपल्या भाषणांत सांगितलें होतें कीं, कोणीहि लोक स्वराज्य चालविण्याला आरंभीं पूर्णपणें लायक नसून तें चालविण्याचें ज्ञान त्यांस अनुभवानेंच प्राप्त होतें. शास्त्री यांच्या या विधानाचा दाखला देऊन केसरीनें आपली बाजू अधिकच बळकट केली.

अशा रीतीनें साधकबाधक प्रमाणें सांगून केसरीनें बेझंटबाईच्या होमरूललीगच्या चळवळीस उचलून धरलें. लोकमान्यांनीं आपला स्वराज्य-संघ अद्यापि स्थापन केला नव्हता; परंतु त्याची ही पूर्वतयारी होती असेंच म्हटलें पाहिजे. कारण बाईंच्या संघावर जे आक्षेप आज घेतले जात होते, तेच उद्यां टिळकांच्या संघावर सरकार व प्रतिपक्षांतील कित्येक गृहस्थ यांजकडून घेतले जाणार हें ठरल्यासारखेंच होतें, यासाठीं ही चळवळ राज-

निष्ठेचीच आहे, तिच्यांत राजद्रोह नाहीं अशी सरकार व लोक यांची आगाऊच खात्री केल्यानंतर लोकमान्यांच्या पुढील मार्ग सहजच सोपा व्हाव-याचा होता. केसरींत हिंदी-स्वराज्य संघावरील लेख सन १९१५च्या अखेरी-अखेरीस आले व ते प्रसिद्ध झाल्यानंतर थोड्याच दिवसांत म्हणजे २३ डिसेंबर १९१५ रोजीं पुण्यास महाराष्ट्र, कर्नाटक, वऱ्हाड, मध्यप्रांत यांतील सुमारें तीनशें सद्गृहस्थांची सभा श्रीमंत गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे त्यांच्या अध्यक्षतेखालीं भरविण्यांत आली. हिंदुस्थानाकरितां एखादा स्वराज्य संघ स्थापणें जरूर आहे काय आणि तो स्थापल्यास कोणत्या धोरणावर स्थापावा व त्याचें नातें इतर संस्थांशीं कसें असावें याचा खल त्या सभेंत दोन दिवस होऊन सरतेशेवटीं पंधरा जणांची एक कमिटी नेमण्यांत आली व त्या कमिटीनें आपला निकाल १ एप्रिल १९१६ च्या आंत प्रसिद्ध करावा असें ठरलें.

वरील ठरावाप्रमाणें २८ एप्रिल १९१६ रोजीं बेळगांव येथें संघाची स्थापना होऊन त्याच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष बॅ. जोसेफ बॅप्टिस्टा, मुख्य चिटणीस श्रीयुत नरसिंह चिंतामण केळकर व दुय्यम चिटणीस श्री. दामोदर विश्वनाथ गोखले आणि खजिनदार श्री. यशवंत विष्णु ऊर्फ आण्णासाहेब नेने यांस नेमण्यांत आलें. "सर्व प्रकारच्या सनदशीर उपायांनीं ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वराज्य मिळ-विणें व त्याकरितां लोकमत तयार करणें" हा संघाचा उद्देश ठरून तो तडीस नेण्यासाठीं सतरा प्रमुख गृहस्थांचें कार्यकारी मंडळ निवडलें गेलें. स्वराज्य-संघाचें मुख्य काम तीन प्रकारचें होतें—( १ ) सनदशीर पद्धतीचें स्वराज्य मिळविण्याकरितां साधनांची योजना करणें, ( २ ) राजकीय शिक्षणाचा देशांत प्रसार करणें व ( ३ ) संघाच्या सभासदांची संख्या वाढविणें. या ठिकाणीं कोणास असा संशय पडण्यासारखा आहे कीं, बेझंट बाईंनीं मद्रासेस व टिळकांनीं पुण्यास असे दोन वेगवेगळे संघ कां स्थापन केले ? या दोन्ही व्यक्ति प्रचंड सामर्थ्याच्या होत्या व त्यांना मिळालेले अनुयायीहि कर्तृत्ववान् व वजनदार होते. तेव्हां या उभयतांचें सामर्थ्य एकवटून अखिल हिंदुस्थानाकरितां एकच संघ स्थापला गेला असता तर कार्याचा जोर एकजुटीनें अधिक वाढला नसता काय ?

पण ही शंका लो. टिळक यांस आली नाहीं असें नाहीं. त्यांना ही शंका आल्यावरून तिचें उत्तर ता. २७ जून १९१६ केसरींत “तुम्ही आपल्या हातानें जेवणार का नाहीं ?” या मथळ्याखालीं लोकमान्यांनीं जो लेख लिहिला त्यांत दिलें आहे. “बेळगांवास जी होमरूल लीग किंवा स्वराज्य-संघ स्थापन झाला, तशाच प्रकारची होमरूल लीग किंवा स्वराज्य संघ मद्रासेसहि मिसेस बेझंट यांनी स्थापला आहे. पण या दोन्ही संघांचे उद्देश एकच असल्यामुळें प्रांतोप्रांतीं काम करणारांच्या सोयीकरितां हे संघ निराळे झालेले आहेत, मतभेदामुळें नव्हेत, ही गोष्ट बेझंटबाई-नाहि मान्य असून बेळगांव येथें होमरूल लीग स्थापन करणाऱ्या गृहस्थां-चाहि तोच अभिप्राय आहे.” यावरून पुणें व मद्रास यांमधील अंतर काम करण्याच्या दृष्टीनें फार म्हणूनच दोन वेगळेवेगळे संघ निघाले, हें उघड आहे. पण त्यांची स्थापना वेगवेगळी झाल्यानंतर त्यांना नांवेंहि भिन्नत्व दर्शविणारींच हवीं असल्यानें बेझंटबाईनीं आपल्या संघाचें नांव ‘होमरूल लीग’ असें ठेविलें होतें, तर लोकमान्यांनीं नव्या संघाचें नांव ‘इंडियन होमरूल लीग’ म्हणजे ‘हिंदी स्वराज्य-संघ’ असें ठेविलें.

स्वराज्य-संघाची स्थापना हें बेळगांवास जमलेल्या राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं एक महत्त्वाचें काम केलें. पण तितकेंच महत्त्वाचें दुसरें एक काम लो. टिळकांस बेळगांव मुक्कामीं उरकून घ्यावयाचें होतें. सुरतेस १९०७ सालीं बखेडा माजून राष्ट्रीय पक्ष कॉंग्रेसच्या चळवळीपासून अलग पडला तो १९१६ सालापर्यंत तसाच बाहेर राहिला. यामुळें राष्ट्रीय सभा एकट्या मवाळ पक्षाच्या हातीं राहिल्यानें ती दुर्बळ बनली होती व राष्ट्रीय पक्षां-तहि थोडा विस्कळीतपणा आला होता. लो. टिळक सहा वर्षांच्या शिक्षेतून सुटून येईपर्यंत राष्ट्रीय पक्षानें कॉंग्रेसमध्यें घुसण्याचा नांव घेण्यासारखा प्रयत्न केलाच नाहीं. राष्ट्रीय सभा नेमस्तांच्या हातांत गेल्यावर त्यांनीं राष्ट्रीय सभेचे नवीन नियम बनविले व ध्येयहि संकुचित केलें. राष्ट्रीय पक्षास ज्यांत वसाहतींच्या स्वराज्यापासून संपूर्ण स्वराज्यापर्यंत किंवा स्वातंत्र्यापर्यंतहि समावेश होईल अशा प्रकारचें व्यापक ध्येय पाहिजे होतें व दुसरें, राष्ट्रीय सभेस प्रतिनिधि पाठविण्याचा अधिकार कोणत्याहि जाहीर सभेला असावा असें त्यांचें म्हणणें होतें; परंतु नेमस्तांनी नियमाचीं

कुंपणें अशीं घालून ठेविलीं होतीं कीं, आपल्या पक्षाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणाचाहि राष्ट्रीय सभेंत शिरकाव होऊं नये. लोकमान्य मंडालेहून सुटून आल्यापासून राष्ट्रीय पक्ष राष्ट्रीय सभेपासून फटकून राहिल्यानें राष्ट्राचें झालेलें नुकसान जाणवत असून राष्ट्रीय सभेंत घुसण्याची त्यांची खटपट गेलीं दोन वर्षें सतत सुरू होती. पण त्यांच्या ह्या प्रयत्नास नेमस्त पक्षांतील कांहीं दुराराध्य व्यक्तींच्या हटवादामुळें अगर भीतीमुळें व खुद्द राष्ट्रीय पक्षांतील कांहीं व्यक्तींच्या अभिमानामुळें यावें तसें यश आलें नाहीं.

लोकमान्यांनीं आपला स्वराज्य संघ स्वतंत्र स्थापला होता तरी त्याचा राष्ट्रीय सभेशीं मुळींच विरोध नव्हता. उलट संघाचें बळ व वजन वाढवून राष्ट्रीय सभेकडून त्याच्या कार्यास मान्यता घ्यावयाची असा टिळकांचा बेत होता. कारण राष्ट्रीय सभा ही हिंदुस्थानांतील सर्वांत जुनी, वजनदार व जगविख्यात संस्था. त्या मानानें स्वराज्य संघाचा जन्म आजकालचा. आणि स्वराज्य संघ झाला तरी तो केवळ राष्ट्रीय पक्षाचा, पण राष्ट्रीय सभा सर्व राष्ट्राची व सर्व पक्षांची. तेव्हां संघाच्या मागणीची छाप ब्रिटिश मुत्सद्द्यांवर किंवा पुढील राजकीय सुधारणांवर पूर्णपणें पडावयाची झाल्यास स्वराज्याची मागणी एकमुखानेंच होणें जरूर असून तो एकमुखीपणा सिद्ध करणारी राष्ट्रीय सभेशिवाय दुसरी संस्थाच देशांत नसल्यानें लोकमान्यांची राष्ट्रीय सभेच्या गोटांत घुसण्याची एकसारखी धडपड सुरू होती. होमरूल लीगच्या स्थापनेच्या वेळींच बेळगांवास प्रांतिक परिषद बोलावून टिळकांनीं राष्ट्रीय सभेचें ध्येय मान्य करूनहि तिच्यांत राष्ट्रीय पक्षानें शिरण्याचा ठराव पास करून घेतला.

बेळगांव परिषदेचें अध्यक्षस्थान श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांस देण्यांत आलें होतें. परिषद् टोलेजंग झाली. सदर परिषदेंत बरेच सभासद काँग्रेसशीं सभेट करण्याच्या विरुद्ध होते. तरी लो. टिळकांनीं परिषदेंत केलेल्या युक्तिवादामुळें त्यांचा विरोध विरघळला. मुख्य वाद ध्येयाचा, तर नेमस्त पक्ष व राष्ट्रीय पक्ष यांचें ध्येय तूर्त तरी साम्राज्यांतर्गत स्वराज्य हें एकच होतें. यामुळें ध्येयाचा आक्षेप दूर झाला. दुसरा वाद, राष्ट्रीय सभेस राष्ट्रीय पक्षाच्या प्रतिनिधींना आपल्या संस्थांमार्फत

जाण्याचा हक्क असावा. हा हक्कहि 'ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीनें' नुकताच कबूल केला होता. उदाहरणार्थ, पुण्याच्या 'सार्वजनिक सभे'स हा हक्क मिळाला होता. मात्र अशा संस्थेनें पाठवावयाच्या प्रतिनिधींची संख्या पंधरापेक्षां अधिक असूं नये, ही मर्यादा घालण्यांत आली होती. हा कड्या-कुलुपांचा बंदोबस्त, राष्ट्रीय पक्षाचें बहुमत राष्ट्रीय सभेंत होऊन राष्ट्रीय सभा आपल्या हातची निसटूं नये, यासाठींच नेमस्त पक्षानें केला होता. 'बेळगांव परिषद व समेट' या विषयावर ता. १ मे. १९१६ च्या अंकांत केसरी म्हणतो, "ही दुसरी अट त्यांत ठेवली नसती तर बरें झालें असतें, हें खरें....हल्लीं राष्ट्रीय सभेचें द्वार जितकें खुलें झालें आहे त्यापेक्षां तें अधिक खुलें पाहिजे हें सर्वथैव खरें आहे. पण ज्यांच्या प्रयत्नानें राष्ट्रीय सभेचें हें द्वार थोडें तरी खुलें झालें त्यांच्याच प्रयत्नानें तें आणखी खुलें होणार नाहीं असें कोण म्हणेल ?"

केसरीकारांनीं वरीलप्रमाणें बेळगांव परिषदेंतील समेटाच्या ठरावांचें समर्थन केलें असलें तमलें तरी तेवढ्यानें त्यांचें स्वत:चें पूर्ण समाधान झालेलें दिसत नाहीं. लो. टिळकांनीं या बाबतींत स्वीकारलेलें धोरण दूरदृष्टि व त्यांच्या थोर मनाचें निदर्शक होतें यांत शंकाच नाहीं. राष्ट्रहित व राष्ट्रैक्य यांशिवाय दुसरी कोणतीहि भावना या कृतीच्या मुळाशीं नव्हती. कारण त्याच लेखांत एके ठिकाणीं असा उल्लेख आढळतो. "...पण राष्ट्रकार्या-करितां जेव्हां दोघांनीं प्रयत्न करावयाचा आहे, तेव्हां 'न मे द्वेष्योस्ति न प्रियः' या उदार मनोवृत्तीचा आश्रय करूनच तो केला पहिजे. हिंदुस्थानची सध्याची स्थिति अशी आहे कीं, आपल्या राजकीय उन्नतीसाठीं राज्यकर्त्यां-जवळ आपणांस जी कांहीं मागणी करावयाची ती सर्वांनीं एकत्र जमून ठरविली पाहिजे." या उद्‌गारांवरून लोकमान्यांना मानापमानाचें गोवें गुंडाळून ठेवून स्वराज्याकरितां राष्ट्रांत ऐक्य घडवून आणण्याचा ध्यास कसा लागला होता हें दिसून येतें.

स्वराज्यसंघाच्या संस्थापकांनीं बेळगांवास संघाची स्थापना करतांना त्याचें पुढील कार्य निर्विघ्नपणें चालण्यासाठीं सर्व प्रकारची काळजी घेतली होती. संघास सरकारी अधिकाऱ्यांचा विरोध होऊं नये म्हणून तो सनदशीर

चळवळीच्या मर्यादेंत ठेविला होता. संघापासून बहुजनसमाजानें अलिप्त राहूं नये, म्हणून त्यांत राजद्रोहाचें बीज मुळींच नाहीं अशी त्यांची त्यांनीं परोपरीनें खात्री करून दिली होती. आणि नेमस्त व राष्ट्रीय पक्ष यांतील फूट मोडावी म्हणून काँग्रेसमध्यें सामील होण्याचा ठरावहि मंजूर करण्यांत आला होता. स्वराज्यसंघ स्थापण्यांतील मुख्य हेतु स्वराज्याची मागणी एखाद्या दुसऱ्या पुढाऱ्याची किंवा मूठभर सुशिक्षितांची नसून तिला बहुजनसमाजाचें सँक्शन म्हणजे मंजुरी किंवा पाठिंबा आहे हें सिद्ध करण्याचा होता. व त्या-करितां लोकमान्यांनीं 'स्वराज्य' या विषयावर व्याख्यानें देण्याचा धुमधडाका सुरू केला. बेळगांवची प्रांतिक परिषद आटोपल्यावर त्यांचें पहिले व्याख्यान बेळगांव येथेंच प्रांतिक परिषदेच्या मंडपांत श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखालीं झालें. त्यानंतर त्याच महिन्यांत देशभक्त तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं अहमदनगर येथें जिल्हा परिषद भरली. या परिषदेच्या निमित्तानें नगरास जाऊन लोकमान्यांनीं 'स्वराज्य' या विषयावर दोन व्याख्यानें दिलीं. त्या दोन्ही ठिकाणच्या भाषणांत पारतंत्र्याविषयीं चीड व स्वराज्याविषयीं प्रेम लोकांत उत्पन्न करतांना ते म्हणाले, "पारतंत्र्यांत स्वराज्याशिवाय दुसरें ध्येय डोळ्यापुढें ठेवूं नका. स्वराज्य मिळविण्यावर जर तुमचा विश्वास नसेल तर तुम्ही हिंदुस्थानांत राहण्यास नालायक आहांत. यापेक्षां हिंदुस्थान देश सोडाल तर फार बरें होईल." स्वराज्य शब्दाचा अर्थ अगदीं सामान्य लोकांस समजण्याकरितां अतिशय सोप्या रीतीनें ते सांगत असत. त्याचा मासला पुढीलप्रमाणें :—"स्वराज्य म्हणजे दुसरें तिसरें कांहीं नाहीं. माझ्या घरचा कारभार मीं पाहाणें याचेंच नांव स्वराज्य. नोकरांचें राज्य जाऊन लोकांचें राज्य व्हावें. याचेंच नांव "स्वराज्य." देव कायमच ठेवावयाचाच, बदलायचा तो फक्त पुजारी." "कलेक्टर, कमिशनर, गव्हर्नर हुषार आहेत. ते आम्हाला पाहिजेत. पण ते आमच्या हाताखालीं पाहिजेत ते नोकर असावेत. मालक नकोत. याचेंच नांव स्वराज्य. आम्ही राज्य-कारभार चालविला तर, बादशहांना उलट आनंदच होईल. मधल्या कोठावळ्यांना मात्र वाईट वाटेल. पण असें बोलण्यांत बिलकुल राजद्रोह नाहीं." त्या वेळीं त्यांनीं श्रोत्यांना स्वराज्य संघाचे सभासद होण्यासाठीं परोपरीनें विनवणी केली. ता. २७ जून १९१६ रोजीं लोकमान्यांचा 'तुम्ही

आपल्या हातानें जेवणार का नाहीं ? ' या विषयावर केसरींत अग्रलेख प्रसिद्ध झाला. त्यांत "प्रस्तुत चळवळींत राजद्रोह नाहीं. बेकायदेशीरपणा नाहीं, कोणत्याहि अधिकाऱ्याची अवमानता नाहीं, आणि कोठें केव्हांहि अस्वस्थता उत्पन्न करण्याचा विचार नाहीं; मग स्वराज्य-संघाचे सभासद होण्यास हरकत कोणती ? नीट विचार करा, उगीच खोटया सबबीनें फसून जाऊन आपल्या पायावर धोंडा पाडून घेऊं नका,'' असा महाराष्ट्रीयांस केसरीनें उपदेश केला. पण जनतेस अधिकाऱ्यांच्या रोषाची बसलेली भयंकर भीति कांहीं केल्या मोडेना व संघाच्या सभासदांची संख्या वाढेना. संघाची वर्गणी मोठी होती म्हणावी तर तसेंहि नव्हतें. प्रवेश-फी दोन रुपये व वार्षिक वर्गणी फक्त एक रुपया. यावरून वर्गणीच्या भीतीनें लोक सभासद होत नव्हते असें नव्हे तर, वर्गणीपेक्षां 'स्वराज्य' या शब्दालाच लोक अधिक भीत होते हेंच खरें. 'स्वराज्य' हा शब्द आज फार स्वस्त झाला आहे, पण अवघ्या पंधरा वर्षांपूर्वीं तो किती महाग होता व त्याची दहशत जनतेस किती वाटत होती हें सिद्ध करण्यास आणखी वेगळें प्रमाण कोणतें पाहिजे ?

लोकमान्य टिळक यांनीं आपल्या संघाची चळवळ पूर्णपणें राजनिष्ठ व सनदशीर ठेवण्याची इतकी खबरदारी बाळगळी होती, तरी संघावर संकटें येणार याचीं दुश्चिन्हें चळवळ जोरांत येऊं लागतांच दिसूं लागलीं. टिळकांच्या होमरूल लीगप्रमाणेंच बेझंटबाई यांनींहि आपला होमरूल लीग मद्रासेस काढला असल्याचें वर सांगितलेंच आहे. बाईंना संघ स्थापन करण्याची स्फूर्ति इंग्लंडांतून मिळाली होती हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. यासंबंधींचा आधार ता. २८–९–१५ च्या केसरींत पुढीलप्रमाणें सांपडतो. "गतवर्षीं कांहीं इंग्रज मुत्सद्द्यांबरोबर व हिंदुस्थानाच्या हिताहिताविषयीं कळकळ बाळगणाऱ्या इंग्लंडमधील कांहीं सद्‌गृहस्थांबरोबर वादविवाद करून आणि त्यानंतर कांहीं महिने हिंदुस्थानांत व इंग्लंडमध्यें संभाषणद्वारां व पत्रव्यवहारानें निरनिराळ्या लोकांचा विचार घेऊन 'होमरूल लीग' नांवाची संस्था काढण्याचें आम्हीं मुक्रर केलें आहे. ह्या होमरूल लीगचा उद्देश हिंदुस्थानला स्वराज्य मिळविणें हा एकच आहे; व ही संस्था येथें असणारी राष्ट्रीय सभा व इंग्लंडमध्यें असणारी ब्रिटिश कॉंग्रेस कमिटी यांना पुरवणी दाखल समजली जाईल. या लीगचा सर्वसाधारण उद्देश म्हटला म्हणजे

लोकांना स्वराज्याच्या ध्येयाचें शिक्षण देऊन कॉंग्रेसच्या पहिल्या आर्टिकल-मध्यें ग्रथित केलेल्या स्वराज्याच्या मागणीला—अर्थात् आत्मविश्वास उत्पन्न झाल्यावर कित्येक वर्षें कॉंग्रेसतर्फे आपल्या हक्कांबद्दल ओरड करूनहि निष्फळ ठरलेल्या आपल्या मागणीला—सर्व राष्ट्राच्या शक्तीचा पाठिंबा देणें हा आहे."

वरील उताऱ्यावरून बेझंटबाईंच्या संघाचा उद्देशहि पूर्णपणें राजनिष्ठेचाच व कायदेशीर होता हें उघड आहे. अशा रीतीनें एकाच उद्देशानें व एकाच धोरणानें निघालेल्या दोन संस्थांनीं परस्परांशीं सहकार्य करून आपल्या चळवळी चालू ठेवल्यास त्यांत गैर तें काय आहे? म्हणून बेळगांव व नगर येथील आपला दौरा आटोपून लोकमान्य पुण्यांत आल्यावर सुमारें तीन आठवड्यांनीं बाईंनीं पुण्यास भेट दिली. त्यांचें ता. २२ मे १९१६ रोजी क्रीडाभुवनांत लोकमान्यांच्या अध्यक्षतेखालीं 'होमरूल' या विषयावर व्याख्यान झालें. जसा टिळकांच्या चळवळीचा पाठपुरावा केसरी करीत होता तसा बेझंटबाईंच्या चळवळीचा पुरस्कार करण्यास त्यांचें मद्रासेस 'न्यू इंडिया' हें इंग्रजी दैनिक पत्र होतेंच. त्या वेळीं वर्तमानपत्रांची मुस्कटदाबी करणारा छापखान्यांचा कायदा (प्रेस ॲक्ट) जिवंत असून त्या कायद्याअन्वयें बाईंच्या 'न्यू इंडिया' पत्रापासून अवघ्या चारच दिवसांनीं दोन हजारांचा जामीन मागण्यांत आला. दडपशाहीची संक्रांत होमरूल लीग चळवळीकडे वळल्याची ही दवंडीच होती. ज्या दिवशीं 'न्यू इंडिया' पत्रापाशीं जामीन मागण्यांत आला, त्याच दिवशीं त्यांना मुंबई इलाख्यांत येण्यास मनाई-हुकूम झाला. लो. टिळक व बेझंटबाई या दोघांची जोडी जमून मुंबई इलाख्यांतील चळवळ आहाराबाहेर जाऊं नये यासाठींच नोकरशाहीची ही धडपड नव्हती काय?

बेझंटबाईंच्या पाठोपाठ हें अरिष्ट लोकमान्यांवर कोसळणार हें ठरल्यासारखेंच होतें. या सुमारास लोकमान्यांच्या भक्तांनीं त्यांच्या ६१ व्या वर्षाची ज्युबिली मोठ्या समारंभानें साजरी करण्याचें योजिलें होतें. त्याप्रीत्यर्थ लोकमान्याना गुरुदक्षिणा न म्हटली तरी अहेर म्हणून एक लक्ष रुपयांची थैली अर्पण करण्याच्या कल्पनेची स्फूर्ति गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांना होऊन ते व त्यांची अनुयायी मंडळी यांचा तसें घडवून आणण्याचा प्रयत्न खाजगी रीतीनें चालू होता. ता. २३ जुलै १९१६ रोजीं हा समारंभ

साजरा करण्यास गायकवाडवाड्यांत लोकमान्यांचे हजारों भक्त उल्हासानें जमले असतां अधिकारी वर्गानें आपलाहि आहेर निराळ्याच मार्गानें त्यांस सादर करण्याची तयारी ठेविली होती. त्याच तारखेस पुण्याचे डि. मॅजिस्ट्रेट मि. हॅच यांनीं बेळगांव व नगर येथें लोकमान्यांनीं भाषणें केल्याबद्दल त्यांजवर जामीनकीची नोटीस बजाविली. ही जामीनकीची रक्कम थोडीथोडकी नसून पन्नास हजारांची होती व एवढी मोठी रक्कम मागण्याला मॅजिस्ट्रेटांनीं कारणहि विलक्षणच दिलें होतें. या अधिकाऱ्यानें म्हटलें होतें कीं, "टिळकांची भक्तमंडळी त्यांस एक लक्षांचा आहेर करणार आहेत, तेव्हां एवढा जामीन पटविणें टिळकांना मुळींच कठीण नाहीं!" अर्थात् ही नोटीस शांतता राखण्यासाठीं होती. सदर खटला म्हणजे स्वराज्य-संघावरील एक मोठें गंडांतरच समजलें पाहिजे. कारण संघाचे सभासद व्हावें कीं न व्हावें याविषयीं आधींच जनतेचीं मनें साशंक व भेदरलेलीं, तशांत संघाचे उत्पादक जे लोकमान्य टिळक त्यांच्या हालचालीसच जामीनकीचा पायबंद बसल्यानंतर स्वराज्याची चळवळ खरोखरच राजद्रोही समजली जाऊन संघापासून जनता पूर्वीपेक्षांहि चार हात दूर पळणार हें स्वाभाविकच होय. ता. १२ ऑगस्ट १९१६ रोजीं पुण्याच्या डि. मॅजिस्ट्रेटनें लोकमान्यांपासून जामीन घेतला व ता. ९ नोव्हेंबर १९१६ रोजीं हायकोर्टानें तो रद्द करून लोकमान्यांना दोषमुक्त ठरविलें. सरकारतर्फे बॅ. बिनिंग यांनीं मॅजिस्ट्रेटपुढील खटल्यांत टिळकांचीं भाषणें राजद्रोही व सरकारासंबंधीं द्वेष उत्पन्न करणारीं होतीं असें म्हटलें होतें. लोकमान्यांच्या वतीनें काम चालविण्यास मुंबईचे प्रसिद्ध बॅ. जिना, साताऱ्याचे प्रख्यात वकील श्री. दादासाहेब करंदीकर इत्यादि वकील खालच्या कोर्टांत हजर होते. हायकोर्टांतहि बॅ. जिना यांनींच काम चालविलें. हायकोर्टांतील अपील न्यायमूर्ति बॅचलर व शहा या जोडीपुढें निघून टिळकांच्या भाषणांत अधिकारी वर्गावर कडक टीका असली तरी तेवढ्यानें टिळकांचा हेतु राजद्रोहाचा किंवा सरकारविषयीं द्वेष पसरविण्याचा होता असें सिद्ध होत नसल्याचें न्यायमूर्तिद्वयानें ठरविलें.

लोकमान्यांवरील हा तिसरा राजद्रोही खटला होय. टिळकांवर सरकारनें राजद्रोहाचा खटला केला व टिळक त्यांतून दोषमुक्त सुटले असें पूर्वीं दोन्ही प्रसंगीं घडलें नव्हतें. यामुळें प्रस्तुत खटल्याचा निकाल लोकमान्यांना अन-

कूल लागेल अशी आशा बाळगण्यास कोणासहि जागा नव्हती. असें असतांहि हा विजय लाभल्यानें व होमरूल लीगवरील संकट टळल्यानें लोकमान्यांच्या कोटचवधि भक्तांना व चाहत्यांना हर्ष व्हावा यांत आश्चर्य तें काय? खुद्द लोकमान्यांना ह्या यशाबद्दल समाधान वाटलें. ते केसरींतील अग्रलेखांत म्हणतात, "स्वराज्याचा रुपया बद्द नाहीं. तो खणखणीत वाजतो, हें टिळकांच्या खटल्यानें आतां सर्वांच्या निदर्शनास आलें आहे. आणि आम्हांस सरकार या मार्गांत अडथळा करील अशा प्रकारची भीति उरलेली नाही, किंबहुना यापुढें कोणी अशी सबब आणील तर ती नामर्दपणाची गणली जाईल... . टिळक व बेझंटबाई तुमच्या जन्मास कांहीं पुरून उरल्या नाहींत. स्वराज्य-प्राप्त्यर्थ जो उद्योग करावयाचा, जी खटपट करावयाची, ज्या योजना करावयाच्या, जें शरीरबल आणि द्रव्यबल उपयोगांत आणावयाचें, अथवा इंग्रजी राष्ट्रापुढें, इंग्रजी पार्लमेंटपुढें हा प्रश्न आणून त्याचा योग्य निकाल लागण्यासाठीं ज्या ज्या कांहीं तजविजी करावयाच्या त्या सर्व करावयास आतां तुम्हांसच लागलें पाहिजे."

लोकमान्यांवर खटला झाल्यापासून त्याचा शेवटचा निकाल हायकोर्टांत लागेपर्यंत जो काळ गेला त्यांत 'स्वराज्य-संघ' स्वस्थ बसला होता असें नाहीं. संघातर्फे त्या मुदतींत व्याख्यानमाला मुद्दाम सुरू करण्यांत आली होती. पण तींत सावधगिरी मात्र अशी ठेविली होती कीं, जीं भाषणें करावयाचीं तीं अत्यंत विचारपूर्वक केलेलीं असावींत व शक्य तर तीं इंग्रजी भाषेंतच व्हावींत. हेतु अर्थातच उघड आहे. वरील धोरणास अनुसरून पहिलें व्याख्यान संघाचे मुख्य चिटणीस श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं ता. २४ सप्टेंबर रोजीं पुण्यास किर्लोस्कर नाटकगृहांत दिलें. अध्यक्ष-स्थानीं बॅ. बॅप्टिस्टा हे होते. तात्यासाहेबांचें हें भाषण अर्थात् इंग्रजींतच झालें असून त्यांत संघाचें पूर्ववृत्त, उद्देश व पुढील कार्याची दिशा त्यांनीं दाखविली होती सदरहू भाषणांत संघाच्या कार्याविषयीं जी माहिती त्यांनीं सांगितली ती बरीच बोधप्रद वाटेल. संघ बेळगांवास एप्रिलअखेर स्थापन झाला, तेव्हांपासून सप्टेंबर महिन्यापर्यंत संघाचे सभासद अवघे ६५० नोंदले गेले होते व वर्गणी २२०० रुपये जमली होती. असो. संघातर्फे सुरू झालेली व्याख्यानमाला तशीच पुढें चालून दुसरें व्याख्यान पुण्यासच

श्री. दादासाहेब करंदीकर यांचें, तिसरें नाशिकचे श्री. रामभाऊ प्रधान वकील यांचें, चवथें नगरचे वकील श्री. हरिभाऊ पटवर्धन यांचें, याप्रमाणें झालीं. तथापि चळवळीस खरा जोर खटल्याच्या निकालानंतर आला. खटल्याचा निकाल लागल्यावर लखनौ येथें त्या सालची राष्ट्रीय सभा भरावयाची होती. ही सभा राष्ट्रीय सभेच्या इतिहासांत अपूर्व ठरणार असा संभव दिसूं लागला. नोव्हेंबर महिन्यांत कॉंग्रेस कमिटीनें आपल्या सुधारणांचा मसुदा तयार केला. मॉस्लेम लीगनेंहि आपला मसुदा बनविला व टिळकांच्या होमरूल लीगतर्फेहि बॅप्टिस्टा यांनीं आपला मसुदा तयार ठेविला होता. अशा रीतीनें तिन्ही बाजूंनीं तयारी सुरू झाली असली तरी, टिळक पक्षाच्या ताब्यांत राष्ट्रीय सभेचीं सूत्रें अद्यापि आलीं नव्हतीं; तरी पण लोकमान्यांचा राष्ट्रीय सभेच्या कामकाजांत प्रवेश मात्र जलदीनें होत चालला. कारण मुंबई प्रांतिक कॉंग्रेस कमिटीनें टिळकांना ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीचे सभासद निवडलें. राष्ट्रीय सभेकरितां पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या वतीनें पंधरा सभासद निवडून देण्यासाठीं लोकमान्यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १०।१२।१९१६ रोजीं सभा भरली व याच उपायानें ठिकठिकाणच्या राष्ट्रीय पक्षाच्या लोकांनीं लखनौच्या राष्ट्रीय सभेत घुसण्याचें ठरविल्यामुळें लोकमान्यांचें सामर्थ्य लखनौस चांगलेंच दृष्टीस पडणार अशी आशा उत्पन्न झाली. या वेळीं टिळकपक्षांत अपूर्व उत्साह उत्पन्न झाला होता. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्ष म्हणजेच टिळक पक्ष. तो एकजीव बनल्याचीं नित्य नवीं प्रमाणें दृष्टीस पडूं लागलीं. लखनौच्या राष्ट्रीय सभेस जाण्याकरितां लोकमान्यांच्या अनुयायांनीं एक स्पेशल ट्रेनच मुंबईहून काढली आणि त्या गाडींतून लो. टिळक पूर्वीच्या दिग्विजयी राजाप्रमाणें स्टेशनास्टेशनांवर आदर-सत्कार घेत घेत निघाले. मराठी राज्यांत मराठे सरदार उत्तरेवर स्वारी करण्यास चालले असतां वाटेनें ठिकठिकाणच्या मांडलिकांपासून खंडण्या वसूल करून पुढें कूच करीत, त्या पूर्ववैभवाचें स्मरण, या खास गाडींतील टिळकपक्षीयांस झाल्यावांचून राहिलें नाहीं. गाडीवर होमरूलचें निशाण जरीपटक्याऐवजीं फडकत होतें व वाटेंत कोठें हारतुऱ्यांचा खच, कोठें पेढेबर्फीच्या व सुक्या मेव्याच्या डाल्या, कोठें नाना प्रकारच्या फळांचे करंडे, कोठें मेजवान्यांचा थाट, कोठें उष्णोदक स्नानाचा बेत, तर कोठें

व्याख्यानांची झोड असे सुखसोहाळे अनुभवीत महाराष्ट्रीय होमरूललीग-वाल्यांची ही खास गाडी लखनौ स्टेशनवर जाऊन थडकली. सर्व ठिकाणच्या पुढाऱ्यांत लोकमान्य हेंच आधिदैवत होऊन राहिलें. टिळक आपल्या राहण्याच्या जागीं बसले कीं, त्यांच्या भोंवतीं त्यांस पाहावयास जमलेल्या लोकांच्या रूपानें राष्ट्रीय सभाच भरल्यासारखें होई व ते राष्ट्रीय सभेच्या मंडपांत जावयास निघाले कीं, ती राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांची मिरवणूकच बनून जाई. उणेपणा इतकाच कीं, ते राष्ट्रीय सभेचे प्रत्यक्ष अध्यक्ष नव्हते. तथापि स्थिति अशी झाली होती कीं, राष्ट्रीय सभेचें अध्यक्षस्थान बाबू अंबिकाचरण मुजुमदार यांना, पण अध्यक्षांचा मान मात्र लोकमान्य टिळक यांना! वास्तविक लोकमान्यांचा लखनौस जो सन्मान झाला त्याच्या तुलनेला दुसरी उपमा नाहीं, म्हणून राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षांसारखा झाला असें म्हणावयाचें इतकेंच. बाकी तो मान अध्यक्षांच्या मानापेक्षां किती तरी पटींनीं खास मोठा होता.

स्वराज्याची आंच सर्वांसच लागली असल्यानें हिंदुस्थानांतील विविध पक्ष या वेळीं वितळण्याच्या मार्गांत असून त्यांचा एक गोळा बनत चालला होता. लखनौस जहाल व मवाळ हे दोन राजकीय पक्ष एकमेकांस आपलेपणानें भेटण्यास जसे उत्सुक झाले होते, तसे राष्ट्रीय सभेपासून फटकून राहण्यांतच मुत्सद्दीपणा समजणारे मुसलमानहि राष्ट्रीय सभेच्या मंडपांत हिंदुआदिकरून इतर धर्मीयांशीं समेट करण्यांतील राजकारण ओळखूं लागले होते. लखनौच्या राष्ट्रीय सभेंत हिंदु व मुसलमान यांच्या संमतीनें एक स्वराज्याची योजना ठरावरूपानें मंजूर झाली व तिच्यांत केवळ एकवाक्यतेकरितां म्हणून मुसलमानांना हिंदूंनीं कांहीं विशेष सवलती दिल्या. ती 'काँग्रेस–लीग–स्कीम' या नांवानें गेल्या पंधरा वर्षांत गाजत असून, तींतील कलमांकडे बोट करीत करीत माँटेग्यु चेम्सफर्ड यांनीं नवीन राजकीय हक्कांचा मसुदा रचिला. आजहि तीं कलमें हिंदु व मुसलमान पुढाऱ्यांकडून डोळ्यांसमोर धरलीं जात आहेत. सदर ठरावासंबंधानें केसरीनें पुढीलप्रमाणें उद्गार काढले :— "शुक्रवारचा ठराव म्हणजे हिंदुस्थानच्या राष्ट्रीय आकांक्षेनें केलेला मुकुट धारणविधिच होय. या समारंभाला तिची सर्व प्रजा आपआपला नजराणा घेऊन हजर होती. हिंदुस्थानांतील असा

एकहि वर्ग नसेल कीं, ज्याचे प्रतिनिधि या समारंभास आले नव्हते. जातिभेद, मतवैचित्र्य, व्यक्तिद्वेष वगैरे राष्ट्रीय कार्योच्छेदक पिशाच्चांनींहि गोमतीच्या प्रवाहांत गति घेतली व नवीन शुभ देह धारण करून मंगल आशीर्वादच दिला. ''

राष्ट्रीय सभेचें अधिवेशन आटोपल्यावर ता. ३० डिसेंबर रोजीं लखनौस बेझंटबाईच्या अध्यक्षतेखालीं स्वराज्य-संघ-परिषद भरली. सभेस सुमारें एक हजार स्वराज्यवादी हजर होते. लोकमान्यांनीं सभेंत भाषण करून लखनौच्या राष्ट्रीय सभेंत घडलेल्या दोन महत्त्वाच्या गोष्टींचा उल्लेख केला. ते म्हणाले, '' स्वराज्याची मागणी निश्चित झाली ही एक गोष्ट व दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे हिंदुमुसलमानांची एकी होऊन उभय पक्षांनीं मिळून तिची मागणी निश्चित केली. ''

लखनौचा कार्यक्रम संपल्यावर ज्या थाटानें लोकमान्य लखनौस गेले होते त्याच थाटानें ते परत आले. परत येतांना त्यांनीं कानपूर, नागपूर, यवतमाळ, अकोला, कारंजा इत्यादि शहरांना भेट दिली आणि टिळकांची भेट म्हणजेच स्वराज्य-संघाचा दौरा. लोकमान्य पुण्यास आल्यानंतर ता. २८ जानेवारी १९१७ रोजीं गायकवाडवाड्यांत स्वराज्य-संघाची परिषद भरली. सदर सभेंत अहवाल वाचून दाखविला गेला. त्यावरून स्वराज्य-संघ स्थापन झाल्यापासूनच्या पुढील नऊ महिन्यांत संघाची बरीच प्रगति झाल्याचें दिसून आलें. तोंपर्यंत संघाच्या सहा शाखा स्थापन झाल्या होत्या. आणि सभासदांची संख्या तीन हजारांच्या पुढें व वर्गणी वगैरेंची रक्कम सात हजारांपुढें गेल्याचें आढळलें. या परिषदेंत एक मुख्य गोष्ट ठरली ती अशी कीं, स्वराज्यसंघानें आपला स्वराज्याचा मसुदा तयार करून तो विलायतेस संघाच्या शिष्टमंडळाबरोबर पाठवावा. कारण स्वराज्याचे हक्क मिळविण्यासाठीं नुसती हिंदुस्थानांतच चळवळ करून भागणार नव्हतें तर ते इंग्रज लोकांस समजावून सांगून त्यांची अनुकूलता मिळविणेंहि जरूर होतें. हिंदुस्थानांत स्वराज्य-संघाचे हजारों सभासद नोंदवून घेण्यानें संघाच्या मागणीस लोकमताची मंजुरी (सँक्शन) मिळविणें हें एक काम व संघाचें शिष्टमंडळ विलायतेस पाठवून तिकडील राजकारणी पुरुषांचें व

जनतेचें मन वळविणें हें दुसरें काम. हीं दोन कामें करण्याचें संघानें मनावर घेतलें. संघास मनुष्यबळाची गरज तर शिष्टमंडळास पैशाची गरज. या दोन्ही गरजा भागविण्याकरितां वऱ्हाड व कर्नाटक प्रांतांत खुद्द लोकमान्यांनीं दौरा काढावा ही कल्पना हळूहळू उदय पावली.

कोणतीहि चळवळ चालू करण्याचें लोकमान्यांनीं एकदां ठरविलें म्हणजे त्याचा ते धोशा लावीत. त्यांना आतां होमरूलच्या प्रचारासाठीं बाहेर निघावयाचेंच असल्यानें, चिकोडीस भरणाऱ्या जिल्हा सभेकरितां बेळगांव व चिकोडी येथील देशभक्त गंगाधरराव देशपांडेप्रभृति पुढाऱ्यांनीं बोलावतांच ते चिकोडीस गेले. चिकोडीची जिल्हा सभा, साताऱ्याचे वकील श्री. दादासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरली. सभा संपतांच तिच्या पाठोपाठ लोकमान्यांचीं स्वराज्यावरील व्याख्यानें ठेवलेलींच. हीं व्याख्यानें चिकोडी व निपाणी या दोन गांवीं झालीं. या दोन्ही ठिकाणच्या भाषणांत हिंदी लोक स्वराज्याला नालायक असल्याचे आक्षेप खोडून काढणें, स्वराज्याची कल्पना श्रोत्यांना सोप्या रीतीनें आणून देणें, होमरूल लीगचे सभासद होण्याचे बाबतींत लोकांस वाटणारी भीति मोडणें, स्वराज्य मागणें यांत कांहीं राजद्रोह नसून उलट तो साम्राज्य रक्षण करण्याचा उपाय असल्याविषयीं जनतेची खात्री करणें, यांवर त्यांचा कसा भर होता हें पुढील उद्गारांवरून लक्षांत येण्यासारखें आहे-- "स्वराज्य मागितलें तर सरकार म्हणतें, 'तुमच्यांत अजून पुरें शिक्षण नाहीं!' जसें काय इंग्लंडला स्वराज्याचे हक्क मिळाले तेव्हां तेथील सारे लोक सुशिक्षितच झाले होते. बरें, शिक्षण द्या म्हटलें तर 'पैसे नाहींत' ही तक्रार येते! अशा एक ना दोन, हजार अडचणी व अडवणुकी आहेत. याला एकच उपाय म्हणजे सत्ता हातांत आली पाहिजे. शिक्षणाची सक्ति पाहिजे असेल तर सरकारवर सक्ति करण्याची ताकद आली पाहिजे व ती ताकद येणें म्हणजेच स्वराज्य मिळणें होय. 'माझा कारभार माझ्या मताप्रमाणें व्हावा' हेंच स्वराज्य. कलेक्टर, गव्हर्नर वगैरे नोकर आम्हीच बादशहा असें समजोत, तरी तसें न होतां ते नोकरच राहिले पाहिजेत. होमरूल लीगकरितां जो नांव देणार त्याच्या पाठीमागें सी. आय्. डी. लागणार हें उघड आहे. 'आम्हीं तसें सी. आय्. डी. ला सांगितलें आहे,' असें गव्हर्नरसाहेब म्हणाले.

सी. आय्. डी. विरुद्ध तर गव्हर्नरसाहेब म्हणतात, 'माझ्याहि मागें सी. आय्. डी. आहे!' गव्हर्नरसाहेबांच्या मागें जसें सी. आय्. डी. आहे तसें तें आमच्या मागें आणणें याचेंच नांव स्वराज्य! ही होमरूलची नवी व्याख्या झाली आहे. होमरूल लीगचें कार्य मोठें कठीण आहे. त्याच्या मार्गांत अडचणी बऱ्याच आहेत. बेळगांवास व्याख्यास दिलें आणि इतकी खबरदारी घेतली तरी बाजू अंगावर येऊं पाहात होती, पण निभावलें! होमरूलची देवता मोठी कडक आहे. नांव घेण्याची पंचाईत, न नांव द्यावें तर ती प्रसन्न होत नाहीं. ती प्रसन्न व्हावयाची म्हणजे जप करावा लागतो, पण जसजसा जप करावा तसतशी ती उग्रतर स्वरूप धारण करते. संकटें हीं येणारच व तीं सोसलींच पाहिजेत. आम्हांला साम्राज्य पाहिजे, म्हणून आम्हीं सरकारला पैसे दिले. आतां तुम्हांला हें साम्राज्य पाहिजे का? असा सरकारास आमचा प्रश्न आहे. तुम्हांला साम्राज्य पाहिजे असेल तर आम्हांला स्वराज्य द्या आणि साम्राज्य सामर्थ्यवान् करा. रशियांतील दडपशाहीची काय अवस्था झाली पाहा! तऱ्हा निराळ्या पण सिद्धांत एकच. साम्राज्याच्या रक्षणासाठीं तुरुंग येत असेल तर खुशाल येऊं द्या! नांवें नोंदवा, पैसे द्या. बाकीची जबाबदारी लीगची कमिटी संभाळील. स्वराज्याचा ठराव आतां खुद्द कॉंग्रेसनेंच पास केला आहे. भिऊं नका. छाती ठोकून उभें राहिलें पाहिजे. उघड उत्तरें द्या. कोणी विरुद्ध असला तर सांगा कीं, आधीं कॉंग्रेस बंद करा! धैर्य धरा. पैसे मिळतील, ती काळजी नको तुम्हांला पोलिस कीं कोणी विचारो, त्याला उघड उत्तर द्या. जो पोलिस मागें आहे तो पुढें आणावयाचा आहे. हेंच होमरूल आहे. धीर धरला तर उद्देश खास तडीला जातील. आज कालानें भरंवसा उत्पन्न केला आहे, दहा वर्षांपूर्वीं हें बोललों नसतों! काल अनुकूल आहे, तो पुढेंच चालला आहे. त्याच्या पाठोपाठ चला. तुम्हांला ओढून बरोबर नेण्याचा काय कालानें मक्ता घेतला आहे? नसतें भय काढून बसणें हा नामर्दपणा सोडा व जरा धीर धरा. मग पाहूं तर खरी काय गंमत होते ती!" चिकोडी व निपाणी या दोन्ही ठिकाणीं लोकमान्यांचें स्वागत कोठें राजासारखें, तर कोठें देवासारखें करण्यांत आलें व संघाकरितां देणग्या मिळण्यासहि सुरुवात झाली. लोकांत होत चाललेल्या जागृतीचा परिणाम नाशिक येथें ता. १७ व १८

मे १९१७ रोजीं संघाची पहिली वार्षिक सभा भरली तिच्यांत चांगला उत्साह दृष्टीस पडला. सभेंत चिटणिसांनीं संघाचा अहवाल वाचून दाखविला, त्यावरून संघाचे झालेले सभासद १४,२१८ व सभासदांकडून चालू सालची आलेली वर्गणी ९००० रुपयांची व लोकमान्यांच्या दौऱ्यांत जमलेली देणगी ६००० रुपयांची अशी दिसून आली. सभासदांत शेंकडा ४२ ब्राह्मण व ४३ ब्राह्मणेतर असून त्यांखेरीज मुसलमान, पारशी वगैरेहि होते. यावरून संघाची सर्वमान्यताच सिद्ध होते.

होमरूल लीगवरील संकटें लोकमान्यांच्या सुटकेबरोबर संपतील असें वाटलें होतें; परंतु ही समजूत चुकीची ठरली. नोकरशाहीच्या डोळयांत ही लीग खुपत असल्यामुळें त्याचें महत्त्व कमी करण्याकरितां नोकरशाही चोहोंकडून आपली भुतावळ उठविण्याच्या उद्योगांत होती. होमरूल लीगला लोकपक्षाचा पाठिंबा आहे हें सिद्ध करण्याचा केसरी प्रयत्न करीत होता तर सरकारची तसा पाठिंबा नसल्याचें दाखविण्याची शिकस्त सुरू होती. सरकारच्या फुशीमुळें संघाच्या नांवानें बोटें मोडण्याला अँग्लो इंडियन व युरोपियन लोक उभे राहिले. त्यांपैकीं अँग्लो-इंडियनांची समजूत केसरीनें पुढील शब्दांनीं घातली आहे—'अँग्लो-इंडियन लोकांना ओरडण्याला युरोपियन लोकांइतकीहि सबब नाहीं. कारण एक तर ते इकडील स्थानिक रहिवाशी आहेत व हाडामांसानें निमेशिमे हिंदीच आहेत. त्यांचा धर्म ख्रिस्ती व भाषा इंग्रजी असली तरी हिंदुस्थानांत विविध धर्मांचे व विविध भाषा बोलणारे जे इतर पुष्कळ वर्ग आहेत त्यांच्या हितसंरक्षणाची स्वराज्य देतांना जशी खबरदारी घेतली जाईल तशीच अँग्लो-इंडियन लोकांचीहि घेतली जाईल." त्याच लेखांत गोऱ्या लोकांनीं होमरूल लीगविरुद्ध चालविलेल्या गिल्ल्यास केसरीनें पुढीलप्रमाणें उत्तर दिलें—"कलकत्ता येथील टाऊनहॉलच्या सभेंत पंचमेळ पंचरंगी गोऱ्या लोकांनीं मिळून हिंदी स्वराज्याविरुद्ध जी ओरड केली, तिला उद्देशून आम्हांस यथार्थतेनें असा प्रश्न करितां येईल कीं, हिंदुस्थानांत येऊन केवळ पैशाच्या मागें लागलेल्या आगंतुक अशा ग्रीक, आर्मिनियम, ज्यू, फ्रेंच, रशियन अशा परकीयांना आमच्या हिंदी स्वराज्याच्या गाड्यास खीळ घालण्याचा काय अधिकार आहे ? "

स्वराज्यसंघावर नोकरशाहीनें प्रथम आपल्या बगलबच्च्यांकडून गोळ्या झाडल्या. नंतर तिला ती बंदूक स्वतःच्या हातांत घेतल्यावांचून राहवेना. उटकमंड येथें मद्रास कौन्सिलची बैठक झाली त्या वेळीं गव्हर्नर लॉर्ड पेण्डलंड यांनीं निराळ्याच रीतीनें तोंडसुख घेतलें. त्यांच्या भाषणाचा आशय असा कीं, हिंदुस्थानास सध्यां स्वराज्य मिळणें शक्य नाहीं. देतां आलेच तर थोडे राजकीय हक्क देऊं. अशा स्थितींत चळवळ करणाऱ्यांनीं जनतेस स्वराज्याची आशा लावणें अनिष्ट असल्यानें सरकार ही चळवळ थांबविण्याकरितां योग्य ते उपाय योजील. हा गडगडाट झालेला लोकांनीं ऐकला व त्या क्षणीं वीज चमकलेलीहि लोकांनीं पाहिलीच. पेण्टलंडसाहेबांच्या भाषणानंतर बेझंटबाई, मि. अरुंडेल व 'कॉमनवील' पत्राचे संपादक वाडिया यांजवर राज्यरक्षणकानूखालीं अटकेंत ठेवण्याचे हुकूम बजावण्यांत आले. त्या बाबतींत केसरीनें म्हटलें कीं, "डिफेन्स ॲक्टाप्रमाणें कोणासहि अटकेंत ठेवण्यास, परशत्रूशीं खलबतें करून त्यापासून साम्राज्याला धक्का आणण्याचा अटकेंत ठेवावयाच्या मनुष्याचा बेत किंवा उद्देश असला पाहिजे तशा प्रकारचा बेझंटबाईचा हेतु असणें शक्य नसल्यामुळें प्रस्तुत हुकूम हा कायद्याचा दुरुपयोग होय." अशा प्रकारचा धुडगूस इकडे नोकरशाहीनें घातला असला तरी येथील स्वराज्याच्या चळवळीची आंच ब्रिटिश मुत्सद्द्यांस इंग्लंडांत आतांपर्यंत पोंचली असून ते हिंदी लोकांच्या तोंडास मधाचें बोट लावण्याच्या विचारांत होते. तो त्यांचा विचार एकदांचा पक्का ठरून ता. २० ऑगस्ट १९१७ रोजीं भारतमंत्री मि. मॉटेग्यु यांनीं आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्यांत हिंदुस्थानास जबाबदारीचें स्वराज्य देऊन साम्राज्यांतील त्यास एक भागीदार करण्याचें धोरण निश्चित करण्यांत आलें होतें. तथापि हें स्वराज्य हप्तेबंदीनें मिळेल व ती हप्तेबंदी कशी करावी याची वाटाघाट करण्यास आपण हिंदुस्थानांत येणार आहों असें त्यांनीं जाहीर केलें.

इंग्रज सरकारचा जाहीरनामा प्रसिद्ध होऊन ते इकडे येणार हें आतां निश्चित झालें होतें. तरी विलायतेंतील जनतेपुढें हिंदी लोकमत मांडण्याकरितां टिळकांच्या स्वराज्य-संघानें बॅप्टिस्टांची तिकडे रवानगी केलीच. कारण होमरूलची चळवळ एकट्या हिंदुस्थानांत करीत न बसतां विला-

यतेंतहि करीत राहणें अधिक फायदेशीर होय असें संघानें ठरविलें होतें व दुसरें असें कीं, बॅप्टिस्टांसारखा खात्रीचा व वजनदार मनुष्य या संघीस विलायतेंत असल्यानें विलायतेंतील राजकारणाचा खरा रंग समजून हिंदुस्थानांत चळवळीचें जहाज त्या रोखानें हांकणें अधिक श्रेयस्कर होतें.

खुद्द भारतमंत्री मॉंटेग्यु हिंदुस्थानांत येणार व स्वराज्यप्राप्तीचे बाबतींत जनतेचें म्हणणें ऐकून घेणार हें निश्चित ठरल्यानंतर स्वराज्यासाठीं सनदशीर चळवळ करणाऱ्या पुढाऱ्यांस इकडील नोकरशाही कोणत्या तोंडानें प्रतिबंध करणार? त्यामुळें अर्थातच मद्रासचे गव्हर्नर लॉर्ड पेण्टलंड यांस लाजल्यासारखें होऊन त्यांनीं बेझंट बाईवरील प्रतिबंध ता. १८ सप्टेंबर १९१७ रोजीं काढून घेतला! पुढें थोडयाच दिवसांनीं मॉंटेग्यूसाहेबांची स्वारी हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं ता. १८ नोव्हेंबर रोजीं शिष्ट-मंडळाच्या भेटी घेण्यास सुरुवात केली. मॉंटेग्यु हिंदुस्थानांत येण्याचें कळतांच हिंदुस्थान स्वराज्यास लायक कसा आहे, याची कल्पना त्यांस आणून देण्याकरितां एक इंग्रजीत पुस्तक लिहून प्रसिद्ध करावें असें स्वराज्य-संघानें, विशेषतः लोकमान्यांनीं ठरविलें. मुदत तर फारच थोडी होती. तेवढयांत हें काम उरकण्याची जबाबदारी कोणावर सोपवावी याचा विचार टिळक यांस पडला. त्यांच्या डोळयांपुढें केसरी-मराठा पत्राचे संपादक व होमरूल लीगचे सरचिटणीस श्री. तात्यासाहेब केळकर हे होतेच. परंतु त्यांजवर संपादकीय व इतर कामांचें ओझें मनस्वी असल्यानें बंगाल्यांतील पुढारी व कसलेले लेखक बाबू बिपिनचंद्र पाल यांस दरमहा पांचशें रुपये पगार देऊन व त्यांचा कच्चा खर्च करण्याचें ठरवून पुण्यास बोलवावें व त्यांजकडून हें काम करवून घ्यावें असें लोकमान्यांनीं योजिलें. पाल यांस तसें पत्रहि रवाना झालें. तथापि रा. केळकर यांस आपणच हें कार्य विनमोबदला स्वतःच्या शिरावर घ्यावें अशी हौस व उमेद होती व त्यांनीं ती लोकमान्यांस कळविलीहि. टिळकांना यामुळें सहजच विशेष आनंद वाटून त्यांनीं अखेर सदर कामगिरी तात्यासाहेब केळकर यांजवर संतोषानें सोंपविली. त्यांना अवधि फक्त दहा आठवडयांचाच असताहि तेवढयांत रात्रीचा दिवस करून त्यांनीं पुस्तकाचें काम पार पाडलें. स्वराज्यावर त्या काळांत जीं असंख्य पुस्तकें निर्माण झालीं, त्यांत तात्यासाहेब केळकर यांच्या पुस्तकाचा

सर्वांत वर नंबर लागेल. ह्या पुस्तकाची किंमत दोन रुपये असून त्यांत हिंदुस्थानची प्राचीन संस्कृति, ब्रिटिश अमलाखालीं हिंदुस्थानास प्राप्त झालेली दैन्यावस्था, हिंदुस्थानावर ब्रिटिश पार्लमेंटाचा ताबा असतांहि हिंदुस्थानची उन्नति करण्याचे कामीं पार्लमेंटास आलेलें अपयश, हिंदुस्थान सरकारची नालायकी, ब्रिटिश मुत्सद्द्यांनीं केलेला वचनभंग, हिंदुस्थानच्या माथीं अपात्रतेचा विनाकारण मारलेला शिक्का आणि हिंदुस्थानच्या जिवावर ब्रिटिश साम्राज्याची थोरवी अशीं प्रकरणें असून हिंदी राजकारणाचा अभ्यास करूं इच्छिणाऱ्या होतकरू तरुणास हें पुस्तक अत्यंत उपयुक्त वाटल्यावांचून राहणार नाहीं. कल्पनेच्याहि बाहेर इतकें उत्कृष्ट पुस्तक तात्यासाहेब केळकर यांनीं अगदीं निरपेक्षपणें लिहिलेलें पाहून लो. टिळकांना अत्यानंद झाला व तो त्यांनीं कित्येकांपाशीं बोलूनहि दाखविला.

स्वराज्य-संघातर्फे मॉंटेग्यु यांची भेट लोकमान्य टिळक, श्रीमंत दादासाहेब खापर्डे, श्री. दादासाहेब करंदीकर, श्री. तात्यासाहेब केळकर, नामदार बेळवी, श्री. गंगाधररावजी देशपांडे, डॉ. मुंजे, श्री. नीलकंठराव उधोजी, डॉ. साठ्ये, डॉ. वेलकर यांनीं दिल्लीस ता. २६ डिसेंबर रोजीं घेतली व त्यांस वाचण्याकरितां श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं तयार केलेलें, 'दि केस फॉर इंडियन होमरूल' हें पुस्तक जरतारी थैलींतून सादर केलें. मॉंटेग्यूंची भेट झाली व पुढें कलकत्त्यास राष्ट्रीय सभेतर्फे विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याचें ठरलें. लो. टिळक पूर्वी विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याच्या विरुद्ध होते, पण आतां ते अनुकुल झाले; यामुळें त्यांजवर प्रतिपक्षांकडून टीकाहि होऊं लागली. तिला उत्तर देतांना ते चिकोडी येथील भाषणांत म्हणाले, "मीच पूर्वी डेप्युटेशनांच्या विरुद्ध होतों. कारण भीक मागून कांहीं मिळत नसतें. पण आम्ही आज जें डेप्युटेशन पाठवीत आहों तें इंग्रजी राष्ट्र जागें झालें असल्यामुळें आपली बाजू मांडण्याकरतां पाठवीत आहों. डेप्युटेशनें पाठवून कोणी जागें होत नाहीं. आजचें आमचें डेप्युटेशन जागृत झालेल्या लोकांना सांगणार कीं, 'आम्हांस होमरूल हवें, यांत तुमचाच फायदा आहे.' हा डेप्युटेशनाडेप्युटेशनांत फरक आहे. आमच्या स्थितींत फरक झाला नाहीं." होमरूलची चळवळ राष्ट्रीय सभेनें आपली म्हटली असती तर लोकमान्यांना आपल्या स्वराज्य

संघातर्फे विलायतेला निराळें शिष्ट-मंडळ पाठविण्याचें कारण राहिलें नसतें. परंतु तसें घडून न आल्यामुळें ही फार खर्चाची घोंड त्यांस उचलावी लागली. संघास जितके सभासद अधिक मिळतील तितके हवेच होते. ती व पैशाची या दोन्ही नडी लक्षांत घेऊन लोकमान्यांनीं वऱ्हाड मध्यप्रांतांत १९१८ च्या फेब्रुवारी महिन्यांत जंगी दौरा काढला. टिळक मधुमेहासारख्या रोगानें पिडले होते, जरेनें थकले होते व कारागृहवासानें क्षीण बनले होते, तरी त्यांचा उत्साह तरुणांसहि लाजविणारा होता व तो त्यांच्या अंगीं त्यांच्या स्वराज्यावरील अलोट प्रेमामुळें बाणून राहिला होता. स्वराज्य हाच त्यांच्या कुडींतील प्राण असून तोच त्यांचा देह चळवळींत वागवीत होता.

वऱ्हाड हा महाराष्ट्राचा विभाग आणि तशांत तो सोन्याचा तुकडा, त्या वऱ्हाडाची प्रीति लोकमान्यांवर म्हणजे लक्ष्मीची मेहेरनजरच. स्वराज्याच्या चळवळीचा असा अन्योन्य संबंध असल्यानें थकलेल्या लो. टिळकांना वऱ्हाडांत स्वराज्यसंघाच्या मोहिमेवर निघण्यांत हुशारी वाटली व वऱ्हाडकरांनाहि निरतिशय भक्तीमुळें लोकमान्यांना कोठें ठेवूं व कोठें न ठेवूं असें होऊन त्यांनीं सुचले त्या उपायांनीं त्यांचा बहुमान करण्याची हौस फेडून घेतली. लोकमान्यांच्या रसवंतींतून बाहेर पडलेलीं बोधवचनें वऱ्हाडकरांना अमृतवृष्टीप्रमाणें वाटत व त्यांनीं गांवोगांवच्या मुक्कामांत स्वराज्यसंघास नजर केलेल्या द्रव्यराशी लोकमान्यांना सुवर्णवृष्टीप्रमाणें संतोष देत. इतक्या द्रव्यराशी लोकमान्यांच्या उशापायथ्यांशीं दररोज यापूर्वीं कधींहि पडल्या नसतील व त्यांचा वऱ्हाडकरांनीं ठेवलेला थाट मोठमोठ्या राजांच्या स्वप्नींहि आला नसेल. त्यांच्या स्वागताकरितां ठिकठिकाणीं जनतेनें तोरणें काय बांधलीं, रांगोळ्या काय घातल्या, पंचारती काय ओंवाळल्या, मेजवान्या काय दिल्या, पदें काय गायिलीं व मानपत्रें काय अर्पिलीं ! त्या सर्वांचें वर्णन करण्यास कवीनें स्वतंत्र काव्यच रचिलें पाहिजे. व्हाइसरॉयच्या दौऱ्याप्रमाणें त्यांचे मुक्काम आगाऊच जाहीर झाले होते. एका दिवसांत त्यांनीं कित्येकदां तीन तीन चार चार गांवें घेतलीं व अशा रीतीनें ही स्मरणीय मोहिम फेब्रुवारी महिना संपण्याच्या आंत आटोपून ते पुण्यास परतहि आले. या दौऱ्यांत स्वराज्याची व्याख्या व महती,

त्यापासून होणारें मानव जातीचें कल्याण, यांमुळें ब्रिटिश साम्राज्यास येणारी बळकटी, स्वराज्य मिळविण्यासाठीं लोकमान्यांची स्वतःची तयारी, इत्यादि गोष्टींचें वर्णन करणारे उद्‌गार त्यांनीं पुढीलप्रमाणें काढले :— "लोकांच्या पुढाऱ्यांच्या हातीं स्वतंत्र अधिकार पडून त्यांत अधिकाऱ्यांच्या नव्हे तर लोकांच्या देखरेखीखालीं, लोकांच्या सोयीकरितां, लोकांच्या पैशाची व्यवस्था ज्या रीतीनें लावतां येईल अशा प्रकारचें स्वराज्य आम्ही मानत आहों. स्वराज्याचें तिकिट काढलें म्हणजे आपल्या सर्व किरकोळ मागण्यांचीं स्टेशनें गांठल्याचें श्रेय येईल. हिंदुस्थानचा स्वराज्याच्या मागणींत मानव जातीचा हितसंबंध ग्रथित झालेला आहे. आमचा स्वराज्याचा जन्मसिद्ध हक्क मिळेपर्यंत आमचें समाधान होणार नाहीं, ब्रिटिश राष्ट्रासहि बळकटी येणार नाहीं, आणि जगांतहि खरी शांतता नांदणार नाहीं. देशास स्वराज्य मिळविण्याकरतां शत्रूंस वेळप्रसंगीं नमस्कार घालण्यापासून तों राज्यक्रांतिकारक कोणताहि शेवटचा बंडखोरीचा अति जालीम उपाय ज्यास सुचेल तो अवलंबण्यास मी तयार आहें."

वऱ्हाडच्या या दौऱ्यांत लोकमान्यांना दोन चिजा सांपडल्या व त्या त्यांना व त्यांच्या भक्तांना दोन अमूल्य रत्नें सांपडावीं, त्याप्रमाणें अत्यंत समाधानास कारणीभूत झाल्या. 'ब्युरॉक्रसी' या इंग्रजी शब्दाला लोकमान्यांना मनाजोगा असा मराठी शब्द पूर्वी बनवितां आला नव्हता. 'गोरा अधिकारी वर्ग' ही त्यांनीं नवी शब्दयोजना रचिली होती. ती त्यांना तितकीशी पसंत झाली नव्हती व तिजवर १९०८ च्या राजद्रोहाच्या खटल्यांत बराच गहजबहि गुदरला होता. या दौऱ्यांत एके ठिकाणीं व्याख्यानाच्या ते ऐन् ओघांत आले असतां, जशा पेटलेल्या भट्टींतून सहज ठिणग्या उडाव्या त्याप्रमाणें 'नोकरशाही' हा नवा शब्द त्यांच्या तोंडून सहजस्फूर्तीनें बाहेर पडला, व तो त्यांस इतका मनापासून आवडला कीं, त्यांनीं तो आपल्या त्याच भाषणांत अनेकवार उच्चारला आणि आज मराठी वाङ्मयांत तो अढळपद धरून बसला आहे. दुसरी चीज म्हणजे 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,' हें व्याख्यान चालू असतां त्यांच्या दिव्य वाणींतून स्रवलेलें अमृतवचन ! तें वचन तेव्हांपासून गुलामगिरींत रुतलेल्या हिंदी माणसाच्या मनाला एकदम मुक्त करणारें व

त्याच्या छातीवर सतत फडकत राहण्याजोगें मानिलें गेलें आहे व कोणत्याहि राजकीय समारंभांत त्यास अग्रस्थान देण्यांत येत आहे.

ता. २८ ऑगस्ट १९१८ रोजीं मुंबईस बॅ. हसन इमाम यांच्या अध्यक्षतेखालीं जादा राष्ट्रीय सभा भरली व तिच्यांत राष्ट्रीय सभेतर्फे विलायतेस शिष्टमंडळ पाठविण्याचें फिरून एकदां ठरलें. मँटेग्यु चेम्सफर्ड यांचा रिपोर्ट आतां प्रसिद्ध झाला असल्यामुळें भावी स्वराज्याची आकृति सिनेमांतील चित्राप्रमाणें सर्वांच्या नजरेस दिसूं लागलीच होती व म्हणूनच जादा राष्ट्रीय सभेस विलायतेस जॉइंट पार्लमेंटरी कमिटीपुढें आपलें म्हणणें मांडण्याचें अगत्य भासलें. मँटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांचा खर्डा पाहून केसरीची तीव्र निराशा झाली. या विषयावर 'उजाडलें, पण सूर्य कोठें आहे ?' अशा लाक्षणिक मथळयाचा केसरीनें अग्रलेख लिहिला. केसरी म्हणतो "सकाळचा वारा सुटावा, पशुपक्ष्यांची किल्‌बिल् कानीं यावी, कोंबडा आरवूं लागावा आणि सकाळ होऊन आतां सूर्योदय होईल अशा उत्कंठेनें वाट पाहणाऱ्या लोकांस सकाळ झाली तरी सूर्योदय न झाल्यानें जितकें वाईट वाटेल तद्वतच मँटेग्युसाहेबांच्या राजकीय सुधारणांची गत आहे... तात्पर्य, ज्याला हिंदुस्थानांतील खरी सत्ता म्हणावयाची त्या हिंदुस्थान सरकारच्या कारभारांत आम्हांस कोणतेहि स्वराज्याचे हक्क मँटेग्युसाहेब देऊं इच्छित नाहींत हें उघड आहे आणि मँटेग्युसाहेबांनींहि ती गोष्ट लपवून न ठेवतां स्पष्टपणें आपल्या रिपोर्टांत दाखल केलेली आहे. वरिष्ठ सरकारच्या कारभारांत स्वराज्याचे हक्क बिलकुल दिलेले नाहींत, प्रांतिक सरकारचे कारभारांत एक दोन खर्चाचीं खातीं आमचेकडे देणार आणि स्थानिक स्वराज्याचे हक्क मात्र शक्य तितक्या पूर्णतेनें आमचेकडे सोंपविले जाणार, हें मँटेग्युसाहेबांच्या सर्व सुधारणांचें संक्षिप्त स्वरूप होय." केसरीनें हें जें सार काढलें तेंच अखेर प्रत्ययास येऊन सदर रिपोर्टाच्या आधारानें जो कायदा पार्लमेंटांत पुढें पास झाला, त्यावर अमृतसर येथील राष्ट्रीय सभेंत लोकमान्य टिळकांच्या प्रयत्नानें 'अपुरा, असमाधानकारक व निराशाजनक' असा शिक्का १९१९ सालीं पडलेला सर्वांनीं पाहिलाच आहे.

मुंबईची जादा राष्ट्रीय सभा आटोपल्यावर ता. ११ सप्टेंबर रोजीं लो. टिळक विलायतेस निघून गेले. विलायतेस लोकमान्यांना दोन कामें साधावयाचीं होतीं. एक काम चिरोल केसचें व दुसरें मॉंटेग्यु-चेम्सफर्ड खडर्यांत दाखल केलेल्या सुधारणांपेक्षां अधिक हक्क मिळविण्यासाठीं प्रयत्न चालू ठेवण्याचें. लोकमान्य ता. ३० ऑक्टोबर १९१८ रोजीं विलायतेस पोहोंचले व तेथून ता. ६ नोव्हेंबर १९१९ रोजीं परत हिंदुस्थानांत येण्यास निघाले. विलायतेस असतांना लो. टिळक व रा. करंदीकर यांनीं बॅप्टिस्टांच्या मदतीनें पार्लमेंटच्या निवडणुकीचे वेळीं स्वराज्य संघाची इंग्रज लोकांस माहिती देण्याकरितां लक्षावधि हस्तपत्रकें काढून ग्रेट ब्रिटन व आयर्लंड यांत वाटलीं. त्यांचा ब्रिटिश लोकांवर व विशेषतः मजूर पक्षावर फार चांगला परिणाम झाला. संघाचे अध्यक्ष बॅप्टिस्टा यांनीं "हिंदुस्थानासाठीं स्वयंनिर्णय" या नांवाचें एक सुंदर छोटेखानी पुस्तक लिहून त्याच्या व संघाचे मुख्य चिटणीस श्री. तात्यासाहेब केळकरकृत 'दि केस फॉर इंडियन होमरूल' या ग्रंथाच्या प्रती शांततापरिषदेचे सभासद, पार्लमेंटचे सभासद, इंग्लंडचे मुख्य मंत्री व शांततापरिषदेचे अध्यक्ष यांजकडे पाठविल्या. संघाची एक शाखा लंडन येथें व दुसरी दे. भ. लाला लजपतराय यांचे मार्फत अमेरिकेंत न्यू यॉर्क शहरीं स्थापन केली. संघातर्फे विलायतेस जाणाऱ्या शिष्टमंडळांत संघाचे उपाध्यक्ष लो. टिळक, श्री. खापर्डे, श्री. करंदीकर, संघाचे मुख्य चिटणीस केळकर व बंगालचे पाल एवढयांचा समावेश होता. केळकर व खापर्डे यांच्याखेरीज बाकीचे सभासद आधींच रवाना झाले होते. उरलेले हे दोघे १९१९ च्या मे महिन्यांत विलायतेस गेले. गु. तात्यासाहेब केळकर यांचा, त्यांच्या विनयशील स्वभावास अनुसरून विलायतेस जाण्याचा मुळींच विचार नव्हता. आपल्या जाण्यावांचून विलायतेंतील काम खरोखर नडून पडणार असेल तरच ते जाणार होते. लोकमान्यांचीं त्यांस निघून येण्याविषयीं वारंवार पत्रें येत. त्यांस त्यांनीं विलायतेस जाण्याची आपली महत्त्वाकांक्षा नाहीं व इच्छाहि नाहीं असें निक्षून लिहून कळविलें होतें. परंतु 'आतां माझा अंत तुम्ही किती पाहणार ?' असें निकडीचें पत्र लोकमान्यांकडून आल्यावर मात्र त्यांनीं जाण्याचा बेत कायम केला. विलायतेस गेल्यानंतर त्यानीं तेथील ब्रिटिश

काँग्रेस कमिटीमार्फत चाललेल्या 'इंडिया पत्रा'चें संपादकत्व पतकरलें व परत येईपर्यंत तें उत्तम प्रकारें चालविलें हें सर्वश्रुतच आहे.

स्वराज्य-संघानें पार्लमेंटरी कमिटीपुढें ज्या मागण्या मांडल्या, त्यांतील मुख्य मागण्या पुढीलप्रमाणें होत—" हिंदुस्थानास पूर्ण स्वराज्य देण्याचें ध्येय मान्य करावें, इंडिया कौन्सिल काढून टाकून भारतमंत्र्याच्या मदतीला दोन अंडर-सेक्रेटरी द्यावेत, अखिल हिंदुस्थानच्या कारभारांत परराष्ट्रीय संबंध, लष्कर, आरमार, हिंदी संस्थानिकांचे संबंध, शांतता व संरक्षण इत्यादि बाबी वगळून बाकीच्या बाबींवर लोकसत्ता असावी, वसाहती इतकें आर्थिक स्वातंत्र्य मिळावें, अंदाजपत्रकावर कायदेकौन्सिलचा पूर्ण ताबा राहावा व पंधरा वर्षांत पूर्ण स्वराज्य मिळावें."

विलायतेंतील कामगिरी आटोपून लो. टिळक व तात्यासाहेब केळकर ता. १ डिसेंबर रोजीं सकाळीं पुण्यास आले. त्या वेळीं पुणेंकरांनीं उभयतांचें टोलेजंग स्वागत केलें. मिरवणुकीबरोबर हत्तीघोडे होते. त्या उभयतांना पुणें म्युनिसिपालिटीतर्फे मानपत्रें देण्यांत आलीं. नंतर ते अमृतसरच्या राष्ट्रीय सभेस गेले. वाटेंत त्यांना बादशहांनीं काढलेला जाहीरनामा वाचावयास मिळाला. तो वाचून त्यांनीं स्वराज्य-संघातर्फे बादशहास जी तार केली, 'तिच्यांत 'प्रतिसहकारिता' (रिस्पॉन्सिव्ह कोऑपरेशन) हा नवीन शब्द वापरला व तो शब्द राजकीय वाङ्मयांत आपल्या विशिष्ट अर्थानें कायम होऊन बसला आहे. अमृतसरची राष्ट्रीय सभा पंडित मोतीलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखालीं भरली व तिच्यांत मॉंटेग्यु-चेम्सफर्ड सुधारणांवर मागें लिहिल्याप्रमाणें 'अपुऱ्या, असमाधानकारक व निराशा-जनक' असा शिक्का मारण्यांत आला. त्याच वेळीं होमरूल लीगचें कार्य संपलें. अशा रीतीनें लो. टिळकांच्या पक्षानें राष्ट्रीय सभा हस्तगत केल्या नंतर स्वराज्याचें कार्य तिजमार्फत पुढें चालणार याविषयीं शंका न राहिल्यामुळें स्वराज्य-संघाचें कार्य वास्तविक येथेंच संपलें. पुढें लवकरच पुणें येथें संघाच्या विनंतीवरून कौन्सिलें काबीज करण्याकरितां काँग्रेस डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना लोकमान्यांनीं केली. वरील सर्व कार्य इतकें रंगारूपास आणण्याचें श्रेय लोकमान्यांनाच असलें तरी त्यांच्या मताचा प्रचंड प्रसार करण्यास 'केसरी'सारखें साधन त्यांच्या हातीं नसतें तर एकंदर कार्यास

पुष्कळच उणेपणा आला असता यांत शंका नाहीं. ज्या केसरीच्या साह्यानें आपले मनोरथ टिळकांना साध्य करितां आले ते त्यांचे केसरी पत्र १९०८ ते १९१४ पर्यंतच्या आणीबाणीच्या काळांत तात्यासाहेबांनीं कसें जतन केलें हें विसरून चालणार नाहीं. या त्यांच्या कामगिरीबद्दल लोकमान्यांनी श्री. दिनकरशास्त्री कानडे यांजपाशीं काढलेले उद्‌गार लो. टिळक यांच्या 'आठवणी व आख्यायिका' या खंडाच्या दुसऱ्या भागांत नमूद आहेत. कानडेशास्त्री आपली आठवण लिहितात ती अशी :—"लोकमान्य १९१४ सालीं सुटून आल्यावर दहा बारा दिवसांनीं एकदां वर्तमानपत्राचे खोलींत ते उभे असतां साताऱ्चे एकदोन गृहस्थ त्यांच्यापाशीं बोलत होते. बोलतां बोलतां पूर्वीच्या पांच सहा वर्षांतील सरकारच्या दडपशाहीचा विषय निघाला, तेव्हां लोकमान्य म्हणाले, "नरसोपंतांनीं म्हणूनच केसरी जिवंत राखला. मी बाहेर असतों तरी स्वतः मलाहि 'केसरी' टिकविणें अशक्य झालें असतें. नरसोपंतांचा गोडवा स्वभाव अशा वेळीं राष्ट्राचे व केसरीचे उपयोगीं पडला व म्हणून आज आपणांस येथें उभे राहावयास जागा राहिली आहे." या वेळीं लोकमान्य गहिंवरून आलेले दिसले. तात्यासाहेब केळकर तेथें हजर नव्हते. लवकरच तात्यासाहेबांचा कांहीं तरी रूपानें जाहीर गौरव करण्याचा आपला उद्देश असल्याचें लोकमान्य म्हणाले.'

सन १९१६ त लोकमान्यांनीं दिलेल्या स्वराज्याबरील व्याख्यानांच्या खटल्याचा हायकोर्टानें निकाल दिल्यावर केसरीनें 'टिळक सुटले पुढे काय ?' म्हणून अग्रलेख लिहिला. त्यांत शेवटीं म्हटलें आहे :—" ………न्यायमूर्तीच्या ठरावाची अगर मनोधैर्याची नुसती तारीफ करून अगर तो ठराव होण्यास टिळक निमित्त झाले म्हणून त्यांस अभिनंदनपर तारा पाठवून, पानसुपारी किंवा चहापार्टी करून अगर पेढे खाऊन काम भागावयाचें नाहीं. सर्वांनींच आतां स्वराज्य-संघाचे सभासद झालें पाहिजे एवढेंच केसरीचें तुम्हांस आग्रहपूर्वक सांगणें आहे. आणि तुम्ही 'तथास्तु' केव्हां म्हणतां याची तो मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहात आहे." केसरीच्या या आव्हानास लोकांनींहि पण तसाच जाब दिला. संघाच्या तीन वर्षांच्या आयुष्यांत त्यानें केवढी तरी उलाढाल केली. संघाचे चाळीस हजार सभासद होऊन प्रत्येकीं शंभर रुपये देऊन एक हजारावर तहाहयात

ठाणे. ... ८६२ दि: ... २८।४।६५ ८८०

सभासद झाले. संघाच्या मुख्य १८० शाखा स्थापन करण्यांत आल्या. वर्गणी, देणगी वगैरे रूपानें सुमारें ३,५४,००० रुपये जमा झाले. विलायतेस गेलेल्या डेप्युटेशनकरितां १,६०,००० रुपये खर्च आला. इंग्लंडच्या भावी राज्यकारभाराचीं सूत्रें मजूरपक्षाचे हातीं येणार हें लोकमान्यांनीं ओळखून सदर पक्षाशीं संधान बांधण्याकरितां त्यांच्या पक्षाच्या फंडास त्यांनीं ३००० पौंड म्हणजे सुमारें ४५,००० रुपये वर्गणीदाखल दिले. खुद्द हिंदुस्थानांत स्वराज्याच्या कल्पनेचा व्याख्यानांच्या रूपानें प्रसार करण्याकरितां सुमारें ३३,००० रुपये खर्चीं पडले. स्वराज्यविषयक विविध प्रकारच्या माहितीचीं मराठी ३१ पुस्तकें व इंग्रजींत १७ पुस्तकें काढून त्यांच्या सुमारें चार-साडेचार लाख प्रती छापून प्रसिद्ध करण्यांत आल्या. नुसत्या छपाईखात्यावर इतका खर्च झाला कीं, तेवढ्यांत अनेक मोठ्या यंत्रांचा एक मोठा छापखानाच निघाला असता ! असो.

लो. टिळक १९२० च्या ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या तारखेस दिवंगत झाले. त्यांच्या मृत्यूनंतर 'हिंदी-स्वराज्य-संघ' हें नांव बदलून 'टिळक स्वराज्य-संघ' असें नांव त्यास ८ मे १९२१ रोजीं वसई येथें भरलेल्या संघाच्या पांचव्या परिषदेंत ठेवण्यांत आलें. पुढील सालीं यवतमाळ येथें भरलेल्या सहाव्या परिषदेंत संघानें आपल्या जवळच्या शिलकेंतून एक लाख रुपये खर्चून संघाचे अध्यक्ष लो. टिळक यांच्या नांवानें मंदिर बांधून त्यांचें स्मारक करावें असें ठरविलें. त्याप्रमाणें त्या संस्थेचा ट्रस्ट करून पुणें येथें 'लोकमान्य टिळक मंदिर' ही प्रेक्षणीय इमारत बांधण्यांत आली व तिच्यांत लोकमान्यांचा पुतळा ठेवण्यांत आला. सर्व हिंदुस्थानभर संचार करणारे टिळक एका मंदिरांत उभे राहिले. त्यांच्या चळवळ करणाऱ्या जिवंत देहानें दगडी देहाचा आश्रय केला तरी त्यांचा अमर आत्मा सध्यांच्या स्वातंत्र्याच्या संग्रामाकडे त्या दगडी देहांतून पाहात असेल व अपुरें राहिलेलें कार्य पुरें होण्याबद्दल आपल्या देशबांधवांना आशीर्वादहि देत असेल !

## ' भोपटकर-गुणगौरव ' ग्रंथांतील लेख

१९४० सालीं धर्मवीर दे. भ. लक्ष्मण बळवंत तथा आण्णासाहेब भोपटकर यांस ६१ वें वर्ष लागलें. त्यानिमित्त केसरी संस्थेनें ' भोपटकर गुणगौरव ' ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांत ती० आण्णासाहेब बापट यांनीं लिहिलेला मनोरंजक लेख पुढें दिला आहे.

# धर्मवीर देशभक्त आण्णासाहेब भोपटकर यांच्या कांहीं आठवणी

लेखक : श्री. सदाशिव विनायक बापट, ' लो. टिळक-आठवणी 'कार

झिजल्यावांचुनि कीर्ति कैची। मान्यता नव्हे कीं फुकाची।
धन्य धन्य म्हणे लोक। सत्क्रिया करितां बरी ।।

—श्रीसमर्थ

### प्रथम परिचय

दे. भ. लक्ष्मण बळवंत ऊर्फ आण्णासाहेब भोपटकर यांच्याशीं माझा ऋणानुबंध सुमारें चौतीस वर्षांचा आहे. या ऋणानुबंधाची सुरुवात सन १९०६ सालापासून झाली व त्याची परिणती निरनिराळ्या कारणांनीं आजतागायत होत गेली. हा काळ त्यांच्या वाढत्या उत्कर्षाचा व भाग्याचा असून त्याविषयीं मला या सुप्रसंगीं साहजिकच फार आनंद वाटत आहे. या काळाचें निरीक्षण करीत असतां त्यांच्या अंगचे कित्येक ठळक गुण मला पाहावयास मिळाले. त्यांपैकीं कांहीं विशेष गुण वाचकांच्या निदर्शनास आणल्यास दे. भ. आण्णासाहेबांच्या खासगी स्वभावाची व वर्तनाची त्यांना थोडीबहुत कल्पना येऊन त्यांजविषयीं आदर वाटेल यांत तिल-प्रायहि शंका नाहीं.

पुण्यांतील माझ्या आयुष्यक्रमाचें सन १९०६ साल हें पहिलें वर्ष. त्या वर्षीं, लोकमान्य टिळकांचें हें कार्यक्षेत्र म्हणून त्यांत राहून स्वशक्त्यनुसार

जें सार्वजनिक कार्य करतां येईल तें करण्यासाठीं साताऱ्याहून मी येथें आलों. परंतु उदरभरणाची चिंता माझी मलाच वहावयाची असल्यामुळें महाराष्ट्र विद्यालयांत मीं नोकरी धरली. महाराष्ट्र विद्यालय ही त्या वेळची पुण्यांतील राष्ट्रीय शिक्षण देणारी संस्था होती. याची माहिती पुष्कळांना असेल. हें राष्ट्रीय विद्यालय तिघां भोपटकर बंधूंचें होतें. त्यांपैकीं थोरले बंधु भालाकार भास्करराव ऊर्फ भाऊसाहेब, मधले बंधु दिनकरपंत ऊर्फ बापूसाहेब, व धाकटे बंधु लक्ष्मणराव ऊर्फ आण्णासाहेब. कै. बापूसाहेब हे सुपरिंटेंडेंटचें काम पाहात असतां त्यांचे पत्रावरून मी विद्यालयांत आलों. नंतर कांहीं दिवसांनीं आण्णासाहेब महाराष्ट्र विद्यालयाचे सुपरिंटेंडंट झाले.

## ठळक गुण

महाराष्ट्र विद्यालय त्या काळीं अत्यंत लोकप्रिय असलें तरी सरकारी द्रव्यसाहाय्याच्या व मान्यतेच्या अभावीं त्याची आर्थिक स्थिति कधींच समाधानकारक नव्हती. त्या विद्यालयांतील उत्साही वातावरणांत सुमारें दोन-अडीच वर्षें घालविल्यावर मला तेथील नोकरी सोडणें अपरिहार्य झालें, व गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांच्या योजनेनुसार मी पुणें सार्वजनिक सभेच्या सेवेस प्रवृत्त झालों. तेव्हांपासून त्याच संस्थेंत मी आजतागायत काम करीत असून या ३१ वर्षांत माझा अनेक लहानथोर व्यक्तींशीं संबंध आला. रा. आण्णासाहेब भोपटकर हे त्या संस्थेचे सन १९१५ सालीं मुख्य चिटणीस झाले. तेव्हांपासून पुढें सात वर्षें ते चिटणीस होते व सन १९२३ पासून आजमितीपर्यंत ते उपाध्यक्ष आहेत. या पंचवीस वर्षांत त्यांच्या स्वभावाचें व त्यांच्या थोर गुणांचें निरीक्षण करण्याचे प्रसंग मला थोडेथोडके आले नाहींत. आण्णासाहेबांच्या थोर गुणांपैकीं आपल्या देशाच्या प्रस्तुतच्या गुलामगिरीविषयीं विलक्षण तिटकारा, इंग्रज सरकाराविषयीं व त्यांच्या अधिकाऱ्यांविषयीं मनापासून पक्की आढी, देशसेवेविषयीं अंतःकरणापासून तळमळ, निर्भयवृत्ति, स्वार्थत्याग, औदार्य, दिलदारपणा, विद्याव्यासंग आणि लेखनवाचनाचा दांडगा हव्यास हे मुख्य गुण होत. वकिली हा तर त्यांचा प्रमख व्यवसाय असून, पुण्यांतीलच काय पण

महाराष्ट्रांतील अव्वल दर्जाच्या वकिलांत त्यांची गणना आहे व त्यावर त्यांनीं कीर्ति व संपत्तिहि पुष्कळ मिळविली आहे. पुण्यासारख्या शहरांत व सध्यांच्या चढाओढीच्या काळांत आपलें वकिलींतील उच्च स्थान टिकविण्याकरितां त्यांना किती वेळ मोडावा लागत असेल व कष्ट पडत असतील याची कल्पना त्या धंद्याबाहेरील फार थोड्यांनाच असेल.

## आण्णासाहेबांविषयीं टिळकांचें मत

पण वकिलीचा धंदा संभाळून त्यांनीं राजकीय, धार्मिक, शैक्षणिक असे व्याप वाढविले आहेत व त्यांतून वेळांत वेळ काढून वाङमयसेवाहि त्यांनीं केली आहे. कोणतेंहि सार्वजनिक काम स्वीकारलें म्हणजे ते हौसेनें उत्साहपूर्वक करावयाचें हा त्यांचा स्वभाव आहे. ज्या कार्यक्षेत्रांत आपण शिरूं त्या प्रत्येक कार्यक्षेत्रांत सर्वांच्या अग्रभागीं आपण असावें अशी त्यांची महत्त्वाकांक्षा असते व तसे ते कार्यक्षम आहेतहि; परंतु त्यांस अनेक क्षेत्रांत कामें करण्याची पाळी आल्यामुळें त्यांना ती महत्त्वाकांक्षा पुरी करावयास सांपडत नाहीं. आण्णासाहेब राजकारणांत सन १९१५ सालीं वावरूं लागले असें म्हणण्यास हरकत नाहीं. त्यापूर्वी एकच वर्ष लोकमान्य टिळक ब्रह्मदेशांतील हद्दपारीची शिक्षा संपवून परत आले होते व त्यांनीं देशाच्या राजकारणांत सहा वर्षांत आलेला सुस्तपणा घालवून ऊत्र आणण्यास सुरुवात केलेली होती. तो काळ महायुद्धाचा असून इंग्लंड अडचणींत सांपडलें होतें व त्याला हिंदुस्थानांतून मिळेल तितकी मदत पाहिजे होती. लो. टिळकांनीं या अडचणीचा फायदा घेऊन स्वराज्यप्राप्तीसाठीं होमरूलच्या चळवळीचें निशाण उभें केलें होतें. ब्रिटिश सरकारास अल्पस्वल्प तुकडा तोंडावर टाकून हिंदी लोकांना संतुष्ट करावयाचें असल्यामुळें त्यांनीं भारतमंत्री मि. मॉंटेग्यु यांना हिंदी लोकांच्या आकांक्षा समजावून घेण्याकरितां हिंदुस्थानांत पाठविलें. ते व तत्कालीन व्हाइसरॉय लॉर्ड चेम्सफर्ड नगरोनगरीं हिंडून हिंदी पुढाऱ्यांनीं मांडलेल्या निरनिराळ्या योजना ऐकून घेत. त्या प्रश्नाचा सांगोपांग विचार सरकार-पुढें मांडण्याची आवश्यकता भासून लो. टिळकांच्या इच्छेवरून श्रीयुत तात्यासाहेब केळकर यांनीं 'केस फॉर होमरूल' नांवाचें इंग्रजी पुस्तक

लिहिलें. त्याच विषयावर आण्णासाहेब यांनींहि सार्वजनिक सभेचे चिटणीस या नात्यानें एक कैफियत तयार केली; व सभेचे अध्यक्ष लोकमान्य टिळक यांस दाखविली. टिळकांना ती फारच पसंत पडून त्यांनीं त्यासंबंधीं काढलेले उद्गार लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. टिळक म्हणाले, 'भोपटकर यांनीं लिहिलेली कैफियत माझ्या अपेक्षेपेक्षांहि चांगली वठली आहे. असल्या तरुणांची सर्व शक्ति व बुद्धि राष्ट्रकार्यास मिळेल तर राष्ट्राचे चांगले दिवस फार दूर नाहींत.'

ही सार्वजनिक सभेतर्फे लिहिलेल्या कैफियतीची हकीकत झाली. पण तिजपेक्षां मोठें असें 'स्वराज्याची मीमांसा' या नांवाचें पुस्तक श्री. आण्णासाहेब यांनीं लिहून प्रसिद्ध केलें. व त्याची एक प्रत लो. टिळकांकडे त्यांनीं पाहावयास पाठविली. ती लोकमान्यांनीं वाचली, त्यानंतर आण्णासाहेब त्यांजकडे कारणपरत्वें भेटावयास गेले असतां टिळक त्यांची पाठ थोपटून म्हणाले, "तुमचें पुस्तक सबंध वाचलें. छान आहे. पुढच्या पिढींतील तुम्ही आमचे तात्या केळकर आहांत."

ब्रिटिश अधिकाऱ्यांविषयीं भोपटकरांचें मत केव्हांहि अनुकूल नसतें. त्यांच्या विरुद्ध ते अंतःकरणांतून नेहमीं जळत असतात. तशांत ब्रिटिश अधिकाऱ्यांनीं चढेलपणाचे उद्गार काढले म्हणजे त्यांच्या संतापाला सीमाच राहात नाहीं. असाच प्रकार होमरूल चळवळीच्या वेळीं घडला. त्या सुमारास कांहीं प्रसंगानें तत्कालीन भारतमंत्री मि. माँटेग्यु हे विलायतेंत दर्पोक्तीनें बोलले होते. त्या बाबतींत रा. तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यांत आण्णासाहेबांचें व्याख्यान झालें. त्यांत ते माँटेग्यूस उद्देशून म्हणाले, "माँटेग्यू हे सेक्रेटरी ऑफ स्टेट असतील. पण त्यांनी लक्षांत ठेवावें की, मीहि लोकप्रतिनिधिभूत अशा या सार्वजनिक सभेचा सेक्रेटरी आहे!" भोपटकरांचे हे उद्गार केळकर यांनीं लो. टिळक यांस सहज सांगितले. तेव्हां लोकमान्य म्हणाले "अशींच आत्मविश्वासाचीं माणसें असावीं लागतात. स्वराज्यांत हेच आमचे भोपटकर 'फॉरीन मिनिस्टर' व्हावयाचे."

### आण्णासाहेबांकडून माफीचा प्रयत्न

वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांविषयीं टाकून बोलण्याचें आणखी एक उदाहरण देण्यासारखें आहे. लॉर्ड विलिंग्डन गव्हर्नर असतां मुंबई इलाख्यांत दुष्काळ पडून लोकांवर भयंकर आपत्ति ओढवली होती. त्या बाबतींत लोकांना साहाय्य करण्याच्या उद्देशानें पुणें शहर म्युनिसिपालिटीतर्फे किर्लोस्कर नाटकगृहांत एक जाहीर सभा बोलाविण्यांत आली. तिचे अध्यक्ष लॉर्ड विलिंग्डन हेच होते. त्या काळीं हल्लींपेक्षां गव्हर्नराचा दरारा किती तरी मोठा असे. त्या सभेंत पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. वक्त्यांत वेगवेगळ्या वर्गांचे निवडक प्रतिनिधि असून वकील वर्गातर्फे भोपटकर वक्ते होते. त्यांनीं आपल्या भाषणांत सरळ गव्हर्नरावरच मुळीं हल्ला केला, व दुष्काळनिवारणाचें कार्य सरकारचें असतां लोकांना बोलावून त्यांची मदत मागण्यांत सरकारनें चूक केली असा त्यांच्यावर ठपका ठेवला. त्यामुळें सभेंत मोठीच खळबळ उडाली. त्यांचें भाषण बंद करण्याचाहि प्रयत्न कांहीं अधिकाऱ्यांकडून झाला. परंतु भोपटकरांनीं कोणासहि जुमानलें नाहीं. इतकेंहि करून शेवटीं दुष्काळ निवारणनिधीस यादी फिरवितांना जे आंकडे पडले ह्यांत गव्हर्नरांपेक्षांहि आपला मोठा आंकडा घालून त्यांनीं तिकडूनहि गव्हर्नरास चांगलेंच लाजविलें असें ऐकतों.

हें प्रकरण इतक्यावरच न थांबतां आनंदाश्रमांत रा. हरिभाऊ आपटे यांच्या घरीं म्युनिसिपालिटीची कांहीं मंडळी भोपटकर यांच्या उद्धट वर्तनाबद्दल त्यांच्याकडून गव्हर्नराची माफी मागविण्याचा विचार करण्याकरितां जमली. ही मंडळी अर्थात् सरकाराच्या प्रेरणेनेंच आलेली व सरकाराच्या कच्छपीं नेहमी असणारी होती. रा. आपटे त्या वेळीं पुणें शहर म्युनिसिपालिटीचे अध्यक्ष असल्यानें वरील मंडळीनें हरिभाऊ-मार्फत भोपटकरांना माफी मागावयास लावण्याचा प्रयत्न केला. परंतु हरिभाऊंना आण्णासाहेबांचा स्वभाव पूर्णपणें माहीत असल्यामुळें ते म्हणाले, 'म्युनिसिपालिटीच्या सभासदांत भोपटकर हे एरवी, सभांच्या वेळीं व इतर सर्व प्रसंगीं फार थंडपणानें व समंजसपणानें वागतात, पण सरकार व सरकारी अधिकारी यांचा विषय आला की, त्यांचें डोकें तापतें, हा रोजचाच अनुभव आहे. इंग्रजांविषयीं विलक्षण हाडवैर बाळगणारे माझ्या

पाहण्यांत दोनच गृहस्थ आले; एक विष्णुशास्त्री चिपळूणकर व दुसरे हे भोपटकर. समोरासमोर सरकारी अधिकाऱ्यावर हल्ला करणारा टिळकांच्या खालोखाल हाच एक मनुष्य आहे. असल्या मनुष्यापासून तुम्ही माफी कसली मागतां ?' हरिभाऊंच्या या उद्गारांमुळें माफीचा सर्व व्यूह आपोआपच ढासळला हें सांगावयास नको. वास्तविक रा. आपटे यांचे हे उद्गार मला ऐकावयास मिळण्याचें एरवी कारण नव्हतें. परंतु हरिभाऊ यांच्याकडे वरील संभापणप्रसंगीं मला जाण्याचें निमित्त घडल्यामुळें ते सहज ऐकण्यास सांपडण्याचा योगायोग आला.

## टिळक-केळकरांच्या गुणांशीं साम्य

वरील गोष्टीवरून टिळकांचे कांहीं गुण भोपटकर यांच्या अंगीं कसे उतरले आहेत हें समजून येतें. माझ्या मतें भोपटकरांत टिळक व केळकर या दोघांच्या कांहीं गुणांचा मिलाफ झाला आहे. राज्यकर्त्यांविषयीं वैर, अतुल धैर्य, सरकारविषयक भाषणांतील कडकपणा, सतत उद्योग, विद्या-व्यासंग व ज्याला एकदां आपलें म्हटलें त्याला कांहीं असलें तरी अंतर द्यावयाचें नाहीं हे भोपटकरांत दिसणारे टिळकांचे प्रमुख गुण होत. लो. टिळकांच्या पक्षांत राहून त्यांचे प्रतिस्पर्धी जे नामदार गोखले त्यांच्या-विषयीं आदरबुद्धि बाळगण्यास मनाचा खरा उदारपणाच पाहिजे. तो गुण केळकर व भोपटकर यांच्यामध्यें समान आहे. सामाजिक सुधारणेच्या बाबतींतहि दोघांत असेंच विलक्षण साम्य आहे. केळकरांइतकाच वाङ्मय-सेवेचा त्यांना हव्यास आहे; व इतर अनेक व्याप आणि आपला वकिलीचा मुख्य धंदा संभाळून तो बराचसा त्यांनीं पूर्णहि केला आहे. त्यांनीं एकट्या वाङ्मयसेवेसच आपणास सर्वस्वीं वाहून घेतलें असतें, तर ते साहित्यिकांतील श्रेष्ठ साहित्यिक होऊन वाङ्मयसम्राट झाले असते; व पुढील पिढ्यांच्या कल्याणार्थ त्यांनीं निःसंशय कपाटभर सर्वोत्तम ग्रंथ लिहिले असते.

## आण्णासाहेबांचें हृद्गत

आण्णासाहेबांशीं माझा घरगुती संबंध थोडाबहुत आला आहे. परंतु प्रकृत स्थळीं त्याकडे न वळतां सार्वजनिक कामानिमित्त त्यांचा माझा

खासगी संबंध येऊन, त्यांत जो सहज पत्रव्यवहार झाला त्याचा येथें परामर्श घेणें अवश्य वाटतें. मी सार्वजनिक सभेचा चिटणीस आणि टिळक-मंदिर-संस्थेचा दुय्यम चिटणीस या नात्यानें गेलीं चौदा वर्षें पुणें जिल्ह्यांत व महाराष्ट्राच्या इतर भागांतील प्रमुख गांवीं जाऊन विशिष्ट विषयावर व्याख्यानें देण्याचे दौरे काढीत असे. दौरा संपविल्यावर त्याचा अहवाल तयार करून तो मी प्रसिद्ध करीत असे. अहवाल छापून तयार होतांच एक प्रत मी प्रथम आण्णासाहेब यांचेकडे वाचण्याकरितां मुद्दाम आदर-पूर्वक पाठवून देई. त्या प्रत्येक अहवालावरील अभिप्राय त्यांनीं मजकडे खासगी रीतीनें लिहून पाठविले आहेत. त्यांचा कधींकाळीं सार्वजनिक रीत्या उपयोग करण्याचा प्रसंग येईल याची मला व त्यांनाहि त्या काळीं कल्पना नव्हती. अर्थात् त्यांत त्यांनीं प्रदर्शित केलेल्या विचारांत कृत्रिमपणा नसून ते सहज प्रकट झाले असल्यामुळें, त्यांत त्यांच्या अंतःकरणाचा खरा ठाव लागतो असें मानणें अगदीं यथार्थ ठरेल. याकरितां प्रस्तुत स्थळीं विस्तारभयास्तव त्यांपैकीं केवळ नमुन्याकरितां म्हणून फक्त तीनच पत्रां-तील मुद्द्यांस धरून तेवढींच अवतरणें देत आहे—

(१) ता. २३।७।३३ च्या पत्रांत ते लिहितात, "...मला तुमचा एक प्रकारें हेवा वाटतो. तो याबद्दल की **तुमच्या हातून भरीव काम होत असून मी मात्र** केवळ संसाराच्या धबडग्यांत संसाराचे धक्केचेपटे यथा-स्थित खात व्यर्थ कालक्रमणा करीत आहे."

(२) ता. ६।८।३४ च्या पत्रांत पुढील मजकूर आहे—"...**तुमचें कार्य पाहून मला राहून राहून असें वाटतें** कीं, जन्मास आलों त्याप्रमाणेंच कोरडा या जगांतून जाण्याचें माझ्या नशिबीं दिसतें. माझ्या आयुष्याच्या चाकोऱ्या आतां अगदीं कायम झाल्या असून, निरनिराळ्या उपाधींचा वेढा मजसभोंवार पडलेला आहे. ऐहिक सुखसाधनांच्या दृष्टीनें माझें आयुष्य फुकट गेलें असें जरी मला म्हणवत नाहीं, तरी इतर दृष्टीनें म्हणजे मायभूमीची व मानव्याची सेवा करण्याच्या दृष्टीने तें खास फुकट गेलें व जात आहे असें म्हटल्यावांचून मात्र राहावत नाहीं. पण आतां इलाज काय? जर नाहीं, तर व्यर्थ हळहळत तरी बसा काय म्हणून ?"

(३) ता. ६।९।३६ च्या पत्रांतील उद्गार––"**तुम्ही करीत आहां अशा प्रकारची देशसेवा करण्यास पूर्वजन्मींचें भाग्य असावें लागतें व** तें मला लाभलेलें नाहीं म्हणून पुष्कळ वेळा खंतहि वाटते. चार खऱ्या कार्यकर्त्यांच्या बैठकींत मी बसलों म्हणजे माझ्या अकर्तृत्वाबद्दल मलाच नेहमीं ओशाळगत वाटतें व म्हणून मी सहसा कार्याबद्दलचें बोलणें टाळून इतर गोष्टींबद्दलचें बोलत असतों. पण आयुष्य फुकट गेलें ही टोंचणी मात्र मनांत कायम असते."

रा. आण्णासाहेब यांनीं पाठविलेल्या बहुतेक सर्वच पत्रांत कोठें ना कोठें तरी अंतरींच्या तळमळीचें वाक्य नाहीं असें पत्रच नाहीं. तें सर्व सोडून दिलें तरी वरील तीन अवतरणांत आण्णासाहेबांच्या मनाचा थोरपणा व देशसेवेविषयीं तळमळ उत्कटपणें व्यक्त होत आहे. त्यांच्या हातून आतांपर्यंत झालेली देशसेवा इतकी थोर आहे की, तिचा कोणासहि हेवा वाटावा. घडलेल्या मातृभूमीच्या सेवेनें त्यांच्या मनाचें समाधान झालेलें नाहीं. यावरून देशसेवेसंबंधीं त्यांनीं आपल्यापुढें ठेवलेलें ध्येय किती श्रेष्ठ प्रतीचें आहे याची कल्पना कोणासहि करतां येईल. श्रीसमर्थ रामदास व श्रीशिवाजी महाराज यांच्या चरित्राची व कार्याची आण्णासाहेबांच्या मनावर पराकाष्ठेची छाप आहे. श्रीसमर्थांचें तत्त्वज्ञान, श्रीशिवाजी महाराजांचें राजकारण व लोकमान्यांचें चारित्र्य हेंच त्यांच्या सार्वजनिक आयुष्याचें ते अधिष्ठान समजतात व नित्याच्या राजकारणांत याच त्रयीचा ते उच्चार करतात. अशा थोर व दिव्य विभूति अनुकरणास्तव त्यांनीं आपल्यापुढें ठेविल्यामुळें व 'उत्कट भव्य तेंचि घ्यावें। मळमळीत अवघेंची टाकावें ।।' या शिकवणुकीनुसार उत्कट व भव्य कार्य आपल्या हातून व्हावें अशी आण्णासाहेबांची प्रथमपासून महत्त्वाकांक्षा असणें अगदीं स्वाभाविक आहे, व यामुळें वरील थोर विभूतींशीं तुलना करतां आपल्या हातून घडलेलें कार्य कांहींच नव्हे या समजुतीनें ते आपल्या ठिकाणीं नेहमीं असंतुष्ट असतात.

### अंतरींची तळमळ

भागानगर-निःशस्त्र प्रतिकारास जाण्याची मला उत्कट इच्छा होती. परंतु माझी प्रकृति अलीकडे अतिशय बिघडली असल्यामुळें मला ती सेवा

अशक्य झाली. माझ्या प्रकृतीची ही अवस्था माहीत असूनहि कांहीं गृहस्थांनीं मला जाण्याचा आग्रह चालविला होता. व मी जात नाहीं असें पाहून ते मजवर गरमहि झाले होते. प्रकृतीची अशी नाजूक स्थिति असतांहि मीं मनाचा हिय्या करून निःशस्त्र प्रतिकारास जाण्याचें योजिलें; व यापूर्वीं तीर्थरूपांची अनुमति घेण्याकरितां मी माझ्या बोरखळ गांवीं गेलों. त्या वेळीं वडिलांचें वय ९२ वर्षांचें होतें. त्यांची शरीरप्रकृति इतकी क्षीण झाली होती की, त्यांचा कोणत्या क्षणीं शेवट होईल याचा भरंवसा नव्हता व त्याप्रमाणें ते त्या चळवळीच्या ऐन भरांत निवर्तलेहि. तीर्थरूपांची अशी स्थिति पाहून माझ्या मनाची चलबिचल झाल्यामुळें बोरखळाहून मी आण्णासाहेबांना त्या बाबतींत पत्रद्वारें सल्ला विचारला. त्या वेळीं त्यांजकडून ताबडतोब आलेलें उत्तरच येथें देत आहें.

पुणें, ता. १९।४।१९३९

कृ. सा. न. वि. वि.

"मला आतांच तुमचें तारीख १६ चें पत्र मिळालें. भागानगर सत्याग्रहास जाण्याची तुमची असलेली उत्कट इच्छा मला पूर्वींच माहीत आहे. पण तुमची शरीरप्रकृति या कामास सर्वस्वी प्रतिकूल आहे हें स्पष्ट आहे. तुमचें शरीरच जर व्याधिग्रस्त झालेलें आहे तर त्याला तुम्ही तरी काय करणार? तशांत मातापितरांविषयींच्या कर्तव्याला कांहीं किंमतच नाहीं काय? तुम्ही आपल्या वडील-मातोश्रींची सेवा-चाकरी अवश्य प्रथम केली पाहिजे. तींत बाकीच्या सर्व कर्तव्यांचा समावेश होतोच. म्हणून माझें तुम्हास स्पष्ट सांगणें आहे कीं, तुमची स्वतःची प्रकृति व वडिलांची हल्लीची असहाय स्थिति या दोन्ही दृष्टींनीं तुम्ही चालू सत्याग्रहास येण्याचा बेत रद्द करा.

"तसेंच पाहिलें तर मी तरी आतां साठीच्या घरांत आलेला आहे. यामुळें प्रकृतिमान बेताबेताचेंच असतें हें सारें खरें; पण शरीराकडे पाहून मीं जर आपलें कर्तव्य करावयाचें नाहीं, तर मग जिवंत राहून करावयाचें तरी काय? सारा ग्रंथ येथेंच आटोपलेला बरा नव्हे!

कळावें, लो. अ. ही. वि.—आण्णासाहेब"

वरील पत्रांत रा. आण्णासाहेब यांची तळमळ, इतरांच्या स्थितीविषयीं सहानुभूतिपूर्वक विचार, मातापितरांसंबंधीं भक्ति व कर्तव्यनिष्ठा प्रतिबिंबित झाली आहे. तसेंच त्या पत्रांत स्वतःसंबंधीं त्यांनीं काढलेले निर्वाणीचे व उत्कट भावनेचे उद्गार पाहून श्रीसमर्थांनीं दासबोधांत 'कांहीं एक उत्कटेंवीण, कीर्ति कदापि नव्हे जाण' या लिहून ठेविलेल्या वचनाची यथार्थता प्रचीतीस येते.

## मातृभक्ति

याच्याच अनुषंगानें त्यांना स्वतःच्या मातापितरांविषयीं काय वाटतें हें नमूद करणें अस्थानीं होणार नाहीं. आण्णासाहेबांच्या मातुश्री त्यांचा चांगला काळ येईपर्यंत हयात होत्या. आण्णासाहेब हे तिघां चिरजीवांत सर्वांत धाकटे असल्यामुळें स्वाभाविकच त्यांची ममता विशेष होती. व उलटपक्षीं त्यांचेंहि आईवर तसेंच उत्कट प्रेम होतें. आईचें पूर्ववय फार गरिबींत गेलें असल्यानें त्यांना आण्णासाहेबांस वकिलीवर पुष्कळ पैसा मिळूं लागलेला पाहून धन्यता वाटत असे. आपल्या आईचे पांग आपल्या हातून फिटावेत म्हणून मातृभक्त आण्णासाहेब त्यासाठीं नेहमीं हर प्रयत्न करीत. एकदां तर आण्णासाहेबांनीं सुरतीं पांचशें रुपये आईच्या पदरांत साक्षात् ओतले व ते आईला खरोखरच दोन्ही हातांनीं उधळण्यास व इच्छेस येईल त्याप्रमाणें खर्च करण्यास सांगितले!

## मनाचें औदार्य

पुणें येथील लॉ कॉलेजांत आण्णासाहेब व्हाइस प्रिन्सिपॉल व प्रोफेसर आहेत. त्यांनीं त्या संस्थेंतील कांहीं सहकाऱ्यांबरोबर निर्वेतन काम करण्याचें ठरविलें. अलीकडे या संस्थेची सांपत्तिक स्थिति उत्कृष्ट असून तिच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीहि झाल्या आहेत. या वेळीं रा. आण्णासाहेब भोपटकर यांनीं व त्यांच्या सहकारी प्रोफेसरांनीं जर इतर कॉलेजांतून मिळणाऱ्या वेतनाप्रमाणें वेतन घेतलें असतें, तर ह्या इमारती होणें शक्य झालें नसतें. केवढें हें औदार्य! ही रक्कम थोडीथोडकी नसून कित्येक हजारांपर्यंत सहज जाईल!

एकदां मी आण्णासाहेबांचे बरोबर उमरावतीहून पुण्यास परत येत होतों. त्यांनीं मला उमरावती स्टेशनावर स्वतःकरितां दुसऱ्या वर्गाचें तिकिट काढण्यास पैसे दिले. त्याप्रमाणें मी त्यांचें तिकिट काढल्यावर सात आठ रुपये शिल्लक राहिले. ते पुण्यास आल्यानंतर हिशेबासुद्धां मी त्यांजकडे पाठवून दिले. सदर रक्कम न स्वीकारतां त्यांनीं ती मजकडे परत पाठविली. मला याचा कांहीं अर्थच कळला नाहीं. म्हणून पुन्हा चिठी लिहून ते पैसे मीं त्यांजकडे पाठविले. त्यांनीं ते पैसे मजकडे परत पाठवून कळविलें कीं, "आपल्या एखाद्या स्नेह्याजवळ पैसे दिले असतां खर्च करून त्यांतील उरलेले पैसे परत घेण्याचा माझा रिवाज नाहीं. म्हणून पैसे तुमचेकडे पाठविले आहेत. स्वीकार करा. परत पाठवूं नका !" पण अर्थातच या रकमेचा स्वीकार करणें मला इष्ट न वाटून आण्णासाहेब यांस न सांगतां त्यांच्या नांवें ती रक्कम सार्वजनिक सभेकडे देणगी म्हणून मीं जमा केली. रा. ग. स. मराठे हे सार्वजनिक सभेचे हिशेब-तपासनीस असल्यामुळें त्यांच्या नजरेस ही गोष्ट आली व ती त्यांनीं आण्णासाहेबांस सांगितली. तेव्हां ते म्हणाले आपल्या माणसाची सांपत्तिक स्थिति मी जाणतों व म्हणूनच केवळ कांहीं विशिष्ट व्यक्तींच्या बाबतींत मी असें करतों. माझ्या श्रीमंतीची ऐट म्हणून मी असें हें प्रदर्शन कसें करीन ? पण बापटांनीं मात्र आज मला चांगलाच धडा शिकविला म्हणावयाचा ! यापुढें माझ्या असल्या वागण्यांत मला आतां थोडा विचारच केला पाहिजे."

### संयम

१९३७ सालच्या निवडणुकींत त्यांचे बंधु रा. भास्करराव ऊर्फ भाऊसाहेब यांनीं जाहीर व्याख्यानांतून आपल्या भावाची हवी तशी नालस्ती केली. ती ऐकून आण्णासाहेबांचे एक स्नेही त्यांच्यासमोर भाऊसाहेबांस दूषण देऊं लागले असतां आण्णासाहेबांनी आपल्या वडील भावाविरुद्ध एकहि अक्षर बोलूं नका, मला तें खपणार नाहीं, असें त्यांना निक्षून सांगितलें! याचें नांव बंधुप्रेम, वडिलांविषयीं आदर.

### समारोप

दे. भ. आण्णासाहेब यांच्या आयुष्यक्रमांतील कांहीं उज्ज्वल प्रसंगांच्या अनुरोधानें येथपर्यंत मीं लिहिलें आहे. परंतु यासारखे आणखी कितीतरी

उज्ज्वल प्रसंग दाखवितां येण्यासारखे आहेत. परंतु विस्तारभयास्तव मला आपली लेखणी आवरणें आवश्यक आहे. आण्णासाहेब यांना हल्लीं पुष्कळ मानमान्यता मिळाली आहे व लोक त्यांना धन्यवाद देत आहेत. हें सर्व त्यांच्या सत्कृत्यांचें फल आहे. हीं सत्कृत्यें स्वतःच्या शरीराला, बुद्धीला व संपत्तीला झीज लावल्यावांचून होत नसतात. त्यांच्या जीवनाचें फल त्यांस कीर्तिरूपानें कसें मिळत आहे हें श्रीसमर्थांच्या शिरोभागीं उद्धृत केलेल्या वचनावरूनहि कळून येणारें आहे.

## श्रीशिवजयंतीनिमित्त, शिवाजीमंदिरांत झालेलें श्री. आण्णासाहेब बापट यांचें भाषण

केसरी, दि. १३–३–१९४२

### ब्राह्म व क्षात्रतेजाच्या संयोगानेंच महाराष्ट्राचा उद्धार

प्रतिवर्षाप्रमाणें येथील शिवाजी-मंदिरांत शिवजयंती-उत्सव अत्यंत उत्साहानें साजरा करण्यांत आला. गुरुवार दि. ५ मार्च १९४२ ला सायंकाळीं ६ वाजतां धर्मवीर आण्णाराव भोपटकर, यांचे अध्यक्षतेखालीं जाहीर सभा होऊन आठवणीकार श्री. सदाशिवराव बापट यांचें भाषण झालें.

आजच्या प्रसंगीं पूर्वनियोजित वक्ते प्रा. माटे यांचें व्याख्यान व्हावयाचें ठरलें होतें. परंतु कांहीं अडचणीमुळें ते येऊं शकत नाहींत असा आयत्या वेळीं त्यांचा निरोप आल्यामुळें सभेचे अध्यक्ष रा. आण्णासाहेब भोपटकर यांनीं व्याख्यान ऐकावयास आलेल्या श्रोत्यांपैकीं आठवणीकार रा. सदाशिवराव बापट यांस चार शब्द बोलण्यास पाचारण केलें. तेव्हां खोखोच्या खेळांत खो म्हटल्याबरोबर जसा गडी एकदम उठतो त्याप्रमाणें अनपेक्षित असें हें आव्हान ऐकून दे. भ. बापट हे उठून व्यासपीठावर आले व त्यांनीं बोलण्यास सुरुवात केली.

## देशाच्या उद्धाराचें श्रेय दोघांस सारखेंच

देशभक्त बापट आपल्या भाषणांत म्हणाले :—छत्रपति शिवाजी महाराज यांचेसंबंधानें कोणाहि खऱ्या महाराष्ट्रीय हाडाच्या माणसास ऐन झोपेंतून उठून चार शब्द बोलण्यास सांगितल्यास तो तर बोलेलच, पण तसाच प्रसंग आल्यास प्रत्यक्ष मुक्या माणसासहि भगवान् शिवरायासंबंधानें वाचा फुटेल इतकें महाराष्ट्राचें मन व अंतःकरण प्रेमानें, आदरानें, कृतज्ञतेनें व उपकृतबुद्धीनें भरलेलें आहे. तथापि असें असूनहि क्वचित् कांहीं संशयात्मे नसते वाद उत्पन्न करतात याचें आश्चर्य वाटतें. पांच सहाशें वर्षांच्या अवनतींतून महाराष्ट्राचा उद्धार करण्यास श्रीसमर्थ व छत्रपति हे दोघेहि सारखेच कारण झाले असतांहि कर्तृत्वाचा व यशाचा हा प्रीतिसंगम न साहून देशाच्या उद्धाराचें श्रेय फक्त कोणा एकासच देण्यांत कांहीं दुराराध्यांचा आग्रह किंबहुना दुराग्रह दिसून येतो. पण धर्मक्षेत्र अशा या आपल्या आर्यभूमीची परंपरा व इतिहास पाहिल्यास धर्म व संस्कृति यांच्या अधिष्ठानावर सर्व व्यवहार व राजकारण अधिष्ठित असल्याचें दिसून येईल. रामकृष्णांच्या पौराणिक काळांत काय हा वरील सिद्धांतच प्रस्थापित झालेला आहे हें कांहीं उदाहरणें देऊन सिद्ध करून देतां येईल.

## निवृत्ति-प्रवृत्ति संयोगाचें चरित्र-चित्र

वैराग्य व पराक्रम यांची युति श्री व विजय किंवा यश व सिद्धि यांस प्रसवते हा चमत्कार जगांत कसा दिसून येतो हें मॅझिनी, गॅरिबॉल्डी वगैरेंच्या उदाहरणांनीं सिद्ध होतें. लोकमान्य टिळक यांनीं एका प्रसंगीं आपलें असेंच मत दिलें आहे कीं, शिव व समर्थ या आपल्या राष्ट्रांतील अगदीं दोन निरनिराळ्या पण एकाच वेळीं उत्पन्न झालेल्या स्वतंत्र अशा स्फूर्ति होत. गंगा-यमुनाप्रमाणें हे दोन स्वतंत्र प्रवाह होते. पुढें त्यांच्याच संगमानें महाराष्ट्राचा उद्धार झाला आहे. श्री. तात्यासाहेब केळकर यांनीं पुढील आशयाचे असे उद्‌गार काढले होते कीं, "थोडा आडमुठेपणा पत्करून असेंहि म्हणतों कीं, ऐतिहासिक आधार क्षणभर बाजूस ठेवूनहि केवळ कलाकृतीच्या सौंदर्यामुळें किंवा अत्यंत रमणीय अशा काव्यकल्पनेच्या मोहामुळें शिवाजी-रामदास यांचें हें निवृत्ति-प्रवृत्ति संयोगाचें भव्य व उदात्त

चरित्र-चित्र समाजापुढें आदर्श म्हणून ठेवणेंच रसिक माणसास अधिक मानवेल."

तात्पर्य, ब्राह्मतेज व क्षात्रतेज आपल्या धर्मभूमींत विभक्त करण्यांत किंवा ते परस्पर पोषक नाहींत असें म्हणण्यांत शहाणपणा नाहीं. त्यांच्या संयोगानेंच महाराष्ट्राचा उद्धार झालेला आहे हें निःपक्षपातीबुद्धीनें पाहणाऱ्या आंधळ्या माणसासहि दिसणारें आहे. स्वाभाविकच आहे कीं, ही दोन्ही सामर्थ्यें एक होता । काळासी नाटोपे सर्वथा । तेथें इतरांची कोण कथा । कीटके न्यायें ॥

## बुद्धिभेद न करतां कार्यास लागा

कांहीं मतलबी, अदूरदृष्टी व स्वार्थी लोकांना शिवसमर्थ भेट ही दोघांच्या अवतारकार्याच्या अगदीं शेवटीं शेवटीं झाली असें म्हणण्यांत मोठें भूषण वाटतें. पण हा मुद्दा आतां शिळा झाला आहे व तो ऐतिहासिक दृष्ट्या कांहीं संशोधकांनीं व विशेषतः धुळ्याच्या सत्कार्योत्तेजक सभेनें अनेक पुराव्यांनिशीं खोडून काढला असल्यामुळें त्यासंबंधीं आतां वास्तविक आक्षेपकांनीं गप्पच बसावयास पाहिजे. पण मधून मधून अजूनहि हा वाद उकरून काढण्यांत येतो याचें दुःख होतें. वास्तविक ब्राह्मण क्षत्रिय यांच्याच काय पण चारी वर्णांच्या एकत्रित शक्तींची जोड राष्ट्रोद्धारास कशी होईल याचेंच चिंतन व प्रचार निदान हल्लींच्या काळांत तरी व्हावयास पाहिजे व आनंदाची गोष्ट ही कीं, तसा प्रयत्न हिंदुमहासभा व तिचे अध्यक्ष स्वातंत्र्यवीर सावरकर व आजच्या सभेचे अध्यक्षहि करीत आहेत. अशा वेळीं कोणी कोणाचा बुद्धिभेद न करतां अहमहमिकेनें शिवरायाच्या व समर्थांच्या महाराष्ट्राचा उद्धार करण्यास सर्वांनीं सिद्ध व्हावें हें आजच्या प्रसंगीं शिकण्यासारखें आहे.

## संस्कृतिसंरक्षणाचें महत्त्व

छत्रपति शिवाजी महाराजांचे चरित्राचें रहस्य सांगण्यासाठीं स्वातंत्र्य व संस्कृति यांतील भेद स्पष्ट केला आणि स्वातंत्र्य मिळण्यास थोडा उशीर झालेला पत्करेल पण संस्कृतीचें संरक्षण झालेंच पाहिजे हें अनेक उदाहरणें देऊन त्यांनीं सांगितलें. जिनादि मुसलमान पुढारी हे आपल्या संस्कृती-

साठीं जसे मोठ्या नेटानें प्रयत्न करीत आहेत तसे हिंदूंनीं नेटानें प्रयत्न केले पाहिजेत. शिवाजी महाराजांनीं राज्याभिषेकाच्या वेळीं गो-ब्राह्मण-प्रतिपालन हें जें मराठी राज्याचें ब्रीद सांगितलें त्यावरून त्यांचा मुख्य हेतु हिंदु संस्कृति संरक्षणाचाच होता हें स्पष्ट आहे.

**' सह्याद्रि ' मासिकाच्या ऑक्टोबर १९४५ मध्यें प्रसिद्ध झालेला लेख:—**

# सुभाषबाबूंचें सौजन्य

लेखक : श्री. **सदाशिव विनायक बापट,** आठवणीकार, पुणें

[ Politeness is the flower of Humanity : Good nature is the beauty of the mind, and, like personal beauty, wins almost without anything else. ]

दे. भ. सुभाषचंद्र बोस यांच्या आकस्मिक व शोकजनक निधनामुळें त्यांची सुहास्यमूर्ति अंतश्चक्षूंपुढें उभी राहून त्यांची एकसारखी आठवण होणें स्वाभाविक आहे. तशांत कोणत्या ना कोणत्या गोष्टीमुळें ज्यांना त्यांनीं कायमचें ऋणी व उपकारबद्ध करून ठेवलें आहे व त्याबद्दल ज्यांची कृतज्ञताबुद्धि जागृत आहे, अशा अनेक उपकृतापैकीं मीहि एक असण्याचें माझें भाग्य असल्यामुळें, मजवरील त्यांच्या त्या विशिष्ट उपकाराचा जाहीर उच्चार करून त्यांच्याविषयीची माझी स्मृतिसुमनांजलि त्यांच्या चरणीं अर्पण करणें माझें कर्तव्य आहे.

### खरें अंतरंग कळण्याचें साधन

कोणाच्याहि चरित्राचें खरें अंतरंग त्याच्या प्रकट जीवनक्रमापेक्षां खाजगी व अप्रकट जीवनक्रमावरूनच अधिक कळून येतें. लो. टिळकांचीं अनेक चरित्रें लिहिण्यांत आलीं. तीं सर्वच आपापल्या परीनें चांगलीं आहेत. पण तीं सर्व बहुतांशीं त्यांच्या प्रकट जीवनक्रमासंबंधीं. म्हणून ब्रह्मदेशांतील मंडालेच्या तुरुंगांतील सहा वर्षांच्या प्रदीर्घ कालांतील त्यांच्या अप्रकट जीवनक्रमाचें चरित्र मिळेल, तर तें विशेष अपूर्वाईचें होय असें मला नेहमीं वाटे. आणि सुदैवानें हा सुयोग अकल्पितपणें पुढें घडूनहि आला ! लो. टिळक यांच्या ' आठवणी-आख्यायिका ' या ग्रंथाकरितां, त्यांच्या पहिल्या खंडापासून

शेवटच्या म्हणजे तिसऱ्या खंडापर्यंत, वर उल्लेख केलेल्या मंडालेच्या तुरुंगांतील लोकमान्यांच्या निवांत, अप्रकट व कधींहि कोठें प्रसिद्ध न होऊं शकणाऱ्या आयुष्यक्रमाचें वर्णन मिळविण्याचा मीं अनेक तऱ्हांनी प्रयत्न केला. शेवटीं वर म्हटल्याप्रमाणें 'आठवणी'च्या तिसऱ्या खंडाच्या वेळीं हा सुयोग जमून आला.

लो. टिळक यांस मंडाले तुरुंगांत स्वयंपाक करून घालण्याकरितां येरवडा तुरुंगांतील कैदी रा. वासुदेव रामराव कुळकर्णी यांस सरकारनें पाठविलें होतें. लोकमान्यांचें साहचर्य घडणें ही खरोखर त्यांची पूर्वपुण्याई असेंच मी समजतों. लोकमान्यांच्या संगतींत असलेल्या व त्यांची सेवा घडलेल्या या भाविक व वृद्ध गृहस्थानें 'आठवणी'च्या तिसऱ्या खंडांत मंडाले तुरुंगांतील लोकमान्यांचा विस्तृत असा जो अद्भुत जीवनक्रम वर्णिला आहे तो पाहून मला वाटे कीं, जेथें हें चरित्र घडलें तेथील जागेचें—तुरुंगांतील लोकमान्यांच्या निवासस्थानाचें—छायाचित्र घेऊन तें रा. कुळकर्णी यांनीं लिहिलेल्या मजकुराजवळ छापावें, म्हणजे हें प्रकरण यथासांग पार पडलें असें होईल. परंतु माझें हें वाटणें जितकें सहज सोपें होतें, तितकेंच तें प्रत्यक्ष घडून येणें महाकर्म कठिण होतें—अगदीं अशक्यच होतें—हें उघड आहे. तथापि एकांतिक व उग्रनिष्ठापूर्वक अत्युत्कट भावनेनें केलेल्या दीर्घ व महान यत्नास फळहि येतें असा अनुभव आहे.

### नाजूक काम आणि उमदी पूर्तता

प्रस्तुत विषयाच्या चिंतनांत मी मग्न असतां—एके दिवशीं कळलें कीं, मंडाले येथील तुरुंगांतील ज्या जागेंत लोकमान्यांस ठेवण्यांत आलें होतें त्याच जागेंत बाबू सुभाषचंद्र बोस यांस ठेवण्यांत आलें असून त्यांस भेटण्यास त्यांचे बंधु शरच्चंद्र बोस लवकरच जाणार आहेत. मला हें कळलें मात्र—लगेच मी बॅरिस्टरसाहेबांस एतद्विषयक विस्तृत पत्र लिहून माझी तीव्रतम इच्छा त्यांस कळविली; व काय वाटेल तें करून, प्रसंगीं कोणत्याहि सूक्तासूक्त मार्गानें व वाटेल तितका खर्च करून, त्या जागेचा निदान स्नॅपशॉटनें गुपित फोटो घेऊन मजकडे पाठविण्याबद्दल त्यांस अत्याग्रहपूर्वक मीं विनंती केली. सुभाषबाबूंचेच ते बंधु! नाहीं त्यांची माझी ओळख ना पाळख! तरीसुद्धां त्या भल्या व थोर गृहस्थानें

मजसारख्या यःकश्चित् व अपरिचित माणसास इतक्या अवघड व नाजूक कामाविषयीं ताबडतोब मोठें उमदें पत्र लिहून, सदर काम करण्याचा आटोकाट प्रयत्न करतों अशा अर्थाचें अभिवचन दिलें. मी इकडे अति उत्कंठेनें त्या कार्याकडे डोळे लावून बसलों होतों. पुढें लवकरच सुभाषबाबूंची तेथून सुटका झाली व ते पुणें येथें राष्ट्रीय सभेच्या महाराष्ट्र प्रांतिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून येण्याचें ठरलें. म्हणून 'आपण लवकरच पुण्यास येत आहोंत त्या वेळीं तुम्हांस देण्याची कबूल केलेली वस्तु आपण समक्षच देऊं', असें त्यांनीं मला कळविलें. त्याप्रमाणें ते येथें आले त्या वेळीं ते दे. भ. आण्णासाहेब भोपटकर यांचे घरीं उतरले होते. तेथें मी त्यांस भेटतांच स्वतः ही अपूर्व देणगी (मंडाले येथील तुरुंगाचें छायाचित्र) सुहास्यवदनानें त्यांनीं माझ्या हवालीं केली ! खरोखर हा लाभ मला अमूल्य वाटला. महत्प्रयासानें मिळविलेलें तें छायाचित्र आठवणीच्या तिसऱ्या खंडांतील लोकमान्यांचे मंडालेच्या तुरुंगांतील लघुचरित्र—लेखक रा. कुळकर्णी यांच्या मजकुराजवळ छापण्याची अशा रीतीनें माझी इच्छा सफल झाली ! पण सर्वांत आश्चर्य हें कीं, त्या जागेचें हें छायाचित्र कोणीं, केव्हां, कसें घेतलें, त्यास खर्च किती आला, हें मात्र शेवटपर्यंत, मी सारखी विचारणा केली असतांहि, त्या उभय बंधूंनीं गुलदस्तांत ठेवलें ! खरोखर हें बंधुद्वय म्हणजे उपकार, साहस, कर्तव्यतत्परता व निरपेक्षता यांचें केवळ प्रतीकच होय.

### टीकाकारांच्या माहितीसाठीं

सुभाषबाबूंकडून अशी ही दुर्मिळ वस्तु हस्तगत झाल्यानंतर मी आतां तरी गप्प बसावेना ? पण त्या थोर व सत्त्वशील पुरुषाचा भलताच फायदा घेण्याचा मला आणखीहि मोह पडला खरा ! तो मोह म्हणजे सुभाषबाबूंनीं लोकमान्यांसंबंधींच्या आपल्या स्वतःच्या आठवणी लिहून द्याव्या हा होय. कारण माझा असा कृतसंकल्प होता कीं, ज्यांचा लोकमान्यांशीं थोडा का होईना संबंध आला असून, व ज्यांस त्यांच्या संबंधानें कांहीं ना कांहीं माहिती असून, त्यांच्यापासून मी ती मिळविली नाहीं—निदान मीं त्यांस विचारली नाहीं असें होऊं नये. हा माझा संकल्प मी अनेक वेळां

जाहीर केला असल्यामुळें, ज्यांस एके काळीं लोकमान्यांचें 'कल्याण' म्हणून कांहीं एका विशिष्ट गटांत समजण्यांत येई अशा रा. कृष्णाजीपंत खाडीलकर यांच्यासारख्याकडून मी आठवणी कशा मागितल्या नाहींत म्हणून कित्येकांना मोठा आचंबा वाटून, त्यांनीं मला खाजगी रीतीनें व जाहीरपणें बहुत दोष दिला व अजूनहि तोच क्रम अधूनमधून चालू आहे! म्हणून अशा जिज्ञासूंच्या व टीकाकारांच्या माहितीकरिता 'आठवणी'च्या तिसऱ्या खंडाच्या माझ्या आत्मनिवेदनांत, केवळ शिष्टाचार म्हणून, रा. कृष्णाजीपंत खाडिलकर यांचा नामोल्लेख न करतां, पण साक्षात् त्यांसच उद्देशून, मीं लिहिलेला मजकूर आतां मुद्दाम या ठिकाणीं उद्धृत करीत आहे :—

"लोकमान्यांच्या डाव्या-उजव्या हातांप्रमाणें समजण्यांत येणाऱ्या एका प्रसिद्ध गृहस्थाच्या आठवणी तुम्ही कशा मिळविल्या नाहींत असें शेंकडों जणांनीं मला नाना प्रकारें टोंचून विचारलें. म्हणून आतां सांगतों कीं, या निष्ठावंत व मला पूज्य असणाऱ्या टिळकभक्तास अगदीं आरंभापासून मीं किती व कशीं पत्रें पाठविलीं व त्यांच्या जिवलग स्नेह्यांकडून भीड घालून त्यांस आळविलें असतांहि त्यांनीं मगरूरपणानें व पक्षांधतेनें आपल्या आठवणी देण्याचें कसें साफ नाकारलें, हा कथाभाग अत्यंत हृदयभेदक असला, तरी तो जाहीर करणें हें अप्रशस्त होय. सदर गृहस्थांकडे दोन वेळां मी समक्ष गेलों असतां, शेवटीं रागाच्या सप्तकांत सूर चढवून ते मला म्हणतात, 'हें पाहा, तुम्ही सर्वांनीं टिळकांना भलतेंच 'पेन्ट' केलें आहे. तुमचे सर्व उद्योग मला साफ नापसंत आहेत; म्हणून मी स्वतंत्र रीतीनें 'चारशें पानांचें' बळवंतरावांचें एक निराळें स्वतंत्र चरित्र लिहिणार आहे. तेव्हां तुम्हांला माझ्याकडून माहितीचा म्हणजे आठवणीचा एक कणहि मिळणार नाहीं, समजलांत!" (आठवणी ३ रा खंड, आत्मनिवेदन.)

## आठवणीची थट्टा ?

एकीकडे रा. खाडिलकर यांचा अजिबात मजकूर नाहीं म्हणून लोक दोष देतात, आणि दुसरीकडे कै. प्रो. शिवरामपंत यांनीं मजकूर दिला आणि तो मी प्रसिद्ध केला म्हणूनहि मला लोक दोष देतातच! पण लोकांनीं

तरी हा दोष कां देऊं नये ? शिवरामपंत हे महाधूर्त ? त्यांनीं अजिबात मजकूर न देण्याच्या खाडीलकरी हटवादाचें अनुकरण न करतां माझ्या तोंडाला खाशीं पानें पुसलीं ! तो प्रकार असा कीं, नांवाला त्यांनीं मजकूर तर दिला; पण तो उलट आमच्या ग्रंथविषयक योजनेची थट्टा करण्याकरितां आपल्या नेहमींच्या वक्रोक्तीच्या व छद्मी पद्धतीनें दिला ! शिवरामपंतांसारख्या गृहस्थांकडून असला मजकूर मिळावा व तो मीं प्रसिद्ध करावा म्हणूनहि कित्येकांनीं माझा निषेध केला. एका मोठ्या साहित्यिकानें मला कळविलें कीं, "प्रो. परांजपे याच्या सबंध मजकुरांत 'टिळक' या नांवाशिवाय त्यांचा संबंध कोठेंहि आलेला नाहीं त्या अर्थी टिळकांची ही आठवण कसली ! केवळ ही आठवणीची थट्टा आहे." शिवरामपंतांनीं असा मजकूर लिहून आमच्या योजनेची थट्टा केली, का वाचकांची केली, का लोकमान्यांची केली ? पण शेवटीं त्यांनीं आपल्या हातानें आपलीच थट्टा करून घेतली हेंच खरें !

वरील व्यक्तिविषयक मजकूर लिहिण्यांत मला आनंद होतो असें नाहीं. पण आज हें हृदयाविष्करण करण्याचें कारण, लोकांना वस्तुस्थिति माहीत नसल्यामुळें अजूनहि मजवर होणारा दोषारोपाचा प्रहार यापुढें तरी निदान होऊं नये हें एक आणि दुसरें मुख्य कारण म्हणजे जवळच्या खात्रीच्या सद्गृहस्थांकडून, म्हणजे लोकमान्यांच्या डाव्या-उजव्या हातां-कडून, झालेली ही संभावना ! व बंगालसारख्या दूरच्या प्रांतांतील, लोकमान्यांशीं फारसा संबंध न आलेल्या, बाबू सुभाषचंद्र यांच्यासारख्या-कडून आठवणी मिळण्याच्या कामीं मिळालेला अनुभव ! यांची माझ्या मनांत होणारी एकसारखी तुलना हें होय. तथापि सुभाषबाबूंचें सौजन्य दर्शविलेंच पाहिजे असें मात्र नाहीं हेंहि मी जाणतों, व त्या बुद्धीनें वरील मजकूर लिहिला नाहीं हेंहि येथें तितक्याच प्रांजलपणें सांगतों.

### सद्वर्तनाचा आदर्श

सुभाषबाबूंस आपल्या आठवणी लिहून पाठविण्याबद्दल विनंती करतांच त्यांनीं त्या बाबतींत दाखविलेली अगत्यबुद्धि, कळकळ, तत्परता व आत्मीयता यांबद्दल त्यांचें कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे. त्यांस आपल्या आठवणी

ग्रंथ ठाणे. स्थळप्रत



अनुक्रम १५०८२ दि: २८/११/५६
८८०

पाठविण्याबद्दल मीं विनंति केली त्या वेळीं व पुढेंहि कांहीं दिवस दुसऱ्या कांहीं महत्त्वाच्या कार्यांत ते गुंतले होते. आणि त्यांची प्रकृतीहि फार बिघडली होती. त्यामुळें आपण पाठविण्याचा कबूल केलेला मजकूर लवकर वेळेवर न पाठवितां आल्याबद्दल दिलगिरीदाखल कळकळीच्या दोन वेळा त्यांनी मला तारा केल्या, व शेवटीं एक पत्रहि पाठविलें. तें मूळ पत्रच जिज्ञासू वाचकांच्या माहितीकरितां मुद्दाम येथें देत आहे.

Anand Bhuwan,
Allahabad, 7–7–28

My dear Mr. Bapat,

I am really ashamed for not being able to send my Reminiscences of Lokamanya, earlier. I have really no excuse to offer. But since my return from Bombay, I have been worried with so many things and so many problems, that I have not been in a writing mood for a long time. I did not want to commence writing about Lokamanya until I was in a real writing-mood. I have not been well of late—the strain of work has been too much for me at times. I was not able to fulfil my promise before I left Calcutta for Allahabad. However, I had to force myself to write something for you. The production has not been statisfactory to me and I do not know whether it will satisfy you and other friends. I believe the article has reached you by now. Please, pardon me for the delay in fulfilling a promise.

Please convey my best regards to Mr. Kelkar, Mr. Divekar and accept same yourself.

Yours very sincerely,
Subhas C. Bose

छायाचित्र, आठवणी, व वरील पत्र यासंबंधीं लिहिलेल्या वरील एकंदर हकीकतीवरून दे. भ. बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या सौजन्याची यथार्थ कल्पना वाचकांस येणार आहे. त्यावरोबरच त्यांस 'Behaviour is a mirror in which each one shows his image' या उक्तीचा प्रत्ययहि आल्यावांचून राहणार नाहीं.

## कै. देशभक्त बाबाराव धारप यांच्या आठवणी

दिनांक १४।२।१९६०च्या तरुणभारतांत मुंबईचे हिंदुत्वनिष्ठ सुप्रसिद्ध ॲडव्होकेट कै. बाबाराव धारप यांच्या संबंधानें ती. आण्णासाहेब यांच्या अनेक आठवणींपैकीं थोड्या प्रसिद्ध झालेल्या आठवणी पुढें दिल्या आहेत.

(लेखक :— **आठवणीकार श्री. स. वि. बापट**)

मुंबईचे प्रख्यात हिंदुत्वनिष्ठ आणि टिळकभक्त विधिज्ञ श्री. काशीनाथ नारायण तथा बाबाराव धारप इहलोक सोडून गेल्यास बराच काल गेला. पण त्यांच्या थोर सद्‌गुणांमुळें माझ्यासारखे त्यांचे कितीतरी स्नेही त्यांच्या वियोगदु:खामुळें तळमळत राहिले आहेत यांत शंका नाहीं. त्रेचाळीस वर्षे बाबांचा माझा निकट संबंध आला असल्यानें घडून आलेले कितीतरी संस्मरणीय प्रसंग गर्दी करून मनापुढें उभे राहतात. त्या अनेक प्रसंगांपैकीं अगदीं थोडे प्रसंग पुढें देतों :—

### टिळकांबद्दल असीम आदर

१९१९ मध्यें सर्वश्री वा. कृ. भावे, हरिभाऊ फाटक, बापूराव जोशी, बाबाराव धारप व मी असे महाडहून रायगडला गेलों. गडाच्या पायथ्यापर्यंत बैलगाडींतून प्रवास केला पण वाट अति खराब. वाटेंत वाळसुरे गांवाजवळ गाडी उलटली. त्या वेळीं बाबांनीं एकदम गाडींतून उडी टाकली ती जवळच्या खोल खळग्यांत पडली. त्यामुळें त्यांचा पाय मुरगळला, फारच दुखावला व कांहीं वेळानें खूप सुजला. त्यांनीं गाडींतून घरीं परत जावें असें मंडळींनीं ठरविलें. पण "लो. टिळकांनीं बांधलेल्या शिवरायाच्या समाधीचें दर्शन घेतल्या-खेरीज मी परत जाणार नाहीं 'पंगू लंघयते गिरीम' " असा त्यांनीं आपला कृतनिश्चय सांगितला.



तीर्थस्वरूप आण्णासाहेब बापट : ती. बाबासाहेब धारप यांचेसह

बाबा कसेतरी एक फर्लांग चालले. पण पुढें पायास जास्तच ठणका सुरू झाला. शेवटीं चालणें अशक्य झालें म्हणून एका मजुराच्या हाऱ्यांत बसून ते गडावर गेले. पुढें गडावर गेल्यावर पायाचें दुखणें वाढलें. गडावरील एका वृद्ध मावळ्यानें "या पायावर मी फासण्या टाकतों म्हणजे त्यांना बरें वाटून ते खाली पायानें उतरूं शकतील" असें सांगितलें, म्हणून तसें केलें. दुसरें दिवशीं आम्ही गडावरून निघालों. "कसातरी मी खालपर्यंत जाऊं शकेन" असें बाबा म्हणाले. गडाचा १/४ भाग बाबांसह आम्ही खालीं उतरलों. इतक्यांत आरोळी आली कीं, 'वणवा लागल्यानें खालीं जाण्याची वाट बंद झाली आहे. मोठा वळसा घालून खालीं लवकर उतरलें पाहिजे.' हें ऐकून व बाबांकडे पाहून सर्वांचें धाबें दणाणलें. शेवटीं दोघां-तिघांनीं त्यांना अलगद उचलून धांवत-पळत खालीं उतरावें असें ठरवलें, पण बाबा ऐकेनात. ही उचलबांगडी ते करण्यास तयार होईनात. विलक्षण निश्चयानें हातांतील काठीवर भार टाकीत ते चालू लागले व सर्वांबरोबर खालीं उतरले. मात्र यामुळें पुढें बरेच दिवस त्यांना आजारीपणा सहन करावा लागला.

## गुप्तदान

लोकमान्य टिळकांच्या चिरोलवरील खटल्याचा निकाल त्यांचेविरुद्ध झाल्यामुळें लोकमान्यांवरील आर्थिक संकट हें राष्ट्रावरील संकट आहे असें समजून तें निवारण्याकरितां महाराष्ट्रानें तीन लाख रुपयांचा 'टिळक पर्स फंड' जमविण्याचें ठरविलें. चालकांनीं प्रथम असें धोरण ठरविलें कीं, फंड मोठा उभारावयाचा असल्यामुळें प्रथम किरकोळ रकमा प्रसिद्ध न करतां ५०० रुपयांपासून अधिक रकमा प्रसिद्ध कराव्यात. निरनिराळ्या लहान देणगीदारांनीं आपापसांत रकमा जमवून त्यांपैकीं एकाचे नांवानें ती रक्कम प्रसिद्ध करावी म्हणून बाबा व बापू (बापूराव जोशी) यांनीं आपल्याजवळचे ५०० रुपये माझ्या एकट्याच्या नांवानें सदर फंडाचे खजिनदार श्री. आण्णा-साहेब नेने यांजकडे भरून त्याची पावती त्यांनीं मजकडे पाठविली! ती पाहून मी अगदीं गोंधळून गेलों. पुढें चौकशी करतां वर दिलेल्या योजनेनुसार हें प्रकरण असल्याचें कळून आल्यामुळें त्याचा सर्व उलगडा झाला.

## न्यायाधीशपदास नकार

हायकोर्टांतील बाबांच्या एका निकटवर्ती विविज्ञांनीं मला एकदां सांगितलें कीं, बाबांना वरिष्ठ न्यायालयांत न्यायाधीश नेमण्याचा विचार चालू असतां त्यांस बाबांनी नकार दिला असें आम्हांस नक्की समजलें आहे. हें ऐकून मला फार वाईट वाटलें. त्यांच्या ज्ञानाला योग्य असें हें पद त्यांनीं स्वीकारलें असतें तर मला स्वाभाविकच विशेष आनंद होणार होता. म्हणून याविषयीं प्रत्यक्ष बाबांनाच मीं समक्ष विचारलें. ते म्हणाले, "अखेर तुमच्याहि कानापर्यंत ही गोष्ट आली म्हणतां. आण्णा, या बाबतींत मी कांहींच न बोलणें बरें; षट्कर्णी ही गोष्ट होणें मला बरें वाटत नाहीं. पण तुम्हांस मी एवढें सांगतों कीं, तो मान मोठा असला व त्यायोगें तुमच्यासारख्या माझ्या 'वेड्या' स्नेह्यास आनंद होणारा असला तरी ती जागा पत्करण्यानें माझें खरोखर आर्थिक नुकसानच होणार आहे. म्हणून त्या योजनेस मी आपला नकार कळविला."

बाबांच्या दहाव्या दिवशीं तिलांजलीकरितां मी मुंबईस गेलों होतों. त्यांच्या घरीं श्रद्धानंद आश्रमाचे कर्तृत्ववान कार्यवाह श्री. श्रीपाद शंकर नवरे हे बाबांचे कुटुंबाचे सांत्वनार्थ आले होते. ते मला म्हणाले, "बाबांनीं आमची संस्था मुळीं कधीं पाहिली नाहीं. पण हिंदुत्वाच्या कडव्या अभिमानामुळें त्यांनीं आमची संस्था न पाहतांहि परवां आपल्या कुटुंबास आमची संस्था पाहण्यास पाठवून त्यांचेजवळ देणगीदाखल आम्हांस देण्यास १ हजार रुपये दिले." यासारखीं अनेक उदाहरणें मला माहीत आहेत. जाहिरातबाजीचा तिरस्कार व गुप्तदान हें बाबांचें वैशिष्टय होतें.

## न्या. छगलांची श्रद्धांजली

बाबा हे कट्टे हिंदुत्वनिष्ठ होते परंतु त्यांची हिंदुत्वनिष्ठा खऱ्या अर्थानें राष्ट्रीय होती. मुंबई हायकोर्टाचे सर न्यायाधीश न्या. छगला यांच्याबद्दल बाबांना नितांत आदर होता. सरकारच्या रोषाची पर्वा न करतां न्याय देणारे म्हणूनच केवळ नव्हे, तर ते कट्टे राष्ट्रीय प्रवृत्तीचे असल्यामुळें बाबांच्या मनांत त्यांच्याविषयीं अत्यंत आदर वसत होता व त्यांनीं तो माझेजवळ किती वेळां तरी व्यक्त करून दाखविला होता. हिंदुमुसलमानांच्या प्रश्नाबद्दल जेव्हां

आम्ही बोलत असूं तेव्हां तेव्हां ते कळवळून म्हणत कीं, न्या. छगलांसारखे भारतांतील इतर मुसलमान जर राष्ट्रीय प्रवृत्तीचे होतील तर हिंदुमुसलमानांचा प्रश्नच भारतांतून नाहींसा होईल. 'गुणी गुणं वेत्ति'-न्यायाधीश छगला हेहि बाबांना फार मानीत असत. न्या. छगला यांनीं बाबांच्या मृत्यूनंतर मुंबई हायकोर्टांत हृदय उचंबळून सोडणारें जें भाषण केलें त्यावरून बाबांच्या गाढ विद्वत्तेबद्दल, वकिलीच्या धंद्यांतील त्यांच्या पात्रतेबद्दल व निष्कलंक चारित्र्याबद्दल त्यांच्याहि मनांत केवढा आदर वसत होता हें कळून आलें.

## केळकर-आठवणी ग्रंथाबद्दलच्या सत्कार सभेंत ती. आण्णासाहेब बापट यांचें झालेलें भाषण

सन १९६१ सालीं पुणें येथील शिवाजी मंदिरांत कै. तात्यासाहेब केळकर यांच्या श्राद्धतिथीनिमित्त डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांच्या अध्यक्षतेखालीं प्रकट सभा भरली होती. त्या सभेंत केळकर आठवणी ग्रंथ तयार केल्या-बद्दल 'केसरी' संस्थेतर्फे आण्णासाहेब बापट यांस महावस्त्र देऊन त्यांचा सत्कार करण्यांत आला. त्या वेळीं आण्णासाहेब यांनीं केलेलें भाषण खालीं दिलें आहे :—

अध्यक्षमहाराज व बंधुभगिनींनो,

(१) 'मौनं सर्वार्थ साधनम्', ही म्हण मला फार आवडते; अशाच अर्थाचें इंग्रजींत एका ग्रंथकाराचें वचन आहे. 'Silence is more eloquent than words' हें वचन तर माझ्या फार आवडीचें आहे. त्याचप्रमाणें श्रीसमर्थ म्हणतात "मनारे जनीं मौन्य मुद्रा धरावी" या उपदेशाचा तर माझे मनावर फार परिणाम झाला आहे. म्हणून सहसा मी फारसें तोंड उघडत नाहीं. पण आयुष्यांत असे कांहीं प्रसंग येतात कीं त्या वेळेला ही म्हण; हें वचन; हा उपदेश किंचित् लवचिक करून आपला कार्यभाग करावा लागतो. असें न केलें तर विनाकारण गैरसमज, माजूरपणा व कृतघ्नपणा यांचा दोष पदरीं येतो. असा विचार करून आपल्या परवान-गीनें दोन शब्द बोलण्याचें मी धारिष्टय करतों.

(२) आजचा हा प्रसंग पाहून ३२ वर्षांपूर्वीच्या एका प्रसंगाची मला आठवण होते. लो. टिळक यांच्या आठवणींचे दोन खंड व 'लो. टिळकसूक्ति-संग्रह' हे ग्रंथ प्रसिद्ध करून १९२८ सालीं लोकमान्यांच्या पुण्यतिथीचे दिवशीं टिळक मंदिरांतील गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांच्या अध्यक्षतेखालीं भरलेल्या प्रकट सभेंत श्री. बाबासाहेब खापर्डे यांच्या हस्तें लोकमान्यांच्या आठवणींचा तिसरा खंड प्रसिद्ध करण्यांत आला. त्या वेळीं तात्यासाहेब केळकर यांनीं मला जवळ बोलावून म्हटलें, "ह्या खुर्चीत बसा." हें ऐकून मी अगदीं गोंधळून गेलों. कारण त्यानंतर तेथें होणाऱ्या गोष्टीची मला कांहींच कल्पना नव्हती. लोकमान्यांचा व गु. तात्यासाहेब यांचा मी लेखक असल्यामुळें टेबलावर लिहितांना अर्थात् मी खुर्चीवर बसे. पण अशा प्रकट समारंभांत तात्यासाहेब यांच्या मांडीला मांडी लावून खुर्चीवर बसणें मला अशक्य होतें. ही माझी स्थिति पाहून त्यांनीं माझा हात धरून "बसा हो येथें" असें म्हणून आपले जवळच्या खुर्चीत मला बसवलें व लगेच उठून अध्यक्षांच्या प्रास्ताविक भाषणास त्यांनीं सुरुवात केली. प्रथम ते जे बोलले ते असें कीं "लोकमान्यांच्या संबंधानें अपूर्व वाङमय बापट यांनीं प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांचे स्नेही डॉ. गोपाळराव पळसुले यांनीं आज सकाळीं ९ वाजल्यापासून आतां ६ वाजेपर्यंत या कानाचे त्या कानास कळूं न देतां ६०० रु. जमवून आजचे सन्माननीय पाहुणे व्याख्याते बाबासाहेब खापर्डे यांच्या हस्तें सदाशिवराव बापट यांच्या गौरवार्थ त्यांस ही थैली देण्यांत येत आहे." असें म्हणून ती थैली रा. खापर्डे यांच्या हस्तें मला देण्यांत आली. याही वेळीं मौन सोडून लोकमान्यांचें स्मरण होऊन मी म्हणालों "सत्पुरुषांचें अनुकरण करणें कठीण आहे. तथापि लोकमान्यांच्या स्फूर्ति-मुळें मी येवढेंच म्हणतों कीं लोकमान्यास त्यांच्या एकसष्टाव्या वाढदिवसा-च्या समारंभाचे वेळीं त्यांस लोकांनीं एक लक्ष रुपयांची थैली अर्पण केली ती स्वीकारून त्याच लोकमान्यांनीं आपले दहा हजार रुपये घालून ती जनसेवेस परत दिली. त्याप्रमाणें या रकमेंत मी माझे ५० रुपयांचें तुळशी-पत्र घालून ही थैली 'केसरी' संस्थेस अर्पण करण्याकरतां गु. तात्यासाहेब यांचे चरणीं अर्पण करतों." असें म्हणून ती थैली तेथेंच त्यांच्या हवालीं केली. पुढें काँग्रेसनें नेहरू रिपोर्ट तयार केला. या थैलीचा विनियोग नेहरू

रिपोर्टाचा प्रचार करण्याकरतां करावा असें तात्यासाहेबांनीं ठरविल्यामुळें टिळक मंदिर या संस्थेचा 'चिटणीस' या नात्यानें टिळक मंदिर संस्थे-तर्फें महाराष्ट्रभर व्याख्यानांच्या रूपानें मी त्याचा प्रचार केला. हें वेगळें सांगण्याचें तात्पर्य असें कीं, त्या वेळीं स्वतःसाठीं ही थैली मी स्वीकारूं शकलों नाहीं.

(३) नंतर दुसरा प्रसंग म्हणजे गु. तात्यासाहेब केळकर यांच्या आठवणी ग्रंथाचा. थोडी गंमत सांगतों. तात्यासाहेब यांचें घर म्हणजे माझें गुरुगृह. ते विद्यमान असतांना एके दिवशीं त्यांचे घरीं मी गेलों होतों. त्यांचे टेबलावर 'गतगोष्टी' म्हणजे त्यांचें आत्मचरित्र हा त्यांचा ग्रंथ नुकताच छापून आलेला मीं पाहिला. तो पाहून हंसत हंसत पण जरा लागून बोलण्यासारखें त्यांस मी म्हणालों "स्वतःच्या वाङमयाचे सर्व प्रकार तुम्हीं आपल्या हातानेंच प्रसिद्ध करीत आहांत; आतां त्यांत तुमच्यासंबंधानें करण्यासारखें दुसऱ्यास कांहीं उरूं देण्याचा आपला बेत दिसत नाहीं; असेंच ना समजावयाचें?" हें ऐकून थोडे गोरे मोरे होऊन त्या महामर्मज्ञ पुरुषानें चटकन् उत्तर दिलें. ते म्हणाले "समजलों; दुसऱ्यास आपणासंबंधानें प्रसिद्ध करण्यासारखें कांहींहि ठेवूं नये असें मीं ठरविलें तरी तुमच्यासारखी वेडीं माणसें आपला हट्ट पुरवणार नाहींत कशावरून? मला ही भीति आहेच!" हें ऐकून चटकन् मी म्हणालों, "आपण आपल्या वाङमयाचे सर्व प्रकार लिहून प्रसिद्ध केले तरी शेवटीं असें एक वाङमयाचें सुंदर दालन शिल्लक राहीलच कीं, जे आपणा स्वतःस कांहीं केल्या निर्माण करतां येणार नाहीं. तें इतरांनाच निर्माण करावें लागेल." हें माझें कांहींसें निश्चयाचें बोलणें ऐकून अत्यंत विनय परिपूर्णतेनें व गंभीर मुद्रेनें हळू आवाजांत ते म्हणाले, "बापट, माझ्या लक्षांत आलें, तुमच्या मनांत काय आहे हें मी समजलों. पण छेः तसें कांहीं होऊं नये. माझी ती योग्यता नाहीं. फक्त टिळकच त्यास योग्य. त्यांच्या जोडीस बसण्याला मी पात्र नाहीं. बाकी हेंहि मी बोलणे व्यर्थच आहे म्हणा. कशाला भविष्यकाळाच्या पोटांत आपण शिरा!" शेवटीं त्यांचीच भीति मीं खरी ठरविली! त्यांच्या स्मशानयात्रेंत अधोमुख करून मी चालत असतांनाच लोकमान्यांच्याप्रमाणें त्यांच्या आठवणीचे ग्रंथ तयार

करण्याचें मीं मनाशीं निश्चित ठरवलें. लोकमान्य हे हिमालय असले तरी तात्यासाहेब हे खास सह्याद्रि होते. शिवाय लोकमान्यांच्या तोंडून तात्यासाहेबांच्या संबंधानें अनेक वेळां कांहीं विशिष्ट धन्योद्‌गार मीं ऐकले होते. त्याचाहि माझे मनावर विशेष परिणाम झाल्यामुळें, कशाचाहि विचार मी न करतां त्यांच्या आठवणींचा ग्रंथ तयार करण्याचे उद्योगास लागलों. ग्रंथ तयार झाला व केसरी संस्थेनें तो प्रसिद्ध केला. एके दिवशीं आदरणीय तात्यासाहेब करंदीकर यांनीं आपल्या खोलींत मला बोलाविलें. या ग्रंथास तात्यासाहेब करंदीकर यांनीं प्रस्तावना लिहिलेली आहे. ती प्रस्तावना व त्या ग्रंथांतील माझें आत्मनिवेदन आपणास फार आवडल्याबद्दल करंदीकर यांस पाठविण्यांत आलेलीं कै. बाळासाहेब खेर व कै. दादासाहेब मावळंकर यांचीं पत्रें तात्या करंदीकर यांनीं मला वाचून दाखविलीं. नंतर ते म्हणाले "या ग्रंथाकरितां तुम्हांस आलेल्या प्राथमिक एकूणएक खर्चाचें टिपण मला द्या. त्याचें काम आहे." सार्वजनिक संस्थांचे जमाखर्च लिहिण्यांत माझा जन्म गेल्यामुळें सदर ग्रंथाकरितां केलेल्या खर्चाची स्वतंत्र वही मीं ठेवली होती. ती दुसरे दिवशीं त्यांस नेऊन दिली. वहींतील खर्चाचा आंकडा जवळजवळ ६०० रुपयांपर्यंत गेला होता. तो पाहून ते म्हणाले तात्यासाहेब केळकर यांच्या स्मरणार्थ केसरी संस्थेनें पंचवीस हजार रुपये बाजूला ठेवण्याचें ठरविलें आहे. त्याच्या व्याजाच्या रकमेंतून तुमच्या या ग्रंथास चालू सालीं बक्षीस देण्याचें आम्हीं योजिलें आहे. पण तें मात्र एका अटीवर ! लोकमान्यांच्या ग्रंथाच्या वेळीं तुम्हांस मित्रमंडळींनीं दिलेली थैली तुम्ही सार्वजनिक कामास परत दिली. तसें तुम्ही करणार नसाल तरच हें बक्षीस तुम्हांस आम्ही देणार आहोंत. तुम्हीं प्रत्यक्ष केलेल्या खर्चाची रक्कम तुम्हीं घेणें मुळींच अयोग्य नाहीं व तशी तुमची आर्थिक स्थितीहि नाहीं हें आम्ही जाणतों. शिवाय ग्रंथ 'केसरी' संस्थेचा आहे तर त्यासाठीं झालेला खर्च 'केसरी' संस्थेनेंच केला पाहिजे हें उघड आहे. म्हणून विचारतों "तुमच्या खर्चाची ही रक्कम तुम्ही घ्याल ना ?" तात्यांच्या ह्या अत्यंत सहानुभूतिपूर्ण निर्वाणीच्या प्रश्नाचा विचार करून त्यांस मीं संमति दिल्यावर टिळक मंदिरांतील प्रकट सभेंत त्यांनीं याबाबत भाषण करून सदर रकमेचें पाकिट माझे हवालीं केलें. अर्थात् प्रत्यक्ष

केलेला प्राथमिक खर्च म्हणून; त्यांच्या आज्ञेप्रमाणें आभारपूर्वक तें पाकिट मीं घेतलें.

(४) त्यानंतर आजचा हा तिसरा प्रसंग होय. वास्तविक या प्रसंगाची खरोखर मुळींच आवश्यकता नव्हती. शिवाय या समारंभाशीं केसरी संस्थेंतील विशेष संलग्न असलेल्या थोर गृहस्थांचे असे उद्गार प्रसिद्ध झाले आहेत कीं, "मनुष्य हा जात्याच उत्सवप्रिय आहे असें लोकमान्यांनीं एका विशिष्ट प्रसंगीं म्हटलेलें आहे, त्यास माझी पुस्ती इतकीच कीं समारंभास अनुरूप अशीच मात्र उत्सवमूर्ति असावी." याप्रमाणें त्यांचे मार्मिक उद्गार असतांना त्यांच्या विधानास बाध आणणारा असा हा आजचा समारंभ तरी माझ्या मतें व्हावयास नको होता. खरोखरच माझ्या अंतःकरणांतील भावना मी आपणांस सांगतों. ती अशी कीं, ही संभावना करण्यासारखें मीं काय केलें आहे? शेंकडों लोकांशीं पत्रव्यवहार करून त्यांचेपासून आणिलेल्या आठवणींच्या मधुकरीच्या अन्नाची या ग्रंथाच्या रूपानें मी समाराधना घातली येवढेंच हें काम ना? पण हें पवित्र व उत्तम अन्न पुरविणारे व त्यांची ग्रंथ-रूपानें व्यवस्था लावणारे हेच वास्तविक त्याचे खरे वाटेकरी होत, असें मी समजतों. अशा प्रसंगीं त्यांचें मला स्मरण न होईल तर "नैर्दत्तान प्रदायभ्यो योभुंक्तेस्तेन एव सः" या दोषास मी पात्र होईन. वास्तविक या संभावनेचा स्वीकार करण्याचा मला हक्क नाहीं. पण तसें केल्यास माजुरपणा व कृतघ्न-पणा यांचें प्रदर्शन केल्यासारखें होईल. येवढ्यासाठीं अत्यंत नम्रपणें व कृतज्ञतापूर्वक याचा मी स्वीकार करतों. तसेंच माझ्याविषयीं खासगी भेटींत व आतांहि देशभक्त भाऊसाहेब मोडक यांनीं जे प्रशंसापर उद्गार काढले ते पाहून "परगुण परमाणून् पर्वतीकृत्यनित्यम्" इत्यादि भर्तृहरीच्या वचनाची मला आठवण होते. खरोखरच आपणांस सांगतों हा सर्व आपलाच मोठेपणा; फक्त निमित्तमात्र मी आहे, अशी माझी भावना आहे.

(५) तथापि, हें मी कंपीत मनानें, संकोचबुद्धीनें व कांहींसें उद्विग्नपणानें बोलत आहे. १९४८ सालीं केळकर आठवणींचा ग्रंथ निर्माण झाला. म्हणजे १२ वर्षें त्यांच्या खर्चांतून मुक्त होण्यास झालीं. पण त्याचीं कारणेंहि तशींच विलक्षण आहेत. तीं सांगण्यांत अर्थ नाहीं. पण अपूर्वाईची व आश्चर्याची गोष्ट म्हणून सांगावीशी वाटते. ती अशी कीं, लोकमान्यांच्या आठवणींचा

पहिला खंड १ ऑगस्टला प्रसिद्ध होणार अशी १५ जुलैला केसरींत जाहिरात दिली. आणि चमत्कार असा कीं, आगाऊच मागण्या आल्यावर एक ऑगस्टला या ग्रंथाची तीन हजारांची आवृत्ति संपून गेली, असें केसरींत प्रसिद्ध करावें लागलें ! म्हणून तांतडीनें एक महिन्याचे आंत दोन छापखान्यांत मिळून पुन्हा तीन हजारांची आवृत्ति काढण्यांत आली. पण गंमत अशी कीं, तीहि आवृत्ति लगोलग संपून गेली. असाच प्रकार खंड २ व खंड ३ व लो. टिळक-सूक्ति-संग्रह आणि इंग्रजी आठवणींचे स्वतंत्र ३ खंड या सर्व ग्रंथांचे बाबतींत झाला. आज सदर ग्रंथांपैकी एकहि प्रत माझेजवळ शिल्लक नाहीं. हें सर्व सांगण्याचा मुद्दा असा कीं, साक्षात् वरीलप्रमाणेंच अनुभव केळकर आठवणींचे बाबतींतहि खास येईल अशी माझी श्रद्धा होती. म्हणून एकच खंड काय पण दोन खंड प्रसिद्ध करण्याचें मीं आरंभापासून मनाशीं योजिलें होतें. कारण तशी सामुग्री मीं मिळविली होती. पण अस्मानी व कांहीं सुलतानी आपत्तीमुळेंच तसें होऊं शकलें नाहीं, केळकर आठवणींचा हा खंड कल्पनेबाहेर वाढल्यामुळें केवळ स्थलसंकोचास्तव मीं लिहून ठेविलेल्या माझ्या स्वतःच्या आठवणींचें बाड दुसऱ्या खंडांत घालावयाचें म्हणून बाजूस ठेवून दिलें. पण तें सार्वजनिक सभेच्या इमारतीस लागलेल्या आगींत अग्नि-मुखीं पडलें हें माझें दुर्दैव होय.

(६) तथापि, बारा वर्षांनंतर कां होईना, या ग्रंथास आलेल्या एकंदर खर्चांतून त्याची पूर्ण मुक्तता करण्याचा सुप्रसंग 'केसरी' संस्थेस लाभला व तो मला पाहावयास मिळाला ही मोठी आनंदाची व अभिमानाची गोष्ट होय. केसरी संस्थेनें हें काम यशस्वीपणें पार पाडलें म्हणून त्यांस धन्यवाद देणें माझें अत्यंत पवित्र कर्तव्यकर्म आहे. 'केसरी'संस्था म्हणजे 'डेक्कन क्वीन' आहे. त्याचें संपादक मंडळ हे तिचे एअर कंडिशन्ड डबे होत. विश्वस्तमंडळ हे तिचें एंजिन आहे. त्यांतील कर्तृत्वाच्या विद्युत्प्रवाहाच्या विशेष जोराच्या प्रभावा-मुळें प्रस्तुतसारखें विशिष्ट कार्य यशस्वी व्हावें हें 'केसरी' संस्थेस भूषण आहे. हें यश येण्यास कारण होणाऱ्या नव्या योजकांचें मी तरी उतराई होणें अशक्य आहे. कारण 'केळकरांच्या आठवणींच्या ग्रंथापायीं बापट यांनीं केसरी संस्थेस व्यर्थ बुडित खर्चांत घातलें' या असह्य उद्गाराचा माझ्या हृदयांत रुतून बसलेला विषारी काटा उपटून निघाला. इतकेंच नव्हे तर त्या

मराठा ... टा. स्थळ


जखमेवर आजच्या समारंभाची व संभावनेची मलमपट्टी लावण्यांत आली हें उपकार मी कसा विसरेन ? तथापि उपकारकांचा नामोल्लेख करून त्यांतील विरी न वालवितां जसें एखाद्या प्रेक्षणीय सुंदर वस्तूच्या प्रत्यक्ष दर्शनापेक्षां त्याचेवरील झिरझिरीत आवरणांतून त्याचें होणारें दर्शन विशेष लोभनीय व आल्हाददायक वाटतें तसें त्यांच्या नांवाचा प्रकट निर्देश न करतां त्यांचें मी अंत:करणपूर्वक आभार मानतों व त्यांचेविषयीं कृतज्ञता प्रगट करतों. व हें असेंच करणें 'The highest art conceals itself' या न्यायानें अधिक स्वारस्यपूर्ण आहे असें मी समजतों.

(७) आपण मित्रमंडळींनीं माझें हें कंटाळवाणें भाषण ऐकून घेतलें याबद्दल आपले मन:पूर्वक आभार मानून हें माझें निवेदन केसरी संस्था व गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचे पवित्र चरणीं मी अर्पण करतों.

---

## श्रीसमर्थांच्या आठवणी प्रसिद्ध करण्याबद्दल केलेलें आवाहन

**येषां स्वैरकथालाप उपदेशा भवन्ति च ।**

— श्रीमद्भागवत

( लेखक:—**आठवणीकार, सदाशिव विनायक बापट**, पुणें. )

(१) **भगवान** श्रीसमर्थ यांची महापुण्यकारक आठवण महाराष्ट्र विसरणें अशक्य आहे. कारण श्रीसमर्थांचें पुण्यस्मरण मानवांचा उद्धार करणारें असून त्यांचें विस्मरण होणें म्हणजे मानवांचें मरण होय, अशी समस्या आहे. श्रीसमर्थकृत दैवी वाङ्मय व त्यांच्याविषयीं सुदैवानें निर्माण झालेलें व होत असलेलें मानवी विविध वाङ्मय इतकें विपुल व अमर आहे कीं, त्यांच्या नुसत्या दर्शनानेंहि श्रीसमर्थांची नित्य आठवण होणारी आहे. तथापि निराकार ब्रह्मापेक्षां साकार मूर्तीचें दर्शन सोपें, सुगम असतें, त्याप्रमाणें व्यक्तिगत अशी विशिष्ट प्रसंगीं, विशिष्ट घडलेली व मनास चटका लावणारी अद्भुत गोष्ट मनुष्याच्या मनावर विशेष परिणाम करणारी ठरून ती कायम ठशाप्रमाणें चिरकाल टिकणारी असते. आणि

अशा या आठवणीमुळें सहजच मनोमय व्यक्तिदर्शन घडूं शकतें. फार काय, पण एका विद्वान् व मार्मिक पाश्चात्य ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, "One simple anecdote of a great man is worth a big volume of biography." (एखाद्या महा थोर पुरुषाच्या अवाढव्य चरित्रग्रंथापेक्षां त्याची एकच विशिष्ट गोष्ट—आठवण त्याच्या चरित्रग्रंथाच्या मोलाची ठरते.)

(२) वर वर्णन केलेल्या अद्‌भुत गोष्टींच्या रत्नांची खाण म्हणजे श्रीसमर्थचरित्र होय. या चरित्र-खाणींतील अनेक गोष्टी—रत्नें श्रीसमर्थ-विषयक अनेक ग्रंथांत इतस्तत: विखुरलेलीं आहेत. हीं दिव्य रत्नें एकत्र करून त्यांचा इंद्रधनुवत् होणारा नयनदीपकहार श्रीसमर्थचरणीं अर्पण करण्यासारखा आहे.

(३) श्रीसमर्थांविषयीं सांगोवांगीं गोष्टी, दंतकथा, आख्यायिका वगैरे वहुत उपलब्ध आहेत; पण कदाचित् भोळ्या भाविक मनाचे ते कढहि असूं शकतील. म्हणून श्रीसमर्थांसारख्या युगपुरुषाच्या बाबतींत तशा अनधिकृत गोष्टी वगैरे आधुनिक चिकित्सक विद्वानांस मान्य न झाल्या तर त्यांत आश्चर्य नाहीं.

(४) पण तो कथाभाग सोडला तरी, श्रीसमर्थांच्या बाबतींत तसा संशय घेण्यास किंवा तक्रार करण्यास मुळींच जागा नाहीं. कारण त्यांच्या हयातींत व त्यांच्या पश्चात् अनेक थोर व अधिकारी पुरुषांनीं आपल्या ग्रंथांत त्यांच्याविषयीं विशिष्ट बाबतींत अधिकृत असे जे मननीय उद्‌गार काढलेले आहेत त्याच त्यांच्या आठवणी होत ! मुख्य मुद्दा असा कीं, आठवण ही अधिकृत व नांवनिशीवार असली पाहिजे. तशीच ती सत्याच्या सहाणेवर उमटलेली पाहिजे. तरच ती आल्हाददायक, टिकाऊ व परिणाम-कारक होते. श्रीसमर्थांच्या केवळ अशाच प्रकारच्या आठवणींचा संग्रह-ग्रंथ निर्माण होण्यासारखा आहे व तसा तो निर्माण होणें अगत्याचें आहे.

(५) पण सुमारें तीनशें वर्षांनंतर अशा पद्धतीचा समूळ ग्रंथ निर्माण होणें शक्य असलें तरी, त्यांत केवळ आठवणीवजा मजकूर असणें अप्रस्तुत व अस्थानीं होणार नाहीं. साक्षात् श्रीसमर्थांनीं श्रीशिवरायाचें वर्णन असें केलें आहे कीं,—

शिवरायाचें आठवावें रूप । शिवरायाचा आठवावा प्रताप । शिवरायाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ।। शिवरायाचें कैसें चालणें । शिवरायाचें कैसें बोलणें । शिवरायाची सलगी देणें । कैसी असे ।।

ही शिवरायासंबंधीं समर्थांची एकप्रकारें आठवणच होय. तसेंच श्री तुकाराम महाराज यांनीं श्रीसमर्थांचें खालीलप्रमाणें केलेलें वर्णन, ही त्यांची समर्थाविषयीं सुंदर आठवणच नव्हे काय ? ते म्हणतात :—

"हुरमुजी रंगाचा उंच मोती दाणा । रामदासी बाणा या रंगाचा ।। पीतवर्ण कांती तेज अघटित । अवाळू शोभत भृकुटीं माजी ।।१।। काष्ठाच्या पादुका स्वामींच्या पायांत । स्मरणी हातांत तुळशीची ।। रामनाम मुद्रा द्वादश हे टिळे । पुच्छ वळवळे कटीमाजी ।।२।। कोपिन परिधान मेखळा खांद्यावरी । तुंबा कुबडी करी समर्थांच्या ।। कृष्णा-तटाकासी जाहलें दर्शन । वंदिले चरण । तुका म्हणे ।।३।।" अशा या विशिष्ट स्वरूपाच्या उद्गारांचा नियोजित ग्रंथांत अंतर्भाव होणें सुसंगत आहे.

(६) श्रीसमर्थांच्या आठवणींच्या ग्रंथांत समर्थकालीन समर्थपंचायतन, श्रीकल्याणादि शिष्यमंडळी, संतकवि, पुढील काळांतील श्रीहनुमंतस्वामी, श्रीआत्मारामबोवा, श्रीउद्धवसुत, महिपतीबोवा, श्रीअनंतकवि, रघुनाथ पंडित, वामनपंडित, मोरोपंतादि श्रेष्ठ कवि इत्यादींच्या ग्रंथांतून श्रीसमर्थांच्या आठवणी व आठवणीवजा उद्बोधक असा मजकूर उपलब्ध होण्यासारखा आहे; व मुख्यत: हेच अधिकारी पुरुष श्रीसमर्थांच्या आठवणींचे खरे लेखक होत. त्याचप्रमाणें अर्वाचीन काळांतील विद्वान्, चिकित्सक व संशोधक न्या. रानडे, लो. टिळक, राजवाडे, सरदेसाई, विजापूरकर, देव, तात्यासाहेब केळकर, प. प. श्रीधरस्वामीमहाराज, अनंतदास रामदासी, बाळशास्त्री हरदास, डॉ. केतकर, डॉ. पटवर्धनबोवा, काकासाहेब कारखानीस, करंदीकर, पोतदार, शंकरराव जोशी, खरे, माटे, आळतेकर, धुळेकर मंडळी, आण्णाबोवा, गुरुदेव रानडे, चौंडेमहाराज, डोळेमास्तर इत्याद्यनेक रामदासी सांप्रदायाचे अभिमानी व श्रीसमर्थांचे चहाते अशांसारख्यांच्या विस्तृत व मार्मिक लिखाणांतून सदर ग्रंथास पोषक, स्फूर्ति-

प्रद व मार्गदर्शक असा आठवणीवजा मजकूर खास उपलब्ध होण्यासारखा आहे. शिवाय मला अज्ञात अशा कितीतरी अभ्यासू व श्रीसमर्थांविषयीं अधिकृत माहिती पुरविणाऱ्यांची भर या ग्रंथांत पडण्यासारखी आहे. मी असेंहि म्हणण्याचें धाडस करतों कीं, महाराष्ट्र-इतिहासप्रेमी व पाश्चात्य इतिहास-संशोधकांकडूनहि या ग्रंथास क्वचित् हातभार लागण्याचाहि संभव आहे !

(७) तात्पर्य, विविध रंगांच्या फुलांचा बांधलेला सुगंधित पुष्पगुच्छ, निरनिराळ्या रंगांच्या जरतारी धाग्यांनीं विणलेलें महावस्त्र व रंगीबेरंगी कमळांचें सुंदर सरोवर पाहून जो आनंद होईल त्याहिपेक्षां शतपटीनें श्रीसमर्थांच्या आठवणींच्या या पवित्र ग्रंथदर्शनानें खास आनंद होणार आहे.

(८) वर वर्णन केलेल्या विशिष्ट घडणाचा, बहुमोल व सुंदर ग्रंथालंकार निर्माण करण्याची माझी इच्छा, हौस व आकांक्षा होती. पण माझ्या वयोमानामुळें व मुख्यत: दुर्दैवानें माझ्या प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आतां ती पूर्ण होणें अशक्य झालें असलें तरी, तो ग्रंथालंकार निर्माण करण्याची अपेक्षा एखाद्या समानधर्मी व अभ्यासू समर्थभक्तांकडून सफल होवो हीच श्रीसमर्थचरणीं माझी नम्र प्रार्थना असणारच !

[ दिनांक १० मार्च १९६२ च्या 'सज्जनगड' मासिकांतील 'दासनवमी–विशेषांकां'तील लेख. ]

मराठी ... ठाणे. स्थळप्रत
अनुक्रमांक ४०७८२ वि: ...
क्रमांक ८८० नों दि: २८।५।६५

# पत्रव्यवहार

## भाग १

## ती. श्री. आण्णासाहेब बापट यांचा निवडक सार्वजनिक पत्रव्यवहार

---

[ ती. आण्णासाहेब यांना सार्वजनिक कार्याचे बाबतींत आलेल्या शेंकडो पत्रांपैकीं निवडकांतील अगदीं निवडक अशीं कांहीं आगत्याचीं व महत्त्वपूर्ण पत्रें कालानुक्रमवार पुढें दिलीं आहेत. ]

# पत्रव्यवहार भाग १

## निवडक पत्रें

(१)

**श्री. वासुदेव कृष्ण भावे**

( माजी मुख्य संपादक 'केसरी' यांचा व आण्णासाहेब बापट यांचा १९०५ सालापासूनचा स्नेहसंबंध. यांचीं सुमारें २५ पत्रें आहेत, त्यांपैकीं दोन पत्रें खालीं देत आहे.)

श्रीशंकर

फलटण, ता. १२-२-१९१९

देशभक्त सदाशिवराव बापट, मित्राचे सेवेशी.

शि. सा. नमस्कार. वि. वि.

आपलें इस्लामपूर येथें आलेलें पत्र पोहोंचलें. पत्र वाचून आपले अंगीं असलेली असामान्य गुरुभक्ति (लो. टिळकांचे विषयींची) इतकी उदात्तपणें नजरेस पडली कीं, ज्यांच्या ठिकाणीं तिचा लवलेशहि नाहीं त्यांची वृत्ति विचक्षण क्षुद्र विषयावरून उडल्यासारखी झाली. आपलें पत्र ज्यांच्या ज्यांच्या हातीं पडलें व ज्यानें म्हणून तें एकदां तरी वाचलें त्यांस आपल्या स्वार्थ-त्यागाचें अनुकरण करावें अशी स्फूर्ति झाली. मी गेल्या सोमवारीं येथें परत आलों. आपले स्नेही रा. वापूसाहेब गोडबोले यांच्यासमवेत दिवस मोठ्या आनंदांत, शांततेंत व सुखांत गेले. तेणेकरून मनांत एक प्रकारचें समाधान उत्पन्न झालें. कळावें हे विनंती.

आपला

**वासुदेव भावे**

(२)

**श्री. शंकर गणेश लवाटे**

(सुप्रसिद्ध मद्यपान निषेधक; पुणें सार्वजनिक सभेचे माजी चिटणीस. यांच्या कांहीं पत्रांपैकीं दोन पत्रें.)

श्रीशंकर १९-२-१९२५

मित्रवर्य श्री. सदाशिवराव यांस सा. न. वि. वि.

आपण मला समक्ष भेटलां होतां. पण तेवढ्यावर मजच्यानें राहवेना. कारण आपली स्थिति माहीत असतांना व सर्व प्रकारच्या अडचणींत व ओढाताणींत आपण असतांना माझा परामर्श आपण उदारपणें घेतां याचें मला अतिशय अवघड वाटतें. मी आपल्या औदार्याचा व चांगुलपणाचा फाजील लाभ करून घेतों असें अनेक वेळां अंतःकरणपूर्वक मला वाटतें व जीव अत्यंत संकुचित व लज्जित होतो. तथापि आपल्या मदतीस माझी नाहीं म्हणण्याची शक्ति नाहीं. आपण आपल्या सामर्थ्याबाहेर दान करतां पण आपली बुद्धि शुद्ध आहे. परमेश्वर आपलें कल्याण करो. यापेक्षा मी दुबळा दुसरा काय आशीर्वाद देणार?

आपला हितचिंतक
**शंकर गणेश लवाटे**

(३)

**लोकनायक माधव श्रीहरि अणे**

( लो. टिळक आठवणी आख्यायिका या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडाचे प्रस्तावना लेखक. यांच्या बऱ्याच पत्रांपैकीं दोन पत्रें)

श्री

यवतमाळ,
ता. ८-८-१९२३

रा. रा. सदाशिवराव यांस कृ. सा. न. वि. वि.

आपलें ता. ४।८।१९२३ चें पत्र पोहोंचलें. 'केसरीं'त प्रसिद्ध झालेल्या आपल्या आठवणी वाचून अतिशय समाधान वाटलें. लोकमान्यां-संबंधीं लहानमोठ्या सर्व गोष्टींचीं टांचणें प्रसिद्ध होणें इष्ट आहे. कारण

त्याशिवाय त्यांच्या खाजगी व सार्वजनिक चारित्र्यांतील सर्व रहस्य स्पष्ट होणार नाहीं. त्याचप्रमाणें त्यांच्या प्रतिपक्षीयांनीं त्यांच्याशीं केलेल्या वर्तनाचें कुटिल स्वरूप देखील व्यक्त व्हावयास असल्या आठवणींचा फार उपयोग होईल. ... ... ... माझी अशी खात्री आहे कीं, इतक्या परिश्रमानें लोकमान्यांच्या चरित्राचा भावी भव्य प्रासाद बांधण्याकरतां आठवणींच्या रूपानें बहुविध साहित्य जमा करून ठेवीत आहांत. तोच क्रम असाच चालू ठेवल्यास या सर्व सामग्रीचा उपयोग होऊन लोकमान्यांचा चरित्र-प्रासाद निर्माण झालेला पाहण्याचें महत्‌भाग्य देखील आपणांस लाभेल. याच लोकमान्यांच्या दिव्य चरित्राचें उत्तुंग शिखरावरून अवतीर्ण झालेल्या तत्त्वगंगेच्या पावन स्पर्शानें आमच्या पूर्वजांचा उद्धार होणार आणि आमच्या भावी संततीचा उत्कर्ष होणार हा माझा दृढ विश्वास असल्यामुळें या प्रवाहाचे अवतरणार्थ आपण चालविलेल्या प्रयत्नाचें मी मनःपूर्वक व सादर कौतुक करतों. आपण ज्या प्रेमानें व अगत्यानें प्रेरित होऊन आपल्या आठवणींचा संग्रह मजकडे मुद्दाम अवलोकनार्थ व नित्य परिशीलनार्थ पाठविला आणि लोकमान्यांचा एकपरी मानसिक सहवास होण्याची संधि मला आणून दिली, त्याच प्रेमाची व अगत्याची उत्तरोत्तर वृद्धि असावी अशी विनंती आहे.

आपला मित्र,

**माधव श्रीहरि अणे**

(४)

**श्री. शंकर गणेश लवाटे** (पत्र नं. २ पाहा)

श्रीशंकर

संकेश्वर,

फा. व. १४ शके १८४९

१८-७-१९२८

मित्रवर्य श्री. सदाशिवराव यांस साष्टांग नमस्कार.

विनंती विशेष.

वर्षप्रतिपदेच्या दिवशीं मला पुण्यास असणें यंदा शक्य नाहीं. त्यादिवशीं होणाऱ्या सार्वजनिक सभेच्या वार्षिक सभेंत आपली प्रशंसाच

होईल. आपली ईश्वरचरणीं सेवा व निष्ठा व पुण्याई जोरदार आहे. ती आपणास नेहमीं कल्याणकारकच परिस्थिति आणील अशी माझ्या मनाची खात्री वाटते. पुणें सोडल्यामुळें आपल्या सहवासास अंतरलों. . . . . मजवर कृपा लोभ करावा हें निरंतर मागणें आहे. यांत मी औपचारिक ईश्वर स्मरून, लिहीत नाहीं. आपणहि औपचारिक लिहून मला दुखवूं नये ... ... मजला परमेश्वरानें धर्मबुद्धि द्यावी व त्याचे ठिकाणीं आपलेप्रमाणें निष्ठा द्यावी. तेवढी मजकरितां त्या प्रभूपाशीं आपण प्रार्थना करावी ही विनंती.

आपला

**शंकर गणेश लवाटे**

(५)

**श्री. काशीनाथ नारायण धारप**

(ॲडव्होकेट, मुंबई. हे आण्णांना वडील भाऊ मानून त्यांचा सर्वत्र 'तीर्थस्वरूप' असा उल्लेख करीत. यांच्याइतकीं पत्रें, आण्णांच्या वडिलां-शिवाय, दुसऱ्या कोणाकडून आलीं नाहींत. त्यांचीं सुमारें ३५०–४०० पत्रें असावींत. त्यांचीं पत्रें म्हणजे मधाचें मोहोळ आहे. स्थलसंकोचाच्या नाइलाजास्तव त्यांपैकीं फक्त एकच पत्र देतों)

**श्रीराम समर्थ**

मुंबई ता. ३।८।१९२८

तीर्थस्वरूप परमप्रिय आण्णासाहेब यांचे सेवेशी शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना विशेष :—

"लोकमान्यांच्या आठवणींचा, तिसरा खंड" याची अगदीं चातका-प्रमाणें मी वाट पाहात होतों. आपण लिहिलें होतें कीं, ऑगस्टचे दोन-तीन तारखेपर्यंत ग्रंथ पाठवून देतों. पण इतका वेळपर्यंत दम काढणें मला फार जड गेलें. ग्रंथ बाजारांत जाऊन आणावें असें वारंवार मनांत येई. परंतु आपणांस हें कळल्यास आपण अतिशय रागवाल व आपणास दुःख होईल म्हणून मन आवरून धरलें. शेवटीं, काल सायंकाळीं आपणाकडून आलेला ग्रंथ मिळाला. रात्रभर वाचीत बसलों. मध्यान्ह केव्हां उलटली

कळलें नाहीं. असो. प्रस्तावनाकार नवाब दादासाहेब खापर्डे यांची प्रस्तावना व आपलें हृदयंगम आत्मनिवेदन वाचलें. ग्रंथाबद्दल काय वाटतें तें समक्ष सांगेन; परंतु एक गोष्ट मात्र लिहिल्यावाचून राहावत नाहीं ती ही कीं गुरुवर्य तात्यासाहेब केळकर यांचे सुमारें २००० पृष्ठांचें लोकमान्यांचें चरित्र वाचनानें जो आनंद झाला नाहीं तो तुमच्या श्रीमंत नवाबांची २८ पानांची अपूर्व प्रस्तावना वाचून झाला. सदर प्रस्तावना लिहितांना नवाब दादासाहेब खापर्डे यांच्या मनाची जी अवस्था होती तीच केवळ एकच स्थिति टिळक चरित्र-ग्रंथ लिहिणाराची असली पाहिजे. कदाचित् तुम्हांला हें माझें लिहिणें पसंत पडणार नाहीं. कारण तुम्ही आपणांस म्हणवतां मात्र सम-शिष्य; परंतु आचारधर्म मात्र तुम्ही पाळतां बुद्धभिक्षूचा !! जास्त शब्द लिहिला गेला असल्यास आण्णा, क्षमा करा. तुमचेशिवाय मला क्षमा कोण करणार ? तुम्ही म्हणजे " मृदूनि कुसुमादपि "

आण्णा! भाग्य तुमचें; संकल्पाप्रमाणें आठवणींचा हा तिसरा आणि शेवटच्या ग्रंथाचे कार्य देवानें तुमचे हातून पुरे करून घेतलें म्हणून तुमचें मी अभिनंदन करतों. आपल्या निकट स्नेही मंडळींनीं आपले प्रेमानें आपणांस थैली देऊन सत्कार करून थोडेंबहुत अभिनंदन केलें असें समजलें. पण गड्या! माझे जीवाला ती गोष्ट इतकी लागून राहिली कीं, हा तुमचा कनिष्ठ बंधु म्हणवणारा एक हतभागी प्राणी त्या समारंभप्रसंगीं उपस्थित होऊं शकला नाहीं. आठवणींचा हा तृतीय खंड काढण्याचा आपला संकल्प जसा आपण आठवणींच्या दुसऱ्या खंडांत सूचित करून ठेवला होता; त्या-प्रमाणें लोकमान्यांचें चरित्र लिहिण्याचा आपला इरादा आपल्या ह्या खंडां-तील आत्मनिवेदनावरून सूक्ष्मपणें व्यक्त होत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय. श्रीरामरायानें आपल्या हातून ही सेवा करून घेतली म्हणजे मात्र त्या वेळीं होणाऱ्या आपल्या अभिनंदनाच्या व सत्काराच्या सभेंत मला उपस्थित राहण्यास विसरूं नका येवढीच प्रार्थना करतों.

सेवेशी श्रुत होय ही विज्ञापना.

तुमच्या मातुश्री वहिनी व ती० ताईंना माझे नमस्कार,

आपला बंधु

**काशीनाथ नारायण धारप**

(६)

नामदार गणेश श्रीकृष्ण ऊर्फ दादासाहेब खापर्डे, अमरावती

(श्रीमंत दादासाहेब यांना लोकमान्य वडील बंधु मानीत व आण्णा बापट हे दादासाहेब यांना 'वडिलां'प्रमाणें समजत. (पत्र नं. १४ पाहा) लोकमान्यांच्या आठवणींच्या ग्रंथांपैकीं तिसऱ्या खंडाचे दादासाहेब प्रस्तावनालेखक आहेत. यांचीं सुमारें ४०–५० पत्रें आहेत. तीं विशेष भावनेनें लिहिलेलीं दिसतात. त्यांपैकीं फक्त ३ पत्रें देतों.)

Hon G. S. Khaparde

श्री अमरावती, वऱ्हाड

ता. ९ ऑगस्ट १९२८

मित्रवर्य राजमान्य राजश्री,

सदाशिवराव बापट

मु. पुणें, स्वामीचे सेवेसी

पोष्य गणेश श्रीकृष्ण खापर्डे कृतानेक शिरसाष्टांग नमस्कार विनंति विशेष —

आपण चिरंजीव बाबासमागमे लोकमान्यांच्या आठवणींचा तिसरा ग्रंथ पाठविला तो पोहोंचला. आणि पाहून मनास फार समाधान वाटलें. पुस्तक अंतर्बाह्य सर्वांगसुंदर झालें आहे. त्याची बांधणी, आंतील चित्रें आणि मजकूर, छपाई वगैरे सर्वच फार बहारीचें झालें आहे. प्रस्तावनाहि बरेच मंडळींनीं वाचली आणि त्यांना ती फार पसंत पडली. गांधीभक्त नाराज होतील परंतु त्याला उपाय नाहीं. प्रत्यक्ष ईश्वरावतारहि दैत्य व राक्षसास आवडलें नाहीं. त्याला इलाज नाहीं. आतां आपण यापुढें कोणता ग्रंथ लिहिण्याचा विचार केला आहे आणि काम कसें काय चाललें आहे हें लिहावें. आपल्या प्रयत्नास उत्तम प्रकारचें यश आलें याबद्दल मी आपलें मनःपूर्वक अभिनंदन करतों. ईश्वर करो आणि असेंच यश आणि कीर्तीचा लाभ आपणास सदैव होवो. माझें या जन्मांतील कार्य आतां संपलें असें वाटूं लागलें आहे. महिनाभर सिमल्यास जाण्याचा विचार आहे. रामभाऊनें (टिळक) गणेशोत्सवासंबंधानें विनाकारण भांडण उपस्थित केलें याचें मनास

फार वाईट वाटतें. परंतु उपयोग काय ? ईश्वरी संकेतच विचित्र दिसतो. लोकमान्यांच्या पोटीं अशी संतती व्हावी याचें नवल वाटतें. याचा खेद किती म्हणून करावा ? ट्रस्टींनीं कोर्टांत फिर्याद लावली आहे असें समजतें. चिरंजीवाकडून (रामभाऊ) अशी तक्रार होणार आहे कीं, लोकमान्यांच्या मृत्युपत्रांत गणेशोत्सवाचा निर्देश नाहीं म्हणून तो मुलाकडे आला आहे. या कोटिक्रमाचें आश्चर्य करावें तितकें थोडेंच आहे. हें सर्व पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं, लोकमान्यांना सर्व कांहीं करतां आलें त्याप्रमाणें योग्य काळीं त्यांना या जगांतून जातांहि आलें. आपल्या मुलांच्या लीला पाहण्यास ते राहिले नाहींत हेंच उत्तम झालें. असो. आपल्या प्रकृतिसंबंधानें वरचेवर लिहित जावें. कळावें. कृपालोभाची वृद्धि होत असावी. ही विनंति.

मित्र,

**गणेश श्रीकृष्ण खापर्डे**

(७)

**नामदार दत्तात्रय व्यंकटेश बेळवी, बेळगांव.**

[सुप्रसिद्ध वकील, लोकमान्यांचे बडे चाहते. यांच्या कांहीं पत्रांपैकीं फक्त एकच पत्र नमुन्यादाखल देतों.]

Belgaum,
10-3-28.

My dear Mr. Bapat,

I congratulate you with all my heart on the completion and the publication of the third and the last volume of Lokamanya Tilak's reminiscences. Thank God you have been able to see through your labour of love.

Pray accept my grateful thanks for a copy of the third volume which you have kindly presented to me. I shall read and read again with pleasure the reminiscences to the last day of my life.

Thanking you again for your kindness.

I remain,
Yours sincerely
Sd/—D. V. Belvi

(८)

**नामदार श्रीमंत दादासाहेब खापर्डे**

(पत्र नं. ६ पाहा)

Hon G. S. Khaparde

श्री

उमरावती, वऱ्हाड

तारीख १३ ऑगस्ट १९२८

मित्रवर्य राजमान्य राजश्री सदाशिवराव विनायक बापट

मु. पुणें स्वामीचे सेवेसी

पोष्य गणेश श्रीकृष्ण खापर्डे कृतानेक शि. सा. नमस्कार विनंति विशेष. आपणाकडून ता. १० मिनहूनचे कृपापत्र आलें. तें काल प्रात:काळीं प्रविष्ट होऊन इतका आनंद झाला कीं त्याचें वर्णन पत्रांत होऊं शकत नाहीं. मीहि आपणास परवां पत्र पाठविलें आहे. प्रायः आपलें पत्र मला मिळालें त्याच वेळेस तें आपणांस पोहोंचलें असेल. लोकमान्य हयात असतां असे प्रसंग पुष्कळ वेळां झाले कीं, त्यांनीं मला पत्र लिहावें आणि मींहि त्यांना त्याच वेळीं पत्र लिहावें. आणि तीं उभयतांस साधारणपणें एकाच वेळीं मिळावी. आणि दोघांचाहि आशय एकाच प्रकारचा असावा. असाच प्रसंग हा आपले व माझे पत्राचे बाबतींत झाला. आणि त्यामुळें एक प्रकारचा विशेष आनंद वाटतो. माझ्या प्रस्तावनेपासून पुण्यास काय परिणाम होईल याची अटकळ मीं केली होती. आणि ईश्वरी योगायोग असा कीं, त्याच वेळेस चिरंजीव बाबाहि (श्रीमंत बाबासाहेब खापर्डे) पुण्यास गेला आणि त्याचें भाषण झालें. पंतांनीं एका आर्येंत लिहिलें आहे कीं,

प्रावृड्श्रिय मेकांच्या न गमे
सुरभि आनसा गरगा.

तसें झालें हें ठीकच झालें. मला त्याचा किंचितहि खेद वाटत नाहीं. इतकेंच नाहीं तर हर्ष वाटतो. लोकमान्य म्हणत असत कीं, जें लिहिणें किंवा बोलणें (प्रतिपक्षास झणाणलें नाहीं तें लिहिणें किंवा बोलणें) कशाला? आपलें आत्मनिवेदन मी फार बारकाईनें वाचलें. तें **अतिउत्तम साधलें आहे,**

आणि हा तिसरा भाग तर सर्वच प्रकारें उत्तमोत्तम झाला आहे असें माझें मत आहे. आणि मित्र बामणगांवकर वगैरे मंडळींचेंहि मत माझ्याप्रमाणेंच आहे. येथील आपली मित्रमंडळीहि फार प्रसन्न झाली आहेत. आणि सर्वत्र आपण फार मोठें काम केलें असें म्हणून आपलें अभिनंदन करीत आहेत. आपण त्यांत नवीनपणा आणला आणि निराळें वळण लावून दिलें या समाधानानें जितकें कौतुक करावें तितकें थोडें आहे. आतां यापुढें कोणतें कार्य सुरू केलें आहे याविषयीं लिहावें. मात्र आपल्या प्रकृतीसंबंधानें वारंवार वर्तमान कळवीत असावें. आपणांस मिळालेल्या पारितोषिकांत आपली भर घालून तें देश-कार्यासाठीं परत केलें हें तर आपणांस फारच भूषणावह आहे. परिस्थितीचा विचार करतां आपण श्रम केले आणि स्वार्थत्याग केला याबद्दल आपल्या सर्व मित्रांस मोठा अभिमान वाटतो. ईश्वर करो आणि आपणांस असाच उत्साह देऊन तो आपणांकडून मोठीं कामें करवून घेवो. मी चालू महिन्याचे २० तारखेस येथून निघून सिमल्यास जाणार आहे. कळावें ही विनंती.

मित्र,

**गणेश श्रीकृष्ण खापर्डे**

(९)

**श्री. गंगाधर बाळकृष्ण देशपांडे, बेळगांव**

(कर्नाटक-सिंह; लोकमान्य व महात्माजी यांचे एकनिष्ठ अनुयायी. यांच्या कांहीं पत्रांपैकीं फक्त एकच पत्र.)

श्री

कुमटी
पो. हुदली
(बेळगांव) ता. २५-८-१९२८

मित्रवर्य सदाशिवराव बापट यांस कृ. सा. न. वि. वि.

आपलें प्रेमळ पत्र पोंचलें. आपण मला पुण्यास भेटलां होतां त्या वेळीं आपली थोडी संकोचवृत्ति मला दिसली व त्याबद्दल थोडें आश्चर्यहि वाटलें. पण पुढें श्री. बाबुराव गोखले यांनीं मला आपलेबद्दल सर्व हकीकत कळविली आपल्या नवीन पुस्तकांतील ‘ विशिष्ट भाग अनिष्ट आहे ’ असें पुष्कळांना वाटतें ही गोष्ट खरी आहे. तो नसता तर बरें झालें

असतें. निदान हल्लींच्या परिस्थितींत तरी तो नको होता. तथापि तेवढ्या-वरून आपण केलेल्या श्रमाचें चीज करूं नये असें मात्र मला मुळींच वाटत नाहीं. मी पुण्यास असतांना एका संस्थेकडून आपला गौरव व सत्कार करण्यांत आला. त्या प्रसंगाला मीं हजर राहण्याचें ठरविलें होतें. पण चिंचवडहून काम आटोपून येण्यास उशीर झाल्यामुळें आपल्या समारंभास येणें जमलें नाहीं. मीं स्वतः प्रस्तावना वाचली नाहीं; व आक्षेपार्ह काय मजकूर आहे हें मला माहीत नाहीं. तो मजकूर कांहीं असला तरी ज्यांच्या संबंधानें तो आहे त्यांची कामगिरी इतकी अपूर्व आहे कीं, त्यांच्या कीर्तीला अशा मजकुरामुळें कांहीं कलंक लागणार नाहीं असा माझा विश्वास आहे.

आपलें पुस्तक मीं विकत घेतलें. असो. आपल्याकडून तें मिळण्यांत व आपण तें मला देण्यांत आपण एक प्रकारचें प्रेमाचें नातें कायम ठेवीत आहांत असें म्हणणाऱ्यांपैकीं मी एक आहे. तेव्हां आपल्या पुस्तकाच्या भेटीचा मी अनादर कसा करीन? आपल्याला ही शंका तरी कां बरें आली? हल्लींच्या वातावरणांत इतका अविश्वास व संशय भरला आहे हें देशाचें दुर्दैव आहे..... आपण मात्र कृपालोभ कायम ठेवावा एवढीच विनंति आहे.

आपला,

**गंगाधर देशपांडे**

(१०)

**महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार**

(प्राध्यापक; व माजी कुलगुरु, पुणें विद्यापीठ)

पुणें भाद्रपद शु. ८ शके १८५०
ता. २३।८।१९२८

रा. रा. सदाशिवराव बापट यांसी—

सप्रेम कृ. सा. न. वि. वि.

आठवणींचा तिसरा खंड आपण आठवणीनें पाठविला याबद्दल आपला उपकार स्मरण करण्यास मला फार संतोष वाटतो. ग्रंथ हातीं पडल्याक्षणा-पासून सर्व वाचून होईपावेतों हातावेगळा करवला नाहीं. इतका मला रुचकर व आकर्षक वाटला. आपली ही आठवणी जमा करण्याची कल्पना खरोखरीच

मोठी फलदायी ठरली आहे. आतां आपल्यास शरीरकष्ट यद्यपि बहुत पडलें आणि मनस्संतापहि सोसावा लागला. तथापि टिळकांचें काम हें असल्यामुळें व आपणास टिळककार्याची निःस्सीम प्रीति व भक्ति असल्यामुळें या कष्टाचें संतापाचें कांहींच दुःख न वाटतां एकंदरीत जें फळ पदरीं पडलें त्यानें हर्ष-लहरीच उचंबळल्या असतील.

टिळकांसारख्यांच्या आठवणी आणि त्या आपण हजारों व्यक्तींकडून मिळविलेल्या ! साहजिकच तसें टिळकांचें चरित्र सागराकार तशाच त्यांच्या आठवणीहि रत्नाकाररूपच असणार ! मला या आठवणींत एकंदर चार प्रकारचा रस मुख्यतः आढळला. एक **विद्या,** दुसरा **विनोद,** तिसरा **वैचित्र्य** आणि चौथा **वीर्य**. हा रससंगम मोठा प्रासादिक झाला आहे.

आतां कांहीं अवांतर बाबींविषयीं येथें लिहितों. प्रथम श्री. दादा-साहेबांच्या प्रस्तावनेबद्दल. तिचा पहिला भाग अतिशयच रसाळ उतरला आहे. दादासाहेबांची रसवंती नुसती बहरली आहे. परंतु पुढें उत्तर-भागांत महात्मा गांधींवर टीका करतांना क्रोधाचा व अनुदाराचा आवेग शिगेला गेलेला पाहून चित्ताला चरका बसतो. त्यामुळें दादासाहेबांची कलाकुसरी अर्धनारीनटेश्वरासारखी परस्पर विरोधी भावोत्पादक झाली आहे. गांधींच्या तत्त्वज्ञानासंबंधीं किंवा त्यांच्या कित्येक योजनांबद्दल मीहि दादासाहेबांप्रमाणेंच एक टीका करणारा आहे व होतोंहि. त्यांचे म्हणणें पुष्कळ स्थळीं मी मान्यहि करीन परंतु एक गोष्ट केव्हांहि मला मान्य करतां येणार नाहीं. आणि ती म्हणजे गांधी यांच्या लोकोत्तर महानुभावीत्वाविषयीं कुत्सित शंका. इतिहास असेंच म्हणेल की, गांधी ही एक लोकोत्तर विभूति होऊन गेली आणि भरतवर्षाची फार मोठी सेवा तिनें केली. मात्र टिळकपंथ व गांधीमत यांत कांहीं मूलभूत फरक तत्त्वाचे आहेत. आणि त्यासंबंधीं माझे दृष्टीनें महाराष्ट्र परंपरा ही मला अधिक जवळची व सत्य वाटते. या महाराष्ट्र-परंपरेचाच जोर वाढवून गांधी-परंपरेंतील दोष नाहीसा केला पाहिजे. परंतु तेवढ्यासाठीं मी टिळक-शिष्याचा दुबळेपणा झाकून गांधींना त्याचा दोष लावण्याला तयार होणार नाहीं. याबद्दल एवढेंच पुरे. उघडच आहे, दादासाहेबांच्या विधानाबद्दल तुम्ही जबाबदार नाहीं आणि दादासाहेबांची प्रस्तावनाकार म्हणून निवड

जी तुम्हीं केली तीहि योग्यच होती यांतहि संशय नाही. दादासाहेबांनीं प्रांजळपणें विरोध दर्शविला यालाहि आक्षेप घेतां येत नाहीं. परंतु गांधींचे लोकोत्तर गुण असून ते नाकारावयाची त्यांची दृष्टि मला संमत नाहीं.

हे आठवणीचे तिन्ही खंड परीक्षेस नेमून विद्यार्थ्यांना बक्षिसें द्या. तुम्हांस दिलेले सत्काराबद्दलचे रुपये ५०० तुम्ही या कामीं व्याजी लावून त्यांतून खर्च करा. नवीन पिढींत यामुळें टिळक-आठवणी उत्साहानें व बारकाईनें वाचल्या जातील, तुमच्या पुस्तकाची छपाई मनोहर झाली आहे.

आपला,
**दत्तो वामन पोतदार**

(११)

**लोकनायक माधव श्रीहरि अणे**

( पत्र नं. ३ पाहा )

लेजिस्लेटिव्ह अॅसेम्बली श्री १३ कार्ट रोड,
सिमला,
ता. ९-९-२८

श्री० सदाशिवराव बापट यांस

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपलें ता. ६ चें व तत्पूर्वींचें एक अशीं दोन्ही पत्रें पोंचलीं. मला आपण पाठविलेला 'लो. टिळकांच्या आठवणी व आख्यायिका खंड ३ रा' ह्या ग्रंथाची प्रतहि पोंचली. ग्रंथ हातीं आला त्याच दिवशीं श्रीमंत दादासाहेबांची प्रस्तावना मीं वाचून पाहिली. त्यानंतर आपलें ता. १०।८।२८ चें पत्र आलें. त्यापूर्वींच आत्मनिवेदन मीं वाचलें होतें. आपला ग्रंथ जरा फुरसतीनें वाचून काढण्याकरतां म्हणून मी आपलेजवळ बाळगला होता. तो वाचून त्यावर एखादा अभिप्रायपर लेख लिहावा असा विचार

केला. परंतु मी मध्यंतरीं कांहीं कामाकरितां यवतमाळहून बाहेर निघून गेलों. त्या अवधींत तो ग्रंथ कोणीतरी स्नेह्यानें वाचण्याकरितां नेला. येथें येण्यापूर्वीं बराच तपास केला पण तपास लागला नाहीं. येथें कदाचित् मित्रवर्य तात्यासाहेब केळकर यांजकडे ग्रंथ पाहावयास मिळेल अशी उमेद होती. परंतु तात्यासाहेब न आल्यामुळें मजकडून अजून ग्रंथ वाचनाचें काम पुरें झालें नाहीं याबद्दल खेद वाटतो. आपणासारख्या टिळकभक्तांनीं अविश्रांत परिश्रम, अतोनात यातायात सहन करून माहिती मिळवावी व मित्रप्रेमादाखल ती अवलोकनार्थ व अभिप्रायार्थ मोफत पाठविली असतां तिचें वाचन करण्याचें साधें कामदेखील मजकडून होऊं नये इतकेंच नव्हे तर ग्रंथरक्षणदेखील करण्यांत येऊं नये ही गोष्ट लाजिरवाणी आहे व ती आपणांस लिहून कळविणें हें त्याहीपेक्षां अधिक खेदास्पद आहे. तथापि जें सत्य आहे तेंच लिहिणें प्रशस्त होय. अशा स्थितींत माझा अभिप्राय आपलेकडे पाठविण्याचा विचार मला निरुपायानें लांबणीवर टाकावा लागत आहे. येथून परत यवतमाळला पोंचल्यावर आपल्या पुस्तकाची एक प्रत मिळवून समग्र वाचतों व आपले ग्रंथावरील प्रस्तावना-लेखासुद्धां माझा अभिप्राय आपणाकडे अवश्य रवाना करतों येवढें आश्वासन मी आज आपणांस देऊन ठेवतों. केवळ प्रस्तावनेवरच अभिप्राय देणें इष्ट नाहीं; कारण प्रस्तावनेविरुद्ध जीं विधानें करण्यांत आलीं आहेत तीं माझ्या अवलोकनांत आलीं नाहींत. तथापि श्री. दादासाहेबांच्या प्रस्तावनेंतील विचारसरणी ज्यांना मान्य नाहीं त्यांनीं तो लेख जाळून टाकण्याचा उपद्व्याप करणें म्हणजे त्यांनीं मतस्वातंत्र्याच्या व लेखन-स्वातंत्र्याच्या तत्त्वाचीं धुळाक्षरें देखील अजून वळविलीं नाहींत असें म्हणणें प्राप्त आहे. असल्या मतासहिष्णु लोकांच्या हातून हिंदुस्थानचें भावी स्वराज्याचें स्थापनेचें महत्कार्य कसें पार पडणार हें एक मोठें कोडेंच आहे. महात्मा गांधींना जर एखाद्या वर्गास चर्मकाराहून कनिष्ठ म्हणून जाहीर विधान करण्याचा 'प्रामाणिक मताचे' जोरावर अधिकार आहे तर श्रीमंत दादासाहेबांनासुद्धां महात्मा गांधींच्या राजकारणाची योग्य कारणपरंपरा दाखवून मीमांसा करण्याचा अधिकार पोहोंचतो हें साधें तत्त्वदेखील या मंडळींना कळत

नसेल तर त्यांना अजून सार्वजनिक कार्याचाराचे बाबतींत पुष्कळच गोष्टी शिकावयाच्या आहेत असें म्हणणें क्रमप्राप्त आहे. श्री. दादासाहेबांनीं आपलीं विधानें साधार व चिकित्सक दृष्टचा प्रतिपादलीं आहेत. त्यांच्या प्रत्येक विधानाशीं सहमत न होतां देखील मी असें म्हणूं शकतों कीं त्यांनीं केलेली मीमांसा ही त्यांच्या गंभीर, विचारी व निर्भय वृत्तीची निदर्शक आहे. त्यांचा हा लेख सोज्ज्वळ मराठीचा उत्कृष्ट नमुना आहे. कठोर सत्य निर्भयपणें प्रतिपादन करूं इच्छिणाऱ्या होतकरू लेखकास आदर्शवत् आहे. माझा सविस्तर अभिप्राय लवकरच लिहून पाठविण्याचें आश्वासन देतों. अलम् प्रतिविस्तरेण.

आपला

**माधव श्रीहरि अणे**

(१२)

**श्री० वासुदेव कृष्ण भावे**

( पत्र नं. १ पाहा )

श्री पुणें, ता. २०–२–३१

दे. भ. सदाशिवराव, मित्राचे सेवेशी सा. न. वि. वि. आपणाकडून हें संकट मजवर येणार याची भीति मला वाटतच होती. आपण पाठविलेली रक्कम जशीच्या तशी परत करीत आहे. ही रक्कम स्वीकारणें यासारखें दुसरें पातक नाहीं. तुम्ही माझे स्नेही व परमस्नेही व जें काम आपण अंगीकारलें तें आमचें म्हणजे केसरी ऑफिसचेंच होय. ही गोष्ट लक्षांत घेतल्यास आपण पाठविलेली रक्कम स्वीकारणें म्हणजे स्वतःस विकून घेणें होय. तुम्हीं आजपर्यंत व्यक्तिशः मजवर केलेले उपकार मी आठवीत गेलों तर त्यांची फेड मी कोणत्याहि मोबदल्यानें न फिटणारी आहे असें मी समजतों. रक्कम परत केली आहे. स्वीकार व्हावा, राग नसावा. निरंतर लोभ असावा.

आपला,

**वासुदेव भावे**

(१३)

**श्री. शंकर रामचंद्र तथा मामाराव दाते**

( मुद्रणतज्ज्ञ, हिंदुमहासभेचे पुढारी. यांच्या कांहीं पत्रांपैकीं फक्त पत्र १. )

Shankar R. Date
C/o American Express Co.
6 Hay Market, London, s. w. 1.
ता. १०-१-३२

श्री. सदाशिवरावजी बापट यांसी, —

सप्रेम कृ. सा. नमस्कार विनंती विशेष. मला इकडे आल्यास ४ महिने झाले. पैकीं पहिले दोन महिने फुकट गेले. गेल्या दोन महिन्यांत मराठी लिपि मोनो टाइपावर बसविण्याचे प्रयोग केले ते यशस्वी झाले आहेत. सोबत छापलेलें पत्रक पाठविलें आहे, त्यांतील मजकूर येथें मोनोटाइपावर कंपोझ करून छापला आहे. हा टाईप कसा काय झाला आहे त्यासंबंधानें आपण आपलें सूक्ष्म निरीक्षणपूर्वक मत मला कळवाल व सूचना कराल तर मी आपला फार आभारी होईन. आपण या विषयांत अनभिज्ञ असल्याचें जरी आपण आपणास म्हणवीत असलां तरी याविषयीं आपली जिज्ञासा व अगत्यबुद्धि मला माहीत असल्यामुळें हें पत्र मुद्दाम आपणास लिहीत आहे. आतां येवढें सिद्ध झालें कीं, मराठी लिपि मोनोटाइपावर उत्तम रीतीनें कंपोझ करतां येईल. एकंदरींत यूरोपची सफर फुकट गेली नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. सध्यां युरोपांत व्यापाराची मंदाई व पैशाची टंचाई यांमुळें सगळीकडे हवालदीलपणा पसरला असून अत्यंत अस्वस्थता वाढली आहे. शत्रू उभा नाहीं म्हणून लढाई होत नाहीं इतकेंच. तिकडे हिंदुस्थानांत तर सरकारनें वणवाच पेटवला असून येथील लोक तो भडकवीत आहेत; व हिंदुस्थान होरपळून काढण्याचा त्यांचा हेतु आहे. एकंदरीनें दिवस मोठे कठीण आले आहेत खरें, परंतु त्यांतूनहि परमेश्वर वाट दाखवील. असो.

माझी प्रकृति उत्तम आहे. शाकाहारीच राहतों. तरीपण ७।८ पौंड इकडे आल्यापासून वजन वाढलें आहे. आपली खुशाली कळवावी. क. लो. असावा हे विनंति.

आपला
**शंकर रामचंद्र तथा मामा दाते**

(१४)

**नामदार श्री. दादासाहेब खापर्डे** अमरावती

(पत्र नं. ६ पाहा) श्री ता. ३० ऑक्टोबर १९३२

मित्रवर्य राजमान्य राजश्री सदाशिव विनायक बापट

मु. पुणें. स्वामीचे सेवेसी

पोष्य गणेश श्रीकृष्ण खापर्डे कृ. सा. न. वि. वि. आपणाकडून तारीख २३ मिनहूनचे कृपापत्र आलें तें यथाकाल येऊन प्रविष्ट झालें आणि अतिशय आनंदास कारण झालें. माझ्या पत्राची तुलना आपण आपल्या पूजनीय वडिलांचे आशीर्वादपत्रांशीं केली आहे हा मोठा गौरव मला योग्य नाहीं. तो आपण केला ही आपल्या मनाची मोठी उदारता आहे. असो. विशेष लिहावयाचें म्हणजे मला तर असा दिवस जात नाहीं कीं त्यांत एकदां किंवा अधिक वेळां लोकमान्यांचें आणि त्यांच्या हयातींतील परिस्थितीचें स्मरण होत नाहीं. असें होणें अगदीं साहजिकच आहे. ईश्वर अशा रीतीनें दुःख दाखवून स्वतःचें स्मरण करवितो. इतकेंच नाहीं तर आमचें पूर्वार्जित पापांचें क्षालन करवितो. म्हणून प्रस्तुत प्रसंग प्रेमानें--जो होईल तो--निमूटपणें सोसला पाहिजे. आज वर्षप्रतिपदेचा दिवस आहे. तो शुभदिन आहे. तेव्हां आपणांस उत्तर लिहिणें जरूर वाटल्यावरून हें लिहीत आहे. हें नवीन वर्ष आपणांस उत्तम फलप्रद होवो आणि आपल्या हातून देशाची सेवा उत्तम होवो अशी प्रार्थना करतों. कळावें हे विनंति.

मित्र,

**गणेश श्रीकृष्ण खापर्डे**

(१५)

**श्री. शंकर श्रीकृष्ण देव, वकील धुळें**

( श्रीसमर्थ रामदास स्वामी यांचे चरित्रकार, यांच्या अनेक संस्मरणीय पत्रांपैकीं फक्त १)

श्रीसमर्थ वाग्देवतामंदिर,
धुळें, ता. ७ मे १९३६

श्री. सदाशिवराव बापट, यांचे सेवेशी. कृ. सा. न. वि. वि. श्रीसमर्थ वाग्देवतामंदिराचा वार्षिक समारंभ दरवर्षी ज्येष्ठ शु. १३ ला

होत जावा असें विश्वस्त मंडळानें ठरविलें आहे, हें आपणांस माहीत आहेच. त्याप्रमाणें येत्या वर्षाच्या उत्सवाचा दिवस ता. ३ जून १९३६ आहे. यंदाच्या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारावें म्हणून आपले गुरु साहित्याचार्य श्री. तात्यासाहेब केळकर यांना विनंती केली आहे. ते येतीलच पण आमचेकरितां आपणहि त्यांना आग्रहपूर्वक विनंती करावी. तशीच आपणांस माझी नम्र पण आग्रहाची विनंती कीं आपण यंदाच्या समारंभासाठीं एखादा निबंध लिहावा व समक्ष येऊन तो वाचावा. किंवा त्यास अनुसरून भाषण करावें. कदाचित् आपल्या प्रकृतीमुळें आपणांस येणें अशक्यच झालें तर निदान नुसता निबंध तरी पाठवावा. निबंध मजकडे ता. २७ मे पर्यंत यावा म्हणजे आमंत्रणपत्रिकेंत त्याचा उल्लेख करण्यास ठीक पडेल. आपल्या निबंधाच्या विषयाचें नांव कळवावें. पत्रोत्तर यावें, लोभ आहेच ही विनंति.

आपला

**शंकर श्रीकृष्ण देव**

कार्यकारी विश्वस्त

(१६)

**डॉ. दत्तात्रेय विनायक पटवर्धनबुवा**

**(राष्ट्रीय कीर्तनकार. यांच्या अनेक पत्रांपैकीं एक पत्र)**

**।। श्रीगजानन प्रसन्न ।।**

जमखंडी

आश्विन शु. १/६९

दि. १५।९।४७

श्री. सदुभाऊ यांस सादर सप्रेम सा. न. वि. वि.

आपलें कृपापत्र मिळालें. आतां पुन्हां लोकमान्यांचीं आख्यानें आपणाला ऐकविण्याचा सुयोग कधीं येतो श्रीहरि जाणें! लोकमान्यांच्या आशीर्वादें सुभाष-चरित्र गेले ८ महिने सांगत आहे. लोकांना आवडतें.

सदुभाऊ, हीं चरित्रें तुम्हांलां न ऐकवावींत तर कोणाला बरें ? ईश्वर योग लवकर आणील. हल्लीच्या स्वराज्यांत अर्थ नाहीं असें वाटतें. राष्ट्र निर्वीर्य करून टाकिलें. आतां स्वराज्य दिल्याचें पुण्य फक्त बाह्य दृष्टीनें मिळविलें पण तें व्यर्थच. आपले जवळ सुभाषबाबूंच्या आठवणी आहेत. अर्थात् त्या अप्रतिमच असणार. आपण त्यांत पंडित आहांत. या आठवणी-साठीं तरी निदान आपली भेट शक्य तितक्या लवकर घेणार आहे. कळावें. लोभ वाढता राहो. ही विनंति.

आपला,
**दत्तात्रेय विनायक पटवर्धन**
संतचरणरज

(१७)

**नामदार बाळ गंगाधर खेर**

(मुंबई राज्याचे माजी पहिले मुख्यमंत्री यांच्या दोन पत्रांपैकीं एक पत्र)

॥ श्री ॥

मुंबई,
दि. १४ फेब्रुवारी १९४८

श्री. सदाशिवराव बापट यांसी कृ. सा. न. वि. वि.

आपलें १७ तारखेचें पत्र पोंचलें. आपल्या कळकळीबद्दल व प्रेमा-बद्दल ऋणी आहे. पुण्यांतील माझ्या भाषणांत मला जें मनांत वाटलें तेंच मी बोललों. त्यानें लोकांत विश्वास व शांति वाढविण्यास मदत झाली असें आपण म्हणतां ही आनंदाची गोष्ट आहे. पुण्याचे माझ्या मुक्कामाचे गर्दींत आपली भेट झाली नाहीं. आपल्या भेटीनें आनंद होतो. कळावें.

आपला,
**बा. गं. खेर**

(१८)

## दिवाणबहादूर केशव विनायक ऊर्फ बापूसाहेब गोडबोले

('महाराष्ट्र-शाकुंतल'चे संपादक. यांच्या सुमारें २५ पत्रांपैकीं फक्त एक)

महाराष्ट्र सामाजिक परिषद—१९५३

॥ श्री ॥

पुणें,

ता. १५।४।१९५३

श्री. सदाशिवरावजी बापट यांस अतिशय आदरपूर्वक कृ. सा. न. वि. वि.

आपण १ रु. वर्गणी पाठवून प्रेक्षक म्हणून परिषदेस येणेचें ठरविलें याबद्दल मी आपला ऋणी आहे. आपलीं व माझीं मतें भिन्न असलीं तरी मनें भिन्न नाहींत ही माझी खात्री आहे. व आपल्या पत्रानें ती अधिकच झाली. आपण इतकें प्रेमळ पत्र लिहिलें आहे की तें वाचून मी अगदीं गहिंवरून गेलों. सदाशिवराव, तुम्ही देशहित साधण्यासाठीं किती कष्ट केले आहेत हें मला माहीत आहे. त्याकरतां आयुष्यभर आपण केलेला त्यागहि मी जाणतों. आपला स्वभाव संकोचित व मागें राहून काम करण्याचा, यामुळें जगाला आपली किंमत कळली नाहीं. नाहीं तर आज आपण अत्यंत थोर पुढारी म्हणून प्रसिद्धीस आलां असतां पण आपला जन्म यासाठीं नाहीं.

आपण मी करीत असलेल्या कामाबद्दल माझी स्तुति केली आहे. आपण कधींहि दिखाऊ शब्द बोलणार नाहीं. 'परगुण परमाणून्' या स्वभावाचे आपण आहां. खरी स्थिति अशी आहे कीं, मीं अगदी सामान्य मनुष्य आहे. कष्ट अगर मतभेद यांनीं मला त्रास होत नाहीं. ईश्वर ज्याला जी दिशा दाखवील त्या रस्त्यानें त्यानें जावें, आपण दोघेहि अशा प्रकारें वागणारे आहों.... ... .. ... परिषदेनंतर एकदां मुद्दाम भेटेन. क. लो. अ. ही वि.

आपला,

**के. वि. गोडबोले**

(१९)

श्री. **दा. वि.** तथा **बाबूराव गोखले**

(माजी संपादक : केसरी, मराठा. कांहीं पत्रांपैकीं फक्त एक)

॥ श्री ॥

दिनांक २२।७।१९५७

सा. न. विशेष :—

मी शुक्रवारी लो. टिळक यांच्या चरित्राची फिलम पाहिली. ती फार चांगली झाली आहे. फिलम म्हणजे चिरंतन टिकणारें दृश्य चित्र, तें पाहून माझ्या भावना, खरेच सांगतों, उचंबळून आल्या. बापट, तुमचें केवढें भाग्य आहे कीं, या चित्रपटांत आपण प्रामुख्यानें आहांत व लोकमान्यांचें चरित्र-चिरंतन होईल. तसेंच त्यांचे एक विश्वासू सहकारी व उत्तम लेखक म्हणून आपलेंहि चित्र चिरंतनहि होईल यांत शंका नाहीं. या भाग्या-बद्दल आपले मी मनःपूर्वक व सादर अभिनंदन करितों.

आपला

**दा. वि. गोखले**

(२०)

श्री. **कृष्णाजी हरि ढमढेरे**, बी. ए.

(बडे व्यापारी : अध्यक्ष, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, मुंबई. आण्णांना हे बंधुप्रमाणें मानतात. यांचीं सुमारें १५।२० पत्रें आहेत. त्यांपैकीं खालील एक पत्र व क्रमांक २५ चे पत्र अशीं देत आहे.)

॥ श्रीगजानन ॥

१५२ अ व्हिन्सेंट रोड, मुंबई

दि. ६।७।१९५८

श्री. सदाशिवराव बापट यांसी सादर नमस्कार विशेष.

आपले कृपापत्र पावलें, आपल्या सुस्वभावास अनुसरून आपण माझ्या-बद्दल सुहृद्भावाचे उद्‌गार काढले हें अनपेक्षित नाहीं. पण त्यामुळें व विशेषतः आपल्या सौजन्यामुळें मी आपल्याकडे स्नेहपूर्णपणें आकर्षिला जातो हें अगदीं खरें आहे. अन्य मित्रांच्या ठायीं आपले स्वतःचे गुण पाहून त्यांची प्रतिच्छाया ठसठशीतपणें समजून येण्याचें व तें प्रदर्शित करण्याचें

आपलें कौशल्य खरोखरच वाखाणण्यासारखें आहे. सर्वांसच आयुष्यांत योग्य संधि मिळते. पण जो आणखी प्रकर्षानें कांहीं यश मिळवितो तो खरा कर्तृत्ववान्. त्याचें खरें कौतुक व गौरव व्हावा हें अगदी योग्य आहे. तसें आपण आहांत हें अगदी निर्विवाद आहे. ही स्तुति नव्हे वस्तुस्थिति आहे. कळावें लोभ अ. ही वि.

आपला,
कृ. ह. ढनढेरे

(२१)

**श्री. दत्तात्रेय गोपाळ फडके**
(पुणें सार्वजनिक सभेचे उपाध्यक्ष)

श्री

पुणें ता. ७।१२।५८

श्री. आण्णा यांस सा. न. वि. वि.

आपली चिठ्ठी वाचली. अशी गोष्ट मनाला लावून घेण्याचें कांहीं कारण नाहीं. मी कार्यवाह असतांना ठराव लिहीत होतों. व बहुतेक कै. तात्यासाहेब केळकरांनाहि पसंत पडत होतें. मी कार्याध्यक्ष व तुम्हीं कार्यवाह असें यापुढें समजूं नये. तुम्ही माझेपेक्षां मोठे आहांत. काम सार्वजनिक असतें; त्यांत लहान थोर असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. तुम्हीं वयाचे मानानें कामहि पुष्कळ करतां. तुमच्या अशा लिहिण्यानें मला संकोच वाटतो...... निरंतर लोभ असावा.

आपला,
द. गो. फडके

(२२)

**श्री. श्रीपादशास्त्री किंजवडेकर**
(मीमांसातीर्थ पंडित)

श्री

शीलाविहार कॉलनी, एरंडवणें,
पुणें ४ : दि. २४।१२।१९५९

श्रद्धेय व माननीय बापट यांसी सादर व सांजलीबद्ध प्रणाम. आपण पाठविलेलें लोकमान्यांच्या आठवणींचे ग्रंथ पोंचले. आपला अत्यंत ऋणी

आहे. आपणासारख्या तपोनिष्ठ साक्षेपी विद्वानाकडून कौतुक होण्याचें भाग्य मला लाभलें याचा अभिमान वाटल्यास तो मनुष्यसुलभ समजून तिकडे दुर्लक्ष करावें.

'सुदाम्याचे पोहे' आपण दिलेत खरे. पण त्यामुळें माझेवर मला न पेलणारी जबाबदारी मोठ्या कौशल्यानें आपण टाकलीत! 'सोन्याची द्वारका' निर्माण करण्याएवढें सामर्थ्य मी कोठून आणूं ? आपण अगत्यपूर्वक माझे प्रवचनास रोज येतां म्हणूनच मला उत्साह येतो हें मी अनेक वेळां नमूद केलेंच आहे. आपल्यासारख्या देशकार्यार्थ तुच्छ स्वार्थ मानलेल्या गुरुजनांचा आशीर्वाद नेहमीं पाठीशीं असावा. यापेक्षां जास्त काय लिहूं ?

आपला नम्र,

**श्रीपादशास्त्री किंजवडेकर**

(२३)

पुणें, दि. २८।१।१९६०

**केसरी आणि मराठा कार्यालय**

**श्री. जयंत श्रीधर टिळक**

(लोकमान्य टिळकांचे नातू, संपादक 'केसरी'-कांहीं पत्रांपैकीं फक्त एक)

श्री. आण्णा बापट यांस कृतानेक सा. न. वि. वि.

लोकमान्यांबद्दलची आपली भक्ति वर्णनातीत आहे. आपण त्यांचेसंबंधीं जो कागदपत्रांचा साठा केलांत तो अमूल्य होय. आपण तो 'केसरी' संस्थेच्या संग्रहांत ठेवण्यासाठीं पाठवित आहांत याबद्दलहि आपले मानावे तितके आभार थोडेच होणार आहेत. लोकमान्यांच्या स्मृतिरूप अशा जेवढ्या वस्तु कागदपत्रें मिळतील त्यांचा संग्रह करण्याची इच्छा आहे व आम्हीं त्याची अल्पशी सुरुवात केली आहे. त्यांत आपल्या देणगीनें अमोल भर पडत आहे. आपल्या मताचा मोठेपणा व लोकमान्यांबद्दलची आपली भक्ति त्यांत दृग्गोचर होतेच परंतु त्यांतहि लोकमान्यांची स्मृति चिरंतन करण्याचा आपला ध्यास विशेष नजरेंत भरतो. एकंदर १८ बहुमोल वस्तु आपण पाठविल्यात त्याची यादी स्वतंत्रपणें आपणाकडे पाठविलीच आहे. त्याबद्दल पुन्हां एकवार आपले मन:पूर्वक या पत्रानें आभार मानतो. कळावें.

आपला,

**ज. श्री. टिळक**

(२४)

**श्री. स. के. नेऊरगांवकर**
(श्री ज्ञानदेवभक्त; पुणें महानगरपालिकेचे माजी इंजिनीयर, पत्र १)

॥ श्री ज्ञानदेव ॥

कसबा, पुणें २
ता. २२।५।६२

श्री. सदुभाऊ बापट यांस क्र. सा. न. त्रि. वि.

आपण पाठविलेलें दुर्मिळ व उत्कृष्ट पुस्तक मिळालें. त्याबद्दल व आपल्या सौजन्याबद्दल मी आपलें कसें आभार मानूं? या विषयावर मीं अधिक वाचन करण्याचें ठरविलें होतें. अशा वेळीं श्री ज्ञानेश्वर महाराजांनीं आपल्यासारख्या सज्जन व वडील माणसांच्या द्वारां पुस्तकच पाठवून दिलें. आपला हा आशीर्वाद व आठवण मी कधींहि विसरणार नाहीं. आपलें मजवर जें निर्व्याज प्रेम आहे त्याचें श्रेय श्रीज्ञानदेवांनीं करावें व आपणास उदंड आयुष्य द्यावें ही त्यांचे चरणीं प्रार्थना. क. लो. अ. ही वि.

आपला नम्र,
**स. के. नेऊरगांवकर**

(२५)

**श्री. कृष्णाजी हरि ढमढेरे, मुंबई**
(पत्र नंबर २० पाहा)

॥ श्री गजानन ॥

मुंबई, दि. १०।८।६२

श्री. माननीय सदाशिवराव बापट यांसी सादर नमस्कार विशेष. आपलें दि. ८।८।६२ चें कृपापत्र पावलें. आपणांस पाठविलेल्या माझ्या ६।८चे पत्रांत मजकडून कांहीं अतिक्रम झाला असावा व म्हणून मोठ्या भावानें लहान भावास लिहिण्याप्रमाणें माझें पत्र आपणास उपदेशात्मक वाटलें असें दिसतें. पण खरेच सांगतों, माझा तसा मुळींच अधिकार नाहीं व तें पत्र लिहिण्यास माझा तसा उद्देशहि नाहीं. उलट माझी भूमिका धाकट्या भावाचीच आहे व तीच खरी शोभेल. तरी माझेकडून लिहिण्यांत कांहीं

प्रमाद झाला असल्यास त्याबद्दल आपण उदार मनानें क्षमा करावी. खरेंच सांगतों उपदेश वगैरे कांहींहि न योजितां केवळ एक व्यक्ति दुसऱ्या जाणत्या व्यक्तीस कांहीं विचार सुचवील तेवढ्या मर्यादेंतच लिहिण्याची माझी कल्पना होती. पत्रें लिहिण्याच्या भरांत कदाचित् कांहीं उणा अधिक शब्द लिहिला गेल्यामुळें आपणास तें अगदीं निराळें लिखाण भासलें असें वाटतें. तरी गैरसमज होऊं नये व खरेंखुरें बंधुप्रेम आहे तसेंच पुढें चालू ठेवावें अशी नम्र विनंती आहे.

आपला,

**कृ. ह. ढमढेरे**

(पत्र २६)

**कॅप्टन शिवराम विष्णु दामले**

(पुणें महाराष्ट्र मंडळाचे चालक. सरकारी मिलिटरी खात्यांत कॅप्टन असतां मलाया–सिंगापूर येथून त्यांनीं आण्णांना पाठविलेलीं १९४५-४६ मधील बरींच पत्रें आहेत. हीं सर्व पत्रें देशस्थितीविषयीं असून खूप मजकुरांनीं गच्च भरलेलीं आहेत. त्या सर्व पत्रांना आण्णांनींहि उत्तरें पाठविल्याचें नमूद आहे. श्री. दामले यांचे पत्रांत आण्णांच्याविषयींहि कळकळीचा मजकूर आहे. पण तीं सर्व पत्रें सोडून देऊन फक्त एकाच पत्रांतील थोडा मजकूर देतों.)

श्री सिंगापूर

Cap. S. V. Damle
1407 Coy. G. P. C.
S. E. A. C
१२।३।१९४६

दे. भ. आण्णासाहेब बापट यांसी सप्रेम नमस्कार.

माझें पत्रास आपलें आलेलें उत्तर वाचून आनंद झाला. माझी बदली देहूरोड येथें झाली आहे. आतां मी लवकर तिकडे येईन. म्यु. निवडणूक कोर्टाचे हुकुमानें बंद झाली हें समजलें. एकंदरींत पाहातां निवडणूक ही वेळ अशी कीं, या वेळीं खाजगी हेवेदावे मत्सर वगैरे सर्व गोष्टींना ऊत असतो.

पुण्याची हकीकत तुम्ही लिहिली ती समजली, फार वाईट वाटलें. पक्ष नको, राजकारण नको. असें क्षणभर वाटतें. स्वतःला जें आवडेल, मानवेल, तेवढें काम यथाशक्ति करून मानसिक आनंद व समाधान जें मिळेल तें घ्यावें व गप्प बसावें असें वाटतें. खरोखर आतां आपला ठेका पूर्ण बदलल्याशिवाय कांहींच मेळ बसणार नाहीं. आपले पुढारी ज्या वेळीं स्वतःचा मोठेपणा हा देशापेक्षां कमी आहे असें समजूं लागतील तेव्हां कांहीं प्रगति होईल. नाहीं तर प्रामाणिकपणें वाटतें कीं, हल्लीं आपली शक्ति व्यर्थ वाया जात आहे. दे. भ. रामभाऊ राजवाडे यांची हकीकत समजून वाईट वाटतें. परमेश्वर करो व मला मरण एकदम येवो. आजारीपण, परावलंबन, खिचपत पडणें हें नकोरे देवा! तुमच्या प्रकृतीबद्दल मात्र खरोखर काळजी वाटते..... असो. वीर नरिमन, सप्रूसाहेब यांचेशीं माझी खूप चर्चा झाली. एकंदरींत मला असें वाटतें कीं, यापुढील निवडणुकीत ब्राह्मणांनीं भाग घेऊं नये. आज ना उद्यां तसा प्रसंग येणारच आहे. मग आपणहून दूरदृष्टीनें तसें केलेलें शहाणपणाचें नाहीं काय! स्वराज्य कॉंग्रेस मिळवीत आहे, मिळवूं द्या. आपल्याला आपोआप तें मिळतेंच! आपल्या मंडळींनीं पेशवे व्हावे, पण राजा मराठा हवा त्यामुळेंच पेशवे सत्ताधीश राहिले. लो. टिळकांनीं संकेश्वरास जें भाषण केलें होतें. तें मननीय आहे.... माझ्या मतें तर आपण ब्राह्मणांनीं दोन तीन पिढ्या राजकारण बंद करावें. पारशी समाजाप्रमाणें व्यापार करून समाज, जात, सधन करावी. तोंपर्यंत स्वराज्य कोणीं मिळविलें तर आपण त्यांत आहोंतच. मी येईन त्या वेळीं आपण समक्ष बोलूं. श्री अणे येऊन गेले. येथें त्यांची स्नान-संध्या, पोथी सर्व चालू होते. बापूजी कोल्ड्रिंक प्याले, हातानें दाढी करतात. आनंदांत असतात. त्यांना मी मोठी मेजवानी दिली, पानसुपारी केली, त्यांस एकदशी होती, त्या वेळीं फराळाचा मोठा थाट केला, त्यांच्या पंगतीस तुम्ही शोभलां असतां. तुमचें परान्न आड येऊं न देतां फक्त शुद्ध 'फलाहार' तुम्हास दिला असता. असो. निरंतर लोभ ठेवा. मी आनंदांत चैनींत आहे. कळावें.

आपला मित्र

**शि. वि. दामले**

(२७)

श्री.

**श्री. वा. कृ. भावे**
(पत्र नं. १ पाहा)

पुणें, दिनांक १८।५।६३

मित्रवर्य सदाशिवराव बापट यांसी सा. न. वि. वि.

आपण 'सार्वजनिक सभे'तर्फे पूर्वी महाराष्ट्रांत अनेक वर्षे केलेल्या प्रचाराची, हल्लीं 'सभे' तर्फे तुमचे चालू असलेलें प्रचारकार्य हें, सुधारून वाढविलेली आवृत्ति असें मला वाटतें. 'सभे'तर्फे कित्येक दिवस झालेलें तुमचें पूर्वीचें मोठ्या कष्टाचें प्रचारकार्य खेडोपाडीं झालें; पण प्रस्तुतचें हें तुमचें प्रचारकार्य पुण्यासारख्या शहरांतील प्रमुख शाळांतील प्रबुद्ध विद्यार्थि-वर्गांत करण्यांत येत आहे, म्हणजे तुम्ही समाजाच्या काळजाशींच हात घातला आहे हें या तुमच्या प्रचाराचे वैशिष्टच होय. तुम्हांस या कामीं पूर्ण यश येवो व तुमची लहानपणापासूनची इच्छा व हौस पूर्ण होवो येवढेंच मी चिंतितों.

आपला
**वा. कृ. भावे**

(२८)

**श्री. य. न. केळकर**
(सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक व ग्रंथकार)

'पुष्करणी'
पुणें
ता. १८।५।६४

श्री.

श्री. सदाशिवराव बापट यांसी, सा. न. वि. वि.

पुणें सार्वजनिक सभेचा १९६३–६४ चा अहवाल वाचला. पुण्यांतील जुन्यांत जुनी मुख्य संस्था आपली. तिचा संसार इतकीं वर्षे असा, सुसूत्र व व्यवस्थित चालत आहे याचें सर्वश्रेय तुमच्यासारख्या ध्येयनिष्ठ, कर्तव्यनिष्ठ व कर्तबगार चिटणिसाची तेथें आज ४०–४५ वर्षांवर उपस्थिति आहे

म्हणूनच, हें कोणीहि कबूल करील. जुन्या संस्थेवर नवीं कलमें करण्याचा जो एक अभिनव प्रकार तुम्हीं गेल्या ४–५ वर्षांपासून अमलांत आणिला आहे तो खरोखरच फार कल्पक असून त्या योगें सार्वजनिक काका व महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांची स्मृति शालेय जगांतील पिढीपासून तेवत राहील. दरसाल एक सार्वजनिक सभा घेण्यापेक्षां, तुम्हीं योजिल्याप्रमाणें शाळाशाळांतून 'स्मृति दिनी' सभा घेऊन जें कार्य होईल तें फारच मोलाचें व चिरंतन ठरेल याविषयीं शंका नको. त्या दिवशीं एका सभेच्या एका निरांजनाऐवजीं अनेक निरांजनें शाळांतून तेवतील व भावी तरुण पिढीला आपल्या या पुण्यांतील दोन महनीय व्यक्तींचे चरित्रेतिहास कळून स्फूर्ति येईल यांत शंका नाहीं.

आपला

**य. न. केळकर**

(२९)

**श्री. ना. भि. परुळेकर** (संपादक, सकाळ)

श्री.

'सकाळ कचेरी'
पुणें ता. २०।५।६४

श्री. सदाशिवराव बापट यांसी सा. न.

पुणें सार्वजनिक सभेचा १९६३-६४ चा अहवाल वाचला; त्यांतील मुख्य मजकूर म्हणजे तुमचें 'प्रचार कार्य' हें सदर वाचलें. लोकांच्या स्मरणांतून विसरत चाललेल्या दोन थोर व्यक्ति कै. सार्वजनिक काका व महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांचा परिचय तरुण पिढीला विशेषतः विद्यार्थिवर्गाला करून देण्याच्या कामीं आपण मोठी कामगिरी करीत आहांत यांत शंका नाहीं. त्याचें वर्णन करावें तेवढें थोडेंच आहे. पुणें सार्वजनिक सभेचा मी सभासद होतों याची आठवण आपण मला करून दिली, याबद्दल आभारी आहे. निरंतर लोभ करावा.

आपला

**ना. भि. परुळेकर**

(३०)

**डॉ. कमलाबाई देशपांडे** श्री.

(माजी प्रिन्सिपॉल, महिला कॉलेज)

सुविख्यात लेखिका

'पुष्कर,' प्रभातरोड पुणें

ता. २४।५।६४

तीर्थस्वरूप आण्णासाहेब बापट यांसी

सादर नमस्कार. विशेष.

सार्वजनिक सभेचा वृत्तांत वाचला. त्याबरोबरची म. आण्णासाहेब पटवर्धन यांचेबद्दलची पुस्तिका वाचली. तुमचा प्रचारकार्याचा वृत्तांत लक्षपूर्वक वाचला. आनंद झाला. नुसती सभा केली तर लोक व विद्यार्थी अशा सभांना येत नाहींत. कारण हे विषय जुने, इतिहासजमा व म्हणून निरर्थक वाटतात. पण याच थोर व्यक्तींनीं आजच्या उत्कर्षाच्या काळाचा पाया कसा घातला हें विद्यार्थ्यांना कळावें व शाळांत जाऊन सभा करविल्यानें हें तुमचें कार्य साधलें. बावीस शाळांतील मुलांचे कानावर या गोष्टी पडल्या. निदान २२०० मुला-मुलींनीं हें ऐकिलें. ही तुमची केवढी सेवा!! तात्पर्य, हें तुमचें सत्कार्य म. पटवर्धन व सार्वजनिक काका यांच्या तुमच्या भक्तीस शोभेसें आहे.

**कमलाबाई देशपांडे**

(ऊर्फ आक्का)

---

(३१)

**श्री. शंकर रामचंद्र तथा मामाराव दाते**

(पत्र नं. १३ पाहा)

श्री.

१४०४ सदाशिव पेठ, पुणें २

दि. २०।५।६४

श्री. सदाशिवरावजी यांसी सादर नमस्कार वि. वि.

सार्वजनिक सभेचा शके १८८५ चा वृत्तांत वाचला. त्यांत नमूद केलेलें प्रचारकार्य वाचलें. कै. सार्वजनिक काका व महर्षि आण्णासाहेब

पटवर्धन यांची माहिती आजच्या पिढीला नाहीं, ती करून देण्याचा आपला उपक्रम खरोखर स्तुत्य व अभिनंदनीय आहे. १८५० ते १९५० या शंभर वर्षांच्या कालावधींत आपल्या महाराष्ट्रांत होऊन गेलेल्या कर्त्या पुरुषांची, कीं ज्यांनीं जनमानसावर आपल्या कर्तृत्वानें छाप उठविला अशांचीं अल्प चरित्रें व त्यांचें विशिष्ट कार्य समाविष्ट असलेलें जर एखादें पुस्तक आपण तयार केलें तर विद्यमान व भावी पिढ्यांना तें मार्गदर्शक ठरेल. सार्वजनिक काका व म. पटवर्धन यांचा आपल्या 'सभे'शीं समवाय संबंध होता म्हणून 'सभे' नें त्यांचें हें वाङमयश्राद्ध केलें. हें पितृऋण फेडण्याच्या कर्तव्यांपैकींच एक कर्तव्य होय. आपण केलेल्या या उपक्रमाबद्दल आपणास धन्यवाद.

आपला स्नेही,
**शंकर रामचंद्र दाते**

(३२)

श्री.

सेनापति पां. म. बापट
(आण्णासाहेब यास आलेल्या
पत्रांपैकीं पत्र नं. ३)

गोखलेवाडी, दादर, मुंबई २८
दि. २८।८।१९६४

मित्र. बापट यांस, सादर नमस्कार.

पुण्याच्या 'तरुण भारत' पत्राच्या अंकांत "बाँबची पोथी लो. टिळकांना मिळाली" या तुम्हीं लिहिलेल्या लेखाचीं कात्रणें तुम्हीं मजकडे पाठविलीं तीं मिळालीं. लोकमान्यांविषयीं व तुमच्याविषयीं महत्त्वाची माहिती मिळाली. तुम्हीं लोकमान्यांचें फार महत्वाचें काम केलेंत. धन्य तुमची !

**पां. म. बापट**

(पत्र ३३)

**स्वातंत्र्यवीर बॅ. विनायकराव सावरकर**

(यांचीं ३ पत्रें आहेत. पण त्यावर कालनिदर्शक असा कांहीं उल्लेख नसल्यामुळें तीं तिन्ही पत्रें शेवटीं दिलीं आहेत.)

रत्नागिरी

न. वि. वि.

आपण धाडलेला लोकमान्यांच्या आठवणींचा तिसरा खंड पोंचला. मोठें कार्य पार पाडलेंत. प्रस्तावना पण प्रस्तावना आहे ! लोकमान्यांचे चरित्रलेखनाचा अधिकार जसा तात्याराव केळकरांचा, तसाच त्यांच्या आठवणी सांगण्याचा आणि त्यांचा समारोप करण्याचा अधिकार दादारावांचा ! पण हें ध्यानांत आहे ना, कीं आपल्या पुस्तकास असा प्रस्तावना-लेखक लाभून कोणीं देवविला ? तुम्हीं नाहीं, मी ! कारण प्रस्तावना लिहिण्याची, खापर्डे असतांना, मी अनधिकृत लुडबुड केली नाहीं आणि आपणांस कळवितों कीं, 'रत्नं समागच्छतु कांचनेन !' म्हणून आज आपल्या ग्रंथरत्नास हें उत्कृष्ट कोंदण मिळालें ! तेव्हां आतां माझेवर रागावण्याचे ठिकाणीं आपण माझें कांहींहि न लिहिल्याविषयीं आभारच मानले पाहिजेत, वरं कां !

अभिप्राय श्रद्धानंदांत आपलें पत्र येतांच आलेला आहे. पाहावा. हे विनंती.

आपला

**वि. दा. सावरकर**

(३४)

**स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर**

रत्नागिरी

सा. न. वि. वि.

आपलीं लोकमान्यांच्या चरित्र प्रस्तावनेविषयींचीं दोन्ही पत्रें मला मिळालीं. पुस्तकाचीं उपमुद्रितेंहि (proofs) मिळालीं. उत्तरास विलंब

लागला. कारण मी प्रथम पत्र आलें तेव्हां दौऱ्यावर होतों. आणि नंतर आठ दिवस आजारीपणाची दौऱ्याची उत्तरक्रिया करण्यांत गेले.

आपण प्रस्तावना लिहिण्याची विनंति केलीत. वास्तविक लोकमान्यांच्या स्मृत्यर्थ आपल्या विनंतिपूर्वींच मीं कांहीं तरी लेखन सेवा करावयास हवी होती. परंतु मागें मी आठवणी सध्यां न देण्याचीं जीं कारणें लिहिलीं त्यासाठींच मला प्रस्तावना लिहितां येणें शक्य नाहीं. एक वेळ एखादी आठवण सांगणें शक्य होईल–मोडतोड करून––पण प्रस्तावना लिहिणें मुळींच शक्य नाहीं. युक्त नाहीं.

कारण टिळक राजकीय महत्पुरुष. त्या खंडांत राजकीय आठवणी आहेतच. असणें अवश्यच. तेव्हां राजकारणाचा उल्लेख सोडून टिळकांच्या स्मृतींची प्रस्तावना लिहिणें म्हणजे रामाविणें रामायण लिहिण्यासारखें दुष्कर आणि अनुचित होय असें मला वाटतें. तरी सध्यां क्षमा करावी. पुढें अटी निघाल्यानंतर मी ह्या नकाराची कसर सव्याज भरून काढीन.

सर्व परिचित मंडळींस नमस्कार, लोभ असावा.

आपला
**वि. दा. सावरकर**

(३५)

**स्वातंत्र्यवीर बॅ. वि. दा. सावरकर** सावरकर सदन
मुंबई २८

श्री. स. वि. बापट यांसी

महाशय, कै. श्रीमान् तात्याराव केळकर यांच्या आठवणी छापण्याचें काम आपण अंगावर घेतलें आहांत हें आपलें कार्ड आलें त्यावरून कळतें. ह्या कामीं आपण निष्णातच आहांत. परंतु माझी प्रकृति सारखी खालावत आहे. कांहीं केलें तरी सार्वजनिक स्वरूपाचे दैनंदिन व्यापहि सोडूं म्हटलें तरी सुटत नाहींत. अशा स्थितींत गुरुवर्य केळकरांसारख्यांच्या आठवणी त्यांच्या योग्यतेस साजेशा आणि स्वतःच्या मनाचें समाधान होईल अशा

लिहिण्याइतकी शक्ति किंवा शांतता मला लाभणें शक्य नाहीं. यासाठीं या कामीं आपणांस मला कांहीं सहाय्य देतां येणार नाहीं याचें वाईट वाटतें. म्हणून आपण आग्रह करण्यासाठीं स्वतः येण्याचे श्रम घेऊं नयेत. शक्य असतें तर कार्डावरीच आपली सेवा केली असती. पुढेंमागें जर क्वचित् आत्मवृत्त लिहिण्याचा योग आला तर त्या वेळीं कांहीं आठवणी लिहिल्या जातीलच. आपण सध्यां माझ्यासारख्या कोणाहि व्यक्तीच्या आठवणी-साठीं अडून न बसतां ज्या शतावधि थोर थोर मंडळींच्या आठवणी मिळण्यासारख्या आहेत तेवढ्याच छापून टाकाव्यात अशी विनंति. माझा निरुपाय म्हणून हें उत्तर शेवटचेंच समजावें. विषाद मानूं नये.

आपला

**वि. दा. सावरकर**

# पत्रव्यवहार

## भाग २

## ती० श्री. आण्णासाहेब यांच्याविषयींच्या माझ्या

## 'परिचय-पुस्तिके' बाबत

## मला आलेलीं महत्त्वपूर्ण पत्रें

ती० श्री. आण्णासाहेब बापट यांच्याविषयींची मीं संपादित केलेली 'परिचय-पुस्तिका' लोकमान्यांच्या गेल्या पुण्यतिथीस म्हणजे दि. १ ऑगस्ट १९६४ रोजीं मी अनेक सुहृदांकडे पाठविली होती. त्याबाबत अनेकांकडून मला प्रोत्साहनपर पत्रें आलीं. तसेंच मुख्यत: त्या सर्व पत्रांत आण्णासाहेबांविषयीं असलेला मजकूर चिंतनीय व वाचनीय असल्यामुळें त्या पत्रांपैकीं निवडकांतील निवडक अशीं केवळ नमुन्यादाखल कांहीं पत्रें मुद्दाम पुढें दिलीं आहेत. त्यांवरून आण्णासाहेब यांचें मनोमय दर्शन होऊं शकेल !

—किशोर बापट
संपादक

स्थळप्रत.
नोंद दि.

# पत्रव्यवहार भाग २

## निवडक पत्रें

(पत्र क्रमांक १)

श्री. कृ. ल. वेलणकर

(शीघ्रकवि : आण्णांचे लेखनिक ; समक्ष येऊन आण्णांना खालील पत्र दिलें व सुंदर हातरुमालाचा आहेर केला.)

तुमचा खुद्द चरित्र ग्रंथ मजला वाचावया लाभला ।
तुम्ही केळकर लोकमान्य प्रभृती कार्यामधें भागला ॥
माझा हातरुमाल घाम पुसण्या हा घ्या करी सत्वर ।
आण्णासाहेब बापटास विनवी लेखनिक वेलणकर ॥ १ ॥

॥ श्री ॥

६१६, सदाशिव पेठ, पुणें २
दि. १।८।१९६४

श्रीसमर्थभक्त लो. टिळक-निष्ठ 'सत्-पुरुष' आण्णासाहेब बापट यांसी
कृ. सा. न. वि. वि.

आण्णासाहेब! श्री. तात्यासाहेब यांचें लो. टिळक चरित्राचें लेखन चालू असतां त्यांचा लेखनिक म्हणून मी आपल्यामार्फत जात असे. तसेच आपण संपादिलेले लो. टिळक आठवणी ग्रंथ, सार्वजनिक सभेचे व टिळक स्मारक मंदिराचे प्रासंगिक अहवाल लिहिण्यास आपणाकडेहि लेखनिक म्हणून मी येत असें. या बाबतींत मी तज्ज्ञ नसतांहि आपण मला संभाळून घेऊन भरघोस असा मोबदलाहि दिला असल्यानें माझें स्मरण आपणास अजून कसें राहिलें याचें आश्चर्य वाटतें. मी अलीकडील माझ्या अंधत्वामुळें भेटू शकत नाहीं. पण आपण मात्र समयोचितपणें माझा परामर्श घेत असतां याचें ताजें उदाहरण म्हणजे आपल्या चरित्राची प्रत आपण स्मरण-पूर्वक श्री. किशोरराव यांचे हस्तें मला दिलीत हें होय; तेव्हां धन्यवाद!

आपली माहिती आठवणी ग्रंथापासूनची पुढची होती. पण तत्पूर्वींची हृदयस्पर्श हकीकत आज चरित्रावरून समजली. पण मी अनेक वर्षें आपल्या सहवासांत असूनहि आपल्या पूर्वाश्रमीचा उल्लेख एकदांहि मजजवळ आपण केला नाहींत हें कसें काय? आपल्या प्रसिद्धिपराङमुखतेची ही कमाल मर्यादा इतरत्र पाहण्यास मिळणें अशक्यच होय. धन्य आपली!

आण्णासाहेब, मला वाटतें पुरें; कारण आपण माझें आपलेपणानें स्मरण ठेवलेंत, याबद्दल मी इतका भारावून गेलों आहे कीं :—

तदपि तव गुणानां ईश पारं न याति ॥

आपले पुतणे श्री. किशोरराव यांस
स. नमस्कार, सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

आपला
कृ. ल. वेलणकर

(पत्र क्रमांक २)

## दिवाणबहादुर केशव विनायक गोडबोले

(संपादक : महाराष्ट्र शाकुंतल)

॥ श्री ॥

८९५, शिवाजीनगर, पुणें ४
दि. ३।८।६४

श्री. किशोर शंकर बापट यांस,

कृ. सा. न. वि. वि.

आपले चुलते, श्री. आण्णासाहेब यांच्याबद्दलची पुस्तिका, ४४ व्या टिळक पुण्यतिथीचा पवित्र योग साधून, आपण प्रसिद्ध केली ती मिळाली. आपल्या घराण्यालाच नव्हे तर भारत देशाला ललामभूत झालेल्या एका पूज्य व्यक्तीबाबतचें आपलें कर्तव्य पार पाडलेंत याबद्दल शतशः धन्यवाद! पुस्तिका हातांत पडतांच 'समूल साद्यंत' वाचन करून आपल्या ऋणांतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला. पण हें ऋण मी कधीं फेडूं शकेन असें मला वाटत नाहीं. उलट सतत तें ऋण मस्तकावर धारण करणेंच मला भूषणावह वाटेल.

लोकमान्य टिळकांचे श्री. आण्णासाहेब नुसते लेखकच नव्हते, तर कल्याणशिष्य होते, हें मीं पाहिलेलें आहे. श्रीव्यास महर्षींनीं महाभारताचे लेखक म्हणून श्रीगणपतीची योजना केली होती असें महाभारतांत सांगितलेलें आहे. त्या श्रीव्यास-गणपति जोडीसारखीच श्री. टिळक-बापटांची युति झाली असें मला वाटतें. विशेषत: लोकमान्यांची मजकूर सांगण्याची शीघ्र गति व शुद्धलेखनाविषयींचा त्यांचा कटाक्ष या दोन्ही कसोटयांना आपले आण्णा पुरे पडले ही सामान्य गोष्ट नव्हे. तुमचे काका यांचें कर्तृत्व लक्षांत घेतां तुमच्या या छोटया पुस्तिकेनें माझें अगर त्यांस जाणणाऱ्या कोणाचेंहि पूर्ण समाधान होणार नाहीं. वास्तविक त्यांनींच आपल्या स्वत:च्या महत्त्वाच्या व मनोरम आठवणी लिहून काढाव्यात. आत्मचरित्र हें नांव त्यांच्या संकोची व अत्यंत विनयी स्वभावास रुचणार नाही हें खरें; तथापि त्यास आग्रह करून पाहावा. कारण सुदैवानें जो अनेकविध माणसांचा व प्रसंगांचा इतिहास त्यांच्या हृदयांत वसत आहे तो जनतेच्याहि हिताच्या दृष्टीनें प्रसिद्ध होणें हेंहि त्यांचें एक पवित्र राष्ट्र-कार्यच आहे.

आपला,
**के. वि. गोडबोले**

## (पत्र क्रमांक ३)

**डॉ. कमलाबाई देशपांडे**
(माजी प्रिन्सिपॉल, महिला विद्यालय, पुणें)

'पुष्कर,' प्रभातरोड,
पुणें ४.

श्री. किशोर शंकर बापट यांसी,

ती० आण्णासाहेबांचा जीवन-वृत्तांत सविस्तर लिहिला जावा असें फार वाटतें. तें जरी अजून अपुरें राहिलें आहे तरी हा संक्षिप्त वृत्तांत देऊन आपण माझ्यासारख्या अनेक जिज्ञासूंची आस पुरविलीत व एक प्रकारें स्वत:चें कर्तव्यहि पार पाडलेंत याबद्दल धन्यवाद !

आपले काका, हे एक चालते बोलते ज्ञानकोश व ऐतिहासिक आठवणींचा कोश आहेत. पन्नास वर्षे पुण्यांतील अनेक लहान-थोरांशीं संबंध आलेला आहे. ते जुन्या आठवणी किती रसाळपणें सांगतात ते तुम्ही जाणतांच. तेव्हां त्यांचेकडून गोष्टी ऐकाव्या, आठवून सायंकाळीं त्या लिहून काढाव्या, असें केलेंत तर अनेक दुर्मिळ गोष्टींचें तुम्ही संकलन कराल. तरी एवढें करावें अशी विनंती करीत आहे. कळावें,

**कमलाबाई देशपांडे**

(पत्र क्रमांक ४)

**श्री. य. न. केळकर**

(सुप्रसिद्ध इतिहास संशोधक, ग्रंथकार)

॥ श्री ॥

पुणें ४

चि. किशोर यांस आशीर्वाद वि.

बापटांचें छोटें चरित्र छापून तूं मोठीच कामगिरी केलीस. छपाई व फोटो तर फारच सुरेख आहे. विशेषतः फोटो पाहून जुन्या बापटांची आठवण झाली ! तथापि एवढ्यानें कोणाचीच भूक भागणार नाहीं ! तूं स्वतः रोज बापटांपाशीं बसून त्यांना जुन्या हकीकती विचारून त्या लिहून घे व एकत्र करून छाप, किंवा बापटांना इतर सर्व सोडून आपलें आत्म-चरित्र लिहावयास सांग. त्यांचें आत्मचरित्र प्रसिद्ध होण्यानें महाराष्ट्राच्या चरित्रांतील अनेक अज्ञात घटनांवर नवीन प्रकाश पडून भावी संशोधकांचे श्रम वाचणार आहेत. आण्णा बापट रोज आपल्या आठवणी सांगण्यास तयार असतील तर मी रोज दोन तास लिहून घेण्यास तयार आहे. तुला ही कल्पना कशी काय वाटते ?

**आण्णा केळकर**

(पत्र क्रमांक ५)

श्री. विठ्ठलराव नारायण केळकर

(श्री. न. चिं. केळकर यांचे पुतणे, यांचें श्री. आण्णांच्या नांवावर आलेलें पत्र.)

श्री. आण्णासाहेब बापट यांस कृ. सा. न. वि. वि.

तुमचे पुतणे श्री. किशोर यांनीं एक मोलाची कामगिरी केली आहे. तुमच्यासारख्या कर्तृत्ववान चारित्र्यसंपन्न सज्जन साधुवृत्तीच्या माणसाला तुमच्या अत्यंत विनयशील स्वभावामुळें प्रसिद्धीच्या कुठल्याहि प्रकारांत पकडणें कठीणच आहे हें मला कित्येक वर्षांपासून माहीत आहे. त्यामुळें श्री. किशोर यांनीं या छोटयाशा व अगदीं त्रोटक पुस्तकांत कां होईना पण एकदां पकडलें हें छान झालें ! अर्थात् याचें खरें मूळ श्रेय कै. श्री. वासुदेवराव भावे यांना आहेच.

तुमच्या चरित्राचे अगदीं उत्कृष्ट सार या पुस्तकांत शेवटच्या पानावर "ते सत्पुरुष आहेत हें निश्चित" या शीर्षकाखालीं मजकुरानें फार थोडक्यांत व सुंदर शब्दांत आलेलें आहे. पण यापेक्षांहि तुमचे कर्तृत्वाचे वेगळे पैलूहि आहेत. लो. टिळकांच्या आठवणीच्या ग्रंथाला व ती. तात्यांच्या आठवणीच्या ग्रंथाला तुम्हीं जीं सुंदर व विद्वत्ताप्रचुर आत्मनिवेदनें लिहिलीं आहेत तीं वाचलीं म्हणजे बापट हे नुसते टिळकांचे व तात्यांचे लेखनिक नव्हत तर जातिवंत लेखक व प्रतिभेची कृपा असलेले साहित्यिकहि आहेत असें म्हणणें वावगें होणार नाहीं. सध्यांच्या 'प्रसिद्धि पुंगवा'च्या काळांत जो तो स्वतःच्या बढाईचे नगारे इतक्या विविध प्रकारें व जोरानें वाजवतो कीं त्यापुढें तुमच्या खऱ्या व जिव्हाळयाच्या कर्तृत्वाची मंजूळ सनई ऐकूं येणें कदाचित् शक्य नसेल ! पण हा दोष सनईचा नाहीं तर तो कानाचा आहे असें म्हणावें लागेल.

तुमचे पुतणे श्री. किशोर यांना मनःपूर्वक धन्यवाद अवश्य कळवावे. कळावे.

आपला,

के. ना. केळकर

(विठ्ठल केळकर)

(पत्र क्रमांक ६)

**श्री. दिनकर विनायक काळे**

(एम्. ए., इतिहास-संशोधक, पुणें)

भा. इ. सं. मंडळ,
सदाशिव पेठ, पुणें २. ५।८।६४

श्री. किशोरराव वापट यांस नमस्कार.

आपली पुस्तिका मिळाली. समोरून प्रसन्न, अंतर्मुख, झपाटयानें येणारी व्यक्ति पाहिली म्हणजे त्यांच्या निर्मळ दर्शनावरून ती. आण्णासाहेब बापटांची मूर्ति आहे असें ओळखावें. नमस्कार करावा, चौकशीचा एखादा-दुसरा प्रश्न विचारावा; परंतु त्यांतील वैयक्तिक पृच्छेला उत्तर न देतांना त्यांनींच उलट आपली माहिती विचारावी. आणि आपली शाबासकी शब्दांत आणि हात पाठीवर ठेवून द्यावी. असे कांहीं त्यांचे प्रसंग मला आठवतात. स्वत:बद्दल अत्यंत संकोची अशा या गृहस्थाबद्दल एरवी गैरसमज होणें शक्य आहे. परंतु त्यांचे स्नेही कै. भावे यांच्यामार्फत त्यांचा उत्कृष्ट परिचय झाल्यानें व अन्य प्रकारानेंहि त्यांचेबद्दल सदैव आदराचीच भावना जागृत राहाते.

(पत्र क्रमांक ७)

**श्री. वि. प्र. लिमये**

(माजी प्राचार्य, टिळक महाविद्यालय, पुणें)

लक्ष्मी रोड,
पुणें २. ५।८।६४

नमस्कार वि. वि.

माझे मित्र श्री. सदाशिवराव यांचे छोटेखानी चरित्र 'समूळ साद्यंत' वाचून काढल्यामुळें मूल्याच्या ऋणांतूनहि मुक्त झालों. तुमचें हें अगदींच त्रोटक चरित्र झाल्यामुळें निराशा झाली. अधिक मोठें व विस्तृत असें त्याचें चरित्र व्हावें अशी त्यांची योग्यता आहे. ही अपेक्षा सफल होईल काय ?

(पत्र क्रमांक ८)

**श्री. दामोदर मोरेश्वर भट**

( हिंदुमहासभेचे थोर व निष्ठावंत प्रचारक )

श्रीरामसमर्थ पुणें

दि. ७।८।६४

श्री. किशोरराव बापट यांस नमस्कार.

श्री. आण्णांचें लहानसेंच चरित्र समग्र वाचलें. मोठा आनंद झाला. मनाचे श्लोकांपैकीं क्र० ८७ हा श्लोक थोडयाशा शाब्दिक पालटानें आण्णा बापटांना त्यांचेंच वर्णन म्हणून लागू होणारा आहे. त्यांनीं लिहिलेलें लो. टिळकांचें चरित्र प्रवासांत हरवलें आहे. तें परत सांपडावें अशी मला वेडी आशा आहे. सद्भाग्यवशात् तें चरित्र सांपडलें आणि तें प्रसिद्ध झालें तर आजवर प्रसिद्ध झालेल्या कोणत्याहि भाषेंतल्या कोणत्याहि टिळक-चरित्राहून तें सरसच ठरेल. कारण तें उपास्य, उपासक व उपासना या त्रिपुटीस जी अपूर्णता आहे ती पूर्ण करणारें ठरेल. थोर आण्णांच्या आम्हां सुहृज्जनांना ही पुस्तिका उपलब्ध करून देऊन आम्हांस तुम्हीं अत्यंत ऋणी करून ठेवलें आहे. आण्णा बापटांचे ज्ञात, अज्ञात सर्व सद्गुरु, त्यांची टिळक-भक्ति, त्यांची केळकरांवरील निष्ठा आणि महर्षि आण्णासाहेब पटवर्धन यांचेसंबंधीची त्यांची आध्यात्मिक धारणा यांचें संकलित चित्र या चरित्रांत आपण उजळून दाखविलें तें अधिक उठून दिसतें. याहून विस्तृत स्वरूपांत त्यांचें चरित्र तुम्हीं स्वतः किंवा इतर कोणीं लिहिलें तरी तें आम्हांस हवें आहे.

(पत्र क्रमांक ९)

**श्री. नाथराव खरे**

( श्रीखुन्यामुरलीधर देवस्थानचे मालक )

पुणें २. दि. ८।८।६४

नमस्कार विशेष.

लोकमान्यांच्या निष्ठेमध्यें उभें आयुष्य स्वदेशाकरतां दिलेले थोर देशभक्त आण्णासाहेब बापट यांचें छोटेसेंच कां होईना पण उत्तम

चरित्र मीं समग्र वाचलें. माझ्या लहानपणापासून त्यांचें कार्य डोळ्यासमोर आहेच. त्याची उजळणी ही पुस्तिका वाचून झाली. कांहीं अज्ञात पैलूहि ज्ञात झाले. लोकमान्यांनीं भारलेल्या वातावरणांत अत्यंत तळमळीनें निःस्पृह कार्य करणारांची थोर परंपरा आण्णासाहेब यांनीं चालवली. त्यांचा आदर्श पुढील पिढीला योग्य मार्गदर्शन करणारा होईल असा माझा विश्वास आहे.

(पत्र क्रमांक १०)

**कॅप्टन शिवराम विष्णु दामले**

( चालक, महाराष्ट्रीय मंडळ, पुणें )

पुणें २. दि. ९।८।६४

स. न. वि. वि. श्रीसमर्थभक्त, लोकमान्य टिळक यांचे आवडते लेखनिक ‘केसरी’ चे अभिमानी, नसानसांतून राष्ट्रीयवृत्ती बाणलेले, विनयमूर्ति, निगर्वी, सदाचरणी आण्णासाहेब बापट यांचें त्रोटक चरित्र तुम्हीं प्रसिद्ध केल्याबद्दल धन्यवाद. अशा सच्च्या देशभक्ताचें विस्तृत चरित्र प्रसिद्ध व्हावयास पाहिजे. त्यामुळें पुष्कळ जुना इतिहास समजून येईल. आण्णासाहेब यांचें शरीर रेखीव व बांधेसूद आहे यावरून त्यांनीं भरपूर मेहनत केली आहे हें सिद्ध होतें. वृत्तीनें सात्त्विक व सज्जन, वागणुकीमध्यें प्रेमळ व पवित्र, हाडाचा देशभक्त असा हा माझा मित्र आहे हें माझें भाग्य होय. त्यांचेबद्दल नितांत आदर व अभिमान वाटतो.

(पत्र क्रमांक ११)

**प्रा. डॉ. न. का. घारपुरे**

( जर्मन भाषेचे प्राध्यापक, पुणें )

सदाशिव पेठ, पुणें २
दि. १०।८।६४

सादर नमस्कार. ही पुस्तिका प्रसिद्ध करून तुम्हीं फार मोठें कार्य केलें आहे असें मला व्यक्तिशः वाटतें. सार्वजनिक सभा म्हणजे सदाशिवराव बापट व सदाशिवराव बापट म्हणजे सार्वजनिक सभा असें मी नेहमीं म्हणतों. सेवा, स्वार्थत्याग व संघटना या त्रयीवर त्यांची नितांत निष्ठा

आहे. ते आपल्याकडे पुष्कळ वेळां विनयामुळें कमीपणा घेतात. हें त्यांच्या स्वभावास धरून असलें तरी तें मला आवडत नाहीं. सदाशिवराव म्हणजे पूर्वजन्मीचे कोणी शापित ऋषि असावेत असें मला नेहमीं वाटतें. मला त्यांचेविषयीं अत्यंत आदर आहे; व त्यांचेविषयीं पुष्कळ माहिती जनतेला झाली पाहिजे; असें मी नेहमीं म्हणत असतों.

(पत्र क्रमांक १२)

**श्री. रघुनाथ दुर्गाराम जोशी**

[ विद्याव्यासंगी, पुराणिक, मंडलेश्वर, मध्य भारत ]

ॐ

मंडलेश्वर
दि. १२।८।६४

चि० किशोरराव यांस "आत्मावैपुत्र नामासि" ह्या वैदिक वचनाप्रमाणें आशीर्वाद. आपल्या त्रोटक चरित्रांतील १६ विषय हे सोळा आणे म्हणजे परिपूर्ण रुपायाप्रमाणें आहेत. प्रसिद्धिविन्मुख आण्णांचा माझा विशेष लोभ आहे. त्यास ३५ वर्षें झालीं. लो. टिळकांचें महाभारत, साहित्य-सम्राट् केळकर यांनीं रचलें तर ते व्यास ठरतील. पण त्यानंतरची वैशंपायन–सुताची भूमिका आण्णा बापटांनीं पार पाडली असें म्हणावें लागतें. मी एकच लहानशी आठवण लोकमान्यांच्या आठवणींच्या तिसऱ्या ग्रंथाकरितां पाठविली होती. तिचा स्वीकार करून त्यांनीं उलट मला आठवणींचे तीन खंड व सूक्तिसंग्रह असा अहेर केला. हे उपकार न फिटणारे आहेत.

(पत्र क्रमांक १३)

**सौ. कुमुदिनी मोघे, एम्. ए.**

( डॉ. दि. न. मोघे, नागपूर, विमानतळ अधिकारी, (यांच्या पत्नी)

नागपूर विमानतळ
१३।८।६४

चि. किशोर यांस आशीर्वाद.

तुम्हीं जी पुस्तिका प्रसिद्ध केली त्याबद्दल धन्यवाद ! कारण आण्णासाहेब बापटांसारखीं जीं रत्नें दडलेलीं असतात त्यांच्यासंबंधीं

एकत्रित माहिती अशी आमच्यासारख्या त्यांच्या चाहात्यांना पाहिजे असते. आम्ही तर त्यांना आमच्या व्यवहारी भाषेत 'देवमाणूस' म्हणूनच संबोधतों. त्यांचें आमचें नातें रक्ताचें नसलें तरी दाट अशा घरोब्याचें आहे.

(पत्र क्रमांक १४)

**श्री. हरि विनायक पाटसकर**

( माजी राज्यपाल, मध्यप्रदेश, भोपाळ )

श्री

राजभवन, भोपाळ
दि. १७।८।६४

सप्रेम नमस्कार.

माझे मित्र श्री. सदाशिवराव बापट यांचेबद्दलची पुस्तिका आपण पाठवली याबद्दल मी आपला मन:पूर्वक आभारी आहे. श्री. बापट यांनीं आपलें सर्व आयुष्य प्रसिद्धिविन्मुख राहून राष्ट्रकार्याकरितां खर्चीं घातलें. लो. टिळकांना त्यांनीं गुरुस्थानीं मानलें होतें. लोकमान्यांच्या आठवणींचे ३ भाग व लोकमान्यसूक्तिसंग्रह हे त्यांचें अपूर्व लेखन आहे. त्याकरतां देश त्यांचा सदैव ऋणी राहील. समकालीन म्हणून मी त्यांचें कार्य सतत पाहात आलों आहे व त्यांचे कार्याबद्दल मला नितांत आदर आहे.

(पत्र क्रमांक १५)

**श्री. सदाशिव कृष्ण बागूल**

( शिक्षक, आंजर्लें, रत्नागिरी )

श्री

आंजर्लें
१४।८।६४

नमस्कार.

दे. भ. आण्णासाहेब यांच्याविषयींची पुस्तिका आपण प्रसिद्ध केलीत ही फार महत्त्वाची गोष्ट झाली. पूर्वीपासून श्री समर्थभक्त पूज्य आण्णासाहेब हे 'सत्पुरुष' आहेत अशी माझी खात्री झाली आहे. त्यांचेवर श्रीसमर्थांची कृपा आहे. ते जेव्हां मला भेटताल तेव्हां मी त्यांना वडील भावनेनें नमस्कार करतों. कळावें.

(पत्र क्रमांक १६)

**श्री. पांडुरंग महादेव बापट –(पी. एम्. बापट)**

( सेनापति; माजी संपादक 'मराठा' पुणें )

श्री

दादर, मुंबई २८
२४।८।६४

नमस्कार.

'आण्णासाहेब बापट' हें पुस्तक साद्यंत वाचलें. आण्णासाहेब 'सत्पुरुष' आहेत यांत संशय नाहीं. माझा त्यांचा पुष्कळ परिचय होता व आहे. ईश्वरानें त्यांचेकडून फार चांगली कामगिरी करून घेतली. आनंद वाटतो तुम्हीं हें पुस्तक प्रसिद्ध करून मोठें पुण्यकर्म केलें आहे. या पुस्तकाच्या वाचनानें आण्णासाहेबांच्या सद्‌गुणांपैकीं कांहीं गुण कांहीं वाचकांस विदित होतील यांत शंका नाहीं.

(पत्र क्रमांक १७)

**श्री. दा. न. शिखरे**

( संचालक, महाराष्ट्र गांधी स्मारक निधि, पुणें )

श्री

गांधीभवन, कोथरूड,
पुणें ४
१४।८।६४

श्री किशोरराव बापट यांस नमस्कार.

माझे मित्र दे. भ. सदाशिवराव बापट यांचें चरित्र आपण प्रसिद्ध केलेंत याबद्दल धन्यवाद. तसेंच तें आपण मजकडे पाठवलेंत याबद्दल आभार. सदाशिवराव यांचा सहवासच काय पण त्यांचें साधें पत्रसुद्धां मला सज्जनगडावरील शीतल वायुलहरीप्रमाणें सदैव संतोष देत आलें आहे. त्यांना दीर्घायुष्य लाभो.

(पत्र क्रमांक १८)

श्री. कृ. ह. ढमढेरे

(वडे व्यापारी; विश्वस्त, लो. टिळक-स्मारक-मंदिर, पुणें).

।। श्रीगजानन ।।

दादर, मुंबई १४
दि. ५।८।१९६४

श्री. किशोरराव बापट यांसी सप्रेम नमस्कार.

आपण जें छोटें पुस्तक मला पाठविलें ते किती तरी बोलकें आहे ! मी आज कमींत कमी ८–९ वर्षांपासून श्री. सदाशिवराव यांस जवळून पाहात आहे. एक सन्मित्र म्हणून त्यांस मानत आलों आहे; पण त्यांचे पूर्वायुष्याबद्दल त्यांच्या विनम्र व मुग्ध स्वभावाप्रमाणें ते मजजवळ कधींहि बोलले नाहींत. टिळक-मंदिराच्या विश्वस्त मंडळीमध्यें जेव्हां मला स्थान देण्यांत आलें तेव्हां, मला श्री. सदाशिवरावांचा खरा परिचय होऊं लागला. तरी पण व्यक्तिगत स्वतःबद्दलचें ज्ञान त्यांनीं मला केव्हांच लवमात्र होऊं दिलें नाहीं, याचें मला आतां आदरपूर्ण आश्चर्य वाटत आहे. मी त्यांना संसारी सद्गृहस्थ मानीत आलों पण आपल्या देशाचाच खरा संसार सुसूत्र व्हावा, ही महत्त्वाकांक्षा बालपणापासून मनःपूर्वक इच्छिणारा व त्याप्रमाणें आजन्म त्या कार्यार्थ आपल्या कल्पनेप्रमाणें संपूर्णतया आपलें आयुष्य समर्पण करणारा, खराखुरा 'देशभक्त' हें अभिधान सार्थ करणारा असा थोर पुण्यात्मा आपला मित्र म्हणून आहे ही गोष्ट मीं पूर्वीं जाणलीच नव्हती. त्यांच्या स्वभावनिदर्शक गोष्टींत किंवा उल्लेख म्हणून जे या पुस्तकांत चित्रित केले गेले आहेत ते मी स्वानुभवानें अधोरेखित करूं शकतों.

खालील अवतरणांत माझें मनोगत व्यक्त करून हें पत्र मी संपवितों.

"स्वसुख निरभिलाषः खिद्यसे लोकहेतोः
प्रतिदिनमथवा ते वृत्तिरेवंविधैव ।"

(पत्र क्रमांक १९)

दे. भ. पुरुषोत्तम प्रभाकर तथा बापूराव जोशी

(टिळक-सांप्रदायाचे एकनिष्ठ व थोर अनुयायी, महाड)

।। श्री ।।

महाड,
दि. १६।८।१९६४

चि. प्रिय किशोर यांस सप्रेम आशीर्वाद.

कै. वासुदेवराव भावे यांनीं दे. भ. प्रिय आण्णांचेबद्दल 'स्वराज्यांत' छापलेला लेख पुन्हा एका पुस्तिकेंत छापून तूं प्रसिद्ध केलास यास मोल नाहीं. त्याबद्दल तुला धन्यवाद! कारण वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालेली माहिती जनतेच्या स्मरणांत फार दिवस राहात नाहीं. परंतु तीच लहान अगर मोठ्या पुस्तकरूपानें छापल्यास तिला चिरस्थायी स्वरूप येतें. आतां 'सत्पुरुष'—संतकोटींतल्या प्रिय आण्णांचें बहुतेक जीवनरहस्य मला व माझ्यासारख्या त्यांच्या निकटच्या थोड्या स्नेह्यांना माहीत आहे. ही गोष्ट निराळी ... ... ... प्रिय आण्णांच्या सद्‌गुणाचा वारसा तुझ्याकडेच येणार आहे तेव्हां तो वारसा त्यास शोभेशा रीतीनें तूं आपल्या शक्ती-प्रमाणें पुढे चालवशील अशी माझी खात्री आहे.

(पत्र क्रमांक २०)

श्री. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

(महामहोपाध्याय; ग्रंथकार, पुणें)

।। श्री ।।

जंगली-महाराज रोड, पुणें ४
दि. १६।८।६४

कृ. न. वि. वि.

श्री. बापट यांना मी अगदीं जवळून पाहात आलों आहे. त्यांची निष्ठा, आठवणीग्रंथाबाबत विश्वप्रयत्न व दक्षता इत्यादि मला आदर्श वाटतात. लो. टिळकांनीं निर्माण केलेले असे मिशनरी लोक आतां दुर्मिळ होत चालले याबद्दल खेद होतो. जगाचा गाडा कांहीं थोर पुरुषांच्या तपश्चर्येवर चाललेला असतो. त्यांपैकीं दे. भ. आण्णा आहेत. त्यांना आयुरारोग्य, शांतता लाभो.

(पत्र क्रमांक २१)

**डॉ. वा. वि. आठल्ये**

(काँग्रेस पक्षाचे प्रमुख पुढारी, सातारा)

।। श्री ।।

राजवाडा-पथ, सातारा
दि. १७।८।६४

सा. न. वि. वि.

माझे जुने मित्र श्री. सदाशिवराव बापट यांची पुस्तिका आपण प्रसिद्ध केलीत ही फारच चांगली गोष्ट झाली. १९०७ मध्यें त्यांचा परिचय प्रथम झाला. त्या घटनेस ५७ वर्षें झालीं. त्यांचें सर्व जीवन निष्ठेनें, सत्प्रवृत्तीनें व विशेषत: देशभक्तीनें भरलेलें आहे. इतकीं निर्मळ माणसें क्वचितच आढळतात. विशेष स्तुति करीत नाहीं. ते इकडे कधीं आले तर भेटल्याशिवाय परत जाऊं नका असें त्यांना आवर्जून सांगावें.

(पत्र क्रमांक २२)

**श्री. के. ना. वाटवे**

(माजी प्राध्यापक सर परशुरामभाऊ कॉलेज, पुणें)

'योगकुंज'
टिळकरोड, पुणें
दि. १८।८।६४

सप्रेम नमस्कार

आपण अगत्यपूर्वक पाठविलेला दे. भ. बापटांचा अल्प परिचय वाचला. आनंद झाला. मला तुमचा हा उपक्रम फार आवडला. यानें नवीन पिढीस दे. भ. बापटांच्या त्यागाची व देशभक्तीची चांगली कल्पना येईल. म्हणून तुमचें हें सत्कृत्य होय.

(पत्र क्रमांक २३)

श्री. रा. श्री. जोग

(माजी प्राध्यापक, फर्ग्युसन कॉलेज, पुणें)

॥ श्री ॥

जोग बंगला, पुणें ४
दि. १८।८।१९६४

सप्रेम नमस्कार

दे. भ. सदाशिवराव बापट यांच्याविषयींची पुस्तिका वाचली. त्यांच्याविषयीं माझ्या मनांत फार आदर आहे. त्यांनीं केलेलें देशकार्य फार मोठें मोलाचें झालें यांत शंका नाहीं. आज त्याचें मूल्य फारसें ओळखलें जात नसलें तरी त्यांच्या कार्याची व त्यांची योग्यता कमी होत नाहीं. त्यांना त्यांच्या नियत उर्वरित आयुष्यांत शरीराचें व मनाचें स्वास्थ्य परमेश्वरानें द्यावें.

(पत्र क्रमांक २४)

श्री. गोपाळ शंकर देडगांवकर

(कार्याध्यक्ष, पुणें सार्वजनिक सभा)

॥ श्री ॥

गंजपेठ, पुणें २
दि. १९।८।१९६४

नमस्कार

'दे. भ. आण्णासाहेब बापट' हें पुस्तक मिळालें. पुस्तकाचे मूल्याप्रमाणें 'समूळ-साद्यंत' तें वाचलें. खरोखर आनंद झाला. या पुस्तकाची नितांत आवश्यकता होती. रा. आण्णासाहेब यांनीं पूर्वीं अत्यंत परिश्रम घेऊन देशासाठीं व्याख्यानांचे दौरे काढून, जीवाची पर्वा न करतां देशसेवा केली आहे व अद्यापिहि तें कार्य चालू आहे. धन्य त्यांची !

(पत्र क्रमांक २५)
डॉ. शंकर दामोदर पेंडसे
(प्राध्यापक, ग्रंथकार, नागपूर)

हिंदु-संस्कृति-गृह
नागपूर—१
दि. २०।८।१९६४

नमस्कार

दे. भ. आण्णासाहेब बापट यांचेबद्दलची पुस्तिका वाचली. आपल्या स्वार्थत्यागी, तपस्वी व देशभक्त चुलत्यांबद्दल आपणांस वाटणारा आदर व कृतज्ञता व्यक्त केलीत म्हणून अभिनंदन. पुस्तक आम्हीं दोघांनीं (मीं व सौ. मालतीबाई यांनीं) वाचलें. त्यांत श्री. सदुभाऊंचें यथार्थ वर्णन केलें आहे. तें वाचून फारच आनंद झाला. या बाबतींत जितकें लिहावें तितकें थोडें आहे. त्यांस आमचे दोघांचे सादर नमस्कार.

(पत्र क्रमांक २६)
श्री. ग. गो. (काका) कारखानीस
(अस्पृश्योद्धारक; श्रीसमर्थ व संत वाङमयाचे गाढे अभ्यासू, विजापूर)
।। श्रीराम समर्थ ।।

विजापूर
दि. २०।८।१९६४

श्री. किशोरराव बापट यांस नमस्कार.

पुण्यास कॉलेजमध्यें मी असतांनाच आण्णासाहेबांविषयीं मीं थोडेंबहुत ऐकलें होतें. पुढें लोकमान्यांच्या आठवणींमुळें तर ते माझ्या कायमचेच माझ्यापुढें आहेत. तेंच त्यांचें अजरामर स्मारक. यानेंच ते महाराष्ट्र-वाङमयांत जवळजवळ चिरंजीव आहेत. लोकमान्यांच्या कोठल्याहि चरित्रा-पेक्षां बापट संपादित आठवणी यांस मी लोकमान्यांचें खरेंखुरें चरित्र समजत आलों आहे. लोकमान्यांचें विश्वरूप-दर्शन सत्यत्वानें त्यांतच होतें. बापटांचा माझा प्रत्यक्ष परिचय मुळींच नाहीं म्हटला तरी चालेल. त्यांचें एकदां दर्शन व्हावें अशी मात्र उत्कट इच्छा आहे. श्रीकृपेनें केव्हां योग

येईल तेव्हां खरा. बापटांचें सविस्तर चरित्र झालें तर पाहिजे आहे. पण तें कदाचित् न लिहिलें गेलें तरी हरकत नाहीं. कारण सहृदय व जाणत्या लोकांसमोर ते आपल्या आठवणींनीं आहेतच.

(पत्र क्रमांक २७)

**श्री. रा. स. भट**

(हिंदुमहासभेचे कार्यकर्ते, पुणें)

७७३ सदाशिव पेठ, पुणें २
दि. २१।८।१९६४

नमस्कार.

पुस्तिका वाचली. आण्णासाहेब यांनीं देशहितार्थ केलेला अपूर्व त्याग व कार्य यामुळें त्यांचें चरित्र होऊं शकेल. विशेषतः सार्वजनिक काम करणाऱ्या कार्यकर्त्यांस आपल्या परिचयामुळें आपलें कार्य पुढें चालविण्यास प्रोत्साहन मिळण्याचे दृष्टीनें परिचय पुस्तिका अमोल वाटते. एवढ्या दीर्घकालीन विविध प्रसंगांनीं भरलेल्या सार्वजनिक आयुष्यांत परान्न ग्रहण न करण्याचा निश्चय तडीस नेणारा आण्णासाहेबांचा निश्चय अभिनंदनीय व अनुकरणीय नाहीं असें कोण म्हणेल? या देशांतील असंघटित हिंदु-समाजांत संघटना निर्माण होऊन हिंदूंचें एक बलशाली राष्ट्र व्हावयाचें तर दे. भ. आण्णासारखे मिशनरी वृत्तीचे प्रचारक लाभल्यास हिंदूंचा दरारा सर्व जगांत निर्माण होऊं शकेल असें त्यांचें कार्यवृत्त वाचून वाटतें.

(पत्र क्रमांक २८)

**डॉ. गजानन बाळकृष्ण पळसुले**

(एम्. ए., पी एच्.डी., संस्कृत-विद्या-प्रवीण)

॥ श्री ॥

५९३ सदाशिव पेठ, पुणें २
दि. ११।८।१९६४

नमस्कार

तीर्थस्वरूप आण्णांची परिचय-पुस्तिका वाचली. आण्णांच्यासारख्या प्रसिद्धिविन्मुख देव माणसाचा अल्प का होईना परिचय करून देऊन आपण

फार मोठें सत्कार्य केलें आहे. आण्णांचा निरलस, निगर्वी व सात्त्विक स्वभाव, त्यांची परोपकारपरता, दुसऱ्यांना यत्किंचितहि न दुखवितां कसोशीनें आपलें तत्त्व पालन करण्याचा करारीपणा, निरहंकार, थोडक्यांत म्हणजे त्यांच्या या दैवी संपत्तीचा जगाला त्यांनींच होऊं न दिल्यामुळें परिचय नाहीं. आपण तो करून दिलांत हें मोठें कार्य झालें. बरींच वर्षें त्यांच्याशीं संबंध येऊनहि मला माहीत नसलेले त्यांचे कांहीं विशेष या पुस्तिकेमुळें माहीत झाले. कळावे ही विनंति.

आपला

**गजानन**

(पत्र क्रमांक २९)

**श्री. गणपत महादेव नलावडे**

(माजी अध्यक्ष व महापौर, पुणें महानगरपालिका व अध्यक्ष, पुणें सार्वजनिक सभा)

१६ बुधवार, पुणें २
दि. ११।८।६४

सप्रेम रामराम. विशेष.

आण्णाराव यांचेबद्दलचें पुस्तक माझ्या हातीं पडतांच त्याचें आनंदानें साद्यंत वाचन केलें. नि तें माझ्या विशिष्ट ठेवण्याच्या पिशवींत घालून संग्रहीं ठेविलें. माझा नि आण्णांचा कमींत कमी ४५ वर्षांचा परिचय आहे. मी त्यांच्याच पक्षांत वागलों नि वाढलों आहे. त्यांच्याइतकी माहिती असणारा मनुष्य पुण्यांतच काय पण महाराष्ट्रांतहि सांपडणार नाहीं. लोकमान्यांचे ते ज्येष्ठ नि श्रेष्ठ शिष्य आहेत. त्यांचें नि माझें राजकीय घराणें, वंश एकच आहे. तेव्हां श्री. आण्णांसंबंधींची माझी श्रद्धा व भावना मी शब्दांनीं वर्णन करणें अशक्य आहे.

(पत्र क्रमांक ३०)

श्री. हरि मोरेश्वर जोशी

(कॉंग्रेस कार्यकर्ते, मुंबई)

४१६ मॅजेस्टिक हॉटेल,
मुंबई १
दि. १२।८।६४

सप्रेम नमस्कार

आण्णासाहेब बापट यांच्या माहितीची उपयुक्त पुस्तिका वाचली. बहुतेक अबोल क्रांतिकारकांप्रमाणेंच सदुभाऊ यांची प्रवृत्ति आहे व त्यामुळें त्यांच्या खऱ्या कार्याविषयीं किंवा त्यागाविषयीं कांहीं माहिती त्यांच्याकडून कळणें कठीण काम आहे! त्यांचे सहकारी अगर समकालीन यांचेकडून कांहीं माहिती मिळणें शक्य होईल म्हणून तसा प्रयत्न व्हावयास पाहिजे. पण जेवढी माहिती मिळाली तेवढी माहिती वापरून तुम्हीं पुस्तिका प्रसिद्ध केलीत हें मराठी वाचकांवरील ऋणच आहे. सदुभाऊंना मी गेलीं ४० वर्षें ओळखतों पण त्यांचे तोंडून त्यांच्या स्वतःच्या कार्याविषयीं चुकूनहि कधीं ऐकलेलें नाहीं. केवळ एक स्वयंसेवक व टिळकभक्त अशी नम्र भूमिका त्यांची असे. पण १९०६–१४ या काळांत त्यांची देशभक्ति, देशसेवा ही सामान्य नव्हे. नाशिक खटल्यांतून ते बचावले हें त्यांना आलेल्या शिर्डीच्या पत्रासारखेंच चमत्कारासारखें आहे. १९०८ सालच्या टिळकांच्या खटल्यांतील कांहीं श्रेष्ठ अधिकाऱ्यांच्या खुनाच्या अज्ञात कटांत ते होतेच. पोलिसांना ते सांपडले तर त्यांना जन्मठेपच झाली असती यांत शंका नाहीं. तात्पर्य, त्यांची देशभक्ति जशी उग्र व उज्ज्वल, तसेंच त्यागाची तयारी मोठी होती हें ओळखून त्यांच्या कार्याचें मापन आपण केलें पाहिजे. त्यांचें त्यागी जीवन हें स्फूर्तिदायक असेंच आहे. या पुस्तिकेंतील त्रोटक माहिती वाचून सदुभाऊंच्याबद्दल अधिक माहिती कशी मिळेल याची चुटपुट लागून राहिली आहे. मिळेल तेव्हां खरी, कळावें.

(पत्र क्रमांक ३१)

**श्री. यशवंत दि. पेंढारकर**

(महाराष्ट्र राजकवि, पुणें)

१९६।३४ सदाशिव,
पुणें २. दि. ३१।८।६४

नमस्कार.

दे. भ. आण्णासाहेब यांचेविषयींची गोड पुस्तिका वाचली; हें कळविण्या-साठींच हें पत्र लिहीत आहे. पुस्तिकेनें आण्णासाहेबांच्या चारित्र्याची आणि कार्याची चांगली कल्पना आली. या सत्पुरुषास प्रभु रामचंद्रानें उत्कृष्ट आरोग्य आणि दीर्घायुष्य द्यावें अशी प्रार्थना आहे. अशा सत्पुरुषांच्या वास्तव्यानें परिसर पावन व प्रभावित होतो. हा लाभ अधिकांत अधिक घडावा.

(पत्र क्रमांक ३२)

**श्री. पंडितराव दांडेकर**

(किर्लोस्करांचे अधिकृत विक्रेते व व्यापारी, सांगली)

सांगली
दि. १।९।६४

नमस्कार

श्री. सदाशिवराव यांची माहिती महाराष्ट्रांतील सामान्य टिळकभक्तांना अगर हिंदुत्वनिष्ठांना नाहीं असें म्हणतां येणार नाहीं. टिळकांच्या राष्ट्रीय उपासनेच्या दिव्याग्नींतूनहि बावनकशी सुवर्णाची लगड आपल्या भक्तीच्या कसाला उतरून व प्रशस्तिपत्रें घेऊन बाहेर आली असली तरी त्यावर अनेक-विध राष्ट्रीय गुणांचा व सात्त्विक भावांचा साज चढविला आहे व त्या अमूर्त सोन्याला अलंकाराचें स्वरूप दिलें आहे हें या पुस्तिकेनें स्पष्ट केलें आहे. म्हणून त्यांचेबद्दलचा आदरभाव त्यांचा उज्ज्वल जीवनपट पाहून दुणावल्याशिवाय राहात नाहीं. सात्त्विक मनोवृत्तीचा पिंड, शुद्ध आचरणाचा पाया, प्रखर ब्रह्मचर्याचें व्रत व राष्ट्रीय सेवेची महत्त्वाकांक्षा या गुणांचें लोण पुढील पिढयांनीं त्यांचेकडून घ्यावें अशी त्यांची योग्यता आहे.

(पत्र क्रमांक ३३)

**श्री. स. के. नेऊरगांवकर**

(माजी इंजिनियर, पुणें महानगरपालिका, वारकरी सांप्रदायाचे पुढारी. ती० आण्णांचे नावानें आलेलें हें पत्र त्यांनीं मला दिलें)

ॐ श्री ज्ञानदेव

१४१ कसबा,
पुणें २
दि. ९।९।६४

कृ. सा. न. वि. वि.

पुस्तिका समग्र वाचली. सात्त्विक भाव उत्पन्न झाला...आपले महाराष्ट्रांतील पुढील पिढयांवर अनंत उपकार आहेत. तुमच्या पुतण्यानें आपली माहिती प्रसिद्ध केली. हें त्याचें खरें सत्कर्म आहे. आपणासारखी अयाचित्व पाळणारी माणसें आपले गुण लपविणार. पण देव कोणाला तरी प्रेरणा देतो. पुतण्यानें काकांची सेवा तर केलीच, पण समाजाचीहि केली आहे यांत शंका नाहीं.

(पत्र क्रमांक ३४)

**डॉ. सीताराम शंकर जोशी**

(प्रिन्सिपॉल, आंबेडकर कॉलेज, महाड)

श्री

हल्लीं मुक्काम जुनागड
दि. ७।१०।६४

नमस्कार

ती. आण्णांची विशेष माहिती पुस्तिकेंत आहे. पण त्यापेक्षांहि बरीच माहिती मला त्यांचे परमस्नेही व माझे चुलते ती. बापूरावांकडून कळली आहे. त्यांच्या पूर्वायुष्यापेक्षांहि त्यांचा स्वभाव, राहणी व विचारसरणी यांचाच माझ्या मनावर फार परिणाम झालेला आहे. स्थितप्रज्ञावस्थेंत पोहोंचलेल्या माणसाचें गुणवर्णन केले न केले तरी त्यांना तें सारखेंच, परंतु आदर्श म्हणून समाजापुढें सदैव असावें याच हेतूनें मी त्यांना दीर्घायुष्य व मुख्यतः आरोग्य चिंतितों.

(पत्र क्रमांक ३५)

**श्री रा. गो. तथा बाबूराव भिडे**

(ग्रंथकार, होमरूल लीगमधील माजी कार्यकर्ते, माजी सहसंपादक केसरी, पुणें)

३६७ शनिवार पेठ, पुणें २
दि. १७।१०।६४

नमस्कार

माझे स्नेही दे. भ. सदाशिवराव यांचें छोटें चरित्र वाचून फार आनंद झाला. वस्तुतः त्यांनीं आपलें आत्मचरित्रच लिहावयास पाहिजे. तें नव्या पिढीला खात्रीनें मार्गदर्शक होईल. परंतु त्यांच्या भिडस्त व संकोची वृत्तीनें तें होईलसें वाटत नाहीं. तुमच्यासारख्या अत्यंत निकटच्या आप्तानेंच हें कार्य केलें पाहिजे. १९१६ पासून त्यांचा माझा निकटचा परिचय. त्यामुळें त्यांच्या सद्‌गुणांची ओळख मला पूर्ण आहे. विशेषतः लोकमान्यांच्या साहित्यसंकलनाबद्दल त्यांनीं घेतलेल्या अविश्रांत परिश्रमाची मला पूर्ण कल्पना आहे. हेंच त्यांचें अमर स्मारक आहे. त्यांच्या या छोट्या चरित्रानें भूक भागत नाहीं म्हणून त्यांचें विस्तृत चरित्र लिहून महाराष्ट्राची भूक शमविण्याचें पुण्य घ्यावें.

(पत्र क्रमांक ३६)

**श्री. दिवाकर पुरुषोत्तम धुपकर**

(हायकोर्ट वकील, मुंबई)

ठाकुरद्वार, मुंबई २
२६।१०।६४

नमस्कार

पुस्तक मिळालें. समग्र काळजीपूर्वक, प्रेमानें वाचलें. अति आनंद झाला. कारण बापट हे कमालीचे 'प्रसिद्धिविन्मुख'. तेव्हां अशा या थोर देशभक्ताची जनतेस ओळख करून देण्याचा तुम्हीं जो हा प्रयत्न केला त्याबद्दल महाराष्ट्र तुमचा ऋणी आहे. आण्णासाहेब हे मोठे भाग्यवान; कारण त्यांना लोकमान्य टिळकांसारख्या युगपुरुषाचा निकट सहवास लाभला....राजकीय क्षेत्रांत त्यांची कामगिरी विशेष आहे हें या पुस्तकावरून सिद्ध होतें.

(पत्र क्रमांक ३७)

"वाङ्मयशोभा" पुणें (ऑक्टोबर १९६४)

ती. आण्णा बापट हे पुण्यांतल्या नवीन पिढीला फारसे माहीत नसले तरी मागल्या दोन पिढ्यांतल्या सुशिक्षित लोकांपैकीं अनेकांना ते विशेष परिचित आहेत. पण बापट माहीत असले तरी त्यांची माहिती मात्र त्यांच्या प्रसिद्धिविन्मुख स्वभावामुळें फारच थोड्यांना असेल.

....आण्णासहेब हे 'केसरी'चे भक्त असून त्यांनीं पुणें सार्वजनिक सभा या संस्थेमार्फत अमोल देशसेवा केली. देशासाठीं त्यांनीं तुरुंगवासहि भोगला. पण या सगळ्यापेक्षां आण्णा आम्हांला विशेष माहीत आहेत ते त्यांच्या हंसतमुख, प्रेमळ, निर्लोभी व्यक्तिमत्त्वाकरितां. या पुस्तिकेच्या अखेरीस त्यांना 'सत्पुरुष' म्हटलें आहे तें अगदीं खरें आहे

(पत्र क्रमांक ३८)

श्री

प्रा. डॉ. ग. त्र्यं. सहस्रबुद्धे
(नागपूर विद्यापीठाचे प्राध्यापक)

२५७ नवी रामदास पेठ,
जोशी बंगला, नागपूर
१३।१।६५

नमस्कार.

ती. आण्णासाहेब यांची पुस्तिका वाचली. अति आनंद झाला. त्यांना ज्या थोर थोर व्यक्तींचा सहवास लाभला त्यांचें आम्हांस तर दर्शनहि घडलें नाहीं; परंतु ज्या पुण्यपुरुषांची योग्यता साऱ्या राष्ट्राला उजळून टाकण्याइतकी मोठी होती त्यांच्या कार्यक्षेत्रांत वास करण्याचें भाग्य त्यांना लाभलें हें कांहीं कमी नाहीं. लोकमान्यांच्या महाविभूतीच्या विश्वासाला पात्र ठरलेल्या ज्या थोर व्यक्ति आहेत त्यांत आण्णासाहेब अग्रस्थानीं आहेत. त्यांचा कृपालोभ आणि आशीर्वाद आम्हांला दीर्घकाळ मिळत राहावेत. मला त्यांनीं मित्र म्हटलें तरी वडीलधारे, मायाळू आप्त अशीच माझी त्यांचेबद्दल भावना आहे.

आपला

ग. त्र्यं. सहस्रबुद्धे

पत्रव्यवहार-समाप्त

## ती. आण्णासाहेब बापट यांच्या गाजलेल्या प्रचार वृत्तान्ताचीं स्वतंत्र पुस्तकें

'पुणें सार्वजनिक सभा' 'लो. टिळक स्मारक ट्रस्ट' या संस्थांचे ती. आण्णासाहेब चिटणीस असल्यामुळें 'पुणें सार्वजनिक सभेतर्फे' बारा वर्षे व 'लो. टिळक स्मारक ट्रस्ट' तर्फे सहा वर्षे महाराष्ट्रांत त्यांनीं आपल्या आवडीचें मोठ्या धडाडीनें प्रचारकार्य केलें. हें विशेष प्रचारकार्य इंग्रजशाहींत झालें. त्या वेळेला या प्रचारकार्याचें विशेष महत्त्व होतें. त्या वेळच्या पुढारी मंडळींनीं, वर्तमान-पत्रकारांनीं त्यांचा मनोसोक्त पुरस्कार केला. यामुळें त्यांचा खूप बोलबाला झाला. दरवर्षी आपल्या प्रचार कार्याचा वृत्तान्त वरील संस्थांकडे आण्णासाहेब पाठवीत असत. व नंतर पुस्तक-रूपानें तो प्रसिद्ध होई. अशा रीतीनें तीं सर्व पुस्तकें स्वतंत्र रूपानें छापिलीं असल्यामुळें त्यांचें प्राचंडच लक्षांत घेऊन या ग्रंथांत त्यांचा समावेश करणें किंवा तीं पुस्तकें संक्षिप्त रूपानेंहि देणें अगदीं अशक्य होय हें उघड आहे.

— संपादक

ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत
अनुक्रम ४०७८२ वि: अरि
८८० २८।१।५
दा. क्र. १४४७९

# गुरु-शिष्य यांच्या आठवणी व चरित्र
# पत्रांची वर्णानुक्रमानुसार
# सूची

## पत्रव्यवहार : भाग १


| क्रमांक | पत्रलेखक | पृष्ठ | पत्रक्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अणे माधव श्रीहरि | ५१७,५२७ | ३,११ |
| २ | किंजवडेकर श्रीपादशास्त्री | ५३६ | २२ |
| ३ | केळकर य. न. | ५४१ | २८ |
| ४ | खापर्डे गणेश कृष्ण | ५२१,५२३,<br>५३१ | ६,८,१४ |
| ५ | खेर बाळ गंगाधर | ५३३ | १७ |
| ६ | गोखले दामोदर विश्वनाथ | ५३५ | १९ |
| ७ | गोडबोले केशव विनायक | ५३४ | १८ |
| ८ | टिळक जयंतराव श्रीधर | ५३७ | २३ |
| ९ | ढमढेरे कृष्णाजी हरि | ५३५,५३८ | २०,२५ |
| १० | दाते शंकर रामचंद्र<br>(मामा दाते) | ५३०,५४३ | १३,३१ |
| ११ | दामले शिवराम विष्णु | ५३९ | २६ |
| १२ | देव शंकर श्रीकृष्ण | ५३१ | १५ |
| १३ | देशपांडे डॉ. कमलाबाई | ५४३ | ३० |
| १४ | देशपांडे गंगाधर बाळकृष्ण | ५२४ | ९ |
| १५ | घारप काशीनाथ नारायण | ५१९ | ५ |
| १६ | नेऊरगांवकर स. के. | ५३८ | २४ |
| १७ | परुळेकर ना. भि. | ५४२ | २९ |
| १८ | पटवर्धनबोवा द. वि. | ५३२ | १६ |

| क्रमांक | पत्रलेखक | पृष्ठ | पत्रक्रमांक |
|---|---|---|---|
| १९ | पोतदार दत्तो वामन | १० | ५२५ |
| २० | फडके दत्तात्रय गोपाळ | २१ | ५३६ |
| २१ | बापट पां. म. (सेनापति) | ३२ | ५४४ |
| २२ | बेळवी दत्तात्रय व्यंकटेश | ७ | ५२२ |
| २३ | भावे वासुदेव कृष्ण | १,१२,२७<br>२,४ | ५१६,५२९,<br>५४१ |
| २४ | लवाटे शंकर गणेश | ३३,३४,३५ | ५१७,५१८ |
| २५ | सावरकर विनायक दामोदर | | ५४५,५४६,<br>५४७ |


**ती० आण्णासाहेब यांच्या संबंधानें मी (संपादक) पूर्वी प्रसिद्ध केलेल्या 'परिचय-पुस्तिके'चे बाबतींत आण्णासाहेब यांचेविषयी मला आलेल्या पत्रांपैकीं निवडक व महत्त्वपूर्ण कांहीं पत्रें :—**

# सदर पत्रांची वर्णानुक्रमानुसार सूची

## पत्रव्यवहार भाग २


| क्रमांक | पत्रलेखक | पृष्ठ | पत्रक्रमांक |
|---|---|---|---|
| १ | आठल्ये वा. वि. | ५६२ | २१ |
| २ | काळे दिनकर विनायक<br>(इतिहास संशोधक) | ५५४ | ६ |
| ३ | कारखानीस ग. गो.<br>(अस्पृशोद्धारक) | ५६४ | २६ |
| ४ | केळकर य. न.<br>(इतिहास संशोधक) | ५५२ | ४ |
| ५ | केळकर विठ्ठलराव नारायण | ५५३ | ५ |

| क्रमांक | पत्रलेखक | पृष्ठ | पत्रक्रमांक |
|---|---|---|---|
| ६ | खरे नाथराव | ५५५ | ९ |
| ७ | गोडबोले केशव विनायक (रावबहादूर) | ५५० | २ |
| ८ | घारपुरे न. का. (डॉ. प्रो.) | ५५६ | ११ |
| ९ | चित्राव सिद्धेश्वरशास्त्री (महामहोपाध्याय) | ५६१ | २० |
| १० | जोग रा. श्री. (प्राध्यापक) | ५६३ | २३ |
| ११ | जोशी पुरुषोत्तम प्रभाकर (पुढारी हिंदु म. सभा) | ५६१ | १९ |
| १२ | जोशी रघुनाथ दुर्गाराम (रामदासी) | ५५७ | १२ |
| १३ | जोशी सीताराम शंकर (प्रिन्सिपॉल) | ५६९ | ३४ |
| १४ | जोशी हरि मोरेश्वर (कॉंग्रेस सेवक) | ५६७ | ३० |
| १५ | ढमढेरे कृष्णाजी हरि (बडे व्यापारी) | ५६० | १८ |
| १६ | दांडेकर पंडितराव (हिंदुसभा कार्यकर्ते) | ५६८ | ३२ |
| १७ | दामले शिवराम विष्णु (चालक, महाराष्ट्रीय मंडळ) | ५५६ | १० |
| १८ | देडगांवकर गोपाळ शंकर | ५६३ | २४ |
| १९ | देशपांडे डॉ. कमलाबाई | ५५१, ५५२ | ३ |
| २० | धुपकर दिवाकर पुरुषोत्तम (ॲडव्होकेट) | ५७० | ३६ |
| २१ | नलावडे गणपत महादेव (माजी महापौर पुणे-म. न. पा.) | ५६६ | २९ |
| २२ | नेऊरगांवकर स. के. (इंजिनियर) | ५६९ | ३३ |
| २३ | पळसुले गजानन बाळकृष्ण (एम्.ए., पीएच्.डी.) | ५६५ | २८ |

| क्रमांक | पत्रलेखक | पृष्ठ | पत्रक्रमांक |
|---|---|---|---|
| २४ | पाटसकर हरि विनायक (माजी राज्यपाल) | ५५८ | १४ |
| २५ | पेंडसे शंकर दामोदर (प्राध्यापक) | ५६४ | २५ |
| २६ | पेंढारकर य. दि. (महाराष्ट्र कवि) | ५६८ | ३१ |
| २७ | बागुल स. कृ. (शिक्षक) | ५५८ | १५ |
| २८ | बापट पां. म. (सेनापति) | ५५९ | १६ |
| २९ | भट दामोदर मोरेश्वर (हिंदुमहासभा कार्यकर्ते) | ५५५ | ८ |
| ३० | भट रा. स. (हिंदुमहासभा-कार्यकर्ते) | ५६५ | २७ |
| ३१ | भिडे रामकृष्ण गोपाळ (ग्रंथकार) | ५७० | ३५ |
| ३२ | मोघे सौ. कुमुदिनी, एम्.ए. | ५५७ | १३ |
| ३३ | लिमये वि. प्र. (प्राध्यापक) | ५५४ | ७ |
| ३४ | वाटवे के. ना. (प्राध्यापक) | ५६२ | २२ |
| ३५ | वेलणकर कृ. ल. (शीघ्र-कवि) | ५४९ | १ |
| ३६ | वाङ्मयशोभा मासिक | ५७१ | ३७ |
| ३७ | शिखरे दा. न. ( संचालक, गांधी-स्मारक निधि) | ५५९ | १७ |
| ३८ | सहस्रबुद्धे म. त्र्यं. (डॉ. व प्रोफेसर) | ५७१ | ३८ |


REFBK-0014471

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ... ७७४८२ ... वि: ५।२।७१
क्रमांक ... ८८० ... नों दि: २८।१।७५